कविकुलगुरू - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

M-3014

शिर्षक	ग्रंथकार	विषय	विस्तार (पुर्ण/ अपूर्ण)	टिकाकार	आकार	पृष्ठे	लिपी	सामग्री	Lines per page	Letters per line	Condition & age (शके/विक्रम सवंत)	Additional Particulars / Remark
भागवद टिका	-	धर्मशास्त्र	अपूर्ण	-	6/12	४२०	संस्कृत	कागद	15	25		

कृष्णस्वामिने नमः ॥ कैवल्यसुखाचें पारणें ॥ प्रणता जयाच्या पादस्मरणें ॥
तो गोविंदसद्गुरु अंतःकरणें॥ सप्रेमध्यानें कवळिला ॥ १ ॥ स्वस्वरूपाच्या विमुखपणें ॥ जीवा कैवल्यसुख नेणणें ॥ बाह्यविषयांचेनि भानें ॥ संतत शिणणें
सुखलाभा॥२॥लक्षचौऱ्यांशीं योनींप्रति॥वाहतां विषयांची सुखावाप्ति॥ इच्छूनि भवोद्भवें भरती ॥ दुःखदुर्गतीमाजि वडे ॥ ३ ॥ सर्वयोनींमाजि ज्ञान ॥ सांचल[1]सूचकध्वनिबोधन ॥ तैसेंचि स्पर्शतें
वेदन ॥ खेद मोदन परस्परें ॥ ४॥ तैसेंचि सर्वांठायीं चक्षु ॥रूपमात्र शकती लक्षूं ॥ जातिविषयें सुखोत्कर्षु ॥
क्लेशविशेषभय बोधें ॥ ५ ॥ तैसीच नैसर्गिक रसना ॥ जातिवैशिष्ट्यें रसज्ञा ॥ जाणे आणि अवघ्राणा ॥ घ्राणकोविद निसर्गें ॥ ६ ॥ आहार निद्रा भय मैथुन ॥ सर्वेंद्रियीं इतुकेंचि ज्ञान ॥ भूत भविष्य वर्तमान ॥ पाप पुण्य अनो[illegible]ख ॥ ७ ॥ इहामुष्मिक पारावार ॥ वेदशास्त्र कुलाचार ॥ वृत्ति व्यवसाय अहंकार ॥ दीर्घतर सं[illegible]ह
॥ ८ ॥ इत्यादि बोधनाहीं त्यांसी ॥ विमुख तुरीयेच्या प्रवेशीं॥ जागृतिस्वप्नसुषुप्तींपाशीं ॥ निबद्ध जालीं ग[illegible]कमैं ॥ ९ ॥ सर्पीं नेत्रेंचि ऐकावें ॥ पश्वादी[2] घ्राणें वोळखावें ॥ मयूरीं नेत्रेंचि रमावें ॥ पदीं सेवावें उद्भिज्जें[3] ॥ १०
ऐसिया अनेक योनी प्रती ॥ विपरीत अनेक इंद्रियवृत्ति ॥ नैसर्गिक विषयप्रवृत्ति ॥ साधनसंपात्ति त्यां कैंची ॥ ११
बहुत पशु होऊनि एक ॥ आदरें घेती काय श्रवणसुख ॥ वक्ता बैसवूनि सम्मुख ॥ ज्ञाता सम्यक पशुवर्य ॥ १२

---

[1] चाहुल. [2] पशुइत्यादिकांनीं. [3] तरुगुल्मादिकांनीं.

जाणोनि आयुर्दायविशेष ॥ सर्प नकरिती योगाभ्यास ॥ चिरायु क्रमिती गगनास ॥ परी यात्रा वायसें नकरिता ॥
॥ १३ ॥ हस्तपादादिसंपन्न ॥ ह्मणोनि रीसवानरगण ॥ नकरिती वेदशास्त्रपठण॥ कर्माचरन श्रौतादि ॥ १४॥
एवमादि सर्वजाति ॥ तुरीयबोधेंचि वर्तती ॥ अनुपरमें तुरीयस्थिति ॥ दुर्लभ त्यांप्रति सर्वत्र ॥ १५ ॥ ह्मणोनि
नखंडे जन्ममरण ॥ आणि नवाढेचि क्रियमाण ॥ प्रारब्ध मात्र होय क्षीण ॥ वर्ष्मपतनपर्यंत ॥ १६ ॥ ऐसें अनेक
जन्म घेतां ॥ वेंचिती आगळ्या संचिता ॥ पापपुण्या ये तुल्यता ॥ तैं लाभे तत्त्वता नरदेह ॥ १७ ॥ ऐसा
नरदेह अवचट जोडे ॥ तेथही विषयसुखाचे चाडे ॥ कर्माचरण करूनि कुडें ॥ भोगिती बापुडे दुर्योनि ॥ १८ ॥
लाहोनियां नरदेह सार ॥ निर्दय हिंसक ढीवर॥ निषादादि परमक्रूर॥ पुन्हा अघोर नारकी ॥१९ ॥ एक तृणकाष्ठा
छेदक ॥ एक कृषीवळ भूकर्षक ॥ शिल्पिक नापिक कारुक ॥ वार्धुषिक नटकादि ॥ २० ॥ पोषिती व्याघ्र
सर्प वृश्चिक ॥ काढिती अमंगल मूत्रनरक ॥ ऐसे व्यवसाय अनेक ॥ दुर्विवेक पोटार्थ ॥२१ ॥ जन्मापासूनि मरणवरी
॥ विषयांवेगळी गोष्टी दुसरी ॥ नुमजों देतां षड्विकारीं ॥ ज्यां षड्वैरि जाचिती ॥ २२ ॥ ऐशा नरदेहाचिया
प्राप्ति ॥ लाहोनि वृथा नरका जाति ॥ त्यांसि दुर्लभ तव पदप्रणाति ॥ ते भवभ्रांतिवरपडे ॥ २३ ॥दु-
देहाची प्राप्ति ॥ त्याहूनि दुर्लभ सत्संगति ॥ तेथही दुर्लभ सत्प्रवृत्ति ॥ जे दे रति सत्संगीं॥ २४ ॥ सत्सं-
ां मन ॥ प्रवृत्ति निवृत्ति होय श्रवण ॥ सारासार कळतां पूर्ण ॥ करी प्रयत्न सारार्थ ॥२५॥ तेव्हां अ-
॥ सप्रेमनिष्कामभजनीं रत ॥ सारांश जाणोनि निजात्मस्वार्थ ॥ अतंद्रित शमषट्कीं ॥ २६ ॥
गवान ॥ द्रवे कारुण्यें कळवळून ॥ तेव्हां सदगरुसन्नि नि भजन प्रमोदे ॥ २७

१ देहपात. २ अ

भगवत्प्रसादजनितभक्ति ॥ तरीच निर्विघ्न गुरुपदराती ॥ येरां मृगजलाचिये स्थिती ॥ बाह्यप्रवृत्ति नाथिली ॥२८
एवं भगवद्वरदप्रणतां ॥ कैवल्यपारणें गुरुपदभक्तां ॥ अनेककल्प योनि भ्रमतां ॥ जोडे अवाचितां सुखलाभ॥२९
गुरुपदभजकां मोक्षासाठीं ॥ नलगे साधनीं आटाआटी ॥ करूनि साधनांची पाउटी ॥ साधनांमुकुटीं गुरुभक्ति
॥ ३० ॥ यालागीं प्रणतीं चरणस्मरण ॥ करितां कैवल्यसुख संपूर्ण ॥ भोगूनि निवाविती ते निजशरण ॥ मिथ्या
भवभान उमजवूनी ॥ ३१ ॥ तो गोमतीआनंदकंद॥ मजमाजि नांदे श्रीगोविंद॥ सबाह्य सप्रेम ध्यानानंद ॥ अनन्य
अभेद प्रकटला ॥ ३२ ॥ आतां वक्ता आणि वदविता ॥ एकात्मतेची लाहती सत्ता ॥ तथापि श्रीचरणापरौता
॥ लाभ तत्वता मंज नुमसो ॥ ३३ ॥ ऐसें ऐकोनि अभेद स्तवन ॥ वशी करूनि अंतःकरण ॥ कृपेनें दिधली
आठवण ॥ ग्रंथ निर्माण करावया ॥ ३४ ॥ अठ्ठाविसाव्या अध्यायांतीं ॥ वैकुंठदर्शन गोपांप्रति ॥ देऊनि पुढती
पूर्वस्थिति ॥ यथाप्रवृत्ति आणिले ॥ ३५ ॥ यावरी गोपींच्या वरोत्तीर्णा ॥ कामक्रीडावडिंबना ॥ देऊनि करील
मन्मथमथना ॥ त्रैलोक्यराणा तें ऐका ॥ ३६ ॥ आतां एकोणतिसावा ॥ अध्याय आरंभिला बरवा ॥ येथूनि
रासरसाब्धिहेलावा ॥ तेतिसावापर्यंत ॥ ३७ ॥ या अध्यायीं कृष्णगीता ॥ ऐकोनि गोपी विरहतप्ता ॥ धनीं
वनमाळी संप्राप्ता ॥ तेणें धर्मता वारिल्या ॥ ३८ ॥ तिहीं प्रत्युक्तिभाषण ॥ अभेदप्रेमा दर्शवून ॥ सूचि[illegible] दुस्त्यज
भगवच्चरण ॥ मग झाला रमोन हरि गुप्त ॥ ३९ ॥ इतुकी कथा ये अध्यायीं॥ पारिसे परीक्षिति प्राये
यी ॥ मुनिनिर्वाणसुखनवायी ॥ नृपा येठायीं निरूपी ॥ ४० ॥

कउवाच ॥ भगवानपितारात्रीःशरदोत्फुल्लमल्लिकाः ॥ वीक्ष्यरंतुंमनश्चक्रेयोगमायामुपाश्रितः ॥१॥

---

१ सकामपुण्य. २नसमजे. ३ संन्यासग्रहणपूर्वकअन्नत्याग.

गोपीव्रताचरण ॥ करूनि कात्यायनीपूजन ॥ लाधल्या जें हरिवरदान ॥ तें संपूर्ण करावया
॥ [1]शरच्छर्वरी [2]शशिभायुक्त ॥ कुंज [3]सकूजित कुसुमित ॥ गोपीसुकृतोदय संप्राप्त ॥ जाणोनि प्रकटित रतिरंगा ॥ ४२ ॥ किंवा गोपी बाल्यवयसा ॥ फेडून लेती यौवनदशा॥ तोंवरी केली काळप्रतीक्षा ॥ होतां त्या निशा संप्राप्त ॥ ४३ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ असतांही श्रीभगवान ॥ कां पां कालप्रतीक्षण ॥ केलें ह्मणोन शं
॥ ४४ ॥ योगमाया अंगीकारी ॥ काय पां करूं नशके हरि ॥ तो कां काळप्रतीक्षा करी ॥ णें
अंतरीं हें माना ॥ ४५ ॥ अकाळीं वनश्री प्रकटितां ॥ बाल्या फेडूनि तारुण्य देतां ॥ तत्काळ गोपीमनोरथा ॥
काय पुरवितां अशक्य ॥ ४६ ॥ तरी ऐकावें इयेविशीं ॥ अशक्य नाहीं भगवंतासी ॥ परी भक्तांच्या सुकृतराशि॥
येती उदयासि तैं लाभ ॥ ४७ ॥ गोपी तोषवूनि वरदानें ॥ यज्ञपत्न्यांचीं उत्कटपुण्यें ॥ त्यांच्या सप्रेम स्नेहबंधनें ॥ पूर्ण कारुण्यें कळवळिला ॥ ४८ ॥ काम असता कृष्णाआंगीं ॥ तरी अनुकूलवयस्का तन्वंगी॥ करूनि रमता स्वेच्छाभोगीं ॥ तेचि प्रसंगीं उतावळा ॥ ४९ ॥ पूर्णकाम परमेश्वर ॥ सप्रेम स्वजनाचें अंतर ॥ जाणोनि क्रीडे तदनुसार ॥ नानावतार नटनाट्यें ॥ ५० ॥ जाणोनि स्वभक्तमनोगता ॥ स्वलीला प्रकटी बालचरिता ॥ येरवीं कंस संहारितां ॥ दुर्घटता त्या कोण ॥ ५१ ॥ हिरण्यकशिपुनिर्दाळणा ॥ स्तंभीं प्रकटवी आपणा ॥ तो येथ
कंससंहरणा ॥ समरांगणा समर्थ ॥ ५२ ॥ परंतु भक्ताचें व लभ ॥ जाणोनि झाला पशुपडिंभ॥ अमरां दुर्लभ पंकजनाभ ॥ तो क्रीडे स्वयंभ सुलभत्वें ॥ ५३ ॥ गोपीचीरापहरणकाळीं ॥ भावूनि निजवयसा कोवळीं ॥ यथाकाळें श्रीवनमाळी ॥ कंदर्पकेलिप्रद हो कां ॥ ५४ ॥ जाणोनि त्यांच्या अभिवांछिता ॥ काळप्रतीक्षा झाला करिता

---

[1] शरदृतूंतील रात्री. [2] चंद्रप्रकाशयुक्त. [3] पक्षांच्या मधुरशब्दांनीं युक्त [4] सुंदरी.

॥ येऱ्हवीं जो मायाभर्ता ॥ त्या भगवंता नअशक्य ॥ ५५ ॥ गोपीमनोऽनुकूला रात्री ॥ शरदुत्फुल्लमल्लिकापत्रीं ॥
श्रीभगवंत लक्षूनि नेत्रीं ॥ तच्चरित्रीं प्रवर्तला ॥ ५६ ॥ योगमायेच्या अवलंबें ॥ अभीष्टविभव आणूनि शोभे ॥
रतिरहस्य पंकजनाभें ॥ मनसिजक्षोभें मनीं धरिलें ॥ ५७ ॥ हरिहरब्रह्मादि जिंकूनि कामें ॥कंदर्प दाटला दर्पभ्रमें
॥ तो येथ जिंकूनि रासक्रमें ॥ विजयसंभ्रमें हरि वर्तें ॥ ५८ ॥ रासमंडळा जो मंडन॥होऊनि कंदर्पदर्पखंडन ॥
करी आखंडलस्मय[1]दंडन ॥ पवनकृशानु[2]वरुणेंशीं ॥ ५९ ॥ येथशंका कीजेल श्रोतां ॥ परदारविनोद केला असतां
॥ कंदर्पविजयाची योग्यता ॥ श्रीभगवंता नशोभे ॥ ६० ॥ परस्त्रीविनोदें करून ॥ कंदर्पजयाचें श्लाध्यपण ॥
भासे विपरीत कर्माचरण ॥ नशोभे गौण भगवंतीं ॥ ६१ ॥ ऐसी शंका झणें माना ॥ योगमायाअवलंबना ॥ करूनि
नाटयक्रीडा नाना ॥ आत्मारामाचि अभिरमे ॥ ६२ ॥ योगमायामुपाश्रितः ॥ भावार्थ याचि पदा[3]आंतौता
॥ जों नशिवोनि परयोषिता ॥ झाला रमता स्वाराम ॥ ६३ ॥ अत्मारामोऽप्यरीरमत ॥ वक्ष्यमाणोक्ति हें संमत
॥ साक्षान्मन्मथाचा मन्मथ ॥ परस्त्री किमर्थ ते ठायीं ॥ ६४ ॥ जयाच्या स्वरूपा मन्मथ भाळे॥ द्वैत निवटूनि मावळे
॥ तेथ परस्त्रीसुखसोहळे ॥ ह्मणतां काळें मुख नोहे ॥ ६५ ॥ तस्माद्रासक्रीडाविडंबन ॥ कामविजयप्रख्या[4]पन
॥ तेथींचें तत्व इतुकें पूर्ण ॥ सकारण जाणिजे ॥ ६६ ॥ एवं आपण आपुले ठायीं ॥ सुरतक्रीडा शेषशायी
॥ करूनि प्रवर्ते मन्मथविजयीं ॥ ते हे नवायी कथेची ॥ ६७ ॥ तेचि शृंगारकथामिषें ॥ पंचाध्यायीं रासरसें ॥
अध्यात्मपरनिवृत्तिदशे ॥ अणूनि विशेषें उमजा हें ॥ ६८ ॥ भगवत्प्रतिश्रुता ज्या रजनी॥ मनोऽनुकूला स्मरक्रीडनीं
॥ त्या दों श्लोकीं श्रीशुक वर्णी ॥ श्रोतीं सुकर्णीं परिसाव्या ॥ ६९ ॥

---

१ इंद्राच्यागर्वाचें खंडन. २ अग्नि. ३ पदांतील. ४ कृष्णानें कबूलकेलेल्या.

तदोडुराजःककुभःकरैर्मुखंप्राच्याविलिंपन्नरुणेनशंतमैः ॥
सचर्षणीनामुदगाच्छुचोमृजन्प्रियःप्रियायाइवदीर्घदर्शनः ॥ २ ॥

॥ टीका ॥ योगमायाविभवें हरि ॥ स्वेच्छा वनश्री अनुकूल करी ॥ पंचभूतें सशर्वरी ॥ कोणे परी तें ऐका ॥ ॥ ७० ॥ जाणोनि गोपींचा स्मरोदय ॥ वनीं राहूनि वनजा[1]प्रिय ॥ तत्प्रीतीस्तव अत्रितनय[2] ॥ प्रकट होय प्राग्[3]भागीं ॥ ७१ ॥ उडुगणेंशीं विराजित ॥ ऐंद्रीदिङ्[4]नायिकाकांत॥ जेंवि चिरकाळें प्रिय संप्राप्त ॥ संल्लालित ललनांगा ॥ ७२ ॥ कुंकुमरंगें मुख विलेपी ॥ करलालनें विरहा लोपी ॥ तेंवि अरुण[5]भा मयंक[2] वोपी ॥ लावण्यरूपी दिग्वदनीं ॥ ७३ ॥ शीतल शंतम[6] सुखतमकरीं ॥ उदयरागें कुंकुमापरी ॥ प्राचीदिग्वदना शृंगारी ॥ स्वभा पसरी सर्वांगीं ॥ ७४ ॥ सर्वजनाची तापग्लानि ॥ शीतळ करीं परिहारूनी ॥ ऐसा उडुपति उदेला गगनीं ॥ प्रीतीकरूनि कृष्णाचे ॥ ७५ ॥

दृष्टाकुमुद्वंतमखंडमंडलंरमाननाभंनवकुंकुमारुणम् ॥
वनंचतत्कोमलगोभिरंजितंजगौकलंवामदृशांमनोहरम् ॥ ३ ॥

॥ ३ ॥

॥ टीका ॥ जें कृष्णाचें निजमानस ॥ आनंदमय मयंकवेष ॥ घेऊनि उगवे प्राक्ककु[3]भेस ॥ धवळी आकाश स्वतेजें ॥ ७६ ॥ कुमुदें निजोदयें विकासित ॥ करी ह्मणोनि तो कुमुद्वंत॥ कमलावदना समान कांत ॥ अखंडि

---

१ वनमाला ज्याला प्रिय तो. २ चंद्र. ३ पूर्वेस. ४ पूर्वदिशारूप स्त्रीचा पति. ५ तांबडी कांति. ६ अतिसुखकारक.

त प्रकाशला ॥ ७७ ॥ अखंडमंडल जैवातृकं ॥ अरुण नवकुंकुमकिंजल्क ॥ तैसा अरुणप्रभात्मक ॥ रजनीनायक नभोगर्भीं ॥ ७८ ॥ त्यातें लक्षूनि कमलारमण ॥ कोमल तत्करप्रभेकरून ॥ रंजित देखोनि वनजीवन ॥ आदरी गायन गोगोप्ता ॥ ७९ ॥ तें गायन ह्मणाल कैसें ॥ सुधा लाजवी माधुर्यरसें ॥ श्रवणमात्रें वधूमानसें ॥ बळें नेतसे हरूनियां ॥ ८० ॥ कामाक्तनेत्रा वामदृशा[3] ॥ श्रवणमात्रें केल्या पिशा ॥ वनीं पहावया परेशा ॥ धांवती कैशा तें ऐका ॥ ८१ ॥

निशम्यगीतंतदनंगवर्धनंव्रजस्त्रियः कृष्णगृहीतमानसाः ॥
आजग्मुरन्योन्यमलक्षितोद्यमाःसयत्रकांतोजवलोलकुंडलाः ॥ ४ ॥

॥ टीका ॥ सुमनोहर भगवद्गान ॥ सबाह्यानंगोद्दीपन ॥ स्थावरजंगगमीं स्मर मोदन ॥ पावे ऐकोन अभिवृद्धि ॥ ८२ ॥ घृतादिसेचनें पावक वाढे ॥ कां मर्मस्पर्शें क्रोध चढे ॥ कीं गंधगुणपाशें ÷आसुडे ॥ कुसुमाकडे रोलंब[4] ॥ ८३ ॥ कीं विष्णुस्मरणें सुकृतवृद्धि ॥ गुरुपदभजनें वाढे बुद्धि ॥ तैसी कंदर्पा प्रवृद्धि ॥ होय निरवधि ज्या गानें ॥ ८४ ॥ ते प्रवृद्धि ह्मणाल कैशी ॥ अल्प सूचनें सुज्ञापाशीं ॥ येरां मूर्खां प्राकृतांशीं ॥ हृदयस्फोटेंशीं नुमजवे ॥ ८५ ॥ ज्याचे पदरीं निष्क[5] एक ॥ तो सहस्र निष्क होय कामुक ॥ सहस्र निष्कीं सर्वात्मक ॥ वांछी कनकअभिवृद्धि ॥ ८६ ॥ धनिक वांछी भूपमान ॥ मानी वांछी भूपासन ॥ सार्वभौमत्व जें असपत्न[6] ॥ भूपसामान्य कामिती ॥ ८७ ॥ सार्वभौमस्वाराज्यता ॥ तो अभिलाषी वैराज्यता ॥ पारमेष्ठ्यादि साम्राज्यता ॥ सां-

---

१ पूर्णमंडल. २ चंद्र. ३ स्त्रिया. ४ भ्रमर. ५ एक सोन्याचें नाणें. ६ शत्रुरहित. ÷ ओढिला जातो.

डूनि परता स्मर वाढे ॥ ८८ ॥ परी तीं नश्वर अवघीं सुखें ॥ पुढती तितुकींच भोगिजे दुःखें ॥ विषयकामीं इहामुष्मिकें ॥ ठकती अल्पकें फळलोभें ॥ ८९ ॥ याहूनि विशेष वाढे काम ॥ तें वांछिती अक्षय्य धाम ॥ स्वसंवेद्य आत्माराम ॥ विषयसंभ्रमवैरस्यें ॥ ९० ॥ ऐसे सनकादि आत्मरत ॥ त्यांहूनि वाढे जें मन्मथ ॥ तें भगवत्प्रेमा अत्यद्भुत ॥ सबाह्य संतत वांछिती ॥ ९१ ॥ तें बृहदारण्यींचें भगवद्गान ॥ पूर्वोक्त अनंगप्रवर्द्धन ॥ उपनिषत्श्रुतिरूप होतां श्रवण ॥ साधनसंपन्न वेधल्या ॥ ९२ ॥ साधनसंपन्न ह्मणाल कैशा ॥ कृष्णप्रगृहीतमानसा ॥ व्रजस्त्रिया त्या भवसुखविरसा ॥ कृष्णपरेशा कामिती ॥ ९३ ॥ कात्यायन्यादिव्रताचरणें ॥ रजतम क्षाळूनि शोधिलीं मनें ॥ गृहीं वर्त्तती हरिआज्ञेनें ॥ परी संलग्न ध्यानें हरिरूपीं ॥ ९४ हरिवराचा उदयकाळ ॥ भगवद्गायन तदनुकूल ॥ ऐकोनि झाल्या विरहाकुळ ॥ धांवती विह्वल हरिप्रेमें ॥ ९५ ॥ करणें विसरलीं प्रवृत्ति ॥ कृष्णगानें हरिल्या स्मृति ॥ पडली भवभानीं विस्मृति ॥ झाली उपरति मानसा ॥ ९६ ॥ नेणती पाउल पडलें कोठें ॥ नादमार्गें धांवती नेटें ॥ श्रवणीं कुंडलें लखलखाटें ॥ तरळतां उमटे विद्युद्भा[1] ॥ ९७ ॥ विजनीं निकुंजीं जो कां कांत ॥ रमारमणीयएकांत ॥ त्याप्रति जात्या जाल्या त्वरित ॥ कळों नेंदित परस्परें ॥ ९८ ॥ विषयसुरतीं सपत्नभावें ॥ रमतां त्रास पावल्या जीवें ॥ यालागीं परस्परें नहोतां ठावें ॥ घेती धांवे परपुरुषीं ॥ ९९ पूर्वाज्ञेनें त्रैवर्गिक ॥ करितां कृत्यें प्रापंचिक ॥ कृष्णगायनें सम्यक् ॥ झाल्या प्रत्यक्[2]प्रवण त्या ॥ १०० ॥ कृष्णगीतें हरितां मन ॥ कर्म मानिती जैसें वमन ॥ भणगा जोडल्या भद्रा[3]सन ॥ मग त्या कोरान्न जेंवि नरुचे ॥ ॥ १ ॥ यद[4]हरेव विरजेत ॥ तद[5]हरेव प्रव्रजेत ॥ जेव्हां हरिरत झालें चित्त ॥ तें संन्यस्त त्रैवर्ग्य[6] ॥ २ ॥ अंत-

---

[1] विजेचा प्रकाश. [2] आत्मस्वरूपाभिमुख. [3] राजसिंहासन. [4] जेव्हां विरक्ति उपजेल. [5] तेव्हां संन्यास घ्यावा. [6] धर्मार्थ कामांसंबंधी.

र रमतां अंतरंगा ॥ मग तें विसरे सर्वसंगा ॥ असोनि नेणे अंगींअंगा ॥ भोगी अनंगा समरसें ॥ ३ ॥ जितुकें जालें जें जें कृत्य ॥ तें तितुकेंचि टाकूनि त्वरित ॥ गोपी धांवती काननांत ॥ कमलाकांतसुरतेच्छें ॥ ४ ॥

दुहंत्योऽभिययुःकाश्चिद्दोहंहित्वासमुत्सुकाः ॥ पयोऽधिश्रित्यसंयावमनुद्वास्यापरायमुः ॥ ५ ॥

॥ टीका ॥ कोण्ही गोपी गोदोहनीं ॥ बैसल्या जानुधृतभाजनीं ॥ स्तननिष्पीडनीं हस्त दोन्ही ॥ जवें तळपती अधोर्ध्व ॥ ५ ॥ श्रवणीं भरलें हरिगायन ॥ तेणें वेधिलें अंतःकरण ॥ सवेग होतां मन उन्मन ॥ प्रवृत्तिभान विसरल्या ॥ ६ ॥ पुढें दोहन करणें ठेलें ॥ नेणती पात्र रितें भरलें ॥ नवचे चुल्हीवरी ठेविलें ॥ चित्ता कर्षिलें हरिगानें ॥ ७ ॥ दोह विसरोनि घेती धांवा ॥ गानध्वनीचा लक्षूनि अध्वा ॥ सवेग ठाकिती वासुदेवा ॥ कोण्ही गोवा नाठवतां ॥ ८ ॥ कोणी गोधूमकणकंडना ॥ करूनि बैसल्या असतां पचना ॥ सुपक्क चुल्हिस्थ नुतरितां अन्ना ॥ करिती धावना ध्वनिमार्गें ॥ ९ ॥ अध्यात्मपरिभाषायोजना ॥ अपरपर्यायव्याख्याना ॥ निरूपितां ग्रंथरचना ॥ नटके गगना विस्तारें ॥ १० ॥ यालागीं पदार्थप्रकाश मात्र ॥ ग्रथनीं जाणिजे सूचनासूत्र ॥ शंकापरिहारीं सर्वत्र ॥ विशेष वक्त्र वावरे ॥ ११ ॥

परिवेषयंत्यस्तद्धित्वापाययंत्यःशिशून्पयः ॥ शुश्रूषंत्यःपतीन्काश्चिदश्नंत्योऽपास्यभोजनम् ॥ ६ ॥

॥ टीका ॥ भोक्तयांच्या बैसल्या पंक्ति ॥ त्यांसि वाढितां गोपयुवति ॥ कृष्णगीतें हरिल्या स्मृति ॥ त्यागूनि जाती तत्कर्में ॥ १२ ॥ पय पाजितां निजलेंकरें ॥ गायनीं रमलीं अभ्यंतरें ॥ टाकूनि धांवत्या झाल्या त्वरें ॥

---

१ मार्ग. २ चुलीवरील.

प्रेम बावरें हारि वेधें ॥ १३ सुखशेजारीं असे भर्त्ता ॥ तत्सेवनीं ज्या अभिरता ॥ तिहीं ऐकतां कृष्णगीता टाकूनि स्वकांतां धांविल्या ॥ १४ रुचतां कृष्णध्वनीची गोडी ॥ कांत न रुचती जैसीं मडीं ॥ उन्मन मानसें जालीं वेडीं ॥ बाह्यपरवडी[1] विसरलीं ॥ १५ एकी भोजना बैंसल्या ताटीं ॥ कोण्ही जेविल्या अर्धपोटीं ॥ कोण्ही ग्रास मोडिले बोटीं ॥ कोणी वोठीं स्पर्शिले ॥ १६ ॥ तंव कृष्णाचें मधुर गान ॥ श्रवणमार्गें झडपी मन ॥ सवें विसरल्या देहभान ॥ टाकूनि भोजन धाविन्नल्या ॥ १७ ॥ लागतां कृष्णगीताची गोडी ॥ रसना विसरली रसपरवडी ॥ भोज्यभोजनभोक्तृत्व सोडी ॥ वेधें आवडी उपरमे ॥ १८ ॥

लिंपंत्यःप्रमृजंत्योऽन्याअंजंत्यःकाश्चलोचने ॥ व्यत्यस्तवस्त्राभरणाःकाश्चित्कृष्णांतिकंययुः ॥ ७ ॥

॥ टीका ॥ एकीं सारवितां गृहाजिरें[2] ॥ वेधिल्या कृष्णगीतस्वरें ॥ धांवत्या जाल्या तैशाच करें ॥ स्मृति नस्मरे तनुभावा[3] ॥ १९ ॥ डोई चिकटली जाणोनि नारी ॥ कृष्णमृत्तिका मर्दिती शिरीं ॥ तंव कृष्णगीताची माधुरी ॥ भरे अंतरीं वेधक ॥ २० ॥ कृष्णगीतें हरितां मना ॥ तनु न स्मरती नग्नानग्ना ॥ मृत्तिका लेपिली कचकुचवदना ॥ धांवती वना ध्वनिपंथें ॥ २१ ॥ कित्तेक अभ्यंगीं स्नेहाक्ता[4] ॥ उद्वर्त्तनीं उद्वार्तितां ॥ नग्नाअनग्ना तद्द्रव्यालिप्ता ॥ भूषणरहिता धांवती ॥ २२ ॥ अंजनवर्तिका घेऊनि करीं ॥ अंजन रेखिलें अर्धनेत्रीं ॥ तंव कृष्णगीत मानसां हरी ॥ भुलल्या नारी तद्वेधें ॥ २३ ॥ अंजनशलाका[5] तैसीच हस्तीं ॥ सांडूनि हंसगति गजगति ॥ पवनवेगें धांवती पंथीं ॥ विवशस्मृति[6] देहभावीं ॥ २४ ॥ एकी नेसणी पांघुरल्या ॥ एकी प्रावरणें नेसल्या ॥ एकीं विपरीत भूषा केल्या

---

[1] बाह्यप्रीती. [2] गृहासमोरचीं आगणें. [3] देहभाव. [4] अंगास तेल ज्यांनीं लाविलें त्या. [5] डोळ्यांत काजळ घालण्याची काडी. [6] पराधीन स्मृति ज्यांची त्या.

हस्तपादादि अवयवीं ॥ १२५ ॥ एकीं मेखळा घातल्या कंठीं ॥ कंठभूषणें मणगटीं ॥ चरणांगुळीं एकांची दाटी ॥ घालिती मुकुटीं वेणिके ॥ १२६ ॥ एकीं पुष्पें घातिलीं मुखीं ॥ तांबूल तुरंबिलें मस्तकीं ॥ करणाभरणाअनोळखी ॥ श्रीकृष्णसुखीं स्मृति रमली ॥ १२७ ॥ पंकजगंधा वाहे पवन ॥ तेणें मार्गें भ्रमरागमन ॥ तेंवि ऐकोन कृष्णगान ॥ करिती धावन तत्पथें ॥ १२८ ॥ एवं तनुमनभावीं विवशा ॥ कृष्णगायनवेधवशा ॥ कृष्णापाशीं मीनल्या कैशा ॥ भवदुराशा नुरवुनी ॥ १२९ ॥ ऐशा विवश धावतां नारी ॥ कोण्ही निषेधक नव्हते घरीं ॥ ऐसा संदेह धरूनि चतुरीं ॥ शंका अंतरीं हे नकीजे ॥ १३० ॥ बाह्य कृष्णार्थ कारितां कर्म ॥ अंतर वेधी तद्गुणप्रेम ॥ वेधें विह्वळ इंद्रियग्राम ॥ तें कर्मसंभ्रम व्यत्यस्त[१] ॥ ॥३१॥ कृष्णभजनीं विपरीतता ॥ कृष्णप्रेम त्यां सांगतां ॥ गोपी वेधूनि कृष्णगीता॥ विवशसंकेता सूचिलें ॥ ॥ ३२ ॥ कृष्णभजनीं ज्या सस्निग्धा ॥ त्यांसि विघ्नाची नबाधी बाधा॥ यालागीं गोपींच्या निषेधा ॥ कोण्हा निरोधा नकरवे ॥ ३३ ॥

तावार्यमाणाःपतिभिःपितृभिर्भ्रातृबंधुभिः ॥ गोविंदापहृतात्मानोनन्यवर्ततमोहिताः ॥ ८ ॥

॥ टीका ॥ इहामुत्रीं ज्या विरक्तमना ॥ भवसुखसंमान मानिती वमना ॥ त्यांसि निषेध करवे कोणा ॥ आत्तां स्वजनां कां इतरां ॥३४॥ आकाश तुटोनि पडल्यावरी ॥ विरोनि ठिकऱ्या होय धरित्री[२] ॥कां उपडोनि गडबडां लोटल्या गिरि ॥ विरक्त अंतरीं नडंडळिती[३] ॥ ३५ ॥ लोटतां प्रळयसिंधुजळ ॥ कीं वरी पडतां वज्रकल्लोळ ॥ कोपें खवळतां कृतांत काळ ॥ विरक्त निश्चळ निर्मम ॥ ३६ ॥ देहस्मृतीचें अस्तमान ॥ कोण सांभाळी प्रपंचभान ॥

---

[१] विपरीत. [२] पृथ्वीवर. [३] न चळती.

मान अपमान कीं सम्मान॥इत्यादि ज्ञान कोण मनी॥ ३७॥गोपी हरिरंगीं होऊनि सक्ता॥इहामुष्मिकीं ज्या विरक्ता॥ विवश भुलोनि कृष्णगीता॥वना धांवत निशिगर्भीं ॥ ३८॥ गृहासक्तीची सबळ काठी॥घेऊनि भर्तार लागती पाठीं॥ त्यांस न गणितां देऊनि पाठी॥दाटोदाटीं निघाल्या॥ ३९॥मातापितरें अतिसवेग॥शीळभंगभयाचीडांग॥घेऊनिपाठी करिती लाग ॥ पळती आंग चुकवुनी ॥ ४० बंधु लोकलज्जेच्या दोरें॥ कवळोनि बांधों धांवती निकरें ॥ कृष्णानुरक्ता सप्रेमभरें ॥ निजनिर्धारें धांवती ॥ ४१ ॥ गोत्राभिमानें[2] भ्रातृगण ॥ वृत्तिक्षेत्रादि धान्यधन ॥ इत्यादि रज्जूंचें बंधन ॥ त्यां रोधन करूं पाहती ॥ ४२ ॥ परी त्या उमरडूनि[3] तयांसी॥गोपकांता कांतारासी ॥ सप्रेमवेधें कृष्णापाशीं ॥ धांवती निशी नगणूनी॥४३॥पैशून्यादि[4] मर्मस्पर्श ॥ कुटिलोक्तीचे घालूनि पाश ॥ बांधों पाहती सुहृद अशेष ॥ परी त्या उदास नावरती ॥ ४४ ॥ स्नेहपाशें कुमरी कुमरें ॥ बांधों धांवती अभ्यंतरें ॥ परी त्या लोटूनि ममतासूत्रें ॥ बलात्कारें निघाल्या ॥४५॥इत्यादि सर्व ईषणात्यागें॥सवेग धांवती त्याविरागें॥ममता लोभ घालूनि मागें ॥ श्रीरंगरंगें रंगल्या ॥ ४६ ॥ गोपी जेवीं सुपक्कदळें॥झगटतां श्रीकृष्णगीतामिळें ॥ सोडूनि द्रुमाचीं डाहाळे कुळें ॥ निर्मम चपळें वावडती[5] ॥ ४७ ॥ कीं भास्करोदयीं अंडजगण[7] ॥ प्रपंचद्रुमींचें सांडूनि स्थान ॥ हरिसुखचारा अभिलक्षून ॥ करिती धावन निःशंका ॥ ४८ ॥ ऐशा निराट[6] गोप नारी ॥ भगवन्निरता विरता घरीं ॥ भरल्या निशीगर्भीं कांतारीं ॥ मधुरस्वरीं गुंतोनी ॥ ४९ ॥ गीतध्वनीचा लक्षूनि मार्ग ॥ हरिप्राप्तीचा करिती लाग ॥ भवसुखवैरस्यें अभंग ॥ श्रीरंगसंगसकामा ॥ ५० ॥ राया अपूर्व याहीवरी ॥ परिसें हरिविरहाची थोरी ॥ एकी बल्लवीं बळात्कारीं ॥ गृहामाझारीं कोंडिल्या ॥ ५१ ॥

---

१ काठी. २ कुलाभिमान. ३ नजुमानून. ४ दोष काढणें. ५ उडून जाती. ६ निर्भय. ७पक्षिसमूह.

अंतर्गृहगताःकाश्चिद्गोप्योऽलब्धविनिर्गमाः ॥ कृष्णंतद्भावनायुक्तादध्युर्मीलितलोचनाः ॥ ९ ॥

॥ टीका ॥ कृष्णप्रेमासक्त रामा ॥ परी कोंडल्या माजि धामा ॥ नहालती हरिगीतवर्त्मा ॥ कीं निबद्ध कर्मामाजिवड्या ॥ ५२ ॥ बृहदारण्यीं हरिनिश्वसित ॥ उपनिषच्छ्रुतिरूप कृष्णगीत ॥ ज्यांसि नव्हेचि श्रवणागत॥ अलब्ध पथ यालागीं ॥ ५३ ॥ निरुद्ध प्रारब्धकर्मधामीं ॥ कोंडूनि ठेल्या इंद्रियग्रामीं ॥ परी प्रेमा अभंग निष्कामकामीं ॥ मेघश्यामीं जयांचा ॥ ५४ ॥ श्रवण नहोतां साधनपथ ॥ विरक्तिनिर्गम कैंचा प्राप्त ॥ यालागीं कोंडल्या प्राक्तनांत ॥ परी आसक्त हरिरूपीं ॥ ५५ ॥ मेघश्याम भगवन्मूर्ति ॥प्रतीतिगोचर जैसी होती ॥ निरतिशयें ते चिंतूनि चित्तीं ॥ ध्यानस्थिति कवाळिली ॥ ५६ ॥ मग त्या अर्धोन्मीलितदृष्टि ॥ तुरीयेपोटीं बाह्यसृष्टीं ॥सांठवूनियां उठाउठीं ॥ ते केली पैठी चित्स्वरूपीं ॥ ५७ ॥ अचिंत्यैश्वर्यभगवान॥ त्याचें लागतां तीव्र ध्यान ॥ निर्गुण हो कां अथवा सगुण ॥ दृढभवबंधनच्छेदक तें ॥ ५८ ॥

दुःसहप्रेष्ठविरहतीव्रतापधुताशुभाः ॥ ध्यानप्राप्ताच्युताश्लेषनिर्वृत्याक्षीणमंगलाः ॥ १० ॥
तमेवपरमात्मानंजारबुद्ध्याऽपिसंगताः ॥ जहुर्गुणमयंदेहंसद्यःप्रक्षीणबंधनाः ॥ ११ ॥

॥ टीका ॥ तीव्रध्यानें भगवन्निरता ॥ कृष्णसुखीं ज्या संप्राप्ता ॥ देहादित्रिगुणात्मक अहंता ॥ त्यागूनि निर्मुक्ता त्या जाल्या ॥ ५९ ॥ आशंकाद्वय येथें स्फुरे ॥ श्लोकद्वयें तें परिसंहरे ॥ क्षणैक निश्चळ अभ्यंतरें ॥ तीं उत्तरें परिसावीं ॥ ६० ॥ जारबुद्धी सगुणप्रेम ॥ धरूनि भजतां पुरुषोत्तम ॥ त्यांसि कैसें कैवल्यधाम ॥ निर्गुण-

---

१ मार्ग. २ श्रुति. ३ स्थिर.

परब्रह्म नुमजतां ॥ ६१ ॥ येथ समर्थ वस्तुमहिमा ॥ पं[1]गिस्त नोहे ज्ञानधर्मा ॥ अमृत सेवितां मरणकामा ॥नोपी आत्मा मृत्यूतें ॥ ६२ ॥ संचित प्रारब्ध आणि क्रियमाण ॥ त्रिविध कर्म जें पापपुण्य ॥ भोगें नहोतां पुरतें क्षीण ॥ गुणबंधन कैंवि तुटे ॥ ६३ ॥ निष्कामकर्मैं चरम[2]देहीं ॥ सविराम अपरोक्षज्ञानें पाहीं ॥ देहअहंता विरतां नाहीं ॥ संचित आणि क्रियमाण ॥ ६४ ॥ संचितनाशें ज्ञानोदयें ॥ क्रियमाणही अहंतालयें ॥ भोगावेगळा प्रारब्धक्षय ॥ कोण्या अन्वयें बोलिला ॥ ६५ ॥ प्रारब्धक्षय जाला नसतां ॥ शुभाशुभ सुखदुःख नभोगितां ॥ कैंची गुणबंधा क्षीणता ॥ बंधनिर्मुक्तता कैंवि वदा ॥ ६६ ॥ नसाहती क्लेश बहळ ॥यालागीं दुःखभोगीं काळ॥ बहुत लागे तये वेळे ॥ विरहें केवळ भोगिले ॥ ६७ ॥ प्रियतमभगवद्विरहक्षोभें ॥ तिहीं सर्वी जाळिलें उभें ॥ कोटियुगांचीं निमेषगर्भे ॥ गगनें अशुभें भोगिलीं ॥ ६८ ॥ सप्रेमभगवत्तनुचिंतनें॥ सुख भोगितां तदालिंगनें ॥ त्रिविधें सुकृतात्मकबंधनें ॥ तीं तत्क्षणें तूटलीं ॥ ६९ ॥ विरहजदुःखाश्लेषसुख ॥ गोपी भगवद्ध्यानोन्मुख ॥ भोगूनि देह त्रिगुणात्मक ॥ तिहीं सम्यक त्यागिलें ॥ ७० ॥ एवं गुणबंधनिर्मुक्तत्व ॥ निर्विकार सप्रेमभरिता ॥ कृष्णस्वरूपीं सायुज्यता ॥ निजएकांता पावल्या ॥ ७१ ॥ ऐसें ऐकतां निरूपण ॥ संशयवातें दोलायमान ॥ नृपाचें मानस[3]पंकज पूर्ण ॥ झालें ह्मणोन पुसतसे ॥ ७२ ॥

कृष्णंविदुःपरंकांतंनतुब्रह्मतयामुने ॥ गुणप्रवाहोपरमस्तासांगुणधियांकथम् ॥ १२ ॥

॥ टीका ॥ राजा ह्मणे जी वाशिष्ठ[5]प्रवरा ॥ बादरायणि परम चतुरा॥मानस[3]वनजा संशयवारा ॥ अळु[4]माळ-

---

१ पराधीन. २ शेवटच्या देहांत. ३ मनोरूपकमळास. ४ थोडासा. ५ वसिष्ठकुलांतश्रेष्ठ.

सा झगटला ॥ ७३ ॥ तेणें वक्तृत्वस्वातीघन ॥ वर्षत असतां तव मुखगगन ॥ चंचलतेस्तव अमृतकण ॥ जाती विखरोन नथरतां ॥ ७४ ॥ प्रश्न ऐकोनि ममोदित ॥ निवांत कीजे संशयवात ॥ तेणें वक्तृत्व अमृतावाप्त ॥ पूर्ण संतृप्त होईन ॥ ७५ ॥ तरी पतिपुत्रादि जगद्ब्रह्म ॥ भावनामात्र भेदभ्रम ॥ तितुकेन प्राणी भोगिती कर्म ॥ अज्ञानरजतमसंवलित ॥ ७६ ॥ अज्ञानरूपअविद्यावरणं ॥ वास्तव ज्ञानें नहोतां क्षीण ॥ मोक्ष नपवती प्राणिगण ॥ हा निश्चय पूर्ण वेदांतीं ॥ ७७ ॥ तेंवि अज्ञाना पशुपजाया ॥ परम लावण्य श्रीकृष्णकाया ॥ देखोनि भाळल्या रमावया ॥ नेणोनि अव्यया परब्रह्मा ॥ ७८ ॥ परम सुंदर हा परपुरुष ॥ कृष्ण नेणोनि श्रीपरेश ॥ जारबुद्धी विषयाभिलाष ॥ धरितां गुणपाश कां तुटले ॥ ७९ ॥ पतिपुत्रादिप्रपंचभजनें ॥ मोक्ष नपविजे प्राणिगणें ॥ जारबुद्धी कृष्णध्यानें ॥ केंवि बंधनें निर्मुक्त ॥ ८० ॥ जारबुद्धि विषयप्रवाहीं ॥ कामासक्ता कृष्णदेहीं ॥ त्यांच्या विषयवासना कैशा पाहीं ॥ विषयापासूनि निरसल्या ॥ ८१ ॥ इतुके शंकेच्या निरसना ॥ केली स्वामीसि प्रार्थना ॥ निःसंशय निरूपणा ॥ करितां श्रवणा सुखवाटे ॥ ८२ ॥

श्रीशुकउवाच ॥ उक्तंपुरस्तादेतत्तेचैद्यःसिद्धिंयथागतः ॥ द्विषन्नपिहृषीकेशंकिमुताधोक्षजप्रियाः ॥ १३ ॥

॥ टीका ॥ शुक ह्मणे गा कुरुपुंगवा ॥ तुवां प्रश्न केला बरवा ॥ निरूपिजेल तो पर्येसावा ॥ वसों नेदावा संशय ॥८३ ॥ तव पुरस्तात् मया एतदुक्तं ॥ राया तुजपुढें हें म्यां कथिलें ॥ कोण्या एक्या योगें भलें ॥ कृष्णीं मानस संलग्न जालें ॥ तरी फावलें अमृतत्व ॥ ८४ ॥ परमद्वेषें शिशुपाळाचें ॥ कृष्णीं मा-

---

१ वेष्टित.

नस जडलें साचें ॥ तेंचि कारण अमृतत्वाचें ॥ सिद्धी गेलें त्यालागीं ॥ ८५ ॥ द्वेषीत होत्सा-
ताही चैद्य[1] ॥ हृषीकेशातें ध्यातां सत्य॥ अपवर्ग लाधला अनवद्य[2] ॥ मा गोपी वंद्य कां नव्हती ॥ ८६ ॥
जारबुद्धि या सप्रेमभावें ॥ अधोक्षजीं रंगल्या जीवें ॥ असतां कैवल्य कां नलभावें ॥ येथ संशय संभवे कोण पां॥
॥८७ ॥ पतिपुत्रादि जगद्ब्रह्म॥ ते अविद्यासंवृत[3] गुणसंभ्रम ॥मनःकाल्पित करणानुक्रम ॥ विषयीं सुखतम प्रति-
भासे ॥ ८८ ॥ कृष्ण केवळ हृषीकेश ॥ हृषीकसमुच्चयाचा ईश ॥ अनावृत जो उत्तम पुरुष ॥ निर्विशेष परब्रह्म
॥ ८९ योगमायाअंगीकारें ॥ नटला स्वजनप्रेमानुसारें ॥ तथापि कोण्हाही प्रकारें ॥ सन्निधिमात्रें मोक्षद ॥
॥ ९० ॥ शिवब्रह्मादि जो अक्षगण ॥ ज्याहूनि अर्वाक् तयांचें ज्ञान ॥ यालागीं अधोक्षज हें अभिधान॥ विपश्चि-
ज्जन बोलती ॥ ९१ ॥ येथ गोपींचा विशेष कायी ॥ हो कां कोण्ही मनुष्यदेही ॥ त्याच्या कल्याणार्थ पाहीं ॥ स-
गुण निर्गुण तनुनाट्य ॥ ९२ ॥

नृणांनिःश्रेयसार्थायव्यक्तिर्भगवतोनृप ॥ अव्ययस्याप्रमेयस्यनिर्गुणस्यगुणात्मनः ॥ १४ ॥

॥ टीका ॥ आविद्याअनावृत भगवत्तनु ॥ येर संवृत अवघा जनु ॥ तो जन व्हावया निरावरण ॥ भगवद्भज-
न द्योतिलें[4] ॥ ९३ ॥ गुणनियंता श्रीभगवंत ॥ येर अवघे गुणसंवृत ॥ भगवद्भजनें होती मुक्त ॥ हा इत्थंभूत स-
दुपाय ॥ ९४ ॥ गुणसंवृता जनाप्रति ॥ भजना लागीं भगवन्मूर्ति ॥ निर्गुणाची सगुण व्यक्ति ॥ जे श्रुतिस्मृति-
निर्दिष्ट ॥ ९५ ॥ श्यामराजीवलोचन॥ पद्मायतताक्ष मयंकवदन॥ चतुर्बाहु आजानुपीन ॥ सरळ सोज्वळ सुकांत

---

[1] चेदिदेशाचा राजा शिशुपाल. [2] निर्दोष. [3] वेष्टिलेलीं. [4] प्रकटिलें.

॥ ९६ ॥ मुकुट कुंडलें मेखळा ॥ श्रीवत्स कौस्तुभ आपादमाळा ॥ केयूरांगदें बाहुयुगळां ॥ कंबुकटकें मुद्रिका॥
॥ ९७ ॥ विद्युद्रासुर पीतांबर ॥ कांसे कसिला मनोहर ॥ चरणीं बिरुदांचां तोडर ॥ वांकी वाळे नूपुरें ॥
॥ ९८ ॥ रातोत्पलनिभ चरणतळें ॥ सामुद्रिकें सोज्वळ सफळें ॥ घोंटींव वर्तुळ सुतेजाळें ॥ नखशशिकळा सपीयूषा
॥ ९९ ॥ कंजारिकंबुकौमोदकी ॥ आयुधें शोभतीं चौहस्तकीं ॥ निषंगशार्ङ्गनंदकप्रमुखीं ॥ विराजमान
विश्वदृक् ॥ २०० ॥ वस्त्राभरणीं सालंकृत ॥ करुणावत्सल कमलान्वित ॥ सपार्षद सोपस्कृत ॥ विभूतियुक्त
विदितात्मा ॥ १ ॥ अप्रमेय जो निर्गुण ॥ त्याची व्यक्ति ऐसी सगुण ॥ भजतां भंगी अविद्यावरण॥विशुद्धज्ञान
प्रकाशी ॥ २ ॥ स्वजनमोक्षणा कारणें ॥ राया निर्गुणा सगुण होणें ॥ येरवीं असतां पूर्णपणें ॥ भव निस्तरणें
दुर्घट पैं ॥ ३ ॥ पार्थिवादिभगवद्व्यक्ति ॥ करूनि भक्त जे जे भजती ॥ त्यांसि अक्षय सायुज्य मुक्ति॥मा
कृष्णचिन्मूर्ति परब्रह्म ॥ ४ ॥ गोपी केवळ अमरांगना ॥ वंदूनि विरंचीची आज्ञा ॥ बल्लवी होऊनि मर्त्यभुवना॥
भगवत्तोषणा पातल्या ॥ ५ ॥ ह्मणोनियां त्या पुरुषोत्तमा ॥ नैसर्गिक लाहोनि प्रेमा ॥ जारभावें वांछिती कामा॥
आत्मारामा अमराद्या ॥ ६ ॥ कां तेंवि चिन्मात्र तनूच्या ठायीं ॥ शत्रुषट्कात्मकप्रेमें पाहीं ॥ हृदय निबद्ध केलें
जिहीं ॥ त्या लवलाहीं तन्मयता ॥ ७ ॥ ह्मणोनि प्राकृत देहधारी ॥ तैसा नव्हे हा निर्विकारी ॥ त्याची मूर्ति
अभ्यंतरीं ॥ कोण्या प्रकारीं संचरतां ॥ ८ ॥

कामंक्रोधंभयंस्नेहमैक्यंसौहृदमेवच ॥ नित्यंहरौविदधतोयांतितन्मयतांहिते ॥ १५ ॥

---

१ कमल, चक्र, शंख, गदा. २ बाणाचा भाता. ३ मृत्तिका. इत्यादि वस्तूंची केलेली भगवन्मूर्ति.

॥ टीका ॥ कां ह्मणिजे विषयाभिलाषें ॥ आसक्ति धारितां दृढमानसें ॥ अचिंत्यवस्तुसामर्थ्यवशें ॥ सायुज्य आपैसें घरंनिघें ॥ ९ ॥ हो कां कोण्ही एक काम ॥ कामूनि भजतां मेघश्याम ॥ परमपुरुषार्थ होय सुगम॥ जडतां प्रेम भगवंतीं ॥ १० ॥ जारविरहकामासक्ति ॥ केवळ प्रेमाची अभिव्यक्ति ॥ गोपी तदर्थ अमरयुवाति ॥ ब्रह्मवरोक्ती अवतरल्या ॥ ११ ॥ क्रोधावेशें भगवन्मूर्ति ॥ कवळूनि राहे आविसर स्मृति ॥ मग त्यां कैंची पुनरावृत्ति ॥ भवनिर्मुक्ति नमगतां ॥ १२ ॥ तृणजळु कां भिंगुरटी ॥ भयें सदैव चिंतितां पोटीं ॥ तद्रूपता उठाउठौं ॥ लाहे गोठी हे तैसी ॥ १३ ॥ भगवद्भयें मानस वेधे ॥ तें निजसुरेंचि सांडिजे भेदें ॥ मग अक्षय कैवल्य साधे ॥ हें कां शब्दें शंसावें॥ १४ ॥ पुत्रादि कोणा एका स्नेहें ॥ भगवद्विग्रह कवळितां मोहें ॥ मग त्या अपवर्ग अपैता नोहे ॥ हें बोलों नलाहे विनिर्गमें ॥ १५ ॥ तैसाचि संबंध कोण्ही एक ॥ होऊनि भगवंतीं पडतां ऐक्य॥ तो तेव्हांचि उत्तम श्लोक ॥ होय चित्सुख सामरस्यें ॥ १६ ॥ अथवा उच्चनीचयोनि ॥कोणी एक जन्मोनि प्राणी॥ निःसीम प्रेमा भगवद्भजनीं ॥ तें निर्वाणीं समरसता॥ १७॥ इत्यादि कोण्ही एक्या भावीं॥ अजस्र प्रेमा वासुदेवीं जडतां तन्मयता पावावी ॥हे अचिंत्य दैवी योगशक्ति ॥१८॥

नचैवंविस्मयःकार्योभवताभगवत्यजे ॥ योगेश्वरेश्वरेकृष्णेयतएतद्विमुच्यते ॥ १६ ॥

॥ टीका ॥ यदर्थीं विस्मय नकीजे तुवां ॥ कृष्णा परेशा देवाधिदेवा ॥ ॥ ऐक्यभावें भजतां जीवां ॥ मोक्ष नमनावा अघटित ॥ १९ ॥ कीं अचित्यैश्वर्यपरिपूर्ण ॥ योगेश्वराचा ईश्वर पूर्ण ॥ याच्या सन्निधिमात्रें जन ॥ तृणपाषाणही उद्धरती ॥ २० गोपिकांचा विस्मय किती ॥ कृष्णसान्निध्यें सर्वजाति ॥ स्थावरजंगमां पावल्या मु-

---

१ घरचेच. २ बाहेर जाणें. ३ नित्य.

क्ति ॥ पुढें उद्धरती तत्स्मरणें ॥ २१ ॥ येरीकडे न घडे ऐसा ॥ विस्मय उचित कौरवेशा ॥ तो येथ श्रीकृष्णीं सहसा ॥ विस्मयावेशा असंभव ॥ २२ ॥ ऐसी कृष्णाची अगाधशक्ति ॥ शुकें बोधिली रायाप्रति ॥ करूनि आशंकानिवृत्ति ॥ निरूपी पुढती हारिलीला ॥ २३ ॥

ताद्दष्ट्वांऽतिकमायाताभगवान्व्रजयोषितः ॥ अवदद्वदतांश्रेष्ठोवाचःपेशैर्विमोहयन् ॥ १७ ॥

॥ टीका ॥ भूतभविष्यद्वर्तमान ॥ सर्व ह्रद्गत अभीष्टाभिज्ञ ॥ निकट गोपी येतां देखोन ॥ बोले वचन विमोहक ॥ २४ ॥ सर्व बोलकियांमाजि श्रेष्ठ ॥ सत्यलोकपति वरिष्ठं ॥ तो ज्या पुढें नुमं[1]ली वोष्ठ ॥ अतिलघिष्ठ ह्मणवीतसे ॥ २५ ॥ तो वक्तयां चुडामाणि ॥ विश्वविमोहक चक्रपाणि ॥ सकौतुका बोलोनि वाणी ॥ गोपरमणी विमोहीं ॥ २६ ॥ त्या भगवदुक्तींचें निरूपण ॥ दहा श्लोकीं शुकभगवान॥वाखाणील तें भाषाकथन ॥ श्रोते सुज्ञ परिसोत ॥ २७ ॥

॥श्रीभगवानुवाच ॥ स्वागतंवोमहाभागाःप्रियंकिंकरवाणिवः॥व्रजस्यानामयंकच्चिद्ब्रुताऽऽगमनकारणम् १८

॥ टीका ॥ अकस्मात निकट[2]वर्ती ॥ वनीं देखोनि गोपयुवति ॥ परमाश्चर्यें तयां प्रति ॥ बोले श्रीपति सस्मित ॥ २७ ॥ अहो तुह्मी सभाग्य रमणी॥सुखरूप आलां कीं पथ क्रमूनी॥सफळ यात्रा मद्दर्शनीं॥अंतः करणीं काय इच्छा ॥ २८ ॥ अकस्मात गोपी सकळा ॥ नधरत येथें धावोन आलां॥तरी कुशल आहे कीं गोकुळा॥सहित सकळां गोगोपां ॥ २९ ॥ अस्ताव्यस्त विस्मृततनु ॥ धाविलां कोण्या भयेंकरून ॥ तुह्मांसि देखोनि माझें मन ॥ भयें उद्विग्न बह्वु झालें ॥ ३० ॥ धांवतां धापां दाटलीं पोटें ॥श्वास नलोटे नासापुटें॥नकळे पाऊल पडि-

---

१ उघडीत नाहीं. २ समीप असलेला.

लें कोठें ॥ अतिजं[1]विष्टें उद्योगें ॥ ३१ ॥ आगमनाचें कारण बोला ॥ परमप्रियकर काय तुह्मांला ॥ तुमची अ-
भीष्टवांछा मजला ॥ सांगा काय करूं तें ॥ ३२ ॥ यावरी मंदस्मितानना ॥ सलज्जापांगी मृगलोचना ॥देखोनि
त्यांच्या मनमोहना॥ त्रैलोक्यराणा बोलतसे ॥३३ ॥

रजन्येषाघोररूपाघोरसत्वनिषेविता ॥ प्रतियातव्रजंनेहस्थेयंस्त्रीभिःसुमध्यमाः ॥ १९ ॥

॥ टीका ॥ अहो तुह्मी वामदृ[2]शा ॥ भ्रमरकांतिसदृशकेशा ॥ परम घोर विपिनीं निशा॥ ईमाजी कैशा पातलां
॥ ३४ ॥ रीस व्याघ्र वृक सूकर ॥ सर्प वृश्चिक प्राणी क्रूर ॥ घोर रजनी भयंकर ॥ वनसंचार कां केला ॥३५॥
भीरु[3] ऐसें स्त्रियांचें नाम ॥ आणि ये[4]सणें वन दुर्गम ॥ विशेष रजनी घोरतम ॥ किमर्थ उद्यम हा येथें॥ ३६ ॥
तथापि आलां केलें बरवें ॥ आतां मद्वाक्य मानावें ॥ व्रजाप्रति परतोनि जावें ॥ वनीं नवसावें वनितांहीं ॥३७॥
तुह्मी नधरत पातलां वना॥ तेणें हृद्रोग जाकळी स्वजना ॥ते हुडकिती स्थानें नाना॥ह्मणोनि स्वस्थाना जा वेगीं ३८

मातरःपितरःपुत्राभ्रातरःपतयश्चवः ॥ विचिन्वंतीह्यपश्यंतोमाकृध्वंबंधुसाध्वसम् ॥ २० ॥

॥ टीका ॥ तुमचे माता पितर पुत्र ॥ बंधु भर्त्तार इष्टमित्र॥ सक्लेश धुंडिती सर्वत्र ॥ श्रमाचें पात्र त्यां नकी-
जे ॥ ३९ ॥ वनीं उपवनीं यमुनापुलिनीं ॥ गुहागह्वरीं दुर्गमस्थानीं ॥ धुंडितां श्रमित होइजे स्वजनीं ॥ तुह्मां
लागूनि अनुचित हें ॥ ४० ॥

दृष्टंवनंकुसुमितंराकेशकररंजितम् ॥ यमुनाऽनिललीलैजत्तरुपल्लवशोभितम् ॥ २१ ॥

---

१ मोठ्या वेगाचा. २ सुंदर नेत्रांच्या. ३ स्त्रिया. ४ हें.

॥ टीका ॥ ऐसें ऐकोनि भगवद्वचन ॥ कोपें स्पर्शिलें त्यांचें मन ॥ मग त्या करूनि तिर्यग्वदन ॥ सचकितनयन विलोकिती ॥ ४१ ॥ ऐसें इंगित देखोनि हरि ॥ ह्मणे तुमाचिये अभ्यंतरीं ॥ पहावी काननकौतुकपरी ॥ ह्मणोनि रात्रीं जरी आलां ॥ ॥ ४२ ॥ तरी देखिलें कीं हें वन ॥ सुपुष्पित शोभायमान ॥ विशेष पूर्णशशांककिरण- ॥ मंडित शोभन सुरुचिर ॥ ४३ ॥ यमुनासलिला वरून अनिळ ॥ सीतळ सुखतमअतिमंजुळ ॥ तेणें तरुपल्लव चंचळ ॥ दावी झळाळ शशिज्योत्स्ना ॥४४॥ ऐशिये शोभाढ्य कांतारीं ॥ सुखरुचिरता नेत्रद्वारीं ॥ पाहतां फावली स्वानंदलहरी ॥ इतर संसारी नेणती ॥ ४५ ॥ यालागीं तुह्मी धन्यतमा ॥ पाहोनि वनश्रीविश्रामा ॥ तोषलां आतां जाऊनि धामा ॥ यथोक्तकर्मा आचरिजे ॥ ४६ ॥

तद्यातमाचिरंगोष्ठंशुश्रूषध्वंपतीन्सतीः ॥ क्रंदंतिवत्साबालाश्चतान्पाययतदुह्यत ॥ २२ ॥

॥ टीका ॥ आतां क्षणभरी येथ नवसा ॥ जाइजे सत्वर निज निवासा ॥ कीजे स्वपतींची शुश्रूषा ॥ स्वजन संतोषा पाववीजे ॥ ४७ ॥ लेंकुरें वासुरें आक्रंदती ॥ तान्हपा गाई हुंबरती ॥ तुह्मीं जाउनि सदनाप्रति ॥ त्यांसि विश्रांति अर्पावी ॥ ४८ ॥ लेंकुरा देऊनि स्तनपानें ॥ गोवत्सांचीं समाधानें ॥ शीघ्र करावीं पयदोहनें ॥ साधुआचरण साध्वी हो ॥ ४९ ॥ इत्यादि वचनें गोपिकांतें ॥ प्रबोधूनियां रमाकांतें ॥ पुढतीं त्यांच्या इंगितातें ॥ मन्मथतातें निरखिलें ॥ ५० ॥

अथवामदभिस्नेहाद्भवत्योयंत्रिताशयाः ॥ आगताह्युपपन्नंत्प्रीयंतेमयिजंतवः ॥ २३ ॥

---

१ पूर्ण चंद्र किरणांनीं शोभमान.

॥ टीका ॥ तंव त्या क्षुब्धा मानोरथभंगें ॥ पहाती सेर्ष्य वक्रापांगें ॥ जाणोनि त्यांच्या मानसा जोगें ॥ वचन श्रीरंगें बोलिलें ॥ ५१ ॥ त्याचा अभिप्राय कळल्या वरी ॥ ह्मणे तुह्मी स्नेहाळ नारी॥ माझा ठायीं मानसदोरीबळें गुंतोनि कर्षिलां ॥५२॥ जेंवि सरिता निस्तरणारा ॥ अभीष्ट जाणें हें परपारा ॥परी तो वाव्हाणियाच्या बळात्कारा ॥ सरितापुरा वशवर्ती ॥५३॥ कां सर्वां प्रियतम तारुण्य ॥ तदर्थ कारितां ही कारुण्य ॥ परी बळिष्ठ काळाचें नैर्घृण्य ॥ दे दाटून जारव्य ॥५४॥ तेंवि साध्वी हो स्वधर्मासक्ता ॥ सदाचारें गृहीं वर्त्ततां ॥ माझ्या ठायीं गुंतल्या चित्ता ॥ मद्वश होत्सात्या पातलां ॥ ५५ ॥ जैसा कोण्ही साधुनर ॥ त्यासि होतां भूतसंचार ॥ तन्नियंत्रित दुर्विकार ॥ नानाप्रकार जेंवि करी ॥ ५६ ॥ ऐकोनि गायना माझिया ॥ तुह्मी सुभगा यंत्रिताशया ॥ वना आलां हें आश्चर्या ॥ कारण प्राया नमनीं मी॥ ५७ ॥ येथ आलां हें उत्तम केलें ॥ परस्परें विलोकन घडलें॥ दर्शनाचें सुख पावलें ॥तुह्मांतें माझें मज तुमचें ॥ ५८ ॥ माझ्या ठांयीं जंतुमात्र॥ प्रियत्वें भजताती सर्वत्र॥ तुह्मी केवळ मत्प्रेमपात्र ॥ हें प्रेम विचित्र नैसर्ग्य ॥ ५९ ॥ असो माझ्या ठायीं प्रेमा॥ धरूनि उबगलां स्वजनधामा ॥ तोक्मा[1] रुक्मा[2] वर्ष्मललामा[3] ॥ त्यजिलें शर्मा वैषयिका[4]॥६०॥ तें मज प्रिय झालें सर्वही॥हे वेधकता माझ्याचि ठायीं यदर्थीं तुमचा अपराध नाहीं ॥ परी रहस्य कांहीं परिसावें ॥ ६१ ॥ माझ्या ठायीं विश्वासतां॥मी जरी नकर्थी तुमच्या हिता ॥ तरी दोषवैषम्य[5] माझिये माथां ॥ यालागीं तत्वता कथितसें ॥ ६२ ॥ जेणें इहलोक प्रशस्त ॥ परलोकही अव्याहत ॥ तो जो स्वधर्म तुमचा उचित ॥ निगमप्रणीत अवधारा॥६३॥ जें कां स्त्रियांसि विहिताचरण भोग्मोक्षांचें साधन ॥ तिहीं श्लोकीं श्रीभगवान् ॥ करी व्याख्यान तें ऐका ॥ ६४ ॥

---

१ पल्लवादिअंकुर. २ स्वर्ण. ३ शरीरावरील दागिने. ४ विषयसंबंधी. ५ दोषाधिक्य.

भर्तुःशुश्रूषणंस्त्रीणांपरोधर्मोह्यमायया ॥ तद्बंधूनांचकल्याण्यःप्रजानांचानुपोषणम् ॥ २४ ॥

॥ टीका ॥ तयांसि ऐका वो ह्मणे हरि ॥ पतिव्रता ज्या पवित्र नारि ॥ त्यांसि पतिसेवन संसारीं ॥ उत्कृष्टधर्म नियमिला ॥ ६५ ॥ ते पतिशुश्रूषा ह्मणाल कैसी ॥ नोहे मायिका जारिणी ऐसी ॥ रक्षूनि भर्तृमानसासी ॥ ज्या परपुरुषीं विचरती ॥ ६६ ॥ पतिमानसरक्षणासाठीं ॥ वरिवरी वदती रुचिरा गोष्टी ॥ परपुरुषाचा प्रेमा पोटीं ॥ दुष्टा कपटी दुश्चरिता ॥ ६७ ॥ सौभाग्यद्रव्यें सुभूषिता ॥ वस्त्राभरणीं सालंकृता ॥ भर्तारअभिरंजनीं मात्रनिरता ॥ सप्रेमसुरता परपुरुषीं ॥ ६८ ॥ तैशा नहोती साध्वी नारी ॥ सबाह्य विशुद्ध सदाचारी ॥ भगवद्बुद्धि निजभर्तारीं ॥ ज्या संसारीं अभिरमती ॥ ६९ ॥ त्या ईश्वराच्या ऐश्वर्यशक्ति ॥ कीं शुद्धसत्वाच्या सन्मय मूर्ति ॥ कीं सत्यज्ञानामृताच्या व्यक्ति ॥ ज्या शुभ सती अमायिका ॥ ७० ॥ तयाच्या व्रताचरणानुसार ॥ साध्वी स्त्रियांहीं स्वभर्तार ॥ निष्कापट्यें अतितत्पर ॥ सत्य साचार भजावा ॥ ७१ ॥ ऐसा भर्तृशुश्रूषणें ॥ उत्कृष्ट धर्म स्वीकारणें ॥ अज्ञापिला नारायणें ॥ वेदवचनें विख्यात ॥ ७२ ॥ सासू श्वसुर देवर[1] भावें ॥ तत्पितृव्यादि[2] आघवे ॥ परिचर्येनें[3] तोषवावे ॥ भर्तारसेवे अनुलक्ष्यें ॥ ७३ ॥ दासदासी प्रजापोष्यें ॥ लालन पोषण सुखसंतोषें ॥ करितां नशिविजे हर्षामर्षें ॥ स्त्रियांसि उत्कर्षें हा धर्म ॥ ७४ ॥ तुह्मी ऐका वो कल्याणी ॥ भर्तार नह्मणावा दुर्गुणी ॥ साम्य मानूनि नारायणीं ॥ व्रताचरणीं तोषविजे ॥ ७५ ॥

दुःशीलोदुर्भगोवृद्धोजडोरोग्यधनोऽपिवा ॥ पतिःस्त्रीभिर्नहातव्योलोकेप्सुभिरपातकी ॥ २५॥

---

१ दीर. २ त्यांचे चुलते. ३ सेवेनें.

॥ टीका ॥ शील ज्याचें परम दुष्ट ॥ पदोपदीं पाववी कष्ट ॥ क्रूर कर्कश जो कनिष्ठ॥ तऱ्ही तो वरिष्ठ नारीसी ॥ ७६ ॥ दुर्भग दुर्दैव भिकारी ॥ कवडी नाहीं ज्याचे पदरीं ॥ अन्नवस्त्राविण संसारीं ॥ विकळगात्री क्षुत्क्षाम ॥ ॥ ७७ ॥ बिजवर तिजवर चतुर्थ वृद्ध ॥ विश्व देखूनि मानी विरुद्ध ॥ परुषभाषणी[1] परम क्रुद्ध ॥ संततिसंबंध सापत्न्य ॥ ७८ ॥ बैसतां उठतां अपान वाजे॥ विकळेंद्रियत्वें नधरी लाजे ॥ वयोवैषम्यें भर्ता नसजे ॥ तथापि भाजे सुपूज्य ॥ ७९ ॥ खोकी वोकी क्षणक्षणा ॥ बोले दुरुक्ति चणचणा ॥ ऐकोनि पिशुनाची प्रेरणा ॥ करी ताडना मात्सर्यें ॥८० ॥ थुंके मुते हागे घरीं ॥ लांछन लावूनि छळना करी ॥ ऐसा जाची परोपरी ॥ कां परदारी कुटिलात्मा ॥ ८१ ॥ तथापि पतिव्रतेसि तो पूज्य ॥ निष्कापटयें परम भज्य ॥ सदन दाही तऱ्ही यज्य ॥ जेंवि कां साज्य[3]हविर्भोक्ता ॥ ८२ ॥ कां जड जैसा मृत्पिंडमात्र ॥ परंतु भासे सचेतनगात्र ॥ करणज्ञानासि अपात्र ॥ दारुयंत्र चेष्टतां ॥ ८३ ॥ कीं अंधापुढें चित्रकथा ॥ करितां त्यासि अनभिज्ञता ॥ कां बधिरा गानीं उपजे आस्था ॥ जे श्रवणें अर्था नफवोनी ॥ ८४ ॥ असो करणज्ञानविकळ ॥ जातमात्र जैसें बाळ॥ जऱ्ही अवयव दिसती चपळ परी ते विकळ व्यवहारीं ॥ ८५ ॥ कीं जागृताचि सुषुप्तिग्रस्त ॥ तैसा प्रज्ञाप्रकाशीं अस्त ॥ पिशाच मूर्च्छित भ्रांतोन्मत्त ॥ असतां कांत ऐसाही ॥ ८६ ॥ नुपेक्षिजे पतिव्रता ॥ सेविजे मानूनि रमाभर्ता ॥ अंतरीं वैषम्य नुपजतां ॥ सायुज्यता ते लाहे ८७ ॥ अथवा रोगें परमरुग्ण ॥ कुपथ्यशील व्यसनीं मलिन ॥ उपदंशादि गद दारुण ॥ सन्निधान करितां दे ॥ ८८ ॥ तऱ्ही तो स्वतनूचिये परी॥ उपचारिजे व्रतस्था नारी ॥ कां जो निर्धन सर्वांपरी ॥ अनुपकारी गुदरोम ॥ ८९ ॥ अर्थधन पदार्थधन ॥ चर्महर्म्यधान्यधन ॥ यशोविद्यातपोधन ॥

---

१ कठोर भाषण करणारा. २ खीला. ३ घृतयुक्त होमद्रव्य खाणारा अग्नि. ४ ग्रस्त. ५ गरमी. ६ रोग.

जो निर्धन सुकृतादि ॥ ९० ॥ ऐसा निर्धन केवळ भर्ता ॥ ह्मणोनि नटाकिजे पतिव्रता ॥ निष्कापटय्प्रेमें भजतां ॥ परमपुरुषार्था लाहिजे ॥ ९१ ॥ ज्या वांछिती उत्तमगति ॥ पतिव्रता ज्या सुभगा सती ॥ इत्यादिदुर्गुणीं युक्त पति ॥तऱ्ही त्यांप्रति अत्याज्य॥९२॥परंतु नव्हावा पातकी॥ ज्ञातिभ्रष्ट बहिष्कृत लोकीं॥पतित जाणोनि वर्णात्मकीं ॥ घटस्फोटें त्यागिला ॥ ९३ ॥ स्वर्णस्तेयी सु[२]रापानी ॥ गुरु[३]तल्पग विप्रहननीं ॥ नकंटाळे मातृगमनीं ॥ तत्सौजन्यीं महापापी ॥ ९४ ॥ इत्यादि महापातकीं लिप्त॥ जाणोनि केला जो बहिष्कृत ॥ पतिव्रतेसि भर्ता त्यक्त ॥ येर अत्यक्त उपदोषी ॥ ९५ ॥ विषयबुद्धी पतितोषण ॥ यदर्थीं पुंश्चळीच विचक्षण ॥ निराभिलाषें तनुवाङ्मन ॥ निर्वाणभजन सतीचें ॥ ९६ ॥काया नचोरी दास्याचरणीं॥ पतिनिंदा नायके कानीं ॥ सेर्ष्या क्षुब्ध नपाहे नयनीं ॥ नवदे वाणी गुणदोष ॥ ९७ ॥ बाहीं जलधीचें लंघन ॥ किंवा पायीं वळघिजे गगन ॥ वदनीं मेरूचें चर्वण ॥ हें अघटितघटन हों शके ॥ ९८ ॥ परंतु भर्ताराची आज्ञा ॥ लंघनीं युगांत जीच्या प्राणा ॥ अवस्थात्रयीं जे पतिविना ॥ अन्याचिंतना नस्पर्शे ॥९९॥ सत्पुत्र सच्छिष्य कां पतिव्रता ॥सद्गुरु पिता अथवा भर्ता ॥ इत्यादि नियमीं सप्रेमता ॥ पावती भजतां अपवर्ग ॥ ३०० ॥ ह्मणोनि तुह्मी कल्पनाकामा ॥ आपुलालया जाऊनि सद्मा ॥ मदुक्तिसाम्य नकरूनि छद्मा ॥ भाविजे पद्माप्रियभर्ता ॥ १ ॥ कुलस्त्रियेसी उपपति करणें ॥ अनुपयोगी बहुतां गुणें ॥ कृष्ण निरोपी गोपींकारणें ॥ विशदलक्षणें तीं ऐका ॥ २ ॥

अस्वर्ग्यमयशस्यंचफल्गुकृच्छ्रंभयावहम् ॥ जुगुप्सितंचसर्वत्रऔपपत्यंकुलस्त्रियः ॥ २६ ॥

---

१ सोनें चोरणारा. २ मद्य पिणारा. ३ गुरुस्त्रीगमन करणारा. ४ त्यांच्या साधुत्वाविषयीं.

॥ टीका ॥ नम्रबोधी सत्यहित ॥ कपटी दुरात्मा तो निश्चित ॥ त्याहूनि तरुवरांशीं एकांत ॥ करितां प्राप्त सुखलाभ ॥ ३ ॥ ह्मणोनि श्रीकृष्ण जगद्गुरु ॥ बोधी यथार्थ शास्त्रविचारु ॥ त्यासि प्राकृत जे ह्मणती जार ॥ नरक अघोर त्यां होती ॥ ४ ॥ उपपती[1]पासूनि सुख भोगणें ॥ औपपत्य हें त्यांतें ह्मणणें ॥ स्वर्गसुकृता पासूनि च्यवणें ॥ तें याकारणें अस्वर्ग्य ॥ ५ ॥ जगीं इहलोकीं छीथू घडे ॥ पूर्वजमाळा नरकीं पडे ॥ गोत्रसुहृदादिकां नवडे ॥ वदनाकडे नपाहती ॥ ६ ॥ उपपति जो जारपुरुष ॥ त्यासि करावया संतोष ॥ अहोरात्र तनु संक्लेश ॥ करितां यश नुपलभे ॥ ७ ॥ जारपुरुषाचे मातापितर ॥ स्वजन सुहृद जाया श्वसुर ॥ क्रूरभावें करिती वैर ॥ परी जार समोर त्यां नवदे ॥ ८ ॥ परस्परें नशकती पाहों ॥ धणीवरी[2] एकांतीं न लाहती राहों ॥ विश्वशत्रुत्वें हृदयीं भवो[3] ॥ भुजंगा[5] भुजंगा सारिखा ॥ ९ ॥ आवडती गोष्टी सांगावया ॥ उमसूं[4] नलाहे जाया ॥ भयें सर्व जगाचिया ॥ मिळणी ठायां नलभती ॥ १० ॥ सांदीकोंदीमाजि रातीं ॥ सर्वां वंचूनि कैतववृत्ती[7] ॥ सभय मिळणी उपदंपती ॥ अथवा दूतीप्रसंगें ॥ ११ ॥ अल्प अवकाश सांपडे ॥ सांचल[8] होतां सुरत विघडे ॥ अभीष्टसुखावाप्ति नघडे ॥ सान्निध्य थोडें बहुक्लेशीं ॥ १२ ॥ कैंची शय्या सुमनोहर ॥ सदीप[9] एकांत मंदिर ॥ गीत तांबूल अन्योपचार ॥ भाषणीं चोर परस्परें ॥ १३ ॥ दर्शन स्पर्शन गुह्यभाषण ॥ मिथः[10] अवयवनिरीक्षण ॥ नीवीमोक्षण[11] कुचमर्दन ॥ चुंबनालिंगन अष्टधा ॥ १४ ॥ सुरतीं पूर्वांगें हीं अष्ट ॥ उत्तर मैथुनादिकें अष्ट ॥ अंगलालन दशनदष्ट[12] ॥ नघडे यथेष्ट जारत्वें ॥ १५ ॥ फल्गु ह्मणिजे तुच्छप्राय ॥ फावलें तितुकें भोगिलें जाय ॥ तितुक्यासाठीं सोसणें घाय ॥ करितां उपाय मिळणीचे ॥ १६ ॥ ध्वांक्ष जैसा गृहस्थद्वारीं ॥ त्यक्तबळीचें भक्षण करीं ॥ मार्जारश्वानादिभय अंतरीं ॥ जा-

---

१ जारपुरुष. २ यथेच्छ. ३ भय. ४ जाराला. ५ सापासारखा. ६ वेळ. ७ कपटानें. ८ चाहूल. ९ दीपयुक्त. १० परस्पर. ११ गांठ सोडणें. १२ दंतक्षत करणें.

र त्यापरी साशंक ॥ १७ ॥ जारीणी जालिया गरोदर ॥ जार नकरी गर्भसंस्कार ॥ भयें उद्विग्न उभयांतर ॥ दोहदोपचार मग कैंचे ॥ १८ ॥ प्रवासीं अथवा परलोकवासीं ॥ वियोग असतां भर्ताराशीं ॥ नारी रमोनि जारपुरुषीं ॥ धरी गर्भासी दैवबळें ॥ १९ ॥ सती प्रयत्नीं साक्षेप गर्भ ॥ शिणतां तयेसी तो दुर्लभ ॥ स्वैरिणी चुकवितां अलभ्यलाभ ॥ एनसकोंभ उदया ये ॥ २० ॥ जैंहुनी गर्भ राहे पोटीं ॥ तैंहुनी उभयतां हिंपुटीं ॥ जुगुप्सितत्वें प्राणसंकटीं ॥ होती कष्टी विश्वभयें ॥ २१ ॥ वदों नशकती कोण्हापाशीं ॥ पुसों नलाहती उपायासी ॥ विंचुवें खादल्या चोराऐसीं ॥ निजमानसीं मिडकती ॥ २२ ॥ उभयतांचें सौजन्य तुटे ॥ वदती परस्परें वोखटें ॥ कर्म वोडवलें ह्मणती खोटें ॥ दुर्घट खोटें आठवलें ॥ २३ ॥ ऐसीं शिणती परस्परीं ॥ तेथ डोहळ्यांची कवण परी ॥ स्रावपतनादिप्रकारीं ॥ यत्नें अंतरीं झुरताती ॥ २४ ॥ स्रावपतनकर्मीं प्रवीणा ॥ कुंटिणी जारिणी वैद्यां निपुणां ॥ शेकमुळिका भेषजें नाना ॥ नवस नावसिती षष्टिके ॥ २५ ॥ डोहळ्यांची ऐशी रीती ॥ श्रमतां जैं होय गर्भोपहति ॥ तें त्या पापें नरकावाप्ति ॥ यालागीं ह्मणती अस्वर्ग्य ॥ २६ ॥ श्रमतां पतनकर्मा नघडे ॥ तैं लौकिक सोहळा वाढे ॥ डोहळे प्रकट चहूंकडे ॥ वाद्यघोषें नृपदंडें ॥ २७ ॥ दीर्घताडन बीभत्सवपन ॥ रासभयान पण्यभ्रमण ॥ शकृन्मूत्रपुरीषसेचन ॥ पादत्राणस्रक्भूषा ॥ २८ ॥ औपपत्यें हें पातित्य ॥ सर्वीं सर्वत्र जुगुप्सित ॥ कुलस्त्रियांसि नोहे उचित ॥ ह्मणे भगवंत गोपींतें ॥ २९ ॥ श्रोतीं आक्षेप केला येथ ॥ अवंचक कृष्णाचा परमार्थ ॥ तो काय हा विषयस्वार्थ ॥ भोगें कृतार्थ नरनारी ॥ ३० ॥ तरी हे नकीजे येथ शंका ॥ कृष्ण नबोधी विषय निका ॥ येथींचा गूढार्थ ठावुका ॥ होय त्या विवेका अवधारा ॥ ३१ ॥ स्वर्ग ह्मणिजे सुकृतफळ ॥ तें निर्विषय सुख केवळ ॥ विषय

---

१ डोहळे पुरविण्याचे प्रकार, २ जारिणी. ३ पापाचा अंकुर. ४ खिन्न. ५ निंद्यत्वामुळें.

सुखीं दुःख बहळ ॥ स्वर्गीं नरकीं समसाम्य ॥ ३२ ॥ हृदयस्थ निजात्मा मुख्यपाति ॥ स्वर्गसुखद तेथींची रति ॥
बाह्य समस्त येर उपपाति ॥ हो कां भूपति सुर सिद्ध ॥ ३३ ॥ प्रथम पति मरोनि गेला ॥ द्वितीय गांधर्वविवाह केला ॥
त्यासि ह्मणती निजदादुला ॥ चाळिती पहिला विधिवाद ॥ ३४ ॥ चोरूनि रमतां ह्मणती जार ॥ गांधर्वविवाहीं उजागर ॥
एवं भलतैसा संसार ॥ ह्मणती चतुर चालोंद्या ॥ ३५ ॥ विभांडकानें धर्मपत्नी ॥ कोण्यासूत्रें पाणिग्रहणीं ॥
केव्हां परिणिली होती हरिणी ॥ जेथ शृंगमुनि जन्मविला ॥ ३६ ॥ किंवा वासवी पराशरें ॥ कैं परिणिली विधिविचारें ॥
जीचे[1] जठरींच्या व्यासकुमरें ॥ त्रिजग सारें धवळिलें ॥ ३७ ॥ मैत्रावरुणि[2] वशिष्ठागस्ति ॥ कोठें गर्गाची उत्पत्ति ॥ सौभरि
मुनिची संतति ॥ कोणती सती करगृहीता ॥ ३८ ॥ एवं यथार्थ भगवदुक्ति ॥ ब्रह्मजिज्ञासा मुख्यश्रुति ॥ तदनुष्ठानीं
नाहीं शक्ति ॥ धर्मप्रवृत्ति त्यां कथिली ॥ ३९ ॥ लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा ॥ ज्ञानें सांख्यांची प्रतिष्ठा ॥ विषयासक्तां कर्मचेष्टा ॥
कथिला गोमटा कर्मयोग ॥ ४० ॥ आत्मपतीचें नफवे सुख ॥ ह्मणोनि बाह्य हें औपपतिक ॥ गांधर्वविवाह परी
चोख ॥ विषयात्मक विध्युक्त ॥ ४१ ॥ अभेद भोगितां आत्मरति ॥ द्वैतबोधाची उपशांति ॥ द्वैतावेगळी अपयशोऽवाप्ति ॥
कोण्हाप्रति तें सांगा ॥ ४२ ॥ येरां सुरनरां विषयसिद्धि ॥ साधितां युद्धीं अथवा वादीं ॥ जय पराजय सर्वां बाधी ॥ द्वैतऽपाधीमाजिवडा ॥ ४३ ॥
फल्गु ह्मणिजे तुच्छ अल्प ॥ तें हें विषयसुखची स्वल्प ॥ याज्ञिक श्रुतीचा करूनि जल्प ॥ यज्ञें
त्रिविष्टप[3] आश्रयिती ॥ ४४ ॥ तेथ नपुरतां विषयअसोसी ॥ पुन्हा पचती गर्भवासीं ॥ स्वर्ग्य कीं अस्वर्ग्य ह्मणिजे
यासी ॥ एवं विषयांसि तुच्छत्व ॥ ४५ ॥ कृच्छ ह्मणिजे कष्टें साध्य ॥ तें विषयसुखचि दुराराध्य ॥ याचा अनुभव सर्वां प्रसिद्ध।
नलगे प्रबोध करावा ॥ ४६ ॥ बाईल मिळतां संतोष वाटे ॥ संसार करितां अपान फाटे ॥ विषय मानूनि गोमटे ॥

---

१ सत्यवती. २ मित्रावरुणांचे पुत्र. ३ स्वर्ग.

दुःखें दुर्घटें भोगिती ॥४७॥ जाया जोडली उर्वशी ऐसी ॥ परी उकरडां रमतां नये तीशीं ॥ ह्मणोनि करितां मंदिरासी ॥ बहुतां क्लेशीं जाचिजे ॥ ४८ ॥ जांतीं उखळें मुसळें खुंटे ॥ सुपें टोपली पाटेपरोटे ॥ झाडणी केरसुण्या खराटे ॥ भिंती दारवंटे कवाडें ॥४९॥ एवं अल्प सुखासाठीं ॥ ऐशा अपार दुःखकोटी ॥ क्षुधे तृषेची जाचणी मोठी ॥ दुर्लभ गोठी मिळणीची ॥५०॥ यात्रा वाणिज्य सेवामिसें ॥ रोषें तोषें दोषें प्रवासें ॥ रोगेंदारिद्र्ये विद्याभ्यासें ॥ वियोग आपैसे ठाकती ॥ ५१ ॥ आपण स्त्रियेचा ह्मणवी स्वामी ॥ पोटार्थ विकूनि घे आणिके धामीं ॥ मग तो देहपति आपुले सद्मीं ॥ दास्यकर्मीं प्रवर्त्तवी ॥ ५२ ॥ स्त्रियेचा ह्मणवी स्वयें दादुला ॥ आपण येरांची बाईल झाला ॥ पोटें ऐसा विटंब केला ॥ निर्लज्जाला सुख वाटे ॥ ५३ ॥ याहूनि धन्य तिर्यग्योनि ॥ विषय भोगिती स्वाधीनपणीं ॥ कोणा अधीन नहोती कोण्ही ॥ भूजलगगनीं स्वच्छंदें ॥ ५४ ॥ नरदेहींच्या विशेष ज्ञानें ॥ कळतां वेदशास्त्रपुराणें ॥ पोटासाठीं विकोनि घेणें ॥ बाईल होणें आणिकांची ॥ ५५ ॥ पुरुषा पढियंती अंतुरी[3] ॥ ते पोष्यांची[4] धुर धरी ॥ तेवि सर्व कार्यें जो आवरी ॥ तो सेवकाशिरीं प्रधान ॥ ५६ ॥ प्राधान्याचें महत्व आलें ॥ भूषण मिरवी येणें बोलें ॥ पोटासाठीं आयुष्य गेलें ॥ विकोनि घेतलें हें नकळे ॥ ५७ ॥ त्याहूनि मळहारक बरा ॥ मूर्खपणें तो निदसुरा ॥ येऱ्हवीं करील जरी स्वविचारा ॥ तरि संसारा जितील ॥५८॥ च्यारी घटिका मलापहरणीं ॥ उरला काळ स्वाधीन पणीं ॥ सप्रेम नामस्मरेल वाणी ॥ तरि दुर्योनि चुकवील ॥५९॥ त्याहूनि गौण प्राधान्य कर्म ॥ शरीरवांङ्मनविश्राम ॥ अहोरात्र सम विषम ॥ प्रपंच अधम उपसावा ॥६०॥

---

१ आपोआप. २ प्रिय. ३ स्त्री. ४ पोसण्यास योग्य. ५ अग्रभाग.

एवं स्वहिताची बोंहरी ॥ विषयस्वार्थें केली पुरी ॥ त्या विषयार्थ झुरे अंतरीं ॥ विपत्ति पदरीं बहुसाळ ॥ ६१ ॥
करितां बहुतांचें न्यूनपूर्ण ॥ छिद्र लक्षून ते करिती विघ्न ॥ कारागार दीर्घ ताडन ॥ धनापहरण दुर्दशा ॥ ६२॥
धनिक ह्मणती सधन आह्मी ॥ स्वतंत्र धनसदनाचे स्वामी ॥ संपन्न संतति हेमीं धामीं ॥ ललनाललामीं सुख
भोगूं ॥६३॥ धनाचा करितां त्या आयव्यय ॥ होय आयुष्याचा क्षय ॥ राजिक दैविक गोत्रजभय॥दस्युस्तेयनृपदंडें
॥ ६४ ॥ देवढीलाभें करूनि खत ॥ हातींचें देऊनि देखत देखत ॥ रडों लागती विख्यात ॥ खत दुखवत
क्षणक्षणा ॥ ६५ ॥ पुढील मुदती भंगोनि गेली ॥ खतें वेदना बहुत केली ॥ रागें चुलीस पाणी घाली ॥ धरणीं
घेतली तद्द्वारीं ॥ ६६ ॥ रोगी चंडिकेचिये द्वारीं ॥ उपासपारणीं जैसा करी ॥ तैसा अधमर्णाचिये घरीं॥ बैसे
निर्धारीं खतेंला ॥ ६७॥ वेसीस बांधिजे ह्मणती दुःख ॥तैसे भवंते मिळती लोक॥निळे पाय काळें मुख ॥ सांगोनि
विवेक करा ह्मणती ॥ ६८॥ श्यांस शेळी लक्षांस गाय ॥ एक सांगती हा उपाय॥मुळीं मुदलासि नाहीं ठाय॥
तेथ व्याज काय पाहतां॥६९ऐसी ऐकतां पंचाइती॥क्षोभें भडका उपजे चित्तीं॥तंव एक बोलती पक्षपाती॥नृपाप्रति
हें कथिजे॥७०॥राया वोपूनि चतुर्थ भाग॥सवृद्धि द्रव्य गणूनि सांग॥घेईजे हा उपाय चांग ॥करिती दीर्घ प्रयत्न
॥७१॥तंव ते राजद्वारींचे जन॥ देखोनि सधन उत्तमर्ण ॥ लांच मागती निर्भर्त्सून॥करिती छलन नदेतां ॥७२॥
एवं साधनाचिये पाठीं ॥ ऐशा अनेक दुःखकोटी ॥ केउती विषयसुखाची गोठी॥सर्वदा पोटीं धरी चिंता॥ ७३ ॥
असत्यवादी कळींचे जन ॥ धन बुडविती विश्वासून ॥ जन्मातरीं त्यांचें श्वान ॥ होऊनि ऋण मग घेती ॥७४॥

---

१ माती. २ भूषण. ३ प्राप्ति व खर्च. ४ शत्रु व चोर. ५ कर्ज घेणारा. ६ सावकार. ७ सव्याज. ८ कर्ज देणारा सावकार (धनिक.)९ अधिक.

पश्वादि दासी स्त्री बाळक ॥ अधमर्णाचे[1] होती धनिक ॥ भूनिक्षेपावरी[2] पन्नक ॥ होती अचुक धनलोभें ॥ ७५ ॥ एवं विषयाची सामग्री ॥ सुखार्थ भुलवूनि घाली घोरीं ॥ यातना जन्मजन्मांतरीं ॥ कैंची संसारीं मग सुटिका ॥ ॥ ७६ ॥ ह्मणाल स्त्रियांसि कथिला धर्म ॥ पुरुषाचें कां घेतां नाम ॥ तरी ज्यांसि कामाचा संभ्रम ॥ त्या सर्वही सकाम कामिनी ॥ ७७ ॥ पुरुष निःसंग उदासीन ॥ निर्विकार निरभिमान ॥ निष्प्रपंच स्वरत पूर्ण ॥ नित्य निर्गुण निष्काम ॥ ७८ ॥ येर अवघीच प्रकृति ॥ तदंश अनेक अविद्याव्यक्ति ॥ कामिनी ह्मणून कामासक्ति ॥ निजात्मरति त्यां कैंची ॥ ७९ ॥ ह्मणोनि जुगुप्सित[3] औपपतिक[4] ॥ सांडूनि बाह्यविषयसुख ॥ पुरुष सेविजे अंतर्मुख ॥ ऐसा विवेक हरि बोधी ॥ ८० ॥ तो मी पुरुष अभ्यंतरीं ॥ दुष्प्राप असतां प्रेमा भारी ॥ सगुण सुलभत्वें संसारीं ॥ घडे व्यवहारीं अवज्ञा ॥ ८१ ॥ ह्मणोनि गोपींसि ह्मणे हरि ॥ परतोनि जावें आपुले घरीं ॥ स्वकांत सेवितां शास्त्रनिर्धारीं ॥ प्रेमा मजवरीं असोंद्या ॥ ८२ ॥

श्रवणाद्दर्शनाद्ध्यानान्मयिभावोऽनुकीर्त्तनात् ॥ नतयासन्निकर्षेणप्रतियाततततोग्रहान् ॥ २७ ॥

॥ टीका ॥ अचिंत्यैश्वर्यगुणकीर्तनें ॥ विविधावतारीं विविधाचरणें ॥ माझीं पुण्यश्रवणकीर्तनें ॥ अंतःकरणें विवरितां ॥ ८३ ॥ श्रवण करितां माझी कीर्ति ॥ मद्रूपीं उपरम पावे वृत्ति ॥ सहजचि विवर्ता निवृत्ति ॥ चित्सुखावाप्ति अनायासें ॥ ८४ ॥ सगुण निर्गुण मद्दर्शन ॥ हृदयीं ठसावतांचि पूर्ण ॥ उडोनि जाय प्रपंचभान ॥ नयनीं चिद्घन प्रकाशे ॥ ८५ ॥ जिकडे जिकडे फांके दृष्टि ॥ तिकडे तिकडे सच्चित्सुखाची वृष्टि॥ अधोर्ध्व सभोंवता

---

१ ऋणिक. २ भूमींत पुरून ठेविलेलें द्रव्य. ३ निंद्य. ४ जार पुरुषाचा समागम करणें. ५ आत्मस्वरूप.

पाटीं ॥ सुखासंतुष्टी मी प्रकटें ॥ ८६ ॥ मजवीण भिन्न असावें कांहीं ॥ तरी त्याचें दर्शन घडावें कहीं ॥ दृश्यकल्पना
नाथिली पाहीं ॥ मनाच्या ठायीं प्रतिभासे ॥ ८७ ॥ मी अद्वैतसुखाची खाणी॥ जिहीं विश्वासें रंगोनि श्रवणीं
॥ प्रेमा धरिला मद्दर्शनीं ॥ त्यांचे नयनीं प्रकाशें ॥ ८८ ॥ मद्दर्शनें उठाउठी ॥ ध्यानानंद उथळे पोटीं ॥ माझी
सगुणमूर्ति गोमटी ॥ प्रकटे सृष्टी सबाह्य ॥ ८९ ॥ श्याम राजीवलोचन ॥ ठाणमाण गुणलक्षण ॥ रूपरेखा लावण्यपूर्ण
॥ वेधें तनु मन पालटी ॥ ९० ॥ देह होय स्तब्धीभूत ॥ चित्त चैतन्यीं विरोनि जात ॥ तैं मग अक्षय सुख
एकांत ॥ होय संप्राप्त अबला हो ॥ ९१ ॥ विशेष काय सांगूं गोठी ॥ वास्तव माझें आस्तिक्य पोटीं॥ सप्रेम बाणल्या
तैंचि वोठीं ॥ कीर्त्तनपरिपाटीं विस्तारे ॥ ९२ ॥ आवडतयाची काहणी ॥ वाखाणितां नपुरे धणी ॥ श्रवणीं
सादर होतां कोण्ही ॥ नपुरे शिराणी कथनाची ॥ ९३ ॥ कृष्ण ऐकावा पाहावा ॥सालंकृत सहावयावा ॥ माजि उभा
ठाके आठवा ॥ जो आठवा देवकीचा ॥ ९४ ॥ सालंकृत ठाणठकारें ॥ आठवे तैसा ध्यानीं भरे ॥ ध्यानसुखाच्या
आविष्कारें ॥ विषयीं झांसुरे[2] तद्वेधें ॥ ९५ ॥ कन्या आवडती दूरदेशीं ॥ माता बोळवी सासुरियासी ॥ मग
ते आठवे निजमानसीं ॥मोहें पिशी तद्वेधें ॥ ९६ ॥ अवचित भासे दृष्टीपुढें ॥ स्वप्नीं संवादीं पवाडे[3] ॥ तिचें बोलणें
कानीं पडे ॥ ह्मणोनि वावडे[4] पाहावया ॥ ९७ ॥ मुखें आळवूं जाय सुनां ॥ तंव तिचेंचि नांव ये वदना ॥ खातां
जेवितां प्राशितां जीवना ॥ विसर पडेना तियेचा ॥९८॥ तैसी असतां सन्निधानीं ॥ अवस्थाभूत नोहे जननी ॥ पढियें
प्रेम दृष्टांतकथनीं ॥ घातलें श्रवणीं प्राकृत ॥ ९९ ॥ आत्मप्रियत्वें विश्वप्रिय ॥ तें वेधकत्व कथिजे काय ॥ तो

---

[1] आवड. [2] विरक्ति पावे. [3] प्रवेश करी. [4] धांवे.

जगदात्मा मी स्वयें ॥ अपैंता होय सप्रेमें ॥४००॥ सन्निधानें तैसा नफवें ॥ यालागीं परतोनि गृहा जावें ॥ श्रवणें ध्यानें सप्रेमभावें ॥ मज चिंतावें हृत्कमळीं ॥ १ ॥ तृषेता धेनु गंगातटीं ॥ बळें मुरडितां मारूनि काठी ॥ कीं भणगा उठवी बैसल्या ताटीं ॥ त्याहूनि कष्टी वधूहोती ॥ २ ॥

॥श्रीशुकउवाच॥इतिविप्रियमाकर्ण्यगोप्योगोविंदभाषितम्॥विषण्णाभग्नसंकल्पाश्चिंतामापुर्दुरत्ययाम्॥२८॥

॥ टीका ॥ श्रुतिस्मृत्यर्थधर्मवचनें ॥ कृष्णप्राप्तीसि करिती विघ्नें ॥ तें विषतुल्य ऐकोनि मनें ॥ दुस्तर चिंता पावलीं ॥ ३ ॥ स्वमुखें गोविंदें निगदिलें ॥ परतोनि सदना जाणें कथिलें ॥ वियोगदुःख दुणाविलें ॥ तेणें मानस भंगलें गोपींचें ॥ ४ ॥ भंगोनि गेला मनोरथ ॥ दुस्तर चिंता जाली प्राप्त ॥ करपद अवयव जाले श्लथ ॥ निश्चेष्टित तनुभाव ॥ ५ ॥ सखेद त्यांचीं तनुलक्षणें ॥ शुकें परीक्षिती कारणें ॥ कथिलीं तैसीं ऐका मनें॥ सावधपणें श्रोते हो ॥ ६ ॥

कृत्वामुखान्यवशुचःश्वसनेनशुष्यद्बिंबाधराणिचरणेनभुवंलिखंत्यः ॥
अस्रैरुपात्तमषिभिःकुचकुंकुमानितस्थुर्मृजंत्यउरुदुःखभराःस्मतूष्णीम् ॥ २९ ॥

॥ टीका ॥ मोडली आनंदाची हांव ॥ स्मृति विसरली शरीरभाव ॥ विकळ इंद्रियांचा गांव ॥ भीरुस्वभाव उमटले ॥ ७ ॥ प्रतिकूळ उत्तरीं अभ्यंतर ॥ तापतां श्वास सांडिती तीव्र ॥ त्यांचिये वाफे बिंबाधर ॥ परम कु-

---

१ आयता. २ भिकाऱ्याला. ३ सांगितलें. ४ दिले. ५ उत्साह.

कुमार वाळले ॥ ८ ॥ परम कोमळ गोपीहृदयें ॥ कृष्णीं सस्निग्ध नवनीतप्रायें ॥ विरहतापें द्रवतां वाहे ॥ चक्षुप्रवाहें बाष्पांबु ॥ ९ ॥ तें अप्रतीकार[1] सकज्जल ॥ वक्षःस्थळीं सशोक जळ ॥ सकुंकुम कुचमंडळ ॥ पडतां केवळ क्षाळलें ॥ १० ॥ अंगकांति पांडुरवर्ण ॥ शोकें गौरता जाली लीन ॥ त्रिवेणी ऐसी हृदयावरून ॥ असितां[2] अरुणश्वेतौघा ॥ ११ ॥ पहातां उघडीं दिसती बुबुळें ॥ आकर्ण कुरंगीसदृश डोळे ॥ ढळमळां स्रवती सशोक जळें ॥ अचळमौळें[3] जेंवि घनीं ॥ १२ ॥ स्तिमित[4]दृष्टि झाल्या नयनीं ॥ अपांग मूर्च्छित मानसग्लानि ॥ विमुखरूपाभिज्ञत्वगुणीं ॥ प्रतिमापाषाणीं समसाम्य ॥ १३ ॥ चरणांगुष्ठें भूतळीं रेखा॥ विस्मृतीमाजी वोढिती देखा ॥ जाणों आयुष्या करूनि लेखां[5] ॥ अवशिष्ट घटिका मोजिती ॥ १४ ॥ मेरूपासूनि ज्यांचा भार ॥ ऐसिया दुःखाचे डोंगर ॥ खचोनि पडले अनावर ॥ त्यांहूनि सुभर सक्लेश ॥ ५१ ॥ ऐशा ठकल्या मुहूर्त मात्र ॥ प्रेमसंरंभा प्रजागर ॥ तेणें परिमार्जूनि नेत्र ॥ उदिता उत्तर जावया ॥ १६ ॥

प्रेष्ठंप्रियेतरमिवप्रतिभाषमाणंकृष्णंतदर्थविनिवर्त्तितसर्वकामाः ॥
नेत्रेविमृज्यरुदितोपहतेस्माकिंचित्संरंभगद्गदगिरोऽब्रुवतानुरक्ताः ॥ ३० ॥

॥ टीका ॥ शुक ह्मणे गा परीक्षिति ॥ किमर्थ गोपींची सकोपवृत्ति॥ झाली ह्मणसी तरी तुजप्रति॥ कथितों निगुती तें ऐका ॥ १७ ॥ ज्याचे प्राप्तीलागीं आह्मीं ॥ विरक्ता जालों सर्वकामीं ॥ सांडूनि सुत धन सदन स्वामी ॥ चरणपद्मीं अनुरक्ता ॥ १८ ॥ ऐसा प्रियतम आह्मांसि कृष्ण ॥ करितां अप्रिय संभाषण ॥ तेणें मानस जालें उ-

---

१ निवारणोपायरहित २ काळा, तांबडा, पांढरा, ओघ जिचा ती. ३ पर्वतशिखरें. ४ मंद. ५ गणना.

ष्ण ॥ करिती स्फुंदन सद्गदिता ॥ १९ ॥ आदरीं देखून अनादर ॥ अमर्ष[1] उधवूं[2] पाहे शिर॥ परी कृष्णीं रंगलें अभ्यंतर ॥ तें निष्ठुर हों नशके ॥ २० ॥ सव्रीड[3]दंपतीबुझावणी[4] ॥ करूं येती शेजारिणी ॥ दुःखें क्रोधोर्मि तेंवि उशिणी ॥ अंतःकरणीं ऊठिली ॥ २१ ॥ जेणें भंगे प्रेमलाभ ॥ तैसा सैराट[5] नकरी क्षोभ ॥ वाढवी प्रेमाचें वालभ॥ह्मणिजे संरंभ तो कोप ॥ २२ ॥ तैसिया कोपें सकोपिष्ठा ॥ नेत्र पुसूनि सद्गदकंठा ॥ विरहें लज्जा विसरूनि धीटा ॥ बोलती प्रेष्ठा कृष्णाशीं ॥ २३ ॥ ज्या भाषणें उपजे हर्ष ॥ विरोनि जाय क्रोधावेश ॥ भाषणरूपें तें पीयूष ॥ येर सदोष विषतुल्य ॥ २४ ॥ ऐसें भाषण जयापाशीं॥त्रिजगत्प्रियतम मानी त्यासी ॥ वृथा जल्पूनि गुणदोषांसी ॥ मूर्खा जगेंशीं वैरस्य ॥ २५ ॥ तैशा नव्हेती व्रजकामिनी ॥ श्रुतिमनोज्ञप्रियभाषिणी ॥ प्रेमा प्रकटूनि अंतःकरणीं ॥ सकोप कृष्णीं अनुरक्ता ॥ २६ ॥

॥ गोप्यऊचुः ॥ मैवंविभोऽर्हतिभवान्गदितुंनृशंसंसंत्यज्यसर्वविषयास्तवपादमूलम् ॥
भक्ताभजस्वदुरवग्रहमात्यजाऽस्मान्देवोयथाऽऽदिपुरुषोभजतेमुमुक्षून् ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ गोपी ह्मणती विभो समर्था ॥ शास्त्रवादार्थें क्रूरता ॥ बोलावया तुज योग्यता ॥ नाहीं सर्वथा विचारीं ॥ २७ ॥ योग्यता नाहीं कां ह्मणसी जरी॥ यदर्थ कारण तूं अवधारीं ॥ एकां निकटीं एकां दुरी॥ हे अयोग्य परी तुजपाशीं ॥ २८ ॥ जैसे मुमुक्षु मागिले ॥ साधनंसपन्नविरक्त भले ॥ तुज आदिपुरुषातें सप्रेम भजले ॥ ते नाहीं उपेक्षिले तैं तेणें ॥ २९ ॥ जाणोनि मुमुक्षूंचें प्रेम ॥ त्यां तैसाचि पुरुषोत्तम ॥ भजता जाला य-

---

१ क्रोध. २ डोकें वर काढूं पाहे. ३ सलज्ज. ४ समजावणी. ५ स्वच्छंद.

थाकाम ॥ तरी आह्मां हें विषम कां वदसी ॥ ३० ॥ आह्मी तैसियें परिपाटीं ॥ सर्वविषयांसि देऊनि पाठी ॥ घातली तव चरणासीं गांठी ॥ भवराहटी विसरूनी ॥३१॥ आह्मी जाणोनि निजांघ्रिभक्ता॥पतिसुतधनादि आश्रमत्यक्ता ॥ अनन्य एकांत अनुरक्ता॥तुज हे वक्रता अयोग्य ॥ ३२ ॥ जेंवि जळाच्या सन्निधानें ॥ द्रवत्वा भजिजेत असतां लवणें ॥ जळें वारूनि काठिन्य देणें ॥ तैं तें उणें कोणासी ॥३३॥ यालागीं जाणूनि अभ्यंतर ॥ आमुचा करीं अंगीकार ॥ नहोईं नभजोनि निष्ठुर ॥ शास्त्रविचारप्रवक्ता ॥ ३४ ॥ दुरवग्रहा हे स्वच्छंदा ॥ आमुचा अव्हेर नकरीं कदा ॥ आह्मी तुझिया पदारविंदा ॥शरण मुकुंदा सर्वस्वें॥ ३५॥जाणोनि स्वकीयांचा छंद॥तैसा क्रीडसी तूं स्वच्छंद ॥ हें विसरूनि आपुलें बिरुद ॥ कां विधिवाद जल्पसी ॥ ३६ ॥ करूनि आज्ञेचा अव्हेर ॥ उल्लंघूनि शास्त्राचार ॥ ह्मणसी कां बोलतां प्रेमादर ॥ तरी तो विचार अवधारीं ॥ ३७ ॥

यत्पत्यपत्यसुहृदामनुवृत्तिरंगस्त्रीणांस्वधर्मइतिधर्मविदात्वयोक्तम् ॥
अस्त्वेवमेतदुपदेशपदेत्वयीशेप्रेष्ठोभवांस्तनुभृतांकिलबंधुरात्मा ॥ ३२ ॥

॥ टीका ॥ पति अपत्य सुहृद स्वजन ॥ यांचें जें का अनुवर्त्तन ॥ हा स्वधर्म स्त्रियांलागुन ॥ विनोदिवचन हें मुख्य ॥३८ ॥ आपुले कंठीं असोनि मणि॥अबळां चाळविजे दर्पणीं॥तैंवि तूं शास्त्रार्थ अनुशासनीं॥आह्मांलागूनि बोधिसी ॥ ३९ ॥ वस्तु चोरूनि ठेविजे घरीं ॥ माग घालिजे जैंवि डोंगरीं ॥ कीं फळें असतां शाखेवरी ॥ जलांतरीं प्रलोभिजे ॥ ४० ॥ ऐसा करूनियां उपहास ॥ करिसी स्वधर्मा उपदेश ॥ तो अवघाचि फळादेश॥

---

१ अनुक्रमानें २ अत्यंत निष्ठुर भाषण करणारा. ३ प्रतिज्ञा. ४ अनुसरणें. ५ थट्टेचें भाषण. ६ धर्मशास्त्राचे नियम. ७ भ्रम पावावें.

घडो आह्मांस तुझ्या ठायीं ॥४१॥ धर्मोपदेशें धर्माचरण ॥ तेणें फळ जें अवगम्यमान ॥ तें तुझ्या ठायींच प्रतीयमान ॥ असो उपदेशविषयत्वें ॥ ४२ ॥ उपदेशाचें जें कां स्थान ॥ उपदेशपद हें त्या अभिधान ॥ मज ह्मणावया काय कारण ॥ तरी तें वचन अवधारीं ॥ ४३ ॥ ज्ञानें करूनि अवगम्यमान ॥ तें एक ईश्वरत्वाचि जाण ॥ वांचूनि प्राकृत प्रपंच गौण ॥ उपदेशस्थान घडेना ॥ ४४ ॥ यथाशास्त्र धर्माचरण ॥ पतिपुत्रादिअनुसेवन ॥ तेणें ईश्वर संतोषोन ॥ वैराग्यज्ञान प्रकाशी ॥ ४५ ॥ वैराग्य ह्मणिजे भवनिवृत्ति ॥ ज्ञानें ईश्वरतत्वावाप्ति ॥ आह्मांसि जाली ते तव प्राप्ति ॥ कां पां श्रीपति परतविशी ४६॥ह्मणसी ब्रह्मांडीं ईश्वर॥मी तो नंदगोपाचा कुमर॥ तरी तूं आत्मा निर्विकार ॥ सबाह्याभ्यंतरव्यापक॥४७॥सर्वीं सर्वत्र आत्मयाविण॥ भोग्यमात्रासि भोक्ता कवण ॥ तो तूं ईश्वर श्रीभगवान ॥ तुझेनि भवभान प्रतिभासे ॥ ४८ ॥ मी आत्मा जरी केंवि ह्मणसी ॥ तरी तूं प्रियतम सर्वस्वेंशीं ॥ आत्मप्रियत्वें प्रपंचासी ॥ प्रिय मानूनि कवळिजे ॥ ४९ ॥ पति अपत्यें बंधु श्वशुर ॥ सुहृद् स्वजन माता पितर ॥ धनें गोधनें वृत्ति क्षेत्र ॥ प्रिय सर्वत्र आत्मत्वें ॥ ५० ॥ आत्मराहित्यें सर्वोपचार ॥ प्रियतम अथवा उपदेशपर ॥ होती तैं मग शास्त्राचार ॥ धर्म साचार प्रबोधी ॥ ५१ तरी हें आत्मत्वींच आघवें ॥ सर्वप्रियत्व आविर्भवे ॥ विपरीतज्ञानें मग विषयीं फावे ॥ कां तें मां[1]वे झगविसी ॥ ५२॥ विंशतिवरा[2]टिकापरिमित ॥ त्यांची एक काकिं[3]नी होत ॥ त्या काकिणी सार्ध[4]शत ॥ रजतमु[5]द्रेंत सांठवती ॥ ५३ ॥ रजतमुद्राषोडशमान ॥ स्वर्णनिष्क त्या अभिधान ॥ तो हस्तगत असतां जाण ॥ वृथा प्राधान्य वराटिकां ॥ ५४ ॥ तेंवि तूं आत्मा प्रेष्ठतम ॥ आह्मी लाधलों अवा[6]प्तकाम ॥ पतिपुत्रादिवर्णाश्रम ॥ अक्षय स्वधाम तूं यांचें ॥ ५५ ॥ तुजमाजि हें अव-

---

१ मायेनें. २ कवडी. ३ दमडी. ४ दीडशें. ५ रुपया. ६ संपन्नमनोरथ.

घें सुख ॥ पतिपुत्रादि जे पृथक पृथक ॥ भ्रमें भावूनि विषयात्मक॥ रमती मूर्ख भवभानीं ॥५६ ॥आह्मांसि उपदेशाचें
स्थान ॥ तो तूं श्रीकृष्ण भगवान ॥त्या तुझ्या ठायींच हें असो पूर्ण ॥ मायिक भिन्न नुपदेशीं ॥ ५७॥अथवा
उपदेष्टा तूं असतां ॥ उपदेशार्थ शरणागता ॥ आह्मी होऊनि तुज हें पुसतां ॥ तूं धर्मवक्ता हें बोधीं॥ ५८ ॥तृषित
असतां जळाजवळी ॥ त्याचे हातीं देइजे कुदळी ॥खनन बोधिजे तये काळीं ॥तेंवि वनमाळी हें वदसी ॥५९॥तरी
हें असो तुझ्याचि ठायीं ॥ जळ सांडूनि नखणूं भुई ॥ तूं उपदेष्टा नव्हसी कांहीं ॥ आत्मा हृदयीं सर्वगत ॥ ६० ॥
आमुच्या कामाचें अधिष्ठान॥आणि कामोपलब्धि जेथें पूर्ण॥तो उभयत्र तूं एक कृष्ण॥नकरीं बोधन उपहासें॥६१ ॥
अथवा शाखेवरूनि चंद्ररेखा॥प्रबुद्ध जेंवि दाविती मूर्खा॥तेंवि पतिपुत्रभावें तें ऐका ॥भजिजे व्यापका ईश्वर॥६२॥ईश्वर
ऐसें पतीचें नाम ॥ठेवूनि धरिजे स्वधर्मप्रेम ॥तेथ वास्तव ईश्वर अनुभवगम्य॥फावल्या कर्म कां कथिजे॥ ६३ ॥ह्मणसी
देहवंतासि हा बोध ॥स्वधर्माचरणचि अविरुद्ध ॥तरी कर्मफळ आत्मा अगाध ॥ जव तूं प्रसिद्ध नफवसी तों ॥
६४ ॥असान्निध्य नृपाचें असतां॥राजा मानूनि भाजिजे दूतां ॥ ते भूपपदवी चढल्या हाता॥दूता मान्यता कोण कोठें
॥ ६५ ॥ तुझेनि मुखें उपदिश्यमान ॥ पतिपुत्रादि जें अनुसेवन ॥ तेथ ईश्वर असतां अधिष्ठान ॥ ईश्वरभजन
तें तें कीं ॥ ६६ ॥ ईश्वररूपाअधिष्ठाना ॥ वांचूनि पतिपुत्रादिव्यक्ति भिन्ना ॥पृथक सत्तत्वें वर्त्तमाना ॥ भजनीं
ये कोठें कोणत्या ॥ ६७ ॥ पेरिला उगवला जोंधळा शेतीं ॥ जोंधळा मानूनि त्या कराबांडा भजती ॥ तेथील
धान्य चढल्या हातीं ॥ कडबा जोपिती कोठ कोठें ॥६८॥तेंवि ईश्वर तूं आत्मा प्रेष्ठ॥असोनि कथिसी स्वधर्मकष्ट

---

२ कडबा.

ते तुझ्या ठायींच अभीष्ट ॥ सफळ संतुष्ट असोत ॥ ६९ ॥ तूं जें कथिसी धर्माचरण ॥त्या धर्मशास्त्रादि अखिलाभिज्ञ ॥ निगमगर्भ दृढ विवरून ॥ तुजवांचून नभजती ॥ ७० ॥

कुर्वंतिहित्वयिरतिंकुशलाःस्वआत्मन्नित्यप्रियेपतिसुतादिभिरार्तिदैःकिम् ॥
तन्नःप्रसीदपरमेश्वरमास्मछिंद्याआशांधृतांत्वयिचिरादरविंदनेत्र ॥ ३३ ॥

॥ टीका ॥ नित्य निर्विकार निष्टंक ॥ प्रियतम आत्मा निरुपाधिक ॥ अगाध अक्षय सच्चित्सुख ॥ विमळ विशोक वितृष्ण ॥ ७१ ॥ तुज आत्मयाचिये ठायीं ॥ कुशल भजती आपुल्या हृदयीं ॥ पतिपुत्रादिदुःखडोहीं ॥ मोहप्रवाहीं नपडोनी ॥ ७२ ॥ पशुपतिपुत्रधनादिकें ॥ दुःखपरंपराप्रापकें ॥ वांचूनि जोडसी त्यागें एकें ॥ हंनायकों मुखें शिष्टांच्या ॥ ७३ ॥ उतरावया महापूर ॥ कीजे नावेचा अंगीकार ॥ पुन्हा नाव नत्यजितां तीर ॥ विश्रांतिकर नजोडे ॥ ७४ ॥ तेंवि भवाब्धिनिस्तरणीं ॥ प्रवृत्ति वेदोक्तधर्माचरणीं ॥ तत्फळविरक्ति अमृतदानीं ॥ प्रवृत्ति त्यागूनि आश्रयिजे ॥ ७५ ॥ ईषणात्यागें वीण तत्त्वता ॥ तें अमृतत्व नचढे हाता ॥ यालागीं त्यागूनि तो भवगुंता ॥ जालों अनुरक्ता तव चरणीं ॥ ७६ ॥ आतां प्रसीद शरणागतां॥ तूंतें भजलों भवविरक्ता ॥ परमेश्वरा पूर्णभरिता ॥ नुपेक्षीं तत्वता वंचूनी ॥ ७७ ॥ पद्मनेत्रा तव पदपद्मीं ॥ चिरकाळ आशा धरिली आह्मीं ॥ ते तूं निराशा नकरीं स्वामी ॥ स्वधर्मनियमीं चालवूनी ॥ ७८॥मद्वाक्याची करूनि अवज्ञा॥ह्मणसी कैशा मदेकशरणा ॥ यदर्थीं ऐकावें सर्वज्ञा ॥ आज्ञालंघना कारण जें ॥ ७९॥ परतोनि जावें व्रजाप्रति ॥ तां हें आज्ञापिलें श्रीपति ॥ चित्तचतुष्टय आपुल्या हातीं ॥ निजात्मशक्ति हरूनियां ॥ ८० ॥

---

१ मन, बुद्धि, चित्त, अहंकार.

चित्तंसुखेनभवताऽपहृतंगृहेषुयन्निर्विशत्युतकरावपिगृह्यकृत्ये ॥
पादौपदंनचलतस्तवपादमूलाद्यामःकथंव्रजमथोकरवामाकिंवा ॥ ३४ ॥

॥ टीका ॥ यावत्काळ आमुचें चित्त ॥ पतिपुत्रादिगृहासक्त ॥ होऊनि सप्रेम विषयीं निरत ॥ प्रपंचकृत्य संपादी ॥ ८१ ॥ तें तव गानें अंतःकरण ॥ विषयीं वैरस्य पावून ॥ होऊनि ठेलें प्रत्यक्प्रवण[1] ॥ नवचे तो नपरतवितां ॥ ८२ ॥ व्यान सांडूनि निवडली वृत्ति ॥ ते कैं प्रकटे श्रवणाप्रति ॥ संवित्ती[2]वांचूनि भारती॥शब्दग्रहणार्थीं अनोळख ॥ ८३ ॥ तुजमाजि विरतां अंतःकरण ॥ सहज समरसीं चैतन्य ॥ प्रपंचस्फूर्तीसि रितें गगन ॥कैंचें शून्य सच्छिद्र ॥ ८४ ॥ समानवायूमाजूनि[3] चपळ ॥ संकल्पविकल्पांचें स्थळ ॥ निवडूनि मानस केवळ ॥ हरिलें तत्काळ स्ववेधें ॥ ८५ ॥ मना समाना विघडतां ॥ तें कैं त्वचेसि स्पर्शज्ञता॥ त्यागा[4]दानीं हातो[5]पाता ॥पाणींद्रिय नप्रवर्त्ते ॥॥ ८६ ॥ मानस तव वेधें उन्मन ॥ असंकल्पें चांचल्यहीन ॥ तें मग कैंचा पृथक्पवन ॥शब्दस्पर्शन द्विगुणत्वें ॥ ८७ ॥ निजगानवेधें तुवां धिषणा ॥ हरिली सांडवूनि उदाना॥ चक्षु मुकले रूपग्रहणा ॥ मग कें चरणां संचरण ॥ ८८ ॥ विपरीत बोधा निश्चयकर्त्ती ॥ तुजमाजि रता मनीषावृत्ति ॥दहन पचन प्रकाशशक्ति ॥ कैंची भूतीं तेजस्त्वें ॥ ८९ ॥ ऐकोनि तुझें मधुरगीत ॥ प्राणामाजूनि निवडे चित्त ॥ तुजमाजि होऊनि एकीभूत ॥ जालें निश्चित चिन्मात्र ॥ ९०॥ प्राणाचित्ता विघडणी होतां ॥ कैंची रसनेसि रसज्ञता ॥ रसाभिलाषेंविण उपस्था ॥ रतिलालसता स्फुरेना ॥ ९१ ॥ चित्त चैतन्यीं होतां लीन ॥भूतीं द्रश्य कैंचें जीवन ॥ सीतळ पात-

---

१ आत्मस्वरूपाभिमुख. २ ज्ञान. ३ मधून. ४ टाकणें किं० घेणें. ५ एकाच्या हातांतून दुसऱ्याच्या हातांत अशा क्रमानें. ६ बुद्धि.

ळ रसाळ सृजन ॥ जलप्लावनक्लेदनपटुतर ॥ ९२॥ अपाना माजूनि अहंता ॥ वेधें तव गायनीं मुरतां ॥ घ्राणीं नुरेचि जिघ्रता॥कैंची क्षरता पायूतें ॥ ९३ ॥सूत्रांत्मत्वें अहंकार ॥ वेढूनि वागवी जो शरीर॥देहात्मभावें धुरंधर ॥ तो अविकार जालिया ॥ ९४ ॥ कैंची पृथ्वी कैंचा गंध ॥ कैंचा आधेयआधारबोध॥सबाह्य अभेद परमानंद॥ श्रीगोविंद परिपूर्णा ॥ ९५ ॥ आमुचीं प्रवृत्ती सहीतकरणें ॥ तुवां हरिलीं अंतःकरणें ॥ आतां फिरोनि जावें कोणें ॥ धर्माचरणें करावया ॥ ९६ ॥ वाग्दोरे हातीं धरूनी ॥ अश्वां सोडी मोकळेपणीं ॥ तैं तो प्रवर्ते भंवता भ्रमणीं ॥ परी दुरी प्रयाणीं असमर्थ ॥ ९७ ॥ कीं नाव खुंटोनि ऐले झाडी ॥परजावया पाणी तोडी ॥ तैं त्या नटके पैलथडी ॥ कीं हरितां घोडीं रथ नचले ॥ ९८ ॥ तेंवि हरूनि करणनिचया ॥ आज्ञापिसी सदना जावया॥ आज्ञापाळणा लंघनकार्या ॥ कोण यदुवर्या समर्थ ॥ ९९ ॥ तुझिया पादमूळा पासून॥इंद्रियग्राम नथरे भिन्न ॥यावरी आह्मां कर्तव्य कोण ॥ तें विवरून प्रबोधीं ॥ ५०० ॥ ह्मणसी तुमची जे असोसी ॥ सांगा जैसी असेल तैसी॥तरी ऐकावें हृषीकेशी ॥ उत्साहेंशीं सांगतसों ॥ १ ॥

सिंचांगनस्त्वदधरामृतपूरकेणहासावलोककलगीतजहृच्छयाग्निम् ॥
नोचेद्वयंविरहजाग्न्युपयुक्तदेहाध्यानेनयामपदयोःपदवींसखेते ॥ ३५ ॥

॥ टीका ॥ इंद्रियग्राम रिक्त पडिला ॥ तव विग्रहीं गोगणंजडला॥ यालागिं आमुचा आवडला॥पाहिजे घडला मनोरथ ॥ २ ॥ हे अंग कोमल आमंत्रणें ॥ गोपी ह्मणती कृष्णाकारणें ॥ श्रवणद्वारें तुझिये गानें॥अंतःक-

---

१ बुडविणें व ओलें करणें. २ पश्चिमद्वार. ३ पदार्थाचें सूक्ष्मस्वरूप हें परमात्मस्वरूप यांत सर्व भूतें, सूत्रांत जसे मणि तशीं ओंविलेलीं आहेत. ह्मणून परमात्मा सूत्रात्मा होय. ४ वस्तु व तिचा आधार यांचें ज्ञान. ५ इंद्रियगण.

णें क्षोभविलीं ॥ ३ ॥ अग्नियंत्राचे[1] कर्णीं[2] अनळ ॥ स्पर्शतां उसळे यंत्रगोळ ॥ तेंवि विवशविरहिणीमेळ ॥ गानश्रवणें उसळलों ॥ ४ ॥ येथ तव तनुसन्निधानें ॥ श्रवणकाळीं [3]कलगायनें ॥ सविलासकटाक्षमोक्षणें ॥ स्मितावलोकनें करूनियां ॥ ५ ॥ हृच्छय ह्मणिजे मदनानळ ॥ हृदयीं प्रज्वळला केवळ ॥ तेणें आमुचे शरीरगोळ ॥ तापले विंगळपडिपाडें ॥ ६ ॥ ते तूं अधरामृतें शिंपीं ॥ प्राणप्रदान आमुतें वोपीं ॥हृच्छयाग्नीचा दाह लोपीं ॥ कृपेनें जोपीं स्मरलतिका ॥ ७ ॥ नातरी वियोगविरहानळ ॥ आणि हृच्छयाग्नीचा ज्वाळ॥ उभय ताप होऊनि प्रबळ शरीरें केवळ प्रज्वळितें ॥ ८ ॥ सांख्याभ्यासें ज्ञानानळ ॥अभ्यासक्रमें योगाग्निज्वाळ॥ मूर्धा भेदूनि ध्यानशीळ॥ पावती केवळ कैवल्य ॥ ९ ॥ स्मरविरहाग्निदग्धा तेंवि ॥ ध्यानें तव चरणाची पदवी ॥ सखया पावूं सप्रेमभावीं आमुच्या जीवीं निश्चय हा ॥ १० ॥ ह्मणसी आहेत तुमचे पति ॥ तुह्मी जाऊनि तयांप्रति॥स्वेच्छां रमूनि अधरामृतीं ॥ कीजे शांति स्मरतापा ॥ ११ ॥

यर्ह्यंबुजाक्षतवपादतलंरमायादत्तक्षणंक्वचिदरण्यजनप्रियस्य ॥
अस्प्राक्ष्यतत्प्रभृतिनान्यसमक्षमंगस्थातुंत्वयाऽभिरमिताबतपारयामः ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ तरी ऐकें गा अंबुजनयना ॥ तुझिया पदतलावलोकना ॥ अनंत वेळां लाहूनि जनना ॥ रमलों नाना स्वपतींशीं ॥ १२ ॥ जऱ्ही भोगिले संसारपति ॥ विषयाभासें नबणे तृप्ति ॥ तव पदपल्लवदर्शनावाप्ति भाग्यें युवति लाधलों ॥ १३ ॥ येऱ्हवीं तुझें श्रीपदकमळ ॥ [4]कमलाउत्साहक केवळ ॥ तेंही क्वचित कोण्हे वेळ ॥

---

[1] तोफ, बंदुक इ. [2] रंजुक. [3] मधुर. [4] लक्ष्मीला उत्सुक करणारें.

सर्वकाळ अप्राप्य ॥ १४ ॥ रमेसि नियमूनि दिधला क्षण ॥ तेंचि क्षणीं ते पदसेवन ॥करूनि मानी आपण.। धन्य [1]पदाब्जेक्षणसौभाग्यें ॥ १५ ॥ तो तूं कोण्हा एक्या योगें ॥ भूभारनिरसनप्रसंगें ॥ अनंतजन्मींच्या सुकृतभाग्यें॥ प्रिय सर्वांगें वनचरां ॥ १६ ॥ नादसुखें वेधती कोण्ही ॥ कोण्ही लक्ष्यें लक्षिती नयनीं ॥ कोण्ही मानसीं ध्याती ध्यानीं ॥ कोण्ही वदनीं यश गाती ॥१७॥ ऐसे ऐकैक वेगळद्या आंगीं ॥भजन आकळिती सप्रेममार्गीं॥ येथ अरण्यजना सर्वांगीं ॥ निःसंगसंगी प्रियतम तूं ॥ १८ ॥ ऐसिया अरण्यजनप्रिया ॥ देखत्या जालों तुझिया पायां ॥ जरी क्वचित्सुकृतक्रिया ॥ आल्या उदया क्षणमात्र ॥ १९॥ क्षणमात्रही तव पदतळां ॥ देखत्या जालों सप्रेमळा ॥ आणि तुवां आमुच्या हृदयकमळां ॥ निज इंगितीं रमविलें ॥ २० ॥ तुझिया गानें संभाषणें ॥ भ्रूविक्षेपनिरीक्षणें ॥ सविलास अपांगमोक्षणें ॥ अभेद रमणें अनुभविलें ॥ २१ ॥ सुरतस्मरण रतिकीर्त्तन ॥ सहचरक्रीडा गुह्य भाषण ॥ ईक्षण संकल्प उद्योग पूर्ण ॥ क्रिया आचरण आठवें ॥ २२ ॥ सुरत भूमिका इया अष्ट ॥ सप्तधा रमविलों आह्मी स्पष्ट॥ तेणें जालों ज्या संतुष्ट ॥ त्या [2]नचखों कष्ट भवभोग ॥ २३॥ जेव्हां भोगिलें तवांघ्रिसुख॥ तेंहूनि भवसुखीं जालों विमुख ॥ देहबुद्धीचा मोडूनि अंक[3]॥ विषया सम्मुख नठाकों॥२४॥ सहस्रदळींचें अमृतपान ॥ प्राशिलें लाहोनि राकारमण[4] ॥ ते केंवि सेविती स्वाधिष्ठान ॥ पुढती परतोन प्रियत्वें ॥ ॥२५ ॥ तोंवि तुच्छ जे विषयाभास ॥ ते काय पुरविती आमुची आस॥यालागीं सापेक्ष[5] रमा ज्यास॥अधरामृतास त्या पाजीं ॥ २६ ॥ तव पदसौभाग्य[6] अति विचित्र॥ ब्रह्मादि सभाग्य सुर सर्वत्र॥ अपेक्षेचे होती पात्र ॥ त्यांमाजि किंमात्र वधूगणही ॥ २७ ॥

---

[1] पदकमलाचें दर्शन हें सुदैव. [2] नसेवूं. [3] खूण. [4] चंद्र. [5] उत्कंठायुक्त. [6] सौंदर्य.

श्रीर्यत्पदांबुजरजश्चकमेतुलस्यालब्ध्वाऽपिवक्षसिपदंकिलभृत्यजुष्टम् ॥
यस्याःस्ववीक्षणकृतेऽन्यसुरप्रयासस्तद्वद्वयंचतवपादरजःप्रपन्नाः ॥ ३७ ॥

॥ टीका ॥ तुझिया वक्षः स्थळाच्या ठायीं ॥ सापत्नभावरहित पाहीं ॥ स्थानसंपन्न असतांही॥ पुन्हा लक्ष्मीही सकाम ॥ २८ ॥ तुळसी सेवी चरणकमळ ॥ तीसी पदरज लाभले अमळ॥ लक्ष्मी ह्मणे मज वक्षःस्थळ॥ नरुचे केवळ कोरडें ॥ २९ ॥ शोकें मेला दशरथपिता ॥ हृदय नद्रवेचि तत्वता ॥अनागसं[1] वनीं त्यजिली कांता॥ परम कठिनता हृत्कमळीं ॥ ३० ॥ सीता आक्रंदे नानापरी ॥ हृदय नद्रवेचि तिळभरी ॥ देवकीवसुदेव कारागारीं ॥ त्यागूनि कांतारीं क्रीडतसे ॥ ३१ ॥ भवविरक्त शरणागत ॥ देखोनि त्यांचा होय आप्त ॥ त्यांच्या पोष्याचा आकांत ॥ देखोनि हृदयांत द्रवेना ॥ ३२ ॥ ऐसें कठोर हृदयस्थान ॥ मज जोडलें असपंत्न[2] ॥ तुळसी सेविजे श्रीचरण ॥ अक्षयकल्याण ज्यां योगें ॥३३ ॥ चरणशौचोद्भवा गंगा॥भवनत्रयांघनिदाघभंगा[3] ॥ कलिमलमथनीं पीयूषौघा ॥ सुकृतामोघा प्रसवित्री ॥ ३४ ॥ पदरज वंदिती सुरवर ॥ हृदयीं ब्राह्मणलत्ताप्रहार ॥ पदार्चनें तुळसी सधर[4] ॥ मज हें कठोर हृत्कमळ ॥ ३५ ॥ ऐसी लक्ष्मी हृदयवासा॥विटोनि तुळसीशीं सापत्न्यईर्ष्या॥चाळी सकाम पदरजलेशा ॥ परमपुरुषा ज्या तुझिया ॥ ३६ ॥ समस्तदेवकीं सेविलें असतां ॥ परी नपवेचि जे सामान्यता ॥ ऐसी अमोघ सौभाग्यता ॥ तव पदरजा आतौती ॥ ३७ ॥ पदरजवाहिनी सरित्प्रवरा ॥सेव्य चराचरनीचतरां ॥ तथापि वरिष्ठां विधिहरसुरां ॥ कल्याणसारा स्पृहणीय ॥३८ ॥ नातरी जीवन मशकादि सर्व ॥

---

१ निर्दोष. २ ज्यास दुसरा हक्क सांगणारा नाहीं तें. ३त्रिभुवनाचें पाप हाच ग्रीष्म त्याचा नाश. ४ अधिक आश्रय युक्त.

सेविती लहान थोर जीव ॥ ह्मणोनि नपवेचि गौणत्व ॥ वरगौरव अमृतत्वें ॥ ३९ ॥ तेंवि पदरज सर्व सेवकीं ॥ सेविले अभीष्टार्थकामुकीं ॥ उणीव नपडे गौरवाविखीं ॥ स्वसुखोद्रेकीं अगाध ॥ ४० ॥ नर सुर मुनिवर पुरंदर ॥ दैत्य दानव विधि शंकर ॥ ब्रह्मांडवासी लहान थोर ॥ तपश्चर्यापर सर्वदा ॥ ४१ ॥ ह्मणसी सुकृता जैं सीग चढे ॥ तैं कृपेनें आह्मांकडे ॥ अल्प ही लक्ष्मीची दृष्टि पडे ॥ ऐसें जोडे कैं भाग्यें ॥ ४२ ॥ ह्मणोनि तपाचे प्रयास ॥ इच्छूनि जयेचा कटाक्ष ॥ सर्वीं सर्वत्र सर्वांस ॥ ते श्रीही सापेक्ष पदरजा ॥ ४३ ॥ तैशाच आह्मीही रानटा ॥ जात्या गौणा अबळा घुरटा ॥ परंतु तव पदरजलंपटा ॥ झालों अदृष्टाचेनि बळें ॥ ४४ ॥ आह्मां तव पदशरणागतां ॥ तव गायनें मन्मथतप्तां ॥ नुपेक्षूनियां कमलाकांता ॥ करीं सनाथा निजदास्यें ॥ ४५ ॥

तन्नःप्रसीदवृजिनार्दनतेऽघ्रिमूलंप्राप्ताविसृज्यवसतीस्त्वदुपासनाशाः ॥
तत्सुंदरस्मितनिरीक्षणतीव्रकामतप्तात्मनांपुरुषभूषणदेहिदास्यम् ॥ ३८ ॥

॥ टीका ॥ वृजिनार्दन[1] या संबोधनें ॥ संबोधिती मृदुभाषणें ॥ कीं हें नाम यथार्थ करणें ॥ आमुचें हरणें दुर्वृजिन ॥ ४६ ॥ ऐकोनि क्लेशनाशननामा ॥ आह्मी विरहिणी सकामा ॥ टाकूनि आलों तव पदपद्मा ॥ तस्मात् आह्मां नुपेक्षीं ॥ ४७ ॥ जैसे तापत्रयसंतप्त ॥ योगी संसारीं विरक्त ॥ त्यागूनि येती गृहधनसुत ॥ आह्मी तद्गत पातलों ॥ ४८ ॥ तव दास्याची धरूनि आशा ॥ पतिपुत्रालय[2]धनादि पाशां ॥ खंडूनि आलिया उपहासा ॥ न करूनि दास्या देइजे ॥ ४९ ॥ कोणें बोलाविलें तुह्मां ॥ जरी तूं ह्मणसी नरललामा[3] ॥ तरी तुझिया सुंदर श्रीमुख-

---

१ पापनाशक. २ पति, पुत्र. गृह, धन इत्यादिकांचे पाश. ३ पुरुषश्रेष्ठा.

पद्मा ॥ पाहता आह्मा स्मर जाळी ॥ ५० ॥ जया मुखकमळाच्या ठायीं ॥ सुंदर सस्मित ईक्षण पाहीं ॥ पाहतां कामाग्नीची खाई ॥ आमुच्या देहीं प्रज्वळली ॥ ५१ ॥ यास्तव तुझें चरणमूळ॥ टाकूनि आलों उतावीळ ॥ तूं सर्वज्ञ श्रीगोपाळ ॥ हरिसी तळमळ निजदास्यें ॥ ५२ ॥ दास्यार्पणें आश्वासून ॥ आमुचें मानस निववीं पूर्ण ॥ वृजिनार्दन हें अभिधान ॥ यथार्थ करून मिरवावें ॥ ५३ ॥ ह्मणसी आपुलालिये सदनीं॥ पतिसेवनें गृहस्वामिनी ॥ त्या किमर्थ दास्याचरणीं ॥ दासी होऊनि प्रवर्त्ततां ॥ ५४ ॥

वीक्ष्यालकावृतमुखंतवकुंडलश्रीगंडस्थलाधरसुधंहसितावलोकम् ॥
दत्ताभयंचभुजदंडयुगंविलोक्यवक्ष्यःश्रियैकरमणंचभवामदास्यः ॥ ३९ ॥

॥ टीका ॥ तरी ऐकें गा भुवनकपाळा ॥ लवण सान्निध्य पावतां जळा॥ जेंवि नरखवे मर्यादवेळा ॥ इच्छी एक वेळा द्रवोनी ॥ ५५ ॥ हो कां धातूमाजि कठिन ॥ स्वकांताचें सन्निधान ॥ होतां लोहवेधें पूर्ण ॥ चंचळ होऊन अनुसरे ॥ ५६ ॥ कठोर पाषाणाची जाति ॥ परी सोमदर्शनें सोमकांतीं॥ द्रवोनि होय जलोत्पत्ति ॥ हे स्वयंभस्थिति नैसर्गिक ॥ ५७ ॥ तेंवि आह्मी पतिव्रता ॥ स्वाश्रमीं स्वधर्मनिरता ॥ ऐकोनि तुझिया वेणुगीता ॥ झालों विरक्ता भवभानीं ॥ ५८ ॥ वेणुध्वनि पडतां श्रवणीं ॥ तेणें मानस आकर्षूनी ॥ तीव्रवेधें आणिलें वनीं॥ तव दर्शनीं मेळविलें ॥ ५९ ॥ [2]भ्रमरभासुर चांचर कुरळ ॥ निडळीं[3] श्रवणीं कुंतळ कुटिल ॥ कुंडलमंडित गंडस्थळ ॥ श्रीमुखकमळ तद्युक्त ॥ ६० ॥ भ्रू व्यंकटा विलासचलिता ॥ त्रपाद्योतक अपांगसहिता ॥ अधरसु-

---

१ लोहचुंबकाचे. २ भुंग्यासारखे तेजस्वी. ३ मस्तकावर. ५ लज्जायुक्त.

धेशीं मंदास्मिता ॥ पाहतां चित्ता मुरणूक ॥ ६१ व्रजजनासि अभयदान ॥ करूनि धरिला गोवर्धन ॥ अमरां निर्भयता वोपून ॥ केलें मथन क्षीरोदा ॥ ६२ ॥ कीं गजेंद्राची देखोनि ग्लानि ॥ अभया उदित सायुधपाणि ॥ कीं रसातळा जातां धरणि ॥ अभयदानी जे बाहु ॥ ६३ ॥ऐसें तुझें भुजदंडयुगळ ॥विस्तीर्ण सुपीन वक्षःस्थळ॥ कमलारतिरसजननस्थळ ॥देखोनि विठ्ठळ पैं आह्मी ॥६४ ॥सुंदर अवयव सालंकृत ॥ सत्रप गायन स्मित इंगित ॥ देखोनि भावी आमुचें चित्त ॥दासी समस्त व्हावया ॥ ६५॥ औपपत्य जुगुप्सित॥ह्मणोनि निंदिसी जारसुरत ॥ यदर्थी ऐकें आमुचें गादित ॥इत्थंभूत विवरूनी ॥ ६६ ॥

कास्त्र्यंगतेकलपदामृतवेणुगीतसंमोहितार्यचरितान्नचलेत्त्रिलोक्याम् ॥
त्रैलोक्यसौभगमिदंचनिरीक्ष्यरूपंयद्गोद्विजद्रुममृगाःपुलकान्यबिभ्रन् ॥ ४० ॥

॥ टीका ॥ कोमलसंबोधनें ह्मणती अंग ॥ तुझें वेणुगीत ऐकोनि सांग ॥ नोहे कोणाचा व्रतभंग ॥ श्रवणीं अनुराग उपजोनी ॥६७॥ षड्ज ऋषभ आणि गांधार ॥ मध्यम पंचम धैवत स्वर ॥ निषादांत मंद्रतार ॥ मानप्रकार त्रिवसनें ॥६८ ॥स्वरकंपितें मूर्च्छनाभेदें ॥ वेणुगीतामृतकलपदें ॥ तालबद्ध संगीत च्छंदें॥ हास्यविनोदें विन्यासें ॥ ६९ ॥ न भुलोनि कोणती पतिव्रता ॥ राहे रक्षूनि आर्यचरिता ॥ ऐसी न सृजीच विधाता ॥जे तव गीता नभाळे ॥ ७० ॥ भूमि सकाम रोमांचित ॥ द्यौ द्रवोनि अमृत स्रवत॥समस्त सारिता प्रवाहरहित ॥पवनीं स्तिमित चंचलता ॥७१ ॥भानुबृहद्भानूंची प्रभा ॥ दाहकपणें नचढे क्षोभा ॥ खद्योतकता दावी शोभा ॥ गगन-

---

१ अस्थिरता. २ लक्ष्मीच्या मनांत प्रीतिरस उत्पन्न करणारें स्थान. ३ सलज्ज. ४ स्वर्ग. ५ सूर्य व अग्नि यांची.

गर्भा आतौंती ॥ ७२ ॥ स्वाराज्यवैराज्यादि पदें ॥ सांडूनि लक्ष्मी येथेंचि नांदे ॥ ह्रीही[1] विलसे कटाक्षमोदें ॥
सांडूनि तुसधें रौद्रत्व ॥ ७३॥ बुद्धि बोधली नादसुखा॥परतोनि नोहे विधिसम्मुखा॥ ज्योत्स्ना रंगली मुखमयंका ॥
अधरपीयूखा भाळोनी ॥ ७४ ॥ अमोघ कंदर्पाची कांति ॥ सर्वात्मकत्वें भाळली रति ॥ क्षमादयाशांतिप्रभृति
तरळताती पदपद्मीं ॥ ७५ ॥ निर्जर मुनिवर गोप सकळ ॥ त्यांच्या पत्न्या आह्मी केवळ ॥ हरिपदलाभा भूमंडळ
॥ ब्रह्मवरें पावलों ॥ ७६ ॥ आतां त्रिजगीं कोण वधू ॥तव गायनें नपवोनि वेध॥अचल आर्यव्रतस्था शुद्ध ॥
दावी सावध भवभानीं ॥ ७७ ॥ मदनमोहना भुलल्या कांता॥ हें आश्चर्य नव्हे कीं तत्वता ॥ पुरुष सकाम वेणुगीता
॥ भुलले तत्वता स्थिरचर ॥ ७८ ॥ त्रैलोक्यसौभाग्य[2]निधान ॥ तें लक्षूनि तव लावण्य ॥ धेनु वृषभ
ऊर्ध्ववदन ॥ पुच्छें वाहून तटस्थ ॥ ७९ ॥ पुरुषप्रकृति पक्षिजाति ॥ वेणुगायनें तटस्थवृत्ति ॥भासती लिखितचित्राकृति
॥ वेधकशक्ति हे तुझी ॥ ८० ॥ वीरुध[3] तरुवर वल्लरी ॥ सर्व वेधलीं वनांतरीं ॥ टवकारलीं पुष्पीं पत्रीं
॥ सप्रेमधारीं द्रवताती ॥ ८१ ॥ कुरंगें सहित कुरंगीगण ॥ पसरूनि सुंदर विशाळ नयन ॥ प्राशन करिती
तव लावण्य ॥सबाह्य विसरून तनुभावा ॥ ८२ ॥ अजा अविकें व्याघ्राटक[4] ॥ मशक शशक सर्प वृश्चिक ॥ तरस
र्‍हीस कपि जंबुक ॥ सात्विकाष्टक प्रकटिती ॥ ८३ ॥ जेणें तव रूपद्योतना ॥ प्रकटे ऐसिया ऐकोनि गाना ॥
ताटस्थ्य त्रिजगाच्या तनुमना ॥ किंमुत[5] अंगना विरहिणी ॥८४ ॥ आतां निश्चय हाचि हरि ॥ दोष नठेवूनियां
शिरीं ॥ इतुकें प्रार्थन मान्य करीं ॥ जाणोनि किंकरी व्रजललना ॥ ८५ ॥

---

[1] लज्जा. [2] त्रिभुवनाचे सौंदर्याचा जनक. [3] वेली. [4] कुकुडकुंभा. [5] काय.

व्यक्तंभवान्व्रजभयार्त्तिहरोऽभिजातोदेवोयथाऽऽदिपुरुषःसुरलोकगोप्ता ॥
तन्नोनिधेहिकरपंकजमार्तबंधोतप्तस्तनेषुचशिरःसुचकिंकरीणाम् ॥ ४१ ॥

॥ टीका ॥ जैसा आदि पुरुष भगवान॥ सुरलोकांचें करी गोपन॥ तो तूं येथ व्रजरक्षण ॥दुःखनिरसन करावया ॥८६॥व्रजींच्या समस्त जनांप्रति॥जितुकीं दुःखें प्राप्त होती॥त्यांची करावया निवृत्ति॥तुझा श्रीपति अवतार॥८७॥ नानासंकाटांचिये काळीं ॥ आदिपुरुष सुरमंडळीं ॥ सुरसंकल्पें करूनि केली ॥ कृपेनें पाळीं निजशरणां ॥ ८८ ॥ तो तूं येथ सर्वांपरी ॥ व्रजजनार्तिहर्त्ता हरि ॥ असतां आह्मी तव किंकरी ॥ मन्मथशरीं जाचतसों ॥ ८९ ॥ आर्ति हेरूनि तोष करणें ॥ आर्त्तबंधु या अभिधानें ॥ गोपी करिती विज्ञापनें ॥ अभीष्टप्रार्थने सुचवूनी ॥९० ॥ स्मरसंतप्ता तव किंकरी ॥ निजकरपद्मा आमुचे शिरीं ॥ ठेवूनि निववीं स्मरातुरी ॥ उदास नकरीं विज्ञप्ति ॥ ९१ ॥ स्तनीं आननीं आपादमौळीं ॥ मर्दीं चुंबीं आणि कुरवाळीं ॥ आपल्या शंतमपाणिकमळीं[1] ॥ श्रीवनमाळी सर्वज्ञा ॥ ९२ ॥ आह्मां किंकरींचिये शिरीं ॥ कृपेनें स्पर्शें अमृतकरीं ॥ जेंवि शशांक सुधाधारीं॥ चकोरांवरी अभिवर्षे ॥ ९३ ॥ तव गानश्रवणें कामाग्नि दीप्त ॥ तेणें सर्वांग जालें व्याप्त॥करसरोजें कुच संतप्त ॥ निववीं त्वरित पुंभावें[2] ॥ ९४ ॥ कुरुपुंगवा बादरायणि ॥ ह्मणे समस्तव्रजकामिनी ॥ कृष्णा कथिती मन्मथग्लानि ॥ बहुतां वदनीं बहुविधा ॥ ९५ ॥

---

[1] सुखदायक हस्तकमळानें. [2] पुरुषत्वें करून.

॥ श्रीशुकउवाच ॥ इतिविक्कवितंतासांश्रुत्वायोगेश्वरेश्वरः ॥
प्रहस्यसदयंगोपीरात्मारामोऽप्यरीरमत् ॥ ४२ ॥

॥ टीका ॥ तयां गोपींचें विक्कवित ॥ एका वदनें इत्थंभूत ॥ कथनीं साकल्यें असमर्थ ॥ तस्मात्संकेत बोलिलों ॥ ९६ ॥ कृष्णवेधें करणगति ॥ आचरों नशकेच प्रवृत्ति ॥ यालागीं तिहीं केली विनति ॥ परवशमतिवैकल्यें ॥ ९७ ॥ परतोनि जा हें आज्ञापिलें ॥ चित्त श्रीकृष्णीं गुंतलें ॥ आज्ञाभंगें शरीर ठेलें ॥ या वैकल्यें विक्कविता ॥९८ ॥ वेणुश्रवणें कामज्वर ॥ लावण्यवेधें अस्वतंत्र ॥ निषेध ऐकोनि विरहातुर ॥ विकळ अंतरें जल्पती ॥ ९९॥ कृष्णवेधें नशकती जाऊं ॥ आज्ञाभंगें नशकती राहूं ॥ तथापि अभीष्टाभिप्रायो ॥ वदल्या खयमेव विक्कवें ॥ ६०० ॥ त्या गोपींचें विक्कवित ॥ ऐकोनि श्रीकृष्ण रमाकांत॥ हास्य करूनि आनंदभरित ॥ वयें रमवीत गोपींतें ॥ १ ॥ एकला कृष्ण बहुत गोपी ॥ झणें कोण्हाचें मानस कल्पी॥तरी तो परमात्मा विश्वव्यापी ॥ योगेश्वरांचा ईश्वर ॥ २ ॥ योगी योगसिद्धीच्या बळें ॥ भोगिती ऐश्वर्यसोहळे ॥ श्रीकृष्ण योगें मायापटलें ॥ निर्मी स्वलीले ब्रह्मांडें ॥ ३ ॥ परिपूर्णत्वें आत्माराम ॥ तेथ कैंचा विषयकाम ॥ जाणोनि गोपीमानसधर्म ॥ रमता झाला स्वच्छंदें ॥ ४ ॥ प्रतिबिंबेंशीं बालक क्रीडे ॥ तेंवि बल्लवीं माजिवडे ॥ आत्मप्रियत्व प्रकटूनि फुडें ॥ क्रीडे निवाडें जगदात्मा ॥ ५ ॥

---

१ व्याकुलता. २ पराधीन जी बुद्धि तिच्या अपूर्णते मुळें. ३ खरें.

ताभिःसमेताभिरुदारचेष्टितःप्रियेक्षणोत्फुल्लमुखीभिरच्युतः ॥
उदारहासद्विजकुंददीधितिर्व्यरोचतैणांकइवोडुभिर्वृतः ॥ ४३ ॥

॥ टीका ॥ भवीं विरक्ता स्वपादनिरता ॥ गोपी जाणोनि नां[1]न्यासक्ता॥प्रेमोत्कर्षें श्रीअच्युता ॥ आली द्रवता कारुण्यें ॥ ६ ॥ मग धर्मधुरीणतेचा पट ॥ ठेवूनि जैसा स्मरलंपट ॥ उदारहासावलोकें वाट ॥प्रकटी औ[2]द्धट भौजं[3]गी ॥ ७ ॥ सांडूनि प्रशस्त मोकळी दृष्टि ॥ स्मराक्त सस्मित वक्र भृकुटी ॥ जाणोनि गोपी यथेष्टतुष्टि ॥ कृष्ण जगजेठी वेष्टिती ॥ ८ ॥ सर्वावस्था सर्वां देहीं ॥ सर्वकाळ सर्वां विषयीं ॥ आत्मप्रियत्वें भवाच्या ठायीं ॥प्राणी सर्वही अभिरमती ॥ ९ ॥ तो प्रियतम आत्माचि वास्तव ॥लीं[4]लालालस वासुदेव ॥ सस्मित ईक्षिता गोपी सर्व॥ उत्फुल्ल अवयवीं टवटविल्या ॥ १० ॥ राकां[5]ग्लौदर्शनें ग्लानि ॥ सांडूनि उत्फुल्लिता कुमुदिनी ॥ तैंवि गोपी प्रसन्नवदनीं ॥ कृष्णा वेष्टूनि तिष्ठल्या ॥ ११ ॥ जैसा उडुपति उडुगणभारीं ॥ मंडित मिरवे गगनोदरीं ॥ तैशा गोपी फुल्लारवक्रीं ॥ वेष्टिती रात्रीं हरिगात्रा ॥ १२ ॥ मन्मथमिश्रित उदार हास्य ॥ करितां कमलामानसहंस ॥ दशनदीधितींचा प्रकाश ॥ जेंवि कुमुदांस शरदिंदु॥ १३॥ भवविरक्ता आत्ममिळणी॥आल्या तिहींशीं चक्रपाणि॥ चटुल चेष्टा उदार करणी ॥शोभता जाला रतिरंगीं ॥ १४ ॥ अच्युतप्रताप अच्युतरति ॥ अच्युतैश्वर्य अच्युतशक्ति ॥ यालागीं अच्युत हे शुकोक्ति ॥ जाणोनि श्रीपति अस्खलित ॥ १५ ॥ ऊर्ध्वरेता पूर्णकाम ॥ विषयास्पृष्ट आत्माराम ॥ तोही पुरवी अभीष्ट प्रेम ॥ स्वजनाभिराम होउनी ॥ १६ ॥ त्या गोपींशीं रतिरंजन ॥ करीत होत्साता श्रीकृष्ण ॥ कैसा क्रीडे तें व्याख्यान ॥ नृपालागून शुक सांगे ॥ १७ ॥

---

१ आपणा वांचून दुसऱ्या ठिकाणीं आसक्त नाहींत त्या. २ विश. ३ जार पुरुषाचें. ४ लीला करण्या विषयीं उत्सुक. ५ पूर्णिमेचा चंद्र.

उपगीयमानउद्गायन्वनिताशतयूथपः ॥ मालांबिभ्रद्वैजयंतींव्यचरन्मंडयन्वनम् ॥ ४४ ॥

॥ टीका ॥ गोपी लावण्यललितवामा ॥ कृष्णरतिरंगीं सकामा ॥ अभीष्ट सुरतें पूर्णकामा ॥ नधरत प्रेमा हरि गाती ॥१८॥ षड्ज ऋषभ आणि गांधार ॥ कंठहृदयनाभिस्वर ॥ ज्यांच्या गानें अनंग स्मर ॥करी संचार सर्वांगीं ॥ १९ ॥ कित्तेक गोपी यशें गाती ॥ कित्तेक लावण्यललितोक्ति ॥ कित्तेक चाटुचटुलोक्ति ॥ हरिइंगितीं व्युत्पन्ना॥ २० ॥ रसाळ वेणूद्गायन ॥ करीत होत्साता श्रीकृष्ण ॥ गोपीगान अनुलक्षण ॥ अमृता समान स्मररुचिर ॥ २१॥ कृष्णगायनीं गोपीगान ॥ मिश्रित सुस्वर तानमान ॥ लास्यमूर्च्छनारागज्ञान ॥ भाव दावून प्रकटिती ॥२२॥ कृष्णावेगळें दुसरें नाहीं ॥ ऐसा एकांत साधिला तिहीं ॥ कृष्ण लेऊनि आपुल्या देहीं ॥शंका कांहीं नठेविली ॥ २३ ॥ मग निःशंक निरभिमानें ॥ कृष्णमयाचि गोपीगानें ॥ कृष्णीं विरोनि गेलीं मनें ॥ तनुक्रीडनें तदधीन ॥२४ ॥ ऐसीं अनेक गोपीशतें ॥ त्यां माजि यूथप श्रीकृष्ण तेथें ॥ नानाविलासमन्मथचरितें ॥ बहुविध सुरतें विचरतसे ॥२५ ॥ अम्लान उत्फुल्ल वैजयंती ॥ कंठीं मिरवीतसे श्रीपति॥ सादृश्यगर्भित हे शुकोक्ति ॥ विशद श्रोतीं परिसावी ॥ २६ ॥ हेमोत्पलिनी वैजयंती ॥ तेंवि गोपींच्या आननपंक्ति ॥ प्रशस्त फुल्लारविंदाकृति ॥ मघमघिताती सप्रेमें ॥ २७ ॥कीं वैजयंतीसी लावूनि कर ॥ गोपी निबिडमाळाकार ॥ कृष्णासभोंवता प्राकार ॥ प्रेमें सादर स्मररसिका ॥२८॥ वैजयंती धरिली करी॥त्यांची कृष्णाभंवती भवरी॥ त्याच्या स्कंधावरूनि येरी ॥ वनिताचक्रीं हरि गाती ॥ २९ ॥ एकी सांडूनि सापत्नभावा ॥ तळवट घेती चरण-

---

१ अंगरहित. २ अर्थसौंदर्यानें शोभमान अशी वाणी. ३ प्रेमानें मिथ्या भाषण. ४ समूहाचा नायक.

सेवा ॥ समरसें करिती माजि रिगावा॥मग केशवा कवळिती ॥ ३०॥एकी करितां मंडपघसणी॥अवसर नफवे कृष्णमिळणी ॥ मग त्या हरिरूप प्राशूनि नयनीं ॥ स्वेच्छा ध्यानीं कवळिती ॥ ३१ ॥ तंव तें सप्रेमध्यान भरे ॥ बाहीर अंतरींचें अवतरे ॥ बाह्य भीतरीं भेद नसरे ॥ मग एकसरें हरिसुरत ॥ ३२॥ एवं श्रीकृष्णरतिलालसा ॥ नवयौवना विगतक्लेशा ॥ अवघ्या सप्रेम सुरतरसा ॥ भोगिती डोळसा वनगर्भीं ॥३३॥ एवं त्रिजगासि मंडन ॥ करूनियां तें क्रीडावन ॥ स्वयें क्रीडे श्रीभगवान ॥ वनीं जीवनीं उभयत्र ॥ ३४ ॥ वनीं ह्मणिजे यमुनातटीं ॥ गिबिडनिकुंजीं तरुवरथाटीं ॥ जीवनीं ह्मणिजे वाळवंटीं ॥ जळानिकटीं मृदुपुलिनीं ॥ ३५॥

नद्याःपुलिनमाविश्यगोपीभिर्हिमवालुकम् ॥ रेमेतत्तरलानंदकुमुदानंदवायुना ॥ ४५ ॥

॥ टीका ॥ नृत्य गीत हास विलास ॥ गोपीं सहित परमपुरुष ॥ वनीं क्रीडतां परमोल्हास ॥ पावोनि पुलिना प्रवेशला ॥ ३६ ॥ यमुनापुलिनीं रम्य मृदुळ ॥ जेथ शर्करा सुशीतळ ॥ मंदानिळें कुमुदें तरळ ॥ परिमळ बहळ जे ठायीं ॥ ३७ ॥ यमुनाजळीं कुमुदावळी ॥ तरळ डोलती मंदानिळीं ॥ तया वायूनें पुलिनपाळीं ॥ तुहिनाचलीं उपमूं ये ॥ ३८ ॥ गंधर्वसुरसिद्धकिन्नरीं ॥ अंगनांसहितमन्मथसमरीं ॥ सुगंध शीतळ वनोदरीं ॥ जेंवि हिमगिरीमाजि रमिजे ॥ ३९ ॥ तैसा पुलिनीं प्रवेशोन ॥ गोपींसहित मनमोहन ॥ रमता झाला आनंदोन ॥ लब्धानंद सप्रेमें ॥ ४० ॥तिये क्रीडेचीं इंगितें ॥ चाटुचटुलरतिचेष्टितें ॥ कामशास्त्रोक्त कामतातें॥दावि-

---

१ वालु २ हिमाचल.

लीं उचितें विचरोनी॥ ४१॥ तीं नृपातें बादरायणि ॥ऊर्ध्वरेताही[1] सप्रेम वर्णी ॥ जेणें भंगती कलिमलश्रेणी ॥ परिसा श्रवणीं तें आतां ॥ ४२ ॥

बाहुप्रसारपरिरंभकरालकोरुनीवीस्तनालभननर्मनखाग्रपातैः ॥
क्ष्वेल्याऽवलोकहसितैर्व्रजसुंदरीणामुत्तंभयन्रतिपतिंरमयांचकार ॥ ४६ ॥

॥टीका ॥ फेडूनि सव्रीड भेदपदर ॥ बाहु पसरूनी स्मरानिर्भर ॥श्रीकृष्ण कंदर्पकेलिचतुर ॥ बल्लवीनिकर आलिंगी ॥ ४३ ॥ अस्ताव्यस्त वसनाभरणीं ॥ कृष्णीं मिनल्या ज्या विरहिणी ॥ सालंकृता रतिरंगणीं ॥ कृष्णेक्षणीं त्या जाल्या ॥ ४४ कुसुमग्रथित कबराभरणीं ॥ मंडित मौळें[2] सलंब वेणी ॥ मलयजकर्दमविलेपनीं ॥ अंगयष्टि मघमघिती ॥ ४५ मंदारमाल्यग्रथित माळा ॥ रूळती बल्लववनितागळां ॥ मन्मथवल्लि फुलल्या बहळा ॥ तैंवि पुंजाळा लावण्यें ॥ ४६॥ भुजग[3]भोगोपम भुज सरळ॥पसरोनि परस्परें लंबाळ॥गोपी आणि श्रीगोपाळ क्रीडाशील रतिरसिक ॥ ४७ ॥ निर्द्वंद्व[4]ही द्वंद्वीभूत ॥ अंगनांशीं अनंगतात ॥ कामकौशल्यें उल्हासयुक्त ॥ आळंगीत सप्रेमें ॥४८ ॥ तया आलिंगना माझारी॥ बल्लवींच्या अभ्यंतरीं ॥ उठती परमानंदलहरी॥निर्विकारी हरिसुरतें॥४९॥बाहुप्रसारण स्मरोत्कर्षें॥संकेत दाविंतां परमपुरुषें ॥तैशाच गोपी स्वबाहुपाशें॥कवळिती तोषें श्रीकृष्णतनु॥५०कृष्णालिंगनीं पडतां मिठी॥सुटली हृदयींची द्वैतगांठी॥अद्वयसुखें भरली सृष्टि॥रमली दृष्टि श्रीकृष्णीं॥५१ आब्रह्मस्तंभपर्यंत ॥ अभेदकृष्णस्वानंदभरित ॥ सुखसंभ्रमें क्रीडासक्त ॥ दिसती विभक्त अविभक्ता ॥ ५२ ॥

---

[1] नित्य ब्रह्मचारी. [2] वेणींतील अलंकार. [3] सर्पाच्या शरीरा सारखे. [4] शीत व उष्ण, सुख व दुःख इ० द्वंद्वांनीं रहित.

आज्यशर्करापयादि मिष्ट॥जिह्वे सुखद आणि स्वादिष्ठ ॥ परी तिक्त कट्वम्ल पटु रामठ ॥ अशनीं अभीष्ट रोचकें ॥ ५३ ॥ इत्यादि उपचार सूपशास्त्रीं[2] ॥ मनुजादिकां विधानसूत्रीं[3] ॥ येर तिर्यक पश्वादि हिंस्त्रीं ॥ तृणादि गात्रीं तोषिजे ॥ ५४ ॥ तेंवि पश्वादि सर्व योनि ॥ सकाम प्रवर्तती मैथुनीं ॥ परी मनुष्यादि सुरवरां लागुनी ॥ स्मरानुशासनीं प्रवृत्ति ॥ ५५ ॥ तेथ कामशास्त्रशिक्षिता युक्ति ॥ वरिष्ठ उत्तम प्रशस्त रति ॥ लिंगसांघट्यमात्रें प्रकृति ॥ तिर्यग्जाती समरसिजे ॥ ५६ ॥ कृष्ण स्वयमेव शास्त्रयोनि॥ सुरवनिता या व्रजकामिनी॥यालागीं यथोक्त क्रीडाचरणीं ॥ स्मरा लागूनि अनुशिक्षी ॥ ५७ ॥ बाहुप्रसारण आलिंगन ॥ वेणीग्रहण मुखचुंबन ॥ पाणिग्रहण कुचमर्दन ॥ नीवीमोक्षण संस्पर्श ॥५८॥ विमुक्तकंचुकी विगतनीवी ॥ करलालन सर्वावयवीं॥ हनुगल्लोरुकरपल्लवीं ॥ सस्मितभावीं परिहसिती ॥ ५९ ॥ मंजुळ कोमळ विनोदवचनीं ॥ कुचादिनखाग्रपरिपातनीं॥सादर अवयवनिरीक्षणीं ॥ अधरपानीं स्मितवक्रीं ॥ ६० ॥ इत्यादि क्रीडा सविस्तर ॥ कंदर्परहस्य शास्त्रानुसार ॥ सुभगाशिक्षित नारीनर ॥ दुर्लभतर त्रैलोक्यीं ॥ ६१ ॥ एवं शास्त्रोक्त सौभाग्यरति ॥ भाग्यें भोगिती नर सुकृती ॥ श्वानसूकरगोखरजाति ॥ तेंवि रमती पामरें ॥६२ ॥ सुमनें तांबूल चंदन ॥ धूपदीप खाद्यपान ॥ कुंजकुसुमित वितानशयन ॥ कामोद्दीपन संपत्ति ॥ ६३ ॥ वाद्यगीत नर्तनकळा॥ आनंदनिर्भर वनिता सकळा ॥ अनीर्ष्यरतिसुखसोहळा ॥ श्रीगोपाळासान्निध्यें ॥ ६४ ॥ कामशास्त्राचीं उदाहरणें ॥ देऊनि पदशः व्याख्यान करणें ॥ केवळ स्त्रैण्याचीं कारणें ॥ ग्रंथीं गौणें नवदावीं ॥ ६५ ॥ येर सज्जनां संकेतमात्र ॥ सूत्रप्राय वदलें वक्र ॥ वृथा किमर्थ कामशास्त्र ॥ येथ समग्र वाखाणूं ॥ ६६॥बाहुप्रसरण आलिंगन॥कचकुचकरऊरुस्प-

---

[1] हिंग [2] वरण, कढी, सांबारें इ० पदार्थ करण्याचें प्रमाणशास्त्र. [3] क्रियेचे नियम [4] छतानें युक्त शय्या. [5] विषयलंपटपणाची.

र्शन ॥ नीवीमोक्षण नखाग्रपातन ॥ हास्य ईक्षण नर्मोक्तिं ॥ ६७ ॥ इत्यादि क्रीडा करूनि हरि ॥ व्रजललनांचे अभ्यंतरीं ॥ समरीं रतिपति प्रदीप्त करी ॥ लावण्यलहरी लालित्यें॥६८ हरिवल्लभा बल्लवललना॥ सप्रेमळा स्वपदशरणा ॥ रमविता जाला त्रैलोक्यराणा ॥ स्वैराचरणा प्रकटूनी ॥ ६९ ॥

एवंभगवतःकृष्णाल्लब्धमानामहात्मनः ॥ आत्मानंमेनिरेस्त्रीणांमानिन्योऽभ्यधिकंभुवि ॥ ४७॥

॥ टीका ॥ एवं ह्मणिजे ऐशिये परी ॥ महात्मा जो कृष्णावतारी ॥ त्या भगवंतापासूनि नारी ॥ महत्त्वथोरी पावल्या ॥ ७० ॥ जीव तितुके मनाधीन ॥ तें मन वर्त्ते ज्या अधीन ॥ त्याशींचि महात्मा अभिधान ॥ तो श्रीकृष्ण भगवंत ॥ ७१ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ कृष्णपरमात्मा मनमोहन ॥ सुरतीं श्रीकृष्णापासून ॥ पावल्या बहुमान व्रजललना ॥ ७२ ॥ लोकत्रयीं ज्या श्रेष्ठ वनिता ॥ त्यांहून आपण महत्त्ववंता ॥ भूमंडळीं त्या बल्लवकांता ॥ कृष्णाभिरमिता मानिती ॥ ७३ ॥ श्रीकृष्णसुरतीं लब्धमाना[2] ॥ इतुकेन वाढतां अभिमाना ॥ कळलें हृदयस्था श्रीकृष्णा ॥ तन्नाशना आरंभी ॥ ७४॥ भगवत्प्राप्तिही जालियावरी ॥ अभिमानाश्रित साही वैरी ॥ करूनि प्रातीची वैखरी ॥ बळें संसारीं बुडविती ॥ ७५ यालागीं निजात्मशरणागता॥ कृष्ण कैवारी रक्षिता ॥ भंगोनि अरिवर्गा दुष्कृता ॥ साधी स्वहिता स्वजनाच्या ॥ ७६ ॥

तासांतत्सौभगमदंवीक्ष्यमानंचकेशवः ॥ प्रशमायप्रसादायतत्रैवांतरधीयत ॥ ४८ ॥

---

१ थट्टेचीं भाषणें. २ प्राप्त झाली प्रतिष्ठा ज्यांस त्या.

॥ टीका ॥ होती भवसुखीं विरक्ति ॥ सप्रेम भगवंतीं अनुरक्ति ॥ अनुतापरूप विरहस्थिति ॥ कृष्णप्राप्तिसापेक्षें ॥ ७७॥ तंववरी श्रवण कीर्तन स्मरण ॥ यथादृष्ट रूपलावण्य ॥ प्रियतम वेधक मूर्तिध्यान ॥ तत्पदसेवन अभीष्ट ॥ ७८ ॥ मानसीं क्रीडाअभ्यर्चन ॥ अभिवादन प्रसादन ॥ स्निग्ध सप्रेम दास्याचरण ॥ सख्य सौजन्य अभिलसित ॥ ७९ ॥ इत्यादि देखोनि कारुण्यता ॥ कृपे वोळल्या प्राणनाथा ॥ आत्मनिवेदनाची आस्था अत्यंत चित्तामाजिवडी ॥ ८० ॥ विरहभूमिके आतौती ॥ साधनदशा हे बाणली होती ॥ त्यांसि जोडतां श्रीकृष्ण सुरतीं ॥ चिंत्सुखावाप्ति अवगमली ॥ ८१ ॥ मग विसरल्या पूर्वस्थिति ॥ मानिली सौभाग्यें उन्नति ॥ आपणा ऐशा सभाग्ययुवति ॥ नाहींत ह्मणती त्रिजगांत ॥८२ ॥ विसरल्या विरहविरक्ति पहिली ॥ नह्मणती कृष्णें कृपा केली ॥ लावण्यगर्वाचिये भुली ॥ कृष्णीं मानिली स्त्रैणता ॥ ८३ ॥ आह्मी वरिष्ठा उत्तमगुणी ॥ सालंकृता लावण्यखाणी ॥ विलासशृंगाररसवाहिनी ॥मृगांकवदनी मृगनयना ॥ ८४॥ आमुचे आंगीं तारुण्यभर ॥ विशेष चातुर्य शृंगार ॥ इत्यादि सौभाग्यें श्रीधर ॥ आह्मीं सत्वर वश केला ॥ ८५ ॥कृष्ण भूलला आमच्या गुणां ॥ आह्मीच सुभगा वरांगना ॥ येर त्रिजगीं दुर्भगा हीना ॥ काय गणना तयांची ॥ ८६ ॥ कृष्ण झाला आह्माधीन ॥ आतां आह्मीच मान्य धन्य ॥ आह्मां पुढें त्रिजग तृण ॥ ऐसा अभिमान मानसीं ॥ ८७ ॥ सौभाग्याचा चढला मद ॥ भोगितां कृष्णसुरतानंद ॥ तेणें वाढला उन्माद ॥ ह्मणती मुकुंद वश केला ॥८८॥ ऐसा अभिमान मानिती मनीं ॥ उदेला जाणोनि चक्रपाणि॥ प्रवर्ते त्यांचिया कल्याणीं॥ मदोपशमनीं मानेशीं॥८९ त्यांचिया आंगींचा सौभाग्यमद ॥ कृष्ण भुलविला हा अभिमान विशद ॥तो प्रशमूनि श्रीमुकुंद ॥ पूर्णप्रसाद

---

१ इच्छित २ ज्ञानसुखाची प्राप्ति. ३ प्राप्त झाली. ४ विषयासक्तता. ५ विलास व शृंगार यांची नदी. ६ चंद्रमुखी.

करावया॥९०॥ह्मणे आपुल्या सन्निधानें॥गोपी कवळिल्या मदाभिमानें॥पुढती विरहोद्दीपनें ॥ प्रशम करणें मदमाना॥९१॥लक्षूनि विरहाचें कारण॥वेष्टित असतां वनितागण॥तेथेंचि पावला अंतर्धान॥पूर्ण प्रसाद होआवया॥९२ माझिये सुरतीं समरस मिळणीं॥मिनल्या असतां व्रजकामिनी॥स्वसाक्षित्वें यां लागूनी॥मदाभिमान झगटला ॥९३॥जेंवि समरसीं योगप्रवीण॥साक्षित्वभेदें उरतां भिन्न॥लयं[1]विक्षेपें विपरीतज्ञान ॥ सच्चित्सुखघन जगदात्मा ॥ ९५ ॥ गोपी मदाभिमानाविष्टा ॥ वियोगविरहें पावती कष्टा ॥ काननीं होऊनि प्रविष्टा॥आत्माभीष्टा हुडकिती ॥ ९६ ॥ स्थिरजंगमां पुसतां वनीं ॥ त्रास पावती करितां ग्लानि ॥ पुन्हा उपरति धरूनि मनीं ॥ यमुनापुलिनीं स्थिर होती॥ ९७ ॥ तेथ करितां गुणकीर्तन ॥ विशुद्ध निर्मद निरभिमान ॥ जालिया होती सुखसंपन्न ॥ निजात्मदर्शन लाहोनी ॥ ९८ ॥ ऐसी अनुकंपा श्रीहरि ॥ लक्षूनियां अभ्यंतरीं ॥ प्रसादार्थ वनितानिकरीं ॥ अंतर्धाना पावला ॥ ९९ ॥ इतुकी लीला ये अध्यायीं ॥ ललना[3]लालस शेषशायी ॥ विचरला तें श्रवणालयीं ॥ परीक्षितीच्या शुक वदला ॥ ७०० ॥ पुढिले अध्यायीं गोपिका ॥ वनीं हुडकिती मनसिजजनका॥ विरहप्रेमामृतरस निका ॥ सावध ऐका साधक हो ॥ १ ॥ श्रीमत्प्रतिष्ठानवासिनी ॥ एकनाथा एकाभिधानी ॥ भवरोगिया आरोग्यदानी ॥ साधक जननी जगदंबा ॥ २॥ चिदानंदाचें दर्शन ॥दिवि[4] स्वानदें उजळून॥ गोविंदकृपा जोगवादान ॥ करूनि दिवटा मज केलें ॥ ३ ॥ गोविंदसद्गुरुचरणसेवा ॥ कृपेनें वोळला नवार्णवा॥ तिणें स्वबोधें दयार्णवा ॥ माजि वैभवा भरियेलें ॥ ४ ॥ स्वानंददिवीचा प्रकाश ॥ करूनि ग्रंथार्थाचें मिस॥गुरुकृपेचा पूर्ण तोष ॥ श्रोतयांस प्रकाशला ॥ ५ ॥ दिविप्रकाशीं स्नेह[5] जळे ॥ जन्ममरणाची पीडा टळे ॥ निजात्मवैभव-

---

[1] मूर्च्छनासुषुप्तींमधील अज्ञान. [2] स्वप्नजागृति यांतील ज्ञान. [3] स्त्रैण. [4] दीप [5] तेल. पक्षीं—विषयप्रेम.

रेखा उजळे ॥ नाथिलें वितुळे भवदैन्य॥६ ॥ द्वैतदुर्गेंची वोवाळणी ॥ करूनि अद्वैतसाम्राज्यसदनीं ॥ स्वानंद भोगिजे श्रोते जनीं ॥ हे विनवणी दिवट्याची ॥ ७॥ आपुले कृपेचा जोगवा ॥ देऊनि पदभजनीं जागवा ॥ सरतें कीजे दयार्णवा ॥ संतां सदैवां[2] हे विनति ॥ ८॥ इतिश्रीमद्भागवत ॥ अठरा सहस्र श्रुतिनिर्मथित[3] ॥ परमहसीं[4] श्रुताधीत[5] ॥ कैवल्यामृत[6] ज्या श्रवणें ॥ ९ ॥ तयांतील हा स्कंध दशम ॥ शुकपरीक्षित्संवाद सुगम॥ रासक्रीडा उपक्रम[7] ॥ अध्याय उत्तम ऊनत्रिंश १०॥इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां रासोपक्रमेकृष्णगोपिकासंवादसुरतवर्णनंनामैकोनत्रिंशत्तमोऽध्यायः॥श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्लोक ॥ ४८ ॥ टीकावोवी ॥ ७१० ॥ एवंसंख्या ॥ ७५८ ॥

---

१ कृतकृत्य, पावन. २ भाग्यवान. ३ वेदांचें मंथन करून काढिलेला सारांश. ४ तपस्ये करितां ज्यानें इंद्रियनिग्रह केला असा संन्यासी. ५ श्रवण केलेली व पठन केलेली. ६ मोक्षरूप अमृत ७ आरंभ.

अध्याय ३०

॥ अकस्मात अंतर्धान ॥ पावला असतां जनार्दन ॥
॥ गोपी विरहतापें करून ॥ करिती गवेषण संतसा ॥२२॥



श्री गोविंदसद्गुरु प्रसन्न ॥ सच्चित्सुखकर वरकरपद्मा ॥ पद्माप्रियतममानससद्मा ॥ श्रीगोविंदा स्वसंविद्मा ॥ छेदक च्छद्मा छंदज्ञा ॥ १ ॥मौळ स्पर्शतां पद्मकरें ॥ पूर्ण सच्चिदानंद अवतरे ॥ विषयशर्मिकगरिमा हरे ॥ मति मोहरे पदभजनीं ॥ २ ॥ अभेदभक्तिसुखाची गोडी ॥ ब्रह्मानंदाच्या पडिपाडीं ॥तुकितां प्रणतीं अनावडी॥केली रोकडीभक्ती पुढें ॥ ३ ॥ असतां ब्रह्मसुख संचलें ॥ मिथ्या विवर्त्तें आच्छादिलें ॥ गुरुपदभजनें उदया आलें ॥ पोटीं जन्मलें भक्तीचे ॥४॥ परिस लोहाचें करी सोनें ॥ तें केंवि तुकेल्याचिये तुळणे ॥ ब्रह्मत्व जोडे गुरुपदभजनें॥ तो केंवि करणें ततुल्य ॥५॥ अभेदपदभजनाची गोडी ॥ देखोनि ऐक्याची मोडिली घडी ॥ अभेदप्रेमा चढोवढी ॥ उभवूनि गुढी रूढविला ॥ ६ ॥ ऐसी कमला निज हृत्कमळीं ॥ कमलदलाक्ष प्रेमें कवळी ॥ तीं वधूवरें सप्रेमशाली ॥ आनंदबहळीं तुज ध्याती ॥७॥ पद्माप्रियतममानससद्मीं ॥ निश्चळ निवास तुमचा स्वामि ॥ ह्मणोनि त्यांतें अबोध ऊर्मि॥कोण्हे कर्मीं नस्पर्शे॥८॥गुरुपदभजनीं सप्रेम रति॥ह्मणोनि अवाप्त ज्ञानशक्ति॥ करितां त्रिजगाची संस्थिति ॥ ज्या भवभ्रांति नस्पर्शे ॥ ९ ॥ ज्याच्या पदभजनीं हा महिमा ॥ तो गोगोप्ता गोविंदनामा ॥ स्मरणमात्रें कैवल्यधामा ॥ स्वसंविद्मा स्वबोधें ॥ १० ॥ मायाच्छद्मच्छेदनशीला ॥ छंदाभिज्ञा प्रणतपाळा ॥ छंदोमया

---

१ शाश्वत ज्ञान व आनंद देणारा. २ वर देणारें करकमल ज्याचें तो. ३ लक्ष्मी व विष्णु ह्यांचें मानस हेंच सद्म ह्म०गृह ज्याचें तो सद्गुरु. ४ आत्मज्ञानसंपन्न. ५ विषयसुखाचें महत्त्व. ६ पुढें होऊन प्रवेश करित्ये. ७ साम्यतेस. ८ वेदज्ञ.

गोगोपाळा ॥ करिसी स्वलीला नटनाट्यें ॥११॥ बहुधा नाट्यें बहु अवतारीं ॥ तव कृत कथिती ग्रंथांतरीं ॥ येथ महाराष्ट्र मम वैखरी ॥ दशमावरी प्रवर्त्तविली ॥१२॥ त्यामाजि हा रासोत्सव ॥ गोपी परिसोनि मुरलीरव ॥ वनीं स्वेच्छा वासुदेव ॥ भोगितां गर्व उदेला ॥ १३॥तो जाणोनि सर्वज्ञ हरि ॥ स्वजनसुखद विग्रहधारी ॥ अनुग्रहार्थ मद परिहरी ॥ होऊनि सत्वरी तिरोहित ॥ १४ ॥जेंवि सद्गुरु शक्तिपात ॥ करूनि सच्छिष्याचें चित्त ॥ झालें जाणोनि निजात्मरत ॥ पुन्हा जागृत भवीं करी ॥ १५ ॥ मग त्या नरुचोनि भवभान ॥ अनुभूतसुखीं वेधे मन ॥ विसरोनि देहादिप्रवृत्तिस्मरण ॥ करी गवेषण तच्छंदें॥ १६ ॥ तेंवि कृष्णसुखाची गोडी ॥ गोपी चाखतां गर्वें गुढी ॥ उभवूनि केली विघडाविघडी ॥ झाडोझाडीं मग फिरती ॥१७॥ बाल उन्मत्त कां पिशाच ॥ देहस्मृतीचा भंगोनि माच॥अनियत करणें कारितां नाच॥गोपी तैशाच हरिवेधीं॥१८॥ विरहतप्ता त्या गोपिकांहीं ॥विरक्त होऊनि देहीं गेहीं ॥ हरि हुडकिला वनाचे ठायीं ॥ तिसाव्या अध्यायीं हे कथा ॥ १९ ॥ शुक ह्मणे गा कुरुवरिष्ठा ॥ जोडलें न जिरे मदगर्विष्ठा ॥ भगवत्प्राप्ति विना कष्टां ॥ कैंवि अभीष्टा भेटवी ॥ २० ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ अंतर्हितेभगवतिसहसैवव्रजांगनाः ॥ अतप्यंस्तमचक्षाणाःकरिण्यइवयूथपम् ॥ १ ॥

॥ टीका ॥ तेंवि गोपी भगवत्संग ॥ लाहतां मदगर्वाचा योग ॥ अंतर्धान अंतरंग ॥ करी श्रीरंग जाणोनी ॥२१॥ अकस्मात अंतर्धान ॥ पावला असतां जनार्दन॥गोपी विरहतापें करून ॥ करिती गवेषण संतप्ता ॥२२॥ मधुमासींच्या मधुतर शाखा ॥ करिणी भक्षूनि मिथुनोन्मुखा ॥ इच्छूनि अभीष्ट मन्मथसुखा ॥ निजनायका वेष्टिती ॥ २३ ॥ त्यांतील जैसा यूथपति ॥ वनीं अंतरतां विहारवृत्ति ॥ विरहतप्ता त्या हुडकिती ॥ तेंवि व्रजयुवति कृष्णातें ॥

---

१ गुप्त. २ शोध. ३ आश्रय.

॥ २४ ॥ शक्तिपातोत्थित जैसा शिष्य ॥ देहादिभवभानीं वैरस्य ॥ पावोनि अभीष्ट सामरस्य ॥ लाहे अवश्य विनिमयता ॥ २५ ॥ कीटकी जैसी भिंगुरटी ॥ ध्यानतादात्म्यें तनु पालटी ॥ तेंवि कोहंता उफराटी ॥ वळे उलटी सोहंते ॥ २६ ॥ हरिसुखभुक्ता तेंवि ललना ॥ प्रेष्ठ पावतां अंतर्धाना ॥ वेधें करितां तीव्र ध्याना ॥ ज्ञातितादात्म्यें पालटल्या ॥ २७ ॥

गत्यानुरागस्मितविभ्रमेक्षितैर्मनोरमालापविहारविभ्रमैः ॥
आक्षिप्तचित्ताःप्रमदारमापतेस्तास्ताविचेष्टाजगृहुस्तदात्मिकाः ॥ २ ॥

॥ टीका ॥ भगवंताचे पदविन्यास ॥ लक्षितां असाम्य गमती हंस ॥ जडतां तीव्रध्यानाध्यास ॥ पावे मानस तन्मयता ॥ २८ ॥ चंद्रापासूनि चकोरनयनां ॥ पर्यंत पीयूषरसाचा पान्हा ॥ तेंवि इंगितें सहित ध्याना ॥ वेधक तनुमना अनुराग ॥ २९ ॥ सस्निग्ध तान्हुलें आणि जननी ॥ सकाम कामुक आणि कामिनी ॥ गुरुशिष्यांचा अभेदभजनीं ॥ अवंचकपणीं अनुराग ॥ ३० ॥ सूर्यदर्शनें पद्मिनी ॥ कां शशांकोदयीं कुमुदिनी ॥ तैसी सानुरागनिरीक्षणीं ॥ मिथा विकासित स्मितवक्त्रें ॥ ३१ कटाक्षविक्षेपमनोहर ॥ सानुरागविलासपर ॥ मधुरगायन आलाप रुचिर ॥ क्रीडाविहार स्मरवृद्धि ॥ ३२ ॥ इत्यादि रमारमणइंगितें ॥ हरितां व्रजरमणींचीं चित्तें ॥ तादात्म्य पावोनि त्या चेष्टांतें ॥ घेत्या झाल्या शिक्षितवत् ॥ ३३ ॥ वादककौशल्य वाजांतरीं ॥ कीं बिंबींचे विकार दर्पंती मुकुरीं ॥ तेंवि तादा[३]त्म्यवेधनिर्भरीं ॥ गोपीशरीरीं हरिचेष्टा ॥ ३४ ॥ हरितादात्म्यें हरिइंगितें ॥ घेऊनि हरिपण आपणांतें ॥ भावूनि विसरल्या पूर्वावस्थे ॥ भजती स्मृतीतें कृष्णत्वें ॥ ३५ ॥ कोहं विसरोनि सोहंबोधें ॥

---

१ चेतनेच्या योगानें जी कृष्णस्वरूपता तिणेंकरून. २ प्रतिबिंबित होतात. ३ आत्मस्वरूपज्ञान. ४ व्यापिलें आसतां.

प्रत्यक्चैतन्य स्वरूपवेधें ॥ वेंठतां मिथ्यात्वें विवर्तरोधें[3] ॥ फावे नुसधें एकत्व ॥ ३६ ॥ तेंवि गोपिका कृष्णात्मका कृष्णानुराग लाहतां निका ॥ करिती तच्चेष्टा एकैका ॥ व्रजनायका भावूनी ॥ ३७ ॥

गतिस्मितप्रेक्षणभाषणादिषुप्रियाःप्रियस्यप्रतिरूढमूर्त्तयः ॥
असावहंत्वित्यबलास्तदात्मिकान्यवेदिषुः कृष्णविहारविभ्रमाः ॥ ३ ॥

॥ टीका ॥ केवळ कृष्ण इंगितें सहित ॥ आपण होऊनि मूर्तिमंत ॥ एकीमेकींतें सांगत ॥ मी नंदसुत ह्मणोनी ॥ ३८॥ कृष्णाचिये चालती चाली ॥ कृष्णमधुरता बोलती बोली ॥ कृष्णकृपेच्या न्याहाळीं ॥ न्याहाळिती त्या तादात्म्यें ॥ ३९ ॥ हास्यवक्रें विभ्रमापांग ॥ कृष्णमयचि ज्यांचें सांग ॥ कृष्णा ऐसा स्वजनानुराग ॥ एवं अव्यंग हरिचेष्टा ॥ ४० ॥ ऐशा गोपी हरिमय जाल्या ॥ वेधें तनुभावा विसरल्या ॥ पूर्वस्मृतीसि अंतरल्या ॥ मग संचरल्या वनांतरीं ॥ ४१ ॥

गायंत्यउच्चैरमुमेवसंहताविचिक्युरुन्मत्तकवद्वनाद्वनम्॥पप्रच्छुराकाशवदंतरंबहिर्भूतेषुसंतंपुरुषंवनस्पतीन्॥४

॥टीका॥ कृष्णविरहें भ्रमिताचिये परी॥रात्रीं भरल्या वनांतरीं॥आलापूनि उच्चस्वरीं॥ श्रीमुरारि हुडकिती ॥४२॥ कृष्णविरहें भ्रमिता अबळा ॥ सबाह्य प्रवृत्तिमार्गीं बरळा ॥ उच्चस्वरीं श्रीगोपाळा ॥ गाती वेल्हाळा निर्लज्ज ४३ ॥ ग्रहपिशाचभ्रमोपहत ॥ मदिरामदें जेंवि उन्मत्त ॥ तैशा फिरती वना आंत ॥ तीं चिह्नें समस्त अवधारा ॥ ४४ ॥ कृष्णा ह्मणोनि उच्चस्वरीं ॥हाका मारिती वनान्तरीं ॥ धांवती उन्मत्ताचिये परी ॥ घोर कांतारीं हरिवेधें ॥ ४६ ॥ वनें लंघूनि वनाप्रति ॥ विखुरल्या सैराट वनीं भरती ॥ हरिगुण उच्चस्वरीं गाती ॥ वोळखी देती

---

१ आत्मज्ञान. २ व्यापिलें असतां. ३ दृश्यभासाच्या प्रतिकारानें. ४ दृष्टीनें.

नामाची ॥ ४६ ॥ ये गा अघबळसंहर्त्तिया ॥ ये गा गोवर्धनधर्त्तया ॥ ये गा स्वजना सुखकर्त्तया ॥ परिहर्त्तया
उपसर्गा ॥ ४७ ॥ पूतनास्तनगरप्राशनकरणा ॥ ये गा गोपींचीरापहरणा ॥ ये गा यमलार्जुनोद्धरणा ॥ दुर्घटहरणा
दुरितारि ॥ ४८ ॥ ये गा मुरलीवादनशीला ॥ ये गा ललनालालनलोला ॥ ये गा प्रमदामानसकमला
॥ अलिउळंप्राय अभिरमका ॥ ४९ ॥ ऐशा गाती अनेकपरी ॥ धुंडित होत्सात्या कांतारीं ॥ पुसती विरुद्ध द्रुमवल्लरी
॥ सबाह्याभ्यंतरीं नांदतया ॥ ५० ॥ अंतर्बाह्य जैसें गगन ॥ तैसा भूतीं जो परिपूर्ण ॥ पुसती वनस्पतीं
लागून ॥ जातां श्रीकृष्ण देखिला ॥ ५१ ॥ त्या गोपींच्या उन्मत्त रीति ॥ स्थावरजंगमीं ज्या प्रश्नोक्ति ॥ श्लोकंनवकें[३]
वदल्या युवति ॥ तें सावध श्रोतीं परिसिजे ॥ ५२ ॥

॥ गोप्यऊचुः ॥ दृष्टोवःकच्चिदश्वत्थप्लक्षन्यग्रोधनोमनः ॥ नंदसूनुर्गतोहृत्वाप्रेमहासावलोकनैः ॥ ५ ॥

॥ टीका ॥ पिंपरी ह्मणिजे प्लक्षतरु ॥ वट अश्वत्थ थोरथोर ॥ उच्चपणें दूरद्रष्टार ॥ ह्मणोनि श्रीधर त्यां पुसती
॥ ५३ ॥ अगा अश्वत्था प्लक्षा वटा ॥ आमुच्या चित्ताचा चोरटा ॥ कृष्ण जातां इया वाटा ॥ तुह्मांसि अवचटा
आढळला ॥ ५४ ॥ आकर्षूनि मुरलीगानें ॥ वनीं आणूनि सन्निधानें ॥ प्रेमहासावलोकनें ॥ आमुचीं मनें
हरतिलीं ॥ ५६ ॥ गायनरूप घालूनि फांसा ॥ तेणें आकर्षिलें वनवासा ॥ शस्त्रासमान विलोकहासा ॥ प्रेरूनि
मानसा चोरिलें ॥ ५६ ॥ तो आमुचा सर्वस्वहर्ता ॥ तुह्मीं देखिला असेल जातां ॥ ह्मणें असेल अर्ता पर्ता ॥
त्याची वार्ता सांगा हो ॥ ५७ ॥ ऐशा पुसोनि पुढें जाती ॥ तंव देखिल्या पुष्पजाती ॥ विरहाकुळा बल्लवयुवति ॥ त्यांतें
पुसती हरिवार्ता ॥ ५८ ॥

---

१ गोपींचीं वस्त्रें हरणारा. २ भुंग्यासारखा. ३ नऊ श्लोकांनीं. ४ दूरची वस्तु पाहणारे.

कच्चित्कुरबकाशोकनागपुन्नागचंपकाः ॥ रामानुजोमानिनीनांगतोदर्पहरस्मितः ॥ ६ ॥

॥ टीका ॥ आपुल्या कुसुमामोददानें ॥ श्रांतां विश्रांति अर्पणें ॥ महानुभावांचीं आचरणें ॥ उदारपणें वागविती ॥ ५९ ॥ ह्मणोनि तरुवरां पुण्यशीळां ॥ कृष्णपदवी पुसती अबळा ॥ चंपकादिवृक्षमेळा ॥ संबोधिती पृथक्त्वें ॥ ६० ॥ श्वेतरक्तपीतादिक ॥ चतुर्विधकुसुमांचे कुरबक ॥ श्वेत रक्त द्विविधाशोक ॥ आणि चंपक कनकाभ ॥ ६१ ॥ नाग पुन्नाग पाटळ ॥ इत्यादि पुष्पतरूंचा मेळ ॥ त्यांसि पुसती उताविळ ॥ तुह्मीं गोपाळ देखिला हो ॥ ६२ ॥ बळरामाचा अनुज हरि ॥ स्मितईक्षणें ललनान्तरीं ॥ रिघोनि सर्प मानस हारि ॥ तो कांतारीं देखिला ॥ ६३ ॥ तुह्मी सदय परोपकारी ॥ उदार सत्पुरुषाचे परी ॥ त्याविण आह्मी दुःखिता नारी ॥ वार्ता तर्‍ही वदा त्याची ॥ ६४ ॥ ऐशा पुसोनि तरुवरांसी ॥ पुढें शोधितां श्रीकृष्णासी ॥ तंव ते वनीं कल्याणराशि ॥ देखिली तुळसी हारिप्रिया ॥ ६५ ॥

कच्चित्तुलसिकल्याणिगोविंदचरणप्रिये ॥ सहत्वाऽलिकुलैर्बिभ्रद्दृष्टस्तेऽतिप्रियोऽच्युतः ॥ ७ ॥

॥ टीका ॥ गोपी ह्मणती अवो तुळसी ॥ गोविंदाच्या श्रीचरणासीं ॥ तव ये प्रियतम रूपांतरासी ॥ तुज अहर्निशी नविसंबे ॥ ६६ ॥ वनमाळा सह वैजयंती ॥ हृत्पद्मस्था पद्मा सती ॥ त्याहूनि विशेष तुजवरी प्रीति ॥ तुज एकांतीं नविसंबे ॥ ६७ ॥ तूतें प्रियतम श्रीअच्युत ॥ अळिकुळमाळाअभिवेष्टित ॥ पावन सुरभि गंधासक्त ॥

---

१ उदार बुद्धीचे लोकांचीं. २ कोरांटकीचें झाड. ३ सुवर्णसदृश.

धरितो अभिरत होत्साता ॥ ६८ ॥ त्या कृष्णाची सांगें शुद्धि ॥ आमुची हरूनि मानसबुद्धि ॥ देखिला असे काननसंधीं ॥ तरी दावीं त्रिशुद्धी तो आह्मां ॥ ६९ ॥

मालत्यदर्शिवःकच्चिन्मल्लिकेजातियूथिके ॥ प्रीतिंवोजनयन्यातःकरस्पर्शेनमाधवः ॥ ८ ॥

॥ टीका ॥ नम्रा गुणाढ्या ज्या युवति ॥ नंदनंदन त्यां वशवर्ती ॥ गुणसंपन्ना मालती जाति ॥ देखोनि पुसती गोपिका ॥ ७० ॥ गुणसंपन्ना सुगंधगुणी ॥ नम्रा तनुलाघवें करूनी ॥ यालागीं यांही चक्रपाणि॥असेल नयनीं देखिला ॥ ७१ ॥ मालती जाती नामीं दोहीं ॥ वल्ली गुल्म भेद पाहीं ॥ भाषा नामें बोलिजे जाई ॥ त्यांसि लवलाहीं हरि पुसती ॥ ७२ ॥ मल्लिका आणि जे यूथिका ॥ आबई जुई नामात्मका ॥ त्यांतें पुसती व्रजनायका ॥ असे ठावुका तरी सांगा ॥ ७३ ॥ तुह्मां स्पर्शोनि शंतम करीं ॥ प्रीति प्रकटोनि अंतरीं ॥ जातां देखिला असेल हरि ॥ तरी झडकरी सांगा हो ॥ ७४ ॥ दीन दयाळ फलाढ्य तरु ॥ सर्वप्राणितर्पणपर[1] ॥ ज्यांचा सर्वां वरी उपकार ॥ ह्मणोनि श्रीधर यां विदित ॥ ७५ ॥

चूतप्रियालपनसासनकोविदारजंब्वर्कबिल्वबकुलाम्रकदंबनीपाः ॥
येऽन्येपरार्थभवकायमुनोपकूलाःशंसंतुकृष्णपदवींरहितात्मनांनः ॥ ९ ॥

॥ टीका ॥ चूत आम्र दोनी जाति ॥ काळवैशिष्ट्यें बोलिजती ॥ एक हेमंतीं मुहुरती ॥ आम्र शिशिरीं सर्वत्र ॥७६॥चूताम्राचे जातिभेद॥तैसेचि कदंब नीप विशद॥लंब वर्तुळ पर्णीं बोध॥रक्तश्वेतप्रभेदीं ॥७७॥ अहो आम्र अहो चूत॥अहो कदंब नीप समस्त॥अहो बकुल पारियात॥अहो श्लेष्मांत[2] कोविदार[3]॥७८॥जंबु विल्वादि आमलकी

---

१ सर्व प्राण्यांस तृप्त करण्याविषयीं दक्ष. २ भोंकरीचें झाड. ३ कांचनांचें झाड.

॥ चारी बोरी भल्लातकी ॥ ताल तमाल केतकी ॥ हरीतकी खर्जूरी ॥ ७९ ॥ करंज कूट असन पनस ॥ तिंतिणी
गोस्तनी पलाश ॥ पिचुमंदादि चंदनास ॥ पुसती परेश व्रजललना ॥ ८० ॥ कारी कर्वंदी कर्मटी ॥ अंजन
धामोडे धायटी॥शाल्मली आरग्वध मर्कटी ॥ राजादना पुसताती ॥८१॥ जितुके यमुनेसमीप द्रुम ॥ जैसे
दयाळ मुनिसत्तम ॥ परोपकारार्थ ज्यांचे जन्म ॥ वर्णाश्रम तीर्थाश्रित ॥ ८२ ॥ पत्रें पुष्पें फळें मूळें ॥काष्ठ त्वचा
अग्र कोवळे ॥ नवंचिती कोण्या काळें ॥ छाये शीतळे निवविती ॥ ८३ ॥ वृष्टि आतप वात शीत ॥ सर्व साहती
जेंवि व्रतस्थ ॥ ऐसे जे परोपकारार्थ ॥ जन्म धरूनि राहिले ॥ ८४ ॥ परदुःख हरूनि सुखी करिती ॥ ह्मणोनि
गोपिका त्यांतें पुसती ॥ विरहतप्ता आह्मी युवति ॥ कोणी श्रीपति सांगो कां ॥ ८५ ॥ कृष्णें मानस हिरोनि
नेलें ॥ हृदयशून्य आह्मांसि केलें ॥ कोण्ही असेल त्या देखिलें ॥ तरी सवेग कथिलें पाहिजे ॥ ८६ ॥ दुःख हिरोनि
सुखी करणें ॥ कैवल्य साधे यासाधनें ॥ यालागिं कृष्णपदवी कथनें ॥ आमुचे प्राणें नवचतां ॥ ८७ ॥
कृष्ण गेला कोणे वाटे ॥ सूचिजे चालवूनि सूक्ष्म फांटे॥तुह्मी सदय स्नेहाळ मोठे॥ तरी सांगा कोठें हरि गेला ॥
८८ ॥ ऐशी द्रुमांतें करूनि ग्लानि ॥ पुढें चालिल्या विरहिणी ॥ तृणीं टवटवीत देखोनि धरणि॥तये लागूनि प्रशंसिती
॥ ८९ ॥

किंतेकृतंक्षितितपोबतकेशवांघ्रिस्पर्शोत्सवोत्पुलकितांगरुहैर्विभासि ॥
अप्यंघ्रिसंभवउरुक्रमविक्रमाद्वाआहोवराहवपुषंपरिरम्भणेन ॥ १० ॥

---

१ बिबवा. २ हिरडा. ३ पर्वताचें शिखर. ४ आसणाचें झाड. ५ द्राक्षी. ६ पळस. ७ निंब. ८ सांवरी. ९ बाव्ह्याचेंझाड. १० मोठा करंज. ११ रांजणीचें झाड.

॥ टीका ॥ अवो धरित्री सांगें गुज ॥ कोण तपश्चर्या घडली तुज ॥ जेणें कृष्णाचे पदरज ॥ तुजला सहज लाभले ॥ ९० ॥ तेणें केशवांघ्रिस्पर्शें ॥ तूं मिरवसी हर्षोत्कर्षें॥रोमांचिता तृणविशेषें ॥ परमोल्हासें मंडित ॥ ९१ ॥ उत्कट तपांचें ऐसें फळ ॥ श्रीकृष्णाचें चरणकमळ ॥ स्पर्शोत्साहें आनंद बहळ ॥ तूं निर्मळ भाससी॥९२ ॥ अहो हा उत्साह येचि काळीं॥वृंदावनीं श्रीवनमाळी॥ क्रीडतां स्पर्शोनि श्रीचरणकमळीं ॥ तुज वेल्हाळी जोडला ॥९३॥ तूं विस्तीर्ण वसंधरा ॥ क्रीडतां एकदेशीं या श्रीधरा ॥ वृंदावनादिवनसंचारा ॥ पदाधिकारा लाधलीसि, ॥ ९४ ॥ तया पुण्याचें हें फळ ॥ भोगिसी स्पर्शानंद बहळ॥किंवा निखिल ब्रह्मांडगोळ ॥ त्रिविक्रमें आक्रमिता ॥ ९५ ॥ तें साकल्यें सन्निधान ॥ स्पर्शले सर्वांगीं श्रीचरण ॥ तेणें उत्साहयुक्त पूर्ण ॥ प्रेमरोमांच वाहसी ॥ ९६ ॥ अथवा त्याहूनि पूर्वीं सुभगें॥आलिंगितां वराहभोगें॥कृपेनें स्पर्शिलीं सर्वांगें॥अद्यापि तद्योगें सोत्साह॥९७ ॥ एवं तुझिया तपोराशि ॥ अमोघ अक्षय निश्चयेंशीं ॥ प्रत्यवतारीं हरिचरणांसी॥ तूं भोगिसी सौभाग्यें ॥ ९८॥ आह्मी अल्पका मंदभाग्या ॥ चरणस्पर्शासि अयोग्या ॥ सप्रेम श्रीष्णासी भोग्या॥ मां कैसेनि अभाग्या हों शकों ॥ ९९ ॥ ह्मणोनि सुभगे धरादेवी ॥ सांगोनि श्रीकृष्णाची पदवी ॥ निजात्मवल्लभ हरि भेटवीं ॥ स्वसुखीं निववीं संतप्तां ॥ १०० ॥ परोपकारा एवढें पुण्य॥त्रिजगीं दुसरें नाहीं जाण ॥ ह्मणोनि श्रीकृष्णाचे चरण ॥ दावूनि उपकार तूं घेईं ॥१ ॥ ऐशा पुसोनि धरणीप्रति ॥ वनीं विरहिणी हरि शोधिती ॥ तंव हरिणींची देखोनि पंक्ति ॥ त्यांतें पुसती तें ऐका ॥ २ ॥

---

१ दुःसाध्य. २ वामनानें. ३ वराहावताराच्या शरीरानें. ४ हे, पृथ्वी.

अप्येणपत्न्युपगतःप्रिययेहगात्रैस्तन्वन्दृशांसखिसुनिर्वृतिमच्युतोवः ॥
कांतांगसंगकुचकुंकुमरंजितायाःकुंदस्रजःकुलपतेरिहवातिगंधः ॥ ११ ॥

॥ टीका ॥ अहो ऐका कुंरगिणी ॥ तुह्मी सभाग्या कुरंगपत्नी ॥ तुह्मांसमीप सहकामिनी ॥ कृष्ण येऊनि गेला कीं ॥ ३ ॥ तुह्मांसि जालें हरिदर्शन ॥ आह्मीं बोळखिलें तुमचें चिह्न ॥ जें पूर्णानंदनिर्भर मन ॥ दिसती नयन संतुष्ट ॥ ४ ॥ तें हरिदर्शन ह्मणाल कैसें ॥ सुंदरीच्या रतिविलासें ॥ ज्याचें सर्गांग चिह्नित दिसे ॥ शोभाविशेषमंडित ॥ ५ ॥ श्यामतमाललावण्यरसिक ॥ आजानुबाहु मुख शशांक ॥ हृदयीं वधूकुचकुंकुमांक ॥ कज्जलांक गुंडयुगीं ॥ ६ ॥ विरंग अधर वधूनिपीत ॥ परिवेष्टित कटिपट पीत ॥ मदनमोहन मंदस्मित ॥ ललनाभुक्त शुभस्त्रग्वी ॥ ७ ॥ ज्याचे कंठींचे कुंदमाळे ॥ कांताअंगसंगाचे वेळे ॥ मिळतां उभय वक्षःस्थळें ॥ कुंकुम लागलें कुचांचें ॥८॥ तेणें रंगली लोहींव वर्ण ॥ सकेशराशीं सुगंध पूर्ण ॥ घ्राण होतसे अवघ्राण ॥ कीं समीप कृष्ण गमतसे ॥९॥ शास्त्रवक्ता सर्वज्ञ मूर्ति ॥ नामें बोलिजे तोकुळपति ॥ कामशास्त्राचे व्युत्पत्ति ॥ गोपी ह्मणती कृष्णातें ॥ १० ॥ एवं कृष्णाचिये गळां ॥ कुचकुंकुमाक्त कुंदमाळा ॥ भावूनि तयेचिया परिमळा ॥ पुसती अबला हरिणींतें ॥ ॥११॥ कुरंगिणी हो तुमच्या नेत्रां ॥ मदनमोहना स्वकीयगात्रा ॥ दावूनि केलें आनंदपात्रा ॥ तुमची तनुयात्रा धन्यतम ॥ १२ ॥ कुरंगनयना कुरंगींप्रति ॥ ऐशा पुसोनि पुढें जाती ॥ फळल्या फळपुष्पीं द्रुमयाति ॥ वित्तर्क करिती त्यां पाहतां ॥ १३ ॥

---

१ हरिणस्त्रिया. २ फिकट. ३ सुंदर माळा धारण करणारा. ४ तांबडा. ५ कल्पून. ६ उपजीविकचा उद्योग.

बाहुंप्रियांसउपधायगृहीतपद्मोरामानुजस्तुलसिकालिकुलैर्मदांधैः ॥
अन्वीयमानइहवस्तरवःप्रणामंकिंवाऽभिनंदतिचरन्प्रणयावलोकैः ॥ १२ ॥

॥ टीका ॥ सफळ तरु हो सभाग्य तुह्मी ॥ बनीं देखोनि आमुचा स्वामी ॥ विनीत त्याचिये पादपद्मीं ॥ अर्चाधर्मीं अनुसरला ॥१४ ॥ श्रेष्ठ आलिया सदनाप्रति ॥ गृहस्थ पूजिती यथासंपत्ति ॥ कीं उपायनें[1] घेऊनि हातीं ॥ नृपा वंदिती जेंवि प्रजा ॥१५॥ तेंवि आपुल्या पुष्पीं फळीं ॥ समीप येतांचि श्रीवनमाळी ॥ पूजा अर्पिली चरणकमळीं ॥ सुकृतबहळीं सज्जन हो ॥ १६ ॥ तो बळरामाचा धाकुटा बंधु ॥ मदनमोहन लावण्यसिंधु ॥ रतिरहस्यें लावूनि वेधू ॥ गेला व्रजवधू वधूनियां ॥१७॥ वधिल्या बरवें एक्या घायीं ॥ आह्मां नवधूनि वधिलें पाहीं ॥ प्राण असतांही विह्वळ देहीं ॥ हरिली सर्वही मनबुद्धि ॥ १८ ॥ बाहु ठेवूनि वनितास्कंधीं ॥ पद्मधारक कौशल्योदधि[2] ॥ मधुप वेधले तुळसीगंधीं ॥ तिहीं मदांधीं अनुयायी ॥ १९ ॥ सुगंधतुळसीमाळा गळां ॥ गंधासक्त भ्रमरमेळा ॥ तयां मदांधां अळिउळां ॥ समान काळा अनुयायी ॥२०॥ तुळशीगंधासक्त भ्रमर ॥ जैसे मदांध विवशतर[3] ॥ कामिनीकंठीं घालूनि कर ॥ उभय परंतत्र अनुगामी[4] ॥२१॥ मधुपां अनुलक्ष्यें मधुपति ॥ उभयतां समानशील पथीं ॥ येतां देखोनि बिनयभक्ति ॥ तुह्मी श्रीपति पूजिला ॥२२ ॥ पुष्पफळोत्करेंशीं मौळी ॥ तुह्मी ठेवितां चरणकमळीं ॥ कृष्णकृपेच्या न्याहाळीं ॥ सुखसुकाळीं डुल्लतसां ॥ २३ ॥ ऐसा वनितास्कंधासक्त ॥ पद्मधारक श्रीअच्युत ॥ द्रुम हो सांगा कोठें स्थित ॥ देह संतप्त त्यासाठीं ॥ २४ ॥ ऐशा प्रार्थू-

---

१ नजराणा. २ चातुर्याचा समुद्र. ३ अतिशयपराधीन. ४ अनुयायी.

नि वृक्षांप्रति ॥ कृष्णपदवी अनुलक्षिती ॥ तंव लतावेष्टित वनस्पति ॥ देखोनि बोलती तें ऐका ॥ २५ ॥

पृच्छतेमालताबाहूनप्याश्लिष्टावनस्पतेः ॥ नूनंतत्करजस्पृष्टाबिभ्रत्युत्पुलकान्यहो ॥ १३ ॥

॥ टीका ॥ तंव कोणी एका बल्लवी ह्मणती ॥ ऐका सखिया हो समस्ती ॥ सम्मुख लता ज्या या दिसती ॥ श्रीकृष्णसंगति यां घडली ॥ २६ ॥ बहुतेक कृष्ण स्पर्शला यांसी ॥ ह्मणोनि सानंदा मानसीं ॥ यास्तव कृष्ण यांचपाशीं ॥ निश्चयेंशीं हुडकावा ॥ २७ ॥ आह्मी दुर्भगा विरहाकुळा ॥ लता सौभाग्यें सुकृतबहळा ॥ कांतसंगतिसुखसोहळा ॥ प्रेमें गोपाळा भोगिती ॥ २८ ॥ पति सन्निध असतां आह्मां ॥ पाहणें दुर्घट मेघश्यामा ॥ द्रुमालिंगनीं लतांचा प्रेमा ॥ हरिसंगमा अनुकूल ॥ २९ ॥ पति लतांचे तरुवर ॥ त्यांचे बाहु शाखाभार ॥ त्यांसि वेष्टूनि लतांकुर ॥ प्रेमें श्रीधर कवळिती ॥ ३० ॥ कृष्णा क्षेम देती लता ॥ तेणें डोलती उभयता ॥ क्षोभ नुपजे पतींच्या चित्ता ॥ सभाग्यता हे यांची ॥ ३१ ॥ ह्मणाल कृष्ण यां भेटला ॥ कैंवि तुह्मांसि जाणूं आला ॥ जिहीं चिह्नीं वोळखिला ॥ त्या चिह्नांला परियेसा ॥ ३२ ॥ कृष्ण नखें आमुचे कुच ॥ स्पर्शतां जेंवि येती रोमांच ॥ तेंवि उत्पुलकिता लता सत्वचं ॥ दिसती साच सानुरागा॥३३॥आपुलाल्या पतिसन्निधि ॥दुर्लभ क्रीडतां हे सुखवृद्धि ॥ यालागिं श्रीकृष्ण अमृतोदधि ॥ यांहीं त्रिशुद्धि भोगिला ॥ ३४ ॥ अहो ऐसा करूनि खेद ॥ ह्मणती केवढें भाग्य मंद ॥ कृष्णीं रमतां नवटे मोद ॥ द्रुमांसमान पशुपांसी ॥ ३५ ॥ शुक ह्मणे गा परीक्षिति ॥ कथिली गोपींची उन्मत्तवृत्ति ॥ आतां वस्तुसामर्थ्य शक्ति ॥ तनुविस्मृतितादात्म्यें ॥ ३६ ॥ आंगींची विसरल्या

---

१ कृष्णाचा मार्ग. २ वृक्ष. ३ दुर्दैवी. ४ विशेष पुण्यशील. ५ आलिंगन. ६ रोमांचित. ७ त्वचायुक्त.

कामिनीपणें ॥ कृष्णस्मृतीचें लेइल्या लेणें ॥ कृष्णाविर्भावें बोलणें ॥ कृताचरणें अवधारा ॥ ३७ ॥

इत्युन्मत्तवचोगोप्यःकृष्णान्वेषणकातराः ॥ लीलाभगवतस्तास्ताह्यनुचक्रुःस्तदात्मिकाः ॥ १४ ॥

॥ टीका ॥ कृष्णान्वेषणाचे चाडे ॥ सप्रेमवेधें मानस वेडें ॥ होऊनि उन्मत्ता पडिपाडें ॥ पुसती पुढें भेटलिया ॥ ३८ ॥ वृक्षवल्ली लताद्रुमा ॥ पुष्पपादपा गुल्मा रामा ॥ मृगमानिनी वल्लरीयुग्मा ॥ मेघश्यामा त्या पुसती ॥ ३९ ॥ एवं उन्मत्ताचिये परी ॥ स्थिरजंगमां पुसतां हरि ॥ तादात्म्यवेधाचिये भरीं ॥ कृष्णानुकारीं बरळती ॥ ४० ॥ जन्मादारभ्य ज्या ज्या लीला ॥ कृष्ण होऊन त्या त्या सकळा ॥ स्वयें अनुकरती वेल्हाळा ॥ त्या तूं नृपाळा अवधारीं ॥ ४१ ॥ चौं श्लोकीं तें अनुकरण ॥ कीजेल शुकोक्तिविवरण ॥ पुढें चौं श्लोकीं व्याख्यान ॥ कथिजेल पूर्ण तन्मयता ॥ ४२ ॥ पुढती अनुकारचेष्टाकथन ॥ एका श्लोकें अनुकरून ॥ पुढें भूमीं उमटले चरण ॥ बरळती लक्षून व्रजललना ॥ ४३ ॥

कस्याश्चित्पूतनायंत्याःकृष्णायंत्यपिबत्स्तनम् ॥ तोकायित्वारुदत्यन्यापदाऽहन्शकटायतीम् ॥ १५ ॥

॥ टीका ॥ असो त्यांमाजि अनुकार आतां ॥ प्रथम परिसें धरित्रीकांता ॥ पूतनारूपें बल्लववनिता ॥ कोण्ही एकी अवगल्या ॥ ४४ ॥ कृष्णरूपें अवगल्या एकी ॥ मौनें निद्रिता मंचकीं ॥ पूतनारूपिणी येऊनि तवेकीं ॥ उचलूनि चूचुकीं लाविती ॥४५॥ प्राणासगट प्याला स्तन ॥ ह्मणूनि अनुकरती क्रंदून॥ पसरूनियां क-

---

१ शरीरांत होणारा कृष्णसंचार. २ कृष्णाचा शोध. ३ सदृश. ४ पुष्पवृक्ष. ५ झुडपें. ६ सुंदरी. ७ तन्मयता अर्थात् कृष्णमयता. ८ भासल्या. ९ आवेशानें.

रपदवदन ॥ गतप्राण ह्मणविती ॥४६॥ एकी बाळकरूपें रुदना ॥ करूनि झाडिती कोमळ चरणां ॥ एकी शकटाकार पतना॥ तन्निघातें पावती ॥ ४७ ॥

दैत्यायित्वाजहारान्यामेकाकृष्णार्भभावनाम् ॥ रिंगयामासकाप्यंघ्रिकर्षंतीघोषनिःस्वनैः ॥ १६ ॥

॥ टीका ॥ एकी गोपी नंदकुमर–॥ रूपें होती क्रीडापर ॥ एकी चक्रवाताकार ॥ गगनीं सत्वर उडविती ॥ ४८ ॥ गुरुतर सलंब कंठीं कृष्ण ॥ होऊनि उत्पतनीं असहिष्ण[2] ॥ तेणें होऊनि गतप्राण॥ अधःपतन अनुकरती ॥ ४९ एकी कृष्णत्वें बाळभावें ॥ रिंगणाकार[3] घेती धांवे ॥ चपळ जानुघर्षणा सवें ॥ रशना[4]नूपुरें गर्जती ॥५०॥ घंटा किंकिणी वांकी वाळे ॥ गर्जतां छंदें चपळ चौताळे ॥ ऐसे कृष्णाचे बाळलीले॥ प्रज्ञाबळें अनुकरती॥५१॥ चपळ पळतां जानुघर्षणीं ॥ एकी सवेग कटिकर्षणीं ॥ वोढूनि घेती आकर्षूनी ॥ जाती पळोनि चपळांगी॥५२॥

कृष्णरामायितेद्वेतुगोपायंत्यश्चकाश्चन ॥ वत्सायतींहंतिचान्यातत्रैकातुबकायतीम् ॥ १७ ॥

॥ टीका ॥ एकी कृष्णाचे अनुकार ॥ दावूनि ह्मणवी नंदकिशोर ॥ एकी ह्मणवी रोहिणीकुमर॥ रामानुकार दावुनी ॥५३॥ कित्तेकी जालिया संवगडे ॥ भोंवते कृष्णा मागें पुढें ॥ एकी वत्सासुराचेनि पाडें॥ कैतवक्रीडे अनुकरती ॥ ५४ ॥ वत्सासुराचा केला वध ॥ तैसे अनुकार दाविती विशद ॥ एकी बकाकार प्रसिद्ध ॥ तैशाच तद्वध अनुकरती ॥ ५५ ॥

---

१ उडण्यास. २ असमर्थ. ३ मंडलाकार. ४ कमरपट्टा. ५ घागऱ्या. ६ कपटाचा खेळ.

आहूयदूरगायद्वत्कृष्णस्तमनुकुर्वतीम् ॥ वेणुंक्वणंतींक्रीडंतीमन्याःशंसंतिसाध्विति ॥ १८ ॥

॥ टीका ॥ धेनुरूपें दूरतरा ॥ एकी अवगती व्रजसुंदरा ॥ एकी वाहोनि वेणुस्वरा ॥ घालिती कुकारा कृष्णत्वें ॥ ५६ ॥ कृष्णवेणूचिया क्वणिता ॥ दूरस्थ धेनु तृणासक्ता ॥ ऐकोनि धांवती जेंवि त्वरिता ॥ तद्वत वनिता अनुकरती ॥ ५७ ॥ सप्तस्वरांचिया भंगी ॥ वेणुक्वणितें विविधा रंगीं ॥ दाविती कृष्णाचिया मार्गीं ॥ अन्या चांगीं प्रशंसिती ॥५८॥ तालबद्ध मानउत्तरें॥तेथ सुष्ठुत्व आविष्कारें॥धन्य भला या उत्तरें॥चमत्कारें शंसिती ५९

कस्यांचित्स्वभुजंन्यस्यचलंत्याहापराननु ॥ कृष्णोऽहंपश्यतगतिंललितामितितन्मनाः ॥ १९ ॥

॥ टीका ॥ भूषामंडित बाहु खांदा ॥ ठेवूनि ऐकीच्या एक प्रमदा ॥ कृष्णावबोधें वदती शब्दा ॥ विन्यासभेदावुनी ॥ ६० ॥ पहा गे व्रजींच्या समस्त युवति ॥ स्वयें कृष्ण मी माझी गति ॥ नयेचि मयूरां हंसांप्रति ॥ लाजोनि ठाती गजगमना ॥ ६१ ॥ ह्मणोनि डोलविती सुंदर आंगें ॥ ललित पाउलें ठेविती चांगें ॥ अमंद ना मंद वेगें ॥ गमनें सुभगें शोभविती ॥ ६२ ॥ जेंवि शिल्पिकाचिये मती– ॥ माजि अवतरे अव्यक्त मूर्ति ॥ तो जेंवि आणूनि दावी व्यक्ति ॥ नाना आकृति लेख्यादि[1] ॥ ६३ ॥ नाना अध्वर्यूंची प्रज्ञा ॥ तादात्म्ययोगें कवळी यज्ञा ॥ किंवा सांख्य समष्टि[2]भाना ॥ व्यतिरेकान्वयपूर्वक ॥ ६४ ॥ कीं ध्याननिष्ठांचें मानस ॥ क्षीराब्धि श्वेतद्वीप अशेष ॥ गुणोपकरणें भूषा वेष ॥ पावे अभ्यासतादात्म्यें ॥ ६५ ॥ तैशा तन्मना व्रजांगना ॥ कृष्ण होऊनि ललितगमना ॥ चालोनि दाविती तें तव मना ॥ कुरुभूषणा कळलें कीं ॥ ६६ ॥

---

[1] चित्रादि, [2] एकवस्तु--व्यष्टि,वस्तुसमूह—समष्टि.

माभैष्टवातवर्षाभ्यांतत्त्राणंविहितंमया ॥ इत्युक्त्वैकेनहस्तेनयतंत्युन्निदधेंऽबरम् ॥ २० ॥

॥ टीका ॥ तंव एकी ह्मणे बल्लववनिता ॥ भेऊं नका हो वृष्टिवाता ॥ मी तयांच्या निवारणार्था ॥ आलों तत्वता गिरिधर ॥६७॥ निर्भय स्थान म्यां निर्मिलें ॥ तुह्मीं पाहिजे आश्रयिलें ॥ ऐसें ह्मणोनि उचलिलें॥ पाठी वस्त्र गिरिभावें ॥ ६८ यत्नपूर्वक सत्वर ॥ दावूनि गोवर्द्धनानुकार ॥ लावूनियां एक कर ॥ उत्तरीयांबर उचलिलें॥६९॥

आरुह्यैकापदाक्रम्यशिरस्याहापरांनृप ॥ दुष्टाहेगच्छजातोऽहंखलानांननुदंडधृक् ॥ २१ ॥

॥ टीका ॥ तंव कालियमथनानुकारा ॥ दावूनि बोले एकी दारा ॥ एक्या पायें दडपूनि शिरा ॥ करें पुंसारा धरूनियां ॥ ७० ॥ ह्मणे रे दुष्टा कालिय फणी ॥ रमणकद्वीपा जाय येथुनी ॥ जन्मलों मी चक्रपाणि ॥ खळनिग्रहणीं जाणावें ॥ ७१ ॥ ऐशी अपरांगने प्रति ॥ दावूनि कालियमथनानुकृति ॥ तेथ आणिकां गोपींप्रति ॥ जाली वदती पैं एकी ॥ ७२ ॥

तत्रैकोवाचहेगोपादावाग्निंपश्यतोल्बणम् ॥ चक्षुंष्याश्वपिदध्वंवोविधास्येक्षेममंजसा ॥ २२ ॥

॥ टीका ॥ अरे गोप हो हा दावाग्नि ॥ महाउल्बण पेटला वनीं ॥ तुह्मीं माजिये आज्ञे करूनी ॥ सवेग लोचनें झांकावीं ॥ ७३ ॥ तुमचें करीन मी रक्षण ॥ ह्मणोनि अनुकरती दावाग्निपान ॥ तंव एकी दामोदर होऊन ॥ उलूखललबंधन अनुकरे ॥ ७४ ॥

---

१ शेंपूट. २ दुष्टांचे शासनार्थ. ३ प्रचंड. ४ उखळास बांधणें.

बद्धाऽन्ययास्रजाकाचित्तन्वीतत्रउलूखले ॥ भीतासुदृक्पिधायास्यंभेजेभीतिविडंबनम् ॥ २३ ॥

॥ टीका ॥ एकी भावूनि दामोदरा ॥ अन्या यशोदा सुंदरा॥ अवगोनि होय शासनपरा ॥ त्या अनुकारा परियेसा ॥ ७५ ॥ स्वयें प्रवर्ते दधिमंथनीं ॥ येरी कृष्णत्वें लागे स्तनीं ॥ दुग्ध उततां देखोनि नयनीं ॥ धांवे टाकोनि अतृप्त ॥ ७६ ॥ कृष्ण मंथनभाण्ड फोडी ॥ सवेंचि धांवोनि शिंकीं तोडी ॥ यशोदा धरूं धांवे तांतडी ॥ लवडसवडी येरु पळे ॥ ७७ ॥ पुष्पमाळेनें नंददारा ॥ उखळीं बांधी दामोदरा ॥ ऐसिया दाविती अनुकारा ॥ भयविकारा प्रकटिती ॥ ७८ ॥ पळतां यशोदा धरिला हरि ॥ तेणें भयभीत अंतरीं ॥ दोन्ही हात लावूनि वक्रीं ॥ पाहे नेत्रीं भयाकुळ ॥ ७९ ॥ झणें यशोदा शिंपुटी मारी ॥ यास्तव वामकर आड धरी ॥ ऐसिया भयाच्या अनुकारीं ॥ बल्लवनारी अनुकरती ॥ ८० ॥

एवंकृष्णंपृच्छमानावृंदावनलतास्तरून् ॥ व्यचक्षतवनोद्देशेपदानिपरमात्मनः ॥ २४ ॥

॥ टीका ॥ ऐसिया कृष्णगवेषणीं ॥ फिरत फिरतां वनोपवनीं ॥ पुन्हा पातल्या वृंदावनीं ॥ यदृच्छे[3] करूनि भ्रमभरिता ॥८१॥ वृंदावनींच्या नालतिका ॥ जाती मल्लिका मालतिका ॥ कुंद मोगरे सेवंतिका ॥ लवंगवल्लिका शतंपत्री ॥८२॥ पाठा त्रायंती वैकंकती ॥ शंखिनी हिरण्या गरुत्मती ॥ गजकर्णिका क्षौद्रा यूंथी ॥ मधुमालती डिंडिका ॥८३॥ ऐशा अनेक वल्लीलता ॥ गुल्मप्रमुख जाति बहुता ॥ त्यांसि पुसती मन्मथजनिता ॥ विरहभ्रांता व्रजललना ॥ ८४ ॥ नाग पुन्नाग अर्जुन ॥ चंदन चंपक रातांजन ॥ नीप करंज राजादन ॥ कुंजराशन न्यग्रोध

---

१ जाणून. २ शोधांत. ३ स्वेच्छेनें. ४ कमळवल्ली. ५ पहाडमूळ. ६ वनस्पति वि० ७ बेहकळीचें झाड. ८ साखरवेल, १० जुईचें झाड, ११ पिंपळ,

भा. द. ॥ ८५ ॥ देवदार कोविदार ॥ चूत पारियातक मंदार ॥ पनस पलाश पारिभद्र ॥ बीजपूर ह्लक्षादि ॥८६॥ ऐशा टी. अ.
अनेक तरुवर लता॥ पुढें भेटती वनीं फिरतां ॥ त्यांतें पुसती स्मरमोहिता ॥ प्रमुदित वार्ता कृष्णाची ॥८७॥
॥ ९ ॥ भूमीशीं उमटलीं पाउलें ॥ भाग्यें दुर्लभ दर्शन झालें ॥ तेथेंचि त्यांचें मन गुंतलें॥ तेंही विवरिलें तें ऐका॥८८॥ ॥ ३० ॥

पदानिव्यक्तमेतानिनंदसूनोर्महात्मनः ॥ लक्ष्यंतेहिध्वजांभोजवज्रांकुशयवादिभिः ॥ २५ ॥

॥ टीका ॥ महांत जे कां ब्रह्मादिक ॥ त्यांहूनि महत्त्वें अधिक॥ तो महात्मा नंदतोक ॥ त्याचे पदांक हे व्यक्त
॥ ९० ॥ ध्वजाब्जयवांकुश देखिले ॥ ऊर्ध्व रेखा वज्राथिले ॥ इत्यादिचिह्नीं उपलक्षिले ॥ व्यक्त पाउलें
कृष्णाचीं ॥ ९१ ॥ तेचि घेवोनि कृष्णपदवी ॥ गोपी विरहिणी आर्तभावीं ॥ त्यांची जिज्ञासा आघवी ॥ व्यक्त
परिसावी चतुरांहीं ॥ ९२ ॥

तैस्तैःपदैस्तत्पदवीमन्विच्छंत्योऽग्रतोबलाः ॥ वध्वाःपदैःसुपृक्तानिविलोक्यार्ताःसमब्रुवन् ॥ २६ ॥

॥ टीका ॥ ऐशीं कृष्णपदें विविक्तें॥ध्वजांकुशादिसुचिह्नितें ॥ तिहीं करूनि तत्पदवीतें ॥ गिंवसीत चालती पुढें
पुढें ॥ ९३ ॥ तंव अकस्मात कृष्णपदां ॥ माजि वधूचीं पाउलें प्रमदा ॥ देखूनि झालिया मन्मथक्षुब्धा ॥
करिती अनुवादा ते काळीं ॥ ९४ ॥ कृष्णवियोगें विरहग्रस्ता ॥ सापत्नभावें विशेष आर्त्ता ॥ होऊनि करिती ॥ ९ ॥
वितर्कवार्ता ॥ श्रवण श्रोतां तें कीजे ॥ ९६ ॥

---

१ कांचन, २ पारंग्यांचें झाड, ३ निंब, ४ महाळुंग, ५ जाणण्याची इच्छा, ६ स्पष्ट, ७ शोधीत,

कस्याःपदानिचैतानियातायानंदसूनुना ॥ अंसन्यस्तप्रकोष्ठायाःकरेणोःकरिणायथा ॥ २७ ॥

॥ टीका ॥ कोणे स्त्रियेचीं इयें पाउलें ॥ भूषाचिह्नित दशांगुळें ॥ कृष्णें नेली जातिये वेळे ॥ कीं जिचें आगळें वाल्लभ ॥ ९६ ॥ श्रीकृष्णाचे स्कंधदेशीं ॥ स्थापूनि बाहुप्रकोष्ठासी[1] ॥ हस्तिनी जैसी मदगजासी ॥ स्कंधीं शुंडा स्थापूनी ॥ ९७ ॥ अंसन्यस्तबाहु[2] तैशी ॥ श्रीकृष्णाच्या पदविन्यासीं ॥ मिश्रपावलीं चाले सरिशी ॥ गति गमकेशी[3] गजगमना ॥ ९८ ॥ आह्मी केतकीकंटकपत्रा ॥ समान झालों क्लेशपात्रा ॥ कृष्णभ्रमरें भोगिलें गात्रा ॥ पुष्पमात्रा सम तीच्या ॥ ९९ ॥ तस्मात तीच्या सुकृतराशि ॥ समता न करवे निर्जरांशीं ॥ ह्मणूनि प्रियतम श्रीधराशीं ॥ कीं त्यासरिशी विहरतसे ॥ २०० ॥

अनयाऽऽराधितोनूनंभगवान्हरिरीश्वरः ॥ यन्नोविहायगोविंदःप्रीतोयामनयद्रहः ॥ २८ ॥

॥ टीका ॥ राधा ह्मणिजे हे त्रिशुद्धि ॥ कृष्णाराधनाची संसिद्धि ॥ मूर्त्तिमंत हे यथाविधि ॥ भोगी गुणनिधि हरिप्रेमें ॥ १ ॥ राध साध हे दोन्ही धातु ॥ संसिद्धी विषयीं व्याकरणप्रणीत ॥ राधो ऐसा प्रवर्तत ॥ हिंसाविषयीं धात्वर्थ ॥ २ ॥ तस्मात्संसिद्धिरूपराधा ॥ भगवत्प्रेमाकार जे मुग्धा ॥ यास्तव बाहु ठेवूनि खांदा ॥ श्री गोविंदासवें विचरे ॥ ३ ॥ परम निश्चयेंशीं इणें ॥ संतोष केला हरि कारणें ॥ करूनि तीव्रें अनुष्ठानें ॥ व्रताचरणें तपश्चर्या ॥ ४ ॥ जो कां ईश्वराचा ईश्वर ॥ पूर्णब्रह्म सर्वेश्वर ॥ आराधिला तो मुरलीधर ॥ भजनीं तत्पर होउनी ॥ ५ ॥ यास्तव सांडूनि अवघ्या जणी ॥ आह्मी अतपस्का[4] विरहिणी ॥ इशींच नेतो चक्रपाणि ॥ एकांतस्थानीं प्रियभावें ॥ ६

---

१ कोपराच्या, खालचा भाग. २ खांद्यावर जिनें हात ठेविला ती. ३ गमक ह्म० दृष्टांत होण्यासारखी. ४ तपस्या नकेलेल्या ज्यांनीं त्या.

भा. द. धन्याअहोअमीआल्योगोविंदांघ्र्यब्जरेणवः ॥ यान्ब्रह्मेशौरमादेवीदधुर्मूर्ध्न्यघनुत्तये ॥ २९ ॥ टी. अ.

॥१०॥ ॥ टीका ॥ ऐका सख्या हो एकी ह्मणती ॥ परमाश्चर्य मानूनि चित्तीं ॥ कृष्णांघ्रिकमळस्पर्शें माती ॥
धन्य त्रिजगतीं आह्मांहुनी ॥ ७ ॥ गोविंदपादाब्जरेणु धन्य ॥ कमलाकमलोद्भव[1] ईशान ॥ कृष्णप्राप्ति अभि- ॥३०॥
वांछून ॥ ज्यातें धरिती निजमौळीं ॥ ८ ॥ रजतमादि अघ[2]निवृत्ति ॥ नहोतां दुर्लभ भगवत्प्राप्ति ॥ यालागीं
हरिपदकमळींची माती ॥ मुकुटीं धरिती अघशमना ॥ ९ ॥ धन्य हे गोविंदपदाब्जरेणु ॥ ज्यांतें रमादि
ब्रह्मेशानु ॥ अघनाशार्थ मुकुटीं धरून ॥ आनंदती हृत्कमळीं ॥ १० ॥ चरणसेवनाचेंनि मिसें ॥ रमेसि
लाभलें भाग्यविशेषें ॥ त्रिभुवन मोजितां पदविन्यासें ॥ दैवें विखनसें[3] पूजिलें ॥११॥ तेंचि गोविंदपादोद्भवा[4] ॥
त्रिजगत्पावनीं अगाधविभवा ॥ स्वयंभ मुकुटीं धरितां भवा[5] ॥ पदरजठेवा लाधला ॥ १२ ॥ विधिहरकमले
अलभ्यप्राप्ति ॥ तेथ इतरांचा केवा[6] किती ॥ अहो आश्चर्य दैवगति ॥ आह्मां संप्राप्ति हरिपद तें ॥१३॥ अनेक
सुकृतें वैकुंठ ॥ नटके करितां तपादि कष्ट ॥ भाग्यें जोडल्या गरुडपृष्ठ[7] ॥ मग होय प्रविष्ट अक्षेशें ॥१४॥ तेंवि
हे श्रीकृष्णपदाब्जरेणु ॥ आह्मां जोडले भाग्यें करून ॥ यांच्या अभिषेकें जनार्दन ॥ विधिहरां समान पावों गे ॥
॥ १५ ॥ हरिप्राप्तीचें द्वार मुख्य ॥ हरिपदधूळीचा अभिषेक ॥ येणें श्रीकृष्णाचें ऐक्य ॥ घडतां अशक्य
नमनावें ॥ १६ ॥ ऐसा ऐकोनि निर्धार ॥ पदाब्जरेणुवंदनपर ॥ होतां आणिकी गोपी क्रूर ॥ वदल्या उत्तर ॥१०॥
तें ऐका ॥ १७ ॥

---

१ ब्रह्मदेव. २ पापनिवारण. ३ ब्रह्मदेवानें. ४ भागीरथी. ५ शंकराला. ६ पाड. ७ कृष्ण.

तस्याअमूनिनःक्षोभंकुर्वंत्युच्चैःपदानियत् ॥ यैकापहृत्यगोपीनांरहोभुंक्तेऽच्युताधरम् ॥ ३० ॥

॥ टीका ॥ कृष्णपदाब्जधूळि मौळीं ॥ वंदिती विरंचिरमांशूळी ॥ आह्मांसि सुलभ ते ये काळीं ॥ ह्मणोनि भूतळीं न्यहाळिती ॥१८॥ तंव ते लागिं नीचीं इयें पदें ॥ कृष्णपदाब्जांमाजि विशदें ॥ पाहतां आमुचें हृदय खेदें ॥ विरहविषादें झडपिलें ॥१९॥ पाहतां श्रीकृष्णपदाब्जरेणु ॥ तंव त्यांमाजि मिश्रित तीचे चरण ॥ देखतां क्षोभाचें कारण ॥ काय ह्मणोन तें ऐका ॥ २० ॥ आह्मां समस्तां गोपिकांचा ॥ जीवनकंद जो कां साचा ॥ तो अधरोष्ठ अच्युताचा ॥ एकली एकांतीं ते प्राशी ॥ २१ ॥ समस्त गोपींचें जीवन ॥ श्रीकृष्णाचें अधरपान ॥ एकली एकांतीं नेऊन ॥ भोगी सँपूर्ण स्वच्छंदें ॥ २२ ॥ कृष्णांघ्रिमाजि तिचीं पदें ॥ आमुचे दृष्टी पडतां विशदें ॥ चित्तें क्षोभविती विरहविषादें ॥ दुःख नुसधें वाढविती ॥ २३ ॥ कृष्णचरणकमळींचे रेणु ॥ वंदिती रमा विरंचि ईशान ॥ आह्मां आनंद तो नफँवोन ॥ दुःख दारुण सापल्यें ॥ ३४ ॥ यालागीं तिचीं पदें नसती ॥ ऐसिया कृष्णपदाची प्राप्ति ॥ लाहों तैं ते वंदों माती ॥ सुखविश्रांती कारणें ॥२५॥ ऐसा सापल्यवितर्के ॥ करूनि अमिश्र हरिपदांक ॥ हुडकिती तो भावार्थ अचुक ॥ वदला शुक तीं श्लोकीं ॥ २६ ॥ ॥

नलक्ष्यंतेपदान्यत्रतस्यानूनंतृणांकुरैः ॥ खिद्यत्सुजातांघ्रितलामुन्निन्येप्रेयसींप्रियः ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ ऐशीं कृष्णपदें केवळ ॥ गोपी हुडकिती विरहाकुळ ॥ तंव ध्वजांकुशादि वज्रमेळ ॥ चिह्नित कोमळ हरिचरण ॥ २७ ॥ प्रमदाचरणचिह्नांरहित ॥ श्रीकृष्णाचीं पदें व्यक्त ॥ देखोनि गोपी हृदया आंत ॥

---

१ ब्रह्मदेव, लक्ष्मी व शंकर, २ लहान, ३ नसांपडून,

वितर्क करिती तें ऐका ॥ २८ ॥ अहो या कृष्णाचीं पाउलें ॥ ध्वजांकुशीं उपलक्षिलें[1] ॥ प्रमदापदारहित भलें ॥
भाग्यें जोडलें वंदूं या ॥२९॥ तंव एक ह्मणती ते काय झाली ॥ जे कृष्णाचा अधर प्याली ॥ वनीं असती जरी
टाकिली ॥ तरी आह्मां भेटली नवचती ॥३०॥ तीचीं सुकुमार चरणकमळें ॥ तृणांकुरीं सखेदबहळें ॥ जाणोनि
कारुण्यें गोपाळें ॥ स्कंधदेशीं ते धरिली ॥३१ ॥ झणें तिचिया चरणारविंदा ॥ तीक्ष्णतृणांकुर करिती भेदा ॥
ह्मणोनि खांदा वाहिली प्रमदा ॥ परम मुकुंदा प्रियतम जे ॥ ३२ ॥ ऐसा ललनेचा लंपट ॥ करूनि सर्वांसि
दृष्टिकपट ॥ जिणें भुलविला पीतपट ॥ पाडूनि विपट[2] आह्मांशीं ॥ ३३ ॥ कडे खांदां वाहे मुग्धा ॥ तेचि प्रियतम गोविंदा ॥ वृथा अवघ्या आह्मी प्रमदा ॥ विरहखेदा वरपडलों[3] ॥ ३४ ॥

इमान्यधिकमग्नानिपदानिवहतोवधूम् ॥ गोप्यःपश्यतकृष्णस्यभराक्रांतस्यकामिनः ॥ ३२ ॥

॥ टीका ॥ एक ह्मणती खरें गे खरें ॥ पदें कृष्णाचीं परम सुभरें[4] ॥ खांदां वाहिली तिचेनि भारें ॥ भूमी
निष्ठुरें रुतलीं गे ॥ ३५ ॥ कामासक्त पहा गे हरि ॥ कडे घेऊनि प्रियसुंदरी ॥ चाले त्याच्या पाउलांवरी ॥
आह्मीं निर्धारीं तर्किलें ॥ ३६ ॥

अत्रावरोपिताकांतापुष्पहेतोर्महात्मना ॥ अत्रप्रसूनावचयःप्रियाऽर्थेप्रेयसाकृतः ॥
प्रपदाक्रमणेएतेपश्यतासकलेपदे ॥ ३३ ॥

॥ टीका ॥ तंव एकी ह्मणती पहा गे येथें ॥ देखोनि सुपुष्पिता वल्लीतें ॥ पुष्पासाठीं वल्लभेतें ॥ भूमीवरतें

---

[1] पाहिलीं, व अनेकवचनाबद्दल एकवचन हें कवीचें निरंकुशत्व. [2] वांकडें. [3] प्रविष्ट झालों. [4] अधिक भारें.

उतरिलें ॥ ३७ ॥ आत्मा ह्मणिजे ज्याचा काय ॥ विराटरूपी[1] ब्रह्मांडमय ॥ ऐसे ब्रह्मांडसमुच्चय ॥ परमाणुप्राय रोमकूपीं[2] ॥ ३८ ॥ कीं मानवीनाट्यें नंदसूनु ॥ जो गोपाकृति गोमटी तनु ॥ तेही वंदिती ब्रह्मेशानु ॥ आत्मा महान् यास्तव ही ॥ ३९ ॥ अथवा आत्मा ह्मणिजे मन ॥ सत्यसंकल्पा अधिष्ठान ॥ प्रकृतिपुरुषां जन्मस्थान ॥ तो श्रीभगवान महात्मा ॥ ४० ॥ येवढें महत्त्व विसरोनि येणें ॥ कान्तेअधीन कां वो होणें ॥ तिचें मानस संरक्षणें ॥ छंदें वर्त्तणें तयेच्या ॥ ४१ ॥ लता देखोन बहळपुष्पा ॥ सुमनीं भरावया सुंदर खोंपा[3] ॥ झोंबतां वल्लरी कां पादपां ॥ नाहीं त्रपा[4] या आली ॥ ४२ ॥ स्त्रियेचें प्रेम रक्षावया ॥ येथ वेंचिलें कुसुमनिचया[5] ॥ भूमीं प्रपद[6] रोवूनियां ॥ पुष्पफांदिया वोढिल्या ॥ ४३ ॥ पहा गे येथ चवड्या वरी ॥ टांचा नलवितां धरित्री वरी ॥ उभा ठाकूनि श्रीमुरारि ॥ झोंबे तरुवरीं सुमनार्थ ॥ ४४ ॥ श्रमूनि प्रसूनें[7] वेंचिलीं ॥ तिहीं प्रियेची वोटी भरिली ॥ आंगीं झाडें वोरबडलीं ॥ तत्प्रेमभुली तें नगणी ॥४५॥ कमलकोमलपाणिकमळें ॥ तळवा मर्दितां शंका कमळे[8] ॥ कुंकुमाक्तें कुचकुड्मलें ॥ परममृदुलें मर्दितसे ॥ ४६ ॥ ज्याची कोमळ अंगयष्टि ॥ निबर न्यहारें रुपती दृष्टि ॥ तो येथ ललनालंपट कष्टी ॥ झोंबे काष्ठीं सुमनार्थ ॥ ४८ ॥ नेणे पीतांबर फाटला ॥ नह्मणे कंठींचा कौस्तुभ तुटला ॥ चरणीं कंटकही नेहटला ॥ प्रेमें भुलला नविचारी ॥ ४८ ॥ धन्यधन्य ते सुंदरी ॥ जिणें प्रेमें भुलविला हरि ॥ आह्मी वृथा विरहातुरी ॥ भ्रमों कांतारीं निशिगर्भीं ॥ ४९ ॥ ऐशा वदती विरहाकुला ॥ पुढें कांतारीं रिघती अबला ॥ तंव कांहीं कौतुक देखोनि डोळां ॥ मिनल्या सकळा ते ठायीं ॥५०॥

---

१ जगत्स्वरूपी. २ शरीरावरील केशांचें उत्पत्तिस्थान. ३ बुचडा. ४ लज्जा. ५ पुष्पांचा समुदाय. ६ पायाचें अग्र. ७ पुष्पें. ८ लक्ष्मीला. ९ दृष्टीनें.

केशप्रसाधनंत्वत्रकामिन्याःकामिनाकृतम् ॥ तानिच्चूडयताकांतामुपविष्टमिहध्रुवम् ॥ ३४ ॥

॥ टीका ॥ उभयभागीं कृष्णपदें ॥ सामुद्रिकें मंडित विशदें ॥ प्रमदापाउलें तयांमध्यें ॥ जोडलीं दिसती भूभागीं ॥ ५१ ॥ तियें दावूनि परस्परीं ॥ एकीमेकींतें ह्मणती नारी ॥ पहा गे येथें बैसोनि हरि ॥ माथा विंचरी प्रियेचा ॥ ५२ ॥ जानूंमध्यें आपणा पुढां ॥ तिसी बैसवूनि सकाम भिडा ॥ कुरळ केशांचा उकली बुचडा ॥ केला वेडा कंदर्पें ॥ ५३ ॥ तिचे विंचरूनियां केश ॥ सुगंध सुमनांचे विशेष ॥ गुंफूनियां वेणीकेश ॥ खोपा विशेष शोभविला ॥ ५४ ॥ श्वेतारक्तगुच्छहारी ॥ भांगीं माणिक्यमुक्तांपरी ॥ कर्णप्रदेशीं कर्णिकारीं ॥ केतकीपत्रीं द्विभाग ॥ ५५ ॥ कुंद मोगरे चंद्रकांति ॥ चामीकराभ पंकजद्युति ॥ यूथिका द्विपत्री मालती ॥ खोपा निगुती रचिला गे ॥ ५६ ॥ कामलंपटें श्रीकृष्णानें ॥ येथ बैसोनि वानरासनें ॥ कामिनीकेशप्रसाधनें ॥ अढळ निजमनें जाणा गे ॥ ५७ ॥ ऐसी कामुकविडंबना ॥ स्वयें अनुकरे त्रैलोक्यराणा ॥ गोपीविरहोक्तिव्याख्याना ॥ मिसें तत्कथना त्या केलें ॥ ५८ ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ रेमेतयाऽऽचात्मरतआत्मारामोऽप्यखंडितः ॥कामिनांदर्शयन्दैन्यंस्त्रीणांचैवदुरात्मताम् ३५

॥ टीका ॥ शुक ह्मणे गा महाराजा ॥ कुरुकुळकोटीरललामतेजा ॥ श्रवणप्रेमें गरुडध्वजा ॥ हृदयांभोजा रंगविलें ॥ ५९ ॥ सूर्य जैसा स्वप्रकाश ॥ मिडगणप्रभेची नपाहे वास ॥ तेंवि आत्माराम हृषीकेश ॥ स्वसंतुष्ट आत्मरत ॥ ६० ॥ सूर्यप्रकाशीं मिडगणादिकां ॥ तेंवि सौख्या विषयात्मका ॥ ज्याचेनि आस्तिक्यें आवां-

---

१ कमलकोश. २ सुवर्णासारखे तेजस्वी. ३ केश विंचरणें. ४ विषयिजनांच्या कृति. ५ मुकुटरत्नाचें तेज. ६ इतर. ७ वाट. ८ धैर्य.

का ॥ विषयकामुकां भुलवावया ॥ ६१ ॥ विषयसुखाचा आभासमात्र ॥ देखोनि दुःखाचें होती पात्र ॥ तैसा नोहे जो स्वतंत्र ॥ अखंड अजस्र सुखधाम ॥ ६२ ॥ तोही स्त्रैण कामुकांची ॥ कुटिलाकारता जे मनाची ॥ ते दैन्यावस्था क्रीडोनि साची ॥ करूनि दावी कामुकां ॥६३॥ आणि स्त्रियाही ज्या जारिणी ॥ केवळ कुतर्कीचिया खाणी ॥ त्यांचें दैन्य चक्रपाणि ॥ लीलाचरणीं प्रकटीतसे ॥ ६५ ॥ येऱ्हवीं तयांची रूपवयसा ॥ नेत्रकटाक्षभ्रामकदशा ॥ भुलवूं नशके श्रीपरेशा ॥ नाटयासरिसा क्रीडे तो ॥ ६५ ॥ आतां स्त्रियांचें दुरात्मकत्व ॥ कामासक्ति मोहकत्व ॥ पुरुषा भुलवूनि दास्यत्व ॥ वरिष्ठत्वें करविती ॥ ६६ ॥

इत्येवंदर्शयंत्यस्ताश्चेरुर्गोप्योविचेतसः ॥ यांगोपीमनयत्कृष्णोविहायान्याःस्त्रियोवने ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ कामी गुंतलाचि पाहिजे ॥ जारिणीचें तो होय खाजें ॥ बळें सांडूनियां लाजे॥ नीच काजें करविती ॥ ६८ ॥ असो ऐसिया त्या विरहिणी ॥ नानावितर्की श्रीकृष्णकरणी ॥ दाविती भावूनि अंतःकरणीं ॥ वनीं उपवनीं हुडकितां ॥ ६९ ॥ चित्तें गुंतलीं कृष्णापासीं ॥ विचेतसा[1] त्या लावण्यराशि ॥ काननीं भ्रमती जैशीं पिशीं ॥ देहभावासि विसरूनी ॥७०॥ झाडीं खोडीं अरडी दरडी ॥ धांवती सैराट जैशीं वेडीं ॥ रमली गोविंदीं आवडी ॥ वितर्कपरवडी तच्छंदें ॥ ७१ ॥ असो ऐसा गोपिकांचा ॥ अभेदभक्तिप्रेमा साचा ॥ यावरी महिमा अभिमानाचा ॥ किंचित वाचा शुकवर्णी ॥ ७२ ॥ सांडूनि समस्त व्रजकामिनी ॥ एकली प्रियतम ललना वनीं ॥ घेऊनि गेला चक्रपाणि ॥ लावण्यखाणी रतिरसिका ॥ ७३ ॥ बाहु ठेवूनियां खांदां ॥ संलग्न

---

[1] अंतःकरणरहित.

होउनि श्रीमुकुंदा ॥ पदोपदीं विचरतां प्रमदा ॥ कृष्णें प्रमोदा पावविली ॥ ७४ ॥ चरणीं रुतती तृणांकुर ॥ ललनालालस भयकांतार॥स्कंधीं वाहे मुरलीधर ॥ जे कां सुंदर बहुमानें ॥ ७५ ॥ जे उतरूनि पृथ्वी वरी ॥ उभाठाकूनि प्रपदांवरी ॥ पुष्पें वेंचूनि श्रीमुरारि ॥ अत्यादरीं दे जीतें ॥ ७६ ॥ जिचें स्वकरीं श्रीभगवान ॥ करी केशप्रसाधन ॥ विविधा कुसुमीं मौलग्रथंन[1] ॥ वेणिकारचन कौशल्यें ॥ ७७ ॥ मुकुरा[2]कार आपुले नयनीं॥ लावण्य उमां[3]णी चक्रपाणि ॥ झाली तन्मानें मानिनी ॥ प्रमदागुणीं स्मयं[4]रूढा ॥ ७८ ॥

साचमेनेतदाऽऽत्मानंवरिष्ठंसर्वयोषिताम् ॥ हित्वागोपीःकामयानामामसौभजतेप्रियः ॥ ३७ ॥

॥ टीका ॥ ऐसी बहुधा सम्मानिली ॥ पाहिजे विनयभावा भजली ॥ परी ते उचितातें विसरली ॥ गर्वें फुगली उफराटी ॥ ७९ ॥ पतिव्रता ज्या साध्वी रामा ॥ क्रीडती जाणोनि कांतकामा ॥ वाढवूनियां विनयधर्मा ॥ दास्यकर्मा अनुसरती ॥ ८० ॥ जैसी श्यामा[5]कमंजरी ॥ उभारितांही बळात्कारीं ॥ सहसा आंगीं ताठा नधरी ॥ पुन्हा स्वीकारी नम्रत्व ॥ ८१ ॥ तैसें नोहे ब[6]र्जेरीकणिस ॥ ताठे कुं[7]लटे सम विशेष ॥ शुद्ध नम्रत्वें उजळी यश ॥ नित्य निर्दोष पतिव्रता ॥ ८२ ॥ जारिणी पासूनि ऐसें नघडे ॥सम्मानितां ते गर्वा चढे ॥ कामिक नाचवी आपणा पुढें ॥ करूनि वेडे तृणप्राय ॥ ८३ ॥ जेंवि कां द्रव्याचेनि बळें ॥ धनिक राबविती आपुलीं कुळें ॥ तेंवि गोवूनि कामकळे ॥ कामिक मोकळे नाचविती ॥ ८४ ॥ विद्यादानें राबवी शिष्यां ॥ वेतनें स्वामी राबवी दासां ॥ तैशा कामिनी कामुकां पुरुषां ॥ कामसुखाशा नाचविती ॥ ८५॥ नेत्र मुरडूनि दाविती रुदन॥

---

१ मस्तकीं गुंफणें. २ आरशा समान. ३ अनुभवी. ४ गर्वास चढलेली. ५ सांव्याची लोंबी. ६ बाजरीचें कणीस. ७ जारिणीसारखे.

मज अधीन ॥ माझें उल्लंघूं नशके वचन ॥ धरिला अभिमान सुभगत्वें[1] ॥ ९९ ॥ कृष्णसम्मानें सगर्वा ॥ चढली
प्रमदा गुणस्वभावा ॥ काय बोलिली श्रीकेशवा ॥ कुरुपुंगवा तें ऐक ॥ ३०० ॥

ततोगत्वावनोद्देशंदृष्ट्वाकेशवमब्रवीत् ॥ नपारयेऽहंचलितुंनयमांयत्रतेमनः ॥ ३८ ॥

॥ टीका ॥ आपुल्या हातें सुगंध सुमनीं ॥ कृष्णें जिची गुंफिली वेणी ॥ जे रमविली बहुतां गुणीं ॥ सम्मानूनि
सुभगत्वें[1] ॥ १ ॥ त्यानंतरें ते सगर्व ललना ॥ वनप्रदेशीं करूनि गमना ॥ श्रीकृष्णातें बोले वचना॥
वरा[2]भिमाना दाखवूनी ॥ २ ॥ पुढें नचलवे मजकारणें ॥ जेथें आवडी धरिजे मनें ॥ तेथें स्कंधीं वाहूनि नेणें ॥
लालसपणें मत्प्रेमें ॥ ३ ॥ येथूनि चालों नशकें पुढां ॥ खांदीं वाहून प्रेमचाडा ॥ तुझें मानस सुखसुरवाडा[3] ॥
वांछी तिकडे मज नेईं ॥ ४ ॥ कामिक जाणोनि चढली डोई ॥ मग ह्मणे चालों नशकें भुईं ॥ मना मानेल तेथें
नेईं ॥ खांदां घेईं प्रियमानें ॥ ५ ॥ तंव तो असं[4]ग आत्माराम ॥ अखंड अजस्र पूर्णकाम ॥ जाणोनि वनितास्मयसंभ्रम
॥ पावे उपरम तें ऐका ॥ ६ ॥

एवमुक्तःप्रियामाहस्कंधआरुह्यतामिति ॥ ततश्चांतर्दधेकृष्णःसावधूरन्वतप्यत ॥ ३९ ॥

॥ टीका ॥ प्रमाद[5]प्रणीत प्रमदावाणी ॥ बोलोनि बोधिला चक्रपाणि ॥ मग तो प्रियतम प्रेमवचनीं ॥ स्कंधारोहणीं
प्रवर्त्तवी ॥ ७ ॥ देखोनि वशवर्ती वनमाळी ॥ खांदीं घ्यावया बैसला तळीं ॥ मग ते सगर्वा वेल्हाळी
॥ पदाब्ज उजळी आरोहणा ॥ ८ ॥ मौळ कवळूनि दोहीं करीं ॥ बैसों जातां स्कंधावरी ॥ तंव अंतर्धान

---

[1] सौंदर्यामुळें, [2] मोठ्या गर्वाला. [3] सुखवृद्धि. [4] आसक्तिरहित. [5] अविचारानें रचलेली.

बळेंचि कुंथूनि काढिती दुखणें ॥ ईर्ष्यारोषें गर्वें फुगणें ॥ न्यून उपसणें पिशुनापें[१] ॥ ८६ ॥ प्रेमें अर्पितां नघेती अन्न ॥ अव्हेरिती अर्पिलें वसन ॥ नकरवे ह्मणती पदाभिमान ॥ अळुमाळ[२] वचन नसाहती ॥८७॥ जंव जंव दाविती त्या विकार ॥ तंव तंव कामिक कर्मठाकार ॥ त्यांच्या छंदें नर्त्तनपर ॥ अन्यविचार विसरोनी ॥ ८८ ॥ तिचेंचि वालभ वाढवी वाड[३] ॥ तिची मोडूं नशके भीड ॥ तिचे ठायीं विश्वास दृढ ॥ वाटे अवघड तीसाठीं॥८९॥ मायबापादि आप्तकोटी ॥ त्यांतें नगणी तृणासाठीं ॥ कोणीं प्रियेची मोडितां गोठी ॥ क्षोभे पोटीं अनिवार ॥९० क्षणक्षणा प्रियेचें वदन ॥ पाहोनि जीवाचें उतरी लोण ॥ येरी मानी तृणासमान ॥ डिंगर करूनि राबवी॥९१॥ तैसी श्रीकृष्णलालनें ललना ॥ चढली लावण्यें अभिमाना ॥ येरी समान मानूनि तृणा ॥ भावी आपणा श्रेष्ठत्व ॥ ९२ ॥ भूस टाकूनि घेती कण ॥ कीं मृगांग टाकूनि कस्तूरीग्रहण ॥ कीं कंटक सांडूनि सेविती सुमन ॥ घेती सुज्ञ गुणलाभें ॥ ९३ ॥ तैशा समस्त रानटा गोपी ॥ कृष्णें सांडूनि विगुणा विरूपी ॥ मद्गुणलावण्यकंदर्पकल्पीं ॥ कृष्ण प्रतापी तापविला ॥ ९४ ॥ कुवलयगंधीं[५] चंचरीक[६] ॥ वेधे नागस्वरें पन्नक ॥ चकोरा वेधी जैवातृक[७] ॥ मत्कामुक हरि तैसा ॥९५॥ तस्मात माझिये सुकुमारते ॥ गुणलावण्यचातुर्यते ॥ अगाध जाणोनि श्रीअनंतें ॥ वनिताशतें उपेक्षिलीं ॥ ९६ ॥ कृष्ण भुलविला गुणलावण्या ॥ त्रिभुवनीं एक मी वरांगना॥ स्कंधीं वाहे समान सुमना ॥ सुगंधव्याजें स्रग्रूपी[८] ॥ ९७ ॥ जंववरी अम्लानता असे सुमनीं ॥ तंववरी भजिजे गुणज्ञजनीं ॥ तेंवि माझिये सुकुमारगुणीं ॥ चक्रपाणि वशवर्ती ॥ ९८ ॥ माझें कुशल सुकुमारपण ॥ असतां कृष्ण

---

१ चहाडखोरापासून. २ अल्प. ३ अधिक. ४ दास. ५ कमलाच्या सुवासाला. ६ भुंगा, ७ चंद्र. ८ माळेच्या रूपानें.

पावे हरि ॥ राहे सुंदरी चवकली ॥ ९ ॥ दाही दिशा निरखी डोळां ॥ कोठें नदेखे गोपाळा ॥ ह्मणे म्यां परम अपराध केला ॥ हरि हारविला हातींचा ॥१० ॥ जाणोनि वशवर्ती श्रीकृष्ण ॥ करूं इच्छीं स्कंधारोहण ॥ विनयभावें नभजें चरण ॥ ऐसी अज्ञान निर्दैवें ॥११॥ हातींचा हारविला चिंतामणि ॥ गर्वा चढोनि पडलें वनीं ॥ आतां माझा अपराध नगणीं ॥ कृपे विरहिणी वांचवीं ॥ १२ ॥ तुझिया अधरामृताची रुचि ॥ निधानलक्ष्मी लावण्याची ॥ दुर्लभ जाणोनि कमला शोची ॥ गर्वें हातींची ते गेली ॥ १३ ॥ ऐसा पावूनियां अनुताप ॥ आंगीं प्रज्वळला कंदर्प ॥ आठवूनि मन्मथबाप ॥ करी विलाप तें ऐका ॥ १४ ॥

हानाथरमणप्रेष्ठक्वासिक्वासिमहाभुज ॥ दास्यास्तेकृपणायामेसखेदर्शयसन्निधिम् ॥ ४० ॥

॥ टीका ॥ लावण्यगुणा भुलला कृष्ण ॥ वाढला होता जो अभिमान ॥ कृष्ण पावोन अंतर्द्धान ॥ केलें निरसन तयाचें ॥ १५ ॥ अ[2]खंड असंग निजात्मरत ॥ ललनालाघवीं अनादृत ॥ कामिनीकामीं अनासक्त ॥ नित्य निर्मुक्त श्रीकृष्ण ॥ १६ ॥ शशांक बिंबला दिसतां जळीं ॥ धीवरा नाकर्षवे तो जाळीं ॥ तैसा नाकळवे वनमाळी ॥ कंदर्पकेलि कुलटां[3]तें ॥ १७ ॥ अनासक्त[4]ता प्रकटूनि ऐसी ॥ गुप्त होतांचि श्रीकृष्णासि ॥ कामिनी स्फुंदे उकसाबुकसीं ॥ दीर्घस्वरेंशीं आक्रंदे ॥१८॥ हाहाकारें आक्रंदोनी ॥ दीर्घविलापें करी ग्लानि ॥ अश्रुधारा स्रवती नयनीं ॥ मनीं स्मरोनिहरिचरिता ॥ १९ ॥ कोठें आहेसि प्राणनाथा ॥ प्राणवल्लभा देईं सुरता ॥ मजला सांडूनि नवचें परता ॥ मम दुश्चरिता नाठवीं ॥ २० ॥ माझिया परमप्रियतम इष्टा ॥ तव वि-

---

[1] गांगरली. [2] विषयांनीं न जिंकिलेला. [3] जारिणीस. [4] विरक्तपणा.

योगें पावलें कष्टा ॥ तुज म्यां नेणोनि स्वसंतुष्टा ॥ केल्या चेष्टा त्या विसरें ॥ २१ ॥ सरल सुपीन सलंब भुज ॥ प्रेमालिंगनीं आनंदभोज[3] ॥ अधर चुंबूनी मकरध्वज ॥ हृदयकंज प्रकाशीं ॥ २२ ॥ पहातां तुझिया आननचंद्रा ॥ स्वानंदभरितें स्मरसमुद्रा ॥ विकसित होय मानसमुद्रा ॥ सौभाग्यभद्रा समलाभें ॥ २३ ॥ तुजवीण दीना मी तव दासी ॥ कोठें सांडून मज गेलासी ॥ एकली विलपें वनवासी ॥ सन्निधानासि मज देईं ॥२४॥ दावीं आपुलें सन्निधान ॥ माझें नाठवीं गर्हिताचरण ॥ करूं इच्छिलें स्कंधारोहण ॥ तें उद्धतपण विसरिजे ॥२५॥ केशीं झाडीन मी तव चरण ॥ बाहीं देईन आलिंगन ॥ अधरामृताचें देऊन पान ॥ वांचवीं प्राण जाताती ॥ ॥ २६ ॥ ऐसे विलाप नानापरी ॥ करूनि रुदतां दीर्घस्वरीं ॥ तंव पातल्या सख्या येरी ॥ वनीं श्रीहरि गिंवसिति या ॥ २७ ॥

अन्विच्छंत्योभगवतोमार्गंगोप्योविदूरतः ॥ ददृशुःप्रियविश्लेषमोहितादुःखितांसखीम् ॥ ४१ ॥

॥ टीका ॥ ध्वजांकुशादि चिह्नीं विशद ॥ भूमी उमटले जे हरिपद ॥ तदनुलक्षें करिती शोध ॥ प्रमदा प्रसिद्ध स्मरतप्ता ॥ २८ ॥ ऐशा हरिमार्गातें अबला ॥ पहात असतां विरहविकळा ॥ तव दुरून देखिली डोळां ॥ सखीव्याकुळा स्मरबाणें ॥ २९ ॥ प्रियतमाचें आलिंगन ॥ लाहोनि विसरली देहभान ॥ करितां मर्यादालंघन ॥ गेला त्यागून वनवासीं ॥ ३० ॥ कृष्णप्राप्ति हातींची गेली ॥ निजसखियांची विघडणी झाली ॥ जळा वेगळी मासोळी ॥ तेंवि तळमळी हरिविरहें ॥ ३१ ॥ तिचें ऐकोन आक्रंदन ॥ सवेग आलिया धांवोन ॥ दुःखावरंप-

---

१ आत्मस्वरूपज्ञानानें आनंद. २ अत्यंत पुष्ट. ३ आनंदाचा अधिकपणा. ४ हृदयकमळ. ५ दुःखांत प्रविष्ट झालेला.

डी देखोन ॥ प्रश्न संभाषण आदरिलें ॥ ३२ ॥ वनीं अवघ्या सांडूनि वधू ॥ घेऊन गेला तुज गोविंदु ॥ कोठें हारविला आनंदकंदु ॥ केंवि हा खेदु तुज झाला ॥ ३३ ॥ मग ते सखियांप्रति बोले ॥ मज गोविंदें सम्मानिलें ॥ खांदां वाहोनि आणिलें ॥ विविध दाविलें रतिलास्य ॥ २४ ॥ मही उतरूनि ठायीं ठायीं ॥ विचित्र वनश्री दाविली पाहीं ॥ पुन्हां उचलूनि दोहीं बाहीं ॥ ने लवलाहीं स्वैरत्वें ॥ ३५ ॥ माझिया मौलग्रथना साठीं ॥ सुमनें वेंचूनि भरिली वोंटी ॥ अंघ्रीं घेऊनि आपणानिकटीं ॥ ग्रथिली गोमटी वेणिका ॥ ३६ ॥ पुन्हा घेवोनि कडिये खांदां ॥ केली कंदर्पकेली विविधा ॥ प्रमदास्वभावें म्यां प्रमादा ॥ करूनि गोविंदा अवगणिलें ॥ ३७ ॥ माझिया लावण्या भुलला हरि ॥ ह्मणोनि गर्वा चढलें भारीं ॥ वनीं सांडूनि अवघ्या नारी ॥ वाहे कंधरीं मज प्रेमें ॥ ३८ ॥ मी एकचि जगीं लावण्यराशि ॥ ह्मणूनि आवडें श्रीकृष्णासी ॥ कृष्ण भुलला सौंदर्यासी ॥ म्यां हृषीकेशी वश केला ॥ ३९ ॥ कृष्ण जाला अधीन ॥ ऐसा धरिला म्यां अभिमान ॥ चालों नशकें मी येथून ॥ खांदां वाहून ने ह्मणतां ॥ ४० ॥ खांदां बैसावया मज बाहे ॥ स्कंधारोहणा उचलितां पाहें ॥ तेथचि गुप्त झाला माय ॥ दुःखें लौंहेंसम मिंडकें ॥ ४१ ॥ श्रीकृष्णाचें आलिंगन ॥ आठवे कृष्णाचें चुंबन ॥ सप्रेम अपांगमोक्षण ॥ सादर निरीक्षण आठवे ॥ ४२ ॥ श्रीकृष्णाच्या गुह्य गोष्टि ॥ स्मरविलासें सस्निग्ध दृष्टि ॥ रसिकलालनें स्मरोनि पोटीं ॥ होतें कष्टी सखिया हो ॥ ४३ ॥

तयाकथितमाकर्ण्यमानप्राप्तिंचमाधवात् ॥ अवमानंचदौरात्म्याद्विस्मयंपरमंययुः ॥ ४२ ॥

---

१ चूकी, २ गळ्यांत, ३ लाहीप्रमाणें (खापरांतील) ४ तळमळत्यें,

॥ टीका ॥ तिचें ऐकोनि बोलणें ॥ कीं जे सम्मानिली विशेष कृष्णें ॥ ह्मणोनि फुगतां मदाभिमानें ॥ पुन्हा अवमानें विघडली ॥ ४४ ॥ अगे या श्रीकृष्णचरणा साठीं ॥ विधिहरप्रमुख विरक्त हट्टी ॥ दुर्घट तपश्चर्येच्या कष्टीं ॥ शिणतां भेटी दुर्लभ त्यां ॥ ४५ ॥ दैवें त्याची प्राप्ति घडली ॥ दुरदृष्टें[1] गर्वा चढली ॥ पुन्हा अभिमानें विघडली ॥ संकटीं पडली हरिविरहें ॥ ४६ ॥ याचें लाघव नकळे कोण्हा ॥ नये विश्वासों याचिया गुणां ॥ चढली मूर्खत्वें अभिमाना ॥ आतां रुदना करीतसे ॥४७॥ निष्काम करिती हरिकीर्त्तन ॥ जाय तयांपें[2] धावोन ॥ सांडूनि लक्ष्मीसह सुखशयन ॥ सनकादिभाषणें सांडूनी ॥४८॥ हरि कीर्त्तनामाजि नाचे ॥ वंदी अणुरेणु तेथींचे ॥ शेषाप्रति रहस्य याचें ॥ लक्ष्मी वाचे पुसतसे ॥ ४९ ॥ सर्वी सांडूनि स्वयें हरि ॥ निष्काम भक्तांचे कीर्त्तनगजरीं ॥ नाचे उडे नानापरी ॥ कोण्या विचारीं हें नुमजे ॥ ५० ॥ ऐकोनि ह्मणे फणिनायक ॥ रहस्य जननीये आइक ॥ कृष्ण निजजनपरीक्षक ॥ नमनिजे निष्टंक वशवर्ती ॥ ५१ ॥ स्वयें नीचा करी नमन ॥ कीं जो विश्वात्मा आपण ॥ धरितां अंगळगीं[3] अभिमान ॥ मग त्या चरण नदाखवी ॥ ५२ ॥ यालागीं ज्यातें तो सम्मानी ॥ त्यांस जायिजे लोटांगणीं ॥ तरीच अधिकार पदसेवनीं ॥ येऱ्हवीं हाणी तत्काळ ॥५३॥ हरिकिंकरांचे किंकर ॥ त्यांहून आपण नीचतर ॥ होऊनि त्यांचे चरणीं शिर ॥ ठेवितां अधिकार दास्यत्वा ॥ ५४ ॥ हें ऐकोनि कमला देवी ॥ हरिजनांचे चरण सेवी ॥ यास्तव त्रिजगाचा गोसांवी[4] ॥ हृदयीं ठेवी सप्रेमें ॥ ५५ ॥ जे कां अर्धांगनिवासिनी ॥ येथवरी तियेची कडसणी[5] ॥ तेथ हे अभिमानें मानिनी ॥ स्कंधारोहणीं प्रवर्त्तली ॥ ५६ ॥

---

१ दुर्दैवानें. २ त्यांपाशीं. ३ समागमांत. ४ धनी. ५ परीक्षा.

यास्तव हातींचा हारविला हारि ॥ भोगी विरहें दुःखलहरी ॥ सुरपद दवडूनि भवसागरीं ॥ याज्ञिकांपरी हे जाचे ॥ ५७॥ दुरात्मत्वें पावली नांड ॥ आणि त्या कृष्णाचें कैवांड ॥ ऐकोनि परम विस्मयारूढ ॥ ह्मणती अवघड हरिप्राप्ति ॥ ५८ ॥ ऐशा समदुःखें तन्वंगी ॥ तयेंसि घेऊनि आपणासंगीं ॥ पुन्हा वनगर्भीं शार्ङ्गी ॥ रिघोनि वेगीं हुडकिती ॥ ५९ ॥

ततोऽविशन्वनंचंद्रज्योत्स्नायावद्विभाव्यते ॥ तमःप्रविष्टमालक्ष्यततोनिववृतुःहरेः ॥ ४३ ॥

॥ टीका ॥ तये सहित रिघाल्या वनीं ॥ जववरी शशिभांमंडित रजनी ॥ पडतां तमाची गवसणी ॥ हरिहुडकंणी सांडिली ॥ ६० ॥ त्यानंतरें हरिशोधन ॥ सांडूनि पुन्हां सेविलें पुलिन ॥ तेथ विसरोनि देहभान ॥ करिती गायन हरिविरहें ॥ ६१ ॥

तन्मनस्कास्तदालापास्तद्विचेष्टास्तदात्मिकाः ॥तद्गुणानेवगायंत्योनात्मागाराणिसस्मरुः ॥ ४४ ॥

॥ टीका ॥ श्रीकृष्णाच्या विरहध्यानें ॥ तदाकार झालीं मनें ॥ तेथ नुमटती प्रपंचभानें ॥ तद्गुणगानें तन्मयता ॥ ६२ ॥ उन्मत्त जैसे बरळताती ॥ तैशा विवश हरिगुण गाती ॥ अनुभविली जे हरिसंगति ॥ तैशा चेष्टती तन्मय त्या ॥ ६३ ॥ कृष्णगानें कृष्णध्यानें ॥ कृष्णसुरतसन्निधानें ॥ कृष्णाकार झालीं मनें ॥ प्रपंचभानें सांडवलीं ॥ ६४ ॥ कृष्णध्यानाचिया वेधें ॥ भेदा विसरल्या कृष्णावबोधें ॥ कृष्ण होऊनि कृष्णच्छंदें ॥ प्रेम

---

१ हानि, २ कपट, ३ चंद्रप्रकाशानें, ४ श्रीकृष्णाचा शोध,

नुसधें वांवरे ॥ ६५ ॥ तया प्रेमाची अवस्था ॥ ग्रंथीं नयेचि वाखाणितां ॥ विरंचीपर्यंत बुद्धिमंता ॥ नाहीं-
योग्यता तत्कथनीं ॥ ६६ ॥ तैसाचि प्रेमळ कोण्ही एक ॥ हरिपदलालस हरिकामुक ॥ भोगूं शकेल तद्रससु-
ख ॥ कथनीं मूक परि तोही ॥ ६७ ॥ श्रीकृष्णाची विरहदशा ॥ अनिर्वाच्य कुरुनरेशा ॥ अनुभवगम्य तन्मान-
सा ॥ येरां भरवसा नकरवे ॥ असो ऐशा पुलिनीं रामा ॥ पतिसुतसदनासह विरामा ॥ वेधें तन्मय मेघश्यामा ॥
भावूनि आत्मा गुण गाती ॥ ६९ ॥ त्यांची सप्रेम तन्मयता ॥ कथिली नवचेचि तत्वता ॥ यालागिं हरि-
गुणकीर्त्तनवार्ता ॥ ऐकें गीता गोपींच्या ॥ ७० ॥ कुरुपुंगवा तुझेनि प्रश्नें ॥ मजही तैसेंच केलें कृष्णें ॥ इतु-
कें ह्मणतां स्मृतींचें ठाणें ॥ उठोनि नयनें जळ लोटे ॥ ७१ ॥ हृदयीं प्रेमसुखाची जोडी ॥ फावतां रोमांच उभ-
विती गुढी ॥ कंठ दाटोनि श्वास कोंडी ॥ पडली बोबडी वाचेसी ॥ ७२ ॥ जैंवि कां प्रेमामृताची गार ॥ सं-
वादवायु कृष्णाकार ॥ स्पर्शें होऊं पाहे नीर ॥ तैंवि पाझर स्वेदाचे ॥ ७३ ॥ परागपरमाणूंची मांदी ॥ मिरवे
जैसी फुल्लारविंदीं ॥ पुलक उभारा तैसा स्वेदीं ॥ रोमांच संधि टवटविला ॥ ७४ ॥ रावणहननीं भूकंपन ॥ हो-
तां सुराद्रि करी धुनन[3] ॥ तैंवि विरतां अहंभान ॥ तनुकंपन सुखलाभें ॥ ७५ ॥ आनंदाब्धीचे हेलावे ॥ तैसे
उठती स्फुंदनयावे[4] ॥ एवं सात्विक अष्टभावें ॥ श्रीशुकदेवें आथिला ॥ ७६ ॥ जेणें वेषें बिंब नटे ॥ प्रतिबिंबही
तैसेंचि वेंठे ॥ अष्टभावीं स्वसुखीं पैठें[5] ॥ केलें नेटें तैंवि नृपा ॥ ७७ ॥ रासक्रीडेच्या विनोदें ॥ गोपी आथि-
ल्या परमानंदें ॥ स्तिमित झालीं खेचरवृंदें ॥ विधिही न वदे गतसमया ॥ ७८ ॥ तैसेचि श्रोते वक्ते दोन्ही ॥
अष्टभावीं सुख भोगूनी ॥ पुन्हा स्मृतीतें आलिंगोनी ॥ श्रवणीं कथनीं प्रवर्त्तले ॥ ७९ ॥ मग बादरायणि ह्मणे राया

---

१ व्यवहार करी. २ मेरुपर्वत. ३ कांपणें. ४ रडण्याचा अनावर वेग जो त्याचा उदय. ५ स्थिर.

गोपी हरिविरहें तन्मया ॥ धनसुत सदनें विसरोनियां ॥ गुण गावया प्रवर्त्तल्या ॥ ८० ॥

पुनःपुलिनमागत्यकालिंद्याःकृष्णभावनाः ॥ समवेताजगुःकृष्णंतदागमनकांक्षिताः ॥ ४९ ॥

॥ टीका ॥ पूर्वीं कालिंदीच्या पुलिनीं ॥ अभीष्ट भोगिला चक्रपाणि ॥ पुढती त्याचि स्थळा येऊनी ॥ कृष्णभांवनीं तन्मनस्का ॥ ८१ ॥ कृष्णाकार कृष्णवेधें ॥ भुक्तसुखाच्या अवबोधें ॥ कृष्ण गाती भेदावरोधें ॥ श्रीकृष्णपदें वांछिती ॥ ८२॥ वांछिती कृष्णाचें आगमन ॥ समस्त मिळोनि गाती कृष्ण ॥ वसवूनि कालिंदीचें पुलिन ॥ भोगिला भगवान जेथ पूर्वीं ॥ ८३॥ येथूनि पुढें गोपीगीत ॥ एकतिसाव्या अध्यायांत ॥ कथिजेल तेथ देऊनि चित्त ॥ श्रोतीं निवांत परिसावें ॥ ८४ ॥ एकोणतिसावा भवविरक्ति ॥ श्रवणवेधें हरिपदप्राप्ति ॥ [3]ईषणात्यागें भगवद्रति ॥ सुखविश्रांति भोगिली ॥ ८५ ॥ पुन्हा उपलब्ध सुखाचा मद ॥ धरितां अंतरला गोविंद ॥ तदन्वेषणप्रकार विशद ॥ तादात्म्यवेध तिसावां ॥ ८६ ॥ भूतमात्रीं भगवत्प्रेमा ॥ विपरीतविवर्त्तरोधोपरमा ॥ लाहतां साफल्य केलिया श्रमा ॥ हे येथ गरिमा जाणावी ॥ ८७ ॥ येथवरी अधिकार चढल्या पूर्ण ॥ नलगे अन्यत्र मग साधन ॥ निर्लज्ज करावें हरिकीर्त्तन ॥ तन्मय होऊन तद्वेधें ॥ ८८ ॥ तेंचि गोपीगीतमिसें ॥ पुढें कथिजेल राया परिसें ॥ जेथ रमिजे परमहंसें ॥ ऐसें व्यासें निगदिलें ॥ ८९ ॥ उत्तरजामाताचे श्रवणीं ॥ इतुकें घालूनि बादरायणि ॥ गोपीगीतनिरूपणीं ॥ सावध येथूनि ह्मणतसे ॥ ९० ॥ प्रतिष्ठानवाळवंट ॥ गौतमीरूपें यमुनातट ॥ अभेद एकात्म वैकुंठ ॥ एकनिष्ठ क्रीडतसे ॥ ९१ ॥ तेथ चिदानंद

---

[1] श्रीकृष्णध्यानीं. [2] त्याच्या ठिकाणीं मन ज्यांचें त्या. [3] स्त्रीपुत्रादिकांच्या ठायीं आस्था. [4] गोदावरी.

मुरलीगीतें ॥ स्वानंदवेधें गोपीचित्तें ॥ विषयत्यागें गोविंदातें ॥ विरहतप्तें समरसलीं ॥ ९२ ॥ तेथ लाहूनि गोविंदरति ॥ शुद्धसत्वें[1] अहंकृति ॥ धरितां अंतरिली अनुभूति ॥ विरहावर्तीं परिभ्रमण ॥९३ ॥ भुक्तसुखाचा नपडे विसर ॥ गोड नवटे भवसागर ॥ तेव्हां जालिया कीर्तनपर ॥ कृष्णदयार्णव जाणोनी ॥ ९४ ॥ हें तें श्रीमद्भागवत ॥ अठरासहस्र मूळ गणित ॥ परमहंस जेथ निरत ॥ स्कंध त्यांत दशम हा ॥ ९५ ॥ शुकपरीक्षितिसंवाद गहन ॥ गोपिकांहीं हरिशोधन ॥ केलें तें हें निरूपण ॥ अध्याय संपूर्ण तिसावां ॥ ३९६ ॥ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां भगदन्वेषणंनाम त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

॥ श्लोक ॥ ४५ ॥ ॥ टीकासंख्या ॥ ३९६ ॥ ॥ एवं संख्या ॥ ४४१ ॥ ॥ ॥

---

[1] रज तम ज्यांत मिसळले नाहींत तें.

◆

अध्याय ३१

॥ चंद्रप्रभा होती जेथवरी ॥ तंववरी हुडकूनि वनाभीतरीं ॥ तमःप्रचुर वृक्षांतरीं ॥ अप्राप्त हरि जाणोनी ॥ ३७ ॥
॥ फिरोनि पुढती यमुना पुलिना ॥ येऊनि समस्त पशुपांगना ॥ कृष्णवेधें करिती गायना ॥ कुरुभूषणा तें ऐकें ॥ ३८ ॥



श्रीमद्गोविंदात्मने नमः ॥ ॥ज्याचिया ध्यानसुखाची चवी ॥ अभेद आत्मावबोधा रुचवी ॥ इहामुष्मिक संकोचवी ॥ प्रज्ञा नाचवी परमार्थीं ॥ १ ॥ कोटिजन्मींचें निष्काम पुण्य ॥ तेणें ईश्वर संतोषोन ॥ करी सद्गुरूचें दर्शन ॥ तें प्रेमा गहन तद्भजनीं ॥ २ ॥ ईश्वरप्रसादें उपलब्ध ॥ गुरुदर्शनें मनासि वेध ॥ लागतां अभेद आत्मावबोध ॥ रुचतां निषेध भवभाना ॥३॥ शुक्तिरजताचा लाभ दुरी ॥ देखोनि कल्पना अलंकारीं ॥ उठती भवस्वर्गाचे परी ॥ त्याची बोहरी तद्ग्रहणीं ॥ ४ ॥ शुक्तिशकल घेतां हातीं ॥ उडोनि जाय रजतभ्रान्ति ॥ भूषणसंकल्प नरूचती ॥ तेंवि निवृत्ति भवस्वर्गा ॥ ५ ॥ सद्गुरूचें मूर्तिदर्शन ॥ होतां सप्रेम ठसावे ध्यान ॥ तेणें स्वसुखसमाधान ॥ अन्य साधन मग नरुचे ॥६॥ सगुणसद्गुरुध्यानवेधें ॥ प्रज्ञा वोसंडे[3] परमानंदें ॥ मग ते दृश्याचे खणोनि कांदे ॥ सदा स्वानंदें अवतरे ॥७॥ सद्गुरुध्यानसुखाची गोडी ॥ अभेद आत्मावबोध उघडी ॥ इहामुष्मिका होय झाडी ॥ विक्षेप[4] झांपडी समवेत ॥ ८ ॥ ईश्वरानुग्रहें सद्गुरु प्राप्त ॥ नहोतां येर जे संसारग्रस्त ॥ रुचवूं नशकती स्वबोधामृत ॥ काय निमित्त तें ऐका ॥ ९ ॥ विषयलोभार्थ बराडी ॥ जेथ देखे अर्थजोडी ॥ तेथ जे दात्याची आवडी ॥ तैसाची भरडी परमार्थ ॥ १० ॥ दाता देखोनि विलासिया ॥ कामशास्त्राचि बोधावया ॥

---

१ राख रांगोळी. २ शिंपीचा तुकडा. ३ भरून वाहूं लागले. ४ अज्ञान.

उक्ति अनेका ग्रंथींचिया ॥ दाऊनियां प्रतिपादी ॥ ११ ॥ यामळकुळार्णवतन्त्रैं नाना ॥ धुंडूनि काढी अनकूल वचना ॥ आणिकां तेथ बोलों देना ॥ करी भर्त्सना तोंडबळें ॥ १२ ॥ तेथ विषयांध यजमान ॥ मानी तयासीच सर्वज्ञ ॥ तां तो वसवसी जैसें श्वान ॥ कोणी विद्वान् येतांची ॥ १३ ॥ जरी त्या आवडे उपासना ॥ तरी वाढवी बहुकामना ॥ अभिचारिका[1] पद्धति नाना ॥ तद्गतज्ञाना प्रबोधी ॥ १४ दावी प्रत्यक्ष चमत्कार ॥ ह्मणे देवतासामर्थ्य अपार ॥ तदर्थ करी प्रयोगपर ॥ जाणोनि अधिकार तयाचा ॥ १५ ॥ यजमान गीतनाट्याद्दिरासिक॥ असतां प्रबोधी तौर्यत्रिक[2] ॥ संगीतशास्त्राचा विवेक ॥ सनाटक अलंकार॥१६॥ पिंगळादि[3] नानाच्छंदें ॥ तानमानें गद्यपद्यें ॥ वेधूनि इत्यादि विनोदें ॥ वेंची समुदें वयवित्त ॥ १७ ॥ दाता जाणोनि साबरपर ॥ भूत प्रेत पिशाच अघोर ॥ साधनविधानें विविध मंत्र ॥ दावूनि तत्पर प्रबोधी ॥ १८ ॥ धनावाप्तीसि साभिलाष ॥ यजमान देखोनि विशेष ॥ कपिंजळादि वादींचे दंश ॥ बोधी अशेष अहैतुक ॥ १९ ॥ वल्लीत्वगग्रमूळिकाकाष्ठीं ॥ दरद[4] पारद[5] पाषाण कुनटि[6] ॥ कल्कक्षारभस्मादि वटीं ॥ धातुपालटीं प्रलोभी ॥ २० ॥ कीं नाना अंजनें पंचाक्षरी ॥ पायाळ देवगणी नरनारी ॥ धनें काढवी मध्यरात्रीं ॥ कीं स्वर्णाकर्षण उपदेशी ॥ २१ ॥ गुटिका चूर्णें रक्षालेप ॥ दृष्टिबंधनें तिलक धूप ॥ भुररी कपटें कायाकल्प ॥ बोधितां पाप नह्मणती ॥ २२ ॥ एवं धनुर्वेद आयुर्वेद ॥ गांधर्व शांभव ज्योतिर्वेद ॥ नानापरीक्षा शिल्पकोविद ॥ करिती प्रबोध यजमाना ॥ २३ ॥ सूपशास्त्रींची योग्यता ॥ कळा चौसष्टी चातुर्यता ॥ पूर्वमीमांसा प्रबोधितां ॥ दानीं आस्था सकामा ॥ २४ ॥ निष्काम

---

[1] हिंसात्मक. [2] नृत्य, गीत, वाद्य. [3] छंदः शास्त्राचा कर्ता. [4] पर्वताचा कडा. [5] पारा. [6] मनःशिळा.

भूतदयेची जोडी ॥ तेथ वेंचूं नावडे कवडी ॥ फळाभिलाषें सकाम गोडी॥ते दानपंरवडी प्रबोधिती॥२५॥ एवं आपुल्या
पोटासाठीं ॥ मनधरणीच्या बोधूनि गोठी ॥ वयवित्ताची करिती लुटी ॥ दोघे शेवटीं नारकीं ॥ २६ ॥ जैसे
पोटार्थ भिकारी ॥ श्वापदें शिक्षिती नानापरी ॥ जें जें सत्व ज्या विकारीं ॥ नाचे तैसें नाचविती॥२७॥शुक सारिका
बोलविती ॥ पन्नग नागस्वरें डोलविती ॥ व्याघ्र प्रयासीं चालविती ॥ अश्व खेळविती कौतुकें ॥ २८ ॥ मर्कटा
शिक्षिती बहुविकारीं ॥ वृषभ नाचविती अंगावरी ॥ जे शिक्षेचे जे अधिकारी ॥ त्यां ते प्रकारीं शिक्षिती ॥ २९ ॥
एवं यजमानाची प्रीति ॥ जाणोनि पंडित प्रबोधिती ॥ ते यजमान श्वापदपंक्ति ॥ शिक्षक पोटार्थी उभयत्र ॥३०॥
अनन्यप्रेमें सच्छिष्य जडे ॥ तरी त्या लावी प्रपंचाकडे॥ जें जें आपणा सुख आवडे ॥ तें त्या कुडे उपपादी॥३१॥
निष्काम विरक्त देखोन ॥ त्याचें करी निर्भर्त्सन ॥ निर्दैव दरिद्री मूर्ख ह्मणोन ॥ करी हेळण दुर्वाक्यें ॥ ३२ ॥
ऐसियांचिया प्रबोधनें ॥ कैसेनि चुकती जन्ममरणें ॥ दावूनि मानुष्य हें पेखणें ॥ होती पाहुणे निरयाचे ॥ ३३॥
ईश्वरानुग्रहें सद्‌गुरु प्राप्त ॥ अपरोक्षज्ञानप्रबोधादित्य॥उदय नकरी जों यथार्थ ॥ व्यर्थ प्राकृत तंव अवघे
॥ ३४ ॥ तो हा गोविंद गोकुळपति ॥ वृत्तिरूपा गोपयुवति ॥ आत्मवेधें भवनिवृत्ति ॥ करूनि परमार्थी लांचविल्या
॥ ३५ ॥ ये अध्यायीं तेचि कथा ॥ वनीं हुडकितां कृष्णनाथा ॥ गोपी पावोनि विरहव्यथा ॥ आल्या
श्रमिता पुलिनातें ॥ ३६ ॥

संग्रह भाषाछंद.

निराशा पुढती गोपी पातल्या पुलिनाप्रति ॥ गाती कृष्णानुलक्षें त्या कृष्णागमन वांछिती ॥ १॥

---

१ दानाची प्रतिष्ठा. २ नरकांत. ३ काथाकूट. ४ नरकाचे.

॥ टीका ॥ चंद्रप्रभा होतीं जेथवरी ॥ तंववरी हुडकूनि वनाभीतरी ॥ तमःप्रचुरवृक्षान्तरीं ॥ अप्राप्त हरि जाणोनी ॥ ३७ ॥ फिरोनि पुढती यमुनापुलिना ॥ येऊनि समस्त पशुपांगना॥कृष्णवेधें करिती गायना ॥ कुरुभूषणा तें ऐकें ॥ ३८ ॥

सुमुखवृत्तविदम् ॥ नमन ॥

नमुनि सद्गुरू गोपिनायका ॥ विरहिणी व्रजीं गाति बायका ॥
कथिन ते कथा प्राकृतें खरी ॥ जशिच हे शुकाचार्यवैखरी ॥ १ ॥

गोप्यऊचुः ॥ जयतितेऽधिकंजन्मनाव्रजःश्रयतइंदिराशश्वदत्रहि ॥
दयितदृश्यतांदिक्षुतावकास्त्वयिधृतासवस्त्वाविचिन्वते ॥ १ ॥

समश्लोकी ॥ ६ ॥

उपजणें तुझें प्राप्त गोकुळीं ॥ वसत इंदिरा ऊर्जितागळी ॥
प्रकट हो सख्या धुंडितों दिशा ॥ असु विगुंतले जाहलों पिशा ॥ १ ॥

ध्रुवपद ॥

हरि दयार्णवा प्रेमगौरवा ॥ प्रकट हो सख्या तोष दे जिवा ॥ २ ॥

---

१ अंधकार बहुत ज्यांत अशा वृक्षांमध्यें.

॥ टीका ॥ गोपी ह्मणती जी प्रियतमा ॥ तुझिया जन्में करूनि महिमा ॥ ऊर्जित नंदव्रजाची गरिमा ॥ उत्कृष्ट आह्मां दिसतसे ॥ ३९ ॥ तुझिया जन्मास्तव वनमाळी ॥ कमला[1] सर्वस्वें येस्थळीं ॥ स्वऐश्वर्यें व्रजमंडळीं ॥ शोभाबहळीं वर्त्ततसे ॥ ४० ॥ तस्मात् तुझिया जन्में करून ॥ प्राणिमात्र व्रजींचे जन॥ ऊर्जित विजयश्रीसंपन्न ॥ नित्य निमग्न स्वानंदीं ॥ ४१ ॥ व्रजीं जन्मतां श्रीमुकुंद ॥ सर्व भोगिती परमानंद ॥ तेथ तावक[2] गोपीवृंद ॥ पावतो खेद तव विरहें ॥ ४२ ॥ तावकी कैशा ह्मणसी जाण ॥ तरी त्वदर्थ धरूनि प्राण ॥लाहोनि विधीचें वरदान ॥ गोपी होऊन जन्मलों ॥ ४३ ॥ तुझ्याठायीं धरूनि प्रीति॥तवप्रिय करावयाची आर्ति॥अह्मीं जन्मलों हें श्रीपति ॥ विदित तुज प्रति सर्वज्ञा ॥४४॥ यास्तव जन्माचि पासून॥तुझ्या ठायीं धरिले प्राण ॥तुजविण प्रियतम नेणों आन ॥ निजसुख संपूर्ण तूं आमुचें ॥ ४५ ॥ बाळपणींच तुझी गोठी ॥ऐकोनि हांव उपजे पोटीं ॥ जे दोहीं बाहीं तुझ्या कंठीं ॥ घालूनि मिठी कवळावें ॥ ४६ ॥ विशेष झालिया दर्शन ॥ मधुमक्षिकाकार नयन ॥ नुठती तव तनूपासून ॥ तनुमनप्राण वेधती ॥ ४७ ॥ भाग्यें स्पर्श जेव्हां घडे ॥ तैं मन्मथसुखाची खाणी उघडे ॥ चुंबनालिंगनाचेनि पाडें ॥ तुकितां नावडे कैवल्य ॥ ४८ ॥ दर्शन स्पर्शन संस्तोभन ॥ ऐसें वेधीं[3] तनुवाङ्मन ॥ वियोगीं त्वन्निष्ठ आमुचे प्राण ॥ अन्यचिंतन विसरले॥ ४९ ॥ एवं जन्मापासूनि आमुचें ॥ तनुमनप्राण जीवित साचें ॥ तुझेनि छंदे सदैव नाचे ॥ दुसरें नरुचे प्रिय कांहीं ॥ ५० ॥ जन्मादारभ्य जैंवि कुमुदिनी ॥ ग्लौ[4] लक्षितां नपवे ग्लानि॥ किंवा यावज्जन्म पद्मिनी ॥ भोगी दिनमणि तन्निष्ठ ॥५१॥

---

[1] लक्ष्मी. [2] तुझे. [3] चित्तीं. [4] चंद्र. [5] थट्टामस्करी.

आह्मी त्वयिधृतासवा तशा ॥ जन्मादारभ्य श्रीपरेशा॥ज्यां दिवसांची धरूनि आशा॥त्या या निशा संप्रांप्ता॥५२ लांगलं[3]कर्षणादारभ्य कष्ट ॥ धान्यपचनादि वाढिलें ताट ॥ तें पळवितां हृदयस्फोट॥तैसी चटपट हे आह्मां ॥ ॥ ५३ ॥ तुझेनि जन्में व्रजसमग्र ॥ असतां आनंद निर्भर ॥ तावक वधूगण विरहातुर ॥ तूतें गह्वर हुडकीतसे ॥ ५४ ॥ तुझेनि जन्में सुखसागरीं ॥ निमग्न असतां चराचरीं ॥ आह्मी तावकी विरहातुरी ॥ दुःखलहरी भोगितसों ॥ ५५ ॥ चो[4]ष्यखाद्यादि पदार्थ जेंवि ॥ दशनव्यापारें रसना सेवी ॥ तेणें आपादतनु टवटवी ॥परीनफवे ते चवी दशनांतें ॥ ५६ ॥ तैसें नकरूनि जनार्दना ॥ करीं आमुची संभावना ॥ नातरी आमुच्या करितां हनना ॥ अघ सर्वज्ञा तव माथां ॥ ५७ ॥ आपणा प्रकट दावूनि नयनीं ॥ आमुची निरसीं मनसिजं[5]ग्लानि ॥ सदयहृदया आमुचे हननीं ॥ काय ह्मणोनि प्रवर्तसी ॥ ५८ ॥ अधोर्ध्व अग्निपश्चिमभागीं ॥ दक्षिण उत्तर विदिङ्मार्गीं ॥ तुजचि पाहों जी सर्वांगीं ॥ बाह्यांतरंगीं अखंड ॥ ५९ ॥ ऐसा वधूगण तवासक्त ॥ जाणोनि मारणें हें अनुचित ॥ मारणें कैसें ह्मणसी येथ ॥ तरी तें यथार्थ अवधारीं ॥ ६० ॥ विरहविवश सर्व ललना ॥ जैसी आवडी जिचिया मना ॥ ते ते तैसी करी जल्पना ॥ पृथक्सूचना सर्वत्र ॥ ६१ ॥ त्यांमाजि एकी आभीर[6]वनिता ॥ आंगीं लावूनि हिंसकता ॥ प्रतिपादिती त्या श्लोकार्था ॥ धरित्रीनाथा शुक सांगे ॥ ६२ ॥

शरदुदाशयेसाधुजातसत्सरसिजोदरश्रीमुषादृशा ॥
सुरतनाथतेशुल्कदासिकावरदनिघ्नतोनेहकिंवधः ॥ २ ॥

---

१ तुझ्या ठिकाणीं प्राण ज्यांचे अशा. २ येऊन पोचल्या. ३ नागर ओढण्यापासून. ४ चोखून खाण्याचा पदार्थ. ५ कामसंबंधी. ६ गोपिका.

सरसिजें[1] शरत्काळिंचीं तळां ॥ विकसितें तयांतील चित्कळा ॥
हरुनि माखिल्या नेत्रमार्गणें[3] ॥ फुकट किंकरी हे नमारणें ॥ २ ॥

॥ टीका ॥ शरत्काळींच्या उदकाशया ॥ माजि सद्गुणसमुच्चया ॥ सहित विकसितां कुशेशयां[2] ॥ अरुणकोमळ जे लक्ष्मी ॥ ६३ ॥ अन्य ऋतूंची तडागअंभें ॥ संभव सरसिरुहग तगभें ॥ शरत्समसाम्य श्री नशोभे ॥ वरवालभें साधुत्व ॥ ६४ ॥ ते श्री हरूनि तव लोचनें ॥ आह्मी विरहिणी कटाक्षबाणें[3] ॥ विंधितां[4] हनना काय उणें ॥ कीं शस्त्राविणें हा वध नोहे ॥ ६५ ॥ प्रेष्ठ अभीष्ट सुरतनाथा ॥ वरदा निरशी मन्मथव्यथा॥ फुकट दासी तव पदप्राप्ता ॥ आह्मी समस्ता विरहिणी ॥ ६६ ॥ शरत्सरसिजलक्ष्मीहरणें ॥ तद्भासादृशकटाक्षबाणें ॥ फुकट दासी कां वधितां प्राणें ॥ तुज हीं दूषणें नलगती ॥ ६७ ॥ कीं यासि वध ह्मणों नये ॥शस्त्रासारिखे नदिसती घाये ॥ परी मारणें मंत्रप्रयोगप्राय ॥ अक्षत प्रळय होतसे ॥ ६८ ॥ रसाळ स्वादिष्ठ शुभ पक्वान्नें ॥ भोक्ता सेवितां प्रियतमपणें ॥ मरण पावे दृग्दूषणें ॥ स्मराक्त नयनें हें तैसें ॥ ६९ ॥ मोल नवेचितां किंकरी ॥ आह्मी अनुकूळ मन्मथसमरीं ॥ असतां विंधूनि लोचनशरीं ॥ नव्हे श्रीहरि वध काय ॥ ७० ॥ जरी तुज मारणें होतें आह्मां॥तरी कासया मेघश्यामा ॥ बहुधा निरसूनियां दुर्गमा ॥ रक्षणकामा आंगविलें ॥७१ ॥ मागें रक्षूनि बहु संकटीं ॥ स्मराक्तदृग्बाणांची वृष्टि ॥ करितां पशुघ्ना परिपाटि ॥ पोसून शेवटीं पशुहनना ॥ ७२ ॥ म्यां कैं कोण्हां रक्षिलें ह्मणसी ॥ तरी तें गोविंदा परियेसी ॥ विदित मर्त्यां अमर्त्यांसी ॥ तें तुजपाशीं निवेदितों ॥ ७३ ॥

---

१ कमळें. २ रक्तकमळ. ३ कटाक्षबाण. ४ भेदणें.

विषजलाप्ययाद्व्यालराक्षसाद्वर्षमारुताद्वैद्युतानलात् ॥
वृषमयात्मजाद्विश्वतोभयाद्वृषभतेवयंरक्षितामुहुः ॥ ३ ॥

विषजलें क्षया पावतेक्षणीं ॥ अघअरिष्टकां वातवर्षणीं ॥
मयसुतादिकां पासुनी अह्मां ॥ जिवविणें तुझें व्यर्थ काय मा ॥ ३ ॥

॥ टीका ॥ ऋषंभ ऐसें संबोधन ॥ श्रेष्ठत्वाचें प्रशंसन ॥ कीं जें अंगीकृताचें हनन ॥ श्रेष्ठांपासून नघडावें
॥ ७४ ॥ तुझें श्रेष्ठत्व ह्मणसी कैसें ॥ निजकृपाकटाक्षपीयूषें ॥ ब्रह्मांडपाळणीं अनायासें ॥ पटुतर ऐसें श्रुति
गाती ॥ ७५ ॥ कालियविषांक्तयमुनावारि ॥ प्राशितां गोगोपां बोहरी ॥ त्याच्या शोकें हे व्रजपुरी ॥ प्रळयपरवरीं
प्रविष्ट ॥ ७६ ॥ तेव्हां कृपावलोकामृतें ॥ जीवविलींसमस्तें प्राणियें मृतें ॥ विदित तव यश हें त्रिजगातें
॥कीं आमुतें नाह्मणसी॥७७॥वत्सें वत्सप अघासुरें॥बकानुजें राक्षसें क्रूरें ॥गिळिलीं त्यांच्या शोकभरें ॥ समग्र
व्रजपुरें संहरतां ॥ ७८ ॥ तुवां फोडून अघाचा घसा ॥ व्रजवत्सपां वत्सांसारिसा ॥ कृपाकटाक्षपीयूषरसा ॥ वर्षोंनि
आपैसा वांचविला ॥७९॥ वनीं गिळितां वडवानळा ॥ प्राशून वांचविलें गोकुळा ॥ इंद्र वर्षतां प्रळयजळा॥
धरिलें अचळा कारुण्यें ॥ ८० ॥ विद्युत्पात जळ अचाट ॥ माजि जलगारा घनदाट ॥ तेणें व्रजपुर पावतां कष्ट
॥ तुवां उद्भट गिरि धरिला ॥ ८१ ॥ अरिष्टनामा वृषभासुर ॥ व्योम मयासुराचा कुमर ॥त्यांचा करूनियां-

---

१ श्रेष्ठ. २ कालियविष मिसळलें ज्यांत असें पाणी. ३ नाश.

संहार ॥ अक्षत व्रजपुर रक्षिलें ॥ ८१ ॥ कृष्णविरहें विवशवाणी ॥ हरियश गाती व्रजकामिनी॥ भूतभविष्यद्वर्त्तमानीं ॥ तृणावर्त्तादि व्योमांत ॥ ८२ ॥ रासक्रीडेच्या प्रसंगीं ॥ वृषभासुरा श्रीकृष्ण भंगी ॥ ऐसिया महाविघ्नीं अनेगीं ॥ कृपेनें वेगीं रक्षिलें ॥ ८३ ॥ ऐसिया प्रळयीं वाचिवणें ॥ आजि मारावें कटाक्षबाणें॥ऋषभ येणें संबोधनें ॥ कीं नलवीं हें उणें श्रेष्ठत्वा ॥ ८५ ॥ वारंवार संरक्षिलें ॥ शेखीं कटाक्षबाणें वधिलें ॥ हेंही यशाचिया माजि पडिलें ॥ तरी मिरविलें पाहिजे ॥ ८६ ॥ स्वगृहीं त्रिजगा पाहुणेर ॥ कुटुंबा लागीं निराहार॥ तेंवि विश्वअवनार्थ तवावतार ॥ स्वभक्तनिकर[1] उपेक्षूनी ॥ ८७ ॥ तरी हें अनुचित जगदात्मया ॥ जरी ह्मणसी तूं नंदजाया ॥ स्वभक्त ह्मणोनि तोषवावया ॥ आलों विलया तयेच्या ॥ ८८ ॥ अनपत्य[2] नंदनारी ॥ह्मणोनि चिंती मज अंतरीं॥ यास्तव जन्मोनि तिचे उदरीं ॥ केलें दूरी वंध्यत्व ॥८९॥ ऐसें नह्मणावें श्रीपति ॥ वृत्तांत विदित आह्मांप्रति ॥ विरिंचीनें केली विनति ॥ तैं तूं क्षिती अवतरसी ॥ ९० ॥

नखलुगोपिकानंदगोभवानखिलदेहिनामंतरात्मदृक् ॥
विखनसार्थितोविश्वगुप्तयेसखउदेयिवान्सात्वतांकुले ॥ २ ॥

नव्हसि गोपिकातोदषायक ॥ हृदयसाक्षि तूं विश्वनायक ॥
विनवितां विधी विश्वरक्षणीं ॥ यदुकुळीं तुझें जन्म तेक्षणीं ॥ ४ ॥

---

[1] समुदाय. [2] निपुत्री.

॥ टीका ॥ सख्या निश्चयेंशीं तूं पाहीं ॥ यशोदानंदनाचि नव्हसी कांहीं ॥ विश्वात्मा तूं सर्वां देहीं ॥ बुद्धिसाक्षी विश्वदृक्[1] ॥ ९१ ॥ ह्मणसी बुद्धिसाक्षी जो विश्वदृक् ॥ तो व्यापक सर्वात्मक ॥ मी गोरक्ष नंदतोक[2] ॥ सगुण पृथक् परिच्छिन्नं[3] ॥ ९२ ॥ यदर्थीं ऐकें पुरुषोत्तमा ॥ विश्वपाळणाकारणें ब्रह्मा ॥ तुज प्रार्थूनि मेघश्यामा ॥ धरवी जन्मा यदुकुळीं ॥ ९३ ॥ ते ब्रह्मयाची मानूनि विनति ॥ विश्वपाळणार्थ श्रीपति ॥ यदुकुळीं जन्मलासि निश्चितीं ॥ आह्मांप्रति विदित हें ॥ ९४ ॥ जरी तां विश्व प्रतिपाळणें ॥ तरी आह्मांसीच कां संहारणें ॥ नेत्रकटाक्षें कामबाणें॥कवण्या गुणें हें सांग ॥९५॥ नदाखवूनियां विषमभेदा ॥ स्वभक्तपाळक आनंदकंदा ॥ पुरवीं मनोरथा चतुर्विधा ॥ चतुःश्लोकोक्ता[4] परिसोनी ॥ ९६ ॥ मस्तकीं ठेवीं पद्मकर ॥ जीववीं दावूनि वदनचंद्र ॥ चरणें मर्दीं पयोधर ॥ देईं अधरामृतपान ॥ ९७ ॥

विरचिताभयंवृष्णिधुर्यतेचरणमीयुषांसंसृतेर्भयात् ॥
करसरोरुहंकांतकामदंशिरसिधेहिनःश्रीकरग्रहम् ॥ ५ ॥

शरण संसृती[5]भ्याड जे अले ॥ अभय श्रीकरें त्यांस वोपिलें ॥
परिणिली हरी ज्या करें रमा ॥ धरिं शिरिं तया पाणि शंतमा ॥ ५ ॥ हरिदया०

॥ टीका ॥ प्रथम प्रार्थना निजकर शिरसा ॥ ठेवीं ह्मणोनि तुज परेशा ॥ प्रार्थितसों तो शंतम कैसा ॥ पद्म

---

१ सर्व पहाणारा. २ नंदाचे मूल. ३ व्याप्त. ४ चार श्लोकामध्यें सांगितलेला. ५ संसारास भ्यालेले,

हस्त हें अवधारीं ॥ ९८ ॥ वृष्णिवरिष्ठा परिसें वहिलें ॥ जे संसारीं भय पावले ॥ ते तव चरणा शरण आले ॥ श्रमित झाले ह्मणोनी ॥ ९९ ॥ पचतां विष्ठेच्या दाथरीं[1] ॥ विंसंचितां[2] षड्विकारीं ॥ तापत्रयाग्नी माझारीं ॥ बळें षड्वैरि भाजितां ॥ १०० ॥ स्वर्गीं नरकीं मानवलोकीं ॥ भ्रमतां पचतां कुंभपाकीं ॥ मरमरू उपजतां योनिमुखीं ॥ जे भवदुःखीं भयभीत ॥ १ ॥ बुडतां सांपडे जेंवि उथळ ॥ क्षुधिता अन्न तृषिता जळ॥ तेंवि त्यां सत्संगें तव पदकमळ ॥ निर्भय स्थळ सांपडलें ॥ २॥ पुन्हा संसृति लागेल पाठीं ॥ ऐसिया भयास्तव सदृढ मिठी ॥ घालूनि अभेदप्रेमा पोटीं ॥ धरूनि मुकुटीं पद धरिले ॥ ३ ॥ तयां संसारशत्रुभीतां ॥ जाणोनि स्वचरणशरणप्राप्तां ॥ होसी ज्या हस्तें अभयदाता ॥ तो पद्मकर माथां धरीं आमुचे ॥ ४ ॥ आणि दैत्यीं त्रासितां सुरवर ॥ समरीं होऊनि पराजयपर ॥ करिती कारुण्यें नामोच्चार ॥ तैं त्यां वरद कर कामद जो ॥ ५॥ कीं स्वभक्तांचे अनेक काम ॥ पुरविता जो कल्पद्रुम ॥ आमुचे शिरीं पाणिपद्म ॥ ठेवीं शंतम श्रीकांता ॥ ६ ॥ तैसीच कमला चंचळपणें ॥ सर्वत्र शिणतां विश्रांति नेणे ॥ तयेसि हृदयीं निश्चळ करणें ॥ पाणिग्रहणें ज्या हस्तें ॥ ७ ॥ शर्मद[3] तें करसरोरुह[4] ॥ आमुचे माथां करूनि स्नेह ॥ ठेवूनि निरसीं दुस्तर विरह॥निःसंदेह सुख वोपीं ॥ ८ ॥

व्रजजनार्त्तिहन्वीरयोषितांनिजजनंस्मयध्वंसनस्मित ॥
भजसखेभवत्किंकरीःस्मनोजलरुहाननंचारुदर्शय ॥ ६ ॥

---

[1] वाफेनें मोदकइ. शिजण्या करितां पात्रांत पाणी व तृण, पानें इ. घालितात तो. [2] विकार पावतां. [3] सुखदायक. [4] हस्तकमल.

व्रजविपत्ति तूं नाशिता हरी ॥ स्वजनगर्व जो सस्मितें हरी ॥
॥ ६ ॥ प्रकटवीं सख्या किंकरीं अह्मां ॥ कुमुदकानना वक्रचन्द्रमा ॥ ६ ॥ ॥३१॥

॥ टीका ॥ तंव आणिखी ह्मणती व्रजयोषिता ॥ स्वभक्ताचा तूं गर्वहर्त्ता ॥ व्रजजनदुःखाचा निहंता॥ आमुचा तत्त्वता प्राणसखा ॥ ९ ॥ दीक्षित स्मरयज्वा[1] तूं चतुर ॥ ह्मणोनि संबोधन हे वीर ॥ तुझ्या किंकरी विरहातुर ॥ वदन फुल्लार दावीं आह्मां ॥ १० ॥ ईषन्मात्र हास्यवदन ॥ करूनि करिसी स्मयभंजन[2] ॥ योषितांचें नवल कोण॥ तैं गर्वापहरण विधिहरां ॥ ११ ॥ तव किंकरी प्रार्थितों तुज ॥ आमुचे कामने सरिसा भज ॥ परम सुंदर वदनांबुज ॥ दावीं सहज जगदीशा ॥ १२ ॥ आह्मां योषितांचा अंगीकार ॥ करूनि मस्तकीं ठेवीं कर ॥ दावीं वदनांबुज सुंदर ॥ करुणाउत्तर परिसोनी ॥ १३ ॥ तंव आणिखी ह्मणती करुणानिधि ॥ अवघड नमगों तुज त्रिशुद्धी ॥ स्वजना समान आमुचा आधि[3] ॥ करुणानिधि छेदावा ॥ १४ ॥

प्रणतदेहिनांपापकर्षणंतृणचरानुगंश्रीनिकेतनम् ॥ फणिफणार्पितंतेपदांबुजंकृणुकुचेषुनःकृंधिहृच्छयम् ॥७॥

पशुपथीं वनीं जाति जीं पदें ॥ जगदघांतकें[4] इंदिरास्पदें[5] ॥
फणिफणांवरी रम्य नर्त्तकें ॥ कुचयुगीं धरीं कामकंतकें[6] ॥७॥ हरिदयार्णवा० ॥ ॥६॥

॥ टीका ॥ प्रणतजनाहूनि विशेष ॥ आह्मी नमगों तुज निःशेष ॥ सहजस्वभावें निजशरणास ॥ जे निर्दोष

---

१ कामशांत्यर्थ विधियुक्त यज्ञ करणारा. २ गर्वाचा नाश ३ मनोव्यथा. ४ जगत्पापनाशक. ५ लक्ष्मीनिवासस्थानें. ६ छेदक.

पद करिती ॥ १५ ॥ कृपेकरूनि गोपाळणीं ॥ तूं जें प्रवर्तसी चक्रपाणि ॥ तें तृणचरा मागें वनीं ॥ चालतां चरणीं कारुण्यें ॥ १६ ॥ तेथ उधळती जे पदरज ॥ भाग्यें ज्यांतें स्पर्शती सहज ॥ त्यांचा भंगिती पापपुंज ॥ तें ते अधोक्षजमय होती ॥ १७ ॥ यामाजि तुझें वेंचे काय ॥ सहज स्वभावें लागतां पाय ॥ चराचरांचें कल्मष जाय ॥ भास्करोदयें तम जैसें ॥ १८ ॥ हें व्हावया काय कारण ॥ विश्वश्रियेचें चरणीं स्थान ॥ सुरसरितेचें जन्मभुवन ॥ ऐश्वर्यदान अघ हरणें ॥ १९ ॥ तें पद आमुच्या स्तनावरी ॥ ठेवूनि मर्दीं शंकरवैरि[1] ॥ जरी तो ह्मणसी बळिष्ठ भारी ॥ तरी अवधारीं श्रीरमणा ॥२०॥ कालियफणी दुर्मददर्प ॥ चरणीं मर्दिला सप्रताप॥तेथ बापुडा वधूकंदर्प ॥ पदप्रक्षेप सहावया ॥ २१ ॥ ह्मणसी कामें जिंकिलें त्रिजग ॥ त्याचा चरणें नघडे भंग ॥ तो कामविजयाचा प्रसंग ॥ वर्त्ते सांग तव चरणीं ॥ २२ ॥ तव पदपंकज केवळ रथ ॥ विजयोर्जित केतुसहित ॥ कंदर्पमद्गज[2] मदोन्मत्त ॥ तद्दमनार्थ अंकुशा ॥ २३ ॥ निर्दयकंदर्पगिरि कठोर ॥ भंगावया चरणीं वज्र ॥ मन्मथ चंचळ भ्रमराकार ॥ पद्म फुल्लार वेधक त्या ॥ २४ ॥ स्मरनिवासें दे अपयश ॥ यशदव[3] त्या करी नाश ॥ मन्मथोदयें अगाध दोष ॥ गंगा निःशेष ते नाशी ॥ २५ ॥ ऐसी मन्मथजयसामग्री ॥ तव पदकमळीं लक्षूनि पुरी ॥ आह्मी प्रार्थूं विरहातुरी ॥ कुचीं क्षणभरी पद ठेवीं ॥ २६ ॥ इत्यादिऐश्वर्यमंडितपद ॥ आमुचे कुचीं ठेवूनि विशद ॥ कामशत्रूचा करीं छेद ॥ वोपीं आनंद दासींतें ॥ २७॥ कुचसंज्ञा हे रतिगौरवें॥ साधकीं हृत्पंकज लक्षावें ॥ हृदयीं पदाब्ज स्थिर व्हावें ॥ येणें भावें वधूग्लानि ॥२८॥ तंव एकी ह्मणती मन्मथशरीं ॥ मरोनि पडिलों स्मरपंजरीं ॥ अधरामृतें त्वां झडकरीं ॥ निजकिंकरी जीववाव्या ॥ २९ ॥

---

१ शंकर शत्रु ज्याचा तो मदन. २ मदन हाच आमचा गज. ३ यश हाच वणवा.

मधुरयागिरावल्गुवाक्ययाबुधमनोज्ञयापुष्करेक्षण॥विधिकरीरिमावीरमुह्यतीरधरसीधुनाप्याययस्वनः ॥८॥

मधुर उत्तरें पंडितप्रियें ॥ कमललोचना बोलसी स्वयें ॥
अनुचरी तिहीं व्याकुळा हरी ॥ अधरअमृतें प्राण मोहरीं ॥ ८ ॥ हरिदयार्णवा० ॥

॥ टीका ॥ फुल्लारपुंडरीकनयना ॥ ह्मणसी किमर्थ पावलां मरणा ॥ तुझिये वाणीच्या मधुरपणा ॥ समस्त अंगना मोहग्रस्ता ॥३०॥ कैसी मधुर ह्मणसी गिरा ॥ सुंदरवाक्यांचा उभारा॥जीच्या ठायीं प्रकटोनि खरा ॥ भुलवी चतुरां विपश्चितां ॥ १३१ ॥ शुक्रप्रमुखमहर्षिमांदीं ॥ वैरोचनींच्या[2] मखसंवादीं ॥ वल्गुवाक्याच्या[3] प्रबंधीं ॥ सुखसंवादीं भुलविली ॥ १३२ ॥ सकळज्ञानियांच्या जो मुकुटीं ॥ हंसविग्रहें तो परमेष्ठी॥ वल्गुवाक्य[3]प्रबोधपाठीं ॥ सदसद्ग्रांठी उगविली॥३३॥कमला भुलोनि मृदुभाषणा॥किंकरी होऊन सेवी चरणा ॥ ऐसी वाणी बुधमनोज्ञा ॥ तिणें अंगना बोधिल्या ॥ ३४॥ मोहग्रस्ता तव किंकरी ॥ विरहें जर्जर मन्मथशरीं ॥अधरामृतपानें पझडकरी ॥ जीववीं श्रीहरि स्मरतप्ता ॥ ३५ ॥ आह्मांसि तुझिया विरहें करून ॥ निश्चयेंशींच आलें मरण॥ परी जे करविती कथामृतपान ॥ तेंही संपूर्ण चालविलें ॥ ३६ ॥ तें कथामृत ह्मणसी कैसें ॥ नव्हे शतमखभाग्य[4] ऐसें ॥ त्याहूनि अनंतगुणविशेषें ॥ पुण्योत्कर्षें संप्राप्त ॥ ३७ ॥

तवकथामृतंतप्तजीवनंकविभिरीडितंकल्मषापहम्॥
श्रवणमंगलंश्रीमदाततंभुविगृणंतितेभूरिदाजनाः ॥ ९ ॥

---

१ तृप्त कर. २ बलीच्या. ३ मधुर. ४ इंद्राच्या ऐश्वर्या सारखे.

तव कथासुधा तप्त वांचवी ॥ अघहरा कवी वर्णिती चवी ॥
श्रवणमंगला श्रीमदाकुला ॥ कथक देति भू भूरि सोहळा ॥ ९ ॥

॥टीका॥ स्वर्गसुधेहूनि आगळें॥ कथामृत हें कैसेनि कळे॥ तरी जें शुकें प्रज्ञाबळें॥ तुकिलें स्वलीले संवादीं॥ ३८॥ तव गुणमहिमेची जे कथा ॥ तेंचि परमामृत तत्वता॥ ह्मणसी यदर्थीं हेतु कोणता ॥ तो तत्वता अवधारीं॥ ३९॥ सुधा स्वर्गस्थ पिती अमर ॥ ते तप्त त्रितापीं शतमंख[1]प्रवर॥ कथामृत हें त्रितापहर॥ निववी सत्वर संतप्तां॥ ४०॥ आणि ब्रह्मनिष्ठ सनकादिक जे जे ॥ तिहीं तव कथामृतातें स्तविजे ॥ अमृतासहित आमुष्मिका जे॥ वांतवोजे[2] मानिती॥ ४३॥ स्वर्गामृतें पातक पोषे॥ मुख्य अमरेंद्र अहल्यादोषें ॥ लिप्त झाला कामावेशें ॥ मा इतर कायसे सुरसाध्य ॥ ४२॥ कथापीयूष कल्मषहरणीं॥ समर्थ जैसा तमोहर तरणि॥ कीं अघौघहंत्री मंदाकिनी॥ जे हरिचरणीं जन्मली ४३ अमृतपानें अमरांप्रति ॥ पुण्यक्षयें स्वर्गच्युति ॥ कल्मषवृद्धि भवदुर्मति ॥ पुनरावृत्तिप्रद होय ॥ ४४॥ अमृतपानें अनंग वाढे ॥ अप्सरासुरतीं मग पवांडे[3] ॥ कृतसुकृता हानि घडे ॥ कर्म उघडे तें तें कीं ॥ ४५ ॥ श्रवणें कथामृत पान करितां ॥ भंग होय आ[4]कल्पदुरिता ॥ अविद्याकामकर्मांची वार्ता ॥ निरसी तत्त्वता निःशेष ॥ ४६॥ अविद्याकामकर्मा जैं क्षय ॥ तैं कैवल्यामृत स्वयेंचि होय ॥ परी सुरा[5]सहोदरा ऐसें नोहे ॥ पुन्हा भवभयप्रद हें कीं ॥ ४७ ॥ श्रवणमात्रें मंगलकारी ॥ बुडतां तारी भवदुस्तरीं ॥ पामर मोक्षश्रीतें वरी ॥ श्रवणाधिकारी झालिया ॥ ४८ ॥ कथामृत पडतां अळुमाळ श्रवणीं ॥ वाढवी अक्षय मंगळश्रेणी ॥ अमंगळकलिमळप्रक्षा-

---

१ इंद्रादि. २ वमना सारखें. ३ शिरे. ४ कल्पपर्यंत केलेलीं पापें. ५ सुरेचें भावंड अमृत.

ळूनी ॥ बैसवी मूर्ध्नि अमरांचे ॥ ४९ ॥ अमरामृताचें होतां श्रवण ॥ असुरनिर्जरीं मांडिला प्रयत्न ॥ तेणें
त्रिजगा उदेलें विघ्न ॥ क्षीराब्धिमथनप्रसंगें ॥ ५० ॥ ज्याचा उदय होतां विशद ॥ असुरां सुरां जे कलहप्रद
॥ प्रथम राहूनें घेतां स्वाद ॥ मौळच्छेद पावला ॥ ५१ ॥ अद्यापि मीमांसेचें कथन ॥ सकामयाज्ञिका
होतां श्रवण ॥ हांवे भरूनि करिती यज्ञ ॥ अप्सरामैथुन वांछूनी ॥ ५२ ॥ एवं अविद्याकामकर्मबुद्धी ॥
अमरामृता माजि हे सिद्धि ॥ कथामृत छेदी भयोपाधि ॥ परमानंदीं समरसवी ॥ ५३ ॥ श्रीमत्पदाचें व्याख्यान
॥ अमरामृत श्रीसंपन्न ॥ तो श्रीमदमादक पूर्ण ॥ स्वदौर्जन्य विस्तारी ॥ ५४ ॥ कथामृताची कैसी
शोभा ॥ प्रकटे शांतिक्षमेची प्रभा ॥ चाखवी स्वानंदाचा गाभा ॥ कीर्ति स्वलाभा विस्तारी ॥ ५५ ॥ ऐसें
कथामृत भूतळीं ॥ विस्तारिती जे कीर्तनशाली ॥ अनुग्रहरूपें सप्रेमळीं॥ श्रोतृमंडळीं प्रबोधिती ॥५६॥ ते
भूतळींचे कल्पतरु ॥ तुकितां बहुधा ते उदार ॥ अमरद्रुम[1]दाता नश्वर ॥ अक्षयईश्वर हे करिती ॥ ५७ ॥
ज्याच्या कथामृतश्रवणें पानें ॥ पामरें मोक्षश्रीसंपन्नें ॥ होती त्यांतें निर्जरमनें ॥ करिती स्तवनें विधिहरही
॥ ५८ ॥ अनंतकल्पीं दानें बहळ ॥ करूनि तोषविला घननीळ ॥त्या सुकृतें कीर्तनशील ॥ सप्रेमळ हरिजन ते
॥ ५९ ॥ कथामृताच्या अनुग्रहें करून ॥ त्रिजगीं तेचि वदान्य[2] मान्य ॥मा प्रत्यक्ष ज्यांसि घडे दर्शन ॥ ते जन
धन्य कें पुनः ॥ ६० ॥ यास्तव आतां प्रकट होईं ॥ आह्मां प्रत्यक्ष दर्शन देईं ॥ आनंदनिर्भर आमुच्या ठायीं ॥
सुरतनवाई विस्तारीं ॥ ६१ ॥ जरी ह्मणसी तूं मत्कथाश्रवणें ॥ फावती समस्त सुखकल्याणें ॥ तरी तुह्मींही कथामृतश्रवणपानें
॥ अभीष्ट भोगणें रतिलास्य ॥६२॥ किमर्थ वाढवीं दर्शनीं हांव ॥ ऐसा स्वामि नधरीं भाव॥तव

---

[1] कल्पवृक्ष. [2] उदारमनस्क.

विलास कामोद्भव ॥ आमुचे जीव जाचितसे ॥६३॥ कथाश्रवणें त्याचें शमन॥नघडे ह्मणोनि तव दर्शन॥इच्छितसों तरी कृपा करून॥ प्रकट होऊन निववावें ॥६४॥ ते मद्विलास ह्मणसी कैसे॥कथिले नवचती जे विखनसें[1]॥ संकेतार्थ अळुमाळसें ॥ वदतां परेशें परिसावें ॥ ६५ ॥

प्रहसितंप्रियप्रेमवीक्षणंविहरणंचतेध्यानमंगलम्॥ रहसिसंविदोयाहृदिस्पृशःकुहकनोमनःक्षोभयंतिहि॥ १०॥

हसित पाहणें प्रेमउत्सहें ॥ विचरणें तुझें ध्यानभाग्य हें ॥
झुरतसों मनीं एकल्या घरीं ॥ स्मरभरें मनें क्षोभवी शरीं ॥१० ॥ हरिदयार्णवा० ॥

॥ टीका ॥ भो भो प्रियतमा शार्ङ्गी ॥ विलासरसिकता तुझ्याआंगीं ॥ एऱ्हां तरतिरंगप्रसंगीं॥ज्या ज्या लिंगीं विहरसी ॥ ६६ ॥ स्मित प्रहसित मंदस्मित ॥ हास्यप्रभेद ऐसे बहुत ॥ स्निग्धास्निग्ध विशद मुदित॥ सूचक संकेत वदनींचे ॥ ६७ ॥ प्रेमापांग करुणापांग ॥ व्रीडाक्रीडाबिभीषापांग[2] ॥ कटाक्षमोक्ष ऐसे अनेक ॥दाविसी अनंगक्षोभक ॥ ६८ ॥ ओष्ठमुद्रा विविधापरी ॥ अर्धमुकुलित अर्धप्रसरी ॥ व्यात्त[3] आकुंचित आवर्त्ताकारीं ॥ बहुप्रकारीं स्मररसिका ॥६९॥ अर्ध अधर ऊर्ध्वदशनीं ॥ धरूनि विंधिसी कटाक्षबाणीं ॥ तरल कपोल भ्रूकंपनीं ॥ आमुच्या मनीं ते कडतरती ॥७०॥ आजानु चंचल पाणियुगळ ॥ नाभि गंभीर नितंब पृथुल[4] ॥हंसविन्यासें चरणकमळ॥ तव गति मंगळ ध्यानस्थां ॥ ७१ ॥ ठाणमाणगुणलक्षण ॥ रूपरेखा रसिकध्यान॥ कोटिमन्मथ कुरवंडून ॥ तव लावण्य निरखिजे॥७२॥ ध्यान योगियां मंगळप्रद ॥ सविलास तव सौंदर्य हें वि-

---

[1] ब्रह्मदेवानें. [2] भय. [3] विस्तृत. [4] विशाल.

शद ॥ आमुचे हृदयीं स्मरउद्बोध ॥ करी प्रसिद्ध कपटिया ॥ ७३ ॥ एकांतविलाससभेच्याठायीं ॥ कुशलविलासिनी कवळूनि बाहीं॥ चुंबनकुचालिंगनीं कांहीं ॥ संकेतनर्मोक्ति ज्या वदसी॥७४॥त्याआमुच्या हृदयाप्रति ॥ स्मरणमात्रें क्षोभविती ॥ स्मरवेदना नसाहवती ॥ माघमासेगवांपरी ॥७५॥ माघमानामें वृश्चिकमाता ॥ सेगवनाम तिच्या अपत्यां ॥ उदरांतूनि ते देती व्यथा ॥ तेंवि हृदयीं स्मरतां नर्मोक्ति ॥ ७६ ॥ ऐसी कथूनि विरहग्लानि ॥ पुढती ह्मणती चक्रपाणि ॥ तुझ्या ठायीं अत्मार्पणीं ॥ आह्मी विरहिणी अनुरक्ता ॥७७॥ ऐसें असतां तूं आमुशीं ॥ कां हें कपट आचरसी ॥ श्लोकयुग्में तदुक्तीसी ॥ शुक नृपासि निवेदी ॥ ७८ ॥

चलसियद्व्रजाच्चारयन्पशून्नलिनसुदरंनाथतेपदम् ॥
शिलतृणांकुरैःसीदतीतिनःकलिलतांमनःकांतगच्छति॥ ११ ॥

पशु चरावया नेसि जैं वनीं ॥ पद मृदू तुझे पंकजाहुनी ॥
तिखट दर्भ हे रूतती झणीं ॥ विकळता भरे आमुचे मनीं ॥ ११ ॥

॥ टीका ॥ तुजनिमित्त आमुच्या चित्तीं ॥ उषःसीं प्रदोषीं वेदना उठती॥कोण्या प्रकारें त्या तुजप्रति ॥ ऐकें श्रीपति कथितसों ॥ ७९ ॥ भो नाथ हें संबोधन ॥ कीं तुजविण अनाथ प्रमदागण ॥झाला ऐसें जाणोनि पूर्ण ॥ प्रकटें सघृणं होऊनी ॥ ८० चारावया गोधनासी ॥ जेव्हां व्रजींहूनि कानना जासी॥तैं उषःकाळापासूनि क्लेशीं ॥ निजमानसीं जाचतसों ॥ ८१ ॥ तव पदनलिनामळसुंदर ॥ करितां तत्पदीं वनसंचार ॥

---

१ कर्कटी. २ कर्कटीचीं अपत्यें. ३ पहांटे. ४ सदय.

यवसपोटरें[1] तृणांकुर ॥ तीक्ष्णतर झणें रुतती॥८२॥तेणें वेदना होती पदां॥या काकुलती दिवस समुदा॥आमुचें चित्त पावे खेदा ॥ सुखप्रदा तुजसाठीं ॥ ८३ ॥ तुज तंव आमुचें स्मरण नाहीं॥वनीं स्वानंदें चारिसी गाई ॥ परी आह्मां विसर नपडे कांहीं ॥ आपुले हृदयीं झुरतसों ॥ ८४ ॥ कीं तव चरणां रुतती खडे॥तिखट दर्भांचे अगरडे[2] ॥ मंजऱ्या कणिशादि जर्बडें ॥ झणें वोरबडे ह्मणोनी ॥ ८५ ॥ परम सुकुमार तुझे चरण॥ त्या तळीं आथरूं आपुला प्राण ॥ वेदनाभयें सखेद सघृण ॥ दिन संपूर्ण क्रमितसों ॥ ८६ ॥ चित्त गुंततां तुझे चरणीं ॥ अव्यावस्त कर्माचरणीं ॥ आह्मी संसारीं सासुरवासिनी ॥ भोगूं जाचणी तद्योगें ॥ ८७ ॥ सासुसासरे भावे देर ॥ विकळ देखोनि कर्माचार ॥ करिती जाचणी अपार॥तें नेणे अंतर तव वेधें॥८८॥ते जाचणीहूनि कोटिगुणें ॥ तुझिये चरणीं रुतती तृणें ॥ या काकुळती चित्त शिणे ॥ विश्रांति नेणे अणुमात्र॥८९॥उदयापासून अस्तमान ॥ पर्यंत करितां पदचिंतन ॥ ऐसें सचिंत आमुचें मन ॥ पुनरागमन जंव देखों ॥ ९० ॥

दिनपरिक्षयेनीलकुंतलैर्वनरुहाननंबिभ्रदावृतम् ॥ घनरजस्वलंदर्शयन्मुहुर्मनसिनःस्मरंवीरयच्छसि ॥१२ ॥

उतरतां दिना कुंतलीं[3] घना ॥ परिस गोरजीं व्याप्त आनना ॥
घडिघडी विभो दावुनी अह्मां ॥ मनिं मनोज[4] तूं देसि सत्तमा ॥ १२ ॥ हरिदयार्णवा० ॥

॥ टीका ॥ सर्वां किरणीं अंशुमाळी ॥ परिक्षय पावतां अस्ताचळीं ॥ घेऊनि गोगोपमंडळी ॥ व्रजा जवळी जैं येसी ॥ ९१ ॥ कमलासारिखें फुल्लारमान ॥ आह्मांसि दावूनि निजानन ॥ आमुचे हृदयीं मनसिजबाण ॥

---

[1] तृणाचीं कुसवें.
[2] शेंडा.
[3] कुटिल केशांनीं.
[4] काम.

अर्पिसी संपूर्ण उद्योगें ॥ ९२ ॥ कमलसादृश्य कैसें वदनीं ॥ उपमासाहित्य कथी शुकमुनि ॥ तें परिसिजे
विचक्षणीं ॥ हरिगुणश्रवणीं रसिकांहीं ॥ ९३ ॥ आनन आवृत नीलकुंतलीं ॥ वनरुह आवृत भ्रमरावळी ॥
वदन धूसर गोरजबहळीं ॥ परागधूळी जलरुह पैं ॥९४॥ निशिदिनीं संकोच विकाश पावे ॥ पंचबाणाच्या
मार्गणभावें ॥ यास्तव स्मरक्षोभक जाणावे ॥ निजमार्दवें वनरुह पैं ॥ ९५ ॥ तैसें श्रीमुख वारंवार ॥ दावूनि
सप्रेम विलासपर ॥ आमुचे हृदयीं क्षोभवी स्मर ॥ तेणें जर्जर होतसों ॥ ९६ ॥ वदनमात्र दावूनि नित्य ॥
आमुचा क्षोभविसी मन्मथ ॥ परंतु देऊनि निजैकांत ॥ मनसिज शांत नकरिशी ॥ ९७ ॥ ऐसा कपटी तूं
तत्वतां ॥ आह्मी अनन्य तव पदनिरता ॥ आतां सांडूनि कापट्यता ॥ पुरवीं आस्था द्विविध हे ॥ ९८ ॥
श्लोकद्वयें द्विविध विनति ॥ गोपी श्रीकृष्णातें करिती ॥ शुक निवेदी परीक्षिती ॥ ते येथ श्रोतीं परिसावी॥ ९९

प्रणतकामदंपद्मजार्चितंधरणिमंडनंध्येयमापदि ॥ चरणपंकजंशंतमंचतेरमणनःस्तनेष्वर्पयाधिहन् ॥१३॥

शरणतोषकें कंजजार्चितें ॥ अपदि ध्येय जीं भूमिमंडितें ॥
सुखतमें तुझीं रम्य पाउलें ॥ स्तनिं धरीं अह्मां सर्व पावलें॥ १३ ॥ हरिदयार्णवा० ॥

॥ टीका ॥ आधिहरण या संबोधना ॥ करूनि सूचिती विरहशमना ॥ रमणसंबोधनें ललना ॥ पूर्वक्रीडना
जाणविती ॥ ३०० ॥ भो भो रमणा तव पदपद्म ॥ जेथ कमलेचें सदैव सद्म ॥ स्तनीं ठेवूनि तें शंतम॥
हृच्छयच्छद्म च्छेदावें ॥ १ ॥ जें पदपद्म श्रीपद्मजें ॥ अज्ञानाधिहरणाच्या काजें ॥ भूमि मोजितां वामनें द्वि-

---

१ कमळ. २ बाण. ३ ब्रह्मदेवानें पूजित. ४ संकटांत.

जें ॥ सप्रेमवोजे अर्चिलें ॥ २ ॥ गगनीं झुगारितां पाषाण ॥ जितुका ऊर्ध्व करी गमन ॥ तितुकेंचि पुन्हा पावे पतन ॥ एवं समान सुखदुःख ॥ ॥ ३ ॥ तैसें इहामुत्र समस्त ॥ समान सुखदुःखांतें देत ॥ जाणोनि झाले जे विरक्त ॥ दुःखातीत व्हावया ॥ ४ ॥ तयां प्रणतां अक्षय सुख ॥ निःशेष निरसूनियां दुःख ॥ भजनमात्रें नमनात्मक ॥ जें दायक पदपद्म ॥ ५ ॥ ऐसें प्रणतपूर्णकाम ॥ कारक जें तव चरणपद्म ॥ आमुचे स्तनीं तें शंत्तम ॥ ठेवीं प्रियतम भो रमणा ॥ ६ ॥ मधुकैटभ मर्दूनि दोन्ही ॥ जे कां मेदोद्भवा[3] मेदिनी ॥ वामनें स्वपदें आच्छादुनी ॥ केली धरणि पवित्र ॥ ७ ॥ कीं गयासुराचे मस्तकीं स्थिर ॥ कीं मर्दितां लवणासुर ॥ कीं भस्मा[1] छलितां नर्त्तनपर ॥ पदफुल्लार भू भोगी ॥ ८ ॥ कीं अमृत वाढितां समुद्रमथनीं ॥ पदविन्यासें मंडितधरणि ॥ कीं क्षत्रकुळाच्या निर्दळणीं ॥ कर्कश ठाणीं रणरंगीं ॥ ९ ॥ किंवा दंडकारण्यीं फिरतां ॥ कीं वत्सें गाई संरक्षितां ॥ हरूनि समस्त दुर्भरव्यथा ॥ धरणिमंडन पद झालें ॥ १० ॥ तैसेंच आमुच्या स्तनावरी ॥ पदाब्ज ठेवूनि हृच्छय[2] हरीं ॥ इतुकी प्रार्थना श्रीहरि ॥ अंगीकारीं बटकींची ॥ ११ ॥ प्राप्त होतां विपत्ति नाना ॥ पदाब्ज ध्याती तन्निरसना ॥ त्यांच्या करिसी विपत्तिहरणा ॥ शंतम चरणां ध्यातांची ॥ १२ ॥ प्रणतजनांचे कामप्रद ॥ पद्मजें अर्चिले परमवंद्य ॥ धरणिमंडन आनंदकंद ॥ स्तनीं तें सुखद पद ठेवीं ॥ १३ ॥ द्विविध विनति जे बोलिली ॥ त्यांमाजि प्रथम निरूपिली ॥ आतां दुसरी याच्ञा केली ॥ ते परिसिली पाहिजे ॥ १४ ॥

सुरतवर्द्धनंशोकनाशनंस्वरितवेणुनासुष्ठुचुंबितम् ॥ इतररागविस्मारणंनृणांवितरवीरनस्तेऽधरामृतम् ॥ १४

---

१ भस्मासुर. २ मदन. ३ मेदापासून उत्पन्न झालेली.

सुरत वाढवी शोक खंडुनी ॥ स्वरिंतवेणुनें चुंबितेक्षणीं ॥
इतर आवडी सांडवी जना ॥ अधरपान तें वोपि चुंबना ॥१४॥ हरिदयार्णवा० ॥

॥ टीका ॥ कामसमरीं अजिंक धीर ॥ ह्मणोनि संबोधिती हे वीर॥तुझें अधराम्रत मधुरतर ॥ तें सत्वर दे आह्मां ॥ १५ ॥ अधरपानें सुरत वाढे ॥ अरिवर्गेंशीं शोक बुडे ॥ तें अधरामृत आह्मां आवडे ॥ पाजीं रोकडें प्राणेशा ॥ १६ ॥ सप्तस्वरीं तानमानीं ॥ वेणु चुंबी पूंरितेक्षणीं ॥ अधरामृतोद्भव मधुर ध्वनि ॥ प्रसरे गगनीं जे काळीं ॥ १७ ॥ सर्वांसि अधरामृताचें पान ॥ फावे होतां वेणुश्रवण ॥ तेणें इहामुष्मिक सुखलावण्य ॥ फिकें जाणोनि विसरवी ॥ १८ ॥ मृत्युलोकींच्या नरांप्रति ॥ दुर्लभ इहामुष्मिक सुखसंपत्ति ॥ वेणुश्रवणीं त्यां घडतां रति ॥ पडे विस्मृति भवभानीं ॥ १९ ॥ मशकापासूनि ब्रह्मावरी ॥ जितुकी विषयसुखाची थोरी ॥ ते विसरवी क्षणाभीतरी ॥ अधरमाधुरी वेणुमयी ॥ २० ॥ परमहंस झाले खग ॥ सिद्ध गंधर्व जाले भृंग ॥ अधरसुधाश्रवणानुराग ॥ धरूनि कुरंग मुनि झाले ॥ २१ ॥ ऐसें तुझें अधरामृत ॥ आह्मां देईं रतिसंमत ॥ इतुका जाणवूनि वृत्तांत॥कथिती संतत ऐकाग्र्य ॥२२॥ जंववरी तुझी नघडे भेटी ॥ असतां साम्राज्यसुखाचे पोटीं ॥ तंव त्या अवघ्या दुःखकोटि॥ दुर्लभ गोठी स्वसुखाची ॥ २३ ॥ ऐसें जाणोनि वीतराग[2] ॥ सर्वसंगाचा करिती त्याग ॥ अवलंबूनि हंसमार्ग[3] ॥ तव संयोग साधिती ॥२४॥ तैशाच आह्मी प्रपंच विसरें॥तुझ्या ठायीं सप्रेमभरें ॥ फिरतों अनुरागें कांतारें ॥ कीं हें श्रीधरें नेणिजे ॥२५ ॥ अनन्यशरण आपणासाठीं ॥ जाणोनि निष्ठुरता

---

१ स्वरयुक्त. २ विषयासक्तिरहित. ३ संन्याशाचा मार्ग. ४ मुखवायूनें पूर्ण करिते वेळीं. ५ एकाग्रता.

हे गोमटी ॥ सदया कैसी धरवे पोटीं ॥ अघटित गोठी हे वाटे ॥ २६ ॥ अनन्यशरणत्वाचें कथन ॥ करिती दों श्लोकीं विवरण ॥ त्याचि माजि निष्ठुरपण ॥ विस्मय पावोन शंसिती ॥ २७ ॥

अटतियद्भवानह्निकाननं[1]त्रुटिर्युगायतेत्वामपश्यताम् ॥ कुटिलकुंतलंश्रीमुखंचतेजडउदीक्षतांपक्ष्मकृद्दृशाम् १९

फिरसि तूं हरी काननें दिवा ॥ त्रुटि युगापरी जाय तेधवां ॥
मुख निरीक्षितां शापितों विधी ॥ करित पापण्या व्यर्थ मंदधी ॥ १९ ॥ हरिदया ॥

॥ टीका ॥ धेनूमागें वृंदावनीं ॥ प्रभाते जातां चक्रपाणि ॥ तेव्हां त्वन्निष्ठ जेजे प्राणी ॥ त्यांची ग्लानि गणवेना ॥ २८ तूतें नपाहतां नयनीं ॥ पळार्ध थोर युगाहुनी ॥ लोटतां दाटती दुःखश्रेणी ॥ हृदयें फुटोनि उलताती ॥ २९ ॥ तूतें न पाहतां ऐसे दुःखी ॥ पुढती भाग्यें निशामुखीं ॥ येतां देखोनि प्रेमोत्सुकीं ॥ होती सुखी तें ऐक ॥ ३० ॥ आकर्णनयनांच्या शेवटीं ॥ भ्रमरभासुरकुंतलदाटी ॥ कंदर्पकार्मुकाकार[2] भृकुटी ॥ स्मरशर[3]सुटी अपांग ॥ ३१ ॥ शशिसह अश्विनी नक्षत्र ॥ तैसा वदनसुधाकर ॥ पाहतां उचलले ठाती नेत्र ॥ जेंवि कां चित्र अनिमेष ॥ ३२ ॥ पाहतां चिरकाळ नपुरे धणी ॥ तरळतां अल्पही पक्ष्मणी[4] ॥ तेव्हां विरिंची लागुनी ॥ जड मूढ ह्मणोनि दूषिती ॥ ३३ ॥ ऊर्ध्वपक्ष्मणीयुक्तनयन ॥ किमर्थ सृजिता झाला द्रुहिण ॥ सादर पाहतां श्रीकृष्णवदन ॥ मध्य व्यवधान[5] करिताती ॥ ॥ ३४ ॥ सादर पाहतां तृषिता नयना ॥ प्राशूनि हृदयीं आणितां कृष्णा ॥ धणी नपुरेचि सहसा जाणा ॥ सुरकामनापडिपाडें ॥ ३५ ॥ तव मुखनिरीक्षणीं जें सुख ॥ त्या सम नतुकेचि पीयूख ॥ ज्याचे सहोदर केवळ वि-

---

[1] क्षण. [2] मदनाच्या धनुष्या सारखे. [3] मदनाच्या शराचें मोक्षण. [4] पापण्या. [5] पडदा.

ख ॥ जें कां शतमख[1]क्षयकारी ॥३६॥ ऐशा तव विग्रहा[2]सक्ता ॥ आह्मी विरहिणी मन्मथतप्ता ॥ सांडूनि स्वजन माता पिता ॥ आलों अच्युता तुजप्रति ॥ ३७ ॥

पतिसुतान्वयभ्रातृबांधवानतिविलंघ्यतेंऽत्यच्युतागताः ॥
गतिविदस्तवोद्गीतमोहिताःकितवयोषितःकस्त्यजेन्निशि ॥ १६ ॥

सुतपती कुळें बंधु लंघुनी ॥ तुज निमित्त रे पातलों वनीं ॥
गति अभिज्ञ तो गीतसंभ्रमीं ॥ कपटि कां वधू टाकिता तमीं ॥ १६ ॥

॥ टीका ॥ गोपी ह्मणती भो अच्युत ॥ ज्यातें तव पद झाले प्राप्त ॥ तो जन पुन्हा नव्हे च्युत ॥ आब्रह्मभुवनांत जेंवि होय ॥ ३८ ॥ आह्मी संप्राप्त ते तव पद ॥ आणि वियोगें हा देसी खेद ॥ ह्मणसी कांहीं अधिकारभेद ॥ तरी तूं विशद अवधारीं ॥३९॥ देहाभिमानेंशीं त्यजिले पति ॥ सहित धनसदनादि संपत्ति ॥ पुत्रममताधरूनि चित्तीं ॥ गोत्राप्रति उब[3]गलों ॥४० ॥ बन्धु स्वजन सहोदर ॥ [4]देवर भावे सासु श्वशुर ॥ करूनि सर्वांचा अव्हेर ॥ वृत्ति क्षेत्र उपेक्षिलें ॥ ४१ ॥ सांडूनि सर्वत्र अभिमान ॥ उल्लंघूनि विधिविधान ॥ आह्मीं सेविले तुझे चरण ॥ अच्युत जाणोन विश्वासें ॥ ४२ ॥ येथूनि आह्मी [5]च्यवलों जरी ॥ तें अच्युतत्वाची कवण थोरी ॥ पूर्वापर हें कथिजे जरी ॥ तरी तूं श्रीहरि सर्वज्ञ ॥४३॥ कैसें आमुचें पूर्वाचरण ॥ भक्ति विरक्ति सप्रेमभजन ॥ चरणां सन्निध आगमन ॥ तूं गति अभिज्ञ जाणसी ॥४४॥ ह्मणसी कां पां उदास झालां ॥ किमर्थ मत्पदा शरण आलां ॥

---

[1] शंभर यज्ञांचा नाश करणारें. [2] शरीराच्या ठिकाणीं आसक्त. [3] कंटाळलों. [4] दीर. [5] भ्रष्ट झालों.

यदर्थी तुवांचि वेध केला ॥ तोही कथिला जातसे ॥ ४५ ॥ गति जाणत्या तुझिया गीतें ॥ उत्कृष्ट बोधें वेधिलीं चित्तें ॥ तेणें सांडूनि प्रपंचातें ॥ आह्मी वनातें सेविलें ॥ ४६ ॥ बृहदारण्यीं श्रुतिगायन ॥ कीं वृन्दावनींचें वेणुगान ॥ तेणें वेधलें आमुचें मन ॥ मग तव चरण आश्रयिले ॥४७॥ गीतवेत्या आह्मी नारी ॥ उद्गीत ह्मणिजे सर्वां उपरि ॥ विवरूनि विरक्तीची थोरी ॥ आह्मी संसारीं विरमलों ॥४८॥ ब्रह्मादिस्थावरान्त विषय ॥ गीतें केले वान्तप्राय ॥ यास्तव धरूनि तव पदसोय ॥ वरिले पाय सप्रेमीं ॥ ४९ ॥ ऐशिया आह्मी पदैकनिरता[1] ॥ अनन्यशरणा व्रजयोषिता ॥ दुर्घटें लंघूनि पदसंप्राप्ता ॥ निशि संमता कोण त्यजी ॥५०॥ अरे कपट्या कितवा[2] शठा ॥ पुरता मायावी तूं कुरठा ॥ जाणोनि वनिता पदलम्पटा ॥ तूं उफराटा उपेक्षिसी ॥ ५१ ॥ शरत्काळींची सचन्द्र रजनि ॥ एकांत सुपुष्पित काननीं ॥ सुन्दरी चतुरा वशवर्तिनी ॥ यां तुजविण कोण्ही नटकिती॥५२॥ विषयविरक्त आत्माराम॥तो तूं एकचि निष्कामकाम ॥ येर कोण्ही वधूसंगम ॥स्ववश सकाम नटकिती॥५३॥ तरी मज जाणोनि उदास ॥ कासया धरितां माझी आस ॥ ऐसें म्हणसी तरी रहस्य॥ आमुचें अशेष अवधारीं ॥ ५४॥ पूर्णकाम तूं निजात्मरमण ॥ म्हणोनि निःसंग उदासीन ॥ जासी विरहिणी उपेक्षून ॥ आमुचें मरण नचुके कीं ॥ ५५ ॥ तव गानवेधें विरहज्वर ॥ तेणें व्यापिलें अभ्यंतर ॥ त्वद्दर्शनें त्यां उपचार ॥ भेषजसार रतिलास्य ॥५६ ॥ पुन्हा वियोग पांचवा झाला ॥ तेणें देहभाव समूळगेला ॥ विरहज्वरें क्षोभ केला॥धुंडूं वैद्याला स्मररुग्णा[3] ॥ ५७ ॥ तरी सद्वैद्या सदय होईं ॥ स्मरतप्तांतें रतिरस देईं ॥मृता जीववूनि सुकृत घे-

---

[1] केवळ पदभक्तीविषयीं रत झालेल्या. [2] हे धूर्ता. [3] कामरोगानें ग्रस्त.

ई ॥ स्वयशनवाई हे मिरवीं ॥ ५८ ॥ हृद्रोगाचें विकारकथन ॥ आणि चिकित्सामृताचें जें स्थान ॥ वदती श्लोकद्वयें करून ॥ तें व्याख्यान अवधारा ॥ ५९ ॥

रहसिसंविदंहृच्छयोदयंप्रहसिताननंप्रेमवीक्षणम् ॥
बृहदुरःश्रियोवीक्ष्यधामतेमुहुरतिस्पृहामुह्यतेमनः ॥ १७ ॥

पिडित काम एकांतमंदिरीं ॥ स्मितविलोकनें तृप्त सुंदरी ॥
उरविशालभा लक्षुनी मना ॥ कवळिजे असी होय वासना ॥१७॥ हरिदयार्णवा० ॥

॥टीका॥तुझिया विलासरासिका उक्ति॥चाटु[1] चटुल[2] संकेतरीति॥हृदयीं आठवितां एकांतीं॥क्षोभे चित्तीं कंदर्प॥६० तेव्हां तुझें हास्यवदन ॥ सविलास कटाक्ष मन्मथबाण ॥ विंधूनि वेधिसी तनुमनप्राण ॥ तें सप्रेमवीक्षण आठवे॥६१॥मलयज[3]चर्चित बाहुयुगळ ॥ सालंकृत सुपीन सरळ॥ उर विशाळ लक्ष्मीबहळ॥उदर वर्तुळ तनुमध्य ॥ ६२ ॥ इत्यादि समस्त अवयवस्मृति ॥ आलिंगनार्थ क्षोभे वृत्ति ॥ वारंवार स्पृहा चित्तीं॥ मोहावर्तीं मन भ्रमवी ॥ ६३ ॥ बळें विसर पाडितां नपडे ॥ मूर्ति सालंकृत दृष्टीपुढें॥ दिसतां सुरतीं हांव वाढे ॥ कवळूं आवडे सप्रेमें ॥ ६४ ॥

व्रजवनौकसांव्यक्तिरंगतेवृजिनहंत्र्यलंविश्वमंगलम् ॥

---

[1] आनंदकारक. [2] सुंदर. [3] मलय पर्वतावरचा चंदन.

त्यजमनाक्नस्त्वत्स्पृहात्मनास्वजनहृद्रुजायान्निषूदनम् ॥ १८ ॥

व्रजजना तुझी मूर्ति सौख्यदा ॥ सकळ संकटें भंगि आपदा ॥
कृपणता त्यजीं दाविं मन्मथें ॥ स्वरत जाळिलों भंगिं ते व्यथे ॥ १८ ॥ हरिदयार्णवा० ॥

॥ टीका ॥ व्रजवनीं जयाचीं निकेतें[1] ॥ व्रजवनौकस ह्मणिजे त्यांतें ॥ तयां समस्तां प्राणियांतें ॥ प्रियतम वर्त्तें तव व्यक्ति ॥ ६५ ॥ कोमलामंत्रणें[2] ह्मणती अंग[3] ॥ तुझी व्यक्ति हे लावण्य सुभग ॥ व्रजजनवृजिनां[4] करी भंग ॥ कृपापांगमोक्षणें ॥ ६६ ॥ सर्वप्रकारें मंगलरूपा ॥ तुझी व्यक्ति हे मन्मथबापा ॥ विशेष आह्मांवरी अनुकंपा ॥ करूनि कंदर्पा परिहरीं ॥ ६७ ॥ हे तव व्यक्ति विश्वमंगल ॥ आह्मां हृच्छय अमंगल ॥ जाळी क्षोभोनि विरहानळ ॥ तो तां शीतळ करावा ॥ ६८ ॥ आमुच्या मानसा माझारी ॥ आलिंगनाची स्पृहा भारी ॥ ह्मणोनि कार्पण्य परतें करीं ॥ अल्पही धरीं परती ते ॥ ६९ ॥ आतां कार्पण्य नकरूनि कांहीं ॥ ईषन्मात्रही कृपेनें पाहीं ॥ हृच्छयरोग आमुचे हृदयीं ॥ भेषज[6] देईं तच्छमना ॥ ७० ॥ दुर्धर हृच्छय जेणें नाशे ॥ तुजपाशीं तें औषध असे ॥ देऊं जाणसी परमरहस्यें ॥ व्रीडाविशेषें वदों नशकों ॥ ७१ ॥ कथिला सनिदान हृच्छयोदय ॥ तच्छमनाचा जो उपाय ॥ भेषजप्रयोगसाधनकार्य ॥ गूढ अभिप्राय सूचिला ॥ ७२ ॥ औत्सुक्यें हे वदल्या गोठी ॥ तंव गमला कृष्णचि पातला निकटीं ॥ वोरसें[8] रुदन स्फुंदन कंठीं ॥ सप्रेम पोटीं भयभीता ॥ ७३ ॥ भयें कवळूनियां बोलती ॥ प्रियतम कारुण्य काकुलती ॥ ते गोपींची सप्रेम उक्ति ॥ परिसे नृपति शुक सांगे ॥ ७४ ॥

---

१ घरें. २ लाडक्या शब्दानीं हाक मारणें. ३ अरे. ४ पातकास. ५ दया. ६ औषध. ७ निदानासह. ८ स्नेहानें बाहेर फुटणें.

यत्तेसुजातचरणाबुरुहंस्तनेषुभीताःशनैःप्रियदधीमहिकर्कशेषु॥
तनाटवीमटासितद्व्यथतेनकिंस्वित्कूर्पादिभिर्भ्रमतिधीर्भवदायुषांनः ॥ १९ ॥

तव पदांबुजें चूचुकांवरी ॥ हळुच ठेवितां भीतसों हरि ॥
फिरसि काननें त्या पदीं कसा ॥ क्षतभयें बहू जीव हा पिसा॥१९॥ हरिदयार्णवा० ॥

॥ टीका ॥ प्रियतमा तुझीं सुकुमार पदें ॥ उपमे असाम्य तुळितां कुमुदें॥स्तनीं मर्दितां मानसमोदें॥भरतां खेदें झळंबतसों ॥ ७५ ॥ आंगीं नववयसेचा भर ॥ तेणें आमुचे कुच कठोर ॥ तव पद कुमुदाहूनि सुकुमार ॥ मर्दितां अपार भय मानूं ॥ ७६॥ हळुहळु स्तनमंडळीं॥मवाल पदतळ श्रीवनमाळी॥स्पर्शूनि भोगूं सुखनवाळी॥ मर्दनकाळीं श्रमभीता ॥ ७७ ॥ काननें फिरसी तयां चरणें ॥ नांगीकारूनि पादत्राणें ॥ कृपाळुपणें पशुरक्षणें ॥ पूर्णकारुण्यें जगदीशा ॥ ७८ ॥ तेव्हां कंटक चुंबिती चरणीं ॥ खडे रुतती कठोर धरणी ॥ क्षतवेदना तिखटां तृणीं ॥ हें अंतःकरणीं भय आह्मां ॥ ७९ ॥ कांटे खडे तृणांकुर ॥ ठेंचा लागती कठोर ॥ फांटे बोरबडती निंबर ॥ धांवतां सत्वर गोपृष्ठीं ॥८० ॥ सम विषम पाऊल पडे ॥ कोठें अवचके कोठें खडे॥सर्प विंचुवादि रगडतां किडे ॥ स्पर्शें रोकडे श्रमकर जे ॥ ८१ ॥ ऐशा अनेक वेदना ॥ होत असतीच तुझिया चरणा॥ विहारभरें तूं नधरिसी गणना ॥ परी आमुच्या मना जाकळिती ॥ ८२ ॥ तुझिया चरणांतें गवसणी ॥ जीवाप्राणांची चक्रपाणि ॥ करूनि साचिंत अंतःकरणीं ॥ आह्मी सदनीं दिन कंठूं ॥ ८३ ॥ सायंकाळीं अक्षत चरण ॥दे-

---

१ स्तनाचें अग्र. २ न अंगीकारून. ३ जून, कठिण. ४व्याकुळ करणें.

खतां आयुष्याभिवर्धन ॥ जैसें मत्स्यातें जीवन ॥ तवावलोकन तेंवि आह्मां ॥८४॥ प्रभातेपासून सायंकाळ ॥ वनीं फिरसी अवघा वेळ ॥ आमुची बुद्धि भ्रमें व्याकुळ ॥ आयुष्य केवळ तूं आमुचें ॥८५॥ ऐसिया गोपी कृष्णात्मका॥ विरहें पावोनि परम दुःखा ॥ नलभोनियां यदुनायका ॥ युगसम घटिका लोटिती ॥ ८६ ॥ एवं अध्यायसमाप्ति ॥ गोपिका विरहें सखेद रुदती ॥ हें ऐकोनि सूचिलें श्रोतीं ॥ त्यां येथ श्रीपति भेटविजे ॥८७॥ तरी अध्यायीं वक्ष्यमाण ॥ परीक्षितीतें शुक भगवान् ॥ ह्मणे राया यापरी जाण ॥ करिती रुदन गोपिका ॥ ८८ ॥

श्रीशुकउवाच ॥ इतिगोप्यःप्रगायंत्यःप्रलपंत्यश्चचित्रधा ॥
रुरुदुःसुस्वरंराजन्कृष्णदर्शनलालसाः ॥ २० ॥

हरिगुणा अशा गाति सुंदरी ॥ विलपती वनीं त्या परोपरी ॥
रडति गोपिका सुस्वरें धिटा ॥ हरिविलोकना लागिं लंपटा ॥ २० ॥

टीका॥ऐशा गोपी हरिगुणगान ॥ करितांस्मरतां भगवद्ध्यान ॥ स्फुंदन विलाप मांडिलें रुदन ॥कृष्णदर्शन वांछूनी ॥ ८९ ॥ अनुभूत हरिगुण सुस्वर गाती ॥ विरहें सखेद त्या विलपती ॥ कृष्णदर्शना लालस[२]वृत्ति ॥ सांगे भूपती शुकयोगी ॥ ९० ॥ ऐशा बहुधा शोकाकुळा ॥ जाणोनि कृपेचा कोंवळा ॥ करुणा आली त्या घननीळा ॥ प्रकट झाला त्यां माजी ॥ ९१ ॥

तासामाविरभूच्छौरिःस्मयमानमुखांबुजः ॥

---

१ आयुष्य वाढणें. २ उत्सुकतेची वृत्ति.

पीतांबरधरः स्रग्वीसाक्षान्मन्मथमन्मथः ॥ २१ ॥

प्रकट जाहला त्यां मधें हरी ॥ हासित ईक्षिल्या गोपसुंदरी ॥
वसनं पीवळें माळ साजिरी ॥ स्मराचि तो दयासिंधुवैखरी ॥ २१ ॥ हरिदयार्णवा० ॥

टीका ॥ जो कां शूरसेनाचा नातु ॥ शौरिनामें श्रीअनंतु ॥ वदनांबुजें हास्य करितु ॥ गोपीआंतु प्रकटला ॥
॥ ९२ ॥ नवघनभासुरसोज्वळकांति ॥ कंठीं मिरवी वैजयंती ॥ किरीटकुंडलांची दीप्ति ॥ कुंतलमंडितगंडयुगीं ॥
॥ ९३ ॥ माथां मयूरबर्हस्तबक ॥ मृगमदकुंकुमामिश्रिततिलक ॥ तरळ अपांग सरळ नासिक ॥ कुंदरदन शशिवदन
॥ ९४ ॥ प्रवाळाधर मंदस्मित ॥ आजानुबाहु भूषान्वित ॥ नववनमाळाकौस्तुभयुक्त ॥ मुरलीमंडित करकमळ
॥ ९५ ॥ विद्युद्भासुर पीतांबर ॥ मेखळे क्षुद्रघंटिकागजर ॥ चरणीं बिरुदांचा तोडर[2] ॥ वांकी नूपुर रुणझुणती
॥ ९६ ॥ मन्मथ मोही नारीनर ॥ त्या मन्मथासही मोहकर ॥ ऐसा सुंदर सालंकार ॥देखिला श्रीधर गोपींहीं
॥ ९७ ॥ कृष्णदर्शनें परमोत्साहो ॥ गोपी पावल्या तो अध्यावो ॥ ऐकावया सावध राहो ॥ सभाग्य समुदावो
श्रोत्यांचा ॥ ९८ ॥ अखिलात्मा जो एकनाथ ॥ चक्रवर्ती भेदरहित ॥ अहंशत्रु सेनेसहित ॥ मर्दूनि मिरवत
सुखासनीं ॥ ९९ ॥ श्रवणसुखाचें अन्नसत्र ॥ मुमुक्षुश्रोत्यांलागिं स्वतंत्र ॥ चिदानंदाचें वाढितां पात्र ॥ स्वानंद
सर्वत्र भोगिती ॥ ३०० ॥ गोविंदाच्या नामस्मरणें ॥ होय भवभंगगां[3] पारणें ॥ श्रवणसुखाच्या अगाधपणें ॥ दयार्णव
होणें मग तेहीं ॥ १ ॥ तेंहें श्रीमद्भागवत ॥ अठरा सहस्र संहितागणित ॥ परमहंसाचा एकांत॥शुक स-

---

१ वस्त्र. २ तोडा. ३ संसारांतील भिकाऱ्यांस. ४ त्यांनीं.

मर्थ निरूपी ॥ २॥श्रोता परीक्षिति सावध ॥ त्यामाजि हा दशमस्कंध ॥ गोपीगीत कथिलें विशद॥जें श्रवणें मोक्षद श्रोतयां॥ ३॥दयार्णवाची हे विनवणी॥ न्यून पूर्ण ग्रंथश्रवणीं ॥ आवडेल संपादूनी॥शुद्ध शोधूनि सांवरिजे ॥४॥ मी जें वदलों बाळपणें ॥ जीर्ण जाणोनि वृद्धगणने ॥ मानाल तरी उभयाचिह्नें ॥ समसमानें झांकावीं ॥५ ॥ बाळ चिवडी विष्ठामूत्र ॥ नग्न झांकलें नेणे गात्र ॥ तेथ मातेचे सदय नेत्र ॥ ते सर्वत्र सांवरिती ॥६॥तैसेंच जाणा वृद्धपण ॥ अनावर मळमूत्रांचें क्षरण ॥ देखतां शरीर उघडें नग्न ॥ सदय सज्जन जवंकिती[1] ॥ ७ ॥ एवं दोहींपरी माझी ॥ विनति संतांचे समाजीं॥न्यूनपूर्ण ग्रंथीचीं वाजी[2]॥तुमचे माथां मी नेणें॥८॥मी अकिंचन[3] देऊं काय॥भावें तुमचे वंदिले पाय ॥ सांभाळावें जननीन्यायें[4] ॥ सदयहृदय मज बाळा ॥ ३०९ ॥ ॥ इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यां संहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां गोपीगीत कथनंनामैकत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३१ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ मूल श्लोक ॥ २१ ॥ ॥ भाषा श्लोक ॥ २१ ॥ ॥ टीकाओव्या ॥ ३०९ ॥ ॥ एवं संख्या ॥ ३५२ ॥ ॥ ॥

---

१ झांकिती. २ बोभाट, अपवाद. ३ निर्धन. ४ आईच्या पद्धतीनें.

अध्याय ३२

॥ मग त्या बल्लवी सप्रेमरुदिता ॥ सांत्वनार्थ क्लेशनिहंता ॥
॥ प्रकट झाला मन्मथजनिता ॥ अकस्मात त्यांमाजी ॥ २८॥



श्रीपरब्रह्मणे नमः ॥ ॥ ज्याच्या दर्शनें परमोल्लास ॥ कैवल्यसुखा परिस विशेष ॥ तो गोपीमानसराजहंस ॥ नमूं निगमेश[1] गोविंद ॥ १॥ जैन मीमांसा पातंजल ॥ सांख्यवैशेषिकादि सकळ ॥ तव दर्शनावीण अकुशल ॥ दर्शनें केवळ अदर्शनें ॥ २ ॥ पूर्वपक्षेंशीं सिद्धांत ॥ हो कां उत्तमांग[2]ही वेदांत ॥ तव दर्शनेंवीण असमर्थ ॥ संसारध्वांत[3] निरसावया ॥३॥ कैवल्यसुखा तो सर्वगत ॥ भरलें अनुस्यूत[4] संतत ॥ असतां कल्पनाभ्रमें भ्रांत ॥ दुःखावर्त जग भोगी ॥ ४ ॥ कोणें कैवल्य हिरोनि नेलें ॥ किंवा कोठें रितें भरलें ॥ न्यून पूर्ण हिरवें पिकलें ॥ नाहीं ऐकिलें कें कोण्हीं ॥ ५ ॥ संतत सर्वगत असोनि काये ॥ जीव जाचती तापत्रयें ॥ जन्ममरणांचे सोसितां घाये ॥ नफवे माये माजिवडें ॥ ६ ॥ विसरे नृपातें भद्रासनीं-॥ हुनि सुषुप्ति पांगरूनी॥ व्याघ्रादिभयाची कणकणी ॥ घालोनि गहनीं भोगविजे ॥ ७ तैं त्या असोनि भद्रपीठ[5] ॥ निरसूं नशकेचि भय दुर्घट ॥ येथ जागरप्रद जो इष्ट ॥ तो वरिष्ठ सुखदाता ॥ ८ ॥ यालागीं नहोतां सद्गुरुभेटी॥ वेदांतादिशास्त्रकोटी ॥ जैशा वोसणतयाच्या गोठी ॥ वदतां वोंठी अनोळख॥९तस्मात् श्रीसद्गुरूच्या दर्शनें॥वेदशास्त्रांचें साचार जिणें॥मोक्षलक्ष्मी अहेवपणें ॥मिरवी भूषणें स्वसुखाचीं॥१०॥गोशब्दार्थें निगमानिकर॥तत्संवितीं जे अविकार ॥ तीचें मानससरोवर ॥हंस साचार तूं येथें॥ ११ ॥ तस्माद्गोपीहृदयमराळ ॥ तो तूं निगमात्मा निगमपाळ ॥ गोविंदनिगमेश केवळ ॥ नमन अविकळ सप्रेमें ॥१२॥

---

[1] वेदांचा स्वामी. [2] मस्तक. [3] संसाररूप अंधकार. [4] एकसारखें. [5] सिंहासन.

भेदवर्जित प्रेमोद्रेक ॥हाचि भजनविशेख॥ अखंडदर्शनात्मक सुख॥प्रकट एक उभयत्र ॥ १३ ॥ ऐसें करितां अभेद स्तवन ॥सद्गुरु सच्चिदानंदघन ॥ स्वसत्ता आकर्षूनियां मन ॥ दीधलें स्मरण ग्रंथाचें ॥ १४॥ कृष्णवियोगें विरहाभिभूता ॥ गोपी हुडकितां जाल्या श्रांता ॥ तिहीं पुलिनीं गाइलें गीता ॥ ते गतकथा संपली ॥ १५ ॥ यावरी तयां रुदितां प्रति॥कैसा भेटला श्रीपति ॥ तद्दर्शनें हर्षावाप्ति ॥ कैशा युवति पावल्या॥१६॥ तो वाखाणी बत्तिसावा ॥ गोपी आणि वासुदेवा ॥ जो मिळणीचा स्वानंदठेवा ॥ श्रवणें विसांवा सर्वांसी ॥ १७ ॥ ऐसें सद्गुरु संवेंदन ॥ प्रेरितां प्रज्ञा लाहोनि मन ॥ निरूपी दयार्णवाचें वदन ॥ भाषाव्याख्यान हरिवरद ॥ १८॥ गताध्यायीं गायनरूपी ॥ विरहविलाप करिती गोपी ॥ सप्रेम जाणोनि विश्वव्यापी ॥ तत्संकल्पीं कळवळिला ॥ १९ ॥

श्रीशुकउवाच ॥ इतिगोप्यः प्रगायंत्यः प्रलपंत्यश्चचित्रधा ॥
रुरुदुःसुस्वरंराजन्कृष्णदर्शनलालसाः ॥ १ ॥

टीका ॥ अलंकारार्थ पूर्विलाध्यायीं ॥ श्लोकद्वयें कथिलें पाहीं॥ पुन्हा प्रारंभीं ये अध्यायीं॥तें युग्मकही आदरिलें ॥ २० ॥शुक ह्मणे गा मात्स्यीरमणा ॥ ऐशा पुलिनीं बल्लवललना॥कृष्णवेधें विचित्रगाना॥ करिती रुदना विवशत्वें ॥ २१ ॥ देवतासंचारें झाड वाजे ॥ तेंवि बल्लवी विवश ह्मणिजे ॥ येथ गायनविकार जे जे॥ श्रीकृष्णतेजें प्रस्फुरित ॥ २२ ॥ राग हिंगुळ मालकौशिक ॥ मेघमल्हार दीपक ॥ दारापुत्रेंशीं भैरवप्रमुख ॥ गाती सम्यक बल्लवी ॥२३ शुकें कथिलें सुमुखवृत्त ॥ परी त्या विचित्रच्छंदें बहुत॥ पद्यंप्रबंध सुस्वरगीत ॥ तालसंगीत गुणामिश्र

---

१ अनुभवज्ञान. २ गायनांतील रागांच्या स्त्रिया व पुत्र यांसह.

॥२४॥कीं तें जाणों विरहगान॥कीं गोपींचें आर्तरुदन॥कीं तें श्रीकृष्णगुणकीर्तन॥वेधी तनुमन श्रुतिपठनें॥ २५॥
हृदयीं कृष्णदर्शनआर्ति ॥ येर विवश तनुमनस्मृति ॥सर्वव्यापी सर्वज्ञमूर्ति ॥ जाणोनि चित्तीं कळवळिला॥२६॥

तासामाविरभूच्छौरिःस्मयमानमुखांबुजः ॥ पीतांबरधरस्रग्वीसाक्षान्मन्मथमन्मथः ॥ २ ॥

टीका ॥ प्रेमा उरवूनि आयासपरा ॥ आदर नहोतां पाठिमोरा ॥ विवशवृत्ति श्रमनिर्भरा॥ वेधें श्रीधरा जाकळिलें॥२७॥
मग त्या बल्लवी सप्रेम रुदिता॥सांत्वनार्थ क्लेशनिहंता॥प्रकट झाला मन्मथजनिता ॥अकस्मात त्यांमाजी ॥ २८ ॥
रातोत्पलदलपदतलमृदुल ॥ इंद्रोत्पलनिभ तनुभां[1] सुनीळ ॥ घोंटी वर्तुळ सकोमळ॥ अंगुळें केवळ
नवकळिका ॥ २९ ॥ गुल्फप्रांतीं वांकी वाळे ॥ अंदूनूपरध्वनि सुताळें ॥ गर्जताती सोहंमेळे ॥ बिरुदमाळे समवेत ॥ ३० ॥
शरणागतां अभयंकर ॥ निजपदभजकां वज्रपंजर ॥ नामस्मरणें भवकुंजर ॥भंगी तोडर पदपद्मीं ॥
३१ ॥ नाभीपासूनि गुल्फवरी ॥ चंचल चपल चमत्कारीं ॥ शोभा विचित्र पीतांबरीं ॥ वरी साजिरी मेखळा ॥
३२॥ अनेकभक्तजनांच्या व्यक्ति ॥ सहित चरित्रें अवतारपंक्ति ॥ मेखळे खेवणा[2] वोप देती ॥ क्षुद्रघंटिका किंकिणी
३३ ॥ मेखळामध्यमणीची प्रभा ॥ उमाणी[3] त्दृदयींच्या कौस्तुभा ॥ मध्यलोहींव[4] पंजजनाभा ॥ त्रिजगद्गर्भा रजरंगें ॥ ३४ ॥
रोमराजी कोमलतर ॥जे शोभवी वय किशोर ॥ वैजयंती वैडूर्यहार ॥ वनशृंगार त्या उपरी ॥ ३५ ॥
श्रीवत्सांकित वक्षःस्थळ ॥ कमलानिवासनिकेत अमळ ॥ अनर्घ्यमौक्तिकमणींची माळ ॥ कंठीं झळाळ दावितसे
॥ ३६ ॥बाहु सुपीन सोज्वळ सरळ ॥ कूर्परमणीबंध करतळ॥सुरेख सामुद्रिकादिमेळ॥नख वर्तुळ रत्नाभ[5] ॥३७॥

---

१ देहकांति. २ कोंदण. ३ तुलना करी. ४ मध्यभागीं आरक्तता. ५ रत्नकांति.

केयूरागदें बाहुवटीं ॥ जडित कटकें द्वयमणगटीं ॥ रत्नजडित मुद्रिकादाटी ॥ दोहीं बोटीं मिरवतसे ॥३८ ॥
उदार हनुवटी गंडयुगळ ॥ कंबुकंठ जो निगममूळ ॥ अधरपल्लव सकोमळ ॥ नासिका सरळ जलजाक्ष[1] ॥३९ ॥
नयन आकर्ण श्रवणशोभा ॥ कुंतलमंडित कुंडलप्रभा ॥ ललाटपट्टिकेचिया गर्भा ॥ भावी भासुर भागवत ॥४० ॥
मयूरबर्हवलयवळित ॥ चंचच्चामीकर[2]मंडित ॥ विचित्रप्रभावैडूर्यजडित ॥ मुकुट मिरवे मस्तकीं॥ ४१ ॥ गुंजावतंस
सुरंगसुमनें ॥ कर्णीं कर्णिकारैं[3] विद्रुमारुणें[4] ॥ दशनदीप्तीचें चांदिणें ॥ स्मित भाषणें फांकतसे ॥ ४ ॥ केशरमृगमद-
चंदनातिलक ॥ माणिक्य[5]रंगीं अक्षतसुरेख ॥ दक्षिणगल्लीं अंजनांक ॥ दृक्संपर्क भयहरणा ॥ ४३ ॥ तांबूल-
चर्चित सृक्किणी[6]भाग ॥ अधर रसना दशन सुरंग ॥ साग्र रसाळ कार्मुक चांग ॥ मिरवी सांग वामकरीं॥४४॥
सपूर तगटी पटप्रावरण ॥ दक्षिणहस्तीं लीलेकरून ॥ धरिले पंच कुसुमबाण ॥ जनमोहन जगदात्मा ॥४५ ॥
कामिनी वेधती काममार्गणें ॥कीं मानिनी मन्मथबाणें ॥ कंदर्पकोटि तेंवि भुलवणें ॥ कटाक्षमोक्षणें ज्याचेनी॥४६॥
रसाळ रस जैं रसना चरे ॥ तैं कामना कामिकां स्फुरे॥ सुरतरहस्यें मन्मथ विचरे॥ तैं रुचिकरें रतिलास्यें॥४७॥
तो जगज्जीवन त्रिजगद्धर्त्ता ॥ रस रसज्ञा रससंवेत्ता ॥ कंदर्पकोटींतें भुलविता ॥ मन्मथजनिता वनमाळी॥ ४८॥
मदनदाहक जो मदनारि ॥ तोभुलविला प्रमदाकारीं ॥ नटोनि निमिषामाझारी ॥ थैथैकारीं नाचविला४९ ॥साक्षा-
न्मन्मथाचा मन्मथ ॥ तो प्रमदाप्रणयप्रणतनाथ ॥ प्रकट झाला अकस्मात ॥ वधूकुमुदांत शशी पूर्ण॥ ५०॥
कृष्णदर्शनीं गोपिकांसी ॥ अद्भुत उत्साह जो मानसीं ॥ कोंदला तो नृपापाशीं ॥ आनंदेंशीं शुक सांगे ॥ ५१ ॥

तंविलोक्यागतंप्रेष्ठंप्रीत्युत्फुल्लदृशोऽबलाः ॥ उत्तस्थुर्युगपत्सर्वास्तन्वःप्राणमिवागतम् ॥ ३॥

---

१ कमलनयन. २ चकचकीत सुवर्णानें शोभमान. ३ कमलकोश. ४ पोंवळयाप्र०लाल. ५ काजळाचा तिलक. ६ ओष्ठप्रांत.

॥ टीका ॥ प्रकर्षें करूनि जो कां इष्ट ॥ तो एक आत्मा सुखसंतुष्ट ॥ ह्मणोनि त्यातें बोलिजे प्रेष्ठ ॥ गोपीतन्निष्ठ सप्रेमें ॥ ५२ ॥ परमप्रेष्ठ श्रीकृष्णातें ॥ गोपी चिंतितां सप्रेमचित्तें ॥ अवचित देखोनि उत्फुल्लितें ॥ झालीं सनेत्र मुखकमळें ॥ ५३ ॥ युगपत् ह्मणिजे एकेक्षणीं ॥ अवघ्या उठिल्या खडबडोनी ॥ जैशा तनु प्राणागमनीं ॥ चेतना लाहोनि टवटविती ॥ ५४ ॥ चंद्र प्रकटतां कुमुदिनी ॥ कीं सूर्यदर्शनीं पद्मिनी ॥ कीं गजयूथपाच्या आगमनीं ॥ मत्तकरिणी प्रोल्लसिता ॥ ५५ ॥ तैशा उल्लासभरें अबळा ॥ जाऊनि कवळिती तमाळनीळा ॥ पृथगावयवीं गोपी सकळा ॥ तें भूपाळा अवधारीं ॥ ५६ ॥

काचित्करांबुजंशौरेर्जगृहेंऽजलिनामुदा ॥ काचिद्दधारतद्बाहुमंसेचंदनभूषितम् ॥ ४ ॥

॥ टीका ॥ उल्लास संभ्रमाच्या भरें ॥ कोण्ही एकी प्रेमादरें[1] ॥ कृष्णकराब्ज उभयकरें ॥ धरिती सत्वर स्मितवक्त्रा ॥ ॥ ५७ ॥ बद्धांजलि द्वयकरतळ ॥ माजि कवळिती हरिकरकमळ ॥ वदन करूनियां अळिउळ ॥ प्रेमविह्वळ चुंबिती ॥ ॥ ५८ ॥ प्रेमसुभरें कोण्ही प्रमदा ॥ चंदन चर्चितशुभमकरंदा[2] ॥ सहित श्रीकृष्णबाहु खांदा ॥ धरूनि मोदा पावती ॥ ५९ ॥

काचिदंजलिनागृह्णात्तन्वीतांबूलचर्वितम् ॥ एकातदंघ्रिकमलंसंतप्तस्तनयोरधात् ॥ ५ ॥

टीका ॥ बद्धांजलिकराब्जयुगळा ॥ वोढवूनि[3] एकी वेल्हाळा ॥ चर्वित हरिमुखींच्या तांबूला ॥ घेती झाली स-

---

१ अतिप्रेमानें. २ पुष्परस. ३ पुढें करून.

प्रेमें ॥ ६० ॥ मनसिजतापें स्तन संतप्त ॥ ह्रदयीं कठोर व्यथाभूत ॥ एकी तन्वी तच्छमनार्थ॥ शंतम धरित पदकंज[1]
॥ ६१ ॥ ह्रच्छयरूपी ह्रद्भवं[2] गर ॥ ज्याची केवळ शमनाकार[3] ॥ हरिपदकंज शीतळतर ॥ धरितां सत्वर त्या शमवी
॥६२॥एकी उताविळिया बाळा ॥ वक्षीं स्पर्शिती हरिकरकमळा ॥ एकी चुंबिती वदनोत्पळा ॥ पादाब्जयुगळा
पैं एकी ॥ ६३ एकी हरिभुज आपुले खांदा ॥ चंदनचर्चित धरिती मुग्धा ॥ चर्वित तांबूल एकी प्रमदा ॥ घेऊनि
मोदा पावती ॥ ६५ ॥ ऐसिया निकट संघट्टनीं ॥ मिनल्या औत्सुक्यें विरहिणी ॥प्रेमसंभ्रमें संतोषूनि॥हरिमुखनयनीं
निरखिती ॥ ६६ ॥

एकाभ्रूकुटिमाबध्यप्रेमसंरंभविह्वला ॥ घ्नंतिवैक्षत्कटाक्षेपैः संदष्टदशनच्छदा ॥ ६ ॥

टीका ॥ प्रीतिप्रचुर क्रोधोद्गम ॥ प्रेमसंरंभ तयासि नाम॥तेणें विह्वळ त्हदयपद्म॥पाहे सकाम अपांगीं॥६६॥
ऊर्ध्वदशनीं[4] अधर दष्ट ॥ आकर्ण भृकुटी कार्मुक[5]कष्ट ॥ कटाक्षाविक्षेप स्मरशरातिखट ॥ मारी उद्भट[6] ईक्षणीं ॥६७ ॥
ललनालोचनकटाक्षबाण ॥ रतिरसरासिक वयसा तरुण ॥ स्मरसमरंगीं साहे कोण॥तो एक श्रीकृष्ण स्मरविजयी ॥
॥६८॥धीरवीर जे रणचत्वरीं ॥ मृगेंद्र मर्दिती बाहुप्रहारीं ॥ तेही ललनालोचनशरीं ॥ क्षणा माझारी भंगती॥६९ ॥
योषिताआसव मादकपणें ॥ तुकितां योषिता बहुतां गुणें ॥ आगळी कीजे मादकस्मरणें ॥ येर अवघ्राणें जरी तीव्र
॥ ७० ॥ वामदृशांचे कटाक्षबाण ॥ विलासमंडित सस्मितठाण ॥ अवयवईक्षण प्रियभाषण ॥ घडतां कोण स्मरजेता
॥ ७१ ॥ काम जाळूनि स्मरांतक ॥ ह्मणवी प्रतापें त्र्यंबक ॥ तो शबरीनें केला रंक॥वनीं निःशंक स्मरवेधें॥ ७२॥

---

१ पदकमल. २ त्हद्यांत उत्पन्न होणारें. ३ यमासारखें. ४ वरचे दांत. ५ धनुष्य. ६ आवेशानें.

आबद्ध भृकुटी कुटिलापांगीं ॥ सुबद्धठाणीं स्मरसमरंगीं ॥ कटाक्षबाणीं यू[1]नाआंगीं ॥ जंव तन्वंगी न विंधी ॥ ७३ ॥
तंववरी कामजयाच्या गोठी ॥ करिती नर सुर योगी हठी ॥ ललनालोचनसाय[2]कवृष्टि ॥ हर परमेष्ठी नसाहती॥७४॥
ऐसिया असंख्य बल्ल[3]ववामा॥रतिरसरासिका क्षोभक कामा॥जिंकूं न शकती मेघश्यामा॥कीं तो परमात्मा स्वात्मरत७५
तदुपरी एकी आभीर[3]वनिता ॥कृष्ण जाणोनि मन्मथजेता॥चकोरवृत्ति त्वच्छयव्यथा॥शमवी तत्त्वता तें ऐक॥७६॥

अपरानिमिषद्दृग्भ्यांजुषाणांतन्मुखाबुजम् ॥ आपीतमपिनातृप्यत्संतस्तच्चरणंयथा ॥ ७ ॥

॥ टीका ॥ कृष्ण नाकळे सकामयोगें ॥ ह्मणोनि आकळी लोचनमार्गें ॥ निमेषवर्जित सानुरागें ॥ बद्धापांगें
ऐकाग्र्यें ॥ ७७ ॥ पूर्णशरदिंदु चकोरें॥लक्षिती अनिमेषें नीहारें ॥ निवती वेधामृततुषारें॥ प्रेमसुभरें रसपुष्टि॥७८॥
कृष्णवदनेंदु तैसा नयनीं ॥ अनिमेष प्राशितां मानिनी ॥ चिरकाळेंही तृप्ति न मनीं॥ तनुवाग्मनीं ताटस्थ्यें॥७९॥जै-
से सज्जन हरिपंदकंज॥ हृदयीं ध्याती तेजःपुंज ॥ नित्यनूतनसुखाची वोज ॥ नाचवी भोज[4] अविसंबें ॥८० ॥ असो हे
लक्षयोगाची कळा ॥ तंव एकी बल्लवीध्यानकुशला ॥ आपाद श्रीकृष्ण लक्षूनि डोळां॥आणी त्वत्कमळा सप्रेमें॥८१॥

तंकाचिन्नेत्ररंध्रेणत्द्दादिकृत्यनिमील्यच ॥ पुलकांग्युपगुह्याऽऽस्तेयोगीवाऽऽनंदसंप्लुता ॥ ८ ॥

॥ टीका ॥ मग बैसोनि एकांतीं ॥ त्हृदयीं पाहूनि श्रीकृष्णमूर्ति ॥ आलिंगूनियां स्वसुखास्थिती ॥
भोगी विश्रांति पूर्णत्वें ॥ ८२ ॥ पूर्णविश्रांतीची ठेव ॥ सबाह्य उमटती अष्टभाव ॥ स्वेद रोमांच पुलकोद्भव ॥

---

१ तरुणाच्या शरीरावर. २ बाण, ३ गोपस्त्री. ४ आवड-इच्छा. ५ रोमांच उत्पन्न होणें.

बाष्पादि सर्वसुखाचिह्नें ॥ ८३ ॥ जैसे योगी आनंदकंद ॥ चिंतिती हृत्कमळीं गोविंद ॥ अमृतोदधीमाजि ते बिंद॥ होती अभेद सुखलाभें ॥ ८४ ॥ असो गोपींची ऐशी हांव॥ पृथगाकारें वासुदेव ॥ कवळिला तो कथितां भाव ॥ अपार अथाव[1] प्रेमाब्धि ॥ ८५ ॥ आतां समुच्चयात्मक रीति ॥ शुक निवेदी रायाप्रति॥समस्ताही बल्लवयुवति ॥ देखोनि श्रीपति हरिखेल्या ॥ ८२ ॥

सर्वास्ताःकेशवालोकपरमोत्सवनिर्वृताः ॥ जहुर्विरहजंतापंप्राज्ञंप्राप्ययथाजनाः ॥ ९ ॥

॥ टीका ॥ केशव ह्मणिजे क्लेशनाशन॥अभीष्ट प्रेष्ठ प्राणांहून ॥त्याचें होतांचि दर्शन ॥ सर्व वधूजन निवाला ॥ ८७ ॥ परमोत्साहें निर्भर मनीं ॥ झाल्या त्यागून विरहग्लानि ॥ जैसे प्राज्ञांतें पावोनि ॥ ताप सांडूनि जन निवती ॥ ८८ ॥ कोण प्राज्ञ कैसे जन ॥ ऐका त्रिविध हें लक्षण ॥ मुमुक्षु जे ईश्वर प्राज्ञ ॥ त्यांतें पावोनि श्रम त्यजिती ॥ ८९ ॥ जीवत्वभेदें वियोगविरहें ॥ अनादिअविद्याभ्रमप्रवाहें ॥ संतप्त तापत्रयाच्या दाहें॥ ते लवलाहें सांडिती ॥९०॥ शुद्ध सात्विकां हे प्राज्ञभेटी॥राजसाची ऐका गोठी॥अहंममपदरा देऊनि गांठी॥संसारखुंटीं निबद्ध जे ॥ ९१ ॥ मी सबळ तरुण लावण्यरूप॥ माझी माय माझा बाप॥माझें कुळशील प्रताप॥वृत्ति अमूप पैं माझी ॥ ९२ ॥ माझी विद्या अव्याहत[2] ॥ माझें द्रव्य अपारिमित ॥ माझी यशकीर्ति विख्यात ॥ ऐश्वर्य ऊर्जित[3] पैं माझें ॥ ९३ ॥ ऐसा ऐश्वर्यसंपदामदें ॥ नाचों लागे ममताछंदें ॥ तंव काळवैगुण्यप्रारब्धें[4] ॥ सर्वेंचि खेदें जाजावे ॥ ९४ ॥ द्रव्यहानि स्वजनशोक ॥ मानभंग होतां दुःख ॥ शिणे जाजावे बहुतेक ॥ नवटे सुख संसारीं ॥

---

१ अगाध. २ अकुंठित. ३ बळकट. ४ काळाचा विपरीतपणा व प्रारब्ध यांनीं.

९५ ॥ त्यासि प्राज्ञ ब्रह्मनिष्ठ गुरु ॥ भेटतां बोधी भव नश्वर ॥ इहामुत्र असाचार ॥ कळतां बिरागपर होय
॥ ९६ ॥ विवेकसुविचारपरिपाटीं ॥ साधनसंपत्ति लावी पाठीं ॥ व्यतिरेकान्वयबोधें[1] तुष्टि ॥ दुःखराहटी पारु-
षवी ॥ ९७ ॥ सविश्वासें दृढ निष्ठा ॥भंगूनि अनादि अनुभूत कष्टां ॥ स्वानंदभुवनीं करी प्रतिष्ठा॥ योनिसंकटा
निरसूनी ॥ ९८ ॥ आतां तामस मूढ जन ॥ खेचर भूचर जलचर पूर्ण ॥ सुषुप्तिकालीं पावती प्राज्ञ ॥ द्वय
अभिमानें लययोगें ॥ ९९ ॥ विक्षेपगर्भीं दंवदंव केली ॥ तितुकी तेथ लया गेली॥ प्रचुर आनंदावाप्ति झाली ॥
प्राज्ञसंगें त्या जैसी ॥ १०० ॥ केशवदर्शनें गोपी तैशा ॥ पावल्या परमानंदोत्कर्षा ॥ विहरजनिता तापलेशा ॥
त्यजिलें मानसा माजूनी १ ऐसा संतुष्ट बल्लवीगण ॥ वेष्टित प्रेष्ठतम भगवान ॥ तिष्ठतसे त्या उपमा कोण ॥
व्यासनंदन अनुवादे ॥ २ ॥

ताभिर्विधूतशोकाभिर्भगवानच्युतोवृतः ॥ व्यरोचताधिकंतातपुरुषःशक्तिभिर्यथा ॥ १० ॥

॥ टीका ॥ साधनसंपत्तिपूर्वक ॥ निर्धूत सर्वाशय सम्यक ॥ त्या गोपिका विधूतशोक॥ जैसें कनकपुट शुद्ध
॥ ३ ॥ कीं जहदजहल्लक्षणायोगें ॥ शबलवाच्यांशपरित्यागें॥ शुद्धलक्ष्यांश सांख्यमार्गें ॥ प्रत्यगात्मत्वें निवडती
॥ ४ ॥ तैसिया पावोनि अनंता ॥ समस्त गोपी शोकविगता ॥ तिहीं वेष्टित मन्मथजनिता ॥ शोभे सविता
जैंवि किरणीं ॥ ५ ॥ किंवा वेष्टित षोडशकला ॥ शोभा आगळी शशिमंडळा ॥ कीं सजीववेष्टित अमरपाळा ॥
शोभे स्वलीला पुरुहूत ॥ ६ ॥ कीं परमात्मा चित्प्रकृति ॥ अचिंत्यैश्वर्य अनंतशक्ति ॥ मंडित मिरवी अगाध

---

[1] अमुक असतां अमुक असतें असाअर्थ.उ०अग्नि आहे तेथें धूम आहे,हा अन्वय.अमुक नरुतां अमुक नरुतें असा अर्थ व्य.उ०अग्नि नाहीं तेथें धूम नाहीं.हा व्य०

व्याप्ति ॥ तैसा श्रीपति शोभतसे ॥ ७॥ किंवा उपासकपुरुषभक्ती- ॥ पूर्वक ज्ञानबळादि शक्ति- ॥ संपन्न आणि जेंवि अभिव्यक्ति ॥ यथापद्धति औपास्या[1] ॥ ८ ॥ किंवा कुंकुमतिलक निडळीं ॥ पदकरकंठीं श्रवणीं मौळीं ॥ भूषणीं मिरवे सौभाग्यशाली ॥ तेंवि वनमाळी वधूयुक्त ॥ ९ ॥ किंवा प्रकृतिविकृतिसहित ॥ चतुर्विंशतितत्वान्वित ॥ जीवचैतन्य विग्रहवंत ॥ विद्यामंडित ज्यापरी ॥ १० ॥ विधूतशोक[2] गोपींमाजि ॥ प्रेमोत्फुल्लित नयनांबुजीं ॥ कृष्ण मिरवे जेंवि पंकजीं ॥ केशरराजी माजि भ्रमर ॥ ११ ॥ ऐसा विशेषें कोणे ठायीं ॥ गोपीवेष्टित शेषशायी ॥ मिरवला तें व्याख्यान दोहीं ॥ श्लोकीं श्रोतीं परिसावें ॥ १२ ॥

ताःसमादायकालिंद्यानिर्विश्यपुलिनंविभुः ॥ विकसत्कुंदमंदारसुरभ्यनिलषट्पदम् ॥
शरच्चंद्रांसुसंदोहध्वस्तदोषातमःशिवम् ॥ कृष्णायाहस्ततरलाचितकोमलवालुकम् ॥ १२ ॥

॥ टीका ॥ महापूरप्रवाहघृष्ट ॥ तें बोलिजे वाळुवंट ॥ जेथूनि दृष्ट जळाचा पाट ॥ महानदीतट तेथवरी ॥ १३ ॥ जें कां सदैव प्रावृट्काळीं ॥ निमग्न राहे सरिज्जळीं[3] ॥ शरत्समयीं प्रवाहाजवळी ॥ मृदुळ स्थळीं पुलिनाख्या ॥ १४ ॥ पूर्वी गोपिका पूरपुलिनीं ॥ रुदती गाती विरहग्लानि ॥ कृष्ण तयांसि घेऊनी ॥ सरित्पुलिनीं पातला ॥ १५ ॥ दोघीं स्त्रियांसि एक कांत ॥ तेथ सापत्नता आक्रांत ॥ विभु श्रीकृष्ण समर्थ ॥ रमवी समस्त एकात्मा ॥ १६ ॥ कृष्णें आणिल्या जया पुलिना ॥ ऐका तयाच्या गुणलक्षणा ॥ जाणोनि नृपाच्या आगमना ॥ दासी शयना जेंवि रची ॥ १७ ॥ तेंवि यमुने सप्रेमभरें ॥ तरळतरंगहस्ताकारें[4] ॥ पुलिन सुखशयनप्रकारें ॥

---

[1] उपासना करण्यास योग्य. [2] शोकरहित. [3] नदीच्या उदकांत. [4] चपल असे लाटारूपी हस्त.

रचिलें सादर मृदुतर ॥१८॥ जाणोनि स्वामीचा विलास ॥ वसंत शोभवी काननास ॥ कुंदकल्पद्रुमादि अशेष॥ पुष्पीं विकास सौरभ्यें ॥ १९ ॥ तया कुसुमित काननावरून ॥ मंद सुगंध झुळुके पवन ॥ तया पंथें भ्रमरगण ॥ कुमुदोदरीं रुणझुणिती ॥२०॥ शरच्चंद्रींचे संपूर्ण किरण॥ निशिगर्भींचें तमो पहरण॥ करिती तेणें शोभायमान॥ मिरवी- कल्याण शर्वरी॥२१॥इत्यादि गुणीं गुणसंपन्न॥रम्य मृदुल जाणोनि पुलिन॥वधूगणवेष्टित मधुसूदन॥तेथ संपूर्ण शोभला ॥२२॥पूर्विलाहूनि वसंतीं वन॥ सभूषा अंजित युवतिनयन ॥ किंवा साम्राज्यश्रीसंपन्न॥ शोभे संपूर्ण भूपत्व ॥ २३ स्वरत सप्रेम गोपीगण ॥ वेष्टित तैसा मधुसूदन ॥ शोभता झाला अमृतांकिरण॥ मिथां मंडन उडुवल्लयीं ॥ २४ ॥ जीवनें टवटविती काननें ॥ कीं मनुजादि अन्नपानें ॥ तेंवि चित्प्रभा समस्त भुवनें॥ एक्या श्रीकृष्णें शोभती ॥ २५ ॥ त्या कृष्णाची अधिकतर ॥ गोपीवेष्टित लक्ष्मी रुचिर ॥ वर्णितां वर्णपंक्तीं- चे भार ॥ नपवे पार वाक्पतिही ॥ २६ ॥ परंतु गोपींचा उत्साह ॥ कृष्णप्रेमा निःसंदेह ॥ एकाग्र करूनि वृत्तिसमूह ॥ श्रवणप्रवाह सांठविजे ॥ २७ ॥

तद्दर्शनाह्लादविधूतहृद्रुजोमनोरथांतंश्रुतयोयथाययुः ॥
स्वैरुत्तरीयैःकुचकुंकुमांकितैरचीक्लृपन्नासनमात्मबंधवे ॥ १३ ॥

॥ टीका ॥ कृष्णदर्शनें परमाह्लाद ॥ पावला संपूर्ण बल्लवीवृंद ॥ तेणें पुलिनशोभा विशद ॥ उत्साहप्रद त्यां झाली ॥ २८ ॥ विरहकाळीं तींचि पुलिनें ॥ भासत होतीं सम श्मशानें ॥ कृष्णावाप्तितोषांजनें ॥ सुख-

---

१ रात्र. २ कज्जलानें माखलेले. ३ चंद्र. ४ परस्पर. ५ नक्षत्रपुजांत. ६ बृहस्पति.

निधानें प्रकटलीं ॥ २९ ॥ विरहदुःखाचा हृद्रोग ॥ मनामाजील पावला भंग ॥ पूर्णचंद्रींचा लांछनडाग ॥ निघतां
सुधांग शशी जैसा ॥ ३० ॥ हृद्रोगविगता तैशा युवति ॥ मनोरथाची पावल्या शांति॥ संकल्पविकल्पातीतवृत्ति
॥ तेंवि शोभती पूर्णत्वें ॥ ३१ ॥ जेंवि कां श्रुतीचा समुदाय ॥ कर्मकांडीं साधनोपाय ॥ लक्षूनि जैसा
सकाम होय ॥ निजात्मप्रत्यय नफवोनी ॥ ३२ ॥ तेथ साधनें अतिदुर्घट ॥ आत्मलाभार्थ मानिलीं इष्ट ॥ तया
काम्यकष्टांचा शेवट ॥ आत्मा स्पष्ट अवगमतां ॥ ३३ ज्ञानकांडीं निजात्मप्राप्ति॥ लाहूनि निष्काम झाल्या
श्रुति ॥ कृष्णदर्शनें गोपयुवति ॥ तेंवि विश्रांति लाभल्या ॥ ३४ ॥ वृद्धकाळीं पतिव्रता ॥ धन सुत ऐश्वर्य
संप्राप्ता ॥ तथापि प्राणप्रियत्वें भर्त्ता ॥ भजे तत्वता सप्रेमें ॥ ३५ ॥ तेंवि अत्मोपलब्धा श्रुति ॥सप्रपंचभेदनिवृत्ति
॥ झालियाही निजात्मरति ॥ सप्रेमभक्ति अनुरक्ता ॥ ३६ त्या येथ गोपिका कृष्णागमनें ॥ हृद्रोगवर्जित
समाधानें ॥ पावल्या असतां पूर्णपणें ॥ सप्रेमभजनीं अनुसरल्या ॥ ३७ ॥अंतर्यामीं परमानंदु ॥ तोचि श्रीकृष्ण
आत्मबंधु ॥ त्या कारणें गोपीवृंदु ॥ भजता झाला आह्लादें ॥ ३८ ॥ फेडूनि उत्तरीयें वसनें ॥ आसनें रचिती
त्या कारणें ॥ कुचकुंकुमाचीं ज्यांवरी चिह्नें ॥ तीं सर्वज्ञें स्वीकेलीं ॥ ३९ ॥

तत्रोपविष्टोभगवान्सईश्वरोयोगेश्वरांतर्हृदिकल्पितासनः ॥
चकासगोपीपरिषद्गतोर्चितस्त्रैलोक्यलक्ष्म्येकपदंवपुर्दधत् ॥ १४ ॥

॥टीका ॥ गोपीदत्तोतरीयासनीं ॥ अचिंत्यैश्वर्यसुखाची खाणी॥तो बैसला पंकजपाणि॥ प्रेमा जाणोनि गोपींचा

---

१ अमृतमयशरीराचा. २ मनोव्यथारहित.

॥ ४० ॥ योगियां माजि थोर थोर ॥ कपिलप्रमुख विरिंचि हर ॥ हृदयांबुजीं बैसकार[1] ॥ ध्यानीं एकाग्र कल्पिती ॥ ४१ ॥ तो हा येथ यमुनापुलिनीं ॥ गोपीप्रेमाच्या सम्मानीं ॥ अर्चिला असतां अंतःकरणीं॥ आनंदोनि क्रीडतसे ॥ ४२ ॥ विश्वश्रियेचें लावण्य ॥ त्रैलोक्यमंजूषागर्भीं[2] पूर्ण ॥ ठेविलें होतें तें काढून ॥ एकला लेऊन मिरवला ॥ ४६ ॥ त्रैलोक्याच्या लावण्यराशि ॥ लेऊनि लक्ष्मी सौंदर्येंशीं ॥ झाली कृष्णरूपीं मिराशी[3] ॥ तैसे वपूशीं धरियेलें ॥ ४४ ॥ ऐसा पावोनि गोपीसभा ॥ तिहीं पूजितां पंकजनाभा॥ त्रिजगच्छ्रीची लावण्यशोभा ॥ तो कंदर्पगाभा नट धरिला ॥ ४५ ॥

सभाजयित्वातमनंगदीपनंसहासलीलेक्षणविभ्रमभ्रुवा ॥
संस्पर्शनेनांककृतांघ्रिहस्तयोःसंस्तुत्यईषत्कुपिताबभाषिरे ॥ १९ ॥

टीका ॥ ऐसा उत्तरीयवसनासनीं[4] ॥ पूजूनि सस्निग्ध मृदुभाषणीं ॥ सम्मानिला पंकजपाणि ॥ यमुनापुलिनीं गोपींहीं ॥ ४६ ॥ श्रीपद अंकावरी धरून ॥ करिती करकमळें मर्दन ॥जैसी कमला मर्दी चरण ॥ अंकीं ठेवून विष्णूचे॥४७॥तैसे चरण अंकावरी ॥धरूनि सादर वामकरीं ॥दक्षिणपाणि भ्रमरापरी ॥ चंचळ करूनि मर्दिती ॥४८॥उभय हस्तांचे स्पर्शनीं॥सम्यक्प्रकारें चक्रपाणि॥स्पर्शोनियां नानास्तवनीं॥स्तविती वदनीं सस्मिता॥४९॥ कामकौशल्यविलासचतुरा ॥ भो भो लावण्यरत्नाकरा ॥ गोपीमानसपंकजभ्रमरा ॥ श्रीसुखकरा रतिरसिका ॥ ॥ ५० ॥ जय जय कंदर्पोद्दीपना ॥ जय जय अमोघनवयौवना॥ जय जय मानिनीमानसहरणा ॥जगज्जीवना

---

१ बसणारा. २ त्रैलोक्य हीच पेटी तिच्या पोटांत. ३ वतनदार. ४ आंगावरील वस्त्र हेंच आसन.

जगन्मया ॥ ५१ ॥ वनितायौवनवनशृंगारा ॥ विरहप्रदा खदिरांगारा[1] ॥ प्रमदावदनपद्माकरा ॥ सम भास्करा प्रकाशका ॥ ५२ ॥ गोपीनयनचकोरचंद्रा ॥ अगाध अक्षयसौख्यसमुद्रा॥ ऐशा विकसित मानसमुद्रा ॥ स्तवनीं यदुवीरा तोषविती ॥ ५३ ॥ शुष्केंधनीं[2] इंधनाशन[3] ॥ बळेंचि चेतवी प्रभंजन[4] ॥ तेंवि जो अनंगोद्दीपन ॥ लीलावलोकनप्रसंगें ॥ ५४ ॥ तया कृष्णातें गोपनारी ॥ स्तवनीं स्तवोनि नानापरी ॥ चरण चुरिती ये अवसरीं ॥ सकोप कुसरी बोलती ॥ ५५ ॥ कोपामाजि प्रेमोत्कर्ष ॥ कोपकैंवाडें[5] वर्धिती तोष ॥ त्रिविधप्रश्नाचें करूनि मिष ॥ भाषणीं ईश तोषविती ॥ ५६ ॥ सकोप ह्मणाल कैशा कळल्या ॥ हास्यकटाक्षमोक्षणलीला॥ विभ्रमविलासें उपलक्षिल्या॥ प्रेमकोपिष्ठा ह्मणोनी॥ ५७॥ वक्र भ्रूकुटी सूची कोपा॥ स्मितवक्त्रें तो भासे सोपा॥ ऐसिया प्रेमसंरंभरूपा ॥ प्रश्नीं विकल्पा जल्पती ॥ ५८ यावरी त्यांची वक्रता ॥ परमचातुर्यकौशल्यता ॥ प्रश्नलाघवें मन्मथताता ॥ छळूं पाहती तद्वदन ॥ ५९ ॥ कृष्ण मानूनि अकृतज्ञ ॥ त्याच्या वचनें त्या दूषण॥ ठेवावया करिती प्रश्न ॥ हेतु लपवून गूढत्वें ॥ ६० ॥ लौकिकप्रवृत्तीची गोठी ॥ त्रिविध प्रश्नाच्या परिपाटी॥ निरोपूं जातां ठेवूं कुटी ॥ हा हेतु पोटीं तयांचे ॥ ६१ ॥

॥ गोप्यऊचुः ॥ भजतोऽनुभजंत्येकएकएतद्विपर्ययम्॥ नोभयांश्चभजंत्येकएतन्नोब्रूहिसाधुभोः ॥ १६ ॥

॥ टीका ॥ गोपी ह्मणती चक्रपाणि ॥ त्रैलोक्यचातुर्यचूडामणि ॥ आमुचा प्रश्न वाखाणूनी ॥ त्रिविध विवरूनि बोधावा ॥ ६२ ॥ त्रिविध प्रश्न कैसा कोण ॥ त्याचीं रूपें भिन्नाभिन्न ॥ जया करितां त्रिविध जन ॥ एक असोन

---

[1] खैराच्या लांकडांचा अग्नि. [2] शुष्क काष्ठादिकांनीं. [3] अग्नि. [4] वायु. [5] कोपाच्या अंगीकारानें.

ह्मणवीतसे ॥ ६३॥ एक इच्छूनि प्रत्युपकार ॥ करिती भजनाचा आदर ॥ त्या भजकांसि भजनपर ॥ होती अपर परस्परें ॥ ६४ ॥ एक नभजंतयातें भजती ॥ प्रत्युपकार नापेक्षिती ॥ एक भजतयातेंही न भजती ॥ ऐसी पंक्ति त्रिविधांची ॥६५॥ भो भो चतुरा जगदीश्वरा॥या तिघांमाजि कोण तो बरा॥साधु साधुत्वें निर्धारा॥आणूनि श्रीधरा बोलावा ॥ ६६ ॥ हें ऐकोनि सर्वज्ञनाथ ॥ जाणोनि प्रश्नाचा गुह्यार्थ॥बोले प्रत्युत्तर यथार्थ ॥ स्वार्थ परमार्थ प्रकटूनी ॥ ६७ ॥ ते भगवन्मुखींची प्रश्नव्याख्या ॥ सावध ऐकें कौरवमुख्या॥पूर्णचंद्रींची जेंवि अभिख्या ॥ आप्यायका त्रिजगातें ॥ ६८ ॥

मिथोभजंतियेसख्यःस्वार्थैकांतोद्यमाहिते ॥ नतत्रसौहृदंधर्मःस्वार्थार्थंतद्धिनान्यथा ॥ १७ ॥

॥ टीका ॥ प्रथमप्रश्नाचें उत्तर ॥ ऐका सख्या हो सादर ॥ प्रत्युपकारीं भजनपर ॥ तें यदुवीर वाखाणी ॥ ६९ ॥ प्रत्युपकार लक्षूनि दृष्टि ॥ भजनादर विशेष पोटीं ॥ हे रजो गुणाची राहटी ॥ सकळसृष्टिप्रवर्तक ॥ ७० ॥ कृष्ण ह्मणे गोपिकांसी ॥ सख्या हो ऐका रहस्यासी॥सकाम लक्षूनि निजस्वार्थासी ॥येरयेरांसि उपकरती ॥७१॥तें परमार्थ सहसा भजन नोहे ॥ स्वार्थमूळांचि उघड होय ॥ अविद्याजनित मोहप्रवाहें ॥ मिथ्या होय फळसिद्धि ॥७२ ॥ गृहस्थ यज्ञें भजती सुरां॥ सुरवर भजती वृष्टिद्वारा ॥ भजनादर हा परस्परां ॥ स्वार्थवर्धक उभयत्र ॥ ७३ ॥जल अर्पूनि द्रुमामूळीं॥निशिदिनीं वना भजती माळी॥तें वन दुभतां पुष्पीं फळीं॥भजले समूळीं आपणांतें ॥७४॥धेनूसि भजती अर्पूनि तृण॥देखुनी दुग्धाचें उपकरण॥भजन नव्हे तो उद्यम जाण॥स्वार्थसाधन परस्परें ॥७५॥नरनारींचा मिथा

---

१ न भजणाऱ्यास. २ शोभा. ३ तृप्तिदायक. ४ परस्परांस. ५ स्वार्थ हेंच मूलकारण ज्यास तें

काम ॥ मिथा वार्धुषपण[1]संभ्रम॥ना तें सौहार्द ना तो धर्म ॥ स्वार्थोद्यम आन नोहे॥ ७६परस्परें स्नेहें स्नेह॥ रूढविती तेणें वाढे मोह ॥ येणेंचि प्रौढजनसमूह ॥ प्रीतिवर्धक रजोगुणें॥७७॥परस्परें द्वेष वाढे ॥ तेथ शत्रुत्वें भजन घडे ॥परार्थ मानूनि आपणाकडे ॥ करिती कुडें अवघे ते॥ ७८ ॥ परस्परें राग द्वेष ॥ धारिती भजनाचा आवेश ॥ ते परार्थ नोहे आपणास ॥ ऐसें परेश प्रतिपादी ॥ ७९ ॥ तेथ क्षणिक सुखावाप्ति ॥ नोहे सुहृद्भावप्रीति ॥ ना ते धर्मतत्वप्रतीति ॥ स्वार्थसंपत्ति अवघी ते ॥८० ॥ आतां ऐका द्वितीय प्रश्न ॥ नभजतयां जे भजती जाण ॥ ते जन केवळ सत्वसंपन्न ॥ सुहृत्स्वजनधर्मात्मे ॥ ८१ ॥

भजंत्यभजतोयेवैकरुणाःपितरोयथा ॥ धर्मोनिरपवादोऽत्रसौहृदंचसुमध्यमाः ॥ १८ ॥

॥ टीका ॥ तयां माजि दोनी कोटी ॥ एक कारुण्यें सदयदृष्टि ॥ दुजे स्नेहाळ समूहसृष्टि ॥ ऐका राहटी दोहींची॥स्नेहदृष्टि मातापितरें ॥ ८२ ॥ भजती प्रजांतें अत्यादरें ॥ तैसे सर्वत्र करुणाभरें॥भूतमात्रीं कळवळिती ॥ ८३ ॥ भूतमात्रांचे कल्याणा ॥ ज्यांसि मुख्यार्थ इतुकाचि जाणा॥ या वेगळें अणुप्रमाणा ॥प्रत्यूपकरणा[2] नेच्छिती ॥८४॥ द्वितीय केवळ मातापितर ॥ होऊनि चाळिती जगासि मैत्र॥ अणुसम नेच्छिती प्रत्युपकार ॥ हृदयीं अपार स्नेहाळ ॥ ८५ ॥ संतती साठीं नवस नाना ॥ गर्भ वाहतां सोसिती शिणा ॥ प्रसूतिवेदना सह पोषणा ॥ मूत्रमेहना[3] सोशिती ॥ ८६ ॥ देवी गोवर दुःखश्रेणी ॥ सोशितां निद्रा नेणती नयनीं ॥ प्रत्युपकार नइच्छूनी ॥ तत्कल्याणीं स्नेहाळें ॥ ८७ ॥ त्यांमाजि प्रथम धर्ममूर्ति॥द्वितीय स्नेहाचीच व्यक्ति[4] ॥एवं धर्मका-

---

[1] व्याजावर उपजीवन पावणारा. [2] उलट उपकाराला. [3] मूत्रस्राव. [4] मूर्ति.

कामपुरुषार्थी ॥ ह्मणे श्रीपति ते दोघे ॥ ८८ ॥ धर्मनिष्ठा सुहृद्राव ॥ दोघांमाजी वर्त्ते सदैव ॥ निरपवाद हा अभिप्राव ॥ वासुदेव वाखाणी ॥ ८९ ॥ आतां तृतीय प्रश्नोत्तर ॥ भजतयां नभजती जे कां अपर ॥ त्यांचा चतुर्विध अधिकार ॥ वर्णी श्रीधर तो ऐका ॥ ९० ॥

भज तोऽपिनवैकेचिद्भजंत्यभजतःकुतः ॥ आत्मारामाह्याप्तकामाअकृतज्ञागुरुद्रुहः ॥ १९ ॥

॥ टीका ॥ जे भजतयांसीच नभजती ॥ ते अभजतया कोंवि भजती ॥ जनका पितृत्वें न मनिती॥ते कें मानिती पिंतृव्या ॥ ९१ ॥ कृष्णसर्प दावानळीं- ॥ हूनि काढितांही स्नेहाळीं ॥ तत्काळ झोंबे मर्मस्थळीं ॥ केंवि कळवळी तो इतरां ॥ ९२ ॥ किंवा अग्निसेवनीं निरत ॥ निष्ठापूर्वक स्मार्त श्रौत ॥ त्यांतें नरक्षी मानूनि आप्त ॥ जेंवि प्रज्वलित पावक ॥ ९३ ॥ अदृष्टकर्मफळ कर्त्ता लाहो ॥ परी आपणा भजकां नधरी स्नेहो ॥ तो इतरांचा नकरी दाहो ॥ हा कें मोहो कल्पावा ॥ ९४ ॥ ऐसे द्विविध कृतोपकार ॥ करिती विसरोनियां अपकार ॥ परीते पृथक्त्वें अधिकार ॥ जाणती चतुर चतुर्विध ॥ ९५ ॥ अग्निदृष्टांत जाणिजे विविध ॥ दृष्टादृष्टार्थी फलदाफलद ॥ एक आत्माराम प्रसिद्ध ॥ दुजा विशद आप्तकाम ॥ ९६ ॥ निर्विकल्प समाधिस्थ ॥ स्वस्वरूपानंदीं स्वस्थ ॥ त्यासि भजती संसारग्रस्त ॥ ते अनाथ तद्भजना ॥ ९७ ॥ ते भजकातें न प्रार्थिती ॥ भजल्या सत्कारही नकरिती ॥ परी ते खाकरं ह्मणों नयेती ॥ उद्भिज्जपंक्तिं सुरंविटप ॥ ९८ ॥ त्यांसि भजतां नादिसे फळ ॥ वाटती कृतघ्नचि केवळ ॥ परि ते भजकांची कामना सफळ॥ अक्षय अमळ

---

१ चुलत्याला. २ पानें झडलेला वृक्ष. ३ वनस्पतींची पंक्ति. ४ कल्पवृक्ष.

सुखलाभें ॥ ९९ ॥ उपासकांसि जैसा अग्नि ॥ तुष्टे अदृष्टफळप्रदानीं ॥ परी नरक्षी प्रज्वळलेनी ॥ प्रत्युपकरणीं
स्निग्धत्वें ॥ २०० ॥ आतां द्वितीय आप्तकाम ॥ अग्नि इंधनार्थ सकाम ॥ होऊनि नचाळी स्नेहधर्म ॥ भजनीं
प्रेम तेंवि नधरी ॥ १ ॥ विषयार्पणें भजती लोक ॥ परी तो नोहे तत्कामुक ॥ प्रत्युपकारें त्या सम्मुख॥ नोहे
निष्टंक अनपेक्ष ॥ २ ॥ आतां सर्पदृष्टांतरीती ॥ एक कृतघ्न क्रूरजाति ॥ केवळ दुर्जन खळ दुर्मति ॥ कृतघ्नवृत्ति
जो दुरात्मा ॥ ३ ॥ ऐका सख्या हो ह्मणे कृष्ण ॥मूढजाति सर्प कृतघ्न॥ह्मणोनि तो उपकृति नजाणोन॥करी विघ्न
भजकातें ॥ ४ ॥ तैसा जो कां मूढमति ॥ कृतघ्न दुरात्मा क्रूरवृत्ति ॥ कृतोपकार नाठवे चित्तीं ॥ सद्य[1] निघातीं
प्रवर्ते ॥ ५ ॥ याहूनि दुसरा जो कां दुष्ट ॥ प्रवृत्तिज्ञान जाणोनि स्पष्ट ॥ परम निष्ठुर कृतघ्न शठ ॥ कठिन
पापिष्ठ गुरुद्रोही ॥ ६ ॥ गुरु ह्मणिजे जननीजनक ॥ कीं संकटीं जे प्राणरक्षक ॥ हितोपदेष्टे उपकारक ॥ कां जे
पोषक सर्वस्वें ॥ ७ ॥ विद्योपदेष्टे हितोपदेष्टे ॥ कृपाकटाक्षें सर्वाभीष्टें॥ जे इच्छिती ते गुरुत्वनिष्ठे॥कथिती स्त्रष्टे
शास्त्रज्ञ॥८॥ ऐसिया गुरू जे जे द्रोहिती ॥ त्यांचा उपकार नाठविती ॥ केवळ कृतघ्न पापमूर्ति ॥ ते कें भजती
इतरांतें ॥ ९ ॥ गुरूचा द्वेष धरिती मनीं ॥ गुरूची निंदा वदती वदनीं॥गुरुची करिती कार्यहानि॥ते कृतघ्न दुर्योनीं
जाचती ॥ १० ॥ त्यांच्या दर्शनें संस्पर्शनें ॥ एकत्रवासें संभाषणें ॥ पुण्यशीळांचीं नाशती पुण्यें ॥ सर्व
दूषणें संक्रमती[2] ॥ ११ ॥ ऐसीं प्रश्नप्रत्युत्तरें ॥ विवरूनि कथितां नंदकुमरें ॥ भ्रूसंकेतें वक्रनेत्रें गोपी परस्परें खुणाविती
॥ १२ ॥ हें देखोनि विधीचा जनक ॥ सवेग हृदयीं करूनि तर्क ॥ गोपीप्रश्नांचा विवेक ॥मनीं निष्टंक
समजला ॥ १३ ॥ सकळप्रश्नांच्या शेवटीं ॥ गुरुद्रोही कृतघ्नां मुकुटीं ॥ त्याची मजवरी आणूनि कुटी[3] ॥ गोपी

---

[1] तत्काळ. [2] प्रवेशती. [3] आळ, आरोप.

भ्रकुटी खुणाविती ॥१४॥ परस्परें हास्यवदनें ॥ नेत्रें सूचिती नवदोनि वचनें ॥ हीं जाणोनि वधूंचीं चिह्नें ॥ काय श्रीकृष्णें बोलिलें ॥ १५ ॥

नाहंतुसख्योभजतोऽपिजंतून्भजाम्यमीषामनुवृत्तिवृत्तये ॥
यथाऽधनोलब्धधनेविनष्टेताच्चिंतयाऽन्यन्निभृतोनवेद ॥ २० ॥

॥ टीका ॥ अवो सख्या हो कथिल्या जना ॥ माजि एकही मी नोहें जाणा ॥ तुह्मी माझी त्यां माजि गणना ॥ नकीजे नयना खुणावुनी ॥ १६ ॥ मी भजकांसि करुणावंत ॥ परम सुहृद परम आप्त ॥ भजकां नभजें तो वृत्तांत ॥ ऐका निवांत वनिता हो ॥ १७ ॥ प्रेम पोखूंनि भजकांप्रति ॥ वियोगें घालीं विरहावर्ती ॥ या माजि कृपेची अभिव्यक्तिं ॥ तुमच्या चित्तीं तें नुमजे ॥ १८ ॥ कृपणा जैसी धनाची प्राप्ति ॥ होऊनि हातींचें जाय पुढती ॥ तें त्या धनचिंतेची व्याप्ति ॥ विषयप्रवृत्ति विसरवी ॥ १९ ॥ होऊनि ठाके तें धनपिसें ॥ जागृतिस्वप्नीं धनचि भासे ॥ विसरे क्षुधा तृषा मानसें ॥ मा येर कायसे उपचार॥२०॥ तो धनाविण नेणे कांहीं ॥ तेंवि ध्यान मी भजकां हृदयीं ॥ वेधें लावूनि प्रेमप्रवाहीं ॥ विषय सर्वही विसरवीं ॥ २१ तरी त्यां भजकांमाजि प्रस्तुत ॥ सर्व प्रकारें तुह्मीच येथ ॥ कैशा ह्मणाल तरी वृत्तांत ॥ कथी अनंत श्लोकार्थें ॥ २२ ॥

एवंमदर्थोज्झितलोकवेदस्वानांहिवोमय्यनुवृत्तयेऽबला: ॥

---

१ वाढवून. २ वियोगरूपी भोंवऱ्यांत. ३ स्पष्टता. ४ विषयांकडील मनाचा कल.

मयापरोक्षंभजतातिरोहितंमाऽसूयितुंमाऽर्हथतत्प्रियंप्रियाः ॥ २१॥

॥ टीका ॥ पूर्वोक्त बोलिले जे भजक ॥ तेंवि मजकारणें सम्यक् ॥ तुह्मींच सांडिला लौकिक ॥ प्रवृत्तिविवेकपरित्यागें ॥ २३ ॥ अस्ताव्यस्त वस्त्राभरणें ॥ सर्वविस्मृतकर्माचरणें ॥ युक्तायुक्त विचारणें॥सांडूनि वना पातलां ॥ २४ ॥ यास्तव लौकिकाचा त्याग ॥ तुह्मांपासूनि घडला सांग॥वेद ह्मणिजे स्वधर्ममार्ग॥मदर्थ तोही त्यागिला ॥ २५ ॥ सासुश्वशुरपतिसेवनें ॥ अतिथिअभ्यागत[1]पूजनें ॥नित्यनैमित्तीं सादर होणें॥व्रतोद्यापनें त्यागिलीं॥२६॥ अपत्यांच्या लालनासी ॥ स्वपोष्यांच्या[2] पोषणासी ॥ वेदप्रणीत स्वधर्मासी ॥ त्यागूनि मजपाशीं पातलां ॥ २७ ॥ स्वकीयाप्त ज्ञाति गोत्र ॥ सकळ सुहृद इष्ट मित्र ॥ त्यांचें भंगूनि स्नेहसूत्र ॥ आलां सत्वर मजपासीं ॥ २७॥ लौकिक स्वधर्म आणि स्वजन ॥ मजकारणें त्यागिले पूर्ण ॥ ऐसिया तुह्मी मदेकशरण ॥ त्या तुमचें कल्याण म्यां कीजे ॥ २८ ॥ ग्रंथि देऊनि वोढी घेणें ॥ विशेष दृढता होय तेणें ॥ तैसेंचि म्यांही अदर्शनें ॥ तुह्मां निजध्यानें वेधिलें ॥ २९ ॥ तुह्मांसि देऊनि निजात्मरति ॥ प्रेमा दृढाविला म्यां चित्तीं ॥ विरहवर्धनें गुप्तस्थिति ॥ सप्रेम उक्ति परिसिलया ॥ ३० ॥ गुप्त होऊनि भजलों तुह्मां॥ तेणें म्यां वाढविला सुदृढ प्रेमा ॥ दोषदृष्टि पाहणें आह्मां ॥ हें अनुचित तुह्मां अबळा हो ॥३१॥ म्यां जें गुप्त होऊनि वनीं ॥ ध्यान वोपिलें तुमच्या मनीं ॥ हेंचि प्रिय केलें जाणोनी ॥ मज लागूनि नदूषावें ॥ ३२ ॥ इतुका तदुक्ति[3]परिहार ॥ बोलूनि अंतरीं कमळावर ॥ निष्कापटचें करुणापर ॥ चमत्कारूनि बोलतसे ॥ ३३ ॥ शरदुत्पलाली[4] फुल्लारा ॥ उषसीं शशिस्रावी जलधारा ॥ सांडिती तेंवि नयनद्वारा ॥ आले श्रीधरा प्रेमाश्रु ॥ ३४ ॥ थरथरां कांपे अंगयष्टि॥ श्वास नसांठवेचि पोटीं ॥ उकसाबुकसीं सद्गद-

---

[1] आगंतुक. [2] दासादिकांच्या. [3] सांच्या बोलण्याचा निर्णय. [4] शरदृतूंतील कमलपंक्ति.

कंठीं ॥ शब्द वोंठीं नफुटती ॥३५॥ रोमांच आले थरथरोनी ॥ पुलकस्वेदांची गवसणी ॥ स्वभक्तप्रेमें चक्रपाणि ॥ बांधोनि ऋणीं वश केला ॥ ३६ ॥ गोपींसि ह्मणे सांडोनि श्वास ॥ करूं नशके परिहारास ॥ ब्रह्मायुपर्यंत होतांदास ॥ आनृण्यास असमर्थ ॥ ३७ ॥

नपारयेऽहंनिरवद्यसंयुजांस्वसाधुकृत्यंविबुधायुषाऽपिवः ॥
यामाऽभजन्दुर्जरगेहशृंखलाःसंवृश्च्यतद्वःप्रतियातुसाधुना ॥ २२ ॥

॥टीका॥ तुमचा संयोग निर्दूषण ॥ अनुच्छिष्टचि आत्मार्पण ॥ तुह्मीं केलें मजलागुन ॥ जन्मापासून गोपी हो ॥ ३८ ॥ बाळपणींच खेळतां मातें ॥ तुह्मीं अर्पिलीं आपुलीं चित्तें ॥ क्षणभंगुरा भवसुखातें ॥सकाम आस्थे नातळलां ॥३९॥ मदर्थ विसरलां मातापिता ॥ मदर्थ त्यजिलें सुत्हृदां आप्तां ॥ मदर्थ त्यजूनि भगिनीभ्राता ॥ मदेकचित्ता हों सरलां ॥ ४० ॥ मदर्थ त्यजिले सासुश्वशुर ॥ मदर्थ त्यजिले भावे देवर ॥ मदर्थ त्यजिले ज्ञातिगोत्र ॥ मजशीं स्वतन्त्र अनुसरलां ॥ ४१ ॥ मदर्थ विसरलां अन्नपान ॥ मदर्थ विसरलां भूषण वसन ॥ मदर्थ विसरलां श्रवण पठन ॥ मदर्थ सम्मान विसरलां ॥ ४२ ॥ मदर्थ त्यजिलें निरीक्षण ॥ मदर्थ त्यजिलें गन्धग्रहण ॥ मदर्थ त्यजिलें निन्दास्तवन ॥ केलें मदर्पण सर्वस्व ॥ ४३ ॥ मदर्थ त्यजिला काम क्रोध ॥ मदर्थ त्यजिला प्रपंचबोध ॥ मदर्थ त्यजिला द्वेष विरोध ॥ मत्सरदुर्मददम्भादि ॥ ४४ ॥ मदर्थ त्यजिला लोभ मोह ॥ ममतातृष्णाशोकसमूह ॥ वृत्ति क्षेत्र देह गेह ॥ भवप्रवाह विसरलां ॥ ४५ ॥ अहंता ममता द्विकंकणीं ॥ राग

---

१ ब्रह्मदेवाचे आयुष्यापर्यंत. २ ऋणांतून मुक्त होण्यास. ३ ढोंग. ४ दोन कड्यांनीं.

द्वेषकीलकमिळणीं ॥ निगडशृंखळा रजोगुणीं ॥ घातली निर्मूनि नरांमरां ॥ ४६ ॥ अहंदेहत्वें ठाके उभा ॥ प-
दार्थममता चढे क्षोभा ॥ देहगेहवृत्तिलाभा ॥ रागद्वेषें खळखळित ॥४७॥ तापत्रयाचें लागतां उष्ण ॥ बेडी ता-
पतां पोळती चरण ॥ तेणें तळमळिती सम्पूर्ण ॥ परी बेडी खंडून नसंडवे ॥ ४८ ॥ कुटुम्बचिन्ता मागें वोढी ॥
लौकिकलज्जा पुढें ओढी ॥ ऐसी उभयत्र सांकडी ॥ द्विधा चरफडी चालतां ॥ ४९ ॥ ऐसी देहगेहात्मबेडी ॥
पडोनि असुरसुरनरकोडी॥ बळेंचि पडिल्या बांदवडी ॥ मोहसांकडी माजिवड्या ॥५० ॥ तुह्मी अनन्यभावें करू-
नी ॥ मातें भजतां अभेदभजनीं॥खण्डूं नशकती जीतें कोण्ही ॥ ते बेडी खण्डूनि सांडिली ॥५१॥ आदिब्रह्म्याचे
प्रथमदिनीं ॥ प्रथम घटिकेचि पासूनी ॥ चरणीं पडली परंतु कोण्ही ॥ नाहीं खण्डूनि टाकिली ॥ ५२ ॥ कल्पा-
नुकल्प गेले फार ॥ परी जीर्ण नोहेचि अणुमात्र ॥ नित्य नूतन जे दृढतर ॥ तुह्मीं ते सत्वर छेदिली ॥ ५३ ॥
मदेकशरण सप्रेम खड्ग ॥ घेऊनि दृढतर सानुराग ॥ देहगेहात्मशृंखळाभंग ॥ तुह्मीं सवेग पैं केला ॥ ५४ ॥
त्रैवर्गिक तोडिती कडी ॥ संन्यास सवातें लडबडी ॥ नानाअभ्यासें चरफडी ॥ चालतां अडी स्वपदातें ॥५५॥गे-
हशृंखळा दुर्जर ऐसी ॥ तुह्मीं मद्भजनप्रेमेंशीं ॥ निःशेष छेदूनि टाकिली कैसी ॥ गगनें जैसी वातोर्मि ॥ ५६ ॥
यालागीं मदर्थ तुमचें जिणें ॥ मदेकशरणा जीवें प्राणें ॥ तुह्मांसि काय म्यां उत्तीर्ण होणें ॥ कवण्या गुणें कोठ-
वरी ॥ ५७ ॥ अमळ अनवंद्य संगम तुमचा ॥ किती ह्मणोनि वर्णूं वाचा ॥ यालागिं तुमचे उत्तीर्णतेचा ॥ प्रताप
टांचा मज आंगीं ॥ ५८ ॥ ब्रह्मा सकळविबुधांशिरीं ॥ त्या ब्रह्मयाचे आयुष्यवरी ॥ म्यां श्रमतांही प्रत्युपकारीं ॥

---

१ प्रीति व द्वेष ह्या दोन खिळ्यांनीं जोडलेली. २ बेडी. ३ मनुष्यांस व देवांस. ४ अधीनता. ५ वाऱ्याची लाट. ६ स्तुत्य. ७ उषा.

नोहे निर्धारीं कृतकृत्य ॥ ५९ ॥ मातें भजती बहुत भक्त ॥ तितुक्यां पाशीं माझें चित्त ॥ तुह्मीं सप्रेम मदेकनिरत ॥ यालागीं अजित जिंकिलों मी ॥ ६० ॥ मी बहुतांचा प्रेमपोसणा ॥ तुह्मी अव्यभिचार मदेकशरणा ॥ यालागीं असमर्थ उत्तीर्णा ॥ विकिलों ऋणामाजि तुह्मां ॥ ६१ ॥ यालागीं तुमचिया उपकारा ॥ उत्तीर्ण व्हावया लागीं मी अपुरा ॥ आतां तुह्मीच मजहूनि थोरा ॥ ह्मणवूनि करा आनृण्य ॥ ६२ ॥ आपणा हूनि बहुता गुणें ॥ तुह्मांसि स्तवितां थोरपणें ॥ इतुकेंचि माझें उत्तीर्ण होणें ॥ जें सर्वस्व उणें स्वीकेलें ॥ ६३ ॥ तुह्मी आपुल्या सुशीलपणें ॥ इतुकेन मातें अनृणी करणें ॥ येऱ्हवीं म्यां काय तुह्मांसि देणें ॥ अनन्यपणें जिंणिलों मीं ॥ ६४ ॥ ऐसा अनन्यभावें हरि ॥ स्ववश केला सर्वांपरी ॥ पुन्हां नाडील गर्वलहरी ॥ ह्मणोनि नारी भयचकिता ॥ ६५ ॥ गर्वें निधान हातींचें गेलें ॥ दैवें पुढती हाता आलें ॥ अगर्वप्रयत्नपूर्वक भलें ॥ ह्मणती रक्षिलें पाहिजे ॥ ६६ ॥ शुक ह्मणे गा इरा[2]रमणा ॥ व्रजवनितांच्या अनन्यभजना ॥ उत्तीर्ण व्हावया त्रैलोक्यराणा ॥ रासनर्त्तना मांडील ॥ ६७ ॥ पुढिले अध्यायीं ते कथा ॥ सावध ऐकें कौरवनाथा ॥ जिच्या श्रवणें कलिमळव्यथा ॥ आकल्पदु[3]रिताऽसह्य नाशे ॥ ६८ ॥ इतुकें श्रीमद्भागवतीं ॥ अठरा सहस्र संहितागणिती ॥ दशमस्कंधीं परीक्षिति ॥ परिसे निश्चिती शुकमुखें ॥ ६९ ॥ तो हा अध्याय बत्तिसावा ॥ हृदयीं धरूनि भक्तिभावा ॥ पढतां पावे कैवल्यठेवा ॥ भव आघवा वो[4]सरे ॥ ७० ॥ श्रीएकनाथ क्षीराब्धि अमळ ॥ चिदानंदचित्कल्लोळ ॥ स्वानन्दसुखाचें अगाध जळ ॥ प्रभा सोज्वळ गोविंद ॥ ७१ ॥ क्षीराब्धिशायी गोपीरमण ॥ लोकत्रयाचें कल्याण ॥ केवळ दयार्णव स्वपदशरण ॥ रक्षी संपूर्ण कारुण्यें ॥ ७२ ॥

---

१ जिंकिला गेलों. २ हे भूमिपते. ३ कल्पपर्यंत झालेलें पातक. ४ दूरजाई.

श्रोतयां विनवी दयार्णव ॥ भक्तऋणिया[१] वासुदेव ॥ साडूनि साधनाची हांव ॥ धरा सद्भाव पदभजनीं ॥ २७३ ॥

इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायां दशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां गोपीविरहाभिभूतरुदितश्रीकृष्णदर्शनहर्षावाप्तिकथनंनामद्वात्रिंशत्तमोऽध्यायः ॥३२॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्लोक ॥ २२ ॥ टीका ओव्या ॥ २७३ ॥ ॥ एवं संख्या ॥ २९५ ॥

---

[१] दासांचा कर्जदार.

* * *

अध्याय ३३

तिहीं स्त्रीरत्नीं अन्वित ॥ प्रीतिपूर्वक रमाकांत ॥
परस्परें बाहुग्रथित ॥ रासक्रीडा आरंभी ॥३३॥



श्रीकृष्णपरमात्मने नमः ॥ विंवर्त्तविमुख विलासचतुरा ॥ विरक्ता विदुषा विरहातुरा ॥
स्वानुरागें क्रीडापरा ॥ नमो गुरुवरा गोविंदा ॥ १ ॥ वास्तव नसतां आभासे ॥ मिथ्यात्वींही
जैसें तैसें ॥ यथापूर्व गोचर दिसे ॥ विवर्त्त ऐसें त्या नाम ॥ २ ॥ तो हा विवर्त्त
भवभ्रम ॥ भूतां गुणांचा संभ्रम ॥ संस्कारजनित कामकर्म॥ रूप नाम अविद्यक ॥ ३ ॥
बस्तु वस्तुत्वें अविकार ॥ अध्यारोप विवर्त्तमात्र ॥ जीवां भ्रमवी भवसागर ॥ जेंवि रविकरजल हरिणा ॥ ४ ॥
मृगां धांवतां रानोमाळें ॥ असाचार तैं कैंचें मिळे ॥ हृदय फुटोनि सुकले गळे ॥ क्लेश आगळे मरणान्त ॥ ५ ॥
तोंचि सच्चित्सुख वस्तु स्वमेव ॥ तेथ भ्रामक अविद्याभाव ॥ अबघा विवर्त्त भवार्णव॥ विषयार्थ जीव आळुके ॥ ६ ॥
असाचार विषयसुख ॥ नफवोनि प्राणी पावती दुःख ॥ बहळसुकृतें भवीं विमुख ॥ धुंडिती चित्सुख मुमुक्षु ॥ ७ ॥
ऐसें विरक्त कैवल्यकाम ॥ तद्विलासार्थ तूं सकाम ॥ परम चतुर कल्पद्रुम ॥ स्वजनाभिराम सद्गुरो ॥ ८ ॥ त्रितापतप्तां
निववावया ॥ निरसूनि भेदभ्रमाची माया ॥ आत्मच्छंदें रासप्रिया ॥ नर्त्तविसी त्यां रतिरसिकां ॥ ९ ॥
भवविमुखा त्या व्रजांगना ॥ त्यांची जाणोनि हृद्वेदना ॥ श्रमपरिहारें ऋणोत्तीर्णा ॥ रासनर्तना आरंभ ॥ १० ॥
योगोत्पलाकरभास्कर ॥ विदुष विरक्त वैष्णवप्रवर ॥ स्वात्मनिरत निर्विकार ॥ बोधी शुकेंद्र भूपातें ॥ ११ ॥ ऐकें
कौरवकुलमंडना ॥ ये अध्यायीं श्रमापहरणा ॥ रासक्रीडा कैवल्यराणा ॥ स्मरमोहना आरंभी ॥ १२ ॥ गो-

---

१ मिथ्याभासाला पराङ्मुख. २ सूर्याच्या भरवर किरणांनीं भासणारें जल, मृगजल. ३ बुभुक्षित होईल.

पीमंडळीमध्यें हरि ॥ रासरसिक नर्त्तन करी ॥ वनीं जीवनीं गोपकुमरी ॥ कोणे प्रकारीं रमविल्या ॥१३॥ तो हारसाळ रासोत्सव ॥ परिसावया महानुभाव ॥ सद्गुरुवरें दयार्णव ॥ आज्ञापिती वक्तृत्वीं ॥ १४ ॥ समर्थआज्ञा वंदूनि शिरीं ॥ जैशी वदली शुकवैखरी ॥ भाषाव्याख्यान त्या प्रकारीं ॥ सादर चतुरीं परिसिजे ॥ १५ ॥

इत्थंभगवतोगोप्यःश्रुत्वावाचःसुपेशलाः॥ जहुर्विरहजंतापंतदंगोपचिताशिषः ॥ १ ॥

॥ टीका ॥ नृपातें ह्मणे बादरायणि ॥ ऐकोनि गोपीही भगवद्वाणी ॥विरहसंताप टाकूनी ॥ हृदयभुवनीं तोषल्या ॥ १६ ॥ इत्थं ह्मणिजे पूर्वाध्यायीं ॥ जें बोलिला क्षीराब्धिशायी ॥ लाघवं[2] घेऊनि आपुले ठायीं ॥ वनिताहृदयीं तोषद ॥ १७ ॥ तुमच्या सप्रेमभक्तिऋणा ॥ समर्थ नोहें मी उत्तीर्णा ॥ आतां तुह्मीचि उदारगुणा कीजे मोक्षणा आनृण्यें ॥ १८ ॥ तुमच्या ऋणें मी बांधला ॥ आज्ञाधारक मी अंकिला ॥तुमचा सर्वस्वें विकिला ॥ विशेष बोला नबोलवे ॥ १९ ॥ ऐसिया मधुरा सुपेशला[3] ॥ ऐकोनि भगवंताचिया बोला ॥ विरहदुःखें संताप झाला ॥ तो टाकिला गोपींहीं ॥ २० ॥ श्रीरंगाच्या अंगस्पर्शें ॥ निवालीं गोपींचीं मानसें ॥ चंद्रें कुमुदकानन जैसें ॥ टाकी संताप दिवसाचा ॥ २१ ॥ कुरुकिरीटविराजरत्ना ॥ अंग या कोमळ आमंत्रणा ॥ संबोधूनि योगिराणा ॥ रासक्रीडना निरूपी ॥ २२ ॥ अंकिला विकिला तुमचा ऋणी॥ ऐसी जे कां भगवद्वाणी ॥ सत्यत्व दावी तिये लागुनी ॥ स्वयें नाचोनि तच्छंदें ॥ २३ ॥

तत्राऽऽरभतगोविंदोरासक्रीडामनुव्रतैः ॥ स्त्रीरत्नैरन्वितःप्रीतैरन्योन्याबद्धबाहुभिः ॥ २ ॥

---

[1] कामक्रोधादिकांनीं ज्याचें मन चंचल होत नाहीं तो. [2] लहानपणा. [3] चतुरपणाचा.

॥टीका॥ गोविंद जो कां ब्रह्मांडपति ॥ तये यमुनापुलिनप्रांतीं॥रासक्रीडा परम प्रीति॥आरंभिता जाहला॥२४॥
रासशब्दें ह्मणाल काय ॥ कुशलनर्त्तकींचा समुदाय ॥ तिहींसहित जो विलास होय ॥ नृत्यविशेष तो रास॥२५॥
रासमंडित जे कां क्रीडा ॥ ते बोलिजे रासक्रीडा ॥ गोपीप्रेमाच्या कैवाडा ॥ आदरी रोकडा श्रीकृष्ण ॥ २६ ॥
ह्रदिनीं विकसितकुमुदोत्पलीं ॥मधुरशब्दें गुंजती आळि॥जलाश्रितविहगांची मंडळी ॥ सुखसुकाळीं कूजती॥२७॥
वनीं कुसुमित वल्लि तरु ॥ शब्दित चंचरीकांचा भारु ॥ तेणें मुखरित जलकांतारु ॥ सुमनोहरु शोभतसे॥२८॥
सिंहावलोकें शृंगाररचना ॥ पूर्वोक्त चतुरां केली सूचना ॥ यावरी रासमंडळग्रथना ॥ परिसा व्याख्याना श्लोकोक्त
॥ २९ ॥ काष्ठपुत्रिका सूत्रतंत्रा ॥ जऱ्ही दिसती त्या नर्त्तनपरा ॥ तऱ्ही नव्हती त्या स्वतंत्रा॥तेंवि सुंदरा अनुवृत्ता
॥३०॥जेंवि कां हरळ वैरागरें ॥ वेधितां प्रभेच्या अत्यादरें ॥ तैं ते होती अनर्घ हिरे॥ तेंवि यदुवीरें व्रजललना
३१घुरटा रानटा आभीरवनिता॥कृष्णसांनिध्यें सप्रेमभरिता॥शोभती सुरांगनांच्या माथां ॥ ललनाललामें हरिवेधें
॥ ३२ ॥ तिहीं स्त्रीरत्नीं अन्वित ॥ प्रीतिपूर्वक रमाकांत ॥ परस्परें बाहुग्राथित ॥ रासक्रीडा आरंभी ॥३३॥

रासोत्सवःसंप्रवृत्तोगोपीमंडलमंडितः ॥ योगेश्वरेणकृष्णेनतासांमध्येद्वयोर्द्वयोः ॥ ३ ॥
यंमन्येरन्नभस्तावद्विमानशतसंकुलंम् ॥ प्रविष्टेनगृहितानांकंठेस्वनिकटंस्त्रियः ॥ ४ ॥
दिवौकसांसदाराणामौत्सुक्यनिभृतात्मनाम् ॥ ५ ॥

---

१ आवडीला. २ नदींत. ३ लांकडी बाहुली. ४ खडे. ५ जवाहिऱ्या. ६ स्त्रीरत्नें.

॥ टीका ॥ रासोत्सवाचें साहित्य ॥ अभिनय ह्मणिजे कौतुकयुक्त ॥ रसिकनम्रता सुरशिक्षित॥हावभाव अपांगीं ॥ ३४ ॥ चौं अक्षरीं क्रियापद ॥ दिढा श्लोका सहित विशद ॥ मंडळरूपें गोपीवृंद॥ सह गोविंद वेंठला ३५ ॥ उभयपार्श्वीं गोपीयुगळ ॥ तडिद्भासुर गौर अमळ ॥ मध्यें मिरवे मेघसुनीळ॥कुचकरतळसंस्पर्शी॥ ३६॥ दक्षिणभागीं बल्लवप्रमदा ॥ कृष्ण तिचिया दक्षिणखांदा ॥ स्वबाहु ठेवूनि वदनारविंदा॥पाववी मोदा संस्पर्शें ॥ ३७ ॥ वामभागींची वामनयना ॥ वामबाहूच्या करूनि ग्रथना ॥ वामउरोजसंस्पर्शना ॥सह आनना प्रोत्साही ॥ ३८ ॥ तैशाच गोपी उभयभागीं ॥ बाहुयुगळें श्रीशार्ङ्गी ॥ आकळूनियां स्निग्धापांगीं ॥ रासप्रसंगीं मोदती॥ ३९ ॥ दोहीं गोपीं माजि हारि ॥ कृष्णयुगळीं एकी सुंदरी ॥ रासमंडळ ऐसियापरी ॥ रची मुरारि सप्रेमें॥४०॥ व्रजवासिनी अनेक गोपी ॥ कृष्ण एकला लावण्यरूपी ॥ गोपीयुगळें स्वप्रतापीं॥ केंवि आटोपी पृथक्त्वें॥४१॥ गोपी पृथक्त्वें नाचती॥तितुक्या कैंच्या श्रीकृष्णमूर्त्ति॥ऐसी शंका नकीजे श्रोतीं ॥तो योगपति जगदात्मा॥४२॥ योगेश्वरेण ऐसा हेतु ॥ देऊनि वदला व्याससुत ॥ जे योगमाया अंगीकृत ॥अवतारचरित विस्तारी॥४३॥दों दों गोपींत एकैक कृष्ण॥दों दों कृष्णीं प्रमदारत्न॥ऐसें रचूनि रासकंकण॥करी नर्त्तन स्वच्छंदें॥४४॥दों दों गोपींत एकैक हरि ॥ दोहींचियाही स्कंधांवरी ॥ बाहु घालूनि उरोज धरी ॥ स्पर्शें अधरीं हनुगल्लीं ॥ ४५ ॥ चटुल चाटु चमत्कारीं ॥ ऐशा मोहिता व्रजसुंदरी ॥ जे ते मानी मज मुरारि ॥ सप्रेमभरीं आळंगी ॥ ४६ ॥ मज एकीतें फावला कृष्ण ॥ कृष्णकंठीं मी संलग्न ॥ माझेंचि भाग्य त्रिजगीं गहन ॥ ऐशा संपूर्ण भाविती॥ ४७ ॥ दोहीं भागीं दोघी जणी ॥ परी त्या नेणती अंतःकरणीं ॥ आपणा वांचूनि चक्रपाणि ॥अन्य कामिनी कवळी हें

---

१ वेष्टिला गेला. २ विजली प्रमाणें तेजस्वी. ३ योगविद्या ज्याच्या स्वाधीन अशा कृष्णानें.

॥ ४८ ॥ कृष्णमौळींचे चूडामणि ॥ गोपीमौळाभरणरत्नीं ॥ देदीप्यमान ललामश्रेणी ॥ रासकंकणीं प्रकाशे ॥ ४९
॥ ललनाललाटीं कुंकुमांक ॥ कृष्णनिडळीं केशरातिलक ॥ नीलकुंतल कुसुमस्तबक ॥ राजीराजित रासोत्थ ॥
५० ॥ कृष्णकुंडलें मकराकृति ॥ गोपीश्रवणीं भूषापंक्ति ॥ गंडमंडित मिथा दीप्ति ॥ वलयपंक्ति रासांगीं ॥ ५१ ॥
गोपीकटाक्षस्निग्धानंग ॥ श्रीकृष्णाचे कृपापांग ॥ नयनपंक्तीं रासरंग ॥ वलय सांग सुघटित ॥ ५२ ॥ तरळ भ्रूलतांचें
वलय ॥ मध्यें गोंदिलीं पाचप्राय ॥ कृष्णभ्रूमध्य ज्योतिर्मय ॥ चंदनबिंदु इंदुत्वें ॥ ५३ ॥ सरळनाशिकांचिया
श्रेणी ॥ तरळ तळपती मौक्तिकमणि ॥ दशनदीप्तींचीं चादिणीं ॥ स्मितभाषणीं फांकती ॥ ५४ ॥ तांबूलरंगें
रंगले अधर ॥ शोभे वलय तें विद्रुमाकार ॥ दानोदकाचे पुलक प्रचुर ॥ वदनशीतकर शोभविती ॥ ५५ ॥
॥ इंद्रनीळांची वर्तुळ श्रेणी ॥ माजि एकैक स्वर्णमणि ॥ चारु चंचल रासांगणीं ॥ हनु कपोलें नर्तती ॥ ५६ ॥
कंठाभरणें संलग्न कंठीं ॥ जडित निष्कमणींची दाटी ॥ अंसवेष्टित बाहुमिठी ॥ भूषणकोटि झळकती त्या ॥
॥ ५७ ॥ नववनितांचे कुच उन्नत ॥ मध्यें वैडूर्यमणिमंडित ॥ श्रीनिकेतन कौस्तुभयुक्त ॥ श्रीवत्स भासुर हरिहृदयीं
॥ ५८ ॥ मणिबंध[1] मणिगणवलयान्वित ॥ कंबुकंकणीं श्रीकृष्णहस्त ॥ करमुद्रिका रत्नजडित ॥ नर्त्तनताळें तरळती
॥ ५९ ॥ कुचपट्टिका सोत्तरीयें ॥ रविशशिविद्युत्प्रभामयें ॥ पल्लव चंचळ चपलान्यायें ॥ सजळजलदीं झळकती
॥ ६० ॥ ॥ हरिपरिधानीं पीतवसनें ॥ दिव्यांशुकें वधूपरिधानें ॥ जडितमेखळा विचित्ररत्नें ॥ संमिश्रकिरणें
प्रकाशती ॥ ६१ ॥ जानुश्रेणी मंडळाकार ॥ रासप्रसंगीं नर्त्तनपर ॥ गुल्फ[2]प्रदेशीं मणिमंजीर ॥ वांकी नूपुर पदकटकें
॥ ६२ ॥ दशांगुलियें पदभूषणें ॥ भूमि उज्वळिती तद्गतरत्नें ॥ पदविन्यासें नूपुरस्वनें ॥ संगीतमानें उ-

---

[1] मणगट. [2] पायांचे घोटे.

तरती ॥ ६३ ॥ ऐसिया रासोत्सवमंडळीं॥जे ते मानी बल्लवबाळी॥ प्रियतम आकळला वनमाळी॥प्रेमागळी मी यातें ॥ ६४ ॥ मजचि कवळूनि नाचे हरि ॥ कृष्णप्रेमा मजचिवरी ॥ ऐशा समस्ता व्रजसुंदरी ॥ पृथगाकारीं मानिती ॥ ६५ ॥ यमुनापुलिनीं रासोत्सव ॥ ऐसा रचितां श्रीकेशव ॥ अतिऔत्सुक्यें गगनीं देव ॥कृष्णलाघवें वेधिलें ॥ ६६ ॥ रसिकरासोत्सवाचे क्षणीं ॥ गगनीं दाटल्या विमानश्रेणी॥सभार्यकां सुरांच्या मनीं॥मनसिजग्लानि हरिवेधें ॥ ६७ ॥ हरिक्रीडनें व्याप्तमनें ॥ ऐशीं सदार सुरविमानें ॥ शतसहस्त्रप्रयुतमानें ॥ संकीर्ण तेणें नभोवलय ॥ ६८ ॥ रासरसिकोत्सवनर्त्तन ॥ सकळसुरवर अनुलक्षून ॥ तदनुकूल यथोपकरण ॥ सद्य घेऊन पातले ॥ ६९ ॥

ततोदुंदुभयोनेदुर्निपेतुःपुष्पवृष्टयः ॥ जगुर्गंधर्वपतयःसस्त्रीकास्तद्यशोऽमलम् ॥ ५ ॥

टीका ॥ त्यानंतरें निर्जरगणीं ॥ हर्षें दुंदुभि ठोकिल्या गगनीं ॥ चैत्रनंदनोद्भवां सुमनीं ॥रासरंगणीं वर्षती ॥ ७० ॥ श्रीकृष्णाचीं यशें अमळ ॥ स्त्रियांसहित गंधर्वपाळ ॥ संगीतस्वरजाति सुताळ ॥ गाती केवळ उत्कर्षें ॥ ७१ ॥ तेथ मृदंग अचेतन ॥ ह्मणती मृत्युलोकीं जन्मोन ॥ नेणती गोपींची प्रेमखुण॥धिक्तान् धिक्तान्धिक्कार ॥ ७२ ॥ धिकिटि धिमिकिटि थोंगि थोंगि ॥ इत्यादि ध्वनि ज्या मृदंगीं ॥ याज्ञिकां धिक्कारिती स्वर्गीं॥कृष्णवियोगीं धिग्धिक्तान्॥७३॥धित्लान्धित्लान् ऐसिया ध्वनि॥उपासकां उपहासुनी॥ह्मणती ठकलां भेदभजनीं ॥ व्रजकामिनींसम ननचां ॥ ७४ ॥ अतद्व्यात्ति तन्न तन्न॥ सराग विपंचीमाजि स्वन॥ताल प्रकटी श्रुतिव्याख्यान ॥ अतन्निरसनव्यतिरेकें ॥ ७५ ॥ ततत्तालें तत्वावबोध ॥ रासनर्तनीं अन्वय शुद्ध॥श्रुति प्रतिपादिती प्रसि-

---

१ लक्ष, दशलक्ष या प्रमाणानें. २ त्यांस धिक्कार असो. ३ तत् ईश्वर त्याची व्यावृत्ति वगळणें.

द्ध ॥ नाट्य करपदविन्यासीं ॥७६॥ दुदुभिघोषें जारकर्म॥त्रिजगद्विख्यातकर्ता परम॥तो एक श्रीकृष्ण पुरुषोत्तम ॥ येर अधम दंडार्ह ॥ ७७ ॥ रुदत ललना लागती पाठीं ॥ विवश हुडकिती वनसंकटीं ॥विलाप करिती वाळवंटीं ॥ परि स्मरकाठी ज्या नवधी॥७८॥ कंदर्पदर्प रहित झाला॥ निर्जित लज्जित जठरा आला ॥ तो एक श्रीकृष्ण दादुला ॥ अद्भुत लीला विस्तारी ॥ ७९ ॥ शिवासि झालें लिंगपतन ॥ चंद्र झाला सलांछन ॥ अहल्यादोषें संक्रंदन ॥ सहस्रनयन भगांकी ॥ ८० ॥ वालखिल्यांची जननकुटी ॥ बैसली ब्रह्मयाचे ललाटीं॥सामान्य सुर नर कोट्यानकोटि ॥ स्मरें संकटीं लोळविले ॥ ८१ ॥ ऐशा सदंडय स्मरलांछनीं ॥ सुरनरमुनीश्वरांच्या श्रेणि ॥ दुंदुभिघोषें चक्रपाणि ॥ स्मर जिंकोनि नाचतसे ॥ ८२ ॥ रडत ललना लागतां पाठी ॥परी ज्या नलगे मन्मथकाठी ॥ यास्तव मारुति शुक धूर्जटि ॥ वंदिती मुकुटीं कृष्णातें ॥ ८३ ॥ गोपीसुकृतप्रादुर्भाव ॥ कीं हा मन्मथविजयोत्सव ॥ जारकर्में श्रीकेशव ॥ स्वरतानुभव त्रिजगा दे ॥ ८४ ॥ दुंदुभिपणवानकनिःस्वनीं ॥ नभा गाजविती निर्जरश्रेणी ॥ संतत वर्षती दिव्यप्रसूनीं ॥ तो सुगंध धरणी नसमाये ॥ ८५ ॥ सस्त्रीक गंधर्वांचे पति ॥ संगीततानमानाच्या रीति ॥ हरियश बहळ अमळ गाती ॥ वनिता धरिती करताळा ॥८६॥ विमानश्रेणिसंकुलनभीं ॥ निर्जरीं त्राहाटितां दुंदुभि ॥ तदनुलक्षें भूगोळगर्भीं ॥ तुमुलध्वनि कोंदला ॥ ८७ ॥

वलयानांनूपुराणांकिंकिणीनांचयोषिताम् ॥ सप्रियाणामभूच्छब्दस्तुमुलोरासमंडले ॥ ६ ॥

॥ टीका ॥ तुमुलशब्द किमुद्भूत ॥ तो वाखाणी या श्लोकांत ॥ वक्ता चतुर व्याससुत ॥ तैं समस्त पर्येसा॥

---

१ समर्थ. २ हे साठ हजार ऋषि ब्रह्मदेवा पासून झाले. ३ कश्यापासून झाला.

॥८८ ॥ पदविन्यास नर्त्तनपर ॥ तेणें गर्जती नूपुर॥ वाकी वाळे पदमंजीर ॥झणत्कार कटकाचा॥ ८९ ॥ अणवट पोल्हारे विरोदिया ॥ सुभट जोडवीं विचित्र झिणिया ॥ रासरंगणीं नर्त्तनक्रिया ॥ झणत्कारें माजविती ॥९०॥ विचित्र वसनें विविधाकार ॥ अधोक्षजाचें पीतांबर ॥ क्षुद्रघंटिकाकिंकिणीगजर ॥ मेखलामंडित ऊठती ॥ ९१॥ करविक्षेप तरळती बहळ ॥ क्वणित वलयध्वनि मंजुळ ॥ हस्तमुद्रिका सुतेजाळ ॥ तेजःपुंज तळपती ॥ ९२॥ सुमनसुरत्नहार कंठीं॥ डोलती नृत्याच्या परिपाटीं ॥ चंचल कुंडलें भूषादाटी ॥ कुंतळनिकटीं तरळती ॥९३ ॥ वलयनूपुरें किंकिणीगजर ॥ सिंजित सर्वही अलंकार ॥ मानिनीं सहित मुरलीधर ॥ नर्त्तनपर जे ठायीं ॥९४ ॥ तये रासमंडळस्थानीं ॥ एवं उठिला तुमुल ध्वनि ॥ सुरीं दुंदुभि त्रहाटिल्या गगनीं ॥ धरा दणदणी श्रीचरणें ॥ ९५ ॥ तेणें दणाणी पाताळभुवन ॥ तुमुल ह्मणिजे ध्वनिसंकीर्ण ॥ रासमंडळीं श्रीभगवान् ॥ नाचतां त्रिभुवन कोंदलें ॥ ९६ ॥ एकात्मत्वें अनेकसृष्टि ॥ दावूनि लपवी मायेपोटीं ॥ गौर गोपींची भवंती घरटी ॥ माजि जगजेठी तो नाचे ॥ ९७ ॥

तत्रातिशुशुभेताभिर्भगन्वादेवकीसुतः ॥ मध्येमणीनांहैमानांमहामरकतोयथा ॥ ७ ॥

॥ टीका ॥ तेथ अत्यंत शोभायमान॥वनितावेष्टित श्रीभगवान् ॥सभाग्य सुरवरांचे नयन॥ देवकीनंदन निरखती जे ॥ ९८ ॥ ऐकैक महामरकतमणि ॥ मध्यें एकैक सुवर्णवर्णी ॥ ऐशी रासमंडळश्रेणी॥ विचित्रभूषणीं पूर्वोक्त ॥ ९९ ॥सजलजलदचक्रीं चपला ॥ कींकांचननीळमणींची माळा॥ कीं मधुकरमंडित हेमकमळा ॥ शोभे अमळा रूज जैंवि ॥ १०० ॥ कीलाल कालिंदजेचें नीळ ॥ तैशा श्रीकृष्णमूर्ति सुनीळ ॥ गौर गोपी गंगाज-

---

१ शब्दकरणारे. २ पाच नामक रत्न. ३ याळ. ४ यमुनेचें.

ल ॥ मिश्र कल्लोल प्रयागीं ॥१॥ माजि आरक्त रत्नद्युति ॥ कुंकुमतिलक सरस्वती ॥ प्रत्यक्ष त्रिवेणी रासाकृति॥ शृंगाररसें तुंबळिली ॥ २ ॥ तेथ विलोललोचन मीन ॥ कुंडलें मकरस्थानापन्न॥गोपीकुचतुंगां कवळून॥ करी अवगाहन रतिरंग ॥ ३ ॥ कीं कृष्ण तमाल त्रिदशतरु ॥ तरुणी कांचनलतिकाकारु ॥ कीं कृष्णकस्तूरीमाजि केसरु ॥ ललना रुचिर लावण्यें ॥४॥ एवं महामरकतमाणि ॥ शोभे जैसा स्वर्णभुवनीं ॥ तैसा वेष्टित बल्लवतरुणीं ॥ चक्रपाणि शोभाढ्य ॥ ५ ॥ गोपीवेष्टित शोभला हरि॥ते हे निरूपिली कुसरी ॥ आतां कैशा व्रजसुंदरी॥ कृष्णामाझारीं बिराजती ॥ ६ ॥

पादन्यासैर्भुजविधुतिभिःसस्मितैर्भ्रूविलासैर्भज्यन्मध्यैश्चलकुचपटैःकुंडलैर्गंडलोलैः ॥
स्विद्यन्मुख्यःकबररशनाग्रंथयःकृष्णवध्वोगायंत्यस्तंतडितइवतामेघचक्रेविरेजुः ॥ ८ ॥

॥ टीका ॥ कृष्णमूर्त्ति त्या नवघनचक्र ॥ सुनीळबहळपटळप्रचुर ॥ गोपी चंचच्चंपलाकार ॥ चमत्कारें चमकती ॥ ७ ॥ त्यांची चांचल्यचमत्कृति॥ पादन्यासें पद थरकती ॥ हस्तविक्षेप संगीतरीति ॥ भुजा तळपती साभरण ॥ ८ ॥ सप्तस्वरीं तानमानें ॥ कृष्णगुणांचीं संकीर्तनें ॥ सत्रप आपांगविमोक्षणें ॥ भ्रूविक्षेप सविलास ॥ ९ ॥ कुंतळ तरळती भ्रमराकृति ॥ श्रवणीं मौळीं भूषणदीप्ति ॥ निडळपाटिका रुचिरद्युति॥ झळकताती तारुण्यें ॥ १० ॥ विलोल कुंडलें गंडदेशीं ॥ प्रतिबिंबती रविप्रभेशीं ॥ कृष्णश्रवणीं मकराऐसीं ॥ मिथाप्रभेशीं सांघटंच ॥ ११ ॥ कुंकुमरेखामंडितभाळें ॥ पुलकप्रचुर वदनकमळें ॥ अमूल्य मणिमयमुक्ताफळें ॥

---

१ चंचल विजेसारख्या. २ अलंकारांसह. ३ सलज्ज. ४ मिश्रण. ५ ज्यांवर पुष्कळ रोमांच उठले तीं.

स्मितभासुमेळें डोलती ॥ १२ ॥ मौळग्रथित कुसुमश्रेणि ॥ वसनपल्लवीं अनर्घमाणि ॥ हेमांबरांच्या प्रभाकिरणीं ॥ दिवसरजनी नुमसविती ॥ १३ ॥ विलोल डोलती हार कंठीं ॥ विचित्र रंगीं कंचुक्या तगटी ॥ चंचल कुचकलशांची थाटी ॥ वरी कुचपटी छादित ॥ १४ ॥ उत्तरीय वसनें ते कुचपट॥परिधानांबरीं कृतपरवंट ॥ पल्लव सरळ तरळती नीट ॥ लखलखाट भूभागीं ॥१२॥ मध्य सुमध्यमा लवविती कैसे ॥रासरंगणीं नर्त्तनमिसें॥ करपदतालें गीतां सरिसे ॥ विविध प्रासप्रभेदीं ॥ १६ ॥ ऐशा नाचती कृष्णवधू ॥ स्वेदें द्रवती मुखशरदिंदु ॥ कांचिवेणिका ग्रंथीं निबद्धु ॥ नृत्यें आबद्ध हों सरल्या ॥ १७ ॥ नर्त्तनश्रमें कुरळगांठी ॥ सुटतां सुमनें नथरती मुकुटीं ॥ तालें स्रवती भूतळवटीं ॥ सुमनें सद्वृष्टि संमिश्र ॥१८॥ रशनाग्रथनें वसना दार्ढ्य॥नीवीबंधन पल्लवाढ्य ॥ तच्छैथिल्यें पावे मौढ्य॥ जेंवि आषाढ्य घनपटळ ॥ १९ ॥ कृष्णगुणांच्या गायनझुळका ॥मंदमारुताकृति त्या देखा ॥ तेथ गर्जना क्वणितप्रमुखा ॥ वलयनूपुरीं उपमिजे ॥ २० ॥ वदनकमळींचे प्रस्वेदकण॥तेंचि तुषाराभिवर्षण ॥ सुगौर गोपी तडिद्वर्ण ॥ कृष्णमेघांगीं विराजती ॥ २१ ॥

उच्चैर्जगुर्नृत्यमानारक्तकंठ्योरतिप्रियाः ॥ कृष्णाभिमर्शमुदितायद्गीतेनेदमावृतम् ॥ ९ ॥

॥ टीका ॥ कृष्णें सहित नाचतां गोपी ॥ सप्तस्वरांच्या आलापीं ॥ घोरमंद्रताररूपीं ॥ करिती उच्चतर गायनें ॥ २२ ॥ यंत्रीं वोढिले स्वर्णतार ॥ तैसे कंठीं सप्तस्वर ॥ उच्चावच प्रभेदवर ॥ रक्तकंठ्या आळविती ॥ ॥ २३ ॥ नाना रंगीं रंगले कंठ ॥ गुर्जर गौड माळव पाठ ॥ केदार कांबोज करनाट ॥ सारंग सोरट कल्याण

---

१ हास्यकांतीच्या मिश्रणानें. २ नजाणवती. ३ सुंदर कटिभाग ज्यांचे त्या. ४ मधुर कंठाच्या स्त्रिया.

॥ २४ ॥ भूपाळ भैरवमालकौशिक ॥मारुशंकराभरणप्रमुख ॥ वसंतमधुमाधवीदीपक ॥ अहेरी तुंडी रामकलि ॥ २५ ॥ कृष्णकीर्त्तनीं बल्लवबाळा ॥ रागरागिणी गाती सकळा॥मूर्च्छनाप्रभेद सकळ कळा ॥ नर्तन काळानुरूप ॥ २६ ॥ रतिलालसा विविधागानीं ॥ मुदिता माधवालिंगनीं ॥ मुखकुचअवयवसंस्पर्शनीं ॥ परमानंदें परिपूर्णा ॥ २७ ॥ अखिल चराचर ज्यांच्या गानें ॥ व्याप्त विस्तृतगुणकीर्त्तनें ॥ त्या कृष्णाच्या समनर्त्तनें ॥ प्रमुदित मनें गोपींचीं २८ ॥

काचित्सहमुकुन्देनस्वरजातीरमिश्रिताः ॥ उन्निन्येपूजितातेनप्रीयतासाधुसाध्विति ॥ १० ॥
तदेवध्रुवमुन्निन्येतस्यैमानंचबह्वदात् ॥

॥ टीका ॥ त्यांमाजि कोण्ही एकी वनिता ॥ कृष्णगानें संमिश्रिता ॥ विविधापरी आलाप करितां ॥ स्वयें त्या गीता आलापी ॥ २९ ॥ षड्ज ऋषभ आणि गांधार ॥ मध्यम पंचम धैवत स्वर ॥ निषादादि आलाप चतुर ॥ उच्चउच्चतर आलापी ॥ ३० ॥ पूर्वी कृष्णेंशीं संमिश्र ॥ पुन्हा पृथक्त्वें अमिश्र ॥ कृष्णासमान रागोद्धार ॥ आळवी सुंदर स्वरजाति ॥ ३१ ॥ कृष्ण आळवी जें ध्रुवपद ॥ तत्तुल्य गोपी आळवी विशद ॥ तीसी सम्मानी मुकुंद ॥प्रियसंवादें भली ह्मणे ॥ ३२ ॥ साधु साधु धन्य धन्य ॥ इत्यादि गौरवें दे बहुमान ॥ तीतें प्रियतम जनार्दन ॥ आपणावीण नान्यत्र ॥ ३३ ॥

काचिद्रासपरिश्रांतापार्श्वस्थस्यगदाभृतः ॥ जग्राहबाहुनास्कंधंश्लथद्वलयमल्लिका ॥ ११ ॥

---

१ काळास अनुसरून. २ संपूर्ण.

॥ टीका ॥ एवं नृत्यविशेषें कोण्ही ॥ कृष्णें सम्मानिल्या तरुणी ॥ कोण्ही विशिष्टमधुरगानीं ॥ कृष्णसम्मानीं संतुष्टा ॥ ३४ ॥ कोण्ही संगीततालमानें ॥ कृष्णें गौरविल्या सम्मानें ॥ हावभाव करचालनें ॥ साधुवचनें तोषविल्या ॥ ३५ ॥ त्या तोषाची पृथक् रीती ॥ कुरुकुळचूडारत्नाप्रति ॥ वशिष्ठान्वयगोत्रसंतति ॥ बादरायणि निरूपी ॥ ३६ ॥ कोण्ही एकी आभीरललना ॥ रासमंडळीं कृतनर्त्तना ॥ परिश्रांता श्रमापहरणा॥ मधुसूदना सह नृत्यें ॥ ३७ ॥ आपुला बाहु कृष्णस्कंधीं ॥ निकट असतां पार्श्वसंधि ॥ टेका घेऊनि श्रम निषेधी॥ परमानंदीं निमग्न ॥ ३८ ॥ रासश्रमभरें कंकणें ॥ ढिलावलीं तीं करनर्तनें ॥ मौळमल्लिका कचग्रथनें ॥ मोकळीं झालीं सुटोनी ॥ ३९ ॥ कृष्ण एक मजचि पाशीं ॥ मीचि प्रियतम श्रीकृष्णासी ॥ ऐसें मानूनि निजमानसीं ॥ स्वानंदासी ते पावे ॥ ४० ॥

तत्रैकांऽसगतंबाहुंकृष्णस्योत्पलसौरभम् ॥ चंदनालिप्तमाघ्रायहृष्टरोमाचुचुंबह ॥ १२ ॥

॥ टीका ॥ एकी बल्लवी श्रमहरणार्थ ॥ श्रीकृष्णबाहु निजांसंगत ॥ प्रफुल्लोत्पलसुगंधभरित ॥ चंदनचर्चित चुंबितसे ॥ ४१ ॥ परमाह्लादें रोमांचित ॥ बाहु हुंगे सप्रेममुदित ॥ कृष्णश्लेषें आनंदभरित ॥ प्रिय मानित हरि आपणा ॥ ४२ ॥

कस्याश्चिन्नाट्यविक्षिप्तकुंडलत्विषमंडितम् ॥ गंडंगंडेसंदधत्याअदात्तांबूलचर्वितम् ॥ १३ ॥

॥ टीका ॥ नाचतां कुंडलें हालती जैसीं ॥ कोण्ही एकीच्या गंडप्रदेशीं ॥ तद्भामंडित स्वगंडेंशीं ॥ योजी प्रेमेंशीं

---

१ शाबास शाबास अशा वचनानें. २ वसिष्ठकुलोत्पन्न. ३ दूर करी. ४ आपल्या खांदावरील. ५ कृष्णाच्या आलिंगनानें. ६ त्याच्या प्रभेनें शोभमान.

हरिगंड[1] ॥ ४३ ॥ कुंडलप्रभा गालावरी ॥ तरळ तळपे परस्परीं ॥ तत्संयोगें अंगीकारी ॥ हरिमुखचर्वित[2] तांबूल ॥ ४४ ॥ वदन घालूनि हरिवदनांत ॥ तांबूल स्वीकरी तच्चर्वित ॥ तेणें लाभें आनंदभरित ॥ फिकें मानित कैवल्य ॥ ४५ ॥ तया तांबूललाभें ह्मणे ॥ प्रियतम मानिलें मजचि कृष्णें ॥ माझिये अवाप्तसुखाचे तुलने ॥ तुळितां ठेंगणे विधिहरही ॥ ४६ ॥

नृत्यंतीगायतीकाचित्कूजन्नूपुरमेखला ॥ पार्श्वस्थाऽच्युतहस्ताब्जंश्रांताऽधात्स्तनयोःशिवम् ॥ १४ ॥

॥ टीका ॥ तव आणिखी कोण्ही ललना[3] ॥ नृत्यगायनीं परम निपुणा ॥ तालबद्धपदभूषणां ॥ किंकिणीरशनाध्वनियुक्त ॥ ४७ ॥ गीतनृत्यभूषणगजरीं ॥ तोषोनि सम्मानी श्रीहरि ॥ कृष्णहस्ताब्ज स्वकुचांवरी ॥ धरी सुंदरी श्रंतमतें ॥ ४८ ॥ तेणें ह्मणे मजसारिखी ॥ कृष्णासि प्रियतम नाहीं सखी ॥ ऐसिया बोधें परमसुखी ॥ सादर निरखी हरिवक्रा ॥ ४९ ॥

गोप्योलब्ध्वाऽच्युतंकांतंश्रियएकांतवल्लभम् ॥ गृहीतकंठ्यस्तद्दोर्भ्यांगायंत्यस्तंविजह्रिरे ॥ १५ ॥

॥ टीका ॥ ऐशा समस्त आणिक महिला ॥ रासविलासीं नर्त्तनकुशला[4] ॥ कृष्णसम्मानें सुखसोहळा ॥ लीलाविभ्रमें भोगिती ॥ ५० ॥ कमलारतिरंगएकांत ॥ तो प्रियतम जोडला कांत ॥ तेणें लाभें गोपी समस्त ॥ आनंदभरित हृत्कमळीं ॥ ५१ दोहीं बाहीं त्याचे कंठीं ॥ कामसंभ्रमें सुदृढ मिठी ॥ घालूनि तच्चरितें बाक्पुटीं ॥ स्वरपरिपाटीं आळविती ॥ ५२ ॥ ह्मणती रतिरंगलालस धीर ॥ कृष्ण कंदर्पकेलिचतुर ॥ योगिमानसकुवलय-[5]

---

१ गाल. २ चावलेला. ३ स्त्रिया. ४ रतिविलासांमध्यें निपुण. ५ योग्यांचें मानस हेंच कमळ त्यावरील भ्रमर.

भ्रमर ॥ मन्मथसुंदर मुरहंता ॥ ५३ ॥ ऐशा श्रीकृष्णयशगायनीं ॥ रासताडवमंडितध्वनि ॥ वलयनूपुरकटिकिंकिणी ॥ गजरें कृष्णीं क्रीडती त्या ॥ ५४ ॥ ऐसें गोपीं सह नर्त्तन ॥ रासरंगीं श्रीभगवान् ॥गायक वादक गंधर्वगण ॥सिद्धचारणशिक्षार्थ ॥५५॥ तेथ उत्कट शृंगाररस ॥देखोनि तयाचें मानस ॥ स्त्रियांसहित मोह विशेष ॥ पावले असतां ते काळीं ॥ ५६ ॥ वाद्यगीतवर्जितव्यंग ॥ रासरंगाचा होईल भंग ॥ ह्मणोनि स्वसत्ता श्रीरंग ॥ प्रकटी अमोघ ऐश्वर्य ॥ ५७ ॥विराम पावतां गंधर्वपति ॥ अन्य वाद्यांदि संपत्ति ॥ कैशा निर्मी श्रीयदुपति॥तें परीक्षिती शुक सागे ॥ ५८ ॥

कर्णोत्पलालकविटंककपोलघर्मवक्त्रश्रियोवलयनूपुरघोषवाद्यैः ॥
गोप्यःसमंभगवताननृतुःस्वकेशस्रस्तस्रजोभ्रमरगायकरासगोष्ठ्याम् ॥१६ ॥

॥ टीका ॥ भगवंतेंशीं सह गोपिका ॥ नाचत्या झाल्या प्रेमोत्सुका ॥ नर्त्तनश्रमें कुरुनायका ॥ मुखमयंका[1] घर्मांबु ॥ ५९ ॥ पखे बाळ्या कर्णसुमनें ॥ बुगड्या भोंवऱ्या जडितरत्नें ॥ ताटंकादि श्रवणाभरणें ॥वदनलक्ष्मी शोभविती ॥६० ॥ श्रवणनयनकपोलस्पर्शी ॥ कुंतळ[2] रूळती उभयप्रदेशीं ॥ श्रमाक्त शोभा श्रीमुखासी॥सालंकृता सस्वेद ॥ ६१ ॥ करकंकणें किंकिणी कांची ॥ वांकीनूपुरपदकटकांची ॥ ध्वनिसाम्यता वादित्रांची[3] ॥ रासमंडळीं वैशिष्ट्यें ॥ ६२॥ तये राससभेच्या ठायीं ॥ गूढ गंधर्व भ्रमरदेहीं ॥ सप्तस्वरांची नवाई ॥ गुंजारवें आळविती ॥ ६३ ॥ मौलग्राथितें विविधें सुमनें ॥ पुष्पमाळा पुष्पभूषणें ॥ गळोनि पडती जैसीं घ-

---

[1] मुखचंद्राला. [2] कुटिल केश. [3] वाद्यांची.

नें ॥ वृष्टि कीजे सुमनांची ॥ ६४ ॥ नृत्यगीतगायनें हरिख ॥ पावोनि डोलतां सत्यलोक ॥ तौर्यत्रिकां त्याग विशेष ॥ लब्ध अनेक कुसुमांचा ॥ ६५ ॥ तेथ शंका करिती चतुर ॥ जे नृत्यापासीं कैंचे भ्रमर ॥ सुगंधलोभें सुकृत सधर ॥ होते तत्पर ते तेथें ॥६९॥ ऐसिया गोपी कृष्णप्रेमें ॥ रासमंडळीं कृष्णकामें ॥ विठ्ठल देखोनि पुरुषोत्तमें ॥ आत्मारामें रमविल्या ॥ ६७ ॥ जैसे ज्यांचे मनोरथ ॥ जैशा नानाविभ्रमयुक्त ॥ तेसतैसा मन्मथतात ॥ रमता झाला तच्छंदें ॥ ६८ ॥

एवंपरिष्वंगकराभिमर्शस्निग्धेक्षणोद्दामविलासहासैः ॥
रेमेरमेशोव्रजसुंदरीभिर्यथाऽर्भकःस्वप्रतिबिंबविभ्रमः ॥ १७॥

॥ टीका ॥ गोपी नेणती चातुर्यकळा ॥ घुरटा रानटा बल्लवअबळा ॥ त्यां माजि नवजलद सांवळा ॥ प्रकटी लीला स्वसत्ता ॥ ६९ ॥ कोकिलकंठ्या सप्तस्वरीं ॥ सुधा लाजवी स्वरमाधुरी ॥ गीतमूर्च्छनाप्रभेदकुसरी ॥ प्रकाशी हरि ऐश्वर्यें ॥ ७० ॥ लावण्यकुशल विलासकळा ॥ सौरभ्यचातुर्यभूषासकळा ॥स्वसत्ता निर्मूनि घनसांवळा ॥ करी व्रजअबळा संगाहे ॥ ७१ ॥ जेंवि जाह्नवीवोघोदक ॥ आपणा मीनले जे वोघ अनेक ॥त्यांमाजि भरूनि पूर्णत्व देख ॥ करी सम्यक् प्रावृटीं ॥ ७२ ॥ तेंवि अचिंत्यगुणपरिपूर्णहरि ॥ तिहीं डवंरिल्या व्रजसुंदरी ॥ क्रीडार्थ प्रतिबिंबाचिये परी ॥ मन्मथसमरीं सज्जिल्या ॥ ७३ ॥ एवं रासविलासनर्त्तनरीति ॥ ज्या ज्या कथिल्या विभ्रमयुक्ति ॥ चुंबनालिंगन अपांगपातीं ॥ करकुचप्रांतीं संस्पृष्ट ॥७४ ॥ नर्मोक्तिभाषणें स्निग्धें-

---

१ शृंगारयुक्त झाल्या.

क्षणें ॥ बाहुकपोलहनुस्पर्शनें ॥ उद्दामविनोद हास्यवदनें ॥ कामोद्दीपनें प्रकटिलीं ॥ ७५ ॥ जेंवि समर्थ स्वसामग्री
॥ देऊनि अकिंचनाच्या घरीं ॥ भोगाविष्ट सर्वोपचारीं ॥ तेंवि श्रीहरि वनितांसी॥७६॥ बिंब हांसतां प्रतिबिंब
हासे ॥ कारपदचांचल्य बिंबासरिसें ॥ तैसा रमला आत्मविलासें ॥ व्रजवनितांशीं जगदात्मा ॥ ७७ ॥
रासमंडळीं ऐसी लीला ॥ करितां कंदर्पबाणें विकळा ॥जाल्या कैश्या त्या व्रजबाळा ॥ कुरुभूपाळा तें ऐक॥७८॥

तदंगसंगप्रमुदाकुलेंद्रियाःकेशान्दुकूलंकुचपट्टिकांवा ॥
नांजःप्रतिव्योढुमलंव्रजस्त्रियोविस्रस्तमालाभरणाःकुरूद्वह ॥ १८ ॥

॥ टीका ॥ कृष्णांगसंगसंस्पर्शनें॥प्रकृष्टमुदिता मन्मथबाणें॥विकळ झालीं सकळ करणें॥वसनाभरणेंन सांवरिती
॥७९॥शिथिलसपुष्पकेशग्रथनें ॥ विमुक्तग्रंथि विगलित वसनें ॥ उत्तरीयें कुचाच्छादनें ॥ रूळतां चरणें तुडविती
॥ ८० ॥ मुक्ताप्रवाळवैदूर्यमणि ॥ करमुद्रिका विविधाभरणीं ॥ श्रवणकंठशिरोभूषणीं ॥ गळतां कामिनी नुमजती
॥ ८१ ॥ अमोघसुगंधसुमनमाळा ॥ बाहुमस्तकीं आणि गळां ॥ आपाद रुळतां व्रजवेल्हाळा ॥ नेणती विकळा
कंदर्पें ॥ ८२ ॥ कबरांबरें वसनाभरणें॥गळतां सावरूं नशकती करणें॥ ऐशा गोपी मन्मथबाणें॥रासक्रीडनें मोहिता
॥८३॥केवळ गोपीच पावल्या मोह॥ऐसा नधरिजे संदेह॥गगनीं सुरस्त्रियांचा समूह॥कृष्णक्रीडनें मोहिला॥८४॥

कृष्णविक्रीडितंवीक्ष्यमुमुहुःखेचरस्त्रियः ॥ कामार्दिताःशशांकश्चसगणोविस्मितोऽभवत् ॥ १९ ॥

॥ टीका ॥ कृष्णक्रीडानिरीक्षणें ॥ वेधलीं देवांगनांचीं मनें ॥ नेणती विगलित वस्त्राभरणें॥मन्मथबाणें विद्धांगा

---

१ अप्रतिबंध. २ छिद्र पाडिलें अंगाला ज्यांच्या त्या.

॥ ८५ ॥ वल्लभ असतां निकटवर्ती ॥ खेंचरांगना विगतस्मृति ॥ विवश करणांची प्रवृत्ति ॥ पाहतां जगती हरिक्रीडा ॥ ८६ ॥ आपुले वंशीं वंशधर ॥ रसिक रासक्रीडाचतुर॥ देखूनि भुलला रजनीकर॥ सऋक्षखेचरवलयेंशीं ॥ ॥ ८७ ॥ ईषन्मात्र शशिमंडल ॥ गगनीं न होतां चंचल ॥ स्तब्ध झाली नक्षत्रमाळ॥ नवग्रह निश्चळ ते काळीं ८८ चंद्र नवचतां अस्तमाना ॥ उदय नकरवे चंडकिरणा॥ ऐसियास्तव रात्रिमाना ॥ नेणीव द्रुहिणा शिवशक्रां ॥ ८९ ॥ ब्राह्मषण्मासांची रजनी ॥ कृष्णें केली रासनर्त्तनीं ॥ व्रजस्त्रियांचे प्रीतीकरूनी ॥ साच ते वाणी या हेतु ॥ ९० ॥ रासक्रीडेच्या अवसरीं ॥ निश्चळ राहिले ग्रह अंबरीं ॥ तेणें कुंठित भास्करभंवरी ॥ बृहच्छर्वरी षाण्मासी ॥ ९१ ॥ ब्राह्मषण्मासांची राती ॥ रासमंडळीं कमलापति ॥ करूनि प्रेमळा गोपयुवति ॥ निजात्मरति रंगविल्या ॥ ९२ ॥ आतां तेंचि रतिरहस्य ॥ जैसें गोपींचें मानस॥ तैसतैसा आदिपुरुष॥ अर्पी संतोष तें ऐका॥ ९३॥

कृत्वातावंतमात्मानंयावतीर्व्रजयोषितः ॥ रेमेसभगवांस्ताभिरात्मारामोऽपिलीलया ॥ २० ॥

॥ टीका ॥ कात्यायनीव्रताचरणीं ॥ प्रार्थिली पृथक्त्वें भवानी ॥ नंदनंदन पति दे ह्मणोनि ॥ पुरश्चरणीं स्तुतिनमनें ॥ ९४ ॥ त्या व्रताची सांगतासिद्धि ॥ झाली ह्मणोनि कृपानिधि ॥ येऊनि चीरापहरणविधि ॥ लीलाविनोदीं गौरविल्या ॥ ९५ ॥ तेव्हां त्यांचें अभ्यंतर ॥ जाणोनि वदला वरदोत्तर ॥ तें येथ करावया साचार ॥ पृथकाकार नट धरिले ॥ ९६ ॥ जितुक्या होत्या बल्लवयुवति ॥ तितुक्या पृथक कृष्णमूर्त्ति॥ होऊनि रमला त्यांचिये प्रीती ॥ निजात्मरतिरसभोक्ता ॥ ९७ ॥ तया सुरतामाजि पूर्ण ॥ प्रकटी आपुलें कृपाळुपण ॥ तें निरूपी

---

१ देवांगना. २ सोगें.

व्यासनंदन ॥ परिसे सर्वज्ञ कुरुवर्य ॥ ९८ ॥

तासामतिविहारेणश्रांतानांवदनानिसः ॥ प्रामृजत्करुणःप्रेम्णाशंतमेनात्मपाणिना ॥ २१ ॥

॥ टीका ॥ अत्यंतरतिरंगसंगरीं ॥परिश्रांता व्रजसुंदरी ॥ प्रस्वेदकणिका मुखकह्लारीं॥सर्व शरीरीं उद्भवल्या॥
९९ ॥ चुंबनालिंगनें रहितवसनें ॥ वर्ष्मस्पर्शें[1] कुचपीडनें ॥ मन्मथसदनसंघट्टनें ॥ गोपीवदनें घर्माक्तें ॥ २००॥
देखोनि प्रपन्नपारिजात[2] ॥ प्रेमळ वत्सळ करुणाभरित ॥ सुखकरकरतळें परिमार्जित ॥ सुरतस्वेद गोपींचा ॥१॥
जो पद्मकर विधीचें माथां ॥ शंतम ठेवी अनुग्रहीतां ॥ तेणें हस्तें मन्मथजनिता ॥ वनितावदनें परिमार्जी ॥ २ ॥
कमलासुरतीं ज्या करतळें ॥ घर्म पुसूनि तोषवी कमळें ॥ तेणें हस्तें वदनकमळें ॥ व्रजललनांचीं परिमार्जी ॥
॥३ ॥ तो कृष्णाचा शंतम कर ॥ स्पर्शतां गोपीहृत्फुल्लार ॥ होऊनि परमानंदनिर्भर॥हर्षें श्रीधरयश गाती ॥४॥

गोप्यःस्फुरत्पुरटकुंडलकुंतलत्विग्गंडश्रियासुधितहासनिरीक्षणेन ॥
मानंदधत्यऋषभस्यजगुःकृतानिपुण्यानितत्कररुहस्पर्शप्रमोदाः ॥ २२ ॥

॥ टीका ॥ चंचच्चामीकरकुंडलें ॥ भ्रमरभासुर कुंतळ काळे ॥ उभयप्रभान्वितकपोलें॥मुकुराकार द्युतिमंतें
॥ ५ ॥ विशेष रत्नजडित लेणीं ॥ मिश्रित प्रभा तेणें करूनी ॥ अमृताकार फांके वदनीं ॥ स्निग्धेक्षणीं स्मितसहिता
॥ ६ ॥ ऋषभ ह्मणिजे परमश्रेष्ठ ॥ आपुला पति जो श्रीकृष्णनाथ ॥ त्यासी सुरतीं सम्मानित ॥ गोपी
यथोचित सुचरितीं ॥ ७ ॥ गाढालिंगनीं कटिसंघटीं ॥ अधरपानीं संलग्नकंठीं ॥ स्निग्धापांगीं करसंस्पृष्टि ॥ व्र-

---

[1] शरीरस्पर्श. [2] शरण आहे पारिजात ज्याला तो.

जगोरटी हरि यजिती ॥ ८ ॥ ऐसिया सुरतानंदकाळीं ॥ व्रजसुंदरी कीर्तनशाली ॥ सप्रेमभरिता वदनकमळीं ॥ गाती सुताळीं हरिचरितें ॥ ९ ॥ हरिकरनखक्षतें कुचतटीं॥होतां प्रमोदभरिता पोटीं॥तों तों गाती यश वाक्पुटीं ॥ सुकृतकोटिफळलाभें ॥ १० ॥ स्थळक्रीडा करूनि ऐसी ॥ गोपीरतिघर्मपरिहारासी ॥ करावया जळक्रीडेसी ॥ करी तिहींशीं तत्प्रेमें ॥ ११ ॥

ताभिर्युतःशममपोहितुमंगसंगघृष्टस्रजःस्वकुचकुंकुमरंजितायाः॥
गंधर्वपालिभिरनुद्रुतआविशद्वाःश्रांतोगजीभिरिभराडिवभिन्नसेतुः ॥ २३ ॥

॥ टीका ॥ गोपींच्या कुचकुंकुमरंगें ॥ माळा संघृष्ट रतिप्रसंगें ॥ तिये कृष्णमाळेच्या अनुरागें ॥ भृंग सवेगें अनुयायी ॥ १२ ॥ गंधर्वप जे गंधर्वपति ॥ तद्वत गायकां अळींची पंक्ति॥ तत्समवेत यमुनेप्रति॥स्वयें यदुपति प्रवेशे ॥ १३ ॥ करिणीगणेंशीं जेंवि करींद्र ॥ कंदर्पदर्पें भेदूनि वप्रं ॥ मन्मथलीले डहुळी नीर ॥ तैसा श्रीधर वधूसंगें ॥ १४ ॥ ज्ञानप्रबोधकवेदार्क ॥ शासनरूप शास्त्रविवेक ॥ सूत्रतत्पद्धतिसूचक ॥ स्मृतिस्मारक धर्मपथा ॥ १५ ॥ इत्यादि लोकवेदमर्यादा ॥ तो धर्मसेतु चालिजे सर्वदा ॥ तरीच पाविजे कैवल्यपदा ॥ करितां भेदा अधःपतन ॥ १६ ॥ सर्वीं सर्वत्र हा धर्मसेतु ॥ चालिजे ऐसा नेम संततु ॥ कृष्ण केवळ कर्मातीतु ॥ आद्य अनंत परमात्मा ॥ १७ ॥ यालागिं नोहे विधिकिंकर ॥भक्तभावनाप्रेमानुसार ॥ स्वच्छंदजारक्रीडापर ॥ तो यदुवीर भिन्नसेतु ॥ १८ ॥ ज्यासि कर्मफळाचा भोग ॥ त्यासी अनुल्लंघ्य सेतुमार्ग ॥ जेथ निजात्मरातिप्रसंग ॥

---

१ नदीतीर.

सेतुभंग तो नगणी ॥ १९ ॥ कृष्ण तों पूर्णकाम निर्विकार ॥ स्वात्माराम अपरतंत्र ॥ स्वभक्तच्छंदें लीलापर जगदुद्धार गुणकर्मैं ॥२०॥ ते कृष्णाची जलक्रीडा ॥ ऐकें भूपा श्रवणसुघडा॥ जीच्या श्रवणें स्वानंद उघडा॥अखिल ब्रह्मांडामाजि भरे ॥ २१ ॥

सोऽभस्यलंयुवतिभिःपरिषिच्यमानःप्रेम्णेक्षितःप्रहसतीभिरितस्ततोऽग ॥
वैमानिकैःकुसुमवर्षिभिरीड्यमानोरेमेस्वयंस्वरतिरत्रगजेंद्रलीलः ॥ २४ ॥

॥ टीका ॥ यमुने माजि युवतिवलय॥वेष्टित प्रविष्ट यशोदातनय ॥ त्यावरी गोपींचा समुदाय ॥ शिंपी तोयसभोंवता ॥ २२ ॥ जिकडे जिकडे विहरे हरि ॥ भंवत्या तैशाच व्रजसुंदरी ॥ जळें शिंपिती चपलकरीं ॥ विविधाकारीं सविलास ॥ २३ ॥ स्निग्ध सप्रेम रुचिरेक्षणें ॥ क्रीडा विनोद हास्यवदनें ॥ चटुलनर्मोक्ति प्रियभाषणें गोपी जीवनें शिंपिती ॥ २४ ॥ बादरायणि विशाळबुद्धि ॥ कोमळामंत्रणें सुखसंवादी ॥ अंगशब्दें नृपातें बोधी ॥ सप्रेमविधि तोषोनी ॥ २५ ॥ विमानयानीं निर्जरगणीं ॥ दिव्य सुमनांचिया श्रेणी ॥ कृष्णावरी अभिवर्षोनी ॥ नानास्तवनीं गुण गाती ॥ २६ ॥ ऐसा अमरीं संस्तूयमान ॥ अनंताचिंत्यगुणपरिपूर्ण ॥ निष्कामनिजात्मरतिसंपन्न ॥ बल्लवीगण तो रमवी ॥ २७ ॥ निजजनांचे लीलेकरून ॥ ज्याचें अवतारचरित्र पूर्ण ॥ तो स्वच्छंदें जलक्रीडन ॥ करी वधूजनतोषार्थ ॥२८॥ गोपीउडुगणीं कृष्णचंद्र ॥ कीं गोपींकरणींमाजि गजेंद्र ॥ कंदर्पदर्पदलनपर ॥ करी यदुवीर जलक्रीडा ॥ २९ ॥इभेंद्र बहुतां करिणींमाजी ॥ तैसाच व्रजवनितासमाजीं ॥ कृष्ण क्रीड-

---

१ स्तुतिकेलाजाणारा. २ गजेंद्र.

तां विमानराजी ॥ कुसुमीं कंजीं वर्षती ॥ ३० ॥ सावळें कृष्णाचें शरीर ॥ सुनील कालिंदीनीर ॥ कस्तूरी नीलोत्पलांचे हार ॥ जेंवि अंबर घनपटळीं ॥ ३१ ॥ त्यांमाजि जैशा विद्युल्लता ॥ तैशा चमकती गोपवनिता ॥ कनकाभरणीं सालंकृता ॥ स्मरोन्नता रतिरंगीं ॥ ३२ ॥ गोपीउरोज श्रीकृष्ण करीं ॥ मर्दितां शोभती कवणेपरी ॥ जेंवि कनकारविंदें भ्रमरीं ॥ यमुनेमाझारीं विराजती ॥ ३३ ॥ ऐसी कथिली स्थळजळकेळी ॥ तदुपरी उपवनीं वनमाळी ॥ क्रीडता झाला वधूमंडळीं ॥ क्रीडाशाली तें ऐका ॥ ३४ ॥

ततःश्चकृष्णोपवनेजलस्थलप्रसूनगन्धानिलजुष्टदिक्तटे ॥
चचारभृंगप्रमदागणावृतोयथामदच्युद्विरदःकरेणुभिः ॥ २९ ॥

॥ टीका ॥ यमुनाजळीं विकसितकमळीं ॥ सुगन्धासक्त होते अळि ॥ वृक्षवल्ली कुसुमें स्थळीं ॥ भ्रमरावळीमण्डित ॥ ३५ ॥ तयां कुसुमांवरूनि अनिळ ॥ मन्द सुगन्ध सुशीतळ ॥ झुळुका येतां दिग्मण्डळ ॥ व्याप्त सकळ सौरभ्यें ॥ ३६ ॥ तये यमुनेच्या उपवनीं ॥ अळिउळ आणि अंगनागणीं ॥ वेष्टित विहरे पंकजपाणि ॥ निर्जरसुमनीं सुपूजित ॥ ३७ ॥ मदांबुमंडित गंडस्थळीं ॥ आसवासक्त भ्रमरावळि ॥ करिणीवेष्टित कंदर्पकेली ॥ करी वनमाळी करी जैसा ॥ ३८ ॥ ऐसा पुलिनीं जीवनीं उपवनीं ॥ त्रिविध क्रीडा पंकजपाणि ॥ क्रीडला तें बादरायणि ॥ उपसंहरूनि निरूपी ॥ ३९ ॥

एवंशशांकांशुविराजितानिशाःससत्यकामोऽनुरताबलागणः ॥

---

१ मकरंद पिण्यांत मग्न झालेली

सिषेवआत्मन्यवरुद्धसौरतःसर्वाःशरत्काव्यकथारसाश्रयाः॥२६॥

॥ टीका ॥ एवं पूर्वोक्तप्रकारीं ॥ सर्वा शरत्काळींच्या रात्री ॥ सत्यसंकल्प गिरिवरधारी॥व्रजसुंदरींसह सेवी४०॥
ज्याचा संकल्प अव्याहत ॥ ब्रह्मांडकोटि निमेषा आंत॥विस्तारूनि जेथींच्या तेथ॥ करी गुप्त ऐश्वर्यें॥४१॥ स्वपदा-
नुरक्ता जाणोनि ललना ॥ तो हा श्रीकृष्ण त्रैलोक्यराणा ॥ फेडावया वरदऋणा ॥ रासक्रीडना अनुसरला ॥४२॥
निजानुरक्ता गोपीगणा- ॥ माजि मधुकरनिभ यदुराणा ॥ करी समस्त दोषा[1]सेवना ॥ शरत्कालीना[2] शृंगारें ॥४३ ॥
दोषाकर[3]भाराजित दोषा ॥ शरत्काव्यकथारसा ॥ आश्रयभूता ज्या अशेषा ॥ तितुक्या परेशा प्रियरूपा ॥४४ ॥
शरत्काळाचें वर्णन ॥ कथारूपें काव्यग्रथन ॥ करिती कविवर विचक्षण ॥ नवरससंपन्न सुखकारी ॥ ४५॥ आ-
श्रय तया काव्यरसा ॥ त्या ज्या शरत्काळींच्या निशा ॥ अनुरक्तगोपीगणविलासा ॥ करूनि कृष्णें सेविल्या॥४६
गोपीगणेंशीं विलास कृष्णें ॥ कामजयार्थ मुख्य करणें ॥ स्वधर्मभंगें व्यभिचारणें ॥हें बोलणें अघटित ॥ ४७ ॥
तरी कां क्रीडला गोपीगणीं॥ऐसी शंका मानिती कोण्ही॥तिहीं श्लोकींच्या त्रितीय चरणीं॥मूळव्याख्यानीं पहावें
॥४८॥श्लोकींचा तृतीय चरण ॥ सिषेव आत्मन्यवरुद्धसौरतः ॥६॥टीका॥आत्मनि ह्मणिजे आपुले ठायीं॥रमण
सुष्ठुत्वें सर्वदाही॥स्खलितविषयेंद्रियप्रवाहीं ॥नोहे कदाही विक्षेपें॥४९॥शबलमायेच्या आवरणें ॥आत्मविस्मृति
तमोगुणें ॥ मलिनसत्वें विक्षेपणें ॥ विषयीं करणें तें भ्रमती ॥५०॥ ऐसा त्रिगुणीं निबद्ध जीव॥ तो सत्य मानी
विषयभाव ॥ तेथ रमणार्थ धरी हांव ॥ लंघूनि सींव धर्माची ॥ ५१ ॥ श्रीकृष्ण केवळ परब्रह्म॥ त्यासी नबाधी

---

१ रात्रीसेवन. २ शरत्कालाच्या. ३ चंद्रप्रकाशानें शोभमान.

अविद्याभ्रम ॥ अजिंक जिंकावया काम ॥ गोपीसंगम नटनाट्य ॥ ५२ ॥ जो नवचेचि समरमही ॥ तयासी कोण्ही नह्मणती विजयी ॥ अलोट शस्त्रास्त्रांच्या घायी ॥ शौर्यें तो तैं वाखाणे॥ ५३ ॥ तैसी शत्रूची आंगवण॥ बुद्धिप्रताप होय जों क्षीण ॥ तोंवरी धैर्यें करी सहन ॥ भयभंजन भगवंत ॥ ५४ ॥ देह असता भूतात्मक ॥ तरी तो धरिता शत्रुधाक ॥ सर्वात्मका शत्रुषट्क ॥ ह्मणतां विवेक पांगुळे ॥ ५५ ॥ पूर्णानुभवें क्षमाशीळ ॥ तेथ शत्रूचें नवचे बळ॥ ये अवतारीं श्रीगोपाळ॥ दावी केवळ वर्तूनी॥ ५६॥ पूतनेचें दुर्जर क्ष्वेड ॥ प्राशी हळाहळ जैसा मृड ॥ धैर्यभंगें करी तडफड ॥ मरणा वरपड ते जाली ॥ ५७ ॥ तृणावर्त्तें गगना नेला ॥ त्यासि तैसाचि अनुकूळ झाला ॥ गुरुतर नुचलतां तो मेला ॥ परी कृष्णें नकेला प्रतिकार ॥ ५८ ॥ शकटभंजन पदचालनें ॥ परी आपण नचळे तया भेणें ॥ यमलार्जुनांतें उन्मळणें॥ परी प्रपातंविघ्नें नडंडळी॥ ५९॥ बकें गिळितां तो कंठीं पोळे॥ परी आपण तया भेणें नपळे ॥ वत्सासुराचे कपटलीले ॥ नकीजे गोपाळें प्रतियत्न ॥ ६० ॥ अघासुरें वत्सें वत्सप॥ गिळूनि केले प्रेतरूप ॥ जाणोनि तयाचा कपटाटोप ॥ शंकाकल्प हरि नधरी ॥ ६१ ॥ तयाच्या मनोरथाचि सरिसा ॥ करितां तद्वदनीं प्रवेशा ॥ गिळितां अडकला त्याचिया घसां ॥ पावला नाशा अघ तेणें ॥ ६२ ॥ ब्राह्मी माया विस्तारून॥ वत्स वत्सापां लपवी द्रुहिण॥ वयस्य वांसुरें होऊनि आपण ॥ लज्जायमान तो केला ॥ ६३ ॥ कालियसर्पे शतैकतोडें ॥ डंखितां शरीरीं विषोर्मि नचढे ॥ सर्वांग कर्षिलें घालूनि वेढे॥ तरी नकोंडे धृति ज्याची ॥ ६४ ॥ कालियफणांवरी नर्त्तन ॥ तेणेंचि सर्पदर्पापहरण ॥ वणवा गिळूनि साहिला पूर्ण

---

१ विष. २ शंकर. ३ अधीन. ४ पतनभयानें. ५ चळन नपावे.

॥ परी नकरी प्रशमन जलवर्षें[1] ॥ ६५ ॥ इंद्र वर्षतां शिलाधारीं ॥ गोकुलावरी धरिला गिरि ॥ निश्चळ राहूनि सप्त रात्री ॥ सहस्रनेत्री लाजविला ॥ ६६ वरुणें स्वलोका नेला नंद ॥ पातला सोडवणे मुकुंद ॥ तेणें पूजूनि आनंदकंद ॥ परमानंद पावला ॥ ६७ ॥ त्रिजग जिंकूनि स्वप्रतापें ॥ वरिली विजयश्री कंदर्पें ॥ तो सांडविला येथ दर्पें ॥ पूतनागरपें[2] रतिसमरीं ॥ ६८ ॥ कांता एकांतकांतारीं ॥ शरच्छशिभांकित[3] शर्वरी॥ सुगंधसुमनीं सप्तस्वरीं ॥ जिंके समरीं स्मर त्रिजगा ॥ ६९ ॥ नग्नावयवा नागरी ललना ॥ नवयौवना नलिनेक्षणा ॥नागेंद्रगामिनी नाट्यनिपुणा॥नमिती चरणां नम्रत्वें ॥७०॥ चाटु[4] चाटुल चातुर्यखाणी ॥ चंपकगौरा चंद्राननी ॥चपळा चमकती सजळघनीं ॥ चारुभाषणी चार्वंगी ॥ ७१ ॥ ऐसियांचिये कटाक्षबाणीं ॥ नपडे मन्मथसमरंगणीं ॥ ऐसा ऐकिला नाहींच कोण्ही ॥ कृष्णा वांचूनि त्रिकाळीं ॥ ७२ ॥ मित्र परीक्षिजे व्यसन पडतां ॥ धनक्षयीं साध्वी कांता ॥ दुर्भिक्षकाळीं निवडे दाता ॥ कळे निर्ममता सुतानिधनीं ॥ ७३ ॥ शूर निवडे समरंगणीं ॥ सुवर्ण निवडे पावकवदनीं ॥ हिरा निवडे मारितां घनीं ॥ निवडे ज्ञानी निर्मोहें ॥ ७४ ॥ कांता एकांतीं अनुकूल ॥प्रार्थनापूर्वक घडल्या मेळ ॥ निवडे ब्रह्मचर्यादिकांचें शील॥हृदय अमल अविकृत ॥ ७५ ॥ शौर्यवल्गना बैसोनि सदनीं ॥ औदार्यकथन ब्रह्मारण्यीं ॥ ब्रह्मचर्यादि सभास्थानीं ॥ कथिजे जनीं सर्वत्र ॥ ७६ ॥ तें तंव वृथाचि विकत्थना ह्मणोनि श्रीकृष्ण त्रैलोक्यराणा॥मन्मथसमरीं अजिंक जाणा ॥ विरहिणीगणा वश नोहे ॥ ७७ ॥ प्रियतमगोपींहीं प्रार्थिला ॥ नवचे कंदर्पें भुलविला ॥ रासमंडळीं नाचविला ॥ परी तो दादुला स्मरविजयी ॥ ७८ ॥ स्मरण कीर्त्तन संक्रीडन ॥ सादर ईक्षण गुह्यप्रश्न ॥ संकल्प उद्योग लिंगमेलन ॥ अष्टांगमैथुन या नांव॥७९॥

---

[1] दगडांच्या वृष्टीनें. [2] पूतनेचें विष पिणारा. [3] शरदृतूंतील चंद्रकांतीनें युक्त. [4] बडबड.

तरुणतरुणींशीं एकत्र ॥ घडतां एकांतीं वसति मात्र ॥ मन्मथबाणें भंगे गात्र ॥ ऐसें चरित्र मदनाचें ॥ ८० ॥
तेथ लिंगसंघट्टयोगें ॥ गोपी भोगितां सप्रेमरंगें ॥ ज्याचें ब्रह्मचर्य नभंगे ॥ नवचे अनंगें जिंकिला ॥ ८१ ॥
[1]चरमधातु ह्मणिजे शुक्र ॥ नद्रवे रमतां वनिताचक्र ॥ नवनीत नलभे मथितां तक्र ॥ तैसा अवक्र आत्मरत ॥ ८२ ॥
आत्मसुरत ज्यासी फावे ॥ तो कां विषयां रमों धावे ॥ [2]ध्वान्तान्तकें रोहिणीमावे ॥ प्राशनहांवे धरिजे कें ॥ ८३ ॥
तस्मात् कंदर्पक्रीडासमरीं ॥ कृष्ण अजिंक निर्विकारी ॥ तयासि ह्मणती जे व्यभिचारी ॥ ते संसारीं [3]भवरुग्ण ॥ ८४ ॥
कृष्ण ह्मणती व्यभिचारला ॥ त्यांचा परमार्थ वृथा गेला ॥ ययार्थ बोध नाहींच झाला ॥ ह्मणोनि विषयाला
प्रतिपादिती ॥ ८५ ॥ कृष्णविरहें स्मराचि जर्जर ॥ कृष्णा नबधी मन्मथशर ॥ ह्मणोनि संकल्प करी मार ॥ कृष्णकुमार व्हावया ८६
कृष्णात्मजतालाभें प्रसिद्ध ॥ रूपचातुर्यसद्गुणवृंद ॥ कृष्णातुल्य लाहेन विशद ॥ ऐसा सादर स्मर हृदयीं ॥ ८७ ॥
आदिनारायणावतारीं ॥ वसंत मन्मथ सह अप्सरीं ॥ तपोभंगार्थ साही वैरि ॥ [4]मघवा प्रेरी आश्रमा ॥ ८८ ॥
तें जाणोनि सर्वात्मक ॥ नोहे सक्रोध ना कामुक ॥ स्वऐश्वर्यें केलीं मशक ॥ शक्रप्रमुख सम्मानें ॥ ८९ ॥
स्वसुखशांति नभंगतां ॥ तपोनिष्ठा नुल्लंघितां ॥ संतोषवूनि अभ्यागतां ॥ अमरनाथा लाजविलें ॥ ९० ॥ तोचि
हा यथ श्रीमुरारि ॥ रासरसिक क्रीडाकुसरी ॥ मन्मथ जिंकावया समरीं ॥ वधू शृंगारी ऐश्वर्यें ॥ ९१ ॥
[5]पांचभौतिक कर्दमगोळे ॥ कृष्णें स्वमायायोगबळें ॥ शृंगारूनि वधूंचे पाळे ॥ केले स्वलीले अनुकूल ॥ ९२ ॥
अचेत काष्ठाची [6]वल्लकी ॥ स्वकौशल्यें तौर्यत्रिकीं ॥ कीजे अनुकूल तांडवविखीं ॥ तेंवि वनौकी व्रजनाथें ॥ ९३ ॥
अचिंत्यानंतैश्वर्यखाणी ॥ कामजयार्थ चक्रपाणि ॥ सबाह्य साजिला लावण्यगुणीं ॥ व्रजकामिनीस्मररंगीं ॥

---

[1] शेवटीं उत्पन्न होणारा. [2] चंद्रानें. [3] संसाररोगानें ग्रस्त. [4] इंद्र. [5] पंचभूतात्मक. [6] वीणा.

॥ ९४ ॥ एरवीं विपरीत वस्त्राभरणा ॥ तनु नेणती नग्नानग्ना ॥ कृष्णवेधें धांविल्या ललना ॥ पूर्वी कथना या केलें ॥ ९५ ॥ ब्राह्म षाण्मासिका रजनी ॥ शरत्काळींच्या अवघ्या करूनी ॥ योगियां भयद ज्या कामिनी ॥ तन्मैथुनीं अरखलित ॥ ९६ ॥ ललनालावण्यरासिकराशि ॥ कृष्णें वेधिलें सुरवरांसी ॥ गोपिकावेषें कैलासवासी[1] ॥ रासक्रीडेसी पातला ॥ ९७ ॥ तंव ऐकैक गोपी एकैक कृष्ण ॥ ऐसें रचिलें रासकंकण ॥ शंभूसि नजोडे सन्निधान ॥ मग चरणांमधूनि रिघे चक्रीं ॥ ९८ ॥ गोपीवेष देखोनि हर ॥ कृष्ण ह्मणे हो गोपीश्वर ॥ किमर्थ केला स्त्रीशृंगार ॥ ऐकोनि शंकर लाजिला ॥ ९९ ॥ अद्यापि पहा वृंदावनीं॥ गोपीश्वर शूळपाणि ॥ शृंगारयुक्तवनिताभरणीं ॥ रासस्थानीं जग वंदी ॥ ३०० ॥ मथुरामाहात्म्यीं हें आख्यान ॥ यात्राप्रसंगें देखती जन ॥ ऐसें कृष्णाचें विंदान[2] ॥ त्रिजगत्संपूर्ण वेधिलें ॥ १ ॥ निजगुणैश्वर्य वनिताआंगीं ॥ सबाह्य लेववूनि रतिरंगीं ॥ गोपी तोषवूनि तितुकें वेगीं ॥ पुह्ना निजांगीं सांठविलें ॥ २ ॥ राजस गोपी अधरींचे रंग ॥ चुंबनामिसें हरी श्रीरंग ॥ सबाष्प तामस अंजनवोघ ॥ हरी सवेग कररुपर्शें ॥ ३ ॥ बुक्का चंदन पुष्पमाळा ॥ सत्वसंपात्ति ज्या बहूळा ॥ गोपी आळंगितां गोपाळा ॥ सुरतीं सकळा त्या हरिल्या ॥४॥ कंचुकीमिसें चिज्जडग्रंथि ॥ नीवीमोक्षणें नित्यमुक्ति ॥ सुरतानंदें पूर्णस्थिति ॥ सायुज्यप्राप्ति गोपींतें ॥ ५ ॥ कृष्णा कंठीं घालूनि हात ॥ रतान्तीं गोपी स्वानंदभरित ॥ पूर्णासमान निजात्मरत ॥ गोपी संतत स्वानंदें ॥६ ॥ ऐसा रासरसोल्लास ॥ शुकें कथितां कुरुवर्यास ॥ तया मानसीं शंकालेश॥ ह्मणोनि प्रश्नास आदरी ॥ ७ ॥

॥ राजोवाच ॥ संस्थापनायधर्मस्यप्रशमायेतरस्यच ॥ अवतीर्णोंहिभगवानंशेनजगदीश्वरः ॥ २७ ॥ ॥१३॥

---

[1] शंकर, [2] कौशल्य.

॥ टीका ॥ राजा ह्मणे गा अरणीतनया ॥ व्यासात्मजा योगिवर्या ॥माझी शंका परिसोनियां ॥निरसावया समर्थ तूं ॥ ८॥ धर्मसंस्थापने कारणें ॥ श्रीकृष्णाचें अवतार धरणें ॥ अंशें ह्मणिजे संकर्षणें ॥ सहित येणें इहलोका ॥ हीति निश्चयें तोचि अर्थ ॥ दोहीं नामीं विरोधस्थ ॥संक्षेप सूचिला तो यथार्थ॥श्रोते समर्थ परिसोत॥ १० ॥ अचिंत्यैश्वर्यसंपन्न ॥ अघटितघटनापटुतरपूर्ण ॥ मायानियंता श्रीभगवान्॥तो हा श्रीकृष्ण जगदात्मा ॥११॥ आणि जगाचा कल्याणकर ॥ ह्मणोनि बोलिजे जगदीश्वर ॥ तो केवीं अनाचार ॥ आचरे जाररतिलास्य ॥१२ ॥

सकथंधर्मसेतूनांवक्ताकर्त्ताऽभिरक्षिता ॥ प्रतीपमाचरद्ब्रह्मन्परदाराभिमर्शनम् ॥ २८ ॥
आप्तकामोयदुपतिःकृतवान्वैजिगुप्सितम् ॥ किमभिप्रायएतन्नःसंशयंछिंधिसुव्रत ॥ २९ ॥

॥ टीका ॥ जगदीश्वरत्वें जगत्पिता ॥ वेदवाक्यें स्वधर्मवक्ता ॥ विशेष धर्मसंस्थापिता॥अधर्मच्छेत्ता श्रीकृष्ण ॥ १३ ॥ धर्मसेतु जे सनातन ॥ त्यांचें करावया रक्षण ॥ युगीं युगीं अवतरोन ॥ अधर्मप्रशमन करीतसे॥ १४ ॥ अधर्म ह्मणसी कोण काय ॥ तरी स्वधर्माची लंघूनि सोय ॥ पाखंडमार्ग वेदबाह्य ॥ जे अन्याय विषयार्थ ॥ १५॥ देहबुद्धि तदभिमान ॥ धरूनि प्रवर्त्तविती जे दुर्जन ॥ त्यांचें करूनियां प्रशमन ॥ रक्षी सज्जन स्वधर्मीं ॥१६ ॥ धर्मासी प्रतिकूळ ह्मणिजे प्रतीप ॥ कां आचरला मन्मथबाप ॥ रासरसिक क्रीडाकल्प ॥ जों अनल्प अधर्म ॥ १७ ॥ केवळ अधर्मचि नोहे जाण ॥ जैसें बडिशाक्त मांसभक्षण ॥ तें एकासी करी दूषण ॥ हें संपूर्ण जग व्यापी ॥ १८ ॥ परदाराभिमर्शन ॥ महा साहस दीर्घप्रयत्न ॥ हेंचि करूनि प्रमाण ॥ विधिलंघन जन करिती ॥ १९

---

१ गळाला चिकटलेलें.

माता बाळां रक्षण करी ॥ विष देऊनि जें ते मारी ॥ कीं तस्करभीता नृप कैवारी ॥ जेंवि तोचि हरी सर्वस्वें ॥
॥२१ ॥ धर्मरक्षक चक्रपाणि॥ प्रवर्त्तला अधर्माचरणीं॥ऐसी प्रतीप[1] केली करणी॥काय ह्मणोनि मज सांगा ॥२२॥
मायानियंता श्रीभगवान् ॥ प्रथम बोलिलों करितां प्रश्न ॥ त्यासी गोपी मन्मथेंविण ॥ अशक्य कोण तोषवितां
॥ २३ ॥ ब्राह्मषण्मास केली राती ॥ त्यासि गोपींची कामप्रवृत्ति ॥ परतवावया नव्हती शक्ति ॥ जे अधर्मसुरतीं
प्रवर्त्तला॥२४॥ह्मणसी कृष्ण अवाप्तकाम ॥ अभेद सर्वग आत्माराम ॥ तेथ परापरत्वें भेदभ्रम ॥ कैंचाअधर्म व्यभिचार ॥ २५॥ तरी हें मीही साच मानीं ॥ परी हें घडे पूर्णपणीं ॥ एथ धर्मसंस्थापनीं ॥ अधर्मकरणी अश्लाघ्य ॥
॥२६॥ जरी श्रीकृष्ण निजात्मरत ॥ तरी कां ऐसें जुगुप्सितं[2] ॥ अविधि गोपींचें जारचरित ॥ महा अयुक्त आचरला॥२७॥ कामें कलुषी अंतःकरण ॥ नहोतां किमर्थ दुष्टाचरण ॥ कांहीं अभिप्राय लक्षून ॥ असेल श्रीकृष्ण आचरला ॥ २८ ॥ परंतु इतुकें दिसे प्रकट ॥ जैसें आचरती श्रेष्ठ ॥ तेंचि प्रमाण करिती स्पष्ट ॥ येर कनिष्ठ आचरतां ॥ २९ ॥ कृष्ण धर्मसंस्थापक ॥ तो जें आचरला कौतुक ॥तैसें आचरती निःशंक ॥ समस्त लोक प्रामाण्यें ॥ ३० ॥ त्या जनांची अवस्था काय ॥ कीं कृष्णाचा जो अभिप्राय ॥ आह्मां प्राकृतां जो दुर्ज्ञेय ॥ तो निःसंशय कथावा ॥ ३१ ॥ सत्यवादी सुदृढव्रत ॥ ह्मणोनि संबोधी भो सुव्रत ॥ कृष्णाभिप्राय वद यथार्थ ॥ जे तूं
अयथार्थ नातळसी ॥ ३२ ॥ हे ऐकोनि नृपाची वाणी ॥ संतोषोनि बादरायणि ॥ ह्मणे राया कल्याणखाणी ॥
लोकपाळणीं प्रवर्त्तसी ॥ ३३ ॥ लोकसंग्रहाचीं[3] कारणें ॥ राया तुझें हें प्रश्न करणें ॥ येऱ्हवीं जाणसी अंतःकरणें ॥ कृष्णाचरणें अलौकिकें ॥ ३४ ॥

१धर्मविरुद्ध. २ निंद्य. ३ लोकांची स्वधर्माचे ठायीं प्रवृत्ति होण्याकारितां जें धर्माचरण तें

॥ श्रीशुकउवाच ॥ धर्मव्यतिक्रमोदृष्टईश्वराणांचसाहसम् ॥ तेजीयसांनदोषायवह्नेःसर्वभुजोयथा ॥ ३० ॥

॥ टीका ॥ कृष्णहृदयींचा अभिप्राय ॥ राया ऐकें निःसंशय ॥ लोकरक्षण कामविजय॥ कलिमलभयप्रशमन ॥ ३५ ॥ युगीं युगीं हरिअवतार ॥ घेऊनि प्रवृत्ति युगानुसार ॥ दावूनि करी जगदुद्धार ॥ सत्य साचार निष्कर्म॥ ३६ ॥ कृतीं आदिनारायण ॥ सत्यशौचसदयपूर्ण ॥ क्षात्रधर्मपरायण॥स्वयें निर्घृण[1] लोकभयें॥ ३७॥ कलिप्रारंभीं द्वापरान्तीं ॥ कृष्ण अवतरला जगत्पति॥ दोहीं युगांची विडंबस्थिति ॥ दावी आद्यन्तीं विचरोनी ॥ ३८ ॥द्वापरींचें विडंवनकर्म ॥ अर्ध यथार्थ अर्ध कृत्रिम ॥ नंदयशोदागोपीप्रेम ॥ पूर्णकाम संपादी ॥४०॥परी तो यथार्थवस्तुमहिमा ॥ सारिखा गमे जऱ्ही कृत्रिमा ॥ तऱ्ही पाववी कैवल्यधामा ॥ वियोगप्रेमा वोपूनी ॥ ४१ ॥ येऱ्हवीं कार्यापुरता स्नेह ॥ दावूनि मित्रत्वा करी रोह[2] ॥ अंतीं वियोगदुःखें दाह ॥ होतां पहाहो नशिणेची ॥ ४२ ॥ आतां कळीचें बिडंबन ॥ जारचौर्यानृतभाषण ॥ समरंगणीं पलायन ॥ गूढवर्त्तन कापटचें ॥ ४३ ॥ सर्वत्र कळिकाळीं हे क्रिया ॥ करूनि जाती निरयालयां[3] ॥ कृष्ण तयांसि उद्धरावया ॥ प्रतीपचर्या[4] आचरला ॥ ४४ ॥ गोरस चोरूनि भक्षिला कृष्णें ॥ ते बाळचर्येच्या श्रवणें पठनें ॥ स्वर्णस्तेयादि[5] महादूषणें॥जळोनि जाति तत्काळ ॥ ४५ ॥ श्रीकृष्णाचे रासक्रीडे ॥ श्रवणें ऐकतां पढतां तोंडें॥ मातृगमनादि पातक झडे ॥मां कैंचा त्या पुढें व्यभिचार ॥ ४६ ॥ ब्राह्मणविडंबें कितवाचरणें[6] ॥ मागधादिकां निर्दाळणें ॥ कालयवनासमरीं पळणें ॥ यांच्या पठनें अघशांति ॥ ४७ ॥ एवं कळिकाळग्रस्तां जनां ॥ तारावया विषयाचरणा ॥ कृष्ण करी त्या श्रवणा पठना ॥ अघ-

---

१ निर्दय. २ वृद्धि. ३ नरकस्थानास. ४ विरुद्धाचरण, ५ सोन्याची चोरी. ६ दुष्टाचरण.

मोक्षणा पावती ॥ ४८ ॥ पाहोनि कृष्णाचें आचरण ॥ येर जें आचरती सामान्य ॥ तें त्यांलागीं अधःपतन ॥ हें
निमित्त देशी कृष्णातें ॥ ४९ ॥ तरी येथींचा ऐसा अर्थ ॥ राया अवधारीं यथार्थ॥ ईश्वराचरणाचा जो पंथ ॥ तो
दे अनर्थ अनीश्वरां ॥ ३५० ॥ कृष्ण परब्रह्म साचार ॥ जो ईश्वरांचा ईश्वर ॥ मायानियंता जगदाधार ॥ अगाध
अपार ऐश्वर्यें ॥ ५१ ॥ असो कृष्णाचें आचरण ॥ परी सामान्य जे जे तपोधन ॥ ज्यांची क्रिया असाधारण ॥ केवीं
सामान्य आचरती ॥ ५२ ॥ इंद्रें ब्रह्मघ्न वधिला वृत्र ॥ घटजें सागर केला मूत्र ॥ वशिष्ठाचे शतैक
पुत्र ॥ विश्वामित्र संहरवी ॥ ५३ ॥ ब्रह्मयाचें कन्यागमन ॥ शंकराचें विषभक्षण ॥ दत्तात्रेयाचें उन्मत्तपण ॥
इतर कोण करूं शके ॥५४॥ वायु न ह्मणे अगम्यागन ॥ कीं सर्वभक्षक हुताशन॥ कीं गंगेचें निर्मळपण॥समळनिर्मळ
न विचारी ॥ ५५ ॥ इतर सामान्य मूढपणें ॥ त्यांचीं देखोनि उत्पथाचरणें ॥ आचरों ह्मणतां मुकती प्राणें ॥
नाशती पुण्यें संग्राहिलीं ॥ ५६ ॥

नैतत्समाचरेज्जातुमनसाऽपिह्यनीश्वरः ॥ विनशत्याचरन्मौढ्याद्यथाऽरुद्रोऽब्धिजंविषम् ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ यालागिं जो अनीश्वर ॥ देहाभिमानी कर्मतंत्र ॥ तेणें ईश्वराचें चरित्र ॥ कदापि अणुमात्र नाचरिजे
॥ ५७ ॥ ईश्वराचरिताचा संकल्प ॥ मनेंकरूनि नकीजे अल्प ॥ ईश्वराज्ञेचा क्रियाकल्प ॥ निर्विकल्प आचरिजे ॥
॥५८॥ह्मणाल मनुष्यवेशें कृष्णें॥जीं जीं केलीं क्रियाचरणें ॥ तीं तीं मानवां स्पृहायमाणें॥तरी हें ह्मणें मानाल ॥५९॥
केवळ पूतना राक्षसी ॥ कृष्णें घोटिली विषासरिसी॥ येरां मानवां नजिरे माशी ॥ हें मानसीं नुमजावें ॥ ६०॥ कृष्णें

---

१ अगस्तिऋषीनें. २ इच्छिलीं जाणारीं.

शकट मोडिला पायें ॥ येरां त्रिमांसिका कैंवि हें होये ॥ तृणावर्ताचें नधरी भय ॥ प्राणप्रळय त्या केला ॥ ६१ ॥ कृष्णें मृत्तिका भक्षूनि पोटीं ॥ दाविल्या अनंतब्रह्मांडकोटी ॥ इतरांसमान कैंवि हे गोठी ॥ वृथा चावटी समतेची ॥ ६२ ॥ मुंगळ्याभेणें इतरां त्रास ॥ कृष्णें मर्दिलें अघासुरास ॥ कृष्णें नाथिलें कालियास ॥ पोरें जंतांस कांपती ॥ ६३ ॥ वत्सें वत्सप कृष्ण झाला ॥ लाजोनि ब्रह्मा शरण आला ॥ चुकलें वंत्स सांपडावयाला ॥ येर देवाला नवसिती ॥ ६४ ॥ कृष्णें दावानळ प्राशिला ॥ येरां उष्ण ग्रास नवचे गिळिला ॥ कृष्णें इंद्र अव्हेरिला ॥ येरां दूतांला नाक्रमवे ॥६५॥ कृष्णें उचलिला गोवर्धन ॥ येरां भाराभरी नुचले तृण ॥कृष्णें वरुणलोका जाऊन ॥ नंद आणून तोषविला ॥ ६६ ॥ कृष्ण प्रतापमार्तंड ॥ येरां नउठे हागती रांड ॥ त्या कृष्णाचा पडिपाडं ॥ कराव्यी तोंड कोण्हाचें ॥ ६७ ॥ कृष्ण निर्जरीं अभिषेकिला ॥ ऐसा मानवी कोण दादुला ॥ कृष्ण गोपींशीं क्रीडिन्नला॥ परी नाहीं भुलविला कंदर्पें॥६८॥ वेणुरवें भुलविल्या नारी॥ विवश धांवती भ्रमितापरी॥ कृष्ण बोधी त्या स्वधर्माचारीं ॥ परी मोहे अतरीं सकाम ॥ ६९ ॥ निष्कामभजनें अभेदें गोपी ॥ स्वरत रमवी विश्वव्यापी ॥ परंतु गोपींहीं कंदर्पकल्पीं ॥ नवचे कदापि भुलविला ॥७०॥ रासक्रीडेच्या प्रसंगीं ॥ अनंतमूर्ति वधूगण संगीं ॥रमविला निःसंग शार्ङ्गी ॥ परी नमोडे भोगीं ब्रह्मचर्य ॥ ७१ ॥ रडत विरहिणी लागती पाठी ॥ परी ज्या नभेदी मन्मथकाठी ॥ त्या कृष्णाची समतागोठी ॥ मानवकोटी कैंवि करी ॥ ७२ ॥ तस्मात ईश्वराचें जें आचरण॥ अचिंत्यैश्वर्यें अगाध पूर्ण ॥ तें आचरावया अनीश्वरजन ॥ सहसा प्रमाण नमनावे ॥ ७३ ॥

---

१ तीन महिन्याच्या मुलांस. २ समता.

ईश्वराणांवचःसत्यंतथैवाऽऽचरितंक्वचित् ॥ तेषांयत्स्ववचोयुक्तंबुद्धिमांस्तत्समाचरेत् ॥ ३२ ॥

॥ टीका ॥ ईश्वराचें वाक्याचि सत्य ॥ त्यांतही वर्णाश्रमें नियमित ॥ तेंचि आचरावें निश्चित ॥ सहसातत्कत नाचरिजे ॥ ७४ ॥ क्वचित् आचारही प्रमाण ॥ मनुष्यनाट्यें अवतरोन ॥ केलें धर्मसंस्थापन ॥ तें तें लक्षून करावा ॥ ७५ ॥ एकपत्नीदृढव्रत ॥ सत्यशौचस्वधर्मनिरत ॥ सदय क्षमस्वी पितृभक्त ॥ हें रामचरित प्रमाण ॥ ७६ ॥ श्रीरामाचें ईश्वराचरण ॥ ह्मणाल कोणतें अप्रमाण ॥ तरी सीतेसि पावकीं करविलें स्नान ॥ केंवि हें सामान्य करूं शके ॥ ७७ ॥ लपोनि वाळीचा घेतला प्राण ॥ कीं समुद्रशोषणा काढिला बाण ॥ जानकी त्यागिली निष्पाप कळोन ॥ ईश्वर ह्मणोन त्या शोभे ॥ ७८ ॥ बिभीषणासि अभिषेचन ॥ समराआधीं केलें पूर्ण ॥ श्रीराम ईश्वरचि ह्मणोन ॥ इतरीं प्रमाण हें नकीजे ॥ ७९ ॥ आह्मी कौरवां जिंकूं रणीं ॥ कीं ते जिंकिती आह्मांलागुनी ॥ नकळे ईश्वराची हे करणी ॥ अर्जुनबाणी प्रमाण हे ॥ ८० ॥ एवं वर्णाश्रमासि जो अनुकूल ॥ तोचि ईश्वराचारही प्रांजळ ॥ येर जो अगाध ऐश्वर्यबहळ ॥ तो मनुजीं केवळ नाचरिजे ॥ ८१ ॥ यास्तव ईश्वरीं जें आज्ञापिलें ॥ तितुकेंचि मानवीं आचरतां भलें ॥ येर त्याचें करितां केलें ॥ नाशे जोडलें कल्याण ॥ ८२ बुद्धिमंत तोचि नर ॥ जो ईश्वराज्ञेसी तत्पर ॥ होऊनि करी सदाचार ॥ साधी इहपर[1] अपवर्ग[2] ॥ ८३ ॥ जरी तूं शंका करिसी राया ॥ कीं ईश्वराही उत्पथचर्या[3] ॥ महा साहसें करूनियां ॥ जग संशया भेटविजे ॥ ८४ ॥ तिहीं सन्मार्गचि आचरोन ॥ नकीजे त्रिजगाचें कल्याण ॥ उत्पथें जोडिती सुकृत कोण ॥ सन्मार्गलंघन किमर्थ ॥ ८५ ॥ तूं हे शंका धरिसी पोटीं ॥ तरी यदर्थीं ऐकें गोठी ॥ ईश्वर पुरुषाचे राहटीं ॥ नयेती भेटी शुभाशुभें ॥ ८६

---

[1] हा लोक व परलोक. [2] मोक्ष. [3] अमार्गाचरण.

कुशलाचरितेनैषामिहस्वार्थोनविद्यते ॥ विपर्ययेणवाऽनर्थोनिरहंकारिणांप्रभो ॥ ३३ ॥

॥टीका ॥ तरी जे ब्रह्मात्मबोधें पूर्ण ॥ जेथ नसंभवती त्रिगुण ॥ त्यांचा देहचि मिथ्या जाण ॥ देहाभिमान मग कोणां ॥ ८७ ॥ देहातीत निरहंकार ॥ जीवन्मुक्त निर्विकार ॥ ते नोहती विधिकिंकर ॥ पूर्णावतार ऐश्वर्यें ॥ ८८ ॥ त्यांसी विधिप्रणीत कर्म कुशल ॥ ईहामुत्रार्थ नोहे सफळ ॥ अथवा उत्पथाचारें जैं कां विकळ ॥ तें अमंगळ हों नशके ॥ ८९ ॥ प्रभुसमर्था नृपोत्तमा ॥प्रतापें कळिकाळदमनक्षमा ॥ स्वसामर्थ्यें पाळिसी क्षमां ॥दुष्टां अधमां दंडूनी ॥ ९० ॥ त्यांमाजि जे जीवन्मुक्त ॥ निर्विकल्प समाधिस्थ ॥ ईश्वरावतार मूर्तिमंत ॥ कर्मातीत जाणसी कीं ॥ ९१ ॥ त्यांसि कैचें पापपुण्य ॥ स्वर्ग नरक जन्म मरण॥प्रारब्धमात्र होय क्षीण ॥ पुढें क्रियमाण हों नशके ॥ ९२ ॥ एका अहंकाराच्या लयें ॥ प्रपंचाचें निर्मूळ होये ॥ विचरताती ब्रह्मान्वयें ॥ त्यां कें काय शुभाशुभ ॥ ९३ ॥ ऐसिया प्राप्तदशेच्या पुरुषां॥शुभाशुभाचा नगोवी फांसा॥मा श्रीकृष्णा पूर्णपरेशा ॥उत्पथ ऐसा कोण वदे ॥ ९४ ॥

किमुताऽखिलसत्वानांतिर्यङ्मर्त्यदिवौकसाम् ॥ ईशितुश्चेशितव्यानांकुशलाकुशलान्वयः ॥ ३४ ॥

टीका ॥ साधनक्रमें झाले सिद्ध ॥ जीवन्मुक्त जे कां प्रसिद्ध ॥ त्यांसि कुशल अथवा अकुशल ॥ विरुद्ध नलवी बाध आचरणा ॥९५॥ मां सकळसत्वांचा नियंता ॥ तिर्यङ्मर्त्यां आणि स्वर्गस्थां ॥ईश्वरत्वें ईशन कर्ता ॥ त्या

---

१ पृथ्वी. २ नित्यानित्यविवेक, विरक्ति, शमदमादि षट्कसंपत्ति, मुमुक्षुता या साधनचतुष्टयेंकरून.

कृष्णनाथा शुभाशुभ ॥९६ ॥ कुशलाकुशलानुप्रवृति ॥ ब्रह्मादिस्थावरनियमस्थिति ॥वर्तविता जो त्या श्रीपति ॥ किमुत वदती शुभाशुभें ॥९७ ॥ ज्या सूर्याच्या प्रकाशबळें ॥ कर्मतिमिरा नगणिती डोळे ॥ मां तो सूर्यचि त्या नकळे ॥ मानिजे आगळें कुमुत हें ॥ ९८ ॥

यत्पादपंकजपरागनिषेवतृप्तायोगप्रभावविधुताखिलकर्मबंधाः ॥
स्वैरंचरंतिमुनयोऽपिननह्यमानास्तस्येच्छयात्तवपुषःकुतएवबंधः ॥ ३९ ॥

॥टीका ॥ ज्या कृष्णाची पादाब्जधूळि ॥ नितरां म्हणिजे सर्वकाळीं ॥ सप्रेम धरूनि राहिले मौळीं ॥हृदयकमळीं संतुष्ट ॥९९॥ पद्मपराग सेविती भ्रमर ॥अन्यत्र विषयीं अनादर॥ तैसे पदाब्जसेवनपर॥इहामुत्रपरित्यागें ॥४०० सप्रेम पादाब्जसेवननिरत ॥ होऊनि झाले नित्य तृप्त ॥ त्यांसि नबधी कर्म उत्पथ॥ नोहे समर्थ बाधावया॥ १॥ सप्रेमभक्तिध्यानयोगें ॥ अभेद इहामुत्रार्थविरागें ॥ चित्सुखावाप्ति चैतन्यगंगे ॥ क्षाळिले अवघे कर्मबंध॥ २ ॥ अथवा मुनिही मननशील ॥ नित्यानित्यविवेककुशल ॥ क्षाळूनि दृश्यांचा विटाळ॥ निवडले केवळ चिद्रूपें ॥३॥ ऐसे अनेक हरिपदनिरत ॥ चिदात्मबोधें नित्यतृप्त ॥ स्वैराचरणीं पथउत्पथ ॥ त्यां नबधीत ज्या वेधें ॥ ४ ॥ अग्निसान्निध्यें तापलें पाणी ॥ त्यामाजि पचल्या बीजश्रेणी ॥ सूटल्या बीजत्वापासुनी ॥ कीं सुटला अग्नि हा नवलाव ॥ ५ ॥ पिशाच पळती मारुतिस्मरणें ॥ तो मारुति निर्भय पिशाचभेणें ॥ ऐसें काय लागे म्हणणें॥ मा शंका करणें तें काय ॥ ६ ॥ कृष्णांघ्रिवेधें मातले मुनि ॥ ते निर्मुक्त उत्पथाचरणीं ॥ मा त्या कृष्णातें स्वैर

---

१ कोणखीं. २ आत्मा नित्य. इतर अनित्य अशा विचारांत निपुण.

करणी ॥ नबधी ह्मणोनि प्रशंसिजे ॥ ७ ॥ स्वेच्छेकरूनि मानवी तनु ॥ धरूनि वर्त्तें स्वभक्ताधीनु ॥ त्या नबधी कर्मबंधन ॥ हें प्रशंसन केतुलें ॥ ८ ॥ परदाराभिमर्शनभय ॥ तुझा निरसला हा संशय ॥किंवा कांहीं उरला होय ॥ कैसा काय तो सांगें ॥ ९ ॥ ईश्वरानीश्वरभेदें प्रांजळ ॥ कथिलें तें तुज नकळे सकळ ॥ तरी ज्या विवेकें बोधिती बाळ ॥ तें सोपें केवळ अवधारीं ॥ १० ॥ जैंवि वेगळें घटभरी जळ ॥ उघडें झांकलें समळ अमळ॥ शुद्धाशुद्ध हा विटाळ ॥ शास्त्रकुशळ बोलती ॥ ११ ॥ ते मर्यादा अगाधहृदीं ॥ नियमिली नवचे शास्त्रकोविदीं[1]॥ करिती क्षालनमज्जनादि ॥ वसती सर्पादि जलचरें ॥ १२ ॥ तेथ उघडेपणाचें गरळभय ॥ कीं स्पर्शास्पर्श रक्षिला जाय ॥ तैंवि सामान्या नेम जो आहे ॥ तो नराहे महत्त्वीं ॥ १३ ॥ कृष्ण ईश्वरांचा ईश्वर ॥ सामान्य जीव अनीश्वर ॥ त्या कृष्णाचा स्वैराचार ॥ कैंवि पामर करूं शकती ॥ १४ ॥ एवं परदाराभिमर्शन-॥कर्त्ता ह्मणतां अलिप्त कृष्ण ॥ आतां अभेदनिजात्मरमण ॥ तें प्रतिपादन अवधारीं ॥ १५ ॥

गोपीनांतत्पतीनांचसर्वेषामेवदेहिनाम् ॥ यों्ऽतश्चरतिसोऽध्यक्षःक्रीडनेनेहदेहभाक् ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ गोपी ह्मणिजेत बल्लवयुवति ॥ जे जे बल्लव त्यांचे पति ॥ उभयतांचा अंतर्वर्ती ॥ सर्वदंपती श्रीकृष्ण ॥ १६ ॥ लक्षचौऱ्यांशी योनिभेद ॥ एवं दंपती कृष्ण अभेद॥रमता रमविता परमानंद ॥ परदारवाद तें कोणा ॥ १७ ॥ वत्सें वत्सपात्मक जाला ॥ गोगोपींचे स्तन प्याला ॥ तो जगदात्मा कृष्ण दादुला ॥ व्यभिचारिला कैंवि घडे ॥ १८ ॥ स्वचैतन्यें निर्विकारी ॥ बुद्ध्यादि साक्षी सर्वांतरीं ॥ लीलानाट्यें देहधारी ॥ नोहे निर्धारीं

---

[1] शास्त्रनिपुण.

भूतमय ॥ १९ ॥ पाञ्चभौतिक धान्यरस ॥ पितृदेहीं तो वीर्यविशेष ॥ मैथुनमार्गें करी प्रवेश ॥ जननीजठरीं ऋतुकाळीं ॥ २० ॥ तेथ पचोनि मास नव ॥ पाञ्चभौतिकदेहा प्रभाव ॥ श्रीकृष्ण अयोनिसंभव ॥ तो केंवि जीवसम गणिजे ॥२१॥ आमुच्या तुमच्या देहयष्टि॥निबद्ध कर्मांचे राहटीं॥ तैसा नोहे कृष्ण जगजेठी ॥ जो सर्वां घटीं एकात्मा ॥ २२ ॥ कृष्ण पूर्णत्वें परमात्मा ॥ तरी कां अनुकरे देहधर्मा ॥ ऐसें ह्मणसी नृपोत्तमा ॥ तरी या वर्मा अवधारीं ॥ २३ ॥

अनुग्रहायभूतानांमानुष्यंदेहमास्थितः ॥ भजतेतादृशीःक्रीडायाःश्रुत्वातत्परोभवेत् ॥ ३७ ॥

॥ टीका ॥ स्वसंतुष्ट अवाप्तकाम ॥ तरी किमर्थ जुगुप्सित कर्म ॥ परदाराभिमर्शन अधर्मं ॥ कां यदूत्तम आचरला ॥ राया ऐसा तुझा प्रश्न ॥ ऐक तयाचें निरूपण ॥ भूतानुग्रहार्थ श्रीभगवान् ॥ मानुषी तनु अवलंबी ॥ २५ ॥ तेथ स्वपादभजनोन्मुख ॥ होऊनि अनुसरती सात्विक ॥ ते उद्धरतीच निष्टंक ॥ हें तों सम्यक कळलें कीं ॥ २६ ॥ परंतु रजतमाक्त जन ॥ विशेष कळिकाळदोषें मलिन ॥ त्यांसि नरुचे हरिपदभजन ॥ विषयसेवन नटकवे ॥ २७ ॥ ऐसियां विषयसक्तांप्रति ॥ होआवया निजगुणश्रवणीं रति ॥ त्यांसि प्रियतम जे रसवृत्ति ॥ ते ते श्रीपति आचरला ॥ २८ ॥ रासक्रीडा शृंगाररसिकां ॥ श्रवणीं आकर्षी कामुकां ॥ मानस वेधतां हरिगुणसुखा ॥ विषयआवांका हारपे ॥ २९ ॥ लागतां हरिगुणसुखाची गोडी ॥ मानस नोहे भवबराडी ॥ इहामुत्रार्थ भोगपरवडी ॥ वमूनि सांडी सवासना ॥ ३० ॥ हरिगुणश्रवणीं रंगतां मन ॥ सहज मावळे विषयभान ॥ भवभ्रमाचें

---

१ निंद्य. २ अवसान. ३ वासनासहित.

अस्तमान ॥ हें अगाध महिमान श्रवणाचें ॥ ३१ ॥ बडिशलोभें गिळितां गळ ॥ मासया पुढती नभेटे जळ ॥ तेंवि शृंगारार्थ हरिगुणशील ॥ होतां तत्काळ भ्रम निरसे ॥ ३२ ॥ एवं प्रेमा उपजे विषयिजना ॥ लंपट होती गुणकीर्त्तना ॥ इतुकेन निरसे भवयातना ॥ ऐसी करुणा विवरूनी ॥ ३३ ॥ विषयिजनासि मनोऽनुकूल ॥ रासक्रीडा करी गोपाळ ॥ नोहे विषयासक्त केवळ ॥ परम दयाळ परमात्मा ॥ ३४ ॥ विषयासक्त जे बहिर्मुख ॥ तेही करावया श्रवणोन्मुख ॥ शृंगाररासरहस्यप्रमुख ॥ दावी अनेक रसलीला ॥ ३५ ॥ हें देखोनि इतरजन ॥ भ्रष्टती स्वयें आचरोन ॥ ऐसा तुझा जो संशय पूर्ण ॥ एकें विवरण तयाचें ॥ ३६ ॥

नासूयन्खलुकृष्णायमोहितास्तस्यमायया ॥ मन्यमानाःस्वपार्श्वस्थान्स्वान्स्वान्दारान्व्रजौकसः ॥ ३८ ॥

॥ टीका ॥ कळिग्रस्त भिन्नाचार ॥ स्वैर उत्पथ आगमाभिचार ॥ धरूनि कृष्णाचा आधार ॥ अनेकप्रकार जल्पती ॥ ३७ ॥ तरी कृष्णा ऐसें ऐश्वर्य आंगीं ॥ आणिका कोणा असे त्रिजगीं ॥ ऐश्वर्येंवीण उत्पथमार्गीं ॥ विधि उल्लंघी कें कोण ॥ ३८ ॥ येथेंचि पहा पां प्रस्तुतीं ॥ ब्राह्म षण्मास करूनि राति ॥ कृष्णीं रमतां गोपयुवति ॥ बल्लवांप्रति अविषाद ॥ ३९ ॥ बल्लवां वाटे आपुली युवति ॥ आपणांशींच भोगी रति ॥ ऐसेच समस्त गोप मानिती ॥ अवघी राती वधूक्रीडा ॥ ४० ॥ ज्याची त्याचे कंठीं हस्त ॥ घालूनि कामिनी सेजे स्वस्थ ॥ असतां कृष्णातें किमर्थ ॥ कोण प्राकृत दूषिती ॥ ४१ ॥ एवं बल्लवीं समस्तीं ॥ आपणांपाशीं आपुल्या युवति ॥ जाणूनि असूया नकरिती ॥ कृष्णीं वर्त्तती अनीर्ष्य ॥ ४२ ॥ तस्मात ऐश्वर्यसिद्धि ऐसी ॥ नसतां येरां प्राकृतांशीं ॥ सम-

---

१ मत्स्यवेधन. २ शास्त्रनाश करणारे जारणमारणादि योग.

ता कृष्णाचे क्रीडेशीं ॥ इच्छितां नरकासी भोगिती ॥ ४३ ॥ पाहोनि कृष्णाचें आचरण ॥ करूं ह्मणती प्राकृत जन ॥ ते पापाचे प्रवर्त्तकजाण ॥ नरक दारुण भोगिती ॥ ४४ ॥ मन नवचतां विषयाकडे ॥ कृष्णक्रीडा ज्या आवडे ॥ सप्रेम श्रवणीं जडतां झडे ॥मातृगमनादि पातक ॥४५॥ कृष्णक्रीडा करितां श्रवण॥ नइच्छावें विषयाचरण ॥ साधकीं धरूनि हे निजखूण ॥ कृष्णीं निमग्न मन कीजे ॥४६ ॥ असो ऐसी रासक्रीडा ॥ गोपिकांचिया सप्रेम भिडा ॥ क्रीडतां मन्मथ केला वेडा ॥ तो पवाडा हा कथिला ॥ ४७ ॥

ब्रह्मरात्रउपावृत्तेवासुदेवानुमोदिताः ॥ अनिच्छंत्योययुर्गोप्यःस्वगृहान्भगवत्प्रियाः ॥ ३९ ॥

॥ टीका ॥ जाणोनि गोपींची प्रेमासक्ति ॥ कृष्णें विशाळ केली राती ॥ त्यांसि वोपोनि निजात्मरति ॥ पुन्हा प्रवृत्ति जागविली ॥ ४८ ॥ प्रवर्तलें ब्राह्मंमुहूर्त ॥ प्रतीचीचुंबित रजनीकांत ॥ प्राची सराग अरुणवंत ॥ मंद मारुत फरकला ॥ ४९ ॥तुहिनाद्रिवत् शीतळ झुळका ॥ त्वगिंद्रियासि झगटती देखा ॥तांबूलस्वाद वदनीं फिका ॥ तनु अंशुका प्रिय करिती ॥ ५० ॥ श्रीकृष्णाचे इच्छामात्रें ॥ स्थावरजंगमें कृष्णतंत्रें ॥ प्रबोध पावतां गोपीवक्रें॥पंकजनेत्रें विलोकिलीं ॥ ५१ ॥ मग त्यां ह्मणे रमारमण ॥ सत्वर सदना करा गमन॥ परमरहस्य हें रक्षून॥ कीजे वर्त्तन संसारीं ॥ ५२ ॥ अंतरीं असोनि निजात्मरत ॥ बाह्यप्रवृत्ति कर्मासक्त॥ नाशों नेदितां परमार्थ ॥जन हितार्थ वर्त्तावें ॥ ५३ अंतरीं बोध बहिर्जडता॥अंतरीं निर्मुक्त बहिर्बद्धता ॥अंतरीं बहिर्भोक्तृता॥संगासक्तता दावावी ॥ ५४ ॥ येणें मत्संग सिद्धि जाय ॥ लोकापवादाचें निरसे भय ॥ कोण्ही नाचरती अन्याय॥यथात्मन्याय प्र-

---

१ पहाटच्या चार घटिका रात्रींचा वेळ. २ पश्चिम. ३ हिमालय पर्वतासारखा.

वृत्ति ॥ ५५ ॥ सर्वांतरीं निवास ज्याचा ॥ त्या वासुदेवें गोपी स्ववाचा ॥ अनुमोदितां तदाज्ञेचा ॥ नकरवे साचा अतिक्रम ॥ ५६ ॥ कृष्णवियोग नसाहवे ॥ आज्ञा लंघूनि नराहवे ॥ यास्तव सदना लागलें जावें ॥ प्रेमगौरवें प्रियांहीं ॥ ५७ ॥ ऐशा कृष्णाच्या प्रियतमा ॥ सदना गेल्या बल्लववामा ॥ इये कथेचा श्रवणमहिमा ॥ नृपोत्तमा शुक सांगे ॥ ५८ ॥

विक्रीडितंव्रजवधूभिरिदंचविष्णोःश्रद्धान्वितोऽनुशृणुयादथवर्णयेद्यः ॥
भक्तिंपरांभगवतिप्रतिलभ्यकामंहृद्रोगमाश्वपहिनोत्याचिरेणधीरः ॥ ४० ॥

॥ टीका ॥ रासक्रीडा परमोत्तम ॥ करूनि अजिंक जिंकिला काम ॥ ज्यातें कथेचा श्रवणीं प्रेम ॥ स्मरसंभ्रम त्या नबधी ॥ ५९ ॥ उमजावया एकात्मभाव ॥ विष्णुनामाचा अभिप्राव ॥ व्यापक सर्वग श्रीमाधव ॥ क्रीडा अपूर्व जे त्याची ॥ ६० ॥ अभेद एकात्मभाव क्रीडा ॥ कामजयार्थ विडंबहोंडा[1] ॥ गोपवधूंशीं सप्रेमचाडा ॥ क्रीडला उघडा जगदात्मा ॥ ६१ ॥ तें हें श्रीकृष्णाचें चरित ॥ जे परिसती सप्रेमभरित ॥ वसंतीं ग्रीष्मीं जेंवि तृषार्त ॥ जलपानार्थ सादर ॥ ६२ ॥ कां कामिनीविरहभरें ॥ प्रेष्ठ अभीष्ट सरळांतरें ॥ सादर होऊनियां आचरे ॥ कीं बुभुक्षु मोहरे[2] अन्नार्थ ॥ ६३ ॥ ऐसिया श्रद्धा श्रद्धावंत ॥ हे कृष्णक्रीडा श्रवण करित ॥ किंवा सप्रेम वर्णित ॥ तो जिंकित कंदर्पा ॥ ६४ ॥ काम अजिंक भुवनत्रया ॥ परी तो आकळूं न शके तया ॥ जेणें कृष्णाची रासचर्या ॥ केली हृदयामाजिवडी ॥ ६५ ॥ कृष्णक्रीडा हृदयीं थारे ॥ तंव तंव बुद्धि विवेकें भरे ॥ सांडूनि भ्रमाचें कावि-[3]

---

[1] अनुकरणाचा निश्चय. [2] पुढें होऊन घुसणें. [3] वेड.

रें ॥ स्वात्मविचारें परितोषे ॥ ६६ ॥ प्रथम क्रिडा पडतां श्रवणीं ॥ विषयवासना अंतःकरणीं ॥ उठती आणि तदाचरणीं ॥ प्रवर्त्तन आवडे ॥ ६७ ॥ रजतमात्का ऐसें घडे ॥ तिहीं विवारितां पुढें पुढें ॥ बुद्धि भरतां विचारें दृढें ॥ कल्पना उडे विषयांची ॥ ६८ ॥ कृष्णीं प्रेमा जडोनि ठाये ॥ इहामुत्रार्थ मिथ्या होय ॥ विषयस्मृतीसि कैंचा ठाय ॥ विसरोनि जाय प्रवृत्ति ॥ ६९ ॥ कृष्णप्रेमाची गवसणी ॥ पडतां कृष्णाचि अंतःकरणीं ॥ ठसावतां सर्वांकरणीं ॥ होय भंगाणी रिपुषट्का ॥ ७० ॥ परा ह्मणिजे अभेदभक्ति ॥ रासक्रीडाचिदात्मरति ॥ फावों लागतां रजतमवृत्ति ॥ झडोनि जाती अतिशीघ्र ॥ ७१ ॥ जों जों भक्तिप्रेमा चढे ॥ तैसतैसा विकल्प झडे ॥ व्यवसितबुद्धींच्या[1] उजिवडें ॥ आतुडे[2] रोकडें कैवल्य ॥ ७२ ॥ धीर[3] ह्मणिजे व्यवसितमति ॥ तोचि करी हृद्रोगशांति ॥ कामत्यागें निजविश्रांति ॥ पावे निश्चिती त्वरितची ॥ ७३ ॥ सत्वसंपन्ना कष्ट नलगती ॥ त्यासि पूर्वींच भवविरक्ति ॥ रासश्रवणें सप्रेमभक्ति ॥ चित्सुखावाप्ति अनायासें ॥७४॥ रासक्रीडाशृंगाररस-॥ श्रवणीं अधिकार समस्तांस ॥ सधीर होऊनि कलिकल्मष ॥ रिपुषट्कास निर्दळिती ॥ ७५ ॥ ऐसा महिमा रासश्रवणीं ॥ भूपा कथूनि बादरायणि ॥ दशमस्कंधींची एकादशिनी ॥ तृतीय येथूनि संपविली ॥ ७६॥ पुढें चौतिसावा अध्याय ॥ नृपा कथील व्यासतनय ॥ अंबिकावनीं गोपसमुदाय ॥ मीनला होय यात्रार्थ ॥ ७७ ॥ तेथ अजगरें नंदाप्रति ॥ अकस्मात गिळितां राती ॥ कृष्णें त्यासी सायुज्यमुक्ति ॥ देऊनि व्रजपति सोडाविला ॥ ७८ ॥ तया कथामृतपानाप्रति ॥ एकाग्र बैसला परीक्षिति ॥ सुकृतसंपन्नीं तेचि पंक्ती ॥ कैवल्यतृप्ति लाहिजे ७९

---

[1] निश्चयात्मकविस्तारशक्तीच्या. [2] हातीं लागे. [3] कोणत्याही कारणानें ज्याचे चित्तास विकार होत नाहीं तो.

अक्षयसदन प्रतिष्ठानीं ॥ श्रीएकनाथ कैवल्यदानी ॥ शमदमादिसत्वसंपन्नीं ॥ जो सुरगणीं अर्चिला ॥ ८० ॥ तयाचें पादप्रक्षालन ॥ करूनि गौतमी झाली धन्य ॥ चिदानंदें कळवळून ॥ पात्र भरून चालिली ॥ ८१ ॥ मग तो सदयस्वानंदवोघ ॥ गोविंदवरदकृपागांग ॥ सेवितां पिपीलिकामार्ग[1] ॥ लाधला सांग दयार्णवा ॥ ४८२ ॥ तें हें श्रीमद्भागवत ॥ अठरा श्लोकसहस्रगणित ॥ परमहंसाचा सुखएकांत ॥ स्कंध त्यांत दशम हा ॥ ८३ ॥ रासक्रीडापंचाध्यायी[2] ॥ समाप्त झाली इये ठायीं ॥ कन्दर्पविजयाची नवायी ॥ श्रवणें पठनें त्रिजगातें ॥ ८४ ॥ दयार्णवाची इतुकी विनति ॥ आत्मस्थिति हे गाती पठती ॥ त्यांसि आतुडे एकान्तभक्ति ॥ होय निवृत्ति रिपुषट्का ॥ ८५ ॥

॥ इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायां दशमस्कन्धेश्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचराविराचितायां रासक्रीडावर्णनंनामत्रयास्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ श्लोक ॥ ४० ॥ ॥ टीका ओव्या ॥ ४८५ ॥ एवं संख्या ॥ ५२५ ॥ ॥ ॥ ॥

---

[1] मूंगीचा मार्ग. [2] रासक्रीडेचे पांच अध्यायांचा समूह.

अध्याय ३४

समृद्धि घालूनि गाडियांवरी ॥ गोप निघाले आनंदगजरीं ॥
पातले अंबिका कांतारीं ॥ राममुरारीं समवेत ॥ ३९ ॥



श्रीगोविंदपरब्रह्मणे नमः ॥ भवसुखरसिकां विरामकरणा ॥ स्वरतिप्रद तूं स्वपादशरणा ॥ श्रीगोविंद त्रिजगोद्धरणा ॥ भवसंहरणा भगवंता ॥ १ ॥ पावे उद्भव संभव ॥ अकार मात्रा आविर्भव ॥ जागृतिगोचरदृश्यभाव ॥ भव हें नाम भ्रमजनित ॥ २ ॥ तेथ भ्रमकर विषयाभास ॥ रसिक रुचिकर तत्स्पर्शास ॥ श्रोत्रादिकां इंद्रियांस ॥ चित्प्रकाश वशपण ॥ ३ ॥ विवरूनि मुळींचें निजात्मरूप ॥ अधिष्ठूनि मनःसंकल्प ॥ विपरीतज्ञ साविक्षेप ॥करी साक्षेप भवभोगा ॥ ॥ ४ ॥ भवभोगाची रसालता ॥ विभवें वाढवी विशाळता॥ इहामुष्मिका भवावर्त्ता ॥ माजि न निघतां परिभ्रमे ॥५ निघावयाची सेंची न करी ॥ अधिकाधिक हव्यास करी ॥ रसाळ रसिक भवसुखलहरी ॥ मानूनि भवंरी प्रिय भावी६॥ मैंद मानूनि प्रियतम सखा॥आप्त भावूनि पारिखा॥ आडवी वरपडिया मरणोन्मुखा ॥ वांचवी देखा निग्रहणें ॥ ७ ॥ पाठी लागे बलात्कारें ॥ मैंदा सहित धरूनि निकरें ॥ फांसे दावूनि बोधितां खरें ॥ विटे अंतरें तत्संगा ॥ ८ तेंवि रसाळ विषयाभास ॥ इहामुष्मिकरूपीं क्लेश ॥ कवळूनि करी आयुष्यनाश ॥ तो चिदाभास गुरु बोधी॥ ९॥ तीव्र व्रतांच्या पाउलीं ॥ अविद्या अडवी फलाशाभुली ॥ चालवूनियां फांसे घाली ॥ मैंदावळी रिपुषट्क ॥ १० ॥ सपाश मैंद आणूनि बोधा ॥ बळेंचि करूनि प्रवृत्तिरोधा ॥ कृपेनें चुकवी वाटबंधा ॥ काढी निषेधामाजूनी ॥ ११

---

१ यत्न. २ मोह पाडून लुटणारी एक जात आहे. त्या जातीचा मनुष्य.

ऐसा भवरसविरामकर ॥ स्वबोध रुचवी अमृतोद्गार ॥ स्वपादशरणां वज्रपंजर ॥ भेद भयंकर निरसूनी ॥ १२ ॥
स्वसंविद्बोध[1] श्रीमंता ॥ गोविंद तो तूं वेदवेत्ता ॥ गोमय त्रिजगा परित्राता ॥ अचिंस्यानंतैश्वर्यें ॥ १३ ॥ तव पद-
प्रणातिवैभवलेश ॥ वाहती त्रिजगीं सभाग्य दास ॥ त्यांमाजि कनिष्ठ मी निःशेष ॥ कृपेनें विशेष तोषवुनी ॥ १४ ॥
भागवतींच्या दशमस्कंधा ॥ बोधवावया अबळां मुग्धां ॥ भाषाव्याख्यानप्रबोधा ॥ कथिला धंदा आज्ञेनें ॥ १५ ॥
समर्थाज्ञानुशासनें ॥ एकादशिनीत्रयव्याख्यानें ॥ श्रीपदपीठीं बाङ्मयसुमनें[2] ॥ यथामतीनें अर्पिलीं ॥ १६ ॥ आ-
तां चतुर्थ एकादशिनी ॥ क्रमें उपायिली[3] व्याख्यानीं ॥ तदर्थ सेवेसि हे विनवणी ॥ श्रीपद वंदुनी कीजतसे ॥ १७ ॥
परम दुर्बोध जेथींचा अर्थ ॥ प्रज्ञा शंकी व्याख्यानार्थ ॥ कृपापांगें स्वसामर्थ्य ॥ आज्ञा समर्थ स्वामींची ॥ १८ ॥
श्वफल्क[4]सि यमुनास्नान ॥ करितां विश्वरूपदर्शन ॥ देता झाला श्रीभगवान ॥ तैं अगाध स्तवन तो करी ॥ १९ ॥
तिये अक्रूरस्तवविवरणीं ॥ धिषणारमण[5] नुमली वाणी ॥ ह्मणोनि श्रीचरणीं विनवणी ॥ वारंवार कीजतसे ॥ २० ॥ हें ऐ-
कोनि नाभीकार ॥ देती उचलूनि अभयकर ॥ ह्मणती स्तनपाचा प्रकार ॥ शंकेसि थार नसतांही ॥ २१ ॥ पाल-
नीं तत्पर असतां जननी ॥ स्तनपा स्तन्यार्थ वृथाचि ग्लानि ॥ तैसी सशंका हे विनवणी ॥ तुज लागूनि स्फुरतसे ॥ २२
आह्मी वसवूं तुझिया हृदया ॥ बोलवूं तें तें बोलावया ॥ त्वां कां शंका करणें वांया ॥ अक्षय अभया जाणोनी ॥ २३ ॥
हें ऐकोनि मौनें नमन ॥ करूनि आदारिलें व्याख्यान ॥ तेथ श्रोतीं सावधान ॥ अनुक्रमणिका परिसावी ॥ २४ ॥
यात्रार्थ अंबिकावनीं बल्लव ॥ अजगरें गिळितां नंदराव ॥ त्यासि सोडवी वासुदेव ॥ हा प्रथमाध्याव चौतिसावा
॥ २५ ॥ पंचतिसाव्या माजि गोपिका ॥ परस्परें युग्मश्लोका ॥ वर्णिती कृष्णाच्या कौतुका ॥ वियोगदुःखा नि-

---

१ आत्मज्ञानबोधानें संपन्न. २ शब्दरूप पुष्पें. ३ प्राप्त झाली. ४ कुब्र्याची तंगडी. ५ ब्रह्मदेव.

रसावया ॥ २६ ॥ छत्तिसीं वधिलें अरिष्टासी ॥ तंव इकडे नारद कंसापाशीं ॥कथितां रामकृष्ण व्रजनिवासी ॥ तो केशी अक्रूरासी पाठवी ॥ २७ कृष्णें केलें केशिहनन ॥ तंव नारद पातला मथुरेहून ॥ तेणें केलें भावें स्तवन ॥ व्योम[1]निबर्हण सदतिसावां ॥ ३८ ॥ कृष्णध्यानें एकनिष्ठ ॥ अक्रूर गोकुलीं प्रविष्ट ॥ रामकृष्णीं तो पूजिला प्रकट ॥ सुखसंतोष अडतिसावां ॥ २९ ॥ रामकृष्ण जातां मथुरे ॥ विविध गोपींचीं स्निग्धान्तरें॥ एकुणचाळिसीं देखिला अक्रूरें ॥ विष्णुलोक यमुनेंत ॥ ३० ॥ चाळिसाव्या माजि अक्रूर ॥ जाणूनि कृष्ण हा ईश्वरेश्वर ॥ सगुण निर्गुण द्विप्रकार ॥ स्तवी साचार नमूनियां ॥ ३१ ॥ एकेताळिसा माजि हरि ॥ यथुराप्रवेशीं रजका मारी ॥ तंतुवाय[3] सुदामनामधारी ॥ वर दे हरि त्या तोषें ॥ ३२ ॥ बेचाळिसाव्या अध्यायांत ॥ कुब्जा केली लावण्ययुक्त ॥ धनुष्यभंगरक्षकघात ॥ कंस सचिंत तच्छ्रवणें ॥ ३३ ॥ त्रेचाळिसावां कुवलया[4]पीड ॥ मर्दूनि रंगीं शिखंडकचूड ॥ चाणूरेंशीं सम अपाड ॥ बोले कैवाड मधुरोक्ति ॥ ३४ चव्वेताळिसाव्या अध्यायीं॥समल्ल कंसा वधिलें पाहीं ॥ कंसस्त्रिया शेषशायी ॥ बोधूनि पितरां भेटला ॥ ३५ एवं चतुर्थ एकादशिनी ॥ विदित इत्यादि निरूपणीं ॥ श्रोतीं सावध होइजे श्रवणीं ॥ हे विनवणी सेवेसी ॥ ३६ ॥

॥श्रीशुकउवाच ॥ एकदादेवयात्रायांगोपालाजातकौतुकाः॥अनोभिरनडुद्युक्तैःप्रययुस्तेंऽबिकावनम्॥ १ ॥

॥ टीका ॥ रासक्रीडा संपल्यावरी॥कोणे एके शुभावसरीं॥नंदादि गोप सहपरिवारीं ॥ देवयात्रार्थ निघाले ३७ उत्साहयुक्त विभव तवकें ॥ गाडे शृंगारिले कवतुकें ॥ गोपाळ आभरणें अंशुकें ॥ लेवूनि वृषभ जुंपिती ॥३८ ॥

---

१ व्योमनामक दैत्याचा नाश. २ परीट. ३ कोळी. ४ हाएक भव्यहत्ती होता.

समृद्धि घालूनि गाडियांवरी ॥ गोप निघाले आनंदगजरीं ॥ पातले अंबिकाकांतारीं ॥ राममुरारीसमवेत॥३९॥
जयजयकार नामस्मरणें ॥ वाद्यें वाजती जलदस्वनें ॥ अंबिकावनीं निर्मळस्नानें ॥ धरूनि अवघे उतरले ॥४०

तत्रस्नात्वा सरस्वत्यांदेवंपशुपतिंविभुम् ॥ आनर्चुरर्हणैर्भक्त्यादेवींचनृपतऽबिकाम् ॥ २ ॥

॥टीका॥ शौचाचार सारूनि आधीं ॥ स्नानें सारिलीं यथोक्तविधि ॥ तीर्थविधानें नेलीं सिद्धि ॥ सरस्व-
तीच्या जीवनें ॥ ४१ सकळ देवतां माजि जो विभु[1] ॥ तो समस्तीं पूजिला शंभु ॥ पूजाद्रव्येंशीं समारंभु ॥रु-
द्राभिषेकपुरस्सर ॥ ४२ ॥ तैशीच पूजिली अंबिका ॥ जे कां मृडानी जगदंबिका ॥ फलां पुष्पां दिव्यांशुकां ॥
रत्नां माणिकां अर्पूनी ॥ ४३ ॥ भक्तिपूर्वक लागती चरणीं ॥ पुष्पांजळि समर्पूनी ॥ प्रदक्षिणा नानास्तवनीं ॥
भवभवानी तोषविली ॥ ४४ त्यावरी ब्राह्मणा कारणें॥बल्लव देती अनेक दानें॥फळकामना न धरूनि मनें॥ शि-
वप्रीत्यर्थ ह्मणोनियां ॥ ४५ ॥

गावोहिरण्यंवासांसिमधुमध्वन्नमादृताः ॥ ब्राह्मणेभ्योददुःसर्वेदेवोनःप्रीयतामिति ॥ ३ ॥

॥टीका॥सवत्सा सदुग्धा सगुणा॥सालंकृता सौम्या तरुणां॥स्वर्चिता[2] धेनु सदक्षिणा॥सुब्राह्मणां समार्पिल्या॥४६
मुख्य दानाचें लक्षण ॥ मिथा नामगोत्रकीर्त्तन ॥ स्वसत्तेचें निवर्त्तन ॥ उत्पादन परिसतां ॥ ४७ ॥ इत्यादि
त्याग[3]पुरस्सर ॥ केलीं गोदानें अपार ॥ द्रव्यदक्षिणा यथोक्त पात्र ॥ विधिसुमंत्र सुशोभित ॥ ४८ ॥ ग्रहतुष्ट्यर्थ

---

१ सर्वव्यापक ईश्वर. २ सुपूजित. ३ दानपूर्वक.

अष्टलोह ॥ अष्टविध वस्त्रसमूह ॥ शिवप्रीत्यर्थ जे जे अर्ह ॥ विधिपूर्वक दश दानें ॥ ४९ ॥ धेनुहिरण्यवस्त्रदानें ॥ तिलाज्यमधुभूमिधान्यें ॥ विविधरत्नें मधुर अन्नें ॥ विप्रांकारणें अर्पिलीं ॥ ५० ॥ सवेग ऐसीं दानें समस्त ॥ सर्वी सारूनि श्रद्धावंत ॥ नामस्मरणें आनंदभरित ॥ राहिले व्रतस्थ ते दिवशीं ॥ ५१ ॥

ऊषुःसरस्वतीतीरेजलंप्राश्यधृतव्रताः ॥ रजनींतांमहाभागानंदःसुनंदकादयः ॥ ४ ॥

॥ टीका ॥ नंद सुनंद आणि उपनंद ॥ वृषभानादि बल्लववृंद ॥ प्राशूनि सरस्वतीकबंध ॥ तटीं सानंद निशी क्रमिती ॥ ५२ ॥ महाभाग हें संबोधन ॥ पुण्यश्लोकांचें पुण्याख्यान ॥ राजा परिसें सावधान ॥ जाणोनि सज्ञान शुक बोधी ॥ ५३ ॥

कश्चिन्महानहिस्तस्मिन्विपिनेऽतिबुभुक्षितः ॥ यदृच्छयाऽऽगतोनंदंशयानमुरगोऽग्रसीत् ॥ ५ ॥

॥ टीका ॥ तंव ते रात्रीं अंबिकावनीं ॥ नंद निद्रिस्त विश्रांतिशयनीं ॥ अजगरजाति महाफणी ॥ होता बहुदिनीं बुभुक्षित ॥ ५४ ॥ जनसमुदाय प्रजागरें ॥ सांचलें जाले त्या चेइरे ॥ यदृच्छेकरूनियां संचारें ॥ ग्रासिता झाला नंदातें ॥ ५५ ॥

सचुक्रोशाहिनाग्रस्तःकृष्णकृष्णमहानयम् ॥ सर्पोमांग्रसतेतातप्रपन्नंपरिमोचय ॥ ६ ॥

॥ टीका ॥ नंद असतां सुखनिद्रिस्त ॥ सर्पें ग्रासिला नाभिपर्यंत ॥ जागृत झाला अकस्मात ॥ आक्रोश करित म-

---

१ अष्टधातु. २ उदक. ३ चाहूल. ४ जागे.

हाभयें ॥ ५६ ॥ लागता अजगराचें गरळ ॥ तनुसामर्थ्य झालें शिथिल ॥ तेणें भयें उतावीळ ॥ स्मरे गोपाळ आकांतीं ५७ धांव धांव बापा कृष्णा ॥ मी वरपडलों सर्पवदना ॥ महासर्प हा क्षणक्षणां ॥ करी ग्रसना कालवत् ॥ ५८ ॥ कृष्णा आपुला शरणागत ॥ सोडवीं कृपेनें अंकित ॥ प्राण नवचतां धांवें त्वरित ॥ ऐसा भयभीत आक्रंदे ॥ ५९ ॥

तस्यचाक्रंदितंश्रुत्वागोपालाःसहसोत्थिताः ॥ ग्रस्तंचदृष्ट्वासंभ्रांताःसर्पंविव्यधुरुल्मुकैः ॥ ७ ॥

॥ टीका ॥ ऐसा नंदाचा आर्त शब्द ॥ समस्तीं ऐकोनि आक्रंद॥सवेग धांविला बल्लववृंद ॥ करावया वध सर्पाचा ॥ ६० ॥ अकस्मात उठिले सर्व॥ग्रस्त देखोनि पशुपराव॥मारिती सर्पावरी घाव॥ जळत उल्मुकें घेऊनी ॥ ६१ ॥ संभ्रांत ह्मणिजे उतावीळ ॥ घाबिरे झाले बल्लव सकळ ॥ ह्मणती अजगरें व्रजपाळ ॥ गिळिला केवळ काळरूपें ॥ ६२ ॥

अलातैर्दह्यमानोऽपिनामुंचत्तमुरंगमः ॥ तमस्पृश्यत्पदाऽभ्येत्यभगवान्सात्वतांपतिः ॥ ८ ॥

॥ टीका ॥ ऐसें ह्मणोनि जळत भितीं ॥ घेऊनि सर्पा पोळविती ॥ जाळितां ताडितां बहुतां हस्तीं ॥ नंदाप्रति अहि नुगळी[3] ॥ ६३ ॥ ऐकोनि नंदाचें आर्त्तवचन ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ तो पातला श्रीभगवान ॥ करुणापूर्ण भक्तपति ॥ ६४ ॥ सवेग येऊनि गोपीनाथें ॥ चरण स्पर्शितां अजगरातें ॥ महदाश्चर्य वर्त्तलें तेथें ॥ सांगे नृपातें शुकमुनि ॥ ६५ ॥

---

१ प्रविष्ट झालों. २ लांकडें. ३ नसोडी.

श्रीसच्चिदानंदाय नमः ॥ ॥ नमो सर्वग सर्वात्मका ॥ विश्वरूपा विश्वव्यापका॥ सुलभ स्वजना पादोन्मुखा ॥ भ्रांतिच्छेदका ध्वांतारि ॥ १ ॥ सर्वशब्दें पृथग्भाव ॥ ब्रह्मास्मि हा स्वानुभव ॥ तद्गतप्रत्यय तूं स्वमेव ॥ तुजवीण माव जड मिथ्या ॥ २ ॥ जो तूं सर्वग प्रत्ययरूपी ॥ तो सर्वात्मा विश्वव्यापी ॥ एकात्मज्ञप्तीच्या[1] आटोपीं ॥ त्रिजग जोपी सर्वज्ञ ॥ ३ ॥ तया ईश्वराचें दाक्षिण्य ॥ तें तव कृपेचें स्वरूप जाण ॥ येन्हवीं प्रवृत्तीवांचून ॥ निवृत्ति कोठून त्या स्फुरती ॥ ४ ॥ प्रवृत्तिस्फुरण प्रपंचोन्मुख ॥ तदनुगतत्वें जें सुख दुःख ॥ तदुपशमनीं कृतविवेक ॥ निवृत्ति सम्यक ती नांव ॥ ५ ॥ तिये निवृत्ती माजीवडी ॥ पूर्वसिद्धांत द्विपक्षसवडी ॥ प्रबोधप्रक्रिया तुझी रोकडी ॥ मोडी आवडी विषयांची ॥ ६ ॥ तयां निर्विषय होतियां ॥ माजि अधिकारप्रक्रिया ॥ जाणूनि तदुचित बोधावया ॥ सद्गुरुराया समर्थ तूं ॥ ७ ॥ सविवेक अनुतापें संतप्त ॥ त्यांसीं प्रबोधूनि सिद्धांत॥ निरसूनियां मिथ्या द्वैत ॥ दुःखातीत तूं करिसी ॥ ८ ॥ विषयसुखाची घ्यावया चवी ॥ सविश्वासें रमले भवीं ॥ बडिश[2] भक्षितां मीन जेंवि ॥ जाले तेंवि दुःखभाक ॥ ९ ॥ ऐसे विषयभोगासक्त ॥ दुःख भोगूनी पश्चात्तप्त ॥ जाणोनि स्वपादशरणागत ॥ कर्माभिरत त्यां करिसी ॥ १० ॥ त्यांची पोखूनि विषयासक्ति ॥ दावूनि आमुष्मिक सुखावाप्ति ॥ सत्कर्मफलोन्मुखप्रवृत्ति ॥ बोधिसी श्रुति तदुचित ॥ ११॥ मग ते पूर्वपक्षानुसार ॥ धरूनि श्रुतीचा आ-

---

[1] ज्ञान. [2] गळ.

धार ॥ इहामुत्रार्थनियमपर ॥ कर्मीं तत्पर वर्तती ॥१२॥ इहलोकींचे भोग क्षणिक ॥सुखप्रलोभें अपार दुःख॥ अक्षय भोगावा सुरलोक ॥ कर्में अचूक आचरती ॥ १३ ॥ मग ते कर्ममर्यादे साठीं ॥ यथेष्टाचरणीं पडे तुटी॥ आचारव्यवहारपरिपाटीं ॥ उमजे गोठी सदसद् ॥ १४ ॥ विधिनिषेधप्रायश्चित्त ॥ विवरिती होऊनि अतंद्रित[1] ॥ तैं ते निर्मळ होती नितांत[2] ॥ मग वेदांत प्रिय ह्मणती ॥ १५ ॥ ब्रह्मांडमय जरी विराटपुरुष॥त्याचे अवयव लोक अशेष ॥ कोण्या कर्में गुर्दींचे[3] केश ॥ मस्तकास अधिष्ठिती ॥ १६ ॥ कोण्या सुकृतें पदांगुळिका ॥ होऊं शकेल पैं नासिका ॥ एवं आदिपुरुषा एका ॥ वृथा लोकावाप्ति गमे ॥ १७ ॥ जीवचैन्या लोकावाप्ति ॥ हेही गमे अवघी भ्रांति ॥ भूतां गुणांची पडल्या बुंथी ॥ उमटे नसती जीवदशा ॥ १८॥ जीवदशा असती खरी ॥ तरी ते प्रविष्ट लोकांतरीं ॥ होऊनि सुरवरांमाझारी ॥ ऐश्वर्यथोरी पावती ॥ १९ ॥ एवं पूर्वपक्षींच्या श्रुति ॥ इहामुत्रार्थीं प्रलोभिती ॥ जोंवरी रजतमांची भ्रांति ॥ तंव ससृति साच गमे ॥ २० ॥ जंववरी निद्रेचें अधिष्ठान ॥ तंववरी साच स्वप्नभान ॥ जागृत जालिया मिथ्या स्वप्न ॥ अपरोक्षज्ञान[4] तैंवि भवीं ॥२१॥ तथापि स्वामीची बलिष्ठ युक्ति॥बोधूनि इहामुत्रप्रवृत्ति ॥ फलप्रलोभें कर्मासाक्ति ॥ लावोनि भ्रांत्ति निरसिली ॥ २२ ॥ इहामुष्मिक मिथ्या फळ ॥ परी ते चित्तशुद्धिच केवळ॥एतद्द्वारा कर्म सफळ ॥ नोहे निष्फळ तवाज्ञा ॥२३॥केवळ ज्यांसी तमाची बुंथी ॥ त्यांची अलोट विषयासक्ति ॥ह्मणोनि भोगिती भवदुर्गति॥तव पदप्रणति नरुचोनी ॥२४॥ संसृतिसंतापें संतप्त ॥ चौऱ्यांशीं लक्षयोनि भ्रमत ॥ अध्यात्म अधिदैव अधिभूत॥सदा आहळत त्रितापीं॥२५॥ त्यांसीभ्रमतां अनेक योनि ॥ ओसंतितां[5] दुःखश्रेणि ॥ अवचट लागल्या तुझ्या चरणीं ॥ स्फुरे त्यां मनीं जिज्ञा-[6]

---

[1] आलस्यरहित.
[2] अत्यंत.
[3] पश्चिमद्वारींचे.
[4] ब्रह्मज्ञान.
[5] भोगितां.
[6] ज्ञानाची इच्छा.

सा ॥ २६ ॥ तव पदभजनीं दृढ विश्वास ॥ होतां निरसती अशेष दोष ॥ नकरितां अतिकर्मक्लेश ॥ होय निःशेष चित्तशुद्धि ॥ २७ ॥ एवं तुझेनि कृपापांगें ॥ भवभ्रमाचें ध्वांत भंगे ॥ ह्मणोनि ध्वान्तारि नाम लिंगें॥स्तविलें प्रसंगें तें क्षमिजे ॥ २८॥ आतां आरब्धकथातंतु ॥ अक्रूरें रविजासलिलाआंतु ॥ जैसा देखिला श्रीभगवंतु ॥ तैसा साद्यंत निरूपिला ॥ २९ ॥ तो एकुणचाळिसावा अध्याव ॥ संपतां अक्रूरा अष्टभाव ॥ झाले मग तो वासुदेव ॥ स्तवी तो भाव अवधारा॥३०॥ कृष्ण ईश्वरांचा ईश्वर ॥ जाणोनि स्तवितसे अक्रूर॥ सगुण निर्गुण द्विप्रकार॥तो हा समग्र चाळिसावा ॥ ३१ ॥

॥ अक्रूरउवाच ॥ नतोऽस्म्यहंत्वाखिलहेतुहेतुंनारायणंपूरुषमाद्यमव्ययम् ॥
यन्नाभिजातादरविंदकोषाद्ब्रह्माऽविरासीद्यतएषलोकः ॥ १ ॥

॥ टीका ॥ अगा हे श्रीकृष्णा मी तूतें ॥ नमस्कारितों सप्रेमचित्तें ॥ झणें तूं ह्मणसी बाळकातें ॥ वृद्धें तातें ननमावें ॥ ३२ ॥ अक्रूरा तूं आमुचा चुलता ॥ कैंवि लेंकुरा नमिसी आतां ॥ ऐसें नह्मणावें भगवन्ता॥ तूं तत्वता आदिपुरुष॥ ३३ ॥ तूं अनादि अजरामर ॥ व्ययरहित[1] अव्ययतर ॥ अनादिनिधन[2] तूं अक्षर[3] ॥ अखिल चराचर प्रसवता ॥ ३४ ॥ जीं कां जगदखिलकारणें॥ तुज पासून त्यांचें होणें ॥ यदर्थीं शंका नलगे करणें ॥ सर्वज्ञपणें प्रभुवर्या॥ ३५ ॥ तूं ह्मणसी तो नारायण ॥ अखिल जगाचें आदिकारण ॥ तरी तोचि तूं हा प्रत्यक्ष कृष्ण ॥ हें मम मन जाणतसे ॥ ३६ ॥ अमृत ह्मणोनि वाणिजे अन्न ॥ ब्राह्मणा सूर्याचें उपमान ॥ अग्निसमान सक्रोध-

---

[1] विकाररहित. [2] आद्यंतरहित. [3] अविनाश.

जन ॥ तैंवि नारायण मज ह्मणसी ॥ ३७ ॥ तरी हे तैसी नोहे उपमा ॥ सत्यचि तुझिया नाभिपद्मा-॥ पासोनि जन्मला जो कां ब्रह्मा ॥ तो भूतग्रामा आदिहेतु ॥ ३८ ॥ तयापासूनि अखिल लोक ॥ जगत्कारण पृथक् पृथक् ॥ तोही मोकळा विवेक ॥ ऐकें सम्यक् सर्वज्ञा ॥ ३९ ॥

भूस्तोयमग्निःपवनःखमादिर्महानजादिर्मनइंद्रियाणि ॥
सर्वेंद्रियार्थाविबुधाश्चसर्वेयेहेतवस्तेजगतोऽगभूताः ॥ २ ॥

॥ टीका ॥ जितुकें अखिल चराचर[1] ॥ त्यासि भूमीचा आधार ॥ भूमीवेगळा व्यवहार ॥ कोणे ठायीं जगाचा ॥ ४० ॥ मृद्घटाचें उपादान ॥ कैचें मृत्तिकेवांचून ॥ स्थूळशरीरें मृत्तिकेवीण ॥ काय हें विवरून पहा पां ॥ ४१ यालागीं पृथ्वी स्थूळकारण ॥ परी नप्रसवे बीजेंविण ॥ तरी तें जगद्बीज जीवन[3] ॥ मुख्य कारण पृथ्वीचें ॥ ॥ ४२ ॥ तया अपाचें कारण तेज ॥ जाठर[4] माठर[5] आणि आर्द्र[6] ॥ तत्कारण तो पवन सहज ॥ प्राणभस्त्रज नभगर्भी ॥ ४३ ॥ पवनहेतु जें कां गगन ॥ ध्वनि अवकाश आणि शून्य ॥ त्रिविध त्रिगुणात्मक ह्मणोन ॥ गगनकारण अहंकार ॥ ४४ ॥ अहंकाराचें कारण ॥ त्यासी महत्तत्व हें अभिधान ॥ महत्तत्वासी योनि जाण ॥ अव्यक्तसंज्ञ जे अजा ॥ ४५ ॥ गुणानुरूप त्रिविध भूतें ॥ कारणसमुच्चय ह्मणिजे त्यांतें ॥ त्यांचे विषय अर्थसंकेतें ॥ शुकें समर्थें बोलिले ॥ ४६ ॥ तदभिमानी विबुधचक्र ॥ विष्णुपवनदिगग्निप्रवर ॥ इत्यादि प्रसवती अपार ॥ भौतिकनिकर पृथक्त्वें ॥ ४७ ॥ एवं कारणें जियें जगाचीं ॥ तुजपासूनि संभूति त्यांची ॥ जें तूं अखिल ब्रह्मांडा-

---

१ चराचरसमूह. २ साक्षात्कारण. ३ उदक ४ जठराग्निचें. ५ सूर्याचें. ६ चंद्राचें.

ची ॥ सृजनसामग्री मूर्तिमंत ॥ ४८ ॥ जरी तूं ह्मणसी श्रीमुकुन्दा ॥ मीं अधीन यशोदानंदा ॥ योग्य नोहें या स्तुतिवादा ॥ तरी गोविंदा अवधारीं ॥ ४९ ॥ त्रिगुणात्मक हे तुझी माया ॥ गुणत्रयातें प्रसवोनियां ॥ योजिलें सृजनावनाप्ययां ॥ ते तुज जाणावया असमर्थ ॥५०॥ ऐसें मायाभ्रमलाघव॥ जें तूं गमसी गोपोद्भव॥ परंतु स्वरूप जें वास्तव ॥ तें नेणती देवब्रह्मादिक ॥ ५१ ॥

नैतेस्वरूपंविरजात्मनस्तेह्यजादयोऽनात्मतयागृहीताः ॥
अजोऽनुबद्धःसगुणैरजायागुणात्परंवेदनतेस्वरूपम् ॥ ३ ॥

॥ टीका ॥ मायेपासूनि भूपर्यंत ॥ जितुकीं कारणें कथिलीं येथ ॥ तीं तुज आत्मया इत्थंभूत ॥ नेणती समस्त जडात्मकें ॥ ५२ ॥ कीं तीं अनात्मकें जडें ॥ चेष्टती तव सत्ताउजिवडें ॥ यास्तव कारणें ह्मणणें घडे॥ येरवीं उघडें अज्ञान ॥ ५३ ॥ अज्ञान ह्मणिजे जें नेणणें ॥ तें जडस्वरूप या कारणें॥ तरी तव वास्तव कवण्या गुणें ॥ जाणों शकती भगवंता ॥ ५४ ॥ अव्यक्तादिकें जडें कैसीं ॥ तरी प्रत्यक्षादिप्रमाणें यांसी ॥ दृग्गोचरें अगोचरासी ॥ जाणों कैसीं शकतील ॥ ५५ ॥ उपनेत्र जैं नेत्रां लक्षी ॥ पुस्तकवाचका हृद्गत साक्षी ॥ प्रत्यक्षादिप्रमाणपक्षीं ॥ आत्मा अक्षीं तैं गवसे ॥ ५६॥ अव्यक्तादिकारणनिकर ॥ह्मणसी अज्ञानजडकठोर॥ मद्रूपावगमीं अधिकार ॥ असे साचार जीवातें ॥ ५७॥ तरी जो अज कंजोद्भव ॥ समष्टिप्रपंचात्मकजीव ॥ तो ही गौणत्वें ज्ञानानर्ह ॥ मां कैंची हांव व्यष्टिगतां ॥ ५८ ॥ अथवा अव्यक्तादिकें जडें ॥ अपणा अथवा तुज निवाडें ॥ जा-

---

१ सृजन-अवन-अप्यय ह्म० उत्पात्तिस्थितिलय. २ विराट स्वरूपी. ३ ज्ञानास अयोग्य. ४ समष्टीचा घटकावयव.

र्णों नशकती ऐसें घडे ॥ परी जीवांकडे ज्ञातृत्व ॥५९॥ तरी जीवही जडा प्रपंचाचा ॥ स्वप्रत्ययें सुखदुःखांचा ॥ उभयसाक्षी ज्ञाता साचा ॥ परी निर्गुणाचा अबोध त्या ॥ ६० ॥ ऐसी अक्रूर करूनि स्तुति ॥ पुन्हा शंका मानी चित्तीं॥ ह्मणसी मी दुर्ज्ञेय सर्वांप्रति ॥ तैं पुनरावृत्ति नचुके कीं ॥६१ ॥ तरी ऐकें जी जनार्दना ॥ अगोचर असतां ही प्रमाणा ॥ कोणा एका मार्गें भजना ॥ सुलभ सज्जना सम्यक तूं ॥ ६२ ॥

त्वायोगिनोयजंत्यद्धामहापुरुषमीश्वरम् ॥ सध्यात्मंसाधिभूतंचसाधिदैवंचसाधवः ॥ ४ ॥

॥ टीका ॥ जीवपरमात्मैक्यबुद्धि ॥ योगमार्गें भजनविधि ॥ योगी भजती तुज निरवधि ॥ तैं परमासिद्धि लाहती ते ॥ ६३ ॥ अध्यात्म अधिभूत अधिदैव ॥ इहीं सहित प्रपंच सर्व ॥ विवरूनि साक्षी वासुदेव ॥सांख्य सदैव उपासिती ॥ ६४ ॥ तयां सांख्यां ज्ञाननिरतां ॥ द्वैतविमुखां निजत्मरतां ॥ नित्योपलब्ध अभेदभक्तां ॥तैं संसृतिवार्ता त्यां कैंची ॥ ६५ ॥ एवं साधुत्वें साधुभजना ॥ सुलभ सर्वदा साधुजना ॥ह्मणसी सकामा विषयमग्ना ॥ दुर्लभ कीं नामप्राप्ति ॥ ६६ ॥ तयांसही तरणोपाय॥जो त्वां निर्मिला होऊनि सदय॥तया मार्गाची लाहोनि सोय ॥ ते तव पाय आश्रयिती ॥ ६७ ॥ जाणोनि तयाचा अधिकार ॥ कर्म ज्ञान द्विप्रकार ॥ मार्ग बोधिला तो मुनिवर ॥ कथी साचार दों श्लोकीं ६८ ॥

त्र्य्याचविद्ययाकेचित्त्वांवैवैतानिकाद्विजाः ॥ यजंतेविततैर्यज्ञैर्नानारूपामराख्यया ॥ ५ ॥

॥ टीका ॥ वैतानिक जे कर्मयोगी ॥ तूतें भजती विविधा लिंगीं ॥ ते तूं ह्मणसी भेदभंगीं ॥ अर्पे स्वर्गी देवां-

---

१ ज्ञानयोगी. २ यज्ञादि कर्म करणारे.

तें ॥ ६९ ॥ इंद्र वरुण वायु अग्नि ॥ इत्यादि पृथक देवता यज्ञीं ॥ सांग सायुध सर्वाभरणीं ॥ अमराभिधानीं
तुज यजिती ॥७०॥ इंद्रवरुणप्रमुखसूक्तें॥ पूर्णैश्वर्यें स्तविती त्यातें॥ पृथक्सर्वेश्वर कैंचे येथें ॥ तुज एकातें तें स्तवन
॥ ७१ ॥ प्रयागीं कां हरिद्वारीं ॥ काशीक्षेत्रीं कां दर्दरीं ॥ महिमा स्तवितां पृथगाकारीं॥ गंगा दुसरी नोहे
कीं ॥ ७२॥ किंवा अनेक पदार्थमात्रीं ॥ पादत्राणादि सूत्रीं वस्त्रीं ॥ कांच नयोगें महिमा भारी ॥ तो पृथगाकारीं
हेमाचा ॥ ७३ ॥ तैसाचि श्रुति ह्मणे जो परम ॥ प्रकृति पुरुष इंद्राग्नियम ॥ मित्रावरुण सूर्यसोम ॥ पूर्णकाम
तूं आद्य ७४॥ऐसें जाणोनि करिती यजनें॥अथवा सकाम पृथगभिधानें ॥ परि तुज पावती तेणें भजनें ॥ सर्वात्मपणें
तव तुष्टि॥७५॥ कर्मयोगी ऐसे भजती ॥ ज्ञानयज्ञें एक यजिती॥ ऐका तयांची व्युत्पत्ति॥शुक संकेतीं जें वदला७६

एकेत्वाऽखिलकर्माणिसन्यस्योपशमंगताः ॥ ज्ञानिनोज्ञानयज्ञेनयजंतिज्ञानविग्रहम् ॥ ६ ॥

॥ टीका ॥ विरक्तिसद्गृहणीं गृहस्थ ॥ निरुपाधिकता प्रायश्चित्त ॥ ज्ञानाहिताग्नि सद्गुरुनाथ ॥ त्यापें दीक्षित
तदनुज्ञा ॥ ७७ ॥ आपातताखिल वेदार्थ ॥ श्रवणसूत्रें भूपरमित ॥ काम्यें निषिद्धें पैं उज्झित ॥ अस्थिशकलें
कपालें ॥७८ ॥ नित्यनैमित्तिक जें कां कर्म ॥ सार्द्र प्रायश्चित्त निष्काम ॥ औपासनार्थ धरूनि प्रेम ॥ वेदीं उत्तम
चित्तशुद्धि ॥ ७९ ॥ सविक्षेप जो ज्ञानानळ ॥ तो त्यागूनि लौकिक समळ ॥ हृदयांरणिमथनें अमळ ॥ सूक्ष्म
तत्काळ प्रकटिला ॥ ८० ॥ पंचविषयीं निर्विकार ॥ तेंचि पंचभूसंस्कार ॥ साधनचतुष्टयसंभार ॥ केली सुंदर
आसादनी ॥ ८१ ॥ विवेकाध्वर्यु स्थापिला ॥ विचारब्रह्मा प्रतिष्ठिला ॥ नियमंहोता तेथें केला ॥ निश्चय जाला

---

१ टाकिलेला, २ हृदय रूप अरणि ह्म० अग्नि उत्पन्न करण्याचीं काष्ठें. ३ यजुर्वेदी ऋत्विज, ४ चार वेद जाणणारा ऋत्विज, ५ ऋग्वेदी ऋ०

उद्गाता ॥ ८२ ॥ संचित प्रारब्ध क्रियमाण ॥ प्रधानहवि अभिघारून ॥ निजात्मप्रत्ययमंत्रपठन ॥ उपशमासन यजमाना ॥ ८३ ॥ प्रथम जे कां द्वेषराग ॥ होमिले आघाराज्यभाग ॥ तदुपरि अधिकार जाला चांग ॥ सांगोपांग अवदानीं ॥ ८४ ॥ स्वगतभेदाची निवृत्ति ॥ तेचि यज्ञीं पूर्णाहुति ॥ अवशिष्ट जे आत्मस्थिति ॥ इळोपहूति स्वच्छंदें ॥ ८५ ॥ नित्यानंदाचें अवतरण ॥ तेंचि पुरोडाशप्राशन ॥ ज्ञप्तिप्रत्यय विसर्जून ॥ अवभृथस्नानपूर्णता ॥ ८६ ॥ ऐसा करूनि ज्ञानयज्ञ ॥ यजिती ज्ञानात्मा भगवान ॥ तेणें पावले निर्वाण ॥ संसृतिभानवर्जित जे ॥ ८७ ॥ अहंदुर्ब्राह्मण्य गेलें ॥ सोहंदीक्षितपण जें आलें ॥ तेंही पूर्णत्वीं मुरालें ॥ मग संचलें शांतिसुख ॥ ८८ ऐसे एक ज्ञानाध्वरी ॥ एक ते उपासनाप्रकारीं ॥ उपासिती तूतें हरि ॥ तें अवधारीं दों श्लोकीं ॥ ८९ ॥

॥ अन्येचसंस्कृतात्मानोविधिनाभिहितेनते ॥ यजंतित्वन्मयास्त्वांबैबहुमुर्त्यैकमूर्तिकम् ॥ ७ ॥

॥ टीका ॥ त्यामाजि प्रथम वैष्णवधर्म ॥ विष्णुपूजन यथानुक्रम ॥ प्रातःकृत्यादि आह्निककर्म ॥ विष्णुपरमसद्भाव ॥ ९० ॥ वर्तमान भूत भाव्य ॥ ते अखिलादिपुरुष एव ॥ येर मायिकअभाव ॥ दृश्य सर्व भवभ्रम ॥ ९१ ॥ गुरूपसादनदीक्षाग्रहात ॥ देहादिमनोबुद्धिपर्यंत ॥ श्रद्धापूर्वक संस्कारवंत ॥ अतंद्रित अनुसरले ॥ ९२ ॥ शद्बार्थ श्रोता श्रवण विष्णु ॥ स्पर्श स्पर्शज्ञ त्वग् भगवान् ॥ दृश्य दृग् द्रष्टा दर्शनु ॥ मधुसूदन परमात्मा ॥ ९३ ॥ रस रसना रसाभिज्ञ ॥ गंध घ्राता घ्रातव्य घ्राण ॥ सर्व सर्वग जनार्दन ॥ भज्य भजन भजकात्मा ॥ ९४ ॥ ऐसे सबाह्य सर्वावयव ॥ जाणती अभेद वासुदेव ॥ पुढती भजनाचें लाघव ॥ पृथग् जाणीव वर्ते तो ॥ ९५ ॥

---

१ सामवेदी ऋत्विज. २ घृतसंरकायुक्त करून. ३ हवनीय घृताचे भाग.



अध्याय ३९।४०.

ज्याची तुलना नपवे पवन॥ ऐसा गतिमंत स्यंदन॥ राम अक्रूर श्री भगवान॥ करिती गमन तद्वेगें॥ ३५०॥
तया संकर्षणोत्संगीं॥ कुंडलीकृत देहार्धभागीं॥ अक्रूरें देखिला श्रीशार्ङ्गी॥ कोणे लिंगीं तें ऐका॥ ३८९॥

श्रीकृष्णानाथांयनमः॥सज्जनचक्रचकोरचंद्रा ॥ नमोगोविंदा देशिकेंद्रा॥तुझी लाहतां वरदमुद्रा ॥ भवसमुद्रा जड तरती ॥ १ ॥ सद्गुरुभजनीं जें अवक्र ॥ तत्समुदाय सज्जनचक्र ॥ त्यातें तोषक अमृतर ॥ आनंद सधर श्रीमूर्ति ॥ २ ॥ श्रीपदनमनमात्रें दास ॥ देशिकेंद्रा तवादेश ॥ लाहतां निर्भय कळिकाळास ॥ भवभय त्यास मग कैंचें ॥ ३ ॥ ब्रह्म निर्गुण निराकार ॥ करितां स्वगत अंगीकार ॥ शुद्ध सत्वात्मक ईश्वर ॥ कर्ता गोप्ता सर्वज्ञ ॥ ४ ॥ स्वगतानुगतत्वें पूर्णता ॥ तेणें उपलभे सर्वज्ञता ॥ तैं तो एकाकी नरमतां ॥ अनेकविधता परिकल्पी ॥ ५ ॥ जडत्वें आलें सर्वज्ञपण ॥ येऱ्हवीं ब्रह्मचि ईश्वर पूर्ण ॥ एकाकी नरमे ह्मणोन ॥ शबल माया अवलंबी ॥ ६ ॥ अविद्यासंभव तदुत्तर ॥ अव्याकृत जें अज्ञानप्रचुर ॥ तदभिमानी जो कां रुद्र ॥ कर्ता संहार सृष्टीचा ॥ ७ ॥ तया तमोगुणाचे पोटीं ॥ सत्वगुणाची प्रभा उठी ॥ विपरीत ज्ञानाची पाउटी ॥ गोप्ता सृष्टि हरि जेथें ॥ ८ ॥ तेथूनि विराट रजात्मक ॥ जेथ ब्रह्मा त्रिजगज्जनक ॥ जागृवदस्थाप्रकाशक ॥ चिद्धामक भवभान ॥ ९ ॥ अव्याकृतीं पंचभूतें ॥ हिरण्यगर्भीं[३] तत्संभूतें ॥ अंतःकरणादि समस्तें ॥ कर्तृकरणें ज्या नाम ॥ १० ॥ चेष्टा ज्ञान क्रिया करणें ॥ प्रकाशूनियां रजोगुणें ॥ भूतिविषयां अभिलाषणें ॥ दृश्यभानें भुलोनियां ॥ ११ ॥ तम प्रसवे व्यापक गगन ॥ गगन प्रसवे सर्वग पवन ॥ पवन प्रसवे प्रकाशमान ॥ विश्वदीपन तेजस्वी ॥ १२ ॥ तेजापासूनि हो-

---

१ गुरुश्रेष्ठा. २ सकाम पुण्य, ३ ब्रह्मदेवाचे ठायीं.

य जळ ॥ जळापासूनि पृथ्वी स्थूळ ॥ पृथ्वीपासूनि भौतिकमेळ ॥ पंचभूतात्मक बहुयोनि ॥ १३ ॥ परस्परें तो समुदाय ॥ पंचभूतात्मक भौतिकमय ॥ एकमेकांचें अन्न होय ॥ परमप्रिय स्वादिष्ठ ॥ १४ ॥ पंचभूतात्मक तो रस रेत ॥ होवूनि सुरतावेश ॥ धरितां तेथ प्रकृति पुरुष ॥ होती अशेष देहरूपी ॥ १५ ॥ एवं दशगुण उतरोत्तर ॥ ब्रह्मापासूनियां स्थूळ शरीर॥पर्यंत जडतेचा विस्तार ॥ जाणती चतुर तत्ववित् ॥ १६ ॥ ऐसा चिज्जडग्रंथिमय ॥ भवभ्रमासि जो आश्रय ॥ तो हा जीवांचा समुदाय ॥ भ्रमें विषयपरिबद्ध ॥ १७ ॥ मिथ्याविषय साच मानी ॥ तदभिलाषें नानायोनि ॥ भ्रमतां भवसिंधूचें पाणी ॥ अगाध करूनि बुडतसे॥ १८॥ ऐसे जड तव चरणा शरण ॥ होतां निरसे मग जडपण ॥ केवळ होती चैतन्यघन ॥ जाती लंघोनि भवसिंधु॥ ॥ १९ ॥ त्या तव चरणा प्रणति मात्र ॥ करूनि कृपेसि जालों पात्र ॥ आज्ञानियमें हरिचरित्र ॥ कथनीं वक्र प्रवर्त्तविलें ॥ २० ॥ तेथ अठतीस अध्यायवरी ॥ वाखाणिली शुकवैखरी॥ अक्रूरा भेटले राममुरारी॥कथा पुढारीं अवधारा ॥ २१ ॥ एकोणचाळिसाव्या आंत ॥ मथुरे जातां कृष्णनाथ ॥ विरहें गोपींचा आकांत ॥ तो समस्त कथिजेल ॥ २२ ॥ आणि अक्रूरा यमुनास्नानीं ॥ विष्णुलोक अवलोकूनी ॥ सात्विक अष्टभाव होऊनी ॥ हरिगुणस्तवनीं तो वेंठे ॥ २३ ॥ इतुकी कथा या अध्यायीं ॥ व्यासतनयें कथिली पाहीं ॥ भाषाव्याख्यान श्रवणालयीं ॥ दयार्णव कथील श्रोत्यांचे ॥ २४ ॥ पूर्वाध्यायाचे समाप्ती ॥ अक्रूर पूजिला परम भक्ति ॥ ऐकोनि नंदादिकांच्या उक्ति ॥ परम विश्रांति मानिली ॥ २५ ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ सुखोपविष्टःपर्यंकेरामकृष्णोरुमानितः ॥ लेभेमनोरथान्सर्वान्पथियान्सचकारह ॥ १ ॥

---

१ तम, सत्व, रज, आकाश, वायु, तेज, जळ, पृथ्वी, अन्न, वीर्य. २ नमस्कार.

॥ टीका ॥ शुक ह्मणे गा परीक्षिति रामकृष्णें अक्रूराप्रति ॥ जैंवि विधि हर विष्णु पूजिती ॥ तैसिया भक्ती पूजिलें ॥ २६ ॥ वृद्ध आप्त गुरुसमान ॥ अनन्य भावें सम्मानून ॥ मंचकीं बैसविला वंदून ॥ सुखसंपन्न तद्योगें ॥ २७ ॥ सुखें [1]उपविष्ट पर्यंकीं ॥ भावी हृत्कमळीं [2]श्वाफल्कि ॥ पंथीं कल्पना केली जितुकी ॥ कृष्णें तितुकी पुरविली ॥ २८ ॥ जे जे इच्छिले मनोरथ ॥ ते ते लाभलों मी समस्त ॥ प्रत्यक्ष भेटलिया भगवंत ॥ अलभ्य त्रिजगांत मग काय ॥ २९ ॥

किमलभ्यंभगवतिप्रसन्नेश्रीनिकेतने ॥ तथाऽपितत्पराराजन्नहिवांछंतिकिंचन ॥ २ ॥

॥ टीका ॥ ऐसा अक्रूर कुरुनरेशा ॥ कृष्णें मानितां परमोल्हासा ॥ पावोनि विसरला भवपथक्लेशा ॥ अन्य दुराशां समवेत ॥ ३० ॥ राया नवल काय यदर्थीं ॥ प्रसन्न जाहालिया कमलापति ॥ काय अलभ्य भक्तांप्रति ॥ येत्रिजगती माजिवडें ॥ ३१ ॥ ज्याचे चरणीं श्रीचें धाम ॥ जो कां अवाप्तपूर्णकाम ॥ तो तुष्टल्या पुरुषोत्तम ॥ काय दुर्गम अप्राप्त ॥ ३२ ॥ तथापि राया भगवत्पर ॥ निष्कामभक्त निर्विकार ॥ नधरिती कांहीं वांछा मात्र ॥ कीं जालें पात्र प्रेमाचें ॥ ३३ ॥ निष्कामभक्तांचिये द्वारीं ॥ स्वयें परमात्मा आज्ञाधारी ॥ न वांछितां सर्व सामग्री ॥ अर्पूनि करी [3]परिचर्या ॥ ३४ ॥ बाळ नमागतां आंगी टोपी ॥ अळंकारेंशीं माता वोपी ॥ अनन्यभावास्तव ते [4]जोपी ॥ तेंवि संगोपी श्रीपति ॥ ३५ ॥ एवं जे जे निष्काम भक्त ॥ त्यांसी संगोप्ता भगवंत ॥ काय तयांसी अप्राप्त ॥ ते संतृप्त हरिप्रेमें ॥ ३६ ॥ शुकें ऐसा भगवन्महिमा ॥ आणि भक्तांचा निष्काम प्रेमा ॥ निरोपूनियां नृपसत्तमा ॥ कथानुक्रमा सांगतसे ॥ ३७ ॥

---

[1] बसलेला. [2] श्वफल्काचा पुत्र अक्रूर. [3] सेवा. [4] रक्षी.

सायंतनाशनंकृत्वाभगवान्देवकीसुतः ॥ सुहृत्सुवृत्तंकंसस्यपप्रच्छान्यच्चिकीर्षितम् ॥ ३ ॥

॥ टीका ॥ तोषवूनियां अक्रूराशी॥ नंद बळराम हृषीकेशी ॥ करिते झाले भोजनाशी ॥सायंतनीय[1] विध्युक्त
॥ ३८ ॥ ऐशीं करूनियां भोजनें ॥ तांबूल घेवूनि धरिलीं वसनें ॥ मग अक्रूरासन्निध रामकृष्णें ॥ स्नेहविधानें
जाऊनी ॥ ३९ ॥ भूतभविष्यवर्तमान ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ सर्ववेत्ता श्रीभगवान ॥ देवकीनंदन परमात्मा॥
॥४०॥ तो कंसाचा अभिप्राव ॥ आणि ज्ञातीसी सुहृद्भाव ॥ इत्यादि वृत्तांत अक्रूरा सर्व ॥पुसता झाला एकांतीं॥
॥४१॥ आणि अक्रूराचें अभ्यंतर ॥ अवंचकभावाचा प्रकार ॥ प्रकटावया कंसविचार ॥ पुसे सविस्तर कर्त्तव्य॥
॥४२॥त्याचि कृष्णाच्या प्रश्नोक्ति ॥ चौं श्लोकीं निरोपिजेती ॥ राया ऐकें सादरवृत्ति ॥ ह्मणे सुमति शुकवक्ता॥४३ ॥

॥श्रीकृष्णउवाच॥तातसौम्याऽऽगतःकच्चित्स्वागतंभद्रमस्तुवः ॥अपिस्वज्ञातिबधूनामनमीवमनामयम्॥४॥

॥ टीका ॥ कृष्ण अक्रूरा करी प्रश्न ॥ तात ह्मणोनि संबोधून ॥ क्षेमरूप कीं आगमन ॥ भद्र कल्याण असे
कीं ॥ ४४ ॥ कुशल असे कीं परिवार ॥ कुशल स्वागत पथसंचार ॥ कुशल प्रज्ञा प्रताप शरीर ॥ कुशल मत्पर[2]
स्नेह कीं ॥ ४५ ॥ आणि स्वज्ञाति स्वबंधूंसी ॥ अनमीव[3] असे कीं सर्वांसी ॥ अनामय[4] ही समस्तांसी ॥ असे
ह्मणोनि पूसिलें ॥ ४६ ॥ स्वज्ञाति ह्मणिजे सुहृद सापिंड ॥ बंधुसंबंधी असा पिंड ॥ ज्ञातिसमुच्चय उदंड ॥
सात्वत वृष्णि कुकुरादि ॥ ४७ ॥ अमीव पातकांचें नांव ॥ तद्विपरीत तें अनमीव ॥ एवं यदुकुळ निष्पाप सर्व
॥ पुसे माधव कृपेनें ॥ ४८ ॥ निष्पाप ह्मणिजे पुण्यवंत ॥ पुण्यफलोदय आनंदभरित ॥ एवं यदुकुळ क्लेशा-

---

[1] संध्याकाळचा. [2] माझ्याविषयीं. [3] दुराचाररहितता. [4] आरोग्य.

तीत ॥ पुसे अच्युत या भावें ॥४९ ॥ आरोग्य ह्मणिजे अनामय ॥ पुसे यदूचा अन्वय[1] ॥ ऐसा येर्थींचा अभिप्राय
॥ जें मुख्य आमय[2] हृद्रोग ॥ ५० ॥ असतां कंसाचे संगती ॥ दुर्लभ यदुवंशा विश्रांति ॥ या लागीं आमुच्या
सर्वज्ञाति ॥ भोगिती विपत्ति सर्बदा ॥ ५१ ॥ विपत्ती वरपडला[3] जोप्राणी ॥ तैं त्या सहजाचि स्वधर्महानि ॥ घडती
पातकांच्या श्रेणी ॥ पुसिलें ह्मणोनि अनमीव ॥ ५२ ॥ हृदयीं जागतां मरणभय ॥ मग त्यां कैंचें अनामय
॥ हाचि उघडा अभिप्राय ॥ पुसे यदुराय तें ऐका ॥ ५३ ॥

किन्नुनःकुशलंपृच्छेएधमानेकुलामये ॥ कंसेमातुलनाम्न्यंगस्वानांनस्तत्प्रजासुच ॥ ९ ॥

॥ टीका ॥ अक्रूरा कोमळ आमंत्रण ॥ अंगशब्दें करी कृष्ण ॥ ह्मणे सखया तुजलागून ॥ काय ह्मणोन पुसतों
मी ॥ ५४ ॥ हें तंव सर्वांसि दिसे प्रकट ॥ कंस सप्रताप वरिष्ठ॥ सर्वज्ञातींसी रोग स्पष्ट ॥वाढला असतां
सुख कैंचें ॥ ५५ ॥ आमचा नाममात्र मातुळ ॥ एऱ्हवीं हा घातक काळ॥त्याच्या प्रजा आमुचें कुळ॥त्या कें
कुशल तो असतां ॥ ५६ ॥ हें म्यां काय तुह्मांसि पुसणें ॥ अहो ऐसें खेदें ह्मणे ॥ देवकीवसुदेवांकारणें ॥ कंसें
जाचणें किमर्थ ॥ ५७ ॥

अहोअस्मदभूद्भूरिपित्रोर्वृजिनमार्ययोः ॥ यद्धेतोःपुत्रमरणंयद्धेतोर्बंधनंतयोः ॥ ६ ॥

॥ टीका ॥ अपराधरहित साधुप्राय ॥ इहीं त्याचें केलें काय ॥ जाणोनि माझीं बापमाय ॥ परमान्यायें जाचितसे
॥ ५८ ॥ भूरि[4] वृजिन[5] जें परम दुःख ॥ माझ्या वैरास्तव हा देख ॥ देतसे करूनियां अविवेक ॥कारण सम्यक्
मी याचें ॥५९ ॥ मजाचि कारणें यांचे पुत्र ॥ मारिले होऊनियां अमित्र[6] ॥ निगड[7]बंधादिदुःखपात्र ॥

---

१ वंश. २ रोम. ३ शिरला. ४ पुष्कळ. ५ पातक. ६ शत्रु. ७ बेडीचें बंधन.

यातना सर्वत्र मज साठीं ॥६० ॥ मजचि साठीं सर्व ज्ञाति ॥ कंसें लांविलिया दिगंतीं ॥ प्रजा सेवक अनुचरवृत्ति ॥ तुह्मी त्या प्रति सोवतसां ॥ ६१ ॥ हें सर्वही मजचिकडे ॥ दिसोनि येतसे पैं उघडें ॥ यावरी पुसेन जें मी पुढें ॥ तेंचि निवाडें निरूपिजे ॥ ६२ ॥

दिष्ट्याऽद्यदर्शनंस्वानांमह्यंवःसौम्यकांक्षितम् ॥ संजातंवर्ण्यतांताततवाऽऽगमनकारणम् ॥ ७ ॥

॥टीका ॥ आश्रयूनियां कंसा खळा ॥ अक्रूरा क्रमिसी विपत्तिवेळा ॥ सौम्य ह्मणिजे सहनशीला ॥ बुद्धिकुशळा दानपति ॥ ६३ ॥ तुह्मां स्वकीयांचें दर्शन ॥ सर्वकाळ वांछी मन ॥ तें आजि बरव्या प्रकारें करून ॥ जालें ह्मणोनि उत्साह ॥ ६४ ॥ दैवास्तव हा परमोत्साह ॥ येथोनि जाणिजे कल्याणोदय ॥ आतां सांगिजे कारण काय ॥ आगमनाचें सविस्तर ॥ ६५ ॥ शुक ह्मणे गा अर्जुनपौत्रा ॥ कुरुभूमंडलमंगलसूत्रा ॥कृष्णें पुसिलें श्वफल्कपुत्रा ॥ तो तच्छ्रोत्रा परिसवी ॥६६ ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ पृष्टोभगवतासर्वंवर्णयामासमाधवः ॥ वैरानुबंधंयदुषुवसुदेववधोद्यमम् ॥ ८ ॥
यत्संदेशोयदर्थंवादूतःसंप्रेषितःस्वयम् ॥ यदुक्तंनारदेनास्यस्वजन्माऽऽकदुंदुभेः ॥९॥

॥टिका ॥ कृष्णें पुसिलें मधुवंशजा ॥ त्या माधवें अक्रूरें अधोक्षजा ॥ सर्व निवेदिलें बरवे वोजा ॥ तें कुरुराजा अवधारीं ॥ ६७ ॥ देवकीविवाहोत्तर प्रयाणीं ॥ भविष्य वदली गगनवाणी ॥ कंसा वधील तुजलागोनी ॥ अष्टम गर्भ देवकीचा ॥ ६८ ॥ तें ऐकोनी देवकीहनन ॥ करितां वसुदेवें बोधून ॥ कंस वारिला पुत्रार्पण ॥ क-

---

१ त्याच्या कर्णाला. २ जाण्याच्या वेळीं.

रीन ह्मणोनि शपथेंसीं ॥ ६९ ॥ तद्विश्वासें देवकीमोक्ष ॥ प्रथमपुत्रार्पणें तो पक्ष ॥ राक्षिता जाला वसुदेव दक्ष[1] ॥
तंव नारदें प्रत्यक्ष गुज कथिलें ॥ ७० ॥ यादव तितुके देवावतार॥ विष्णु तव रिपु देवकीकुमर ॥ अचुक आठवा
हा जाणोनि मंत्र ॥ होईं सत्वर सावध तूं ॥ ७१ ॥ येथूनि यदुकुळासी वैर॥चाळिता जाला कंसासुर॥देवकीवसुदेव
सह निज पितर ॥ कारागार[2] त्यां केलें ॥ ७२ ॥ अष्टम गर्भाचिये काळीं ॥ देवकीकन्या मारितां गेली ॥
पुढें कंसाची मति खुंटली ॥ मग सोडिलीं तीं दोघें ॥ ७३ ॥ त्यावरी कंस आजिपर्यंत ॥ विचार नसुचोनि होता
भ्रांत ॥ तंव नारद पातला अकस्मात ॥ तेणें वृत्तांत पुन्हा कथिला ॥ ७४ ॥ आनकदुंदुभीपासून[3] ॥ देवकीजठरीं
कृष्णजनन ॥ तेणें नंदगृहीं लपवून ॥ कन्या आणूनि तुज दिधली ॥ ७५ ॥ ऐसी ऐकोनि नारदोक्ति ॥ कंस
प्रवर्तला वसुदेवघातीं ॥ मग त्या नारदें धरूनि हातीं ॥ कथिली युक्ति नृपचर्या[4] ॥ ७६॥ नीति कथूनि नारद गेला
॥ कंसें उपाय आरंभिला ॥ मानें पाचारूनियां मजला ॥ व्रजपुराला पाठविलें ॥ ७७ ॥ धनुर्मखाचें करूनि
छद्म ॥ आणवी सगोप कृष्णराम ॥ किमर्थ तरी तो हननकाम ॥ कृतसंभ्रम[5] अवधारीं ॥ ७८ ॥ द्वारीं लोटूनि
महागज ॥ वधावे बळराम अधोक्षज ॥ दैवें वांचल्या महाभुज ॥ रंगीं काज साधीन ॥७९॥ चाणूर मुष्टिक शल
तोशल ॥ अतुलबळि हे प्रचंड मल्ल ॥ धडकूनि विद्युल्लते तुल्य ॥ मज निःशल्यं[6] करितील ॥ ८० ॥ ऐसे मारीन
रामकृष्ण ॥ नंदव्रजाचें सर्वस्वहरण ॥ देवकी वसुदेव उग्रसेन ॥ शस्त्रें वधीन स्वहस्तें ॥८१ ॥ यदुकुळाचें खणोनि
खात ॥ मृत्युभयाचें फाडीन खत ॥ ऐसा कथूनि मज वृत्तांत॥ दूत दर्थ आलों मी ॥८२॥ऐसें अक्रूरें अवंचकभावें
॥ गुह्य कृष्णासि केलें ठावें ॥ परिसोनि साग्रज वासुदेवें ॥ श्रुतकैतवें हांसिला ॥ ८३ ॥

---

[1] चतुर. [2] बंदिगृह. [3] वसुदेवापासून. [4] राजानें वागण्याची पद्धति. [5] केलेली त्वरा. [6] चिंतारहित.

श्रुत्वाऽक्रूरवचःकृष्णोबलश्चपरवीरहा ॥ प्रहस्यनंदंपितरंराज्ञादिष्टंविजज्ञतुः ॥ १० ॥

॥ टीका ॥ अक्रूरवृत्तांत परिसोनि हरि ॥ आणि बलराम प्रलंबारि[1] ॥ हांसते झाले परस्परीं ॥ टाळी करीं देवोनी ॥८४॥पाचारूनियां पिता नंद ॥ कथिला कंसाज्ञेचा निगद[2] ॥ तेणें समस्त गोपवृंद॥केला सावध तें ऐका८५

मोपान्समादिशत्सोऽपिगृह्यतांसर्वगोरसः ॥ उपायनानिगृह्णीध्वंयुज्यंतांशकटानिच ॥ ११ ॥

॥ टीका ॥ नंदें बाहोनि भराडा[3] ॥ पटहघोषें गवळवाडा ॥ आज्ञाशब्द चहूंकडा ॥ प्रकट झडझडा करविला ॥ ८६ ॥ परिसा आज्ञेचा अनुकल्प[4] ॥ आपुले संपत्तिविभागरूप ॥ उपायनें गोरस गोप ॥ घेवोनि साटोप सिद्ध असा ॥ ८७ ॥ पयोदधिनवनीतघृतादिसर्वें ॥ भरूनि शकट सज्ज करावे॥प्रभाते मथुरेलागीं जावें ॥सावध असावें यदर्थी ॥ ८८ ॥

यास्यामश्वोमधुपुरींदास्यामोन्नृपतेरसान् ॥ द्रक्ष्यामःसुमहापर्वयांतिजानपदाःकिल ॥ १२ ॥
एवमाघोषयत्क्षत्रानंदगोपःस्वगोकुले ॥

॥ टीका ॥ प्रभाते जाऊं मधुपुरीप्रति ॥ रस समर्पूं नृपाप्रति ॥ पूर्वोत्साह पाहों जाती ॥ अनेकयाती जनपद पैं ॥ ८९ ॥ रस कां दीजे नृपाप्रति ॥ नगरीं लोक हे चर्चा करिती ॥ अचिकित्स रोगाचे निवृत्ति ॥ चिकित्सार्थीं रसदान ॥ ९० ॥ तो अवलोकूं धनुर्मख ॥ ऐसा नियम निश्चयात्मक॥नंद आज्ञापी क्षेत्ररक्षक ॥ नगरीं घोष तो प्रकटी ॥ ९१ ॥ नंदाचिये आज्ञेप्रमाणें ॥ गोकुळीं क्षेत्ररक्षक तेणें ॥ पटहघोष इत्यादि वचनें ॥ प्रकट के-

---

[1] प्रलंब दैत्याचा शत्रु. [2] वचन. [3] कीर्तनकरणारा गोंसावी, पुजारी. [4] विधिः

लीं समस्तां ॥ ९२ ॥ ऐसा डांगोरा परिसोनी ॥ गोपी सचिंत जाल्या मनीं ॥ त्याची सन्निग्ध मानसग्लानि ॥ नृपा लागोनि शुक सांगे ॥ ९३ ॥

गोप्यस्तास्तदुपश्रुत्यबभूवुर्व्यथिताभृशम् ॥ रामकृष्णौपुरींनेतुमक्रूरंव्रजमागतम् ॥ १३ ॥

॥ टीका ॥ गोपीमानसें कृष्णीं निरतें ॥ कृष्णवियोगें केवळ प्रेतें ॥ तिहीं ऐकोनि ये वार्तेतें ॥ परम दुःखातें पावल्या ॥ ९४ ॥ रामकृष्णांतें न्यावयासी ॥ अक्रूर आला गोकुळासी ॥ ऐशा सूक्ष्मवृत्तांतासी ॥ ऐकोनि मानसीं संतप्ता ॥ ९५ ॥ तियें हृदयतापलक्षणें ॥ नृपा कथिलीं बादरायणें ॥ सप्रेमभगवत्पर जीं चिह्नें ॥ परिसा श्रवणें सज्जनहो ॥ ९६ ॥

काश्चित्तत्कृतहृत्तापश्वासम्लानमुखश्रियः ॥ स्रंसद्दुकूलवलयकेशग्रंथ्यश्वकाश्वन ॥ १४ ॥

॥ टीका ॥ ऐसी वार्ता पडतां कानीं ॥ हृदयताप मानसग्लानि ॥ ओष्ठ वाळले श्वासें करूनी ॥ म्लान जाली वदनश्री ॥ ९७ ॥ आंगींची पुष्टि उतरोनि गेली ॥ मुद्रिकाकंकणें गळोनि पडलीं ॥ केश सुटोनि पुष्पें विखुरलीं ॥ नेसणीं निसरलीं नेणती ॥ ९८ ॥ कित्येकां गोपींची हे दशा ॥ तंव अणखी तन्मानसा ॥ वार्ता ऐकोनि जाल्या पिशा ॥ तें नरेशा अवधारीं ॥ ९९ ॥

अन्याश्चतदनुध्याननिवृत्ताशेषवृत्तयः ॥ नाभ्यजानन्निमंलोकमात्मलोकंगताइव ॥ १५ ॥

---

१ आंगठ्या. २ कृष्णाचे ठिकाणीं मन ज्यांचें त्या.

॥ टीका ॥ कृष्णमूर्ति अनुलक्षून ॥ हृदयीं आविर्भविलें ध्यान ॥ तेणें गोगणवृत्ति[1] लीन ॥ प्रवृत्तिभान[2] विसरल्या ॥ १०० ॥ नेणती आपुली अवयवस्मृति ॥ तेथ कैंची लोकप्रवृत्ति ॥ बाणली नित्यमुक्तांची स्थिति॥ निजात्मरति समसाम्य ॥ १०१ ॥ परि हे मूर्च्छना मूढदशा ॥ कृष्णवियोगस्मरणा सरिशा॥पावल्या नकरितां योगाभ्यासा ॥ आत्मसौरसा समगमती ॥ २ ॥ ऐशा पावल्या विदेहावस्था ॥तंव आणखी बल्लववनिता॥ स्मरत्या झाल्या कृष्णगीता ॥ तें कुरुनाथा अवधारीं ॥ ३ ॥

स्मरन्त्यश्चापराःशौरेरनुरागस्मितेरिताः ॥ हृदिस्पृशश्चित्रपदागिरःसंमुमुहुःस्त्रियः ॥ १६ ॥

॥ टीका ॥ शूरसेनाचा जो कां नातु ॥ शौरि तो हा कृष्णनाथु ॥ त्याच्या वाणी हृदयाआंतु ॥ विलासभरित आठविती ॥ ४ अनुराग ह्मणिजे प्रेमप्रीति ॥ तत्पूर्वक ज्या मधुरोक्ति ॥ हास्य करूनियां श्रीपति ॥ वदे एकांतीं कांतारीं ॥ ५ ॥ जिया वाणींचिया श्रवणें ॥ मनें मूर्च्छितें मन्मथबाणें ॥ मनोहारका मनोज्ञा ह्मणणें ॥ सुललितपणें रसपुष्टा ॥ ६ ॥ जया वाणींच्या व्यापारीं ॥ विचित्रचूर्णिकाप्रचुराक्षरीं ॥ नवरसघटिता पदांच्या हारी ॥ स्मरती नारी मोहिता ॥ ७ ॥ आणिक कृष्णाच्या इंगिता ॥ हृदयीं स्मरती स्नेहानुरक्ता ॥ तें तूं परिसें कौरवनाथा ॥ विरहव्यथा गोपींची ॥ ८ ॥

गतिंसुललितांचेष्टांस्निग्धहासावलोकनम् ॥ शोकापहानिनर्माणिप्रोद्दामचरितानिच ॥ १७ ॥

॥ टीका ॥ श्रीकृष्णाचे पदविन्यास ॥ पाहोनि वेधले राजहंस ॥ विसरोनियां मानसवास ॥ केला सहवास

---

[1] इंद्रियगणाची स्थिति. [2] उद्योगाचें स्मरण.

हरिचरणीं ॥९॥ हंस मृगेन्द्र[1] शक्रयान[2] ॥ यांच्या गति जगतीमान्य ॥ सुललित कृष्णाचें गतिगमन ॥ विस्मित देखोनि ते होती ॥ ११० ॥ पदविन्यासें निवे धरणि ॥ स्पर्शें जंतूतें अमृतधणी[3] ॥ गतिइंगितें लक्षितां मनीं ॥ मन्मथ मानिनीं मोहीतसे ॥११॥ ऐसी लावण्य सुललित गति ॥ तीतें गोपी हृदयीं स्मरती ॥ विरहदुःखें विह्वळ होती ॥ चित्तें कवळिती कृष्णातें ॥ १२ ॥ चेष्टा ह्मणिजे विलासचर्या ॥ संगीतसूत्रें संमत आर्यां ॥ स्मरोनि संतप्त होती नार्या ॥ जेवीं अनार्यां भव तावी ॥ १३ ॥ तया चेष्टांचे अंतर्भाव ॥ स्मितावलोकें प्रकटी सर्व ॥ ह्री धी भी श्री शुभ गौरव ॥ क्रीडा बैभव सुस्निग्ध ॥ १४ ॥ सलज्जहासावलोकनें॥ मानिनी मूर्च्छिता मन्मथबाणें ॥ तत्कौशल्यें बुद्धिवर्धनें ॥ चातुर्यखुणे स्मरचर्या ॥ १५ ॥ लब्धसुखासी होय अभाव ॥ तोचि शोकाचा प्रादुर्भाव ॥ ऐसे अनेक भवोद्भव ॥ भोगितां जीव संत्रस्त ॥ १६ ॥ मानसभंगें वियोगभय ॥ अपांगमात्रें द्योतक होय ॥ लावण्यलक्ष्मी मन्मथमाय ॥ उपमा काय रौचर्यां[4] ॥ १७ ॥ ऐशिया बहुधा शोकांप्रति ॥ अपहारका हरिनर्मोक्ति[5] ॥ रतिरसातें आणी व्यक्ति ॥ मिथा एकांतीं क्रीडतां ॥ १८ ॥ रासरसिका नर्तनकाळीं ॥ किंवा क्रीडतां यमुनाजळीं ॥ रमतां पुलिनप्रदेशीं मृदुळीं ॥ तदुचित बोलिलीं जीं नर्में ॥ १९ ॥ हरिकरसंस्पर्श निजांगसंधि ॥ स्मरतां कमिनीं विरह बाधी ॥ तेणें मानसीं माजला आधि ॥ असाध्य व्याधि समसाम्य ॥ २० ॥ उद्दाम कृष्णाचें आचरित ॥ गोपी स्मरती हृदयांत ॥ नरसुरविधिहरही असमर्थ ॥ कृष्णचरितआचरणीं ॥ २१ ॥ स्तिमित ठेले खेचरगण ॥ गणकां नगणे रजनीमान ॥ ऐसें उद्दाम कृष्णाचरण ॥ तें त्या स्मरोन वधू रुदती ॥ २२ ॥ श्रीकृष्णाचे सुरतकाळीं ॥ तौर्यत्रिकीं अमरपाळीं ॥ करूनि पुष्पवृष्टि मोकळी ॥ पिटिली टाळी

---

२ सिंह. २ हत्ती. ३ अमृताची इच्छा. ४ रुचिरपणाला. ५ लीलायुक्त भाषणें.

आनंदें ॥ २३ ॥ प्रवाहत्यागें सरिता स्तिमिता ॥ स्थावरजंगमविरहावस्था ॥खेचरभूचरादिकां समस्तां ॥ रतिसुखास्था श्रीकृष्णीं ॥ २४ ॥ ऐसें चिंतूनि श्रीकृष्णचरित ॥ गोपी हृत्कमळीं संतप्त ॥ वियोगभयें विरहग्रस्त ॥ जाल्या समस्त ते काळीं ॥ २५ ॥

चिंतयंत्योमुकुन्दस्यभीताविरहकातराः॥समेताःसंघशःप्रोचुरश्रुमुख्योऽच्युताशयाः ॥ १८ ॥

॥ टीका ॥ कृष्णासंगें जे केली क्रीडा ॥ ते चिंतिती विगतव्रीडा[1] ॥ वियोगविरहदुःखें भ्याडा ॥ एकीपुढां एक वदती ॥ २६ ॥ थवे मिळूनि ठायीं ठायीं ॥ परस्परें कथिती पाहीं ॥ कृष्णक्रीडेची सुघडाई[2]॥ स्मरोनि हृदयीं विलपती ॥ २७ ॥ जिहीं अच्युत[3] कवळिला चित्तें ॥ अच्युताशया ह्मणिजे त्यातें ॥ नेत्रीं बाष्पांबूचें भरितें ॥ काय पैं तेथें त्या वदती ॥ २८ ॥

॥ गोप्यऊचुः ॥ अहोविधातस्तवनक्वचिद्दयासंयोज्यमैत्र्याप्रणयेनदेहिनः ॥
तांश्चाकृतार्थान्वियुनंक्ष्यपार्थकंविक्रीडितंतेऽर्भकचेष्टितंयथा ॥ १९ ॥

॥ टीका ॥ संगति योजूनियां कृष्णीं ॥ सर्वेंचि मांडिली विघडणी ॥ ह्मणोनि दुःखें आक्रंदोनी ॥ विधात्यालागोनि बोलती ॥ २९ ॥ अहो वचनें सखेद तया ॥ ह्मणती अरे विधातिया॥कांहीं च नाहीं तुजला दया॥परम निर्दया बालिशा ॥ ३० ॥ तुझें कैसें हें मूर्खपण ॥ कृष्णमैत्री संयोजून ॥प्रणय[4]भावें स्नेहवर्धन ॥ पुन्हा विघडण आदरिलें॥ ॥ ३१ ॥ जारप्रेमाचें जें मैत्र ॥ तेथील रहस्य परम विचित्र॥ दुरावूनि स्वपतिपुत्र ॥ चित्तें स्वतंत्र तन्निष्ठ ॥

---

१ लज्जारहित. २ कुशलपणा. ३ अच्युताचे ठायीं मन ज्यांचें त्या. ४ प्रीति.

॥३२॥ माता पिता बंधु बहिणी ॥ सासू स्वशुर भावे वाहिनी ॥ गुह्य नवदवे त्यांलागोनी ॥ जाराकर्णीं तें वदिजे
॥ ३३ ॥ व्याही जांवई सोइरे ॥ चुलते मामे आप्त सारे ॥ त्यांतें दुरावूनि अंतरें ॥ गुह्य उत्तरें जारेंसीं ॥३४॥
सामान्य जाराची हे कथा ॥ हा तों केवळ मन्मथजनिता ॥जारभावें वेधिलें चित्ता ॥ अन्यवार्ता विसरलों॥३५॥
कृष्णीं वेधूनि गेलीं चितें ॥ प्रिय नवाटे कृष्णापरतें ॥ कृष्णा वेगळें स्वहितकर्त्तें ॥ नसे त्रिजगातें धुंडितां
॥ ३६ ॥ श्रीकृष्णाचें तोषे मन ॥ तैसें करणें हिताचरण ॥ आमुचें स्वहित जाणोनि कृष्ण ॥ स्वयें आपण सं-
पादी॥३७॥कृष्ण जाणों मनींचा भाव ॥ कृष्ण आमुच्या जिवाचा जीव॥ त्याच्या स्नेहाचें लाघव ॥ कोणा अपूर्व
वदवेल ॥३८॥ कृष्णावेगळें आमुचें जिणें ॥ शुष्कतृणरजाहूनिही उणें ॥ श्रीकृष्णाच्या अंगीकरणें ॥ ब्रह्मांड गणने
नगणूं पैं ॥ ३९ ॥ कृष्णावीण ग्रास नगिळे ॥ कृष्णावीण तृषा नवोळे ॥ कृष्णावीण शरीर नचळे ॥ नेत्र आंध-
ळे हरिविरहें ॥ ४० ॥ घ्राण परिमळा कृष्णाविण ॥ नेणे त्वगिंद्रिय संस्पर्शन ॥ कृष्णावांचूनि नेणती श्रवण ॥
शब्दीं विवरण अर्थाचें ॥ ४१ ॥ शून्य कृष्णावीण संसार ॥ वाटे सर्वत्रही हुर्हुर ॥ अनोळख इंद्रियां उपचार ॥
कृष्णीं अंतर पडतांची ॥ ४२ ॥ ऐशा आह्मी कृष्णपरा ॥ स्नेहें मैत्रें प्रेमसुभरा[2] ॥ आतां विघडितां निष्ठुरा ॥
द्रव अंतरा कैंवि नये ॥ ४३ ॥ असो आमुची ऐसी कथा॥प्राणिमात्रा देहवंता ॥ मैत्र योजूनि पुन्हा विघडितां ॥
करुणा चित्ता नये तुझिया ॥ ४४ ॥ भणगा वाढूनि दिव्यान्नभाणें[4] ॥ पुन्हा जैसें हिरोनि नेणें ॥ तैसें अतृप्ता वि-
घडणी करणें ॥ हें दूषण तव आंगीं ॥ १४५ ॥ बाळ मांडोनि खेळ मोडी ॥ किंवा मैत्री लावोनि विघडी ॥ तैसी
तुझी बोखटी[3] खोडी ॥ बोलों उघडी तैं ऐक ॥ ४६ ॥

---

१ भागतनाहीं. २ प्रेमानें पूर्ण झालेल्या. ३ वाईट. ४ दिव्यान्नाचीं पात्रें.

यस्त्वंप्रदर्श्यासितकुंतलावृतंमुकुन्दवक्रंसुकपोलमुन्नसम् ॥
शोकापनोदस्मितलेशसुंदरंकरोषिपारोक्ष्यमसाधुतेकृतम् ॥ २० ॥

॥ टीका ॥ विधात्या हें तुझें गर्हित[1] कर्म ॥ श्रीकृष्णाचें वदनपद्म ॥ आमुच्या नेत्रांसि करूनि सुगम ॥ पुन्हा दुर्गम करिसी पैं ॥ ४७ ॥ कैसें कृष्णाचें वदनकमळ ॥ ऐका तेथींचा विशेष मेळ ॥ जयावरी विखुरले कृष्णकुन्तल ॥ प्रभा घननीळ लावण्य ॥ ४८ ॥ गंडमंडित कुन्तलकांति ॥ तरळ कुन्तल झळकताती ॥ आकर्ण नयन मीनाकृति ॥ उन्नत नासिका मिरवतसे ॥ ४९ ॥ लेशमात्र मंदस्मित ॥ चंचल अपांग विलासयुक्त ॥ भ्रूविक्षेपें प्रमदाचित्त ॥ चोरूनि नेत चारुत्वें ॥ १५० ॥ कोटिक्षणदापतींचें[2] लोण ॥ उतरूनि पाहिजे सुंदरवदन ॥ अनंतजन्मींचा शोकशीण ॥ जाय हारपोनि तत्काळ ॥ ५१ ॥ तें हें दावूनि आह्मांप्रति ॥ वियोगें लपविसी कां मागुती ॥ ऐसी तुझी असाधुमति ॥ निर्दय चित्तीं तूं एक ॥ ५२ ॥ पुन्हा ह्मणती विधातियासी॥तूं दत्तापहारी परम दोषी ॥ दत्तापहरण कैसें ह्मणसी ॥ तरी ते विषीं अवधारीं ॥ ५३ ॥

क्रूरस्त्वमक्रूरसमाख्ययास्मनश्चक्षुर्हिदत्तंहरसेवताज्ञवत् ॥
येनैकदेशेऽखिलसर्गसौष्ठवंत्वदीयमद्राक्ष्मवयंमधुद्विषः ॥ २१॥

॥ टीका ॥ देऊनि पुन्हा हरण करणें ॥ ऐसीं क्रूराचीं लक्षणें ॥ क्रूराविण निर्दयपणें ॥ ऐसें करणें नकरवे ॥ ५४ ॥ कपटें घेऊनि अक्रूरनामा ॥ आलासि दत्तापहरण[3]कामा ॥ चक्षु हरूनि आंधळें आह्मां ॥ करितां नामा वैय[4]-

---

१ निंद्य. २ चंद्रांचें ३ दिलेली वस्तु हिरावून घेणें. ४ व्यर्थपणा.

र्य ॥ ५५ ॥ अमंगळासि मंगळ अभिधान ॥ कीं राक्षसा ह्मणिजे पुण्यजन ॥ जिच्या उदयीं अकल्याण ॥ते कल्याणी रवितनया ॥ ५६ ॥ वत्सानामींचें नामामृत ॥ वाळुवे शर्करा संकेत ॥ अजाभिधानें बोलिजे बस्त ॥ वृथा तद्वत तव नाम ॥ ५७ ॥ जैसा निषिद्ध पुरीषक्षार ॥ तयासि ह्मणती नवसागर ॥ दत्तापहारी जो तूं क्रूर ॥ वृथा अक्रूर ह्मणविसी ॥ ५८ ॥ तुह्मांसि देऊनि काय म्यां हरिलें ॥ जरी तूं पुससी येणें बोलें ॥ अमुचें चक्षुर्हरण कां मांडिलें ॥ अक्रूररूपें येऊनी ॥ ५९ ॥ ह्मणसी अक्रूर नेतो कृष्णा ॥ तुमच्या नकरीं चक्षुर्हरणा ॥ तरी कृष्णरूपामाजि त्रिभुवना ॥ देखों नयना माजिवड्या ॥ १६० ॥ तुझें सुष्ठु सृजनकृत्य ॥ कृष्णरूपीं देखों समस्त ॥ तो नेतांचि चक्षूरहित ॥ झालों निश्चित विधात्या ॥ ६१ ॥ तुझें सृष्टीचें कौशल्य सारें ॥ कृष्णरूपींच पाहों नेत्रें ॥ यालागीं त्वां विषादसूत्रें ॥ कपट मैत्रें आदरिलें ॥ ६२ ॥ त्रिजगच्चक्षु श्रीकृष्णनाथ ॥ अक्रूररूपें तद्धरणार्थ ॥ द्वेषें पातलासि तूं येथ ॥ चक्षूरहित करावया ॥ ६३ ॥ कृष्णरूप जो कां नेत्र ॥ त्यामाजी मम सृष्टि सर्वत्र ॥ गोपींसी कळली ह्मणोनि क्रूर ॥ अमित्र बुद्धि त्वां हरिली ॥ ६४ ॥ कृष्णवियोगें आमुचे डोळे ॥ होती स्वभावें आंधळे ॥ सहजांचे सृष्टिसौष्ठवं नकळे ॥ ऐसिये लीले आदरिसी ॥ ६५ ॥ ऐसें तुझें हें दौर्जन्य ॥ अक्रूरत्वीं क्रूरपण ॥ आमुचें करिसी चक्षूहरण ॥ मूर्खा समान तव बुद्धि ॥ ६६ ॥ ऐसिया विधातयासि खेदें ॥ गोपी निंदिती बहुधा शब्दें ॥ यानंतरें मिथानुवादें ॥ वदती खेदें तें ऐका ॥ ६७ ॥

ननंदसूनुःक्षणभंगसौल्हृदःसमीक्षतेनःस्वकृतातुराबत ॥
विहायगेहान्स्वजनान्सुतान्पतिंस्तद्दास्यमद्धोपगतानवप्रियः ॥ २२ ॥

---

१ मनुष्याच्या मलापासून उत्पन्न झालेला क्षार. २ सृष्टीचें सौंदर्य.

॥ टीका ॥ खेदें ह्मणती अहो बाई ॥ नंदपुत्र हा कैसा काई ॥ क्षणभंगुर स्नेहनवाई ॥ याच्या ठायीं वर्ततसे ॥ ६८ ॥ याचें सुहृदत्व क्षणभंगुर ॥ नेणे स्वरतांचें[1] अंतर ॥ कार्या पुरता प्रेमादर ॥ नोहे स्थिर सौजन्यें ॥ ६९ ॥ मनीं नविचारी हा कां गे॥ आमुतें भुलवोनि स्नेहापांगें ॥ वश करूनि लागवेगें ॥ आमुचीं अष्टांगें कवळिलीं ॥७०॥ मजसाठीं या झाल्या आतुरा[2] ॥ ऐसें नकळे कां या चतुरा॥ आह्मी सांडूनियां स्वसंसारा ॥ झालों तत्परा दास्यत्वीं ॥ ७१ ॥ पतिसुतसदनें स्वजन आप्त ॥ शरीरसुखभोग समस्त॥त्यागूनि झालों भवविरक्त ॥ चित्तें आसक्त या केलीं ॥७२॥ आह्मी याच्याचि मुरलीगानें ॥ नेत्रकटाक्षें स्मितभाषणें ॥ गतिगौरवें तनुलावण्यें ॥ तनुमनप्राणें वेधलों ॥ ७३ ॥साक्षात् याच्याचि दास्यासाठीं॥आह्मीं केली संसारतुटी। ॥हा कां जाण नव्हे पोटीं ॥ प्रीति उफराटी कां याची ॥ ७४ ॥ नव्या नव्यांतें प्रीति धरी॥ पहिल्या विरहा वरपडें करी ॥ आह्मां दुःखितां सांडूनि दुरी ॥ कैसा मधुपुरीं जाईल ॥७५॥ यासि राहवूं धरूनि पदरीं ॥ ऐसिया भावें गोपनारी ॥ बोलती ईर्ष्येंच्या उत्तरीं ॥ तेंचि चतुरीं परिसावें ॥ ७६ ॥

सुखंप्रभातारजनीयमाशिषःसत्याबभूवुःपुरयोषितांध्रुवम् ॥
याःसंप्रविष्टस्यमुखंव्रजस्पतेःपास्यंत्यपांगोत्कलितास्मितासवम् ॥ २३ ॥

॥ टीका ॥ ईर्ष्या ह्मणिजे सापत्नदुःख ॥ स्मरूनि करिती विरहें शोक ॥ पुरजनवनितांसि होईल हरिख ॥ सपत्नी मुख्य त्यां ह्मणती ॥ ७७ ॥ मथुरेच्चिया वनितांप्रति ॥ आजि उत्तम शकुन होती ॥ शुभसूचकें स्वप्नें

---

[1] आपलेठायीं आसक्त झाले यांचें. [2] दुःखपीडित.

सतीं ॥ त्या देखती बहुतेक ॥ ७८ ॥ त्यांचे लवत असती नयन ॥ भुजा मांडिया करिती स्फुरण ॥ प्रभाते अंगणीं पक्षिगण ॥ लाभ दर्शनें सुचविती ॥ ७९ ॥ आजिची रजनी नागरां[1] अबलां॥ सूचक होईल महाफळा ॥ प्रभाते भोगिती सुखसोहळा ॥ अमृत डोळां प्राशुनी ॥ ८० ॥ तीर्थें व्रतें तपें दानें॥ अनेकजन्मार्जितें[2] पुण्यें ॥ आणि भल्यांचीं आशीर्वचनें ॥ सत्य संपूर्ण त्यां जालीं ॥ ८१ त्यांचे मनोरथ झाले पूर्ण ॥ त्यांसि अमृतें उगवला दिन ॥ आह्मी झालों अवलक्षण[3] ॥ ह्मणोनि कृष्ण अंतरला ८२॥ नागरां नारींसि लाभ कोण॥ ऐसें कल्पील अंतःकरण॥तरी कृष्णमुखाचें अमृतपान ॥ त्यांचे नयन करितील ॥८३ ॥ कृष्ण व्रजप[4] त्रिजगीं श्रेष्ठ ॥ मथुरे होतांचि प्रविष्ट ॥ त्याचें वदनारविंद[5] स्पष्ट ॥ पाहती तन्निष्ठ[6] होऊनी ॥ ८४ ॥ जया मुखकमळाच्या ठायीं ॥ परमामृताची सुरसायी[7] ॥ ललितस्मितापांगें हृदयीं ॥ नेती लवलाहें प्राशुनी ॥ ८५ ॥ व्रजपतीचें वदन स्मेर[8] ॥ ललितापांगें आनंदप्रचुर ॥ आसव ह्मणिजे मादकतर ॥ नेत्रीं सत्वर ज्या पिती ॥ ८६॥ ऐसी ईर्ष्येची कल्पना ॥ पुढती काय तर्किती मना ॥ तें परियेसीं कुरुनंदना ॥ इरारमणा[9] परीक्षिति ॥ ८७ ॥ गोपी ह्मणती आह्मी हरि ॥ भाग्यें भोगिला आजिवरी ॥ जरी गेला मथुरापुरीं ॥ तरी परतूनि येईल ॥ ८८ ॥ त्याचीं येथें मातापितरें ॥ सुहृद ज्ञाति प्रेमपात्रें ॥ आणि आमुच्या स्नेहसूत्रें ॥ आकर्षूनि आणिजेल ॥ ८९ ॥ एक दोनी कीं त्रिरात्र ॥ पुरवनितांचें घडल्या मैत्र ॥ कैंवि आमुचें स्नेहसूत्र ॥ भंगू शके हें नह्मणा गे ॥ ९०॥

---

[1] मथुरानगरांतील. [2] पुष्कळ जन्मीं संपादिलेलीं. [3] हतभाग्य. [4] गोकुलपति. [5] मुखकमल. [6] त्याच्या मुखाच्या ठिकाणीं आसक्त. [7] सरसपणा. [8] हास्ययुक्त. [9] पृथ्वीपते.

तासामुकुन्दोमधुमंजुभाषितैर्गृहीतचित्तःपरवान्मनस्व्यपि ॥
कथंपुनर्नःप्रतियास्यतेऽबलाग्राम्याःसलज्जास्मितविभ्रमैर्भ्रमन् ॥ २४ ॥

॥ टीका ॥ ऐका सखिया हो रहस्य ॥ नागरी वनितांचा विलास॥कटाक्ष विभ्रम सलज्ज हास॥कृष्णचित्तास मोहिती ॥ ९१ ॥ त्यांच्या मधुरोक्तींचे पाश ॥ गमती माधुर्यें पीयूष ॥ मंजुळपणें कोकिळांस ॥ लाजविती तंतुत्वें ॥ ९२ ॥ चातुर्यरचनेचिया परी ॥ क्षीराब्धिसंभवा ज्या अप्सरी ॥ त्यांहूनि चतुरा या नागरी॥ मोहिती हरी चातुर्यें ॥ ९३ ॥ विरक्त योगी तपस्वी हठी ॥ निग्रहें बैसले गिरिकपाटीं ॥ ऐसियांतेंही अप्सरादृष्टि ॥ वेधूनि सृष्टी नाचविती ॥ ९४ ॥ मा हा तो परम कामासक्त ॥ ग्राम्या आभीरवनिताभुक्त ॥ याचें नागरी मोहिती चित्त॥ मग निवृत्त हों नशके ॥ ९५ ॥ जरी हा नंदादिकाधीन ॥ आणि सखेही येथ बहुत जण ॥ तथापि नागरीं वेधिल्या मन ॥ येथ परतोन नयेहा ॥ ९६ ॥ जैसा गोरक्ष जालिया भूप ॥ तो पूर्वस्नेहा करूनि लोप ॥त्यागी स्वजन मायबाप ॥ रतिलोलुप तैसा हा ॥ ९७ ॥ आह्मी पशुपी गे रानटा ॥ अजादिपशुपाळिणी घुरटा ॥ कर्कशकर्में तनु जरबटा ॥ संग वोखटा पैं आमुचा ॥ ९८॥ जेंवि दुःष्काळीं अन्नाविणें॥क्षुधार्त मानव सेविती तृणें॥ त्यांसि जोडलिया दिव्यान्नें ॥तृणभक्षणें लाजती ॥९९॥ जऱ्ही मनस्वी धीर[3] स्वतंत्र॥तथापि दुर्गम स्त्रीचरित्र ॥ कटाक्षमात्रें वेधोनि नेत्र ॥ करिती पात्र मोहाचें ॥ २००॥ मत्तमानिनी मन्मथबाणें ॥कामुकां घेती जीवें प्राणें॥ बांधोनियां रतिसुखगुणें ॥ स्वाधीनपणें वर्तविती ॥ १ ॥ तेथोनि कैसा परतों शके ॥ आमुचीं काय त्या स्मरती

---

१ क्षीरसमुद्रापासून जन्म ज्यांचे त्या. २ विषयसुखासक्त. ३विषयप्राप्तीनें मनोविकार न पावणारा.

सुखें ॥ आह्मी नतुलों त्याचेनि तुके[1] ॥ स्मरकौतुकें अविदग्धा[2] ॥ २ ॥ आजि आमुचा सुखसोहळा ॥ होईल मथुरे माजी सकळां ॥ भाग्योदय त्यांचियां निढळा ॥ आमुच्या कपाळा निष्फळता ॥ ३ ॥

अद्यध्रुवंतत्रदृशोभविष्यतेदाशार्हभोजांधकवृष्णिसात्वताम् ॥
महोत्सवःश्रीरमणंगुणास्पदंद्रक्ष्यंतियेचाध्वनिदेवकीसुतम् ॥ २५ ॥

॥ टीका ॥ आजि तेथें मथुरापुरीं ॥ दाशार्हादि समस्तां गोत्रीं ॥ उत्साह भोगिजेल सर्वत्रीं ॥ पाहतां नेत्रीं कृष्णातें ॥ ४ ॥ दाशार्हकुळीं उद्धवादिक ॥ भोजीं उग्रसेनप्रमुख ॥ वृष्णिकुळींचे समस्त लोक ॥ पावती सुख हरि पाहतां ॥ ५ ॥ कंकादिक कुकुरमेळीं ॥ सात्वतश्वफल्कमंडळी॥अंधक माधव यादवकुळीं ॥ उत्साह सकळीं भोगिजे ॥ ६ ॥ आणि मार्गीं जातां देखती जे जे ॥ तेही नाचती आनंदें मौजे ॥ कवण्या लाभें तें ऐकिजे ॥ बरवें वोजें चतुरांहीं ॥ ७ ॥ लक्ष्मी शोभा नपवे स्वगुणीं ॥ ह्मणोनि ज्याची जाली रमणी ॥ अनंत सद्गुणांची खाणी ॥ देखोनि नयनीं त्या हरितें ॥ ८ ॥ देवकीसुतातें पाहतां डोळां ॥ दृष्टीसि होईल सुखसोहळा ॥ धन्य मथुरेचिया अबळा॥नयनें घननीळा[3] प्राशिती ॥ ९ ॥ असो तेथींचा परमानंद ॥ स्मरतां वृद्धि पावे खेद॥ अक्रूरा निंदेचे वदती शब्द ॥ तेचि विशद[4] परिसा हे ॥ १० ॥

मैतद्विधस्याकरुणस्यनामभूदक्रूरइत्येतदतीवदारुणः ॥
योऽसावनाश्वास्यसुदुःखितंजनंप्रियात्प्रियंनेष्यतिपारमध्वनः ॥ २६॥

---

१ तुलनेला. २ अचतुरा. ३ घनाप्रमाणें नीळ. ४ स्पष्ट.

॥ टीका ॥ ऐसें याचें क्रूर कर्म ॥ आणि या शोभन अक्रूर नाम ॥ कोण ठेवित होता अधम ॥ तो मूर्ख परम अविवेकी ॥ ११ ॥ नाम नशोभे या सर्वथा ॥ किमर्थ ते ऐका कथा ॥ निर्दय निष्ठुर क्रूर पुरता ॥ याहूनि कोणी असेना ॥ १२ ॥ अत्यंत दारुण हा घातक ॥ अक्रूर नामा मिरवी ठक ॥ क्रिया पाहतां जैसें विख ॥ पक्कान्नपगें जीव घेणें ॥ १३ ॥ प्रणांहुनी प्रियतम श्रीकृष्ण ॥ विघडूनि नेतो हा निर्घृण ॥ दृष्टिगोचर मार्गाहून॥पार लंघून दुरंत ॥ १४ ॥ कृष्णा नेतां दूरतर ॥ प्राण सोडिती शरीर ॥ ऐसा आह्मांसि दुःखभर ॥ परि त्याचें अंतर द्रवेना ॥ १५ ॥ कृष्णवियोगें दुःखित जन ॥ काढूनि नेतो त्यांचा प्राण ॥ कांही नकरी समाधान ॥ क्रूर दारुग यमाहूनी ॥ १६ ॥ ऐसिया क्रूरा अक्रूरनाम ॥ कोण ठेवित होता अधम ॥ द्रवों शके अंतक[2] यम॥पारि विषम हा क्रूरत्वें ॥ १७ ॥ पुन्हा ह्मणती या काय बोल ॥ आमुचेंचि प्रारब्ध झालें विफळ ॥ ह्मणोनि उदेला हा काळ ॥ कृष्णही केवळ द्रवेना ॥ १८ ॥ धिक्कार आमुच्या जीवितासी ॥ ह्मणोनि रुदती उकसाबुकसी॥ दुःखें करिती वितर्कासी ॥ तें रायासि शुक सांगे ॥ १९ ॥

अनार्द्रधीरेषसमास्थितोरथंतमन्वमीचत्वरयंतिदुर्मदाः
गोपाअनोभिःस्थविरैरुपेक्षितंदैवंचनोऽद्यप्रतिकूलमीहते ॥२७॥

॥टीका ॥ अगे हा कृष्णचि निष्ठुर ॥ हृदयीं न द्रवेचि अणुमात्र ॥ देखोनि याची बुद्धि कठोर ॥ उपेक्षापरं वृद्धहि या ॥ २० ॥ नधरी ओलावा अंतरीं॥उद्धव चढतां रथावरी ॥ वृद्धें दुखविल्या अनादरीं ॥ मग किमर्थ वारी कोण या ॥ २१ ॥ भंगल्या वृद्धांचें अंतर ॥ मग ते सहजचि उपेक्षापर ॥ येर गोप ते दुर्मंदतर ॥ जाती

---

१ ज्याला अंत नाहीं तो. २ नाश करणारा. ३ निष्ठुर. ४ हायगय करणारे. ५ मदोन्मत्त.

सत्वर शकटेंशीं ॥ २२ ॥ दैव होकां सानुकूळ ॥ कृष्णसंगें हा दुर्मदमेळ ॥ जातो यावरी वीजकंल्लोळ ॥ पडोनि मरो पैं एखादा ॥ २३ ॥ महाविघ्नांचा संघात ॥ यांवरी पडो गे अकस्मात ॥ किंवा घडो शकटघात ॥ कीं डंखो ।निश्चित महासर्प ॥ २४ ॥ महाविघ्नें या दुर्मदांत ॥ एखादा जरी पावे मृत्य ॥ त्या तरी अपशकुनें कृष्णनाथ ॥ राहता येथ निश्चयें ॥ २५ ॥ परि आमुचें दैव कुडें ॥ तरी या कांहींच वोखटें नघडे ॥ ह्मणती मृत्यु आले रोकडे ॥ बोटें कडाडें मोडिती ॥ २६ ॥ मग परस्परें धिवसा धरिती ॥ कृष्णा वृद्ध न राहविती ॥ तरी लज्जा सांडोनि द्या गे परती ॥ चाला निश्चिती राहवूं या ॥ २७ ॥

निवारयामःसमुपेत्यमाधवंकिन्नोऽकरिष्यत्कुलवृद्धबान्धवाः ॥
मुकुंन्दसंगान्निमिषर्धदुस्त्यजाद्दैवेनविध्वंसितदीनचेतसाम् ॥ २८ ॥

॥ टीका ॥ निषेधूं जातां सर्वांपुढें ॥ जारसौहार्द पडेल उघडें ॥ हें भय ठेवूनि एलीकडे ॥ चाला निवाडें या वर्जूं ॥ २८ ॥ लज्जा सांडूनि दीर्घप्रयत्ना ॥ चढोनि ह्मणती सुहृदा जना ॥ शंकोनि मुकिजे किमर्थ प्राणा ॥ नयेचि करुणा कोणासी ॥ २९ ॥ बंधुवर्गसुहृदाभेणें ॥ लज्जेसाठीं प्राण देणें ॥ तरी तें कृष्णवियोगें मरणें ॥ आह्मां कारणें आलींच कीं ॥ ३० ॥ बंधुवर्ग काय करिती ॥ कायसी त्यांच्या भयाची खंती ॥ मथुरे गेलिया श्रीपति ॥ विरहावर्तीं पडलों गे ॥ ६१ ॥ मुकुंद केवळ सुखनिधान ॥ तत्संग दुस्त्यज प्राणांहून ॥ आह्मां विघडणी त्यापासून ॥ अर्धक्षण न सोसवे ॥ ३२ ॥ मुकुंदसंगा जेव्हां विघडी ॥ तेव्हांचि चित्तें होती वेडीं ॥ दीन अनाथें बापुडीं ॥ भणगें बराडी भासती ॥ ३३ ॥ जैं अंतरला मुरलीधर ॥ तैं हें शरीर भूमिभार ॥ आह्मां नडंखी विखार ॥ मृ-

---

१ वेगाचा झोत. २ दंश करो. ३ खोटें ४ धैर्य. ५ निवाडं.

त्यु समोर नये गे ॥३४॥ मागतांही मरण नये ॥ बंधुवर्गाचें केंतुलें भय॥आमुचें जिणें वांचूनि काय॥यशोदातनय विघडलिया ॥ ३५ या लागीं अवघ्या होऊनि धीटा ॥ कृष्ण लागतां मथुरे वाटा ॥ वोढा धरूनि बाहुवटा ॥ दवडा खोटा अक्रूर हा ॥ ३६ ॥ बंधुवर्गीं निर्लज्ज उद्धटे ॥ सोसूंजारपैं शून्यबोट ॥ परी कृष्णवियोगाचे कष्ट॥ याहूनि दुर्घट न सोसती ॥ ३७ ॥ यालागीं आतांचि निःशंक होणें ॥ आणिक कृष्णातें निवारणें ॥ नातरी तत्कृतक्रीडास्मरणें ॥ आलीं मरणें नमरतां ॥ ३८ ॥ मरण बरवें एके घायीं ॥ परि तें दुःख नसोसे देहीं ॥ हृदय फुटोनि होते लाही ॥ तें लवलाही परिसा गे ॥ ३९ ॥

यस्यानुरागललितस्मितवल्गुमंत्रलीलाऽवलोकपरिरंभणरासगोष्ठयाम् ॥
नीताःस्मनःक्षणमिवक्षणदाविनातंगोप्यःकथंन्वतितरेमतमोदुरंतम् ॥ २९ ॥

॥ टीका ॥ ज्याचे सप्रेमसुललितपणें ॥ भ्रूविभ्रमें हास्य करणें ॥ त्याच्या स्मरण मात्रें मरणें ॥ कीं जीवें प्राणें तळमळिजे ॥ ४० रासक्रीडासभास्थानीं हास्यवदनें चक्रपाणि ॥ रतिरहस्यगोष्ठी वाणी ॥ बोलिला त्या आठवती ॥ ४१ ॥ त्या शब्दांची चातुर्यता ॥ नेत्रकटाक्ष तनुइंगिता ॥ क्षेमालिंगनचुंबन स्मरतां ॥ केंवि जीविता सांवरवे ॥ ४२ ॥ ज्याचे सुस्निग्ध[3] अपांगपात ॥ रासविलासी सभे आंत ॥ कृष्णें केला जो एकांत ॥ तो कें चित्त विसरेल ॥ ४३ ॥ क्षणा समान क्षणदा[4] तेथें॥आह्मीं क्रमिल्या ज्याच्या सुरतें ॥ त्याच्या वियोगें कैशा येथें ॥ धरूं प्राणांतें सखिया हो ॥ ४४ ॥ प्रियतमाचा विरह घोर॥ केवळ दुःखाचा सागर॥कीं तें अंधतम अपार

---

१ कोठचें. २ जारसंबन्धी चहाड्यांनीं होणारी अमर्यादा. ३ अतिप्रेमभरित. ४ रात्रि.

॥ कैंवि परपार पावों गे ॥ ४५ ॥ असो अंधतम निस्तरणें ॥ रोकडेंचि वियोगमात्रें मरणें ॥ गोचारणें गेलिया कृष्णें ॥ ह्मणाल विघडणें साहतसों ॥ ४६ ॥ आमुचा वियोगें जाईल प्राण ॥ ह्मणोनि अंतरीं कळवळोन॥ कैसें करी प्राणतर्पण ॥ तें संपूर्ण परिसा गे ॥ ४७ ॥

योऽह्नःक्षयेव्रजमनंतसखःपरीतोगोपैर्विशन्खुरजश्छुरितालकस्रक् ॥
वेणुंक्वणन्स्मितकटाक्षनिरीक्षणेनचित्तंक्षिणोत्यमुमृतेनुकथंभवेम ॥ ३० ॥

॥ टीका ॥ आमुचे ग्लानी उताविळा ॥ परते लक्षूनि सायंकाळा विष्णुसंगें सुरमुनिपाळा॥ तेंवि गोपाळवत्सेसीं ॥ ४८ ॥ गोवत्सांचे जे खुररज ॥ पुढें हाकितां उधळती सहज ॥ तेणें धूसर कुंतळपुंज[1] ॥ सबर्हस्रजं[2]मुखकांति ॥ ४९ ॥ आधींच लावण्य तनु सुनीळ ॥ धूसर जैसें अंबर[3] अमळ ॥ धूळी माजी धांवे चपळ ॥ पोटीं कळवळ करुणेची ॥ ५० ॥ धुळी निघोनि धेनुमागें ॥ हळूच येता मंदवेगें ॥ तरी कां माखती अष्टांगें ॥ प्रेमळ प्रसंगें रज सोसी ॥ ५१ ॥ ऐशा व्रजा माजीं सांजे ॥ अनुदिनीं प्रवेशे डवरला[4] रजें ॥ तैं गोपीनयनचकोरें बिजे ॥ चंद्रदर्शनें जीव धरिती ॥ ५२ ॥ व्रजीं प्रवेशलियावरी ॥ ललितस्मितवक्त्रें श्रीहरि ॥ ईक्षणमात्रें मानस हरी ॥ तें अमृतलहरीं सम वाटे ॥ ५३ ॥ आणि अमृतातेंही लाजवी ॥ कैवल्यसुखासी आणी उणवी ॥ तेणें वेणुक्वणनें निववी ॥ मृता जीववी विरहिणी जो ॥ ५४ ॥ तो मथुरे गेलिया तैसा पुढती ॥ नयेतां आमुची कवण गति ॥ त्याविण जीवितें कैंवि राहती ॥ हें निश्चिती सांगा गे ॥५५॥ कृष्णावांचूनि आमुचें

---

[1] कुटिल केशांचा समूह. [2] मयूरपिच्छें आणि माला यांसह. [3] आकाश. [4] प्रफुल्लित झालेला.

जिणें ॥ क्षणमात्रही राहों नेणे ॥ कृष्णवियोगें आलीं मरणें ॥ ह्मणोनि करणें विलपती ॥ ५६ ॥ शुक ह्मणे गा परीक्षिति ॥ अलौकिक गोपींची सप्रेम भक्ति ॥ अव्यभिचारें[१] कमलापति ॥ व्यभिचारमति भजिन्नल्या ॥ ५७॥ ह्मणोनि दुर्लभ आह्मां तुह्मां ॥ गोपिकांचा भाग्यमहिमा॥ ज्या अनुसरल्या मेघश्यामा ॥ पतिसुतधामा विसरोनी ॥ ५८ ॥ कृष्ण जातो हें ऐकूनि राती ॥ ऐशा अनेक कल्पना करिती ॥ लज्जा सांडूनि दीर्घ रुदती॥ परिसें नृपति तें आतां ॥ ५९ ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ एवंब्रुवाणाविरहातुराभृशंव्रजस्त्रियःकृष्णविसक्तमानसाः ॥
विसृज्यलज्जांरुरुदुःस्मसुस्वरंगोविंददामोदरमाधवेति ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ एवं पूर्वोक्त प्रकारें करून ॥ विरहें संतप्त गोपीगण ॥ मानसें झालीं कृष्णप्रवण[२] ॥ करिती रुदन दीर्घस्वरें ॥ ६० ॥ लज्जा सांडूनियां दुरी ॥ कृष्णविरहें दुःखभारीं ॥ रडती आक्रोशें सुस्वरीं ॥ व्रजसुंदरी कुरुवर्या ॥ ६१ ॥ कृष्णीं मानसें जडोनि ठेलीं ॥ विरहदुःखें लज्जा गेली ॥ जैसी पूर्वी क्रीडा केली ॥ ते वदती भुलीमाजिवड्या ॥ ६२ ॥ श्रीगोविंदा जय गोपति ॥ आह्मी तुझिया वेणुगीतीं ॥ भोगिली कैवल्यसुखसंपत्ति ॥ ते कैं पुढती देखों पां ॥ ६३ ॥ कृष्णा तुझिया अवलोकनें॥आमुची विश्रांति पावती मनें॥योगयजनें[३] तपःसाधनें ॥ तें सुख कोणीं नभोगिजे॥६४॥कृष्णा तुझिये रासस्थानीं॥आह्मीं भोगिल्या ज्या ज्या रजनी॥ तव वियोगें त्या कोठोनी ॥ पुढती नयनीं देखों पां ॥ ६५ ॥ कृष्णा तुझिया आलिंगनें ॥मनें जालीं जियें उन्मनें ॥

---

[१] अनन्यभावें. [२] कृष्णानुरक्त. [३] योग ह्म॰ ईश्वरचिंतनाविषयीं मन स्थिर करणें.

तीं काय विषयरूपें वमनें ॥ पुन्हा सेवनें करिती पैं ॥ ६६ ॥ तव करकमळें निविजे कुचीं ॥ तव चुंबनें वदना रुचि ॥ तव भाषणा पुढें साची ॥ अमृताची चवी लोपे ॥ ६७ ॥ तुझिया विनोदरहस्यगोष्ठी ॥ आठवताती आमुच्या पोटीं ॥ विरहदुःखें होऊं कष्टी ॥ पुन्हा दृष्टी कैं पडसी ॥ ६८ ॥ कृष्णा तुझिया संगाविणें ॥ वृथा झालें आमुचें जिणें ॥ केलें क्षणभंगुर साजणें ॥ लाजिरवाणें सुहृदांत ॥ ६९ ॥ सणगीं वृश्चिकें[1] डंखिला चोर ॥ कीं विदेशीं गेलिया प्रियतम जार ॥ दुःखें करपे जरी अंतर ॥ तरी बाहेर नुमसवे[2] ॥ ७० ॥ कृष्णा तुझेनि प्रियतम मैत्रें ॥ आह्मीं सांडिलीं स्वकुलगोत्रें ॥ अंतीं विरहदुःखाचीं पात्रें ॥ होवोनि चरित्रें स्मरतसों ॥ ७१ ॥ कृष्णा तुजवीण दाही दिशा ॥ शून्य झालिया आह्मां कैशा ॥ जेंवि क्षेम[3] देतां आकाशा ॥ नपुरे आशा अणुमात्र ॥ ७२ ॥ मोहें कवळों जातां झाडें ॥ निघती सर्वांगीं वरबडे ॥ तैसें निष्ठुर जग कोरडें ॥ तुझेनि पाडें[4] कवळीतसों ॥ ७३ ॥ माता नेदी तव सुखरति ॥ मा इतरां पितरां सुहृदीं आप्तीं ॥ कैंची तव स्नेहाची प्रीति ॥ ह्मणोनि चित्तीं झुरतसों ॥ ७४ ॥ कीं जारपुरुष पृथ्वीवरी ॥ थोडे असती घरोघरीं ॥ परी आह्मां ऐशा जारिणी नारी ॥ सहसा घोरीं नपडती ॥ ७५ ॥ वियोग होतां त्या अन्यत्र ॥ सवेंचि जोडिती जारमैत्र ॥ तैसें नोहे तव चरित्र ॥ निजात्मतंत्र केलें रे ॥ ७६ ॥ तस्कर हिरोनि नेती वसनें ॥ पुन्हा घेइजेती नूतनें ॥ तुवां हिरोनि नेलीं मनें ॥ तीं नूतनें नहोती ॥ ७७ ॥ कपटद्या ऐसें जाणतों आह्मी ॥ तरी कां वेधतों तुझिया कामीं ॥ नांदत होतों संसारभ्रमीं ॥ ते त्वां ऊर्मी[5] भंगिली रे ॥ ७८ ॥ तुझे हातींचें सुटतें मन ॥ तरी संसारीं समाधान ॥ ऐसा कोणी नदिसे आन ॥ जो तुजपासून मन मुरडी ॥ ७९ ॥ तुझिया प्रेमें ऐसें झालें ॥ आमुचें मानस हिरोनि नेलें ॥ विरहदुःखा वर्पडें[6] केलें ॥ इतुकें

---

१ विंचवानें. २ न प्रकट करवे. ३ आलिंगन. ४ सादृश्यानें. ५ वेग. ६ प्रविष्ट.

जोडिलें तव मैत्रें ॥ २८० ॥ तव वियोगें पतिसुतसदनें ॥ स्वजन आप्तें धनगोधनें ॥ इहामुत्रादिविषयमानें[1] ॥ केवळ वमनासम गमती ॥ ८१ ॥ कैसें तेथ मानस रमे ॥ कैंवि तोषे भवसंभ्रमें ॥ ऐसें केलें तुझिया प्रेमें ॥ कर्में धर्में पालटलों ॥ ८२ ॥ जैं कामिला[2] तुझा काम ॥ तैंचि बुडालें रूप नाम ॥ शेवटीं झालों अनाथ परम ॥ केवळ वर्ष्म[3] श्रमपात्र ॥ ८३ ॥ अहा कृष्णा काय केलें ॥ स्नेह लावूनियां आपुलें ॥ कैसें निष्ठुर मानस झालें ॥ प्रेम सांडिलें केवीं पां ॥ २८४ ॥ कृष्णा आमुचें पातक काय ॥ जेणें अंतरले तव पाय ॥ तुझेंनि स्मरणें पातक जाय ॥ तरी कां लाहेसम मिडकों ॥ ८५ ॥ अहा कृष्णा मुरलीधरा ॥ अहा मुकुन्दा शाङ्र्गधरा ॥ अहा गोविंदा दामोदरा ॥ अहा श्रीधरा माधवा ॥ २८६ ॥ अमुच्या हृत्पंकजमधुकरा[4] ॥ शशिसमतर्पक नेत्रचकोरा ॥ हा गोविंदा दामोदरा ॥ अहा श्रीधरा माधवा ॥ २८७ ॥ प्रेमळ मानसरसशृंगारा ॥ जगनगकारणमयभांगारा ॥ हा गोविंदा दामोदरा ॥ अहा श्रीधरा माधवा ॥ ८८ ॥ लावण्यसुभगा त्रिजगदाधारा ॥ अहा रे लक्ष्मी प्राणेश्वरा ॥ अहा गोविंदा दामोदरा ॥ अहा श्रीधरा माधवा ॥ ८९ ॥ गोपीवलयविलासचतुरा ॥ गोपीलालनकामातुरा ॥ अहा गोविंदा दामोदरा ॥ अहा श्रीधरा माधवा ॥ ९० कृष्णा कोमळ मानस तुझें ॥ निष्ठुर झालें कोण्या काजें ॥ अंतर पडलें असेल जें जें ॥ तें साहिजे कृपाळुवा ॥ ९१ ॥ करुणा येऊं दे रे तुज ॥ कांहीं आमुचें ऐकें गुज ॥ तुझें नसोडूं चरणांबुज ॥ सांडोनि लाज सर्वे येऊं ॥ ९२ ॥ जरी तूं आह्मां नेदिसी येऊं ॥ तरी तव चरणीं प्राण देऊं ॥ आतां कासया मरणा भिऊं ॥ फुटती जीव तव विरहें ॥ ९३ ॥ अगे हा कृष्ण गेलियावरी ॥ आमुचें काय पां ठेविलें घरीं ॥ तरिशा जाऊं मथुरापुरीं ॥ अक्रूरवैरी मारूं कां ॥ ९४ ॥ मरण बरवें एका घायें ॥ कृष्णविरहें

---

१ ह्या लोकाचीं व परलोकाचीं विषयसुखें. २ इच्छिला. ४ शरीर. ४ हृदयकमलांतील भ्रमरा.

वांचोनि काय ॥ आतां याचे न सोडूं पाय ॥ मग जें होय तें हो कां ॥ ९५ ॥ ऐशा वदती नानापरी ॥ अतिदुःखिता व्रजसुंदरी ॥ लज्जा सांडूनियां दुरी ॥ रडती सुंदरी हरिप्रेमें ॥ ९६ ॥ कृष्ण कवळूनि निजमानसें ॥ अत्यंत दुःख होय जैसें ॥ तैशा तळमळती विरहक्लेशें ॥ दीर्घघोषें आळविती ॥ ९७ ॥ गोविंददामोदर गजरीं ॥ मुकुन्दमाधवनामोच्चारीं ॥ रडती आक्रोशें सुस्वरीं ॥ ढळती नेत्रीं बाष्पाम्भें ॥९८॥ आक्रोशें आणि सुस्वरीं ॥ ह्मणतां विरोध नमानिजे चतुरीं ॥ सुस्वरता ते नामोच्चारीं ॥ येर ते लहरी दुःखोर्मि ॥ ९९ ॥ जैसी सुवर्णाचेनि गुणें ॥ मोलागळीं पादत्राणें ॥ तैसें भगवन्नामस्मरणें ॥ सुस्वर रुदनें मुनि वदला ॥ ३०० ॥ एकएकी सहस्रवरी ॥ दुःखें विलाप करिती नारी॥ पुढें वर्तली कैशी परी ॥ ते अवधारीं कुरुवर्या ॥ १ ॥

॥ स्त्रीणामेवंरुदंतीनामुदितेसवितर्यथ ॥ अक्रूरश्चोदयामासकृतमैत्रादिकोरथम् ॥ ३२ ॥

॥ टीका ॥ ऐसीच समस्त शर्वरी ॥ विरहदुःखें रुदतां नारी ॥ उदया पातला ध्वांतारि ॥ तव अक्रूरें श्रोत्रीं ऐकिलें ॥ २ ॥ ब्राह्ममुहूर्तीं आत्मचिंतन ॥ करितां परिसे निहूल रुदन ॥ मळोत्सर्गार्थ करितां गमन ॥ परिसे रुदन गोपींचें ॥ ३ ॥ मग स्नानार्थ यमुनातीरीं ॥ अक्रूर जातां देखोनि नारी ॥ सरिशा रुदती आर्तस्वरीं ॥ कीं अंतरीं द्रवो हा ॥ ४ ॥ स्नानसंध्या संपे पूर्ण ॥ तंव परिसिलें ललनारुदन ॥ परि नद्रवे अक्रूरमन ॥ काय ह्मणोन तें ऐका ॥ ५ ॥ कृष्ण ठेवूनि गेलिया मज ॥ विषादें क्षोभेल भोजराज ॥ दुष्ट प्रेरूनि भंगील व्रज॥ एक अधोक्षज न नेतां ॥ यास्तव करूनि निष्ठूर मना॥ अनादरूनि रुदत्या ललना ॥ सूर्योदयीं कां संध्यास्नाना॥ संपादू-

---

१ अंधकाराचा शत्रु श्री सूर्य. २ पाहाटेच्या चार घटिका,

नि निघाला॥७॥गोपीविरहविलापगजरीं॥द्रविजे कठोरां गिरिपाथरीं॥सदय सात्वत सद्विचारी॥निष्ठुर करी हृदयातें॥८॥अलोट ठकल्या मर्यादवेळा॥आक्रंदतां आप्तां सकळां॥नेतां करुणा नुपजे काळा॥तेंवि अबळा उपेक्षिल्या॥ ९
कीं प्रथमप्रसवीं ललनारुदन ॥ निष्ठुर मानसीं नगणी सुईण॥इच्छूनि तिचें निज कल्याण॥श्रमवूनि वेण देववी१०॥
तेसें निष्ठुर करूनि मना ॥ अव्हेरूनि ललनारुदना ॥ संपादूनि मैत्रविधाना॥त्वरें स्यंदना जुंपिलें ॥१२ ॥तंव
ते बलरामश्रीपती ॥ मज्जन भोजन सारूनि पंक्ती ॥ वसनाभरणीं सन्नद्ध होती ॥ रथीं बैसती साटोपें ॥ १२ ॥

गोपास्तमन्वसज्जंतनंदाद्याःशकटैस्ततः ॥ आदायोपायनंभूरिकुंभान्गोरससंभृतान् ॥ ३३ ॥

॥ टीका ॥ तयांचि सरिसे समस्त गोप ॥ शकट जुंपूनि ससाक्षेप ॥ घेऊनि उपायनें अमूप ॥ शकटीं साटोप वळघले ॥ १३ ॥ गोरसादि अनेक रस ॥ शकटीं भरोनि पूर्ण कलश ॥ पुढें लक्षूनि अक्रूरास ॥ नंदप्रमुख
निघाले ॥ १४ ॥ हातींचा दुरी गेलिया कृष्ण ॥ मग कें देखों पुन्हावदन ॥ कांहीं तरी संभाषण॥ घडो
ह्मणोनि ऊठिल्या गोपी॥ १५ ॥

गोप्यश्चदयितंकृष्णमनुव्रज्यानुरंजिताः ॥ प्रत्यादेशंभगवतःकांक्षंत्यश्चावतस्थिरे ॥ ३४ ॥

॥ टीका ॥ परमप्रियतमा कृष्णातें ॥ आनंदयुक्त देखोनि चित्तें ॥ ठायीं ठायीं मथुरापथें ॥आनंदभरिता ठाकल्या ॥ १६ ॥ विरहसंतप्त गोपीगण ॥ ह्मणाल त्यांसी आनंद कोण ॥ तरी लक्षूनि कृष्णसंभाषण ॥ उत्साह
पूर्ण मानिला ॥ १७ ॥ सवेग करूनि शृंगार ॥ लक्षूनि कृष्णाचा साचार॥ कृष्णापासूनि अभीष्टकर ॥ प्रत्युत्तर

---

१ स्नान. २ सज्य. ३ भेटीचे पदार्थ.

वांछिती ॥ १८ ॥ परतोनि पाहील आह्मांकडे ॥ कांहीं अभीष्ट वदेल तोंडें ॥ मनीं धरूनि ऐशिये चाडे ॥ ठाकल्या पुढें पथसंधि ॥ १९ ॥ शीघ्र येईन या उत्तरा ॥ आश्वासील कांहीं तरी ॥ ऐसी इच्छा अभ्यंतरीं ॥ धरूनि नारी तिष्ठती ॥ २० ॥ जाणोनि त्यांचें अंतःकरण ॥ कृष्णपरमात्मा सर्वज्ञ ॥ करिता झाला समाधान ॥ तें सज्जन परिसोत ॥ २१ ॥

तास्तथातप्यतीर्वीक्ष्यस्वप्रस्थानेयदूत्तमः ॥ सात्वयामाससप्रेमैरायास्यइतिदौत्यकैः ॥ ३५ ॥

॥ टीका ॥ आमुचें प्रस्थान मथुरापुरीं ॥ या निमित्त व्रजसुंदरी ॥ विरहतप्ता लक्षूनि नेत्रीं ॥ सांतवी श्रीहरि यदुवर्य ॥ २२ ॥ फिरोनि येईन मी झडकरी ॥ स्नेह असोंद्या मजवरी ॥ तुमच्या वियोगें क्षणभरी ॥ प्राण शरीरीं नधरीं मी ॥ २३ ॥ तुमचें कोमळ हृदयकंज[1] ॥ तेथें निवास माझा सहज ॥ सहसा विसर नपडे मज ॥ हें निजगुज पैं माझें ॥ २४ ॥ तुह्मी हृदयीं जतन करा ॥ ऐसिया सप्रेम उत्तरां ॥ बोधूनियां दूतद्वारा ॥ व्रजसुंदरा राहविल्या ॥ २५ ॥ ऐसा कथूनि गुह्यसंकेत ॥ घडघडाट चालिला रथ ॥ त्यावरी गोपींचा वृतांत ॥ नृपा कथीत मुनिवर्य ॥ २६ ॥

यावदालक्ष्यतेकेतुर्यावद्रेणूरथस्यच ॥ अनुप्रस्थापितात्मानोलेख्यानीवोपलक्षिताः ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ ऐकोनि कृष्णाचा संकेत ॥ चित्तें त्यासंगें प्रस्थित[2] ॥ शरीरें राहिल्या तटस्थ ॥ जैशा अचेत पुतळिया ॥ २७ ॥ चित्तें धाडूनियां कृष्णासंगें ॥ उभ्या ठाकल्या केवळ आंगें ॥ जनपद[3]मांदी मुरडली मागें ॥

---

[1] हृदयकमळ. [2] निघालेली. [3] लोकांचा समुदाय.

रथ सवेगें अंतरतां ॥ २८ ॥ जंववरी केतु[1] दृष्टी दिसे ॥ तंववरी जडलीं तेथें लक्षें ॥ जैसीं योगियांचीं मानसें ॥ स्वरूपसमरसें स्थिरावलीं ॥ २९ ॥ सवेग मार्ग क्रमितां रथु ॥ दृष्टिगोचर नव्हे केतु ॥ तैं त्या धुळी गगनाआंतु ॥ पाहती तटस्थ मुद्रिता ॥ ३० ॥ लेप्यमूर्ति[2] सालंकारीं ॥ किंवा लिखितचित्रापरी ॥ रेणु लक्षिता अंबरीं ॥ मुद्रा खेचरी जडली त्यां ॥ ३१ ॥ चिरकाळें त्या श्वासापरती ॥ होतां चेइली जाग्रति ॥ मुद्रा सोडूनि पूर्वस्थिति ॥ विरहावर्तीं पडलिया ॥ ३२ ॥ सिद्धि नपावतां योगाभ्यास ॥ विघ्नबाहुल्यें पावे भ्रंश ॥ जेंवि तो साधक पावे क्लेश ॥ गोपीमानस तेंवि करणें ॥ ३३ ॥ गोपी लक्षें ज्या लक्षिती ॥ त्याची नहोतां दर्शनावाप्ति ॥ ह्मणाल निष्फळ योगस्थिति ॥ तरी हें श्रोतीं नह्मणावें ॥ ३४ ॥ त्यांचें जें कां विरहदुःख ॥ तनुमानसें कृष्णात्मक ॥ भवभ्रमासि करूनि विमुख ॥ कैवल्यसुखप्रद होय ॥ ३५ ॥ गोपीं ऐसी तन्मयता ॥ इच्छिती सनकादि भवविधाता ॥ त्यांचे क्लेश निष्फळ ह्मणतां ॥ वाग्देवता सकंप ॥ ३६ ॥ कैशी विरहें तन्मयता ॥ सावधान परिसिजे श्रोतां ॥ कृष्णचेष्टितें स्मरतां गातां ॥ नेणती वनिता उदयास्त ॥ ३७ ॥

तानिराशानिववृतुर्गोविन्दविनिवर्त्तने ॥ विशोकाअहनीनिन्युर्गायन्त्यःप्रियचेष्टितम् ॥ ३७ ॥

॥ टीका ॥ कृष्ण नपरते गेला दुरी ॥ देखोनि निराशा बल्लवनारी ॥ फिरत्या झाल्या ते अवसरीं ॥ शोकलहरी वरपडिया ॥ ३७ ॥ प्रियतमा अद्वया यदुनायका ॥ तच्चेष्टिता मायाकौतुका ॥ विरहें गाती विगतशोका ॥ कीं सशोका होत्सात्या ॥ ३८ ॥ कृष्णानुगत्वें आमुच्या चेष्टा ॥ कृष्णवियोगें लागती कष्टा ॥ कृष्णविरहें प्राप्त कष्टा ॥ जालों अदृष्टा[3] भोगाव्या ॥ ३९ ॥ कृष्णवेणूचिया ध्वनी ॥ चेतना उपलंभे[4] अचेतनीं ॥ स्वानन्दभोग अं-

---

१ ध्वज. २ चुना इ० पदार्थांची बाहुली. ३ दैवाला. ४ प्राप्त होई.

तःकरणीं ॥ कल्पना मनीं तद्वेधें ॥ ३४० ॥ कृष्ण चैतन्यच्छाया मात्र ॥ प्रकटी प्रवृत्तिप्रवाहीं[1] गात्र ॥ मां तो प्रत्यक्ष चिन्मात्र ॥ कैंवि स्वतन्त्र करीना ॥ ४१ ॥ तस्मात् प्रवृत्ति निवृत्ति ॥ कृष्णचेष्टा सर्वभूतीं॥ गोपी त्या त्या स्मरोनि गाती ॥ शोकनिवृत्तीकारणें ॥ ४२ ॥ कृष्ण प्राणांचा चेष्टक ॥ कृष्ण मनाचा तुष्टक ॥ कृष्ण कर्माचा पुष्टक ॥ कृष्ण निष्टंक प्रियप्रेष्ठ[2] ॥ ४३ ॥ कृष्णभोगीं भवविराम[3] ॥ कृष्णसंगीं चित्सुखाराम[4] ॥ कृष्ण केवळ पूर्णकाम ॥ आत्माराम जगदात्मा ॥ ४४ ॥ कृष्ण मनाचें मोहन ॥ कृष्ण बुद्धीचें जीवन॥ कृष्ण केवळ चैतन्यघन ॥ कृष्णें विण केवीं जिणें ॥ ४५ ॥ प्रियतम कृष्ण ऐशा गाती ॥ वेधें नेणती दिवस राती ॥ असो गोपींची हे स्थिति ॥ गेला श्रीपति तें ऐका ॥ ४६ ॥

भगवानपिसंप्राप्तोरामाक्रूरयुतोनृप ॥ रथेनवायुवेगेनकालिंदीमघनाशिनीम् ॥ ३८ ॥

॥ टीका ॥ सकलैश्वर्यसंपन्न ॥ यालागीं सर्वज्ञ श्रीभगवान ॥ तथापि गोपी उपेक्षून ॥ करी गमन नृपवर्या ॥ ॥४७॥भगवान ह्मणिजे ऐश्वर्यवन्त ॥ रासविलासीं गोपी समस्त ॥ अनेक होऊनि जेंवि रमवीत ॥ तेंवि कां येथ नजाला ॥ ४८ ॥ ऐश्वर्यसम्पन्नही असोन ॥ गोपी सशोका उपेक्षून ॥ विरहवेधें तत्कल्याण ॥ लक्षूनि गमन स्वयें करी ॥४९ ॥ ज्याची तुलना नपवे पवन ॥ ऐसा गतिमन्त स्यन्दन ॥ रामाक्रूरश्रीभगवान् ॥ करिती गमन तद्वेगें ॥ ५० ॥ त्रिजगदघौघहंत्री[5] यमुना ॥ सवेग येऊनि तिचिया पुलिना ॥ अक्रूर आदरी मध्याह्नस्नाना ॥ कुरुभूषणा तें ऐक ॥ ५१ ॥

---

[1] उद्योगपरंपरेमध्यें. [2] प्रियपदार्थांत अतिप्रिय. [3] संसारयातनांचा नाश. [4] ज्ञानानंदाची विश्रांति. [5] लोकत्रयाचे पातकांचा नाश करणारी.

तत्रोपस्पृश्यपानीयंपीत्वामृष्टंमणिप्रभम् ॥ वृक्षखण्डमुपव्रज्यसरामोरथमाविशत् ॥ ३९ ॥ ॥३९॥

॥१६॥ ॥ टीका ॥ ते कालिंदी सुकृतंजननी[1] ॥ आश्रयूनि तिष्ठती मुनि ॥ उदार क्षमस्वी दृढासनी ॥ समदर्शनी तरूरूपी ॥ ५२॥ कल्पतरूंतें लाजविती ॥ ऐसी ज्यांची फलसंपत्ति ॥ तया द्रुमांचे छायेप्रति ॥ रामश्रीपति उतरले ॥ ५४ ॥ तेथ ठेवूनियां स्यंदन ॥ स्पर्शोनि कालिंदीजीवन ॥ हस्तपाद प्रक्षाळून ॥ केलें आचमन श्रमहारी ५५॥ मुक्ताफलादिरत्नप्रभा ॥ लाजवी ऐसिया रविजाम्भा[2] ॥ प्राशितां रामपद्मनाभा ॥ पथश्रमाभा[3] विरमली ॥ ५६ ॥ अगाधत्वें शीतळतर ॥ मृष्ट[4] निर्मळ रत्नाकार ॥ सुखकर सुन्दर श्रेयस्कर ॥ तें यमुनानीर प्राशिलें ॥ ५७ ॥ मग जाऊनि वृक्षच्छाये ॥ रथीं बैसते झाले स्वयें ॥ श्रीकृष्ण आणि रोहिणीतनय ॥ किशोरप्राय अवगमती ॥ ५८ ॥

अक्रूरस्तावुपामन्त्र्यनिवेश्यचरथोपरि ॥ कालिन्द्याह्रदमागत्यस्नानंविधिवदाचरत् ॥ ४० ॥

॥ टीका ॥ वक्तयांमाजि चातुर्यराशि ॥ तो शुक सांगे नृपापासीं ॥ अक्रूर सारी आह्निकासी ॥ कोणें विधीसीं तें ऐका ॥ ५९ ॥ शत्रु धरोनि नाना व्यक्ति ॥ रामकृष्णांतें देखोनि क्षिती ॥ ह्मणे कांहीं विघ्न करिती ॥ अक्रूराचित्तीं हे शंका ॥ ६० ॥ यालागीं बळराममुरारी ॥ बैसवूनियां रथावरी ॥ अक्रूर त्यांतें विनति करी ॥ जननीपरी स्नेहभरें ॥ ६१ ॥ माध्याह्निक विधिविधान ॥ स्नानसंध्या ब्रह्मयज्ञ ॥ जंव मी सारीं जपतर्पण ॥ तुह्मी स्यंदन तंव नटका ॥ ३६२ ॥ ऐसें तुमचें अभयदान ॥ होतां करीन संध्यास्नान ॥ तथास्तु ह्मणे जनार्दन ॥ सहसा स्यन्दन न सोडूं ॥ ६३ ॥ ऐसा करूनियां अनुवादु ॥ रामकृष्ण दोघे बन्धु ॥ रथीं बैसवू- ॥१६॥

---

[1] पुण्यकर्माची माता. [2] यमुनोदकाला. [3] मार्गश्रमाची छाया. [4] पवित्र.

नियां सावधु ॥ मग प्रबुद्ध चालिला ॥ ६४ ॥ पूर्वीं जेथ गोपांप्रति ॥ ब्रह्मलोकाची दर्शनावाप्ति ॥ यमुनाह्रदीं त्या दानपति ॥ निमज्जनार्थी प्रवेशला ॥ ६५ ॥ हस्तपाद प्रक्षालून ॥ शौचविधि शुद्धाचमन ॥ यमुनाजीवन अभिवंदून ॥ करी मज्जन तें ऐका ॥ ६६ ॥

निमज्ज्यतस्मिन्सलिलेजपन्ब्रह्मसनातनम् ॥ तावेवददृशेऽक्रूरोरामकृष्णौसमन्वितौ ॥ ४१ ॥

॥ टीका ॥ निमज्ज उन्मज्ज वारत्रय ॥ पूर्णांजलि भरोनि तोय ॥ स्नानीं प्रयोग पढता होय ॥ देशकालादि स्मरोनी ॥६७॥ पुन्हा करूनि निमज्जन ॥ अघमर्षण[1] सूक्तपठन॥करितां कृष्णीं झळंबे मन॥तें लक्षण अवधारा ॥ ६८ ॥ रामकृष्ण कोमळ बाळ ॥ चाणूरमुष्टिक जैसे काळ ॥ त्यांपें[2] नेलों मी चांडाळ ॥ केवळ खळ शिशुघाती ॥ ६९ ॥ कोणीकडे हे शिशु सुकुमार ॥ मल्ल कोठें वज्रकठोर ॥ अपाड[3] त्यांसि जाणोनि समर ॥ हे शंका अक्रूर अवलंबी ॥ ३७० ॥ तें जाणूनि जगत्पति ॥ करावया शंकानिवृत्ति ॥ अघमर्षणीं अक्रूराप्रति ॥ ऐश्वर्यशक्ति प्रकाशी ॥ ७१ ॥ जळीं निमग्न पाहे नेत्रीं ॥ रामकृष्ण कोमळगात्री ॥ कां पां आले जळान्तरीं॥ ह्मणोनि अंतरीं दचकला ॥ ७२ ॥

तौरथस्थौकथमिहसुतावानकदुंदुभेः ॥ तर्हिस्वित्स्यंदनेनस्तइत्युन्मज्ज्यव्यचष्टसः ॥४२॥

॥ टीका ॥ प्रार्थूनि रथीं म्यां स्थिर केले ॥ जळामाजी कैसे आले ॥ तरी रथीं नसती ह्मणोनि पाहिले ॥ उन्मज्जन करूनियां ॥ ७३ ॥

---

[1] सर्वपापनाशार्थ जपावयाची ऋचा. [2] त्यांपाशीं. [3] अयोग्य.

तत्रापिचयथापूर्वमासीनौपुनरेवसः ॥ न्यमज्जद्दर्शनंयन्मेमृषाकिंसलिलेतयोः ॥ ४३ ॥

॥ टीका ॥ तंव रथींही यथास्थित ॥ आनकदुंदुभीचे सुत ॥ बैसले देखोनि अक्रूराचित्त ॥ परम विस्मित पैं झालें ॥ ७४ ॥ मग ह्मणे मज सलिलीं यांचें ॥ दर्शन झालें असे साचें ॥ तें काय मृषा या संशयाचें ॥ निवारण करावया ॥ ७५ ॥ पुन्हा तैसाचि यमुनाजळीं ॥ पाहे देवूनि बुडकुळी ॥ तंव तो साग्रज वनमाळी ॥ जळीं स्थळीं समगमला ॥ ७६ ॥

भूयस्तत्रापिसोऽद्राक्षीत्स्तूयमानमहीश्वरम् ॥ सिद्धचारणगंधर्वैरसुरैर्नतकंधरैः ॥ ४४ ॥
सहस्रशिरसंदेवंसहस्रफणमौलिनम् ॥ नीलांबरंबिसश्वेतंश्रृंगैःश्वेतमिवस्थितम् ॥ ४५ ॥

॥ टीका ॥ भूयःह्मणिजे तेथेंचि पुन्हा ॥ पाहे निश्चळ करूनि नयना ॥ देखता झाला शेषशयना ॥ त्या विवरणा अवधारा ॥ ७७ ॥ द्वादशश्लोकपर्यंत ध्यान ॥ वदला व्यासाचा नंदन ॥ त्यांत दों श्लोकीं संकर्षण ॥ भगवद्वर्णन दशश्लोकीं ॥ ७८ ॥ अहि ह्मणिजे पन्नगयाति ॥ अहीश्वर तो पन्नगपति ॥ त्यातें अक्रूर कोणे रीती ॥ कोणे स्थिती पाहतसे ॥ ७९ ॥ सहस्रशीर्ष विशालतनु ॥ सहस्र ह्मणिजे गणनाहीनु ॥ सहस्रशब्दाचें व्याख्यान ॥ अनंत ह्मणोनि श्रुति वदती ॥ ८० ॥ सहस्रशीर्ष जो कां पुरुष ॥ सहस्रपाद सहस्राक्ष ॥ या श्रुत्यर्थामाजि दक्ष ॥ अनंत अलक्ष लक्षिती ॥ ८१ ॥ ज्यासि असती सहस्र शिरें ॥ दोन सहस्र त्या असावीं नेत्रें ॥ तस्मात् अनंत ऐसा चतुरें ॥ सहस्रवाचक विवरावा ॥ ८२ ॥ आणि ते यमुनेचिया ह्रदीं ॥ अक्रूरें मस्तक मोजिले कधीं ॥ मग

---

१ मिथ्या. २ दिसला. ३ अनंत नेत्र ज्याला तो. ४ डोहामध्यें.

ते सहस्रगणनाशब्दीं ॥ घदला सुबुद्धि शुक वक्ता ॥ ८३ ॥ एवं अनंत संकर्षण ॥ प्रतिमस्तकीं शोभती फण ॥
तद्युक्त मौळीं मणिभूषण ॥ श्वेत संपूर्ण तनुशोभा ॥ ८४ ॥ पद्मफुल्लारबिसभासुर ॥ तैसा श्वेतमस्तकनिकर ॥
सहस्रशृंगी जेंवि गिरिवर ॥ रजतांकार कैलास ॥ ८५ ॥ एवं श्वेतशरीर पूर्ण ॥ परिधान केलें नीलवसन ॥
उदयाद्रिच्छायाचंडकिरण- ॥ मंडित जैसा क्षीराब्धि ॥ ८६ ॥ ऐसा साम्बर सालंकार ॥ ज्यातें स्तविती निर्जर
असुर ॥ सिद्धचारणगंधर्वनिकर ॥ नतकंधर होत्साते ॥ ८७ ॥ सबाह्य भासुर सर्वांकडे ॥ सर्व प्रकाशी
निजउजिवडें ॥ यालागीं देव ह्मणणें घडे ॥ कोणीं वांकुडें नह्मणावें ॥ ८८ ॥ ऐसा अहीश्वर संकर्षण॥ त्यावरी कैसा
श्रीभगवान ॥ दहा श्लोकीं तें व्याख्यान ॥ अन्वय संलग्न एकादशीं ॥ ८९ ॥

तस्योत्संगेघनश्यामंपीतकौशेयवाससम् ॥ पुरुषंचतुर्भुजंशान्तंपद्मपत्रारुणेक्षणम् ॥ ४६ ॥

॥ टीका ॥ तया संकर्षणोत्संगीं ॥ कुंडलीकृतदेहार्धभागीं ॥ अक्रूरें देखिला श्रीशार्ङ्गी ॥ कोणे लिंगीं तें ऐका॥
३९० ॥ घनश्याम सर्व तनु ॥ पद्मपत्रारुणेक्षणु ॥ चतुर्बाहु सरळ सुपीनु ॥ पीतवसन कौशेय ॥ ९१ ॥ पुरुष
जो कां प्रकृतिपर ॥ शान्त ह्मणिजे निर्विकार ॥ त्याचे अवयव पृथगाकार ॥ परिसा समग्र शुक वर्णी ॥ ९२ ॥

चारुप्रसन्नवदनंचारुहासनिरीक्षणम् ॥ सुभ्रून्नसंचारुकर्णंसुकपोलारुणाधरम् ॥ ४७ ॥

॥ टीका ॥ अखिलानंदाधिष्ठान ॥ कीं जें साकल्यें लावण्य ॥ स्मितापांगीं निरीक्षण ॥ प्रसन्नवदन चित्सुख जें
॥ ९३ ॥ उच्च नासिका सुंदर भ्रूकुटी ॥ गंड वर्तुळ आकर्ण दृष्टि॥ अरुणप्रभा अधरपुटीं॥ स्फुट वि द्रुमा सारिखी॥ ९४॥

---

१ कमलांतील विकसित तंतूंप्रमाणें शुभ्रवर्ण. २ सहस्र शिखरांचा. ३ रौप्यमयी आकृति ज्याची तो. ४ वस्त्रसहित. ५ मस्तक खालीं करून.

प्रलंबपीवरभुजंतुंगांसोरस्थलश्रियम् ॥ कंबुकंठनिम्ननाभिंवलिमत्पल्लवोदरम् ॥ ४८ ॥

॥ टीका ॥ सकळकर्मा कार्यारंभ ॥ तेथें पावती भुज सलंब ॥ त्यालागीं ह्मणिजेते प्रलंब ॥ लावण्यबिंब पीनत्व ॥ ९५ ॥ कंबुकंठ उच्च अंश[1] ॥ निम्न गंभीर नाभिदेश ॥ त्रिवलीमंडित उदर सपोस ॥ विशाळवक्षस शोभाढ्य ॥ ९६ ॥

बृहत्कटितटश्रोणिकरभोरुद्वयान्वितम् ॥ चारुजानुयुगंचारुजंघायुगलसंयुतम् ॥ ४९ ॥

॥ टीका ॥ कटिप्रदेश श्रोणिभाग ॥ बृहत् ह्मणिजे विस्तीर्ण चांग ॥ वारणशुंडाकार सुभग ॥ चारु ऊरुद्वयं[2] ज्यातें ॥ ९७ ॥ मुकुर[3]बिंबाकृति वर्तुळ ॥ सुंदर जानुद्वयं[4] सोज्वळ ॥ गुल्फा[5]पासूनि चढते स्थूळ ॥ जंघायुगळ मिरवतसे ॥ ९८

तुंगगुल्फारुणनखव्रातदीधितिभिर्वृतम् ॥ नवांगुल्यंगुष्ठदलैर्विलसत्पादपंकजम् ॥ ५० ॥

॥ टीका ॥ उच्च उन्नत वर्तुळ गुल्फ ॥ अरुणप्रभानखकलाप ॥ आरक्त पदतळ देती वोप[6] ॥ करिती लोप बालार्का ॥ ९९ अद्भुत दशदल[7]नवराताब्ज ॥ छदावळी[8] त्या अंगुलिपुंज ॥ ऐसें युग्म श्रीपादकंज ॥ भूषणवोज अवधारा ॥ ४०० ॥

सुमहार्हमणिव्रातकिरीटकटकांगदैः ॥ कटिसूत्रब्रह्मसूत्रहारनूपुरकुंडलैः ॥ ५१ ॥

॥ टीका ॥ अनंतकोटि दिव्य तरणि ॥ लोपती ज्याच्या प्रभाकिरणीं ॥ ऐसे महार्ह मुकुटीं मणि ॥ आणि किंकिणी बाह्यवंटा ॥ १ ॥ कुंडलमंडित गंडदेश ॥ तत्प्रभाढ्य कुटिल केश ॥ नामें कुन्तळ ह्मणती ज्यांस ॥ शोभाविशेष तद्योगें ॥ २ ॥ त्रिजगच्चित्राकृति खेवणी ॥ कांचि मिरवे मध्यस्थानीं ॥ धाता निर्मी जयावरूनी ॥

---

[1] स्कंधदेश. [2] दोन मांड्या. [3] आरसा. [4] गुडघे. [5] पायांचे घोटे. [6] तेज. [7] दहा पाकळ्याचें नवें तांबडें कमल. [8] पत्रपंक्ति.

प्रळयावसानीं यथापूर्व ॥ ३ ॥ ब्रह्मसूत्र सूचनाकार ॥ ज्याचेनि सचेतन चराचर ॥ तें शोभवी ब्रह्मसूत्र ॥ सर्वेश्वर सर्वात्मा ॥ ४ ॥ कंठीं अनर्घ्य रत्नहार ॥ सुमनमाळा मनोहर ॥ चरणीं बिरुदांचा तोडर॥ अंदु नूपुर रुणझुणती ॥ ५ ॥ आतां आयुधांची सामग्री ॥ तेही ऐका बरवे परी ॥ चहूं हस्तकीं मिरवी चारी ॥ स्वयें श्रीहरि जगदात्मा ॥ ६ ॥

भ्राजमानंपद्मकरंशंखचक्रगदाधरम् ॥ श्रीवत्सवक्षसंभ्राजत्कौस्तुभंवनमालिनम् ॥

॥ टीका ॥ दक्षिण ऊर्ध्वकरीं पद्म ॥ वामभागीं शंखोत्तम ॥ चक्र गदा तदनुक्रम ॥ अधोहस्तीं शोभती ॥७ ॥ वक्षःस्थळीं देदीप्यमान ॥ दक्षिणभागीं श्रीवत्सचिह्न ॥ मध्यें मिरवे कौस्तुभरत्न ॥ आपाद पूर्ण वनमाळा ॥ ८ ॥ स्तवनीं तत्पर पार्षदगणं ॥ तेही ऐका सावधान ॥ यथामति गुणकीर्तन ॥ नम्र होऊनि करिताती ॥९

सुनंदनंदप्रमुखैःपार्षदैःसनकादिभिः ॥ सुरेशैर्ब्रह्मरुद्राद्यैर्न्नवभिश्चद्विजोत्तमैः ॥ ५३ ॥
प्रह्लादनारदंवसुप्रमुखैर्भागवतोत्तमैः ॥ स्तूयमानंपृथग्भावैर्वचोभिरमलात्मभिः ॥ ५४ ॥

॥ टीका ॥ जय विजय सुनंद ॥ कुमुदकुमुदाक्ष मुख्य पार्षद ॥ अष्टौ हरीचे द्वास्थं विशद ॥ पुण्यशील सुशील ॥ १० ॥ सनकसनंदनसनातन- ॥ सनत्कुमारप्रमुख जाण ॥ ऊर्ध्वरेते हे चौघेजण ॥ कुमारगण यां नांव ॥ ११ ॥ रुद्रेंद्रादि कमलासन ॥ तदनुयायी मरुद्गण ॥ वेदवेत्ते नव ब्राह्मण ॥ मरीचिप्रमुख जाणावे ॥

---

१ सांखळ्या. २ वाळे. ३ सेवकसमूह. ४ द्वारपाल. ५ आमरण ब्रह्मचर्यव्रत पाळणारा.

॥१२ ॥ प्रह्लाप्रदमुख भागवत ॥ पावकप्रमुख समस्त ॥ विष्णुपुरोगम[1] अदितिसुत ॥ पृथग्भावें स्तवितातीं ॥
॥१३॥पार्षद स्वामिसेवकभावें ॥ स्तविती विभूचीं अनंत विभवें ॥ ऊर्ध्वरेते तपोगौरवें॥ब्रह्मनिर्वाण विवरिती॥१४॥
पूर्णचैतन्य परमेश्वर ॥ भावें स्तविती ब्रह्मादिहर ॥ मरीच्यादि जे द्विजवर ॥ ह्मणती परतर प्रजापति ॥१५॥
प्रह्लाद नारद सप्रेमभरित ॥ भगवत्प्रियतम भागवत ॥ स्तविती सर्वात्मा सर्वगत ॥ भजनाभिमत सद्भावें
॥ १६ ॥ यज्ञभोक्ता भाविती वसु ॥ आदित्य भाविती हा चंडांशु ॥ अमलात्मे जे श्रेष्ठ पुरुषु ॥ परदैवत भाविती
॥१७ ॥ ऐसा बहुधा पृथग्भावीं ॥ स्तूयमान सर्वत्र सर्वीं ॥ अमलसूक्तीं गणगंधर्वीं ॥ देवीं मानवीं स्तविजेत
॥१८ ॥ तैशाचि परम अमळभक्ति ॥ भावें सेविती सर्वशक्ति ॥ अल्प सांगों त्या संकेतीं ॥ सावध श्रोतीं परिसिजे ॥१९

श्रियापुष्ट्यागिराकांत्याकीर्त्यातुष्ट्येलयोर्जया ॥ विद्ययाऽविद्ययाशक्त्यामाययाचनिषेवितम् ॥ ५५ ॥

॥ टीका॥ सौभाग्यश्री जे ऐश्वर्यजननी ॥ विश्वात्मका विश्वकुटुंबिनी॥विश्वगोप्त्री तत्पर चरणीं ॥ सेवे लागूनि
देखिली ॥ २० ॥ तदनु ऐश्वर्यबृंहणां[2] ॥ जे कां पटुतर पुष्टीकरणा ॥ लक्षूनि प्रभूच्या अवलोकना ॥ पोषी
त्रिभुवना ते पुष्टि ॥ २१ ॥ कल्याणरूपिणी सुमंगळ गिरा ॥ वैखरी[3] मध्यमा पश्यंती परा॥प्रसवे श्रुत्यात्मकाविचारा ॥
यथाधिकारा द्योतक जे ॥ २२ ॥ ऐसीच कांति लावण्यखाणी ॥ सर्वीं सर्वत्र शोभा आणी ॥ जीच्या प्रकाशें
चातुर्यश्रेणी ॥ सौंदर्य भूषणीं मिरवती ॥ २३ ॥ तदनुलक्षें सुसंतुष्टि ॥ तिष्ठे प्रभूचिये कृपादृष्टी ॥ जीच्या
लोभें सुरेंद्रकोटी ॥ भवाब्धिपोटीं निमज्जती ॥ २४ ॥ आत्मतुष्टीवीण जें विभव ॥ भवाब्धि हें त्याचेंचि नांव

---

१ विष्णुप्रमुखद्वादशादित्य. २ ऐश्वर्य वृद्धीला. ३ वैखरी इ० चार शब्द, वाणीचे प्रकार दाखवितात.

॥ तुष्टिलोभें वाढतां हाव ॥ प्रभव पराभव पावती ॥ २५ ॥ ते संतुष्टि प्रभूचिया ठायीं ॥ तिष्ठे सांकल्यें अक्षयी ॥ जेंविआकाशाचिये भुई ॥ चांचल्य कहीं स्पर्शेना ॥ २६ ॥ इला[1] ह्मणिजे धरादेवी ॥ अखिल ब्रह्मांडें वागवी ॥ जीच्या ठायीं आधेयभावीं[2] ॥ वर्तें पदवी त्रिगुणाची ॥ २७ ॥ क्षांति दांति[3] क्षमा नामें ॥ जीच्या रूपाचीं माहात्म्यें ॥ जयाच्या योगें महत्त्वगरिमे ॥ पावती नियमें तपोधन ॥ २८ ॥ ऊर्जा ह्मणिजे अभ्युदयकारिणी ॥ ऊर्जितैश्वर्यप्रवार्धिनी ॥ बिजेपासूनियां प्रतिदिनीं ॥ सुधाकिरणीं जेंवि सुधा ॥ २९ ॥ विद्या ह्मणिजे ज्ञानशक्ति ॥ जीच्या उदयें भवविरक्ति ॥ प्रकट होय आत्मरति ॥ चित्संवित्ति[4] जी नाम ॥ ३० ॥ अविद्या भवभ्रमाची जननी ॥ विषयसुखाची उभारणी ॥ मृषा दृश्याचें पाजी पाणी ॥ जीवांलागोनि प्रलोभें ॥ ३१ ॥ सपल्लवें गंडूनि[5] जीव ॥ इहामुष्मिका आणी बरव[6] ॥ प्रवृत्तिप्रवाहाची धांव ॥ जे सावेव[7] विक्षिप्ता ॥ ४३२ ॥ विद्या केवळ मुक्तिदानी ॥ अविद्या संसारप्रवर्धिनी ॥ दोहींची जे मुख्य जननी ॥ ते मायाभिधानीं बोलिजे ॥ ३३ ॥ इत्यादि शक्ति ज्या अशेष ॥ सादर तिष्ठती सेवेस ॥ अक्रूर पाहोनि तो हृषीकेश ॥ पावला तोष तें ऐका ३४ ॥

विलोक्यसुभृशंप्रीतोभक्त्यापरमयायुतः ॥ हृष्यत्तनूरुहोभावपरिक्लिन्नात्मलोचनः ॥ ५६ ॥

॥ टीका ॥ ऐसा संकर्षणोत्संगीं ॥ सगुण सालंकृत शार्ङ्गी ॥ अक्रूरें अवलोकुनी दिव्यदृगीं ॥ झाला सर्वांगीं द्रवीभूत ॥ ३५ ॥ आमुचा वृष्णिकुलावतंस ॥ तो हा श्रीकृष्ण पूर्णपरेश ॥ सुरगण ब्रह्मादिप्रमुख दास ॥ होऊनि ज्यास सेविती ॥ ३६ ॥ अखिलशक्त्यात्मक जे माया ॥ सर्वशक्तीसीं वोळगे[8] पायां ॥ हें परमैश्वर्य देखोनियां

---

१ पृथ्वी. २ वस्तुत्वानें. ३ इंद्रियदमन. ४ चैतन्यबोध. ५ ठकवून. ६ शोभा. ७ अवयवांसहित. ८ सेवी.

उमसावयां असमर्थ ॥३७॥ हर्षे उचंबळला देहीं ॥ स्तिमित झाल्या वृत्ति सर्वही ॥ रोमांच उठिले लवलाहीं ॥ नेत्र ठायीं पुंजाळले ॥ ३८ ॥ स्वेदें वोलावलें गात्र ॥ आनंदाश्रु ढाळिती नेत्र॥ सद्गद कंठ भंगला स्वर॥जाला पात्र सत्वाष्टका ॥ ३९ ॥ पादांगुष्ठादिमौळवरी ॥ कंप दाटला सर्वशरीरीं ॥ ऐसी सात्विकाष्टकसामग्री॥तेव्हां अकूरीं प्रकटली ॥४०॥स्तिमित वृत्ति झाल्या सर्व॥त्यां नांव परिछिन्नभाव॥हे सत्वावस्थासुखगौरव ॥ महानुभाव[2] जाणती ॥ ४१ ॥ ऐसी दशा जे स्तिमितकरा ॥ जाली ते ठायीं अक्रूरा ॥ तीतें सांवरूनि पुढारां॥कैसा स्तोत्रा प्रर्वतला ॥ ४२ ॥

गिरागद्गदयाऽस्तौषीत्सत्वमालंब्यसात्वतः ॥ प्रणम्यमूर्धाऽवहितःकृतांजलिपुटःशनैः ॥ ९७ ॥

॥ टीका ॥ सप्रेमळ जे भगवद्भक्त ॥ त्यांतें ह्मणावे सात्वत ॥ त्यांशीच ऐसी दशा प्राप्त ॥ येर प्राकृत नेणती ॥ ४३ ॥ यालागीं तो सात्वतप्रबर ॥ नवां माजील षष्ठ अक्रूर ॥ अवस्था जिरवूनि झाला सघरं[3] ॥ प्राणप्रचार प्रवर्तला ॥ ४४ ॥ मग हळूचि उघडूनि दृष्टि ॥ सुखोत्कर्षा जिरवोनि पोटीं ॥ सद्गदगिरा सकंपयष्टि स्तोत्रपाठीं वेंठला[4] ॥ ४५ ॥ करूनि बद्धांजलिपुट ॥ नम्रमूर्धारहित मुकुट ॥ नमस्कारूनि वैकुंठपीठ ॥ स्तोत्रपाठ आदरिला ॥ ४६ ॥ तया स्तवनाचिया श्रवणा ॥ सावध करूनि कुरुभूषणा॥ शुक आदरी निरूपणा॥ त्या व्याख्याना अवधारा ॥ ४७ ॥ ते चाळिसाव्या माजी कथा ॥ श्रवणें निरसे दुस्तर व्यथा ॥ बैसवी सच्चित्सुखाचे माथां ॥ ते परमार्था सौभाग्य ॥ ४८ ॥ तें हें श्रीमद्भागवत ॥ परमहंस रमती येथ ॥ भाषाव्याख्यान

---

[1] बोलण्यास. [2] महाज्ञानी. [3] अधिकआश्रययुक्त. [4] प्रवृत्त झाला.

दयार्णवोक्त ॥ टीका विख्यात हरिवरदा ॥४९॥ एकांजनार्दनवरेंशीं ॥ विरोधकृतीं फाल्गुनमासीं ॥ कृष्णषष्ठी उत्सवदिवसीं ॥ समाप्ति कथेसि प्रतिष्ठानीं ॥ ४५० ॥ ॥ ॥ इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यांसंहितायांदशममस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायांरामकृष्णाक्रूरमथुराभिगमनगोपीविरहाक्रूरयमुनास्नानविश्वरूपदर्शनयोगोनामोनचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ३९ ॥ श्लोक ॥ ५७ ॥
॥ ओव्या ॥ ४५० ॥ ॥ एकूणसंख्या ॥ ५०७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ शुभंभवतु ॥

---

१ श्रीएकनाथ व जनार्दनस्वामी यांच्या वरानें. २ विरोधकृत हें साठ सवत्सरां पैंकीं एक आहे.

अध्याय ३८.

तैसा प्रतापी द्युतिमन्त ॥ अक्रूर परम भागवत ॥ रथेंसहित क्रमी पंथ ॥ जावया त्वरित नन्द ब्रजा ॥ २७ ॥
तंव येरीकडे जनार्दना ॥ नारदें केली विज्ञापना ॥ कीं उद्यां करिशील कंसहनना ॥ मल्लां वारणां समवेत ॥ २८ ॥



श्रीकृष्णपरब्रह्मणे नमः ॥ वेद्यवेदनवेदकत्रिपुटी ॥ ज्याचेनि प्रकाशें नेत्रपुटीं ॥ ज्ञेय ज्ञान ज्ञातृत्व पोटीं ॥ घालूनि उलटी गोचर्या ॥ १ ॥ जें होय जयाचें नेतार ॥ तया साधन ह्मणिजे नेत्र ॥ एवं ज्ञानेंद्रियांचा निकर ॥ त्रिपुटीप्रसर विस्तारी ॥ २ ॥ चिदाभासें भ्रमलेपणें ॥ अविद्यावरणीं आंधळें होणें ॥ तया विक्षेपें भेटवणें ॥ वेद्य दृश्य नाथिलें ॥ ३ ॥ तें जैं बाह्य विषयभान ॥ आब्रह्मभुवनादि विस्तीर्ण ॥ नेत्रपुटीं त्याचें वयुन॥ साच होऊन प्रतिभासे ॥ ४ ॥ एवं नेत्रावच्छिन्न वयुन ॥ अबाह्यें बाह्य प्रकाशून ॥ वेद्य ऐसें त्या अभिधान ॥ठेवून वेदन स्वयें होय ॥ ५ ॥ वेतृत्व जीवचैतन्या शिरीं ॥ देऊन विषयां वेद्य करी ॥ वेदन होऊनि जे माझारी ॥ त्रिपुटी उभारीं भ्रमगर्भी ॥ ६ ॥ तया भ्रमाचे भ्रमणचक्रीं ॥ भ्रमिजे सुरनरखेचरचक्रीं ॥ जेवीं शफरीं मकरीं नक्रीं ॥ ठपिजे परस्परीं ग्रासार्थ ॥ ७ ॥ द्वैत नसोनि अनेकता ॥ वैर नसोनि अमित्रता ॥ भ्रमें वरपडतां प्राकृतां ॥ दुजा उमजविता नभेटे ॥ ८ ॥ तेथ उलटूनि नेत्रचर्या ॥ मिथ्यात्व बोधिसी दृश्या ज्ञेया ॥ ज्ञान ज्ञातृत्वीं नेसी लया॥ श्रीगुरुराया गोविंदा ॥ ९ ॥ ऐसा तुझा कृतोपकार ॥ वर्णूं नशकती विधि हर अमर ॥ तेथ फेडावया सधर ॥ कोण परतर अद्वैती ॥ १० ॥ यालागिं जोंवरी स्मरणधर्म ॥ तोंवरी सद्गुरू वेगळें ब्रह्म॥भावील तो पामर अधम ॥ अंधतम पावेल ॥ ११ ॥ पुढें स्मरणधर्मा पाठीं ॥ अभेदबोधें ऐक्यगांठीं ॥ स्मरण असतां ऐक्य प्रक-

---

१ वेद्य-बाह्यवस्तु; वेदन-ज्ञानेंद्रियें; वेदक-जीवचैतन्य. २ ज्ञानेंद्रियसमूह. ३ इंद्रियांचें कर्म. ४ अल्पज्ञानानें. ५ स्वप्नजागृतींमधील ज्ञान. ६ बोध

टी ॥ तोही सृष्टी मूढात्मा ॥ १२ ॥ सद्गुरु केवळ परब्रह्म ॥ अवगमल्याही[1] विगतभ्रम ॥ अगाध मर्यादेचा नेम ॥ परमनिःसीम अनुल्लंघ्य ॥ १३ ॥ यावत्कल्पांतको देहो ॥ तावन्मर्यादाप्रवाहो ॥ गुरुभजनात्मक बोलिला पहाहो ॥ पार्वतीनाहो[2] गुरुगीते ॥ १४ ॥ अद्वैतबोधें लोकत्रयीं ॥ वर्तत असतां भेदक्षयीं ॥ तथापि गुरुभजनाच्या ठायीं ॥ द्वैत देहीं उरवावें ॥ १५ ॥ जेथ विराला स्मरणधर्म ॥ तेथ आपण सद्गुरुब्रह्म ॥ ये त्रिपुटीचें मोडलें नाम ॥ अनियम नियम तें भजन ॥ १६ ॥ अमोघ ऐसी भजनरहाटी ॥ मादृश[3] पामरां दुर्लभ सृष्टी ॥ ह्मणोनि वोवियेच्या परिपाटीं[4] ॥ हे वाक्पुटीं वाखाणूं ॥ १७ ॥ जैसीं पामरें निर्दैवें ॥ काय जाणती साम्राज्यविभवें ॥ दळणीं कांडणीं तिहीं गावें ॥ मनाचे हांवे पुरवावया ॥ १८ ॥ तेंवि गोविंदा तुझें भजन ॥ केंवि लाहें मी हीनदीन ॥ यास्तवग्रंथार्थमिसें स्तवन ॥ करूनि वाङ्मन विनवितसें ॥ १९ ॥ श्रीआज्ञेचें मंगलसूत्र ॥ लाहूनि मम वाणी पवित्र ॥ कृष्णावतारबाळचरित्र ॥ यथार्थसूत्र वाखाणीं ॥ २० ॥ तेथ अध्याय सततिसावा ॥ व्योमा वधूनि संपला आघवा ॥ अतां अक्रूरा आणि केशवा ॥ भेटी होईल सप्रेमें ॥ २१ ॥ केशिवध नारदस्तव ॥ आणि वधिला व्योमदानव ॥ हें ऐकोनि कुरुपार्थिव ॥ प्रश्न स्वमेव करूं इच्छी ॥ २२ ॥ श्रीकृष्णाचें आगाध चरित ॥ ऐसे मारिले अपार दैत्य ॥ अक्रूरभेटी कथावी त्वरित ॥ हें नृपाचें आर्त समजोनी ॥ २३ ॥ भूतभविष्यद्वर्तमान ॥ जाणता योगींद्र शुक सर्वज्ञ ॥ तेणें भूपति नकरितां प्रश्न ॥ अभीष्ट व्याख्यान आदरिलें ॥ २४ ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ अक्रूरोऽपिचतांरात्रिंमधुपुर्यांमहामतिः ॥ उषित्वारथमास्थायप्रययौनंदगोकुलम् ॥ १ ॥

---

१ जाणिल्यावराहि. २ पार्वतीपति शंकर. ३ माझ्यासारखे. ४ अनुक्रमानें.

॥ टीका ॥ शुक ह्मणे गा महाप्राज्ञा ॥ अक्रूरें घेऊनि कंसाज्ञा ॥ येऊनि आपुलिया सदना ॥ व्रतें हरिदिना लोटिलें ॥ २५ ॥ ते रात्री क्रमूनि मथुरापुरीं ॥ महातेजस्वी अक्रूर क्षत्रीं ॥ प्रभाते आरूढोनि रथावरी ॥ जैसा तमोरि[2] उदया ये ॥ २६ ॥ तैसा प्रतापी द्युतिमंत ॥ अक्रूर परम भागवत ॥ रथेंसहित क्रमी पंथ ॥ जावया त्वरित नंदव्रजा ॥ २७ ॥ तंव येरीकडे जनार्दना ॥ नारदें केली विज्ञापना ॥ कीं उद्या करिसी कंसहनना ॥ मल्लवारणांसमवेत[3] ॥ २८ ॥ भविष्यार्थ समीप मुनि ॥ कथूनि गेलिया चक्रपाणि ॥ मथुराप्रवेशीं कंसहननीं ॥ आवेश मनीं उथलला[4] ॥ २९ ॥ काम खवळे नवयौवनीं ॥ क्रोध कुरपे रिपुवल्गनीं ॥ कीं गजयूथा समीप अवलोकुनी ॥ मृगेंद्र मनीं आवेशे ॥ ३० ॥ कीं समीप जाणोनि प्रळयकाळ ॥ महामृत्यु ग्रसनशील[5] ॥ तेंवि उद्युक्त घननीळ ॥ कंसादिखळदळनार्थ ॥ ३१ ॥ जो कृष्णाचा मनोरथ ॥ तो हा मूर्त अक्रूररथ ॥ प्रेरिला होत्साता उद्युक्त ॥ क्रमी पंथ तें ऐका ॥ ३२ ॥

॥ गच्छन्पथिमहाभागोभगवत्यंबुजेक्षणे ॥ भक्तिंपरामुपगतएवमेतदचिंतयत् ॥ २ ॥

॥ टीका ॥ ऐकें राया कुरुभूषणा ॥ नंदव्रजाप्रति करितां गमना ॥ परमोत्साह अक्रूरमना ॥ जाला कोणा प्रकारींचा ॥ ३३ ॥ अभेदभजनभाग्यें सभाग्य ॥ यास्तव अक्रूर महाभाग ॥ भगवच्चरणीं भक्तियोग ॥ त्यातें अभंग प्रकटला ॥ ३४ ॥ हें निरूपण विवेकें खोले ॥ मानसीं पाहिजे अवलोकिलें ॥ चतुरांलागिं विनीत बोलें ॥ अल्प सूचिलें जात असे ॥ ३५ ॥ परा ह्मणिजे उत्कृष्ट भक्ति ॥ परब्रह्मात्मक जे रति ॥ ह्मणाल

---

१ एकादशीला. २ सूर्य. ३ हत्ती कुवलयापीड. ४ प्रकट झाला. ५ ग्रास करूं इच्छिणारा.

उदेली अक्रूराप्रति ॥ तें हें श्रोतीं न ह्मणावें ॥ ३६ ॥ अथवा पूर्ण परमेश्वर ॥ तत्पदभजनप्रेमादर ॥ ह्मणाल
पावला तो अक्रूर ॥ परी हा विचार नह्मणावा ॥ ३७ ॥ केवळ श्रीकृष्ण परब्रह्म ॥ पूर्ण चैतन्य आत्माराम ॥
तत्पदभजनीं उत्कृष्ट प्रेम ॥ उदेलें निःसीम तें त्यातें ॥ ३८ ॥ व्याघ्रवत्सअविकपाळे ॥ पाळिले मंडलकाच्या
मेळें ॥ स्वकुळज्ञानें यथा काळें ॥ जेंवि तें मिळे स्वपक्षीं ॥ ३९॥ तेंवि भूभारहरणकाम ॥ अवतरला जें
पुरुषोत्तम ॥ तेंव्हां स्वपक्षपराक्रम ॥ अंशरूपें हा प्रकटिला ॥ ४० ॥ ते हे अक्रूरादि यादव ॥ आणि नंदादि
पशुप सर्व ॥ यांचा अभेदप्रादुर्भाव ॥ प्रसंगें भाव प्रकटती ॥ ४१ ॥ रिक्त तडागीं लवणदुर्ग ॥ लाहोनि
मातला दस्युवर्ग ॥ तदर्थ प्रावृटीं कदनप्रसंग ॥ नृपें सांग आदरिला ॥ ४२ ॥ भंवते नृपदळाचे पाळे ॥
दस्यु न गणितीच दुर्गबळें॥ वार्षिकी सरोवर भरतां जळें ॥ दुर्गही मिळे तत्पक्षीं ॥ ४३ ॥ तैं दस्यूचा खचला
पाया ॥ तो न्याय घडला कंसराया ॥ रामकृष्णांच्या हननकार्या ॥ अक्रूर उपाया प्रयोजिला॥ ४४॥त्यासि चालतां
गोकुळपथीं ॥ त्द्दयीं आठवली कृष्णमूर्ति ॥ प्रकट जाली अभेदभक्ति ॥ मुनिगगनोक्तिविश्वासें ॥ ४५॥ आठवा
देवकीचे पोटीं ॥ ऐसी संदिग्ध गगनगोठी ॥ नारदें कथितां नंदवाटीं ॥ भरवसा पोटीं दृढ जाला ॥ ४६ ॥
तया कृष्णा अंबुजेक्षणा[2] ॥ चिंतूनि तच्चरणीं दृढभावना ॥ अभेदप्रेमें जडली जाणा ॥ करी चिंतना तत्तोषें॥४७॥
उदया येतां प्रसूतिकाला ॥ पान्हा प्रकटे स्तनमंडळा ॥ तेंवि जैं कंसाची मरणवेळा ॥ तैं प्रेमा उदेला अक्रूरा ॥
॥ ४८ ॥ मग तो तेणें प्रेमरसें ॥ तिंबलेनि[3] निजमानसें ॥ चिंतिता जाला तें पर्येसें ॥ मुनि ह्मणतसे कुरुवर्या४९॥

किमयाचरितंभद्रंकिंतप्तंपरमंतपः ॥ किंवाऽथाप्यर्हतेदत्तंयद्द्रक्ष्याम्यद्यकेशवम् ॥ ३ ॥

---

१ मेंढरांचा समूह २ कमलनत्र कृष्णाला. ३ मर्दन केलें असतां.

॥ टीका ॥ चालतां व्रजपुरपथें रथ ॥ अक्रूरा पोटीं मनोरथ ॥ ह्मणे मी पूर्वी कल्याणभरित ॥ किमाचरित आचरलों ॥ ५० ॥ काय सुकृत माझिये गांठीं ॥ जेणें आजि मी केशवा दृष्टी ॥ पाहेन ह्मणोनि आनंद पोटीं ॥ सुखसंतुष्टी उथलला ॥ ५१ ॥ तपश्चर्या अतिदारुण ॥ निष्कामतपिन्नलों मी पूर्ण ॥ तेणें अखिलमंगलायतन[1] ॥ तो श्रीकृष्ण देखेन मी ॥ ५२ ॥ किंवा वाटतें मज बहुतेक ॥ स्वधर्मार्जित गोभूकनक ॥ सत्पात्रीं सम्मानपूर्वक ॥ दानें अनेक मज घडलीं ॥ ५३ ॥ यथायोग्य यथापात्रीं ॥ यथोक्त देशकाळीं पवित्रीं ॥ यथेष्ट द्रव्यें यथासूत्रीं ॥ यथाधिकारें समर्पिलीं ॥ ५४ ॥ तयासुकृताचिया राशि ॥ सफळ आलिया उदयाशी ॥ तेणें भाग्यें केशवासी ॥ नेत्रसारसीं[2] देखेन ॥ ५५ ॥ पुढती शंकित विवरी मनीं ॥ अनधिकारियामजलागुनी ॥ परम दुर्लभ चक्रपाणि ॥ काय ह्मणोनि तें तर्की ॥ ५६ ॥

ममैतद्दुर्लभंमन्यउत्तमश्लोकदर्शनम् ॥ विषयात्मनोयथाब्रह्मकीर्तनंशूद्रजन्मनः ॥ ४ ॥

॥ टीका ॥ पांचभौतिक देहात्ममति ॥ कंस तो हा खळ दुर्मति ॥ मी तयाचा आज्ञावर्ती ॥ पापमूर्ति सबाह्य॥ ५७ ॥ निर्दय कुटिल निरपत्रप ॥ सदैव वर्ततां तयासमीप ॥ तेणें घडला कल्मषलेप ॥ नुमजे अल्प आत्महित॥ ५८ ॥ यास्तव उत्तमश्लोकदर्शन ॥ परम दुर्लभ मजलागुन॥जैसें वृषलां[3] श्रुतिव्याख्यान ॥ मानी मम मन तद्वत हें॥५९॥विरक्तां योग्य ब्रह्मप्रतिष्ठा॥जेंवि ते दुर्लभ विषयनिष्ठा॥तेंवि अघटित मज पापिष्ठा॥भेटी वरिष्ठा कृष्णाची ॥ ६० ॥ ऐसी दुर्लभ श्रीकृष्णभेटी ॥ कोठूनि माझिये अदृष्टीं[4] ॥ ऐसी अप्राप्ति बैसतां पाठीं ॥ तंव स्मरली गोठी प्राप्तीची ॥ ६१ ॥

---

[1] सर्व सुखाचें आगर. [2] नेत्रकमलांनीं. [3] शूद्राला. [4] नशीबीं.

मैवंममाधमस्यापिस्यादेवाच्युतदर्शनम् ॥ ह्रियमाणःकालनद्याक्वचित्तरतिकश्चन ॥ ५ ॥

॥ टीका ॥ पूर्वोक्त असंभावने बाध ॥ करी संभावना अनुवाद ॥ तो मानसीं एवंविध ॥ विवरी प्रबुद्ध अक्रूर ॥ ६२ ॥ हरिदर्शनीं असंभावना ॥ ह्मणे वृथा हे स्फुरली मना ॥ मजसारिख्याही अधमा दीना ॥ हरिदर्शनावाप्ति घडे ॥ ६३ ॥ कोण्या प्रकारें ह्मणाल ऐसें॥तरी तृणतुष[1] नदी प्रवाहा सरिसें ॥ बळेंचि परपार पावे जैसें ॥ अयोग्य अनायासें एकादें ॥ ६४ ॥ सर्वत्र तृणें नदी लंघिती ॥ ऐसें नबोलवेचि व्याप्ति ॥ नाहीं नह्मणवेचि निश्चिति ॥ एकें देखिजती उल्लंघितां ॥ ६५ ॥ तेंवि काळाचा बळात्कार ॥ तेथें कर्मानिल प्रेरणापर ॥ सुरनरतिर्यकां भ्रमणकर ॥ कोण्ही दुस्तर लंघिती ॥ ६६ ॥ तयां क्वचित्जीवांमाजी ॥ कृष्णदर्शन मजही आजि॥घडेल ऐसें हृदयांभोजीं ॥ भावूनि पूजी हरि ध्यानीं ॥ ६७ ॥

ममाद्यामंगलंनष्टंफलवांश्चैवमेभवः ॥ यन्नमस्येभगवतोयोगिध्येयांघ्रिपंकजम् ॥ ६ ॥

॥ ठीका ॥ भगवत्प्राप्तीचें कारण ॥जें मज भगवत्प्रेमा पूर्ण॥उदेला तेव्हांचि अकल्याण॥भंगोनि कल्याण उदेलें ॥ ६८ ॥ भगवत्प्रेमाची प्रवृत्ति ॥ तेचि अमंगळाची हंती ॥ आजि ते बहुवस[2] उदेली चित्तीं ॥ अमंगळभ्रांति तद्योगें ॥ ६९ ॥ माझें जन्म आजि सफळ ॥ ऐसा निश्चय जाला अढळ ॥ ज्या कारणास्तव तो घननीळ ॥ भक्तवत्सल वंदीन ॥ ७० ॥ योगीश्वरां जे चूडामणि ॥ तेही पदाब्ज पूजिती ध्यानीं॥ ते मी प्रत्यक्ष पाहोन नयनीं ॥साष्टांग मूर्ध्नि वंदीन ॥ ७१ ॥ ज्याचिया चरणरजाचे प्राप्ती ॥ पंकजभव[3] भव[4] सकामे चित्तीं ॥सनकादि तपश्चर्या करिती ॥

---

१ गवत व कोंडा. २ फार. ३ ब्रह्मदेव. ४ शंकर.

ध्यानीं हरिमूर्तिपहावया ॥ ७२ ॥ आजि कंसाच्या निदेशमात्रें ॥ ते मी प्रत्यक्ष पाहीन नेत्रें ॥ कंसउपकार वर्णी वक्रें स्फुरती गात्र हरिप्रेमें ॥ ७३ ॥

कंसोबताऽद्याकृतमेत्यनुग्रहंद्रक्ष्येंऽघ्रिपद्मंप्रहितोऽमुनाहरेः ॥
कृतावतारस्यदुरत्ययंतमःपूर्वेऽतरन्यन्नखमंडलत्विषा ॥ ७ ॥

॥ टीका ॥ बतशब्दार्थें आश्चर्य परम ॥ मानूनि ह्मणे हा कंस विषम ॥ तो मजला कल्पद्रुम ॥ हरिपदप्रेमफळदानें ॥ ७४ ॥ कंसें अनुग्रह केला मज ॥ जे आणावयासि गरुडध्वज ॥ प्रेरिलों यास्तव अधोक्षज ॥ पाहोनि पदाब्ज वंदीन ॥ ७५ ॥जो कां केवळ परब्रह्म ॥ तो हा श्रीकृष्ण पुरुषोत्तम ॥ साधुरक्षक वधूनि अधम॥ स्थापक धर्म अवतरला ॥ ७६ ॥ कंसाज्ञेवरूनि त्याचे ॥ आजि पदाब्ज मी पाहीन साचे॥जिहीं पूर्वीं बहु भक्तांचें॥[1]अंधतामिस्र निरसिलें ॥ ७७ ॥ अंबरीषादि राज[2]र्षिवृंद ॥ आश्रयूनि जें चरणारविंद ॥ ताम[3]स दुरत्य[4]य अगाध ॥ तो भवसिंधु निस्तरले ॥ ७८ ॥ अज्ञानतमाब्धि भव हा निबिड ॥ तेथ हरिपदनखमार्तंड ॥ तत्प्रकाशें तरले सुघड ॥ अल्पही अवघड नमनूनी ॥ ७९ ॥ ते मी आजि कंसकाजें ॥ पाहीन भगवत्पदांबुजें ॥ कृपा केली अधोक्षजें ॥ येऱ्हवीं नुमजे हरिग[5]रिमा ॥ ८० ॥

यदर्चितंब्रह्मभवादिभिःसुरैःश्रियाचदेव्यामुनिभिःससात्वतैः ॥
गोचारणायानुचरैश्चरद्वनेयद्गोपिकानांकुचकुंकुमांकितम् ॥ ८ ॥

---

१ निबिड अज्ञान. २ क्षत्रिय असून ब्रह्मनिष्ठ. ३ अज्ञानमय. ४ टाळतां न येणारा. ५ श्रीकृष्णाचें महत्त्व.

॥ टीका ॥ हरिपदगरिमा कोणेपरी ॥ जेथींची अचिंत्य गुणसामग्री ॥ वर्णूं नशकेचि वागीश्वरी[1] ॥ मां कैंवि ते इतरीं उमाणिजे[2] ॥ ८१ ॥ ऐश्वर्यसत्तायोगवरिष्ठ ॥ ह्मणोनि कंजज[3] नीलकंठ ॥ सदैव अर्चूनि हरिपदपीठ ॥ नमिती मुकुटसंघृष्टि ॥ ८२ ॥ आदिशद्बें जो ईश्वर ॥ ज्याचे विधिहर गुणावतार[4] ॥ तोही नपवे ऐश्वर्यपार ॥ ह्मणोनि तत्पर पदभजनीं ॥ ८३ ॥ असो हे ऐश्वर्याची गरिमा ॥ परी सौभाग्यविभागें आगळी रमा ॥ तेही लंपट हरिपदपद्मा ॥ लावण्यमहिमा विसरूनी ॥ ८४॥ क्षीराब्धिमथनीं सुरवरकोटि॥विधिहरादि लक्षूनि दृष्टि ॥ हरिपदकमळीं घालूनि मिठी ॥ येरें करंटीं उपेक्षिलीं ॥ ८५ ॥ निलयललनाललामलास्या॥ लक्षूनि लालस लिगटती तोषा ॥ सोडूनि कैवल्यसुखाची आशा ॥ भवदुर्दशाभिभूत ॥ ८६ ॥ कांताकनकादि निकेतनीं[5] ॥ कमनीयत्व[6] कौशल्यगुणीं ॥ ग्रथित ग्रस्तांच्या देखोनि श्रेणी ॥ निर्मुक्त मुनीं तत्त्यागें ॥ ८७ ॥ श्रीसौभाग्या देवूनि पाठी ॥ सदन सुंदरी सुवर्णकोटी ॥ निगड क्ष्वेड बडिश पोटीं ॥ मानून हठी निष्टले ॥ ८८ ॥ ऐसे भवरसरतिविरक्त ॥ मुनिजन सज्जन सात्वत भक्त ॥ तेही होऊनि पादाब्जनिरत ॥ परमपुरुषार्थ साधिला ॥ ८९ ॥ अपवर्गार्थ सात्वत मुनि ॥ रंगले ज्याचे श्रीपादभजनीं ॥ त्याची प्राप्ति सामान्य जनीं ॥ लाहिजे कोठूनि जरी ह्मणिजे ॥ ९० ॥ राजा दुर्गम दुर्गांतरीं॥द्वास्थ पार्षद वेत्रधारी ॥ उद्भट भटसंघ गोप्तारीं ॥ कैंवि पामरीं तो भजिजे ॥ ॥९१ ॥मृगयायात्रायानीं वनीं ॥ सर्वां सुलभ नृप दर्शनीं ॥ह्मणाल तरि तो तेही स्थानीं॥पार्षदगणीं अभिगुप्त॥ ॥९२॥राजा अल्पक मानवकोटीं ॥ तत्प्राप्तीची दुर्लभ गोठी ॥ मा ज्यातें नमिती विधि हर मुकुटीं॥ त्याची भेटी कैंवि घडे ॥ ९३ ॥ तरी हा केवळ जगज्जीवन ॥ परम कृपाळु श्रीभगवान ॥ सवें घेऊनि अनुचरगण ॥ धे-

---

१ सरस्वती. २ तर्किजे. ३ ब्रह्मदेव. ४ रजस्तमोगुणमय अवतार. ५ गृह. ६ सुंदरत्व.

नुरक्षणकार्यार्थ ॥ ९४ ॥ भूतमात्राच्या कारुण्यें ॥ चरणीं नघालूनि पादत्राणें[1] ॥ गोगोपनार्थ विचरे बनें ॥ अंतःकरणें कळवळुनी ॥ ९५ ॥ तेथ चरणस्पर्शासाठीं ॥ मोक्ष पावती कोट्यानुकोटी ॥ नाहीं कोण्हाही आडकाठी ॥ कृपाळु पोटीं सर्वज्ञ ॥ ९६ ॥ कित्तेक दर्शनें संस्पर्शनें ॥ स्मरणें क्रीडनें अवलोकनें ॥ अनुचिंतनें संभाषणें ॥ ध्यानें नमनें उद्धरती ॥ ९७ ॥ अनंत तपांची सामग्री ॥ जिहीं अच्छिद्र बांधिली पदरीं ॥ ते येथ तृणादिदेहधारी ॥ हरि उद्धरी पदस्पर्शें ॥ ९८ ॥ शास्त्रपरिभाषाप्रसिद्धि ॥ कर्माचरणें चित्तशुद्धि ॥ जालिया होय ज्ञानोपलब्धि ॥ हरिसन्निधि तैं जोडे ॥ ९९ ॥ तैसा येथें दुर्घट कांहीं ॥ साधनांचा पांगडा[2] नाहीं ॥ हरिपदप्रेमा उदेल्या देहीं ॥ सुलभ सर्वांही सर्वत्र ॥ १०० ॥ कोण गोपींचीं कर्माचरणें ॥ कीं वेदशास्त्राध्ययनें पठनें ॥ योगाभ्यसनें पुरश्चरणें ॥ अपरोक्षज्ञानें त्यां कैंचीं ॥ १ ॥ निःसीम अनन्य प्रेमा देहीं ॥ अवंचकभावें अनुरत पायीं ॥ विरत जाणोनि देहीं गेहीं ॥ देहीं विदेही त्या रमवी ॥ २ ॥ कुंजसदनीं यमुनापुलिनीं ॥ वृंदावनीं गोवर्द्धनीं ॥ सुलभ गोपींतें अनुदिनीं ॥ हरिपदनलिनीं कुचघृष्टि ॥ ३ ॥ एवं स्वर्चित विधिहरप्रमुखीं ॥ लक्ष्मी ज्याच्या भजनें सुखी ॥ मुनिजन सात्वत उपासकीं ॥ मोक्षकामुकीं जें सेव्य ॥ ४ ॥ जे पद वयस्यानुचरगणीं ॥ मिश्र फिरती वृंदाविपिनीं ॥ अनुकंपार्थ गोचारणीं ॥ ते आजि नयनीं पाहीन ॥ ५ ॥ गोपीकुचकुंकुमपंकिल[3] ॥ तळवां सामुद्रसुचिह्नमेळ ॥ अघहर जेथें गंगाजळ ॥ त्रिजगन्मंगळ संभवलें ॥ ६ ॥ ऐसें ज्याचें पादारविंद ॥ तो आजि पाहीन मी गोविंद ॥ उजवे जाती कुरंगवृंद[4] ॥ फलितार्थ विशद हा त्याचा ॥ ७ ॥ हरि अवतरला दैत्यदलना ॥ तो आजि गोचर होईल नयना ॥ सुंदर अवयव आणूनि ध्याना ॥ करी चिंतना तें ऐका ॥ ८ ॥

---

[1] जोडा. [2] परावीनत्व. [3] चिखलानें युक्त. [4] हरिणसमूह.

द्रक्ष्यामिनूनंसुकपोलनासिकंस्मितावलोकारुणकंजलोचनम् ॥
मुखंमुकुंदस्यगुडालकावृतंप्रदक्षिणंमेप्रचरंतिवैमृगाः ॥ ९ ॥

॥ टीका ॥ कृष्णमृगाचिया पंक्ति ॥ प्रादक्षिण्यें[1] शकुन देती ॥ बहुतेक आजी कृष्णमूर्ति ॥ शुभसंकेतीं[2] देखेन ॥ ९ ॥ त्या कृष्णाचें सुंदर मुख ॥ अरुणापांग सरळ नासिक ॥ आकर्णनयन केसरी तिलक ॥ स्मितभा[3] मृगांक लाजवी ॥ १० ॥ कुंडलमंडित गंडयुगळ ॥ गुडाळक ह्मणजे कुटिल कुंतळ ॥ सुभगलावण्यलक्ष्मी बहळ ॥ तें मुखकमळ पाहीन मी ॥ ११ ॥ ऐसे संकल्प करूनि पोटीं ॥ असंभावना परती लोटी ॥ हृदयपल्लवीं शकुनगांठी ॥ बांधोनि गोठी हे बोले ॥ १२ ॥

अप्यद्यविष्णोर्मनुजत्वमीयुषोभारावतारायभुवोनिजेच्छया ॥
लावण्यधाम्नोभवितोपलंभनंमह्यंननस्यात्फलमंजसादृशः ॥ १० ॥

॥टीका॥ ऐसें चिंतूनि कृष्णवदन ॥ नावरे प्रेमाचें अवतरण ॥ पुनरपि साकल्यें चिंतन ॥ करी सद्गुणसमवेत ॥ १३ ॥ निजजनाचे इच्छे करून ॥ मनुष्यवेष अवलंबून ॥ विष्णु ह्मणिजे व्यापक पूर्ण ॥ त्याचें दर्शन लाहीन मी ॥ १४ ॥ कोण्या कारणें मनुष्य होणें ॥ तरी भूभार फेडावयाचि कारणें ॥ अखिल लावण्या मिरवणें ॥ आश्रय होऊनि निज तेजें ॥ १५ ॥ जया तेजाचा कडवसा[4] ॥ पवाड[5] होय विश्वाभासा ॥ निवाड[6] त्याचिया लावण्यरसा ॥ कोणा सौरस करावया ॥ १६ ॥ ज्याची चित्प्रभा चराचरीं ॥ लावण्यरसाची माधुरी ॥ रंगें रोचक गोगोचरीं ॥ तो वैखरी कैंवि वदवे ॥ १७ ॥ त्या विष्णूचें लावण्यरूप ॥ आजि पाहीन मी सक्रूप ॥ सफ-

---

१ दक्षिणे कडून जाण्यानें. २ उत्तम शकुनांनीं. ३ हास्यकांति. ४ आधार. ५ महत्त्व. ६ निश्चय.

ळ होईल हा संकल्प ॥ तैं भाग्य अमूप नेत्रांचें ॥ १८ ॥ ऐसें नघडे काय ह्मणून ॥ अवश्य घडेल हा निश्चय पूर्ण ॥ तरीच होती मज शुभ शकुन ॥ वृथा अनुमान कां कल्पूं ॥ १९ ॥ तस्मात नघडे ऐसें नव्हे॥होइल हा निश्चय जीवें ॥ करितां पुढती शंका शिवे ॥ विवेकविभवें ते निरसी ॥ २० ॥ तैं चौं श्लोकांचें कुलकं ॥ श्लोकत्रयें शंकापंक ॥ निरसूनि तोष दर्शनात्मक ॥ चौथा श्लोक उपपादी ॥ २१ ॥ तरी ते शंका ह्मणाल कैसी ॥कर्तृत्वभोक्तृत्वादि आवेशीं ॥कृष्णीं प्रवृत्ति आह्मांचि ऐसी ॥ तैं विष्णुत्व त्यासी कैंवि घडे ॥ २२ ॥ इये शंकेच्या निरसनीं ॥ विरवण वदली अरवाणी ॥ शुकें घातली नृपाकर्णीं ॥ ते ध्या श्रवणीं अवधानें ॥ २३ ॥

यईक्षिताऽहंरहितोऽप्यसत्सतोःस्वतेजसाऽपास्ततमोभिदाभ्रमः ॥
स्वमाययात्मन्नचितैस्तदीक्षयाप्राणाक्षधीभिःसदनेष्वभीयते ॥ ११ ॥

॥ टीका ॥ जऱ्ही प्राकृत दिसे कृष्ण ॥ तऱ्ही तो प्रकृतिधर्मविहीन ॥ शुभाशुभकार्यकारण ॥ अहंताशून्यही अवलोकी ॥ २४ ॥ देहाहंता नसतां एक ॥ कर्तृत्व भोक्तृत्व हर्ष शोक ॥ कोणे ठायीं भेद कळंक॥ भासोनि पंक माजवी पां ॥ २५ ॥ ह्मणाल अहंता ते काय॥तरी अवघा आत्मप्रत्यय॥झांकतां विक्षेप करी उदय ॥ भेदासि ठाय त्यामाजी ॥ २६ ॥ एकला एकातीं शयन करी ॥जागृति प्रत्यय सुषुप्ति आवरी॥विक्षेपस्वप्नभ्रमांतें प्रसरी॥ तैं भेद उभारी सुखदुःखा ॥ २७ ॥ तेथ क्षणिकें विषयाभासें ॥ सुखदुःखादि पूर्वाध्यासें ॥ भोगितां हर्षे शोकें त्रासें ॥ एवं ऐसें स्वाज्ञान ॥ २८ ॥ अविद्यावरण ह्मणिजे तम ॥ विक्षेप तो भेदोद्गम॥ विषयाभास केवळ भ्रम ॥

---

१. पांच सहा इ० अनेक श्लोक मिळून एकान्वयानें एक विषयाचें वर्णन केलें असतें असा कवितेचा प्रकार.

देह अहंमम दृढावी ॥ २९ ॥ तो कर्तृत्वभोक्तृत्वाभिनिवेश[1] ॥ घालूनि सुखदुःखांचे पाश ॥ जागवूनियां षड्वैरियांस
॥ रात्रिदिवस जाचवी ॥ ३० ॥ कृष्णीं अपास्त[2] हे अवघेची ॥ ह्मणोनि ऊर्मी अहंतेची ॥ नुठे यास्तव
आनंदाची ॥ नित्योपलब्धि प्रकाशे ॥ ३१ ॥ ह्मणाल कृष्णही देहधारी ॥ तमादि भ्रम त्याकां नावरी ॥तरी
स्वतेजसा या पदावरी ॥ जाणिजे चतुरीं निर्भ्रमता ॥ ३२ ॥ नित्य स्वरूपसाक्षात्कार ॥ स्वप्रत्यय जैं अनावर ॥
तैं त्या कोठूनि पडेल विसर ॥ कैंवि तमांकुर विरूढेल ॥ ३३ ॥ जेथ तमाचें आवरण नाहीं ॥ तेथ विक्षेप कैंचा
काई ॥ विक्षेपें विण भेद पाहीं ॥ कोणा कहीं उपजेल ॥ ३४ ॥ भेदेंविण कर्ता भोक्ता ॥या अभिनिवेशें देहाहंता
कैंवि भ्रमवील नित्यतृप्ता॥चैतन्यनाथा श्रीकृष्णा॥३५॥ह्मणाल हें जरी कृष्णीं नघडे॥तरी गोपींसीं कैसा क्रीडे॥
संगोपूनि निज संवडे ॥ दैत्य गाढे निर्दाळी ॥ ३६ ॥ तरी आत्मनि ह्मणिजे आपुले ठायीं ॥ आपुल्या
ईक्षणसत्ता पाहीं ॥ आपुले मायेच्या प्रवाहीं ॥ रची सर्वही संकल्पें॥३७॥धी बोलिजे कर्तृकरणा ॥ प्राण ह्मणिजे
चेष्टाकरणा ॥ ज्ञानकर्मात्मका संज्ञा ॥ अक्ष ऐसी जाणावी ॥ ३८ ॥ इत्यादि करणीं सावयव ॥ स्वसत्ता निर्मूनि
विविध जीव ॥ अभेदबोधें वासुदेव ॥ क्रीडे स्वमेव ऐश्वर्यें ॥३९॥ लता[3]पिहितकुंजसदनीं॥विचित्रलीला॥
कर्माचरणीं ॥ आसक्त भाविजे मुग्धीं जनीं ॥ परी जाणती ज्ञानी अनासक्त ॥ ४० ॥ जो ज्या उत्कट चिंतितार्थ
॥ तो त्या प्रत्ययगोचर होत ॥ तैसा आभिमुख्यें भासत ॥ कर्मासक्तवत् श्रीकृष्ण॥ ४१ ॥एवं आह्मां
समान कृष्ण ॥ देही नोहे हा निश्चय पूर्ण ॥ कर्तृत्वभोक्तृत्वाभिनिवेशशून्य॥हा पूर्णचैतन्य परमात्मा॥ ४२ ॥
ऐसी शंकेची निवृत्ति ॥ करूनि पुनः विवरी चित्तीं ॥ जे नित्यतृप्ता लीलाआचरिती ॥ कैंवि प्रवृत्ति ह्मणावी

---

[1] अभिमान. [2] दूर टाकिलेले. [3] वेलींनीं झांकलेले.

॥ ४३ ॥ तरी जगदुद्धाराचि कारणें ॥ पूर्ण स्वजनांच्या कारुण्यें ॥ अनुग्रहार्थ लीलाचरणें ॥ करी तीं श्रवणें
परिसावीं ॥ ४४ ॥

यस्याखिलामीवहभिःसुमंगलैर्वाचोविमिश्रागुणकर्मजन्मभिः ॥
प्राणंतिशुंभंतिपुनंतिवैजगद्यास्तद्विरक्ताःशवशोभनामताः ॥ १२ ॥

॥ टीका ॥ ज्याचे जन्मकर्मगुण ॥ तिहीं करूनि मिश्र व्याख्यान ॥ ज्याच्या वाणी करिती कथन ॥
जगत्कल्याण त्या वाणी ॥ ४५ ॥ पूर्णपणासि नपडे तुटी ॥ अव्ययत्वाची नसुटे गांठी ॥नपचतांचि गर्भघटीं॥
योनिसंकटीं नकोंडतां ॥ ४६ ॥ ऐसीं अयोनिसंभवजन्में[1] ॥ कारुण्यगुणादि अनंत नामें ॥ वाणी वर्णिती ज्या
सप्रेमें ॥ अगाध कर्में यशोंऽकितें ॥ ४७ ॥ ज्याच्या जन्मकर्मगुणीं ॥अमीवें ह्मणिजे पातकश्रेणी ॥ श्रवणमात्रें
त्यांची धुणी ॥ करी दिनमणि जेंवि तमा ॥ ४८ ॥ सकळ पातकां होतां भंग ॥ क्षाळला अमंगळ प्रसंग ॥
यास्तव मंगळवृद्धि सांग॥ पिके अव्यंग ते ठायीं ॥४९॥ गुणकर्मादिविमिश्रा वाणी॥अमृतरूपा जगज्जीवनीं॥
प्राणंति या पदव्याख्यानीं ॥नृपा शुकमुनि बोलिला ॥ ५० ॥ तव कथामृत ऐसें ॥ गोपीगीतीं गाइलें असे॥
तेंचि अक्रूरें निजमानसें ॥ चिंतनमिसें विवरिलें ॥५१॥ त्रिजगल्लक्ष्मीचें शोभन॥ जन्मकर्मगुणांचें कथन॥आणि
पवित्रा गंगेहून ॥ गुणकीर्तनमयवाणी ॥५२ ॥ ऐसिया वाणी त्रिजगाप्रति॥प्राणंति[2] ह्मणिजे जीवविती॥शुंभंति[3]
ह्मणिजे शोभविती ॥ बोलिजे पुंनंति[4] पावनता ॥ ५३ ॥ एवं जन्मकर्मगुणविमिश्रा ॥ वाणी निखिल चराचरा॥

---

१ शुक्रशोणितसंयोगानें ज्यास जन्म नाहीं तो. २ जगवितात. ३ शोभवितात. ४ पवित्रकारितात.

जीववी शोभवी आणि निष्पापकरा ॥ मंगलप्रचुरा पुण्यदा ॥ ५४ ॥ अमृतरूपा मंदाकिंनी ॥ लक्ष्मीशोभना रविनंदिनी ॥ सरस्वती ते विश्वपावनीं ॥ एवं त्रिवेणी हरिकीर्ति ॥ ५५ ॥ तीर्थीं व्रतीं तपीं दानीं ॥ पुरश्चरणीं यज्ञविधानीं ॥ चर्तुविधपुरुषार्थांची खाणी ॥ तें फळ कीर्तनीं अक्षय ॥ ५६ ॥ विविधा कर्मीं पृथक् फळें ॥ पुण्यक्षयें होती विकळें ॥ हरिकीर्तनीं जोडती सकळें ॥ तीं नहोती विकळें कल्पांतीं ॥ ५७ ॥ जन्मकर्मगुणामिश्रिता ॥ ऐसी जया वाणींत नाहीं कथा ॥ तिया वाणी चातुर्यभरिता ॥ लावण्ययुक्ता शवरूपा ॥ ५८ ॥ भगवद्गुणीं ज्या विमुखा वाणी॥ अशुभफळांच्या केवळ खाणी ॥वैदिकी लौकिकी सूक्तपठनीं॥कदा कल्याणी नफळती ॥५९॥हरिगणविमुखीं आशीर्वाद॥दिधल्या होती अशुभप्रद॥रजस्वलेचें सोवळें शुद्ध॥जेंवि अशुभफळदानी॥६० ॥ शव अपवित्र जेंवि श्मशानीं ॥ कीं जीताचि बाळरंडा कामिनी ॥ हरिगुणविमुखा चातुर्यखाणी ॥ परी त्या वाणी शवरूपा ॥ ६१ ॥ श्मशानीं शवासनीं अभिचार ॥ जारणमारणादि साबरमंत्र ॥ साधूनि होती पात्रापात्र ॥ तेंवि अपवित्र फळदात्या ॥ ६२ ॥ शव उपयोग साबरागमीं ॥ तेंवि बाळरंडा ही पूज्य वामीं ॥ परी ते योग्यता नरकधामीं ॥ पूज्या पूजकां पाचक ॥ ६३ ॥ साहित्य अळंकार नाटकें ॥ संगीत शृंगाररस कौतुकें ॥ हो का काव्यव्याकरणप्रमुखें ॥ लावण्यरोचकें वाणीचीं ॥ ६४ ॥ हो का श्रुतिप्रवीणा वाणी ॥ मीमांसादि अनुष्ठानीं ॥ परी ज्या विमुखा भगवद्गुणीं ॥ त्या शव ह्मणोनि अशुभदा ॥६५॥ अशुभें त्यांचीं कर्मफळें॥ ह्मणोनि पचविती गर्भखोळे ॥ जन्ममृत्यूचे उमाळे॥दुःखें वहळें भोगविती ॥ १६६ ॥ शास्त्राभ्यासें लावण्यभरिता ॥ परी शवासमान ज्या हरिगुणरहिता ॥ त्या वाणींतें सादर श्रोता ॥ प्रेतान्नभोक्ता तो जाणा ॥ ६७ ॥

---

१ गंगा. वाम ह्म० शक्तिमार्ग.

वेदवरिष्ठ जऱ्ही झाला ॥ तरी तो शरण हरिगुणांला ॥ कर्मसांगतासिद्धि वदला ॥ विष्णुस्मरणें सर्वत्र ॥ ६८॥
शव नासोनि सुटे घाणी ॥ तैसिया हरिगुणविमुखा वाणी॥ निंद्य अपवित्र दुर्गुणी ॥ नरकश्रेणीफळरूपा ॥ ६९ ॥
बालरंडा रूपसंपन्ना ॥ नट लेवूनियां आभरणा ॥ पाहे स्मितवक्त्रें दर्पणा ॥ तें पुंश्चलीचिह्नां प्रकटी कीं ॥ ७० ॥
तनुतारुण्यें लावण्यपुष्टि ॥ तों ते मन्मथें होय कष्टी॥ परपुरुषाचे मैथुनघृष्टी॥ अघसंकटीं कुळ बुडवी ॥ ७१ ॥
बालरंडेसी रजोदर्शन ॥ होतां संस्कार करी कोण ॥ असंस्कारी सर्वाचरण ॥ प्रेतासमान जितातें ॥७२ ॥ बालरंडा
लावण्ययुवति ॥ सालंकृता ही भेटल्या पंथीं ॥ अशुभसूचक कार्यघाती ॥ भले मानिती अपशकुन ॥७३॥
बालरंडेच्या हातींचा पाक ॥ शुचिमत विधिपूर्वक॥तथापि हव्य[1]कव्या[2]त्मक ॥भोजनीं कुंभपाक नचुकती॥७४॥
बाळरंडेचें सोवळेपण ॥ तें प्रेतसंपर्का समान ॥ पिता बंधु आप्त स्वजन ॥ ममता धरून कालविती ॥ ७५ ॥
शास्त्रीं निंद्य परि ममता नसुटे ॥ यालागीं सोवळें तिचेंचि मोठें ॥ ब्राह्मणस्पर्शें तें उफराटें ॥ सचैल करी शुद्धत्वें
॥ ७६ ॥ रजोदर्शनीं संस्कारवंता ॥ पुरुषभुक्ता वैधव्यप्राप्ता ॥ सदोषा नसती विरक्ता असतां ॥ बालरंडे
सम त्या पैं ॥७७॥सुपुत्रवंता वैधव्यप्राप्ता ॥ पुत्रयोगें त्यां कर्मार्हता॥दोष नाहीं त्यांचिया माथां ॥ सौभाग्यभरिता
जाणाव्या ७८ ॥ पिताचि आपण गर्भवासी ॥ परिणमोनि जन्म पावे कुसीं ॥ उपनयनीं तो
स्वकर्मासी ॥ पुत्रापासीं निक्षेपी ॥७९॥अधिकार करूनि श्रौतीं स्मार्ती॥स्वपत्नी देऊनि पुत्राहातीं॥कर्मसंन्यासें
होय यति॥तैं कर्मच्युति त्यां नाहीं ॥ ८० ॥ भर्त्तार पुत्ररूपें कुसीं ॥ ह्मणोनि वैधव्य नाहीं तिसी ॥ एवं प्रेतत्व
बालरंडेसी ॥ उत्क्रांतदशी मुनि वदती॥८१॥ प्रैषोच्चारपूर्वक आतुर॥अथवा विद्वद्यतीश्वर॥त्याचें प्रेतही

---

[1] हव्य-देवां करितां जें अन्न तें. [2] कव्य-पित्रां करितां जें अन्न तें.

परम पवित्र ॥ अशौचसंचार त्या नाहीं॥८२॥परंतु हरिगुणविमुखा वाणी ॥ त्या प्रेतापरीस अशौचखाणी ॥ घेतां श्रवणीं पठनीं मननीं ॥ अकल्याणीं नांदविती ॥ ८३ ॥बालरंडा जऱ्ही असंस्कारी ॥ वैराग्ययुक्ता निरहंकारी ॥ हरिगुणकीर्तिं पढे वैखरी ॥ तरी धन्य संसारीं पावन ते ॥८४॥ नवंचूनियां तनु मन प्राण ॥ अमत्सरत्वें हरिगुणभजन ॥ नीचकर्मीं निरभिमान ॥ उल्लास पूर्ण हृत्कमळीं ॥ ८५ ॥ जितेंद्रियत्वें हरिगुणपठन ॥ भर्तारस्रूपी श्रीभगवान ॥ त्हृदयीं ठसावतां संपूर्ण ॥बाळरंडापण मग कैंचें ॥८६॥ भर्ता भगवान रुचला मनीं॥ हरिगुणपठनीं रंगली वाणी ॥ शरीर रंगलें हरिगुरुभजनीं॥तैं सुकृतखाणी ते होय ॥८७॥ तिचें पदजल वंदिती सुर ॥ विधिहर होती आज्ञाधर ॥ सप्रेम हरिगुणवाग्व्यापार॥जाणोनि श्रीधर संगोपी ॥८८॥ तैं अशुभें तितुकीं शुभदें होती ॥ महापातकें क्षया जाती ॥ हरिगुणपठनीं ऐसी शक्ति ॥ जे नपढती ते प्रेत ॥८०॥निंद्य कुंटिनी अपवित्र ॥ पक्षिपालनीं नामोच्चार॥ कारितां पावली तमसःपर[1] ॥ वैकुंठपुर अक्षय ॥९०॥ पिंगलानामें केवळ गणिका ॥ हरिगुणपठनें अक्षय सुखा ॥ पावली ते तुज कुरुकुलतिलका ॥ पुढिले स्कंधीं कथीन ॥ ९१ ॥ जऱ्ही तो प्राणी आचारभ्रष्ट ॥ परि भवीं विरक्त एकनिष्ठ ॥वाचेसि कारितां हरिगुणपाठ॥पावे वैकुंठ अनायासें ॥९२ ॥ अजामिळाच्या पातकराशि ॥ कीं जें घडलें वाल्मीकासी ॥ तें पूर्वीं म्यां तुजपासीं ॥ नाममहिमेंशीं निरोपिलें ॥ ९३ ॥ एवं हरिगुणपठनापुढें ॥ ब्रह्मांडभरीही पातक उडे ॥ पावन हरिगुण जो नर नपढे ॥ तो जिताचि मढें अपवित्र ॥ ९४ ॥ तस्मात् हरिगुणविमुखा वाणी ॥सालंकृता रसाळपणीं ॥ बालरंडा त्या व्यभिचारिणी ॥ प्रेताहिहूनि अपवित्रा ॥ ९५ ॥ ज्या ज्या विरक्ता हरिगुणपठनीं ॥ त्या शव शोभना संमता वाणी

---

[1] अज्ञानापासून दूर राहणारा.

या पदाचे स्फुट व्याख्यानीं ॥ दूषण बुधजनीं नमनावें ॥ ९६ ॥ ऐसें ज्याचें मंगल यश ॥ तोचि हा यदुकुळीं आदिपुरुष ॥ कां अवगला पशुपवेष ॥ हृषीकेश तें ऐका ॥ ९७ ॥

सचावतीर्णःकिलसात्वतान्वयेस्वसेतुपालामरवर्यशर्मकृत् ॥
यशोवितन्वन्व्रजआस्तईश्वरोगायंतिदेवायदशेषमंगलम् ॥ १३ ॥

॥ टीका ॥ भगवन्निर्मित स्वधर्मसेतु ॥ वर्णाश्रमादि जे कर्मतंतु ॥ तद्रक्षक जे अमरनाथु ॥ त्यां सुखहेतु अवतरला ॥ ९८ ॥ अमरवर्यां जो सुखसागर॥स्वयें व्रजपुरीं तो ईश्वर ॥ करूनि दैत्यांचा संहार॥कीर्ति अपार विस्तारी ॥ ९९ ॥ पीयूषबाह्य जैसे अमर ॥ अखिल तेजस्वी भास्कर ॥ तैसे अशेष मंगलकर ॥ यश पवित्र जयाचें ॥ २०० ॥ अशेष मंगल निर्जर गाती ॥ ज्याची पातन यशःसंपत्ति ॥ त्रिजगदुद्धरणीं अगाध कीर्ति ॥ तो श्रीपति व्रजवासी ॥ १ ॥ बहुतेक त्याचें मज दर्शन ॥ होईल ऐसें भावूनि पूर्ण ॥ अक्रूर आपणा मानी धन्य ॥ तें निरूपण अवधारा ॥ २ ॥

तंत्वद्यनूनंमहतांगतिंगुरुंत्रैलोक्यकांतंदृशिमन्महोत्सवम् ॥
रूपंदधानंश्रियईप्सितास्पदंद्रक्ष्येममासन्नुषसःसुदर्शनाः ॥१४॥

॥ टीका ॥ ब्रह्मांडभुवनींचें लावण्य ॥ एकात्मता पावलें पूर्ण ॥ दृष्टिमंतांसि महोत्सव करण ॥ ज्याचें द-

---

१ जातीचे चार आश्रम आहेत ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, यति.

र्शन बहुभाग्यें ॥ ३ ॥ महान ह्मणिजे विधिहरप्रमुख ॥ ज्यांतें वंदिती अखिल लोक ॥ त्यांसही गतिप्रद जो देख ॥ ह्मणोनि पदांक ते वाहती ॥ ४ ॥ अज्ञानसुषुप्ति[1]प्रलयावस्छा ॥ फेडूनि तामसी अहंता ॥ पूर्णात्मत्व प्रकाशितां ॥ तो महंतां गतिप्रद ॥ ५ ॥ जागररूपा जे उत्पत्ति ॥ ते निरसूनि विक्षेपभ्रांति ॥ काढूनि रजोगुणाची बुंथी ॥ पूर्णात्मस्थितिप्रापक जो ॥ ६ ॥ सनकादि ऊर्ध्वरेते व्रती ॥ ज्याचे स्वरूपीं त्यांची गति ॥ ह्मणोनि शोभे गुरुत्वशक्ति ॥ त्रिजगदुत्पासिस्थितिनाशी ॥ ७ ॥ त्रिजगदुद्धर्ता जो गुरुवर ॥ आखिल लावण्य एकाकार ॥ नेत्रवंतासि उत्साहकर ॥ रूप सुंदर देखोनी ॥ ८ ॥ इंदिरेनें एकांतइच्छे ॥ नरसुराविधिहर केलीं तुच्छें ॥ तें-रूप धरूनि गोगोपवत्सें ॥ रक्षी स्वेच्छें तें सम जो कां ॥ ९ ॥ त्या कृष्णाचें आजि दर्शन ॥ बहुतेक भाग्यें मी लाहीन ॥ किमर्थ ह्मणों तरी शुभप्रद शकुन ॥प्रभाते पासून होताती ॥ १० ॥ उषसीं करितां आत्मचिंतन लविन्नला दक्षिण नयन ॥ दक्षिणबाहु करीस्फुरण ॥ सुप्रसन्न हृत्कमळ ॥ ११ ॥ सुस्नात सालंकृत हास्यवदन॥ प्रभाते भेटले ब्राह्मण ॥ सपुत्रसुवासिनींचा गण ॥ सौभाग्यमंडित भेटला ॥ १२ ॥ धेनु सवत्सा स्नुतस्तनी॥ प्रफुल्ल कुसुमेंसी माळिणी ॥ दधिदुग्धेंसीं व्रजगौळिणी ॥ प्रयाणारंभीं भेटल्या ॥ १३ ॥ उषःकाळीं सुष्ठु चिह्नीं ॥ शुभसूचका जाल्या रजनी ॥ आजि हरिपद देखेन नयनीं ॥ निश्चय शकुनीं दृढ केला ॥ १४ ॥ पादाब्जदर्शनानंतरें ॥ नमनोत्साह सप्रेमभरें ॥ आधींच कल्पीचित्तें आतुरें ॥ तियें उतरें परिसावीं ॥ १५ ॥

अथावरूढःसपदीशयोरथात्प्रधानपुंसोश्चरणंस्वलब्धये ॥
धियाधृतंयोगिभिरप्यहंध्रुवंनमस्यआभ्यांचसखीन्वनौकसः ॥ १६ ॥

---

[1] अज्ञान व सुषुप्ति हीच मलययस्थिति·

॥ टीका ॥ हरिपद देखिल्या नंतर ॥ रथापासूनि अतिसत्वर ॥ उडी टाकूनि दण्डाकार ॥ लोटीन शरीर भूभागीं ॥ १६ ॥ प्रधान ह्मणिजे श्रेष्ठपुरुष ॥ रामकृष्ण गोपाळवेष ॥ नटले ईश्वर जाणोनि त्यांस ॥ नमीन सावकाश तत्क्षणीं ॥ १७ ॥ ज्यांचें चरणपंकज मुनि ॥ आत्मप्राप्ति अभिलाषुनी ॥ प्रज्ञाबळें कवळिती ध्यानीं॥ योगसाधनीं बहुयत्नें ॥ १८ ॥ आजि मी त्यांच्या चरणांसहित ॥ तत्सान्निधि गोप समस्त ॥ त्यांतें नमीन आनंदभरित ॥ होईन कृतार्थ तल्लाभें ॥ १९ ॥ श्रीपद ऐसें नमिल्यावरी ॥ अनुग्रह करील कैसा हरि ॥ तेंही अक्रूर त्ह्दयीं विवरी ॥ शुकवैखरी तें वर्णी ॥ २० ॥

अप्यंघ्रिमूलेपतितस्यमेविभुःशिरस्यधास्यन्निजहस्तपंकजम् ॥
दत्ताभयंकालभुजंगरंहसाप्रोद्वेजितानांशरणैषिणांनृणाम् ॥ १६ ॥

॥ टीका ॥ चरणीं ठेवितांचि मस्तक ॥ वि[१]भु समर्थ उत्तमश्लोक ॥ माझे शिरीं हस्ताब्जक॥ कृपापूर्वक ठेवलि ॥ २१ ॥ तें हस्ताब्ज ह्मणाल कैसें ॥ दिढा श्लोकें विस्तारवशें ॥ निरूपिजेल तें मानसें ॥ श्रोतीं संतोषें परिसावें ॥ २२ ॥ कालभुजगाचिया वेगें ॥ प्राणी तळमळिती आवघे ॥ त्यांमाजि शरण भयप्रसंगें ॥ जाले निजांगें श्रीचरणीं ॥ १२३ ॥ तयां मानवां अभयदान ॥ जया हस्ताब्जें करून ॥ आणिक सभाग्य कोण कोण ॥ तें हस्ताब्जनिधान लाधले ॥ २४ ॥

---

[१] व्यापक.

समर्हणंयत्रविधायकौशिकस्तथाबलिश्चापजगत्त्रयेन्द्रताम् ॥
यद्वाविहारेव्रजयोषिताश्रमंस्पर्शेनसौगन्धिकगंध्यपानुदत् ॥ १७ ॥

॥ टीका ॥ सम्यक ह्मणिजे बरव्यापरी ॥ शतक्रतूच्या पुण्यावसरीं ॥ सप्रेम सपर्यां[1] षोडशोपचारीं ॥ पुरन्दर करी ज्या हस्तीं ॥ २५ ॥ कौशिकनामें पुरन्दर ॥ जो लाहोनि वरद कर ॥ जंभनमुचिवृत्रासुर॥ जाला पटुतर मर्दावया ॥२६॥ आणि रावण मर्दूनि अयोध्यापुरीं॥श्रीराम प्रवेशला सुरवरभारीं॥भद्रीं अमरेन्द्र नमस्कारी ॥ तैं लाहे शिरीं वरद हस्त ॥ २७ ॥ कीं इंद्राच्या कैपक्षें[2] ॥ बळीतें छळिलें वामनवेषें ॥ तेव्हां तेणें प्रेमोल्लासें ॥ दानविशेषें कर पूजिला ॥ २८ ॥ त्रिपादपरिमितभूमिदान ॥ करीं अर्पिलें संकल्पजीवन ॥यास्तव अद्यापि द्वार रक्षण ॥ करी आपण तयाचें ॥ २९ ॥ आणि त्रिजगाची अमरेंद्रता ॥ बळी लाधला प्रसाद उचिता ॥ तोचि हस्त मी आजि माथां ॥ हरिपद नमितां लाहेन ॥ ३० ॥ दैत्यभयाची निवृत्ति ॥ निर्भय इंद्रपदाची प्राप्ति ॥ ऐसी इंद्राची सकाम भक्ति ॥ ते अभीष्टावाप्ति त्यां जाली ॥ ३१ ॥ निष्काम बळीनें त्रिपाददान ॥ छळितां केलें आत्मार्पण ॥ इंद्रत्वेंसीं कैवल्यसदन ॥ द्यावया भगवान् द्वार रक्षी ॥ २३२ ॥ ऐसे सकामादि मुमुक्षुनिकर ॥ त्यांसि अभीष्टप्रद जो कर ॥ आणि अनुरक्तांसही सुखकर ॥ तो प्रकार अवधारा ॥ ३३ ॥ गोपी अनन्य सप्रेमळा ॥ नेणती कर्मादि कर्मफळा ॥ अवंचकभावें श्रीगोपाळा ॥ त्हृदयकमळामाजि धरिती ॥ ३४ ॥ तद्विरहादि त्रितापशमनीं ॥ रासक्रीडा रसनर्तनीं ॥ कोमलहस्तपद्म संस्पर्शोनी ॥ पंकजपाणि निववी त्यां ॥ ३५ ॥ चंद-

---

१ पूजा. २ कैवारानें.

नीं सौरभ्य नैसर्गिक ॥ कीं वेधवती सौगंधिक ॥ इत्यादि गंधा जो द्योतक ॥ भोगिती हस्तक तो गोपी ॥ ३६ ॥
ऐसा परमानुग्रहकर ॥ श्रीकृष्णाचा पद्मकर ॥ तेणें स्पर्शील माझें शिर ॥ आजि नमस्कारप्रसंगीं ॥ २३७ ॥
आणि शत्रुदूत मी ह्मणोनि कांहीं ॥ कृष्ण शत्रुत्वें पाहणार नाहीं ॥ ऐसें वाटतें माझ्या ठायीं ॥ तें श्लोकान्वयीं
प्रकाशी ॥ ३८ ॥

नमय्युपैष्यत्यरिबुद्धिमच्युतःकंसस्यदूतःप्रहितोऽपिविश्वदृक् ॥
योंऽतर्बहिश्चेतसएतदीहितंक्षेत्रज्ञईक्षत्यमलेनचक्षुषा ॥ १८ ॥

॥ टीका ॥ कंसें प्रेरिलों सांगूनि काज ॥ तेणें कंसदूतत्वही यथार्थ मज ॥ तथापि सर्वज्ञ अधोक्षज ॥ जाणे
गुज हृदयींचें ॥ ३९ ॥ सबाह्य श्रीकृष्ण विश्वद्रष्टा ॥ जाणे कायवाङ्मानसचेष्टा ॥ यास्तव माझिया अंतर्निष्ठा ॥
दिसती स्पष्टा क्षेत्रज्ञा ॥ ४० ॥ मी सबाह्य कृष्णीं निरत ॥ बाह्यविडंम्बीं कंसदूत ॥ हें नित्यावबोधें समस्त ॥
जाणे सर्वगत सर्वात्मा ॥ ४१ ॥ सबाह्य जाणोनियां निष्कपट ॥ मजवरी होईल पूर्ण संतुष्ट ॥ तेव्हां अवघे हरती
कष्ट ॥ तेंचि स्पष्ट बोलतसे ॥ ४२ ॥

अप्यंघ्रिमुलेवहितंकृतांजलिंमामीक्षितासस्मितनार्द्रयादृशा ॥
सपद्यपध्वस्तसमस्तकिल्बिषोवोढामुदंवीतविशंकऊर्जिताम् ॥ १९ ॥

---

१ कमळ. २ बाह्य अनुकरणानें.

॥ टीका ॥ सम्यक् श्रीकृष्णाचे चरणीं ॥ दंडप्राय तनु लोटुनी ॥ अष्टभावें उचंबळोनी॥ उभा राहीन नम्रत्वें ॥ ४३ ॥ आवरूनियां सर्व करणां ॥ एकाग्र करूनि नयना मना ॥ उभा राहीन सन्निध चरणां ॥ देखोनि करुणा हरि करील ॥ ४४ ॥ नम्रमूर्ध्नी बद्धांजलि ॥ मातें देखोनियां वनमाळी ॥ अमृतदृष्टी जैं निहाळी॥ तें किल्बिष समूळीं क्षाळेल ॥ २४५ ॥ हास्यवदनें सुधापांगें ॥ अवलोकितां कमलारंगें ॥ परमानंदें निवती आंगें ॥ ऊर्जित वेगें लाहेन ॥ ४६ ॥ आणि आत्मीय यादवगणीं ॥ मातें गणील चक्रपाणि ॥ ऐसें भावूनि अंतःकरणीं ॥ बोले वाणी तें ऐका ॥ ४७ ॥

सुहृत्तमंज्ञातिमनन्यदैवतंदोर्भ्यांबृहद्भ्यांपरिरप्स्यतेऽथमाम् ॥
आत्माहितीर्थीक्रियतेतदैवमेबन्धश्चकर्मात्मकउच्छ्वसित्यतः ॥ २० ॥

॥ टीका ॥ जाणोनि परमात्मा श्रीकृष्ण ॥ अनन्यभावें होईन शरण ॥ ऐसें अक्रूरें निरूपण ॥ केलें संपूर्ण येथवरी ॥ ४८ ॥ आतां कृष्ण कैसा आपणा ॥ सम्मानील ते संभावना ॥ अक्रूर करी अंतःकरणा ॥ माजि त्या कथना अवधारा ॥ ४९ ॥ कृष्ण देखोनि ऐसिया मातें ॥ परमसुहृत्तम मानील चित्तें॥ अनन्य दैवत मज वृद्धातें ॥ स्नेहभरितें भावील ॥ ५० ॥ आपुले ज्ञातीमाजि आप्त ॥ मम कल्याणीं परम निरत॥ पूज्य अनन्य दैवत॥ भावील भगवन्त मजलागीं ॥ ५१ ॥ सस्निग्ध विशाळ उदार बाहीं ॥ आदरें आळंगील हृदयीं ॥ त्यानंतरें माझें कांहीं ॥ ऊर्जित कल्याण कीं काय ॥ २५२ ॥ केवळ श्रीकृष्ण परमात्मा ॥ तो जैं पूज्यत्वें भजेल आम्हां ॥ तें आमुच्या क-

---

१ पाप. २ सुख. ३ तुळतुळीत.

ल्याणकामा ॥ विपर्यास तों नघडेल कीं ॥५३॥ ऐसें विवरूनि पुढती ह्मणे ॥ श्रीकृष्णाच्या आलिंगनें ॥ माझा देह पवित्रपणें ॥ तीर्था तीर्थ होईल ॥ २५४ ॥ स्पर्शमणीच्या सन्निधानें ॥ लोह पालटे सुवर्णपणें ॥ कीं गंगोदकाच्या संस्पर्शनें ॥ निष्पाप होणें त्रैलोक्यें ॥ ५५ ॥ ते गंगा ज्याचे चरणकमळीं ॥ तो जैं आलिंगी वनमाळी ॥ तेव्हां तीर्थांची मंडळी ॥ करील सगळी तनु माझी ॥ ५६ ॥ आणि अग्नीच्या आलिंगनें॥बीजत्वापासूनि मुकती धान्यें॥ तैसीं कर्माचीं बंधनें ॥ मुक्त होतील तत्काळ ॥५७ ॥ पुनःपुनः उपजणें मरणें ॥पुनःपुनः देह धरणें॥कर्मबन्धें ज्या ऐसें करणें ॥ कृष्णालिंगनें तो निरसे ॥ देह अळंगेतां श्रीकृष्ण ॥ कर्मबन्ध देहापासून ॥ मुक्त होतां नघडे जाण पुन्हा धारणें देहाचें ॥ ५९ ॥

लब्धांगसंगंप्रणतंकृतांजलिंमांवक्ष्यतेऽक्रूरततेत्युरुश्रवाः ॥
तदावयंजन्मभृतोमहीयसानैवादृतोयोधिगमुष्यजन्मतत् ॥ २१ ॥

॥ टीका ॥ लाहोनिकृष्णाचा अंगसंग ॥ प्रणाम करूनि साष्टांग ॥ बद्धांजलि नम्रोत्तमांग[1] ॥ पाहीन सांग हरिचरण ॥ ६० ॥ ऐसिया मातें अवलोकून ॥ जो का पुण्यश्रवणकीर्तन ॥ तो उरुश्रवा[2] स्वमुखें करून ॥ सम्मानून बोलेल ॥ ६१ ॥ तात अक्रूर ऐसिया शब्दीं ॥ संबोधील जैं कृपानिधि ॥ तेव्हां आमुची जन्मसिद्धि॥ सफळ त्रिशुद्धि जाहली ॥ ६२ ॥ श्रेष्ठीं नादरिला जो प्राणी ॥ वृथा भूभार तो जन्मोनी ॥ धिक्कार त्याचे जननीं मरणीं वृथा जननीश्रमकर तो ॥ ६३ ॥ धिक् त्या जंतूचें तें जन्म ॥ ज्यातें नादरी पुरुषोत्तम ॥ धिक्कृत तयाचें सर्व कर्म ॥

---

१ वांकविलें मस्तक ज्यानें तो. २ विशाळ कीर्ति ज्याची तो.

विश्वीं अधम असंमत जो ॥ ६४ ॥ विश्वीं संमत जो सौजन्यें ॥ तो आदरिजे श्रीभगवानें ॥ श्रीकृष्ण जीव नव्हे मां मानें ॥ सुहृदादिकां सम्माना ॥ ६५ ॥ सुहृदादिकां आलिंगन॥स्वागतप्रश्न संभाषण॥नकरी प्राकृत जीवांसमान ॥ कां पां कृष्ण तें ऐका ॥ ६६ ॥

नतस्यकश्चिद्दयितःसुहृत्तमोनचाप्रियोद्वेष्यउपेक्ष्यएववा ॥
तथाऽपिभक्तान्भजतेयथातथासुरद्रुमोयद्वदुपाश्रितोऽर्थदः ॥ २२ ॥

॥ टीका ॥ कृष्ण परमात्मा ईश्वर ॥ सर्वीं सर्वगत निर्विकार ॥ त्यासि अप्रिय कोण प्रियतर स्वपर ॥ आप्त कीं इतर असेना ॥ ६७ ॥ त्यासि सुहृद अथवा द्वेष्य ॥ उदास मध्यस्थ ना उपेक्ष्य ॥ इष्ट मित्र गोत्र पोष्य ॥ हा विशेष त्या नाहीं ॥ ६८ ॥ हे संबन्ध जीवांकडे ॥ इश्वरीं कांहीं सम्बध नघडे ॥ तथापि भक्त भजती कोडें ॥ तैसा त्याकडे अनुसरतो ॥ ६९ ॥ जो जो प्राणी भजेल जैसा ॥ ईश्वर भासे तयासि तैसा ॥ कामिकांचे इच्छेसरिसा ॥ फळे अपैसा सुरद्रुम ॥ ७० ॥ बैसोनि कल्पतरुतळवटीं ॥ इच्छी संकल्पें रत्नकोटी ॥ तों त्या लाहे कीं नरोटी ॥ इच्छी तैसी लाहे तो ॥ ७१ ॥ त कल्पना सुरतरु नकरी ॥ तैसा भक्तांच्या भजनावरी ॥ इच्छेसरिसा भजे हरि ॥ सम्बन्धविकारी नहोतां ॥ ७२ ॥ मित्र ह्मणती त्यांचा मित्र ॥ पुत्र भाविती त्यांचा पुत्र ॥ शत्रु मानिती त्यांचा शत्रु ॥ भावनामात्रफळदानी ॥ ७३ ॥ तैसा कृष्ण माझ्या भावें ॥ मज संतुष्ट स्नेहगौरवें ॥ अंगीकारील त्वद्दत आघवें ॥ वोळखोनि तें अवधारा ॥ ७४ ॥

१निरपेक्ष. २ निष्पक्षपाती.

किंचाग्रजोमाऽवनतंयदूत्तमःस्मयन्परिष्वज्यगृहीतमंजलौ ॥
गृहंप्रवेश्यातसमस्तसत्कृतंसंप्रक्ष्यतेकंसकृतंस्वबंधुषु ॥ २३ ॥

॥ टीका ॥आणि कृष्णाचा अग्रज बंधु ॥ संकर्षण जो चातुर्यसिंधु॥यदुकुळगगनीं जैसा इंदु॥अनंदकंदु व्रजकुमुदां ॥ ७५ ॥ बद्धांजलि केली मियां ॥ तैसीच स्वकरीं धरूनियां॥हास्यवदनें आलिंगूनियां॥गृहामाजी प्रवेशवील ॥ ७६ ॥ समस्त सत्कार लाधले ज्यातें ॥ऐसिया मातें धरूनि हातें ॥ पुसेल कंसाचीं चेष्टितें ॥ छळी बंधूंतें केंवि कैसा ॥ ७७ ॥ स्वबंधु जे यादवगण ॥ त्यांच्या ठायीं द्वेष गहन ॥ धरूनि कैसा करी छलन ॥ तें संपूर्ण पुसेल ॥ ७८ ॥ ऐसें अक्रूराचें प्रेम ॥ नृपा कथूनि मुनिसत्तम ॥ पुढील कथेचा अनुक्रम॥अमृतोपम वाखाणी७९

इतिसंचितयन्कृष्णंश्वफल्कतनयोऽध्वनि ॥ रथेनगोकुलंप्राप्तःसूर्यश्चास्तगिरिंनृप ॥ २४ ॥

॥टीका॥ऐसा अक्रूर रथावरी कृष्णप्रेमें कल्पना करी ॥ चिंतूनि कृष्णातें अंतरीं॥मार्गीं रहंवरीं[2] चालतां॥८० ॥ ऐसा श्वफल्काचा तनय ॥ कृष्णचिंतनें कृष्णमय ॥ स्मरणधर्मा मुकला ठाय ॥ तथापि जाय रथयोगें ॥८१ ॥ अस्त पावतां गभस्ति[3] ॥ अक्रूर पावला व्रजाप्रति ॥ तंव त्या कृष्णाचे चरण क्षिती॥देखता झाला तें ऐका॥८२॥

पदानितस्याखिललोकपालकिरीटजुष्टामलपादरेणोः ॥
ददर्शगोष्ठेक्षितिकौतुकानिविलक्षितान्यब्जयवांकुशाद्यैः ॥ २५ ॥

---

१ व्रज म्ह० गोकुळ हेंच कुमुद म्ह० कमल. २ रथामध्यें. ३ सूर्य.

॥टीका ॥ समस्त लोकपाळांच्या श्रेणी ॥ लागतां श्रीकृष्णचे चरणीं ॥ निर्मळ पदरज गंगेहुनी ॥शिरोभूषणीं
मिरविती ॥ ८३ ॥ त्या कृष्णाचीं अतिसुंदरें ॥ पाउलें जैसीं सहस्रारें॥गोष्ठीं उमटलीं वसुंधरे॥मंगलकरें क्षितीतें
॥ ८४ ॥ गोगोपाल सह जनपद[1] ॥ त्यां माजि कृष्णाचेही पद ॥ कैसे वोळखिले पैं विशद ॥तोचि अनुवाद
अवधारा ॥ ८५ ॥ वज्रांकुशोर्ध्वरेखाध्वज ॥ पद्माचिह्नेंसीं श्रीपादाब्ज ॥ गंगाजनक तेजःपुंज ॥ निरखी सहज निजदृष्टी
॥ ह्मणाल पाउलांचीं सामुद्रिकें ॥ कैसीं उमटलीं मृत्तिके ॥ कैंवि अक्रूर त्यां ओळखे ॥ हें विवेकें बोधावें ॥
८७ ॥ तरी येथींची विचित्र परी ॥ सावध परिसावी पैं चतुरीं ॥वेध्यवेधक परस्परीं ॥ प्रेमादरीं ज्ञातृत्व ॥
८८ ॥ गगनामाजील माग काढणें ॥ हें एक विहंगयाति[2] जाणे ॥ कीं जळगर्भींचा यादोगणें[3] ॥ जैंवि हुडकणें मागोवा
॥ ८९ ॥ ह्मणाल हें जातिविशिष्ट ज्ञान ॥ तरी येथही तैसेंचि लक्षण ॥ परस्परें ओळखण ॥ वेध्यवेधक
सप्रेमें ॥ ९० ॥ वेधक शक्ति श्रीभगवंतीं ॥ असे स्वतःसिद्ध आयती ॥ तदंश[4] तद्वेधें वेधती ॥ हेही स्थिति नैसर्गिक
॥ ९१ ॥ येरां सर्वत्र हें अवघड ॥ परी सप्रेमळांलागिं उघड ॥ जैंवि चंद्रींचे सस्नुत सड ॥ सेविती चंड
चाकोरी ॥ ९२ ॥ सकौस्तुभ एकावळी[5] कंठीं ॥ध्यानें घालितां दाटली मुकुटीं॥दुज्या ध्यानस्थें देखोनि दृष्टी॥मुकुट
काढोनि घालविली ॥ ९३ ॥ कीं दुष्यंतमृगया त्रिपुराचळीं ॥ करितां अश्वचरणातळीं॥ लोहस्पर्शतां स्पर्शशिळीं
॥ वेधें तत्काळीं हेम केलें ॥ ९४ ॥ तैसे अनेक पाषाण इतरां ॥ बहुधा झगटतां अश्वखुरां ॥ लोहनाला ते कर्बुरा
॥ करूं नशकती संस्पर्शें ॥ ९५ ॥ कीं शतयोजनें सिंधुजळीं ॥ अयस्कांताचीं खडकें तळीं ॥ परी जळयानींच्या
लोहखिळीं ॥ वेधें तकाळीं गाळिजेत ॥ ९६ ॥ तेंवि कृष्णाचीं पाउलें ॥ ध्वजवज्रादिचिह्नमेळें ॥ अक्रूराचे

---

[1] देश. [2] पक्ष्याची जाति. [3] जलजंतूंना ‘यादः’ ह्मणतात. [4] त्या ईश्वराचे अंश. [5] एकपदरी माळ.

वेधती डोळे ॥ तीं तीं स्थळें तो पाहे ॥ ९७ ॥ वेधक श्रीकृष्णचरणकमळें ॥ अक्रूर तंदृश सप्रेमळ ॥ वेध्यवेधक उभयशील ॥ तें केवळ ज्ञातृत्व ॥ ९८ ॥ येथें ह्मणती सामन्य कवि ॥ ध्यानींची माळा अडस कां व्हावी ॥ मुकुट काढूनि दुजा घालवी ॥ हे गोष्टी आघवी अप्रमाण ॥९९॥ ते धीटपाठ धूर्त्त वक्ते ॥अनुभवें विण बहुश्रुत ज्ञाते ॥ योगमहिमा अविदित त्यांतें ॥ ते प्रमाण यातें केंवि ह्मणती ॥ ३०० ॥ चकोरां चंद्रामृतें तृप्ति॥ तेथ नाऽस्तिकमंडूकांप्रति ॥ एवं प्रतीतीविण प्राकृतमति ॥ प्रमाण नमानिती तें उचित ॥ १ ॥ येऱ्हवीं जीवब्रह्मैक्यप्रसंग ॥ ते दशेतें ह्मणिजे योग ॥ तत्सिद्धीचे जे जे मार्ग ॥ ते अव्यंग अगाध ॥ २ ॥ लयलक्ष्यादि ध्यानयोग ॥ सांख्य भक्ति ज्ञान अष्टांग ॥ चिदैक्यपूर्णत्व घडे सांग ॥ साधनमार्ग प्रसिद्ध हे ॥ ३ ॥ सूर्यसत्तायोगबळें ॥ सूर्यकातीं स्फुरिजे अनळें ॥ तेंवि अतींद्रियज्ञानयोगें उजळे ॥तें केंवि कळे धूर्तांतें ॥ ४ ॥ एवं अघटितघटनापटी ॥ योगमायेची शक्ति मोठी ॥ जिचेनि ब्रह्म नटलें नटीं ॥ तें नेणती करंटीं प्राकृतें ॥ ५ ॥ तस्मात्प्रेमभक्तियोगबळें ॥ आंथिले[1] अक्रूराचे डोळे ॥ ह्मणोनि श्रीकृष्णपाउलें ॥ देखोनि भरले उल्लासें ॥ ६ ॥

तद्दर्शनाह्लादविवृद्धसंभ्रमःप्रेम्णोर्ध्वरोमाऽश्रुकलाकुलेक्षणः ॥
रथादवस्कंद्यसतेष्वचेष्टतप्रभोरमून्यंघ्रिरजांस्यहोइति ॥ २६ ॥

॥ टीका ॥ अहो या पदाचें व्याख्यान ॥ परमाश्चर्यें ह्मणे धन्य ॥ जे कां दुर्लभ भगवच्चरण ॥ ते म्यां सचिह्न देखिले ॥ ७ ॥ ज्यासि दुर्लभ वराटिका[2] ॥ त्यासि निधान[3] जोडल्या देखा ॥ गगन नपुरे त्याचिया हरिखा[4] ॥

---

१ वसविले. २ कवडी. ३ द्रव्याचा ठेवा. ४ हर्षाला.

त्याहूनि श्वाफल्का[1] उत्साह ॥ ८ ॥ भगवच्चरणदर्शनानंद ॥ तेणें संभ्रम[2] वाढला अगाध ॥ तीं चिह्नें ऐका विशद ॥ नृपा कोविद[3] शुक सांगे ॥ ९ ॥ सप्रेम भरतें भरलें आंगीं ॥ रोमा थरकल्या सर्वांगीं ॥ बाष्पांबुकळा[4] लागवेगीं ॥ स्तिमितापांगीं डळमळिती ॥ १० ॥ रोमांचमूळीं उमटले पुलक ॥ शरीरीं पाझरे स्वेदोदक ॥ सकंपश्वासा जालें अटक ॥ सात्विकाष्टक प्रकटलें ॥ ११ ॥ तया संभ्रमा सरिसा पाहीं ॥ रथावरूनि लोटला मही ॥ कृष्णपाउलें दोहीं बाहीं ॥ कवळी हृदयीं औत्सुक्यें ॥ १२ ॥ हे प्रभूचे अंघ्रिकण ॥ ह्मणूनि तनूचें उतरी लोण ॥ कवळूनि घाली लोटांगण ॥ परम धन्य भव मानी ॥ १६ ॥ मध्यपीठ श्रीकृष्णांघ्रि ॥ श्रीविद्या ते राजेश्वरी ॥ आवरणदेवता गोपगोखुरीं ॥ नमस्कारी सप्रेमें ॥ १४ ॥ आजि कृष्णांघ्रिरजांच्या ठाईं ॥ स्नान जालें मज पुण्यांहीं[5] ॥ यज्ञावभृथें[6] जितुकीं कांहीं ॥ घडलीं स्वदेहीं मानितसे ॥१५॥ कृष्णांघ्रिरेणूंमाजि लुंठनें[7] ॥ किमर्थ केलें ह्मणाल पूर्ण ॥ तरी प्रेमसंभ्रमाचें अवतरण ॥ फळाभिस्मरण करूं नेदी ॥ १६ ॥

देहंभृतामियानर्थोहित्वादंभंभियंशुचम् ॥ संदेशाद्योहरेर्लिंगदर्शनश्रवणादिभिः ॥ २७ ॥

॥ टीका ॥ प्राणी देहातें जे धरित ॥ त्या देहवंतांचा मुख्य पुरुषार्थ ॥ हाचि उत्कृष्ट ऐसें कथित ॥ शुक समर्थ नृपातें ॥ १७ ॥ तो हा कोणता पुरुषार्थ ॥ जो अक्रूरा साधला येथ ॥ तो साकल्यें वाखाणिजेत ॥ चतुरीं स्वस्थ परिसावा ॥१८॥ सांडूनि दंभभयादि शोक ॥ भगवत्प्रेमा अंतर्मुख ॥ कंससंदेशपूर्वक ॥ श्वफल्कतोक जो भोगी ॥ १९ ॥ तरी अक्रूरें कैसें टाकिलें भय ॥ कैसा दंभ टाकिला होय ॥ शोकत्यागाचा अभिप्राय ॥ यथान्वयें परिसा हो ॥ २० ॥ नंदादि व्रजींचे प्रजाजन ॥ त्यांसि करूं जातों मी शासन ॥ तें राजसत्ता ऐश्वर्यचिह्न ॥ त्यागिलें संपूर्ण ह-

---

[1] श्वफल्काचा पुत्र अक्रूर. [2] त्वरा. [3] ज्ञाता. [4] नेत्रोदकाचे बिंदु. [5] पुण्यकर्मांनीं. [6] यज्ञांतीं स्नानें. [7] लोळणें.

रिप्रेमें ॥ २१ ॥ ऐसा कथिला दंभत्याग ॥ आतां परिसा भयाचें लिंग ॥ अक्रूरें त्यागिलें तो प्रसंग ॥ यथासांग कथिजेल ॥ २२ ॥ मी अक्रूर कंसदूत ॥ माझें कुटुंब मथुरेआंत ॥ साधावया कंसकृत्य ॥ व्रजा निश्चित धाडिलों ॥ २३ ॥ परमगुह्य आत्मिकपणें ॥ कंसें कथिलें मजकारणें ॥ तदर्थ व्रजा माझें जाणें ॥ हें निर्भयपणें विसरला ॥ २४ ॥ मी कृष्णासि झालों शरण ॥ हें कंसासि होतां श्रवण ॥ तैं कुटुंबें सहित माझें मरण ॥ हें भय संपूर्ण त्यागिलें ॥ २५ ॥ व्यसनीं पडलें यादवकुळ ॥ त्याचा कैपक्षी घननीळ ॥ त्यातें वधील कंस खळ ॥ तैं दुःख केवळ सर्वांसी ॥ २६ ॥ रामकृष्णां वधिल्या पाठीं ॥ देवकीवसुदेवांतें निवटी ॥ उग्रसेनाची छेदील घांटी ॥ आणि यादवकोटी मारील ॥ २७ ॥ तेव्हां माझे जिवलग आप्त ॥ कंस मारील ते समस्त ॥ तैं मज जाकळी शोकावर्त ॥ ऐसें त्द्दया नधरिलें ॥ २८ ॥ अथवा कृष्णासि जालों शरण ॥ ऐसें कंसासि होतां श्रवण ॥ माझिया कुटुम्बालागीं दुर्जन ॥ तीव्रशासन तैं करील ॥ २९ ॥ निरपराध स्त्रिया लेंकुरें ॥ दुर्जनाच्या तीव्रप्रहारें ॥ दुःख पावती या शोकांकुरें ॥ नाहीं अंतरें शिंवतला ॥ ३० ॥ वृत्तान्तपूर्वक कंसाज्ञा ॥ संदेश ऐसी तयेसि संज्ञा ॥ तो संदेश ऐकतां अक्रूरमना ॥ भगवद्भावना उपजली ॥ ३१ ॥ सांडूनि भय शोक आणि दंभ ॥ कवळिला केवळ पद्मनाभ ॥ तदनु प्रेम मानसक्षोभ ॥ अनन्य वालभ जें कथिलें ॥ ३२ ॥ संदेश पडतां श्रवणपुटीं ॥ विसरला सदंभभयशोकगोठी ॥ भगवत्प्रेमा उथलला पोटीं ॥ शुकें वाक्पुटीं तो कथिला ॥ ३३ ॥ माझें आजि जन्म धन्य ॥ कंससंदेशें करून ॥ मी देखेन भगच्चरण ॥ उल्हास पूर्ण हा भरला ॥ ३४ ॥ तेणें उल्हासभरितचित्तें ॥ गृहीं क्रमूनि ते रात्रीतें ॥ प्रभाते चालिला व्रजपुरातें ॥ ध्यानभक्तीतें अनुभवित ॥ ३५ ॥ ह्मणे काय म्यां सुकृत केलें ॥ सर्वस्व

---

१ नाहींसा करील. २ स्पर्शला. ३ निरोप. ४ प्रेम.

सत्पात्रीं अर्पिलें ॥ कीं तपश्चर्यें संपादिलें ॥ जें हरिपाउलें देखेन मी ॥ ३६ ॥ परम दुर्लभ जो संसारीं ॥ तो मी
कंसाआज्ञेवरी ॥ शूद्र श्रुतीतें अनधिकारी ॥ तो ही श्रीहरि देखेन ॥ ३७ ॥ पुनरपि ह्मणे हेंही नव्हे ॥ मज कां
हरिदर्शन नव्हावें ॥ जरी मी अधम तथापि व्हावें ॥ अच्युतदर्शन मजलागीं ॥ ३८ कालनदीच्या प्रवाहीं ॥ तृणासमान
जीव पाहीं ॥ बळें वाहवितां नवचंती[1] काई ॥ कोण्ही तऱ्हीही परपारा ॥ ३९ ॥ भगवद्दर्शनासि अवरोध- ॥ कारक
अमंगल अघसंबंध ॥ तो नाशोनि सजन्म शुद्ध ॥ जालों प्रसिद्ध हरिनमना ॥ ४० ॥ कंसें मजवरी अनुग्रह केला
॥ कीं हा नियोग[2] सांगीतला ॥ तेणें देखेन हरिपाउलां ॥ ज्या भजतां लंघिला भव संतीं ॥ ४१ ॥ विधि हर
सुर मा[3] सात्वत[4] मुनि ॥ अर्चिती जया पादा लागुनी ॥ गोचारणार्थ वृन्दावनीं ॥ गोपींच्या स्तनीं लांछित जे ॥ ४२ ॥ त्या
कृष्णाचें सस्मित ध्यान ॥ आजि भाग्यें देखती नयन ॥ कीं जे होती मज शुभ शकुन ॥ प्रादक्षिण्यें मृग जाती ॥
॥ ४३ ॥ जाणोनि निजजनांची आर्ति ॥ भूभारहरणा लावण्यमूर्त्ति ॥ तो कृष्ण देखेन मनुष्याकृति ॥ तैं सफळ
संपत्ति नयनांची ॥ ३४४ ॥ जरी धरिला मनुष्यदेह ॥ तरी ज्या नातळे अहंमोह ॥ स्वप्रकाशज्ञानप्रवाह ॥
लीलानुग्रहविग्रही ॥ ४५ ॥ प्राकृत मानिती त्या देहधारी ॥ परी तो निर्गुण निर्विकारी ॥ स्वधर्मसंस्थापनेवारी
॥ लीलावतारी युगीं युगीं ॥ ४६ ॥ तें जन्मकर्मगुणचरित्र ॥ वाचा सुमंगल वर्णिती मिश्र ॥ त्यां जीवविती
शोभविती आणि पवित्र ॥ करिती पवित्र त्रिजगातें ॥ ४७ ॥ भगवज्जन्मकर्मगुणवर्जिता ॥ येर शृंगारचातुर्यभरिता
॥ जरी जाल्या कविसंमता ॥ तऱ्ही त्या प्रेतासम वाणी ॥ ४८ ॥ तो हा अवतरला यदुकुळीं ॥ धर्मसंस्था-

---

[1] जात नाहींत. [2] काम. [3] लक्ष्मी. [4] भक्त.

पक भूमंडळीं ॥ तोचि ज्याची यशनव्हाळी ॥ अमरावळी गाताती ॥ ४९ ॥ त्यातें आजि देखेन दृष्टी ॥ ज्याचें लावण्य त्रिजगन्मुकुटीं ॥ सुप्रभाते शकुनगांठी ॥म्यां हृत्पटीं बांधिली ॥ ५०॥ तथापि ऐसा देखिल्यावरी ॥ उडी घालीन मी धरत्री ॥ सधेनु सानुग[1] नमस्कारीं ॥ योगेश्वरीं जो पूज्य ॥ ५१ ॥ दंडप्राय चरणांवरी ॥ पतित देखोनि मातें हरि ॥ अभयहस्त ठेवील शिरीं ॥ जो भय हरी शरणांचें ॥ ५२ ॥ जो हस्त बळीनें त्रिजगद्दानीं ॥ कीं शक्रें पूजिला शतमखयजनीं ॥ कीं गोपींहीं श्रमापहरणीं ॥ रासनर्तनीं आळंगिला ॥ ५३ ॥ ऐसा हस्त माझे शिरीं ॥ ठेवूनि परमात्मा अंतरीं ॥ कांहीं विषम भावा नधरी ॥ नमनी वैरिदूत मज ॥ ३५४ ॥ दंडप्राय नमिल्या वरी ॥ कृतांजलि मज देखोनि हरि ॥ कृपादृष्टी अमृतधारीं ॥ तैं अनघ[2] शरीरीं सुखवाटे ॥ ३५५ ॥ जरी मज मानूनि वृद्ध वडील ॥ बाहु पसरूनि आळंगील ॥ तरी तीर्थमयचि मज करील ॥ बंध हरील कर्मांचा ॥ ॥५६ लब्धप्रणाम अंगसंग ॥ कृतांजलि समाहितांग[3] ॥ देखोनि पुसेल मज श्रीरंग॥बापा ह्मणोनि गौरवें ॥ ५७ ॥ तेव्हां धन्य माझें जन्म ॥ कीं मज संतुष्ट पुरुषोत्तम ॥ ज्यातें नादरी मेघश्याम ॥ परम अधम तेंचि जिणें॥५८॥ भगवंताच्या आदराहेतु ॥ नोहे सोयरा स्वजन आप्तु॥द्वेष्य उदास ना मध्यस्थु॥कीं तो सर्वगत सर्वात्मा॥५९॥ तथापि भक्तप्रेमानुसार ॥ फळे जैसा सुरतरुवर[4] ॥ तैसा कृष्ण निर्विकार ॥ मित्रामित्र तद्भावें ॥ ६० ॥ असो मातें कृष्णाग्रज ॥ कृतांजलि धरूनि सहज ॥ सत्कारील मानूनि पूज्य ॥ तैं मी भोज नाचेन ॥ ६१ ॥ कंससंदेशापासून ॥ ऐसे संकल्प विवरी मन ॥ विवश[5]तनुभावें प्रयाण॥ सूर्यास्तमानपर्यंत ॥ ६२ ॥ बाह्यतनुभाव विसरला ॥ नेणे कैसा मार्ग क्रमिला ॥ रथें करूनि व्रजा गेला ॥ तंव बोधिला हरिबोधें ॥ ६३ ॥ भूमी उमटले कृष्णचरण ॥

---

[1] अनुग–सेवक. [2] निष्पाप. [3] समाधान पावलीं आंगें ज्याचीं तो. [4] कल्पवृक्ष. [5] पराधीन.

ध्वजवज्रांकुशादिसुचिह्न ॥ देखोनि घातलें लोटागण ॥ भरला पूर्ण सत्वाष्टकें ॥ ६४ ॥ भगवत्प्रेमें तनुमनभाव ॥ विसरला दंभशोकभेव ॥ परमपुरुषार्थ याचें नांव ॥ हें श्रेष्ठगौरव देहवंता ॥ ६५ ॥ ह्मणोनि देहातें जे धारिती ॥ हाचि पुरुषार्थ तयांप्रति ॥ जे अक्रूरा ऐशी भगवद्रति ॥ देहविस्मृती माजी घडे ॥६६॥ देहवतां हे दुर्लभ प्राप्ति॥ जे भवविस्मरणें भगवद्रति ॥ शुकें कथूनियां रायाप्रति ॥ कथा पुढती आदरिली ॥ ६७ ॥ भूमीवरी उमटले चरण ॥ अक्रूरें ते अभिवंदून ॥ पुढें झालें हरिदर्शन ॥ तें निरूपण अवधारा ॥ ६८ ॥

ददर्शकृष्णंरामंचव्रजेगोदोहनंगतौ ॥ पीतनीलांबरधरौशरदंबुरुहेक्षणौ ॥ २८ ॥

॥ टीका ॥ रथौनि होता जो उतरला॥ तैसाचि पुढतीं रथीं बैसला ॥ हरिपदचिह्नें पाहत गेला ॥ दोहनस्थळा धेनूंच्या ॥ ६९ ॥ जेथ धेनूंचें दोहन ॥ करिती त्या नांव दोहनस्थान॥तेथें होते विद्यमान॥रामकृष्ण एकत्र ७० ॥ कृष्ण सांवळा पीतवसन ॥ नीलांबरधर संकर्षण ॥ शरत्सरोजफुल्लार[2]नयन ॥ सुप्रसन्न देखिले ॥ ७१ ॥

किशोरौश्यामलश्वेतौश्रीनिकेतौबृहद्भुजौ ॥ सुमुखौसुंदरवरौबालद्विरदविक्रमौ ॥ २९ ॥

॥ टीका ॥ दोघां किशोरवय समान ॥ श्यामश्वेत तनुभा[3] भिन्न ॥ श्रीवत्सश्रीनिके[4]तन ॥ बाहु आजानु शुभ वक्र ॥ ७२ ॥ त्रैलोक्यींच्या सौंदर्यवंतां ॥ मुकुटीं ज्यांची वर सुंदरता ॥ बालद्विरदापरी तुळितां ॥ विक्रमसमता दोघांची ॥ ७३ ॥

ध्वजवज्रांकुशांभोजैश्चिह्नितैरंघ्रिभिर्व्रजम् ॥ शोभयंतौमहात्मानावनुक्रोशास्मितेक्षणौ ॥ ३० ॥

---

१ भगवंताचे ठायीं प्रेम. २ शरदृतूंतील कमला प्रमाणें प्रफुल्लित नेत्र ज्यांचे ते. ३ देहकांति. ४ स्थान.

॥ टीका ॥ ध्वजवज्रांकुशाब्जचिह्नें ॥ मंडित पाउलें सुलक्षणें ॥ भूमीं उमटती शोभायमानें ॥ शोभित तेणें व्रज करिती ॥ ७४ ॥ देहधारी जे वरिष्ठ ॥ त्यांहूनि ज्यांचे देह श्रेष्ठ ॥ महात्मानौपदें स्पष्ट ॥ हा अर्थ उत्कट शुक वदला ॥ ७५ ॥ अनुकंपान्वित हास्यवदनीं ॥ तद्युक्त अपांग विलसती नयनीं ॥ उदारक्रीडा मिरवती दोन्ही ॥ अमूल्यमणिस्रग्वंत ॥ ७६ ॥

उदाररुचिरक्रीडौस्रग्विणौवनमालिनौ ॥ पुण्यगंधानुलिप्तांगौस्नातौविरजवाससौ ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ विरज ह्मणिजे विशुद्ध वसनें ॥ धरिलीं करूनि मंगळ स्नानें ॥ त्यांवरी सुमनें विलेपनें ॥ दिव्याभरणें शोभती ॥ ७७ ॥ वैडूर्यमणींचे हार कंठीं ॥ त्यांवरी वनमाळांची दाटी ॥ मलयागर श्रीखंडउटी ॥ सुमनें मुकुटीं तुरंबिलीं ॥ ७८ ॥ जवादीकस्तुरीसुगंधरोळा ॥ सुगंध पुण्यात्मक आगळा॥ तरीच प्रियतम बळघननीळा ॥ सौरभ्यउधळा सर्वांगीं ॥ ७९ ॥

प्रधानपुरुषावाद्यौजगद्धेतूजगत्पती ॥ अवतीर्णौजगत्यर्थेस्वांशेनबलकेशवौ ॥ ३२ ॥

॥ टीका ॥ प्रधान ह्मणिजे मूळप्रकृति ॥ तदवलंबें पौरुषावाप्ति ॥ प्रधानपुरुष या संकेतीं ॥वाखाणिजती श्रेष्ठत्वें ॥ ८० ॥ तस्मात्प्रकृतिपुरुषात्मक ॥ स्वांशें मूर्ति धरूनि पृथक॥ जगद्योनि अद्वय एक॥ द्विधा देख अवगले ॥ ८१ ॥ आदिपुरुष जगत्कारण ॥ ह्मणोनि जगत्पति हें अभिधान ॥ जगतीभारहरणा पूर्ण ॥ मूर्त होऊ-

---

श्रेष्ठ पुरुषांमध्यें श्रेष्ठ असे बलराम व कृष्ण हे दोघे. २ उत्कृष्ट. ३ बहुमूल्यरत्नांच्या माळा घालणारे.

न अवतरले ॥ ८२ ॥ स्वांशें ह्मणिजे स्वमूर्तींसीं ॥ श्वेतनीलतनुभावेशीं ॥ बल केशव या अभिधानांसी॥ धारिती मानुषी क्रीडेंत ॥ ८३ ॥

दिशोवितिमिराराजन्कुर्वाणौप्रभयास्वया ॥ यथामारकतःशैलोरौप्यश्चकनकाचितौ ॥ ३३ ॥

॥ टीका ॥ दशदिग्भाग स्वप्रभे करून ॥ वितिमिर करिती दोघे जण॥कृष्ण मरकतगिरिसमान॥ संकर्षण तो ताराद्रि ॥ ८४ ॥ कनकाभरणीं सालंकृत ॥ विशेष अनर्घ रत्नजडित ॥ जेंवि चंद्रार्क प्रभावंत॥ दशदिग्ध्वांत परिहरिती ॥ ८५ ॥ ऐशा देखोनि उभय मूर्ति॥सप्रेम विह्वळ अक्रूरस्मृति॥ रथौनि उडी घातली क्षितीं॥ करी प्रणति तें ऐका ॥ ८६ ॥

रथात्तूर्णमवप्लुत्यसोऽक्रूरःस्नेहविह्वलः ॥ पपातचरणोपांतेदंडवद्रामकृष्णयोः ॥ ३४ ॥

॥ टीका ॥ रामकृष्णांच्या चरणांनिकटीं॥ स्नेहपूर्वक अंगयष्टि॥लोटूनि पडता जाला सृष्टी॥दंडप्राय अक्रूर ८७

भगवद्दर्शनाह्लादबाष्पपर्याकुलेक्षणः ॥ पुलकाचितांगऔत्कंठ्यात्स्वाख्यानेनाशकन्नृप ॥ ३५ ॥

॥ टीका ॥ कंससंदेशापासुनी ॥ जैसे मनोरथ केले मनीं ॥ त्या या प्रत्यक्ष मूर्ति दोन्ही ॥ देखिल्या ह्मणोनि आह्लाद ॥ ८८ ॥ सत्ताविसाव्या श्लोकांत ॥ दर्शनश्रवणादिकें जो प्राप्त ॥ तो भाव जाणावा साद्यन्त॥परमपुरुषार्थ देहवन्तां ॥ ३८९ ॥ तस्मात या परमाह्लादें ॥ बाष्पामृतें नेत्रकुमुदें ॥ उचंबळलीं आणि सद्गदें ॥ श्वासरोधें स्फुंदतसे ॥ ९० ॥ तनु पाझरे स्वेदजळीं ॥ हर्षें थरकली रोमावळी ॥ पुलक सर्वत्र रोममूळीं ॥ कांपे चळाळी वि-

---

१ प्रकाशमान, २ दशदिशांतील अंधकार.

वशत्वें ॥ ३९१ ॥ ऐसे भाव सात्विक अष्ट ॥ अक्रूराआंगीं जाले प्रकट ॥ सतनुस्मृतीची वळली मोट ॥ नशके स्पष्ट वक्र वदों ॥ ९२ ॥ मी अक्रूर नमितों चरण ॥ ऐसें करूं नशके कथन ॥ तेथ साकल्य वर्त्तमान ॥ समर्थ कोठून कथावया ॥ ९३ ॥ सात्विकाष्टकें थकली स्मृति ॥ स्तिमित सर्वेही करणवृत्ति ॥ अन्तर्वेत्ता जाणोनि चित्तीं॥ काय श्रीपति करितसे ॥ ९४ ॥

भगवांस्तमभिप्रेत्यरथांगांकितपाणिना ॥ परिरेभेऽभ्युपाकृष्यप्रीतःप्रणतवत्सलः ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ दानपति हा श्वफल्कतनय ॥ अक्रूरनामा आत्मप्रिय ॥ उद्देश मात्र कंसकार्य ॥ परि विशुद्धहृदय वोळखिला ॥ ९५ ॥ मदर्थ धाडिला येथें कंसें ॥ हें जाणोनि हृषीकेशें ॥ स्वसामर्थ्यें क्षेममिसें॥ आदिपुरुषें सुचविलें ॥ ९६ ॥ दंडप्राय चरणांनिकटीं ॥ सवेग देखोनियां जंगजेठी ॥ सुदर्शनांकितहस्तें मुष्टी ॥ धरूनि पोटीं कवळिला ॥ ९७ ॥ कवटाळूनि दक्षिणकरें ॥ हृदयीं धरिला स्नेहभरें ॥ प्रणतवत्सलें श्रीधरें ॥ अत्यादरें तोषविला ॥ ९८॥ तापसान्निध्यें नवनीत ॥ तेंवि संतप्त शरणागत॥ देखोनि द्रवे हृदयांत॥यालागिं प्रणतवत्सल तो

संकर्षणश्चप्रणतमुपगुह्यमहामनाः ॥ गृहीत्वापाणिनापाणीअनयत्सानुजोगृहम् ॥ ३७ ॥

॥ टीका॥ तैसाचि नमितां संकर्षणही॥अक्रूरा कवळूनि दोहीं बाहीं॥सप्रेम आलिंगूनि हृदयीं॥वाङ्मनदेहीं तोषविला ॥ ४०० ॥ मनःसंकल्प सत्य ज्याचा ॥ स्थितिलयसंभव चराचरांचा ॥ कर्ता ह्मणोनि वदती वाचा ॥ महामना या अभिधानें ॥ १ ॥ सुटतां आलिंगनाची मिठी ॥ धरूनि जोडिला अंजिलिपुटीं ॥ सानुज बलरा-

---

१ स्तंभःस्वेदोऽथरोमांचःस्वरभंगोऽथवेपथुः ॥ वैवर्ण्यमश्रु प्रलयो ह्यष्टौ भावाश्च सात्विकाः ॥

म जगजेठी ॥ आणिता जाला गृहांत ॥ २ ॥ ग्रहामाजी नेलिया वरी ॥ काय करिता जाला शौरि ॥ तें व्याख्यान
प्रेमादरीं ॥ ह्मणे अवधारीं शुक राया ॥ ३ ॥

पृष्ट्वाऽथस्वागतंतस्मैनिवेद्यप्रवरासनम् ॥ प्रक्षाल्यविधिवत्पादौमधुपर्कार्हणमाहरत् ॥३८॥

॥ टीका ॥ गृहीं प्रवेशल्या नंतरें ॥ स्वागत पुसोनि मधुरोत्तरें ॥ अक्रूरातें अत्याअदरें ॥ श्रेष्ठासन अर्पिलें
॥ ४ ॥ श्रेष्ठाहुनि श्रेष्ठतर ॥ तये आसनीं तो अक्रूर ॥ बैसवोनि रोहिणीकुमर ॥ जाला तत्पर पूजेतें ॥५॥
घेऊनि सर्वोपचारासिद्धि ॥ चरण क्षाळूनि यथाविधि ॥ अर्घ्यपाद्यमधुपर्कादि ॥ यथोचित पैं समर्पिलें ॥ ६ ॥

निवेद्यगांचातिथयेसंवाह्यश्रांतमादृतः ॥ अन्नंबहुगुणंमेध्यंश्रद्धयोपाहरद्विभुः ॥ ३९ ॥

॥ टीका ॥ अपूर्वदर्शन ह्मणिजे अतिथि ॥ यालागिं भावें अक्रूराप्रति ॥ धेनु अर्पूनि सप्रेमभक्ति॥श्रमोपशांति
पैं केली ॥ ७ ॥ करूनि शरीरसंवाहन ॥ विनयभावें श्रमापहरण ॥ परमादरें पुरस्करून ॥ भोजनालागून प्रार्थिलें
॥ ८ ॥ लेह्य पेय चोष्य खाद्य ॥ भक्ष्यभोज्यादि पदार्थ विविध ॥ सूपशास्त्रोक्त रसांचे स्वाद ॥ बहुगुणशब्दें
बोलिजे ॥ ९ ॥ क्षुधाहरण श्रमापहरण ॥ निद्रातंद्रा तृषा न्यून ॥ आयुष्यसत्वबलवर्घन ॥ हे बहुगुण ज्या अन्नीं
॥ १० ॥ रोगनिवृत्ति सुखोत्पति ॥ स्वस्थचित्तें वाढे सुमति ॥ यालागीं सर्वेंद्रियांची प्रीति ॥ यथोचितीं उपचारीं
॥ ११ ॥ मेध्य ह्मणिजे परमपवित्रें ॥ रसाळें स्निग्धें हृद्य स्थिरें ॥ ऐसीं अन्नें श्रद्धादरें ॥ अर्पिलीं यदुवीरें
समर्थें ॥ १२ ॥ सन्निध बैसोनि रामकृष्ण ॥ मधुरोत्तरें कृतप्रार्थन ॥ परमानंदा माजि निमग्न ॥ श्वफल्कनंद-

---

[१] गंधपुष्पदूर्वा यांनीं युक्त उदक देवादिकांस देतात तें अर्घ्य.पाय धुण्याचें पाणी तें पाद्य.कोणी शिष्टास मधुदहीं हीं मिश्र करून खावयास देतात तो मधुपर्क.

न जेविला ॥ १३ ॥ गंडूषपात्रीं आचवण ॥ मलयजगंधें करोद्वर्तन॥क्षाळूनि हस्तपादवंदन ॥ दिव्यवसनें पूसिलें ॥ १४ ॥ भोजनोतरील जे उपचार ॥ परिसें परीक्षिति सादर ॥ जैसें निरूपी व्यासकुमर ॥ तें समग्र अवधारा १५॥

तस्मैभुक्तवतेप्रीत्यारामःपरमधर्मवित् ॥ मुखवासैर्गंधमाल्यैःपरांप्रीतिंव्यधात्पुनः ॥४० ॥

॥ टीका ॥ भोजनोत्तर अक्रूराप्रति ॥ मुखवासादि उपचारपंक्ति ॥ राम धर्मज्ञ परमप्रीति॥यथानिगुती समर्पी ॥ १६ ॥ सुवर्णतगटां समान पर्णें ॥ चर्चूनि मुक्ताफळांच्या[3] चूर्णें ॥ केतकीखांदिर गुप्तसुवर्णें ॥ क्रमुकं कर्पूर घोळींव ॥१७॥ एला लवंगा कंकोळ ॥ जाजीपत्री जाजीफळ ॥ केशर नागर सहतांबूल॥ त्रिदशगुणमेळमंडित ॥ १८ ॥ ऐसा तांबूल समर्पून ॥ तद्वत पूर्वरसष्ठीवनं- ॥ परित्यागार्थ तद्भाजन ॥पुढें आणून ठेविलें ॥१९ ॥ केशरमिश्रित चंदनटिळा ॥ अक्षता जैशा माणिक्य किळा ॥ भ्रूमाजि कस्तूरीचा टिकला ॥ श्रवणीं भरिला पौष्येय ॥ २० ॥ जवादिमिश्रित मलयजउटी ॥ आपाद सुमनमाळा कंठीं॥ विचित्र गुच्छ खोविले मुकुटीं ॥ सौरभ्यमुष्टि उधळिलिया ॥ २१ ॥ सुरभिनिर्यास चूर्णशलाका ॥ अग्रीं योजूनियां पावका ॥ रामें अर्पूनि स्वफल्कतोका ॥ उत्कृष्ट तोषा पावविलें ॥ २२ ॥ रामकृष्णें पूजिला ऐसा ॥ नंदें अभिवंदिला शिरसा॥ मधुरोत्तरीं मार्गक्लेशा ॥ हरिता झाला तें ऐका ॥ २३ ॥

पप्रच्छसत्कृतंनंदःकथंस्थनिरनुग्रहे ॥ कंसेजीवतिदाशार्हसौनपालाइवावयः ॥ ४१ ॥

॥ टीका ॥ ऐसा अक्रूर सम्मानिला ॥ त्यासि नंद बोलता झाला ॥ दाशार्हशब्दें अक्रूराला॥संबोधन नंदाचें

---

१ तस्त. २ हातास सुगंधी द्रव्य लावणें. ३ चुन्यानें. ४ कात. ५ सुपारी. ६ विड्याचा पहिला रस थुंकण्या करितां. ७ पिकदाणी,

॥ २४ ॥ नंद ह्मणे गा श्वफल्कतनया ॥ जीवंत असतां कंसा निर्दया ॥ तुह्मांसि दुर्लभ सुखाची छाया ॥ यत्नें कैसिया वांचलां ॥ २५ ॥ पशुघ्नें पोसिलीं जेंवि मेंढरें ॥ तैशा प्रजा कंसें क्रूरें ॥केव्हां छेदील नकळे शिरें॥सदा धोसरें घालिती ॥ २६ ॥ अनुग्रह ह्मणिजे प्रसन्नता ॥ हे कदापि नाहीं कंसचित्ता ॥ यालागीं निरनुग्रह तत्त्वता ॥ अतिक्रूरता पशुघ्न ॥२७॥ सौनप[1] ह्मणिजे पशुहिंसका ॥ मेंढरां अविनामें ओळखा ॥ तैसाच कंस पाळक लोकां ॥ ह्मणे श्वफल्कात्मजानंद ॥ २८ ॥

योऽवधीत्स्वस्वसुस्तोकान्क्रोशंत्याअसुतृप्खलः ॥ किंनुस्वित्तत्प्रजानांवःकुशलंविमृशामहे ॥ ४२ ॥

॥ टीका ॥ अहो जो बहिणीचीं लेंकुरें ॥ आक्रंदतां ते झिडकूनि करें ॥ हिरोनि आपटी क्रूरप्रहारें ॥ कठोर अंतरें निर्लज्ज ॥ २९ ॥ प्राणपोषक लांडगे व्याघ्र ॥ तैसा खळकर्मा घोर ॥ कीं अपत्यभक्षक सर्प मार्जार ॥ तैसा निष्ठुर दुरात्मा ॥ ३० ॥ ऐसिया कंसप्रजांचें जिणें ॥ दुर्लभ सचिंत क्षणें क्षणें ॥ त्या तुह्मांसि कुशल पुसणें ॥ कवण्या गुणें दानपते ॥३१॥ व्याघ्रानिकट बांधिली गाय ॥ पाणी पिऊनि चारा खाय॥तिचें काळिज करपोनि जाय ॥ तोचि न्याय तुह्मां सर्वां ॥ ३२ ॥ तेथ कोणतें कुशळ पुसणें ॥ अक्रूरा लागूनि नंद ह्मणे ॥ ऐसी ऐकोनि सूनृत[2]वचनें ॥ तोषला मनें दानपत्ति ॥ ३३ ॥

इत्थंसूनृतयावाचानंदेनसुसभाजितः ॥ अक्रूरःपरिपृष्टेनजहावध्वपरिश्रमम् ॥ ४३ ॥

॥ टीका ॥ सभास्थानीं कृतसम्मान ॥ माधुर्यगिरा प्रश्नं करून ॥ अक्रूर पावला समाधान ॥ संसारशीण वि-

---

[1] खाटिक. [2] सत्य व मधुर अशीं वचनें.

सरला ॥ ३४॥ अनेकयोनि परिभ्रमतां ॥ मार्गीं जो श्रमला होता ॥ रामकृष्णें सम्मानितां ॥ नंदप्रश्नें तो हरला ॥ ३५ ॥ शुकेंहावृत्तांत नृपा कथिला ॥ इतुकेनि अध्याय संपूर्ण झाला ॥ अठतिसावा तो वाखाणिला ॥ पुढें श्रोत्यांला सूचना ॥ ३६ ॥ एकोणचाळिसाव्याआंत ॥ मथुरे जाईल कृष्णनाथ ॥ तेव्हां गोपिका विरहें तप्त ॥ रुदती वदती विविधोक्ति ॥ ३७ ॥ आणि अक्रूरें करितां यमुनास्नान ॥ जळीं देखोनि रामकृष्ण ॥ उन्मज्जनीं रथीं देखोन ॥ पुन्हा निमग्न होऊनी ॥ ३८ ॥ जळीं देखेल तो विश्वरूप ॥ सद्गद अष्टभावीं सकंप॥होईल स्तवनार्थ साटोप ॥ कथाकलाप तो परिसा ॥ ४३९ ॥ एकनाथ चन्द्रबिम्ब ॥ चिदानंदाची धवळ शोभ ॥ स्वानंदपीयूषाचा लाभ ॥ गोविंदकिरणीं दयार्णवा ॥ ४० ॥ तें हें अष्टादश सहस्र ॥ श्रीमद्भागवत पुराण थोर ॥ परमहंससंहितासार ॥ स्कंध सुंदर दशम हा ॥४१॥ शुकपरीक्षितिसंवाद ॥ अक्रूरभेटीचा आनंद ॥ दयार्णवोक्त महाराष्ट्र विशद अठतिसावा संपला ॥ ४२ ॥ ॥ इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायामक्रूरश्रीकृष्णसप्रेमदर्शनंनामाऽष्टत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्लोक ॥ ४३ ॥ टीका ओव्या ॥ ४४२ ॥ एवं संख्या ॥ ४८५ ॥ ॥ ॥

---

१ बुडी मारून वर उठणें. २ आवेशयुक्त. ३ कथासमूह.

अध्याय ३६वा.

व्रजासम्मुख येतां हरि॥ पृष्ठीं घालूनिया व्रजपुरी॥ अरिष्ट धांवे कृष्णावरी॥ खुरीं धरित्री विदारित॥ ४०
पळतां देखोनि गोकुलवासी॥ भेऊं नका हो म्हणे त्यांसी॥ मी असतां हृषीकेशी॥ कृतांतासी त्रासीन॥ ६५॥



श्रीकृष्णसच्चिदानंदाय नमः ॥ ॥ वेधी पदाब्जसाधकभ्रमरां ॥ श्रीमुखमयंकध्यातृचकोरां ॥ प्रबोधसुधाघन मुमुक्षुनिकरां ॥ चातकां मोरां नाचवी ॥ १ ॥ शमदमादि साधनकोटी ॥ साधितां वैराग्यहातवटी ॥ सायुज्यपदाचियेही मुकुटीं ॥ श्रीपादप्रेमा जोडिला ॥ २ ॥ तेचि साधक श्रीपादकमळा ॥ वांचूनि नेच्छिती सुकृतफळा ॥ येरां प्राकृतां दुर्बळां ॥ प्रेमजिव्हाळा दुर्लभ ॥ ३ ॥ भ्रमरा पद्मेंशीं साजणें ॥ कीं सलिलाविण मीना नजिणें ॥ तेंवि पादाब्जसेवनेंविण विभवें आनें दुःखदें ॥ ४ ॥ हा निसर्गप्रेमप्रद ॥ तें स्वामीचें पादारविंद ॥ जें वांछितां सुरवरवृंद ॥ सुकृतमंद[2] नलाहती ॥ ५ ॥ ध्यानयोगें मनःसंकल्प ॥ जिहीं अर्पिले कोटिकल्प ॥ तेचि चकोर निर्विकल्प ॥ वदनोडुप[3] प्राशिती ॥ ६ ॥ येरां द्विजां[4] वायसादिकां ॥ अनोळखीच मुखमयंका ॥ मा ते कोठूनि तत्पीयूखा ॥ सेवनसुखा वेधती ॥ ७ ॥ यांलागिं अनेकजन्मवरी ॥ ध्यानयोगाची सामग्री ॥ जिहीं साधूनि घेतली पदरीं ॥ ते तव वक्त्रीं वेधती ॥ ८ ॥ स्वप्नभ्रमाचा विक्षेप ॥ मोडूनि सुषुप्ति करी लोप ॥ तो मार्तंड गगनदीप ॥ जागृदवस्थाबोधक ॥ ९ ॥ परि तो अबोधची बोध ॥ प्रवृत्ति बोधूनि करी बद्ध ॥ केवळ विषयासक्ती विरुद्ध ॥ तेचि प्रसिद्ध प्रकाशी ॥ १० ॥ जागृतिबोधें समस्त प्राणी ॥ प्रवर्तती विषयाचरणीं ॥ तेणें पडती भवभ्रमणीं ॥ गर्भजाचणीमाजिवडे ॥ ११ ॥ देखूनि क्षुधेची जाचणी ॥ रसना रसाच्या गवेषणीं ॥ पडोनि भ्रमे संसारवनीं ॥ नानायत्नीं रस-

---

१ चंद्र. २ ज्यांचें पुण्य कमी ते. ३ मुखचंद्र. ४ पक्ष्यांना.

लोभें ॥ १२ मग ते रसप्राप्तीसाठीं ॥ ज्ञानवयाची सोडूनि गांठीं ॥ वुद्धि धांवडी बारावाटीं ॥ महादुर्घटीं श्रमपावे ॥ १३ ॥ क्षणैक होतां जठरपूर्ति ॥ तंव घ्राण अपेक्षी उत्तम हंती ॥ नेत्र लावण्यरूपा झुरती ॥ त्वागिच्छारति मृदुस्पर्शीं ॥ १४ ॥ गायनास्तव झुरती श्रवण ॥ अभीष्टवैभव वांछी मन ॥ जागृतिबोधें हें भवभान ॥ जन्ममरणप्रद होय ॥ १५ ॥ ह्मणाल वदनें शास्त्रपठन ॥ नयनें अक्षरपरिज्ञान ॥ श्रवणें श्रुत्यर्थावधारण ॥ कां भवतरण नकरी हो ॥ १६ ॥ तरी शास्त्रें पढोनि लोकांपुढें ॥ खोंलती दीनत्वें बापुडे ॥ ज्ञान विकिती जठरचाडे ॥ केंवि निवाडें ते तरती ॥ १७ ॥ अपसठ्यादि पिशाचलिपी ॥ अनेक विद्या अक्षरजल्पीं ॥ नीचसेवनें महत्त्व कल्पी ॥ तो निष्पापी कैं होय ॥ १८ ॥ करूनि श्रुत्यर्थावधारणा ॥ जठरार्थ वाखाणी पुराणा ॥ अनेक देश कटकें नाना ॥ जठरतर्पणा लागिं भ्रमे ॥ १९ ॥ एवं बोध जो प्रवृत्तिपर ॥ तयाचि नाम भव दुस्तर ॥ प्रकर्षेंकरूनि आत्मविचार ॥ प्रबोधक चतुर यास्तव तूं ॥ २० ॥ विषयनिष्ठा सोडवावया ॥ अदृष्ट फळ बोधिसी तयां ॥ देहात्मबुद्धि नेसी लया ॥ आणूनि उदया जीवदशा ॥ २१ ॥ मग ते जीवात्मबुद्धीकरून ॥ इहामुत्रार्थ भोगभान ॥ साच मानूनि कर्माचरण ॥ फलाशा धरून विचंबिती ॥ २२ ॥ ऐसिया जीवात्मबुद्धिमंतां ॥ वास्तव बोधूनि चिदात्मकता ॥ त्रिविध बंधमोक्षकर्त्ता ॥ तूं तत्त्वता चित्सूर्य ॥ २३ ॥ यालागिं वास्तव प्रबोधन ॥ कर्त्ता तो तूं प्रबोधघन ॥ शुद्धाधिकारी चातकगण ॥ स्वमुखें गर्जोन तोषविसी ॥ २४ ॥ गोशद्बें जे तव चित्किरण ॥ जिहीं प्रबोधिसी सज्जन ॥ यालागिं गोविंद हें अभिधान ॥ गोवेत्तृत्वें तुज शोभे ॥ २५ ॥ जैसा गोमंत अंशुमाळी ॥ स्वतेजें प्रकट असतां जवळी ॥ नेणती विमुखें कां आंधळीं ॥ तेंवि हृत्कमळीं तुज नेणों ॥ २६ ॥ प्रबोघामृतें

---

१ स्पष्ट करिती. २ श्रम करितात. ३ किरण ज्यास आहेत तो. ४ सूर्य. ५ सुगंध.

ऐसिया जडा ॥ मज मुरडूनि आपणाकडां ॥ दाविलें सच्चित्सुखउजिवडा ॥ नेत्रीं उघडा नांदोनी ॥ २७ ॥ पुन्हा स्वगुण वर्णावावया ॥ स्वसत्ता अधिष्ठूनि मम हृदया ॥ भाषाव्याख्यान विवरावया ॥ दशमस्कंधीं नियोजिलें ॥ २८ ॥ तेथ श्रीमत्सत्तायोगें ॥ पंचतीस अध्याय संपले मागें ॥ पुढें यथानुक्रमप्रसंगें ॥ छत्तिसावा आदरिला ॥ २९ तेथ पंचतिसाव्या अध्यायांतीं ॥ कृष्णलीला वर्णितां युवति॥सायंकाळीं व्रजाप्रति ॥ येतां श्रीपति हरिखेल्या ॥ ३० ॥ व्रजासन्निध श्रीभगवान् ॥ सहित वयस्य संकर्षण ॥ वेणुवादनें संगीतिगान ॥ येतां गोगणपुरस्कृत[१] ॥ ३१ ॥ सुरवर वर्षती दिव्यसुमनीं ॥ दुंदुभींचे विजयध्वनि ॥ गंधर्व गाती तानमानीं ॥ मंगलस्वनीं हरिचरितें ॥ ३२ ॥ अप्सरा नर्तकी नृत्य करिती ॥ गोपाळ आनंदें नाचती ॥ हर्षें पाहों धांविल्या युवति ॥ नसाहे दुर्मति अरिष्ट ॥ ३३ ॥ ऐसा आनंदभरित हरि ॥ देखोनि प्रवेशतां व्रजपुरीं ॥ अरिष्टासुर अरिष्ट करी ॥ तें यावरी अवधारा ॥ ३४ ॥ शुक ह्मणे गा परमपवित्रा ॥ कुरुनरेंद्र गौरवगात्रा[२] ॥ विचित्रवीर्याच्या प्रपौत्रपुत्रा ॥ परिसें सत्पात्रा परीक्षिति ॥ ३५ ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ अथतर्ह्यागतोगोष्ठमरिष्टोवृषभासुरः॥ महींमहाककुत्कायःकंपयन्खुरविक्षताम् ॥ १ ॥

टीका ॥ सुरवर व्रजपुर सचराचर ॥ कृष्णागमनें तोषनिर्भर ॥ जाले असतां त्यानंतर ॥ देखोनि असुर क्षोभला ॥ ३६ ॥ वृषभासुर तो अरिष्टनामा ॥ लोकत्रयाच्या मंगलधामा ॥ क्षोभला देखोनि पुरुषोत्तमा ॥ दुष्ट दुरात्मा दुर्वीर्य ॥ ३७ ॥ म्लेच्छ विप्रांची मंडळी ॥ कीं धर्माचरणा नसाहे कळि ॥ तैसा देखोनि श्रीवनमाळी

---

[१] पुढें केलेला. [२] गौरव ह्म० महत्त्व तेणेंकरून युक्त गात्र ह्म० शरीर ज्याचें तो.

अरिष्ट तेकाळीं क्षोभला ॥ ३८ ॥ याच्या क्षोभाचें लक्षण ॥ देहाकृति प्रताप गहन ॥ साडेतीं श्लोकीं विवरण ॥ व्यास नंदन निरूपी ॥ ३९ ॥ व्रजासम्मुख येतां हरि ॥ पृष्ठीं घालूनियां व्रजपुरीं ॥अरिष्ट धांवे कृष्णावरी॥खुरीं धरित्री विदारित ॥ ४० ॥ महान् ह्मणिजे विशाळकाय ॥ स्थूळ वोसं[१]ड पर्वतप्राय ॥ खुरक्षतांचे वोपूनि घाय ॥ धरा कंपायमान करी ॥ ४१ ॥

रंभमाणःखरतरंपदाचविलखन्महीम् ॥ उद्यम्यपुच्छंवप्राणिविषाणाग्रेणचोद्धरन् ॥ २ ॥

॥टीका॥भयानक रंभ[२]माणें॥ह्मणिजे वृषभशब्दें गर्जना करणें॥मदोन्मत्त डरक्या देणें॥त्रासती जेणें सिंह व्याघ्र॥ ४२ ॥ चरणघातें धरा उकरी ॥ ते भू मानी वज्रा परी ॥ शृंगीं उलथोनि टाकी गिरि ॥ प्रळय व्रजपुरीं मांडिला ॥ ४३ ॥ वोसंडपर्यंत वाहूनि पुच्छ ॥ थडके दिग्गज मानी तुच्छ॥विषाणाग्रीं उच्च उच्च॥पर्वत उलथोनि टाकी तसे ॥ ४४ ॥ ग्राम दुर्गें यमुनादरडी ॥ शृंगें रोवूनि मस्तकें खरडी ॥ भयें जनाची पडली भरडी ॥ वळती वेंगडी करचरणां ॥ ४५ ॥

किंचित्किंचिच्छकृन्मुंचन्मूत्रयंस्तब्धलोचनः ॥ यस्यनिर्ह्रादितेनांगनिष्ठुरेणगवांनृणाम् ॥३॥
पतंत्यकालतोगर्भाःस्रवंतिस्मभयेनवै ॥

॥ टीका ॥ उन्मत्तवृषभचेष्टा कुटिल ॥ किंचित् किंचित् टाकी मळ ॥मळासरिसें मूत्रजळ ॥वारंवार विसर्जी॥

---

१ कोळें, वशिंड. २ डुरकणें.

४६ ॥ मदघूर्णित नेत्रपातीं ॥ स्तब्ध ह्मणिजे नहालती ॥ सरोंख पाहतां मूर्छित होती ॥ मनुष्ययाति पश्वादि ॥ ४७ ॥ ज्याची गर्जना ऐकोनि कानीं ॥ गाई आणि व्रजकामिनी ॥गर्भ टाकिती पैं दचकोनी॥प्राणहानि कितियेकां ॥ ४८ ॥ कितिएकींचे गर्भपात ॥ गर्भस्त्रावही जाले बहुत ॥ पात स्त्राव यादोहीं आंत ॥ भेद काय तो अवधारा ॥ ४९ ॥ चतुर्थमासवरी गर्भ पडती ॥ स्त्राव बोलिजे तया प्रति॥ पंचमीं षष्ठीं पात ह्मणती॥ सप्तादि प्रसूति ह्मणावी ॥ ५० ॥ पूर्ण नभरतां गर्भमान ॥ ऐकोनि अरिष्टासुरनर्दन ॥ गोअंगनांचें गर्भपतन ॥ होय दचकोनि अकाळीं ॥ ५१ ॥ शेळया मेंढ्या गाई महिषी ॥ अश्विनी आणि स्त्रिया मानुषी॥ गर्भ टाकिती भयासरिसी ॥ दाही दिशीं आकांत ॥ ५२ ॥

निर्विशंतिघनायस्यककुद्यचलशंकया ॥ तंतीक्ष्णशृंगमुद्वीक्ष्यगोप्योगोपाश्चतत्रसुः ॥ ४ ॥

॥ टीका ॥ ज्याचे वोसंडप्रांतीं घन ॥ रिघती पर्वतभावने करून ॥ तीक्ष्णशृंगाग्रें देखोन ॥ गोपगोपीगण त्रासले ॥५३॥उच्च भयंकर शृंगाग्रासी॥देखोनि कांपती व्रजनिवासी॥गोधनें बुजालीं गोकुळासी ॥सोडूनि चौपासीं विखुरलीं ॥ ५४ ॥

पशवोदुद्रुवुर्भीताराजन्संत्यज्यगोकुलम् ॥ कृष्णकृष्णेतितेसर्वेगोविंदंशरणंययुः ॥ ५ ॥

॥ टीका ॥ अद्भुत नृपाचिये कर्णीं ॥ विस्मयें सांगे बादरायणि ॥ धेनु सांडूनि वत्सें तान्हीं ॥ भरल्या रानीं

---

१ गर्जना. २ वोडी. ३ पर्वतची कल्पना करून.

संत्रासें ॥ ५५ ॥ धेनुमहिष्यादि वांसुरें ॥ व्रजीं होतीं जीं लघुतरें ॥ त्यांतें सांडूनि बुजालीं ढोरें ॥भरलीं कांतारें प्राणभयें ॥ ५६ ॥ तस्मात आपणाहूनि प्रिय ॥ नाहीं ऐसा अभिप्राय ॥ नृपा बोधूनि व्यासतनय ॥ कथान्वय निरूपी ॥ ५७ ॥ ऐसा देखोनि दुष्ट अरिष्ट ॥ सर्वीं मानूनि परम अरिष्ट ॥ ह्मणती कृष्णा निरसीं कष्ट ॥ भयें उद्भट त्रासलों ॥ ५८ ॥ कृष्ण कृष्णेति कृष्णेति ॥ ह्मणोनि येती काकुळती ॥श्रीगोविंदा गोकुळपति ॥ शरण तुजप्रति रिघालों ॥ ५९ ॥ तूंचि संकटीं संरक्षिता ॥ तूंचि आमुचा प्राणदाता ॥ तूंचि भयाचा उपहर्ता ॥ दुष्टनिहंता दैत्यारि ॥ ६० ॥ मेघ वर्षतां शिळाधारीं ॥ तुवां गोवर्धन धरिला करीं ॥ व्रज रक्षिलें सप्तरात्री ॥ तूं कैवारी आमुचा ॥६१॥ वरुणापासूनि आणिला नंद॥अजगरें गिळितां प्राणप्रद॥व्रजजनाचा जीवनकंद ॥ तो तूं मुकुंद भयहर्ता ॥ ६२ ॥ ऐसें आपुलालिया वाणी ॥ कृष्ण स्मरती समस्त प्राणी॥ हें जाणोनि अभयदानी ॥ निगमयोनि प्रवर्त्तला ॥ ६३ ॥

भगवानपितद्वीक्ष्यगोकुलंभयविद्रुतम् ॥ माभैष्टेतिगिराश्वास्यवृषासुरमुपाह्वयत् ॥ ६ ॥

॥ टीका ॥ ऐसे व्रजजन कृष्णा शरण ॥ देखोनि कृष्णें ही संत्रस्तजन ॥ गोकुल भयभीत जाणून ॥ अभय देवोन आश्वासी ॥ ६४ ॥ पळतां देखोनि गोकुळासी ॥ भेऊं नका हो ह्मणे त्यांसी॥मी असतां हृषीकेशी ॥ कृतांतासी त्रासीन ॥ ६५ ॥ अरिष्ट उदेलें परमारिष्ट ॥ ह्मणोनि प्रवेशला हा गोष्ठ ॥ निमेषामाजी करीन पिष्ट ॥ भोगील कष्ट कृतकर्में ॥ ६६ ॥ ऐसे व्रजजन आश्वासोन॥अरिष्टा सम्मुख श्रीभगवान॥करिताझाला आवाहन ॥ गिरा गर्जोन साटोपें ॥ ६७ ॥

---

१ भयानें. २ अतिशय. ३ वेदांचें उत्पत्तिस्थान. ४ बोलावणें ५ आवेशानें

गोपालैःपशुभिर्मंदत्रासितैःकिमसत्तम ॥ बलदर्पहाऽहंदुष्टानांत्वद्विधानांदुरात्मनाम् ॥ ७॥

॥ टीका ॥ दुष्टां माजी परम श्रेष्ठा ॥ मूर्खा मंदमति अरिष्टा॥ गाईगोपांसीं कुचेष्टा ॥ वृथापुष्टा कां करिसी॥
॥६८॥ गाई गोपां संत्रासूनी ॥ कोण पुरुषार्थ इच्छिला मनीं ॥ तुजसारिख्या दुष्टदमनीं ॥ चक्रपाणि मी सिद्ध
॥ ६९ ॥ दुष्टबळाचा निहंता[1] ॥ दुर्जनाचा दर्पहंता[2]॥ दुरात्मयाची दुष्ट अहंता ॥ मी संहर्त्ता श्रीकृष्ण॥७०॥मज
नेणोनि गोपगाई ॥ त्रासितां लज्जा न वाटे कांहीं ॥ पुरुषार्थ वाहसी आपुले ठायीं ॥ तरी सत्वर येईं सामोरा ॥
७१ ॥ मी दुष्टांचा दमनकर्त्ता ॥ तूं वाहसी दुष्ट अहंता ॥ मजसीं गांठी पडली आतां ॥ कोण रक्षिता तुजलागीं७२

इत्यास्फोट्याच्युतोऽरिष्टंतलशब्देनकोपयन् ॥ सख्युरंसेभुजाभोगंप्रसार्यावस्थितोहरिः ॥ ८ ॥

॥ टीका॥ऐसें बोलोनि कैटभारि[3] ॥डावा बाहु उजव्या करीं ॥ ठोकूनि आवेश प्रदीप्त करी॥दुष्टाअंतरीं तलशब्दें[4]
॥ ७३ ॥ तलशब्द तो बाहुध्वनि ॥ तेणें करूनि अरिष्टमनीं ॥ क्षोभ उपजवी जगद्योनि[5] ॥ समरांगणीं साटोपें
॥७४॥ सलंब बाहु भुजगापरी ॥ संवगडियाच्या स्कंधावरी॥पसरूनि उभा निर्भय हरि ॥ दुराचारिहननार्थ
॥७५॥स्वयें अच्युत जो अविनाश॥ करावया अरिष्टनाश ॥उभा राहिला सावकाश॥त्रिजगा तोष यश गातां॥७६

सोऽप्येवंकोपितोऽरिष्टःखुरेणावनिमुल्लिखन् ॥ उद्यत्पुच्छभ्रमन्मेघःक्रुद्धःकृष्णमुपाद्रवत् ॥ ९ ॥

॥ टीका ॥ ऐसा क्षोभवितां अरिष्ट ॥ तोही जात्या दैत्य दुष्ट ॥ बळें क्षोभोनि उद्भट ॥ झाला नीट समरंगीं

---

[1] नाश करणारा. [2] गर्वनाशक. [3] कैटभदैत्याचा शत्रु. [4] छड्डु ठोकण्यानें. [5] जगाचें उत्पत्तिस्थान.

७७ ॥ खुरें उकरी अवनितळ ॥ पुच्छें विध्वंसी घनमंडळ ॥ कृष्णावरी धांविला प्रबळ ॥ यंत्रगोळ[1] पैं जैसा ॥
७८ ॥ क्रोधें क्षुब्ध जैसा भुजंग ॥ कीं अनावर मार्गणवेग[2] ॥ तैसा धांविला अतिसवेग ॥ कमलारंग लक्षूनी ७९ ॥

अग्रन्यस्तविषाणाग्रःस्तब्धासृग्लोचनोऽच्युतम् ॥ कटाक्षिप्याद्रवत्तूर्णमिंद्रमुक्तोऽशनिर्यथा ॥ १०॥

॥ टीका ॥ तीक्ष्ण शृंगाग्रें पैं दोन्ही ॥ पुढें धरूनि शस्त्रस्थानीं ॥ आरक्त लोचनें ज्वलित वह्नि ॥ स्तब्ध पक्ष्मणी[3] नहालती ॥ ८० ॥ क्रूर कटाक्षें वक्रदृष्टी ॥ श्रीकृष्णाची अंगयष्टि ॥ लक्षूनि धांवे दुष्ट हट्टी ॥ अरिष्ट कपटी कुटिलात्मा[4] ॥ ८१ ॥ इंद्रें प्रेरिला जैसा अशनि[5] ॥ वृत्रासुरावरी प्रज्वळोनी ॥ कडकडाटें धांवे गगनीं ॥ तैसा कृष्णीं संघटला ॥ ८२ ॥ केवळ क्रोधाब्धि अरिष्ट ॥ क्षोभें लोटला अतिउद्भट ॥ अगस्तितुल्य कंबुकंठ ॥ उठिला घोंट भरावया ॥ ८३ ॥

गृहीत्वाश्रृंगयोस्तंवाअष्टादशपदानिसः ॥ प्रत्यपोवाहभगवान्गजःप्रतिगजंयथा ॥ ११ ॥

॥ टीका ॥ वज्रकल्लोळ जैसा तुटे॥तैसी मुसांडी आंगीं झगटे॥येवा[6] सांवरूनि वैकुंठें[7]॥शृंगें बळकटें धरूनियां॥ ८४ ॥ अरिष्ट झाडितां नसुटे वेगें ॥ बळें लोटितां मेघरंगें[9] ॥अठरा पांड सारिला मागें ॥नाग[8] प्रतिनागें ज्यापरी८५ अरिष्टातें क्षेपितां हरि ॥ उलथोनि पडिला पृथ्वीवरी ॥ अठरा पांडपर्यंत दुरी ॥ पुन्हा सांवरी तो आपणा ॥ ८६ ॥

सोऽपविद्धोभगवतापुनरुत्थायसत्वरः ॥ आपतात्स्विन्नसर्वांगोनिःश्वसन्क्रोधमूर्छितः ॥१२ ॥

॥ टीका ॥ कृष्ण अरिष्ट निक्षेपितां ॥ उलथोनि पडिला पृथ्वी वरुता॥पुन्हा धरूनि क्रूर अहंता॥ जाला उठता ॥ ४ ॥
सवेग ॥ ८७ ॥आंगीं क्रोधाग्नि प्रज्वळला॥श्वासासरिशा निघती ज्वाला॥घामें सर्वांगीं डवडविला ॥सुस्नात झाला

---

१ तोफेचा गोळा. २ बाणाचा जोर. ३ पापण्या. ४ दुष्टबुद्धीचा. ५ वज्र. ६ वेग. ७ कृष्णानें. ८ हत्ती. ९ लोटितां.

निर्वाणीं ॥ ८८ ॥ऐसा सक्रोध कृष्णावरी ॥ अरिष्ट पडला वज्रापरी ॥ पडतां कृष्णें तो शृंगाग्रीं ॥धरूनि करीं मुरडिला ॥ ८९ ॥

तमापतंतंसनिगृह्यशृंगयोःपदासमाक्रम्यनिपात्यभूतले ॥
निष्पीडयामासयथाऽऽर्द्रमंबरंकृत्वाविषाणेनजघानसोऽपतत् ॥ १३ ॥

टीका ॥ शृंगें रगडोनि दोहीं करीं ॥ लात मारिली कुक्षीवरी ॥ उलथूनि पाडिला धरित्री ॥ चरणप्रहारीं दडपिला ॥ ९० ॥ दीर्घवस्त्र धुवोनि नारी ॥ पायें दडपोनि पिळिती करीं ॥ कृष्णें अरिष्ट तैसिया परी ॥ पिळिला भूवरी दडपोनी ॥ ९१ ॥ रगडूनि पायें दडपिला मही ॥ शृंगें पिळिलीं हातें दोहीं ॥ उपटोनि हाता आलीं तेंहीं ॥ मग तद्घायीं[1] ताडिला ॥ ९२ ॥ निष्ठुर लागतां शृंगप्रहार ॥विकळ पडला अरिष्टासुर ॥ यावरी प्राणप्रयाणपर ॥ अन्यव्यापार विसरला ॥ ९३ ॥

असृग्वमन्मूत्रशकृत्समुत्सृजन्क्षिपंश्चपादाननवस्थितेक्षणः ॥
जगामकृच्छ्रंनिर्ऋतेरथक्षयंपुष्पैःकिरंतोहरिमीडिरेसुराः ॥ १४ ॥

टीका ॥ कंठ वाजतसे घडघडां ॥ अशुद्ध[2] वमितसे भडभडां ॥ पाय खोडितसे खडखडां ॥झाडी तडफडां सर्वांगें ॥ ९४ ॥ तनुवैकल्यें[4] मूत्रलेंढे ॥ गांडीवाटे पडती लेंडें ॥नेत्र फिरवी वांकडे वेडे॥पसरी चाभांडें[3] क्षणक्षणा

---

१ त्या शृंगप्रहारांनीं. २ रक्त. ३ जाभाडें अ० दाभाडें. ४ शरीराच्या दुर्बळतेमुळे.

॥ ९५ ॥ देहममता सहसा नसुटे ॥ अहंता धरूनि देही वेंठे ॥ यास्तव कष्ट होती मोठे ॥ युगान्त वाटे तनुत्यागीं
॥ ९६ ॥ एक एके रोमरंध्रीं ॥ वृश्चिकवेदना सहस्र वरी ॥ तथापि अहंममता धरी ॥ हांव पसरी वांचावया
॥ ९७ ॥ जितुकी ज्याची अहंता प्रबळ ॥ तितुका दुःखद अंतकाळ[1] ॥ ह्मणोनि अरिष्ट क्लेशबहळ ॥ भोगी
व्याकुळ प्राणांतीं ॥ ९८ ॥ विवेकसंपन्न निरहंकृति ॥ अंतीं कृष्णस्मरण करिती ॥ ते पावती सायुज्यमुक्ति ॥
पुन्हा संसृति त्यां नाहीं ॥ ९९ ॥ त्या कृष्णाच्या हातें मरण ॥ अरिष्ट पावला असतां जाण॥परंतु प्रबळ देहाभिमान
॥ नपवे निर्वाण यास्तव तो ॥ १०० ॥ देहांतूनि प्राण निघतां ॥ अरिष्टें भोगिली क्रूर व्यथा ॥ वारंवार
देहाहंता ॥ जाची तत्वता जीवातें ॥ १ ॥ जीवमात्र चैतन्यघन ॥ परंतु अध्यस्त[2] देहाभिमान ॥ तेणें भ्रमती
प्राणिगण ॥ जन्ममरणभवचक्रीं ॥ २ ॥ यास्तव कृष्णहस्तें हनन ॥ जालें असतां क्लेशगहन ॥ भोगूनि पावला
मृत्युस्थान ॥ हें व्याख्यान शुकें केलें ॥ ३ ॥ देहाहंता जंव जंव सुटे ॥ तंव तंव क्लेशसमुद्र आटे ॥निःशेष आत्मत्वें
जें निवटे ॥ तें तो वेंठे पूर्णत्वें ॥ ४ ॥ जेथ ज्ञानाचा अंकुर ॥ तोचि नररूपें ईश्वर ॥ ज्ञानविहीन पशु पामर
॥ तो प्रत्यक्ष असुर वृषभात्मा ॥ ५ ॥ कृच्छ्रं[3] जगाम ऐसें पद ॥ तें हें वाखाणिलें विशद ॥यानंतरें तो दुर्मद ॥
मृत्युपद पावला ॥ ६ ॥ कृष्णहस्तें पावोनि मरण ॥ आणि अरिष्टा मृत्युसदन ॥ ऐसिये शंकेचें खंडन ॥ हें व्याख्यान
परिसतां ॥ ७ ॥ ऐसा अरिष्टासुराचा वध ॥ केला श्रीकृष्णें प्रसिद्ध ॥ देखोनि किन्नर गंधर्व सिद्ध ॥
समस्त विंबुध हरिखेले ॥ ८ ॥ जयजयकार दुंदुभिगजरीं ॥ पुष्पवृष्टि करिती शिरीं ॥ कीर्ति गाती सप्तस्वरीं ॥
आणि अप्सरी नाचती ॥ ९ ॥ भारापनयनें धरादेवी ॥ परमानंदें हृदयीं भावी ॥ अरिष्टनाशें सर्वत्र सर्वीं ॥

---

[1] वेष्टिला जातो. [2] भ्रमानें कल्पिलेलें. [3] कष्टानें मृत्यु पावला. [4] देव. [5] भार दूर झाल्यामुळें.

सदयार्णवीं निमज्जिजे ॥ १० ॥ संपलें अरिष्टासुराख्यान ॥ येथूनि कंसासुरानुसंधान॥गोविंदसद्गुरुवरदें वदन ॥ दयार्णवाचें वदेल ॥ ११ ॥ इत्यरिष्टाख्यानं समाप्तम् ॥ ६ ॥

एवंककुद्मिनंहत्वास्तूयमानःस्वजातिभिः ॥ विवेशगोष्ठंसबलोगोपीनांनयनोत्सवः ॥ १५ ॥

॥ टीका ॥ ऐसिया प्रकारीं वृषभासुर ॥ मर्दूनि यशस्वी श्रीधर ॥ संकर्षणेंसीं गोपभार ॥ धेनुपुरःसर पातला ॥ १२ ॥ गोपीनयनां उत्सवरूप ॥ संवगडे वर्णिती नवप्रताप ॥ प्राचीन कीर्ति गाती पशुप ॥ अह्लाद अमूप व्रजभुवनीं॥ १३॥ऐसा मर्दूनि अरिष्ट बळी॥व्रजीं प्रवेशला वनमाळी॥आनंद अमरांचे मंडळीं॥दैत्यां काजळी उदेली १४॥व्रजीं स्वच्छंदें मुकुंद ॥ क्रीडत असतां आनंदकंद ॥ कंसा भेटोनि नारद ॥ करी अनुवाद तो ऐका ॥ १५ ॥

अरिष्टेनिहतेदैत्येकृष्णेनाद्भुतकर्मणा ॥ कंसायाथाऽऽहभगवान्नारदोदेवदर्शनः ॥ १६ ॥

॥ टीका ॥ अद्भुतकर्म प्रकटूनि सृष्टी ॥ कृष्णें मारिला अरिष्ट गोष्ठीं ॥ यानंतरें नारद गोष्ठी ॥सांगे श्रुतिपुटीं कंसाचे ॥ १६ ॥ जिवलग विश्वासवंत चार ॥ परम सूक्ष्म समाचार ॥ सांगे शत्रुकृत विचार ॥ तेंवि मुनिवर कंसातें ॥ १७ ॥ पूर्वीं ऐकोनि गगनवाणी ॥ कंस प्रवर्त्तला देवकीहननीं ॥ वसुदेवें तैं गर्भार्पणीं ॥ भाष देऊनि थांबविला ॥ १८ ॥ प्रथम गर्भ कीर्तिमंत ॥ अर्पितां कंस करुणावंत ॥ झाला देखोनि ब्रह्मसुत ॥ सांगता वृत्तांत कंसातें ॥ १९ ॥ तैं मारिलें गर्भषट्क ॥ वसुदेवदेवकीसि करूनि अटक ॥ विध्वंसूनि यादवकटक ॥ पिता

---

१ भाषण. २ कानांत. ३ गर्भ स्वाधीन करणें. ४ नारद. ५ गुप्तबातमीदार.

निष्टंक निग्रहिला ॥ २० ॥ सप्तमगर्भपाताची बोली ॥ अष्टम कन्या गगना गेली ॥ कंसप्रज्ञा कुंठित झाली ॥ काजळीं[1] धरिली मरणाची ॥ २१ ॥ पूतनादि प्रेरिले दूत ॥ निष्फळ यत्न ते समस्त ॥ यावरी कंस अंतरांत॥ होता विस्मित अनुपायें[2] ॥ २२ ॥ गगनवाणीची वृथा गोष्टी ॥ कन्या जन्मली देवकीपोटीं ॥तेही गगनीं झाली पैठी[3] ॥ भ्रामक चावटी जल्पोनी ॥ २३ ॥ शत्रु आहे अन्यस्थळीं ॥ ह्मणोनि प्रेरिले दैत्यबळी॥ तितुक्यांची ही झाली होळी ॥ कोणे काळीं नुदैजे ॥ २४ ॥ एवं वृथाचि हें अवघें ॥होणार होवोनि गेलें मागें ॥साच असता तरी प्रसंगें ॥ लागवेगें[4] तो येता ॥ २५ ॥ ऐसें मानूनि कंसासुर ॥ करूनि निश्चिंत अभ्यंतर ॥मृत्युचिंतेचा पडला विसर ॥ यास्तव मुनिवर पुन्हा आला ॥ २६ ॥ दिव्य देवर्षि ब्राह्मण ॥ यास्तव ह्मणिजे देवदर्शन ॥ भूत भविष्य वर्त्तमान ॥देवदर्शनविदितत्वें ॥२७॥ अथवा ब्रह्मादिसभास्थानीं॥वृत्तांत देखिला ऐकिला कानीं॥यालागीं देवदर्शनमुनि ॥ शुक वाखाणी यथार्थ ॥ २८ ॥ त्या नारदें कंसापासीं ॥ येऊनि बोधिलें वृत्तांतासी ॥ चिंता कंसाचे मानसीं ॥ स्मरण देऊनि जागविली ॥ २९ ॥ काय कैसें दीधलें स्मरण॥तें ऐकावें सावधान ॥जेणें क्षोभोनि कंसमन ॥ करी प्रयत्न हरिहनना ॥ ३० ॥

यशोदायाःसुतांकन्यांदेवक्याःकृष्णमेवच ॥ रामंचरोहिणीपुत्रंवसुदेवेनबिभ्यता ॥
न्यस्तौस्वमित्रेनंदेवैयाभ्यांतेपुरुषाहतः ॥ १७ ॥

॥ टीका ॥ पूर्वीं नारदें वृत्तांत ॥ सांगूनि आपुला कल्याणार्थ ॥ वांछिला येऊनि परमगुप्त ॥ यास्तव आप्त[6]-

---

१ कैदकेला. २ निरुपायामुळें. ३ स्थिर. ४ अतित्वरेनें. ५ साक्षाद्देवा प्रमाणें ज्ञान ज्याचें तो. ६ खरें बोलणारा.

कंस मानी ॥ ३१ ॥ येतां देखोनि नारदासी ॥ सम्मानूनि पूजिलें त्यासी ॥मग बैसोनि एकांताबासीं ॥ मुनिवाक्यासी अवधारी ॥ ३२ ॥ नारद ह्मणे गा भोजेंद्रा ॥ आझूनि कायसा निदसुरा ॥ सांगोनि गेलों त्या विचारा ॥ कां प्रतिकारा नकेलें ॥ ३३ ॥ कंसें कथिलें सविस्तर ॥ स्वामी यत्न केला फार ॥ परंतु अद्यापि गोचर ॥ शत्रु साचार नाडळे॥३४देवकीसप्तमगर्भपात॥आठवी कन्या झाली अद्भुत॥मारितां गेली गगनाआंत॥मज चिंतेतें घालुनी ॥ ३५ ॥ अन्यस्थळीं आहे शत्रु ॥ ऐसा बोलिली गूढमंत्रु ॥ तदर्थ प्रेरिले महावीर ॥ परी कोठें साचार नुमटे तो ॥ ३६ ॥ हें ऐकोनि नारदमुनि ॥ वृत्तांत सांगे कंसाकानीं ॥कंस आप्तोक्ति[1] मानूनी॥सादर होऊनि अवधारी ॥ ३७ ॥ नारद ह्मणे कंसराया ॥ देवकीची जे ह्मणसी तनया॥ते ययोदा नंदजाया॥तिचे जठरीं जन्मली ॥ ३८ ॥ देवकीचा अष्टम सुत ॥ वसुदेवें तो नेऊनि गुप्त ॥ यशोदेपाशीं ठेवूनि त्वरित ॥ कन्या येथ आणिली ॥ ३९ ॥ ते त्वां वधितां गगना गेली ॥शत्रुवार्ता गूढ कथिली ॥ध्वनितार्थत्वें[2] तुज नुमजली ॥ ते म्यां बोलिली प्रसिद्ध ॥ ४० ॥ सातवा ह्मणसी गर्भपात ॥ अवघाचि मृषा तो वृत्तांत ॥ नंदसदनीं रोहिणसुत ॥ ठेविला गुप्त वसुदेवें ॥ ४१ ॥ पूर्वीं मारिले गर्भ साही ॥ तैसेचि वधिसी हे दोघेही ॥यालागीं ठेवी नंदगेहीं॥भेणें कोण्हाही नकळतां ॥४२ ॥ नंद मानूनी परम मित्र॥ तेथें ठेविले देवकी पुत्र ॥ दिवसें दिवस प्रौढगात्र॥झाले विचित्र प्रतापी ॥ ४३ ॥ तुवां जितुके प्रेरिले पुरुष ॥ त्यां दोघांहीं तावकनाश[3] ॥ केला ऐसिया वृत्तांतास ॥ तुज निःशेष नसांगती ॥ ४४ ॥ इतुकें प्रकट कथिल्या वरी ॥ आतां आपुलें स्वहित करीं ॥ ऐकतां कंसाचे अंतरीं॥ क्रोधलहरी प्रज्वळली ॥ ४५ ॥

---

[1] यथार्थवादीचें भाषण. [2] गूढार्थ. [3] तुझ्या दूतांचा नाश.

निशम्यतद्भोजपतिःकोपात्प्रचलितेंद्रियः ॥ निशातमसिमादत्तवसुदेवजिघांसया ॥ १८ ॥

॥ टीका ॥ ऐकोनि मुनिवराची वाणी ॥ भोजेंद्र दुर्मति अविचारखाणी ॥ क्रोध वोसंडे[1] सर्वां करणीं ॥ अविहित करणी आदरिली ॥ ४६ ॥ खड्ग घेऊनि तीक्ष्णीकृत[2] ॥ वसुदेवाचिया वधार्थ ॥ धांवतां नारदें धरिला हात ॥ बोधिला वृत्तांत तो ऐका ॥ ४७ ॥

निवारितोनारदेनतत्सुतौमृत्युमात्मनः ॥ ज्ञात्वालोहमयैःपाशैर्बबंधसहभार्यया ॥ १९ ॥

॥ टीका ॥ नारद ह्मणे रे भोजपति ॥ ऐसी आहे राजनीति ॥ कार्यसाधक तो पुरुषार्थी ॥ कार्यघाती तो मूर्ख ॥ ॥४८॥ दोघे वसुदेवाचे कुमर ॥ व्रजीं वाढती प्रबळतर ॥ तुझ्या वधास्तव अवतार ॥ धरूनि सुरवर पातले ॥ ॥४९ ॥ ते नकरितां हस्तगत ॥ वसुदेवाचा करिसी घात ॥ त्यांसि वृत्तांत झालिया विदित ॥ तेथूनि त्वरित निघती ते ॥ ५० ॥ कारागृहींचीं बाळकें नेलीं ॥ तुज तीं नाहींत विदित झालीं ॥ आतां व्रजामाजी मोकळीं ॥ कोण आकळी तयांतें ॥ ५१ ॥ वसुदेवदेवकीचिया मरणीं ॥ निर्मम निष्ठुर होती दोन्ही ॥ मग प्रवर्त्तती तुझिये हननीं ॥ नानायत्नीं प्रतापें ॥ ५२ ॥ यालागिं सांवरूनियां क्रोध ॥ त्या दोहींचा योजीं वध ॥ तंववरी वसुदेवानिरोध ॥ निगडबंध[3] करीं राया ॥ ५३ ॥ ऐसा नारदें कंसासुर ॥ वारिला बोधूनि नीतिविचार ॥ मग तो ह्मणे वसुदेवकुमार ॥ मृत्यु साचार हे माझे ॥ ५४ ॥ वसुदेवसुतापासूनि मृत्यु ॥ आपणा कथिला दैवप्रणीतु ॥ हें जाणोनि कंस धूर्त ॥ काय करिता जाहला ॥ ५५ ॥ वसुदेव धरूनि देवकीसहित ॥ निगडबंधनीं निग्रहीकृत॥

---

[1] भरून वाहूं लागे. [2] पाणी दिलेला. [3] बिड्या घालून कैद करणें.

कारागारीं रक्षणयुक्त ॥ रोधितां झाला प्रयत्नें ॥ ५६ ॥ नारदाचिये आज्ञेवरून ॥ रक्षिले वसुदेवाचे प्राण ॥ कारागारीं संस्थापून ॥ मानिलें वचन मुनीचें ॥ ५७ ॥ यानंतरें नारदमुनि ॥ आज्ञा कंसाची घेऊनी ॥ कृष्णदर्शनालागुनी ॥ आनंदोनि निघाला ॥ ५८ ॥ ते पुढारीं सांगों कथा ॥ प्रस्तुत ऐका कंसचरिता ॥ रामकृष्णांचिया घाता ॥ उपाय योजिता पैं झाला ॥ ५९ ॥

प्रतियातेतुदेवर्षौकंसआभाष्यकेशिनम् ॥ प्रेषयामासहन्येतांभवतारामकेशवौ ॥ २० ॥

॥टीका ॥ आज्ञा घेऊनि नारद गेला ॥ कंसें केशी पाचारिला ॥ वृत्तांत तयासि निरूपिला ॥ नारदें कथिला जैसा तो ॥ ६० ॥ केशीसि ह्मणे कंसासुर ॥ तुजविण जिवलग नाहीं अपर ॥ तुवां प्रवेशोनि व्रजपुर ॥ वसुदेवकुमर मारावे ॥ ६१ ॥ रामकृष्ण नामें दोन्ही ॥ माझे शत्रु नंदसदनीं ॥ गुप्त वाढती त्यांच्या हननीं ॥ प्राणदानी मज होईं ॥ ६२ ॥ जंव पेटला नाहीं अनळ ॥ तंव विझविजे वोतूनि जळ ॥ रामकेशव माझे काळ ॥ तूं तत्काळ वधीं तैसे ॥ ६३ ॥ कांटा काढी जो पायींचा ॥ उपकार फेडूं नशकवे त्याचा ॥ मां भंग केलिया मच्छत्रूचा ॥ तात साचा तो तूं कीं ॥ ६४ ॥ एक तो वीर्यें उत्पन्न करी ॥ दुजा उपनयनें संस्कारी ॥ तिसरा विद्याप्रबोध करी ॥ क्षुधा निवारी तो चौथा ॥ ६५ ॥ पांचवा भयापासूनि त्राता ॥ आड निघूनि प्राण रक्षिता ॥ रामकृष्णांच्या केलिया घाता ॥ तो तूं तत्वता मम जनक ॥ ६६ ॥ ऐसा उपकार माझिये शिरीं ॥ केलिया तुझी हे धरित्री ॥ मी होईन आज्ञाधारी ॥ ऐशा प्रकारीं गौरविला ॥ ६७ ॥ देऊनि स्वहस्तें तांबूल ॥ वधावया केशवबाळ ॥ व्रजा धाडिला केशी खळ ॥ पुन्हा कुटिल काय करी ॥ ६८ ॥

---

१ प्रतिबंध करणारा. २ पृथ्वी.

ततोमुष्टिकचाणूरशलतोशलकादिकान् ॥ अमात्यान्हस्तिपांश्चैवसमाहूयाऽऽहभोजराट् ॥ २१ ॥

॥ टीका ॥ केशी धाडूनि व्रजाप्रति ॥ मागें कंसें विवरूनि चित्तीं ॥ रामकृष्णांच्या घाताप्रति ॥ अभिनव युक्ति आदरिली ॥ ६९ ॥ मुष्टिक चाणूर शल तोशल ॥ महाप्रतापी प्रचंड मल्ल ॥ आणि अमात्य बुद्धिकुशल ॥ हस्तिपाळ प्राणसख ॥ ७० ॥ पाचारूनि ऐसियां चतुरां ॥ करूनि एकांतीं बैसकारा ॥ भोजेंद्र सांगे गुह्य विचारा ॥ कुरुनरेंद्रा तो ऐकें ॥ ७१ ॥

भोभोनिशम्यतामेतद्वीरचाणूरमुष्टिकौ ॥ नंदव्रजेकिलाऽऽसातेसुतावानकदुंदुभेः ॥ २२ ॥

॥ टीका ॥ आमात्यां अंबष्ठां आणि मल्लां ॥ मुष्टिकचाणूरशलतोशलां ॥ कंस संबोधी बुद्धिकुशलां ॥ कितवां खळां कुटिळांतें ॥ ७२ ॥ अहो ऐकिलेंकीं अपूर्व ॥ केवढा कपटी हा वसुदेव ॥ येणें दावूनि स्नेहभाव ॥ केलें लाघव तें ऐका ॥ ७३ ॥ सप्तम देवकीगर्भ च्यवला ॥ ऐसा शब्द रूढ केला ॥ रोहिणीपुत्र वाखाणिला ॥ गोकुळा नेला केवांडें ॥ ७४ ॥ अष्टमगर्भाचिये वेळे ॥ दोघें असतां बंदिशाळे ॥ कैसें कैवाड केलें कुटिळें ॥ कोण्हा नकळे तें वर्म ॥ ७५ ॥ पुत्र झाला देवकीउदरीं ॥ कन्या जन्मली नंदाघरीं ॥ दोघी प्रसूत एकेरात्रीं ॥ कोणे प्रकारीं या कळलें ॥ ७६ ॥ यशोदे समर्पूनि निजकुमर ॥ कन्या आणिली अतिसत्वर ॥ सर्वां अलक्ष रचिला मंत्र ॥ नकळे विचित्र हें कैसें ॥ ७७ ॥ द्वारपाळ दृढविश्वासी ॥ सावध होती द्वारापासीं ॥ आणि भवंते नगरवासी ॥ होता यमुनेसि महापूर ॥ ७८ ॥ नकळे दुष्टाचें अंतर ॥ संव चोराचा स्नेहविचार ॥ माझा करावया संहार ॥ त्र-

---

१ नवीन. २ महात. ३ धूर्त. ४ प्रसिद्ध. ५ कपटानें.

जीं कुमर लपविले ७९ ॥ आनकदुंदुभीचे ते सुत॥नंदव्रजीं वाढती गुप्त ॥ गवेषणार्थ[1] प्रेरिले भृत्य ॥ तिहीं ते समस्त मारिले ॥ ८० ॥ कर्मरेखा बळिष्ठ माझी ॥ ह्मणोनि नारद आला आजी॥ शत्रु वाढती नंदव्रजीं ॥हे गोष्ठी सहजीं उमजविली ॥ ८१ ॥ वसुदेवाचा करितां घात ॥नारदें धरिला माझा हात॥सांगीतला नीतिवृत्तांत ॥ नमरीं तत्सुत न वधितां ॥ ८२ ॥ मग वसुदेवाचा निग्रह[2] केला ॥ नंदव्रजाकेशी गेला ॥ पुढें मंत्र जाईल रचिला ॥ तो तुह्मीं परिसिला पाहिजे ॥ ८३ ॥

रामकृष्णौततोमह्यंमृत्युःकिलनिदर्शितः ॥ भवद्भ्यामिहसंप्राप्तौहन्येतांमल्ललीलया ॥ २३ ॥

॥टीका ॥ रामकृष्ण जे वसुदेवसुत ॥ मज कारणें तेथूनि मृत्यु ॥ अलोट विचार दैवकृत ॥ कथिला निश्चित मुनीनें ॥ ८४ ॥ तरी ते येथें आलिया वरी ॥ तुह्मीं वधावे माझे वैरी ॥ मल्ललीलेची दावूनि परी ॥ जनामाझारीं क्रीडार्थ ॥ ८५ ॥ हें जरी मानेल तुमच्या मना ॥ तरी मल्लरंगाची कीजे रचना ॥ कलाकौशल्य युक्ति नाना ॥ सावधाना अवधारा ॥ ८६ ॥

मंचाःक्रियंतांविविधामल्लरंगपरिश्रिताः ॥ पौराजानपदाःसर्वेपश्यंतुस्वैरसंयुगम् ॥ २४ ॥

॥ टीका ॥ कुशल शिल्पिक पाचारूनी ॥ मल्लरंगाचिये स्थानीं ॥ सभा कीजे विविधारत्नीं ॥ स्तंभ वितानीं[3] अलंकृत ॥ ८७ ॥ मुख्य स्थानीं भद्रपीठ[4] ॥ रत्नरौक्ममंचक[5] श्रेष्ठ ॥ वीर[6]अंगलग सुभट॥तिहीं मिकट असावें

---

१ शोधार्थ. २ बंधन. ३ छतांनीं. ४ सिंहासन. ५ रत्नखचित सोन्याचे पलंग. ६ वीरसमाज.

॥ ८८ ॥ त्याहुनि अंवरें अमात्यमंचा ॥ भंवता परिधि यूथपतींचा ॥ यथाधिकारें नागरिकांचा ॥ बैसो जनांचा समुदाय ॥ १८९ ॥ ऊर्ध्वमाडिया जालंधरें ॥ तेथ बैसिजे अंतःपुरें ॥ नागरी स्त्रिया सह लेंकुरें ॥ पृष्ठीं अंतरें प्रजांचिया ॥ ९० ॥ एवं समस्त लहान थोर ॥ आणूनि आनंदें निर्भर ॥ मल्लरंग कौतुकाकार ॥ सर्वी सादर पहावा ॥ ९१ ॥ मल्लयुद्धें क्रीडापरें ॥ पाहोत नरनारीलेंकुरें ॥ आपुलाल्या यथाधिकारें ॥ मंचांतरें बैसोनी ॥ ९२ ॥ ऐसी अमात्यां करूनि आज्ञा॥कंस हस्तिपा करी सूचना ॥ ते तूं ऐकें मात्सीरमणा ॥अभिमन्युनंदना परिक्षिति ॥ ९३ ॥

महामात्रत्वयाभद्ररंगद्वार्युपनीयताम् ॥ द्विपःकुवलयापीडोजहितेनममाऽहितौ ॥ २९ ॥

॥ टीका ॥ कंस ह्मणे गा अंबष्ठा ॥ हस्तिपांमाजि परम श्रेष्ठा ॥ मल्लरंगाचिया दारवंठा ॥करीं पैठा महागज॥ ९४ ॥ कुवलयापीडनाम हस्ती ॥ मदोन्मत्त जो भद्रजाति ॥ ज्याचे तुलने ऐरावती ॥ गौण भासे यवमानें ॥ ९५ ॥ तो नेऊनि रंगद्वारीं ॥ क्षोभवूनियां उभा करी ॥ रामकृष्ण येतां वैरी ॥ दोघे मारीं रगडोनी ॥ ९६॥ रामकृष्ण वसुदेवकुमर ॥ केवळ विष्णूचे अवतार ॥ माझे शत्रु परम क्रूर ॥ मर्दी कुंजर प्रेरूनी ॥ ९७ ॥ पूर्वी कालनेमि दैत्य ॥ तो मी हिरण्यकशिपुसुत ॥ माझा विष्णूनें केला घात ॥ मग जन्मलों येथ भोजकुळीं ॥ ९८ ॥ यामुनपर्वतीं माझिये माते ॥ कपटें भोगिलें द्रुमलदैत्यें ॥ हें रहस्य कथिलें तूतें ॥ येर सर्वांतें अप्रकट ॥ ९९ ॥ हरिवंशीं हा सविस्तर ॥ कंसें स्वमुखें जन्मविचार ॥ केला अंबष्ठा गोचर ॥ अध्याय अवग्रपर्यंत ॥

---

१ अलीकडे. २ मंडल. ३ महाताला. ४ महाता. ५ उमत्त जातीचा. ६ जवसासारखा.

२०० ॥ रामकृष्ण द्वारा आंत ॥ येतां द्वाःस्थीं द्वारें पिहित ॥ करितां कोठें मलाहती पंथ॥कीजे निःपात गजयोगें ॥ १ ॥ इतुका हस्तिपा कथिला मंत्र ॥ पुन्हा अमात्यांप्रति विचार ॥ सांगे उत्साहरचनापर ॥ ऐकें सविस्तर तो राया ॥ २ ॥

आरभ्यतांधनुर्यागश्चतुर्दश्यांययाविधि ॥ विशसंतुपशून्मेध्यान्भूतराजायमीढुषे ॥ २६ ॥

॥ टीका ॥ महापर्व चतुर्दशी ॥ पुसोनि विप्रां सर्वज्ञांसी ॥ आरंभीजे धनुर्यागासी ॥ उपचारेंसीं विध्युक्त॥ ३॥ अभीष्टदेवताराधन ॥ तये कारणें तुष्टीकरण ॥ पवित्रा पशूतें समर्पण ॥ कीजे संपूर्ण सास्निग्ध ॥ ४ ॥ इत्यादिकार्यांची योजना॥आज्ञापिली ते धरूनि सूचना ॥ पत्रारूढ करूनि आज्ञा ॥ द्रव्यें नाना आणवावीं ॥५॥ शृंगारिजे यागभुवन ॥ विचित्रवितानीं सतोरण ॥ गायक नर्तक बंदिजन ॥ मुरजप्रवीण आणवावे ॥६ ॥फळें पुष्पेंनानारस ॥ इक्षु कदलीविचित्रवास ॥ पल्लव समिधा दूर्वा कुश ॥ आणिजे द्विजांस पुसूनियां ॥ ७ ॥

इत्याज्ञाप्यार्थतंत्रज्ञश्चाहूययदुपुंगवम् ॥ गृहीत्वापाणिनापाणिंततोऽक्रूरमुवाचह ॥ २७॥

॥टीका॥रामकृष्णांचिया वधार्थ॥व्रजा प्रेरिला केशी आप्त॥ दुसरा मंत्र रचिला गुप्त ॥ मल्लरंगणीं रिपुहनना ॥ तृतीयमंत्र अंबष्ठासी ॥ आज्ञापिलें दृढविश्वासीं ॥ शत्रु वधावे देहलीपासीं ॥ कुंजरासी क्षोभवुनी॥९ ॥ रामकृष्ण मथुरापुरीं ॥ आणवावयाचे विचारीं ॥ धनुर्यागाची सामग्री ॥रचनाकुसरी निरोपिली॥॥१० ॥ यज्ञार्चिये उ-

---

१ द्वारपालांनीं. २ बंद केलेलीं. ३ कागदावर लिहिलेली. ४ मृदंगांत कुशल. ५ उंबरठा.

पचारसिद्धि ॥ गांवोगांवीं विशालबुद्धि ॥ दूत धाडोनि सर्वसमृद्धि ॥ यथाविधि आणविल्या ॥ ११॥ पृथक् पृथक् इत्यादि आज्ञा ॥ मल्ल अंबष्ठ मंत्रियां प्राज्ञां ॥ करूनि हृदयीं विवंचना ॥ कंस विवरी तें ऐका ॥१२ ॥ कार्य साधे ज्या उपायें ॥ स्फुरद्रूप तो उपाय होय ॥ तया पुरुषा नामधेय ॥ अर्थतंत्रज्ञ हें बोलिजे॥१३ ॥यालागिं कंस बुद्धिमंत ॥ जाणोनि कार्याचा सिद्धांत॥आणवावया वसुदेवसुत ॥ अक्रूर चित्तांत योजिला ॥ १४॥यादवांमाजि बुद्धिश्रेष्ठ ॥ अक्रूर साधुत्वें वरिष्ठ ॥ पाचारूनि तो स्नेहाळ इष्ट ॥आपणा निकट बैसविला॥१५ ॥सम्मानूनि तो स्तोत्रपाठीं ॥ आनंदविला हृदयसंपुटीं ॥ धरूनि सप्रेमें मनगटीं ॥ रहस्यगोठी आदरिली ॥ १६ ॥

भोभोदानपतेमह्यंक्रियतांमैत्रमादृतः ॥ नान्यस्त्वत्तोहिततमोविद्यतेभोजवृष्णिषु ॥ २८ ॥

॥ टीका ॥ क्रयविक्रय वाणिज्यधर्मीं॥मार्गीं अथवा ग्रामोग्रामीं ॥ अंश घेवोनि रक्षिजे नियमीं ॥ तो वृत्तिस्वामी दानपति ॥ १७ ॥ श्वफल्कपूर्वजपरंपरा ॥ वृत्त्याधिकार हा अक्रूरा॥दानपति या नामादरा॥जाणोनि कंस संबोधी ॥ १८ ॥ आदरपुरस्सर द्विरुक्ति ॥ ह्मणे भो भो दानपति ॥ मित्रत्वाची स्नेहाळ प्रीति॥आजि मम हितीं तां कीजे १९ ॥ मजकारणें तुजसारिखा ॥ परम सादर हिततम सखा ॥ भोजवृष्णींसह अंधकां ॥ माजि निका असेना२०

अतस्त्वामाश्रितःसौम्यकार्यगौरवसाधनम् ॥ यथेंद्रोविष्णुमाश्रित्यस्वार्थमध्यगमद्विभुः ॥ २९ ॥

॥ टीका ॥ चतुर सुहृद् आणि सज्जन ॥ यालागिं सौम्य हें संबोधन॥तुझिया आश्रयास्तव जाण॥ कार्य गहन

---

१ पाणिदार. २ श्वफल्क हा एक राजा होता. ३ अत्यंत हितकारक.

साधीन मी ॥ २१ ॥ ह्मणसी भोजेंद्र तूं समर्थ ॥ माझा आश्रय तुज किमर्थ ॥ तरी पर्येसीं सद्दृष्टांत ॥ मम कार्यार्थ
प्रियतमा ॥ २२ ॥ इंद्र विभुत्वें अमरपति ॥ विष्णुआश्रयें स्वार्थावाप्ति ॥ लाहे तैसा मी निश्चिती ॥ दानपति
तवाश्रयें ॥ २३ ॥ धनुष्याश्रयें चाले शर ॥ कीं अग्निप्रसंगें प्रबळयंत्र ॥ कीं शौचाचारावांचूनि मंत्र ॥ नव्हती
स्वतंत्र स्फुरद्रूप ॥ २४ ॥ यालागीं तवाश्रयें करूनी ॥ माझिया प्राणांतें गवसणी ॥ होईल ऐसें अभिवांछूनी ॥
तुजलागूनि विनवीतसें ॥ २५ ॥ हें ऐकोनि दानपति ॥ अक्रूर ह्मणे कंसाप्रति ॥ आह्मां अवंचक सेवकांप्रति ॥
निजकार्यार्थी आज्ञापीं ॥ २६ ॥ आह्मी आप्त किंकरजन ॥ विशेष करावें नलगे स्तवन ॥ आज्ञापिलें कार्य पूर्ण
जालें जाणोन तोषिजे ॥ २७ ॥ हें ऐकोनि कंसासुर ॥ स्वमुखें आज्ञापी अक्रूर ॥ सांगोनि कार्यार्थविचार ॥
वृष्णिकुमरहननाचा ॥ २८ ॥

गच्छनंदव्रजंतत्रसुतावानकदुंदुभेः ॥ आसातेताविहानेनरथेनाऽऽनयमाचिरम् ॥ ३० ॥

॥ टीका ॥ ऐकें अक्रूरा वृत्तांत ॥ नंदव्रजा जाय त्वरित ॥ तेथ दोघे वसुदेवसुत ॥ परम गुप्त आसती ॥ २९
कपट करूनियां वसुदेवें ॥ नदव्रजीं ते रक्षिले जीवें ॥ अद्यापि मज हें नव्हतें ठावें ॥ नारदें दैवें गुज कथिलें ॥ ३०
शोधार्थ म्यां धाडिले दूत ॥ तितुकियांचाही करूनि घात ॥ नंदव्रजीं वसुदेवसुत ॥ वाढती गुप्त मम शत्रु ॥ ३१
॥ यालागीं ते वसुदेवसुत ॥ येथें आणावे तुवां त्वरित ॥ पवनवेगीं माझा रथ ॥ नेऊनि कार्यार्थ हा साधीं ॥ ३२ ॥
इतुकी किमर्थ करणें त्वरा ॥ ऐसें कांहीं कल्पिसी चतुरा ॥ तरी माझिया कृतविचारा ॥ परिसें अक्रूरा प्रबुद्धा ॥ ३३

---

१ विश्वासु. २ केलेल्या विचारास.

म्यां ऐकोनि नारदवाणी ॥ आनकदुंदुभीचिये हननीं ॥ प्रवर्ततां माझिये कर्णीं ॥ नीति सांगोनि मुनि गेला॥ ३४
मग म्यां वसुदेवदेवकी दोन्ही ॥ धरूनि घातलीं दृढबंधनीं ॥हें कुमरांचे नपडे कांनीं॥तंव जाऊनि आणावे ॥३५॥
ह्मणसी लेंकुरें अपराधरहितें ॥ काय ह्मणोनि आणिजे येथें ॥ हें द्विविधशंकापरिहारार्थें ॥ ऐकें निश्चित मम वाक्य ३६ ॥३६ ..

निसृष्टःकिलमेमृत्युर्देवैर्वैकुंठसंश्रयैः ॥ तावानयसमंगोपैर्नंदाद्यैःसाभ्युपायनैः ॥ ३१॥

॥ टीका ॥ मातें जाणोनि कालनेमि ॥ समरीं असमर्थ पराक्रमी ॥ ह्मणोनि माझिये मृत्यूद्यमीं[1] ॥ वांछाकामीं
सुरवर ॥ ३८ ॥ ऐसिया सकाम सुरवरगणा ॥ आश्रय मुख्य वैकुंठराणा ॥ तिहीं तयातें भाकूनि करुणा ॥ माझिया मरणा प्रार्थिलें ॥ ३८ ॥ एवं विधि हर सुरवर सकळीं ॥ रामकृष्ण दोघे बळी ॥ मृत्यु केवळ माझिये मुळीं
कुठाररूप निर्मिले ॥ ३९ ॥ मजही केवळ मृत्युरूप ॥कळल्या कैसी लागेल झोंप॥मुनीनें कथिली सूचना अल्प॥
मग म्यां साक्षेप मांडिला ॥ ४० ॥ तरी जाऊनि व्रजपुरा ॥ येथें आणावें वसुदेवकुमरां ॥ नंदप्रमुख पशुपनिकरां
बहुसंभारा[2] समवेत ॥ ४१ ॥ उपायनें पूजोपचार ॥ विशेष वार्षिक करभार ॥ रामकृष्णेंसीं नंदप्रवर ॥ थोरथोर
व्रजवासी ॥ ४२ ॥ येथें आणावे झडकरी ॥ येवढी माझी विनति करीं ॥ ते तां येथें आणिल्यावरी ॥ कृत्य अवधारीं मम मनिंचें ॥ ४३ ॥

घातयिष्यइहानीतौकालकल्पेनहस्तिना ॥ यदिमुक्तौततोमल्लैर्घातयेवैद्युतोपमैः ॥३२॥

॥ टीका ॥ कुवलयापीडनामा हस्ती ॥ स्थापूनियां देहळीप्रांतीं ॥कुंजर प्रेरूनि शत्रूप्रति॥गुप्तस्थिति निर्दळीन

---

[1] मृत्यूचें कामीं. [2] पुष्कळ सामग्रीसहित.

॥ ४४ ॥ मदोन्मत्त कुंजर वाटे ॥ येतां मारिलें अवचटें ॥ऐसा लौकिकीं शब्द उमटे ॥ सहजाचि तुटे मम शल्य ॥ ४५ ॥ ह्मणसी कुंजरा नाटोपती ॥ तरी सामान्य नोहे हस्ती ॥ प्रळयकाळाची आकृति ॥ दिग्गज लपती या भेणें ॥ ४६ ॥ ऐशिया कुंजरापासूनि जिणें ॥ सर्वथा नघडे कोटिगुणें ॥ तथापि मुक्त जाले प्राणें ॥ तरी आणिका यत्नें वधीन ॥ ४७ ॥ कोणता यत्न पुससील ॥ तरी वज्रप्राय माझे मल्ल ॥ थडकोनि विद्युल्लते तुल्य ॥वधिती तत्काळ शत्रूतें ॥ ४८ ॥ देवनिर्मित माझे शत्रु ॥ मुख्य मारिल्या वसुदेवकुमर ॥ पुढील कार्यार्थविचार ॥ तो सविस्तर अवधारीं ॥ ४९ ॥

तयोर्निहतयोस्तप्तान्वसुदेवपुरोगमान् ॥ तद्बंधून्निहनिष्यामिवृष्णिभोजदशार्हकान् ॥ ३३ ॥

॥ टीका ॥ रामकृष्ण विष्णुव्यक्ति ॥ वृष्णिभोजादि सुरवरपंक्ति ॥ यास्तव मानूनि आपुले पति ॥ हे मद्धार्तीं सापेक्ष ॥ ५० ॥ रामकृष्णांच्या वधाअंतीं ॥ वसुदेवप्रमुख पक्षपाती ॥ सहित बंधु सुहृदज्ञाति ॥ करीन शांति सर्वांची ॥ ५१ ॥ भोजदाशार्हवृष्णिकुळें ॥ यांचीं खणोनि सांडीन मूळें ॥ मजहूनि वरिष्ठ आगळे ॥ उरों नेदीं यदुवंशीं ॥ ५२ ॥ जरी तूं ह्मणसी वरिष्ठ पितर॥ऐक त्याचाही विचार॥अक्रूरा तूतें गुह्य मंत्र ॥कथितों साचार हृदयींचा ॥ ५३ ॥

उग्रसेनंचपितरंस्थविष्ठंराज्यकामुकम् ॥ तद्भ्रातरंदेवकंचयेचान्येविद्विषोमम ॥ ३४ ॥

---

१ लोकांत. २ हृदयांत सलणारीवस्तु. ३ विष्णूचा अवतार. ४ तत्पर.

॥ टीका ॥ माझा पिता उग्रसेन ॥ स्थविर वृद्ध शक्तिहीन ॥ तथापि वाछी माझें मरण॥भद्रासनभोगार्थ ॥ ५४ ॥ वसुदेवादि अमरपक्षीं ॥ मिळोनि माझें मरण लक्षी ॥राज्यासिंहासन अपेक्षी॥क्ष्वेड कुक्षिगत जैसें ॥५५॥ आणि त्याचा देवक भ्राता॥देवकीप्रमुख अवघ्या सुता ॥ नांदावया सौभाग्ययुक्ता ॥ क्षेम जामाता अभिवांछी ॥ ५६॥ आनकंदुंदुभीचिया मरणें ॥ वैधव्य पावती कन्यारत्नें ॥ ह्मणोनि रक्षी नानायत्नें ॥ माझ्या निधनें तोषेच्छु॥५७॥ मुख्य करूनि पिता चुलता ॥ जे जे मद्विष्टे तत्वता ॥ मी तयांच्या करीन घाता ॥ सुह्रदां आप्तां समवेत ॥ ५८ ॥

ततश्चैषामहीमित्रभवित्रीनष्टकंटका ॥ जरासंधोममगुरुर्द्विविदोदयितःसखा ॥ ३५ ॥

॥ टीका ॥ त्यानंतरें हे अक्रूरा ॥ नष्टकंटक वसुंधरा ॥ जाली ऐसें जाण चतुरा ॥ सपत्न दुसरा मग नाहीं॥५९ पिता चुलता सुहृद्गण ॥ मारिल्या ह्मणसी निर्बळपण ॥ तरी आप्त जैसे प्राण ॥ ते कोण कोण अवधारीं ॥ ६०॥ माझा श्वशुर जरासंध ॥ प्रतापसमुद्र जो अगाध ॥ गुरुत्वें जनका तुल्य प्रसिद्ध ॥ आणि द्विविद प्राणसख॥६१ ॥ द्विविद जात्या वानर खरा ॥ जिवलग अप्तत्वें सोयरा ॥ तैसाचि शंबरासुर दुसरा ॥ जैंवि वारा अनळातें ॥ ६२॥

शंबरोनरकोबाणोमय्येवकृतसौहृदाः ॥ तैरहंसुरपक्षीयान्हत्वाभोक्ष्येमहींनृपान् ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ महाप्रतापी शंबरासुर ॥ असाध्य दुर्गसमरीं क्रूर ॥ ज्याच्या भेणें कांपती अमर ॥ जिवलग फार माझा तो ॥ ६३ ॥ बाणासुर तो शंकरवरदी ॥ निर्जरांचा हाडदंदी ॥ हिरण्यकशिपूपासूनि मांदी ॥ दैत्यकुळाची

---

१ वृद्ध. २ सिंहासन. ३ विष. ४ वसुदेवाच्या. ५ संतोष इच्छिणारा. ६ शत्रुरहित. ७ शत्रु. मरणानें.

ऱ्यापक्षीं ॥ ६४ ॥ ऐसे त्रिजगतींत वरिष्ठ ॥ परंतु माझे परम इष्ट ॥ माझ्या ठायींच सौहार्द[1] श्रेष्ठ ॥ त्यांहीं स्पष्ट केलेंसे ॥ ६५॥ यापुढें दाशार्ह भोज वृष्णि ॥ अथवा सुरवर होतु[2] कां कोण्ही॥ मेषव्याघ्रां समरांगणीं॥तैसे मरणीं आतुडती[3] ॥ ६६ ॥ इत्यादि जे जे दैत्यश्रेष्ठ ॥ तेहींकरूनि मी बळिष्ठ ॥सुरपक्षीय नृप फळकट[4] ॥भरीन घोंट तयांचा ॥ ६७ ॥ मुख्य करूनि यादवकुळ ॥ अमरपक्षींचे भूमिपाळ ॥ करीन तयांचें निर्मूळ ॥मग मी भूतळ भोगीन ॥ ६८ ॥ समृद्धिमंत आणि असपत्न[5] ॥ सार्वभौमीय[6] भद्रासन ॥ मी भोगीन ऐश्वर्यपूर्ण ॥ ध्रुवासमान चिरकाळ ॥ ६९ ॥ ऐसिया उपायासि मूळ ॥ साधक अक्रूरा तूं आप्त कुशल ॥ नाममात्र मी भूपाळ ॥ येर ऐश्वर्य सकळ तुझेंचि हें ॥ २७० ॥ महत्त्व देऊनि माझे आंगीं ॥ तूं प्राधान्य भूतळभोगीं ॥रहस्यगोष्टी हे आवघी ॥ कथिली तुज लागीं शपथेंसीं ॥ ७१ ॥

एतज्ज्ञात्वाऽऽनयक्षिप्रंरामकृष्णा विहार्भकौ ॥ धनुर्मखनिरीक्ष्यार्थंद्रष्टुंयदुपुरश्रियम् ॥ ३७ ॥

॥ टीका ॥ ऐसा जाणोनि सर्व मंत्र[7] ॥ स्वार्थ मदर्थ परमार्थ मैत्र ॥ वसुदेवाचे दोघे पुत्र ॥ जावोनि सत्वर आणावे ॥ २७२ ॥ कोण निमित्त करावें ह्मणसी ॥ तरी ऐकावें इयेविशीं ॥ धनुर्यागनिरीक्षणासी ॥ अर्भकांसी[9] सांगावें ॥ २७३ ॥ आणि यदुपुरीची शोभा ॥ अवलोकनार्थ[8] प्रलोभा ॥ दावूनि रामा पद्मनाभा ॥ युक्ति सुलभा

---

[1] मित्रत्व. [2] असोत. [3] प्राप्त होती. [4] तुच्छ. [5] शत्रुरहित. [6] सर्वभूमीचें. [7] मसलत.

[8] पाहण्यास. [9] मुलांस.

प्रलोभीं ॥ २७४ ॥ राजाज्ञेच्या शासनें करून ॥ नंदेंसहीत बल्लवगण ॥ उपायनेंसीं पुरस्करून ॥ सावधान आणावे
॥ २७५ ॥ तयांसर्वे द्व्याअर्भक ॥ पहावया धनुर्मख ॥ मथुरापुर श्रीकौतुक- ॥ निरीक्षणार्थ घेवविजे ॥७६॥
एवंविंधि आणितां देख ॥ कोमळबुद्धि ते अर्भक ॥ येती पहावया कौतुक ॥ कांहीं वितर्के नकरितां ॥ २७७ ॥
कंसाज्ञा हे परिसोन ॥ अक्रूर विवेकी सर्वज्ञ ॥ रक्षूनि प्रभूचें समाधान ॥ बोले वचन तें ऐका ॥ ७८ ॥

॥ अक्रूरउवाच ॥ राजन्मनीषितंसध्र्यवतवस्वावद्यमार्जनम् ॥
सिद्ध्यसिद्ध्योःसमंकुर्याद्दैवंहिफलसाधनम् ॥३८॥

॥ टीका ॥ अक्रूर ह्मणे भोजपति ॥ जे तां निजमनीं विवारिली युक्ति ॥ मृत्यु चुकवावयाचे अर्थीं ॥ उत्तम निश्चिती
यत्न हा ॥ ७९ ॥ राजनीतीचे मंत्रविचार ॥ वक्तयां माजी तूं परम चतुर ॥ तुझिये प्रज्ञेचा परपार ॥
नेणती साचार कवि गुरुही ॥ २८० ॥ मान देऊनि नृपाचे प्रज्ञे ॥ भविष्यानुरूप दावी सूचने ॥ कीं हांव इच्छिली
जैसी मनें ॥ ते दैवावीण नफळे कीं ॥ ८१ ॥ यास्तव राया हा निर्वाहो ॥योजिल्या ऐसें सिद्धि जावो ॥
अथवा विपरीत होऊनि ठावो ॥ परि समता वांवो नकरावी ॥ ८२ ॥ फळभावना दैवानुसार ॥ हा जाणोनि
मुख्य विचार ॥ समत्वें बर्तती परमधीर ॥ सुखें होणार होतसे ॥

---

१ अशारीतीनें. २ त्वां. ३ अंत. ४ शुक्राचार्य. ५ बृहस्पति. ६ बुद्धि. ७ व्यर्थ. ८ फलसिद्धि.
९ ज्याचें चित्त कोणत्याही कारणानें विकार पावत नाहीं ते.

मनोरथान्करोत्युच्चैर्जनोदैवहतानपि ॥ युज्यतेहर्षशोकाभ्यांतथाप्याज्ञांकरोमिते ॥ ३९ ॥

॥ टीका ॥ नीतिशास्त्रीं अनुशासन ॥ पुरुषें नसंडिजे सहसा यत्न ॥ दैवानुसार फळें जाण ॥ पारि पुरुषाधीन फळ नाहीं ॥ २८४ ॥ होणार जें जैसें बलिष्ठ ॥ तैसाचि प्रयत्न सुचे स्पष्ट ॥ फांसयांतून दिसे वाट ॥ जें मरण निकट पक्षियातें ॥ २८५ ॥ निर्दैवा धनंकटाह येतां पुढें ॥ तैं त्या अंधत्व आवडे ॥ त्या धनासि अडखळूनि पडे ॥ लंघूनि उघडे नेत्र करी ॥ २८६ ॥ आणिकही प्रयत्न राया ॥ मूषक प्रवर्तला व्यवसाया ॥ सर्पपेटिका फोडूनियां ॥ अभीष्टचारया वांछिलें ॥ २८७ ॥ तोचि प्रयत्न सर्पा फळला ॥ क्षुधार्त मूषका भक्षूनि धाला ॥ तेणेंचि मार्गें बाहीर गेला ॥ निर्मुक्त झाला दैवबळें॥८८ यालागिं त्रिजगीं प्राणिमात्र॥मनोरथ करिती थोरथोर॥ परी ते फळती दैवानुसार ॥ अनिष्टमिश्रइष्टफळीं ॥ २८९ ॥ दैवप्रणीत तत्फळलाभें॥ सुखदुःखभोगांच्या संक्षोभें हर्षशोकादि सबळ कोंभें ॥ आणिती क्षोभें संसृति॥२९०॥रावणें जे जे प्रयत्न केले॥ते ते विपरीतफळीं फळले॥ सेतुबंधादि सफळ जाले ॥ यत्न अवघे कपींचे ॥ २९१ ॥ एवं प्रयत्न सव्यभिचार ॥ नकरवे फळाचा निर्धार॥ तथापि मी तव आज्ञाधर ॥ करीन साचार तवाज्ञा ॥ २९२ ॥ ऐसें ऐकूनि अक्रूरवचन ॥ होणार बलिष्ठते करून ॥ कांहीं नकरीच अनुमान ॥ कृतप्रयत्न निरूपिला ॥ २९३ ॥

---

१ द्रव्याची कढयी. २ उंदीर. ३ उद्युक्त झाला. ४ उद्योगाला. ५ सर्प जींत होता ती पेटी. ६ अनुकूळ भक्ष्य. ७ भुकेलेला. ८ तृप्त झाला. ९ दैवानें निर्मिलेलें. १० अंकुरानें. ११ संसार. १२ वानरांचे. १३ अनिश्चितफलदायक.

एवमादिश्यचाक्रूरंमंत्रिणश्चविसृज्यसः ॥ प्रविवेशगृहंकंसस्तथाऽक्रूरःस्वमालयम् ॥ ४० ॥

॥ टीका ॥ ऐसी आज्ञा अक्रूरातें ॥ करूनि पाठविला व्रजातें ॥ रंगरचना मंत्रियांतें ॥आज्ञापूनि पाठविलें॥
कंसआज्ञा वंदूनि शिरीं ॥ अक्रूर प्रवेशला स्वमंदिरीं ॥ मंत्री बोलविलियावरी ॥ गृहा माझारीं नृप गेला ॥२९५
शुक ह्मगे गा कुरुपुंगवा ॥ अध्याय संपला छत्तिसावा॥येथील अभिप्राय आघवा ॥तुजला बरवा कळला कीं २९६
प्रथम अरिष्टासुराचा वध ॥ नारदकंसांचा संवाद ॥ मारावया राममुकुंद ॥ मंत्र विशद कंसकृत ॥ ९७ ॥ अक्रूराचें
नीतिवचन ॥ आणि कंसाचें आज्ञापन ॥ अध्यायांत निरूपण॥इतुकें श्रवण झालें कीं॥९८॥यावरी अध्याय सदतिसावा ॥ आरंभिजेल तो पर्येसावा ॥ ज्या माजि मृत्यु केशिदानवा॥श्रीकेशवाचेनि हस्तें ॥९९॥ आणि नारदकृष्णदर्शन ॥ समासें[1] अवतारचरित्रकथन ॥ तैसेंचि व्योमासुराचें हनन ॥सावध होऊनि परिस पुढें ॥३००॥ गौतमीच्या उत्तरतटीं ॥ श्रीएकनाथभद्रपीठीं ॥चिदानंदें सज्जनदाटी ॥ बैसली सृष्टि स्वानंदें ॥ १ ॥ तेही गोविंदाज्ञेवरून ॥ दशमस्कंधाचें व्याख्यान ॥ महाराष्ट्रदेशभाषाग्रथन ॥ टीका अभिधान हरिवरदा ॥२॥ तेथ दयार्णवाची वाणी ॥ विद्वज्जनीं मानस्थानीं ॥ अंगीकारिली ते उमाणी[2] ॥ श्रोतृश्रवणीं हरिलीला ॥ ३ ॥ मान मानलें
सज्जनांसी ॥ ह्मणोनि अगणित हरिगुणराशि ॥ उमाणविती त्या निजमानसीं॥श्रवणें नेऊन सांठवणें ॥ ४ ॥
नारद[3]व्यासशुकप्रमाण ॥ पाहोनि निबद्ध केलें मान॥ श्रोतीं नकरावा अनमान ॥ हरिगुणश्रवणसंग्रहणीं ॥ ६ ॥
एवं श्रीमद्भागवत ॥ अष्टादशसहस्रगणित ॥ परमहंसीं रमिजे येथ ॥ लीलामृत कृष्णाचें ॥ ६ ॥ त्यामाजि हा

---

१ संक्षेपानें. २ स्पष्टकरी. ३ नारद,व्यास शुक ह्यांच्या ग्रंथांचा आधार.

स्कंध दशम ॥ वक्ता श्रीशुक केवळ ब्रह्म ॥ श्रोता परीक्षिति नृपसत्तम ॥अध्याय उत्तम छत्तिसावा ॥ ७ ॥
॥ इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायामरिष्टासुरवधनारदकंससंवादकेश्यक्रूरनीतिवचनाज्ञापनन्नामषट्त्रिंशत्तमोऽध्यायः॥ ३६॥
श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्लोक ॥ ४० ॥ टीका ॥ ३०७ ॥ एवं संख्या ॥ ३४७ ॥ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ शुभंभवतु ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

---

१ ब्रह्मस्वरूप. २ राजांमध्यें अत्युत्तम.

॥ अध्याय ३६ वा समाप्त ॥

अध्याय ३७

आधींच केशी महा क्रूर॥ विशेष प्रेरितां कंसासुर॥ अश्वरूपी भयंकर॥ व्रजी सत्वर प्रवेशला॥ ४२॥
कृष्णमाया अघटित घटी॥ निमेषें निवटी ब्रह्मांड कोटि॥ तेथें कायशी भिंगुरटी॥ दुष्ट कपटी हयरूपी॥ ८९॥



श्रीकृष्णजगद्गुरुवे नमः॥ नमो मौननिरततंराणि ॥ अनुलोमविलोम द्विधा पठनीं॥ अन्वयव्यतिरेक प्रबोधुनी ॥ सायुज्यदानी गुरुराया ॥ १ ॥ नमो या वाक्यार्थाची शक्ति ॥ यथार्थ बाणली जयाप्रति ॥ हरिहरब्रह्मादि त्या सेविती ॥ धरूनि व्यक्ति अजस्र ॥ २ ॥ नमोवाक्याची वदतां महिमा ॥ मौनमुद्रा निखिल निगमा ॥ विस्तार लिहितां नपुरे क्षमा ॥ हें जाणे रमावरहरही ॥ ३ ॥ नम्य एकचि श्रीगुरुनाथ ॥ नमन तद्गौरवा प्रकटित ॥ तेंचि शक्तिरूप विख्यात ॥ विभवें प्रसवत तत्सत्ता॥ ४॥ जेंवि लोहाग्ररहित शूळ॥ धनुष्यें विण शर निष्फळ॥ तेंवि नमनेंविण नम्य प्रांजळ ॥ नये केवळ उपयोगा ॥ ५ ॥ प्रातिपदिक मात्र नांव ॥ विभक्तियोगें लिंगसंभव ॥ तेथ नमनें भक्तिगौरव ॥ प्रकट होय अगाध ॥ ६ ॥ नमनें त्याग बोलिजे योगीं ॥ सत्तावारणदानप्रसंगीं ॥ आत्मनिवेदन प्रणतां लागीं ॥ नमनमात्रें संपादे ॥ ७ ॥ नमोमात्रें क्रोध मरे ॥ नमोमात्रें काम पुरे ॥ नमोमात्रें स्नेह भरे ॥ अभेदबोधें सर्वत्र ॥ ८ ॥ नमनें अनेकापराधक्षमा ॥ नमनें क्षालन विगुणकर्मा ॥ नमन प्रापक कैवल्यधामा नमन प्रेमा शोभवी ॥ ९ ॥ नमनें दुष्ट होती इष्ट ॥ नमनें निष्पाप पापिष्ठ ॥ नमनें देवता अभीष्ट ॥ नमनें संतुष्ट सर्वात्मा ॥ १० ॥ नमनें गुरुशिष्यांचा प्रेमा ॥ प्रकृतिपुरुषां नमनें महिमा ॥ नृपामात्यगौरवगरिमा ॥

---

१ मौन ह्म० वेदगुह्य. तेथें निरत ह्म० नम्र झाले त्यांचा प्रकाशक. २ उलट सुलट.

नमनधर्मामाजिवडी ॥ ११ ॥ नमनें स्वामिसेवकभाव ॥ नमन मिरवी भक्तदेव ॥ नमन शक्तीचें लाघव ॥ लाहे गौरव अनायासें ॥ १२ ॥ अच्युत नारायण अनंत ॥ इत्यादि नामें सामर्थ्यवंत ॥ नमःपूर्वक चतुर्थ्यंत॥ जपतां सफळित संकल्प ॥ १३ ॥ अग्निंजाया कवच अस्त्र ॥ ह्मणाल इत्यादि पल्लवीं मंत्र ॥ तरी नमनपर्याय हे सर्वत्र ॥ वषट्कारद्विठांदि ॥ १४॥ मध्यभागीं असतां राव ॥ अग्र पश्चात उभय पार्श्व ॥ विभागें सैनिक वाहती नांव ॥ परी ते सर्व नृपगोत्ते ॥ १५ ॥ नमन ह्मणाल किमात्मंक ॥ तें सेव्यसेवकभावसूचक ॥ तेथ अक्षरांचा विवेक ॥ भाषा अनेक पालटिती ॥ १६ ॥ विविध गुणकार्यानुरूप ॥ योनिभेदेंही अमूप ॥ नमस्काराचे अनुकल्प॥ते हे अल्पजल्पना ॥ १७ ॥ नमन संभवे शपथस्थानीं ॥ नमन प्रतिज्ञाप्रशंसनीं ॥ नमन उपेक्षानिषेधनीं ॥ नमन शासनीं स्मारक ॥ १८ ॥ नमन नसंभवे जे ठायीं ॥ तें अंधतम अज्ञान पाहीं ॥ गाढमूढपाषाणदेहीं ॥ नम्यनमनराहित्यें ॥ १९ ॥ नम्य एकचि श्रीगुरुनाथ॥ ऐसा बोलोनियां परमार्थ॥पुन्हा प्रतिपादिले किमर्थ ॥ नम्यनमक अनेकधा ॥ २० ॥ परस्परें करिती नमन ॥ तें नम्यनमक अवघेचि जन ॥ तरी ये शंकेचें निरसन ॥ सावधान अवधारा॥ २१ ॥भूप असतां कुंजरावरी॥गजपं हडपीं चामरधारी॥कुंजरेंसीं तें नमस्कारी॥ अमात्यादि जन अवघा ॥ २२ ॥ ते जन नमिती लक्षूनि भूपा ॥ न ते किंकरां गजां गजपां ॥ हयरथशिबिकानौकारूपा ॥ यानीं महिपातें नमन ॥ २३ ॥ तैसा सर्वांचिये शिरीं ॥ दक्षिणामूर्ति सहस्त्रारीं ॥ सद्गुरुनाथ साम्राज्य करी ॥ जनव्यवहारीं त्या नमन ॥ २४ ॥जन वंदिती परस्परीं ॥ तेथ सद्गुरु दोघां शिरीं॥ कोण कोण्हा

---

१ अग्नीची स्त्री स्वाहा. २ स्वाहाकार. ३ कोणत्या स्वरूपाचें. ४ महात. ५ राजाला विडा देणारा. ६ शंकर ७ सहस्त्रपत्रकमलामध्यें.

नमस्कारी ॥ ह्मणाल हें जरी उमजेना ॥ २५ ॥ तरी भद्रासनीं असतां राव ॥ मुद्रेमाजि स्थापूनि नांव ॥ लहान थोर नियोग सर्व ॥ मुद्रापत्रें प्रवर्तवी ॥ २६ ॥ तेथ राजा असे सर्वांशिरीं ॥ परी लाघव गौरव यथाधिकारीं नियोगीं नमिती परस्परीं ॥ तेंवि व्यवहारीं श्रुतिशिक्षा ॥ २७ ॥ एवं नमन सद्‍गुरुनाथा ॥ येर प्राकृत प्रकृतिगाथा ॥ प्रवर्तन जें व्यवहारार्था ॥ ते तव सत्ता सर्वत्र ॥ २८ ॥ मौन संज्ञा निगमगुह्य ॥ तव पद सर्व गुह्यां आश्रय ॥ तेथ निरत जो प्रणतनिचय ॥ तूं चित्सूर्य बोधक त्यां ॥ २९ ॥ सूर्य नवग्रहांचा पति ॥ उदयें प्रकाशी जागृति बोधी तन्मातृकप्रवृत्ति ॥ जेणें संसृति सर्वत्र ॥ ३० ॥ सद्‍गुरु गृहपाशविमोचक ॥ त्रिविधावस्थाग्रासक ॥ आत्मरूपप्रकाशक ॥ सायुज्यदायक भवहंता ॥ ३१ ॥ पित्याचा पुत्र पुत्राचा पिता ॥ ह्मणतां अनुलोमविलोमता व्यतिरेकान्वयें सद्गुरु भजतां ॥ एकवाक्यता घडे तैसी ॥ ३२ ॥ काकाचा जामात जामाताचा काका ॥ ह्मणतां एकवाक्यते चुका ॥ तेंवि प्राकृतां भज्यभजकां ॥ अन्वयव्यतिरेकां अनोळखी ॥ ३३ ॥ तस्मात उपक्रमोपसंहार ॥ सद्गुरु भजकां चित्सुखसार ॥ सर्वीं सर्वत्र नमस्कार ॥ तो साचार गुरुचरणीं ॥ ३४ ॥ यास्तव गणेश शारदा गुरुवर ॥ कुळदेवता श्रोते चतुर ॥ साधुसज्जन मुनीश्वर ॥ एकाकाकार ननमीं मी ॥ ३५ ॥ मुखीं घालितां अन्नजीवन ॥ सर्व अवयवां आप्यायन ॥ तेंवि वंदितां सद्‍गुरुचरण ॥ तोषे त्रिभुवन आत्मत्वें ॥ ३६ ॥ तेणें तोष पसायदानें ॥ सद्‍गुरुनाथें दिधलें सूचने ॥ जें आरब्धग्रंथनिरूपणें ॥ तोषवीं मनें श्रोत्यांचीं ॥ ३७ ॥ आज्ञा लाहोनि दयार्णव ॥ ह्मणे ये अध्यायीं वासुदेव ॥ वधील केशिव्योमदानव ॥ आणि परिसेल स्तव नारदाचा ॥ ३८ ॥ कंसें धाडिला केशी व्रजा ॥ तेणें हरिसीं कवणें वोजा ॥ युद्ध केलें आणि मुनिराजा ॥ अधोक्षजा

---

१ जें नसतां जें नसतें असा नियम. हा व्यतिरेक. अधिकरणास व्यापून जें पदार्थाचें अस्तित्व तो अन्वय. २ प्रसाददानानें.

स्तवी कैसा ॥ ३९ ॥ कैसा वधिला व्योमासुर ॥ इतुके कथेचा विस्तार ॥ श्रवणीं होऊनि सादर ॥ अध्याय समग्र परिसावा ॥ ४० ॥

श्रीशुकउवाच ॥केशीतुकंसप्रहितःखुरैर्महींमहाहयोनिर्जरयन्मनोजवः ॥
सटावधूताभ्रविमानसंकुलंकुर्वन्नभोहेषितभीषिताखिलः ॥ १ ॥

॥ टीका ॥ शुक ह्मणे गा उत्तरात्मजा ॥ अधोक्षजाच्या हननकाजा ॥ कंसें केशी धाडिला व्रजा ॥ कवणें वोजा तो गेला ॥ ४१ ॥ आधींच केशी महाक्रूर ॥ विशेष प्रेरितां कंसासुर ॥ अश्वरूपी भयंकर ॥ व्रजीं सत्वर प्रवेशला मनाहुनी चपळगति ॥ पुढिलां खुरीं टांफरी[1] क्षिती ॥ तेणें जर्जर झाली माती ॥ चळीं कांपती व्रजवासी ॥ ४३ ॥ अयाल थरकती ग्रीवेवरी ॥ उपांयीं[2] येतां नभामारीं ॥ विमानें गुप्त अभ्रांतरीं ॥ त्या दे भवंरी प्रळयाची ॥ ४४ ॥ मत्तकुंजर डहुळी पाणी ॥ करी कमलांतें भंगाणी ॥ तैसीं विमानें नभोंऽगणीं ॥ सटांकरूनि[3] विध्वंसी ॥ ४५ ॥ अश्वजातीचा हेषितशब्द[4] ॥ प्रलयमेघतुल्य भयद ॥ तेणें मनुजादिसुरवरवृंद ॥ प्राणिकदंब त्रासला ॥ ४६ ॥ तो भयंकर ह्मणाल कैसा ॥ ऐका तयाचा आकृतिठसा ॥ पाहतां सुरवर पावती त्रासा ॥ हेषितघोषा जग जाचे ॥ ४७ ॥

विशालनेत्रोविकटास्यकोटरोबृहद्गलोनीलमहांबुदोपमः ॥
दुराशयःकंसहितंचिकीर्षुर्व्रजंसनंदस्यजगामकंपयन् ॥ २ ॥

---

१ टापा मारी. २ पुढील पाय उभारून मागील पायांवर उभें राहणें. ३ अयाळीच्या जटा. ४ खिंकाळणें.

॥ टीका ॥ प्रळयाग्नीचा लखलखाट ॥ तैसे विशाळ नेत्रवाट ॥ मुख कोटरा सारिखें विकट ॥ गिरिदरकुट ज्यापरी ॥ ४८ ॥ स्थूळ विशाळ कंठगळा ॥ सजलजलदासारिखा निळा ॥ कुटिळबुद्धि कपटें भरला ॥ जय कंसाला अभिवांछी ॥ ४९ ॥ ऐसा येऊनि नंदव्रजा ॥ कंपायमान केल्या प्रजा ॥ त्यातें देखोनि अधोक्षजा ॥ आवेश पैजा उथलला ॥ ५० ॥

तंत्रासयंतंभगवान्स्वगोकुलंतद्धेषितैर्वालविघूर्णितांबुदम् ॥
आत्मानमाजौमृगयंतमग्रणीरुपाह्वयत्सव्यनदन्मृगेंद्रवत् ॥ ३ ॥

॥ टीका ॥ आपुले गोगोपगोपी सकळ ॥ एवमादि जें गोकुळ ॥ दैत्यत्रासें अतिव्याकुळ ॥ देखोनि घननीळ कळवाळिला ॥ ५१ ॥ आणि खेंकाळे भयंकर ॥ तेणें विमानीं त्रासले सुर ॥ पुच्छकेशांचा फडत्कार ॥ तेणें जलदाभ्र भंगिलें ॥ ५२ ॥ आणि संग्रामार्थ मातें ॥ हुडकी क्षोभवूनि व्रजातें ॥ कंसशत्रु मी माझेनि हातें ॥ हा कंसातें जय वांछी ॥ ५३ ॥ ऐसें विवरूनि अंतःकरणीं ॥ दैत्यनिहंता चक्रपाणि ॥ सरसावोनि समरांगणीं ॥ वीरांगणीं पुढारला ॥ ५४ ॥ दैत्या बाहे आपणाकडे ॥ ह्मणे व्यर्थ कां इकडे तिकडे ॥ फिरसी पसरूनि चाभाडें ॥ मरण रोकडें पावसी ॥ ५५ ॥ ऐसें ह्मणोनि ठाकला पुढां ॥ बाहु ठोकोनि आला गाढा ॥ तंव केशी दैत्य महाबळियाडा ॥ कैसा सिंहाडा गर्जिन्नला ॥ ५६ ॥

सतंनिशम्याभिमुखोमुखेनखंपिबंन्निवाभ्यद्रवदत्यमर्षणः ॥
जघानपद्भ्यामरविंदलोचनंदुरासदश्चंडजवोदुरत्ययः ॥ ४ ॥

---

१ वृक्षाची ढोल, २ पर्वताची लहानशी गुहा.

॥ टीका ॥ ऐकोनि वीरवृत्तीचा शब्द ॥ दैत्यें केला सिंहनाद ॥ पुढें लक्षूनि मुकुंद ॥ अतिसक्रोध धाविन्नला ॥ ५७ ॥ जैसा गगनचि गिळील तोंडें ॥ ऐशीं विकराळ चाभाडें ॥ पसरूनि लोटला कृष्णापुढें॥ कान पाडूनि डसावया ॥ ५८ ॥ तंव श्रीकृष्णाचें अभंग ठाणें ॥ निर्भय देखोनि शंकला मनें ॥मग तो दुष्ट विमुखवदनें॥ वदंळा हाणे हरिहृदयीं ॥ ५९ ॥ आजिपर्यंत कोठें कोण्हीं ॥ पराभविलाचि नाहीं रणीं ॥ यास्तव दुरासद ह्मणोनी ॥ बादरायणि अनुवादे ॥ ६० ॥ दुरत्यय ह्मणिजे ज्याचे कवे ॥ पासूनि कोण्ही नसुटे जिवें ॥ मारुताहूनि प्रचंड धांवे ॥ ह्मणोनि नागवे सुरासुरां ॥ ६१ ॥ कृष्ण कोमळ अरविंदाक्ष ॥ मदनमूर्ति सुकुमारवेश ॥ त्याचा लक्षूनि हृदयदेश ॥ लत्ता कुलिशसम ताडी ॥ ६२ ॥

तद्वंचयित्वातमधोक्षजोरुषाप्रगृह्यदोर्भ्यांपरिविध्यपादयोः ॥
सावज्ञमुत्सृज्यधनुःशतातरेयथोरगंताक्ष्र्यसुतोव्यवस्थितः ॥ ९ ॥

॥ टीका ॥ कृष्णहृदया मागिलां पायीं ॥ लत्ताप्रहार करितां पाहीं ॥ तेणें चुकवूनि ते लवलाहीं॥ दैत्य दोहीं पदीं धरिला ॥ ६३ ॥ त्हृदयावरी ताडितां वदळा ॥ कृष्णें तैशाच धरिल्या चपळा॥गरगर भवंडी घनसांवळा॥ लीलाकमला सारिखा ॥ ६४ ॥ बळें सक्रोध टाकितां गगनीं ॥ शतधनुष्यें लंघूनि अवनि ॥ दैत्य पडला जैसा अशनि ॥ कीं अचल भंगोनि कोसळला ॥ ६५ ॥ गरुड सर्पातें झुगारी ॥ तैसा दैत्य टाकूनि दुरी॥अभंग कृष्ण राहिला समरीं ॥ प्रतीक्षा करी युद्धार्थ ॥ ६६ ॥

---

१. तोंड फिरवून. २ दुगाण्या. ३ अजिंक्य. ४ मिठी. ५ वायुहून ६ न सांपडे. ७ वज्रतुल्य. ८ चारशें हात.

सलब्धसंज्ञःपुनरुत्थितोरुषाव्यादायकेशीतरसाऽपतद्धरिम् ॥
सोप्यस्यवक्रेभुजमुत्तरंस्मयन्प्रवेशयामासयथोरगंबिले ॥ ६ ॥

॥ टीका ॥ दैत्य आदळला पृथ्वीवरी ॥ तेणें मूर्च्छा दाटली शरीरीं ॥ ते सांवरूनियां झडकरी ॥ कृष्णावरी धांविन्नला ॥ ६७ ॥ कृष्ण गिळावया सक्रोध हटें ॥ विकराळ पसरूनि मुखवटें ॥ सवेग धांविला कडकडाटें ॥ कृष्णा निकटें संघटला ॥ ६८ ॥ प्रथम वदळा केल्या विफळ ॥ तेणें हृदयीं दुःख बहळ ॥ कृष्णावरी पडला खळ ॥ परि तो अढळ नढळेची ॥ ६९ ॥ पसरलें देखोनि दैत्यवदन ॥ वामबाहु मधुसूदन ॥ वदनीं घाली हास्य करून ॥ उरग[1] लीन[2] जैंवि बिळीं ॥ ७० ॥ निर्भय सर्प रिघे बिळीं ॥ दैत्यमुखीं तैंवि वनमाळी ॥ वामबाहु घालूनि समूळीं ॥ वदनकमळीं हासतसे ॥ ७१ ॥ मुखीं सांपडतां हरिहस्त ॥ दैत्यें तोष मानिला बहुत ॥ डसों जातां दशनपात[3] ॥ झाला त्वरित तें ऐका ॥ ७२ ॥

दंतानिपेतुर्भगवद्भुजस्पृशस्तेकेशिनस्तप्तमयःस्पृशोयथा ॥
बाहुश्चतद्देहगतोमहात्मनोयथामयःसंववृधेउपेक्षितः ॥ ७ ॥

॥ टीका ॥ कक्षेपर्यंत बाहु वदनीं ॥ घालूनि निर्भय चक्रपाणि ॥ केशी डसतां कडकडोनी ॥ दंत उन्मळोनि गळाले ॥ ७३ ॥ तप्तलोह सिंदूरवर्णी ॥ तैसा बाहु स्पर्शितां दशनीं ॥ दंत पडले उन्मळोनी ॥ दैत्या नयनीं दुःखाश्रु ॥ ७४ ॥ कीं तप्तलोह जैसें पोळे ॥ तिखटा दशनीं तैसा बळें ॥ डसों गेला तंव मोकळे ॥ दशन जाले

---

१ सर्प. २ लपलेला. ३ दंतपतन.

दैत्याचे ॥ ७५ ॥ वज्रापरीस बाहु निबर ॥ बळेंचि क्रोधें रगडी असुर ॥ तेणें दशन जाले चूर ॥ नेत्रीं पाझर सूटले ॥ ७६ ॥ आत्मशब्दें बोलिजे देहो ॥ महात्मा जो हरिविग्रहो ॥ त्या कृष्णाचा दैत्यें बाहो ॥ग्रासितां पहाहो वाढला ॥ ७७ ॥ वायु प्राशूनि फुगे नाग ॥ कीं द्रव्यविशेषें स्फुलिंग[1] ॥ कीं तें त्रिविक्रमाचें[2] आंग ॥ वाढे त्रिजग मोजावया॥७८॥किंवा जलोदरनामा रोग॥जठरीं उद्भवला सवेग ॥ वाटे उपेक्षिलिया मग ॥ यमलोकमार्ग दाखवी ॥ ७९ ॥तैसा दैत्याचिये शरीरीं ॥ कृष्णबाहु वाढला भारी ॥पुढें कैसी वर्त्तली परी॥ते अवधारीं कुरुवर्या ॥ ८० ॥

समेधमानेनसकृष्णबाहुनानिरुद्धवायुश्चरणांश्चविक्षिपन् ॥
प्रस्विन्नगात्रःपरिवृत्तलोचनःपपातलेंडंविसृजन्क्षितौव्यसुः ॥ ८ ॥

॥ टीका ॥ कृष्णबाहु वाढला कंठीं ॥ तेणें खुंटली प्राणराहटी ॥ वायुरोधें[3] भरला पोटीं ॥ दुःखेंआपटी चरणांतें ॥ ८१ ॥ सर्वांगासी आला घाम ॥ विकळ झाला तनुविक्रम ॥ नेत्र वटारिले विषम ॥ प्राणोत्क्रम वोढला ॥ ८२ ॥ बाहुचर्वणीं नचले शक्ति ॥ पलायनाची खुंटली गति ॥ विकळ झाल्या इंद्रियवृत्ति ॥ देहस्मृति मावळली ॥ ८३ ॥ मूर्च्छना दाटली गाढमूढ ॥ पोटीं वायु कोंडला वाड[4] ॥ झाला ऊर्ध्व मार्ग अवघड ॥ मग फोडिलें कवाड पायूचें[6] ॥ ८४ ॥ जैसा अदत्त[5] कवडा जोडी ॥ गांडीवाटे प्राण सोडी ॥ केशिदैत्यातें परवडी ॥ झाली रोडी प्राणांतीं ॥ ८५ ॥ गांडीवाटे सांडितां लेंडा ॥ सरिसा निघाला प्राणलोंढा ॥ शरीर उघडलें तडतडां ॥ झाला उघडा हरिबाहु ॥ ८६ ॥

---

[1] अग्निकणिका. [2] वामनाचें. [3] वायु कोंडणें. [4] अतिशय. [5] कृपण, चिकु. [6] पश्चिमद्वाराचें.

तद्देहतःकर्कटिकाफलोपमाद्व्यसोरपाकृष्यभुजंमहाभुजः ॥
अविस्मितोऽयत्नहतारिरुत्स्मयैःप्रसूनवर्षैर्दिविषद्भिरीडितः ॥ ९ ॥

॥ टीका ॥ पक्क कांकडी साद्यंत उकले ॥ तैसीं तनूचीं भासती शकलें ॥ कृष्णें बाहूतें काढिलें ॥ प्रेत पडलें भूपृष्ठीं ॥ ८७ ॥ सुरनरासुरां जो अद्भुत ॥ तो मारिला केशी दैत्य ॥ परंतु विस्मयें नोहे दृप्त[1] ॥ सर्वरहितजगदात्मा ॥ ८८ ॥ कृष्णमाया अघटित घटी[2] ॥ निमिषें निवटी ब्रह्मांडकोटी ॥ तेथ कायसी भिंगुरटी ॥ दुष्ट कपटी हयरूपी ॥ ८९ ॥ महाभुज या पदाचा अर्थ ॥ कृष्णप्रताप अत्यद्भुत ॥ यत्न नकरितां मारिला दैत्य ॥ गर्वा नशिवत अविस्मयें ॥९०॥ बुद्धिबळीं कां सारिपाटीं ॥ सारी[3] मारितां गर्व उठी॥ परी कृष्ण प्रतापी जगजेठी ॥ अगर्व सृष्टीं अक्षोभ ॥ ९१ ॥ हें देखोनि सुरसमुदाय ॥ विमानीं मानूनि परमाश्चर्य ॥ परम उत्कट करिती विस्मय ॥ कुसुमनिचय[4] वर्षती ॥ ९२ ॥ मग ते श्रीकृष्णाचीं यशें ॥ निर्जर[5] वर्णिती संतोषें ॥ उत्साह करिती दुंदुभिघोषें ॥ प्रेमोत्कर्षें नाचती ॥ ९३ ॥ परस्परें देव वदती ॥ अचाट केशिदैत्याची शक्ति ॥ कृष्णें मारिला कवणे रीति ॥ हा विस्मय चित्तीं बहु वाटे ॥ ९४ ॥ काहीं पराजिलें नाहीं शस्त्र ॥ कांहीं नकरितां प्रतीकार[6] ॥ अयत्नें मारिला दुष्ट असुर ॥ ज्याचा आधार कंसातें ॥९५॥ फळोदयातें सूचक प्रसून॥कीं सूर्योदया जाणवी अरुण ॥ तैसें कंसासुरा असन्मरण ॥ केशिमरणें बोधिलें ॥ ९६ ॥ येथूनि झाला दृढनिश्चय ॥ दैत्यां राक्षसां दानवां क्षय॥आह्मां निर्जरां ऊर्जित विजय॥कल्याण अभय त्रिजगातें॥९७॥ भार उतरला मानूनि मनीं

---

[1] गर्विष्ठ. [2] रचित्ये [3] सोंगटी. [4] पुष्पसमुदाय. [5] देव. [6] विघ्ननिवारणोपाय.

आनंद भरित झाली अवनि ॥ कृष्णपवाडे गाती गगनीं ॥ देव विमानीं उत्साहें॥९८॥ ऐसा झाला केशिवध ॥ श्रोतीं होऊनि पुढें सावध ॥ कृष्णा भेटेल मुनिनारद ॥ तो संवाद परिसावा ॥ ९९ ॥ कृष्णदयार्णवप्रार्थना ऐसी ॥ श्रवणीं बैसतां सप्रेमेंसीं ॥ चिंता नकीजे कोणेविषीं ॥ सर्व हृषीकेशी संपादी ॥ १०० ॥ इतिकेशिवधः समाप्तः ॥ ६ ॥ ऐसा प्रभाते वधिला केशी ॥ त्यानंतरें श्रीहृषीकेशी ॥ पुरस्करूनि गोधनासी ॥ गेला वनासि सहगोप ॥ १ ॥ शुक ह्मणे गा नृपोत्तमा ॥ नारद देवर्षि महात्मा ॥ बनीं भेटला पुरुषोत्तमा ॥ ते कथेची गरिमा अवधारीं ॥ २ ॥

देवर्षिरूपसंगम्यभागवतप्रवरोनृप ॥ कृष्णमक्लिष्टकर्माणंरहस्येतदभाषत ॥ १० ॥

॥ टीका ॥ ह्मणसी आधीं कंसापाशीं ॥ सांगोनियां त्र्यक्षरीसी ॥ मग कां भेटला कृष्णासी ॥ हे शंका मानसीं नधरावी ॥ ३ ॥ कंसाचिये अंतकाळीं ॥ ध्यानरूपें श्रीवनमाळी ॥ बिंबवावया हृदयकमळीं ॥ गोष्टी त्याजवळी चावळला ॥ ४ ॥ अतींद्रियद्रष्टा[1] मुनि ॥ भूतभविष्यवर्त्तमानीं ॥ कंसाधिकार विचारूनी ॥ स्वहितकथनीं प्रवर्तला ॥ ५ ॥ कंस आसुरीप्रकृतिमंत ॥ त्यासि अनोळख भक्तिपंथ ॥ यालागिं विरोधभजनासक्त ॥ मुनि तदुचित त्या बोधी ॥ ६ ॥ प्रह्लादाचा जो अग्रज ॥ तो हा कंसनामा भोज ॥ त्यासि कथिला अधोक्षज ॥ सांगोनि गुज विश्वासें ॥ ७ ॥ आसन्न[2]मरण जालिया प्राप्त ॥ विवेकनिष्ठ जिवलग आप्त ॥ जेंवि कथिती प्रायश्चित्त ॥ तेंवि गुह्यार्थ हा वदला ॥ ८ ॥ हें ऐकोनि कंसचित्त ॥ कृष्णीं जडलें विरोधार्थ ॥ तेणेंचि तयाचा परमार्थ ॥ मु-

---

१ इंद्रियांस अगम्य अशा वस्तु पाहणारा. २ समीप.

ख्यपुरुषार्थ लक्षिला ॥ ९ ॥एवं भागवतप्रवरमुनि॥नमनीं त्र्यक्षरी लांछनीं ॥सर्वसुहृदस्वहितकथनीं ॥ कळवळूनि प्रवर्त्तला ॥ १० ॥ कर्में कथूनियां कंसासी ॥ मग कां आला कृष्णापासीं ॥ ऐसी शंका कांहीं धरिसी ॥ तरी येविषीं अवधारीं ॥ ११ ॥ क्लिष्ट ह्मणिजे निंद्य कर्म ॥ जो नातळे पुरुषोत्तम ॥ त्या कृष्णातें मुनिसत्तम ॥ गुह्य सप्रेम हें वदला ॥ १२ ॥

कृष्णकृष्णाप्रमेयात्मन्योगेशजगदीश्वर ॥ वासुदेवाखिलावाससात्वतांप्रवरप्रभो ॥ ११ ॥

॥ टीका ॥ कृष्णकृष्णद्विरुक्तिनामें ॥ आदरपुरस्सर सप्रेमें ॥ संबोधिलें मुनिसत्तमें ॥ तें नृपोतमें परिसावें ॥ १३ ॥ नवां संबोधनीं अर्थ ॥ सूचिला संशयनिवृत्यर्थ ॥ ऐकोनि येथींचा गुह्यार्थ ॥ शंका किमर्थ राहील ॥ १४ ॥ कृष्ण सर्वज्ञ ईश्वर ॥ जाणे सर्वांचें अंतर ॥ नारदाचा प्रेमादर ॥ सत्य साचार त्या विदित१५ ॥ किमर्थ बोधिलें कंसातें ॥ हेंही विदित सर्वज्ञातें ॥ ह्मणोनि संशयरहितचित्तें ॥ मुनि कृष्णातें भेटला ॥१६ ॥ कृष्णरूपा कालात्मका ॥ तुज मृत्यूचा कायसा धोका ॥ किमर्थ वयसेचा आवांका ॥ दावूनि लोकां चाळविसी ॥१७ अप्रमेंयात्मा तूं ईश्वर ॥ तुझा अमोघ मंत्रविचार ॥ कैंवि जाणती ते पामर ॥ कंसासुरप्रमुख जे ॥ १८ ॥ अथवा आत्मा ह्मणिजे देह ॥ तो हा तुझा अप्रमेय ॥ वृथा कंसादिकांचें भय ॥ हा अभिप्राय सूचिला॥ १९ परिच्छिन्न असता जरी ॥ तरी हा जन्मता देवकीउदरीं ॥ स्वेच्छा लीलाविग्रहधारी ॥ स्वेच्छा आदरी तैं मरण ॥ २० ॥ कंसासि कथिलें गुह्य सर्व ॥ तेणें रचिला मंत्र वाव ॥ तरी तूं योगीश्वरांचा राव ॥ अचिंत्य

---

१ अमर्याद ह्म० देशकाल भैदरूप मर्यादा राहित आत्मा ज्यांचा तो. २ समर्याद.

अभिप्राव पैं तुझा ॥ २१ ॥ कंस प्रतापी वाटेल चित्ता ॥ तरी तूं त्रिजगाचा नियंता ॥ जगदीश्वर या संबोधनार्था ॥ माजि तत्वता हें सूचिलें ॥ २२॥कंसें करावया स्वरक्षण॥बळिष्ठ ठेविले ह्मणसी गण॥त्यांमाजि तुझें वसतिस्थान ॥ वासुदेव पूर्ण सर्वग तूं ॥ २३ ॥ सर्वाश्रय तूं अखिलावास ॥सात्वंतप्रवर[1] स्वभक्तईश ॥ सर्वशक्तीचा परेश ॥ प्रभुत्वें जगदीश प्रभुवर तूं ॥२४ ॥ ह्मणविसी नंदाचा बाळक ॥ हें मायावी नाट्यकौतुक ॥ वास्तव स्वरूप निष्कलंक ॥ सर्वात्मक तूं आत्मा ॥ २५ ॥

त्वमात्मासर्वभूतानामेकोज्योतिरिवैधसाम् ॥ गूढोगुहाशयःसाक्षीमहापुरुषईश्वरः ॥ १२ ॥

॥टीका ॥ सर्वभूतांचा अंतरात्मा ॥ तो तूं एकचि पुरुषोत्तमा ॥ नोहसी परिच्छिन्न जीवात्मा ॥ तुजमाजि व्योमादिक अवघें ॥ २६ ॥ व्यापक ह्मणसी कवणेपरी ॥ जैसा पावक काष्ठांतरीं ॥ ज्योतीरूपें वसती करी ॥ काष्ठविकारीं अलिप्त ॥ २७ ॥ भूतीं असोनि भूतांप्रति ॥दृश्यरूपें नयेसी व्यक्ती॥यालागीं गूढ ह्मणोनि श्रुति॥ वाखाणिती तुजलागीं २८ ॥ गूढत्वासि चारी हेतु ॥ ऐकें तेथींचा वृत्तांतु ॥ गुहाशय साक्षी महापुरुष तूं॥ ईश्वर नियंतासर्वांचा ॥ २९ ॥ मनोबुध्यादि जे आशय॥ त्या गुहांमाजि तूं गुहाशय[2]॥तज्जन्यकल्पनाकृतनिश्चय॥ त्यां तूं अप्रमेय अगम्य ॥ १३० ॥ यालागीं ह्मणिजे तुज साक्षी ॥ कीं साक्षी अदृश्य सर्वां पक्षीं ॥ ह्मणोनि महापुरुष तूं हृषीकेशी॥ जो परिच्छिन्नमतीशीं दुर्ज्ञेय ॥ ३१॥ एवं सर्वप्रकारें अविज्ञेय ॥ तैं ममास्तिक्या प्रमाण काय ॥ ह्मणसी तरी तूं प्रतीतिमय ॥ अज अव्यय ईश्वर तूं ॥ ३२ ॥ गौणभूतात्मक चराचर ॥ जीव अज्ञान

---

[1] यदुश्रेष्ठ. [2] मन, बुद्धि इ०जे आशय (स्थानें) ह्याच गुहा त्यांत राहणारा.

कर्मतंत्र ॥ त्यांतें नियामक फळभोगपर ॥ तो तूं ईश्वर नियन्ता ॥३३ ॥ अशुभफलदें कर्मैं करिती ॥ अशुभफळभोगा नेच्छिती ॥ त्यां तो भोग शासनरीति ॥ ईशनशक्ति भोगविसी ॥ १३४ ॥ जगच्छत्रु जगन्मित्र ॥ एक सभाग्य एक दरिद्र ॥ एक मूर्ख एक चतुर ॥ कर्मानुसार तूं करिसी ॥ ३५ ॥ नेघें ह्मणतां घेवविसी ॥ करीना ह्मणतां तें करविसी ॥ नभोगूं ह्मणतां भोगविसी ॥ कृतकर्मासि ऐश्वर्यें ॥३६ ॥ ह्मणसी ईश्वरें म्यां नियमिलें॥ तें नियम्य चराचर कोठूनि आलें ॥ कोणापासूनि दुसरें जालें ॥ तें परिसिलें पाहिजे ॥ ३७ ॥

आत्मनाऽऽत्माश्रयःपूर्वंमाययाससृजेगुणान् ॥ तैरिदंसत्यसंकल्पःसृजस्यत्स्यवसीश्वरः ॥१३ ॥

॥ टीका ॥ तरी हें तुजवेगळें नाहीं ॥ तूं एकचि दोहीं ठायीं ॥ नियंता नियम्य नियमन पाहीं ॥ मायाप्रवाहीं रूढविसी ॥ ३८ ॥ अन्यसाधनांचा आश्रय ॥ नापेक्षिसी तूं आत्माश्रय ॥ मृगजळ करूनि अकर्त्ता सूर्य॥ तेंवि अव्यय स्वतंत्र तूं ॥ ३९ ॥ स्वसत्तायोगबळें माया ॥ पूर्वीं अधिष्ठूनि गुणत्रया ॥ प्रवर्त्तविसी त्रिविधकार्या ॥ सृष्टिप्रळयस्थित्यादिकां ॥ ४० ॥ गुण सृजूनि गुणद्वारा ॥ सृजन पालन आणि संहारा ॥ एवं तूंचि कर्त्ता खरा ॥ भेदविकारा नशिवोनी ॥ ४१ ॥ ह्मणसी सृष्टयादि त्रिविध क्रिया ॥ षट्कारकें साधती यया ॥ तरी कारकतंत्र ह्मणावया ॥ योग्य झालों सहजची ॥ ४२ ॥ तरी तूं ईश्वर सत्यसंकल्प ॥ तुज अन्य साधनांचा खटाटोप ॥ नपडे कीं तूं उभयरूप ॥ सप्रताप सर्वात्मा ॥ ४३ ॥ सबाह्य एकात्मता तुझी ॥ तेथ अंतर्बाह्य गोष्टी दुजी ॥ कवण करील भेदवाजी ॥ क्रीडसी सहजीं सहजत्वें ॥ ४४ ॥ जागृति फेडूनि विश्वाभिमान॥ सुषुप्ति लेवूनि देखे स्वप्न ॥

---

१ नियमन करणारी शक्ति. २ निर्दून. ३ कर्त्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान व अधिकरण. ४ भेदाचा भोभाट करणारा.

तेथ कारकें कैंचीं कोण ॥ कारकाधीन विचारीं ॥ १४५ ॥ एवं विश्वविश्वसाक्षी ॥ तूंचि अभेदभेद उभयपक्षीं ॥
क्रीडसी हें जाणिजे दक्षीं ॥ पूर्णनिरपेक्षीं विरक्तीं ॥ ४६ ॥ निर्मूनि अवघा जगडंबर ॥ संस्थापूनि स्वधर्मसूत्र ॥
लीला क्रीडसी स्वतंत्र ॥ भेद विचित्र भासोनी ॥ १४७ ॥ धर्मसंस्थापने होतां भंग ॥तैं तूं अवतरसी श्रीरंग ॥
मर्दूनि अधर्मी अनेक ॥ धर्मप्रसंग स्थापिसी ॥ ४८॥ प्रस्तुत येथ कंसादिक ॥ असुर धर्मोच्छेदक ॥ अवतरलासि
तूं यदुनायक ॥ धर्मसंस्थापक तन्नाशें ॥ ४९ ॥

सत्वम्भूधरभूतानांदैत्यप्रमथरक्षसाम् ॥ अवतीर्णोविनाशायसेतूनांरक्षणायच ॥ १४ ॥

॥ टीका ॥ भूधर ह्मणिजे पृथ्वीपति ॥ असुरभूपति दैत्यजाति ॥ अधर्मरूपी पापमूर्त्ति ॥राक्षसव्यक्ति नररूपी
॥ ५० ॥ त्यांच्या संहारा कारणें ॥ धर्मसेतुसंस्थापनें ॥ तुझें यदुकुळीं अवतार धरणें ॥ साधुरक्षणें अघनाशें५१॥
आजिपर्यंत बालचरितें ॥ बहुत मारिले अधर्मकर्त्ते॥ पुढां मारिसी ते संकेतें ॥ कथिजेतील प्रसंगें ॥ ५२ ॥

दिष्ट्यातेनिहतोदैत्योलीलयाऽयंहयाकृतिः ॥ यस्यहेषितसंत्रस्तास्त्यजन्त्यनिमिषादिवम् ॥ १५ ॥

॥ टीका ॥ लीलेकरूनि दैवयोगें ॥ केशिनामा दैत्य आंगें ॥ तुवां मारिला प्रसंगें ॥ ज्याचेनि स्वर्गें उद्विग्न ॥
॥ ५३ ॥ महाकपटी अश्वाकृति ॥ ज्याच्या हेंषणें त्रिजगती ॥ सुर नर भूचर संत्रासती ॥ देवही पळती स्वर्गौनी ॥ १५४ ॥ नहालती नेत्रपातीं ॥ यास्तव अनिमेष ऐसें ह्मणती ॥ त्या स्वर्गस्थां हृदयीं खन्ती ॥जो दुर्मति

---

१ जगचा पसारा. २ खिंकाळणें.

आठवतां ॥ ९५ ॥ तो आजि दैवें मारिला केशी ॥ येथूनि प्रारम्भ दैत्यवधासी ॥ अनुक्रमें जे संहारिसी ॥ ते तूं पर्येसीं श्रीकृष्णा ॥ ९६ ॥

चाणूरंमुष्टिकंचैवमल्लानन्यांश्चहस्तिनम् ॥ कंसंचनिहतंद्रक्ष्येपरश्वोऽहनितेविभो ॥ १६ ॥

॥ टीका ॥ परश्वोऽहनि ह्मणिजे परवां ॥ मथुराप्रवेशसी माधवा ॥ चाणूरादि मल्लां सर्वां ॥ मुष्टिकप्रमुखां मारिसी ॥ ५७ ॥ अतींद्रियद्रष्टा[1] नारदमुनि ॥ तयाची प्रसिद्ध सिद्धवाणी ॥ ज्ञानप्रकाशें अवलोकुनी ॥ कृष्णालागूनि विज्ञापी ॥ ५८ ॥ माझें संपतां वृत्तांतकथन ॥ सद्यचि होईल अक्रूरागमन ॥ त्याचें ऐकोनि विज्ञापन ॥ मथुरानिवेशन प्रभाते ॥ ५९ ॥ उद्यां अपराह्णीं[2] मथुरानगर ॥ सहित अग्रज वयस्यनिकर॥ प्रवेशोनि पाहसी समग्र ॥ लक्ष्मी विचित्र यदुपुरीची ॥ ६० ॥ रजक वधूनियां प्रारंभीं ॥ धनुष्य भंगूनि समारंभीं ॥ कंसबळेंसीं काळक्षोभी ॥ धनुष्यरक्षक वधसील ॥ ६१ ॥ ऐसी संपल्या उद्यांची रात्री ॥ परवां पाहीन आपुले नेत्रीं ॥ तुवां मारिला जाईल स्वकरीं ॥ कुवलयापीड महागज ॥ ६२ ॥ पुढें रिघोनि रंगागार[3] ॥ समल्लमुष्टिकादि चाणूर ॥ तुवां मर्दिला कंसासुर ॥ हें तव चरित्र पाहीन ॥ ६३ ॥ इतुकें पाहीन रोकडें ॥ यावरी मारिसी जे जे पुढें ॥ ते ते वीर प्रतापी गाढे ॥ ऐकें निवाडें जाणवितों ॥ ६४ ॥

तस्यानुशंखयवनमुराणांनरकस्यच ॥ पारिजातस्यहरणमिंद्रस्यचपराभवम् ॥ १७ ॥

॥ टीका ॥ कंसमर्दनापासून ॥ अनुक्रमेंचि चरित्रजाण ॥ भद्रासनीं[4] उग्रसेन ॥ पितृसांत्वन व्रतदीक्षा ॥ ६५ ॥

---

[1] ज्ञानदृष्टीनें पाहणारा. [2] दिवसाचा शेवटचा भाग. [3] तालिमखाना. [4] सिंहासन.

पुढें सांदीपनीपासीं ॥ गुरूपसादन विद्याभ्यासीं ॥ गुरुपत्नीनें दक्षणेसी ॥ मृतपुत्रासि याचितां ॥ ६६ ॥ तदर्थ प्रवेशे सिंधूदरीं ॥ पांचजन्य जो सागरवैरि ॥ मर्दूनि वागाविसी वामकरीं ॥ मत्स्यावतारीं जेंवि दुजा ॥ ६७ ॥ त्यानंतरें कंसदारा ॥ दुःखें जाऊन जनकघरा॥पिता मागधं स्मरवूनि वैरा ॥ बळात्कारें क्षोभवितां॥ ६८॥ कंससूड मागतां रणीं ॥ मागधपक्षीय दैत्यश्रेणी ॥ मर्दितां अनुक्रमें करूनी ॥ कालयवन मारिसी ॥ ६९ ॥ त्यानंतरें रुक्मिणीहरणीं ॥ संहरिसी वीरश्रेणी ॥ हें व्याख्यान वक्ष्यमाणीं ॥ व्यत्यासं कोण्ही नमनावा ॥ ७० ॥ सत्यभामारुक्मिणीकलह ॥ सत्यभामांत्वनस्नेह ॥ दावितां अमरांचा समूह ॥ कथील विग्रह भौमाचा ॥ ७१ ॥ तत्प्रसंगें मुरमर्दन ॥ आणि नरकासुराचें हनन ॥ पारिजातद्रुमापहरण ॥ गर्व भंगून शक्राचा ॥ ७२ ॥

उद्वाहंवीरकन्यानांवीर्यशुल्कादिलक्षणम् ॥ नृगस्यमोक्षणंपापाद्द्वारकायांजगत्पते ॥ १८ ॥

॥ टीका ॥ स्वप्रतापमात्रमोल ॥ करूनि ललनारत्नें अमोल ॥ जिंकिसी तत्प्रसंगें खळ ॥ प्रबळदळेंसीं निर्दळिसी ॥ ७३ ॥ रुक्मिणीप्रमुख नायिका अष्ट ॥ कृतनियमेंसीं जिंकिसी स्पष्ट ॥ सोळासहस्त्र एकवाट ॥एके घटिकेंत वरिसील ॥ ७४ ॥ स्यमंतकमणिगवेषण ॥ जांबवताचें संतोषण ॥ करिसी गर्व परिहरून ॥ देसी दर्शन रामरूपें ॥ ७५ ॥ नृगासि द्विजशापें करून ॥ अंधकूपीं चिरकाळ पतन ॥ त्याचें करिसील उद्धरण ॥ द्वारकाभुवन घसवूनी ॥ ७६ ॥

स्यमंतकस्यचमणेरादानंसहभार्यया ॥ मृतपुत्रप्रदानंचब्राह्मणस्यस्वधामतः ॥ १९ ॥

---

१ कृष्णाचागुरु. २ गूरूगृहीं वास. ३ समुद्रामध्यें. ४ जरासंध. ५ उलटक्रम.

॥ टीका ॥ सत्यभामेची ऐकोनि ग्लानि ॥ सुधन्व्याची प्राणहानि ॥ करूनि घेसी स्यमंतकमणि ॥ हेंही नयनीं देखेन ॥ ७७ ॥ पुढें ब्राह्मणाचे मृतपुत्र ॥ प्रतिज्ञापूर्वक पांडुपुत्र ॥ आणितां भंगेल प्रतिज्ञासूत्र ॥ तें तूं चरित्र करसील ॥ ७८ ॥ सवें घेऊनियां अर्जुन ॥ महाकाळपुरा जाऊन ॥ ब्राह्मणाचे मृतनंदन ॥ देसी आणून कौतुकें ॥

पौंड्रकस्यवधंपश्चात्काशिपुर्याश्चदीपनम् ॥ दंतवक्रस्यनिधनंचैद्यस्यचमहाक्रतौ ॥ २० ॥

॥ टीका ॥ पौंड्रकनामें कारुषराव ॥ कृष्णायुधें कृत्रिम सर्व ॥ धरूनि ह्मणवी वासुदेव ॥ द्वेषें दानव समसाम्य ॥ ८० ॥ दूत धाडूनि तो दुर्मति ॥ पाचारील युद्धाप्रति ॥ काशीमाजी त्या स्वरूपमुक्ति ॥ देसी स्वहस्तीं निवटूनी ॥ ८१ ॥ काशीपति पौंड्रकमित्र ॥ चक्रें छेदिसी तयाचें वक्र ॥ सूडाकारणें तत्पुत्र ॥ यजील अभिचारविधिं रुद्रा ॥ ८२ ॥ रुद्रदत्त कृत्या क्रूर ॥ यज्ञीं प्रकटेल महाघोर ॥ तीतें प्रेरूनि द्वारकापुर ॥ जाळितां प्रतिकार तूं करिसी ॥ ८३ ॥ धगधगीत सुदर्शन ॥ देखोनि कृत्या पलायमान ॥ प्रेरकेंसीं ऋत्विग्गण ॥ भस्म जाळून करील ॥ ८४ ॥ तत्प्रसंगें काशीपुरी ॥ अवदान[2] होईल वैश्वानरीं[3] ॥ राजसूयमहाध्वरीं ॥ प्रार्थील तूतें युधिष्ठिर ॥ ८५ ॥ तत्प्रसंगें मागधहनन[4] ॥ भीमहस्तें करविसी जाण ॥ अग्रपूजेचें प्रकरण ॥ चैद्यहनन[5] तेठायीं ॥ ८६ ॥ अनुक्रमेंचि दंतवक्र ॥ मनुष्यरूपी केवळ असुर ॥ तुजसीं करूनि क्रूर समर ॥ समरसेल तुजमाजी ॥ ८७ ॥ या वेगळे अनेक वीर ॥ पृथ्वी ज्यांचा मानी भार ॥ त्यांचा करिसील संहार ॥ पांडुकुमार क्षोभवूनी ॥ ८८ ॥

---

१ जारणमारणादियोगानें. २ आहुति. ३ अग्नीमध्यें. ४ जरासंधाचा नाश. ५ शिशुपालवध.

यानिचान्यानिवीर्याणिद्वारकामावसन्भवान् ॥ कर्त्ताद्रक्ष्याम्यहंतानिगेयानिकविभिर्भुवि ॥ २१॥

॥ टीका ॥ ऐशा अनेक असुरसेना ॥ मर्दूनि धर्मसंस्थापना ॥ करिसी साधुसंरक्षणा ॥तें गोचर नयना होईल ॥ ८९ ॥ नांदतां द्वारकेमाझारीं ॥ अनेकवीर्यें करिसी हरि ॥ तें मी पाहीन आपुल्या नेत्रीं ॥ गाती भूचत्रीं कविवर जे ॥ ९० ॥

अथतेकालरूपस्यक्षपयिष्णोरमुष्यवै ॥ अक्षौहिणीनांनिधनंद्रक्ष्याम्यर्जुनसारथेः ॥२२ ॥

॥ टीका ॥ ॥ ऐसा भविष्य संकेतार्थ ॥ बोलोनियां ऋषिसमर्थ ॥ पुन्हा सूची जो गूढार्थ ॥ तो हा श्लोकार्थ पर्येसा ॥ १९१ ॥ ऐसें करितां भूभारहरण ॥ तूं जो कालरूपी भगवान ॥ रथी करूनियां अर्जुन ॥ सारथि होऊन विचरसी ॥ १९२ ॥ तेव्हां तुझिया पक्षपाता ॥ अक्षौहिणींचा समूह पुरता ॥ तावकी शक्ति लाहूनि शरता ॥ निर्दळी दैत्यां समरीं जो ॥ १९३ ॥ त्या अक्षौहिणींचें ही निधन ॥ शेवटीं मी अवलोकीन ॥ ऐसें मुनीचें गूढ वचन ॥ श्रीधरव्याख्यान तें ऐका ॥ ९४ ॥ भूभाररूपा अक्षौहिणी ॥ अश्वा विश्वाच्या ह्मणोनी ॥ बोलिजती त्या समरांगणीं ॥ मरतां पाहीन मुनि ह्मणे॥ ९५॥ येथवरी जे नारद स्तवनीं ॥ चरित्रभाग भविष्यकथनीं ॥ पदानुक्रम ये व्याख्यानीं ॥ नाहीं ह्मणोनि नदूषिजे ॥९६ ॥ ऐसा संकेत जाणवून ॥ यावरी करी वास्तव स्तवन ॥ कीं तूं विशुद्धविज्ञानघन ॥ ममता अभिमान नातळसी[3] ॥९७॥ एवं करूनि विज्ञापन ॥ वास्तव स्तवनें आनंदवून ॥ मुनि भगवंता अभिवंदन ॥ करी संपूर्ण दों श्लोकीं ॥ ९८॥

---

१ तुझी. २ बाणत्व. ३ नस्पर्श करिशी.

विशुद्धविज्ञानघनंस्वसंस्थयासमाप्तसर्वार्थममोघवांछितम् ॥
स्वतेजसानित्यनिवृत्तमायागुणप्रवाहंभगवंतमीमहि ॥ २३ ॥

॥ टीका ॥ त्या भगवंता तुजप्रति ॥ आह्मी शरण भेदनिवृत्ति ॥ करूनि स्वयंभ आत्मस्थिति ॥ विनयविनति मुनि वदला ॥ ९९ ॥ तें भगवत्स्वरूप किंलक्षणं[1] ॥ केवळ विशुद्ध विज्ञानघन ॥ जेथ अस्पृष्ट सत्वादित्रिगुण॥ अपरिच्छिन्न अगाध ॥ २०० ॥ शोधनें निरसूनि गुणादिमळ ॥ तें शुद्धिपूर्वक बोलिजे अमळ॥ विशुद्धविज्ञानघन केवळ ॥ नित्यनिर्मळ जें रूप ॥ १ ॥ खता झाडूनि उजळिजे आरसा ॥ सूर्य गगनीं जे कीं त्यासरिसा॥ तोही गोचर ज्या प्रकाशा ॥ त्या डोळसा जो प्रकटी ॥ २ ॥ ज्ञेयज्ञातृत्वविहीन ॥ केवळविशुद्धज्ञानघन ॥ यालागिं स्वसंस्थितीकरून ॥ अभीष्टार्थ संप्राप्त ॥ ३ ॥ स्वससामर्थ्यें स्वप्रताप ॥ स्वऐश्वर्यें स्वस्थ भूप ॥ ते स्वसंस्था आनंदरूप ॥ येर तो जल्प क्षुब्धत्वें ॥ ४ ॥ सम्यक्स्वरूपस्थितिच जे कां ॥निरतिशयानंद देखा॥ तया पूर्णत्वें करूनि असिका[2] ॥ अर्थसमूह अवाप्त ज्या ॥ ५ ॥ एवं अवाप्तपूर्णकाम ॥ तें हें कथिलें कैवल्यधाम ॥ आतां सत्यसंकल्पात्मक जें ब्रह्म ॥ ईश्वरनाम अभिव्यक्त ॥ ६ ॥ अमोघवांछितार्थ[3] ज्याचा ॥ तो सत्यसंल्पी ईश्वर साचा ॥ ऐसें निरूपितां शंकेचा ॥ संभव झाला श्रोतयां ॥ ७ ॥ वांछा असे जये ठायीं॥आणि संसृतीचा स्पर्श नाहीं ॥ हेंचि अघटित ह्मणाल कांहीं ॥ तरी येविषयीं अवधारा ॥ ८ ॥ स्वतेजसा नित्य निवृत्त[4] ॥ मायागुणप्रवाह जेथ ॥ संसृतिसंभव कैंचा तेथ ॥ मुनिसमर्थ वदलासे ॥ ९ ॥ स्वतेजसा ह्मणिजे काय ॥ चिच्छ-

---

[1] कोणत्या प्रकारचें. [2] सर्व. [3] ज्याच्या इच्छा कधीं विफल होत नाहींत तो. [4] दूर केलेला.

क्ति जे प्रज्ञामय ॥ तयेकरूनि निरसला होय ॥ मायागुणमयप्रवाह ॥ १० ॥ मायागुणमयप्रवाह कैसा ॥ प्रश्न स्फुरेल जरी मानसा ॥ तरी नावेक सावध बैसा ॥ साद्यंत परिसा संसार ॥ ११ ॥ प्रथम स्फुरण प्रणवांकुर ॥ अव्यक्तमाया ते साचार ॥ केवळ अज्ञानतमःप्रचुर ॥ रुद्र संहाराभिमानी ॥ १२ ॥ तयामाजी विवळे[1] सत्व ॥ विपरीतज्ञान तें महत्तत्व ॥ विष्णु अभिमानी ज्ञातृत्व ॥ पालनपटुत्व प्रकाशी॥ १३ ॥त्यामाजी रजोगुणीं विराट ॥ क्रियासमवेत सृजननिष्ठ ॥ सृजनाभिमान जाला प्रकट ॥ ब्रह्मांडघट साकार॥ १४॥ तमोगुणीं अव्यक्त भूतें ॥ सत्वगुणीं ज्ञानवंतें ॥ रजोगुणीं दृश्यें मूर्त्तें ॥ विषयस्वार्थें कालवलीं ॥ १५ ॥ तत्कर्दमें भौतिक सृष्टि ॥ जीवचैतन्या प्रकटराहटी॥लक्षचौऱ्यांसीं भगसंकटीं ॥ नचुके घरटी परिभ्रमतां ॥१६ ॥ मरणें उपजणें व्यवहारणें ॥ सुखदुःखांचें भरलें भाणें ॥ सुर नर तिर्यक होणें जाणें ॥ सदा जाचणें नसुटतां॥ १७॥ शत्रुषट्क अभ्यंतरीं ॥ विश्वासूनि मैंदापरी ॥ आतुडविती[2] षड्विकारीं ॥ त्रितापजोहरीं[3] कोंडोनी ॥ १८॥ अंधतामिस्र आणि मोक्ष ॥ द्विधा अज्ञानज्ञानपक्ष ॥ आत्मा उभयत्र अपरोक्ष ॥ तो अलक्ष त्या नकळे॥१९ ॥ इहामुष्मिक तिर्यग्योनि ॥ तामिस्रमोक्ष ताटस्थ्यकथनीं ॥ जीव पडिले परिभ्रमणीं ॥ निबद्ध गुणीं फळभोगें ॥ २० ॥ तो हा मायागुणप्रवाह ॥ चिच्छक्तिप्रकाशें जेथ वाव ॥ संसृतीसि तेथें ठाव ॥ ह्मणणें माव अवघी हे॥२१॥ तमात्मक सत्वीं विपरीत ज्ञान ॥ मिश्रप्रकाशें मंदनयन ॥ रज्जूवरी सर्पभान ॥ अध्यारोपण तेंवि भवा ॥२२ ॥ प्रज्ञानतेजाच्या उजिवडें॥अध्यारोप कोणीकडे॥तेथ संसृति भाविती वेडे॥मूर्ख बापुडे भवभ्रांत॥२३॥एवं ऐसिया भगवद्रूपा ॥ शरण जाणोनि कीजे कृपा ॥ येथ शंका करिसी बापा ॥ तें संक्षेपामाजि वदतों ॥ २४ ॥ भूतभविष्य-

---

[1] स्पष्ट होतें. [2] मिळविती. [3] तापत्रयरूप अग्नीमध्यें.

वर्त्तमान ॥ नारदा तूं त्रिकालज्ञ ॥ मायागुणप्रवाहशून्य ॥ मजलागून कैंवि वदसी ॥ २५ ॥ ईश्वर मज जरी मानिसी साच ॥ तरी विश्व अवघेंचि मत्प्रपंच ॥किंवा ह्मणसी यदुपतीच॥तरी हें अवघेंचि यदुचक्र ॥ २६ ॥ इतुका प्रपंच मा॥झिये गांठीं ॥ अगुणप्रवाह कैशिये गोठी ॥ ह्मणसी तरी तें तूं जगजेठी ॥ ऐकें वाक्युटीं निरूपितों॥२७

त्वामीश्वरंस्वाश्रयमात्ममाययाविनिर्मिताशेषविशेषकल्पनम् ॥
क्रीडार्थमद्यात्तमनुष्यविग्रहंनतोऽस्मिधुर्यंयदुवृष्णिसात्वताम् ॥ २४ ॥

॥ टीका ॥ भो भो यदुकुळधुरंधरा ॥ पूर्ण ऐश्वर्यें ईश्वरा ॥ तूतें नमितों वृष्णिप्रवरा ॥ सात्वनिकरा प्रभुवर तूं ॥ २८ ॥ ईशितव्यें आपुल्या ठायीं ॥ इशेनशक्तीच्या प्रवाहीं ॥ स्ववश करिसी तूं सर्वही ॥ तूं कोण्हांही वश नव्हसी॥२९॥यास्तव मायावशवार्तिनी॥सत्ता योगबळें स्वीकरूनी॥अशेष विशेष तियेकरूनी॥स्वक्रीडार्थ प्रवर्तक ॥ ३० ॥ तें हें अवघेंचि भवभ्रमचक्र ॥ स्निग्ध मोहक मादक मधुर ॥परी तें तुज नोहे भ्रमकर ॥तूं परतर परमात्मा ॥ ३१ ॥ अव्यक्तादि गुणप्रवाह ॥ महदहंकार भूतसमूह ॥ इहीं न करवे तुज निग्रह लीलाविग्रहनाटक तूं ॥ ३२ ॥ दुर्गमदुर्गीं भद्रासन ॥ पूर्ण ऐश्वर्यें नृपसंपन्न ॥ तेथ निबद्ध दस्युगण ॥ त्यां तें स्थान अनुल्लंघ्य ॥ ३३ ॥ कर्मपाशीं निबद्ध झाले ॥ भवभ्रमचक्रीं नियंत्रिले ॥ ते नवचती मुक्त केले ॥ तुजवेगळे कल्पांतीं ॥ ३४ ॥ तेचि चक्रीं तूं चक्रवर्ती ॥ परी नपडसी चक्रावर्तीं ॥ ऐसी तुझी अगाधकीर्ति ॥ चक्रभ्रांतिप्रभंजक ॥ ३५ ॥ तो तूं काळकळनारूप ॥ सात्वतवृष्णियदुकुळभूप ॥ मनुष्यविग्रही भाससी पशु-

---

१ चोरांचा समूह. २ काळाची आकर्षण शक्ति तद्रूप.

प ॥ क्रीडाकलाप कलुषंघ्न ॥ ३६ ॥ अगाध तुझी हे कल्पना॥निवटावया खळ दुर्जना॥ धर्मसेतुसंस्थापना ॥ साधुरक्षणा करावया ॥ ३७ ॥ पांडवादि स्वपक्षीं देव ॥ नंदप्रमुख हे बल्लव ॥ सात्वत वृष्णि मधु यादव ॥ घेऊन स्वमेव यदुचक्र ॥ ३८ ॥ मृत्युलोकीं अवतरलासी ॥ त्रिजग ग्रथूनि कल्पनापाशीं ॥ नित्य निर्लेप क्रीडा करिसी ॥ पूर्णत्वेंशीं साऩ्यतीं ॥ ३९ ॥ एवं यादवादि स्वपक्षसृजन ॥ षट्पंचकोटि अभिवर्धन॥ कार्यान्तीं त्यां उपसंहरण ॥ करिता पूर्ण निर्मम तूं ॥ ४० ॥ ऐसा अहंताममतारहित ॥ सात्वतवृष्णियदुकुळनाथ ॥ त्या तूतें मी शरणागत ॥ अभिवंदित साष्टांग ॥ ४१ ॥ रायासि ह्मणे व्यासनंदन॥साद्यन्तभावीं लीलाचरण॥सूचनारूप केलें स्तवन ॥ तें हें कथन तुज केलें ॥ ४२ ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ एवंयदुपतिंकृष्णंभागवतप्रवरोमुनिः ॥प्रणिपत्याभ्यनुज्ञातोययौतद्दर्शनोत्सवः॥२५॥

॥ भगवद्भक्तां जो अग्रणी ॥ भागवतप्रवर नारदमुनि ॥ तेणें ऐशा प्रकारें स्तवूनी ॥ नमिता झाला कृष्णाते ॥ ४३ ॥ यदुकुळचक्रचूडामणि ॥ तो वंदूनि चक्रपाणि ॥ दर्शनोत्साह मानूनि मुनि॥आज्ञा घेऊनि निघाला ॥ ४४ ॥ कृष्णमूर्ति ह्रदयीं ध्यात ॥ कृष्णकीर्ति वदनीं गात ॥ कृष्णप्रेमें आनंदभरित ॥ गेला विधिसुत स्वच्छंदें ॥ ४५ ॥ ऐसा नारदें केला स्तव ॥ तो श्रोतयां कथिला सर्व ॥ पुढें निरूपी दयार्णव ॥ व्योमदानववधलीला ॥ ४६ ॥

भगवानपिगोविंदोहत्वाकोशिनमाहवे ॥ पशूनपालयत्पालैःप्रीतैर्व्रजसुखावहः ॥ २६ ॥

---

१ पापनाशक. २ ब्रह्मपुत्र नारद.

॥ टीका ॥ प्रभाते केला केशिवध ॥ वना गेला मुकुंद॥ तेथें भेटला मुनि नारद॥ त्याचा स्तुतिवाद जो कथिला ॥ ४७ षड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ तो गोविंद श्रीभगवान ॥ गोपां हातीं पशुगोपन ॥ प्रीतीकरून जो करवी ॥ ॥ ४८ ॥ व्रजसुखावह ऐसा हरि ॥ तेणें भावी मुनिवैखरी ॥ ऐकोनि स्वीकेली अंतरीं ॥ सूचना अवतारकार्याची ॥ ४९ ॥ वनीं क्रीडतां तदनंतर ॥ वधिला कपटी व्योमासुर ॥ नवां श्लोकीं तो विस्तार ॥ व्यासकुमर वाखाणी ॥ ५० ॥ परी हे कथा मागील खरी ॥ प्रलंबहनन केल्यावरी ॥ व्योमासुरातें कृष्ण मारी ॥ ये अवसरीं निरूपिली ॥ ५१ ॥ वेषधारी केशिदैत्य ॥ त्याची कथितां कपटमात ॥ प्रसंगें कपटी व्योमदैत्य ॥ वधिला तो येथ निरूपिला ॥ ५२ ॥ शंखचूडवधापूर्वीं ॥ व्योमवध वर्णिती कवि ॥ असो हे पाठभेदाची पदवी ॥ प्रस्तुत सर्वीं परिसिजे ॥ ५३ ॥

एकदातेपशून्पालाश्चारयंतोऽद्रिसानुषु ॥ चक्रुर्निलायनक्रीडाश्चोरपालापदेशतः ॥ २७ ॥

॥ टीका ॥ हो कां कोण्हे एके काळीं ॥ गोप पशूंतें सहवनमाळी ॥ चारितां पर्वताचिये मौळीं ॥ क्रीडा सकळीं मांडिली ॥ ५४ ॥ ऐका क्रीडेचा प्रकार ॥ एक जाले मेषाकार ॥ एक अर्भक झाले चोर॥ क्रीडा विचित्र पिहितांक्ष ॥ ५५ ॥

तत्राऽऽसन्कतिचिच्चोराःपालाश्चकतिचिन्नृप ॥ मेषायिताश्चतत्रैकेविजह्रुरकुतोभयाः ॥ २८ ॥

॥ टीका ॥ चोर जाले पांच सात ॥ मेष झाले अर्भक बहुत ॥ मेषरक्षक बल्लवसुत ॥ जाले तेथ

---

१ डोळे ज्यांनीं झांकिले ते.

कितिएक ॥ ५६ ॥ ऐसा रचूनि क्रीडाकल्प ॥ क्रीडते झाले निर्भयरूप ॥ देखोनि व्योम कपटी गोप ॥ जाला विकल्प कल्पूनी ॥ ५७ ॥

मयपुत्रोमहामायोव्योमोगोपालवेषधृक् ॥ मेषायितानपोवाहप्राहश्चोरायितोबहून् ॥ २९ ॥

॥ टीका ॥ कपटी मयासुराचा कुमर ॥ व्योमनामा महाअसुर॥गोपाकृति धरूनि चार ॥ क्रीडापर त्यां माजी ॥ ५८ ॥ मेष स्ववाडां कोंडून ॥ मेषपाळ झांकूनि नयन॥निजती कांबळ्यां पांघरोन ॥ तों चोर येऊन मेष हरिती ॥ ५९ ॥ तंव ते श्वान करिती टाहो ॥ चेइरा[1] मेषपांचा समुदावो॥मेंढरें दशदिशा लागलीं पाहों ॥ करिती हाहूं चहूंकडे ॥६०॥ तेथें मेंढराकृति जीं पोरें ॥ तीं भोभाती[2] मेषस्वरें ॥ धावोनि मेषप धरिती त्वरें ॥ चोर घाबिरे पळताती ॥ ६१ ॥ पुनः पुनः दिवस रजनीं ॥ ऐसेंचि क्रीडती कल्पूनी ॥ व्योमासुर तये स्थानीं ॥ चोर होऊनि पातला ॥ ६२ ॥ लटकीं लावूनि नेत्रपातीं ॥ मेषपाळ निद्रा करिती ॥ दैत्यें घालूनि तमाची[3] बुंथी[4] केले सुषुप्तिवरपडे[5] ॥ ६४ ॥ मग जे चोररूपी गोप ॥ त्यां माजी आपणही तद्रुप ॥ मिळोनि नेले मेषकळप॥ गिरिसमीप गह्वरीं[6] ॥ ६४ ॥

गिरिदर्यांविनिक्षिप्यनीतंनीतंमहासुरः ॥ शिलयापिदधेद्वारंचतुःपंचावशेषिताः ॥ ३० ॥

॥टीका॥ सचोरकळप जो जो नेला ॥ गुहागर्भी तो सांठविला॥शेवटीं शिला लावूनि आला॥अवशिष्टांला न्या-

---

[1] जागृत. [2] ओरडती. [3] आज्ञानाची. [4] सोंग. [5] गाढनिद्रेंत शिरलेले. [6] गुहेंत.

॥ ६५ ॥ चार पांच मेषपाळ ॥ उरले होते जे गोपाळ ॥ तेही घेऊनि चालिला कुटिळ ॥ मनीं घननीळ विवंची ॥ ६६ ॥

॥ तस्यतत्कर्मविज्ञायकृष्णःशरणदःसताम् ॥ गोपान्नयंतंजग्राहवृकंहरिरिवौजसा ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ कृष्णपरमात्मा सर्वज्ञ ॥ जाणोनि दैत्याचें विंदान ॥ भक्तांसि ज्याचें अभयदान ॥ तो भगवान कळवळिला ॥ ६७ ॥ अवशिष्ट गोप नेतां व्योम ॥ देखोनि क्षोभला पुरुषोत्तम ॥ जैसा आयुष्य खुंटतां यम ॥ दावी निजधाम तत्काळ ॥ ६८ ॥ कीं सिंहाचीं पिलीं तान्हीं ॥ लांडगा धरूनि नेतां ग्लानि ॥ सिंह धरी त्या कव घालुनी ॥ जेंवि क्षोभोनि प्रतापें ॥ ६९ ॥ तेंवि कृष्णें व्योमासुर ॥ धरिला प्रतापें सत्वर ॥ पुढें वर्त्तला प्रकार ॥ ऐका साचार चतुर हो ॥ ७० ॥

॥ सनिजंरूपमास्थायगिरींद्रसदृशंबली ॥ इच्छन्विमोक्तुमात्मानंनाशक्नोद्ग्रहणातुरः ॥ ३२ ॥

॥ टीका ॥ कृष्णें दैत्य धरितां निकरें ॥ हरपोनि गेलें कपटवारें ॥ मूळींचें रूप धरिलें खरें ॥ जें गिरींद्रें समसाम्य ॥ ७१ पर्वतप्रायमहाबळी ॥ घेतां कृष्णें सम कवळी ॥ मिठी नकरवेचि मोकळी ॥ दैत्य ते काळीं घाबिरला ॥ ७२ ॥ भगवंताच्या ग्रहणें करून ॥ जाला आतुर विकळप्राण ॥ कोण्याप्रकारें वेधी त्या कृष्ण ॥ तें तूं श्रवण करीं राया ॥ ७३ ॥

तंनिगृह्याच्युतोदोर्भ्यांपातयित्वामहीतले ॥ पश्यतांदिविदेवानांपशुमारममारयत ॥ ३३ ॥

---

१ कृत्य. २ भिठी. ३ झोंबी, युद्ध. ४ शक्तिरहित.

॥ टीका ॥ मग अच्युतें दोहीं बांहीं ॥ दैत्य निग्रहें पाहूनि मही ॥ सोमींच्या[1] बस्तासारिखें[2] पाहीं ॥ प्राण लवलाहीं घेतले ॥ ७४ ॥ विमानीं पाहत असतां देव ॥ आणि भूतळीं स्थिरचर सर्व॥मारूनि श्वासनिरोधें दानव॥ कृष्णें लाघव दाखविलें ॥ ७५ ॥

गुहापेधानंनिर्भिद्यगोपान्निःसार्यकृच्छ्रतः ॥ स्तूयमानःसुरैर्गोपैःप्रविवेशस्वगोकुलम् ॥ ३४॥

॥ टीका ॥ मग गुहामुखीं जे दाटली शिळा ॥ कृष्णें पायें लोटोनि हेळां ॥ संकटापासूनि पशुपमेळा ॥ कृष्णें अवलीळा[3] काढिला॥७६॥कोंडोनि मरतां गुहापोटीं ॥ प्राण पातले होते कंठीं ॥ कृष्णें काढूनि उठाउठीं ॥ अमृतदृष्टी वांचविले ॥ ७७ ॥ दीप विझतां घालूनि तेल ॥ स्थापिला निर्वात लक्षूनि स्थळ ॥ तैसा कृष्णें गोवळमेळ ॥ मर्दूनि खळ वांचविला ॥ ७८ ॥ ऐसीं कृष्णाचीं अमळ यशें ॥ वर्त्तमानें भूतभविष्यें ॥ सुरवर विमानीं गाती तोषें ॥ स्तविती उल्हासें मुनिवर्य ॥ ७९ ॥ सुरवर स्तविती विमानयानीं ॥ कुसुमें वर्षती कृष्णमूर्ध्नि ॥ गोप नाचती कृष्णकीर्त्तनीं ॥ व्रजीं स्वभुवनीं प्रवेशतां ॥ ८० ॥ कृष्णें व्योमासुराचा वध ॥ वनीं करूनि एवंविध ॥ फेडूनि गोपांचा निर्बंध[4] ॥ व्रजीं मुकुंद प्रवेशला ॥ ८१ ॥ सततिसाव्या अध्यायांत ॥ इतुका निरूपिला वृत्तांत ॥ पुढिल्या अध्यायामाजि त्वरित ॥ कृष्णा सात्वत भेटेल ॥ ८२ ॥ अक्रूराचें तें भक्तिप्रेम ॥ परिसावया गुह्य परम ॥ दत्तावधानें[6] कैवल्यकाम ॥ श्रोते सत्तम परिसतु ॥ ८३ ॥ कैवल्यदायक हा वाग्यज्ञ ॥ श्रीमदेकनाथ यजमान ॥ भेदपशूचें करूनि हनन ॥ संस्कृत करूनि अभेदें ॥ ८४ ॥ सच्चिदानंदाचें भरूनि पात्र ॥ पूर्णस्वानंदें

---

१. सोमयज्ञांतील. २ बोकडाप्रमाणें. ३ सज. ४ प्रतिबंध. ५ अक्रूर. ६ दिलें लक्ष्य ज्यांनीं ते.

पढूनि मंत्र ॥ गोविंदाज्ञावषट्कार ॥ तोषवी अध्वर दयार्णव ॥ ८५ ॥ श्रोतयांचे श्रवणकुंडीं ॥ इहीं वाक्यांहूनी उदंडी ॥ अविद्याकांमकर्मांची[1] झाडी ॥ केली ब्रह्मांडीं मखंसिद्धि[2] ॥ ८६ ॥ तें हें श्रीमद्भागवत ॥ दशमस्कंध श्रीकृष्णचरित ॥ जेथें मारिला केशिदैत्य ॥ तो अध्याय समाप्त सततिसावा ॥ ८७ ॥ इतुकी दयार्णवकृत प्रार्थना ॥ भोगंप्रारब्धयोगें[3] जाणा ॥ प्रयत्नें साधिजे भगवद्भजना ॥ हे खूण मना माजि धरिजे ॥ २८८ ॥ ॥ इतिश्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायां दशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादे हरिबरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायां केशिवधनारदस्तवव्योमासुरवधनामसप्तत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ टीका वोव्या २८८ ॥ ॥ एवं संख्या ॥ ३२२ ॥ ॥ अध्याय ॥ ३७ ॥ ॥ ॥

---

[1] अज्ञानें करून केलेल्या काम्य कर्मांची. [2] यज्ञाची तयारी. [3] सुखदुःखादिभोगयुक्त प्रारब्धाच्या योगानें.

* * *

अध्याय ३५

कृष्ण गेला असतां वना ॥ सानुरागा तद्गतमना ॥
करिती तल्ली लागायना ॥ बल्लव ललना विरहिणी ॥ २१॥



श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ ॥ गवर्ण तो गजानन ॥ अकार तो श्रीभगवान् ॥ उकार तो उमारमण ॥ एवमादि मिळूनि गोकार ॥ १ ॥ गकार[1] ह्मणिजे धिषणापति ॥ जे कां रजोगुणाची व्यक्ति ॥ मातृकामात्रीं ज्याची वसती ॥ तो अकार निश्चिती वासुदेव ॥ २ ॥ उकार केवळ उमारमण ॥ हें बीजनिघंटीं प्रशंसन ॥ जाणती मंत्रविद्याभिज्ञ ॥ एवं प्रणवपूर्ण गोकार ॥ ३ ॥ प्रणव आदिबीजा नाम ॥ एकाक्षर नादब्रह्म ॥ जेथूनि स्वरवर्णाचा जन्म ॥ निगमोद्गम तद्योगें ॥ ४ ॥ तेथूनि आगमस्मृतिपुराणें ॥ सूत्रें पद्धति विहिताचरणें ॥ तव नामाच्या प्रथमवर्णें ॥ केलें शाहणें ब्रह्मांड ॥ ५ ॥ तया प्रणवाचा अभिज्ञ ॥ सन्मात्र तूं सच्चित्सुखघन ॥ विदंतीति[3] वेत्ता ह्मणोन ॥ वदे व्याकरण गोविंद ॥ ६ ॥ तव वेत्तृत्वें[4] विण प्रणव ॥ प्रसवे चौऱ्यांशीं लक्ष जीव ॥ जंव नपवती ते तुझा ठाव ॥ तंव ते भवभ्रमग्रस्त ॥ ७ ॥ यालागिं प्रणवप्रसवतिया ॥ प्रणतपाळा प्रणयप्रिया ॥ अगुणा आद्या सद्गुणनिलया ॥ वेदवेत्तया विदग्धा ॥ ८ ॥ प्रणवरूपा[5] प्रणवात्मका ॥ प्रणवरहस्यप्रकाशका ॥ प्रणवाभिज्ञाखिलबोधका ॥ नमो देशिका[6] गोविंदा ॥ ९ ॥ करूनि तव पदप्रणति मात्र ॥ तव कृपेचें झालों पात्र ॥ यालागिं संवित्प्रचुरगात्र ॥ करूनि चरित्र वदविसी ॥ १० ॥ इंधन अधिष्ठितां अनळें ॥ जऱ्हीं तें इंधनाकृतिही कळे ॥ परंतु नधरे तद्विटाळें ॥ निवडे केवळ

---

१ ब्रह्मा. २ प्रत्येक वर्णांत. ३ जाणतो. ४ हे ज्ञात्या. ५ हे ब्रह्मरूपा. ६ हे गुरो.

अनळत्वें ॥ ११ ॥ तैंवि भूतां गुणांचा समुदाव ॥ तेथ प्रकटोनि स्वसद्भाव ॥ देहभावाचें पुसूनि नांव ॥ केला ठाव स्वबोधा ॥ १२ ॥ दशमस्कंधाचें व्याख्यान ॥ भाषाबद्ध निरूपण ॥ प्रेमळ भक्त जे अव्युत्पन्न ॥ त्यांतें श्रवण करावया ॥ १३ ॥ निरूपीं ह्मणोनि स्पर्शिलें करीं ॥ ते श्रीआज्ञा वंदूनि शिरीं ॥ दयार्णवाची वैखरी ॥ दशमावरी प्रवर्त्तली ॥ १४ ॥ तेथ रासक्रीडान्त पहिले ॥ चौतीस अध्याय वाखाणिले॥ स्वेच्छा गोपींही भोगिलें॥रतिसौभाग्य कृष्णेंशीं ॥ १५ ॥ परंतु गोपींची जीवदशा ॥ साक्षी होऊनि तत्सुखावेशा ॥ वरपडलिया पावती भ्रंशा ॥ यास्तव परेशा कींव आली ॥ १६ ॥ मग उदया आणूनि वियोगरवि ॥ सत्रप ईषणात्रय जागवी ॥ सप्रेम वेधें विरह लावी पुढती गोवी विधिविहितीं ॥ १७॥ परी तो हरि विरहाचा आंगीं ॥ साक्षित्व जिवदशा जों भंगी ॥ तोंवरी वर्त्तती भवविरागी ॥ सानुरागी श्रीकृष्णीं ॥ १८ ॥ तोंचि सानुरागलक्षण ॥ कृष्णभुक्तरात्रि स्मरोन ॥ वियोगदुःखाचें दिनमान ॥ क्रमी वधूगण गुणकथनें ॥ १९ ॥ स्वागतादि च्छंदें द्वादशयुगळीं ॥ मिथा गोपींची मंडळी॥ संवादली तें नृपाजवळी ॥ कथनशाली शुक सांगे ॥ २० ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ गोप्यःकृष्णेवनंयातेतमनुद्रुतचेतसः ॥ कृष्णलीलाःप्रगायंत्योनिन्युर्दुःखेनवासरान्॥ १॥

॥ टीका ॥ कृष्ण गेला असतां वना ॥ सानुरागा तद्गतमना ॥करिती तल्लीलागायना ॥ बल्लवललना विरहिणी ॥ २१ ॥ विरहदुःखाचे वासर ॥ युगाहूनही भासती थोर ॥ करिती तद्दुःखा परिहार ॥ लीला सादर वर्णूनी ॥ २२ ॥ ॥ १ ॥

---

१ धर्मार्थकामांची आस्था.

॥ गोप्यऊचुः ॥ वामबाहुकृतवामकपोलोवल्गितभ्रुरधरार्पितवेणुम् ॥
कोमलांगुलिभिराश्रितमार्गंगोप्यइंरयातियत्रमुकुंदः ॥ २ ॥

॥ टीका ॥ गोपी गोपींतें ह्मणे वो सखिये ॥ श्रीकृष्ण जेव्हां वेणु वाहे॥ तेव्हां अद्भुत कौतुक काय ॥ वर्तलें होय तें ऐका ॥ २३ ॥ वेणु वाजवी जनार्दन ॥ तें कृष्णाचें कमनीय[1] ध्यान ॥ ठाणमाण गुणलावण्य ॥ मनें कवळून वर्णिती ॥ २४ ॥ शक्रोपलमय[2]सुनीलकांति ॥ वदनीं राकावदनद्युति ॥ नयन नीरजपत्राकृति ॥ कोमलमूर्ति कंदर्पी ॥ २५ ॥ वामबाहुमूळीं संलग्न ॥ वामकपोल करूनि पूर्ण ॥ कुंचित अधरीं वेणुधमन ॥ भ्रूचालन सविलास ॥ २६ ॥ दक्षिणभागीं उभय करीं॥कोमलांगुलीं उभय रंध्रीं ॥ गायनमार्गें सप्तस्वरीं॥ जेव्हां मुरारि वाजवी ॥ २७ ॥

व्योमयानवनिताःसहसिद्धैर्विस्मितास्तदुपधार्यसलज्जाः ॥
काममार्गणसमर्पितचित्ताःकश्मलंययुरपस्मृतनीव्यः ॥ ३ ॥

॥ टीका ॥ तेव्हां निर्जर सिद्ध विमानयानीं ॥ कृष्णलीला पाहतां नयनीं ॥ सिद्धवनिता अंकासनीं ॥ होत्या कवळूनि स्वपतींसी ॥ २८ ॥ स्वपतींचिया अंकासनीं॥वेणुवादन ऐकोनि श्रवणीं ॥ विस्मित होतांचि अंतःकरणीं ॥ काममार्गणीं[3] भेदल्या ॥ ९९ ॥ स्मरशरघातें व्याकुळ मनें॥स्मरणधर्मा मुकल्या तेणें॥ मोह पावल्या तेंचि चिह्नें ॥ कीं नेणती वसनें गळालीं ॥ ३० ॥ परमसत्रपा सिद्धांगना ॥ परि परिसोनि वेणुक्वणना ॥ काममार्गणें मोहितमना ॥ विगलितवसना नस्मरती ॥ ३१ ॥ स्वकांतांकीं निर्जरकांता ॥ परिसोनि कृष्णवेणुक्वणि-

---

[1] सुंदर [2] इंद्रनीलमणीप्रमाणें नीलवर्ण कांति. [3] मदनशरांनीं.

तां ॥ स्मरमार्गणें मोहितचित्ता ॥ मा आह्मी तद्भक्ता विरहिणी ॥ ३२ ॥ कृष्णविलासें ॥ क्रमिल्या रजनी ॥ त्यांचा विसर नपडे मनीं ॥ आतां तद्विरहें विरहिणी ॥ केंवि साजणी दिन कंठूं॥ ३३ ॥ हें ऐकोनि अपरा युवति ॥ कृष्णवेणूची अद्भुत शक्ति ॥ पश्वादि मृगें मोहितें होती ॥ ह्मणती सखियांतें तें ऐका ॥ ३४ ॥

हंतचित्रमबलाःश्रृणुतेदंहारहासउरसिस्थिरविद्युत् ॥ नंदसूनुरयमार्त्तजनानांनर्मदोयर्हिकूजितवेणुः ॥ ४ ॥

॥ टीका ॥ अवो हा नंदाचा नंदन ॥ जेव्हां करी वेणुवादन ॥ ज्याचेनि दुःखाविष्ट जन ॥ कौतुकापन्न होतसे ॥ ३५ ॥ वेणु योजूनि अधरपुटीं ॥ वामांग वक्षोर्ध हनुवटी ॥ टेंकूनि तिर्यक् तरळदृष्टि ॥ चंचळ भ्रुकुटी सविभ्रमा ॥ ३६ ॥ तंव ते वदनेंदूची कांति ॥ आणि हृदयींची हारद्युति ॥ ऐक्यभावें पुंजाळती ॥ हास्यदीप्तिसमसाम्यें ॥ ३७ ॥ मुक्ताफळादि रत्नहार ॥ कीं सुपुष्पीं कुंदमंदार ॥ लावण्यलक्ष्मी चपळाकार ॥ मुखभामित्र स्थिर उरसीं ॥ ३८ ॥ श्रीधरप्रणीत अर्थविशेष ॥हारा सारिखें शोभे हास्य॥कीं हाराधरी स्मितप्रकाश॥ तो हारहासं श्रीकृष्ण ॥ ३९ ॥ ऐसा नंदसूनु गोविंद ॥ आर्त्तजना आनंदकंद ॥ वेणुवादनें विनोदप्रद ॥ होय विशद जे काळीं ॥ ४० ॥ ह्मणाल दुःखार्त्त ते कोण ॥ जे भवदुःखार्णवीं निमग्न ॥ क्षुधातृषादि जरामरण ॥ संचितरुग्ण सर्वदा ॥ ४१ ॥ ऐसियांतें हीं वेणुक्वणनें ॥ दुःख विसरवी विनोददानें ॥ आनंदप्रचुर त्यांचीं मनें ॥ प्रसन्ननयनें ते पाहती ॥ ४२ ॥ तिये काळीं पश्वादि मृगें ॥ चित्सुखावाप्ति लाहती आंगें ॥त्यांचे देहीं उमटती लिंगें ॥ तियेंही प्रसंगें अवधारा ॥ ४३ ॥

---

१ हारा प्रमाणें शुभ्रवर्ण हास्य ज्याचें तो. २ पूर्वसंचित हाच रोग त्यानें ग्रस्त.

वृंदशोव्रजवृषामृगगावोवेणुवाद्यहृतचेतसआरात्॥दंतदष्टकवलाधृतकर्णानिद्रितालिखितचित्रामिवाऽऽसन् ५

॥ टीका ॥ केवळ ज्ञानविहीन पशु ॥ ज्यांचा नंदव्रजीं निवासु ॥ धेनु वृषभ मृगें अशेष ॥ ते पावती तोष वेणुरवें ॥ ४४ ॥ जोडतां विशेष निम्नभाग ॥ जळही सांडी पुढील वोघ ॥ कीं मिष्टान्नलाभें मानूनि उबग ॥ करिती त्याग कदन्ना ॥ ४५ ॥ तस्करा जोडतां यथेष्ट कनक ॥ घेतल्या धातु टाकी आणिक ॥ तैंवि चित्सुखलाभें मृगादिक ॥ होती विमुख निजविषया ॥ ४६ ॥ वृषभ धेनु चित्रापरी ॥ विविधमृगयाति कांतारीं ॥ ठायीं ठायीं पृथगाकारीं ॥ समाधिशेजारीं सुखसुप्त ॥४७॥ गोवृषमृगादिकांचे वृंद ॥ जेथ जे जे होते विशद ॥ श्रवणीं पडतां वेणुनाद ॥ जाले स्तब्ध ते तैसे ॥ ४८ ॥ ह्मणाल स्तब्धता कोण्या गुणें ॥ तरी वेणुवादनें त्यांचीं मनें ॥ हरूनि केलीं प्रत्यक्प्रवणें ॥ तें स्मितलक्षणें अवधारा ॥ ४९ ॥ अनाहत वेणूच्या वादनें ॥ वेधितां उपवनें दहनें जीवनें ॥ तिष्ठती चेष्टाविहीनें ॥ सहितत्रिभुवनें उपरमिजे ॥ ५० वेणुवाद्यें स्मृतीचें हरण ॥ मृगपशूंचे पृथक गण ॥ लिखितचित्रासमान ॥ वेणुक्वणनें पैं करितां ॥ ५१ ॥ कृष्णापासूनि होते दूर॥तिर्यक तमोयोनिप्रचुर ॥ वर्जितवर्णाश्रमाचार ॥ ते झाले स्थिर ध्वनिवेधें ॥ ५२ ॥ तेणें थकली विषयवृत्ति ॥ कवळ चर्वितां उभयदंतीं ॥ हालों विसरल्या दंतपंक्ति ॥ नेत्रपातीं उन्माळित ॥ ५३ ॥ श्रृंगें स्पार्शिलीं पुच्छाग्रीं ॥ उत्तंभित कर्णहारी ॥ योनिपरत्वें तनुसामग्री ॥ तत्तत्प्रकारीं ताटस्थ्य ॥ ५४ ॥ भुलल्या अज्ञान तिर्यग्योनि ॥ मां आह्मी तों तद्रक्ता विरहिणी ॥ कृष्णें अनुभविल्या त्या रजनी ॥ कैंवि साजणी नस्मरों ॥५५॥हें ऐकोनि अपरा गोपी ॥ ह्मणती

---

१ आत्मस्वरूपाभिमुख. २ अखंड.

श्रीकृष्णाचे रूपीं ॥ सचेतांची तों गोष्टी सोपी ॥ परी सरिताआपीं स्मरमूर्च्छा ॥५६ ॥ कैसें कृष्णाचें तें रूप ॥ देखोनि सरितांतें कंदर्प॥व्यापिता झाला तो संक्षेप ॥ नृपातें अल्प मुनि जल्पे ॥ ५७ ॥

बर्हिणस्तबकधातुपलाशैर्बद्धमल्लपरिबर्हविडंबः ॥ कर्हिचित्सबलआलिसगोपैर्गाःसमाह्वयतियत्रमुकुंदः॥ ६ ॥

॥ टीका ॥ आलि ऐसें संबोधन ॥ अवो साजणी हें आश्चर्य गहन ॥ जेव्हां मल्लविडंबन ॥ करी श्रीकृष्ण अनुकरूनी ॥ ५८ ॥ बर्हिबर्हांचा किरीट ॥ करकौशल्यें रचिला नीट ॥ शक्रकार्मुकद्युति निघोंट ॥ प्रभा उद्भट श्रीमुकुटीं ॥ ५९ ॥ श्वेत पीत नील कर्बुर ॥ गैरिकादि धातु विचित्र ॥ विविधाकृति रंजित गात्र ॥ मल्लपरिकरपरिबद्ध ॥ ६० ॥ प्रफुल्लार कल्हारपंक्ति ॥ विविधोत्पलांचिया जाति ॥ कोमलपल्लवमंडित व्यक्ति ॥ मल्लाकृति नटनाढ्यें ॥ ६१ ॥ सहित गोप संकर्षण ॥ सुधासदृश वेणुक्वणन ॥ करूनि पाचारी धेनुगण ॥ जेव्हां श्रीकृष्ण सखिया हो ॥ ६२ ॥

तर्हिभग्नगतयःसरितोवैतत्पदांबुजरजोऽनिलनीतम्॥स्पृहयतीर्वयमिवाबहुपुण्याःप्रेमवेपितभुजाःस्तिमितापः ७

॥ टीका ॥ तेव्हां तदुत्थमधुरध्वनि ॥ मिश्रितपवना आलिंगुनी ॥ गतिराहित्य सरिज्जीवनीं ॥ पदरज मनीं वांछिती ॥ ६३ ॥ परंतु सरिता आमुचेचि परि ॥ अल्प सुकृतसंग्रह पदरीं ॥ तेणें पदरजःप्रेम अंतरीं ॥ परी धणीवरी नलाहती ॥ ६४ ॥ पदरजःप्रेमवेधेंचि स्तिमिता ॥ तरंगभुजा प्रस्फुरिता॥केवळ अलिंगनार्थ उदिता ॥ तद्रसप्राप्ता समदुःखा ॥ ६५ ॥ समदुःखिता कवणे परी ॥ स्तिमितबाष्पा व्रजनारी ॥ भुजा स्फुरती

---

१ चित्रवर्ण २ मल्लांप्रमाणें कंबरबस्ताबांधिला ज्यानें तो. ३ नद्यांचें उदक.

आणि अंतरीं ॥ वृत्तितादात्म्यें ताटस्थ्य ॥ ६६ ॥ वनविहारयोगें स्पर्शा ॥ क्वचिल्लब्धसुखोत्कर्षा ॥ स्मरोनि सुरतीं आह्मांचि सरिशा ॥ मां आह्मी त्या निशा कें विसरों ॥ ६७ ॥ तंव अपरा ह्मणती सरिता चरा ॥ कृष्णवेणुक्वणनावसरा ॥ वेधी द्रुमवल्लीस्थावरां ॥ त्या प्रकारा परिसा गे ॥ ६८ ॥

अनुचरैःसमनुवर्णितवीर्यआदिपूरुषइवाचलभूतिः ॥
वनचरोगिरितटेषुचरंतीर्वेणुनाऽऽह्वयतिगाःसयदाहि ॥८॥

॥ टीका ॥ आदिपुरुष जो परमेश्वर ॥ तोचि हा श्रीकृष्ण साचार ॥ नेणोनि मुग्धा उपमापर ॥ श्रीअनुकार कल्पिती ॥ ६९ ॥ सुरवर परमेश्वरानुयायी ॥ बल्लवरूपी तेथ ये ठायीं ॥ कृष्णप्रताप वर्णिती पाहीं ॥ पन्नगशायी समसाम्य ॥ ७० ॥ आदिपुरुषीं अचल भूति ॥ येर चंचल सर्वत्र वसति ॥ कृष्णीं निश्चल देखोनि युवति ॥ श्री उपमिती ईशेंशीं ॥ ७१॥ निश्चळ लक्ष्मी ह्मणाल कैसी॥वनवासीही श्रीकृष्णासी॥सुरवर अनुचर गोपवेशीं ॥ ऐश्वर्यासी वर्णिती ॥ ७२ ॥ आदिपुरुषाच्या श्वासानिळें ॥ निगमगानें त्रिजग चळे॥ तद्वद्वेणुवादनलीलें ॥ गोगोपाळें मोहरती ॥ ७३ ॥ रसाळवेणुगायनध्वनी ॥ माजि धेनु निजाभिधानीं ॥ संबोधितां चक्रपाणि ॥ नवल तेक्षणीं होतसे ॥ ७४ ॥

वनलतास्तरवआत्मनिविष्णुंव्यंजयंत्यइवपुष्यफलाढ्याः॥
प्रणतभारविटपामधुधाराःप्रेमहृष्टतनवःससृजुःस्म ॥ ९ ॥

---

१ चनलशील. २ ऐश्वर्य. ३ श्वासरूपवायूनें.

॥ टीका ॥ निगमवाक्यार्थींच्या श्रवणीं ॥ निश्चल तरुसम मुनिजनध्यानीं ॥ सुकृतसाफल्यें संकल्प सुमनीं॥ अमोघ लगडोनि लवले जे ॥७५॥ तैशाच पतिव्रता ज्या साध्वी ॥ कांतसेवनव्रतलाघवी ॥ तरुवरवेष्टित वल्ली जेंवि ॥ पुष्पीं पल्लवीं सफळित ॥ ७६ ॥ सफळसुकृतभारें नम्रा ॥ त्या ज्या शाखा प्रणतभारा॥निजात्मकारणकृतविचारा ॥ बाह्योपचारा सूचिती ॥ ७७ ॥ आत्मव्यापक जो श्रीविष्णु ॥ सर्व भूतीं जो भ्राजिष्णु[1]॥ वास्तव अभेदप्रेमा गहन ॥ प्रणत होऊन जाणविती ॥ ७८ ॥ सिंधु बिंदुत्वें निवडुनी ॥गगनीं चढोनि पडला धरणी॥ परि प्रेमा अगाध निजात्ममिळणीं ॥ सम्मुख धांवोनि जेंवि सुचवी ॥ ७९ ॥ किंवा पृथ्वीचे परमाणु॥वायुयोगें चढल्या गगन ॥ तथापि अभेदप्रेमा गहन ॥ कथिती भजोन मिळणीतें ॥ ८० ॥ त्याचि मुनिवरपतिव्रता ॥ येथ जालिया पादपलता[2] ॥ नेणोनि मुग्धा गोपवनिता ॥ सादृश्यता उपमिती ॥ ८१ ॥ विष्णु व्यापक आपुले हृदयीं ॥ तो हा गोविंद शेषशायी ॥ अभेदसप्रेमभावें मही ॥ वर्षती पाहीं मधुधारा ॥ ८२ ॥ चंद्रदर्शनें चंद्रकांति ॥ वास्तव वेधें पाझर द्रवती ॥ वेणुवादनें वृक्षयाति ॥ तैशा स्रवती सखिया हो ॥ ८३ ॥ त्या कृष्णाच्या अधरपानें ॥ रंगलीं असतां आमुचीं मनें ॥ वियोगदुःखाचें चांदणें ॥ कवण्यागुणें विसरती ॥ ८४ ॥ तंव आणिका गोपी ह्मणती ॥ कृष्णवेणूची वेधकशक्ति ॥ सरसीं[3] सारसहंसयाति ॥ उपरम पावती परिसोनी ८५

दर्शनीयतिलकोवनमालादिव्यगंधतुलसीमधुमत्तैः॥अलिकुलैरलघुगीतमभीष्टमाद्रियन्यर्हिंसंधितवेणुः १० ॥

टीका ॥ लावण्यश्रीचें सौभाग्य मुख्य ॥ तो ललाटीं केशरतिलक ॥ वरी अक्षता जेंवि अर्क॥ बिंबे माणिक्य-

---

[1] प्रकाशमान. [2] वृक्षलता. [3] सरोवरांत.

प्रभेंत ॥ ८६ ॥ तेंवि लावण्य मदनाहुनी ॥ तेंवि मिरविती त्रिभुवनीं ॥ त्या दर्शनीं यांचाही अग्रणी ॥ तिलकस्थानीं श्रीकृष्ण ॥ ८७ ॥ ऐसा लावण्यचूडामणि ॥ विशेष विलसे दिव्याभरणीं ॥ तुलसीगंधार्थ भ्रमरगणीं वनमाळेसीं वेष्टिला ॥ ८८ ॥ येथ श्रोते शंका करिती ॥ सामान्य सौरभ्य तुलसीप्रति ॥ सांप्रत भ्रमर नवेधती ॥ ग्रंथीं ख्याति किमर्थ ॥ ८९ ॥ तरी ये शंकेची निवृत्ति ॥ श्रीकृष्ण अवतरला जैं क्षिती ॥ तैं सुरस्त्रियादि भूतीं ॥ ऐश्वर्यें शक्ति प्रकाशिल्या ॥ ९० ॥ निर्जर जिंकिले यातुधानीं[1] ॥ त्या राक्षसां समरांगणीं ॥ कपि मर्दिती ऐसी करणी ॥ ऐश्वर्यें करूनि प्रभूच्या ॥ ९१ ॥ पूर्वीं अथवा इये काळीं ॥ साधारण तो गोळांगुळीं ॥ पारिजात तुळसी तेंवि परिमळीं ॥ वनजें[3] आगळी ऐश्वर्यें ॥ ९२ ॥ ह्मणोनि वनमाळामिश्रतुळसी ॥ सेवूनि तद्गत दिव्य गंधासी ॥ मातले मधुकर हरिगुणांसी ॥ उच्चस्वरेंसीं आळविती ॥ ९३ ॥ श्रीकृष्णासी तोषकर ॥ अनुलक्षूनि मुरलीस्वर ॥ गाती आनंदें मधुकर ॥ वेणु श्रीधर जैं वाहे ॥ ९४ ॥

सरसिसारसहंसविहंगाश्चारुगीतहृतचेतसएत्य ॥ हरिमुपासततेयतचित्ताहंतमीलितदृशोधृतमौनाः ॥ ११ ॥

॥ टीका ॥ तें ऐकोनि वेणुगान ॥ सारसहंसादि पक्षिगण ॥ चारुगायनें अंःतकरण ॥ तन्मय होऊन उपरमती ॥ ९५ ॥ विष्णुसान्निध्यें जे सत्वस्थिती ॥ पासूनि दूरतमा याति ॥ अंडजयोनीमाजि वसती ॥ तेउपरमती तेथूनी ॥ ९६ ॥ मुरलीरवें हृतमानस ॥ सांडूनि संसारसरोवरवास ॥ होऊनि विरक्त परमहंस ॥ कृष्णसहवास आश्रयिती ॥ ९७ ऐसे हरिमुरलीच्या स्वरें ॥ पक्षी सांडिती सरोवरें ॥ कृष्ण भजती अत्यादरें ॥ निकट निर्धारें

---

१ राक्षसांनीं. २ वांनरांनीं. ३ वनांत उत्पन्न झालेले.

प्रवेशती ॥ ९८ ॥ विषादें ह्मणती विहंग धन्य ॥ तत्सान्निध्यें सुखसंपन्न ॥ आमुचें दुर्भाग्य परम गहन ॥ कीं
वियोगें करून जाचतसों ॥ ९९ ॥ हरिसुरताचा नपडे विसर ॥ विरह तावी अभ्यंतर ॥ युगसम गमतसे वासर
नसरे सत्वर हा सखिये ॥ १०० ॥ अपराध ह्मणती मुरलीस्वन ॥ परिसोनि वेधे पक्षिगण ॥ भ्रमर करिती
अनुगायन ॥ नवल कोण पैं याचें ॥ १ ॥ याहूनि अद्भुत नवलपरी ॥ कृष्ण मुरलीक्वणनें करी ॥ ते हे परिसोनि वो
सुंदरी ॥ विश्वांतरीं सुखदा जे ॥ २ ॥

सहबलःस्त्रगवतंसविलासःसानुषुक्षितिभृतोव्रजदेव्यः ॥ हर्षयन्यर्हिवेणुरवेणजातहर्षउपरंभातिविश्वम् ॥ १२॥

॥ टीका ॥ व्रजदेवी या संबोधनें ॥ गोपिकांतें ऐका ह्मणे ॥ मुकुटकुंडलें दिव्याभरणें ॥ सालंकरणें बलकृष्णें ॥
॥ ३ ॥ मुक्ताफळांचे हार कंठीं ॥ दिव्य मणींच्या दीप्ति मुकुटीं ॥ श्रवणीं अवतंसाची दाटी ॥ नटांगयष्टि सविलास
॥ ४ ॥ ऐसा ललितलावण्यवेश ॥ अधिष्ठूनि गिरितटदेश ॥ त्रिजगा ओपितसे संतोष ॥ परमोल्लास पावोनी
॥ ५ ॥ ऐशिया आनंदाचेभरीं ॥ जेव्हां वेणु अधरीं धरी ॥ वेणुरवें त्या आनंदलहरी ॥ विश्वांतरीं पूरितसे ॥ ६ ॥
जैं त्या वेणुस्वनें गगन ॥ पूर्ण परमानंदें करून ॥ ते काळींचें अद्भुतचिह्न ॥ ऐका संपूर्ण सखिया हो ॥ ७ ॥

महदतिक्रमणशंकितचेतामंदमंदमनुगर्जतिमेघः ॥ सुहृदमभ्यवर्षत्सुमनोभिश्छाययाचविदधत्प्रतपत्रम् ॥ १३ ॥

॥ टीका ॥ महान् अखिलानंदप्रद ॥ जाणोनि साशंक अंबुद ॥ नातिक्रमवेच गोविंद ॥ समर्याद सेवेसी ॥ ८

---

१ पक्षी. २ बलराम व कृष्ण यांनीं. ३ तुरा. ४ मेघ.

कृष्णचरणांचिये आवडी ॥ मेघ मर्यादा वाहे गाढी ॥ कृष्णापुढें नकरी वाढी ॥ नगडगडी उच्चस्वरें॥९॥ कृष्णमुरलीचिया
नादा ॥ अनुलक्षूनि करी शब्दा ॥ मुरजादिका वाद्यभेदा ॥ गायनीं ध्रुवपदा पडिपाडें ॥ १० ॥
आपुला आत्मसखा श्रीहरि ॥ सबाह्य आत्मत्वें समसरी ॥ लक्षूनि सुमनवृष्टि करी ॥ सुधातुषारीं सुखकंद ॥
॥११॥सबाह्य आत्मसाम्यता कैसी ॥ तरी कृष्ण जीवन या त्रिजगासी ॥ मेघही जीवनें आर्ति नासी ॥ विश्रांतीसी
अर्पुनी ॥ १२॥कृष्ण समत्वें सर्वांतरी ॥ मेघही विषमभावा नधरी ॥ समान वर्षे सर्वांवरी ॥ दयादाक्षिण्यें
उभयत्र ॥ १४ श्यामकांति समसमान ॥ विद्युल्लता पीतवसन ॥ स्वभक्तचातकां पोषण ॥ क्षोभें कल्याणप्रद
दोघे ॥ १४ ॥ ऐसा लक्षूनि सुहृद्भाव ॥ करी सुमनांचा वर्षाव ॥ कीं मेघा आडूनि वर्षती देव ॥ त्याचेंचि
नांव पुष्पघन॥ १५ ॥ सुमनासमान अंबुकण ॥ श्रमहरणार्थ अभिवर्षोन ॥ कडतर ताविती भास्करकिरण
करी ह्मणोन आतपंत्र ॥ १६ आतपापाँसूनि करी त्राण ॥ ह्मणोनि आतपत्र हें अभिधान॥मेघ स्वच्छाये करून॥
करी वारण आतपाचें ॥ १७॥ऐसा अफाट जो अंबुद ॥ तोही ऐकोनि वेणुनाद ॥ सेवी आत्मत्वें मुकुंद ॥ आह्मां
दुःखद तद्विरह ॥ १८ ॥ मेघादि अनावर कृष्णानुरक्त ॥ तेथ वधूगण तत्संगभुक्त ॥ वियोगदुःखें अतिसंतप्त
दिन समस्त आहळतसों ॥ १९ ॥तंव त्या व्रजांगना प्रौढा ॥ जाऊनि वदती यशोदे पुढां ॥ वेणुनादें लाविलें
वेडा ॥ ब्रह्मादिमूढां सारिखें ॥ २० ॥ जारक्रीडा यशोदेपासीं॥आह्मीं प्रकट बोलिजे कैसी ॥ हें नाठवेचि गोपिकांशीं॥
मानसें पिशीं हरिविरहें ॥ २१ ॥ जेंवि कनकबीजभँक्षण ॥ करितां विसरवी देहभान ॥ गुह्यार्थही करी
जल्पन ॥ तेंवि वधूगण हरिविरहें ॥ २२॥

---

१ मृदंग इ०. २ छत्र . ३ उनापासून. ४ धोतऱ्याचें बीं खाणें.

विविधगोपचरणेषुविदग्धोवेणुवाद्यउरुधानिजशिक्षाः ॥तवसुतःसतियदाऽधरबिंबदत्तवेणुरनयत्स्वरजातीः १४

॥ टीका॥ह्मणती यशोदे सुंदरी॥गोवळक्रीडा नानापरी॥स्वकौशल्यें प्रकट करी॥तो हा मुरारि तव तनय२३॥
विविधा परींचें गोवळाचरण ॥ तद्विषयीं हा परम निपुण ॥क्रीडाकौतुकें मनांतून ॥ प्रकटी नूतन अलौकिकें २४॥
तैसीच वेणुवादनविषयीं॥त्याची चतुरता कथिजे कायी॥कोण्हापाशीं शिकला नाहीं॥आपुले हृदयींहुनी प्रकटी२५॥
घेऊनि अचेत वेणुकांड ॥ करी नादमय ब्रह्मांड॥स्वरजातीचे भेद उदंड॥ सवनविभागें विस्तारी॥२६॥मन्द्रमध्यमतारभेद ॥ प्रथममध्यमोत्तम विशद ॥ सवनविभाग ऐसे त्रिविध ॥ मूर्च्छना विविध तद्गर्भीं॥ २७॥षड्ज ऋषभ
आणि गांधार ॥ मध्यम पंचम धैवत स्वर ॥ आलापी उच्चउच्चतर ॥ निषादादिक सातही ॥ २८ ॥ स्वरजातिसवनविभाग ॥ भेदें उत्पन करी राग ॥ तेथ त्रिजग सानुराग ॥ विषयीं विराग पावोनी ॥ २९ ॥ तुझा तनय
हा बिंबाधरीं ॥ जेव्हां ठकार वेणु धरी ॥ आरोहअवरोहजातिस्वरीं ॥ ब्रह्मांड करी नादमय ॥ ३० ॥

सवनशस्तदुपधार्यसुरेशाःशक्रशर्वपरमेष्ठिपुरोगाः ॥
कवयआनतकंधरचित्ताःकश्मलंययुरनिश्चिततत्वाः ॥ १५ ॥

॥ टीका ॥ कीचककांडाचें[1] मात्र मिष ॥ नादब्रह्मामृत जें सुरस ॥ श्रवणीं पडतां मुनिवर त्रिदश ॥ विधि हर
सुरेश वेधती ॥ ३१ ॥ बाह्यविषयांचिया प्रवृत्ति ॥ सांडोनि एकाग्र होती वृत्ति ॥ मनोमस्तकें नम्र होती॥ आत्मस्थिति सुखलाभें ॥ ३२ ॥ परम कोविद सनकादिक[2] ॥ तेही होती श्रवणोन्मुख ॥ तद्रसपानें सच्चित्सुख- ॥ लोभें

---

[1] वेळूच्या कांड्याचें. [2] सनत्कुमार, सनक, सनंदन, सनातन हे ब्रह्मदेवाचे पुत्र, हे जनोलोकीं राहतात.

विमुख तनुधर्मीं ॥ ३३ ॥ आह्मी कोण कोणे ठायीं ॥ कोण अवस्था कोणे समयीं ॥ ऐसी स्मृतीच नधरे देहीं ॥ मोहप्रवाहीं मज्जती ॥ ३४ ॥ सच्चित्सुखात्मकप्रत्यय ॥ तेथ मोह तो कैसा काय ॥ तरी येथींचा अभिप्राय ॥ निःसंशय अवधारा ॥ १३५ ॥ भूतभविष्यवर्तमान ॥ कालत्रयात्मक सर्वज्ञ ॥ विधिहरेंद्रमुनिवर पूर्ण ॥ तद्विहीन ते जाले ॥ १३६ ॥ वेणुश्रवणें थकल्या वृत्ति ॥ पदाभिमानाची विस्मृति ॥ वेणुध्वनीची अगाध शक्ति ॥ विंवशस्थिति सुखलाभ ॥ १३७ ॥ कृष्णमुरली मोही तत्वतां ॥ विधिहरेंद्रमनि समस्तां ॥ आह्मी तत्पदप्रेमासक्ता ॥ केवीं मोहिता नहों पां ॥ ३८ ॥

निजपदाब्जदलैर्ध्वजवज्रनीरजांकुशविचित्रललामैः ॥ व्रजभुवःशमयन्खुरतोदंवर्ष्मधुर्यगतिरीडितवेणुः १६ ॥

॥ टीका ॥ तया मोहासि कारण ॥ यशोदे तुझा हा नंदन ॥ ऐकें तयाचें लक्षण ॥ मोहकचिह्न वर्णिती ॥ ३९ ॥ श्रीपदकमलदलामल ॥ जेथ सुचिह्नें रत्नमेळ ॥ ध्वजवज्रांकुशाब्ज सकळ ॥ गंगादि सोज्वळ ऊर्ध्वरेखा ॥ ४० ॥ ऐसिया पदीं फिरतां विपिन ॥ करी पृथ्वीचें वेदनाशमन ॥ खुरक्षतें जें बहुकालीन ॥ तें संपूर्ण विसरवी ॥ ४१ ॥ खुरक्षताच्या विषम तिडका ॥ खुरतोद त्यां ह्मणिजे देखा ॥ स्वपदस्पर्शें व्रजजनसखा ॥ निरसी फिरतां भूपृष्ठीं ॥ ४२ ॥ अश्वक्रान्ता रथक्रांता ॥ गजपदातिनृपक्रान्ता ॥ एवं बोलिजे विष्णुक्रान्ता[3] ॥ भूपति तत्वता हरिअंश ॥ ४३ ॥ तया नृपातें करितां समरां ॥ कठोर झगटतां गजरथखुरां ॥ व्यथा नमनी वसुंधरा ॥ जेंवी सुरतीं सुंदरा नखक्षति ॥ ४४ ॥ त्रिजग मोजितां त्रिविक्रमें ॥ कीं हिरण्याक्ष वधितां पराक्रमें ॥ तिखट वराहखुरसंक्रमें ॥ भू-

---

१ पराधीनता. २ खुरांनीं होणारीं क्षतें. ३ राजानें व्यापलेली.

सप्रेमें आह्लादे ॥ ४५ ॥ हरि चारितां वनीं गोधनां ॥ गोखुरीं भू नपवे वेदना ॥ परमाह्लादें प्रफुल्लमना॥ समाधाना पावतसे ॥ ४६ ॥ कित्येक ह्मणती धेनुखुर ॥ पृथ्वीलागीं वेदनाकर ॥ हें व्याख्यान अविवेकपर ॥ नातिचतुर निरूपिती ॥ ४७ ॥ तरी ते खुरवेदना कवण ॥ परिसा आतां सावधान ॥ ब्रह्म्यापाशीं करी रुदन ॥ पृथिवी जाऊन ज्या दुःखें ॥ ४८ ॥ अविधि दस्यु तस्कर जार ॥ अधर्म करी उत्पथाचार ॥ करितां अन्यायें संचार ॥ते वज्रप्रहार भू मानी ॥ ४९ ॥ विश्वासघातिया दुर्जना ॥ परस्त्रीपरद्रव्यापहरणा ॥ निरपराधसाधुच्छलना ॥ करिती विचरणा जें दुष्ट ॥ १५० ॥ वेतन भक्षूनि जन्मवरी ॥ स्वामी सांडूनि पळती समरीं ॥ सयान[1] त्यांच्या तिखटां खुरीं ॥ दुःखी धरित्री बहुसाल ॥ १५१ ॥ सांडूनियां स्वभर्तारां ॥ जाया जाऊनि भजती जारां ॥ लागतां त्यांचिया पदप्रहारां ॥ धरा थरथरां कांपतसे ॥ ५२ ॥ शिष्यमुखें गुरूची निंदा ॥ सादर ऐकती त्यांचिया पदां ॥ लागतां भूमि पावे खेदा ॥ कांपे गदगदां तद्योगें ॥ ५३ ॥ पितृद्रोही मातृद्रोही ॥ सुरापानी स्वर्णस्तेयी[2] ॥ यांच्या स्पर्शें दुखवे मही ॥ वज्रघायीं नातैसी ॥ ५४ ॥ वेदनिंदक वेदद्रोही ॥ ब्रह्मघ्न कृतघ्न आततायी[3] ॥ मातृगामी कन्याविक्रयी ॥ त्यांच्या पायीं भू दुखवे ॥ ५५ ॥ वेदबाह्यपाषंडीं रत ॥ यथेष्टाचरणमार्ग मुक्त॥ वर्णसंकर विषयासक्त ॥ वामी[4] कामी कौलिक ॥ ५६॥ आयतन अगार नगरसीमा ॥ भंगिती लंघिती शपथनियमा ॥ वृत्युच्छेदकांच्या विक्रमा ॥ लागतां श्रमा भू मानी ॥ ५७॥ ऐसे धरेचे खुरतोद॥ शमवी स्पर्शोनि सुमंगल पद ॥ जे पदीं सामुद्रललामवृन्द ॥ तिहीं मकुन्द विचरतां ॥ ५८ ॥ तनुगौरवें धुरंधर॥ वर्ष्मधुर्य[5] तो कुंजर ॥

---

[1] वाहनासह. [2] सोनें चोरणारा. [3] वधाविषयीं उद्युक्त. [4] शाक्त. [5] हत्ती.

एवं जगतीं संचार ॥ करीं श्रीधर वेणु वाहत ॥ ५९ ॥ तें कृष्णाचें गजगतिगमन ॥ विचित्र वेणूचें वादन ॥ सविलास आपांगवीक्षण ॥ वेधी तनुमन तें ऐका ॥ ६० ॥

व्रजतितेनवयंसविलासवीक्षणार्पितमनोभववेगाः ॥ कुजगतिंगमितानविदामःकश्मलेनकबरंवसनंवा ॥१७ ॥

॥ टीका ॥ वेणुवादनें श्रवणद्वारा ॥ वेधूनि आकर्षी अंतरा ॥ सविलास वीक्षणें वेधी नेत्रां ॥ बुद्धिविचारा विसरवी ॥ ६१ ॥ देखोनि वेणुवादनपर ॥ श्रवणें नयनें होतां सादर ॥ इतुक्या निमित्त मन्मथज्वर ॥ उपजे तीव्र सर्वांगीं ॥ ६२ ॥ ऐसिया आह्मी स्मरजर्जरा ॥ विस्मृता प्रवृत्तिं[1]व्यापारा ॥ नेणों गळाल्या वस्त्रां कबरां[2] ॥ वृक्षाकारा ताटस्थ्यें ॥ ६३ ॥ नेणों फिटोनि गेलीं वसनें ॥ केश सुटोनि गळालीं सुमनें॥ नस्मरतीच शरीरें नग्नें॥ वेणुगायनें भुललिया ॥ ६४ ॥ आमुचें नवल काय साजणी ॥ आह्मीच ऐशा हरिणी वनीं ॥ भुलोनि कृष्णाच्या वेणुगायनीं ॥ प्रवृत्तिभानीं विमुक्ता ॥ ६५ ॥

मणिधरःक्वचिदागणयन्गामालयादयितगंधतुलस्याः॥ प्रणयिनोऽनुचरस्यकदांऽसेप्रक्षिपन्भुजमगायतयत्र १८

॥ टीका ॥ ऐकें यशोदे सुंदरी ॥ तुझा तनय श्रीमुरारि ॥ अमूल्यमणिमाला ग्रथित धरी ॥ धेनुगणनार्थ निजकंठीं ॥ ६६ ॥ क्वचित् ह्मणिजे कोणे समयीं ॥ वर्णविभागें निवडी गायी ॥ गणना करिती एके ठायीं ॥ ग्रथितमणिस्रज घेउनी ॥ ६७॥ अथवा बंधु रामकृष्ण ॥ धेनु वळिती विभागून॥ तैं पाडोवाडीं करिती गणन॥

---

[1] संसारकृत्यें. [2] केशरचना.

ग्रथित मणिगण घेउनी ॥ ६८ ॥ अथवा चालतां धेनुहारि ॥ धेनु चिंतूनि एकी पांढरी ॥ एकीबेकीक्रीडेवारी मणिमयहारीं उमाणिती ॥ ६९ ॥ अथवा प्रसूता पारठिया ॥ दोहनकाळीं निवडावया ॥ घेऊनि ग्रथिता मणिमया वलया ॥ करी कानया परिगणना ॥ ७० ॥ एवं गोगणनाव्यापार ॥ तदर्थ ग्रथित मणिगणहार ॥ कंठीं मिरवी मुरलीधर ॥ तुझा कुमर यशोदे ॥ ७१ ॥ तो मणिहार उत्तम ॥ आणि प्रियतम तुळसीदाम ॥सुगंधाढ्य जें कां परम ॥ मेघश्याम तद्युक्त ॥ ७२ ॥ सवंगडी अनुचर प्रियतम बहु ॥ त्यांचे स्कंधीं घालूनि बाहु ॥ वेणु वाजवी मुहुर्मुहु ॥ जे जे ठायीं जे समयीं ॥ ७३ ॥

क्वणितवेणुरववंचितचित्ताःकृष्णमन्वसतकृष्णगृहिण्यः॥
गुणगणार्णमनुगत्यहरिण्योगोपिकाइवविमुक्तगृहाशाः ॥ १९॥

॥ टीका ॥ तैं तों वेणुक्वणितध्वनि ॥ मानसा वेधी पडतां श्रवणीं ॥ तेणें अपहृतचित्ता हरिणी ॥ येती धांवोनि हरिमागें ॥ ७४ ॥ वल्लभा कृष्णसार मृगां ॥ सहित तत्पत्न्या सानुरागा ॥ फिरती कृष्णामागोमागां ॥ पुन्हा तत्संगा नत्यजिती ॥ ७५ ॥ गृहाशा जे फिरवी मागें ॥ मुक्त जाली तत्प्रसंगें ॥ ह्मणोनि कृष्णा मागोमागें ॥ फिरवी कुरंगें अनुरक्तें ॥ ७६ ॥ जैशा गोपिका मुरलीरवें ॥वंचितचित्ता घेती धांवे॥पुन्हा गृहाशा नाठवे ॥ कीं सुटलें दावें भवपाश॥ ७७॥ कृष्णगृहिणी गोपवनिता ॥ हरिसुख भोगूनि वियोगतप्ता ॥ यालागीं भवपाशनिवृत्ता ॥ ज्या सानुरक्ता श्रीकृष्णीं ॥ ७८ ॥ ऐसें कौतुक एकी वदती ॥ तंव आणिका यशोदेप्रति ॥

---

१ गणना करिती. २ कृष्ण. ३ वारंवार.

कृष्णलीला अनुवर्णिती ॥ ते भूपती शुक सांगे ॥ ७९ ॥ मध्याह्नपर्यंत वृंदावनीं ॥ क्रीडा करूनि चक्रपाणि ॥ धेनु आणि परतोनी ॥ यमुनापुलिनीं जीवनार्थ ॥८०॥ ते समयींची ललितलीला ॥कृष्णसौभाग्यकळाकुशला ॥ वदती यशोदेप्रति व्रजबाळा ॥ कुरुनृपाळा तें ऐक ॥ ८१ ॥

कुंददामकृतकौतुकवेषोगोपगोधनवृतोयमुनायाम् ॥ नंदसूनुरनघेतववत्सोनर्मदःप्रणयिनांविजहार ॥ २० ॥

॥ टीका ॥ अवो निष्पापे यशोदे सती ॥ तुझा तनय हा श्रीपति ॥ यशोदानंदनही ह्मणती ॥ अपरा वदती नंदात्मज ॥ ८२ ॥ तो हा गोपी भुलवावया ॥ विचित्रवेशें नटवी काया ॥ कुंदमाळा घालोनियां ॥ धातुमया कृततिलकां ॥ ८३ ॥ गोपीनयनांसि सुखकर ॥ करूनि विचित्र अलंकार ॥ वेश मिरवी अतिसुंदर ॥मोहनपर त्रिजगातें ॥ ८४ ॥ ठाकत ठमकत आणि मुरडत ॥ गोपगोधनीं परिवेष्टित ॥यमुनापुलिनीं क्रीडा करित ॥ संतोषवीत जगत्रया ॥ १८५ ॥ वेणुनादें वेधी देवां ॥ खेचरां भूचरां जलचरां देवां ॥ स्थावरां वनचरां सर्वां ॥ भुलवी जेव्हां तनुनाट्यें ॥ ८६ ॥

मंदवायुरुपवात्यनुकूलंमानयन्मलयजस्पर्शेन ॥ बंदिनस्तमुपदेवगणायेवाद्यगीतवलिभिःपरिवव्रुः ॥ २१ ॥

टीका ॥ मलयज ह्मणिजे मलयागर ॥ तदुत्थं शीतळ सुगंध समीर ॥कृष्णासि भजे सम्मानपर ॥व्यजनाकार मृदुस्पर्शें ॥ ८७ ॥ अथवा मलयजदक्षिणपवन ॥ कीं मलयज कृष्णाचें विलेपन॥त्याच्या संस्पर्शें सम्मान॥ओपी

---

१. तेथें ह्म॰ मलयपर्वतावर उत्पन्न झालेला. २ वायु.

समीरण सर्वत्र ॥ ८८ ॥ जेवीं बंदिजनाच्या पंक्ति ॥ स्तवनीं तोषविती भूपती ॥ तेवीं कृष्णाचीं यशें गाती ॥ विशाळमति सिद्धगण ॥ ८९ ॥ गंधर्व किंनर चारण सिद्ध ॥ वाद्यगीत सुतालबद्ध ॥ वटिका प्रास पद प्रबंध ॥ वर्णिती शुद्ध हरिचारितें ॥ ९० ऐसे अनेक निर्जरगण॥ सेवकत्वें करिती सेवन॥ तत्संगाचें अनुस्मरण ॥ करी तनुमन संतप्त ॥९१॥ ऐशा वदती यशोदेप्रति॥ तंव अष्टांश उरला गभस्ती॥ समीप कृष्ण आला ह्मणती॥ अनुवादती तद्योगें ॥ ९२ ॥ त्या कृष्णाचें सदयपण ॥ पथीं व्रजाप्रति आगमन ॥ अनुगंस्तवन वेणुक्कणन॥ आनंदोन वधू कथिती ॥ ९३ ॥ धेनु स्मरोनि वत्सें शब्द॥ करिती पावोनि परमानंद ॥ तेव्हां संतुष्ट गोपीवृंद॥ वर्णी मुकुंद तें ऐका ॥ ९४ ॥ जैसीं दोहनोन्मुख वासुरें ॥ चळवळ करिती उत्साहभरें ॥ कीं दोहनकाळीं प्रेमादरें ॥ होती तत्परें बिडाळें ॥ ९५ ॥ तैसीं गोपींचीं अंतरें॥ कृष्णागमनीं स्नेहसुभरें॥ होऊनि ठाती कृष्णाकारें॥ वाग्व्यापारें ते वदती ॥ ९६ ॥

वत्सलोव्रजगवांयदगध्रोवंद्यमानचरणःपथिवृद्धैः॥कृत्स्नगोधनमुपोह्यदिनांतेगीतवेणुरनुगेडितकीर्तिः ॥२२॥

॥ टीका ॥ गोपी ह्मणती अवो बाई ॥ कृष्णवात्सल्य सांगों काई ॥ व्रजीं वत्सें जियें बाधिलीं गेहीं ॥ स्मरे त्यांतेंही हृत्कमळीं॥ ९७ ॥ व्रजवासी जे निजरत जन ॥ विषयीं विमुख तद्भोगण ॥ त्यांसि करावया उपबृंहण ॥ वत्सल पूर्ण हिकतर्ता ॥ ९८ ॥ वेदाज्ञेच्या सुदृढदोरें ॥ कर्मखुंटा जीं बांधिलीं ढोरें ॥ तच्छ्रमहरणार्थ श्रीधरें ॥ करुणाभरें द्रवोनी ॥ ९९ ॥ पूर्ण परामर्ष केला सजणी ॥ यालागिं परतोनि अस्तमानीं ॥ आमुची

---

१ सूर्य. १ सेवकांनीं केलेली स्तुति. ३ वृद्धि. ४ मांजरें.

जाणूनि हृदयग्लानि ॥ चक्रपाणि येतसें ॥ २०० ॥ स्मरसंतप्त गोपीजन ॥ मरतां मद्विरहें आहळोन ॥ ऐसिये करुणे कळवळून ॥ जाणा श्रीकृष्ण परतला ॥ १ ॥ कृष्णहृदय गे सदय कैसें ॥ प्रेमळांचें या परम पिसें ॥ तोषे तयांच्या संतोषें ॥ द्रवे मानसें तद्दुःखें ॥ २ ॥ काळिय मथूनि कृष्ण आला ॥ भेटोनि व्रजजन सुखी केला ॥ तें रात्रीं जळतां वणवा प्याला ॥ स्वजन रक्षिला कारुण्यें ॥ ३ ॥ यज्ञार्थ करवी पशूंचें हनन ॥ तेणें पावे तोष गहन ॥ मग याज्ञिकां होय प्रसन्न ॥ ऐसा निर्घृण जो मघवा ॥ ४ ॥ कृष्ण केवळ पशुरक्षक ॥ मघवा जाणोनि पशुहिंसक ॥ कृष्णें वर्जिला त्याचा मख ॥ स्मरोनि दुःख तो क्षोभे ॥ ५ ॥ प्रळयमेघ शिळाधारीं ॥ पडतां कृपाळु श्रीहरि ॥ गोकुळावरी धरिला गिरि ॥ सप्तरात्रीं निजहस्तें ॥ ६ ॥ झणें जाचती स्वकीय जन ॥ ह्मणोनि धरी जो गोवर्धन ॥ तो येतसे जाणोनि शीण ॥ गोपीगोगणतोषार्थ ॥ ७ ॥ सदय अगध्रं[2] श्रीहरि ॥ परतला स्वजनार्थ झडकरी ॥ परंतु मार्गीं नमस्कारीं ॥ वृद्धीं सुरवरीं गोविला ॥ ८ ॥ शिवविरंचिशक्रादिक ॥ वृद्ध मुनिवर नारदप्रमुख ॥ मार्गीं नमनाचें करिती अटक ॥ चालों निष्टंक नलाहे ॥ ९ ॥ ह्मणाल गोविला नमस्कारीं ॥ तें गोधनें कोण सांवरी ॥ तरी जो त्रिजगातें मोहरी ॥ स्वयें मोहरी वाजवुनी ॥ ॥ १० ॥ जाणोनि दिवसाचें अवसान ॥ गोधनाचा समूह पूर्ण ॥ मुरलीरवें गोळा करून ॥ मग व्रजभुवन प्रवेशे ॥ ११ ॥ तो हा प्रवेशकालींचा गजर ॥ वेणुगायन मनोहर ॥ कीर्ति वर्णिती अनुचर ॥ छंदें सुस्वरें हरिचरितें ॥ १२ ॥ लहानें बालक जेंवि राहणीं ॥ बसविती मुद्रा लावुनी ॥ मग तीं देहभाना विसरोनी ॥ वदती काहणी भूतभावी ॥ १३ ॥ तैशा विसरोनि देहस्मृति ॥ गोपवनिता यशोदेप्रति ॥ देवकीजठरींचा चंद्र श्री-

---

१ इंद्र. २ अग ह्म. पर्वत जो गोवर्धन त्याला धरणारा.

पति ॥ ह्मणोनि वदती बरळत्वें ॥ १४ ॥ कीं देवकीजठरोद्भव शशी ॥ तो बलराम गोपवेशी ॥ ह्मणोनि वदती यशोदेपासीं ॥ उत्साहेंसीं व्रजललना ॥ १५॥

उत्सवंश्रमरुचाऽपिदृशीनामुन्नयन्खुररजश्छुरितस्रक्॥
दित्सयैतिसुहृदाशिषएषदेवकीजठरभूरुडुराजः ॥ २३ ॥

॥ टीका ॥ देवकीजठरींचा निशारमण[1] ॥ तो हा सकृष्ण[2] संकर्षण ॥ श्रमांक्त[3] कांतिही करून॥ करिती कारुण्यें कटाक्षें ॥ १६ ॥ गोपींसहित स्निग्ध जन ॥ त्यांचे उत्साहवंत नयन ॥ श्रमित कांतिही करून ॥ तोषवी नयन पहात्यांचे ॥ १७ ॥ गोरजधूसर सकुंतला ॥ हास्ययुक्ता वदनकमला ॥ धूसर कंठींच्या वनमाला ॥ घनसांवळा शोभवी ॥ १८ ॥ आह्मां सुत्द्दां जो प्रियतमा ॥ करित कृपेची पूर्णिमा ॥ मोहरे चकोरां चंद्रमा ॥ तेवीं परमात्मा येतसे ॥ १९ ॥ मनोरथ करावया आमुचे पूर्ण ॥ संतप्त जाणोनि विरहिणीगण ॥ येतसे श्रीकृष्ण सर्वज्ञ ॥ श्रमापहरण करावया ॥ २० ॥ तंव अतिसमीप आलिया कृष्णा ॥ सभ्रमें उतावीळया वदती आना ॥ श्रीकृष्णाच्या विरहध्याना ॥ सदयचिह्नांसमवेत ॥ २१ ॥

मदविघूर्णितलोचनईषन्मानदःस्वसुहृदांवनमाली ॥ बदरपांडुवदनोमृदुगंडंमंडयन्कनककुंडललक्ष्म्याम्॥२४

॥टीका॥ईषत्तारुण्याची छाया॥ तया मिरवी कैशोरवया[4]॥मदघूर्णिता[5] लोचनाचिया॥प्रांतांमाजी उमटली॥२२॥

---

१ चंद्र. २ कृष्णासहित. ३ श्रमयुक्त. ४ बाल्यस्थितीला. ५ मदाच्या योगानें धुंद

जैसें अल्पपक्क बोर ॥ तैसें वदनपंकज गौर ॥ हो कां संकर्षण श्रीधर ॥ बदर[1]पांडुर लावण्यें ॥ २३ ॥ ह्मणाल सुनीळ कृष्णवदन ॥ बदरपांडुर हे उपमा गौण ॥ सरु[2]क्मणिकुंडलभा पूर्ण ॥ गंडमंडन शशितुल्य ॥ २४ ॥ पाच ठेवितां शुभ्रवस्त्रीं ॥ हिरवी प्रभा भासे नेत्रीं ॥ तेवीं रत्नकुंडललक्ष्मी वक्त्रीं ॥ बदरपांडुर प्रकाशे ॥ २५ ॥ ईषत्पक्क तें लाहतां बोर ॥ हिरवें टळटळित उद्दाम रुचिर ॥ तैसे कुंडलप्रभाभासुर ॥ बदरपांडुर मृदुगंड ॥ २६ ॥ ऐसें मिरवी वदनारविंद ॥ तो सुहृदां लागीं मानद ॥ वनमाळाधर श्रीमुकुंद ॥ आनंदकंद यदुवर्य ॥ २७ ॥

यदुपतिर्द्विरदराजविहारोयामिनीपतिरिवैषदिनांते ॥
मुदितवक्त्रउपयातिदुरंतंमोचयन्व्रजगवादिनतापम् ॥ २५ ॥

॥ टीका ॥ यशोदेपासीं गोपवनिता ॥ यदुपति ह्मणती कृष्णनाथा ॥ तेथ संकर्षणप्रमुखता ॥ देवकीसुतादि वाक्यार्थी ॥ २८ ॥ अथवा गर्गवाक्यावरून ॥ पूर्वीं वसुदेवसुत श्रीकृष्ण ॥ यास्तव यदुपति ह्मणून ॥ कथिती वधूगण यशोदे ॥ २९ ॥ कीं व्रजवनिता या सुरांगना ॥ जाणती मूळींच्या विधिवरदाना ॥ यास्तव यदुपति ह्मणती कृष्णा ॥ संकल्पसंज्ञा जाणोनी ॥ ३० ॥ गजेंद्रलीलालक्षण जें जें ॥ तो द्विरद[3]राजविहार ह्मणिजे ॥ तैसें क्रीडिजे यदुराजें ॥ व्रजीं सांजे प्रवेशतां ॥ ३१ ॥ पूर्णिमेचा यामिनीपति ॥ चकोरकुमुदादिकांची आर्ति ॥ भंगोनि जेंवि दे विश्रांति ॥ स्वयें दिनांतीं प्रकटूनी ॥ ३२ ॥ तेवीं गोगोपींची आर्ति ॥ दुरंत भाविली तिहीं जे चित्तीं ॥ करित होत्सातां तद्विमुक्ति ॥ ये यदुपति शशिवदन ॥ ३३ ॥ पैल समीप आला द्वारि ॥

---

१. बोरा प्रमाणें पांढरां वर्ण ज्याचा. २ सुवर्णयुक्त रत्नकुंडलांची कांति. ३ गजराजलीला. ४ नाशरहित.

वदनचंद्रींच्या अमृतधारीं ॥ अपांगमोक्षणें त्रिताप हरी ॥ स्वानंदलहरी दे आह्मां ॥ ३४ ॥ कृष्णवियोगविरहैं दुःख ॥ युगासमान वाटे निमेख ॥ दुरंत ह्मणणें यास्तव देख ॥ कीं जो निष्टंक अनंत ॥ ३५ ॥ एके श्रीकृष्णप्राप्तीविण ॥ करितां कोटिसाधनीं शीण ॥ नोहे दुःखाब्धिलंघन ॥ यास्तव गहन दुरंत ॥ ३६ ॥ऐसा दुःखाब्धि दुरत्यय ॥ निरसी कृपाळु देवकीतनय॥करूनि स्वमुखचंद्रोदय ॥ वधूसमुदाय तोषवितो॥३७॥श्रीशुक व्यासाचा औरस ॥ सवध करूनि कुरुनरेश ॥ गोपिकांचा प्रेमोत्कर्ष ॥ उपसंहरी तें एका ॥ ३८ ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ एवंव्रजस्त्रियोराजन्कृष्णलीलानुगायतीः॥ रेमिरेऽहःसुतच्चिंतास्तन्मनस्कामहोदयाः॥२६॥

॥ टीका ॥ शुक ह्मणे गा नृपोत्तमा ॥ गोपिकांचा भाग्यमहिमा ॥ वर्णूं नशके शतपथ ब्रह्मा ॥भुजंगमासंमवेत ॥ ३९ कृष्णीं जडावया प्रेम ॥ मुनिवर करिती साधनश्रम ॥ परि तें विधिहरां दुर्गम ॥ कीं रजस्तमव्यासत्वें ॥ ४० ॥ बिशुद्धसत्वात्मक गोपिका ॥ ह्मणोनि कृष्णीं प्रेमा निका॥ कृष्णवियोगें तन्मनस्का॥बाह्यविवेका विसरल्या ॥ ४१ ॥ कृष्णरूप अंतःकरण ॥ कीं स्तिमितत्वें भोगिती कृष्ण ॥ कृष्णमयचि ज्यांचें मन ॥ करिती ध्यान संकल्पें ॥ २४२ ॥ कृष्णनिश्चयें ॥ व्यवसितबुद्धि ॥ ह्मणोनि निरसल्या भवोपाधि ॥ कृष्णानुससंधानात्मकासिद्धि ॥ जे कृष्णीं समाधि नित्यत्वें ॥ ४३ ॥ कृष्णीं रमला अहंभाव ॥ विरहकातरा तोचि ठाव ॥ जारप्रेमाचें लाघव ॥ कृष्णीं सर्व समविषम ॥ ४४ ॥ हांसणें रुसणें उदास होणें ॥ उपकृति कारुण्य स्नेह स्मरणें ॥ स्वानुभूतरति चिंतणें ॥ हें जारलक्षणें कृष्णेंसीं॥४५॥एवं कृष्णीं अहंकार ॥ ज्यांचा सर्वस्वें कृ-

---

१. शोषासहित.

ष्णपर ॥ सर्वेंद्रियांचे व्यापार ॥ कृष्णाकार सर्वदा ॥ ४६ ॥ कृष्ण व्यभिचारी अव्याभिचारा ॥ कीं सर्वस्वें कृष्णपरा॥कृष्णावेगळा नघेती वारा॥येरां पामरां कुणपांचा[1]४७कृष्णचैतन्य सर्वगत॥कृष्णावेगळे अवघे प्रेत ॥ यालागीं गोपिका कृष्णीं निरत॥झाल्या विरत गुणभूतां[2] ॥४८॥विरहदुःखाहि माजि गोपी॥ऐशा सप्रेम कृष्णरूपीं॥ कृष्णगुणांच्या कीर्तनजल्पीं ॥भवविकल्पीं विमुक्ता॥४९॥केवढें आश्चर्य कौरवराजा ॥ हरिवियोगीं बल्लवभाजा ॥ गुणकीर्तनें गरुडध्वजा ॥ भजल्या ओजा दुःखार्ता ५० ह्मणोनि यांचा भाग्योदय॥अमरेंद्राहोनि वरिष्ठ होय॥ विधिहर ज्याचे नलाहती पाय ॥ तो अनपाय[3] ज्यां साध्य ॥ ५१ ऐशा हरिविरहें वेल्हाळा ॥ रजनीभुक्ता बल्लवबाळा ॥ भोगिती दिवसाही घननीळा ॥ तद्गुणलीला वर्णूनियां ॥ २५२ एवं रासरसामृत गोड ॥ गोपिकांचा सुखसुरवाड[4] ॥ भंगितां दुष्ट शंखचूड ॥ केला दुखंड श्रीकृष्णें ॥ ५३ ॥ मग गोपींचा हर्षोत्कृष्ट॥असाह्य मानूनि करितां अरिष्ट ॥ कृष्णें भंगिला तो अरिष्ट ॥ अध्याय प्रकट यावरी तो ॥ ५४॥ तें हें श्रीमद्भागवत ॥ अठरासहस्र व्यासकृत ॥ परमहंसाप्रिय वेदांत ॥ सुनिश्चित भक्तितत्वें ॥ ५५ ॥ त्यामाजील स्कंध दशम ॥ श्रीकृष्णाचें जन्मकर्म ॥ शुकपरीक्षितिसंवाद परम ॥ अध्याय उत्तम पंचतिसावा ॥ ५६॥ एका जनार्दनान्वयप्रवर ॥ गोविंसद्गुरूचा किंकर ॥ कृष्णदयार्णव श्रवणीं सादर ॥ मागे अवसर श्रोतयां ॥ २५७ ॥ इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायांदशमस्कधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायांयुग्मगीतकथनंनामपंचात्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३५ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्लोक ॥२६ ॥ टीकाओव्या ॥ २५७ ॥ एवंसंख्या ॥ २८३ ॥ ॥ ॥ ॥

---

[1] प्रेतांचा. [2] त्रिगुणात्मक वस्तूचें ठायीं. [3] अनायासें करून. [4] सुकाचा सुकाळ.

सवैभगवतःश्रीमत्पादस्पर्शहताशुभः ॥ भेजेसर्पवपुर्हित्वारूपंविद्याधरार्चितम् ॥ ९ ॥

॥ टीका ॥ भगवंताचा श्रीमच्चरण ॥ त्रिपथगेचें[1] जन्मस्थान ॥ सकळ मंगळां एकायतन[2] ॥ जो अघशमन संस्पर्शें ॥ ६६ ॥ तया चरणाच्या संस्पर्शमात्रें ॥ निष्पाप झालीं सर्व गात्रें ॥ सर्पशरीर क्षणार्धमात्रें ॥ त्यागूनि पवित्र तनु भजला ॥ ६७ ॥ विमानारूढ विद्याधरीं ॥ पूजिला जैसा शक्र अमरीं ॥ तयातें श्रीकृष्ण पृच्छा करी मुग्धापरी नरनाट्यें ॥ ६८ ॥

तमपृच्छद्धृषीकेशःप्रणतंसमुपस्थितम् ॥ दीप्यमानेनवपुषापुरुषंहेममालिनम् ॥ १० ॥

॥ टीका ॥ अचिंत्यैश्वर्यमहिमा आपुला ॥ जाणाया बल्लवां सकळां ॥ पृच्छा करी घनसांवळा ॥ प्राकृतां अबळां सारिखी ॥ ६९ ॥ जो कां अखिलब्रह्मांडाधीश ॥ विष्णुविरिंचिहरप्रजेश ॥ सकळां पाळक यां हृषीकेश ॥ तो जगदीश श्रीकृष्ण ॥ सांडूनियां सर्पतनु ॥ दिव्यपुरुष देदीप्यमान ॥ निघाला त्यातें तो भगवान् ॥ पुसता झाला वृत्तांत ॥ ७१ ॥ देदीप्यमान कैसा पुरुष ॥ मुकुट कुंडलें माळा सुवास ॥ साळंकृत सुंदर वेश ॥ वंदी कृष्णास अतिविनयें ॥ ७२ ॥ कृष्णापुढें नम्रमूर्ध्नि ॥ बद्धांजलिमंडितपाणि ॥ उभा ठाकला त्यालागुनी ॥ कोण ह्मणोनि पुसे हरि ॥ ७३ ॥

कोभवान्परयालक्ष्म्यारोचतेऽद्भुतदर्शनः ॥ कथंजुगुप्सितामेतांगतिंवाप्रापितोऽवशः ॥ ११ ॥

॥ टीका ॥ परालक्ष्मी जे उत्कृष्टशोभा ॥ तयेकरूनि उजळिसी नभा ॥ स्वतेजें झांकूनि मार्तंडबिंबा[3] ॥ कोण तूं

---

१ भागीरथीचें. २ एकस्थान. ३ सूर्यमंडळास.

उभा रोचिष्मान् ॥ ७४ ॥ ऐसें अद्भुत तव दर्शन ॥ आगे हें कुत्सितकर्म कोण ॥ जेणें सर्पयोनि परमहीन ॥ पावलासी विधितन्त्र ॥ ७५ ॥ होऊनि कुत्सित कर्माधीन ॥ अधोगतीचें कारण कोण ॥ ऐसें ऐकोनि भगवद्वचन ॥ करी निरूपण तो सर्प ॥ ७६ ॥

॥सर्पउवाच ॥ अहंविद्याधरःकश्चित्सुदर्शनइतिश्रुतः ॥ श्रियास्वरूपसम्पत्याविमानेनाचरन्दिशः ॥ १२ ॥

॥ टीका ॥ सर्प ह्मणे श्रीपरुषोत्तमा ॥ विद्याधर मी सुदर्शननामा ॥ कोण्ही एक प्रसिद्धकर्मा ॥ त्रिजगीं गरिमा विख्यात ॥ ७७ ॥ रूपलावण्यश्रीसम्पन्न ॥ सर्व समृद्धि ऐश्वर्य पूर्ण ॥ स्वेच्छा विमानीं बैसोन गगन. ॥ दिग्मंडळीं संचरतां ॥ ७८ ॥

ऋषीन्विरूपानंगिरसःप्राहसंरूपदर्पितः ॥ तैरिमांप्रापितोयोनिंप्रलब्धैःस्वेनपाप्मना ॥ १३ ॥

॥ टीका ॥ फिरतां बैसोनि विमानीं ॥ देखिले तपस्वी आंगिरसमुनि ॥ अतिकर्कश अनुष्ठानीं ॥ शरीरें वाळोनि कृश झालीं ॥ ७९ ॥ जटा पिंगट वळल्या केशीं ॥ कांति धूसर बुभुक्षु ऐसी ॥ आपुल्या लावण्यमदगर्वेंशीं ॥ म्यां तयांसि उपहासिलें ॥ ८० ॥ ऊर्ध्वरेते तपस्वी थोर ॥ ऐसा नकरूनि विचार ॥ भीड नधरूनि वारंवार ॥ उच्च उच्चतर हांसिलों ॥ ८१ ॥ उपहासव्यंग्योक्ति हेलनें ॥ऐकोनि मुनि वर क्षोभले मनें ॥ माझिया ऐशा पापाचरणें॥शापवचन बोलिले ॥ ८२ ॥ मुखें गोड मागें दुष्ट ॥ ते नर वृश्चिकाहूनि कनिष्ठ ॥ करिती सम्मुखचि फुंपाट ॥ ते

---

१ तेजस्वी. २ तीव्र. ३ आमरण ब्रह्मचर्यानें राहणारे.

पापिष्ठ सर्वरूपीं ॥ ८३ ॥ नसाहोनि परमहिमान ॥ भुंकती ते केवळ श्वान ॥ गर्वें नकरिती अभ्युत्थान ॥ ते रासभसमान धश्चोंट ॥ ८४ ॥ देखोनि भल्यांची प्रतिष्ठा ॥ वांकुल्या दावूनि करिती चेष्टा ॥ भल्यावरी आरोप करिती खोटा ॥ ते मर्कटसमयोनि ॥ ८५ ॥ भीड सांडोनि म्यां उपहासिलें ॥ यास्तव अजगर होणें पडिलें ॥ माझें पातक मज कळलें ॥ नीचयोनिप्रदानें ॥ ८६ ॥ यालागि भल्यांचा अतिक्रम ॥ गर्वें करिती दुष्ट अधम ॥ ते ते भोगिती अंधतंम[१] ॥ दुष्टयोनि पावोनी ॥ ८७ ॥ परंतु माझा भाग्योदय ॥ ह्मणोनि मुनींचा समुदाय ॥ परम कारुण्यें मातृप्राय ॥ शापमोक्षणीं कळवळिला ॥ ८८ ॥

शापोमेऽनुग्रहायैवकृतस्तैःकरुणात्मभिः ॥ यदहंलोकगुरुणापदास्पृष्टोहताशुभः ॥ १४ ॥

॥ टीका ॥ ऋषिसमर्थीं दिधला शाप ॥ मज तो अनुग्रहकारणरूप ॥ जेंवि अवचट करीर[२]विटप ॥ फळला कल्पद्रुमरूपें ॥ ८९ ॥ केवळ करुणेचे सागर ॥ शांतिक्षमेचे गिरिवर ॥ आंगिरसमुनि परम उदार ॥ केला उद्धार शापुनी ॥ ९० ॥ ज्यांच्या शापकृपादृष्टि ॥ विश्वगुरूची चरणस्पृष्टि ॥ मी लाधलों दिव्यांगयष्टि ॥ कल्मष[३]सृष्टि भंगोनी ॥ ९१ ॥ ज्याच्या शापास्तव हे प्राप्ति ॥ त्रिजगद्गुरुची दर्शनावाप्ति ॥ लाहोनि झाली अघनिवृत्ति ॥ आतां श्रीपति अवधारीं ॥ ९२ ॥

तंत्वाऽहंभवभीतानांप्रपन्नानांभयापहम् ॥ आपृच्छेशापनिर्मुक्तःपादस्पर्शादमीवहन् ॥ १५ ॥

॥ टीका ॥ जन्ममरणादिदुःखप्रचुर ॥ तो हा दुस्तर भवसागर ॥ जेथ बुडाले चराचर ॥ लहान थोर तळ-

---

१ अज्ञान. २ नेप्तीची वृक्ष. ३ पापयोनि.

मळिती ॥ ९३ ॥ ऐशा प्राणियां भवभयभीतां ॥ तव श्रीचरणीं शरणागतां ॥ भवविरक्तां तव पदनिरतां ॥ भवभयहर्त्ता तूं त्यांचें ॥ ९४ ॥ तरी ऐकें गा एनसंशमना ॥ दुःखदुर्योनिनाशना ॥ आह्मांसि आपुल्या जावया भुवना ॥ देईं अनुज्ञा कृपेनें ॥ ९५ ॥ तुझिया पादस्पर्शें स्वामी ॥ शापनिर्मुक्त झालों पैं मी ॥ श्रीमूर्ति राहो हृदयपद्मीं ॥ पुन्हा हे ऊर्मी मज नबाधो ॥ ९६ ॥

प्रपन्नोऽस्मिमहायोगिन्महापुरुषसत्पते ॥ अनुजानीहिमांदेवसर्वलोकेश्वरेश्वर ॥ १६ ॥

॥ टीका ॥ महायोगी महापुरुष ॥ सज्जनपति लोकेश्वरेश ॥ इत्यादि संबोधनीं तोष ॥ संबोधूनियां करितसे ॥ ९७ ॥ भूतभविष्यवर्तमानीं ॥ त्रिकालज्ञ तूं योगाग्रणी ॥ काळत्रयीं जे दुष्टकरणी ॥ तन्निरसनीं प्रपन्न मी ॥ ९८ ॥ प्रकृतिपुर्यांमाजि जे सुप्त ॥ त्यांहि माजि तूं असुप्त गुप्त ॥ प्रकृतिनियंता प्रकृत्यतीत ॥ तो तूं भगवंत महापुरुष ॥ ९९ ॥ प्रकृतिपुरीं शयन ज्याचें ॥ पुरुष ऐसें नाम त्याचें ॥ आदिकारण तूं प्रकृतीचें ॥ महापुरुष याहेतु ॥ १०० ॥ तो तूं स्वामी महापुरुष ॥ आह्मी तुझेचि अंश विशेष ॥ आह्मां बाधिजे जैं कलुष ॥ तैं तो दोष तुजलागीं ॥ १ ॥ ह्मणसी अनेक प्रतिमंडळें ॥ उपाधियोगें चंचळें समळें ॥ मुख्यमंडळातें नातळे ॥ तेंवि प्रकृतिमळें अलिप्त मी ॥ २ ॥ तरी मुख्यमंडळ जेंवि अलिप्त ॥ तैसेंच प्रतिमंडळही लेपातीत ॥ बिंबलें असतां उपाधिआंत ॥ असे निर्मुक्त निःसंग ॥ ३ ॥ उपाधि अनत्मत्वें जड ॥ अज्ञानप्रचुर गाढमूढ ॥ तीमाजी तुझाचि प्रकाशवाड ॥ समळ निर्मळ अवगमितां ॥ ४ ॥ परंतु ज्ञानाच्या वैपरीत्यें ॥ आंगीकारूनि तादात्म्यातें ॥ तद्गतमालिन्य-

---

१ पाप निवारण करऱ्या. २ शरण आलेला.

चांचल्यातें ॥ घे निजमाथां अभिमानें ॥ ५ ॥ महापुरुष या संबोधनें ॥ त्या निजांशा मजकारणें ॥ शकों नेदी विपरीतज्ञानें ॥ प्रकृत्यभिमानें हें प्रार्थी ॥ ६ ॥ आतां सत्पते हें संबोधन ॥ सदसद्ग्रंथीचें भेदन ॥ करूनि असज्जडनिरसन ॥ सन्मात्र चैतन्यें निवडलें ॥ ७ ॥ तयांसि पुढती असन्मळ ॥ स्पर्शों नेदिसी तूं गोपाळ ॥ करूनि आत्मत्वें सांभाळ ॥ प्रणतपाळसंज्ञेनें ॥ ८ ॥ ह्मणसी लोकलोकांतरीं ॥ ईश्वर असती पृथगाकारीं ॥ ते ते तेथ तेथ अधिकारी ॥ मानवशरीरी मी पशुप ॥ ९ ॥ तरी तूं लोकेश्वरांचा ईश ॥ पूर्णैश्वर्यें परेश ॥ तुझा मजवरी कृपालेश होतां लोकेश नदंडिती ॥ १० ॥ अनन्यसप्रेमभावें भरित ॥ मज तूं जाणें स्वपादप्रणत ॥ करूनि कृपेनें सनाथ ॥ मोडीं विभक्तपण माझें ॥ ११ ॥

ब्रह्मदंडाद्विमुक्तोऽहंसद्यस्तेऽच्युतदर्शनात् ॥ यन्नामगृह्णन्नखिलाङ्श्रोतॄनात्मानमेवच ॥
सद्यःपुनातिकिंभूयस्तस्यस्पृष्टःपदाहिते ॥ १७ ॥

॥ टीका ॥ ऐकें अच्युता जगत्पति ॥ सद्याचि झाली मज प्रतीति ॥ ब्रह्मदंडाची निर्मुक्ति ॥ दर्शनावातीस्तव तुझिये ॥ १२ ॥ ब्रह्मशाप परम क्रूर ॥ तेणें पावलों योनि घोर ॥ तुझिया दर्शनास्तव सत्वर ॥ झालों साचार निर्मुक्त ॥ १३ ॥ केला भगांकित सुरपति ॥ त्रिजगीं भ्रमाविला पशुपति ॥ ऐशी ब्रह्मदंडाची शक्ति ॥ राकापति[1] सलांछन[2] ॥ १४ ॥ यदर्थी आश्चर्य नलगे करणें ॥ ज्याच्या अच्युत नामस्मरणें ॥ अखिल भवाब्धि निस्तरणें ॥ श्रवणें पठनें अघशांति ॥ १५ ॥ ज्याचें नाम स्मरतां भक्ती ॥ स्मरतां पावे अघनिवृत्ति ॥ पावन करी

---

[1] चंद्र. [2] कलंकयुक्त.

आपणाप्रति ॥ श्रोते तत्पंक्ति पावन ॥ १६ ॥ ऐसा ज्याचा स्मरणमहिमा ॥ त्या तुझिया श्रीपुरुषोत्तमा ॥ संस्पर्शतां पादपद्मा ॥ कां पां पाम्मा[1] नभंगे ॥ १७ ॥ चरणस्पर्शें ब्रह्मदंड ॥ खुडूनि ऐश्वर्यें ब्रह्मांड ॥ धवळी ऐसा पदमार्त्तंड ॥ वसो अखंड ममहृदयीं ॥ १८ ॥

इत्यनुज्ञाप्यदाशार्हंपरिक्रम्याभिवंद्यच ॥ सुदर्शनोदिवंयातःकृच्छान्नंदश्चमोचितः ॥ १८ ॥

॥ टीका ॥ ऐसा प्रार्थूनि वृष्णिप्रवर ॥ आज्ञा लाहोनि विद्याधर ॥ करूनि प्रदक्षिणा नमस्कार ॥ पावला स्वपुर सुदर्शन ॥ १९ ॥ मग सर्पप्रेतमुखांतून ॥ नंद काढिला बळें वोढुन ॥ निश्चेष्ट पडिला विसंज्ञ ॥ कृपेनें स्पर्शोन हरि जीववी ॥ २० कृच्छ्रात् ह्मणिजे संकटांतून ॥ केलें नंदाचें मोक्षण ॥ विद्याधराचें उद्धरण ॥ देखोनि ऐकोनि गोपगणीं ॥ २१ ॥

निशाम्यकृष्णस्यतदात्मवैभवंव्रजौकसोविस्मितचेतसस्ततः ॥
समाप्यतस्मिन्नियमंपुनर्व्रजंनृपाऽऽययुस्तत्कथयन्तआदृताः ॥ १९ ॥

॥टीका ॥ अचिंत्यैश्वर्यात्मक वैभव ॥ ऐकोनियां बल्लव सर्व ॥ अगाध कृष्णाचें लाघवं ॥ बिस्मितचित्तें प्रशंसिती ॥ २२ ॥ ऐसी संपलिया रजनी ॥ द्वितीयदिवशीं अंबिकावनीं ॥ यात्राविधान संपादुनी ॥ १ ॥ पुन्हा व्रजभुवनीं प्रवेशती ॥ २३ ॥ व्रजीं जाऊनि प्रवेशती ॥ कृष्णमाहिमा हा वर्णिती ॥ विद्याधराची शापनिर्मुक्ति ॥ नृपा तुजप्रति जे कथिली ॥ २४ ॥ पूर्वीं विद्याधर उन्मत्त ॥ नगणूनियां ऋषि समर्थ ॥ उपहासितां शापोपहत ॥ कृष्णें तो तेथ उद्धरिला ॥ २५ ॥ तैसाचि धनदाचा[2] सेवक ॥ उन्मत्त शंखचूड गुह्यक ॥ भंगूनि तयाचा मस्तक ॥ हरी ध-

---

१ पाप. २ कुबेराचा.

दुनायक मौळमणि ॥ २६ ॥ ऐका तयाचें आख्यान ॥ श्रोतीं परिसिजे सावधान ॥ दयार्णव करील भाषाकथन॥ येथ सुदर्शन उद्धरला ॥ २७ ॥ ॥शुक ह्मणे गा करुमंडना ॥ भगवद्गुणगणमणिभूषणा॥स्वेच्छा क्रीडतां रामकृष्ण। बल्लवललनां समवेत ॥ २८ ॥

कदाचिदथगोविंदोरामश्चाद्भुतविक्रमः ॥ विजह्रतुर्वनेरात्र्यांमध्यगौव्रजयोषिताम्॥ २० ॥

॥ टीका ॥ अंबिकायात्रा संपल्यावरी ॥ कोण्ही एके शुभवासरीं ॥ गोव्रजकामिनींसह कांतारीं॥राममुरारी क्रीडती ॥ २९ ॥ शरच्छशांकभासुररजनीं- ॥ माजि माधव सहमानिनी ॥ मन्मथमोदक कुसुमितवनीं ॥ अद्भुतविक्रमी विहरती ॥ ३० ॥ ब्रह्मांडश्रेणी वाहती माथां ॥ कीं अनंत अजस्र एकात्मता ॥ अखिल भुवनीं अमोघ सत्ता ॥ ऐसे अद्भुत विकमी ॥ ३१ ॥ गोव्रज ह्मणिजे गौळवाडा ॥ तेथील गोपिका लावण्य सुघडा ॥ तयांमध्यें करिती क्रीडा॥ सुखसुरवाडा प्रकटुनी ॥ ३२ ॥ कैसे सालंकृत सुवेष ॥ कैसा स्निग्ध क्रीडाविशेष॥तो तूं परिसें सावकाश ॥ ह्मणे नृपास योगींद्र ॥ ३३ ॥

उपगीयमानौललितंस्त्रीजनैर्बद्धसौहृदैः॥स्वलंकृतानुलिप्तांगौस्रग्विणौविरजोंऽबरौ॥ २१ ॥

॥ टीका ॥ नील पीत विविध वास ॥ विरज ह्मणिजे स्वप्रकाश ॥ मणि कुंडलें मौळि केश ॥ मयूरपक्षें धृतकुसुमें ॥ ३४ ॥ कटकें अंगदें रत्नमुद्रिका ॥ हार मेखळा क्षुद्रघंटिका ॥ पदनूपुरें अंदु वांक्या ॥ पदकें सहित सालंकृत ॥३५॥ जवादी कर्पूर केशर॥कस्तूरिका कृष्णागर॥कुंकुमाक्षता मलयजसार ॥चर्चिती दोघे शोभाभाढ्य ॥ ३६॥वसनें भूषणें शोभायमानें ॥ तदनुकूल अनुलेपनें ॥ गोपी सप्रेमें स्नेहबंधनें ॥गुणकीर्तनें तोषविती॥ ३७

---

१ मस्तकावरील रत्न, २ सुखाचा सुकाळ.

गांधर्ववेदोक्त प्रभेदकुसरी ॥ ललितगायनीं गोपी चतुरी ॥ गुणगणगमकीं उच्चस्वरीं॥राममुरारी रंजविती॥३८

निशामुखंमानयंताबुदितोडुपतारकम् ॥ मल्लिकागंधमत्तालिजुष्टंकुमुदवायुना ॥ २२ ॥

टीका ॥ निशामुख जो संध्याकाळ ॥ करिती सानंदें धवल बहळ ॥ ज्यांमाजि उदित तारकामेळ॥शशिमंडळसमवेत ॥ ३९ ॥
मल्लिकाशब्दें सुमनयाति ॥ तद्रसपानें भ्रमरपंक्ति ॥उन्मत्त गुंजारवें गाती ॥तच्छोभाढ्य निशामुख ॥ ४० ॥
कुमुदकाननीं शशिदर्शनीं ॥ फुल्लारमाना कल्हारश्रेणी ॥ तद्गत मारुत सौरभ्यखाणी ॥प्रसरीत
घ्राणीं निशामुखीं ॥ ४१ ॥

जगतुःसर्वभूतानांमनःश्रवणमंगलम् ॥ तौकल्पयन्तौयुगपत्स्वरमण्डलमूर्च्छितम् ॥ २३ ॥

॥ टीका ॥ खेचर भूचर जलचर वनचर ॥ भूतमात्र चराचर ॥ श्रवणमानसांप्रति रुचिर ॥होती सादर तद्वेधें ॥ ४२ ॥
प्रियतम आणि मंगळप्रद ॥ निरसी अमंगळ अध्यंस्त खेद ॥ ऐसे अगाध गांधर्वभेद ॥ राममुकुंद
आलापिती ॥ ४३ ॥ युगपत् ह्मणिजे एकेचि समयीं॥स्वरमंडळें मूर्च्छना पाहीं॥अनिबद्ध अद्भुत कळा कांहीं॥
सवनोद्धारण गिरद्भिया ॥ ४४ ॥ निबद्ध ह्मणिजे श्रुतिसंग्रथित ॥ कारिका सामसूत्रसंगीत॥एकसमयींच कळा बहुत ॥ अनिबद्ध अद्भुत कौशल्य ॥ ४५ ॥ निश्वसितोद्भव ज्याच्या श्रुति ॥ सत्यसंकल्पें अखिलोत्पत्ति ॥त्रिजगीं
अशक्य आणिकांप्रति ॥ युगपत् गाती अद्भुत ते ॥४६ ॥ स्वरमंडल मूर्च्छनायुक्त ॥ मानसमोदक श्रवणामृत ॥
सुरस सुललित मंगलवंत ॥ राम अनंत आळविती ॥ ४७ ॥ ऐसी अद्भुत गायनकळा ॥ प्रकटूनि सूचिती कवण्या

---

१ कल्पित. २ श्वासापासून उत्पन्न झालेल्या.

फळा ॥ तें तूं ऐकें नरशार्दूला ॥ कौरवपाळा परीक्षिति ॥ ४८ ॥ स्वभक्ताचें मानसहरण॥ स्वरत करावें निजांघ्रिशरण ॥ ऐसें कृष्णाचें अंतःकरण ॥ गोपीमोहनविडंबें ॥ ४९ ॥

गोप्यस्तद्गीतमाकर्ण्यमूर्च्छितानाविदन्नृप ॥ स्रंसद्दुकूलमात्मानंस्रस्तकेशस्रजन्ततः ॥ २४॥

॥ टीका ॥ गोपी ऐकोनि अद्भुत गान ॥ तत्काळ विसरल्या शरीरभान ॥ गायनीं विरोनि गेलें मन ॥ झाल्या उन्मन स्वानंदीं ॥ ५० ॥ कृष्णरूपीं मानसलीनां ॥ तनु नेणती नग्नानग्ना॥ सावरूं नशती विगलित वसना ॥ मां माळासुमनां कोण स्मरे ॥ ५१ ॥सुटूनि केश मोकळे रुळती॥ग्रथित सुमनें स्रवती क्षिति ॥ सुमनमाळा गळतां सुवति ॥ सहसा नेणती स्वरनिरता ॥ ५२ ॥ ऐसिये हरिक्रीडे माझारीं ॥ एक गुह्यक मोक्षाधिकारी ॥ भय पावूनि व्रजसुंदरी ॥ केल्या सत्वरी घाबिऱ्या ॥ ५३ ॥

एवंविक्रीडतोःस्वैरंगायतोःसंप्रमत्तवत्॥शंखचूडइतिख्यातोधनदानुचरोऽभ्यगात् ॥ २५ ॥

॥ टीका ॥ तो तूं गुह्यक ह्मणसी कोण ॥ ऐकें राया सावधान ॥ जो धनदाचा अनुचरगण ॥ ज्या अभिधान शंखचूड ॥ ५४ ॥ यथेष्ट स्वेच्छा राममुरारी ॥ क्रीडतां व्रजयुवतीं माझारीं ॥ मधुर गाती सप्तस्वरीं ॥ सर्वज्ञ परी प्रमत्तवत्[2] ॥ ५५ ॥ शंखचूडनामा तेथ ॥ येतां झाला अकस्मात ॥ रामकृष्ण ज्यांचे नाथ ॥ तया त्रासित वधूनिचया[3] ॥ ५६ ॥ कृष्ण आणि संकर्षण ॥ प्रत्यक्ष करितां निरीक्षण ॥ बळात्कारें बल्लवीगण ॥ भयें त्रासोनि आक्रोशवी ॥ ५७ ॥

---

[1] पुरुषव्याघ्र. [2] अज्ञानी मनुष्यासारखे. [3] समूह.

तयोर्निरीक्षतोराजंस्तन्नाथंप्रमदाजनम् ॥ क्रोशंतंकालयामासदिश्युदीच्यामशंकितः ॥ २६ ॥

॥ टीका ॥ रामकृष्णांची नधरूनि शंका ॥ निजमरणाचा नमनी धोका ॥ गीतमोहिता व्रजबायका ॥ कृष्णासम्मुखा संत्रासी ॥ ५८ ॥ त्याच्या भयें त्रासलया युवति ॥ दीर्घस्वरें आक्रंदती ॥ बळेंचि उत्तरदिशेप्रति ॥ पिटी दुर्मति शंखचूड ॥ ५९ ॥

क्रोशंतंरामकृष्णेतिविलोक्यस्वपरिग्रहम् ॥ यथागादस्युनाग्रस्ताभ्रातरावन्वधावताम् ॥ २७ ॥

॥ टीका ॥ धांव धांव गा संकर्षणा ॥ महाबालिष्ठा प्रलंबमथना ॥ वधूगण आक्रोश कारितां करुणा ॥ रामकृष्णा जाकळी ॥ ६० ॥ रामकृष्णा धांवे पावें ॥ ऐशा बल्लवी घेती नावें ॥ जैसी धेनु दीर्घ रावें ॥ व्याघ्रें धारितां आक्रंदे ॥ ६१ अवंचक सर्वस्वें मत्पर ॥ जाणोनि केला अंगीकार ॥ तो स्वपरिग्रह[1] गोपीनिकर ॥ पाहोनि श्रीधर कोपला ॥ ६२ ॥ परिसोनि त्यांचें आक्रंदित ॥ आणि शंखचूडाचें दुष्टाचरित ॥ रामकृष्ण बंधु त्वरित धांवते॥जाले त्यामागें ॥ ६३ ॥

माभैष्टेत्यभयारावौशालहस्तौतरस्विनौ ॥ आसेदतुस्तंतरसात्वरितंगुह्यकाधमम् ॥ २८ ॥

॥ टीका ॥ नाभी नाभी प्रमदागणा ॥ अभय देती समस्तां ललनां ॥ ताल उपडूनि दीर्घस्वना ॥ गर्जूनि दोघे धांवती ॥ ६४ ॥ गुह्यकांमाजि अधम मूढ ॥ मर्तुकाम[2] जो शंखचूड॥त्यातें वधावया वेगाड[3]॥ धांवती सदृढ प्रतापें ॥ ६५ ॥

---

१ आपल्या स्त्रिया. २ मरणाची इच्छा ज्यास तो. ३ त्वरेनें.

सवीक्ष्यतावनुप्राप्तौकालमृत्यूइवोद्विजन् ॥ विसृज्यस्त्रीजनंमूढःप्राद्रवज्जीवितेच्छया ॥ २९ ॥

॥ टीका ॥ रामकृष्ण लागले पाठी ॥ जेंवि काळमृत्यूशीं पडली गांठी ॥ देखोनि गुह्यक भयभीत पोटीं ॥ मानी संकटीं आतुडलों[1] ॥ ६६ ॥ भयें सांडोनि स्त्रीसमुदाय ॥ पळतां वेंगडी वळती पाय ॥ रक्षूनि जीवितरक्षणोपाय ॥ पळता होय तेथूनी ॥ ६७ ॥ स्मृति हारपोनि जाला मूढ॥ यास्तव व्योमगति झाली गूढ ॥ भूतळीं पडतां शंखचूड ॥ दिसे उजेड शिरोरत्नें ॥ ६८ ॥ गुह्यकापासूनि स्त्रीसमुदाय ॥ सोडवूनियां यादवराय ॥ रक्षण ठेवूनि रोहिणीतनय ॥ धांवता होय त्यामागें ॥ ६९॥

तमन्वधावद्गोविंदोयत्रयत्रसधावति ॥ जिहीर्षुस्तच्छिरोरत्नंतस्थौरक्षन्स्त्रियोबलः ॥ ३० ॥

॥ टीका ॥ स्त्रीरक्षणीं बलभद्र बळी ॥ सुदृढ राहिला विक्रमशाली ॥ शंखचूडाचा सरत्नमौळि ॥ धांवे वनमाळी हरणार्थ ॥ ७० ॥ जीवितरक्षणाचिये चाडे ॥ गुह्यक धांवे जिकडे जिकडे ॥ शिरोरत्नार्थ तिकडे तिकडे ॥ कृष्ण वावडे साटोपें ॥ ७१ ॥ घ्यावया हेममृगाचा प्राण ॥ जैसा धांवे राघवबाण ॥ तैसा गुह्यका माग कृष्ण॥धांवे निर्वाण[2] द्यावया ॥ ७२ ॥

अविदूरइवाभ्येत्यशिरस्तस्यदुरात्मनः ॥ जहारमुष्टिनैवाङ्गसहचूडामणिंविभुः ॥ ३१॥

॥ टीका ॥ अंग ह्मणिजे कोमलवचनें ॥ कौरवभूपा मुनिवर ह्मणे॥ दुरात्मयाचा मस्तक कृष्णें ॥ चूडारत्नें सह हरिला ॥ ७३ ॥ अविदूर ह्मणिजे दुरी ना जवळी ॥ पाठीं धांवोनि श्रीवनमाळी ॥ मुष्टी कवळूनि सरत्न-

---

[1] पडलों. [2] मुक्ति.

मौळि ॥ तोडूनि तत्काळीं घेतला ॥ ७४ ॥ जैसें कोमळ तुंबिनीफळ ॥ मुष्टी कवळूनि तोडी कृषीवळ ॥ तैसें सरत्न गुह्यकमोळ ॥ धावूनि कृष्णें तोडिलें ॥ ७५ ॥ समोळरत्न कृष्णाहातीं ॥ गुह्यककबंध पडलें क्षिती ॥ शंखचूडा उत्तमगति ॥ वोपी श्रीपति कृपेनें ॥ ७६ ॥ कृष्णहस्तें पावला निधन ॥ यालागीं चूकलें जन्ममरण ॥ अक्षय करूनि सायुज्यसदन ॥ वित्तपगण उद्धरला ॥ ७७ ॥

शंखचूडंनिहत्यैवंमणिमादायभास्वरम् ॥ अग्रजायाददत्प्रीत्यापश्यन्तीनांचयोषिताम् ॥ ३२ ॥

॥ टीका ॥ एवं वधूनि गुह्यकातें ॥ त्याचे मौळीं जें रत्न होतें ॥ प्रभे लोपवी भास्करातें ॥ तें स्वहस्तें हरि हरी ॥ ७८ ॥ गोपी सकंपा गुह्यकभयें ॥ तयांतें रत्न दावूनि स्वयें ॥ अग्रजाहातीं वोपिता होय ॥ तो अभिप्राय अवधारा ॥ ७९ ॥ शंखचूड येवूनि पुढती ॥ त्रासील सकाम क्रूरवृत्ति ॥ गोपी हृदयीं हे शंका वाहती ॥ तिची निवृत्ति करावया ॥ ८० ॥ शंखचूडाचा मौळमणि ॥ तिहीं पाहतां आपुले नयनीं ॥ गुह्यकभयाची कणकणी ॥ हृदयांहूनि निरसली ॥ ८१ ॥ रक्षूनि अग्रजाची मर्यादा ॥ मणिअर्पणें स्नेहवादा ॥ वर्धवितां तो परमानंदा ॥ पावोनि मुकुंदा आलिंगी ॥ ८२ ॥ तिये आलिंगनमेळीं ॥ त्रिजग सच्चित्सुखकल्लोळीं ॥ विबुध विमानीं पिटिती टाळी ॥ पुष्पें मोकळीं वर्षती ॥ ८३ ॥ ऐसिया रासरसिका रजनी ॥ व्रतस्था कात्यायनीपूजनीं ॥ याचिल्या यमुनानिमज्जनीं ॥ हरितोषणीं गोपींहीं ॥ ८४ ॥ त्या गोपींच्या वरदऋणा ॥ फेडावया त्रैलोक्यराणा ॥ जैसजैसी त्यांची कामना ॥ त्या त्यां खुणा अनुसरे पैं ॥ ८५ ॥ सुदर्शना स्वर्गावाप्ति ॥ शंखचूडातें सायुज्यमुक्ति ॥ गोपी पावल्या

---

१ भोंपळीचें फल. २ धड. ३ ईश्वररूपीं मिळून जाणें. ४ कुबेरगण.

स्वानंदतृप्ति ॥ रामश्रीपति संतुष्ट ॥ ८६ ॥ पुढें परम रसाळ कथा ॥ मानिनी मानसीं मनसिजव्यथा ॥ पावोनि हरिगुण वदती मिथा ॥ ते कुरुनाथा अवधारीं ॥ ८७ ॥श्रीएकनाथ भक्तपति॥ चिदानंदाख्य वेणुगीतीं ॥ स्वानंदरूपा गोपयुवति ॥ गोविंदवेधें वेधल्या ॥ ८८ ॥ त्या गोपींचा समरसभाव ॥ हर्षें कोंदला दयार्णव॥श्रवणें मननें सुस्नात सर्व ॥ हें पर्व अपूर्व श्रोतयां ॥ ८९ ॥ तें हें श्रीमद्भागवत ॥ अष्टादश सहस्त्र गणित ॥ परमहंसीं रमिजे जेथ ॥ स्कंध विख्यात दशम हा॥९० ॥ श्रीशुकपरीक्षितिसंवाद ॥ उत्तररासक्रीडाभेद ॥ सुदर्शनशंखचूडाख्यान विशद ॥ अध्याय प्रसिद्ध चौतिसावा ॥ १९१ ॥

॥ इतिश्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमंकधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायामंबिकावनयात्रासुदर्शनविद्याधरशंखचूडगुह्यकधनदानुचरोभयोद्धरणंनामचतुस्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

श्लोक ॥ ३२ ॥ ॥ टीका ओव्या ॥ १९१ ॥ ॥ एवं संख्या ॥ २२३ ॥ ॥ ॥

अंतःकरण केवळ विष्णु ॥ जेथ सुषुप्त करणगणु ॥ लीन झालिया प्राज्ञाभिमानु ॥ आनंद अभिन्न उपासिती ॥ ॥९६ ॥ ईषन्मात्र मानस जागें ॥ होतां भगवद्भजनानुरागें ॥ संकल्प उठती संस्कारवोघें ॥नोहे वावुगें विक्षिप्त ॥ ९७ ॥ तेथ प्रकाशे स्वप्नावस्था ॥ देखे सिंहासनीं हृदयस्था॥आपण आचरे अर्चनपथा॥यथोक्त आस्थापूर्वक ॥ ९८ ॥किंवा भगवद्गुणगणमाळा ॥ पढोनि तोषवी हरिजनमेळा॥ अथवा हरियश हरिप्रेमळा ॥ गातां जिव्हाळा तच्छ्रवणीं ॥ ९९ ॥ अथवा देखे पर्वोत्सव ॥ विष्णुक्षेत्रें यात्रा गौरव ॥ संत सज्जन महानुभाव ॥ स्निग्ध लाघव भक्तीचें ॥ १०० ॥ अथवा प्रत्यक्ष कृष्णमूर्ति ॥ प्रकटली भजनाच्या एकांतीं ॥ तिनें स्पर्शोनि अमृतहस्तीं ॥ केली विश्रांति भवविलयें ॥१ ॥ऐसे संकल्प असंख्य ॥ मानस प्रसवे भजनोन्मुख ॥स्वप्नामाजीही भजनसुख ॥ भोगी विमुख भवविषयीं ॥ २ ॥ बुद्धि जागिन्नलिया तेथ ॥ विश्वाभिमान होय जागृत ॥ तैं गुरूपदिष्ट निश्चयकृत ॥ भगवच्चरित अवलोकीं ॥ ३ ॥ व्यतिरेकान्वय ओतप्रोत॥ भगवत्तत्व सुनिश्चित ॥ येर मायाभ्रमनिर्मित ॥ दृश्य समस्त बहुरूप ॥ ४ ॥त्यामाजीही प्रियतम चित्ता॥भगवद्गुणयशोमंडित कथा॥येर विरसा नवरसवार्ता ॥ ज्या वीथिस्थां नागरी ॥ ५ ॥ नमन साष्टांग लोटांगण ॥ भगवन्मूर्ति भगवज्जन ॥ तत्संस्पर्शें तोषगहन ॥ अंगनालिंगन प्रिय नवटे ॥ ६ ॥ जितुकें दृश्य रूपा आलें ॥ तितुकें भगवन्मय भाविलें ॥ भवभावनें शून्य पडिलें ॥ चित्त जडिलें हरिरूपीं ॥ ७ ॥ सुनीळ दिसतां दृष्टीपुढें ॥ कृष्णरूपचि भासे उघडें ॥पीत पीतांबर पडिपाडें ॥ वांडेंकोडें अनुभविती ॥ ८ ॥ श्वेतभगवद्दर्शनदीप्ति ॥ अरुण तितुकी अधरोष्ठकांति॥ रक्त हरिपदतळभा ह्मणती ॥ कृष्ण कल्पिती कुंतळभा ॥ ९ ॥ मिश्रप्रभा शिखंडचूड॥ रुक्मललामश्रेणि सुघड॥ हरित वन-

---

१ महाज्ञानी. २ संसारनाश. ३ रस्त्यांतील. ४ आनंदानें. ५ केशकांति, ६ सोन्याचे दागिन्याची पंक्ति.

माळेचा उघड ॥ फाके उजेड चहूंकडे ॥ १० ॥ नेत्रगोचर ऐसें पाहतां॥हरिरूपाची स्मृति ये चित्ता ॥ दृश्य भवभान नुधवी[1] माथा ॥ एकात्मता हरिरूपीं ॥ ११ ॥ रसना रसाभिज्ञपणें ॥ रसाळ हरिसुख चाखों जाणे ॥ तृप्त सर्वदा स्वानंदपानें ॥ जगज्जीवनें टवटवीत ॥ १२ ॥ गोड अवघा हरिचिद्रस॥ भवभावना बाकस[2] फोस॥ घ्राण दर्शन आदिपुरुष ॥ पुण्यगंध[3] पृथ्वीचा ॥ १३ ॥ ऐशिया वोजा भगवन्मय ॥ अवघा इंद्रियसमुच्चय ॥ नेणे वावुगी विषयसोय ॥ सदा तन्मय हरिरंगीं ॥ १४ ॥ वाणी नामस्मरणीं निरत ॥ गुणकीर्तनीं अतंद्रित ॥ हरियशःकथनीं प्रेमाद्भुत ॥ आनंदभरित तद्योगें ॥ १५ ॥ विजातीय ह्मणोनि पक्षी ॥ मनुजसंवादा उपेक्षी ॥ अवघें जनपद तैसें लक्षी ॥ प्रवृत्तिपक्षीं व्यवहारीं ॥ १६ ॥ नमिळे वावुगा संवादा॥वृथा उत्तर नेदी शब्दा॥ नामस्मरण कां कीर्तनधंदा ॥ सदा सर्वदा वैखरी ॥ १७ ॥ साबरागमी जैसा ग्रहणीं ॥ साबरमंत्र जपतां वाणीं ॥ मानस रक्षी सावधपणीं ॥ हरिगुणपठनीं तेवीं सदा ॥ १८ ॥ स्वप्नीं देखे पर्वोत्सव ॥ तो जागृतीचा परिणामभाव ॥ जागृदवस्थेचे व्यवसाव ॥ स्वप्नीं सावेव प्रकटती ॥१९॥एवं कर्मेंद्रियप्रवृत्ति ॥ चाले हरिचर्यापथीं ॥ कोणे काळीं नपडे रिती ॥ भोगी विश्रांति तद्योगें ॥ २० ॥ विधिपूर्वक जो अभिहितपथ॥ ऐका तयाचाही अर्थ ॥ वैखानसादि भागवत ॥ कीं नारदप्रणीत पांचरात्र ॥ २१ ॥ अक्रूर ह्मणे श्रीभगवंता ॥ तुंवा निर्मिल्या भजनपथा ॥ अनुष्ठिती जे एकात्मता ॥ निरसूनि वार्ता भेदाची ॥ २२ ॥ संकर्षण श्रीवासुदेव ॥ प्रद्युम्नानिरुद्ध चतुर्व्यूह ॥ बहुधा भेद एकात्मभाव ॥ भजती सावेव सप्रेमें ॥२३॥ एक नारायणोपनिषद ॥ जैसा प्रकटी

---

[1] वर उचलीत माहीं. [2] कडबा, पेंढा. [3] पवित्र गन्ध.

अर्थविशद ॥ आत्मा नारायण अभेद ॥ सच्चिदानंद उपासिती ॥ २४ ॥ ऐसे वैष्णवधर्में भजती ॥ त्यांसी अभेद एकात्मरति ॥ अस्त पावली संसृति ॥ हें काय पुढती बोलावें ॥ २५ ॥

त्वामेवान्येशिवोक्तेनमार्गेणशिवरूपिणम् ॥ बह्वाचर्यविभेदेनभगवन्समुपासते ॥ ८ ॥

॥ टीका ॥ आणि तूतेंचि शैवागमें ॥ एक भजती विध्युक्त नेमें ॥ निरूपिजती ते अनुक्रमें ॥ पुरुषोत्तमें परिसावें ॥ २६ ॥ शिवप्रणीत मार्गेंकरून ॥ बहुतां आचार्यांपासून ॥ करिती बहुविधदीक्षाग्रहण ॥ याजिती भगवान् शिवरूपी ॥ २७ ॥ शिवचिह्नित कापालिक ॥ [illegible]साद पाशुपत कौळिक ॥ दिगंशुकी भैरवप्रमुख ॥ माहेश्वरादि शांभव जे ॥ २८ ॥ ऐसे बहुविध भेदेंकरून ॥ उपासिताती तुजलागून ॥ त्यांसि ही नबाधी पुनरागमन ॥ कीं झालिया अभिन्न तव बोधें ॥ २९ ॥ सप्रेमनिष्कामभजनानंद ॥ वास्तव अपरोक्षज्ञानावबोध तरीच तुटे भवमूळकन्द ॥ येर निषिद्ध पाखंड ॥ ३० ॥ असो ऐसे वैष्णव शैव ॥ देवताबुद्धिपृथग्भाव ॥ धरूनि यजिती जे स्वमेव ॥ तें तें सर्व तुज अर्पे ॥ ३१ ॥

सर्वएवयजन्तित्वांसर्वदेवमयेश्वरम् ॥ येप्यन्यदेवताभक्तायद्यप्यन्यधियःप्रभो ॥ ९ ॥

॥ टीका ॥ विष्णु शंकर गजानन ॥ भर्गभगवतीपंचायतन ॥ कीं इंद्राग्नी सोमवरुण ॥ भिन्नभिन्न उपासिती ॥ ॥ ३२ ॥ परी तूं सर्वात्मा सर्वेश्वर ॥ यास्तव तुज ते सर्वोपचार ॥ जऱ्ही ते पृथग्देवतापर ॥ भावनांकुर बुद्धीचे ॥ ३३ ॥ क्षुद्राक्षुद्रदेवताभक्त ॥ परी तें तवार्चनचि समस्त ॥ सर्वात्मका तूं ह्मणसी येथ ॥ तरी उपासकांत वि-

---

१ शिवभक्त. २ दिगंबर.

रोध कां॥ ३४॥ आपुलालिया उपासना ॥ अवलम्बिती मतें नाना॥ धरूनि तेथींचिया अभिमाना ॥ अन्यत्र भजना
दूषिती ॥ ३५ ॥ ऐसे केवीं एकात्मते । लाहोनि भजती मज एकातें ॥ ऐसें नह्मणावें समर्थें ॥ कारण यातें तें ऐक
॥ ३६ ॥ सकाम वासनेचिया बीजा ॥ धरूनि क्षुद्रां करिती पूजा ॥ परी त्या भजना फळद वोजा ॥ गरुडध्वजा
तूं एक ॥ ३७ ॥ आवडतीं बीजें पेरिलीं मळां ॥ आवडी सारिख्या देती फळा ॥ परी तें पासूनि एका जळा ॥
फळद सकळां तूं तैसा ॥ ३८ ॥ क्षुद्र वासना सकाममति ॥ क्षुद्र देवता आराधिती ॥ सर्वग चैतन्यात्मक वसति॥
तुझी त्यांप्रति अनोळख ॥ ३९ ॥ निर्दैवा हस्तीं चिन्तामणि ॥ परी तो नेणे त्यां लागोनी ॥ मानी हननीं ओठंगणीं
॥ तो फळदानी तितुकाची ॥ १४० ॥ तैसे होऊनि कामनापर ॥ क्षुद्राराधनीं अतितत्पर ॥ अर्पिती शुभाशुभ
उपचार ॥ निष्ठा अघोर फळलोभें ॥ ४१ ॥ त्यां तीं फळें तुजपासून ॥ परी ते ह्मणती क्षुद्राधीन ॥ जेंवि
पाखंडी गंगांवन ॥ विहिरे[3] करून प्राशिती ॥ ४२ ॥ ऐसे सकाम विविधा यजनीं ॥ यजिती मनीषाभेदें[2] करूनी॥
तें सर्वगा तुज लागोनी ॥ अर्पे ह्मणोनि फळ जोडे ॥ ४३ ॥ फलद तूं ज्यां जैसी बुद्धि ॥ ते मानिती तत्कर्मसिद्धि ॥
यास्तव क्षुद्रांची प्रसिद्धि ॥ परी ते निरवधि तुज अर्पे ॥ ४४ ॥ एथ दृष्टान्त बोलिला शुक ॥ तो परिसिजे श्रोतीं
श्लोक ॥ एक्या सिक्थें चरु सम्यक् ॥ पक्वापक जाणों ये ॥ ४५ ॥

यथाऽद्रिप्रभवा नद्यः पर्जन्यापूरिताः प्रभो ॥ विशन्ति सर्वतः सिन्धुं तद्वत्त्वां गतयोऽन्ततः ॥ १० ॥

॥ टीका ॥ त्रयी सांख्य कां विविध योग ॥ शैव वैष्णवी दीक्षा चांग ॥ वाम दक्षिण बहुविध मार्ग ॥ जेंवि

---

१ गंगोदक. २ बुद्धिभेदानें. ३ झरे.

सरितावोघ ऋजु कुटिळ ॥ ४६ ॥ आवडीची विचित्र गति ॥ तदनुसार भजकांप्रति ॥ सरळ वक्र मार्गें भजती ॥ परी फळद अन्तीं तूं त्यांतें ॥ ४७ ॥ अद्रीपासूनि जेंवि सरिता ॥ पूर्ण पर्जन्योदकें भरिता ॥ वामदक्षिणओघें त्वरिता ॥ मिळती तत्वता सिन्धूतें ॥ ४८ ॥ कुटिळ सरळ भजनवोघ ॥ परि सप्रेमजळा चपळवेग ॥ तेणें मिळती ते सवेग ॥ चैतन्याब्धि तुज माजी ॥ ४९ ॥ ऐसा सर्वत्र सर्वदा भजना ॥ सर्वां सुलभ सर्वात्मना ॥ हेतु तेथींच्या व्याख्याना ॥ परिसा श्रवणा वसवूनी ॥ ५० ॥

सत्वंरजस्तमइतिभवतःप्रकृतेर्गुणाः ॥ तेषुहिप्राकृताःप्रोताआब्रह्मस्थावरादयः ॥ ११ ॥

॥ टीका ॥ तुझी शक्ति साम्यप्रकृति ॥ गुणत्रय हें तत्संतति ॥ त्या पासूनि जीवोत्पत्ति ॥ प्राकृत ह्मणिजेती ते अवघे ॥ ५१ ॥ जितुक्या प्रकृति कार्योपाधि ॥ स्थावरादि ब्रह्मावधि ॥ यथानुक्रमें ते निरवधि ॥ मिळती चिदब्धि तुजमाजी ॥ ५२ ॥ जे जे सम्भवले जेथून ॥ ते ते तेथेंचि होती लीन ॥ एवं प्राकृत जीवसमुच्चय जाण ॥ पुन्हा त्रिगुणीं प्रवेशती ॥ ५३ ॥ त्रिगुणगुणसाम्यें माझारी ॥ प्रविष्ट होती श्रीमुरारि ॥ तेही प्रवेशे चित्सागरीं ॥ जैसी लहरी एकवटे ॥ ५४ ॥ यथाक्रमें स्वोपाधिलयीं ॥ सर्व सांठवती तुझ्याचि ठायीं ॥ कीं तुवांचि ब्रह्मादि सर्वही प्रकृतिगुणीं संग्रथित ॥ ५५ ॥ ते सर्वही तुजवांचून ॥ पृथग्भासतांही नव्हती भिन्न ॥ अन्वयबोधें तूं अभिज्ञ सर्वदेवात्मा सर्वेश ॥ ५६ ॥ येथ ऐसें ह्मणसी हरि ॥ भासे तव वचनामाझारी ॥ प्रकृतिसम्बन्ध मजही जरी ॥

---

१. उत्पन्नझाले.

तरी सर्वोपरी जीव मीही ॥ ५७ ॥ सर्वी मजसीं विशेष कोण ॥ ऐसें सहसा देवा नह्मण ॥ विशेष ऐश्वर्य व्यापकपण ॥ निर्लेपलक्षण अवधारीं ॥ ५८ ॥

तुभ्यंनमस्तेऽस्त्वविषक्तदृष्टयेसर्वात्मनेसर्वधियांचसाक्षिणे ॥
गुणप्रवाहोऽयमविद्ययाकृतःप्रवर्ततेदेवनृतिर्यगात्मसु ॥ १२ ॥

॥ टीका ॥ असो प्रणाम तुजकारणें ॥ विशेष ह्मणसी कीं लक्षणें ॥तो मी कथितों विशेषणें ॥ तें तूं संपूर्ण अवधारीं ॥ ५९ ॥ अविषक्तदृष्टि ह्मणजेसि काये ॥ अलिप्तबुद्धि तो तूं स्वयें ॥ काय निमित्त ह्मणसी जरी हें ॥ तरी सर्वात्मा तूं ह्मणोनियां ॥ ६० ॥ सम विषम दोष गुण ॥ भेद असतां होय दर्शन ॥ कांहीं नसेच तुजवांचून ॥ अभेद ह्मणोनि निर्लेप ॥ ६१ ॥ अलिप्तवुद्धि ऐसें ह्मणसी॥ तरी बुद्धि वेगळी असे कीं मजसी ॥ ऐसें नह्मणावें हृषीकेशी ॥ तूं बुद्धीशीं द्योतक ॥ ६२ ॥ अविद्याभेदभ्रमाक्त जीव ॥ मलिनबुद्धि ते ते सर्व ॥ बुद्धिसाक्षी तूं वासुदेव ॥ न तुज यास्तव बुद्धिलेप ॥ ६३ ॥ तरी तो बुद्धिलेप कोणासी ॥ ऐसें स्वामी तूं जरी ह्मणसी ॥ तरी जे अविद्याभ्रमाची राशि ॥ ते ज्यापासीं नांदतसे ॥ ६४ ॥ त्रिगुत्मकगुणप्रवाह ॥ अविद्याकामकर्ममय ॥ तदनुसार लाहोनि देह ॥ भ्रमती पाहें भवस्वर्गी ॥ ६५ ॥ देव मनुष्य तिर्यग्योनि ॥ ते ते ठायीं देह धरूनी ॥ होवूनि तेथींचे अभिमानी ॥ जननीं मरणीं परिभ्रमती ॥ ६६ ॥ ऐसे अविद्यागुणप्रवाहें ॥ सुरनरतिर्यग्भ्रमती मोहें॥ तुज नेणतां ऐसें होये ॥ तो तूं काय त्यां तुल्य ॥ ६७ ॥ यास्तव जीवां आणि तुजसीं॥ ऐसा विशेष तूं श्रीहृषीके-

---

१ अज्ञानामुळें जो भेद, त्यामुळें जो भ्रम, त्यानें व्याप्त.

शी ॥ तूं सर्वात्मा चराचरेंसीं ॥ ते गुणमूर्तीसी स्तवीतसें ॥ ६८ ॥ दों श्लोकीं तें विराटध्यान ॥ स्तवी अक्रूर अवलोकून ॥ शुक नृपेंद्रा करी कथन ॥ तें सज्जन परिसोत ॥ ६९ ॥

अग्निर्मुखंतेऽवनिरंघ्रिरीक्षणंसूर्योनभोनाभिरथोदिशः श्रुतिः ॥
द्यौःकंसुरेंद्रास्तवबाहवोऽर्णवःकुक्षिर्मरुत्प्राणबलंप्रकल्पितम् ॥ १३ ॥
रोमाणिवृक्षौषधयःशिरोरुहामेघाःपरस्यास्थिनखानितेऽद्रयः ॥
निमेषणंरात्र्यहनीप्रजापतिर्मेढ्रस्तुवृष्टिस्तववीर्यमिष्यते ॥ १४ ॥

॥ टीका ॥ देवमनुष्यतिर्यक्प्रमुख ॥ पृथक्पृथक् अनेक लोक ॥ ते ते तव अवयव सम्यक ॥ सर्वात्मक तूं सगुण ॥ ७० ॥ तेचि अवयव कैसे कोण ॥ मुख्य मुख तो हुताशन ॥ आधार धरणि ते तव चरण ॥ सूर्य लोचन नभ नाभि ॥ ७१ ॥ दिशा श्रवण स्वर्ग शिर ॥ सुरेंद्र बाहु कुक्षि सागर ॥ वायु प्राण मरुच्चक्र ॥ बळ समग्र तें तुझें ॥ ७२ ॥ तृणादिओषधि वृक्षगुल्म ॥ एवं उद्भिज्ज ते तव रोम ॥ मेघ मूर्धजांचें नाम ॥ कामोद्गम जेथ होय ॥ ७३ ॥ तूं परमात्मा परात्पर ॥ मेरुप्रमुख जे गिरिवर ॥ तितुक्या अस्थि तव समग्र ॥ वज्रशिखरें नखशोभा ॥ ७४ ॥ उन्मेष निमेष दिवसरजनी ॥ प्रजापति तो मेढ्रस्थानीं ॥मौळिस्थ मेघमाळेचें पाणी ॥ ते वृष्टि होऊनि वीर्य द्रवे ॥७५॥ ऐसी वर्णूनि विराट तनु ॥ पुन्हा बोले शंका करून॥तुझें स्वरूप दृश्यमान ॥इतुकेंचि ह्मणोनि नबोलवे ॥७६॥एवं सर्वही दृश्य प्रपंच ॥ तुझा अवयवभूत साच ॥ तथापि सविकार हा असाच ॥ कल्पित अहाच तव रूपीं ॥ ७७ ॥

---

१ वनस्पति. २ केश. ३ शिश्नस्थानीं.

त्वय्यव्ययात्मन्पुरुषेप्रकल्पितालोकाःसपालाबहुजीवसंकुलाः ॥
यथाजलेसंजिहतेजलौकसोऽप्युदुंबरेवामशकामनोमये ॥ १५ ॥

॥ टीका ॥ अव्ययात्मा तूं पुरुष एक ॥ तुझ्या ठायीं बहुधा लोक ॥ लोकपाळांसहित देख ॥ जीव अनेक प्रकल्पित ॥ ७८ ॥ जलामाजी जलचरकोटी ॥ बहुधा विचरती जलाचे पोटीं ॥ कीं उंबरामाजील मुरुकुटीं ॥ करिती राहटी बाहुल्यें ॥ ७९ ॥ संकल्पांचें जें कां जनन ॥ प्रधानशब्दें तें तव मन ॥ ह्मणोनि मनोरूपी श्रीभगवान् ॥ तरी तव तनु स्थिरचरही ॥ ८० ॥ तुझ्या स्वरूपीं ब्रह्मांडकोटी ॥ भ्रमती ऐसी श्रुतीची गोठी ॥ जळीं जळचरें फळीं मुरकुटीं ॥ तेंवि हीं पोटीं समजावीं ॥८१ ॥ कोणे उंबरीं कोठें कोण ॥ ये वार्तेचें मशकां शून्य ॥ एवं परमात्मा तूं पूर्ण ॥ अपार ह्मणोन नाकळसी ॥ ८२॥ एवं अनंतब्रह्मांडपति ॥ भजना अश्यक ते तव मूर्ति ॥ यास्तव अवतारकथामृतीं ॥ सज्जन रमती तें ऐक ॥ ८३ ॥

यानियानीहरूपाणिक्रीडनार्थंबिभर्षिहि ॥ तैराम्रृष्टशुचोलोकामुदागायंतितेयशः ॥ १६ ॥

॥ टीका ॥ ऐसा स्वलीला क्रीडनार्थ ॥ जीं जीं रूपें धरिसी येथ ॥ तिहीं करूनि शोकरहित ॥ गाती प्रमुदित तव यश तें ॥ ८४ ॥ यास्तव स्वयेंही दानपति ॥ नमिता झाला अवतारपंक्ति ॥ नृपा निरोपी शुक संकेतीं ॥ तेंचि श्रोतीं परिसावें ॥

नमःकारणमत्स्यायप्रलयाब्धिचरायच ॥ हयशीर्ष्णेनमस्तुभ्यंमधुकैटभमृत्यवे ॥ १७ ॥

॥ टीका ॥ प्रलय पावल्या सकळ सृष्टि ॥ तया प्रलयाब्धीचे[1] पोटीं ॥ जगत्कारण जे मत्स्ययष्टि[2] ॥ नमो जगजेठी मत्स्यरूपा ॥८६॥ नमो यज्ञरक्षणपरा ॥ अद्भुतहयग्रीवातारा॥ मधुकैटभहननचतुरा॥ जगदुद्धारा जगदीशा॥८७॥

---

१ प्रलयकालच्या समुद्राच्या. २ मत्स्यरूप.

अकूपारायबृहतेनमोमंदरधारिणे ॥ क्षित्युद्धारविहारायनमःसूकरमूर्तये ॥ १८ ॥

॥ टीका ॥ अकूपार जो सागर ॥ तोही नपुरे सविस्तर ॥ बृहत् ह्मणिजे विशाळतर ॥ मंदरधर कमठात्मा[१] ॥ ८८ ॥ त्या कूर्मावतारा कारणें ॥ माझें साष्टांगनमन करणें ॥आणि भू दंष्ट्राग्रें उद्धरणें ॥ सहज क्रीडणें हें ज्याचें ॥ ८९ ॥ तया वाराहरूपाहरि ॥ माझें नमन अत्यादरीं ॥आणि अद्भुत नरकेशरी[२]॥ निर्भय करीं स्वजनातें ॥९० ॥

नमस्तेऽद्भुतसिंहायसाधुलोकभयापह ॥ वामनायनमस्तुभ्यंक्रांतात्रिभुवनायच ॥ १९ ॥

॥ टीका ॥ सर्व लोकांचा भयापहरण ॥ दुर्धरदैत्यसंहारण ॥ त्या नरहरीस माझें नमन ॥ आणि वामन बटुरूपी ॥९१ ॥ वामनरूप बलिच्छलनार्थ ॥ त्रिविक्रम त्रिपादभूग्रहणार्थ॥ उभयात्मकां दंडवत ॥सप्रेमभरित पैं माझें ॥९२॥

नमोभृगूणांपतयेदृप्तक्षत्रवनाच्छिदे ॥ नमस्तेरघुवर्यायरावणान्तकरायच ॥ २० ॥

॥ टीका ॥ भृगुवंशीं ज्या संभव ॥ तयासि ह्मणावें भार्गव ॥ तत्पति तूं वीरवाडव[३] ॥ क्षत्रदावदहनपटु[४] ॥ ९३ ॥ दृप्त ह्मणिजे उन्मत्त क्षत्री ॥ तद्वन समूळशखापंत्री ॥ कुठारें छेदूनि भू सत्पात्रीं ॥ वेदोक्तमंत्रें समर्पिली ॥ ९४ ॥तया नमो जी भार्गवा ॥ आणि रघुवर्या श्रीराघवा[५] ॥ रावणांतका महिजाधवा ॥ नमो वासवाहितमथना[६] ॥ ९५ ॥

नमस्तेवासुदेवायनमःसंकर्षणायच ॥ प्रद्युम्नायानिरुद्धायसात्वतांपतयेनमः ॥ २१ ॥

॥ टीका ॥ नमो संकर्षणा बलरामा ॥ वासुदेवा पूर्णकामा ॥ प्रद्युम्ना श्रीअनिरुद्धनामा॥ चतुर्धामा व्यूह रूपा ॥

---

[१] कूर्मस्वरूपी. [२] नरहरि. [३] वीरांस वडवाग्नि. [४] क्षत्रियरूप वनास वणव्यासारखा. [५] हे सीतापते. [६] इंद्राचे शत्रूंचा नाश करणारा.

॥९६ ॥ प्रद्युम्नानिरुद्ध नसतां आधीं ॥ अक्रूरें स्तवन केलें कधीं ॥ तरी अनादिसिद्ध हे प्रसिद्धि ॥ असे वेदीं व्यूहरूप ॥९७॥ सात्वतशब्दाची व्युत्पत्ति॥ भक्तपति कीं यादवपति ॥ इत्यादिशब्द दानपति ॥ स्तवी श्रीपती सप्रेमें॥९८॥

नमोबुद्धायशुद्धायदैत्यदानवमोहिने ॥ म्लेच्छप्रायक्षत्त्रहंत्रेनमस्तेकल्किरूपिणे ॥ २२ ॥

॥ टीका ॥ कल्क्यवतार झाला नाहीं ॥भावी लोकप्रासिद्धि पाहीं॥तैसे बुद्धादि तिये समयीं॥अक्रूरें दाही स्तवियेले ॥ ९९ ॥ नमो सदयरूपा बुद्धा ॥ हिंसाविमुखा परमशुद्धा ॥ स्वमुखें करूनि वेदनिंदा ॥ हेतुवादा प्रकटिलें ॥२०० ॥कळि होतां प्रवर्तमान ॥ देव ब्राह्मण वेद यज्ञ ॥ यांचीं सामर्थ्यें जाणोनि क्षीण॥दैत्यीं प्रयत्न आदरिला ॥ १ ॥ दैत्य धैर्यें सामर्थ्यवंत ॥ वेदोक्तयज्ञाचरणीं निरत ॥ तत्सुकृतें देवता समस्त ॥ पदच्युत करूं पाहती ॥ २ ॥ ह्मणोनि देवांच्या कैवारा ॥ निगम निंदूनि युक्तिद्वारा ॥ पाखंडयुक्ति अहिंसापरा ॥ दनुजां असुरां प्रबोधिल्या ॥ ३ ॥ मोह पावले दानव दैत्य ॥ तिहीं स्वीकेलें बौद्धमत ॥ पाखंडयुक्तिहेतु समस्त ॥ पथ वेदोक्त निंदूनी ॥ ४ ॥ दैत्यदानवांची बुद्धि ॥ मोह पावल्या नुमजे शुद्धि ॥ तिहीं वेदोक्तयज्ञविधि ॥ सांडूनि निषेधीं प्रवर्तले ॥ ५ ॥ दैत्यीं त्यजितां वेदोक्तपथा ॥ देवीं सांडिली मानसव्यथा ॥ ऐशा साधूनि सुरकार्यार्थी ॥ पुन्हा परमार्था प्रतिपादी ॥ ६ ॥ वेदनिंदाकरिता जो मी ॥ मम मुख पाहूंनयेचि तुह्मीं ॥ नधरूनि अवज्ञाभयाची ऊर्मी ॥ द्विजीं स्वधर्मीं वर्तावें ॥७ ॥ विप्रां ऐसी आज्ञा केली ॥ दैत्यां स्वमतें घालोनि भुली ॥ पाखंडपरिचर्या प्रशंसिली ॥ जे कळिकाळीं कळिगरिमा ॥ ८ ॥ ऐसिया बुद्धा परमशुद्धा ॥ दैत्यविमोहका प्रसि-

---

१ दैत्य.

द्धा ॥ युक्ति प्रकाशूनि विरुद्धा ॥ नमो अविरुद्धा वेदमया ॥ ९ ॥ अणि कळिकाळाचियेअंतीं॥ वेदमार्ग सर्व लोपती ॥ म्लेच्छप्राय क्षत्र होती ॥ त्यांची समाप्ति तूं कर्ता ॥२०॥ त्या कल्किरूपा तुज कारणें ॥ माझीं अनेक साष्टांग नमनें ॥ ऐसी स्तुति करूनि मनें ॥ करी प्रार्थने मोक्षार्थ ॥ ११॥ कोण्या बंधें बांधला कोण ॥मां त्याचें करावें विमोचन ॥ यदर्थी अक्रूर करी प्रार्थन ॥ तें सज्जन परिसोत ॥ १२ ॥

भगवन्जीर्वलोकोऽयंमोहितस्तवमायया ॥ अहंममेत्यसद्ग्राहोभ्राम्यतेकर्मवर्त्मसु ॥ २३ ॥

॥ टीका ॥ तरी एकदोघांची कायसी गोठी ॥ चराचरात्मक अवघी सृष्टि ॥ तुझे मायेनें मोहिल्या पाठीं ॥ वृथा चावटी सुटिकेची ॥ १३ ॥ ज्ञानें मुक्त झालों ह्मणती ॥परंतु नुगवे प्रपंचगुती॥ पडली अहंममताभ्रांति ॥ कर्मपथीं ते भ्रमवी ॥ १४ ॥ लटिका देह लटिकें गेह ॥ दारापुत्रादि लटिका मोह ॥ यांचा धरूनियां आग्रह ॥ करिती रोह[1] अभिमाना ॥ १५ ॥ आदि अवसान कळल्यावरी ॥ देह मी ह्मणोनि अभिमान धरी ॥ देहापूर्वीं कीं आतां उपरी ॥ कोण नविचारी मी ऐसें ॥ १६ ॥ देह कळलिया साद्यंत[2] ॥ आपण सहजचि देहातीत ॥ ऐसे जे कां विचारवंत ॥ तेही भ्रांत तव माया ॥ १७ ॥ कर्म प्राचीन जैसें होय ॥ ते ते मार्गीं भ्रमती देह ॥ धन सुत कांता कोठें राहे ॥ ममता वाहे भ्रमयोगें ॥ १८ ॥ मृदश्मदारु[3]मयमंदिर ॥ करकौशल्यकृतसुंदर ॥ स्थावरभूभागीं तें स्थिर ॥ परि ममता दुर्धर तनुभृतां[4] ॥ १९ ॥ प्रारब्ध फिरवी दिगंतरीं॥अन्यत्र वसती कृतमंदिरीं ॥ परंतु ममता जे अंतरीं ॥ ते सिंतरी[5] अध्यासें ॥ २० ॥ कीट कातिणी मशक मूषक ॥ गोधा मत्कुण सर्प वृश्चिक

---

[1] वृद्धि. [2] जन्ममृत्युयुक्त. [3] माती, दगड, लांकुडें यांचे गृह. [4] प्राण्यांला. [5] ठकवी.

ऐसे गृहाभिमानी अनेक ॥ ते ह्मणती मूर्खमनुजातें ॥ २१ ॥ मानत्र कृतगेहीं नयरती ॥ वृथा ममता वाहतां मरती ॥ स्त्रिया अन्यत्र व्यभिचारिती ॥ आपण फिरती तद्भरणा ॥ २२ ॥ तैसे नहों आह्मी जंतु ॥ स्त्रियादिभोगीं भरणरहितु ॥ आपुले सदनीं पावों अंतु ॥ वर्तों संतत सहवासें ॥ २३॥आमुचा मार्ग आचरों आह्मी ॥ ह्मणोनि अलिप्त कर्माकर्मी ॥पाप क्षाळूनि या जन्मीं अधर्मीं ॥ पुण्यधामीं मग विलसों॥२४ ॥ ऐसे जंतूहूनियां निपटारे ॥ मायामोहें नर निदसुरे ॥ असो त्यांविण काय नसरे ॥ मम गुंफिरे तें ऐक ॥ २५ ॥

अहंचाऽऽत्मात्मजागारदारार्थस्वजनादिषु ॥ भ्रमामिस्वप्नकल्पेषुमूढःसत्यधियाविभो ॥ २४ ॥

॥ टीका ॥ मी अक्रूर हे देहबुद्धि ॥ दारा सुत धन गेह उपाधि ॥ आप्तस्वजनबंधुसुहृदीं ॥ ममता बाधी सर्वत्र ॥ २६ ॥ देहा ह्मणवी जो अक्रूर ॥ तो देह असावा सुंदर ॥ धीर शूर बळप्रचुर ॥ परम चतुर असावा ॥ २७॥ माझे पुत्र मजहूनि बळी ॥ मजहूनि लक्षणें त्यां आगळीं ॥ क्षेम असावें सर्व काळीं ॥ ममता वाहटुळी ते ऐसी ॥ २८ ॥ विजयप्रतापी तनुज अनुज ॥ स्नेहाळ सभाग्य ऐश्वर्यपुंज ॥ सुहृद असावे ऐसे सहज ॥ नाचे भोज ते ममता ॥ २९ ॥ वृत्तिक्षेत्र सदन सधर ॥ दारा असावी परम चतुर ॥ सादर सुंदर मनोहर ॥ अव्यभिचार सुतजननी ॥ ३० ॥ अर्थसंग्रहं असाबा विपुल ॥ नित्य नूतन उद्योगकुशल ॥ व्यवसायं धनार्जनीं सफळ ॥ ममताजाळ हें गोवी ॥ २३१ ॥ सुत धन वनिता वृत्तिक्षेत्र॥ आप्त स्वजन गोत्र मित्र ॥ जैसें ज्याचें ब्रह्मसूत्र ॥ तितुकें मात्र त्यां जोडे ॥ ३२ ॥ जैसी जोडती त्यांची ममता ॥ त्यांसी नव्हावी विघ्नवार्ता ॥ रात्रदिवस हे

---

१ कोणत्याही कार्याविषयीं जो अप्रयोजक तो. २ गोंधळून जाई. ३ द्रव्यसंचय. ४ उद्योग.

हृदयीं चिंता ॥ ते अच्युता भजों नेदी ॥ ३३ स्वप्नप्राय हा संसार ॥ कळतां नश्वर क्षणभंगुर ॥ तथापि मानूनि अजरामर ॥ सत्य साचार प्रेम धरी ॥ ३४ ॥ कनक[1]बीज भक्षिल्या नरां ॥ भुललों हेंही कळे अंतरा ॥ तथापि भवंडी भ्रमाचा भंवरा ॥ तो त्या बाहिरा निघों नशके ॥ ३५ ॥ तेंवि या अविद्याभ्रमाची भुली ॥ अहंममता प्रबळ जाली ॥ तिणें मूढता बुद्धीसि केली ॥ तुजवेगळी ते नफिटे ॥ ३६ ॥ प्रभु ह्मणिजे तूं समर्थ ॥ अविद्यानाशक बोध यथार्थ ॥ तुज वेगळा जो परमार्थ ॥ विषयस्वार्थ अवघा तो ॥ ३७ ॥ कैसें बुद्धीचें मूढत्व ॥ तें तूं ऐकें सावयव ॥ वास्तवबुद्धि अवास्तव ॥ कवळी माव सुखलोभें ॥ ३८ ॥

अनित्यानात्मदुःखेषुविपर्ययमतिर्ह्यहम् ॥ द्वंद्वारामस्तमोविष्टोनजानेत्वात्मनःप्रियम् ॥ २९ ॥

॥ टीका ॥ इहलोकींचीं विभवें सकळें ॥ क्षणिकें ऐसें प्रत्यक्ष कळे ॥ नित्य मानिती कर्मफळें ॥ धरिती आगळें तत्प्रेमा ॥ ३९ ॥ ऐसेंचि आमुष्मिक[3] वोफळ[4] ॥ तें नित्य मानूनि कर्मफळ ॥ इष्टपूर्ताचरणीं[5] कुशळ ॥ प्रेमा विशाळ वाढवी ॥ ४० ॥ तैसेंचि देह दुःखागार ॥ विष्ठामूत्रांचें कोठार ॥ अस्थि चर्म मांस रुधिर ॥ जें अपवित्रदुर्गंधि ॥ ४१ ॥ विजातीय जो अनात्मा ॥ तो स्थूळदेह मानूनि आत्मा ॥ अहंबुद्धि निस्सीम प्रेमा ॥ धरी परमात्मा विसरोनी ॥ ४२ ॥ दुःखकारण सुतधननिलय ॥ क्षेत्र वनिता सुहृद प्रिय ॥ केवळ दुःखद जो समुदाय ॥ तो सुखमय भाविला ॥ ४३ ॥ सुखदुःखात्मक जें द्वंद्व ॥ तें जाणावें करणवृंद ॥ भोगीत तद्द्वारा आनंद ॥ परि झालों विषयांध हें नकळे ॥ ४४ ॥ हें व्हावया काय कारण ॥ सबाह्य तमोगुणाचें आवरण ॥

---

१ धोतऱ्याचें बीं. २ अज्ञान. ३ ऐहिक. ४ पोकळ. ५ यज्ञादिकर्म व तळीं बाधणें इ० कर्म.

तेणें आवडे यथेष्टाचरण ॥ यास्तव आठवण बुजाली ॥ ४५ ॥ यदर्थीं ऐका उदाहरण ॥ कोणें करून झांके कोण ॥ कोण त्यातें जाय टाकून ॥ तें व्याख्यान अवधारा ॥ ४६ ॥

यथाऽबुधोजलंहित्वाप्रतिच्छन्नंतदुद्भवैः ॥ अभ्येतिमृगतृष्णांवैतद्वत्त्वाऽहंपराङ्मुखः ॥ २६ ॥

॥ टीका ॥ मूढमति जैसा बाळ ॥ जें कां जलोद्भव गोंडाळ ॥ तेणें झांकलें त्यागूनि जळ ॥ धांवे केवळ मृगतोया ॥ ४७ ॥ तैसा तुजसी पराङ्मुख ॥ होऊनि लटिकें संसारदुःख ॥ अनुभवूं जातां पावे दुःख ॥ परि विवेक दृढ नुमजे ॥ ४८ ॥ लटिकें ह्मणसी संसारसुख ॥ तरी कां होसी विषयोन्मुख ॥ विषयत्यागीं काय अशक्य ॥ तें तूं सम्यक अवधारीं ॥ ४९ ॥

नोत्सहेऽहंकृपणधीःकामकर्महतंमनः ॥ रोद्धुंप्रमाथिभिश्चाक्षैर्ह्रियमाणमितस्ततः ॥ २७ ॥

॥ टीका ॥ कृपण[2]बुद्धीचें लक्षण ॥ विषयवासनापंकें मलिन ॥ ह्मणोनि अविद्याकामकर्में मन ॥ जालें क्षोभोन अनावर ॥ ५० ॥ विषय इंद्रियां वेधिती पूर्ण ॥ इंद्रियां विषयांचें चिंतन ॥ ऐसें परस्पराभिगमन ॥ यालागीं मन अनि[3]रुद्ध ॥ ५१ ॥ बलिष्ठें इंद्रियें नाटोपती ॥ विषयवासनासमळ मति ॥ ह्मणोनि मनातें आकर्षिती ॥ बळेंचि नेती इतस्ततः ॥ ५२ ॥ यालागीं आवरूं नशके मन ॥ ऐसाही तव चरणा शरण ॥ व्हावयासी काय काय कारण ॥ तें संपूर्ण अवधारीं ॥ ५३ ॥

सोऽहंतवांघ्र्युपगतोऽस्म्यसतांदुरापंतच्चाप्यहंभवदनुग्रहईशमन्ये ॥

---

१ जलसमूहा वर रुजलेली वनस्पति. २ अविचारी. ३ अनिवार.

पुंसोभवेद्यर्हिसंसरणापवर्गस्त्वय्यब्जनाभसदुपासनयामतिःस्यात् ॥ २८ ॥

॥ टीका ॥ जो मी आकळूं नशकें मन ॥ ऐसाही तव चरणा शरण ॥ ह्मणसी अजिंक ज्याचें मन ॥ तरी चरणा शरण तो कैसा ॥ ५४ ॥ ऐशिया परतंत्रा मजवरी ॥ हा अनुग्रहचि तुझा हरि ॥ येह्र्वीं पदभजना अधिकारी ॥ नोहे निर्धारीं मी देवा ॥ ५५ ॥ अंतर्यामी तूं ईश्वर ॥ तव पदभजनाचा अधिकार ॥ असज्जनासि दुर्लभतर ॥ अनुग्रह साचार मजवरि हा ॥ ५६ ॥ तव अनुग्रह पूर्ण असतां ॥ तव पदभजनीं उपजे आस्था ॥ ह्मणसी संतकृपेनें हें साधतां ॥ मज कां वृथा स्तवितोसी ॥ ५७ ॥ तरी जीवासि संसारनिवृत्ति ॥ तव कृपेवीण नोहे निश्चिती ॥ जैं तव कृपेची होय प्राप्ति ॥ तैं उपजे मति सद्भजनीं ॥ ५८ ॥ अब्जनाभ[1] हें संबोधन ॥ जे नाभिपद्मीं पद्मासनें[2] ॥ दृश्य द्रष्टा विश्वाभिमान ॥ तो होय लीन कृपेनें ॥ ५९ ॥ कृपा करिसी तूं त्द्दयस्थ ॥ तरीच आवडे परमार्थ ॥ होऊनि भवविषयीं विरक्त ॥ सत्पदनिरत तैं होय ॥ ६० ॥ ईश्वर अनुग्रह जोंवरी नकरी ॥ तंव सद्गुरु न दिसे पृथ्वीवरी ॥ आस्था नबैसे सच्छास्त्रीं ॥ नरुचे मैत्री संतांची ॥ ६१ ॥ अंतरीं नुपजतां सद्भाव ॥ प्रत्यक्ष भेटतां ननमी देव ॥ काय कृष्णा तुज दानव ॥ पुढें सावेव नदेखती ॥ ६२ ॥ तस्मात् त्द्दयस्थ तूं भगवान् ॥ कृपेनें अनुग्रह करिसी पूर्ण ॥ तैं मग आवडती सज्जन ॥ त्यांचें भजन करूं लागे ॥ ६३ ॥ अनन्य[3]भावें करितां सेवा ॥ कृपानुग्रह करिसी तेव्हां ॥ देती अक्षय चित्सुखठेवा ॥ भवहेळावा[4] मग कैंचा ॥ ६४ ॥ एवं तवानुग्रह मात्र ॥ करी सत्पदभजना पात्र ॥ ब्रह्मावबोधें सोज्वळ नेत्र ॥ तैं भवविचित्र भ्रमवीना ॥ ६५ ॥ ऐशिया कृपानुग्रहकरा ॥ सत्पथबोधक जो अंतरा ॥ तया घालूनि नमस्कारा ॥ प्रार्थी गिरा दोंश्लोकीं ॥ ६६ ॥

---

[1] अब्ज ह्म० कमळ,नाभीचे ठायीं ज्याच्या तो. [2] ब्रह्मदेव. [3] ईश्वरावांचून दुसरा त्राता नाहीं अशा बुद्धीनें. [4] संसारचा फेरा.

नमोविज्ञानमात्रायसर्वप्रत्ययहेतवे ॥ पुरुषेशप्रधानायब्रह्मणेऽनंतशक्तये ॥ २९ ॥

॥ टीका ॥ विज्ञानमात्रा[1] तुजकारणें ॥ माझें नमन अक्रूर ह्मणे ॥ विज्ञानमात्र तो कैसा कोणें ॥ पुसिलें प्रश्नें तरी ऐका ॥ ६७ ॥ सद्यः प्रसूतगर्भपाहीं ॥ प्रवृत्तिज्ञान नेणेचि काहीं ॥ परंतु स्वप्रत्यय त्याच्या ठायीं ॥ असे कीं नाहीं विचारा ॥ ६८ ॥ सूर्यकांतींचा हुताशन[2] ॥ तेथ नसतांही इंधन[3] ॥ अव्यक्त असे भरूनि गगन ॥ तेंवि विज्ञानमयमात्र ॥ ६९ ॥ मात्रशब्दें बोलिजे मान ॥ विज्ञानमात्र तव परिमाण ॥ सूर्यकांतज वेधी इंधन ॥ तेंवि भवभानवेधक तूं ॥ ७० ॥ प्राकृतप्रवृत्तिविस्तार ॥ कर पद अवयव जड शरीर ॥ तद्रहित तूं विज्ञानमात्र ॥ त्या नमस्कार तुज माझा ॥ ७१ ॥ सर्वग हृदयस्थ विज्ञानघन ॥ सर्वप्रत्यया[4] जो कारण ॥ श्रोत्र त्वग् दृग् रसना घ्राण ॥ ज्याचेनि सज्ञान स्वविषयीं ॥ ७२ ॥ अतएव सर्वप्रत्ययहेतु ॥ तो तूं मुळींचा विज्ञानतंतु ॥ ब्रह्मादितृणशाखापर्यंत ॥ साक्षी संतत संस्कारीं ॥ ७३ ॥ स्थूळादिमहाकारणवरी ॥ स्वप्रत्ययें अवस्था वरी ॥ वर्तोनि जंगमीं स्थावरीं ॥ देतां भंवरी भ्रमरहित ॥ ७४ ॥ पुरुषशब्दें बोलिजे जीव ॥ त्यासी सुखदुःखादि अनुभव ॥ प्रापक जो त्या ईश्वर नांव ॥ अविद्या स्वभाव काळ कर्म ॥ ७५ ॥ प्रधान ह्मणिजे तन्नियंता ॥ नमो त्या तुज श्रीभगवंता ॥ एवं प्रज्ञानाहूनि परता ॥ तूं तत्वता परब्रह्म ॥ ७६ ॥ एवं ब्रह्म जें कां निर्गुण ॥ अनंतशक्यात्मक परिपूर्ण ॥ आदिमध्यान्तरहित जाण ॥ तें प्रधान तुजमाजीं ॥ ७७ ॥ अनंता जे मायाशक्ति ॥ तुजमाजी तिची त्रिकाळवस्ती ॥ मृगजळाचे प्रवाह दिसती ॥ जेंवि गभस्तीं[5]माजूनी ॥ ७८ ॥ एवं प्रधाना[6] अधिष्ठान ॥ विज्ञानमात्र

---

[1] ज्ञानाचा अखंड अनुभवघेणें हें विज्ञान. मात्रा-मूर्ति [2] अग्नि. [3] लांकूड वगैरे. [4] सर्व ज्ञानाला. [5] किरणांतून. [6] प्रकृतीला.

तूं भगवान ॥ त्या तुज माझें साष्टांगनमन ॥ भवनिस्तरण तव नमनें ॥ ७९ ॥ अनंतानामें मायादेवी ॥ प्रधानशब्दें जे बोलावी ॥ तिचा प्रवर्तक गोसांवी ॥ तीतें चेष्टवी तो पुरुष ॥ ८०॥ तिचें चेष्टारूपस्फुरण ॥ काळ ऐसें त्या अभिधान ॥ काळपुरुष आणि प्रधान ॥ ब्रह्म परिपूर्ण अवघें तूं ॥ ८१ ॥ सर्वप्रत्ययासि तूं हेतु ॥ बोलिले तें प्रतिपादितु ॥ करी अच्युता प्रणिपातु ॥ तो श्लोकार्थ अवधारा ॥ ८२ ॥

नमस्तेवासुदेवायसर्वभूतक्षयायच ॥ हृषीकेशनमस्तुभ्यंप्रपन्नंपाहिमांप्रभो ॥ ३० ॥

॥ टीका॥ सर्व प्रत्ययाचीं कारणें॥अंतःकरणादि कर्तृकरणें॥ज्याचेनि तयां चेष्टणें॥एकात्मपणें तव बोधें॥८३॥ दृश्यपर्यंत अनुसर्जन॥तत्संहर्ता संकर्षण॥विषयस्फुरणें जो अभिमान॥भासे भवभान ज्याचेनी॥८४॥तया भवभाना माझारी ॥ अनुसंधानें[2] प्रवृत्ति विवरी ॥ज्ञानें रक्षक सर्वांतरीं॥ तो निर्धारीं वासुदेव ॥८५॥ सर्व संकल्पांचें जनन ॥ जेथ होय तें अनावर मन ॥ तो मनसिज[3] तूं प्रद्युम्न ॥ चाळक पूर्ण मनाचा ॥८६॥ ज्यातें रोधूं नशकती बुध॥बुद्धिसाक्षी तो अनिरुद्ध ॥ इत्यादि भेदीं जो अभेद ॥ तो तूं प्रसिद्ध हृषीकेश ॥ ८७ ॥ एवं संहार अवन जनन ॥ कर्मभेदें त्रिधाभिमान ॥ व्यूहरूपी संकर्षण ॥हरि प्रद्युम्न अनिरुद्ध ॥ ८८ ॥ जे उत्पत्तिस्थितिलयकर ॥ त्रिगुणावतारी विधि हरि हर॥तो तूं व्यूहात्मक श्रीधर॥परमेश्वर परमात्मा ॥८९॥ क्षयशब्दें बोलिजे धाम[4]॥ सर्वभूतक्षय हें नाम॥ सर्वभूताश्रय जो परम ॥ कीं विषयोद्गम जेथूनी ॥ ९०॥ शब्दापासूनि होय गगन॥ स्पर्शापोटीं उपजे पवन ॥ रूप प्रसवे हुताशन[5] ॥ रसीं जीवन[6] प्रकाशे ॥ ९१ ॥ गंधापासूनि होय धरणि ॥ एवं भूतें स्वकारणीं ॥ तन्मा-[7]

---

१ नियामक. २ चिंतनानें. ३ मदन. ४ स्थान. ५ अग्नि. ६ उदक. ७पंचभूतांचे सूक्ष्मांश.

त्राश्रय तो ह्मणोनी ॥ नामाभिधानीं भूतक्षय ॥ ९२ ॥ तन्मात्राश्रय जो अभिमान ॥ तो बोलिला संकर्षण ॥
विषयप्रलोभें होय निधन ॥ तें भूतसंहरण अविरुद्ध ॥९३॥ एवं सर्व सर्वात्मका ॥ अक्रूर वंदूनि त्रिजगज्जनका॥
रक्षीं ह्मणोनि श्रीपादुका ॥ नमी मस्तका स्पर्शोनी ॥ ९४ ॥ एवं स्वचरणां शरण मातें ॥ रक्षीं सिंपोनि
कृपामृतें ॥ हें प्रार्थन अनुचित येथें ॥ कीं प्रभुत्वें तूतें करणेंची ॥ ९५ ॥ सूर्यासम्मुख जालियावरी ॥ तो काय
प्रकाशा आवरण करी ॥ तेवीं शरणांतें अव्हेरी ॥ मग कैं थोरी प्रभुत्वा ॥ ९६ ॥ ह्मणोनि प्रभु या संबोधनें॥
प्रपन्न रक्षीं नलगे ह्मणणें ॥ म्यां जें प्रार्थिलें अधीरपणें ॥ तें साहणें सर्वज्ञा ॥९७॥ पंक्तीमाजी वाढितां अन्न॥
सर्वीं सर्वत्र समसमान ॥ बाळ मागे करूनि रुदन ॥ तेंवि प्रार्थन हें माझें ॥ ९८ ॥ अनन्यभावें शरणागत ॥
त्यातें नुपेक्षीच समर्थ ॥ मातें रक्षीं ह्मणोनि येथ ॥ भासे व्यर्थ मज माझें ॥ ९९ ॥ ऐसें अक्रूरें पुन्हा पुन्हा ॥
प्रार्थना करूनि नमिलें चरणा ॥ शुकें कथिलें मात्स्यीरमणा ॥ त्या व्याख्याना निरोपिलें ॥ ३०० ॥ वक्ष्यमाण
कथा पुढें ॥ एकेचाळिसाव्या माजी उघडें ॥ प्रमेय कथिजेल तें निवाडें ॥ श्रोतीं रोकडें परिसावें ॥ १ ॥
प्रवेशतां मथुरापुरीं ॥ बलिप्रदानीं रजक मारी ॥ पुढें वायकमाल्यकारीं ॥ विनयें हरि तोषविला ॥ २ ॥
अक्रूराशीं ऐश्वर्य पूर्ण ॥ दावूनि केलें शंकाहरण ॥ मथुरेमाजी प्रवेशून ॥ निववी स्वजन तें ऐका ॥ ३ ॥ कृष्ण
आनंदाचा कंद ॥ रजक स्वदोषें पावेल वध ॥ वायका माल्यकारा वरद ॥ कंसाविरुद्ध मखभंगें ॥ ४ ॥ हे
सविस्तर पुढें कथा ॥ सावध होऊनि परिसिजे श्रोतां ॥ नकीजे अपवर्गाची चिंता ॥सप्रेम रुचतां हरि गरिमा५॥
ब्रह्मांडभरित प्रतिष्ठानीं ॥ एकनाथ साम्राज्यदानीं ॥ चिदानंदाच्या आसनीं ॥ स्वानंदभुवनीं शोभतसे ॥ ६ ॥

---

१ नाश. २ शरणागत. ३ पुढें सांगावयाची. ४ तत्त्व. ५ शिपी. ६ माळी.

गोगणपति[१] गोविंदराव ॥ करितां कृपामृतवर्षाव ॥ उचंबळला दयार्णव ॥ कथागौरव तें भरितें ॥ ७ ॥ तें हें
श्रीमद्भागवत ॥ अशेष शब्दब्रह्ममथित ॥ अष्टादशसहस्रमित ॥ सार व्यासोक्त नवनीत जें ॥ ८ ॥ शुकें नृपाचे
श्रवणवदनीं ॥ सप्रेम भरितां सप्तदिनीं ॥ पुष्टि बाणली सायुज्यदानी[२] ॥ ब्रह्मांडभुवनीं नसमाये ॥ ९ ॥ त्यामाजील
हा स्कंध दशम ॥ अक्रूरें स्तविला पुरुषोत्तम ॥ श्रवणमात्रें पुरती काम ॥ अध्याय उत्तम चाळिसावा ॥ ३१० ॥
॥ ॥ इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायां श्रीकृष्णस्तवनसगुणनिर्गुणद्विप्रकाराक्रूरेणकथनंनामचत्वारिंशत्तमोऽध्यायः॥४०॥
॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्लोक ॥ ३० ॥ ॥ ओव्या ॥ ३१० ॥ ॥ एवं संख्या ॥ ३४० ॥

---

[१] इंद्रियगणांचा स्वामी. [२] ईश्वरस्वरूपी मिळणें अशी जी मुक्ति तीप्रत देणारी.

अध्याय ४१.

सदनोसदनीं उचित आराम ॥ फलपुष्पाढ्य शोभती द्रुम ॥ विराव करिती विहंगम ॥ हे शोभा उत्तम पुरगर्भी ॥१३१॥
वायक म्हणिजे शिंपी याति ॥ तेणें स्वकौशल्यें आपुले हातीं ॥ रामकृष्णांच्या उभय मूर्ति ॥ यथानिगुती अलंकारिल्या ॥३३८॥



श्रीकृष्णपरमात्मने नमः ॥ ॥ श्रीगोबिंदा दाविंगोश्री ॥ अनुलोमें तव नामगजरीं ॥ सप्रेम गातां गोव्यापारीं ॥ प्रकटे निर्धारीं तव धाम ॥ १ ॥ येथ मंत्रार्थ मंत्र फळ ॥ तीन्ही मिळोनि अभेद अमळ ॥ सच्चित्सुखघन विलासबहळ ॥ नुधवे हळहळ द्वैताची ॥ २ ॥ श्री जे रुचिरपणें रुचि ॥ केवळ आवडी इंद्रियांची ॥ विषयभ्रमें भ्रमे प्रपंचीं ॥ एऱ्हवीं साची चित्प्रभा ॥ ३ ॥ मागील गोडी नेणोनि पुढें ॥ विषयार्थ जीवचैतन्य वेडें ॥ तें तव नामाच्या उजिवडें ॥ होय उघडें चिन्मात्र ॥ ४ ॥ एवं चिन्मात्रैकप्रभा ॥ प्रपंचीं निष्प्रपंचशोभा ॥ गोविंदनामाच्या वालभा ॥ माजी गोगर्भा प्रकाशी ॥ ५ ॥ मग ते विलोमें परतोनि मूळा ॥ सेवी सन्मात्र स्वसोहळा ॥ जैसी सबाह्य गोडी गुळा ॥ तेंवि शोभला तो संच ॥ ६ ॥ आंत बाहेर अभेद गगन ॥ गगना ज्यामाजी सांठवण ॥ मोडूनि गेलिया त्रिपुटीभान ॥ सच्चिद्घन गोविंद ॥ ७ ॥ अनुलोम विलोम ओतप्रोत ॥ अन्वय व्यतिरेक्त प्रवृत्त निवृत्त ॥ इत्यादिवाक्यांचा मथितार्थ ॥ भ्रमोपशांत सन्मयता ॥ ८ ॥ तया सद्गुरु निजात्मरमणा ॥ अखंड अभेद प्रणाम चरणा ॥ भेदें भजतां सगुणें सगुणां ॥ अखंडपणा अविसंच ॥ ९ ॥ भजनामाजी त्रिपुटी सार ॥ कायिकवाचिकमानसपर ॥ तो हा माझा वाग्व्यापार ॥ ग्रंथाकार परिचर्या ॥ १० ॥ सद्गुर्वाज्ञासूत्रावरून ॥ दशमस्कंधाचें व्याख्यान ॥ चाळिसाव्यांत अक्रूरस्तवन ॥ केलें विवरण यथामति ॥ ११ ॥ आतां एकोत्तरचाळिसा ॥ माजी वृ-

---

१ उलटापालट. २ वाणीच्या व्यापारानें. ३ नाशरहितता. ४ सेवा.

त्तांत आहे ऐसा ॥ मथुरा प्रवेशतां जगदीशा ॥ रजक नाशा पावेल ॥१२॥ पुढें वायंका माल्यकारा ॥ संतोषोनि देईल वरा ॥ विभवें विलोकील निज नगरा ॥ नगरनागरा[2] हरि पाहती ॥ १३ ॥ ये अध्यायीं इतुकी कथा ॥ सप्रेमभावें परिसिजे श्रोतां ॥ श्रवणें निरसी भवभयव्यथा ॥ परमपुरुषार्था[3] प्रकाशी ॥ १४ ॥

स्तुवतस्तस्यभगवान्दर्शयित्वाजलेवपुः ॥ भूयःसमाहरत्कृष्णोनटोनाट्यमिवाऽऽत्मनः ॥ १ ॥

॥ टीका ॥ शुक ह्मणे गा कुरुभूवरा[4] ॥ इरालावण्यरसशृंगारा[5] ॥ धर्मपौत्रा[6] स्वधर्मचतुरा ॥ हरिचरित्रा परियेसीं ॥ १५ ॥ अखिलैश्वर्यसंपन्न ॥ तो जगदात्मा श्रीभगवान ॥ तेणें स्वरूप सगुण निर्गुण ॥ जळीं संपूर्ण दावूनियां ॥ १६ ॥ अक्रूर स्तवीत असतां पुढती ॥ उपसंहरिलें निजात्मशक्ति ॥ आपुली अवगणी[7] करी परती ॥ नट नाटयान्तीं ज्यापरी ॥१७॥ सगुण निर्गुण कैसें काय ॥ निखिलगुणात्मकविराटमय ॥ सगुण श्रीकृष्णरोहिणीतनय ॥ मूर्तिद्वय मनोहर ॥ १८ ॥ हें दावूनि लपविलें पुढती ॥ बाणली अक्रूरा प्रतीति ॥ तोही विस्मित होवोनि चित्तीं ॥ पूर्वस्थिति अवलोकी ॥ १९ ॥

सोऽपिचांतर्हितंवीक्ष्यजलादुन्मज्ज्यसत्वरः ॥ कृत्वाचाऽऽवश्यकंसर्वंविस्मितोरथमागमत् ॥ २ ॥

॥ टीका ॥ निमज्जनींच हें अद्भुत ॥ होवूनि लोपलें पैं समस्त ॥ मग उन्मज्जूनी त्वरान्वित ॥ मध्याह्नकुल संपादिलें ॥ २० ॥ स्नान वसन तिलकधारण ॥ संध्या अर्घ्य उपस्थान ॥ जप तर्पण देवार्चन ॥ मध्याह्नविधान संपविलें ॥ २१ ॥ कर्मसमाप्तिपर्यंत ॥ हृदयीं होत्साता विस्मित ॥ तैसाचि रथापाशीं त्वरित ॥ विस्मयभरित पा- ॥ १ ॥

---

१ शिष्याला. २ नागरिकस्त्रिया. ३ मोक्षार्थीला. ४ कुरुभूमीचा पति. ५ पृथ्वीरूपनायिकेच्या सौंदर्यरसाचा अलंकार. ६ धर्मराजाचा नातु. ७ सोंग.

तला॥२२॥ नेत्र वक्त्र तनु इंगितें ॥ त्याचीं लक्षूनि श्रीभगवंतें ॥ काय पुसता झाला त्यातें॥ तें रायातें शुक सांगे॥२३

॥ तमपृच्छद्धृषीकेशःकिंतेदृष्टमिवाद्भुतम् ॥ भूमौवियतितोयेवातथात्वांलक्षयामहे ॥ ३ ॥

॥ टीका ॥ अक्रूरातें करणपति[1] ॥ पुसता झाला भ्रूसंकेतीं ॥ परम विस्मय तुझ्या चित्तीं ॥ कोणे रीती दाटला ॥२४॥पूर्ण विस्मयें भरला ऐसा ॥ तुझा दिसतसे आकृतिठसा ॥ जळीं स्थळीं कीं विहायसा[2] ॥ नवलाव कैसा तो सांगें ॥ २५ ॥ हें ऐकोनि भगवद्वचन ॥ अक्रूराचें हृष्ट मन ॥ काय वदला तें सज्जन ॥सावधान परिसोत ॥२६॥

अक्रूरउवाच ॥ अद्भुतानीहयावंतिभूमौवियतिवाजले ॥त्वयिविश्वात्मकेतानिकिंमेऽदृष्टंविपश्यतः ॥ ४ ॥

॥ टीका ॥ अक्रूर ह्मणे कमलापति ॥ जितुकीं अद्भुतें येथ असती ॥ गगनीं जीवनीं आणि क्षितीं ॥ तितुकीं वर्तती तुजमाजी ॥ २७ ॥ विश्वात्मा तूं श्रीभगवंत ॥ तुज मी पाहत असतां येथ ॥ कोणतें नपाहिलें अद्भुत[3] ॥ एवं समस्त पाहिलें म्यां ॥२८॥ जरी तूं ह्मणसी श्रीअनंता॥माझे प्राप्तीपूर्वीं तत्वता ॥ तुज मी झालों उपलक्षिता॥ विस्मितवदनीं चमत्कृत ॥ २९ ॥ यास्तव भूजलगगनामाजीं[5] ॥ कांहीं आश्चर्य नेत्रकंजीं[4] ॥ देखिलें ह्मणोनि सांगपां सहजीं ॥ प्रश्न केला कौतुकें ॥ ३० ॥

यत्राद्भुतानिसर्वाणिभूमौवियतिवाजले ॥ तंत्वाऽनुपश्यतोब्रह्मन्किंमेदृष्टमिहाद्भुतम् ॥ ५ ॥

॥ टीका ॥ तरी तुझ्या ठायीं सर्वाद्भुतें ॥ पहात असतां मी त्या तूतें ॥ निश्चळ स्थलजला आंतौतें ॥ अद्भुत

---

[1] इंद्रियांचा नियामक. [2] आकाशांत. [3] चमत्कार. [4] नेत्रकमळांनीं. [5] मध्यें.

मातें काय गमे ॥ ३१ ॥ परब्रह्म तूं परमेश्वर ॥ तुजमाजी पाहतां चराचर ॥ जळीं स्थळीं गगनीं अपर ॥ विस्मयकर
उरलेंसे ॥ ३२॥ अद्भुत देखिल्यापरी मातें ॥ अवलोकिलें श्रीअनंतें ॥ हेंचि परमाद्भुत येथें ॥ याहूनि परतें नान्यत्र ३३
ऐसें ह्मणोनि नमिलें चरणा ॥ अक्रूर वळंघला मग स्यंदना ॥ वैयासँकि कुरुभूषणा ॥ सादर श्रवण करीं ह्मणे ॥ ३४ ॥

श्रीशुकउवाच ॥ इत्युक्त्वाचोदयामासस्यंदनंगांदिनीसुतः ॥ मथुरामनयद्रामंकृष्णंचैवादिनात्यये ॥ ६ ॥

॥ टीका ॥ इतुकें बोलोनि गांन्दिनीसुत॥ सवेग हांकिता झाला रथ॥ मथुरे सन्निध हरि अनंत॥ आणिले त्वरित दिनांतीं ३५

मार्गेग्रामजनाराजंस्तत्रतत्रोपसंगताः ॥ वसुदेवसुतौवीक्ष्यप्रीतादृष्टिंनचाददुः ॥ ७ ॥

॥ टीका ॥ राया ऐकें सावधान ॥ रामकृष्ण सहस्यंदन ॥ येतां आडवे ग्रामजन ॥ येती धांवोन पहावया
॥ ३६ ॥ खेट खर्वट ऊषरें पुरें ॥ घोष पल्लिका ग्राम कोटरें ॥ ते ते स्थळींचे जनपद सारे ॥ येती समोरे पहावया
॥ ३७ ॥ वसुदेवतनय रामकृष्ण ॥ देखतां जडती त्यांचे नयन ॥ समाधिस्थ योगिजन ॥ ब्रह्मीं लीन ज्यापरी ॥ ३८ ॥
रामकृष्णांच्या पाहतां मूर्ती ॥ दृष्टि जडल्या पुढती नुठती ॥ तटस्थ नहालती पातीं ॥ चित्राकृति स्मृतिविलयें
॥ ३९ ॥ ऐसे मार्गीं जन वेधले ॥ प्रसंगें राया तुज हें कथिलें ॥ नंदादिगोळी पुढें गेले ॥ ते ठाकले कृष्णार्थ ॥ ४० ॥

तावद्व्रजौकसस्तत्रनन्दगोपादयोऽग्रतः ॥ पुरोपवनमासाद्यप्रतीक्षंतोऽवास्थिरे ॥ ८ ॥

॥ टीका ॥ अक्रूर मध्याह्नीं कां राहिला ॥ गोपसमुदाय पुढें गेला ॥ मथुरोपवनीं तो उतरला ॥ वाट पाहत कृष्णाची ॥ ४१ ॥

---

१ चढला. २ व्यासपुत्र शुकाचार्य. ३ गांदीनी ही अक्रूराची माता. ही प्रत्यहीं ब्राह्मणास गोदान देत असे ह्मणून तिला हें नांव पडलें.

तान्समेत्याऽऽहभगबानक्रूरंजगदीश्वरः ॥ गृहीत्वापणिनापाणिंप्रश्रितंप्रहसन्निव ॥९ ॥

॥ टीका ॥ तंव ते रथेंसीं रामकृष्ण ॥ गोपसमुदायीं येऊन ॥ अक्रूरासीं बोले वचन ॥करीं धरून स्मितवक्रें
॥ ४२ ॥ परमविनीत नम्रभावें ॥ अक्रूरा निरोप दिधला देवें॥ काय कथिलें तें आघवें ॥ अवधारावें ये श्लोकीं ४३॥

भवान्प्रविशतामग्रेसहयानःपुरींगृहम् ॥ वयंत्विहावमुच्याथततोद्रक्ष्यामहेपुरीम्॥१० ॥

॥ टीका ॥ अक्रूरासी ह्मणे हरि ॥ पुढें जावें त्वां झडकरी ॥ प्रवेशोनियां मथुरापुरीं ॥ नृपांगारीं रथ लावीं
॥ ४४ ॥ कंसा कथूनि ममागमन ॥ मग प्रवेशें आपुलें सदन ॥ आह्मी नंदादि गोपगण ॥ येथें उतरोन विश्रामों ॥ ४५ ॥ मग प्रवेशों मथुरापुरीं ॥ यथावकाशें वयस्यभारीं ॥ नगरशोभा पाहों नेत्रीं ॥ हें अक्रूरें श्रोत्रीं
ऐकोनी ॥ ४६ ॥

॥ अक्रूरउवाच ॥ नाहंभवद्भ्यांरहितःप्रवेक्ष्येमथुरांप्रभो ॥ त्यक्तुंनार्हसिमांनाथभक्तंतेभक्तवत्सल ॥ ११ ॥

॥ टीका ॥ ह्मणे तुह्मांवीण मी सहसा ॥ योग्य नव्हें मथुराप्रवेशा ॥जळा वेगळा तळमळी मासा॥ व्याकुळ
तैसा मम प्राण ॥ ४७ ॥ प्रभु समर्थ तूं ऐश्वर्यनिधि ॥ गोपशैशव हे उपाधि ॥ स्वभक्त टाकणें ऐसी बुद्धि ॥
कोणें विधि आदरिली ॥ ४८ ॥ भक्तवत्सल तूं आमुचा नाथ॥ प्रभुत्वें ऐश्वर्यें समर्थ ॥ असतां वियोगणें हा
अर्थ॥मज यथार्थ तर्केना ॥ ४९ ॥ सांडूनि सुहृद गोपगण ॥ जातां संकोच मानी मन ॥ समस्तीं यावें तरी तूं

---

१ राजवाड्याजवळ. २ मित्रसमूहासह.

दीन ॥ ह्मणोनि अनुमान तर्किंसी ॥ ५० ॥ तरी तूं नाथ आमुचे शिरीं ॥ तेणें सर्व समृद्धि घरीं ॥ कोणेविसीं
संकोच नकरीं ॥ सहपरिवारीं चालावें ॥ ५१ ॥

आगच्छयामगेहान्नःसनाथान्कुर्वधोक्षज ॥ सहाग्रजःसगोपालैःसुहृद्भिश्चसुहृत्तम ॥ १२ ॥

॥ टीका ॥ साग्रज सुहृद सबल्लव ॥ सहित यानें शकट सर्व ॥ आश्रम सनाथ[1] करूनि देव ॥ हें अपूर्व मज दावीं
॥ ५२ ॥ अपूर्व देव ह्मणसी कैसें ॥ तरी सुहृत्तमें[2] पुराणपुरुषें[3] ॥ मज गौरवावें विशेषें ॥ श्रीजगदीशें अधोक्षजें ॥ ५३ ॥
बाह्य शरीराचे जे आप्त ॥ सुहृद ह्मणिजेती ते समस्त ॥ तूं सर्वात्मक सर्वगत[4] ॥ परमपुरुषार्थ[5] सुहृत्तम ॥ ५४ ॥ ह्मणोनि
सनाथ मजला करीं ॥ आश्रमा येईं सहपरिवारीं ॥ तेणें लाहीन ऐश्वर्यथोरी ॥ कोणेपरी तें ऐक ॥ ५५ ॥

पुनीहिपादरजसागृहान्नोगृहमेधिनम् ॥ यच्छौचेनानुतृप्यंतिपितरःसाग्नयःसुराः ॥ १३ ॥

॥ टीका ॥ गृहस्थधर्मांचे अधिकारी ॥ आह्मी गृहमेधी संसारी ॥ आमुचे आश्रम पवित्र करीं ॥ पदरजवारिकर्दमें[6]
॥ ५६ ॥ सरज श्रीपादशौचोदक ॥ पडतां ममांगणीं[7] सम्यक ॥ नांदीमुख[8] अश्रुमुख ॥ अर्यमप्रमुख दिव्यपितर
॥ ५७ ॥ सोमप[9] उष्मप बर्हिषद ॥ मौनप सूक्तप अग्निष्वद[10] ॥ कव्यवाहनादि[11] पितर विशद ॥ अक्षय आनंद
पावती ॥ ५८ ॥ गार्हपत्यादि[12] समस्त अग्नि ॥ तव पादावनेजनीं[13] ॥ तृप्त होतां सर्वी यज्ञीं ॥ अवभृथस्नानीं
कृतपूत ॥ ५९ ॥ श्रीपादशौचोदकें करून ॥ इंद्रप्रमुख सुरवरगण ॥ अक्षय तृप्ति पावती पूर्ण ॥ तैं तप कोण

---

१ शोभमान. २ अत्यंत मित्रानें. ३ आदि पुरुषानें. ४ सर्वव्यापी. ५ मोक्ष. ६ पायांची धूळ आणि पाणी यांच्या चिखलानें ७ माझ्या अंगणांत. ८ लग्नांत नांदीश्राद्ध ज्यांस उद्देशून करितात ते पितर. ९ ब्राह्मणांचे पितर. सोमपादि सात हे पितृलोकवासी पितर आहेत. १० अग्निष्वात्तादि हे देवांचे व ब्राह्मणांचे पितर होत. ११ पितरांस अर्पिलेलें अन्न खाणारे पितर वि० १२ दक्षिण, गार्हपत्य, आहवनीय हें अग्नित्रय. १३ पादोदकानें.

नाचरलों ॥ ६० ॥ एवं त्रिलोकीतर्पण ॥ घडलें तच्छ्रेयःसंपादन ॥ ऐसें आश्रम करी पावन॥ पदरज क्षाळून आंगणीं ॥ ६१ ॥ आश्रममात्र पवित्र नव्हे ॥ श्रीपदप्रक्षालनगौरवें ॥ दुर्लभ ऐश्वर्य जोडे दैवें॥तें आघवें अवधारीं ॥६२॥

अवनिज्यांघ्रियुगलमासीच्छ्लोक्योबलिर्महान् ॥ ऐश्वर्यमतुलंलेभेगतिंचैकांतिनातुया ॥ १४ ॥

॥ टीका ॥ अंघ्रियुगळ प्रक्षाळून ॥ परम कीर्त्यर्ह होईन ॥ अतुळ ऐश्वर्य लाहीन ॥ आणि निर्वाणमोक्षश्री ॥६३ ॥ पूर्वी अवनेजनें कोणासी ॥ ऐश्वर्य जोडलें ऐसें ह्मणसी ॥ तरी तूं ऐकें हृषीकेशी ॥इयेविषीं निरोपितों ॥ ६४ ॥ वैरोचनि जो कां बळी ॥ त्रिपादभूमिप्रदानकाळीं ॥ तवांघ्रियुगळाच्या पाखाळीं ॥ स्वकीर्ति धवळी जगत्त्रयीं ॥ ६५ ॥ आणि तूतें काठीकार ॥ करूनि अजस्र राखवी द्वार ॥ विषम नमनी तव अंतर ॥ जैंवि पिता पुत्रैश्वर्यें ॥ ६६ ॥ पिता पुत्राची सेवा करी ॥ विषम नवटे उभयांतरीं ॥ हेचि अतुलैश्वर्यथोरी ॥ जे सत्ता तुजवरी ज्या विभवें ॥ ६७ ॥ ब्रह्मादिकांचेही माथां ॥ अगाधैश्वर्यें जोडे सत्ता ॥परी तूतें राबवी अक्षोभता ॥हें ऐश्वर्य तत्वता बळीचें ॥ ६८ ॥ आणि भोगूनि शक्रासन ॥ सर्वथा बळीसी नाहीं पतन॥एकांतीं कीं गति संपूर्ण॥ भक्तासमान नित्यमुक्त ॥ ६९ ॥ क्षीणपुण्यें इतर शक्र ॥ पतन पावती अधोवक्र ॥ बळी ते गतीसी नोहे पात्र ॥ परम पवित्र सुश्लोक्य ॥ ७० ॥

आपस्तेंऽघ्न्यवनेजन्यस्त्रींल्लोकाञ्शुचयोऽपुनन् ॥ शिरसाधत्तयाःसर्वःस्वर्याताःसगरात्मजाः ॥१५॥

---

१ पाय धुण्यानें. २ विरोचनपुत्र. ३ निर्मळपणानें. ४ द्वारपाल. ५ निरन्तर. ६ स्तवनकरण्यास योग्य.

टीका ॥ तुझीं पादावनेजनजळें ॥ त्रिलोकी पावन करिती अमळें ॥ शिरीं धरिलीं जाश्वनीळें ॥ आणि उद्धरिलें सगरात्मजां ॥ ७१ ॥ ऐसा तव पादप्रक्षालनें ॥ श्लाघ्य संपन्न बहुकल्याणें ॥ पावेन ऐसें कृपाळुपणें॥ कीजे ह्मणोनि प्रार्थिलें ॥७२॥ मग विचारी अंतःकरणीं ॥ जेथ कुंठित निगमवाणी ॥ अनंतवदनीं शिणला फणी ॥ तो कैं स्तवनीं स्तविजेल ॥ ७३ ॥ आतां नमनमात्रचि करणें ॥ अभीष्ट जाणिजेल सर्वज्ञें ॥ ऐसें विवरोनि अंतःकरणें करी वंदन तें ऐका ॥ ७४ ॥

देवदेवजगन्नाथपुण्यश्रवणकीर्तन ॥ यदूत्तमोत्तमश्लोकनारायणनमोऽस्तुते ॥ १६ ॥

॥ टीका ॥ देव ह्मणिजे द्योतमान ॥ दिविभुवन ज्यां वसतिस्थान ॥ त्यांतें द्योतक चैतन्यघन॥ त्या तुज नमन देवदेवा७५अखिलजगाची नाथनशक्ति ॥ सत्तायोगें धरिसी पुरती ॥ जगन्नाथ तूं जगत्पति ॥विदित विनति तुज माजी ॥ ७६ ॥ पुण्यरूप ज्याचें यश ॥ जन्मकर्म लीलावेश ॥ श्रवणें कीर्तनें निरसी दोष ॥ निःश्रेयस निष्पादी७७ तया पुण्यश्रवणकीर्तना ॥नमो नमो जी श्रीजनार्दना॥जाणसी माझी विज्ञापना॥अभीष्टज्ञा पुण्ययशा॥७८॥ ययातिशापें समळकुळ ॥ स्वजन्में केलें त्रिजगीं धवळ ॥ यालागीं कालत्रयीं मंगळ ॥ नाम निर्मळ यदूत्तम ॥ ॥७९ ॥ अमळकीर्ति निगमप्रणीत ॥ तो हा उत्तमश्लोकसंकेत ॥ स्मृतिपुराणीं महर्षि गात ॥ नमो अद्भुतऐश्वर्या ॥ ८० ॥ नारायणा नरायंतना ॥ गुणभूतात्मक नारस्थाना ॥ एवं नमन निर्गुणा सगुणा॥ संबोधूनि पृथक्त्वें ॥ ८१ ॥ अक्रूरें मानूनि आपुले मनीं ॥ नामस्मरणीं अभिवंदूनी ॥ भगवत्प्राप्ति अमृतदानीं ॥ साधन याहूनि आन नसे ॥ ८२ ॥

---

१ पाय धुतलेलीं उदकें. २ तीन लोक. ३ शंकरानें. ४ वेदवाणी. ५ शेष. ६ प्रकाशमान. ७ प्रकाशक. ८ नियमनशक्ति. ९ कल्याण. १० नर हें स्थान ज्याचें.

ह्मणोनि बहुधा सबोधनें ॥ स्मरोनि करितां अभिवंदनें ॥ कृपादृष्टी जनार्दनें ॥ पाहोनि वचनें बोलतसे ॥ ८३ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ आयास्येभवतोगेहमहमार्यसमन्वितः ॥ यदुचक्रद्रुहंहत्वावितरिष्येसुहृत्प्रियम्॥ १७ ॥

॥ टीका ॥ श्रीकृष्ण ह्मणे अक्रूरातें ॥ मी येईन तव गृहातें ॥ अग्रजें सहित येऊनि तेथें ॥ अभीष्टातें पुरवीन ८४
परंतु यदुकुलमंडलद्रोही ॥ जंववरी कंस वधिला नाहीं ॥ तंववरी कोठें नवचें पाहीं ॥ तें रहस्य कांहीं अवधारीं ८५
मी जाईन जयाच्या सदना ॥ कंस तयाच्या करील कदना ॥ आणि विपरीत भेदभावना ॥ तुझ्या ठायीं कल्पील ८६
यालागीं वधूनि यदुकुळद्वेष्टा ॥ सदना येईन सहित श्रेष्ठा ॥ सुहृदां आप्तां कनिष्ठां ज्येष्ठां ॥ प्रिय अभीष्टा वोपीन ८७
ऐसी भगवन्मुखींची वाणी ॥ अक्रूरें घेवूनि आपुले श्रवणीं ॥ जैसा दुष्काळीं बुभुक्षु प्राणी ॥ त्यागी जाणोनि विषान्न ८८

श्रीशुकउवाच ॥ एवमुक्तोभगवतासोऽक्रूरोविमनाइव ॥ पुरींप्रविष्टःकंसायकर्माऽऽवेद्यगृहंययौ ॥ १८ ॥

॥ टीका ॥ शुक ह्मणे गा कौरवराया ॥ तैसा आग्रह सांडूनियां ॥ अभिवंदूनि देवकीतनया ॥ निघता आला वि-
मनस्क[1] ॥ ८९ ॥ विमनस्काचे परी म्लान ॥ कीं अभीष्ट प्राप्तीचें व्यवधान[2] ॥ मग मथुरापुरीं प्रवेशोन॥ कंसा जा-
वून भेटला ॥ ९० ॥ प्रभुत्वें जुहारूनियां कंस ॥ समासें[3] निवेदी कृतकर्मास ॥ जे आज्ञेप्रमाणें उभयांस॥ घेऊन
आलों भोजेंद्रा ॥ ९१ ॥ आणि नंदादि सर्व पशुप ॥ नानाद्रव्यें रस अमूप ॥ उपवनीं उतरले समीप ॥ कथिलें
संक्षेप कृतकर्म ॥ ९२ ॥ मग घेउनि कंसाज्ञा ॥ अक्रूर जाता झाला सदना ॥ यानंतरें कुरुभूषणा॥ कृष्णाचरणा
अवधारीं ॥ ९३ ॥

---

[1] खिन्न झालेला. [2] आच्छादन. [3] संक्षेपानें.

अथापराह्णेभगवान्कृष्णःसंकर्षणाऽन्वितः ॥ मथुरांप्राविशद्गोपैर्दिदृक्षुःपरिवारितः ॥ १९॥

॥ टीका ॥अक्रूरविसर्जनानंतर ॥ अपराह्णकाळीं जगदीश्वर ॥ साटोप साग्रज सानुचर ॥ वयस्यभारवेष्टित ॥९४॥ देखावया मथुरापुरी ॥ आवडी धरूनि अभ्यंतरीं ॥ प्रवेशला कोणेपरी ॥ तें अवधारीं कुरुभूपा ॥ ९५ ॥ जैसी कृष्णें देखिली पुरी ॥ चौंश्लोकीं ते शुकवैखरी ॥ वदली तेसें व्याख्यान चतुरीं ॥ भाषाविवरीं परिसावें ॥ ९६॥

दद्दर्शतांस्फाटिकतुंगगोपुरद्वारांबृहद्धेमकपाटतोरणाम् ॥
ताम्रारकोष्ठांपरिखादुरासदामुद्यानरम्योपवनोपशोभिताम् ॥२० ॥

॥ टीका ॥ गगनचुंबित महाद्वारें ॥ रम्य स्फटिकांचीं गोपुरें ॥ वज्रगोमेदपाचप्रवरें ॥ रत्नविचित्रें खेवंणिलीं ॥ ९७ ॥ गोपुरशिखरीं झळकती ध्वजा ॥ सरत्नकलशा तेजःपुंजा ॥ गमे पालविती अधोक्षजा ॥ स्वधामवोजा पहावया ॥ ९८ ॥ विशाळ स्फटिकाच्या चौकटी ॥ गणपति रेखिले ऊर्ध्वपाटीं ॥ उभय विशाखउंबरवटीं ॥ शोभा गोमटी जाडेताची ॥ ९९ ॥ उभय विशाखमूळभागीं ॥ क्षीरोदमथनोद्भवश्वेतांगी ॥ स्फटिकप्रतिमा दिग्गजलिंगीं ॥ वज्रमणींचे चौदंती ॥ १०० ॥ तयासेजीं उंबरवटा ॥ कमठाकृति नील निघोंटा॥अल्प उन्नता मध्यकोष्ठा ॥ कीर्तिमुखें तें विशाळें ॥ १ ॥ वल्ली कमळें शुक सारिका ॥ जडित रत्नीं निर्मिल्या देखा ॥ खणोखणीं चित्रपताका ॥ पवनें लखलखा झळकती ॥ २ ॥ चंड कपाटें पुरटघटित ॥ वज्रमणीचे शंकु वृत्त ॥ कील-

---

१ नगरद्वारावरील इमारती. २ त्या त्या रत्नांनीं खचित केलीं. ३ हिऱ्याचे. ४ शेजारीं. ५ कांसवाचे आकाराचा.
६ घनदाट. ७ मध्यगृह. ८ स्वर्णनिर्मित. ९ वर्तुलाकार.

कीलनें उत्कीलित ॥ जेंवि निशांत रविउदयीं ॥ ३॥ रत्नजडित कनकपर्णें ॥ मुक्तादामपाचकिरणें ॥ खणोखणीं रम्य तोरणें ॥ भासुर सदनें लाजविती ॥ ४ ॥ भंवते परिखं वरुणालयां ॥ सारिखे सजळ भरले राया ॥ नक्रां मकरां यादोनिचयां ॥ क्रीडावया विस्तीर्ण ॥ ५ ॥ उपपरिखांच्या परिधिवसें ॥ दुर्गाग्रभाग अष्टांश दिसे॥ परप्रयत्ना असाध्य कैसे ॥ दुर्गम जैसें मृत्युमुख ॥ ६ ॥ मूळपाषाण लोहबंदी ॥ उपरी अष्टलोहांची वेदी ॥ वप्रप्रकोष्ठीं संधीं संधीं ॥ यंत्रसमृद्धि परहननीं ॥ ७ ॥ पाचपेरोजमरकतचर्या ॥ शोभती दुर्गाग्रीं बरविया॥काद्रव्यें फणा उभारलिया ॥ जेंवि पहाया गरुडातें ॥ ८ ॥ परिखाप्रदेशीं उपवनें ॥ पुष्पवाटिका सुगंध सुमनें॥ क्रमुक कदळी द्राक्षाविपिनें॥ श्रीसंपन्नें शोभती ॥ ९ ॥ जाई जुई मालती कुंद ॥ बकुळसेवंतीचंपकवृंद ॥ वायु सुगंध मंद मंद ॥ झळके विशद निगूढत्वें ॥१०॥ ऐशा अनेक पुष्पयाती ॥ फळसमृद्ध तरुवर किती ॥ नगरा भोंवत्या उपवनपंक्ती ॥ सुरस शोभती जलसौख्यें ॥ ११ ॥ नगरापासूनि दुरी ना जवळी ॥ रम्योद्यानें सुफळित फळीं ॥ पनस अच्युत शाल शाल्मली ॥ बदरी आंवळी अशोक ॥ १२ ॥ ताल तमाल तील तितिणी जंबु ॥ वट अश्वत्थ उंबर निंब ॥ कपित्थ चंदन बिल्व कदंब ॥ बहुविध निंबें लकुचादि ॥१३ ॥मधु प्रियाळु श्लोष्मातकी ॥ कुटज राजादन केतकी ॥ तूत तुरंज भल्लातकी ॥ पार्यातकी वनशोभा ॥ १४ ॥ ऐसीं उद्यानें अनेक॥ नगराभोंवती पृथक् पृथक् ॥ रहाट मोठा कूप तटाक ॥ संपथ वापी पुष्करणी॥१५ ॥ पक्षिविराव वनोपवनीं ॥ भ्रमर गुंजारवती सुमनीं ॥ किलकिलाती वानरश्रेणी ॥ बहुविध प्राणी निविताती ॥ १६ ॥ वनोपवनाभोंवत्या

---

१ खिळे ठोकण्यानें. २ खिळे काढून मोकळें केलेलें. ३ खंदक. ४ समुद्र. ५ जलजंतुसमूहाला. ६ परिघामुळें.
७ अष्टधातूंची. ८ उंच चौक ९ तटाचे मध्यभागीं. १० तेज.

भिंती ॥ द्वारें देहल्या बैठका निगुती ॥ जलयंत्रांच्या ऊर्ध्वगती ॥ विचित्र शोभती शालाग्रीं ॥ १७ ॥ चौक रमणीय चैत्यं[1] वेदी ॥ पाचस्फाटिकमाणिक्यबंदी ॥ वैदूर्यमाणि जडिले संधी ॥ नुमजे कधीं दिनरजनी ॥ १८ ॥ असो ऐसे नृपाराम ॥ नगराभोंवते उत्तमोत्तम ॥ पाहता झाला मेघश्याम ॥ नगरी परम शोभाढ्य ॥ १९ ॥ ताम्र तार नारी पुरटं[2] ॥ अष्टलोह आरकूटं[3] ॥ तन्मयघटिता शाला निघोंट ॥ वस्तुसंघाट साठविणें ॥ १२० ॥ धेनुमहिषीकुञ्जरशाला ॥ शकटशाकटीस्यंदनशाळा ॥ अजाअविकक्रमेळ[4]शाळा ॥ अश्वशाळा विस्तीर्ण ॥ २१॥ देवागारेंधर्म शाळा ॥ मठ मठिका पर्णशाळा ॥ वेदशास्त्राध्ययनशाळा ॥ यज्ञशाळा प्रशस्ता ॥ २२ ॥ चित्रविचित्र रंगशाळा ॥ अस्त्रें शस्त्रें वस्त्रशाला ॥ रुग्णोपचारी[5] भेषजशाळा ॥यंत्रशाळा सद्रव्या ॥२३॥ नाट्यशाळा नाटक शाळा ॥ वाद्यशाळा वादकशाळा ॥ नृत्यशाळा नर्तकशाळा ॥ गायनशाळा गांधर्वी ॥२४॥ पारधीच्या समृद्धिशाळा ॥ दस्युदमनादिबंदिशाळा ॥ कुरंगव्याघ्रशुनक[6]शाळा ॥ गोळांगुळ[7]श्येनादि[8] ॥२५ ॥ अष्टादशधान्यसमृद्धि ॥ धननिक्षेप महानिधि ॥ ताम्रारकोष्ठा ये पदबोधीं ॥ अर्थ ऐसा प्रकाशे ॥२६॥सौरभ्यशाळा परिमळद्रव्यें ॥ रसांचे संग्रह विविधें गव्यें ॥ भांडागारें राजसेव्यें ॥ जैसीं दिव्यें सुरसदनें ॥२७॥ बहुविध नेपथ्यमांदुसा ॥ गणना नलगे सुवर्णकोशां ॥ वैदूर्यरत्नाच्या अशेषा ॥ संदोहशाला[9] भटगुप्तां[10] ॥ २८ ॥ आणिक कोणे प्रकारें पुरी ॥ देखता झाला कैटभारि ॥ ते पुरगर्भींची संपदाकुसरी ॥ परिसिजे चतुरीं विशेषणीं ॥ २९ ॥

सौवर्णश्रृंगाटकहर्म्यनिष्कुटैःश्रेणीसभाभिर्भवनैरुपस्कृताम् ॥
वैदूर्यवज्रामलनीलविद्रुमैर्मुक्ताहरिद्भिर्वलभीषुवेदिषु ॥ २१ ॥

---

[1] मंडप. [2] सोनें. [3] पितळ. [4] उंट. [5] रोग्यांस उपचार करणाऱ्या. [6] कुत्रा. [7] वानर. [8] ससाणा. [9] वस्तुसमूहाच्या शाळा. [10] वीररक्षित.

॥ टीका ॥ सुवर्ण[१]चतुष्पथ [२]चैत्यद्रुम ॥ [३]धनिकवेव्हारें सभाग्यपरम ॥ त्यांच्या सदनश्रेणी रम्य ॥ हेम[४]हर्म्यमंडिता॥ ३०॥ सदनोसदनीं उचित आराम ॥ फळपुष्पाढ्य शोभती द्रुम ॥विराव करिती विहंगम॥हे शोभा उत्तम पुरगर्भीं ॥ ३१ ॥ सहस्रेंसहस्र एकैक जाती ॥ [५]वार्धुषांच्या दुकानपंक्ति ॥ सभाशब्दें त्या बोलिजती ॥ जडित शोभती हाट[६]वटिया ॥ ३२ ॥ रत्नमणींचे बंबाळ ॥ रात्रौ तेजःपुंज बहळ ॥ वर्जित[७]तैलवसनानळ ॥ दिवट्या केवळ त्या गमती ॥ ३३ ॥ वणिक् [८]वराटवसनक्रयी ॥ हेम[९]तारताम्रक्रयी ॥ विविधधातु[१०]मुद्राक्रयी॥[११]पणनिष्कादि घडमोडी ॥ ३४ ॥ [१२]पत्रारूढधनप्रेक्षक ॥ [१३]शुल्बकांस्यादिभाजनक्रयिक ॥ [१४]स्वर्णस्तेयपांचाळप्रमुख ॥ अनेक शिलिपकसच्छ्रेणी ॥ ३५ ॥ धान्यविक्रयी अपार ॥ शाकाफलौघपुष्पनिकर ॥ नागवल्लीपर्णकार ॥ तांबूलकार ज्या नाम ॥ ३६ ॥ महामौल्य शरचापकार ॥ खड्गादि अनेक शस्त्रकार ॥ गजाश्वादि [१५]पल्याणकर ॥ स्यंदनकार शिबिकादि ३७ [१६]तंतुवायक माल्यकार ॥ [१७]परिमळद्रव्यक्रयी अपार ॥ नानारंगीं [१८]रंगकार ॥ बहु विकार हेमादि ॥ ३८ ॥ अनेक रत्नक्रयविक्रयी ॥ घृततैलादिरसक्रयी ॥ पयाज्य[१९]शर्कराविकारक्रयी ॥ आणि समवायी औपकरणी ॥ ३९ ॥ [२०]कारुक [२१]भिषक [२२]कैवर्तक ॥ [२३]और्णतार्णपदक्रयिक ॥ इंधनतृणक्रयी चर्मक ॥ आणि अल्पक कार्त्रिमी ॥ ४० ॥ ऐसिया वार्धुषसभाश्रेणी ॥ हेमहर्म्या कलशाभरणी ॥ निवेशनीं ससोपानीं ॥ ध्वजातोरणीं विराजती ॥ ४१ ॥ तदनुकूल त्यांचीं भवनें ॥ [२४]चतुःशालात्मकविस्तीर्णें ॥ जडित रत्नें विचित्र किरणें ॥ शुद्धकांचन लखलखिती ॥ ४२ ॥

---

[१] चवाठे. [२] मंदिरें. [३] श्रीमंतलोकांचीं घरें. [४] स्वर्णमय मंदिरांनीं सुशोभित. [५] व्याजवट्टा करणारे सावकार. [६] दुकानें.
[७] तेल, फडके, अग्नि. [८] कवड्या. [९] रुपें. [१०] नाणीं. [११] पैसा. [१२] हुंडीचे व्यापारी. [१३] तांबें. [१४] सोनार. [१५] खोगीर,
[१६] कोष्टी. [१७] आतारी. [१८] रंगारी. [१९] हलबाई. [२०] शिल्पी. [२१] वैद्य. [२२] कोळी. [२३] लोकरीच्या व तृणाच्या वस्तु. [२४] चौसोपी वाडा.

पंचसप्तनवैकादश ॥ त्रयोदश पंचदश सप्तदश ॥ एवमादि ताळें तेतिस ॥ उच्चता विशेष नभोगर्भी ॥ ४३ ॥
कलशावरते वैडूर्यमणि ॥ जेथ दुंनवटिजे रविकरणीं ॥ भासती जनपदांच्या नयनीं ॥ अनेक तरणि प्रकाशले ४४
माजी मंदिरांची रचना ॥ स्फटिकवेदिकातळवटीं जाणा ॥ मरकत सूदलें स्तंभासना ॥ कोरींव सुमना समसाम्य॥
॥ ४५ ॥ इंद्रनीळाचे वरती स्तंभ ॥ उथाळीं हिऱ्याचीं स्वयंभ ॥ पीठप्रभा विद्युन्निभ ॥ पुष्कराजांच्या फांकती ॥
॥ ४६ ॥ खगेंद्ररत्नांचे तुळवट ॥ गोमेदाचे कासवट ॥ माणिकाचे पिधानपाट ॥ कनकें निघोंट घोंटिले ॥ ४७ ॥
वलभीशब्दें ज्या मोहटिया ॥ प्रवाळमुक्ताफळीं सजिलिया ॥ तेथ वेदिका निर्मिलिया ॥ तेथ पक्षियां सुखवसती॥ ४८
उत्तरभागीं यमुनावनें ॥ संतुष्ट शोभती द्विजवरभुवनें ॥ पूर्वप्रदेशीं क्षत्रियसदनें ॥ नृपोपकरणें मिरविती ॥४९ ॥
पश्चिमभागीं वेशवाट ॥ वीथी चतुष्पथ निघोंट ॥ राजमार्ग घडघडाट ॥ ज्यांतें शृंगाट बोलिजे ॥ ५० ॥ शूद्रप्रमुख अवर जाती ॥ दक्षिणभागीं त्यांची वसती ॥ अनुलोमविलोम जे संतति ॥ ते नांदती तदाश्रयें॥५१॥देवसदनासमीप देखा ॥ पूजकमाल्यकगायकप्रमुखां ॥ वसती अष्टविध सेवकां ॥ अष्टभूमिप्रदेशीं ॥५२ ॥ दिवाकीर्ति कौलिक रजक ॥ घडसी नटक मद्योत्पादक ॥ किरात धीवर वागुरिक॥ याम्यें पृथक् तत्पल्ली ॥५३ ॥ याहूनि दुरी दूरतर ॥ म्लेच्छ चांडाळ डोंबडोहर ॥ श्वपच पुल्कस हिंसकपामर ॥ मळापहार परपाल्लिका ॥ ५४ ॥
दो श्लोकीं हे नगररचना ॥ निरोपूनियां योगिराणा ॥ यावरी निरोपी सौभाग्यचिह्ना ॥नगराभरणा दोंश्लोकीं५५ ॥

---

१ दुप्पड होणें. २ पाचेचे. ३ कडिपाट. ५ कडणी, बांसा इ. ६ घराचे वांशांच्या शेवटीं बसविलेली आडवी फळी. ७ शोभविल्या. ८ खुराडीं, ९ यमुनेचीं उदकें, १० वेश्यागृहें. ११ उच्चनीच अ० नीचोच्च वर्णापासून झालेले. १२ न्हावी. १३ कोष्टी. १४ कातकरी. ५ कोळी. १६ पारधी. १७ दक्षिणेकडे, १८ अतिनीच जातीचा. १९ चांडाळ. २० भंगी.

जुष्टेषुजालामुखरंध्रकुट्टिमेष्वाविष्टपारावतबर्हिनादिताम् ॥
संसिक्तरथ्यापणमार्गचत्वरांप्रकीर्णमाल्यांकुरलाजतंडुलाम् ॥ २२॥

॥ टीका ॥ गृहाग्रभागीं ज्या वलभिया ॥ मदालसांवरी आच्छादिलिया ॥ स्वर्णवेदी तेथ केलिया ॥मुक्ताप्रवाळीं मणिबद्धा ॥ ५६ ॥ चित्रांबरासारिखीं छिद्रें ॥ पद्में स्वस्तिकें सर्वतोभद्रें ॥ तियें गवाक्षें जालरंध्रें ॥ सूक्ष्में सुन्दरें रत्नमयें ॥ ५७ ॥ आंतून पाहतां बाहिर दिसे ॥ बाह्य जनातें आंत न दिसे ॥ जालरंध्रें त्या ह्मणिजेत असें ॥ शोभा विशेष सदनाची ॥ ५८ ॥ तेथ पक्षी बसावया ॥ रत्नकुट्टिमें निर्मिलीं राया ॥ शुक सारिका रम्य चिंडिया ॥ शब्द करिती ते ठायीं ॥ ५९ ॥ मयूर परावत चातक ॥ हंस सारस चक्रवाक ॥ चकोर खंजरीट लावक ॥ पिका पंचमस्वर गाती ॥ ६० ॥ तेणें नादित मथुरापुरी ॥ पाहता झाला कैटभारि ॥ सालंकृता कवणे परी ॥ तें अवधारीं कुरुभूपा ॥ ६१ ॥ वीथीशब्दें राजपथ ॥ हाटवीथीसी पण्यसंकेत ॥ चौकचौबारे चतुष्पथ ॥ प्रांगणपंक्ती गृहश्रेणी ॥ ६२ ॥देवालयादि रंगभूमि॥नगरीमाजी सर्वसद्मीं॥ केशरचंदनमिश्रितकर्दमीं ॥ संमार्जनें सर्वत्र ॥ ६३ ॥ सुगंधद्रव्योदकें प्रोक्षिलीं ॥ मुक्ताफळांच्या रंगवल्ली ॥ दिव्यसुमनें वरी विखुरलीं ॥ तंडुललाज सुमंगळ ॥ ६४ ॥ गृहश्रेण्यादि प्रांगणवीथी॥ सालंकृता ऐसिया रीती ॥ त्यावरी द्वारार्चनाची निगुती ॥ ते शुकोक्ति श्रोतीं परिसावी ॥ ६५ ॥

---

१ राजसभांवर, २ सोन्याचीं खुराडी. ३ रत्ननिबद्ध भूमि, ४ चिमण्या, ५ दुकानांची रांग, ६ रांगोळ्या. ७ लाह्या.

आपूर्णकुंभैर्दधिचंदनोक्षितैःप्रसूनदीपावलिभिःसपल्लवैः ॥
सवृंदरंभाक्रमुकैःसकेतुभिःस्वलंकृतद्वारगृहांसपट्टिकैः ॥ २३ ॥

॥ टीका ॥ उंबरवटाकोटिप्रदेशीं ॥ करूनि भूवरी तंडुलराशि ॥ शुद्धोदकें पूर्ण कलशीं ॥ भरूनि त्यांवरी स्थापूनी ॥ ६६ ॥ पटकुलपट्टिका कलशां गळां ॥ वरी शोभती सुमनमाळा ॥ तळीं पुष्पावळी वर्तुळा ॥ चंदन प्रोक्षिला दधियुक्त ॥ ६७ ॥ आम्रपल्लव कलाशां वदनीं॥त्यांवरी हेमपात्रें स्थापूनी ॥ दीपावळी अभ्यर्चूनी ॥ देदीप्यमाना प्रज्वळिता ॥ ६८ ॥ कलशांनिकटी रंभास्तंभा ॥ फळगुच्छेंसीं वरिष्ठ शोभा ॥ कदळें क्रमुक तोरणप्रभा ॥ आम्रपत्रें खाद्यादि ॥ ६९ ॥ क्रमुकस्तंभ उच्चतर ॥ त्यांवरी पताका चित्रविचित्र॥ गगनीं तरळती भासुर ॥ अमरनगरा लाजविति ॥ ७० ॥ ऐसी समस्तां सदनद्वारीं ॥ शोभा समसाम्य साजिरी ॥ मंगळरूपा वृद्धाचारीं ॥ शुकवैखरी ते वदली ॥ ७१ ॥ नगरगर्भीं पूर्वापर ॥ ऐसी शोभा निरंतर ॥ आला जाणोनि कमलावर ॥ पुरी अपार हरिखेली ॥ ६२ ॥ पूर्वदेहींच पतिव्रता ॥ प्रफुल्लितांगी आलिया भर्ता ॥ तैसी मथुरा आनंदभरिता ॥ अवलोकितां निजनाथें ॥ ७३ ॥ किंवा जैसी पूर्विलाहुनी ॥ शोभा दुणवटे वसंतें वनीं ॥ किंवा उदया येतां तरणि ॥ जैंवि पद्मिनी प्रोल्लसिता ॥ ७४ ॥ ऐसी लावण्यलक्ष्मी पाहीं ॥ प्रफुल्लित पुरीच्या ठायीं ॥ पाहता झाला शेषशायी ॥ ते हे नवायी मुनि वदला ॥ ७५ ॥ समासें केलें पुरीवर्णन ॥ येथून संपलें हेंप्रकरण ॥यावरी कृष्णसंकर्षण- ॥ प्रवेशकथन अवधारा ॥ ७६ ॥

---

१. उंबऱ्याच्या दोन्ही शेवटास २ केळीचे खांब. ३ पाफळीचे स्तंभ४दुप्पट होते. ५ संक्षेपानें.

तांसंप्रविष्टौवसुदेवनंदनौवृतौवयस्यैर्नरदेववर्त्मना ॥
द्रष्टुंसमीयुस्त्वरिताःपुरस्त्रियोहर्म्याणिचैवाऽरुरुहुर्नृपोत्सुकाः ॥ २४ ॥

॥ टीका ॥ उत्तराजठरार्णवसंभूता ॥ हरिगुणश्रवणभूषणमुक्ता ॥ ऐकें परीक्षिति जीवन्मुक्ता ॥ सभाग्य श्रोता मीनलासी ॥ ७७ ॥ राया ऐसिये मथुरेप्रति ॥ वयस्यवेष्टित रामश्रीपति ॥ राजमार्गें प्रवेश करिती ॥ तें ऐकोनि युवति मथुरेच्या ॥ ७८ ॥ त्यांतें देखावया कारणें ॥ परम उत्सुका अंतःकरणें ॥ सवेग आल्या उत्सुकचिह्नें ॥ सकारणें अवधारा ॥ ७९ ॥ औत्सुक्यासी कारण काय॥जे नारदवचनें कंसराय ॥ रामकृष्ण वसुदेवतनय ॥ जाणोनि उपाय तद्धननीं ॥ ८० ॥ अक्रूरासी अंळोचून ॥ येथ आणिले व्रजा धाडून ॥अतां वधील हे गुणगुण ॥ पुरींचे जन गुजगुजती ॥ ८१ ॥ हें ऐकूनि नगरनारी ॥प्रवेशतां राममुरारी॥ लावण्य पाहों डोळेभरी॥ऐशा अंतरीं उत्सुका ॥ ८२ ॥ कानीं पडतांचि हर्षागमन ॥ वस्तुसामर्थ्यें वेधे मन ॥ होवोनि ठेलें पैं उन्मन ॥ प्रवृत्तिभान पारुषलें ॥ ८३ ॥ आले ऐकूनि राममुरारी ॥ एकी चढलिया माडियांवरी ॥ एकी वळघल्या गोपुरीं ॥ प्रासादशिखरीं पैं एकी ॥ ८४ ॥ एकी भिंतीवरी ओळघल्या ॥ एकी अटालियांवरी चढल्या ॥ जालरंध्रीं पहात ठेल्या ॥ एकी धांवल्या नृपमार्गें ॥ ८५ ॥ राजमार्गाच्या प्रांगणीं ॥ उच्चस्थानीं गृहांगणीं ॥ स्त्रीपुरुषादि मुंडपघसणी ॥ ज्ञाती कोणी नस्मरती ॥ ८६ ॥ औत्सुक्यविस्मृतिलक्षणें ॥ श्लोकयुग्में बादरायणें ॥ वाखाणिलीं तीं परिसूनि मनें ॥ निर्भर होणें सज्जनीं ॥ ८७ ॥

---

१ मित्रांनीं वेष्टिलेला. २ त्यांच्या वधाविषयीं. ३ हळूच सांगून. ४ नाहींसें झालें. ५ राजवाडा. ६ गच्चीवर. ७ गवाक्षाच्या छिद्रांतून. ८ परस्परांचीं डोकीं घासण्या जोगी झालेली गर्दी.

काश्चिद्विपर्यग्धृतवस्त्रभूषणाविस्मृत्यचैकंयुगलेष्वथापराः ॥
कृतैकपत्रश्रवणैकनूपुरानांक्त्वाद्वितीयंत्वपराश्चलोचनम् ॥ २५ ॥

॥ टीका ॥ एकी नेसल्या विपरीत वसनें ॥ केलीं उत्तरीयें परिधानें ॥ नेसणीं करूनियां प्रावरणें ॥ निःशंकमनें धाविन्नल्या ॥ ८८ पदर पांघुरते नेसल्या ॥ नेसते पदर पांघुरल्या ॥ प्रौढा परवंटा नेसोनि आल्या ॥ निरिया खोंविल्या पाठीसीं ॥ ८९ ॥ एकी नेसल्या कंचुकिया ॥ शिरीं घेती साडिया घडिया ॥ आंगें धांवती उघडिया ॥ झाल्या वेडिया हरिवेधें ॥ ९० ॥ विपरीत भूषणें लेइल्या एकी ॥ कर्णभूषणें घातलीं नाकीं ॥ नासिकाभरणें एकी मस्तकीं ॥ लेत्या झाल्या लगबगां ॥ ९१ ॥ एकी मेखळा घालिती गळां ॥ कटी वेष्टूनि कंठमाळा ॥ गळा सांडूनि मोकळा ॥ दंडीं बांधिल्या गळसऱ्या ॥ ९२ ॥ वाळे वांकी एके पायीं ॥ दुसरे चरणीं लेइल्या नाहीं ॥ तैशाच धांवती लवलाहीं ॥ नथरे देहीं देहस्मृति ॥ ९३ ॥ जडित चुडा एके हस्तीं ॥ दुसरा बुचा कर न स्मरती ॥ बाहुभूषणें एके हातीं ॥ दुजे बांधिती पैं निढळीं ॥ ९४ ॥ पंखे बाळ्या एके कर्णीं ॥ लेइल्या तांतडी करूनी ॥ दुजा मोकळा नस्मरोनी ॥ गजगामिनी धांवती ॥ ९५ ॥ एके श्रवणीं तानवडा ॥ दुसरा विसरल्या श्रवणमुडा ॥ सऱ्या चितांक बाणले दन्डा ॥ कंठीं गोंडा वेणीचा ॥ ९६ ॥ काजळ सूदलें एका नयना ॥ दुजा तैसाच विसरोनि सुणा सवेग धांवती मृगलोचना ॥ जना आपणा नोळखती ॥ ९७ ॥ व्याही जांवई मेहुणे॥श्वशुर देवर भर्ता पिशुनें ॥ नेणती विस्मृत वस्त्राभरणें ॥ निःशंकमनें धांवती ॥ ९८ ॥ वासनाभरणें अस्ताव्यस्त॥ तियें निरूपिलीं संकेतें ॥ आतां करितां राहिलीं कृत्यें ॥ तीं तूं समस्तें अवधारा ॥ ९९ ॥

---

१ भूषण राहित. २ उघडा. ३ घातलें. ४ उघडा. ५ चहाडखोर.

अश्नंत्यएकास्तदपास्यसोत्सवाअभ्यज्यमानाअकृतोपमज्जनाः ॥
स्वपंत्यउत्थायनिशम्यनिःस्वनंप्रपाययंत्योऽर्भमपोह्यमातरः ॥ २६ ॥

॥ टीका ॥ एकी क्षुधिता जेविती ताटीं ॥ ग्रास चाविती मोडिती बोटीं ॥ तंव कृष्णागमनचा[1]वटी ॥ श्रवणपुटीं प्रवेशली ॥ २०० ॥ उत्साहभरिता श्रवणमात्रें ॥ क्षुधे तृषेसी विसरल्या पात्रें ॥ कृष्णदर्शना उत्सुक नेत्रें ॥ धांवतां गात्रें नावरती ॥ १ ॥ धांवतां पदर रुळतीं बिं[2]दीं ॥ येरी वनितांची मांदी खुरंदी ॥ गळोनि पडल्या नोहे शुद्धि ॥ धांवती नुसधीं कलेवरें ॥ २ ॥ मुखीं भरले जे षड्रस ॥ चावणें गिळणें हे स्मृति ओस ॥ हातीं उचलिले तैसेचि ग्रास ॥ जाती जगदीशा पहावया॥३॥ह्याहीहूनि कौतुक आन ॥ राया ऐकें सावधान ॥ केवळ लज्जेचें भाजन॥ तो हा स्त्रीजन विधिसृष्ट ॥ ४ ॥ त्याही अभ्यंग करावया ॥ तैलें सर्वांगीं माखलिया ॥ शिरीं चर्चूनि चोखणिया ॥ स्नाना आलिया शिळेवरी ॥ ५ ॥ वसनाभरणरहित आंगें ॥ वरी माखली चोखणी रंगें ॥ धांवती वेधलिया श्रीरंगें ॥ प्रवृत्ति[4]पांगें नपांगती ॥ ६॥ डोई चिकटली घांसती अबळा ॥ कृष्णमृत्तिका मर्दिली बा[5]ळां ॥ कर्दम सर्वांगीं माखला॥ मुखमंडल अनोळखी ॥ ७ ॥ तैशाच तनु नसांवरीत ॥ जळें नहोतां सुस्नात ॥ धांवती वधू शतानुशत ॥श्रवणें विस्मित परीक्षिति ॥ ८ ॥ एकी प्रसुप्ता सुखसेजारीं ॥ कृष्णागमनोत्सवाच्या गजरीं॥ अग्नि स्पर्शतां द्रव्ययंत्रीं ॥ गोळापरी धांवती त्या ॥ ९ ॥ बाळका पाजिती स्नेहाळ जननी ॥ कृष्णागमनोत्सव पडतां कानीं ॥ धांवतां पडलीं स्तनींहूनी ॥ नेणती ग्लानि रुदनाची ॥ १० ॥ राया येथ नवल काय ॥ करणज्ञानें प्रपंच होय ॥ करणोपरमें फावल्या सोय ॥

---

[1] बातमी. [2] रस्त्यांत. [3] संसारचिंतेनें. [4] निश्चयापासून नढळती. [5] केशांला.

तें स्वप्नप्राय भवभान ॥ ११ ॥ स्वप्नसंसारीं प्रसवली ॥ पुत्रें सहित ते पहुडली ॥ दैवें अवचिती जागृति आली ॥ मग कैं माउली शिशु जोपी ॥ १२ ॥ तैसा परमात्मा सुखकंद ॥ करणां फावल्या तत्सुखवेध ॥ देहस्मृतीचा होय अबोध ॥ येथ विरोध कोणता ॥ १३ ॥ ऐशा धांविल्या वाडेंकोडें ॥ कृष्ण पाहती निजांनिवाडें ॥ कृष्णें जाणूनि त्यांचिये चाडे ॥ कोण्या पाडें तोषविल्या ॥ १४ ॥

मनांसितासामरविंदलोचनःप्रगल्भलीलाहसितावलोकनैः ॥
जहारमत्तद्विरदेंद्रविक्रमोद्दशांददच्छ्रीरमणात्मनोत्सवम् ॥ २७ ॥

॥ टीका ॥ जे लीलेनें विधिहरसुर ॥ मोहिले होत्साते अजस्त्र ॥ वर्तती होवोनि लीलातंत्र ॥ प्रगल्भतर यास्तव ते ॥ १५ ॥ अबळामोहकें जीं कौशल्यें ॥ प्रबुद्ध तियें मानिती शल्यें ॥ प्रगल्भलीलारससाफल्यें ॥ हरिचांचल्यें विधिंगोळीं ॥ १६ ॥ अयस्कांतें चळती लोह ॥ तैसा प्रगल्भलीलामोह ॥ त्रिजगा वेधक हरिविग्रह ॥ वनितासमूह तो वेधी ॥ १७ ॥ इंद्रनीळाचें गाळोनि किळ ॥ सुनीळप्रभा कोमळ अमळ ॥ तत्प्रतिमेचा रंग सोज्वळ ॥ फांके निर्मळ चिद्गगनीं ॥ १८ ॥ तो हा अद्यापि योगिजन ॥ लक्षयोगें मुरडूनि नयन ॥ पाहोनि होताती उन्मन ॥ सच्चित्सुखघन तनुधारी ॥ १९ ॥ कमलनेत्रीं कोमळदृष्टि ॥ उद्दामलीलानाटकयष्टि ॥ त्रिभंगीं ठाण ठकारधाटी ॥ चाले जगजेठी ठमकत ॥ २० ॥ रत्नजडित शोभे मुकुट ॥ बर्हश्रेणी ललाटजुंष्ट॥ कुटिल कुंतल श्रवणानिकट ॥ पाहे व्यंकट स्मितवदनीं ॥ २१ ॥ गंड मंडित कुन्तळकांति ॥ दशनीं कोटिचंद्रांची द्युति ॥ सरळ नासिका चापाकृति ॥ भ्रूतरळती सविभ्रमा ॥ २२ ॥ उभयोष्ठांच्या मीलनोन्मीलनीं ॥ आनंद कोंदे ब्रह्मांडभुवनीं ॥ सुललित श-

---

१ मोठ्या हर्षानें. २ आत्मतुल्य. ३ प्रेमाला. ४ पद्धतीनें. ५ नित्य. ६ ब्रह्मांडांत. ७ लोहचुंबक. ८ कृष्णशरीर. ९ तेज. १० मस्तकानें सेवित.

ब्द निघती वदनीं ॥ ज्यांच्या श्रवणीं श्री वेधे ॥ २३ ॥ चिबुक हनुवटी वर्तुळ ॥ कंबुकंठ बाहु सरळ॥ कपाटसन्निभ वक्षःस्थळ ॥ ककुदीं[2] सबळ वृषसाम्य ॥ २४ ॥ केयूरांगदें दंडलीं दंडीं ॥ मनगटीं जडित कंकणजोडी ॥ तरळ मुद्रिकांच्या उजिवडीं ॥ फांके ब्रह्मांडीं विद्युद्दीं[3] ॥ २५ ॥ जगदुद्धार त्रिवळी सहित ॥ नाभि गंभीर दक्षिणावर्त ॥ सूक्ष्म रोमराजी अनुदित[4] ॥ अंबर पीत परिधान ॥ २६ ॥ मेखळे क्षुद्रघंटिकादाटी ॥ पल्लव सोडूनि मालगांठी ॥ जानु वर्तुळ त्रिकोणघोंटी ॥ चरणतळवटीं भास्करभा[5] ॥ २७॥ चरणीं वाळे वांकी अंदु ॥ पदविन्यासें उमटती शब्दु ॥ गजेंद्रविक्रम श्रीगोविंदु ॥ चाले अमंदमंदवत् ॥ २८ ॥ दिव्यकौशेयपट[6] प्रावरण ॥ उभय पल्लव देदीप्यमान ॥ डुलत चाले मत्त वारण ॥ तैंवि श्रीकृष्ण पद ठेवी ॥ २९॥ संवगडियांच्या खांदावरी ॥ हात ठेवूनि चाले हरि ॥ तरळ भ्रूकुटी कमलनेत्रीं॥सस्मितवक्रीं वधू वेधी ॥३०॥ कृष्णदर्शना उतावीळा ॥ तनुविस्मृता नगरअबळा ॥ धांवूनि आलिया त्यांसि डोळां ॥ सुखसोहळा दाखवी ॥३१॥ प्रगल्भलीलारसिक तनु ॥ सविलासहासावलोकेंकरून ॥ रमणीय रमेचें रमवी मन ॥ निववी वधूगण त्यारूपें ॥ ३२ ॥ सनाथ केल्या लक्ष्मीहोन ॥ मानसें हरीनें नेलीं हरून ॥ लावण्य दाविलें डोळे भरून ॥ जाल्या निमग्न स्वानंदीं ॥ ३३ ॥ उत्सव देवूनि वधूनयनांसी ॥ हरिता झाला मानसांसी ॥ ना त्या स्वानंदसमरसीं ॥ निमग्न केल्या कां नह्मणा ॥ ३४ ॥ तिहीं ते देखोनि कृष्णमूर्ति ॥ कैसी भोगिली निजविश्रांति ॥ तें तूं ऐकें परीक्षिति ॥ ह्मणे भारती[7] शुकाची ॥ ३५ ॥

दृष्ट्वामुहुःश्रुतमनुद्रुतचेतसस्तंतत्प्रेक्षणोत्स्मितसुधोक्षणलब्धमानाः ॥
आनंदमूर्तिमुपगुह्यदृशाऽऽत्मलब्धंहृष्यत्त्वचोजहुरनंतमरिंदमाधिम् ॥ २८ ॥

---

१ दरवाज्याच्या फळी प्रमाणें विस्तीर्ण. २ मान. ३ विजेचें तेज. ४ स्पष्ट न उगवलेली. ५ सूर्यतेज. ६ रेशमीवस्त्र. ७ वाणी.

॥ टीका ॥ अनंतजन्में श्रुतिस्मृति॥वर्णितां ऐकिली ज्याची कीर्ति॥ ते हे प्रत्यक्ष कृष्णमूर्ति ॥ नारदोक्ति श्रुत होती ॥ ३६ ॥ वारंवार श्रवणेंकरून ॥ पूर्वींच सवेध होतें मन ॥ मूर्ति अकस्मात देखोन ॥ निर्भर पूर्ण उत्साहें ॥ ३७ ॥ विशेषसविलास तत्प्रेक्षण ॥ हास्ययुक्त सुंदर वदन॥ तेंचि केवळ सुधासेवन॥ लाहोनि नयन निवाले ३८ मग त्या दृष्टी सम्मानप्राप्ता ॥ स्मितावलोकनामृतें तृप्ता ॥ नेत्रें प्राशूनि आंतौता ॥ नेती एकांता हृत्पद्मीं ॥ ३९॥ फावलिया मानससदनीं ॥ आनंदमूर्ति कवटाळूनी॥निर्भर झाल्या आलिंगोनी॥ त्वचा थरकोनि हरिखेल्या ॥ ४० ॥ अरिंदम हे परीक्षिति॥ वामा पावोनि निजविश्रांति ॥ अनंत जन्मींची वियोगखंती ॥ ते निश्चिती टाकिली ॥ ४१ ॥ अरिंदम हें संबोधन॥ निर्जित षड्वैरी ह्मणोन॥ शृंगाररसीं झणें निमग्न॥ होसी ह्मणोनि सुचविलें ॥ ४२ ॥ शृंगाररसभावें हे कथा॥ झणें घेसी धरित्रीनाथा ॥ तरी दुर्जय काम उधवील माथा ॥ मग सत्पथा अंतरसी ॥ ४३ ॥ अरिंदमसंबोधनें करून॥ ऐसें केलें सावधान॥ ह्मणे राया हें निरूपण॥ शान्त संपूर्ण वेदांत ॥ ४४ ॥ ऐशा आनंदनिर्भर नारी॥ हृदयीं आलिंगूनि श्रीहरि॥ प्रसन्नवदना कोणे परी ॥ राममुरारी त्या यजिती ॥ ४५ ॥

प्रासादशिखरारूढाःप्रीत्युत्फुल्लमुखांबुजाः ॥ अभ्यवर्षन्सौमनस्यैःप्रमदाबलकेशवौ ॥ २९ ॥

॥ टीका ॥ उभ्या होत्या प्रासादशिखरीं ॥ गवाक्षद्वारीं कीं गोपुरीं ॥ कृष्णप्रेमें त्या समस्त नारी ॥ वक्रकद्वारीं प्रफुल्लिता ॥ ४६ ॥ रामकृष्णांवरी तिये समयीं ॥सुष्ठु सुमनांची वृष्टि तिहीं ॥केली ह्मणतांच राजा हृदयीं ॥ शंकित होवोनि पुसतसे ॥ ४७ ॥ तनुविस्मृता धांवल्या नारी ॥ तेव्हां सुमनें कैंचीं करीं ॥ त्या वर्षल्या कवणे परी ॥ हे अंतरीं मज शंका ॥ ४८ ॥ मुनि ह्मणे गा श्रोतया चतुरा॥ प्रेमोत्कर्षें वधू निर्भरा ॥ शोभनमा-

---

१ आयताच. २ शत्रूचें दमन करणारा. ३ सुन्दर स्त्रिया. ४ मुखकमल.

नससुमनभारा[1] ॥ वर्षत्या झाल्या उल्लासें ॥ ४९ ॥ उत्फुल्लप्रीतीच्या निर्भरीं ॥ अनंदाश्रु वर्षती नेत्रीं ॥ नेत्रकमळीं कृष्णावरी ॥ वर्षती ऐसें नह्मणिजे ॥ ५० ॥ कीं हर्षें रोमांचित त्वचा ॥ पुलक पाझर सुखस्वेदाचा ॥ तोचि वर्षाव तत्सुमनांचा ॥ प्रेमोत्साहें नमनावा ॥ ५१ ॥ नातरी सप्रेम सादर श्रवणें ॥ सेवितां कृष्णाचें बोलणें ॥ कळवळूनि अंतःकरणें ॥ द्रवणें वृष्टिसम नोहे ॥ ५२ ॥ कीं कारुण्यें अंःतकरणीं ॥ शोभन शब्द निघती वदनीं ॥ ते अभीष्टवृष्टि गगनसुमनीं[2]॥ केली ह्मणोनि नमनावें ॥ ५३ ॥ एवं मनाचे शोभन भाव ॥ सौमनस्य त्यांचें नांव ॥ तिहीं वर्षल्या नारी सर्व ॥ हें अपूर्व तुज कथिलें ॥ ५४ ॥ आणिक कित्येक वृद्ध पुरंध्री[3] ॥ लाजाक्षतासुमनोपचारीं[4] ॥ वळघल्या होत्या प्रासादशिखरीं ॥ त्या हरीवरी वर्षल्या ॥ ५५ ॥ कीं सुमनशब्दें जे सुरवर ॥ तत्संबंधीं सुमनभार ॥ तिहीं वर्षल्या प्रमदा अपार ॥ ज्या निर्जरपुरवनिता ॥ ५६ ॥ एवं रामकेशवांवरी ॥ सुमनीं वर्षल्या नरसुरनारी ॥ पुढें चालतां कैटभारि ॥ कैसा द्विजवरीं पूजिला ॥ ५७ ॥

दध्यक्षतैःसोदपात्रैःस्रग्गंधैरभ्युपायनैः ॥ तावानर्चुःप्रमुदितास्तत्रतत्रद्विजातयः ॥ ३० ॥

॥ टीका ॥ कनकरजतादि पर्यळीं ॥ दध्यक्षतापुष्पीं फळीं ॥ सुमनमाळा गंधें पिंवळीं ॥ आणि धवळीं श्रीगंधें ॥ ५८ ॥ धूपदीपादि सामग्री ॥ खंडशर्करा तांबूलवस्त्रीं ॥ शुद्धोदकें कनकपात्रीं ॥ येती सामोरीं द्विजवृंदें ॥ ॥ ५९ ॥ राम गोपाळ श्रीपति ॥ ईश्वरभावें द्विज पूजिती ॥ शकुनार्थ दध्यक्षता अर्पिती ॥ मग लेपिती विलेपनें ॥ ६० ॥ केशरतिलक रेखूनि भाळा ॥ सर्वां कंठीं घालिती माळा ॥ वरी उधळिती दिव्य परिमळा ॥ फुलीं-

---

१ उत्कृष्ट मनोभाव हाच पुष्पसमूह. २ शब्दास गगन सुमनें ह्मणतात. ३ पतिपुत्रवती स्त्रिया.
४ लाह्या, अक्षता व पुष्पें ह्यांच्या, उपचारांनीं. ६ स्वर्गांतील स्त्रिया.

मोकळा वर्षती ॥ ६१ ॥ सधूपदशांगशळाका ॥ उजळूनि साज्यं त्रिवर्तिका ॥ आर्द्र खाद्यें खर्जूरिका ॥ पयःशर्करा
नैवेद्य ॥ ६२ ॥ पनस कर्दळें आम्रफळें ॥ द्राक्षें दाडिमें रायांवळे ॥ साखरनिंबें बोरें जांबळें ॥ सेवे मृदुलें अर्पिलीं ॥ ६३
त्रयोदशगुणान्वित तांबूल ॥ यथाशक्ति दक्षिणा विपुल ॥ कर्पूरें नीराजिती सोज्वळ ॥ पुष्पांजळि मंत्रपुष्पें ॥६४॥
उपायनें वस्त्राभरणें ॥ प्रसाद मानूनि घेतलीं कृष्णें ॥ द्विज संतोष पावूनि मनें ॥ आशीर्वचनें ओपिती ॥ ६५ ॥
ऐसे द्विजवर ठायीं ठायीं ॥ हर्षें पूजिती शेषशायी ॥ पुरजनवनिता आपुले ठायीं ॥ चिंतिती कायी तें ऐका॥६६॥

ऊचुःपौराअहोगोप्यस्तपःकिमचरन्महत् ॥ याह्येतावनुपश्यंतिनरलोकमहोत्सवौ ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ परस्परें नगरनारी ॥ बोलती मानूनिआश्चर्य भारी ॥ केवढी गोपींची तपःसामग्री॥कोणे विचारीं तकैंना ॥ ६७ ॥ महत् ह्मणिजे परमश्रेष्ठ ॥ कोण यांचें तप उत्कट ॥ जया पुण्यें रामवैकुंठ ॥ पाहती यथेष्ट अनुदिनीं६८
प्रभाते कानना नेतां गायी ॥ भोगिती लावण्यसुखनवायी ॥ मध्याह्नें गोधनें आणितां सांई ॥ येती त्याठायीं जलव्याजें
॥ ६९ ॥ सायंकाळीं परततां धेनु ॥ रामकृष्ण वाहती वेणु ॥ त्या नादाचें होतां श्रवण ॥ येती धांवोन सामोऱ्या७०
नयनचकोरें परम तृषितें ॥ प्राशिती वदनचंद्रामृतें ॥ अनुदिनीं धनी फावली त्यांतें ॥ महत्सुकृतें कोण तपें ॥७१ ॥
ज्याच्या दर्शनमात्रें अभिनव ॥ नरलोकांसी महोत्सव ॥ तें गोपीनयनीं फावलें दैव ॥ जे रामकेशव लावण्य ॥७२॥
संपलें पुरवधूप्रकरण ॥ पुढें जातां श्रीभगवान ॥ केलें दुर्मदरजकहनन ॥ तें व्याख्यान अवधारा ॥ ७३ ॥

॥ रजकंकंचिदायांतंरंगकारंगदाग्रजः ॥ दृष्ट्वाऽयाचतवासांसिधौतान्यत्युत्तमानिच ॥ ३२ ॥

---

१ घृतयुक्त. २ तीन वाती. ३ केळीं. ४ प्रतिदिवशीं. ५ सावलीस. ६ पाण्याच्या निमित्तानें. ७ समृद्धि. ८ उदबत्त्या. ९उन्मत्त.

॥ टीका ॥ जो गदाचा अग्रज बन्धु ॥ भगवान् श्रीकृष्ण गोविंदु ॥ तो रजकातें देखोनि शब्दु ॥ करोनि विनोदु
बोलिला ॥ ७४ ॥ मथुरापुरी महाथोर ॥ रजकही बहुत तदनुसार ॥ त्यां माजी कोणी एक क्षालनचतुर ॥ रंगकार
नृपदूत ॥ ७५ ॥ क्षालनीं वसनें विगतरंग ॥ तियें यथापूर्व रंगवी सांग ॥ यास्तव रंगकार हें नामलिंग ॥ येव्हवीं
चांग रजकची॥७६॥यातें ह्मणे जगदीश्वर॥अन्य वसनें प्राकृत नर॥लेती त्यांहूनि उत्तमतर॥अंबरें सुंदर दे आह्मां
॥७७॥परम विशुद्ध प्रक्षाळिलीं॥विविधा रंगीं रगाथिलीं॥आह्मां उभयतां शोभती भलीं ॥ तीं देई वहिलीं संतोषें ७८

देह्यावयोःसमुचितान्यंगवासांसिचार्हतोः ॥ भविष्यतिपरंश्रेयोदातुस्तेनात्रसंशयः ॥ ३३ ॥

॥ टीका ॥ अंगशब्दें संबोधून ॥ रजका ह्मणे श्रीभगवान्॥गौरश्याम तनु जाणोन ॥ उचित वसनें अर्पावीं॥७९॥
आह्मां यथोचित वस्त्रें देसी ॥ तरी परम श्रेय तुज दातयासी ॥होईल आणि निश्चयेंसीं ॥ संशय मानसीं नधरावा ८०
स्वातीचेनि विशुद्ध जळें ॥ सिं[2]धुशुक्तिके मुक्ताफळें ॥ तो बिंदु तप्ततैलीं मिळे ॥ तरी प्रज्वळे आश्रय[3]भुक् ॥८१॥किंवा
पर्यांज्य तनुपोषक ॥ नवज्वरिता तेंचि विख ॥ तेंवि मधुर भगवद्वाक्य ॥ क्षोभवी रजक तें ऐका ॥ ८२ ॥

सयाचितोभगवतापरिपूर्णेनसर्वतः ॥ साक्षेपंरुषितःप्राहभृत्योराज्ञःसुदुर्मदः ॥ ३४ ॥

॥ टीका ॥ नीचा उच्चत्वें सम्मान ॥ तोचि त्यातें क्षोभक पूर्ण ॥अजाकंठीं गजभूषण॥ घंटाबंधन गतिरोधी॥८३॥
तैसा षड्गुणैश्वर्य संपत्ति ॥ सर्वत्र पूर्णता ज्यातें पुरती ॥ तेणें वसनें याचितां प्रीती ॥ रजक दुर्मति क्षोभला ॥८४॥
ह्मणाल षड्गुणैश्वर्यसंपन्न॥ भूतभविष्यत्रिकालज्ञ ॥ असतां कां नाहीं समजला कृष्ण ॥ अंतःकरण रजकाचें॥८५॥

---

[1] सत्वर. [2] समुद्राच्या शिंपल्यांत. [3] आश्रयाला खाणारा अग्नि. [4] दूध व तूप.

तरी तो सर्वज्ञ श्रीभगवंत ॥ जाणोनि तयाचें दुष्टचित्त ॥ याच्ञाछळें निजकार्यार्थ ॥प्रकटी समर्थ तो ऐका॥८६ ॥शकुना लागीं शत्रुनगरीं ॥सुमनें वसनें बलात्कारीं ॥ हरूनि करावी मारामारी ॥ महाद्वारीं प्रतापें ॥८७॥ परिमळद्रव्यें गोरस गंधें ॥ खाद्य शर्करा फळें विविधें ॥ लुंठन करूनि खवळिजे क्रोधें ॥ तें शत्रु विरोधें[2] ममरा ये ॥८८॥ ऐसा नीतिशास्त्रींचा विधं ॥ दुश्चित नकीजे शत्रुवध ॥ यालागीं स्वप्रताप प्रसिद्ध ॥ दावी मुकुन्द रजकवधें ॥ ८९ ॥ कंस दैत्यांश केवळ ॥ जरी तो झाला मथुरापाळ ॥ तरी जाणे श्रीगोपाळ ॥ मथुरा निर्मळ निजनगरी ॥९०॥ कृष्ण सर्वांचा अंतरसाक्षी ॥ रजक जाणोनि कंसपक्षी ॥ याच्ञाछळें वसनापेक्षी[5] ॥ जाला निरपेक्षी परिपूर्ण ॥ ९१ ॥ संकल्पमात्रें सर्व संपत्ति ॥ ज्यातें सर्वत्रसर्वदा पुरती ॥ तोही रजकाची दुर्मति ॥ जाणोनि प्रार्थी शकुनार्थ॥९२ ॥रजकें ऐकोनि हरीचा शब्द ॥ स्निग्धद्रव्यें[6] जातवेद ॥क्षोभे तैसा खळ दुर्मद ॥ अति सक्रोध प्रज्वळिला ॥ ९३ ॥ वत्सनाभीसि अंहिफेन ॥ राजसेवेच्या स्नेहें करून ॥ बाचटलिया गरळाहून ॥ मारकपण स्वयें मिरवी ॥ ९४ ॥ तैसा साक्षेपें कोपला ॥कटु दुरुक्ति बोलता झाला ॥ अमृतपानें राहु मेला ॥ तेंवि रजकाला हरियाच्ञा ॥ ९५ ॥

ईदृशान्येववासांसिनित्यंगिरिवनेचराः ॥ परिधत्तकिमुद्वृत्ताराजद्रव्याण्यभीप्स्सथ ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ उद्वृत्त ह्मणिजे उद्धतवृत्तं[10]॥ चोरवाटपाडे उत्पथं[11] ॥ गिरिकाननीं राहतां नित्य ॥तें नचले येथ नृपनगरीं ९६ नित्य ऐसींच उत्तमवसनें ॥ तुह्मी घेतसां पथभंजनें ॥ येथ राजद्रव्यांचीं हरणें ॥ तेणेंचि गुणें करूं इच्छां ॥ ९७॥ तोंडा पुरता घेइजे ग्रास ॥ शक्तीसारिखेचि हव्यास ॥ दीप ग्रासितां पतंगास॥ जैंवि नाश तैंवि तुह्मां ॥ ९८ ॥

---

१ याचनेच्या मिषानें. २ प्रतिकूल वर्तननें. ३ प्रकार. ४ खिन्न झालें मन ज्याचें तो. ५ वस्त्रें मिळविण्यास इच्छिणारा. ६ तूप दूध इ० स्वाळीचे पदार्थ. ७ आग. ८ बचनाग ह्या नांवाची विषारी वनस्पति. ९ विष अ० अफू. १० दांडगेपणाची वर्तणूक. ११ आडवाटेला.

याताऽऽशुबालिशामैवंप्रार्थ्यंयदिजिजीविषा ॥ बध्नंतिघ्नन्तिलुम्पन्तिदृप्तंराजकुलानिवै ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ जरी वांचावयाची धराल इच्छा ॥ तरी या गोष्टी नबोला कुत्सा ॥ जीवें सोडिलें तुह्मां तुच्छां ॥ पळा वसनेच्छा सांडूनी ९९॥ मूर्ख हो नेणां नृपशासना ॥ ऐसी करूं नका प्रार्थना॥शीघ्र करा रे पलायना॥जरी निज प्राणां वांचवणें ॥३००॥ डोंगरीं वनीं पाहतां जैसे ॥ येथ मोकळें नाहीं तैसें॥तीव्र नृपाचें शासन असे ॥ बोलतां कैसें उद्धत ॥ १ ॥ राजवर्गी येचिक्षणीं ॥ दृढ बांधिती करकरोनी ॥ ताडन करिती निष्ठुरपणीं ॥ घेती लुटूनि सर्वस्व ॥ २ ॥ दस्यु ह्मणोनि करिती वध ॥ ऐसिया रजकोक्ति विरुद्ध ॥ ऐकोनि कोपला मुकुन्द ॥ तत्कर्म विशद अवधारा ॥ ३ ॥

एवंविकत्थमानस्यकुपितोदेवकीसुतः ॥ रजकस्यकराग्रेणशिरःकायादपातयत् ॥ ३७ ॥

॥ टीका ॥ ऐसी आगळी वल्गना वाचे ॥ करितां देवकीतनय त्याचे ॥ नखाग्रें कृं[2]तन मस्तकाचें ॥ करिता झाला सकोप ॥४॥ लीलाकमळ खंडी बाळ ॥ तयाचि परी श्रीगोपाळ ॥ सकोप रजकाचें सिसाळ॥खंडी तत्काळ कराग्रें ५॥

तस्यानुजीविनःसर्वेवासःकोशान्विसृज्यवै ॥ दुद्रुवुःसर्वतोमार्गवासांसिजगृहेऽच्युतः ॥ ३८ ॥

॥टीका॥ कायेपासूनि रजकशिर ॥ हरितां रजकाचे किंकर ॥ सर्व पळाले सत्वर ॥ वस्त्रसम्भार टाकूनी ॥ ६ ॥ राजसेव्यें धौतांबरें ॥ रंगाथिलीं विचित्रें शुभ्रें ॥ टाकोनि झडझडां पेटारे ॥ रजककिंकरें पळालीं ॥७॥पळतां नसांवरिती आंगें ॥ नवचती एकमेकां मागें ॥ प्राणधाकें अतिलगबगें ॥ दिग्विभागें विखुरलीं ॥८॥आह्मी अनाथें किंकर-

---

१ वस्त्रांची इच्छा. २ छेदन. ३ हातांत शोभेकरितां धरिलेलें कमल. ४ मस्तक. ५ राजानें घेण्यास योग्य.

वृत्ति ॥ वांचवी ह्मणोनि वोसणंती ॥ एकें अडखळोनियां पडती ॥ तोंडीं माती विमुखत्वें ॥९॥ आराधनीं कां विरोधनीं ॥ धैर्य नाहीं ज्यां लागोनी ॥ ऐसी तयांची भंगाणी ॥ जाली ह्मणोनि सुचविली॥१०॥ज्याचें ऐश्वर्य अविच्युत॥ यालागीं नामें तो अच्युत ॥ वसनसम्भार अव्याहत ॥ घेता झाला स्वइच्छा ॥ ११ ॥

वसित्वाऽऽत्मप्रियेवस्त्रेकृष्णःसंकर्षणस्तथा ॥ शेषाण्यादत्तगोपेभ्योविसृज्यभुविकानिचित् ॥ ३९ ॥

॥ टीका ॥ आपुले कांतिप्रीत्यनुसार ॥ दिव्यवस्त्रें उभय सोदर ॥ देवकीतनय कृष्ण बलभद्र ॥ लेते झाले यथेष्ट ॥१२॥ शेष गोपाळां वांटिलीं ॥ उरलीं भूमीवरी विखुरलीं ॥ राजवस्त्रांची लुटी केली ॥ पुरप्रवेशीं शकुनार्थ ॥१३॥ पुरप्रवेशकाळीं प्रथम ॥ बळिप्रदानीं रजकाधम ॥ देऊनि कंसा पराक्रम ॥ विदित केला पररूपें ॥ १४ ॥ गगनवाणीचा विश्वास ॥ मानूनि पितरां दिधला त्रास ॥ उग्रसेनादि यादवांस ॥ द्वेषिलें विशेष ज्यासाठीं ॥१५॥जयासाठीं बाळकहनना ॥ प्रेरिली भूमंडळी पूतना ॥ अघबकादि तावकं प्राणां ॥ जयासाठीं मूकले॥१६॥ नारदवचनें व्रजीं कळलें ॥ अक्रूर धाडूनि आणविले ॥ रामकृष्ण ते मथुरे आले ॥ हें जाणविलें रजकवधें॥ १७ ॥ प्राचीन लोकवदंती[3] ऐसी ॥ रजकें दूषिलें श्रीरामासी ॥ रामें निष्पापें जानकीसी ॥ त्यजिलें वनासि अपवादें ॥१८॥ ये अवतारीं तेंचें उसणें ॥ रजक मारूनि घेतलें कृष्णें ॥ ऐसें कित्येक ध्वनितवचनें ॥ कर्णोपकर्णें भ्रमविती ॥१९॥ मंथरा तेचि कुब्जा ह्मणती ॥ पूतना कैकेयी झाली होती ॥ व्याधजन्मीं वाळीचें अन्तीं ॥ उशिणें दिधलें श्रीकृष्णें॥२०॥ राम जन्मोनि कृष्ण झाला ॥ त्यासही कर्मभोग लागला ॥ ऐसा लौकिक जो गलबला ॥ बालिशांला भ्रामक ॥२१॥ मुनीनें[4] शापितां

---

१ बडबडती. २ त्या कंसाचें सेवक. ३ लोकवार्ता. ४ दुर्वासानें.

अम्बरीष ॥ आपण त्याचे गर्भवास॥स्वयें सोसी श्रीपरेश ॥ या वचनास ते आश्रयिती ॥२२॥ तरी मत्स्य अद्यापि
सिन्धुजळीं ॥ कूर्म अद्यापि पृथ्वीतळीं ॥ सिंह दैत्यवधें तत्काळीं ॥ अन्तराळीं तिरोहिंत ॥ २३ ॥ वामन अद्यापि
बळीचे द्वारीं ॥ चिरंजीव परशुधारी ॥ श्रीराम गेला सशरीरीं॥ अयोध्यानगरी घेऊनी ॥२४॥यामाजी कोण केव्हां
मेला ॥ कोण्या कर्में तो बांधला ॥ कोठें उसणें देऊं आला ॥ कैसा घडला कोण भोग ॥२५॥ दैत्य स्वसुता शासन
करी ॥ निरपराध हरि त्या मारी॥त्याचें उसणें कैं नरहरि॥कोणे अवतारीं फेडिलें ॥२६॥ ह्मणाल शरणागतासाठीं॥
नृसिंहें फोडिली दैत्यघांटी ॥ तरी वाळिवधाची विरुद्ध गोठी॥कां वाक्पुटीं बोलावी ॥२७॥ अवताराचें जन्ममरण॥
नचुके ऐसें जरी प्रमाण ॥ तरी दासाचें भवबन्धन ॥ काय ह्मणोन परिहरे ॥२८॥ कल्पतरुचि दुकळें मरे ॥ तेथ
कल्पिंत्याची कैं क्षुधा हरे ॥ यालागीं ऐसीं विरुद्धोत्तरें ॥ ऐकोनि चतुरें नभ्रमिजे ॥२९॥ वसुदेवदेवकीप्रति हरि॥
स्वमुखें ह्मणे मी जन्मांतरीं ॥ सुतपापृनीचिये उदरीं ॥ पृश्निगर्भ जन्मलों॥३०॥ कश्यपअदितिपोटीं द्वितीय ॥
तुमचे पोटीं जन्म तृतीय॥ एवं वरदोत्तीर्णसोय ॥ जन्मत्रयें सुचविली॥३१॥परंतु कर्मफळ भोगावया॥ कीं मरूनि
उसणें फेडावया ॥ जन्मणें नाहीं जगदात्मया ॥ या निश्चया जाणावें॥३२॥ देवकीउदरीं ज्या नवमास ॥ घडला
नाहींच गर्भवास ॥ योनिसंकट कैचें त्यास ॥ केंवि कर्मास तो भोगी ॥ ३३ ॥ ह्मणाल प्राचीन कवींच्या उक्ति॥
ते रोचनार्था फळश्रुति ॥ कर्म नसुटे देवांप्रति ॥ मां जीवांप्रति केंवि सुटे ॥ ३३४ ॥ ऐशा मीमांसाप्रतिपादका
॥ पूर्वपक्षींच्या श्रुति अनेका ॥ तदनुसार याही वाक्या ॥ देखोनि शंका नधरावी ॥ ३३५ ॥ एवं

---

१ गुप्त. २ हिरण्यकशपूची नरडी. ३ इच्छा करणाराची.

करूनि रजकहनन ॥ राजवस्त्रांचें लुण्ठन ॥ पुढें कैसा चालिला कृष्ण ॥ तें व्याख्यान अवधारा ॥ १३६ ॥

ततस्तुवायकःप्रीतस्तयोर्वेषमकल्पयत् ॥ विचित्रवर्णैश्चैलेयैराकल्पैरनुरूपतः ॥ ४० ॥

॥ टीका ॥ शृंगाटकीं कैटभारि ॥ हर्षें चालतां वयस्यभारीं ॥ तंव कोणी एक वायक हरी ॥ यथादरीं भजिन्नला ३७
वायक ह्मणिजे सिंपीयाति ॥ तेणें स्वकौशल्यें आपुल्या हातीं ॥ रामकृष्णांच्या उभयमूर्ति ॥ यथा निगुती अलंकारिल्या
॥ ३८ ॥ वस्त्रांचेचि अलंकार ॥ करूनि शृंगारिले सुंदर ॥ विविध रंगांचे प्रकार ॥ मुकुटप्रवर आभरणें ॥ ३९ ॥ श्वेत-
श्याम अंगकांति ॥ तयांसि अनुरूप जे शोभती ॥ तैसे वेश तयांप्रति ॥ वस्त्रसंपत्ती शोभविले ॥ ४० ॥

नानालक्षणवेषाभ्यांकृष्णरामौविरजेतुः ॥ स्वलंकृतौबालगजौपर्वणीवसितेतरौ ॥ ४१ ॥

॥ टीका ॥ आधींच त्रिजगाचें लावण्य ॥ वरी नानालक्षणी अलंकरण ॥ वेषें करूनि रामकृष्ण ॥ विराजमान देदीप्य
॥ ४१ ॥ ऐरावताचे सहोदर ॥ शुक्ल कृष्ण बालकुंजर ॥ पर्वोत्सवीं सालंकार ॥ जेंवि शृंगार मिरवती ॥ ४२ ॥
तंतुवायकाचा भाव ॥ देखोनिप्रसन्नवासुदेव ॥ त्यातें ओपी वर अपूर्व ॥ तें तूं स्वमेव अवधारीं ॥ ४३॥

तस्यप्रसन्नोभगवान्प्रादात्सारूप्यमात्मनः ॥ श्रियंचपरामाल्लोंकेबलैश्वर्यस्मृतींद्रियम् ॥ ४२ ॥

॥ टीका ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ अचिंत्यलीला प्रकाशून ॥ स्वस्वरूपमुक्ति पूर्ण ॥ वायका लागोन वोपिली॥ ४४॥
आणि इहलोकाच्या ठायीं ॥ परमलक्ष्मी जे अक्षयी ॥ बलप्रताप पुरता पाहीं ॥ सर्वेंद्रियीं पटुतरता ॥ ४५ ॥ आ-
णि अजस्र निजात्मस्मरण ॥ जेथ नुमटे विवर्तस्फुरण ॥ इत्यादि वरें गौरवून ॥ तेथून गमन आदरिले ॥ ४६ ॥

---

१ चवाठा. २ लहान हत्ती. ३ संसारची इछा.

पुढें मालाकारसदना ॥ जाता झाला त्रैलोक्यराणा ॥ शुक निरूपी कुरुभूषणा ॥ त्या व्याख्याना अवधारा ॥ ४७ ॥

ततःसुदाम्नोभवनंमालाकारस्यजग्मतुः ॥ तौदृष्ट्वाससमुत्थायननामशिरसाभुवि ॥ ४३ ॥

॥टीका॥ तन्तुवायका देवूनि वर॥सुदामानामक मालाकार॥त्याच्या भवंना जगदीश्वर॥जाते झाले बलकृष्ण४८
ते गें अंतरें देखोनि हरि॥उठोनि धाविन्नला सामोरीं ॥भावें साष्टांग नमस्कारी ॥ श्रीपद शिरीं स्पर्शोनी ॥ ४९ ॥

तयोरासनमानीयपाद्यंचार्थार्हणादिभिः ॥ पूजांसानुगयोश्चक्रेस्रक्ताम्बूलानुलेपनैः ॥ ४४ ॥

॥टीका॥ दिव्यासनें उभयांप्रति॥अर्पूनियां पूर्णभक्ती॥पाद्य अर्पी यथानिगुती॥जैंवि सुरपति हरिहरां ॥ ५० ॥
देऊनि सर्वांसि रम्यासनें॥आसनीं बैसविले सम्मानें॥करूनि पादप्रक्षाळणें॥अनुलेपनें चर्चिलीं ॥ ५१ ॥ केशरतिलक रेखिले भाळीं॥अक्षता माणिक्य सुढाळ ढाळीं॥मलयजचन्दनंउटी पातळी॥त्यावरी उधळी सौरभ्यें ॥ ५२ ॥
सुमनमाळा घालूनि कण्ठीं ॥ दशांगधूप हव्यँवाटीं ॥ दिव्य एकारती गोमटी ॥ धरूनि बोटीं उजळली ॥५३॥
पयाज्यशर्कराखाद्यखण्ड ॥ आर्द्रनारिकेळोद्भव उदंड ॥ पक्वखर्जूरी द्राक्षाघड ॥ रसाळपाड कदळादि ॥ ५४ ॥
उत्तमत्रयोदशद्रव्यमेळ ॥ अर्पण केले दिव्य तांबूल ॥ उपायनें यथानुकूळ ॥ कर्पूरसोज्वळ नीराजन ॥ ५५ ॥
पुष्पांजाळि अर्पूने शिरीं ॥ सर्वां प्रदक्षिणा करी ॥ वारंवार नमस्कारी ॥ जोडले करीं प्रार्थितसे ॥ ५६ ॥

प्राहनःसार्थकंजन्मपावितंचकुलंप्रभो ॥ पितृदेवर्षयोमह्यंतुष्टाह्यागमनेनवाम् ॥ ४५ ॥

॥टीका॥हर्षोत्कर्षें जयजय ह्मणे॥आजि सार्थक आमुचें जिणें॥जन्म सफळ जाला जाणें॥चरणागमनें स्वामीच्या

---

१ घराला. २ इन्द्र. ३ उत्कृष्टतेज ज्याचें. ४ तेजांनीं. ५ मलयपर्वतावरील. ६ सुगन्ध. ७ अग्निमध्यें.

॥५७॥ भो भो समर्था गोपाळा ॥ पवित्र केलें आमुच्या कुळा ॥ आजि पितृगणांचा मेळा ॥ भोगी सोहळा ब्रह्मपदीं ॥ ५८ ॥ देव पितर आणि ऋषि ॥ तुमच्या आगमनें आह्मांसी ॥ पूर्ण तुष्टले हृषीकेशी ॥ प्रतीत[1] ऐसी दृढ झाली ॥ ५९ ॥ काय ह्मणोनि ह्मणसी जरी ॥ तरी तूं परब्रह्म श्रीमुरारि ॥ लीलागोपविग्रहधारी ॥ तें अवधारीं कारण तूं ॥ ६० ॥

भवन्तौकिलविश्वस्यजगतःकारणम्परम् ॥ अवतीर्णाविहांशेनक्षेमायचभवायच ॥ ४६ ॥

॥ टीका ॥ उत्कृष्ट जगाचें कारण॥स्वयें जे कां अकारण॥ते हे तुह्मी दोघे जण॥रामकृष्ण अवतरलां ॥ ६१ ॥ अचिंत्यैश्वर्यशक्तीकरून ॥ करावया अखिल[2] कल्याण ॥ जगत्प्रवृत्तिप्रवर्धन ॥ संस्थापन धर्माचें ॥ ६२ ॥ इत्यादि कार्याकारणें ॥ तुमचें येथ अवतार धरणें॥ लोकदृष्टी शंका मनें ॥ नलगे करणें यदर्थी ॥६३॥ तेच शंका ह्मणाल कैसी ॥ क्षोभें मारिलें रजकासी ॥ कृपा केली वायकांसी[3] ॥ हे भासे मूर्खांसि विषमता[4] ॥६४॥ ते तुमच्या ठायीं नसे ॥ ह्मणोनि सुदामा विनवीतसे ॥ तें व्याख्यान कुरुनरेशें ॥ स्वस्थमानसें परिसावें ॥ ६५ ॥

नहिवांविषमादृष्टिःसुहृहोर्जगदात्मनोः ॥ समयोःसर्वभूतेषुभजन्तंभजतोरपि ॥ ४७ ॥

॥टीका॥ विषम दृष्टि तुमच्या ठायीं॥नाहीं ऐसें ह्मणणे कायी॥तुमचे सत्तेची नवायी॥समुच्चयीं भूतांच्या॥६६ विषम होतांचि नये तुह्मां॥तुह्मी सर्वांचा एकात्मा॥सर्वगतत्वें सुहृत्प्रेमा॥अधमोत्तमा माजिवडा ॥ ६७ ॥ जो जो भजे जे जे भावें॥तेणें तैसेंचि फळ पावावें॥रजकक्षोभें प्रक्षोभावें॥साधु सद्भावें वायका॥६८॥ भाग्यें माझिया सदनाप्रति ॥ तुह्मी आलेति कृपामूर्ति ॥ भृत्यामाजी मी नीचवृत्ति ॥ सेवेसि विनति परिसावी ॥ ६९ ॥

---

[1] अनुभव, [2] सम्पूर्ण, [3] शिंप्याला, [4] पक्षपातीपणा.

तावाज्ञापयतंभृत्यंकिमहंकरवाणिवाम् ॥ पुंसोऽत्यनुग्रहोह्येषभवद्भिर्यन्नियुज्यते ॥ ४८ ॥

॥टीका॥ दास्य काय म्यां करावें॥ऐसें भृत्यांतें[1] आज्ञापावें॥तुमच्या दास्यें श्लाघ्य अवघें ॥जिणें होय पुरुषाचें ७०
तुह्मी कार्यार्थ जें नियोजा॥तैं तो अनुग्रहो बरवे वोजा॥पुरुषासि झाला सहजी सहजा॥निजसायुज्या तैं लाभे॥ ७१॥

श्रीशुकउवाच ॥ इत्यभिप्रेत्यराजेन्द्रसुदामाप्रीतमानसः ॥ शस्तैःसुगन्धैःकुसुमैर्मालाविरचितादवौ ॥४९ ॥

॥टीका॥ कौरवकैरवप्रबोधका[2]॥शुक ह्मणे गा प्रबोधका॥ऐकें परीक्षितिसंज्ञका[3]॥निष्कलंका राजर्षे[4] ॥७२॥ निष्काम
अनन्य मी किंकर॥तुह्मी निश्चयें जगदीश्वर॥तुमची आज्ञा तो अनुग्रह थोर ॥अभिप्राय समग्र सुचविला
॥७३॥ऐसी विज्ञापना करून॥साष्टांग वन्दिले रामकृष्ण॥सर्वां देऊनि आलिंगन॥करजोडून ठाकला ॥७४॥सप्रेममानसें
सुदामा ॥ निवडोनि दिव्य सुमनोत्तमा ॥ माळा निर्मूनि पूर्णकामा ॥ देवूनि परमात्मा तोषविला ॥ ७५॥
प्रशस्तें ह्मणिजे संकोचरहितें॥ऐसीं निवडोनि विशुद्ध चित्तें॥कोमळ सप्रेम सुगंधभरितें॥सुमनें ग्रथितें हारिमाळे॥७६॥

ताभिःस्वलंकृतौप्रीतौकृष्णरामौसहानुगौ ॥ प्रणतायप्रपन्नायददतुर्वरदौवरान् ॥ ५० ॥

॥टीका॥ऐसिया माळा समर्पून॥सानुग पूजिले रामकृष्ण॥सालंकृत शोभायमान॥तोषें वरदान घे ह्मणती ॥७७॥
अनन्यभावें शरणागत ॥ परमविनीत पादप्रणत ॥ त्याचें जाणोनि मनोगत ॥ वर ओपीत ते काळीं ॥ ७८ ॥

सोऽपिवव्रेऽचलांभक्तिंतस्मिन्नेवाखिलात्मनि ॥ तद्भक्तेषुचसौहार्दंभूतेषुचदयांपराम् ॥ ५१ ॥

---

१ सेवक. २ कौरव हींच कैरवें ह्म० कमळें, त्यांस प्रफुल्लित करणारा. ३ परीक्षिति संज्ञा ह्म० नाम ज्याला तो. ४ ब्रह्मनिष्ठ राजा.

॥ टीका ॥ तोही निष्काम पूर्णभक्त ॥ नमगे ऐश्वर्य नाशवंत ॥ अखिलात्मक श्रीभगवंत ॥ अचलां याचित तद्भक्ति ॥ ॥७९॥ जें कां अखिल चराचर ॥ अभेद अवघाचि श्रीधर ॥ जाणोनि भजक अव्यभिचार ॥ मागे साचार सद्भावें ॥८०॥ सर्वभूतीं निर्वैरता ॥ तेही याचिली नयाचितां ॥ सर्वभूतीं एकात्मता ॥ आली हाता अनायासें ॥ ८१ ॥ सर्वात्मक जें श्रीभगवंत ॥ तें निंदेची हरली मात ॥ अनिंदकता चढली हात ॥ अकस्मात या योगें ॥ ८२ ॥ तये मार्गेचिभूतदया ॥ न प्रार्थितां आली हृदया ॥ ठाव नसेचि क्षोभावया ॥ ह्मणोनियां अक्षोभता ॥ ८३ ॥ जेथ क्षोभकता निमाली ॥ तेथें शान्ति सहजेंचि आली ॥ ऐसी पूर्णश्री याचिली ॥ अभेदभजनें श्रीदामें ॥८४॥ भगवद्भक्तांचें सौजन्य ॥ भूतमात्रीं दयाळुपण ॥ हेंही प्रार्थिलें ह्मणोन ॥ नलगे भिन्न सांगावें ॥ ८५ ॥ जाणोनि याचें मनोगत ॥ सर्वज्ञ सर्वग श्रीभगवंत ॥ अनन्यभावाचें अंकित ॥ गौरवीत वरदानें ॥ ८६ ॥

इतितस्मैवरंदत्वाश्रियंचान्वयवर्धिनीम् ॥ बलमायुर्यशःकीर्तिनिर्जगामसहाग्रजः ॥ ५२ ॥

॥ टीका ॥ ऐसे वर जे याचिले तेणें ॥ तेही देऊनि जनार्दनें ॥ नमागतां करुणापूर्णें ॥ कृपावरदानें गौरविला ॥ ८७॥ पुत्रपौत्रांची संतति ॥ चंद्रसूर्य गगनीं भ्रमती ॥ तंववरी ऐश्वर्यसंपत्ति ॥ भगवद्भक्तिविराजित ॥ ८८ ॥ तव तनूपासोनि जे संतति ॥ ममानुग्रहें तयांप्रति ॥ बळप्रताप दिव्यकांति ॥ विजय कीर्ति पूर्ण असो ॥ ८९ ॥ श्रियादि नमागे सुदामा ॥ परि तो कळवळा मेघश्यामा ॥ निष्काम भजतां पादपद्मां ॥ ओपी जगादात्मा सर्वस्वें ॥ ९० ॥ विसरोनि आपुली ऐश्वर्यथोरी ॥ अनन्याची सेवा करी ॥ गर्भासमान वाहे उदरीं ॥ कां कडियेवरी मातृवत् ॥ ९१ ॥ ऐ-

---

१ अढळ. २ मागत. ३ अनन्य. ४ न मागतां. ५ नष्ट झाली.

सा स्वभक्तकरुणाकर ॥ नमनी दासांचा जोजार[1] ॥ सुदाम्यासि तो देऊनि वर ॥ साग्रज सानुचर निघाला ॥९२ ॥ रजक प्रार्थिला बरवे रीती ॥ परंतु तयाची दुर्मति ॥ मरण पावला कृष्णहस्तीं ॥ तेणें सद्गति तो लाहे ॥९३॥ शिंपी शरण अनन्यभावें ॥ ह्मणोनि वर त्या दिधले देवें ॥ माळाकाराचिया दैवें ॥ भक्तिगौरवें गौरवी ॥९४॥ यावरी पुढें घक्ष्यमाण ॥ कुब्जा करी गंधार्पण ॥ तिसी देवूनि तनुलावण्य ॥ धनुर्भंजन हरि करील ॥९५॥ आणि धनूरक्षकांचा वध ॥ कंस अरिष्टें देखेल विविध ॥ रंगोत्सवादि कथा विशद ॥ शुक [2]कोविद कथील ॥ ९६ ॥ तया श्रवणाचे अधिकारी ॥ तेहीं अवधानसामग्री ॥ करोनि परीक्षितीबरोबरी ॥ पंक्तिकार होइजे ॥९७॥ अखिलब्रह्मांडचक्रवर्ती ॥ श्रीएकनाथ पुराणकीर्ति ॥ चिदानंदाची संपत्ति ॥ स्वानंदभरित सर्वत्र ॥ ९८ ॥ गोविंदनामाचा गौरव ॥ चराचरीं सप्रेम द्राव ॥ तेणें भरला दयार्णव ॥ ते टीका अपूर्व हरिवरदा ॥९९॥ श्रीमद्भागवतोत्तम ॥ महापुराण भगवत्कर्म ॥ अठरा सहस्र संख्या परम ॥ पारमहंसी संहिता ॥ ४०० ॥ त्यामाजील दशम स्कंध ॥ शुकपरीक्षितिसंवाद ॥ मथुराप्रवेश रजकवध ॥ अध्याय प्रसिद्ध एकेचाळिसावा ॥ १ ॥ ॥ इतिश्रीमद्भागवतेमहाराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यां संहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायांरजवधवायकमाल्यकारवरोनामैकचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ४१ ॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥ श्लोक ॥५२ ॥ ओंव्या ॥ ४०१ ॥ एवं संख्या॥४५३

---

१ कुटुंबादिरूप संसाराचा मोठा खटला तो. २ ज्ञाता. १ ओळावा.

अध्याय ४२.

ज्याचा संकल्प अविच्युत ॥ यालागीं नामें तो अच्युत ॥ तेणें कुब्जा लावण्यभरित ॥ केली त्वरित निजहस्तें ॥ ५९ ॥ दोघे कोदंडखंडायुध ॥ मारित ऊठिले पैं प्रसिद्ध ॥ शालामुखीं करूनि रोध ॥ केला वध सर्वांचा ॥ ६७



पाण्डुरंगाय नमः ॥ ॥ जो गोमतीपैलपारीं ॥ नांदे सर्वदा निर्विकारी ॥ क्रीडे गोमतीमाझारीं ॥ विषयव्यवहारीं अस्पष्ट ॥ १ ॥ गोप्रवृत्ति जे गोमती ॥ ज्या चैतन्यें प्रवाहवती ॥ तो तूं तीरस्थ श्रीगोपति ॥ अलिप्तस्थिति तेथ वससी ॥ २ ॥ क्रीडतां गोमतीमाजी अजस्र ॥ तूं अस्पष्ट निर्विकार ॥ सागरीं नभिजे जेंवि अंबर ॥ बिंबलें सर्वत्र परि त्यांत ॥ ३ ॥ बिंबलें असोनि तिंबलें नसे ॥ तैसा जो कां कूटस्थदशे ॥ वेंठला नझेंके विश्वाभासें पूर्णप्रकाशें देदीप्य ॥ ४॥ गोमतीचें पैलतीर ॥ संकल्पप्रभव कामाकार ॥ बिषयात्मक भवसागर ॥ दुःखप्रचुर सुखभ्रांति ॥ ५ ॥ ओतप्रोत तयेही ठायीं ॥ अवघी क्रीडा तुझीच पाहीं ॥ तुजवेगळी नुठे देहीं विषयग्राही अहंता ॥ ६ ॥ भ्रांतीस्तवचि जीवदशा ॥ एऱ्हवीं अभेद तूंपरेशा ॥ करावया भ्रांतिनाशा ॥ गौरवासरसा अवतरसी ॥ ७॥ तव कृपेचा बोधादित्य ॥ ज्यांचें तिमिर विध्वंसित ॥ ते तव चरणा शरणागत ॥ येर प्राकृत ओखटीं ॥ ८ ॥ देहबुद्धीच्या ढोलांतरीं ॥ करूनि दिवसा मध्यरात्री ॥ रागदोषविषमोत्तरीं ॥ दुष्टस्वरीं घुंघाती ॥ ९ ॥ असो तयांची किमर्थ कथा ॥ तूं कैंपक्षी शरणागता ॥ कृपेनें तारिसी स्वपादप्रणतां ॥ हा महिमा तत्वता श्रुति गाती ॥१०॥ मी तव कृपेचा औरस ॥ मजवरी सर्वस्वें वोरस ॥ त्यास्तव दिधला कवळ सुरस॥

---

१ निरंतर. २ मऊ झालें. ३ आंवकारी दशा. ४ झांके. ५ विषयग्रहण करणारी. ६ ज्ञानसूर्य. ७ मोठ्या पोकळीमध्यें. ८ घूंघूं करितात. ९ सहाय. १० स्वपदीं नम्र झालेल्यांस. ११ स्नेहभरित.

करूनि मिष दशमाचें ॥ ११ ॥ लावोनि सप्रेम भजनवेध ॥ पदपदार्थी अर्थावबोध ॥ करूनि भेदाचा निषेध ॥
ग्रंथ विशुद्ध विवरविला ॥ १२ ॥ यावरी एकोत्तरचाळिसा ॥ माजी करूनि रजकनाशा ॥ आठवा कृष्ण मी
॥ १ ॥ आलों ऐसा ॥ भाव कंसा जाणविला ॥ १३ ॥ तंतुवायक माळाकार ॥ यांसि देवूनि अभीष्टवर ॥ ये अध्यायीं ॥४२॥
जगदीश्वर ॥ कुब्जा सुंदर करील ॥ १४ ॥ लीलेकरूनि धनुष्यभंग ॥ मारूनि धनूरक्षकांचा वर्ग ॥ कंसासि
दुर्निमित्तप्रसंग ॥ मल्लरंगप्रारंभ ॥ १५ ॥ ये अध्यायीं कथा इतुकी ॥ नृपा कथील वैयासकि ॥ भाषा वाखाणिजेल
निकीं ॥ सप्रेम भाविकीं परिसावीं ॥ १६ ॥

श्रीशुकउवाच ॥ ॥ अथव्रजन्राजपथेनमाधवःस्त्रियंगृहीतांगविलेपभाजनाम् ॥
विलोक्यकुब्जांयुवतिंवराननांप्रपच्छयान्तींप्रहसन्रसप्रदः ॥ १ ॥

॥टीका॥ ज्याचिये कृपालेशास्तव ॥योगसिद्धि लाधे सर्व ॥ तो वशिष्ठान्वय[1]सम्भव ॥ योगिराव शुक ह्मणे॥१७॥
कौरवान्वय[2]सौभाग्यतिलका॥ऐकें परीक्षिति कलिभंजका॥माळाकारा तन्तुवायका॥वरविवेकानन्तरें ॥ १८ ॥ जो कां
मधुवंशसंभव॥यालागीं नामें तो माधव॥जातां राजपथें सबल्लव॥स्त्री अपूर्व देखिली ॥१९॥ जिची त्रिवक्र अंगयष्टि॥
पूर्णतारुण्याची पुष्टि॥फुल्लारपंकजवदना सृष्टि॥अति गोमटी वरानना ॥ २० ॥ केशरकस्तूरीश्रीगन्ध ॥दिव्यसुमनामोद
विविध ॥ अंगविलेपनें नानाविध॥पात्रें विशुद्ध करतळीं ॥२१॥येतां देखोनि तियेप्रति॥हांसत होत्साता
श्रीपति ॥ रसप्रद ह्मणिजे सुखोत्पत्ति ॥ भोगी त्रिजगती ज्याचेनी ॥ २२ ॥ पुसता झाला तो श्रीहरि ॥ तें व्याख्यान ॥ १ ॥
परिसिजे चतुरीं ॥ कैसी कृष्णोक्ति साजिरी ॥ शुकवैखरी वाखाणी ॥ २३ ॥

---

[1] वसिष्ठकुलांत जन्म ज्याचें तो शुकाचार्य. [2] कौरववंशाचा शोभादायक टिकला परीक्षिति.

श्रीभगवानुवाच ॥ ॥ कात्वंवरोर्वैतदुहानुलेपनंकस्यांगनेवाकथयस्वसाधुनः ॥
देह्यावयोरंगविलेपमुत्तमंश्रेयस्ततस्तेनचिराद्भविष्यति ॥ २ ॥

॥ टीका ॥ उपहासपूर्वक श्रीरंगें ॥ तये संबोधिलें प्रसंगें ॥ अवो अंगने सुजंघे[1] ॥ कोण तूं गे कोणाची ॥ २४ ॥ ह्मणसी उपहासपूर्वक कैसें ॥ तेंही कथिजेल राया परिसें ॥ अंधे स्त्रियेलागिं जैसें ॥ सुलोचना संबोधन ॥ २५ ॥ अमंगळासि मंगळ नाम ॥ तैंवि त्रिवक्रेसि पूर्णकाम ॥ अंगने सुजंघे ऐसी नर्म[3]- ॥वाक्यें सप्रेम संबोधी ॥ २६ ॥ उपहासगर्भित[2] संबोधन ॥ तयेसि पुसे जनार्दन ॥ तूं कोणाचें वनितारत्न ॥ हें अनुलेपन कोणासी ॥ २७ ॥ उह ऐसिया निपातें ॥ वितर्क करूनि भ्रूसंकेतें ॥ प्रश्न केला कमलाकान्तें ॥ कीं साधुवाक्यातें कथिजे आह्मां ॥२८॥ आह्मी रामकृष्ण बन्धु ॥ आमुचे ठायीं भावना शुद्ध ॥धरूनि विलेपना जैंवि विविध ॥उत्तम सुगन्ध विलेपीं ॥ २९ ॥ कांति सुगौर सांवळिया ॥ जाणोनि सुन्दर देई उटिया ॥ सद्यचि[4] सफळ होती क्रिया ॥ भावें केलिया सत्सेवा ॥३०॥ आह्मां देसी तनुलेपनें ॥ तेणें कल्याण तुजकारणें ॥ सद्य होईल ऐसें जाणें ॥ इयें ऐकोनि वचनें येरी वदे ॥ ३१ ॥

सैरंध्युवाच ॥ ॥ दास्यस्म्यहंसुन्दरवर्यसंमतात्रिवक्रनामाह्यनुलेपकर्मणि ॥
मद्भावितंभोजपतेरतिप्रियंविनायुवांकोऽन्यतमस्तदर्हति ॥३॥

॥टीका॥ सुन्दरवर्य हें संबोधन॥येणें कृष्णाचें सम्मुखीकारण॥आनन्दभरित अंतःकरण॥हरिकृत प्रश्न निरोपी

---

१. सुन्दर मांड्या जिच्या ती. २ लीलेच्या भाषणानें. ३ थट्टेनें युक्त. ४ तत्काल.

॥३२॥ वृक्षःस्थळग्रीवाकटी॥ऐसी त्रिवक्र अंगयष्टि॥यथार्थनामकामीं कंस²चेटी॥ह्मणती वाक्पुटीं त्रिवक्रा ॥ ३३ ॥ अनुलेपसाधनक्रियेच्या ठायीं॥माझें कौशल्य कंसाहृदयीं॥मानलें तेणें मज ये कार्यीं॥आज्ञापिलें सप्रेमें ॥३४॥ अंगविलेप विविधा रीती॥अर्पी कंसाच्या वनितांप्रति॥कंस सम्मानी मजप्रति॥मी आवडती वर सर्वां ॥ ३५ ॥ माझे हातींचें विलेपन॥कंसासि अत्यन्त प्रियतम मान्य॥तें द्यावया आणिक कोण॥तुह्मां वांचोन योग्य असे॥ ३६॥तुह्मी त्रैलोक्यसुन्दर॥तुह्मांचि योग्य हे उपचार ॥ किंकरींमाजी ममाधिकार ॥ प्रीतिपात्र स्वामीचें ॥३७॥ ऐसी त्रिवक्रा मृदुभाषिणी ॥ कृष्णाप्रति वशवर्तिनी ॥ किमर्थ झाली हे शंका मनीं ॥ तरी सज्जनीं परिसावें ॥ ३८ ॥

रूपपेशलमाधुर्यहसितालापवीक्षितैः ॥ धर्षितात्माददौसांद्रमुभयोरनुलेपनम् ॥ ४ ॥

॥ टीका ॥ भगवंताचें सुन्दरपण ॥ सर्वावयवीं सुष्ठु लावण्य ॥ जें कां लक्ष्मीसी भुलवण ॥ तेथ त्रिवक्रानयन गुंतले ॥३९ ॥ नेत्रीं पाहतां अक्षरपंक्ति ॥ विवरणें बुद्धि गुंते अर्थी ॥ तेंवि लक्षितां अंगकांति ॥ रुचली चित्तीं कोमलता ॥ ४०॥ पेशल ह्मणिजे सुकुमारता ॥ श्रीकृष्णाची सादर पाहतां॥तेणें मूर्च्छना आली चित्ता॥ देहअहंता विरमली ॥ ४१॥ नेत्रकटाक्ष वदनीं हास्य॥ वाङ्माधुर्य रसविशेष ॥ आलाप ह्मणिजे स्वरसारस्य ॥ इहीं मानस हिरतलें¹ ॥ ४२ ॥ इत्यादि भगवल्लक्षणें पाहतां ॥ त्रिवक्रा झाली मोहितचित्ता ॥ सघनविलेपन चर्चितां ॥ बंधु उभयतां तोषविले ॥ ४३॥ मलयज चंदन घन चर्चून ॥ कैसे शोभवी दोघे जन ॥ तें तूं राया करीं श्रवण ॥ सभाग्यपण कुब्जेचें ॥ ४४ ॥

---

१ हिरावून नेलें. २ कंसचेटी ह्म० कंसाची दासी

ततस्तावंगरागेणस्ववर्णेतरशोभिना ॥ संप्राप्तपरभागेनशुशुभातेऽनुरंजितौ ॥ ५ ॥

॥ टीका ॥ यानंतरें रामकृष्ण॥श्वेत श्याम ज्यांचे वर्ण ॥ त्यांहूनि केशरादि रंग भिन्न ॥ तिहीं करून चर्चिले ॥४५
नाभीपासूनि उपरिभाग ॥ केशरादिकीं चर्चितां सांग ॥ शोभते झाले लावण्य सुभग ॥ रंगें सुरंग उभयतां॥४६॥
स्वमुखें बोलिला भगवान ॥ आह्मांस देईं विलेपन॥ तेणें शीघ्र तव कल्याण ॥ हें वाक्य ऐकोन अनुसरली॥४७॥
उभयतांसि अंगरांग ॥ तिनें चर्चिले यथासांग ॥ तेणें तुष्टला श्रीरंग ॥ वरप्रसंग अवधारा॥४८॥

प्रसन्नोभगवान्कुब्जांत्रिवक्रांरुचिराननाम् ॥ ऋज्वींकर्तुमनश्चक्रेदर्शयन्दर्शनेफलम् ॥ ६ ॥

॥टीका॥ऐश्वर्य अचिंत्यसंपन्न॥ सत्तामात्रें विश्वसृजन॥कुब्जांग सरळ करूं आपण॥ इच्छी श्रीकृष्ण हृत्कमळीं४९
तिनें सुंन्दर विलेपन ॥ अर्पूनि केलें तनुरंजन ॥ यालागीं सरळतनुलावण्य ॥ स्वयें भगवान करूं इच्छी ॥ ५० ॥
किंवा भुलौनि भगवद्रूपा ॥ तिचिये अंतरीं उदेला त्रपा ॥ ह्मणेनि विधातया निष्कृपा॥त्रिवक्रा का पां मज केलें५१
माझी असती लावण्यतनु ॥ तरी मी भोगितें मधुसूदनु ॥ आतां त्रिवक्रा लावण्यहीनु ॥ लज्जेकरून नबोलवे॥५२॥
हें जाणोनि अंतरवेत्ता ॥ प्रसन्न पूर्णत्वें होत्साता ॥ तियेची मोडूनि त्रिवक्रता॥सुंदर वनिता करूं इच्छी॥५३॥वदनपंकंज[3]
परम रुचिर ॥ कटिवक्षः स्थळग्रीवा वक्र ॥ ऐसें विपरीत जें शरीर ॥ लावण्यप्रचुर करावया ॥ ५४ ॥
प्रवर्तला कमलाकांत ॥ दर्शवी दर्शनाचा सफलार्थ ॥ कोणेपरी तें श्लोकोक्त ॥ परिसा समस्त निरूपण ॥५५ ॥

पद्भ्यामाक्रम्यप्रपदेद्व्यंगुल्युत्तानपाणिना ॥ प्रगृह्यचिबुकेऽध्यात्ममुदनीनमदच्युतः ॥ ७ ॥

---

[1] उटी. [2] लाज. [3] मुखकमल.

॥टीका॥कृष्णें कुब्जा स्वसंमुख॥उभी करूनियां सम्यक ॥ तिचें पदाग्र नावेक॥स्वपदीं निष्टंक दडपिलें ॥५६॥
दक्षिणहस्तेंचीं अंगुलें दोन्ही॥तर्जनीमध्यमाअभिधानीं ॥हनुवटीयेतळीं घालूनी॥ऊर्ध्व उचलूनि निटविली॥५७॥
उत्तान[1] द्वयं[2] गुळें धरूनि चिबुकां[3]॥ऊर्ध्व उचलितां वर्ष्म[4]शळाका॥सरळावयवी शोभली देखा ॥ जैसी नायिका सुराप्सरा
५८ज्याचा संकल्प अविच्युत॥यालागीं नामें तो अच्युत॥तेणें कुब्जा लावण्यभरित॥केली त्वरित निजहस्तें॥५९
अहल्या चरणस्पर्शमात्रें॥करपदयोगें कुब्जागात्रें॥सुंदर केलीं जगन्मित्रें॥ऐसीं चरित्रें अघहंतीं ॥ ६० ॥

सातदर्जुसमानांगीबृहच्छ्रोणिपयोधरा ॥ मुकुन्दस्पर्शनात्सद्योबभूवप्रमदोत्तमा ॥ ८ ॥

॥टीका॥श्रीकृष्णाच्या स्पर्शेंकरून॥कुब्जा सरळसमानतनु॥पृथुळ[5] पयोधर नितंब[6] पीन[7]॥मध्य[8] सान[9] तन्वंगी॥६१
मुकुंदयतीति मुकुंद॥आनंदवर्धक अर्थ विशद ॥ त्याच्या स्पर्शें प्रमदा सद्य॥ झाली आनंदमय अवघी ॥ ६२ ॥
परमानंद उचंबळोन॥तिनें प्रार्थिला आनंदघन॥तेंही ऐका निरूपण॥कुरुमंडन संदस्य[10] हो ॥ ६३ ॥

ततोरूपगुणौदार्यसंपन्नाप्राहकेशवम् ॥ उत्तरीयान्तमाकृष्यस्मयंतीजातहृच्छया ॥ ९ ॥

॥टीका॥कृष्णप्रसाद लाहोनि पूर्ण॥औदार्यरूपगुणलावण्य॥झाली सकळकळासंपन्न॥श्रीसमान श्रीभाग्यें॥६४॥
ऐसी लाहोनि सयोग्यता॥बोलती झाली श्रीभगवन्ता॥उत्तरीयवसन त्वरिता ॥ओढी हस्तें स्मितवदना ॥६५॥ ॥ ३ ॥
साधनसंपत्ति होती पहिली॥तेणें कृष्णकृपा लाधली॥स्पर्शें षड्गुणसंपन्न झाली॥अभिलाषिली कृष्णरति ॥६६ ॥

---

[1] पालथी. [2] दोन अंगुलें. [3] अधरोष्ठाखालचा भाग. [4] देहाची काठी. [5] विशाल. [6] कटिपश्चाद्भाग.
[7] पृष्ठ. [8] कंबर. [9] बारीक. [10] परीक्षितीचे सभासद.

डोळे मोडूनि हास्य करी ॥ भ्रूसंकेतें पदरीं धरी ॥ भगवत्काम अभ्यंतरीं ॥ तेणें गात्रीं विव्हळता ॥ ६७ ॥
साधनसंपत्ति होती पहिली॥तेणें कृष्ण कृपा लाधली॥स्पर्शें सद्गुणसंपन्न झाली॥अभिलाषिली कृष्णरति॥६८॥
दुर्लभकेजा भाजी घेणें ॥ मुक्तामौल्य तो काय जाणे ॥ धनसंपन्न झालिया तेणें ॥ रत्नभूषणें अपेक्षिजे ॥ ६९ ॥
तेंवि विषयासक्त नर ॥ बाह्यलौकिक भजनादर ॥ त्यांसि दुर्लभ जगदीश्वर ॥ भवसागर अनुल्लंघ्य ॥ ७० ॥
देवें जोडतां साधनधन ॥ भगवद्गुरुकृपासंपन्न ॥ उभयभोगीं विरक्त पूर्ण ॥ निजात्मरमण कामिती॥७१॥
ऐसिया कामातुरांप्रति ॥ भयलज्जेची होय निवृत्ति ॥ कुब्जा नस्मरे कंसभीति ॥ नधरी चित्तीं जनलज्जा
॥७२ ॥ कृष्णाप्रति काय ह्मणे ॥ तें ऐकावें कुरुभूषणें ॥ मुमुक्षु सच्छ्रोते शहाणे ॥ अंतःकरणें पडकती तें ॥७३॥

एहिवीरगृहंयामोनत्वांत्यक्तुमिहोत्सहे ॥ त्वयोन्मथितचित्तायाःप्रसीदपुरुषर्षभ ॥ १० ॥

॥ टीका ॥ भगवंतासी स्ववश करणें ॥ ऐसें भाग्य केलें कोणें ॥ कुब्जेचिया अगाध पुण्यें ॥ झालें बोलणें
सविलास ॥ ७४ ॥ भो भो वीर विलासचतुरा ॥ चाल ये जाऊं माझिया घरा ॥ तुज टाकूनि दुःखसागरा-॥
माजि माझेनि नपडवे ॥ ७५ ॥ तुज त्यागितां अनुत्साह ॥ दुःखसागर तो महामोह ॥ तेथ तळमळी माझा देह
॥ परमोत्साह तव संगें ॥ ७६ ॥ तुवां स्ववश केलें चित्ता ॥ तुझेनि झालें चित्तोन्मथिता ॥ एवं करोनि
स्मरमोहिता ॥ नवचें परता रति देई ॥ ७७ ॥ भो भो स्वामी पुरुषश्रेष्ठा ॥ पूर्ण साधूनि ममाभीष्टा ॥ स्मरविरहाच्या
निरसीं कष्टा ॥ रक्षीं अरिष्टापासाव[2] ॥ ७८ ॥ तुझिये अधरामृतें तृषा ॥ निरसीं माझी परमपुरुषा ॥
वियोगदुःखाचिया क्लेशा ॥ पात्र नकरीं प्रसीद ॥ ७९ ॥ तव तनूच्या आलिंगना ॥ तव करकंजीं कुचमर्दना ॥

---

१. सवकतात. २ पासून. ३ प्रसन्न हो.

चटुलचाटुस्मितभाषणा ॥ स्पृहयमाणा स्मरतप्ता ॥ ८० ॥ माझा मनोरथ पूर्ण करीं ॥ ह्मणोनि ओढी धरूनि पदरीं ॥ तेणें विस्मित श्रीमुरारि ॥ पाहे नेत्रीं सखयांतें ॥ ८१ ॥

॥ ४ ॥ एवंस्त्रियायाच्यमानःकृष्णोरामस्यपश्यतः ॥ मुखंवीक्ष्यानुगानांचप्रहसंस्तामुवाचह ॥ ११ ॥ ॥४२॥

॥टीका॥ऐसी संप्रार्थितां वनिता॥हास्यवदनें मन्मथजनिता॥साग्रज सखे पहात असतां॥काय करिता जाहला ॥८२॥अवलोकूनि साग्रज सखे॥कुब्जा खुणावूनि उन्मेखें[1]॥हस्य करूनि बोले मुखें॥तें तूं ऐकें कुरुवर्या ॥ ८३ ॥

एष्यामितेगृहंसुभ्रूःपुंसामाधिविकर्शणम् ॥ साधिताऽर्थोऽगृहाणांनःपांथानांत्वंपरायणम् ॥ १२॥

॥टीका॥अवो सुभ्रु लावण्यसरिते॥अभीष्टार्थ साधूनि पुरते॥मग मी येईन गृहातें॥तूं पांथांतें विश्रांति ॥ ८४ ॥ अभीष्टार्थ ते ह्मणाल कोण॥तरी जें समल्लकंसहनन॥उग्रसेनादिविमोचन॥आणि सांत्वन पितरांचें ॥ ८५ ॥ ऐसा कृतार्थ होऊनियां ॥ सदना जातां अक्रूराचिया ॥ मग मी गृहासि येईन तुझिया ॥ दृढनिश्चया मानावें ॥ ८६ ॥ गृहिणी नाहीं जयांप्रति ॥ तूं त्या अपरिग्रहां[2] विश्रांति ॥ मार्गस्थांची मनोजआर्ति[3] ॥ तूं शमविसी निजयोगें॥८७॥ दारपरिग्रह ज्यांस नाहीं॥मनोभवआधि जो त्यांच्या देहीं॥तो तूं शमवूनि आनंदडोहीं॥निमग्न करिसी भो सुभ्रु ॥ ८८

विसृज्यमाध्व्यावाण्यातांव्रजन्मार्गेवणिक्पथैः ॥ नानोपायनताम्बूलस्त्रग्गंधैःसाग्रजोऽर्चितः ॥ १३ ॥ ॥ ४ ॥

॥ टीका ॥ इत्यादिचटुला मधुरोत्तरीं ॥ विसर्जूनियां सैरंध्री[4] ॥ पुढें वार्धुषरथ्यांतरीं ॥ वयस्यभारीं चालिला ॥८९॥

---

१ डोळे मिचकावण्यानें. २ अपत्नीकांला. ३ कामपीडा. ४ परगृहीं राहणारी, स्वतंत्र व वेणीफणी करण्यांत कुशल जी स्त्री ती. ५ लोभी

वणिकमार्गीं प्रतिदुकानीं ॥ माळाताम्बूलानुलेपनीं ॥ पूजाद्रव्यें पात्रें भरूनी ॥ येती वाणी सामोरे ॥ ९० ॥
साग्रज सानुचर श्रीपति ॥ सर्वोपचारें सर्व यजिती ॥ नाना उपायनें अर्पिती ॥ नमस्कारिती साष्टांगीं ॥ ९१ ॥
स्तुति प्रणति प्रदक्षिणा ॥ भावें करिती जनार्दना ॥ तेथ दाटल्या नागरजनां ॥ पाहतां नयनां अनिमेष ॥ ९२ ॥
ते ते ठायीं तज्जनवनिता ॥ सादर पाहती मन्मथजनिता ॥ हरिलावण्यें हरितां चित्ता ॥ जाल्या मोहिता तें एक ९३

तद्दर्शनस्मरक्षोभादात्मानंनाविदन्स्त्रियः ॥ विस्रस्तवासःकबरवलयालेख्यमूर्तयः ॥ १४ ॥

॥ टीका ॥ पण्यश्रेणीप्रासादशिखरीं ॥ खणोखणीं दामोदरीं ॥ द्वारीं वप्रीं गवाक्षच्छिद्रीं ॥ रथ्यांतरीं वधूदाटी
॥ ९४ ॥ नेणती पदर कोणीकडे ॥ अवयव नह्मणती झांकले उघडे ॥ अलंकार वेडेवांकुडे ॥ नजनांकडे त्या पाहती
॥ ९५ ॥ सभाग्य अच्युत अर्चिती सांग ॥ ललना लक्षिती लावण्य चांग ॥ सबाह्य रुचलिया श्रीरंग ॥ मनीं
अनंग प्रकटला ॥ ९६ ॥ तेणें गळालीं नेसलीं वसनें ॥ विस्रस्त केश विगलित सुमनें ॥ श्लथ कंकणें सर्वाभरणें ॥
द्रवलीं चिह्नें स्मरक्षोभें ॥ ९७ ॥ वि[1]लीन चेष्टा उपरमवृत्ति ॥ सबाह्य कृष्णीं रंगल्या प्रीती ॥ भासती लिखितचित्राकृति
॥ कीं लेप्य[2]मूर्ति अनिमेषा ॥ ९८ ॥ अनेक देशिकेंद्र प्रबुद्ध ॥ वैध[3]दीक्षेचा करिती बोध ॥ नैसर्गिक लावण्यवेध
॥ लाधल्या वेध हरिविरहें ॥ ९९ ॥ वारंवार हरिस्मरकथा ॥ वधूसंबंधी नमनी वृथा ॥ श्रवणें मननें
दुर्लभ व्यथा ॥ छेदी सर्वथा रंगलिया ॥ १०० ॥ उत्तमवसनीं सुवर्ण[4]तार ॥ कीं भोजनीं साज्य पंचधार ॥ सभाग्य
घालिती वारंवार ॥ तेंवि हरिस्मर येठायीं ॥ १०१ ॥ भगवद्रूपीं वेध घडे ॥ ऐसें ज्याचें दैव उघडें ॥ त्याच्या

---

[1] लय पावल्या. [2] चुना, मृत्ति इ० कांच्या मूर्ति. [3] विधिविषयक दीक्षेचे. [4] सोनें व रुपें.

स्मरणें दुष्कृत झडे ॥ पढतां तोंडें हरिप्राप्ति ॥ २ ॥विषयासक्त सकाम नर॥प्रेमें पढतां वारंवार ॥ हरिगुणवस्तुमहिमा अपार ॥ निर्विकारकारक त्यां ॥३॥षण्यमार्गें ठायीं ठायीं॥ साग्रज स्वर्चित शेषशायी॥जातां वनितारूपनवायी ॥ पाहतां देहीं ताटस्थ्य ॥ ४ ॥ असो यानंतरें हरि ॥ पुढें जातां मथुरापुरीं ॥ पौरजनांतें विचारी ॥ कोणे मंदिरीं धनुर्मख ॥ ५ ॥

ततःपौरान्पृच्छमानोधनुषःस्थानमच्युतः ॥ तस्मिन्प्रविष्टोददृशेधनुरैन्द्रमिवाद्भुतम् ॥ १५ ॥

॥ टीका ॥ स्वयें सर्वज्ञ षड्गुणवंत ॥ प्राकृतांपरी पौरां पुसत ॥ कोणे स्थानीं धनु स्वर्चित ॥ दावा त्वरित ह्मणतसे ॥ ६ ॥ एक दाविती भ्रूसंकेतें ॥ एक दाविती उजव्या हातें ॥ एकें स्वयें चालोनि पंथें॥ धनुःस्थानातें दाखविती ॥ ७॥ तेणें पथें कैटभारि॥ प्रवेशे धनुर्मखागारीं ॥ शक्रकार्मुक गगनावरी ॥ देखे त्यापरी अद्भुत पैं ॥८॥ जरी तें अद्भुत ह्मणसी कैसें॥तेंही कथिजेल समासें[1]॥सावध होवोनि राया परिसें ॥आदिपुरुषें जें दमिलें॥ ९॥

पुरुषैर्बहुभिर्गुप्तमर्चितंपरमर्धिमत् ॥ वार्यमाणोन्टभिःकृष्णःप्रसह्यधनुराददे ॥ १६ ॥

॥टीका॥महावीर शूर सुभट॥जे कंसाचे राजभट ॥ रक्षणा बैसले उद्भट ॥ शस्त्रें तिखट परजुनी ॥१०॥ दाविती बळप्रतापप्रौढी ॥ बिरुदें मस्तकीं भुजादंडीं ॥ युद्धप्रताप वदती तोंडीं ॥ घालिती मुरंडी[2] श्मश्रूंतें[3] ॥ ११ ॥ तोडर रुळिया रुळती पायीं ॥ कीर्तिमुखें दोहीं बाहीं ॥ शस्त्रास्त्र मल्लविद्या पाहीं॥ तेणें देहीं तमतामिती[4]॥ १२॥ ऐसे अपार वीरवाट ॥ धनूरक्षणीं बैसले थाट ॥ उभे बिरुदें पढती भाट ॥ कडकडाड वीररसें ॥ १३ ॥

---

[1] संक्षेपाने. [2] पीळ. [3] मिशांना. [4] गर्वानें वल्गना करिती.

वायूसी प्रवेश जेथ नघडे ॥ दुर्गम कृतांतवदनायेवढें ॥ तेथ आखंडल[1]शस्त्रापाडें ॥ चंड कोदंड मांडिलें ॥ १४ ॥ वज्रतुल्य कठोर कोटी[2] ॥ विगत[3]प्रत्यंच भूतटीं ॥ गगनगर्भीं मध्यमुष्टि ॥ कमठ[4]पृष्ठसम कठिन ॥ १५ ॥ रक्तपीतहरितरंगीं ॥ रत्नखचित मुष्टिभागीं ॥ महाभयंकर भुजगभोगी[5] ॥ मखप्रसंगीं प्रतिष्ठिलें ॥ १६ ॥ रुक्मबंदी किंकीणी घंटा ॥ कर्कशरणरंगीं वाजटा[6] ॥ दिठीं देखतां वीरवाटां ॥ थरके कांटा सर्वांगीं ॥ १७॥ उभयभागीं इषुधि[7] पूर्ण ॥ तक्षकभक्षक अक्षयबाण ॥ विद्युद्भासुर खड्ग तीक्ष्ण ॥ कोशवर्जित[8] द्विभागीं ॥१८॥ तदुभयपार्श्वीं द्वय खेटकें[9] ॥ ज्यांवरी कनकोदकाचे टिबके ॥मुष्टिग्रहणीं शंकु निके ॥ वज्रमणीचे दृढतर ॥ १९॥ तोमर मुद्गर परशांकुश ॥ कुंत यमदंष्ट्र पट्टिश ॥ गदा त्रिशूळ वरुणपाश ॥ वज्रें चक्रें भृशुंडी ॥ २० ॥ ऐसीं अनेक नग्न शस्त्रें ॥ प्रतिष्ठिलीं जें पिशाचमंत्रें ॥ पुढें विस्तीर्ण कनकपात्रें ॥ सोपस्करें स्थापिलीं ॥ २१ ॥ अविकां बस्तांचे मस्तक॥ वनलुंलाय[10] पोत्री[11] शशक ॥ रोहें चितळें कुरंगप्रमुख ॥ पिशितें[12] अनेक विहगादि॥ २२ ॥ रत्नपात्रीं विविधें रुधिरें॥ तरुजें योगजें मद्यें अपारें ॥ संस्कृत अन्नें बहुतप्रकारें ॥ घृतपाचितें बहुपरीचीं ॥ २३ ॥अनेक पुष्पें माळा दळें॥ नारीकेळादि समस्तफळें ॥ इक्षुकदळीस्तंभ सरळे ॥ वरी कोंवळे फळघोंस ॥ २४ ॥ धूप दीप रंगावळी ॥ नैवेद्य तांबूल स्थळोस्थळीं ॥ रंगदेवता विराजली ॥ मखमंडपीं घवघवीत ॥ २५ ॥ एवं स्वर्चित परमर्द्धिमत्[13] ये श्लोकपदींचा कथिला अर्थ ॥ ऐसिये धनुर्मखशाळे आंत ॥ बळें अच्युत निघाला ॥ २६ ॥ कोटिकरटीं[14] माजी सिंह ॥ कीं खगेंद्र नगणी कोटि द्विजिह्व[15] ॥ तैसे प्रतापें बळकेशव ॥ पावले ठाव धनुष्याचा ॥ २७ ॥ त्यांतें वा-

---

१ इंद्रधनुष्यासारखें. २ धनुष्याचीं टोंकें. ३ धनुष्याची दोरी' ४ कांसव. ५ सर्पशरीरासारखें. ६ वाचाल. ७ भाता. ८ नागवे. ९ ढाला. १० रानरेडा. ११ डुकर. १२ मांस. १३ अतिसमृद्धियुक्त. १४ हत्ती. १५ साप.

रिती राजभटं[1] ॥ शस्त्रें उचलोनि क्रोधिष्ठ ॥ कृष्ण मानूनि ते फलकट[2] ॥ हठें बलिष्ठ प्रवेशला ॥ २८ ॥ कराळ[3]
धनूरक्षकांच्या पंक्ति ॥ अवघे सकोप दटाविती ॥ त्यांतें नगणोनि कोदंड हातीं ॥ कोणे रीतीं हरि कर्षी ॥२९॥

करेणवामेनसलीलमुद्धृतंसज्यंचकृत्वानिमिषेणपश्यताम् ॥
नृणांविकृष्यप्रबभंजमध्यतोयथेक्षुदंडंमदकर्युरुक्रमः ॥ १७ ॥

॥ टीका ॥ मत्तवारण इक्षुदंड ॥ ओढी पसरूनि शुंडादंड ॥ तेंवि पसरोनि वामदंड ॥ चंड कोदंड आंसुडिलें॥ ३०
मत्तकुंजर अनावर ॥ वारितां बळेंचि घालूनि कर ॥ इक्षुदंड ओढी शीघ्र ॥ तेंवि घे श्रीधर कोदंड ॥ ३१ ॥वामकरें
उचलोनि चाप ॥ वीरां प्रकटी स्वप्रताप ॥ लीलामात्रें दमूनि स्वल्प। गुण साटोप वाइला[4] ॥ ३२॥ चाप सूदिलें
वाममुष्टि॥मौर्वी मर्दूनि दक्षिणांगुष्ठीं॥ठकारें कर्षितां जगजेठी॥कडकडाटीं भंगलें॥ ३३॥निमेषमात्रें घेऊनि धनु॥
लीलेकरूनि वाइला गुण[5] ॥ओढूनि मोडिलें कडकडून॥रक्षकगण पाहत पाहतां॥ ३४॥ निमिषामाजी ब्रह्मांडकोटि ॥
ज्याची स्वलीला योगभ्रूकुटी ॥ इच्छामात्रें घटी विघटी ॥ तो जगजेठी उरुक्रम[6] ॥ ३५ ॥ धनुष्य भंगितां कडकडाटें
॥ भयानक शब्द उठिला नेटें ॥ गगन भूमि दिशा दरकुटें ॥ त्या भोभाटें कोंदलें ॥ ३६ ॥

धनुषोभज्यमानस्यशब्दःखंरोदसीदिशः ॥ पूरयामासयंश्रुत्वाकंसस्त्रासमुपागमत् ॥ १८ ॥

॥ टीका ॥ नाद भरला सर्वांकर्णीं ॥ ऐकोनि कंसें अंतःकरणीं ॥ मृत्युभयाची कणाणी ॥घेतली कानीं दचकोनी ३७
धनुष्य भंगितां राजभट ॥ क्षोभें उठावले उद्भट ॥ कृष्णावरी एकदाट ॥ कडकडाट धांविले ॥ ३८ ॥

---

[1] योद्धे. [2] तुच्छ. [3] भयंकर. [4] चढविला. [5] धनुष्याची दोरी. [6] विशाल पराक्रम ज्याचा तो.

॥ तद्रक्षिणःसानुचराःकुपिताआततायिनः ॥ ग्रहीतुकामाआवव्रुर्गृह्यतांबध्यतामिति ॥ १९ ॥

॥ टीका ॥ मुख्य मुख्य ससेवक ॥ क्रोधें खवळले रक्षक ॥ आततायी[1] जे निःशंक ॥ जे पातक नगणिती ३९
अग्नि लावितां गृहाप्रति ॥ निरपराध जंतु जळती ॥ त्यांची दया नुपजे चित्तीं ॥ ते निश्चिती आततायी ॥ ४० ॥
विष घालूनि अन्नपानीं ॥ विश्वासें जे वधिती प्राणी ॥ निर्घृण निष्ठुर अंतःकरणीं ॥ ते दुर्गुणी आततायी ॥ ४१
शस्त्रघातें घेऊनि प्राण ॥ बलात्कारें धनापहरण ॥ आततायी ते दुर्जन ॥ करुणाहीन कठोर ॥ ४२ ॥ पतिव्रतेचा
व्रतभंग ॥ बलात्कारें करिती संग ॥ निर्दय निरपत्रप[2] निलाग ॥ कीं वृत्तिविभाग अपहर्ते ॥ ४३ ॥ ऐसे आततायी
निर्घृण ॥ तिहीं प्रतापें वेष्टिला कृष्ण ॥ शुकें आततायिपदें कथन ॥ केलें नैर्घृण्य[3]प्रशंसने ॥ ४४ ॥ रामकृष्ण
केवळ बाळ ॥ राजस सुकुमार वेल्हाळ ॥ लावण्यलक्ष्मी सुतेजाळ ॥ लीला रसाळ स्मेरास्य[4] ॥ ४५ ॥ ज्याच्या
लावण्यें सुरनरवनिता ॥ खेचर भूचर जलचर सरिता ॥ वेधूनि झालिया स्मरमोहिता ॥ त्यांचिया घाता नसि-
णती जे ॥ ४६ ॥ दया नाहींच ज्यांचे हृदयीं ॥ ऐसे निष्ठुर आततायी ॥ घ्या घ्या ह्मणूनि उठिले पाहीं ॥ कठोर
घाई मिसळले ॥ ४७ ॥ रामकृष्ण धरावे जित ॥ हा सर्वांचा मुख्य हेत ॥ एक ह्मणती करा घात ॥ हातोहात
पळतील ॥ ४८ ॥ एक ह्मणती धरा बांधा ॥ एक ह्मणती सवेग वधा ॥ ऐसे बोलती सक्रोध शब्दा ॥ रामगोविंदा
वेष्टूनी ॥ ४९ ॥ यानंतरें रामकेशव ॥ लक्षूनि दुष्ट दुरभिप्राव ॥ सक्रोध साधूनियां आव ॥ कैसे स्वमेव उठावले ५०

॥ अथतान्दुरभिप्रायान्विलोक्यबलकेशवौ ॥ क्रुद्धौधन्वनआदायशकलेतांश्चजघ्नतुः ॥ २० ॥

---

[1] वधाविषयीं उद्युक्त. [2] निर्लज्ज. [3] निर्दयपणा. [4] हास्ययुक्त मुख.

॥ टीका ॥ क्रोधावेश उठतां चित्तीं ॥ धनुष्यखण्डें दोघांहातीं ॥ तिहीं ताडितां रक्षकांप्राप्ति ॥ केली समाप्ति
सर्वांची ॥ ५१ ॥ कोटिकिंकरटी[1] कण्ठीरव[2] ॥ मर्दी तेवीं बळकेशव ॥ आततायी मर्दूनि सर्व ॥ विजयोत्सवें विराजले॥५२॥
तेणें झाला हाहाकार॥ भंगला रक्षकांचा परिवार ॥ धाकें पळाले किंकर ॥ भग्नशिरःकरपदपृष्ठ ॥५३॥
कंसा ह्मणती पाहें दृष्टि ॥ बळें मोडूनि धनुष्ययष्टि ॥ तिहीं झोडिले वीर जेठी ॥ दाटोदाटीं पातले ॥५४॥ राया
सत्वर सावध होयीं ॥ मारीत आले वीर विजयी ॥ झोडिती कोदण्ड[3]खण्डघायीं॥सत्वर देईं जीवदान॥५५॥भयें
वोर्थ[4]रूनि पाहती मागें ॥ ह्मणती राया लपवीं वेगें ॥ थरथरां कांपती सर्वांगें ॥ ह्मणती लागें पातले ॥ ५६ ॥ हें
ऐकूनि दचकला कंस ॥ तेणें पडला मुकुटाव[5]तंस ॥ कोरडी पडली आननास ॥ धैर्यें निःशेष सांडवला॥५७॥मग
भ्रूसंकेतें हस्तखुणा ॥ कंस प्रेरी पार्षद[6]गणां ॥ ह्मणे धांवा रे धांवण्या ॥ धरूनि आणा रिपु दोघे ॥ ५८ ॥ ऐसी
नृपाची संकेतवाणी ॥ ऐकोनि धांवल्या वीरश्रेणी ॥ धनुष्यागारीं चक्रपाणि ॥ चहूंकडूनि वेष्टिती ॥ ५९ ॥ एक
विंधिती तिखट बाण ॥ दुरूनि एक टाकिती पाषाण ॥ एक ह्मणती चक्रेंकरून ॥शिर छेदून पाडारे॥६०॥कोणी
परजूनि ओ[7]डणें खण्डें[8] ॥ अपर शूळेंसीं होती पुढें ॥एक ह्मणती धरूं रोकडे॥कंसापुढें जित नेऊं ॥६१॥रामकृष्ण
हे जीत धरा ॥ दुसरे ह्मणती जिवें मारा ॥ तिसरे ह्मणती सैंबडियां पोरा ॥ दमनीं दरारा कायसा ॥६२॥ एक
झुगारिती तोमर ॥ कोण्ही टाकिती महामुद्गर ॥ अपर करिती परिघ[9]मार ॥ अन्य कुठार टाकिती ॥६३॥ पहा
हो कैसे आपुले पायीं ॥ काळें आंणेले मरणालयीं ॥ मृत्यु होणार जिये भोईं ॥ ते ते ठायीं तनु त्यजिती ॥६४॥

---

१ हत्ती. २ सिंह. ३ धनुष्याच्यां तुकड्यांच्या प्रहारानें. ४ शब्द करून. ५ मुकुटावरील तुरा. ६ सेवकांना.
७ ढाला. ८ तरवारी. ९ गदाप्रहार.

बापुडीं होतीं मोकळे रानीं ॥ कर्मे सिरकलीं काळवदनीं ॥आतां सोडवूं नशके कोण्ही ॥ कंसापासूनि लेंकुरें॥६५॥ एक कंसा सांगों गेले ॥ रामकृष्ण धनुष्यशाळे ॥ वीरीं कोंडूनि जित धरिले ॥ भले सांपडले अडचणीं॥६६॥ऐसा कंसासि समाचार ॥ जाणविती जंव किंकर ॥ तंव ते बलरामश्रीधर ॥ उठिले तीव्र आवेशें ॥ ६७॥ दोघे कोदण्डखण्डायुध ॥ मारित उठिले पैं प्रसिद्ध ॥ शालामुखीं करूनि रोध॥ केला वध सर्वांचा ॥६८॥ धनुष्यशकलांचेनि प्रहारें ॥ झोडिती वीरांचीं शरीरें ॥ तुटोनि गेलीं पदकरशिरें ॥ लोंढे रुधिरें तुम्बळले ॥ ६९ ॥

बलंचकंसप्रहितंहत्वाशालामुखात्ततः ॥ निष्क्रम्यचेरतुर्हृष्टौनिरीक्ष्यपुरसम्पदः ॥ २१ ॥

॥टीका॥ ऐसें कंसप्र[1]हित बळ ॥ मर्दूनियां केशवबळ ॥ विचार करूनियां तत्काळ ॥ शाळामुखींहुनी निघाले ॥ ७० ॥ ह्मणसी विचार केला कैसा ॥ तो तूं ऐकें कुरुनरेशा ॥ आजिची रात्रि आयुष्य कंसा ॥ उद्यां प्रवेशा पुढें करूं ॥ ७१ ॥ आजी परतावें येथून ॥ उदैक प्रवेशों रंगस्थान ॥ ऐसें करूनि संकेतकथन ॥ शाळामुखींहून निघाले ॥ ७२ ॥ वयस्यपार्षदगणवेष्टित ॥ आंगीं विजयश्री मण्डित ॥ मथुरालक्ष्मी अवलोकित ॥ जाती मिरवत बळ कृष्ण ॥७३ ॥ ठायीं ठायीं ठाकती उभे ॥ पुरश्रीलावण्य लक्षिती लोभें ॥ वीरवृत्तीच्या नवचती क्षोभें ॥ निर्भय दम्भें सांडवले ॥ ७४ ॥ ऐसी करूनि मारामारी ॥ हर्षनिर्भर विचरती नगरीं ॥ लोकचर्चा परस्परीं ॥ ते तूं अवधारीं कुरुकु[2]ध्रा ॥ ७५ ॥

तयोस्तदद्भुतंवीर्यंनिशम्यपुरवासिनः ॥ तेजःप्रागल्भ्यंरूपंचमेनिरेविबुधोत्तमौ ॥ २२ ॥

---

१ कंसानें पाठविलेलें. २ कु ह्म० पृथ्वी, ध्र ह्म. पालन करणारा.

॥ टीका ॥ त्यांचें अद्भुतकर्माचरण ॥ देखोनि ऐकोनि ह्मणती जन ॥ आदिपुरुष हे रामकृष्ण ॥ सुरभूषण अवतरले ॥ ७६ ॥ अगाध यांची प्रतापगरिमा ॥ उर्जितप्रभावा नलगे सीमा ॥ प्रबुद्ध ह्मणती प्रागल्भ्यनामा ॥ अगाध धार्ष्ट्य पैं यांचें ॥ ७७ ॥ कोटिमदनांचें लावण्य ॥ कुरवंडिजे उभयांवरून ॥ सुरवरवंद्या शिरोरत्न ॥ ऐसे पुरजन अनुमिती ७८ कैंसे वेष्टित वयस्यभारीं ॥ निःशंक प्रवेशले मधुपुरीं ॥ रूपें मोहिल्या नगरनारी ॥ निर्विकारीं स्मरच्छद्मीं ॥ ७९ ॥ दुर्मदरजकाचें मर्दन ॥ वायकमाल्यकां सनाथ करून ॥ सैरंध्रीचें त्रिवक्रपण ॥ निरसूनि लावण्य ओपिलें ॥ ८० ॥ लीलेकरूनि धनुर्मख ॥ पहावयाचें करूनि मिख ॥ वज्रप्राय जें भयानक ॥ तें बळें कार्मुक खंडिलें ॥ ८१ ॥ रक्षक उठिले मारामारी ॥ कार्मुकखंडांचिया प्रहारीं ॥ करूनि सर्वांची बोहरी[1] ॥ निःशंक नगरीं विचरती ॥ ८२ ॥ कंसें प्रेरिलें प्रबळ बळ ॥ त्यासी हे दोघेचि झाले काळ ॥ पाहतां दिसती कोमळ बाळ ॥ परि सुरपाळ केवळ हे ॥ ८३ ॥ आणि पूतनावधादि करणी ॥ ऐकिली होती कर्णोपकर्णीं ॥ आजिचें कर्म पाहोनि नयनीं ॥ निश्चय मनीं दृढ झाला ॥ ८४ ॥ गगनवाणी लटिकी नोहे ॥ कंसा वधिती हे निःसंदेह ॥ ऐसे जनांचे समुदाय ॥ मोहस्नेहें झळंबती ॥ ८५ ॥

तयोर्विचरतोःस्वैरमादित्योऽस्तमुपेयिवान् ॥ कृष्णरामौवृतौगोपैःपुराच्छकटमीयतुः ॥ २३ ॥

॥ टीका ॥ असो नगरजनाची वार्ता ॥ रामकृष्ण पुरीं विचरतां ॥ कोणी नाहीं पुरे ह्मणतां ॥ स्वेच्छा स्वसत्ता क्रीडती ॥ ८६ ॥ ठायीं ठायीं उभे ठाती ॥ गोपवेष्टित रामश्रीपती ॥ स्वनगरींचें लावण्य पहाती ॥ जनपदमातिसमवेत ॥ ८७ ॥ कोठें सविनोद हांसती ॥ कोठें सुरस्वर आलापिती ॥ कोठें छंद प्रबंध गाती ॥ कोठें पाहती पुरललना ॥ ८८ ॥

---

[1] नाश.

राम कृष्णवयस्यमांदी ॥ येती जे जे राजबिदीं ॥ तेथ नरनारीजनवृंदीं ॥ कोंदाकोंदी दाटणी ॥ ८९ ॥ ऐसे स्वेच्छा
विचारतां पुरीं ॥ कोणी पुरे हे सूचना नकरी ॥ तंव अस्ता गेला शार्वरारि[1] ॥ जाली शर्वरी रतिरुचिरा ॥ ९० ॥
आविसाळिया[2] परतले पक्षी ॥ शब्द[3]विरामें बैसले वृक्षीं ॥ मिथों[4] गोवत्सांचा लक्षीं ॥ ध्वनि गो[5]उक्षीं सकाम ॥ ९१ ॥
द्यावाभूमी[6] रविभावस्त्र[7] ॥ फेडूनि नेसली तमसांबर ॥ रूपानुलब्धि दरिद्र ॥ क्रमिती नेत्र दीपाश्रयें ॥ ९२ ॥ दोहना
उदित बल्लवगण ॥ दुग्धलाभातें लक्षून ॥ बिडाळें चरणाभंवतें भ्रमण ॥ करिती घर्षण स्वमौळें ॥ ९३ ॥ मार्तंडमंल-
विरहातुरा ॥ पद्मिनी अवगल्या निम्लोचमुद्रा[8] ॥ जोत्स्ना समुदित देखोनि चंद्रा ॥ फुल्लारवक्रा कुमुदिनी ॥ ९४ ॥
रजनीमुखीं युवयुवति ॥ आनंदनिर्भर होय दंपती ॥ वरवियोगें विरहज्योति ॥ करपे चित्तीं पतिव्रता ॥ ९५ ॥ शुक-
सारिका निद्राभूत ॥ कौशिक[9] पिंगळे निशि पंडित ॥ साग्निक होमशाळे आंत ॥ करिती त्वरित उद्धरणें ॥ ९६ ॥ संध्या-
वंदनें करिती विप्र ॥ प्रदोष जाणोनि मौनस्थ च्छात्र[10] ॥ त्रिषवणी[11] वनस्थ यतीश्वर ॥ व्रती तत्पर स्वकर्मा ॥ ९७ ॥
उडुगण प्रकाशले अंबरीं ॥ दीपप्रचुर मथुरापुरी ॥ रामकृष्ण ते अवसरीं ॥ पुरीबाहेर निघाले ॥ ९८ ॥ उडुगणें[12]वेष्टित
जैसा चंद्र ॥ कीं सुरवरमंडित जैसा शक्र ॥ किंवा त्रिदशार्चित[13] विधिहरिहर ॥ तेंवि सानुचर निघाले ॥ ९९ ॥ एक
साग्रज कृष्ण पथीं ॥ गोप सेविती किंकरवृत्ती ॥ वेत्रपाणि[14] पुढें खोळती[15] ॥ पृष्ठीं येती अनुगत्वें ॥ २०० ॥
एक चामरधर देवढे ॥ एक बिरुदें[16] पढती पुढें ॥ एक वर्णिती पवाडे ॥ दैत्य गाढे वधिले ते ॥ २०१ ॥

---

[1] शार्वर ह्म॰ गाढ अंधकार, त्याचा अरि ह्म॰ शत्रु, सूर्य. [2] घरट्याला. [3] शब्द न करितां. [4] परस्पर. [5] उक्षा ह्म॰ बैल. [6] आकाश व भूमि. [7] सूर्य-कान्तिरूप वस्त्र. [8] अस्त पावली मुद्रा ज्यांची त्या. [9] घुबड. [10] विद्यार्थी. [11] त्रिकाल स्नान करणारे. [12] नक्षत्रपुंज. [13] देवपूजित. [14] वेताची छडी धरणारे. [15] चालती. [16] वंशावळी.

पूतनेचा भरिला घोंट ॥ चरणघातें भंगिला शकट ॥ तृणावर्ताचा रगडूनि कंठ ॥ वधिला दुष्ट श्रीकृष्णें ॥ २ ॥ उन्मळिले यमलार्जुन ॥ अघबकवत्सासुरभंजन ॥ कृष्णें केलें कालियमर्दन ॥ बळें रिघोन यमुनेंत ॥ ३॥ कृष्णें प्राशिला पावक ॥ रामें रगडिला धेनुक ॥ ऐसे पवाडे अनेक ॥ पढती निःशंक संवगडे ॥ ४ ॥ जेथ लाविले होते शकट ॥नंदप्रमुख गौळी श्रेष्ठ ॥ तेथ जाते झाले प्रकट ॥ धीट उद्भट प्रतापी ॥ ५ ॥ राजसदनीं मारामारी ॥ करूनि आले बिढागारीं ॥ निर्भय निःशंक अंतरीं ॥ राममुरारी प्रतापें ॥ ६ ॥ लावण्यलक्ष्मीमंडित पूर्ण ॥ श्रीकृष्णाचें सस्मित वदन ॥ सादर पाहतां निवाले नयन ॥ आप्त स्वजन हरिखेले ॥ ७ ॥

गोप्योमुकुन्दविगमेविरहातुरायाआशासिताऽऽशिषऋतामधुपुर्यभूवन् ॥
संपश्यतांपुरुषभूषणगात्रलक्ष्मींहित्वेतरानुभजतश्चकमेऽयनंश्रीः ॥ २४ ॥

॥ टीका ॥ ह्मणती मुकुन्द व्रजाबाहेरी ॥ निघते समयीं विरहातुरी ॥ आशीर्वादात्मक वैखरी ॥ गोपसुंदरी ज्या वदल्या ॥ ८ ॥ ह्मणती मधुपुरीमाझारी ॥ सुख[1]तम होती आजिच्या रात्री ॥ अवलोकितां डोळेभरी ॥ चारुगात्री श्रीकृष्णाची॥ ९॥आणि आजिचिया प्रभाता॥तेथ होती सुखरूपता ॥ मुकुन्दलावण्यलक्ष्मी पाहतां॥ नेत्रां पुरता ध्रुवलाभ ॥१० ॥ त्यांचिया दृष्टिसुखतम होती ॥ ऐसी गोपींची भा[2]रती ॥ सत्य झाली ऐसें ह्मणती ॥ कोणे प्रतीती ह्मणाल ॥ ११ ॥सकळ पुरुषांचें भूषण ॥ तो हा प्रत्यक्ष श्रीभगवान्॥ज्याची तनुशोभा पाहून॥ लक्ष्मी आपण अनुरली ॥ १२॥ उपेक्षूनि ब्रह्मादि अमर ॥ ज्याच्या चरणाचा आधार ॥ रमा आश्रयिती झाली सधर ॥ सुखसागर तो कृष्ण॥ १३॥

---

१ अतिसुखकारक. २ वाणी.

रमामोहनकरशरीर॥ मथुरेमाजी ज्याचे नेत्र॥ पहाती ते ते सुखसागर॥ ह्मणोनि धन्यतर होतील ॥१४॥ ऐशा गो-
पींच्या [1]आंशिषोक्ति ॥ आठविल्या पैं स्वजनीं आर्ती॥ तव रामकृष्णादिकीं समस्तीं ॥ केली विश्रांति ते ऐका१५

अवनिक्तांघ्रियुगलौभुक्त्वाक्षीरोपसेचनम् ॥ ऊषतुस्तांसुखंरात्रिंज्ञात्वाकंससचिकीर्षितम् ॥ २५ ॥

॥टीका॥नाठ्यवसनें विसर्जून ॥स्वच्छ करपद प्रक्षाळून ॥ करिते झाले मग भोजन॥दुग्धोदन स[2]र्पर्पट ॥ १६ ॥
ऐसे समस्त गोपगडी ॥ जेविले ज्या जैसी आवडी ॥ शेषरात्रीमाजीवडीं ॥ निद्रा केली समस्तीं ॥ १७ ॥
परमानंदें क्रमूनि रजनी ॥ ब्राह्ममुहूर्तीं चेइले शयनीं ॥ कंसमनोगत विवंचूनी ॥ उठिले दोन्ही उल्हासें ॥ १८ ॥
आतां कंसाकडील मातु ॥ त्याचे मनीचा कर्तव्यहेतु ॥ ज्ञानी कृष्णासि झाला विदितु ॥ तो वृत्तांत अवधारा॥१९॥
धनुष्यभंगरक्षकघात ॥ ऐकोनि क्षोभला भोजनाथ ॥ तेणें रामकृष्णांच्या वधार्थ ॥ बळ अद्भुत पाठविलें ॥२०॥
रामकृष्णांतें वधूनि रणीं ॥ परतोनि येतील वीरश्रेणी ॥ ऐसा कंस अंतःकरणीं ॥ निश्चय ह्मणोनि संतुष्ट ॥२१॥
तंव अकस्मात कुणपें क्षिती ॥ देखता झाला भोजपति॥ आणि नगरींची वार्ता दूतीं॥ यथानिगुती निरूपिली॥२२॥
राया वृजींचे नंदकुमार ॥ वेष्टित संवगडियांचा भार ॥ प्रवेशले मथुरापुर ॥ त्रितीय प्रहर नभरतां ॥ २३ ॥
रूप लावण्य गुण चातुर्य ॥ कळाकौशल्य शौर्य धैर्य ॥ ठाण[3]माण शब्दमाधुर्य ॥ पुरजन आर्य विलोकिती ॥२४॥
लीलारसिकता देखोनि त्यांची ॥ मनें वेधती पुरजनांचीं॥धणी नपुरे लोचनांची॥मानिती जन्माची सफळता॥२५॥
ऐसा जनासि झाला वेध ॥ तंव पातला वनितावृंद ॥ त्यांचे हृदयींचा परमानंद ॥ कथनीं मंद सरस्[4]वती ॥ २६ ॥
एक पातल्या भोजनत्यक्ता ॥ एक पातल्या तैलाभ्यक्ता ॥ एक पातल्या वस्त्रविमुक्ता ॥परमानुरक्ता हरिरूपीं॥२७॥

---

[1] आशीर्वादरूप वाणी. [2] पर्पट—पापड. [3] शरीराचा बांधा. [4] वाग्देवता.

भा. द. एकी बाणल्या विपरीतभूषा ॥ एकी पातल्या विमुक्तकेशा ॥मनें विस्मिता जनोपहासा॥पाहती परेशा पूर्णत्वें॥२८ टी. अ०
ऐसिया तटस्थ झाल्या नारी ॥ उभ्या माडिया गोपुरशिखरीं॥ भित्तिप्रांगणीं बाजारीं ॥ चित्रापरी अचंचळ॥२९॥
॥ १० ॥ नारीनर नागरजनें ॥ भुलोनि ठेलीं रूपलावण्यें ॥ किंवा कांहीं असे टोणे[1] ॥ कवण्या गुणें हें नकळे ॥३०॥ राजरजक ॥ ४२ ॥
पुरचौबारा[2] ॥ कृष्णें मागतां नेदी चीरां[3] ॥ करें छेदूनि त्याचिया शिरा ॥ वस्त्रसंभारा लूटिलें ॥ ३१ ॥ पुढें आले
वायकापाशीं॥ धाकेंतो शरण झाला त्यांसी ॥वस्त्रें लेववूनि सावकासीं ॥तेणें सर्वांसी तोषविलें॥ ३२॥ सुदामानामें
माळाकार ॥ तेणें अर्पिले सुमनहार ॥ वशवर्ती सर्व नागर ॥ जाले सादर सर्वस्वें ॥ ३३ ॥ धन्य धन्य मुखें ह्मणती
॥ उपायनें समर्पिती ॥ कोणा हृदयीं नवटे खंती ॥ रजकघाती ह्मणोनी ॥ ३४ ॥ पुरचौबारा राजवसनें ॥
लुटितां जनपद पाहती नयनें ॥ कोणी नकरीच धांवणें ॥ रजकप्राणें वेंचलिया॥३५॥ऐसे उत्पथदस्युवृत्ति[4] ॥ पुढें
जातां राजपथीं ॥ त्रिवक्रा भेटली अवचितीं ॥ तिसीं मागती विलेपनें ॥ ३६ ॥ तिनें मान्य करूनि शब्द ॥भयें
वंदिलें त्यांचे पद ॥ सर्वां चर्चूनि सुगंध ॥ परमानंद पावविले ॥ ३७ ॥ कृपावरदें स्पर्शोनि तिसी ॥ त्रिवक्रा केली
लावण्यराशि ॥ पुढें जातां पुरजनासी ॥ धनुर्मखासी पूसती ॥ ३८ ॥ बळें रिघोनि धनुष्यागारीं[5] ॥ रक्षकीं
वारितां बलात्कारीं ॥ धनुष्य उचलूनि वामकरीं ॥ सज्य करूनि भंगिलें ॥ ३९ ॥ रक्षक उठिले शस्त्रघातीं ॥
धनुष्यखंडें घेऊनि हातीं ॥ रक्षकांची केली शांति ॥ प्रतापशक्ति अद्भुत ॥ ४० ॥ पाहतां दिसती कोमळ
बाळ ॥ वीरवृत्तीचे प्रलय काळ ॥ धांवण्या आलें प्रचंड दळ ॥ तेंही तत्काळ संहारिलें ॥ ४१ ॥ मग सांडूनि
धनुष्यागार ॥ सवें घेवूनि वयस्यभार ॥ लीलाविनोदें पुरी समग्र ॥ पाहत पाहत निघाले ॥ ४२ ॥ ॥ १० ॥

---

[1] जादूचा प्रकार. [2] नगरांतील चवाठ्यांत. [3] वस्त्रांला. [4] वाटपाड्या चोरांच्या वृत्तीनें. [5] धनुष्याचें गृह.

नंदादिगोप राहिले जेथें ॥ पुन्हा परतोनि गेले तेथें ॥ दूतीं जाणविता कंसातें ॥ भयें मूर्च्छेतें पावला ॥ ४३ ॥ रक्षकवध
धनुष्यभंग ॥ ऐकोनि उतरला होता रंग ॥ दळहननादि वार्ता सांग ॥ ऐकोनि आंग टाकिलें ॥ ४४ ॥

कंसस्तुधनुषोभंगंरक्षिणांस्वबलस्यच ॥ वधंनिशम्यगोविन्दरामविक्रीडितंपरम् ॥ २६ ॥

॥ टीका ॥ रामकृष्णांचें विक्रीडन ॥ ऐकोनि कंसाचें भंगलें मन ॥ ऐसेचि नव्हे प्रताप गहन ॥ बळविध्वंसन ऐकोनी
॥ ४५ ॥ धनुष्य भंगोनि रक्षक ॥ सबळ मारिले सैनिक ॥ ऐकोनि कंसा बैसला दचक ॥ धैर्यें निःशेष सांडवला ॥ ४६ ॥
भरली आयुष्याची अवधि ॥ काळ पाहतसे मरणसंधि ॥ तदाकार जाहली बुद्धि ॥ दुश्चिह्नऋद्धि[1] उघडली ॥ ४७ ॥

दीर्घप्रजागरोभीतोदुर्निमित्तानिदुर्मतिः ॥ बह्वन्यचेष्टोभयथामृत्योर्दौत्यकराणिच ॥ २७ ॥

॥ टीका ॥ पुढें बोंब मागें धाडी ॥ तेंवि दुर्निमित्तपरवडी[2] ॥ कंसा आंगीं प्रकटली उघडी ॥ श्रोतीं सुघडी
ऐकावी ॥ ४८ ॥ समीप जाणोनि मृत्युसमय ॥ आपाद मस्तक भरलें भय ॥ यास्तव सांडितें झालें धैर्य ॥ यवनालय
जेंवि द्विजीं ॥ ४९ ॥ मृत्युभयाची काजळी पोटीं ॥ तेणें निद्रेसि पडली तुटी ॥ विवेकविचारीं दिधली
पाठी ॥ बुद्धि अव्हाटीं भ्रंशली ॥ ५० ॥ तेव्हां सावध स्मृतीच नाहीं ॥ मन पसरलें दिशा दाही ॥ अहंकार
एकला देहीं ॥ भयप्रवाहीं बुडतसे ॥ ५१ ॥ यालागिं भोजेंद्र दुर्मति ॥ द्विविध दुःश्चिह्नें तयांप्रति ॥ स्वप्नामाजी
आणि जागृती ॥ प्रकट होती तें ऐका ॥ ५२ ॥ करिती मृत्यूचें दूतत्व ॥ ह्मणोनि दुर्निमित्तें त्यांचें नांव ॥ त्यांच्या
दर्शनानंतरें जीव ॥ टाकिती ठाव मृत्यूचा ॥ ५३ ॥ अद्यापिही ऐसीं चिह्नें ॥ प्रकट होतां जाणोनि सूचने ॥ प्राणिगणीं

---

[1] दुश्चिह्नांची विपुलता. [2] परंपरा.

भल्यांच्या वचनें ॥ स्वहित करणें लवलाहें ॥५४॥ बहुत दुर्निमित्तें देखिलीं ॥ त्यांमाजी जागृतीमाजी पहिलीं ॥
श्लोकयुग्में निरूपिलीं ॥ तें परिसिलीं पाहिजेत ॥ ५५ ॥

अदर्शनंस्वशिरसःप्रतिरूपंचसत्यपि ॥ असत्यपिद्वितीयेचद्वैरूप्यंज्योतिषांतथा ॥ २८ ॥

॥ टीका ॥ शरीरीं शिर असतां सिद्ध ॥ दिसे प्रतिच्छाया[1] कबंध ॥ द्विधा नसतां ज्योतिर्वृंद ॥ भासे अबद्ध दुश्चिह्न ५६
पहाता एका दीपानळा[3] ॥ दोन्ही ऐसे भासती डोळां ॥ गगनीं पाहतां ग्रहमंडळा ॥ नेत्रकमळा द्वय गमती ॥ ५७

छिद्रप्रतीतिच्छायायांप्राणघोषानुपश्रुतिः ॥ स्वर्णप्रतीतिर्वृक्षेषुस्वपदानामदर्शनम् ॥ २९ ॥

॥ टीका ॥ छाया पाहतां जळीं स्थळीं ॥ मस्तकीं अथवावक्षः स्थळीं ॥सच्छिद्रता नेत्रकमळीं ॥ दिसों लागलीं
दुश्चिह्नें ॥ ५८ ॥ बोटें घालितां श्रवणपुटीं ॥ नाद घुमघुमी ब्रह्मांडघटीं ॥ त्या प्राणघोषाची अनुमटी[4] ॥ झाली
शेवटीं कसासी ॥ ५९ ॥ वृक्ष स्वर्णाकार वाटती ॥ चिखलीं पावुलें नुमटती ॥ ऐसीं दुर्निमित्तें जागृती ॥ माजी होती तें
कथिलीं ॥ ६० ॥ सुषुप्तीवीण भ्रमभयभरें ॥ झांपडी घाली नेत्रद्वारें ॥ तेथें देखे स्वप्नाकारें ॥ चिह्नें अपरें तीं ऐका ॥ ६१ ॥

स्वप्नेप्रेतपरिष्वंगःखरयानंविषादनम् ॥ यायान्नलदमाल्येकस्तैलाभ्यक्तोदिगंबरः ॥ ३० ॥

॥ टीका ॥ एकएके झांपडी पोटीं ॥ देखे दुर्निमित्तांच्या कोटी ॥ त्यांमाजी शुकें जे वाक्पुटीं ॥ कथिली गोठी ते परिसें
॥ ६२ ॥ भयभ्रमें जो झांपडी घाली ॥ तंव अवलोकी वडिलें मेलीं॥त्यांसी आळंगीं स्नेहभुलीं ॥ ओसणे बोली तच्छंदें
॥ ६३ ॥ किंवा प्रेमाथिलीं आतें ॥ झांपडी माजी तें देखे मृतें ॥ त्यांचीं आलिंगूनियां प्रेतें ॥ करी रुदनातें दीर्घस्वरें ॥ ६४॥

---

१ प्रतिबिंब. २ धड. ३ दिव्याची ज्योति. ४ अप्रतीति.

तेव्हां वनिता सावध करिती ॥ घाबिरा उघडी नेत्रपातीं ॥ ह्मणे पडिलों शोकावर्तीं ॥ कोण विपत्ति चुकवील
॥ ६५ ॥ तंव त्या प्रबोधिती कामिनी ॥ राया सुखरूप असतां शयनीं ॥ रुदन करिसी काय ह्मणोनी ॥ पाहें
नयनीं निज वनिता ॥ ६६ ॥ जरासंधजा[1] अस्ति प्राप्ति ॥ कंसांगना या आपुले हातीं॥परिमार्जूनि नेत्रांप्रति॥
तांबूल देती सोपस्कर ॥ ६७ ॥ राया विलाससुमनशयनीं ॥ आजि कां हे उपजली ग्लानि ॥ काय निमित्त
भोगायतनीं[2] ॥ सशोकवदनीं प्रलाप ॥ ६८ ॥ ऐसीं ऐकोनि वनितावचनें ॥ कांहीं उत्तर नेदी वदनें ॥ पुन्हा
झांपडी घालूनि नयनें ॥ अन्य दुश्चिह्नें देखतसे ॥ ६९ ॥ काळा गाढव महाथोर ॥ त्यावरी आपण होवोनि
स्वार ॥ मागें लागले भयंकर ॥ पळे सत्वर दक्षिणे ॥ ७० ॥ परिघतोमरकृपाण[3]पाणि ॥ बोलती निष्ठुर
भयंकरवाणी ॥ तेणें भयें जल्पे वदनीं ॥ धांवा कोणी सोडवा ॥७१॥ सर्वेंचि सावध करिती जाया॥ ह्मणती
उठोनि बैसें राया ॥ काळमृत्यूची पडली छाया ॥ आलीं उदया दुश्चिह्नें ॥ ७२ ॥ वीणा वाहूनि गाती राग॥
पाहती अविशिष्ट रात्रिभाग ॥ तंव तो लागोनि अपांग ॥ राहे सवेग भ्रमग्रस्त ॥७३॥तेथें पुन्हा देखे स्वप्न॥
जें आपण करूनि विषभक्षण ॥ रडत उठे वोसणोन ॥ आलें मरण ह्मणोनियां ॥ ७४ ॥ तेणें भयें दचकोनि
उठे ॥ ह्मणे म्यां विष भक्षिलें खोटें ॥ मरण पातलें वोखटें ॥ स्त्रिया अनिष्टें भाविती ॥ ७५ ॥ ह्मणती राया
घेईं उटी ॥ सांगें प्रियतमा कांहीं गोठी ॥ कां ये दुःचिह्नें वोखटीं ॥ तुझिये दृष्टी भासती ॥ ७६ ॥ जवादि
कस्तूरी केशर ॥ माजी संमिश्र मलयजसार ॥ आंगीं चर्चिती सकर्पूर ॥ दिव्य धूसर उधळिती ॥ ७७ ॥
त्रयोदशगुणी देवूनि विडा ॥ विनोदें ह्मणती आदरीं क्रीडा ॥ तंव तो पाहे नेत्रांपुढां ॥ भ्रमें रोकडा दुश्चिह्नें॥

---

१ जरासंधाच्या कन्या. २ विलास मंदिरीं. ३ खड्ग.

देखे आपणा उद्वस[1]दांगीं ॥ परम विकराळ तिहीं मांगीं ॥ तेल माखूनियां सर्वांगीं ॥ ह्मणती वेगीं ऊठ चाल ॥७९॥आपण नागिवा दिगंबर ॥ कंठीं जपा[2]उशीर[3]हार॥एकटा रासभीं होऊनि स्वार ॥ याम्ये[4] समोर प्रयाण ॥ ॥ ८० ॥ भोंवते निर्भय दस्युगण ॥ बळें करविती विषभक्षण ॥ ऐसा देखोनि समय कठिन ॥ उठे आरडोन ओसणत ॥ ८१ ॥ तंव त्या सावध मागधतनया ॥ ह्मणती भ्रांति उपजली राया ॥ दुर्निमित्तें आलीं उदया ॥ कोण या समया टाळील ॥ ८२ ॥ ह्मणती चिह्नीं पालट झाला ॥ विनाशकाळ समीप आला ॥ राजा स्मृतीनें सांडवला ॥ नदिसे भला फलितार्थ ॥ ८३ ॥ हीं दुश्चिह्नें स्वप्नोद्भवें ॥ प्रकटल्या मरण होय ठावें ॥ अनेक असती यांचीं नांवें ॥ संक्षेपभावें सूचविलीं ॥ ८४ ॥

अन्यानिचेत्थंभूतानिस्वप्नजागरितानिच ॥ पश्यन्मरणसंत्रस्तोनिद्रांलेभेनाचिंतया ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ ऐसीं जागृतीं स्वप्नीं चिह्नें ॥ मृत्युदूतत्वीं ज्याचें होणें ॥ अनेकें देखिलीं त्यांच्या भेणें ॥ अंतःकरणें संत्रस्त ॥ ८५ ॥ बैसली मरणाची काजळी ॥ चिंता चिताग्नीतें पाजळी ॥ ज्ञप्ति सुप्ति हारपली ॥ ऐसी क्रमिली ते रात्री ॥ ८६ ॥ नफवे विश्रांतीचा लेश ॥ निद्रा नबणे डोळयांस ॥ दुष्टचिह्नीं मरणत्रास ॥ तेणें सक्लेश सचिंत ॥ ८७ ॥ ऐसी क्रमिल्यानंतर निशी ॥ सूर्य पातलिया उदयासी ॥ पुढें कथा वर्तली कैसी॥ ते रायासि शुक सांगे ॥ ८८ ॥

व्युष्टायांनिशिकौरव्यसूर्येचाद्भ्यःसमुत्थिते ॥ कारयामासवैकंसोमल्लक्रीडामहोत्सवम् ॥ ३२ ॥

---

[1] ओसाड अरण्यांत. [2] जास्वंदीची फुलें. [3] वाळा. [4] दक्षिणेस.

॥ टीका ॥ अस्तमानीं अस्ताचळ ॥ लंघोनि सागरीं रविमंडळ ॥ मग्न झाले तें सांडूनि जळ ॥ उदयाचळ वळघलें ॥ ८९ ॥ तये समयीं कंसासुर ॥ उठिला सांवरूनियां धीर ॥ पूर्वीं रचिला जैसा मंत्र ॥ तदनुसार उद्युक्त ॥ ९० ॥ सूचनामात्रें मंत्रिवर्ग ॥ एकांतसदनीं मिं[1]नला सांग ॥ पूर्वमंत्राचा उद्योग ॥ अतिसवेग करविला ॥ ९१ ॥ शत्रु [2]आवंतूनि आणिले घरा ॥ त्यांचें चेष्टित कां नविचारा ॥ रजक मारूनि मथुरापुरा ॥ माजी नागरा वेधिल्या ॥ ९२ ॥ आपुली पुरी पारकी जाली ॥ अवघीं तच्छंदीं वेधलीं ॥ दैवरेखा पालटली ॥ किंवा ठाकली मर्यादा ॥ ९३ ॥ लीले करूनि दोघे वैरी ॥ निर्भय रिघाले धनुष्यागारीं ॥ धनुष्य मोडूनि बलात्कारीं ॥ केली बो[3]हरी रक्षकां ॥ ९४ ॥ साह्य प्रेरिलें बळ प्रबळ ॥ तेंही निवटिलें तत्काळ ॥ फिरोनि गेले नलगतां पळ ॥ परम चपळ प्रतापी ॥ ९५ ॥ जंव ते नवचती वृंदावना ॥ तंव करा हो मंत्ररचना ॥ बुद्धियुक्ति रिपुमर्दना ॥ दीर्घप्रयत्ना नचुकावें ॥९६॥ जंव शत्रूशीं बाळदशा ॥ नेणती शस्त्रास्त्रविद्याभ्यासा ॥ नाहीं बळिष्ठ नृपकुवांसां[4] ॥ धरिती भरंवसा स्वबळाचा ॥ ९७ ॥ ऐसे [5]आतुंडले एकाकी ॥ आळस नकीजे यत्नाविखीं ॥ कोणां नहोतां ठावुकी ॥ करा हो निकी रंगरचना ॥९८॥ अल्प पेटतां अनळ सदनीं ॥ सवेग विझविजे घालोनि पाणी ॥ प्रबळ वाढल्या पुर जाळूनी॥ करी हानि सर्वस्वें ॥ ९९ ॥ तैसे विषद्रुमाचे कोंभ ॥ सांपडले हा मानूनि लाभ ॥ आतां उन्मूळनीं प्रगल्भ ॥ मंत्र स्वयंभ रचाहो ॥१००॥ [6]अंबष्ठासि सूचना करा ॥ करूनि कुवलिया[7]पीड मां[8]जिरा ॥ वसुदेवाच्या उभय कुमरां॥वधवा द्वारामाझारीं ॥ १॥ तथापि ते जरी तेथूनि वांचले॥ तरी मल्लरंगीं जाती वधिले ॥ मल्लां सूचना करूनि वहिलें ॥ रंगा आणिलें पाहिजे ॥ २॥ मल्लक्रीडामहोत्सव॥

---

१ मिळाला. २ आमंत्रण करून. ३ नाश. ४ आश्रय. ५ हातीं लागले. ६ महातास. ७ या नांवाचा हत्ती. ८ उन्मत्त.

कंसें करविला प्रेरूनि सचिव ॥ मंचा रंगरचना सर्व ॥ कथिली स्वमेव त्यापासीं ॥ ३ ॥ ऐसा मंत्रिया बोधूनि मंत्र ॥ शौच सारूनि क्षाळिलें वक्र ॥ स्नानसंध्या यथासूत्र ॥ कंसें सत्वर विसर्जिलीं ॥ ४ ॥ आज्ञे सरिसा अमात्यवर्गीं ॥ अंबष्ठ ठेवूनि द्वारभागीं ॥ रंगरचना ते प्रसंगीं ॥ केली सर्वे ती ऐका ॥ ५ ॥

आनर्चुःपुरुषारंगंतूर्यभेर्यश्चजघ्निरे ॥ मंचाश्चालंकृताःस्रग्भिःपताकाश्चैलतोरणैः ॥ ३३ ॥

॥ टीका ॥ आज्ञा ऐकोनि पुरुषवर्ग ॥ शृंगारिता झाला रंग ॥ चतुःशालादिग्विभाग ॥ मंचकीं सांग सज्जिले ॥ ६ ॥ रत्नखचित रंगागार ॥ माजी मंचावळी सुन्दर ॥ उच्च मध्यम निम्नतर ॥ धरूनि सूत्र साधिल्या ॥ ७ ॥ महद्वितानें[1] उभवलें गगनीं ॥ पृथगाकारें मंचश्रेणी ॥ शृंगारिल्या खणोखणीं ॥ गर्भवितानीं सुरंगीं ॥ ८ ॥ इंद्रगोपवर्णी[2] ऊर्णा[3] ॥ वसनें मढिलीं स्तंभावरणा ॥ कांचनसन्निभ तगटी जाणा ॥ ओटंगणें[4] प्रतिमंचा ॥ ९ ॥ चित्र विचित्ररत्नरंगीं ॥ विस्तीर्ण चित्रासनें भूभागीं ॥ मंचा प्रतिमंचा विभागीं ॥ कशिपासनें[5] मृदोलिका[6] ॥ १० ॥ माळा तोरणें सुमनस्रजा[7] ॥ खणोखणीं विचित्र ध्वजा ॥ मुक्तादामा रत्नपुंजा ॥ खचिले वोजा वितानीं ॥ ११ ॥ गंधाक्षता सुमनहार ॥ परिमळद्रव्यें दिव्यधूसर ॥ नागवल्लीदळें सुंदर ॥ क्रमुक खादिर सच्चूर्ण ॥ १२ ॥ एला लवंगा जाजीफळ ॥ जाजीपत्री सकंकोळ ॥ नागर काश्मीर चंद्रधवळ ॥ पात्रें सुढाळ स्थळोस्थळीं ॥ १३ ॥ उदकाडिया प्रतिआसनीं ॥ स्थापिल्या पावक चेतवूनी ॥ सोज्वळ पिकपात्रांच्या श्रेणी ॥ अनुक्रमणी ठेविल्या ॥ १४ ॥ गाळींवसिकता रंगांगणीं ॥ पसरूनि मृदुल केली धरणि ॥ लहुडी भ्रृशुंडी बाहु-

---

१. मोठें छत. २ इंद्र गोप हा लहानसा तांबडा किडा आहे. ३ लोंकर. ४ लोडें. ५ स्वर्णासनें. ६ गिरद्या. ७ पुष्पमाला. ८ चकचकीत.

तुळणीं ॥ लोहमुद्गर स्थळोस्थळीं ॥ १५ ॥ वज्रसार वर्तुलोपळ ॥ उचलोनि अनुमानिजे बळ ॥ परिघ लोहाचे विशाळ ॥ स्थापिले स्थूळ मल्लरंगीं ॥१६॥ऐसी अर्चूनि रंगक्षिति ॥ अलंकारूनि मंचपंक्ति ॥ राजपुरुष गर्जना करिती ॥ भेरी तुरें त्राहाटुनी ॥ १७ ॥ करणे तुतारें नफेरी ॥ एक त्रहाटिती कुंजरभेरी ॥ बांके बुरंगी शृंगें मोहरी ॥ शंखस्वरीं नभ गर्जे ॥१८॥ ऐसे स्वर्चित रंगस्थानीं ॥ येऊनि बैसिजे नागरीं जनीं ॥ ऐसी राजाज्ञा ऐकूनी ॥ समस्त येऊनि बैसले ॥ १९ ॥

तेषुपौराजानपदाब्रह्मक्षत्रपुरोगमाः ॥ यथोपजोषंविविशूराजानश्चकृतार्हणाः ॥ ३४ ॥

॥ टीका ॥ तिया रंगस्थाना माजी ॥ जे कां उच्चमंचराजी ॥तेथ बैसका केली द्विजीं ॥ क्षत्रसमाजीं राजन्य[1] ॥ २० ॥ एके विभागीं मध्यपंक्ती ॥ बैसल्या वार्धुषिकांच्या[2] जाती ॥ लाहान थोर वैश्यव्यक्ति॥ यथासंपत्ति सम्मानें ॥ २१ ॥ त्याहूनि अवर मंचश्रेणी ॥ तेथ बैसका कनीयजनीं[3] ॥ तैशाच नारी प्रासादभुवनीं ॥ पिहितासनीं[4] बैसालिया ॥ २२ ॥ साधारणा ज्या पौरा नारी ॥वृद्धा प्रगल्भा सभेमाझारी ॥ बैसत्या झाल्या निजाधिकारीं ॥ स्वल्प अंतरें पृष्ठीसीं ॥ २३ ॥ यथावकाशें यथाधिकारें ॥ यथासंतोषें बैसले सारे ॥ राजमंच राजेश्वरें ॥ मंडळेश्वरां[5] नेरोपिले ॥२४॥ एवं राजमंचश्रेणी ॥ विराजमानन्टपासनीं ॥ कंस सामात्य सिबिकायानीं[6] ॥ कैसा येवोनि बैसला ॥ २५ ॥

कंसःपरिवृतोऽमात्यैराजमंचउपाविशत् ॥ मंडलेश्वरमध्यस्थोहृदयेनविदूयता ॥ ३५ ॥

---

[1] क्षत्रिय. [2] व्यापाऱ्यांच्या. [3] शूद्रादिकांनीं. [4] आच्छादित आसनांवर. [5] माण्डलिक राजांना. [6] पालकी.

॥ टीका ॥ किरीटकुण्डलें कंठमाळा- ॥ वेष्टित अमात्यपार्षदमेळा ॥ सिबिकायानीं रंगस्थळा ॥ कंस पातला
तुरगजरीं ॥ २६ ॥ चामरें रत्नदंडी द्विभागीं ॥ सेवक वीजिती कंसालागीं ॥ एक धांवती लागवेगीं ॥ सूचना
लिंगीं सुचविती ॥ २७ ॥ भोजेंद्र जाणोनि सन्निध ॥ आसनें सांडूनि सामंतवृंद ॥ बद्धांजळी नमिती पद ॥
भंवते पार्षदसम ठाती ॥ २८ ॥ उच्चमंचीं भोजभूवर ॥ भोंवते बैसले मंडलेश्वर ॥ मंत्री सचिव अमात्यनिकर॥
यथाधिकार बैसले ॥ २९ ॥ एक निटाविती राजवसनें ॥ एक अर्पिती माळा सुमनें ॥ हार अवतंस मुकुटरत्नें॥
सरसाविती पैं एक ॥ ३० ॥ विलेपनें चर्चिती दिव्यें ॥ एक उधळिती परिमळद्रव्यें ॥ सुगंधतैलीं माखिती
आघवे ॥ कुंतळगुच्छ सश्मश्रु ॥ ३१ ॥ सुवर्णवर्णीं तांबूलपत्रें ॥ सर्वोपचारीं भरूनि पात्रें ॥ नृपासनाप्रति
विचित्रें ॥ स्थापिती करें अनुयायी ॥ ३२ ॥ ष्ठीवनपात्रीं[2] धरिती पिका ॥ हस्तांशुकीं पुसिती मुखा ॥ दर्पण
पाहोनि पावती तोखा ॥ तेथ कंसा एकां हत्ताप ॥ ३३ ॥ बैसला असतां सिंहासनीं ॥ भय संताप अंतःकरणीं
दुर्निमित्तें स्मरती मनीं ॥ तेणें कणाणी सर्वांगीं ॥ ३४ ॥ तंव षण्वती विविधें तुरें ॥ मल्लरंगीं तालगजरें ॥ खाखाइलीं
उच्चस्वरें ॥ वीरश्रीवारें प्रकाशिती ॥ ३५ ॥

वाद्यमानेषुतुर्येषुमल्लतालोत्तरेषुच ॥ मल्लाःस्वलंकृतादृप्ताःसोपाध्यायाःसमागताः ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ तुरें वाजत असतां ऐसीं ॥ मल्लतालच्छंदासरिसीं ॥ नादें सुचविलें मल्लांसीं ॥ पूर्वसूचनारहस्य॥ ३६॥
तो ऐकतां वाद्यघोष ॥ मल्लां आंगीं महा आवेश ॥ उथळितां तिंहीं समरावेश ॥ घेऊनि जाले स्वलंकृत ॥ ३७ ॥
दृप्त माजले ठोकिती भुजा ॥ ह्मणती कृतांत लोळवूं पैजा ॥ कोण साहे आमुच्या तेजा ॥ कंसकाजा आजी साधूं

---

१ तुरा. २ पिकदाणी मध्यें.

॥३८॥ मल्लविद्यापरायण ॥ द्वन्द्वयुद्धीं परम निपुण ॥ राजगुरु ते प्रबोधप्रवीण ॥ संगें घेऊन पातले ॥ ३९ ॥

चाणूरोमुष्टिकःकूटःशलस्तोशलएवच ॥ तआसेदुरुपस्थानंवल्गुवाद्यप्रहर्षिता: ॥ ३७ ॥

॥टीका॥ मल्लविद्याप्रबोधकर॥तिहींसीं मुष्टिक कूट चाणूर॥शलतोशलादि मल्लभार॥रंगागार प्रवेशला ॥४० ॥ तिहीं पावतां रंगस्थाना॥ऐकोनि वाद्यांची गर्जना॥आवेशें करिती सिंहस्वना॥स्ववल्गना पुरुषार्थें ॥ ४१ ॥ भयंकर देती हाका ॥ आवेशें भुजा ठोकिती देखा ॥ मल्लविद्येचा आंवांका ॥ एकमेकां दाविती ॥ ४२ ॥ ऐसे पातले रंगस्थाना ॥ नृपा खालाविती[2] माना ॥ लाहोनि भूपाच्या सम्माना ॥ दाविती नाना मल्लविद्या ॥४३॥ ऐसे मल्ल अवाप्तहर्ष ॥ बोलती आपुला विजयोत्कर्ष ॥ तेणें किंचित कंसा तोष ॥ करी आदेश तो ऐका ॥ ४४ ॥

नन्दगोपादयोगोपाभोजराजसमाहुता: ॥ निवेदितोपायनास्तेएकस्मिन्मंचआविशन् ॥ ३८ ॥

॥टीका॥कंसें श्वाफल्कि[3] खुणाविला ॥ निजानुचरातें प्रेरूनि वहिला ॥ नन्दादिकां गोपां सकळां ॥ आणिता झाला रंगालया ॥ ४५ ॥ नन्दादि समस्त पातले गोप ॥ नम्र मस्तकें नमूनि भूप ॥ ठेवूनि उपायनें समीप ॥ विगतजल्प[4] तिष्ठती ॥ ४६ ॥ कनिष्ठ मंचा एके प्रान्तीं ॥ नृपसंकेतें दाविली दूतीं ॥ तेथ बैसोनि गोपसमस्तीं ॥ निश्चळ पाहती तच्चेष्टा ॥४७॥ अर्पितां रायासि करभार ॥ नकरी आदर अनादर॥देखोनि संदिग्ध गोपनिकर ॥ चिन्तातुर बैसला ॥ ३४८ ॥ रंगासक्त नृपाचें मन ॥ यास्तव पशुपां नेदी मान ॥ एक ह्मणती कोपायमान ॥ रामकृष्णहननार्थ ॥ ३४९ ॥ एक ह्मणती बरवें झालें ॥ रामकृष्ण एथ नआले ॥ एक ह्मणती दैवबळें ॥ यथा-

---

१ सामर्थ्य. २ वांकविती. ३ अक्रूर, ४ मुकाट्यानें. ५

काळें सर्व घडे ॥ ३५० ॥ बेचाळिसाव्या अध्यायांत ॥ इतुकी कथा अरणीसुत ॥ सांगोनि वक्ष्यमाणसंकेत ॥
कथी वृत्तांत तो ऐका ॥ ३५१ ॥ त्रेचाळिसाव्या माजी हरि ॥ कुंजर मर्दूनि रंगद्वारीं ॥ प्रवेशला रंगागारीं ॥
घेवूनि करीं गजदन्त ॥ ५२ ॥श्रीएकनाथपादोदका॥हरिवरदाख्य वाहिनी[1] टीका ॥श्रवणें सुस्नात होतिया लोकां॥
अघकळंका प्रक्षाळी ॥ ५३ ॥ तेथींचा व्याख्यानवोलावा ॥ पूर्णभरितें दयार्णवा ॥सप्रेम श्रवण सर्वीं सर्वां॥कैवल्य[2]ठेवा
साधतसे ॥ ५४ ॥ ऐसी श्रीमद्भागवतीं ॥ व्यासोपदिष्ट[3] शुकभारती[4] ॥ अठरा सहस्र संहितागणती ॥
जे सेविती परमहंस ॥ ५५ ॥ तेथील दशमस्कन्ध अपूर्व ॥ त्यांतील बेचाळिसावा अध्याव ॥ धनुष्यभंगें कंसा
भेव ॥ तो हा सर्व निरूपिला ॥ ५६ ॥ श्रीमद्भागवतदशमस्कन्ध ॥ टीकाहरिवरदा अगाध ॥ दयार्णवकृत परम
विशुद्ध ॥ अध्याय प्रसिद्ध बेचाळिसावा ॥ ५७ ॥ ॥ इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायां
दशमस्कन्धेश्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायांकुब्जामोहनधनुर्भंजनरक्षकादि
कंससेनाहननकंसानिष्टदर्शनमल्लरंगादिनिरूपणं नामद्विचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ४२ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥
॥ श्लोक ॥ ३८ ॥ टीका ओव्या ॥ ३५६ ॥ एवं संख्या ॥ ३९४ ॥ सम्पूर्णमस्तु ॥ श्रीपाण्डुरंगार्पणमस्तु ॥

१नदी. २ मुक्ति. ३ व्यासानें उपदेशिलेला. ४ शुकाची वाणी.

अध्याय ४३.

तंव रंगद्वारीं कुवलयापीड ॥ मत्तवारण प्रतापी दृढ ॥ हस्तिपा मंत्र बोधूनि गूढ ॥ स्थापिला रूढ हरिहनना ॥ ३२ ॥
कुंजर पडतां भूमंडळीं ॥ बळें आक्रमी पायां तळीं ॥ दंत उपडोनि वनमाळी ॥ ठोकी त्यातळीं गजगजपां ॥ ६२ ॥



श्रीगोविन्दसद्‌गुरवे नमः ॥ ॥ गगनसुमनग्रथनतंतु[1] ॥ त्यासि आधार गोविंद जो तूं ॥ जेथ चराचर आधेयभूतु[2] ॥ त्या तुज मीतूंरहित[3] नमो ॥ १ ॥ शब्दसुमनें गगनोद्भूत ॥ स्वयंभ स्मृति तद्‌ग्रथनतंतु ॥ नम्यनमननमकातीतू ॥ आधार तो तूं सन्मात्र ॥ २ ॥ नमूं जातां तुज ऐसिया ॥ भेदें नसरे नमनक्रिया ॥यालागीं मी तूं गाळूनियां ॥ऐक्यें अद्वया प्रणाम ॥ ३ ॥ ऐशी अन्वयव्यतिरेकरीति ॥ अपरोक्षचिन्मात्रैकप्रतीति ॥ सांख्ययोगादिवेदांतीं ॥ सर्वसिद्धांतीं ठी केली ॥ ४ ॥ परंतु माझिया मनोधर्मा ॥ सगुणसद्गुरुभजनप्रेमा ॥ तुळितां फळकट मोक्षगरिमा॥ येरा अधमा दुर्लभ जें ॥ ५ सद्गुरुभजनाविण मोक्ष ॥ इच्छिती अधम मुमुक्ष ॥ सांख्य योग कां वेदांतपक्ष ॥ अवघा कक्ष[4] समगमतो ॥ ६ ॥ शास्त्राभ्यासें ब्रह्मज्ञान ॥ योगविद्येचें साधन ॥ अवघें सद्‌गुरुभजनाविण ॥ निष्फळ जाण निर्वीर्य ॥ ७ ॥ नकर्षितां कोदंडकांड[5] ॥ प्राणें विण जैसा पिंड ॥ गुरुभजनें विण वक्ता चंड ॥ तें पाखंड पांडित्य ॥ ८ ॥ निर्बळाचा तिरस्कार ॥ निर्धनाचा अहंकार ॥निर्दयाचा सदाचार ॥ कीं शृंगार अनिनेचा ॥९ ॥ तस्मात् सद्‌गुरुभजनापोटीं॥ऐश्वर्यसिद्धि कोट्यानकोटि॥कैवल्यपदाचिये मुकुटीं॥वंदी धूर्जटि गुरुभक्तां॥ १०॥ऐसे वरिष्ठ सर्वांहून॥सोपें सद्‌गुरुपदसेवन॥परंतु तेथ इतुकें कठिन॥जें प्रेम अनन्य निष्काम॥ ११॥

---

१ गगनमुमनें ह्म॰शब्द, यांचें ग्रथन ह्म॰कविता करणें; त्याचा तंतु ह्म॰बुद्धिरूप दोरा. २ अधारावर राहणारे पदार्थ. ३ मी, तूं अशाभेदानें रहित.
४ वादिप्रतिवादीचा कोटिक्रम. ५ धनुष्यबाण.

असो ऐसिया मनोरथा ॥ वाहें परंतु मी नसरतां ॥ सर्व विदित श्रीगुरुनाथा ॥ चरणीं माथा न्यसिलासे ॥ १२॥
हें ऐकोनि सज्जनवृंद ॥ ज्यांसी गुरुभजनाचा छंद ॥ पूर्ण पावोनि परमानंद ॥ ह्मणती सावध प्रेमळा ॥ १३॥
नंदादि आलिया सभेसी ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ सादर होऊनि व्याख्यानासी ॥ ते आह्मांसी परिसवीं ॥ १४॥
सज्जन श्रोते सादर पूर्ण ॥ सांभाळूनि अनुसंधान ॥ पुढें कथेचा करितां प्रश्न ॥ तेणें प्रसन्न वक्तृत्वें ॥ १५ ॥
सज्जनप्रश्नाचेनि सुवातें ॥ दयार्णवीं प्रज्ञाभरतें ॥ भरलें तेणें परमामृतें ॥ भवसंतप्तें निववीतसे ॥ १६ ॥
ह्मणे ऐका जी विद्वज्जन ॥ करूनि धनुर्यागभंजन ॥ स्वेच्छा पुरीमाजी क्रीडन ॥ करूनि स्वस्थान पातले ॥ १७॥
हें ऐकोनि कंसमनीं ॥ दाटली भयाची कणकणी ॥ दचकें दुश्चिह्नांच्या श्रेणी ॥ देखिल्या शयनीं निशिगर्भीं ॥ १८॥
होतां प्रभाते चेइरा ॥ रचिलें जैशा मंत्रविचारा ॥ द्वारीं स्थापूनि कुंजरा ॥ मल्लसमरा विवंचिलें ॥ १९ ॥
इत्यादि कंसचिकीर्षित ॥ रामकृष्ण जाणोनि त्वरित ॥ हर्षें उठिले तंद्रारहित ॥ पुढें वृत्तांत अवधारा ॥ २० ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ अथकृष्णश्चरामश्चकृतशौचौपरंतप ॥ मल्लदुंदुभिनिर्घोषंश्रुत्वाद्रष्टुमुपेयतुः ॥ १ ॥

॥ टीका ॥ शुक ह्मणेगा कुरुवरिष्ठा ॥ परीक्षिति नरवरश्रेष्ठा ॥ सगजसमल्लकंसदुष्टा ॥ हननोत्कंठा हरिपोटीं ॥ २१॥
उठल्या नंतर शयनीहून ॥ आनंदभरित रामकृष्ण ॥ टाकूनि आले यमुनापुलिन ॥ शौचविधान संपविलें ॥ २२॥
अनीतिमार्गें उत्पथवृत्ति ॥ रामकृष्ण तों नाचरती ॥ मातुळवधादिदोषानिवृत्ति ॥ कोणे रीती तें ऐका ॥ २३॥
पूर्वदिवशींच शौचाचार ॥ दोषनिवृत्तिप्रकार ॥ निरपराध सहोदर ॥ शुद्ध साचार आचरले ॥ २४ ॥

---

१ करण्यास इच्छिलेलें कार्य. २ आलस्यरहित.

तेंही ऐका स्फुट व्याख्यान ॥ धनुर्भंगादि सेनाहनन ॥ कंसासि ऐश्वर्य सूचिलें पूर्ण ॥ पितृमोक्षण करावया २५॥ बाळें बळिष्ठां मारिती रणीं ॥ ऐसी अमोघ ईश्वरकरणी ॥ जाणोनि सावध नोहेचि मनीं ॥ पुढती हननीं प्रवर्त्तें ॥ २६ ॥ ऐसा मातुळ वधितां पाहीं ॥ सहसा आह्मांसि दोष नाहीं ॥ निरपराधता ऐसी हृदयीं ॥ शौचविषयीं विवंचिली ॥ २७ ॥ एवं सबाह्य शौचाचार ॥ विवंचूनि वसुदेवकुमार ॥ ऐकोनि मल्लदुंदुभिगजर ॥ हर्षनिर्भर आवेशें ॥ २८ ॥ मल्लरंग पाहावा दृष्टी ॥ ऐसी उत्कंठा दाटली पोटीं ॥ मत्तगजमर्दना जैसे हट्टी ॥ कंठीरव[1] उठावती ॥ २९ ॥ मल्लतालें दुंदुभिध्वनि ॥ अकस्मात पडतां श्रवणीं ॥ कुरपे क्षोभले जैसे वह्नि ॥ घृतें करूनि प्रोक्षिलिया ॥ ३० ॥ प्राग्दृष्टमार्गेंच सत्वर ॥ पावते झाले रंगद्वार ॥ तेथील वृत्तांत समग्र ॥ श्रोतीं सादर परिसावा ३१॥

रंगद्वारंसमासाद्यतस्मिन्नागमवस्थितम् ॥ अपश्यत्कुवलयापीडंकृष्णोंऽबष्ठप्रचोदितम् ॥ २ ॥

॥ टीका ॥ तंव रंगद्वारीं कुवलयापीड ॥ मत्तवारण प्रतापी दृढ ॥ हस्तिपों[2] बोधोनि मंत्र गूढ ॥ स्थापिलारूढ हरिहनना ॥ ३२ ॥ तो रंगद्वारीं महागज ॥ देखोनि सर्वज्ञ गरुडध्वज ॥ हस्तिपें प्रेरिला जाणोनि सहजे ॥ जाला सज्य तें ऐका ॥ ३३ ॥

बध्वापरिकरंशौरिःसमुह्यकुटिलालकान् ॥ उवाचहस्तिपंवाचामेघनादगभीरया ॥ ३ ॥

॥ टीका ॥ शूरसेनाचा पौत्र हरि ॥ उदित युद्धा साटोप धरी ॥ कंचुक[3] कटितटीं सांवरी ॥ बद्धपरिकरीं सन्नद्ध ॥ ३४ ॥ कुरळ केशांची वीरगुंठी[4] ॥ सांवरूनि बांधिली मुकुटीं ॥ मेघगंभीरबोभाटीं ॥ बोले वाक्पुटीं हस्तिपा ॥ ३५ ॥

अंबष्ठांबष्ठमार्गन्नोदेह्यपक्रममाचिरम् ॥ नोचेत्सकुंजरंत्वाद्यनयामियमसादनम् ॥ ४ ॥

---

१ सिंह. २ महाताला. ३ अंगरखा. ४ बुचडा.

॥ टीका ॥ आम्रेडितीं[1] अंबष्ठातें ॥ ह्मणे सत्वर काढीं गजातें ॥ मार्ग नरोधीं आमुतें॥रंगभूमीतें जाऊं दे ॥ ३६ ॥
हें नायकोनि पथ रोधिसी ॥ तरी तुज आजि कुंजरेंसीं ॥ पाठवीन मी यमसदनासी ॥ निश्चयेंसीं जाण पां ॥ ३७ ॥

एवंनिर्भर्त्सितोऽबष्ठःकुपितःकोपितंगजम् ॥ चोदयामासकृष्णायकालान्तकयमोपमम् ॥ ५ ॥

॥टिका ॥ ऐसा कृष्णें कठोरोत्तरीं॥अंबष्ठ निर्भर्त्सितां अंतरीं॥क्षुब्ध होवोनि कुंजर प्रेरी ॥ कृष्णावरी कोपवूनी॥ ३८॥
अंतक ह्मणिजे मृत्यु केवळ ॥ त्यासी क्षोभक निमित्त काळ ॥ यम नियंता प्रेरी प्रबळ ॥ तद्वत् खळ गज प्रेरी ॥ ३९ ॥

करींद्रस्तमभिद्रुत्यकरेणतरसागृहीत् ॥ कराद्विगलितःसोऽमुंनिहत्यांघ्रिष्वलीयत ॥ ६ ॥

॥टीका॥कुन्जर प्रेरितां अंबष्ठें॥कृष्णावरी लोटला नेटें ॥ शुंडादंडें धरूनि हठें ॥ चरणफांटे चिरूं पाहे ॥ ४० ॥
तव लघिमेच्यां[2] लाघवें ॥ कृष्ण निष्टला नहोतां ठावें ॥ वज्रमुष्टि ओपूनि जवें ॥ जठरा तळीं प्रवेशला ॥ ४१ ॥
कुंजराचे चारी पाय ॥ तयांमाजीच लीन होय ॥ हस्तिप कुंजरा भंवतें पाहे ॥ ह्मणती काय हरि झाला ॥ ४२ ॥

संक्रुद्धस्तमचक्षाणोघ्राणदृष्टिःसकेशवम् ॥ परामृषत्पुष्करेणसप्रसह्यविनिर्गतः ॥ ७ ॥

॥टीका॥श्रीकृष्णाचा मुष्टिप्रहार॥लागतां सक्रोध कुंजर॥घ्राणें हुंगोनि शोधनपर॥नेत्रा गोचर पशुजाती ॥४३ ॥
शुंडाग्रातें पुष्कर ह्मणणें ॥ श्रीकृष्णातें हुडकी तेणें ॥ येरी मुरडोनि आंगवणें ॥ थाप मारून निष्टला ॥ ४४ ॥

पुच्छेप्रगृह्यातिबलंधनुषःपंचविंशतिम् ॥ विचकर्षयथानागंसुपर्णइवलीलया ॥ ८ ॥

---

[1] दोन तीनदां उच्चारिलेलें वाक्य. [2] पाहिजे तितका आंगीं हलकेपणा आणण्याचें सामर्थ्य.

॥टीका॥मग येऊनि पुच्छाकडे॥करीं घालूनि पुच्छवेढे॥पंचवीस धनुष्यें[1] कुन्जर खिरडे॥तेंवि निवाडें वोढिला४५॥
परम बळिष्ठा बळिष्ठ॥ सक्रोध कुंजर आणि अंबष्ठ ॥ कृष्णें कर्षितां भंगला कंठ ॥ मानी उद्भट[2]विक्रम हा॥४६॥
जेंवि भुजंगमातें खगप[3]॥कर्षिता होय प्रळयकंप ॥ तेंवि करींद्रा कंदर्पबाप ॥ स्वलीला प्रताप प्रकाशी ॥ ४७ ॥

सपर्यावर्त्तमानेनसव्यदक्षिणतोऽच्युतः ॥ बभ्रामभ्राम्यमाणेनगोवत्सेनेवबालकः ॥ ९ ॥

॥ टीका ॥ कृष्ण धरावया साठीं ॥ दक्षिणांगें मुरडी करटी[4] ॥ येरु[5] प्रतापें पुसाटीं[6]॥वोढी हट्टीं वामांगें ॥ ४८ ॥
वामभागीं जंव कुन्जर फिरे ॥ तंव दक्षिणांगीं कर्षिजे येरें॥वत्सपुच्छेंसीं लेकुरें ॥ जेंवे कां फेरे घालिजती ॥४९ ॥

ततोऽभिमुखमभ्येत्यपाणिनाहत्यवारणम् ॥ प्राद्रवन्पातयामासस्पृश्यमानःपदेपदे ॥ १० ॥

सधावन्क्रीडयाभूमौपतित्वासहसोत्थितः ॥ तंमत्वापतितंक्रुद्धोदंताभ्यांसोऽहनात्क्षितिम् ॥ ११ ॥

॥टीका॥॥पुच्छें कर्षूनि सहस्त्रवरी॥मग सम्मुख येऊनि श्रीहरि॥बळें ताडूनि मुखावरी॥पळे सत्वरी क्षोभवुनी५०
खवळला कुंजर लागे पाठीं॥त्यासि चाळवोनि जगजेठी॥पळतां पडोनि भूतळपृष्ठीं॥जाया उठाउठीं निष्टूनी ५१
कृष्ण पडिला देखोनि दृष्टी॥कुंजर येऊनि मेटे[7]खुंटी॥दांत मारी भूतळवटीं ॥तंव कृष्ण थापटी दे पुढती ॥ ५२ ॥
तेणें क्षोभला पुढतीं उठे॥धांवे कृष्णा पाठोवाटे[8] ॥ तंव येरु स्खलितापरी आपटे ॥ सवेग निष्टे तेथुनी ॥५३ ॥
ऐसें देखतांचि कुंजरें ॥ दांतें मारी परम निकरें ॥ तंव मुखावरी ताडूनि येरें ॥ करी सामोरें पलायन ॥ ५४ ॥
ऐसें पदोपदीं प्रपातन॥वारणातें करवी कृष्ण॥तेणें झाला खेदक्षीण॥परी क्रोध दारुण नसंवरे ॥ ५५ ॥

---

[1] चार हात. [2] महापराक्रमी. [3] गरुड. [4] हत्ती. [5] कृष्ण. [6] शेंपटला. [7] गुडघे टेकून बसण्याचा व्यापार. [8] पाठोपाट.

स्वविक्रमेप्रतिहतेकुञ्जरेन्द्रोऽत्यमर्षितः ॥ चोद्यमानोमहामात्रैःकृष्णमभ्यद्रवद्रुषा ॥ १२ ॥

॥टीका॥ भग्नविक्रम झालियावरी॥अत्यन्त क्षोभा पावला करी॥हस्तिपें प्रेरितां कृष्णावरी॥विजूच्या परी लोटला॥५६॥मी कुवलयापीड गज॥अर्भकें निस्तेज केलें मज॥पायाळावरी जैसी वीज॥धरूनि लाज तेंवि भडके ५७॥

तमापतन्तमासाद्यभगवान्मधुसूदनः ॥ निगृह्यपाणिनाहस्तंपातयामासभूतले ॥ १३ ॥

॥टीका॥ ऐसा कुवलयापीडयावा॥मर्दनीं आवेश यादवदेवा॥कुंजरें कलीवर कवळितां कंवा॥मुरडे सिंहासमसाम्य॥५८॥ मधुकैटभनिषूदन॥केलें मल्लयुद्धें करून॥तैसी प्रकटी आंगवण ॥ श्रीभगवान् ऐश्वर्यें ॥५९॥ कुञ्जरापुढें पळतो हरि ॥ ऐसें मानूनि अन्तरीं ॥ अम्बष्ठ वारंवार प्रेरी ॥ त्याची बोहंरी आदरिली ॥६०॥ कुञ्जर झाला भग्नदर्प ॥ तथापि अंबष्ठ साटोप ॥ यालागीं मुरडला मन्मथबाप ॥ धरिला द्विप शुण्डाग्रीं ॥६१॥ शुण्डा पिळितां प्रबळ बळी ॥ उलथूनि पडला भूमण्डळीं ॥ मृगेन्द्र बैसे कुंभस्थळीं ॥ तेंवि वनमाळी गज गांजी ॥ ६२ ॥

पतितस्यपदाक्रम्यमृगेंद्रइवलीलया ॥ दंतमुत्पाट्यतेनैभहस्तिपांश्चाहनद्धरिः ॥ १४ ॥

॥टीका ॥ कुंजर पडतां भूमंडळीं॥बळें आक्रमी पायातळीं॥दन्त उपडोनि वनमाळी ॥ठोकी त्यातळीं गज गजपां[३]६३

मृतकंद्विपमुत्सृज्यदन्तपाणिःसमाविशत् ॥ अंसन्यस्तविषाणोऽसृङ्मदबिन्दुभिरंकितः ॥ १५ ॥
विरूढस्वेदकणिकावदनांबुरुहोबभौ ॥ १६ ॥

---

१ मिठी. २ नाश. ३ महाताला.

॥ टीका ॥ विसर्जूनियां कुञ्जरप्रेत ॥ हस्तीं वाहूनि गजदन्त ॥ कैसे वीरश्रीशोभायुक्त ॥ रामश्रीकान्त शोभले ॥ ६४ ॥ स्कंधीं वाहोनि दंतकुलिशें ॥ रंग प्रवेशती उत्कटावेशें ॥ रक्तबिन्दु टबकती कैसे ॥ दंतापासोनि स्कंधींच्या ॥ ६५ ॥ मद जाणिजे दानोदक ॥ रूढावेश स्वेदपुलक ॥ इत्यादिकीं व्याप्तमुख ॥ शोभा अलौकिक प्रकाशी ॥ ६६ ॥ ह्मणाल एकला एकट हरि ॥ प्रवेशला रंगागारीं ॥ तरी तो निर्भय शत्रुसमरीं ॥ गोपपरिवारीं प्रवेशे ॥ ६७ ॥

वृतौगोपैःकतिपयैर्बलदेवजनार्दनौ ॥ रंगंविविशतूराजन्गजदन्तवरायुधौ ॥ १६ ॥

॥टीका॥ मल्लरंगीं परम कुशल॥नावांनिके गोपबाळ॥पूर्वींच निवडूनि ते ते सकळ॥सवें हरिबळ आणिती६८॥ तितुका वेष्टित गोपभार ॥ यूथप श्रीकृष्णबळभद्र ॥ प्रवेशले रंगागार ॥ करीं हातियेर[2] गजदंत ॥६९॥ तये रंगप्रवेशकाळीं ॥ मंचासनीं नृपमण्डळीं ॥ कैसा भासला वनमाळी ॥ तें रसशाळी[3] परिस तूं ॥ ७० ॥

मल्लानामशनिर्नृणांनरवरःस्त्रीणांस्मरोमूर्तिमान्गोपानांस्वजनोऽसतांक्षितिभुजांशास्तास्वपित्रोःशिशुः ॥
मृत्युर्भोजपतेर्विराडविदुषांतत्वंपरंयोगिनांवृष्णीनांपरदेवतेतिविदितोरंगंगतःसाग्रजः ॥ १७ ॥

॥टीका॥रौद्ररसें मल्लांप्रति ॥भगवान वाटे वज्राकृति ॥ विदूयुत्पातासम निघातीं॥चूर्ण करिती हृदयातें॥७१॥ मन्दराचळासम निर्घोंट ॥ आर्टींव वज्राचे बाहु सदट[4] ॥ चपेटप्रहारेंसीं निष्पिष्ट॥ गात्रें कूट[5] हे करिती ॥ ७२॥ सजलमेघापरी सुनीळ ॥ चपळां[6]परी नेत्र चपळ ॥ विदूयुत्प्रतापी प्रलयकाळ ॥ गमती केवळ मल्लांतें ॥ ७३ ॥

---

१ नामांकित. २ हत्यार. ३ रसिक. ४ बलकट. ५ चूर्ण. ६ विजांप्रमाणें.

कठोर अंगयष्टि ठकार[1] ॥ प्रबळ अंस[2] विशाळ उर ॥ जानुघोंटी कुलिशाकार[3] ॥ कठिन कोंपर मणिबंध[4] ॥ ७४ ॥ मालगांठी कांसिली कांसे ॥ जैसी सौदामिनी प्रकाशे ॥ मल्लरंगीं वज्रासरिसे ॥ मल्लावेषें भासले ॥ ७५ ॥ ऐसा रौद्ररसाचा यावा ॥ देखतां मल्लां धुकधुकी जीवा ॥ परंतु नृपाच्या स्नेहगौरवा- ॥ साठीं हांवा बांधिती ॥७६॥ ऐसे भासले मल्लांप्रति ॥ अद्भुतरसें नर पाहती ॥ गुणलावण्यें संपूर्ण व्यक्ति ॥ ह्मणती कल्पांतीं नदेखिली॥७७॥ कोटि चंद्रांची पूर्ण जोत्स्ना ॥ तुळितां समता नपवे वदना ॥ विलोलकंजखंजनयना[6] ॥ असाम्य तुलना उपमितां ॥७८॥ रसाळवदनीं दानोदक ॥ सरळ नासिका शोभवी बिक ॥ कोमळ अधर दन्त सुरेख ॥ गण्ड चिबुक हनु विलसे ॥ २७९ ॥ आजानुबाहु सुपीन सरळ ॥ उन्नत विशाळ वक्षःस्थळ ॥ रोमराजी अतिकोमळ ॥ उदर त्रिवळीमण्डित ॥ ८० ॥ दया अवतरली माझारी ॥ ते स्वशोभा प्रकाशी जठरीं ॥ नवांबुदभा[7] सर्वशरीरीं ॥ चारुगात्रीं ते विलसे ॥ ८१ ॥ नाभि गभीर जगद्बीज ॥ गुह्यनिगमां निजगुह्य सहज ॥ ऊरु असाम्य कदळी गज ॥ नितम्ब सुतेज समसाम्य ॥ १८२ ॥ जानु जंघा गुल्फ प्रपद ॥ पदांगुळें सुरेख विशद ॥ पूर्णामृतें वीसही चांद ॥ ध्यातां वरद ध्यानस्थां ॥ ८३ ॥ पुरटकिरीट मयूरवेंठी ॥ कुटिलालकांची वीरगुंठी ॥ मकरकुंडलें कर्णपुटीं ॥ मार्तंडकोटी लोपविती ॥ ८४ ॥ शोभे मुक्ताफळ नासाग्रीं ॥ श्रीवत्स कौस्तुभ प्रकाशे उरीं ॥ उदित मल्लरंगाच्या समरीं ॥ माळा शिरीं खोंविलिया ॥ १८५ ॥ बाहु वेष्टिले बिरुदवसनीं॥त्यावरी कीर्तिमुखें किंकिणी ॥ भुजा ठोकितां उठती ध्वनि ॥ कंबुकंकणीं मणिबंध ॥ १८६ ॥ व्रजमुष्टि वज्रमुद्रिका ॥ चपेटे लोळविती

---

१ मोहक. २ खांदे. ३ वज्राकृति. ४ मनगट. ५आवेश. ६ चपल कमळ किवा खंजपक्षी यांप्रमाणें नेत्र ज्यांचे ते. ७ नवीन मेघासारखी कांन्ति. ८ पायांचे घोंटे. ९ पावलाचे अग्र. ९ स्वर्णाचा मुकुट.

अंतका ॥ पीतांबर कशिला निका ॥ मल्लगंठिका ठकारें ॥ ८७ ॥ चरणीं अंदु वांकी वाळे ॥ अरिगण रुळती
बिरुदमेळे ॥ उत्तरीयवसनाविण मोकळें ॥ रूप देखिलें नरवर्गी ॥ ८८ ॥ कोटि ब्रह्मांडगर्भींचें तेज ॥ मूर्तिमंत
तेजःपुंज ॥ अद्भुत लावण्यरसाची वोज ॥ ह्मणती कंजजजनिता हा ॥ ८९ ॥ वीर्यप्रताप परमाद्भुत ॥ लावण्य
ऐश्वर्य शक्तिमंत ॥ ऐसा नरवर्गी हृदयांत ॥ रस अद्भुत अनुभविला ॥ ९० ॥ आतां ललनालालनरसिक ॥
ललनाहृत्पंकजकौतुक ॥ पुरवावया तनु नाटक ॥ दावी नावेक तें ऐका ॥ ९१ ॥ कामक्षोभक जे सामग्री ॥ ते ते
प्रकाशी स्वशरीरीं ॥ कैसी कोण ते येथ चतुरीं॥विविधाकारी जाणावी ॥ ९२ ॥ कुंज कोकिळा कंजकानन ॥ कंद
कलापी कलभाषण ॥ कामिनीकामप्रोद्दीपन ॥ कलुषीकरण कंदर्पी ॥ ९३ ॥ रजनी राका[1] राकारमण[2] ॥ ऋतु
वर रासरसिक पूर्ण ॥ रोलंबाचें[3] रुंजीकरण ॥ रतिवर्धन रागवंतां ॥ ९४ ॥ लतांपिहित[4] निगूढस्थान ॥ कुंज ऐसें
त्या अभिधान ॥ बाहुलतांहीं गुप्तसदन॥ हृद्भवन कृष्णाचें ॥९५॥ श्रीकृष्णाची स्वरमाधुरी॥ पिका लाजती पंचमस्वरीं ॥ कृष्णस्वरें स्मर शरीरीं॥ युवतियूनां अवतरे ॥ ९६ ॥कंजकानन[5] कृष्णतनु ॥ शिरःपंकज शोभायमानु ॥ त्यामाजी फुल्लारविंदवदन ॥ पंकजनयन परमात्मा ॥९७॥ पाणिकमळें सहस्रदळें ॥सदय हृत्पद्माचीं मृदुलें ॥ चरणकमळें रातोत्पळें॥परम रसाळें रागाढ्यें९८॥जेथ सद्भ्रमरांची दाटी॥नाभिकमळीं ब्रह्मांडकोटि॥एवं पंकजवन जगजेठी॥निजांगयष्टि प्रकाशी ॥ ९९॥ मेघश्याम तनूची शोभा॥मेघगंभीर गायनें नभा॥ मेघरागें पाववी क्षोभा॥रातवल्लभा रसदानें
॥१००॥मेघागमनीं कलापिगण ॥ महोत्साहें करी नर्तन ॥ तेंवि देखोनि कृष्णागमन ॥ भक्त[7]बर्हिण नाचती ॥ १ ॥
अस्पष्ट अव्यक्त अक्षरपंक्ति ॥ मुग्धाबाळा शिशुभारती ॥ कृष्णकलभाषणाची रीति ॥ कळा नपवती षोडशी ॥ २ ॥

---

१ ज्या पूर्णिमे मध्यें चंद्र पूर्ण असतो ती २ चंद्र· ३भुंग्यांचें. ४ लताच्छादित. ५ कमलवदन. ६ सज्जन हेच भ्रमर. ७ भक्त हेच मयूर.

घडतां इत्यादि संपर्क ॥ कामजकळी वधूकामुक॥कृष्णा आंगीं तें सकळिक ॥ वसे निष्टंक विश्वात्मता ॥ ३॥ कृष्णधम्मिल[1]काळिमा ॥ पूर्णचंद्रेंशीं पूर्णिमा ॥ साम्य तमिस्रात्रियामा ॥ प्रकटी कामा हरिवदन ॥ ४ ॥ शरद हेमंत किंवा वसंतु ॥ कामक्षोभक जे हे ऋतु ॥ प्रत्यक्ष कृष्ण अवघे मूर्तु ॥ ऐसें व्यासोक्त जग जाणे ॥ ५ ॥ ऊर्जादि[7] मार्गशीर्षमास ॥ स्वयें ह्मणवी श्रीपरेश ॥ कुसुमाकर ऋतुविशेष ॥ हृषीकेश ते ह्मणे मी ॥ ६ ॥ रासक्रीडारसकोविद ॥ त्रिजगीं तो एक मुकुंद ॥ दानोदकें रोलंबशब्द ॥ सुमनसुगंध प्रकाशी ॥ ७ ॥ अनेकजन्मार्जित सुकृती ॥ त्या श्रीकृष्णीं रागवती ॥ कंदर्पक्षोभें भुलल्या युवति ॥ हरि स्मरमूर्ति त्यां गमला ॥८॥ सरळ चापसमान भुज ॥ मौर्वी[2] भासे भ्रमरस्रज[3] ॥ बाणस्थानीं नेत्रकंज ॥ मकरध्वजकुण्डलभा ॥९॥कोटिकंदर्प लावण्य रुचिर ॥ शृंगाररसें ललनानिकर ॥ लक्षिता झाला लक्ष्मीधर ॥ तो पदविस्तार निरोपिला ॥ १० ॥ आतां संवगडे गोपगडी ॥ हास्यरसाची उभविती गुढी ॥ अल्प व्युत्पत्ति तेही उघडी॥आदरीं सुघडी परिसिजे॥११॥ आमुचा गडी ह्मणती गोप ॥ परि हें आजिचें विचित्र रूप ॥ कधीं दाविलें नव्हतें अल्प ॥ हास्य अमूप ते करिती ॥ १२ ॥ खांदां गजदंताच्या डांगा ॥ मल्लवर्गणी[4] बाणली आंगा ॥ अतुळबळेंसीं पातले रंगा ॥ गोपसोंगासम गमती ॥ १३ ॥ इत्यादि अनेक उपहासें ॥ आप्तस्नेहें हास्यरसें ॥ वयस्यांचे हृदयीं भासे ॥ रूप ऐसें कृष्णाचें ॥ १४ ॥ यानंतरें असद्रूपां ॥ हृदयीं प्रकटी स्वप्रतापा ॥ वीररसाक्त दावी रूपा ॥ तें कुरुभूपा अवधारीं ॥ १५ ॥ धनुष्यबाण ठकारठाण ॥ वीरश्रीमंडित निमासुर[6] ध्यान ॥ दुर्भूपांचें हृदयदारण ॥ करी संपूर्ण वीररसें ॥ १६ ॥ बाहत्तरी कळा कौशल्यमयी ॥ मल्लविद्या भासवी देहीं ॥ द्वंद्वयुद्धाची नवाई ॥ उमटे ठायीं

---

[1] पुष्पालंकृत केशांचा बुचडा. [2] धनुष्याची दोरी. [3] भ्रमरांची माळा. [4] मल्लांचें सोंग. [5] मोहक उभें राहणें. [6] सुंदर. [7] कार्तिकादि.

वर्ष्मा[1]च्या ॥ १७ ॥ छत्तीस दंडायुधीं निपुण ॥ गदाभ्रृशुंडी तोमरप्रवीण ॥ प्रासपरिघपट्टि[2]शपूर्ण ॥ चर्म[3] कृपाण[4]
शूळ शक्ति ॥ १८ ॥ यमदंष्ट्रादिपरश्वध[5] ॥ ऐसे अनेक आयुधभेद ॥ परजूं जाणे ऐसा विशद ॥ मानिती
असद्भूपाळ ॥ १९ ॥ अस्त्रविद्या सर्वांपरी ॥ अथर्वणअंगिरसें रहस्यधारी ॥ कोण्या समरीं नपवे हारी ॥ ऐसा
अंतरीं भाविती ॥ २० ॥ ऐसा असन्महीपाळां ॥ वीररसें घनसांवळा ॥ चंडप्रतापी देखोनि डोळां ॥ धाकें
चळचळां कांपती ॥ २१ ॥ एकां पातली हुडहुडी ॥ वळल्या एकांच्या मुरकुंडी ॥ वदनीं एकाच्या बोबडी ॥
नेत्रां अनुघडी पैं एकां ॥ २२ ॥ हृदयीं स्मरोनि दुष्टाचरण ॥ ह्मणती करूं आला शासन ॥ आतां आह्मां
सोडवी कोण ॥ यापासोन त्रिजगतीं ॥ २३ ॥ ऐसे असन्मनुजपति ॥ भगवद्रूपाची प्रतीति ॥ भाविते झाले
ध्यानस्थिती ॥ कुरुभूपति तुज कथिलें ॥ २४ ॥ भगवत्पितरां करुणारसें ॥ कोमल शिशुत्वची प्रकाशे ॥
तेंही वाखाणूं स्वल्पसें ॥ स्वस्थमानसें जरी पुससी ॥ २५ ॥ नंद वृषभान उपनंद ॥ पितृप्रमुख वृद्ध स्निग्ध ॥
त्यांस भासला मुकुंद ॥ अजा[6]तरदशिशुसमता ॥ २६ ॥ रामकृष्णांगें कोमळें ॥ केवळ जैसे नवनीतगोळे ॥
जरी ते धेनुगोपनशील ॥ तथापि मृदुल सुकुमार ॥ २७ ॥ धेनुगोपनशीलवयसें ॥ स्नेहें पितरां गमती कैसे ॥
जातमात्रशिशुसरिसे ॥ मोहावेशें भासती ॥ २८ ॥ घ्राणें सरळ नेत्र तरळ ॥ ओष्ठ मृदुळ कुन्तळ कुटिळ ॥
भ्राजिष्ठ कुंडलें गंडयुगल ॥ वक्षःस्थळ बिस्तीर्ण ॥ २९ ॥ ग्रीवा ककुद्मीं बाहु सुपीन ॥ भोगि[7]भोगसम आजानु ॥
मालगांठी पीतवसनु ॥ शोभायमान परवंटी ॥ ३० ॥ जैसीं कोमळ रातोत्पलें ॥ त्यांहूनि सुकुमार चरणतळें ॥
लक्षितां पितरांचीं नेत्रकमळें ॥ जालीं व्याकुळें कारुण्यें ॥ ३१ ॥ ऐसिया लेकुरांवरी प्रतिभट ॥ मल्लरंगीं का-

---

१ शरीराच्या, २ पट्टा. (खड्गभेद.) ३ ढाल. ४ तरवार. ५ कुठार. ६ ज्यास दांत आले नाहींत असा. ७ सर्पशरीरसदृश.

मल्लसुभट[1] ॥ कैसा रक्षील नीलकंठ ॥ पितरां उत्कट हे चिंता ॥ ३२ ॥ ऐसें पितरां सदयरसें ॥ केवळ कोमल शिशुत्व भासे ॥ भयानकरसावेशें ॥ कंस मानसें अवलोकी ॥ ३३ ॥ कंठीरवां[2] लक्षी करटी[3] ॥ धेनु लक्षी व्याघ्र दृष्टी ॥ सर्पा पडतां खगेंद्रमिठी ॥ नसरे गोठी मृत्युविना ॥ ३४ ॥ तैसा कंसें आपुल्या नयनीं ॥ काळस्वरूप चक्रपाणि ॥ देखिला आणि मूर्खजनीं ॥ भौतिकगणीं लक्षिला ॥ ३५ ॥ पंचभूतें आणि त्रिगुण ॥ विराट ऐसें या अभिधान ॥ एतदात्मक श्रीभगवान् ॥ भासला पूर्ण अविदुषां[4] ॥ ३६ ॥ यालागीं तिहीं बीभत्सरसें ॥ संभाविले निजमानसें ॥ मल्लसमरीं बाळकें कैसें ॥ समता नेणोनि वेंठावें ॥ ३७ ॥ शांतरसें योगिवृंद ॥ देखती केवळ परमानंद ॥ नेत्र लावूनि श्रीमुकुंद ॥ हृदयारविंदीं भोगिती ॥ ३८ ॥ यावरी सप्रेमभक्तिरसें ॥ वृष्णिवृंदासी मुकुन्द भासे ॥ उपासकांचें ध्येय जैसें ॥ पाहती तैसे सुस्निग्ध ॥ ३९ ॥ ऐकोना जे कुळदेवता ॥ कीं परब्रह्मींची योगसत्ता ॥ ऐसी भावना समस्तां ॥ देखोनि अच्युता वृष्णिगणा ॥ ४० ॥ ययाधिकारें सर्वांप्रति ॥ रंगीं भासला कमलापति ॥ ते हे पृथक्पदें व्युत्पत्ति ॥ शुकभारती वरी कथिली ॥ ४१ ॥ बळरामेंसिं बळाहकांग[5] ॥ जेव्हां प्रवेशला मल्लरंग ॥ दशधा रसीं देखती चांग ॥ तो प्रसंग निरूपिला ॥ ४२ ॥ यावरी कंसाचें अंतर ॥ झालें परमभयप्रचुर ॥ तें व्याख्यान व्यासकुमर ॥ कथी कुरुवरनृपातें ॥ ४३ ॥

हतंकुवलयापीडंदृष्ट्वातावतिदुर्जयौ ॥ कंसोमनस्यपितदाभृशमुद्विजतेनृपम् ॥ १८ ॥

॥ टीक ॥ रामकृष्ण रंगस्थानीं ॥ कंस केवळ मृत्युच मानी ॥ पूर्वपराक्रम अनुमानी ॥ वाढवी ग्लानि ह-

---

[1] प्रतिस्पर्धी. [2] सिंहाला. [3] हत्ती. [4] अविद्वानांला. [5] मेघाप्रमाणें श्यामवर्ण अंग ज्याचें तो.

त्कमळीं ॥ ४४ ॥ कुवलयापीडनामा गज ॥ सहस्रगजबळांचा पुंज ॥ लीला मर्दूनियां तो सहज ॥ रंगीं भोज नाचती ॥ ४५ ॥ धनुर्मख भंगिला पूर्वदिनीं ॥ संरक्षक मर्दिल्या सेनाश्रेणी ॥ हें देखोनि कंसा मनीं ॥ बैसली कणकणी भयाची ॥ ४६ ॥ निकट गोप्ते परम शूर ॥ दुर्घट दुर्गम मल्ल दुर्धर ॥ अस्त्रविद्येचा अंगीं भर ॥ परि पडला विसर सर्वांचा ॥ ४७ ॥ सन्नद्ध बद्ध सर्वसंपत्ति ॥ एवं मनस्वी कंसभूपति ॥ तथापि देखोनि रामश्रीपति ॥ कैसे शोभती तें ऐका ॥ ४८ ॥ राया ऐसी कंसस्थिति ॥ ग्लानि म्लानता भय विभ्रांति ॥ कथिलियावरि ते यदुपति ॥ पडली भ्रांति ते काळीं ॥ ४९ ॥

तौरेजतूरंगगतौमहाभुजौविचित्रवेषाभरणस्रगंबरौ॥यथानटाउत्तमवेशधारिणौमनःक्षिपंतौप्रभयानिरीक्षताम्

॥ टीका ॥ मल्लरंगीं दोघे बन्धु ॥ शोभती जैसे भास्कर इंदु ॥ दिव्यांबराभरणें विविधु॥जैसे विशुद्ध नटवेश॥५०॥ मंचस्थानीं जनपदसभा॥पाहतां त्यांचिया नयनीं जिभा॥निघोनि प्राशिती लावण्यप्रभा॥मानसें लोभा झळंबती[1] ५१ नाट्यें नटोनि नटनाटकी ॥ निर्भय ऊर्जित लक्ष्मी नटकी ॥ धरिली गोपाकृति लटकी ॥ तथापि धडकी नधरिती॥५२ ॥ असो निर्भय निराट ऐसे॥ आजानुबाहु रौद्ररसें[2] ॥ रंगीं मृत्युसमान कंसें ॥ भावुनी मानसें भय धरिलें ॥ ५३ ॥ सानुज कंस मल्लांसहित ॥ धाकें कांपती हृदया आंत ॥ येर मंचस्थजनाची मात॥ राया समस्त अवधारीं ॥ ५४॥

निरीक्षितावुत्तमपूरुषौजनामंचस्थितानागरराष्ट्रिकानृप॥
प्रहर्षवेगोत्कलितेक्षणाननाःपपुर्नतृप्तानयनैस्तदाननम् ॥ २० ॥

॥टीका॥मथुरानगरी माजील लोक॥आणि राष्ट्रींचेही अनेक॥देखोनि रंगीं उत्तम पुरुष॥पावले हर्ष हृत्कमळीं॥ ५५

---

[1] स्पर्शिती. [2] भयदायक अशा वीर्यानें.

तया हर्षोत्कर्षवेगें ॥ रामकृष्णांचीं उत्तम आंगें ॥ प्राशितें झाले नयनमार्गें ॥ परि तृप्ति नभंगे प्रेमाची ॥ ५६ ॥
आवडीचेनि आर्तिभरें॥नयनें प्राशितां मुखकह्लारें॥अधिक प्रेमोत्कर्ष अवतरे॥कारणद्वारें कवळावया ॥ ५७ ॥

पिबंतइवचक्षुर्भ्यांलिहंतइवजिह्वया ॥ जिघ्रंतइवनासाभ्यांश्लिष्यंतइवबाहुभिः ॥ २१ ॥

॥टीका॥चक्षुकरूनी प्राशिती रूप॥ऐसें प्रेमभरें सकृप॥घ्राणें हुंगिजे जेंवि कां पुष्प॥मानसें द्विरेफ करूनियां ५८
वत्सें चाटिती जैशा धेनु ॥ तैशा रसज्ञा उद्विग्न ॥ आलिंगितीच बाहूकरून ॥ ऐसे निमग्न दयारसीं ॥ ५९ ॥
राया कौरववनउडुपति[1] ॥ ते जन परस्परें बोलती ॥ ऐकें तयांची भारती ॥ शुक संकेतीं वाखाणी ॥६० ॥

ऊचुःपरस्परंतेवैयथादृष्टंयथाश्रुतम् ॥ तद्रूपगुणमाधुर्यप्रागल्भ्यस्मारिताइव ॥ २२ ॥

॥टीका॥गोकुळवृंदावननिवासी॥अनेक जनपद हरिसहवासी॥तिहीं प्रताप शक्ति जैसी॥देखिली तैसी ते वदती ६१
मथुराराष्ट्रिक सह नागर ॥ भगवन्महिमागारिमा प्रचुर ॥ ऐकिला तैसा सविस्तर ॥ येरां येर प्रतिवदती॥ ६२ ॥
मल्लरंगींच्या दर्शनमात्रें॥रामकृष्णांचीं देखोनि गात्रें॥गुण माधुर्य पूर्वचरित्रें॥कथिती विचित्रें स्मरविलीं ॥ ६३ ॥
जैसी दिधली आठवण॥तैसें भगवत्प्रागल्भ्य नयन॥ देखोनि अंतःकरणा स्मरण ॥ देती संपूर्ण चरितांचें ॥ ६४ ॥

एतौभगवतःसाक्षाद्धरेर्नारायणस्यहि ॥ अवतीर्णाविहांशेनवसुदेवस्यवेश्मनि ॥ २३ ॥

॥टीका॥जनपद परस्परें बोलती॥दोघे नारयणांशमूर्ति॥तेथ अवतरले गूढस्थिती॥वसुदेवसंतति तत्सदनीं ॥६५

---

१ कौर रूपी कमलवनाचा चंद्र.

अनंत ऐश्वर्यपरिपूर्ण ॥ जो तो श्रीहरि नारायण ॥ त्याचे अंशावतार पूर्ण ॥ ह्मणतां गौण नमनावें ॥ ६६
पावकांश[1] स्फुलिंग[2] एक ॥ ऐश्वर्य नोहे न्यूनाधिक ॥ पाचक दाहक प्रकाशक ॥ वाढे सम्यक प्रसंगीं ॥ ६७ ॥
तैसे वसुदेवाचे घरीं ॥ जरी अवतरले मनुजाकारीं ॥ तरी ऐश्वर्याची थोरी ॥ प्रत्यक्ष चतुरीं देखिजे ॥ ६८ ॥

एषवैकिलदेवक्यांजातोनीतश्चगोकुलम् ॥ कालमेतंवसन्गूढोववृधेनंदवेश्मनि ॥ २४ ॥

॥टीका॥ अहो हा कृष्ण पुरुषोत्तम॥ राजीवाक्ष मेघश्याम॥ देवकीजठरीं पावला जन्म॥ महानिशीथीं[3] नभो[4]ऽष्टमीं ६९
दुर्भटगुप्तकारागारीं ॥ कोणां नकळत करूनि चोरी ॥ नेऊनि गोकुळामाझारी॥ अद्यापवरी लोपविला ॥ ७० ॥
परंतु नंदाचिये सदनीं ॥ याची ऐश्वर्यप्रतापकरणी ॥ परस्परें अद्भुत जनीं ॥ बोलती वदनीं ते ऐका ॥ ७१ ॥

पूतनाऽनेननीताऽतंचक्रवातश्चदानवः ॥ अर्जुनौधेनुकःकेशीगुह्यकोऽन्येचतद्विधाः ॥ २५ ॥

॥टीका॥ कपटवेशें सविष स्तन॥ पूतना पाजितां ते शोषून॥ येणें मारिली नलगतां क्षण॥ महादारुण निशाचरी ७२
परम कोमल सुकुमार चरण ॥ झाडूनि शकट केला चूर्ण ॥ तृणावर्ताचे घेतले प्राण॥ चढतां गगन गळग्रहणें॥ ७३
मृद्भक्षणीं ब्रह्मांडकोटि ॥ वदनीं यशोदे दाविल्या दिठीं ॥ स्मरोनि नारदशापगोठी॥ गुह्यकराहटी आठविली॥ ७४॥
नलकूबर मणिग्रीव ॥ जे धनदाचे वीर्यसंभव ॥ नारदशापें अर्जुनत्व ॥ पावले दुर्भव स्थावरता ॥ ७५ ॥
चरणस्पर्शें उन्मळोनी ॥ उद्धरिले ते गुह्यक दोन्ही ॥ घोडे गाढव राक्षसयोनि ॥ केशिधेनुक संहरिले ॥ ७६ ॥
तयांचि ऐसे विविधरूपी ॥ राक्षस वधिले महाप्रतापी ॥ अघासुराच्या प्रळयकल्पीं॥ मूढत्व ओपी विधातिया ॥ ७७

---

[1] अग्नीचा अंश. [2] ठिणगी. [3] अर्धरात्रीं. [4] नभ ह्मणजे श्रावण, त्याची अष्टमी.

गावःसपालाएतेनदावाग्नेःपरिमोचिताः ॥ कालियोदमितःसर्पइंद्रश्चविमदःकृतः ॥ २६ ॥

॥टीका॥महिमा देखिला ते ते जन॥येरां परस्परें करिती श्रवण॥ह्मणती अवतार रामकृष्ण॥ऐश्वर्य गहन पैं यांचें७८
गाई गोपाळ दावानळीं ॥ जळतां देखोनि करुणाशाली ॥ रक्षिता झाला ते काळीं ॥ स्वयें वनमाळी ऐश्वर्यें ॥७९॥
झांकवोनियां नेत्रकमळें ॥ नेलें भांडीरवटाजवळें ॥ ऐसिये यांचे ऐश्वर्यलीले ॥ साक्षी डोळे पैं आमुचे ॥ ८० ॥
एक ह्मणती यमुनाह्रदीं ॥ कालिय वि[1]षधर सु[2]पर्णदंदी ॥ येणें दमिला नर्तनविधी ॥ वरदासिद्धि बोळविला ॥८१॥
एक ह्मणती परस्परें ॥ पुरंदरयज्ञाचें मातेरें ॥ करूनि वि[3]दर्प केला येरें ॥ मग तो मत्सरें क्षोभला ॥ ८२ ॥

सप्ताहमेकहस्तेनधृतोऽद्रिप्रवरोऽमुना ॥ वर्षवाताशनिभ्यश्चपरित्रातंचगोकुलम् ॥ २७॥

॥टीका॥सां[4]वर्तक मेघ विद्युत्पात॥सवें देवूनी प्रळयवात॥गोपगोधनांचा निःपात॥करवी त्वरित क्षोभवूनी॥८३॥
जलपाषाण विद्युत्पतनें ॥ गृहें मंदिरें पडती तेणें ॥ आक्रंदती गोपगोधनें ॥ झंझापवनें त्रासिता ॥ ८४ ॥
तेव्हां कृष्णें गोवर्धन ॥ करीं धरूनि सप्तदिन ॥ इंद्र केला लज्जायमान ॥ दुर्मेघविघ्न भंगोनी ॥ ८५ ॥
वर्षावात विद्युत्पात ॥ जलगा[5]रादि महासीत ॥ भंगोनि गोकुळ दिवस सात ॥ रक्षी समस्त गिरिधर हा ॥८६॥

गोप्योऽस्यनित्यमुदितहसितप्रेक्षणंमुखम् ॥ पश्यंत्योविविधांस्तापांस्तरंतिस्माश्रमंमुदा ॥२८ ॥

॥टीका॥आणि गोपिकांचें वदन॥नित्यानंदें निर्भर पूर्ण॥हास्ययुक्त सविलास नयन॥पाहोनि विघ्न निस्तरती॥८७
विविध ह्मणिजे अनेक ताप ॥ हरिमुख पाहतां अनिमेष अल्प ॥ गोपी निस्तरती सुखरूप ॥ऐसा प्रताप पैं याचा८८॥

---

१ साप. २ गरुडाचा प्रतिस्पर्धी. ३ गर्वराहित. ४ प्रलयकालीन मेघ. ५ गारा.

तंव बोलती कोणी एक ॥ नागर मथुराप्रांतींचे लोक ॥ ते तूं कुरुउडुगणपा ऐक ॥ ह्मणे श्रीशुक स्वानंदें ॥८९॥

वदंत्यनेनवंशोऽयंयदोःसुबहुविश्रुतः ॥ श्रियंयशोमहत्त्वंचलप्स्यतेपरिरक्षितः ॥ २९॥

॥टीका ॥ते जन वदती परस्परें॥यदुकुळगोपन कारितां येरें॥त्रिजगीं यदुवंश विस्तारे॥ कीर्ति पसरे नभोगर्भी
॥९०॥यदुवंशींची कीर्ति बहळ॥त्रिजग धवळी परम अमळ॥ यश लक्ष्मी महत्त्वशीळ ॥ याचेनि यदुकुळ वरील
॥९१॥ऐसा देवकीतनयमहिमा॥वर्णिला धरूनि कृष्णीं प्रेमा॥एक वर्णिते झाले रामा ॥ नृपललामा[1] तें ऐक॥९२

अयंचास्याग्रजःश्रीमान्रामःकमललोचनः ॥ प्रलंबोनिहतोयेनवत्सकोयेबकादयः ॥ ३० ॥

॥ टीका ॥ अहो हा याचा अग्रजबंधु ॥ राम तेजस्वी प्रतापासिंधु ॥ कमललोचन महाप्रसिद्धु ॥ जैसा
इंदु उडुगणीं॥९३॥निर्भय मल्लरंगीं उभा॥वदनीं फांके वीरश्रीप्रभा॥बळप्रतापशक्तिशोभा॥देखती सभासद सारे
॥९४॥प्रलंबासुर महाकपटी॥गोपवेशें या वाहोनि पृष्ठीं ॥नेतां येणें मारूनि मुष्टि॥केला सृष्टी शतचूर्ण॥ ९५ ॥
वत्सासुर बकासुर॥व्योमादि कपटी महादुष्कर ॥ रामें केला यां संहार॥ जेणोनि निर्धार जन वदती॥९६ ॥कृष्णें
धेनुक वधिला ह्मणती॥रामें बकवत्सादिकां शांति॥ऐसें विपरीत जन बोलती ॥ हे लोकोक्ति अनिश्चयें ॥ ९७ ॥

जनेष्वेवंब्रुवाणेषुतूर्येषुनिनदत्सुच ॥ कृष्णरामौसमाभाष्यचाणूरोवाक्यमब्रवीत् ॥ ३१ ॥

॥टीका॥ पटह ढक्का दुंदुभि तुरें ॥ वाजती मल्लतालांच्या[2] गजरें ॥ त्यांमाजी जनपद परस्परें॥ऐसीं उत्तरें बोलती ९८
ऐकूनि चाणूर क्षोभला पोटीं ॥ ह्मणे दुष्टांच्या दुष्ट गोठी ॥ वीररसाची करिती तुटी ॥ श्रवणपुटीं नपडाव्या ॥ ९९॥

---

[1] राजांतील रत्न. [2] मल्लांची गर्जना.

तप्ततैलीं शीतळ जळ ॥ पडतां भडके प्रळयज्वाळ ॥ तैसा चाणूर मल्लपाळ ॥ क्षोभला केवळ जन वदतां १०० ॥
रामकृष्णांते पाचारून ॥ कपटगर्भित मृदुलवचन ॥ यथार्थ वदला तें मंपूर्ण ॥ श्रोता सर्वज्ञ परिस तूं ॥ २०१ ॥

हेनंदसूनोहेरामभवंतौवीर्यसमंतौ ॥ नियुद्धकुशलौश्रुत्वाराज्ञाऽऽहूतौदिदृक्षुणा ॥ ३२ ॥

॥टीका॥ अगा ये बलरामा बळिष्ठा ॥ नंदतनया कृष्णा धीटा ॥ तुमच्या वीर्यशौर्याच्या चेष्टा ॥ जाल्या प्रकटा नृपसभे २
मल्लविद्याप्रवीण तुह्मी ॥ राजा कौतुकेक्षणकामी[1] ॥ तेणें तुह्मां रंगभूमी ॥ पाचारूनि आणविलें ॥ २०३ ॥
निरतिशयें युद्धकुशल ॥ रायें ऐकोनि तुमचें बळ ॥ येथ आणविलें त्याचें फळ ॥ दाविजे केवळ नृपनयना ॥ ४ ॥

प्रियंराज्ञःप्रकुर्वंत्यःश्रेयोविंदंतिवैप्रजाः ॥ मनसाकर्मणावाचाविपरीतमतोऽन्यथा ॥ ३३ ॥

॥ टीका ॥ जननी जनक जगदीश्वर ॥ नृपति तयांचा अवतार ॥ त्याच्या प्रजा मनुजमात्र ॥ यावद्राष्ट्रपर्यंत ॥ ५ ॥
करितां नृपाज्ञालंघन ॥ इहलोक परलोक होय शून्य ॥ यालागीं सर्वदा नृपाधीन ॥ प्रजा संपूर्ण वर्तती ॥ ६ ॥
इत्यादिदोष दर्शनशास्त्रीं ॥ यावरी नृपति दंडधारी ॥ वागवी अष्टांग सामग्री ॥ शासन करी प्रजांतें ॥ ७ ॥
देश[2] दुर्ग कोश बळें ॥ मंत्री प्रधान अमात्य कुशळ ॥ नृपशरीर प्रजा सुशीळ ॥ न्याय निर्मळ शास्त्रोक्त ॥ ८ ॥
देखतां प्रजांचा अन्याय ॥ कृतांततुल्य दंडिता होय ॥ न्यायें वर्ततां परमसदय ॥ अपत्यप्राय प्रतिपाळी ॥ ९
यालागीं नृपासी जें जें प्रिय ॥ अवश्य प्रजांसि तें करणीय ॥ तें आचारितां पावती श्रेय ॥ ऊर्जितविजय सर्वत्र १०
ह्मणाल अवंचक अर्पणें कर ॥ इतुकेनि प्रजा स्वधर्मपर ॥ ऐसें नव्हे हा विचार ॥ ऐका साचार वदतसें ॥ ११ ॥

---

[1] कौतुक पाहूं इच्छिणारा. [2] हीं अष्टांगें होत. [3] सैन्य.

मनें नृपाचें प्रिय इच्छिणें ॥ नृपासी प्रिय तें कर्म करणें ॥ नृपा रुचे तें बोलणें ॥ कायवाग्मनें[1] नृपसेवा ॥ १२॥
श्रेय प्रजांसि या आचरणें ॥ विपरीत होतां तीव्रशासनें ॥ प्रजा पीडती अकल्याणें ॥ दुःखें दारुणें भोगिती १३
तरी ये प्रसंगीं पातलां तुह्मी॥नृपति कौतुकेक्षण[2]कामी॥निःशंक क्रीडतां आपुले ग्रामीं॥तैसे संभ्रमीं क्रीडा हो १४॥

नित्यंप्रमुदितागोपावत्सपालायथास्फुटम्॥वनेषुमल्लयुद्धेनक्रीडंतश्चारयंतिगाः॥ ३४ ॥

टीका॥ गोपवत्सप यथासुखें ॥ वनीं पुलिनीं स्वसंतोषें ॥ मल्लयुद्धाच्या उत्कर्षें ॥ परमावेशें क्रीडती ॥ १५ ॥
नित्य नूतनानंदभरित ॥ क्रीडतां धेनूं तें चारित ॥ मल्लविद्यापारंगत ॥ झालां समस्त तद्योगें ॥ १६ ॥
तरी अंतरींची सांडूनि शंका ॥ नृपासि दाविजे प्रियकौतुका॥तेंचि प्रियतम सर्व लोकां॥वदतों ऐका बल्लवहो॥ १७॥

तस्माद्राज्ञःप्रियंयूयंवयंचकरवामहे॥भूतानिनःप्रसीदंतिसर्वभूतमयोनृपः॥ ३५ ॥

॥टीका॥सर्वभूतमयचि राजा ॥ तो तोषतां अवघ्या प्रजा॥तोष पावती सहजींसहजा॥या निजगुजा जाणा हो॥१८
तस्माद्रायाचें कौतुक ॥ तुह्मीं आह्मीं आवश्यक ॥ आजि पुरविणें निष्टंक ॥येणें सर्वही लोक तुष्टती॥ १९ ॥
सर्वभूतात्मक भूपति ॥ भूतें त्याच्या अंगप्रकृति ॥ नृपसंतोषें त्या तोषती ॥ प्रसन्न होती अनायासें ॥ २० ॥
ऐसें चाणूरमल्लपवचन ॥ जैसें विषाक्त[3] मिष्ट पक्वान्न ॥ सगर्भरहस्य करूनि श्रवण ॥ बोले श्रीकृष्ण तें ऐका॥२१॥

तन्निशम्याब्रवीत्कृष्णोदेशकालोचितंवचः ॥ नियुद्धमात्मनोऽभीष्टंमन्यमानोऽभिनंद्यच ॥ ३६ ॥

टीका ॥ देशकालासी जैसें उचित ॥ तैसें बोले कमलाकांत॥राजा मल्ल सभा समस्त ॥ हर्षयुक्त ज्या वाक्यें॥२२

---

[1] देह, वाचा व मन यांहीं करून. [2] कौतुक पाहण्यास उत्सुक. [3] विषानें भरलेलें.

ह्मणाल देश काल तो कवण॥तरी देश तो मल्लरंगस्थान॥काळ तो कंसाचें निर्याण॥जाणोनि वचन हरि बोले॥ २३
मल्लरंगीं नृपाच्या सदनीं ॥ येत्वोनि वदतां अयुक्तवाणी॥चतुर ऐसें न ह्मणे कोणी ॥धृतावगणी[1] सम वदिजे॥ २४॥
समल्लकंसाचा अंतकाळ ॥ उदित जाणोनि श्रीगोपाळ ॥ वक्तयांमाजी परम कुशळ ॥ वाक्य प्रांजळ बोलतसे॥
॥ २५ ॥ एऱ्हवीं दुर्गीं सांकडलों[2] ॥ दुर्धर मल्लांहस्तीं पडलों ॥ यास्तव सभय वचन बोलों ॥ न ह्मणे केवळ भगवंत
॥ २६ ॥ आपणा प्रियतम युद्ध करणें ॥ तेंचि चाणूरें प्रार्थिलें वदनें ॥ अभीष्ट मानूनियां श्रीकृष्णें ॥
आह्लाद मनें मानिला ॥ २७ ॥ एवं तोषोनि अंतःकरणीं ॥ हास्यवदनें प्रशस्तवाणी ॥ मल्लरंगीं चक्रपाणि ॥
वदता झाला तें ऐका ॥ २८ ॥

प्रजाभोजपतेर्यूयंवयंचापिवनेचराः ॥ करवामप्रियंनित्यंतन्नःपरमनुग्रहः ॥ ३७ ॥

॥टीका॥भोजपति हा कंसराजा॥तुह्मी समस्त याचिया प्रजा॥जाणोनि नृपाच्या प्रियतम काजा॥ अवंचक वोजा
अनुसरतां ॥ २९ ॥ आह्मीही वनवासी गोपाळ ॥ तथापि नृपाच्या प्रजा सकळ॥ नृपासी प्रियतम जें केवळ ॥
नित्यकाळ आचरूं ॥ ३० ॥ नृपाचें प्रियतम जें करणें ॥ प्रजांसी परमानुग्रह तेणें ॥ तरीच सर्वही कल्याणें ॥
प्रजांकारणें उपलभती ॥ ३१ ॥ तथापि नीतिन्यायविचारें ॥ प्रवर्तिजे यथाधिकारें ॥ चाणूराप्रति कमलावरें ॥
बोलिलें तें परिसाहो ॥ ३२ ॥

बालावयंतुल्यबलैःक्रीडिष्यामोयथोचितम् ॥ भवेन्नियुद्धंमाधर्मःस्पृशेन्मल्लसभासदः ॥ ३८ ॥

---

[1] घेतलेल्या सोंगाप्रमणें. [2] संकुचित झालों.

॥ टीका ॥ आह्मी वत्सप गोपगडी ॥ नेणों मल्लविद्येच्या विकडी[1] ॥ द्वंद्वयुद्ध यथाआवडी ॥ समान जोडी क्रीडतसों ॥ ३३ ॥ तैसेंचि येथें यथोचित ॥ तुल्यबळी जे आह्मांआंत ॥ तिहींसीं क्रीडों ते समस्त ॥ नृपासहित जन देखो ॥ ३४ ॥ तुह्मी बलिष्ठ महामल्ल ॥ आह्मी बाळकें तुह्मांतुल्य ॥ ह्मणवितां हा अधर्म केवळ ॥ लाहती सकळ सभासद ॥ ३५ ॥ ऐसें ऐकोनि कृष्णवचन ॥ भगवत्प्रताप वाखाणून ॥ चाणूर करी निराकरण तें सज्जन परिसतू ॥ ३६ ॥

चाणूरउवाच ॥ नबालोनकिशोरस्त्वंबलश्चबलिनांवरः ॥लीलयेभोहतोयेनसहस्रद्विपसत्वभृत् ॥३९ ॥

॥टीका॥ चाणूर ह्मणे वासुदेवा ॥ बालक न होसी तूं केशवा ॥ पौगंड किशोर वयसा सर्वा ॥ तव गौरवा नशोभती ॥ ३७ ॥ सर्व बलिष्ठांमाजी वरिष्ठ ॥ बलराम हा परम श्रेष्ठ ॥ द्वंद्वयुद्धा मल्लवाट ॥ सर्व कनिष्ठ तुह्मांपुढें ॥३८॥ ऐसें नमनाल जरी केवळ॥ तरी सहस्र गजांचें ज्यासी बळ ॥ तो कुवलयापीड सपाळ[2] ॥ लीलेकरूनि निवटिला ॥ ३९ ॥ यालागीं वयाची तुल्यता ॥ अयोग्य तुह्मांसी पाहतां ॥ बळप्रतापाची समता ॥ जाणोनि भिडतां निर्दोष ॥ ४० ॥

तस्माद्भवद्भ्यांबलिभिर्योद्धव्यंनानयोऽत्रवै ॥ मयिविक्रमवार्ष्णेयबलेनसहमुष्टिकः ॥ ४० ॥

॥ टीका ॥ तस्माद्बळिष्ठीं तुह्मांसीं ॥ युद्ध करितां अधर्मासी ॥न मिळे नीति जाणोनि ऐसी॥ द्वंद्वयुद्धासी करावें ॥ ४१ ॥ ऐकें वृष्णिकुळसंभवा ॥ तूं सांवरीं माझा यावा[3] ॥ बळभद्रेंसिं द्वंद्वभावा ॥ मुष्टिक रंगीं झगटेल

---

१ चातुर्यें. २ महातामुद्धां. ३ आवेश.

॥ ४२ ॥ ऐसें चाणूराचें वचन ॥ ऐकोनियां श्रीभगवान् ॥ परमोत्साहें करूनि मान्य ॥ द्वंद्वयुद्ध करील॥४३॥
पुढिले अध्यायीं ते कथा ॥ शुक कथील अभिमन्युसुता ॥ तद्व्याख्यानीं सप्रेम श्रोतां ॥ दीजे तत्वता अवधान
॥ ४४॥ श्रीएकनाथ प्रतिष्ठानीं ॥ कैवल्य साम्राज्याचा दानी ॥ चिदानंदाचिये भुवनीं ॥ स्वानंद सज्जनीं भोगिजे
॥ ४५ ॥ तेथें गोविंदनामस्मरणें ॥ भवभ्रमाचें दूरी करणें ॥ प्राणिमात्रीं उद्धरणें ॥ पादसेवनें प्रभूच्या ॥ ४६
तत्पादोदकगोदावरी ॥ संप्राप्त पिपीलिकापुरीं ॥ ओघें दयार्णवामाझारी ॥ भक्तिप्रेमें सांठविली ॥ ४७ ॥ तज्जल
श्रीमद्भागवत ॥ अठरासहस्रसंख्यागणित ॥ भक्तिरहस्य शुकप्रणीत ॥ जालें प्राप्त नृपासी ॥ ४८ ॥ दशमस्कंध
हा तयांतील ॥ अवलोकुनी शुकाचे बोल ॥ वाखाणिला ते कल्लोळ ॥ हरिवरदाचे दयार्णवीं ॥ ४९ ॥
श्रवणपानें पठनाचमनें ॥ मननिदिध्यासमज्जनें ॥ साक्षात्कारोपलब्धपुण्यें ॥ शीतळ होणें सबाह्य ॥ ५० ॥
इतिश्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहस्यांसंहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायां
दवार्णवानुचरविरचितायांकुवलयापीडसहस्तिपमर्दनरंगप्रवेशनभगवच्चाणूरसंवादोनामत्रिचत्वारिंशत्तमोऽध्यायः
॥ ४३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्लोक ॥ ४० ॥ ओंव्या ॥ २५० ॥ एवं संख्या २९० ॥ संपूर्णमस्तु॥

मुंगीपैठणपुरीमध्यें. २ मोठ्या लाटा.

अध्याय ४४.

ये अध्यायीं मल्लसहित॥ सबंधु कंसाचा निःपात॥ तद्वनितांसि करूनि शान्त॥ भेटेल अच्युत पितरांसी॥ ३०॥



श्रीगणेशाय नमः ॥ ॥उत्पथ[1]मथना सत्पथकथना ॥नमो गोविंदा शतपथ[2]ग्रथना॥ स्वप्रबोधें दुष्पथ[3]व्यथना ॥दुर्मदन[4]थना श्रीनाथा ॥ १ ॥ निर्गुण केवळ परब्रह्म ॥ लीलारोळ प्रणवोद्गमं[5] ॥ तन्निश्वासजनितनिगम ॥ नाद[6]ब्रह्मध्वनिरूप ॥ २ ॥ शुद्धसत्वात्मक परमात्मा ॥ महाविष्णु ईश्वरनामा ॥ सर्वज्ञ सर्वकर्तृत्वकामा ॥ सज्य होय स्वयंभ ॥ ३ ॥ तेथींचा जो ज्ञानांकुर ॥ छंदोमय सुपर्ण[7]ाकार ॥ मात्रास्वरवर्णोच्चार ॥ कार्तस्वर[8]मयपक्षी ॥ ४ ॥ जैसा मूळींचा अनाहत[9] ध्वनि ॥ तेंवि अशिल्पवर्णसुपर्णी ॥ स्वयंभसुवर्णमय तद्वानीं ॥ गमनागमनीं प्रवृत्ति ॥ ५ ॥ छंदोगामी तो विष्णुरथं[10] ॥ बृहत्सामें सामगीत ॥ हा सामवेदींचा संकेत ॥ श्रुति विपश्चितं[11] जाणती ॥ ६ ॥ पूर्णकाम प्रणवाकार ॥ स्वयंभ अनाहत निगमोच्चार ॥ पुढें प्रवृत्ति तदनुसार॥गुणव्यापार ययापूर्व॥७॥ प्रथमसमष्टिजीव विधि॥ जो कां आदिपुरुषाची बुद्धि ॥ प्रभु तयातें निगम बोधी॥वर्णप्रसिद्धि अनुच्चरित॥८॥जैसा जलबिंदूचा रस ॥ अव्यक्त विदित हा सर्वांस ॥ गर्भी मुसावे[12] व्यक्त पुरुष ॥ तेंवि विखनस[13]श्रुतिबोधीं ॥ ९ ॥ तेथूनि मात्रावर्णस्वर ॥ जिह्वा टाळू ओष्ठव्यापार ॥ उदात्त अनुदात्त सवनोच्चार ॥ छंदाकार प्रवृत्ति ॥ १० ॥ मग वि-

---

[1] वेदोक्त मार्ग सोडून स्वैरै वर्तणाऱ्या लोकांचें मर्दन करणारा. [2] शतपथ ब्राह्मणनामक ग्रंथ रचणारा. [3] कुमार्गवर्तिजनास पीडा करणारा. [4] उन्मत्तजनांचा नियामक. [5] प्रणव ह्म० ॐकार ह्म० ब्रह्मरूप,त्याचाउद्गम ह्म०प्रकाश. [6] नादरूपानें इंद्रियगोचर झालेलें ब्रह्म. [7] गरुडाकार. [8] स्वर्णमय. [9] अखंड. [10] गरुड. [11] पंडित. [12] एकत्र होतो. [13] ब्रह्मदेव.

रंचि अध्यापक ॥ छात्र महर्षि मरीचिप्रमुख ॥ पारंपर्योक्त[1] निगमघोक ॥ मार्ग सम्यक श्रुतिप्रणीत ॥ ११ ॥
तो उल्लंघूनि निगमपथ ॥ स्वैर वर्तती जे उत्पथ ॥ तन्निग्रहणीं तूं समर्थ ॥ निजात्मस्वार्थ प्रकटूनी ॥ १२ ॥
उत्पथें[2]।विषयांची प्रवृत्ति ॥ अनावर हे जीवांप्रति ॥ बलात्कारें प्रवर्तती ॥ निगमपद्धति लंघूनी ॥ १३ ॥
ऐसे उत्पथ अधःपाती ॥ धरूनि विषयांची आसक्ति ॥ श्रुतिविरोधीं प्रवर्तती ॥ तन्मथनार्थी अवतरसी ॥ १४ ॥
विषयप्रवृत्ति सोडवावया ॥ पूर्वमीमांसा बोधूनि तयां ॥ त्रैविद्यात्मक यज्ञक्रिया ॥ आणिसी आया[3] श्रुति ह्मणती १५
विषयसेवनें विषयविराग ॥ बोधूनि श्रुतिप्रणीत सन्मार्ग ॥ तद्रोचनीं उभय भोग ॥ निषिद्धत्याग नरकभयें १६ ॥
ऐसे सत्पथीं निरत होतां ॥ वेदोत्तमांग[4] प्रतिपादिता ॥ होऊनि छेदिसी समूळ द्वैता ॥ एकात्मता प्रकटूनी ॥ १७ ॥
विषयासक्ति देहात्मता ॥ सुकृतासक्ति जीवात्मता ॥ उभय निरासीं एकात्मता ॥ कथिसी सत्पथा माजिवडी ॥ १८
एवंपद्धतिअनुक्रमकथना ॥ गिरागौरवें शतपथग्रथना ॥ करूनि प्रबोधें गोगोपना ॥ निजात्मशरणा उद्धरिसी ॥ १९ ॥
ऐसिया शतपथक्रमपद्धति ॥ रोचनार्थ जे फळश्रुति ॥ तन्निष्ठ धरूनियां आसक्ति ॥ देहाहंकृति दृढ केली ॥ २० ॥
जारण मारण उच्चाटन ॥ स्तंभन मोहन वशीकरण ॥ छलन कीलन विद्वेषण ॥ श्रुतिप्रमाणें दृढ करिती ॥ २१ ॥
कामी वामी कौळाचारी ॥ आगमाश्रयें विषयभरीं ॥ ऐसे दुष्पथी संसारी ॥ नरकीं अघोरीं पचविसी ॥ २२ ॥
आसुरींयोनिमापन्ना ॥ अनेक जन्म गर्भयातना ॥ दुष्पथी भोगिती हें अर्जुना ॥ कथिलें स्वमुखें श्रीकृष्णें ॥ २३ ॥
श्रुतिप्रामाण्यें दुष्पथगामी ॥ ऐसे पीडिसी जन्मोजन्मीं ॥ इहामुष्मिक उभयकामी ॥ दुर्मद नियमीं नाथिसी ॥ २४ ॥

---

[1] शिष्यपरंपरेनें उच्चारिलेला. [2] दुर्मार्गास प्रवृत्त करणारे. [3] आकाराला. [4] वेदान्तशास्त्र.

दुर्मद कर्मठ पूर्वपक्षी॥नाकीं वेसणी घालूनि त्यांसी ॥ गुरुत्वें आणूनि सन्मार्गांसी॥बळें पाजिसी चिंत्सुधा[1]
॥ २५ ॥तो हा उत्पथ कंसासुर ॥ वांचवावया स्वशरीर ॥ धर्मभंगें अनाचार ॥ कर्ता अघोर दुष्टात्मा॥२६॥
त्याची छेदावया दुर्मति ॥ स्वयें येऊनि मथुरेप्रति ॥ मल्लरंगीं बळश्रीपति ॥ करिती ख्याति प्रतापें ॥ २७॥
तेथ त्रेताळिसाव्या अंतीं॥स्वमुखें चाणूरें केली विनति ॥ मजसीं तुल्य श्रीपति॥ मुष्टिकाप्रति बळ योद्धा॥२८॥
यावरी पुढें वर्तलें काय॥तये कथेचा अभिप्राय ॥ परिसावया उत्तरातनय ॥ सादर देखोनि मुनि बोले ॥ २९ ॥
ये अध्यायीं मल्लेंसहित ॥ सबंधुकंसाचा निपात॥तद्वनितांसी करूनि शान्त ॥ भेटेल अच्युत पितरांसी ॥ ३० ॥

श्रीशुकउवाच॥एवंचर्चितसंकल्पोभगवान्मधुसूदनः ॥ आससादाथचाणूरंमुष्टिकंरोहिणीसुतः॥ १ ॥

॥टीका॥जैसा संकल्प अंतःकरणीं॥तैसाचि चाणूरवदनें करूनी ॥ कृतनिश्चयें चक्रपाणि ॥तन्निग्रहणीं[2] प्रवर्तला॥ ३१
भुजा ठोकोनि सम्यक ॥ जाला चाणूर सम्मुख ॥ तें देखोनि रोहिणीतोक॥रंगीं मुष्टिक पाचारी ॥ ३२ ॥
दाक्षिणहस्तें घेऊनि माती ॥ मर्दूनियां उभयहस्तीं ॥ बळें अधरोष्ठ चावूनि दांतीं ॥करीं आंसुडिती परस्परें॥३३॥

हस्ताभ्यांहस्तयोर्बध्वापद्भ्यामेवचपादयोः ॥ विचकर्षतुरन्योन्यंप्रसह्यविजिगीषया ॥ २ ॥

॥टीका॥हस्तीं पडे नपडे मिठी॥तंव ते आंसुडिती जगजेठी॥चांचरी जातां धरापृष्ठीं॥उठाउठीं सांवरिती॥ ३४॥
पडतां मणिबंधांसि[3] मिठी॥बळें सोडविती चिकाटी ॥ चरणें चरणांसी घालूनि आंटी ॥ दाटोदाटीं रेंटिती ॥ ३५॥
बलात्कारें आंसुडिती ॥ अंगप्रौढी झिंझाडिती ॥ एकमेकांतें ओढिती ॥ तळीं पाडिती परस्परें ॥ ३६ ॥

---

[1] ज्ञानामृत. [2] त्या चाणूराच्या नाशाविषयीं. [3] मनगटाला.

पृष्ठी शिवे नशिवे मही ॥ तंव चमत्कारें उसळती पाहीं ॥ मल्लविद्येची नवाई ॥ दाविती देहीं प्रतापें ॥ ३७ ॥
परस्परें जिंकावया ॥ कर्षिती हाका देवूनियां ॥ द्वंद्वयुद्धाचिया क्रिया ॥ दाविती राया उत्साहें ॥ ३८ ॥
हा हा ह्मणोनि दीर्घस्वरीं ॥ हुंकारिती मेघगजरीं ॥ हिरण्यकशिपूचिये समरीं ॥ नर[1]केशरी जेंवि गर्जे ॥ ३९ ॥

अरत्नीद्वेअरत्नीभ्यांजानुभ्यांचैवजानुनी ॥ शिरःशीर्ष्णोरसोरस्तावन्योन्यमभिजघ्नतुः ॥ ३ ॥

॥टीका॥तर्जनी अंगुष्ठ उभयसंधि॥मिठ्या घालूनि वज्रबंदी॥आंसुडिताती द्वंद्वयुद्धीं ॥विजयसिद्धिसाधना॥४०॥
अरत्नि[2] ह्मणिजे समुष्टिहस्त ॥ कूर्परघातें करिती खस्त ॥ जानुप्रहार करिती व्यस्त ॥पदविन्यस्त चापल्यें॥४१॥
मल्लविद्येच्या कुसरी ॥ थडका हाणिती उरीं शिरीं ॥ दंतपातनें चपेटप्रहारीं ॥ हु[3]मण्या निकरीं मारिती ॥ ४२ ॥
लत्ताप्रहार मेढ्र[4]स्थानीं ॥ ऊरु भंगिती हाणूनि पार्ष्णी[5] ॥ गुल्फप्रहाराचिया हननीं॥पडती नयनीं झांपडिया॥ ४३॥

परिभ्रामणविक्षेपपरिरंभावपातनैः ॥ उत्सर्पणापसर्पणैश्चान्योन्यंप्रत्यरुंधताम् ॥ ४ ॥

॥टीका॥करांगुळी बलात्कारीं॥परस्परें कवळूनि करीं ॥ सव्यदक्षिणावर्त फेरी॥देती भंवरी परस्परीं ॥ ४४ ॥
एकमेकां क्षोभविती ॥ सिंहनादें गर्जताती ॥ साटोप धरूनि उफाळती ॥ हिणाविती सरोष ॥ ४५ ॥
बळें देती किंकाळिया ॥ भंवत्या मल्लांच्या आरोळिया ॥नागर जनांच्यां टाळिया॥बाहुस्फालनें उभयत्र॥ ४६ ॥
बाहुपृष्ठीं ऊरु टिरी ॥ चपेटे ठोकूनि परस्परीं ॥ क्षोभविती हुंकारगजरीं ॥ उरीं शिरीं थडकिती ॥ ४७ ॥
कर आंसुडोनि कवळिती कैंवा[6] ॥ सुहृद स्नेहाळ जैसें खेंवाँ[7] ॥मिथा प्रपातनाचिया हांवा॥दशनीं अधर रगाडिती ॥ ४८

---

१ नरसिंह. २ कोंपरापासून करांगुळा पर्यंत जो हस्ताचा भाग तो. ३ टकरा. ४ गुह्यस्थानीं. ५ टांचा. ६ मिठीच्यायोगानें. ७ आलिंगनानें.

मिथा शरीरें कवळूनि बळें ॥ निकरें चेंपिती जीवनकळे[1] ॥ आंसडूनि[2] पाडितां शरीर आदळे ॥ सवेंचि उफाळें उसळती ॥ ४९ ॥
एकमेकां आपटिती भूमी ॥ मिथा समानपराक्रमी ॥ निधे उमटताती व्योमीं ॥ विजयकामी उभयत्र ॥ ५० ॥
अवचट सुटतां शरीरामिठी ॥ चढोनि जाती एक जगजेठी ॥ अपर मागां सरती हट्टी ॥ नेदूनि पाठी समरंगीं ॥ ५१ ॥
पाउलें मात्र टाकिती मागें ॥ सिंतरों[3] पाहती कृतांतवेगें ॥ सक्रोध दृष्टी लक्षूनि आंगें ॥ लागवेगें आंसुडिती ॥ ५२ ॥
एकमेकांचे घ्यावया प्राण ॥ ऐसे करिती गात्रें भग्न ॥ विक्रमशक्तीचें धरूनि त्राण ॥ युद्ध दारुण नसंडिती ॥ ५३ ॥

उत्थापनैरुन्नयनैश्चालनैःस्थापनैरपि ॥ परस्परंजीगीषंतावपचक्रतुरात्मनः ॥ ५ ॥

॥ टीका ॥ भूमी पाडूनि वीरवाट[4] ॥ मुरडूनि करपद करिती मोट ॥ बळें उचलिती जैसे घट ॥ नेती मुकुटपर्यंत ॥ ५४ ॥
अयस्कार[5] निजव्यापारीं ॥ लोह ठोकी घनप्रहारीं ॥ तैसे आदळिती भूमीवरी ॥ गात्रें चकचुरी करावया ॥ ५५ ॥
वरुणपाशांसमान कंठीं ॥ निकरें घालिती वज्रमिठी ॥ तीतें उखळिती जगजेठी ॥ दशनें[6] ओष्ठीं रगडूनी ॥ ५६ ॥
चरणें चरणां घालूनि आढी ॥ हृदय कवळूनि बाहुप्रौढी ॥ भूमीं पाडूनि करपद मोडी ॥ निर्मूनि घडी स्थापिती ॥ ५७ ॥
एवं मिथा जिकावया ॥ शरीरें भंगिती कौरवराया ॥ हें देखूनि नागरीजाया ॥ कृपे द्रवलिया बोलती ॥ ५८ ॥

तद्बलाबलवद्युद्धंसमेताःसर्वयोषितः ॥ ऊचुःपरस्परंराजन्सानुकंपावरूथशः ॥ ६ ॥

॥ टीका ॥ पुरपुरंध्री[7] परस्परें ॥ ठायीं ठायीं निकरनिकरें ॥ बोलती तें सदयोत्तरें ॥ उत्तरोत्तरें परिसावीं ॥ ५९ ॥

---

[1] मर्मस्थानीं. [2] परिभ्रमणाच्या योगानें. [3] झकवूं पाहती. [4] वीरसमूह. [5] लोहार. [6] दांत. [7] पतिपुत्रवती स्त्रिया.

जेवीं मदगज गोवत्सेंसीं ॥ कीं द्विजकुमार राक्षसेंसीं ॥ तेंवि लेंकुरें महामल्लासीं॥द्वंद्वयुद्धासीं मिसळले ॥ ६० ॥
ऐसें सबळां अबळां युद्ध ॥ देखोनि ह्मणती हा प्रमाद ॥ महा अन्याय धर्मरोध[1] ॥ अधर्म प्रसिद्ध ये ठायीं ॥६१॥

महानयंबताधर्मएषांराजसभासदाम् ॥ येबालबलवद्‌युद्धंराज्ञोऽन्विच्छंतिपश्यतः॥७॥

॥ टीका ॥ महा अन्याय ह्मणति नारी ॥ राजसभासदांचे शिरीं ॥अबळां बलिष्ठां योजूनि समरीं ॥पाहती नेत्रीं
कौतुक ॥ ६२ ॥ अबळां बलिष्ठां युद्ध प्रबळ ॥ नृपें वारिजे तें तत्काळ ॥ तोचि झालिया अधर्मशीळ ॥ सवेग
काळ त्या ग्रासी ॥ ६३ ॥ येथ अन्याय सभास्थानीं ॥ बाळां बळिष्ठां समरांगणीं ॥ युद्धीं योजूनि पाहती नयनीं॥
परि अधर्म कोणी नमनिती ॥ ६४ ॥ परी हें नमने ईश्वरासी ॥ अन्याय रुचला भोजेंद्रासी ॥ याचें फळ येचि
दिवसीं ॥ भोगील ऐसी जनचर्चा ॥ ६५ ॥ ह्मणाल अन्याय कैसा येथ ॥ तरी पाहती सदस्य सभानाथ ॥
होवोनियां विचाररहित ॥ युद्धवृत्तांत तो ऐका ॥ ६६ ॥

क्ववज्रसारसर्वांगौमल्लौशैलेंद्रसन्निभौ ॥ क्वचातिसुकुमारांगौकिशोरौनाप्तयौवनौ ॥ ८ ॥

॥टीका॥चाणूर मुष्टिक महामल्ल॥वज्रांगकठोर मंदरतुल्य ॥ मल्लविद्येचें कौशल्य॥तनुचापल्य अभ्यस्त॥६७ ॥
क्रूरप्रतापी महादुर्घट ॥ युद्धीं अनेक जिंकिले वाटे[2] ॥ नभंगे समरीं धारिष्ट ॥ महाधीट कोणीकडे ॥ ६८ ॥
कोणीकडे महा लेंकुरें ॥ कोमळांगें नवनीताकारें ॥ आंगीं नाहीं तारुण्यवारें ॥ त्यांसीं निकरें[3] हें युद्ध ॥ ६९ ॥
धर्मलंघन याचेंचि नांव ॥ सभासदां हा अधर्म ॥ भल्यांहीं ऐसें देखतां विषम ॥ दुर्लभ क्षेम[4] ते ह्मणती ॥७० ॥

---

१ मर्मास घातक. २ समुदाय. ३ आवेशानें. ४ कल्याण.

धर्मव्यतिक्रमोह्यस्यसमाजस्यध्रुवंभवेत् ॥ यत्राधर्मःसमुत्तिष्ठेन्नस्थेयंतत्रकर्हिचित् ॥ ९ ॥

॥टीका॥अधर्म जये सभास्थानीं॥तेथ बैसों नये सज्जनीं॥उठोनि जावें झडझडोनी॥बैसतां हानि सर्वस्वें ॥ ७१॥

नसभाप्रविशेत्प्राज्ञःसभ्यदोषाननुस्मरन् ॥ अब्रुवन्विब्रुवन्नज्ञोनरःकिल्बिषमश्नुते ॥ १० ॥

॥टीका॥सभ्यांसहित सभानाथ॥अधर्मरूपी असती जेथ॥प्रज्ञावंतीं नवचिजे तेथ॥अन्याय तत्कृत स्मरोनी ॥७२
प्रवेशतां तें सभास्थान ॥ जाणोनि भिडेनें धरितां मौन ॥ होय अधर्मसंक्रमण[1] ॥ श्रेष्ठा लागून तद्योगें ॥ ७३ ॥
अज्ञान होवोनि नकळे ह्मणतां ॥ तथापि दूषण बैसे माथां ॥ यालागीं भल्यांहीं आपुल्या स्वार्था ॥ दुष्टसभे नवचावें॥७४
उभयपक्षें दोषसंचार ॥ यालागीं अधर्मसभागार[2] ॥ सांडूनि सज्जनीं साचार ॥ अतिसत्वर निघावें ॥ ७५ ॥
पृथक्समुदायीं परस्परीं ॥ ऐशा बोलती एकी नारी ॥ तंव आणखी सदयोत्तरीं ॥ वदती सुन्दरी तें ऐका ॥ ७६ ॥

वल्गतःशत्रुमभितःकृष्णस्यवदनांबुजम् ॥ वीक्ष्यतांश्रमवार्युप्तंपद्मकोशमिवांबुभिः ॥ ११ ॥

॥टीका॥पहा सखियाहो कौतुक ॥ शत्रुजयार्थ नंदतोक ॥ आवेशें प्रयत्नपूर्वक ॥ झोंबे सम्यक चहूंकडूनी॥७७॥
अभितः ह्मणिजे सर्वांकडूनी ॥ शत्रु आकळी चक्रपाणि॥ तेणें [3]श्रमांबु उमटलें वदनीं ॥ जेंवि जीवनीं अब्जकळिका ७८

किन्नपश्यतरामस्यमुखमाताम्रलोचनम् ॥ मुष्टिकंप्रतिसामर्षहाससंरंभशोभितम् ॥१२ ॥

॥ टीका ॥ कां न पहा रामवदन ॥ आवेशें आरक्त लोचन ॥ मुष्टिकातें दटावून ॥ शोभायमान सस्मित ॥ ७९॥
अधर चावूनि उभय रदनीं ॥ अभंग प्रताप मल्लकदनीं ॥ वीरलक्ष्मी सस्मितवदनीं ॥ पाहतां सज्जनीं धणी[4] नपुरे॥८०

---

[1] अधर्ममार्गानें संचार. [2] सभास्थान. [3] घाम. [4] इच्छा.

पुण्याबतव्रजभुवोयदयंन्नृलिंगगूढःपुराणपुरुषोवनचित्रमाल्यः ॥
गाःपालयन्सहबलःक्वणयंश्चवेणुंविक्रीडयांचतिगिरित्ररमार्चितांघ्रिः ॥ १३ ॥

॥टीका॥तंव अन्यवनिता ह्मणती बाई॥पुण्यवंत हे व्रजींची भोई॥ज्या कारणास्तव इये ठायीं॥शेषशायी अवतरला८१
पुराणपुरुष[1] जो श्रीपति ॥ घेवूनि नरदेहाची बुंथी ॥ आच्छादूनि ऐश्वर्यशक्ति ॥ गोपाकृति नटलासे ॥ ८२ ॥
विचित्र वनसंभवें सुमनें ॥ कंठीं मुकुटीं कृतभूषणें ॥ क्रीडे सहित संकर्षणें ॥ गोधनें रक्षित होत्साता ॥ ८३ ॥
वेदव्याख्यानीं जो प्रवीणु ॥ स्वयें अध्यापी कमलासनु ॥ तो येथ धरूनि प्रणव वेणु ॥ करी क्वणन निजवदनें ॥८४॥
गिरीश धरूनि कपि आकृति ॥ रमा होवोनि सीता सती ॥ ज्याचे पादाब्ज अर्चिती ॥ तो गोपति गोगोप्ता ॥ ८५॥
ऐशा धन्य व्रजींच्या भूमी ॥क्रीडतां निवती श्रीपादपद्मीं ॥ धिग् धिग् निर्दैवा पैं आह्मी ॥ देखों श्रमीं समरंगीं॥८६॥
सभासदस्य[2] अन्यायपर ॥ नकरिती बळाबळविचार ॥ बाळांसमान मल्लक्रूर ॥ करितां धिक्कार समस्तां ॥ ८७ ॥
बळिष्ठ मल्ल बाळांवरी ॥ घालूनि निग्रहूं पाहती समरीं॥ धिग्धिग् ऐसे सभाधिकारी॥ पडती अघोरीं महानरकीं ॥८८
तंव येरी ह्मणती आमुचें पुण्य॥परम अल्प साधारण ॥ यास्तव अनवसरीं[3] कृष्ण ॥ आमुचे नयन विलोकिती॥ ८९॥
पैल गोपींचीं महा तपें ॥ पुण्यें नुमाणवतीच[4] मापें ॥ जिहीं श्रीकृष्ण क्रीडाकल्पें ॥ यथासंकल्पें सेविला॥ ९० ॥
ऐसी वामदृशांची[5] ग्लानि ॥ गोपी सभाग्यहरिक्रीडनीं ॥ श्लोकत्रयें बादरायणि ॥ नृपा लागूनि निरूपी॥ ९१ ॥

गोप्यस्तपःकिमचरन्यदमुष्यरूपंलावण्यसारमसमोर्ध्वमनन्यसिद्धम् ॥
दृग्भिःपिबंत्यनुसवाभिनवंदुरापमेकांतधामयशसःश्रियऐश्वरस्य ॥ १४ ॥

---

१ ब्रह्मरूप ईश्वर. २ सभासद. ३ अवेळीं. ४ न मोजवती. ५ स्त्रियांची.

॥ टीका॥कायआचरल्या गोपी तपें॥तया पुण्याच्या साक्षेपें ॥लक्ष्मी वेधिली जया रूपें॥तें ज्या सोपें विलोकिती
॥९२॥अनंतकोटिकंदर्पकांति॥कुरवंडूनि टाकिजे परती॥तें लावण्यसार कृष्णाकृति॥गोपी प्राशिती निजनयनें ९३ ॥
ब्रह्मांडसंदोहां[1] माझारी ॥ लावण्यसमता कोणी नकरी ॥ तेथ अधिक लावण्यपरी ॥ वदतां वैखरी सलज्ज ॥ ९४
अलंकारें लावण्य विविध॥त्यासी बोलिजे अन्य सिद्ध॥ऐश्वर्यलक्ष्मी जे स्वतः सिद्ध ॥ तें धाम प्रसिद्ध अनन्य ॥ ९५ ॥
एवं आभरणांवांचून ॥ ज्याचें लावण्य शोभायमान ॥ त्रिजगीं ऐश्वर्य शोभवी पूर्ण ॥ गोपीनयन प्राशिती तें ॥ ९६ ॥
मधुप मधुपानें उन्मत्त ॥ लावण्यामृत नूतन नित्य ॥ प्राशितां गोपीनयन मत्त ॥ पूर्णसुकृत यास्तव तें ॥ ९७॥
यशःश्रीचें एकांतधाम ॥ ब्रह्मादिकांसि दुर्लभ परम ॥ तो लावण्यसुखसंभ्रम ॥ गोपी निःसीमें[2] भोगिती ॥ ९८॥
कैसकैश्या कोणे समयीं ॥ कोण क्रीडा कोणे ठायीं ॥ कैसी लावण्यसुखनवाई ॥ भोगिती तेंही अवधारा ॥ ९९ ॥

यादोहनेवहननेऽमथनोपलेपप्रेंखेंखनार्भरुदितोक्षणमार्जनादौ ॥
गायंतिचैनमनुरक्तधियोऽश्रुकंठ्योधन्यावृजस्त्रियउरुक्रमचित्तयानाः ॥ १५ ॥

॥टीका॥व्रजास्त्रिया ज्या दोहनकाळीं॥लावण्यरूपी श्रीवनमाळी॥आठवूनियां हृदयकमळीं॥गाती स्नेहाळी तच्छंदें १००
दोहनपात्रीं वाजती धारा ॥ सानुरागें जगदुद्धारा ॥ गाती तच्छंदें सुन्दरा ॥ पुण्यें सधरा[3] व्रजरामा ॥ १ ॥
एकी करितां कणकंडना ॥ सप्रेम गाती मधुसूदना ॥ एकी करितां दधिमंथना ॥ गाती कृष्णा अनुरक्ता ॥ २ ॥
एकी सारवितां स्वसदनें ॥ हरिगुण गाती सप्रेमवदनें ॥ एकी हालविती पाळणे ॥ कृष्णगायनें रंगोनी ॥ ३ ॥

---

१ समूह. २ अमर्याद. ३ अधिक आश्रययुक्त.

लेंकुरा बुझाविते[1] अवसरीं ॥ वदनीं गाती कैटभारि ॥ सडासंमार्जन करितां घरीं ॥ पूतनारि वधू गाती ॥ ४ ॥
गातां अनुरागें मुकुन्द ॥ सबाह्य पावती परमानंद ॥ अनेक जन्मींचा विसरती खेद ॥ तो आह्लाद विधि नेणे ॥ ५ ॥
बुद्धि रंगल्या कृष्णगुणीं ॥ आनंदाश्रु स्रवती नयनीं ॥ धन्य धन्य त्या व्रजकामिनी ॥ कृष्णाचिंतनीं अनुरक्ता ॥ ६ ॥
विशाळ ज्याचा पदविन्यास ॥ उरुक्रमनामें[2] बोलिजे त्यास ॥ त्रिविक्रम तो हृषीकेश ॥ व्रजवनितांस सुखसेव्य ॥ ७ ॥
चित्तें रंगल्या उरुक्रमीं ॥ ह्मणूनि नबाधी संसारऊर्मी ॥ धन्या व्रजवधू बर्ततां धामीं ॥ तें नदेखों आह्मी दुर्भाग्यें ॥ ८ ॥
आणखी ह्मणती अहोरात्र ॥ नित्यनूतन कृष्णचरित्र ॥ सादर पाहती त्यांचे नेत्र ॥ तेंही समग्र अवधारा ॥ ९ ॥

प्रातर्व्रजाद्व्रजतआविशतश्चसायंगोभिःसमंक्वणयतोऽस्यनिशम्यवेणुम् ॥
निर्गम्यतूर्णमबलाःपथिभूरिपुण्याःपश्यंतिसस्मितमुखंसदयावलोकम् ॥ १६ ॥

॥टीका॥ प्रभाते थापटोनि यशोदा ॥ जागृत करी श्रीमुकुन्दा ॥ सालंकृत सिदोरी खांदां ॥ सुरभिवृंदा समवेत ॥ १०
ससंकर्षणगोपमेळीं ॥ बेणुक्वणनें प्रयाणकाळीं ॥ मिरवत घनतनु सांवळी ॥ व्रजमंडळी आनंदवी ॥ ११ ॥
ऐकोनियां तें वेणुक्वणन ॥ गोपीसमूह सांडूनि सदन ॥ व्रजपुराबाहीर धांवून ॥ नयन भरून विलोकिती ॥ १२ ॥
विशाळ पुण्याचिया कोटी ॥ असती व्रजवनितांचे गांठी ॥ यास्तव सादर पाहती दृष्टी ॥ हरि जगजेठी जगदात्मा ॥ १३
आकर्ण नयन सास्मितमुख ॥ विशाळ भाळ सरळ नासिक ॥ कृपाकटाक्ष सदयावलोक ॥ पाहती सम्यक कृतपुण्यें ॥ १४ ॥
आह्मी अभाग्या अल्पपुण्या ॥ यास्तव कृष्णा संकर्षणा ॥ मल्लनिग्रहणीं आमुच्या नयनां ॥ दावितां करुणा विधि नुधवे १५

---

१ समजाविते वेळीं २ मोठी आक्रमणशक्ति ज्याची तो.

ऐशा समस्त पुरपुरंध्री[१] ॥ सखेद वदतां परस्परीं ॥ अंतरवेत्ता श्रीमुरारि ॥ कौतुक करी तें ऐका ॥ १६ ॥

एवंप्रभाषमाणासुस्त्रीषुयोगेश्वरोहरिः ॥ शत्रुंहंतुंमनश्चक्रेभगवान्भरतर्षभ ॥ १७ ॥

॥टीका॥सदयस्त्रियांचें अंतर॥द्रवलें जाणोनि योगेश्वर ॥ करावया शत्रुसंहार॥मनोव्यापार[२] अवलंबी ॥ १७ ॥
षड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ साक्षात् श्रीहरि भगवान् ॥ निववावया अभिरतजन ॥ शत्रुनिग्रहण आदरी ॥ १८ ॥
भरतवंशीं श्रेष्ठ पूर्ण ॥ भरतर्षभ त्या संबोधन ॥ देता झाला व्यासनंदन ॥ सादर देखोन श्रवणार्थी ॥ १९ ॥
ऐशा नगरवधूंच्या वाणी ॥ ऐकोनियां ननकजननी ॥ पुत्रभावना रामकृष्णीं ॥ स्नेहें द्रवोनि झळंबती ॥ २० ॥

सभायाःस्त्रीगिरःश्रुत्वापुत्रस्नेहशुचातुरौ ॥ पितरावन्वतप्येतांपुत्रयोरबुधौबलम् ॥ १८ ॥

॥टीका॥सभयोत्तरीं नागरवामा॥स्नेहें कवळिती कृष्णरामा॥जननीजनकें हृदयपद्मा॥माजी ऐकोनि दचकलीं २१
पुत्रप्रताप विदित नाहीं ॥ ह्मणोनि शोकसंतप्त हृदयीं ॥ प्रकट रडों नलाहती पाहीं॥ अंतरीं लाहीसम फुटती॥ २२
ऐसी पितरांची अवस्था॥ आणि कळवळिल्या नागरवनिता॥हें जाणोनि मन्मथजनिता॥काय करिता झाला पैं॥२३ ॥

तैस्तैर्नियुद्धविधिभिर्विविधैरच्युतेतरौ ॥ युयुधातेयथाऽन्योन्यंतथैवबलमुष्टिकौ ॥ १९ ॥

॥टीका॥मल्लविद्येच्या कुसरी॥जाणे अवघ्या कैटभारि॥तिहीं तिहीं युद्धप्रकारीं ॥ समरीं श्रीहरि क्रीडला॥ २४ ॥
परप्रतापें नोहे च्युत ॥ यालागीं नामें तो अच्युत ॥ याहूनि इतर जो बळवंत ॥ तो मल्ल विख्यात चाणूर ॥ २५ ॥
जैसे भिडती चाणूरहरि ॥ बळमुष्टिक तयांचि परी ॥ द्वंद्वयुद्धाच्या कुसरी ॥ दावूनि समरीं आक्रमिती ॥ २६ ॥

---

१ नगरांतील स्त्रिया. २ विचार.

रामकृष्ण तूं ह्मणसी राया ॥ तुल्य मल्लेंसीं केलिया ॥ बाल्यें माल्यें समान काया ॥ कैंवि विजया आकळिती ॥ २७ ॥
तरी हें ऐसें सहसा नह्मण ॥ इंधनासमान कें कृशानं[1] ॥ अगस्ति ह्मणूंनये लहान ॥ उदधिजीवन प्राशितां ॥ २८ ॥

भगवद्गात्रनिष्पातैर्वज्रनिष्पेषनिष्ठुरैः ॥ चाणूरोभज्यमानांगोमुहुर्ग्लानिमवापह ॥ २० ॥

॥टीका॥षड्गुणैश्वर्यसंपन्न॥जरी गोपाकृति भगवान ॥ तथापि प्रतापें असाधारण ॥ गोपांसमान तो नोहे ॥ २९ ॥
पाषाणघातें ताडितां घटा॥तैं घटशकलांचा होय कुटा॥घटेंही ताडितां पाषाणगोटा॥ तरी घटाचि स्फोटा पावतसे॥ ३०
तैसें भगवद्गात्रावरी ॥ प्रहार करितां चाणूर समरीं ॥ तो श्रीभगवान वज्रशरीरी॥गात्र[2]बोहरी मल्लांची॥ ३१ ॥
वज्रनिष्ठुर भगवत्प्रहार ॥ लागतां मल्लांचें शरीर ॥ संधी संधी झालें चूर ॥ वाटे घोर तो समय ॥ ३२ ॥
स्वप्रहारीं भगवत्प्रहारीं ॥ चाणूर भग्नांग झाला समरीं ॥ क्षणक्षणां मूर्च्छा शरीरीं॥ नयनीं चंद्री लागतसे॥ ३३ ॥
पुन्हा अवलंबूनियां धीर ॥ ह्मणे हा समय महाक्रूर ॥ दांत खावूनि करी निकर ॥ नंदकुमर मारावया ॥ ३४ ॥
एकाचि घायें मारीन हरि ॥ ह्मणोनि सक्षोभ दीपापरी ॥ प्रज्वळिला तैंचि तूं अवधारीं ॥ कुरुकेसरी नृपनाथा ॥ ३५

सश्येनवेगउत्पत्यमुष्टीकृत्यकरावुभौ ॥ भगवंतंवासुदेवंक्रुद्धोवक्षस्यबाधत ॥ २१ ॥

॥टीका॥जैसा श्येन शकुंतहननीं[3]॥क्षोभें निःशंक धांवे गगनीं॥तैसा चाणूर मिसळला कदनीं॥वळूनि दोन्ही वज्रमुष्टी ३६
ज्याचें ऐश्वर्य अव्याहत ॥ तो भगवंत वसुदेवसुत ॥ त्याचे हृदयीं मुष्टिघात ॥ ओपी त्वरित चाणूर ॥ ३७ ॥
परी त्या नकरीच प्रतिकार ॥ वज्रनिष्ठुर मुष्टिप्रहार ॥ वक्षीं साहिले होवोनि सधर ॥ तो प्रकार अवधारा ॥ ३८ ॥

---

[1] अग्नि. [2] शरीराचा नाश. [3] पक्षिवधाविषयीं

नाचलत्तत्प्रहारेणमालाहतइवद्विपः ॥ बाह्वोर्निगृह्यचाणूरंबहुशोभ्रामयन्हरिः ॥ २२ ॥

॥टीका॥चाणूराचिया वज्रमुष्टि॥हृदयीं साहे स्वयें जगजेठी॥मेरु नचले जेंवि वृष्टि॥कीं महाकरटी पुष्पहननें॥३९
तैसा अचळ राहोनि हरि ॥ चाणूरमुष्टि साहोनि समरीं ॥ सवेग त्याचे बाहू धरी ॥ दोहीं करीं प्रतापें ॥ ४० ॥
बाहू धरूनि उचलिला गगनीं॥सव्य अपसव्य भवंडूनी॥विक्रम दाविला नागरां ननरीं॥तो तूं कुरुमणि अवधारीं४१

भूपृष्ठेपोथयामासतरसाक्षीणजीवितम् ॥ विस्रस्ताकल्पकेशस्रगिंद्रध्वजइवापतत् ॥ २३ ॥

टीका॥बहुधा भवंडूनि चक्रापरी॥सुभरें आपटिला भूमीवरी॥झाली गात्राची चकचुरी॥जयजयकारीं नभ गर्जे४२॥
प्राणाविरहित शरीर ॥ पडिलें विकराळ महाथोर ॥ बाबरझोंटी कंठींचे हार ॥ अलंकार विखुरले ॥ ४३ ॥
गौडदेशीं इंद्रध्वज ॥ उत्सव करिती जनसमाज ॥ विशाळ स्तंभ रोवूनि सहज ॥ करिती तद्ध्वजपताका ॥ ४४ ॥
वस्त्राभरणीं पुरुषाकृति ॥ अळंकारूनि आणिती व्यक्ति ॥ पतन पावे उत्सवांतीं ॥ चाणूर क्षिती तेंवि पडला ॥४५॥

तथैवमुष्टिकःपूर्वंस्वमुष्ट्याभिहतेनवै ॥ बलभद्रेणबलिनातलेनाभिहतोभृशम् ॥ २४ ॥

॥टीका॥तैसाचि अपर मुष्टिकनामा॥मुष्टिघातें हाणितां रामा॥येरें हस्तें वदनपद्मा॥निकरें अधमा ताडिलें ॥४६

प्रवेपितःसरुधिरमुद्वमन्मुखतोऽर्दितः ॥ व्यसुःपपातोर्व्युपस्थेवाताहतइवांघ्रिपः ॥ २५ ॥

॥टीका॥बलभद्राची ते चडकण॥लागतां व्याकुळ झाले प्राण॥निर्वाणमूर्च्छा दाटली पूर्ण॥गात्रकंपन विवशत्वें४७
भडभडां रुधिर वमी तोंडीं ॥ वळली भूतळीं मुरकुंडी ॥ प्राण जातां करपद खोडी ॥ नेत्र भवंडी वैरूप्यें

---

१ महाजग.

॥४८॥ चंडवातें वृक्ष उपडे ॥ तैसा पडला सभेपुढें ॥ मल्ल गजबजिले चहूंकडे ॥ कोणी पुढें हों नशके ॥ ४९ ॥

ततःकूटमनुप्राप्तंरामःप्रहरतांवरः ॥ अवधील्लीलयाराजन्सावज्ञंवाममुष्टिना ॥ २६ ॥

॥टीका॥ रामें मुष्टिक मारिल्यावरी॥ कूटनामा मल्ल समरीं॥ लोटला संकर्षणावरी॥ आंगीं वीरश्री बाणोनी ॥ ५० ॥
बाहू ठोकूनि ठकारें ठाके ॥ तंव वाममुष्टिप्रहारें एकें ॥ लीलेंकरून रोहिणीतोकें ॥ रंगभूमिके निजविला ॥ ५१ ॥

तर्ह्येवहिशलःकृष्णपदापहतशीर्षकः ॥ द्विधाविदीर्णस्तोशलकउभावपिनिपेततुः ॥ २७ ॥

॥टीका॥ तैसेचि दोघे महामल्ल॥ कृष्णावरी शलतोशल ॥ उठावले शलभतुल्य ॥ वीरश्री बहळ साटोपें ॥ ५२॥
कृष्णें वज्रलत्ताप्रहारीं ॥ मस्तक चूर्ण केलें समरीं ॥ अशुद्ध[1] वाहे धरणीवरी ॥ राममुरारी जयवंत ॥ ५३ ॥

चाणूरमुष्टिकेकूटेशलतोशलकेहते ॥ शेषाःप्रदुद्रुवुर्मल्लाःसर्वेप्राणपरीप्सवः ॥ २८ ॥

॥टीका॥ चाणूर मुष्टिक महामल्ल॥ कूट आणि शल तोशल॥ मारिले असतां मल्लदळ॥ भयें तत्काळ पळाले ॥ ५४ ॥
प्राण वांचवयाचे चाडें ॥ मरणभयें झाले वेडे ॥ पळतां मार्ग नसांपडे ॥ धाकें चहूंकडे विखुरले ॥ ५५ ॥
कोणी लपती वनितांमागें ॥ कोणी ह्मणती आह्मी भणगें ॥ एक पळाले लागवेगें ॥ राजमार्गें अधोमुख ॥ ५६ ॥
पळतां वळलिया वेंगडी ॥ जितचि होऊनि पडलीं मडीं ॥ एक तृणें धरिती तोडीं ॥ आली हुडहुडी एकांतें ॥ ५७॥
ऐसे प्राणपरीप्सव[2] ॥ वांचवावया आपुले जीव ॥ समरंगाचा घेऊनि भेव ॥ भाकूनि कींव पळाले ॥ ५८ ॥
तंव रामकृष्ण प्रतापमेरु ॥ तयांसि देऊनि नाभीकारू[3]॥ ह्मणती भयत्रस्तांतें नमारूं ॥ धरूनि धीरू बैसारे॥ ५९ ॥

---

[1] रक्त. [2] प्राणरक्षिण्यास इच्छिणारे. [3] अभयवचन.

ऐसें सभयां देवूनि अभय ॥ उभय बंधु परम निर्भय ॥ कृष्ण आणि रोहिणीतनय ॥ करिती काय तें ऐका ॥ ६० ॥

गोपान्वयस्यानाकृष्यतैःसंसृज्यविजहृतुः ॥ वाद्यमानेषुतूर्येषुवल्गंतौरुतनूपुरौ ॥ २९ ॥

॥टीका॥गोप वयस्य संवगडे॥आकर्षूनि आपणाकडे॥मंडळ रचूनि वाडेंकोडें ॥ विविधा क्रीडे दाविती॥ ६१ ॥
मल्लरंगीं महागजरें ॥ वाजत असतां विचित्र तुरें ॥ चरणीं रुणझुणती नूपुरें ॥ रामश्रीधरें नाचतां॥ ६२ ॥
ऐसें देखोनि सर्वांमनीं ॥ परमानंद सभास्थानीं ॥ जयजयकाराचिया ध्वनी ॥ टाळी सज्जनीं पीटिली ॥ ६३ ॥

जनाःप्रजहृषुःसर्वेकर्मणारामकृष्णयोः ॥ ऋतेकंसंविप्रमुख्याःसाधवःसाधुसाध्विति ॥ ३० ॥

॥टीका॥कंसावांचूनि सर्व सभा॥ पात्र झाली आनंदलाभा॥रंगीं क्रीडतां पद्मनाभा॥अपार शोभा मिरविली॥६४॥
रामकृष्णांच्या देखोनि कर्मा ॥ आल्हाद सर्वांच्या हृदयपद्मा॥ स्तविती रामा पुरुषोत्तमा॥ नागरी वामा जयघोषें॥६५
संत सज्जन महानुभाव ॥ ब्राह्मणप्रमुख ज्ञाति सर्व ॥ वोपिती आशीर्वादगौरव॥साधु साधु इहीं शब्दीं ॥६६॥
धन्यधन्य ह्मणती कृष्णा ॥ भला गा भला संकर्षणा ॥ कठोर मल्लांचिये तुळणा ॥ समरंगणा आंगविलें ॥ ६७ ॥
समस्त समूह आल्हादभरित ॥ जनमानसें उत्फुल्लित ॥ कंस क्षोभें परमतप्त ॥ तत्संकेत अवधारा ॥ ६८ ॥

हतेषुमल्लवर्येषुविद्रुतेषुचभोजराट् ॥ न्यवारयत्सतूर्याणिवाक्यंचेदमुवाच ह ॥ ३१ ॥

॥टीका॥मल्लयूथप पावलेमरण॥इतर पळाले घेऊनि प्राण॥ विजयी देखोनि रामकृष्ण॥उद्विग्न मन कंसाचें॥६९॥

ऐसा समय वर्तला असतां ॥ कंसें दाबूनि हस्तसंकेता ॥ प्रेरूनियां निकट दूतां ॥ वाद्यघोष राहविला ॥ ७० ॥
दुंदुभिपटहादि अनेक तुरें ॥ रंगीं गर्जतां विचित्र गजरें ॥ स्वपक्षभंगें[1] आपुल्या करें ॥ कंसें निकरें निवारिलीं॥ ७१॥
वाद्यघोष राहिले असतां ॥ कंस क्षोभें होय बोलता ॥ तें बोलणें कौरवनाथा ॥ संक्षेपता शुक सांगे ॥ ७२ ॥

निःसारयतदुर्वृत्तौवसुदेवात्मजौपुरात् ॥ धनंहरतगोपानांनंदंबध्नीतदुर्मतिम् ॥ ३२ ॥

॥टीका॥अरे हे वसुदेवाचे कुमर ॥ दुष्ट दुर्वृत्त महाक्रूर ॥ मथुरे बाहिर काढा सत्वर॥ अन्यायकर दुरात्मे॥७३॥
महाकपटी दुष्ट नंद ॥ लोहनिगडीं बांधोनि पद ॥ यासि करारे निर्बंध ॥ गुप्तद्वंद्वकारक हा ॥ ७४ ॥
याचा व्रज लुटूनि आणा ॥ हिरूनि घ्या रे धनगोधना ॥ नागवूनियां गोपगणा ॥ भणगें करूनि सोडा रे ॥ ७५॥
कैसी नंदाची दुर्मति ॥ मज वधावें कृष्णाहातीं ॥ वसुदेव करात्रा मथुरापति ॥ आपण क्षिति भोगावी ॥ ७६ ॥
यास्तव निगडीं कारागारीं ॥ यातें रक्षा बरवे परी ॥ आणिक आज्ञा काय करी ॥ तेही चतुरीं पारिसावी ॥ ७७ ॥

वसुदेवस्तुदुर्मेधाहन्यतामाश्वसत्तमः ॥ उग्रसेनःपिताचापिसानुगःपरपक्षगः ॥ ३३ ॥

॥टीका॥सबाह्य निष्कपट दयाळ॥सज्जन सत्तम पुण्यशीळ॥यांहूनि इतर तो हा कुटिल॥वसुदेव केवळ असत्तम॥७८
याची ऐकाहो दुर्मेधा[2] ॥ मजसीं करूनि साधुवादा ॥ मनीं इच्छी माझिया वधा ॥ युक्ति विविधा कापट्यें॥७९ ॥
केवढें कैवांड[3] करून ॥ रक्षकांचे वंचूनि नयन ॥ मध्यरात्रीं नगरींहून ॥ व्रजीं नंदन लपविला ॥ ८० ॥
समस्तांशीं करूनि चोरी ॥आणूनि नंदाची कुमारी ॥आठवी ह्मणोनि माझे करीं ॥देवूनि मैत्री दाखविली ॥ ८१ ॥

---

[1] स्वपक्षाच्या पराभवानें. [2] दुर्बुद्धि. [3] कटप.

म्यां आपाटितां ते गगना ॥ गेली वदोनि शत्रुसूचना ॥ निर्मळमनें दोघां जणां ॥ बंदीहूनि सोडिलें ॥ ८२ ॥
माझें निष्कपट अंतर ॥ सहसा नेणे कुजांतर ॥ यांचा करूनि श्रमपरिहार ॥ स्नेह साचार वाढविला ॥ ८३ ॥
या तिळासी ऐसें तेल ॥ वसुदेव दुरात्मा केवळ ॥ नेवोनि वधा रे तत्काळ ॥ विलंब अळुमाळ[1] नलावावा ॥८४॥
तैसाचि उग्रसेनही पिता ॥ मिळोनि तत्पक्षीं तत्वतां ॥ माझ्या इच्छी जीवघाता॥धरूनि आस्था राज्याची॥८५॥
याच्या करूनि शिरश्छेदा ॥ सानुगवर्ग अवघा वधा ॥ द्वितीय आज्ञेच्या अनुवादा॥करितां आपदा पावाल॥८६॥
ऐसा निकट दूतांप्रति ॥ क्षोभें आज्ञापी भोजपति ॥ हें ऐकोनि जगत्पति ॥ काय करिता जाहला ॥ ८७ ॥

एवंविकत्थमानेवैकंसेप्रकुपितोऽव्ययः ॥ लघिम्नोत्पत्यतरसामंचमुत्तुंगमारुहत् ॥ ३४ ॥

॥टीका॥आयुष्य सरलिया सन्निपातें॥जेंवि मुमूर्षु[2] बरळे भलतें॥तेंवि या दुरुक्ती कंसातें॥वदतां श्रीकांतें परिसोनी॥८८
अंतःकरणीं क्षोभ धरिला ॥ समरीं मर्दितां महामल्लां ॥ अव्यय ह्मणिजे नाहीं श्रमला ॥ विजयाथिला प्रतापी॥८९॥
लघिमा[3]लाघवें उत्प्लवन[4] ॥ करूनि खगेंद्रासमान ॥ परम उच्च मंचास्थान ॥ नृपासन जे ठायीं ॥ ९० ॥
नावांनिगे[5] वीर सावध ॥ शस्त्रास्त्रेंसीं सन्नद्ध बद्ध ॥ भंवते उभे नृपा संनिध ॥ गेला सक्रोध हरि तेथें ॥ ९१ ॥
तरसा ह्मणजे वेगवत्तर ॥ हिमाद्रीवरी विद्युत्प्रहार ॥ तेंवि सवेग कमलावर ॥ मंचा उच्चतर वळंघला ॥९२ ॥
येतां देखोनि जनार्दना ॥ दचक बैसला कंसमना ॥ पुढील कथेच्या निरूपणा ॥ मात्स्यीरमणा शुक सांगे॥९३॥

तमाविशंतमालोक्यमृत्युमात्मनआसनात् ॥ मनस्वीसहसोत्थायजगृहेसोऽसिचर्मणी ॥ ३५ ॥

---

१ थोडासा. २ मरणोन्मुख. ३ लघिमाह्म॰पाहिजे तितकें हलकें होतां येण्याचें सामर्थ्य, तेणें करून जें चापल्य तेणेंकरून. ४उड्डान. ५ नामांकित.

॥टीका॥राजा आणि निजासनीं॥ऐश्वर्यमंडित वीरकंकणीं॥कंस मनस्वी निर्भयपणीं॥बोले क्षोभोनि निःशंक॥९४॥
जैसा कुञ्जर मदोन्मत्त ॥ स्वबळें कोणातें नगणित ॥ तंव केसरी अकस्मात ॥ येऊनि बैसत गंडस्थळीं ॥ ९५॥
तेंवि आपुला जो कां मृत्यु ॥ स्मरोनि नभोवाणीसंकेतु ॥तो हा आठवा देवकीसुतु॥झगटला नधरत आंगेंसीं॥९६॥
त्यातें देखोनि गजबजिला॥ आसनापासोनि सवेग उठिला॥खङ्ग चर्म[1] घेता झाला ॥ रक्षावयाला आपणा ॥९७॥
कोश सांडुनि करवाळ[2] ॥ बाळ[3]तरणीहूोन तेजाळ ॥ कंस परजी आणि वर्तुळ ॥ अभेद् खेटक वामकरें ॥ ९८ ॥
बंधु आणि पार्षदगण ॥ क्रूर प्रतापी महातीक्ष्ण ॥ समीप असतां कंसाविण॥कोणी आंगवण करूं न शके ॥९९
परम कठिन मृत्युसंधि ॥समीप असतां आप्तमांदी ॥ कोणा नकरवे मोक्षणविधि ॥ नेतां त्रिशुद्धि कृतांता ॥२०० ॥
तैसी पडतां कृष्णामिठी ॥ कंसें खंडा वोडण मुष्टि ॥ पडताळूनियां उठाउठी ॥ उठला संकटीं संग्रामा ॥ १ ॥

तंखड्गपाणिंविचरंतमाशुश्येनंयथादक्षिणसव्यमंबरे ॥ समग्रहीद्दुर्विषहोग्रतेजसायथोरगंताक्ष्यर्सुतःप्रसह्य॥३६॥

॥टीका॥खड्गविद्येचा अभ्यास॥परमप्रतापी जाणे कंस॥सव्य दक्षिण भ्रमरिकांस[5]॥दावी अशेषलाघवें ॥ २ ॥
माथां वाहोनियां वोडण ॥ बैसोनि छेदूं पाहे चरण ॥ सर्वेंचि करी उत्प्लवन ॥ शिरीं कृपाण[2] हाणावया ॥ ३ ॥
शूळप्राय अग्रभागीं ॥ खड्ग मुष्टी झाडी वेगीं ॥ घाव दावूनि दक्षिणांगीं ॥ प्रहार वामांगीं करूं धांवे ॥ ४ ॥
ऐसा खंडा खड्गपाणि ॥ कंस परजी मंचस्थानीं ॥ मल्लविद्येची कडसणी[4] ॥ चक्रपाणि निःशस्त्र ॥ ५ ॥
जैसा ससाणा निःशंक गगनीं ॥ मारी शकुंता झडपोनी ॥ किंवा गरुड महाफणी ॥ समरांगणीं आकर्षी ॥ ६ ॥

---

१ ढाल. २ खड्ग. ३ उदयकालच्या सूर्यापेक्षां. ४ परिक्षा. ५ मंडलांस.

तेंवि आंगीं नलगतां खड्ग॥ बलात्कारें कमलारंग ॥ कंसा आंगीं अतिसवेग॥ उग्रवीर्य झगटला ॥ ७ ॥
ज्याच्या उग्रतेजाचा लेश ॥ लाहोनि कृतांतादि अशेष ॥ आंगीं मिरविती उग्रत्वास ॥ तो हा परेश श्रीकृष्ण॥८॥
झडपे सरसी पडली मिठी ॥ मुष्टी कवळिली वीरेंगुंठी ॥ आंसुडितां महाहठीं ॥ वर्तली गोठी ते ऐका ॥ ९ ॥

प्रगृह्यकेशेषुचलत्किरीटंनिपात्यरंगोपरितुंगमंचात् ॥
तस्योपरिष्टात्स्वयमब्जनाभःपपातविश्वाश्रयआत्मतंत्रः ॥ ३७ ॥

॥टीका॥केश मुष्टी कवळूनि हरि॥आंसुडितां दक्षिणकरीं॥मुकुट पडला धरणीवरी॥झाली विखुरी सुमनांची॥ १०॥
उच्च मंचाहूनि निकरें॥रंगभूवरी टाकिला करें ॥ त्यावरी स्वयेंचि दामोदरें ॥ केलें स्वगात्रें उत्पतनें[2] ॥ ११ ॥
अनंतब्रह्मांडें ज्याचे उदरीं॥तो विश्वाश्रय स्वयें श्रीहरि ॥ अब्जनाभि या हेतुमाझारी ॥ सूचना करी शुकवक्ता ॥१२॥
कंसावरी तेणें उडी ॥ घालितां कंस दडपला बुडीं ॥ पतना सरसा प्राण सोडी ॥ पडिली कुडी अचेतन ॥ १३ ॥
कृष्ण नोहेचि परतंत्र ॥ योद्धा लोटूं शके गात्र ॥ लक्षूनि कंसाचें प्राणसूत्र ॥ आत्मतंत्र स्वयें लोटे ॥ १४ ॥
उडी घालितां कंसावरी ॥ कंसप्रेत पडलें समरीं ॥ राहिली युद्धाची अवसरी ॥ गोष्टी पुढारीं अवधारीं ॥ १५ ॥

तंसंपरेतंविचकर्षभूमौहरिर्यथेभंजगतोविपश्यतः॥हाहेतिशब्दःसुमहांस्तदाभूदुदीरितःसर्वजनैर्नरेंद्र॥ ३८ ॥

॥टीका॥रंगोत्सव पहावयासी॥नागर आले मथुरावासी॥निःसंशय त्यां कळावयासी॥कंसप्रेतासि हरि दावी १६॥

---

१ बुचडा. २ उड्डान.

पाहती रंगभूमीमाझारी ॥ कंसप्रेत ओढी हरि ॥ जैंवि मदोन्मत्त महाकरी ॥ ओढी केसरी निवटूनी ॥ १७ ॥
नरनारींचें बहुधा यूथ ॥ ज्ञातिपरत्वें पृथक्स्वस्थ ॥ बैसलें तितुकें अकस्मात् ॥ हा हा करीत ऊठिलें ॥ १८ ॥
हाहाकार झाला थोर ॥ राजवर्गी भयातुर ॥ समस्त गजबजिले नागर ॥ ह्मणती नृपवर निमाला॥ १९ ॥
तये समयीं परीक्षिति ॥ परमचातुर्याची मूर्ति ॥ विचारूं पाहे शुकाप्रति ॥ सद्गति दुर्गति कंसाची ॥ २० ॥
हें जाणोनि अंतरवेत्ता॥भूतभविष्यत्रिकालज्ञाता॥प्रश्न नकरितां झाला वक्ता ॥ तें येथें श्रोतां परिसावें॥ २१ ॥

सनित्यदोद्विग्नधियातमीश्वरंपिबन्वदन्वाविचरन्स्वपञ्श्वसन् ॥
ददर्शचक्रायुधमग्रतोयतस्तदेवरूपंदुरवापमाप ॥ ३९ ॥

॥ टीका ॥ राया पूर्वींच द्वितीयाध्यायीं ॥ गर्भींच असतां शेषशायी॥कंस प्रवर्ते तद्वधोपायीं ॥ परि तो ते समयीं असाध्य ॥ २२ ॥ गर्भिणी आणि आपुली बहिणी ॥ वधितां अपकीर्ति सर्वत्र जनीं ॥यश लक्ष्मीआयुष्यहानि ॥ ऐसें विवरूनि परतला ॥ २३ ॥ तैंहूनि तीव्र भगवद्ध्यान ॥ कंसा हृदयीं लागलें जाण ॥ तो तेणेंचि नित्य उद्विग्न ॥ भयें करूनि नविसरे ॥ २४ ॥ साक्षात् ईश्वर देवकीउदरीं ॥ शंखचक्राब्जगदाधारी ॥ प्रकट होवोनि मजला मारी ॥ वाहे अंतरीं हे धडकी ॥ २५ ॥ प्राशन करितां पाहे आपा ॥ देखे नारायणस्वरूपा ॥भयें भावी सत्यसंकल्पा ॥ वदनीं जल्पामाजी स्मरे ॥ २६ ॥ अन्न ब्रह्म विष्णु रस ॥ भक्षण करितां आठवे दंश ॥

---

१ मृत्यु पावला. २ उदकाला. ३ सत्य आहे संकल्प ज्याचा.

स्मरणासरिसा आदिपुरुष ॥ सायुध सावेश पुढां देखे ॥ २७ ॥ चरणचालीं अथवा यानीं ॥ स्वेच्छा विचरों जातां अवनीं ॥ चहूं दिग्भागीं चहूंही कोनीं ॥ दचके देखोनि गदायुध ॥ २८ ॥ निद्राकाळीं शयनीं अवनीं ॥ माजी देखोनि चक्रपाणि ॥ मानसीं भयाची कणाणी ॥ उठे दचकोनि वोथरला ॥ २९ ॥ जागृतिस्वप्नीं सुषुप्ती ॥ माजी देखोनि श्रीपति ॥ भयें कंसाचिये चित्तीं ॥ ध्यानस्थिति दृढ झाली ॥ ३० ॥ श्वासोच्छ्वासीं देखे हरि ॥ सहज अजपाहंसाक्षरी[1] ॥ वाहतां कंसासी अहोरात्रीं ॥ चक्रधारी पुढां दिसे ॥ ३१ ॥ भयें पूर्वींहूनि हा वेध ॥ लागतां मानस हरिरूप शुद्ध ॥ होतें ह्मणोनि तो प्रसिद्ध ॥ पावला वध हरिहस्तें ॥ ३२ ॥ जया रूपाचें तीव्र ध्यान ॥ भयें भाविलें अनुसंन्धान[2] ॥ कंस तन्मय झाला पूर्ण ॥ जें इतरालागून दुरापें[3] ॥ ३३ ॥ योगयागतपांच्या श्रेणी ॥ करितां जें रूप नपवती कोणी ॥ कंस तद्रूप होवोनी ॥ आनन्दघनीं समरसला ॥ २३४ ॥ भिंगुरटीच्या भयें कीटकी ॥ अन्तरींचें ध्यान नटकी ॥ तेही भ्रमरी होय नेटकी ॥ हे गोष्ठी लटकी ह्मणूं नये ॥ ३५ ॥ हा तंव चैतन्यघन श्रीकृष्ण ॥ भयें कंसासि करितां ध्यान ॥ कृष्णहस्तेंचि पावला मरण ॥ मीनला[4] सम्पूर्ण कृष्णरूपीं ॥ ३६ ॥ यालागीं कंसा कवण गति ॥ करणें नलगेचि हे प्रश्नोक्ति ॥ पुढील कथा परिसिजे श्रोतीं ॥ जे कुरुपती शुक सांगे ॥ ३७ ॥

तस्याऽनुजाभ्रातरोऽष्टौकंकन्यग्रोधकादयः ॥ अभ्यधावन्नभिक्रुद्धाभ्रातुर्निर्वेशकारिणः ॥ ४० ॥

॥ टीका ॥ इतस्तता कंसप्रेत ॥ रंगीं कर्षितां कृष्णनाथ ॥ तंव कंसाचे बन्धु दृप्त ॥ आठही त्वरित

---

[1] जप करण्याचा आयास नसतां, जप होतो जीचा अशी जी श्वासोच्छ्वासात्मक हंसगायत्री ती. [2] चिंतन. [3] दुर्लभ. [4] मिळाला.

धांविन्नले ॥ ३८ ॥ खड्ग खेटक गदा परिघ ॥ प्रास पट्टिश वज्र अभंग ॥तोमर मुद्गर शस्त्रें अनेग ॥ घेवूनि
सवेग ऊठिले ॥ ३९ ॥ घ्या घ्या ह्मणोनि कृष्णावरी ॥ सरोंख चवताळले समरीं ॥ निर्भय निःशस्त्र कैटभारि
जैसा गिरि घन पडतां ॥ ४० ॥ चक्रें त्रिशूळ शक्ति लहूडी ॥ एक टाकिती बाळें धोंडी ॥ ह्मणती कंसाचिये
सुडीं ॥ झोडा प्रौढी बळकृष्णा ॥ ४१ ॥ अरे हे गोरक्षक मातले ॥ नधरत नृपावरी पातले ॥ नृपा मारूनियां
जिंतले ॥ कैंवि मिरविती भूतळीं ॥ ४२ ॥ आह्मी प्रताप[1]वीरकेसरी ॥ रामकृष्णांतें वधूनि समरीं ॥ नंदव्रजाची
बोहरी ॥ करूं पुढारी कंसाज्ञा ॥ ४३ ॥ ऐसे कंक[2]न्यग्रोधप्रमुख ॥ अष्टही बंधु धरूनि तवकें[3] ॥ वाहिला
बंधुत्वाचा अंक ॥ त्यासी उत्तीर्ण व्हावया ॥ ४४ ॥ मदोन्मत्त जैसे करी ॥ नधरत लोटले देखोनि समरीं ॥
तेव्हां संकर्षणकेसरी[4] ॥ काय करी तें ऐका ॥ ४५ ॥

तथातिरभसांस्तांस्तुसंयतान्रोहिणीसुतः ॥ अहन्परिघमुद्यम्यपशूनिवमृगाधिपः ४१ ॥

॥टीका॥चपेटघातें फोडूनि वदन॥परिघ घेतला हिरोन॥परिघप्रहारें सशस्त्र चूर्ण ॥ केले संपूर्ण आठही ॥४६ ॥
जैसा केसरी प्रतापजेठी ॥ मर्दी करटी कोट्यानकोटी ॥ तेथ सामान्य मृगांची गोठी ॥ कैंवि ओंठीं प्रशंसिजे॥४७॥
तेंवि मातले अष्ट शलभ ॥ मर्दूनियां रोहिणीडिम्भ ॥ विजयश्रीचा ऊर्जितकोंभ ॥ रंगीं शोभा प्रकाशी ॥ ४७ ॥
हें देखोनि निर्जरगणीं ॥जयजयकारें गर्जोनि गगनीं ॥ उत्साह केला तो सज्जनीं ॥ सावध होवोनि परिसावा ॥ ४९ ॥

नेदुर्दुंदुभयोव्योम्निब्रह्मेशाद्याविभूतयः ॥ पुष्पैःकिरंतस्तंप्रीताःशशंसुर्ननृतुःस्त्रियः ॥ ४२ ॥

---

[1] पराक्रम करणाऱ्या वीरांमध्यें सिंह ह्म०.श्रेष्ठ. [2] कंक. न्यग्रोध इ०. [3] आवेश. [4] सिंहासारखा पराक्रमी.

॥टीका॥समल्ल सानुज कंसासुर॥मर्दूनि विजयी वसुदेवकुमर॥देखोनि आंनंदें निर्भर॥करिती निर्जर जयघोष ॥५०
भवाब्जभवादि अमरीं सकळीं॥पूर्वी जावोनि क्षीराब्धिपाळीं॥प्रसन्न करितां स्वपक्षशाळी॥श्रीवनमाळी अवतरला ५१
आजि तो वधूनि कंसासुर ॥ निर्भय केले सुरभूसुर ॥ ह्मणोनि आनंदें निर्भर ॥ जयजयकार सुर करिती॥५२ ॥
ब्रह्मेशादि निर्जरपति ॥ श्रीप्रभूच्या गुणविभूति ॥ दुदुंभिघोषें उत्साह करिती ॥ विजयावाप्ति जाणोनी ॥ ५३ ॥
करिती अमोघ पुष्पवृष्टि॥ दिव्यसुमनीं भरली सृष्टि ॥ कृष्णमहिमा लक्षूनि ॥ दृष्टीं ॥ स्तोत्रपाठीं प्रशंसिती ॥ ५४ ॥
प्रीतिपूर्वक निर्जरगण ॥ करिती भगवद्यशोवर्णन ॥ अप्सरांचें सुनर्तन ॥ सामगायन गंधर्वीं ॥ ५५ ॥
ह्मणती जयजय जगदीश्वरा ॥ संकटीं कैपक्षी[1] तूं अमरां ॥ मर्दूनियां महाअसुरां ॥ भूसुरां[2] तोषद तूं॥५६ ॥
जयजय जगज्जननीजनका ॥ जयजय जगद्भयभंजका ॥ जयजय सज्जनमनोरंजका॥ अघगंजका अखिलाद्या॥ ५७॥
जयजय पुण्यपावनचरिता॥जयजय अखिलांडकोटिभरिता॥ जयजय पादाब्जशौचसरिता ॥ भवनिस्तरिता भ्रमहंत्री
इत्यादि स्तवनीं स्ताविता अमरीं॥येरीकडे मागध[3]कुमरी ॥कंसकलेवर कवळिती समरीं॥ जैशा भ्रमरी मधुभंगीं॥५९॥
येथूनि तयांचें शोककथन ॥ राया ऐकें सावधान ॥ श्लोकषट्कं निरूपण ॥ व्यासनंदन निरूपी ॥ ६० ॥

तेषांस्त्रियोमहाराजसुहृन्मरणदुःखिताः ॥ तत्राभीयुर्विनिघ्नंत्यःशीर्षाण्यश्रुविलोचनाः ॥ ४३॥

॥टीका॥तेषां ह्मणिजे बहुतांचिया॥शोक करिती बहुत जाया॥ दुःखें धांवूनि आलिया॥ महाराया तें ऐकें॥ ६१ ॥
महामल्लांच्या मल्लवनिता ॥ आणि कंसाच्या राजकान्ता ॥ कंसबन्धूंचिया समस्ता ॥ शोकसंतप्ता धांवती॥६२॥

---

[1] साहाय्यकारी. [2] भूमि व ब्राह्मण यांस. [3] जरासंधाच्या कन्या अस्ति व प्राप्ति-कंसस्त्रिया

आप्त सोयरा जीवप्राण ॥वल्लभा समान दुसरा कोण॥ त्या प्राणप्रियाचें देखोनि मरण ॥ दुःखें दारुण झळंबती ॥ ६३॥ हाहाकारें आक्रंदती ॥ उर मस्तक वदनें पिटिती ॥ लोचनीं अश्रुधारा स्त्रवती ॥ विलाप करिती परोपरी ॥ ६४ ॥ अंगें टाकिती धरणीवरी ॥ हस्तें ताडिती उरीं शिरीं ॥ शोकसंतापमहापूरीं ॥ दुःखलहरीमाजिवड्या ॥ ६५ ॥

शयानान्वीरशय्यायांपतीनालिंग्यशोचतीः ॥ विलेपुःसुस्वरंनार्योविसृजंत्योमुहुःशुचः ॥४४॥

॥ टीका ॥ वीरश्रीमंडित रंगक्षिति ॥ तेथ अभंग निद्रिस्त पति ॥ त्यांतें आलिंगोनि त्या सती ॥ शोक करिती आक्रोशें ॥ ६६ ॥ आपुलाल्या पतींचीं प्रेतें ॥ आलिंगूनियां उभय हस्तें ॥ भूमि भिजविती अश्रुपातें ॥ संतप्तचित्तें त्या रुदती ॥ ६७ ॥ मुखामाजी भरली माती ॥ ते काढिती आपुल्या हातीं ॥ रक्तें लेपलीं गात्रांप्रति ॥ तें त्या पुसिती निजवसनीं ॥ ६८ ॥ निडळें लाविती कांतनिडळा ॥ अश्रुपात ढळती डोळां ॥ मुखें चुंबिती वेळोवेळां॥ घालिती गळां निजहस्त ॥ ६९ ॥ हस्तें धरूनियां हनुवटी ॥ वदती भोगिल्या विलासगोठी ॥ दीर्घस्वरें रुदतां कंठीं ॥ प्रकटे सृष्टी सुस्वरता ॥ ७० ॥ स्वभावें मधुर स्त्रियांचे कंठ ॥ करुणास्वरें रुदतां स्पष्ट ॥ विविधा विलपती तो बोभाट ॥ सुस्वर ह्मणोनि शुक वदला ॥ ७१ ॥ वारंवार अश्रुपात ॥ दुःखशोकें वदनें घेत ॥ बहुधा विलाप करूनि तेथ ॥ करिती आकान्त तो ऐका ॥ ७२ ॥

हानाथप्रियधर्मज्ञकरुणानाथवत्सल ॥ त्वयाहतेननिहतावयंतेसगृहप्रजाः ॥ ४५ ॥

॥ टीका ॥ अहा अहारे प्राणप्रिया ॥ समर्थ नाथा जिवलग सखया ॥ आमुची अभिरंजनविलासक्रिया ॥

पुरवावया तूं योग्य ॥ ७३ ॥ अन्नपानें वस्त्राभरणें ॥ देखों नलाहसी आमुचें उणें ॥ झळंबसी आमुचे करुणे ॥
झालों तुजविणें अनाथा ॥ ७४ ॥ दास दासी पोष्यवर्गें ॥ पुत्र कलत्र कुटुंब अवघें ॥ मरण पावलों तव वियोगें॥
कोण तुजमागें आपंगी ॥ ७५ ॥ आमुचा किमर्थ विषाद आला ॥ कां पां धरिला दीर्घ अबोला ॥ कां पोष्यांचा
त्याग केला ॥ धर्मझाला अनुचित हें ॥ ७६ ॥ तुझिया उच्छिष्टाची आस ॥ धरूनि पाहूं चिरकाळ वास ॥
अनाथ दिसती दासी दास ॥ कां पोष्यांस उपेक्षिलें ॥ ७७ ॥ ऐशा समस्त स्त्रिया रुदती ॥ विशेष कंसाचिया
सती ॥ वाग्विलापें शोक करिती ॥ तो भूपति अवधारीं ॥ ७८ ॥

त्वयाविरहितापत्यापुरीयंपुरुषर्षभ ॥ नशोभतेवयमिवनिवृत्तोत्सवमंगला ॥ ४६ ॥

॥ टीका ॥ ह्मणती नाथा कंसासुरा ॥ तूं भर्ता या मथुरापुरा ॥ तुझेनि मरणें दीन दारा ॥ पावली धरा
वैधव्य ॥ ७९ ॥ ऐकें गा ये पुरुषश्रेष्ठा ॥ आह्मी तव जाया वरिष्ठा ॥ पुरी समान भोगूं कष्टां ॥ सौभाग्यभ्रष्टा
नशोभूं ॥ ८० ॥ मखरें तोरणें पताका ॥ मंगळवाद्यें गजर निका ॥ तुझेनि मरणें नगरी शोका ॥ पात्र झाली
आह्मांपरी ८१ ॥ सौभाग्यलक्ष्मीचें कुंकुम ॥ पुसोनि गेलिया दिसों अधम ॥ केवळ वैधव्याचें धाम ॥ झालों
परम अमंगळ ॥ ८२ ॥ मंगलोत्सवा वोहट पडला ॥ अवदशेचा श्रृंगार चढला ॥ पूर्वाचरणें दोष घडला ॥
भोगणें पडला तो आजी ॥ ८३ ॥ तव प्रतापें मंगळ धरणि ॥ बिलसे जैसी सुभगा तरुणी ॥ वैधव्यदुःख
तुझिये मरणीं ॥ हे तव करणी भू भोगी ॥ ८४ ॥ तेचि कंसासुराची करणी ॥ स्मरोनि विलपती कामिनी ॥
संक्षेपें तें बादरायणि ॥ घाली कर्णीं नृपाचे ॥ ८५ ॥

---

१ ममतापूर्वक रक्षण करितो.

अनागसांत्वंभूतानांकृतवान्द्रोहमुल्बणम् ॥ तेनेमांभोदशांनीतोभूतध्रुक्कोलभेतशम् ॥ ४७ ॥

॥ टीका ॥ कंसप्रेताच्या वदनापुढें ॥ हस्त नेवून वदती तोंडें ॥ ह्मणती केलें कर्म कुडें ॥ तें रोकडें फळा आलें ॥ ८६ ॥ निरपराध छळिलीं भूतें ॥ भूतद्रोह जो घडला तूतें ॥ आजि नृपासन पालथें ॥ पडोनि आह्मांतें दीन केलें ॥ ८७ ॥ शरीररक्षणा कारणें ॥ वसुदेवदेवकी निग्रहें छळणें ॥ उग्रसेना निगडबंधनें ॥ कार्याविणें तुवां केलें ॥ ८८ ॥ यादव लाविले दिगंतीं ॥ ब्राह्मण मारिले स्मार्तश्रौती ॥पतिव्रता छळिल्या सती॥दुष्टनिघाती प्रेरूनी ॥ ८९ ॥ बाळें मारिलीं जातमात्र ॥ शत्रु केले स्वकुलगोत्र ॥ दैत्यदुरात्मे जोडिले मित्र ॥ अन्यायपात्र झालासी ॥ ९० ॥ भूतद्रोह निरपराध ॥ आप्तस्वजनासीं विरोध ॥तेणें दुःखाब्धि अगाध ॥ लंघितां प्रसिद्ध अनुल्लंघ्य ॥ ९१ ॥ तुझिया इत्यादि आचरणें ॥ आह्मी विपत्ति हे भोगणें ॥ भूतद्रोह करूनि कोणें॥ सुख संसारीं अनुभविलें ॥ ९२ ॥ प्राणी पीडितां नधरिसी करुणा॥शेवटीं पात्र झालासि मरणा॥विधवा अनाथा तवांगना॥शरण कोणा जातील ॥ ९३ ॥ तव संगतीं भोगिलें सुख ॥ तें तंव होवोनि गेलें क्षणिक ॥ आतां अगाध दुःख शोक ॥ भोगितां लोक विलोकिती ॥ ९४ ॥ रक्षावया स्वशरीर ॥ शत्रु केला परमेश्वर ॥ ऐसा बुद्धिमंद जो नर ॥ दुःख अघोर मग पावे ॥ ९५ ॥

सर्वेषामिहभूतानामेषहिप्रभवाप्ययः ॥ गोप्ताचतदवध्यायीनक्वचित्सुखमेधते ॥ ४८ ॥

॥ टीका ॥ कृष्ण हा परमात्मा केवळ ॥ भूतमात्राचा स्थितिलयकाळ ॥ ब्रह्मांडगोळप्रभवनशीळ ॥ स्वपक्ष-

पाळ दैत्यारि ॥ ९६ ॥ त्याची अवज्ञा करितां मूर्ख ॥ कोठें अणुमात्र नपवे सुख ॥ तो त्वां वधावया प्रत्यक्ष॥
वसुदेवतोक आणिला ॥ ९७ ॥ धनुर्यागाचें करूनियां मिष ॥ आणिलें कपटें वधावयास ॥ तुझा तव कपटें
झाला नाश ॥ केलें दुःखास पात्र आह्मां ॥ ९८ ॥ ऐशा विलाप करिती नाना ॥ सानुज कंसाच्या अंगना ॥ आणि तैशाच मल्लललना॥करिती रुदना सम दुःखें॥९९॥असो हा दुःखाचा सागर ॥ निरूपितां नलगे पार॥यावरी
नृपातें व्यासकुमर ॥ सांगे प्रकार तो ऐका ॥ ३०० ॥

श्रीशुकउवाच ॥ राजयोषितआश्वास्यभगवाँल्लोकभावनः॥ यामाहुर्लौकिकींसंस्थांहतानांसमकारयत्॥ ४९

॥टीका॥राया कुरुकंजवनगभस्ति॥श्रवणसुभगा परीक्षिति॥तुझेनि श्रोतेपणा विश्रांति॥माझ्या चित्तीं उचंबळे३०१
लोकभावन[1] जो भगवन्त ॥ धर्मस्थापक कमलाकांत ॥ नृपांगना करूनि शांत ॥ आश्वासित निजवदनें ॥ २ ॥
शास्त्र[2]निर्णीत जे निष्कृति[3] ॥जीतें लौकिकी संस्था ह्मणती ॥ ते ते मृतांच्या स्त्रियांहातीं ॥ करवी श्रीपति विध्युक्त ॥ ३॥
पुत्रसंतति होती ज्यांसी ॥ त्यांचेनि हातें तत्कर्मासी ॥ करविता झाला हृषीकेशी ॥ धर्मज्ञांसी विवरूनी ॥ ४ ॥
कंस आणि कंसबंधु ॥ समल्ल सर्वांचिया वधू ॥ उत्तरकर्मीं योजूनि सिद्धु ॥ पुढें गोविंद काय करी ॥ ५ ॥

मातरंपितरंचैवमोचयित्वाथबंधनात् ॥ कृष्णरामौववंदातेशिरसाऽऽस्पृश्यपादयोः ॥ ५०॥

॥ टीका ॥ उद्धव अक्रूर घेवूनि सवें ॥ सहित संवगडे आघवे ॥ बंदिशाळा वासुदेवें ॥ विजयविभवें ठाकिली ६
कारागारींचे रक्षक दूत ॥ भेणें पळाले समस्त ॥ मातापितरें केलीं मुक्त ॥ निगड त्वरित छेदूनी ॥ ७ ॥

---

[1] लोकांस उत्पन्न करणारा. [2] शास्त्रानें ठरविलेली. [3] प्रायश्चित्तादिकक्रिया.

अनुक्रमेंचि उग्रसेना ॥ सहित समस्त यादवगणा ॥ करूनि बंधविमोचना ॥ समाधाना पावविलें॥ ८ ॥
वसुदेव देवकी उग्रसेन ॥ बंधुवर्ग जो यादवगण ॥ त्यातें स्वमौळें रामकृष्ण ॥ अल्प स्पर्शोनि वंदिती ॥ ९ ॥
तेणें आनंदले सर्व ॥ फिटला कंसभयाचा ठाव ॥ निर्भय पावती वासुदेव ॥ तंव देवकी वसुदेव काय करिती १०

देवकीवसुदेवश्चविज्ञायजगदीश्वरौ ॥ कृतसंवंदनौपुत्रौसस्वजातेनशंकितौ ॥ ५१ ॥

॥ टीका ॥ वसुदेवदेवकी जनकजननी ॥ पुत्रभ्रांति सांडूनि मनीं ॥ प्रत्यक्ष जगदीश्वर जाणोनी ॥ लागलीं
चरणीं निःशंक ॥ ११ ॥ पुत्रबुद्धि रामकृष्ण ॥ मानूनि न देती आलिंगन ॥ बद्धांजलि पुढें ठाकोन ॥ करिती
स्तवन पूर्णत्वें॥ १२॥ह्मणती जयजय जनार्दना॥जगदुद्धरणा संकर्षणा॥दैत्यदुर्मदनिर्दालणा॥भवतारणा भगवंता १३
अनेकजन्मींचा सुकृतसांठा ॥ होता ह्मणोनि आलांत पोटा ॥ संहारूनि दैत्यां दुष्टां ॥ आह्मां अभीष्टा भेटाविलें
॥ १४ ॥ नम्रमौळें हे करिती स्तुति ॥ नयनीं प्रेमोदकें स्रवती ॥ हें जाणोनि मां भूपति॥काय करिती तें ऐका
॥१५॥पुढिले अध्यायीं ते कथा॥शुक सांगे कौरवनाथा॥भाषाव्याख्यान तेथींचें श्रोतां॥एकाग्र चित्तां परिसावें॥ १६
प्रतिष्ठान गोदातटीं ॥ सच्चित्सुखमयवैकुंठपीठीं ॥ एकनाथकृपादृष्टी॥ स्वजनसृष्टी निववविता ॥१७॥ चिदानंदप्रसाद
तेथ ॥ भक्त लाहती स्वानंदभरित ॥ गोविंदवरें पूर्णतृप्त ॥ होती समस्त दयार्णव ॥ १८ ॥ तें हें
श्रीमद्भागवत ॥ अठरासहस्र मुनिप्रणीत ॥ परमहंसीं रमिजे येथ ॥ उपनिषदर्थ सोलींव ॥ १९ ॥ यांतील हा
दशमस्कंध ॥ पूर्ण झाला कंसवध ॥ चतुर्थ एकादशिनी प्रसिद्ध ॥ श्रोता सावध परीक्षिति ॥ २० ॥ चव्वेचाळिसावा
अध्याय ॥ संपवूनियां शुकाचार्य ॥ पुढील कथेचा अभिप्राय ॥ निरूपील तो अवधारा ॥ २१ ॥ माथां

ठेवूनि श्रोतयां चरणीं ॥ दयार्णवाची हे विनवणी ॥ सर्वभूतीं चक्रपाणि॥लक्षूनि श्रवणीं बैसावें ॥ २२ ॥ विरोध अथवा अनन्यशरण ॥ झालिया सहजीं भवाब्धितरण ॥ तारूं तेथ श्रीनारायण ॥ होय आपण सर्वस्वें ॥२३॥

॥ ॥ इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायांसमल्लकंसवधोनामचतुश्चत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ४४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु

॥ श्लोक ॥ ५१ ॥ ओव्या ॥ ३२३ ॥ एवंसंख्या ॥ ३७४ ॥ अध्यायःसंपूर्णोऽस्तु ॥

अध्याय ४५.

नंदादिपितृसांत्वन ॥ राज्यीं स्थापूनि उग्रसेन ॥ व्रतबंधादि गुरुसेवन ॥ करूनि साग्रज स्वपुरा ये ॥१५॥



गोविंदपरमात्मने नमः ॥ ॥ भावें वंदू जातां पद ॥ तंव भाव[1] भावना[2] भाव्य[3] विशद ॥
गिळूनि प्रकटिसी स्वानंद ॥ साक्षित्वभेद ग्रासूनी ॥ १ ॥ भाव ह्मणिजे आस्तिक्यता ॥
तव पदभजनीं निर्धारिलां ॥ पदभजनाची अमोघ सत्ता ॥ प्रकटी तत्वता प्रतीति ॥ २ ॥
प्रतीतीचें जें लक्षण ॥ प्रतिबिंब विवर्त्तरूप जाणोन ॥ मुख्य बिंब अवग[4]म्यमान ॥
प्रतीति जाण या नांव ॥ अंतःकरणींचा चित्प्रकाश ॥ करणद्वारा भावी दृश्य ॥ तये भावने माजी अशेष ॥
विषयाभास भासतसे ॥ ४ ॥ तेथ अनन्य तव पदभजनें ॥ प्रत्यक्प्रव[5]ण होती करणें ॥ तेव्हां निरास भाव्यभावने ॥ अंतःकरणें अनुभवितां ॥ ५ ॥ भावितां मात्र अंतःकरण ॥ द्वैतोपरमें होय लीन ॥ तेव्हां साक्षित्वभेदाविण ॥ स्वानंदघन समरसतां ॥ ६ ॥ ऐसी अगाध एकात्मता ॥ जोडे तव पदभजननिरतां ॥ पुढती
व्युत्थ[6]ानीं विवर्ता ॥ जरी देखता होईल ॥ ७ ॥ तरी तो बाधित विवर्तबोध ॥ करूं नशके विषयीं बद्ध ॥ करणद्वाराही स्वानंद ॥ नित्योपलब्ध निःसीम ॥ ८ ॥ सगुणपदभजनाचें ध्यान ॥ ऐसें निरसूनि विषयभान ॥
सबाह्य समाधिव्युत्थान ॥ भ्रमावीण स्फुरों नेदी ॥ ९ ॥ सबाह्य झालिया भ्रमातीत ॥ नभासे पृथक्त्वें विवर्त ॥
नित्यमुक्त निजात्मरत ॥ पूर्णामृत परब्रह्म ॥ १० ॥ इये भजनानंदप्रतीती ॥ माजी सद्गुरु आज्ञापिती ॥

---

[1] आस्तिक्यबुद्धि. [2] कोणत्याही पदार्थास अस्तित्वें करून मानण्याचा जो व्यापार तो. [3] निश्चय करण्यास योग्य तो. [4] जाणलें जाणारें. [5] देहस्थित जें ब्रह्म त्या कडे वळलेला. [6] ध्यानविसर्जनांत.

दशमस्कंधाची व्युत्पत्ति ॥ भाषाभारती वाखाणीं ॥ ११ ॥ समल्लकंसाच्या निर्याणीं॥संपली चतुर्थ एकादशिनी ॥
पुढें नंदादिकांची ग्लानि ॥ चक्रपाणि सांतवी ॥ १२ ॥ एकादशिनी ते पंचम ॥ तये कथेचा अनुक्रम ॥
पंचाध्यायपर्यंत नेम ॥ पूर्वार्ध पूर्ण होईल ॥ १३ ॥ उत्तरार्धीं अध्यायषट्क ॥ पर्यंत कथिजेल सम्यक ॥
एकादशिनीचें पंचक ॥ श्रोतीं सविवेक परिसावें ॥ १४ ॥ प्रथमीं नंदादिपितृसांत्वन ॥ राज्यीं स्थापूनि उग्रसेन
॥ व्रतबंधादि गुरुसेवन ॥ करूनि साग्रज स्वपुरा ये ॥ १५ ॥ शेचाळिसीं उद्धव व्रजा ॥ धाडूनि बोधवी
बल्लवभाजा ॥ नंदयशोदाशोकाग्नितेजा॥शमवूनि बोधें निववील ॥ १६ ॥ सत्तेचाळिसांमाजी उद्धव ॥ हरिआज्ञेचा
अभिप्राव ॥ व्रजांगनांसि बोधूनि सर्व ॥ येईल गौरव लाहूनी ॥ १७ ॥ तया नांव भ्रमरगीत ॥
गोपीउत्प्रेक्षासंकेत ॥ तें व्याख्यान इत्थंभूत ॥ अतंद्रित निरूपीं ॥ १८ ॥ अठ्ठेचाळिसामाजी कुब्जा ॥
वरोत्तीर्णाचिया काजा ॥ स्वयें भोगूनि त्रैलोक्यराजा ॥ अक्रूर गजाह्वया[1] धाडी ॥ १९ ॥ एकोणपन्नासीं
अक्रूर ॥ टाकूनियां हस्तिनापुर ॥ पांडवांसि विषमाचार ॥ न्याय निष्ठुर नृपा कथी ॥ २० ॥ इत्यादि
पंचाध्यायीकथनीं ॥ पूर्वार्ध संपवी बादरायणि ॥ तें महाराष्ट्र वाखाणूनी ॥ प्रेमळ श्रवणीं निववावें ॥ २१ ॥
ऐसी गुरुवरप्रेरणा ॥ दयार्णवाच्या अंतःकरणा ॥ होतां सज्जन सादर श्रवणां॥ करूनि कथना आदरीं ॥ २२ ॥
चव्वेचाळिसीं कंसवध ॥ केलिया नंतरें श्रीगोविंद ॥ पंचेचाळिसीं स्वव्रतबंध ॥ गुरुसांनिध्य संपादी ॥२३॥
तेथ अरणीगर्भ[2]संभव ॥ बादरायणि योगिराव ॥ कथा निरूपी स्वयमेव ॥ जाणोनि भाव नृपाचा ॥ २४ ॥

॥श्रीशुकउवाच॥पितरावुपलब्धार्थौविदित्वापुरुषोत्तमः ॥ माभूदितिनिजांमायांततानजनमोहिनीम्॥१

---

[1] हस्तिना पुराला. [2] शुकाचार्य.

॥टीका॥चव्वेचाळिसाव्याचिये अंतीं॥वसुदेवदेवकी सांडूनि भ्रांति॥रामकृष्णांतें वंदिती॥ईश्वरमूर्ति जाणोनी२५
पुत्र ह्मणोनि नंदेती क्षेम ॥ ह्मणती केवळ हें परब्रह्म ॥ ऐसीं जाणोनि विगतभ्रम॥ पुरुषोत्तम मनीं विवरी ॥२६॥
पुत्रदर्शनावाप्तिसुख ॥ त्याहूनि उत्कृष्ट पारमार्थिक ॥ केवळ ईश्वर आत्मतोक ॥ झालीं सम्यक लब्धार्थैं ॥ २७ ॥
पुत्रावाप्तीचा जो हरिख ॥ अविद्यासंभ्रम सांसारिक ॥ वास्तवज्ञानें पारमार्थिक ॥ कैवल्यसुख अनुभविती॥ २८ ॥
ऐसीं लब्धार्थैं जाणोनि पितरें॥ झणें हें होती भजनपरें ॥ ह्मणोनि स्वमाया जगदीश्वरें ॥ चमत्कारें पसरिली॥२९ ॥
जिये मायेचें मोहन॥पावोनि भ्रांत अवघे जन ॥नोळखे आपणा आपण ॥ विषयाचरण प्रिय मानी ॥ ३० ॥
तये मायेचा पडतां पडदा॥आनंद झाला बळगोविंदा॥मग पितरांच्या निरसिती खेदा॥मृदु अनुवादा करूनियां ३१

उवाचपितरावेत्यसाग्रजःसात्वतर्षभः ॥ प्रश्रयावनतःप्रीणन्नंबतातेतिसादरम् ॥ २ ॥

॥टीका॥दैवीसंपत्तिसंपन्न॥अनन्यबोधें ज्यांचें भजन॥सात्वत ऐसें त्यां अभिधान॥करिती सेवन ते ज्याचें॥ ३२॥
तो श्रीकृष्ण हृषीकेशी॥साग्रज ह्मणिजे बळरामेंसीं ॥ येवोनि जननीजनकांपासीं ॥ संतोषासी पाववित ॥ ३३ ॥
बद्धांजळि नम्र माथा॥आदरें ह्मणे अंब ताता ॥ तुमच्या स्नेहासी उत्तीर्णता ॥ आह्मी सर्वथा हों नशकों ॥ ३४ ॥

नास्मत्तोयुवयोस्तातनित्योत्कंठितयोरपि ॥ बाल्यपौगंडकैशोराःपुत्राभ्यामभवन्क्वचित् ॥ ३ ॥

॥टीका॥आह्मांनिमित्त तुमचें चित्त॥अहोरात्र हृद्रोगवंत॥कैसे असती उभय सुत॥ह्मणोनि संतत श्रम पावां॥ ३५
रात्रिदिवस आमुच्या ठायीं॥तुमचें हृदय वेधलें पाहीं॥तेणें स्वप्नामाजीही कांहीं ॥ सुखनवाई नानुभवां ॥ ३६ ॥

अभ्रें झांकतां मार्तंड॥मुकुळित होय पद्मिनीखंड ॥ तेंवि पूतनादि विघ्नें चंड ॥ जाणोनि अखंड झुरतसां ॥ ३७ ॥
आह्मांवरी पडतां विघ्नें॥तुह्मां जाकलिती दुःखस्वप्नें॥जागृतीमाजी तीं स्मरोनि रुदनें॥करूनि क्लिन्नें तुह्मी झालां ३८
आह्मांपासूनि पुत्रसुख ॥ तुह्मी नेणांचि निष्टंक ॥ बाल्य पौगंड कैशोरिक ॥ वयसा फोक वेंचल्या ३९ ॥
नाहीं पूजिली षष्ठिका ॥ नेणां दशरात्रोत्सव निका ॥ पुरंध्री घालिती पल्लका[2] ॥ त्या संतोषा नभोगिलें ॥ ४० ॥
नाहीं घडलें नामकरण ॥ जातकर्मादि स्वस्तिवाचन ॥ पुरंध्रीतोषण द्विजार्चन ॥ अभीष्टदान अघटित ॥ ४१ ॥
नाहीं खेळविलें उत्संगीं ॥ सुख नफवेचि कृताभ्यंगीं ॥ स्तन्य देवोनि अंगसंगीं ॥ सर्वभोगीं ननिवां हो ॥ ४२ ॥
आंग्या टोप्या पिंपळवानें ॥ श्रवणभूषणें नेत्रांजनें ॥ सालंकृतें पुत्रवदनें ॥ नाहीं नयनें देखिलीं ॥ ४३ ॥
पुत्र रिंगतां प्रांगणीं ॥ सस्निग्ध[1] पाहोनियां नयनीं ॥ परमानंद अंतःकरणीं ॥ तुह्मां लागोनि दुर्लभ तो ॥४४॥
स्मिताननें कलभाषणें ॥ बाळकांचिया गमनागमनें ॥ परमानंद भोगिजे मनें ॥ तुह्मांकारणें तो नफवे
॥ ४५ ॥ नाहीं वदन कुरवाळिलें ॥ नाहीं हृदयीं आलिंगिलें ॥ नाहीं हस्तीं संस्तोभिलें[3] नाहीं देखिलें
क्रीडेतें ॥ ४६ ॥ पयाज्यमिश्रित भरूनि वाटी ॥ लावूनि पुत्राचिये ओंठीं ॥ परमानंद भोगिजे पोटीं
॥ तुम्हां ते गोठी नफवली ॥ ४७ ॥ जेवितां सवें घेऊनि बाळ ॥ नाहीं मुखीं घातले कवळ ॥ बाळतृप्तीचा
सुखकल्लोळ ॥ तुम्हां केवळ नभोगला ॥ ४८ ॥ नाहीं परिमार्जिलीं गात्रें ॥ क्रीडा नाहीं देखिली नेत्रें ॥ बाळे
वांकी परिसोनि श्रोत्रें ॥ सुखासि पात्रें नझालां ॥ ४९ ॥ कुमारांची हे कौमार्यलीला ॥ तुम्हीं नाहीं देखिली डो-
ळां ॥ पौगंडवयसेचा सोहळा ॥ नाहीं भोगला तुम्हांसी ॥ ५० ॥ आह्मां पुत्रांचें किशोरपण ॥ नदेखती तुमचे

---

१ ओले. २ पाळण्यांत. ३ कुरवाळिलें.

नयन्न ॥ आह्मांनिमित्त दृढबंधन ॥ यालागीं उत्तीर्ण हों नशकों॥५१ ॥ कोणे समयीं कोणे ठायीं॥तुह्मांपुत्र सुख फावलें नाहीं ॥ एवं आह्मीच निर्दैवदेही ॥ ऐका तेंही निरूपण ॥ ५२ ॥

नलब्धोदैवहतयोर्वासोनौभवदंतिके ॥ याबालाःपितृगेहस्थाविंदंतेलालितामुदम् ॥ ४ ॥

॥टीका॥ कैसें आमुचें दैव कुडें ॥ तेणें विघडिलों कैवाडें॥ नाहीं क्रीडलों तुह्मांपुढें॥सुखसुरवाडें स्वानंदें ॥५३॥
मातापितरांच्या छायेसी ॥ वाढतां आह्लाद बाळकासी ॥ नाहीं भोगला तो आह्मांसी॥ झालों परदेशी दुर्दैवें ॥ ५४॥
बाळक्रीडा देखूनि नयनीं ॥ उल्लासती जनकजननी ॥ धांवोनि घेती पैं उचलोनी ॥ स्नेहें द्रवोनि आलिंगिती॥५५ ॥
तया सुखाच्या पडिपाडीं ॥ तुळणा नदेखों ब्रह्मांडीं ॥ नित्य नूतन घडिघडी ॥ आनंदकोडी भोगिती ॥ ५६ ॥
पितृगेहीं जीं वाढती बाळें ॥ तीं हे भोगिती सुखसोहळे ॥ आह्मां विघडिलें दैवें विफळें ॥नाहीं भोगिलें सांनिध्य॥ ५७
विफळ तुमचें ही प्रारब्ध ॥ आमुचें दुर्दैव तों प्रसिद्ध ॥ ह्मणोनि उभयतांही खेद ॥ नेणों आह्लाद परस्परें ॥ ५८ ॥
तुमच्या उपकारा उत्तीर्ण ॥ शताब्दपर्यंत वांचल्या जाण ॥ होऊं नशकों हें व्याख्यान ॥ करी श्रीकृष्ण तें ऐका॥५९

सर्वार्थसंभवोदेहोजनितःपोषितोयतः ॥ नतयोर्यातिनिर्वेशंपित्रोर्मर्त्यःशतायुषा ॥ ५॥

॥टीका॥ जन्मांतरींचें कर्म दुष्ट॥ यास्तव भोगिले वियोगकष्ट ॥ येही जन्मीं दुर[3]दृष्ट ॥ सेवा अभीष्ट घडोंनेदी॥६० ॥
मनुष्यदेहीं जन्मोनि नर ॥ शताब्द वांचल्याही समग्र ॥ मातापितरांचा उपकार॥ नोहे अणुमात्र उत्तीर्ण॥६१ ॥
काय ह्मणोनि ह्मणाल ऐसें ॥ तरि हें परिसा स्वस्थमानसें ॥पितृऋणासी उत्तीर्ण कैसें ॥ केंवि पुरुषें नहोइजे॥६२ ॥

---

१ कपटें करून. २ वृद्धि पावे. ३ दुर्दैव.

सुकृताचरणानुष्ठान ॥ चतुर्विधपुरुषार्थसाधन ॥ देहाधारें घडे पूर्ण ॥ जनकापासून तो देह ॥ ६३ ॥
स्ववीर्यदान गर्भधारण ॥ नवमासवरी क्लेशसहन ॥ अन्नपाननिद्रेवीण ॥ नित्य नूतन वेदना ॥ ६४ ॥
पुढें जन्मकाळींचे कष्ट ॥ गर्भ गर्भिणी भोगी वरिष्ठ ॥ जन्म पावल्या तनु लघिष्ठ ॥ इष्ट अनिष्ट अनभिज्ञ॥६५॥
ऐशिया गर्भगोळाप्रति ॥ माता वाढवी स्नेहाभिव्यक्ति॥आपुली विसरोनि विश्रांति ॥ अहोरात्रि तन्निष्ठ ॥७६ ॥
बाळकाच्या मळमूत्रवमनीं ॥ माता जेवितां नशिणे मनीं ॥ अहोरात्र स्तन्यपानीं ॥ नमनी ग्लानि तत्क्लेशें॥६७॥
बाळग्रहादि रोग विविधा ॥ दशननयनरुदनबाधा ॥ देवी गोंवर सोशितां कदा ॥ जनकें खेदा नपवती ॥ ६८ ॥
रक्तरेतें जठरीं जनन ॥ स्तन्यें अन्यें तनुपोषण ॥ रुग्णकाळीं भेषजदान ॥ मळादिसहन सर्वदा ॥ ६९ ॥
ज्याच्या रक्तमांसांचा देह ॥ तदाधारें पुरुषार्थसमूह ॥ त्या पितरांसि उत्तीर्णार्ह ॥ कोण निर्वाह सांगपां ॥ ७० ॥
देह वांचल्या शताब्दवरी ॥ पूर्ण ऐश्वर्य असतां घरीं ॥तथापि उत्तीर्णतेची परी ॥ नसे संसारीं घटिकेची॥७१॥
ऐसियां जननी जनकांप्रति ॥ ऐश्वर्यशरीरें जे वंचिती ॥ तयां पापिष्ठां नरकावाप्ति ॥ स्वमुखें श्रीपति बोलतसे॥७२॥

यस्तयोरात्मनःकल्पआत्मनाचधनेनच ॥ वृत्तिंनदद्यात्तंप्रेत्यस्वमांसंखादयंतिहि ॥ ६ ॥

॥टीका॥धन संपत्तिऐश्वर्यधर ॥ शरीरीं आरोग्य पटुतर॥पितृसेवनीं अतत्पर ॥ वंची शरीर धन धान्य ॥७३॥
नेदी पितरांसी जीवन ॥ त्यांचें नरक्षी वर्तन ॥ वृद्धें झालिया शक्तिहीन ॥ संगोपन जो नकरी ॥ ७४ ॥
तो नर निरयपात्रभूत ॥ देहीं असतां जीतची प्रेत ॥ मरणीं यमदूत अकस्मात्॥नेवोनि नरकांत घालिती॥७५॥
समुद्रीं नविझे वडवानळ ॥ तेंवि त्याचा जठरानळ ॥ क्षुधाशमनार्थ स्वमांसकवळ ॥ यमभट केवळ भक्षविती॥७६

आपुलीं मांसें आपुल्या दशनीं॥तोडोनि भक्षविती निशिदिनीं॥ऐशा अनन्त यातनाश्रेणी॥पितृसेवनविमुखातें ॥७७
यदर्थी व्यवस्थाविशेष ॥ स्वमुखें निरूपी आदिपुरुष ॥ सावध करूनि मानसास ॥ श्रोतीं अशेष परिसावें॥ ७८॥

मातरंपितरंवृद्धंभार्यांसाध्वींसुतंशिशुम् ॥ गुरुंविप्रंप्रपन्नंचकल्पोबिभ्रच्छ्वसन्मृतः ॥७॥

॥टीका॥निजपितरांची सेवारहित॥तरी तो पुत्र जीतची प्रेत॥वृथा त्याचा परमार्थस्वार्थ॥संशय येथ उपजला॥७९
दैव्यासुरीप्रकृतिमंत ॥ कोणीएकाचें मिश्राचरित ॥ ऐसे पितरांसि पुत्र बहुत ॥ त्यांमाजी क्वचित परमार्थी ॥८० ॥
मातापितरें भवभ्रमितें ॥ राजसांतामसां भजती स्वार्थें ॥ धिक्कारिती सात्विकातें ॥ परमार्थातें उपेक्षिती॥८१॥
तरी काय त्यांचा वृथा जन्म ॥ सात्विका केंवि ह्मणिजे अधम ॥ यदर्थी निर्णय पुरुषोत्तम॥ स्वमुखें स्वधर्म वाखाणी८२
कल्प ह्मणिजे सामर्थ्यवंत ॥ सदाचारी स्वधर्मनिरत ॥ तयाचा विध्युक्तपरमार्थ ॥ रमाकांत निरूपी ॥ ८३ ॥
वृद्ध माता वृद्ध पिता ॥ सुशील भार्या पतिव्रता ॥ पुत्र कुमार अदत्ता दुहिता ॥ यांतें त्यागितां प्रेतत्व ॥ ८४ ॥
सत्पुत्रासि परामार्थ मुख्य ॥ यातें पाळावें सम्यक ॥ मोहें कथिती जरी अविवेक ॥ तो निष्टंक नकरावा ॥ ८५ ॥
गुरुशुश्रूषा सर्वांशिरीं ॥ सुब्राह्मण जो सत्कर्मकारी ॥ त्यांसि रक्षिजे सर्वांपरी ॥ परमार्थथोरी हे मुख्य ॥ ८६॥
अनाततायी[1] शरणागत ॥ जंव तो होय संकटरहित ॥ तंववरी रक्षिजे अतंद्रित ॥ मुख्य परमार्थ या नांव ॥८७ ॥
ऐसियाची उपेक्षा करितां ॥ हानि होय इहपरमार्था ॥ जीतचि नर तो समान प्रेता ॥ यासी सर्वथा नातळिजे[2]॥८८॥
त्याच्या स्पर्शें सचैल स्नान ॥ हव्यकव्यां तो अनर्ह जाण ॥ देवपितर त्यासि देखोन ॥ जाती पळोन पापभयें ॥ ८९
इत्यादि पितृसेवारहित ॥ तो संसारीं जितचि प्रेत ॥ आह्मांसि तेचि दशा प्राप्त ॥ तो वृत्तांत हरि बोले ॥ ९० ॥

---

[1] जो घातकी नव्हे तो. [2] न स्पर्शावें.

तन्नावकल्पयोःकंसान्नित्यमुद्विग्नचेतसोः ॥ मोघमेतेऽव्यतिक्रांतादिवसावामनर्चतोः ॥ ८ ॥

॥टीका॥तस्मात् शिशुत्वें असमर्थ ॥ कंसापासोनि भयत्रस्त ॥ सर्वकाळ उद्विग्नचित्त ॥ जीतचि प्रेत पैं झालों
॥ ९१ ॥ यावत्काळ सेवेविणें ॥ तुमच्या यथोक्त अनर्चनें[1] ॥ आमुचें निष्फळ झालें जिणें ॥ तें केंवि वदनें बोलावें
॥ ९२ ॥ आजिपर्यंत आयुष्याचे ॥ दिवस निष्फळ गेले साचे ॥ अर्चन घडलें नाहीं तुमचें॥ऐसें वाचे हरि बोले
॥९३॥तस्मात् आह्मी सापराध॥तुम्ही कृपाब्धि अगाध॥गतगोष्टीचा नकीजे खेद॥ह्मणोनि मुकंद प्रार्थितसे ॥ ९४

तत्क्षंतुमर्हथस्तातमातनौपरतंत्रयोः ॥ अकुर्वतोर्वांशुश्रूषांक्लिष्टयोर्दुर्हृदाभृशम् ॥९ ॥

॥टीका॥आह्मां पासूनि जें अंतर पडलें ॥ तें तुह्मीं पाहिजे क्षमा केलें ॥ स्नेहवर्जितें विघडिलें ॥ कंसें दुष्टें दुर्जनें
॥ ९५ ॥ कंसभयास्तव सक्लिष्ट आह्मी ॥ शिशुत्वें परतंत्र पशुपसद्मीं ॥ विमुख तुमचे शुश्रूषाकर्मीं॥तें सर्व तुह्मीं
क्षमावें ॥९६॥जननीजनकें सहज स्नेहाळें ॥ आह्मी सापराध तरी बाळें॥सर्व क्षमूनि पाळणें लळे॥इत्यादि गोपाळें
प्रार्थितां॥ ९७ ॥शुक ह्मणे गा परीक्षिति ॥ ऐशा अनेक कारुण्योक्ति ॥ बोलता झाला जगत्पति ॥ त्या संक्षेपरीती
तुज कथिल्या ॥ ९८ ॥

॥श्रीशुकउवाच ॥इतिमायामनुष्यस्यहरेर्विश्वात्मनोगिरा ॥ मोहितावंकमारोप्यपरिष्वज्यापतुर्मुदम्॥१०॥

॥टीका॥ विश्वात्मा जो आदिपुरुष॥नटला मायामनुष्यवेष॥इत्यादि तेणें मधुरोक्तींस॥वदोनि जनकास मोहिलें॥९९
त्याची ऐकोनि मोहक गिरा ॥ द्राव आला पैं अंतरा ॥ हृदयीं कवळूनियां कुमरां ॥ आनंदनिर्भरा जाहलीं ॥१००॥

---

[1] अपूजनानें.

मोहें कवळूनियां जनकीं ॥ उभय कुमर घेवोनि अंकीं ॥ आनंदाश्रूंचिया उदकीं ॥ दोघांमस्तकीं वर्षती ॥ १ ॥

सिंचंतावश्रुधाराभिःस्नेहपाशेनचावृतौ ॥ नकिंचिदूचतूराजन्बाष्पकंठौविमोहितौ ॥ ११ ॥

॥टीका॥ अश्रुधारा स्रवती नयन॥तेणें शिंपिती निजनंदन॥स्नेहपाशांचें आवरण॥पडतां ज्ञान विसरलीं ॥२॥
कंसहननादिप्रतापवंत ॥ ईश्वरभावें भाविले सुत ॥ भगवद्वचनें मोहग्रस्त ॥ तो वृत्तांत विसरलीं ॥ ३ ॥
पुत्रमोहें झळंबलीं ॥ ईश्वरभावना विसरलीं ॥ शब्द नफुटे स्तब्ध झालीं ॥ स्फुंदों लागलीं ममतेनें ॥ ४ ॥
कंठ दाटला स्नेहभरें ॥ नयनीं बाष्पांबु पाझरे ॥ वदनीं ननिघती अक्षरें ॥ मोहें यदुवरें भुलविलीं ॥ ५ ॥

एवमाश्वास्यपितरौभगवान्देवकीसुतः ॥ मातामहंतूग्रसेनंयदूनामकरोन्नृपम् ॥ १२ ॥

॥टीका॥कुशळा मनुष्यांचिये परी॥पितरां आश्वासूनियां हरि॥जो जन्मला देवकीउदरीं ॥ऐश्वर्यधारी अचिंत्य
॥ ६ ॥ तंव अक्रूरोद्धवादिक ॥ अंतरंगकृतविवेक ॥ ह्मणती नगर अराजक[1] ॥ सहसा क्षणैक नटकावें ॥ ७ ॥
नृपावांचुनी नृपासन ॥ राष्ट्र नगर पडलें शून्य ॥ प्रजा पीडिती दस्युगण ॥ नसतां शासन नृपाचें ॥ ८ ॥
ऐसें ऐकोनि चक्रपाणि ॥ उग्रसेनाप्रति येऊनी ॥ कंसदुःखा परिहरूनी ॥ राज्यासनीं बैसविला ॥ ९ ॥
देवकीचा तातभ्राता ॥ उग्रसेन कंसपिता ॥ तयासि बोले मन्मथजनिता ॥ तें तूं कुरुनाथा अवधारीं ॥ १० ॥

आहचास्मान्महाराजप्रजाश्चाज्ञप्तुमर्हसि ॥ ययातिशापाद्यदुभिर्नासितव्यंनृपासने ॥ १३ ॥

॥ टीका॥हरि ह्मणे गा महाराजा ॥ आह्मी समस्त तुझिया प्रजा ॥ आज्ञानियम वाहूं तुझा ॥शासनीं सह-

---

[1] राजरहित.

जा तूं अर्ह ॥ ११ ॥ जरी तूं आह्मांसि सिंहासनीं ॥ बैसा ह्मणोनि प्रार्थिसी वचनीं ॥ तरी ययातिशाप यदुसंतानीं ॥ पूर्वींहुनी अनुल्लंघ्य ॥ १२ ॥ जरा घेवूनि तारुण्य देणें ॥ह्मणतां ययाति यदुकारणें॥निर्भर्त्सूनि निष्ठुर वचनें ॥ विमुख तेणें दवडिला ॥ १३ ॥ तेणें शापिला स्वसुत यदु ॥ वयसा नेदुनी निष्ठुर वादू॥करिसी तरी हा शापशब्द ॥ऐकें विशद पैं माझा ॥ १४ ॥ तुझिये वंशीं साम्राज्यचिह्न ॥ नसो कोणासि सिंहासन ॥ अनुल्लंघ्य माझें हें शापवचन ॥ लंघितां संतान क्षय पावे ॥ १५ ॥ ऐशिया ययातिशापास्तव ॥ आह्मांसि सिंहासन अनर्ह ॥ तूं जरी ह्मणसी मी यादव ॥ तरी शापभेव तूं नधरीं ॥ १६ ॥ राया माझिये आज्ञेवरून ॥ अंगीकारीं तूं सिंहासन ॥ तुज नबाधी शापवचन ॥ करीं शासन यदुचक्रा ॥ १७ ॥ जरी तूं ह्मणसी जराजरठ[1]॥ मजला अयोग्य राज्यपट ॥ सामंत भूपति बळिष्ठ ॥ देती कष्ट प्रजांसी ॥ १८ ॥ ऐशी शंका नधरीं मनीं ॥ सेवक असतां मी चक्रपाणि ॥ तुझें शासन त्रिभुवनीं ॥ यदुमेदिनी ते किती ॥ १९ ॥

मयिभृत्यउपासीनेभवतोविबुधादयः ॥ बलिंहरंत्यवनताःकिमुतान्येनराधिपाः ॥ १४ ॥

॥टीका॥तुझा भृत्य मी आज्ञाधार ॥ असतां वरुणेंद्र इंद्रयमकुबेर ॥ पूजा अर्पूनि सादर ॥ होवोनि किंकर ओळंगिती[2] ॥ २० ॥ तेथ माण्डलिक नरपति ॥ अथवा होतू कां चक्रवर्ती॥त्यांची येथ गणना किती ॥ लावीन ख्याति कृतांता ॥ २१ ॥ मज सेवितां तुझे चरण ॥ सुरवर येती तुजला शरण॥ अन्य भूपांचा केवा कोण ॥ प्रजापीडन करावया ॥ २२ ॥ इत्यादिवचनीं मातामह ॥ कृष्णें करूनि निःसंदेह ॥ सिंहासन देवूनि पहा हो ॥

---

१ जरेमुळें वृद्ध झालेला. २ सेविती.

छत्र धरिलें स्वहस्तें ॥ २३ ॥ पटहघोषें आज्ञानिदेश ॥ जाणविला माण्डलिकांस ॥ ते वोळंगती होवोनि दास ॥
प्रजा विशेष सुखावल्या ॥ २४ ॥ देशोदेशीं अभयपत्रें ॥ प्रजा आणूनि पाहिल्या नेत्रें ॥ तद्वृत्त ऐकोनियां त्यांचेनि
वक्रें ॥ सुखासि पात्रें त्या केल्या ॥ २५ ॥ त्यानंतरें विषयपति ॥ आपले गोत्रज बन्धुज्ञाती ॥ कंसभयास्तव
दिगंतीं ॥ प्रजांप्रति पुसोनि ते ॥ २६ ॥

सर्वान्स्वज्ञातिसंबंधान्दिग्भ्यःकंसभयाद्गतान् ॥ यदुवृष्ण्यंधकमधुदाशार्हकुकुरार्यकान् ॥ १५ ॥
सभाजितान्समाश्वास्यविदेशावासकर्शितान् ॥ न्यवासयत्स्वगेहेषुवित्तैःसंतर्प्यविश्वकृत् ॥ १६ ॥

॥ टीका ॥ कंसहननादि समस्त ॥ पत्रीं लिहूनि अभीष्टवृत्त ॥ सम्मानूनि यथायुक्त ॥ कुटुंबें सहित आणिले ॥ २७ ॥
आपुले स्वजन सुहृद आप्त ॥ बन्धु सोयरे दिगंतीं गुप्त ॥ कंसप्रतापानळें दीप्त ॥ भयसंतप्त सर्वदा ॥ २८ ॥
यादव वृष्णि अंधक मधु ॥ दाशार्ह कुकुर आर्यक विविधु ॥ भोज सात्वत समस्त बंधु ॥ आणिले प्रसिद्ध सम्मानें २९
सभास्थानीं ज्यांसि मान ॥ ते ते पदीं त्यां स्थापून ॥ कंसभयें जो पावले शीण ॥ तो संपूर्ण विसरविला ॥ ३० ॥
नष्टचर्य प्रवासें शिणलें ॥ धनीं रत्नीं ते सुखी केले ॥ स्वस्वगेहीं संस्थापिले ॥ आश्वासिले जगदीशें ॥ ३१ ॥
कृष्णहस्तें पावोनि मान ॥ पूर्णानंदें निवाले स्वजन ॥ गौण मानूनि शक्रासन ॥ ते निजसदन सेविती ॥ ३२ ॥

कृष्णसंकर्षणभुजैर्गुप्तालब्धमनोरथाः ॥ गृहेषुरेमिरेसिद्धाःकृष्णरामगतज्वराः ॥ १७ ॥

॥ टीका ॥ रामकृष्ण जे महाभुज ॥ ब्रह्मांडभरितप्रतापतेज ॥ त्यांचे छायेसि स्वगोत्रज ॥ सहजीं सहज निवाले ॥ ३३ ॥
आपुलाले पाळूनि देश ॥ प्रजांसि देवूनि संतोष ॥ लाहोनि पूर्ण मनोरथांस ॥ पूर्वश्रमास विसरविले ॥ ३४ ॥

झाडोझाड देशोदेशीं ॥ कंसें लाविले जे भिकेसी ॥ रामकृष्णें त्या कष्टांसी ॥ निरसूनि स्ववासीं निववविले ॥ ३५ ॥
रामकृष्णांचे कृपेकरून ॥ ज्यांचा निरसिला समस्त शीण ॥ सदा सर्वदा सुखसंपन्न ॥ सेविती कृष्ण कुरुवर्या॥ ३६ ॥

वीक्ष्यंतोऽहरहःप्रीतामुकुंदवदनांबुजम् ॥ नित्यंप्रमुदितंश्रीमत्सदयस्मितवीक्षणम् ॥ १८ ॥

॥टीका॥श्रीकृष्णाचें वदनांबुज॥नित्य नूतन तेजःपुंज॥पाहोनि नयनें प्राशिती सहज॥नाचती भोज सप्रेमें॥ ३७॥
कृष्णवदनाब्ज ह्मणाल कैसें ॥ नित्य प्रमुदित जें उल्लासें ॥ लावण्यलक्ष्मीसदयहास्यें ॥आपांगमोक्षें विराजित ॥ ३८॥
ह्मणाल मुकुंदवदनारविंद॥अनुदिन नयनीं प्राशितां स्निग्ध॥कोण तो लाभ त्यां उपलब्ध॥तरी तो प्रसिद्ध अवधारा॥

तत्रप्रवयसोऽप्यासन्युवानोऽतिबलौजसः ॥ पिबंतोऽक्षैर्मुकुंदस्यमुखांबुजसुधांमुहुः ॥ १९ ॥

॥टीका॥ चंद्रमंडळींच्या आमृतधारा॥चकोर प्राशिती नेत्रद्वारा॥कोणा नहोती जरी गोचरा॥तरी चकोरां तोषविती॥
तैसा हरिमुखपंकजरस ॥ जे जे सेविती वृद्धप्रवयस ॥ आंगीं तारुण्य बाणे त्यांस ॥ बळें विशेष तेजस्वी ॥ ४१ ॥
वृद्ध जरठ झाले तरुण ॥ वीर्यबळिष्ठ प्रतापपूर्ण ॥ धैर्य शौर्य गांभीर्य गुण ॥ दया दाक्षिण्य द्युतिमंत ॥ ४२ ॥
भगवन्मुखारविंदामृतें ॥ इत्यादि गुणाढ्य झाले पुरते॥ तंव तंव प्रेमादरें बहुतें ॥ हरिवदनातें प्राशिती ॥ ४३ ॥
नेत्रद्वारा अतिसादर ॥ हरिमुखपीयूष वारंवार ॥ प्राशनालागीं अतितत्पर ॥ लहान थोर सर्वदा ॥ ४४ ॥
असो यादवांची हे कथा ॥ कृष्णें सम्मानिलें समस्तां ॥ यानंतरें झाला येता ॥ व्रजप होता त्या ठायीं ॥ ४५ ॥

अथनंदंसमासाद्यभगवान्देवकीसुतः ॥ संकर्षणश्चराजेंद्रपरिष्वज्येदमूचतुः ॥ २० ॥

॥टीका॥देवकीतनय श्रीभगवान॥सहित अग्रज संकर्षण॥नंदादि व्रजयूथा जाऊन॥ क्षेमा कवळून बोलती ॥४६॥
ऐकें राया कौरवपति ॥ क्षेम देऊनि नंदाप्रति ॥स्वमुखें स्मरोनियां उपकृति ॥ बोले श्रीपति मृदुवाक्यें ॥ ४७ ॥

पितर्युवाभ्यांस्निग्धाभ्यांपोषितौपालितौभृशम् ॥ पित्रोरभ्यधिकाप्रीतिरात्मजेष्वात्मनोऽपिहि ॥ २१ ॥

॥टीका॥यशोदा माउली स्नेहाळ॥ताता तुह्मी पुत्रवत्सल॥केला आमुचा प्रतिपाळ ॥यावत्काळपर्यंत ॥ ४८ ॥
तुमच्या स्नेहाची कळामात्र ॥ कथनीं समर्थ नोहे वक्र ॥ स्वयें श्रमोनि अहोरात्र ॥ पाळिले पुत्र कृपेनें ॥ ४९॥
आपुलें करूनि तनुशोषण ॥ केलें आमुचें संरक्षण ॥ ब्राह्मी माया हें विचित्र जाण ॥ नव्हे कारण आश्चर्या॥५० ॥
पशुपक्ष्यादि समस्त योनि ॥ आपणाहूनि सुतपाळणीं ॥ झळंबती बहुतां गुणीं ॥ईश्वरकरणी विचित्र हे ॥५१॥
समस्तांसी आत्मप्रीति ॥ पुत्र आत्मा हे प्रतीति ॥ ह्मणोनि पडे ममताभ्रांति ॥ सुखविस्मृति स्वतनूची ॥५२॥
यालागीं आपुल्या देहाहून ॥ करिती आत्मजतनुपोषण ॥ विशेष तुमचें स्नेहाळपण ॥वदतां मौन वाचेसी॥५३॥
इतरां पितरांहूनि वरिष्ठ॥आह्मांनिमित्त सोसिले कष्ट ॥ विघ्नें उदेलीं गरिष्ठ ॥ साहिलें अनिष्ट तज्जनित॥५४॥
व्रजा येऊनि पूतना ॥ पाजिती झाली उल्बण पान्हा ॥ जें ते मुकली आपुल्या प्राणा ॥तें व्रजभुवना महाविघ्न५५
राक्षसीतनु दीड योजन ॥ पडतां पीडिले व्रजींचे जन ॥ तिचें करूनि तनुखंडन ॥ केलें दहन समस्तीं ॥५६॥
तेव्हां आमुच्या संरक्षणीं ॥ ब्राह्मण घालूनि शांतिपठनीं॥वेंचिल्या धनधान्यांच्या श्रेणी॥इतरांलागूनि हें नाहीं५७
जन्मनक्षत्र उत्साहदिवसीं ॥ शकटभंगें भय मानसीं ॥ मानूनि धनधान्यें द्विजांसी ॥ धेनुवस्त्रांसी वांटिलें ॥ ५८ ॥
तृणावर्त्त महादुष्ट ॥ तेणें व्रजजना दिधले कष्ट ॥ मेला स्वपापें पापिष्ठ ॥ तुह्मी मन्निष्ठ भयभीत ॥ ५९ ॥

कांटा खडा विंचू किडा ॥ ह्मणें आह्मांसि करील पीडा ॥ ह्मणोनि खेळतां चहूंकडां ॥ मागां पुढां संरक्षां ॥ ६० ॥
यमलार्जुनांचिये पतनीं ॥ विचार करूनि पशुपजनीं ॥ आह्मांचिसाठीं कळवळूनो ॥ वृंदावनीं प्रवेशलां ॥ ६१ ॥
तेथ अघ बक वत्सासुर ॥ धेनुक कालिय विखार ॥ इत्यादि विघ्नें लहान थोर ॥ पावलां घोर आह्मांसाठीं ॥ ६२ ॥
आह्मांनिमित्त आखंडळ[1] ॥ वर्षोनियां करकांजळ[2] ॥ क्षोभें बुडवितां गोकुळ ॥ तुह्मीं तें सकळ साहिलें ॥ ६३ ॥
ऐसे अनेक दैत्य दुष्ट ॥ प्रलंब केशी व्योम अरिष्ट ॥ विचित्र माया करिती कपट ॥ तुह्मीं ते कष्ट सोसिले ६४॥
अक्रूरें आणितां मथुरापुरीं॥आमुचा कळवळा तुमचे जठरीं॥आह्मां निमित्त सभेमाझारी॥कंस तुह्मांवरी कोपला६५॥
यालागीं इतरां पितरांहूनी ॥तुह्मी आमुच्या प्रतिपालनीं॥श्रमलां परम स्नेहाळपणीं॥दिवस रजनी नह्मणतां ६६॥
स्तन्यपानें करलालनें ॥ अभ्यंगादि संस्तोभनें ॥ दधिदुग्धाज्य अन्नाशनें ॥ वसनें भूषणें वाढविलें ॥ ६७ ॥
तें तें काय आठवूं किती ॥ तुमच्या स्नेहाची अभिव्यक्ति ॥ वर्णितां मौनावे भारती ॥ ह्मणे श्रीपति नंदातें ६८॥
ह्मणें तूं ताता ह्मणसी मुखें॥वसुदेवदेवकी तुमचीं जनकें ॥ येचिविषीं वचन निकें ॥ सादर आयकें पशुपेंद्रा॥६९॥

सपितासाचजननीयौपुष्णीतांस्वपुत्रवत् ॥ शिशून्बंधुभिरुत्सृष्टानकल्पैःपोषरक्षणे ॥ २२ ॥

॥टीका॥वीर्यदानें जन्मविता॥तो बोलिजे प्रथम जनिता॥उपनयनादि संस्कार करिता॥द्वितीय पिता तो होय७०
औरस पुत्राचि समान ॥ परमार्थबुद्धी विद्याभ्यसन ॥ करवी सांडूनि भेदभान ॥ जनक जाण तृतीय तो ॥ ७१ ॥
चतुर्थ जनक तो आपत्काळीं ॥ अन्न देवूनियां प्रतिपाळी ॥ पांचवा दुर्मरण जो टाळी॥अभयशाली सर्वस्वें ॥७२॥

---

[1] इंद्र. [2] गारा व उदक.

हा पंचजनकविचार ॥ बोलती मन्वादि स्मृतिकार ॥ यांही माजी मम निर्धार ॥ ऐक साचार भो ताता ॥ ७३ ॥
तोचि पिता तेचि माता ॥ स्वपुत्रासमान पोषण करितां ॥ अंतरीं नस्पर्शे भिन्नता ॥ आह्लाद चित्ता समसाम्य ७४॥
पोषणीं असमर्थ जनकजननी ॥ अथवा बंधुवर्गही कोणी ॥ सर्वीं टाकिले उपेक्षूनी ॥जे त्यां लागूनि पाळिती ७५
तेंचि ययार्थ मातापितरें ॥ उपेक्षा करितां पूर्वील इतरें ॥ ऐसीं ताता धर्मोत्तरें ॥ मम निर्धारें जाणावीं ॥ ७६ ॥
वसुदेवदेवकी जनकजननी ॥ होतीं कंसाचिये बंधनीं ॥ तिहीं जठरीं जन्मवूनी ॥ उपेक्षूनी टाकिलों ॥ ७७ ॥
तुह्मीं पाळिलें निस्सीम प्रेमें॥स्नेहाळपणें अवाप्तकामें॥आतां माझ्या प्रार्थनानियमें ॥ व्रजा संभ्रमें जाइजे ॥ ७८ ॥

यातयूयंव्रजंतातवयंचस्नेहदुःखितान् ॥ ज्ञातीन्वोद्रष्टुमेष्यामोविधायसुहृदांसुखम् ॥ २३ ॥

॥टीका॥आतां माझिया संवगड्यांसहित॥घेवूनि बल्लवगण समस्त॥तुह्मीं व्रजपुरा जावें त्वरित॥माझा संकेत अवधारा
सुहृदां आप्तां यादवगणां॥आह्मी भेटोनि थोरां लहानां॥सुखसंपन्न करूनि जाणा॥ तुमच्या दर्शना मग येऊं ॥ ८० ॥
सुहृद ज्ञाति स्नेहाळपणें ॥ आमुच्या दुःखें शिणती शीणें ॥ त्यांसि सुखाचें पारणें ॥ लागे करणें नावेक ॥ ८१ ॥
यालागीं समस्तांचिया भेटी ॥ परस्परें संवादगोठी ॥ झालिया सुटतील हृदयगांठी ॥ स्नेहदृष्टी न्याहाळितां ॥८२॥
यालागीं व्रजा जाइजे तुह्मीं॥सुहृद तोषवूनि येऊं आह्मी ॥ऐशिया मधुरोक्तीच्या निमयीं ॥स्नेहसंभ्रमीं सांत्वन ॥८३॥

एवंसांत्वय्यभगवान्नंदंसव्रजमच्युतः ॥ वासोऽलंकारकुप्याद्यैरर्हयामाससादरम् ॥ २४ ॥

॥टीका॥ज्याचें ऐश्वर्य अव्याहत॥मनुष्यनाट्यें नव्हे च्युत॥यालागीं नांवें जो अच्युत॥श्रीभगवंत जगदात्मा ८४
तेणें समस्त बल्लवगणां ॥ आणि व्रजस्थां अवघ्या जनां॥नंदापासीं वस्त्राभरणां ॥ करूनि स्मरणा अर्पिलें ॥ ८५ ॥

नंद यशोदा रोहिणी ॥ आणि समस्ता बल्लवपत्नी ॥ स्मरणपूर्वक अनुक्रमणीं ॥ वस्त्राभरणीं गौरविलीं ॥ ८६ ॥
सुवर्णरजतवर्जित पात्रें ॥ गोरसव्यवहारीं पवित्रें ॥ पानपचनादि विचित्रें ॥ इच्छामात्रें समर्पिलीं ॥ ८७ ॥
यांही वेगळीं वस्तुजातें ॥ रत्नें माणिक्यें मुक्तें बहुतें ॥ समर्पिलीं समस्तांतें ॥ श्रीभगवंतें स्नेहाळें ॥ ८८ ॥
सादर ह्मणिजे स्नेहभरें ॥ अचिंत्यैश्वर्यसत्ताधरें ॥ नंदादिकांचीं स्निग्धांतरें ॥ पदार्थमात्रें प्रलोभिलीं ॥ ८९ ॥

इत्युक्तस्तौपरिष्वज्यनंदःप्रणयविह्वलः ॥ पूरयन्नश्रुभिर्नेत्रेसहगोपैर्व्रजंययौ ॥ २५ ॥

॥ टीका ॥ यदुकुळाचें समाधान ॥ करूनि व्रजपुरा येईन ॥ ऐसें नंदें ऐकतां वचन ॥ मोहें मन झळंबलें ॥ ९० ॥
ऐसा नंद बोधिला असतां ॥ स्वपुत्रभावना विपरीत होतां ॥ वियोगदुःखें कवळिलें चित्ता ॥ तेणें वक्तृता निरोधिली ॥ ९१
रामकृष्ण दोघे जन ॥ हृदयीं धरिले आलिंगून ॥ नकरीच मस्तकावघ्राण ॥ वर्णविवर्ण उमजोनी ॥ ९२ ॥
परंतु स्नेहाचा कळवळा ॥ तेणें सद्गदित झाला गळा ॥ टपटपां अश्रु स्रवती डोळां ॥ वदनकमळा न्याहाळी ॥ ९३ ॥
अधोमुख पुसी नेत्रां ॥ मोहें कंप दाटला गात्रां ॥ हृदयीं कवळूनि उभय पुत्रां ॥ पाहे वक्त्रा पुनः पुनः ॥ ९४ ॥
तंव तंव वियोगदुःखलहरी ॥ विचित्र उठती अभ्यंतरीं ॥ कैसा प्रवेशों व्रजपुरीं ॥ कोण्या उत्तरीं व्रज बोधूं ॥ ९५ ॥
यशोदाप्रमुख गौळणी वृद्धा ॥ पुत्रस्नेहें परमस्निग्धा ॥ त्यांसी नसोसे वियोगबाधा ॥ ह्मणती मुकुंदा कां त्यजिलें ॥ ९६ ॥
तेव्हां त्यांसि सांगूं काय ॥ पुत्रस्नेहें जाकळे हृदय ॥ पूर्वक्रीडेचा आठव होय ॥ नुचले पाय प्रयाणीं ॥ ९७ ॥
परंतु स्वपुत्र झाले पर ॥ तेही होवोनियां निष्ठुर ॥ ताता ठाकिजे व्रजपुर ॥ निरोप उत्तर हें दिधलें ॥ ९८ ॥

---

१ वस्तुसमूह.

आतां किमर्थ राहिजे येथें ॥ ऐसें विवरूनियां चितें ॥ गोपां आज्ञापी संकेतें ॥ वृष शकटांतें जुंथवी[1] ॥ ९९ ॥
कृष्णें दीधली जे सामग्री ॥ अवघी भरूनि शकटावरी ॥ सज्ज होवोनि पशुपभारीं ॥ नंद व्रजपुरीं पावला ॥ २०० ॥
पुढें पातले व्रजींचे लोक ॥ व्यवस्था ऐकोनियां सम्यक ॥ त्यांसि झाला हर्ष शोक ॥ तो नावेक वर्णावा ॥ १ ॥
परंतु कठिन नोहे हृदय ॥ त्याहूनि अवस्था कथिता होय ॥ यालागीं नवदे व्यासतनय ॥ हें कुरुवर्य समजला ॥ २ ॥
ह्मणोनि नकरितां ते गोठी ॥ पुढील कथा लक्षूनि दिठी ॥ केली वसुदेवें राहटी ॥ ते बाक्पुटीं शुक वर्णी ॥ ३ ॥

अथशूरसुतोराजन्पुत्रयोःसमकारयत् ॥ पुरोधसाब्राह्मणैश्चयथावद्विजसंस्कृतिम् ॥ २६ ॥

॥टीका॥नंद बोळवूनियां व्रजपुरा॥रामकृष्ण निजमंदिरा॥आलिया नंतर मातापितरां॥पुत्रसंस्कारा प्रवृत्ति ॥४॥
शूरसेनापासूनि प्रभव ॥ शूरसुत तो वसुदेव ॥ मेळवोनि द्विजसमुदाव ॥ करवी अपूर्व संस्कार ॥ ५ ॥
गर्गाचार्य पुरोहित ॥ आणि द्विजवर्य समस्त ॥ विवरूनियां श्रुतिसंमत ॥ स्वयें निजसुत संस्कारी ॥ ६ ॥
सम्मानूनि यादवकुळें ॥ सोयऱ्यांसि धाडिलीं मूळें ॥ बिढागारासि योजिलीं स्थळें ॥उभविलीं अमळें वितानें॥७॥
पाचारूनि शिल्पकार ॥ त्वाष्ट्रतुळणेचे परम चतुर ॥ शृंगारिलें मथुरापुर ॥ ध्वजा विचित्र उभविल्या ॥ ८ ॥
वनें उपवनें काननें ॥ शृंगारविलीं आज्ञावचनें ॥ नगरा भोंवतीं चित्रस्थानें ॥ देवायतनें शोभविलीं ॥ ९ ॥
परिखामंडित[2] पुरगोपुरें[3] ॥ पण्यवीथी[4] हाट[5] चौबारें[6] ॥ द्वारें देहळ्याँ दामोदरें ॥ निर्जरपुरें लाजविती ॥ १० ॥
ब्राह्मणक्षत्रियवैश्यसदनें ॥ वार्धुषिकांचीं विचित्र भुवनें ॥ अनेक यातींचीं अनेक वर्णें॥विविध स्थानें शोभविलीं ११

---

१ जुंपवी. २ खंदकांनीं सुशोभित. ३ द्वारावरील इमारती. ४ दुकानांच्या पंक्ति. ५ बाजार. ६ चवाठे. ७ उंबरठे.

हर्म्यगोपुरीं धवळारीं[1] ॥ रत्नजडित कळशहारी ॥ जैसे प्रकटले ध्वांतारि[2] ॥ नगरांबरी बहुरूपें ॥ १२ ॥ विचित्र
वितानें[3] पताका ॥ शृंगारिल्या पुरभूमिका ॥ सदनोसदनीं समस्त लोकां ॥ उत्साह निका हरिप्रेमें ॥ १३ ॥ ठायीं
ठायीं ऊर्ध्वजळें ॥ उडती शिल्पकौशल्यबळें ॥ अनेक वाद्यें वादकमेळें ॥ स्थळोस्थळीं प्रतिष्ठिलीं ॥ १४ ॥ मूळपत्रें
सुहृद आले ॥ बिढागारीं निवेशविले ॥ उद्धवअक्रूरां निरूपिलें ॥ पारपत्य तद्विषयीं ॥ १५ ॥ मुक्तामंडित
कनकपत्रीं ॥ तोरणें बांधिलीं पुरगोपुरीं ॥ सर्वनगरी सदनद्वारीं ॥ तोरणहारी विराजती ॥ १६ ॥ मखरें मंडप
कदळीस्तंभ ॥ उभयवीथी सजल कुंभ ॥ पल्लवपट्टिका दधिकुसुमांभ ॥ दीप स्वयंभ लखलखिती ॥ १७ ॥
सर्व पुरंध्री सालंकृत ॥ देखोनि देवांगना लज्जित ॥ निर्जरांची कायसी मात ॥ स्वयें भगवंत जे ठायीं ॥ १८ ॥
नारायणाची उपमा नरां ॥ लक्ष्मीसमान पुरसुंदरा ॥ वैकुंठ तुळिजे मथुरापुरा ॥ वसुदेवकुमरां संस्कारीं ॥ १९ ॥
सभास्थानीं उग्रसेन ॥ भवंता मंडित यादवगण ॥ वरिष्ठ पाचारूनि ब्राह्मण ॥ पत्रिकाशोधन करविलें ॥ २० ॥
सूर्य चंद्र बृहस्पति ॥ एवं नवग्रहांची पंक्ति ॥ बळिष्ठ बट्वांचार्यांप्रति[4] ॥ मुख्य गर्गोक्ति साधिली ॥ २१ ॥ ग्रहेंहोरा[5]
आणि द्रेष्काण[6] ॥ नवांश द्वादशांश त्र्यंशांश पूर्ण ॥ निर्मळ इष्ट वर्गशोधन ॥ पंचकोत्तीर्ण दिनशुद्धि ॥ २२ ॥
जगज्जनकाचा जनक हरि ॥ त्याचिये विध्युक्त संस्कारीं ॥ काळ अनुकूळ ग्रहनक्षत्रीं ॥ होऊनि करी परिचर्या ॥ २३ ॥
जातकर्मादि संस्कार ॥ अतिक्रांत बहुवासर ॥ प्रायश्चित्त निष्कृतिपर ॥ तदनुसार द्विजाज्ञा ॥ २४ ॥ हेमरत्नें
वसनें रस ॥ गो भू धान्यें पूर्णकलश ॥ यथायोग्य ब्राह्मणांस ॥ दीधलीं अशेष गर्गाज्ञा ॥ २५ ॥ दशादिशांचीं
विप्ररत्नें ॥ आणिलीं सम्मानें प्रयत्नें ॥ त्यांसि विध्युक्त गोदानें ॥ केलीं अर्पणें तें ऐका ॥ २६ ॥

---

[1] मंदिर. [2] सूर्य. [3] छतें. [4] बटु ब्र०मुंजा, त्याचा आचार्य. [5] अर्ध लग्न. [6] राशीचा दशांशात्मक विभाग.

तेभ्योऽदाद्दक्षिणांगावोरुक्ममालाःस्वलंकृताः ॥ स्वलंकृतेभ्यःसंपूज्यसवत्साःक्षौममालिनीः ॥ २७ ॥

॥ टीका ॥ साधु सवत्सा सुशीळा तरुणी ॥ शुभलक्षणा पयस्विनी ॥ हेममाळाकंठाभरणी॥ स्वर्णशृंगी रौप्यखुरी २७
कांसदोहा क्षौमपृष्ठी ॥ दिव्य नैवेद्य हेमताटीं ॥ द्विजवर बैसवूनियां पाटीं ॥ मंत्रपाठीं सुपूजित ॥ २८ ॥
अर्घ्य पाद्य शुद्धाचमन ॥ वस्त्राभरणें समर्पून ॥ आंगीं चर्चूनि सुचंदन ॥ सुमनमाळा मघमघित ॥ २९ ॥ धूपदीपादि
नैवेद्य ॥ फळ तांबूळ दक्षिणा विविध ॥ आरती पुष्पांजळि अभिवाद ॥ सपर्याविध सारूनी ॥ ३० ॥ ऐसीं
पूजित विप्ररत्नें ॥ त्यांसि अर्पिलीं तें गोदानें ॥ पुच्छेंकरूनियां तर्पणें ॥ त्यागवचनें नममोक्ति ॥ ३१ ॥
आत्मसत्तेचें निरसन ॥ पात्रसत्ता उत्पादन ॥ त्यागशब्दाचें व्याख्यान ॥ श्रोते सज्ञान जाणती ॥ ३२ ॥ एवं
पूर्वसंकल्पसिद्धि ॥ ब्राह्मण पूजूनि यथाविधि ॥ वसुदेव धर्मज्ञ विशाळबुद्धि ॥ करी त्रिशुद्धि गोदानें ॥ ३३ ॥
पूर्ण संकल्प कोणे काळीं ॥ कोठें गोधनें संपादिलीं ॥ ऐसी शंका श्रोतीं केली ॥ तेही कथिली जातसे ३४ ॥

याःकृष्णरामजन्मर्क्षेमनोदत्तामहामतिः ॥ ताश्चाददादनुस्मृत्यकंसेनाधर्मतोहृताः ॥ २८ ॥

॥टीका॥रामकृष्णांच्या जन्मसमयीं॥असतां निरुद्ध कारागृहीं॥अयुत अयुत धेनु पाहीं॥स्मरोनि हृदयींअर्पिल्या
॥३५॥तितुक्या आजी महामति ॥ केवळ वसुदेव धर्ममूर्ति ॥ सालंकृता द्विजांप्रति ॥ यथानिगुती समर्पी ॥३६॥
कोठें संपादिल्या ऐसें ॥ तर्किलें श्रोत्यांच्या मानसें ॥ तरी ज्या अधर्मे हरिल्या कंसें ॥ त्या वृष्णीशें आणिल्या॥ ३७
जितुकें कंसाचें खिल्लार ॥ अनेक वस्तु रत्नभांडार ॥ सर्वहरूनि वृष्णीश्वर ॥ करी देकार ब्राह्मणा ॥३८॥ त्या नंतरें
पुण्याहपठन ॥ नांदीश्राद्ध विधिविधान ॥ देवक प्रतिष्ठापूर्वक जाण ॥ चौलोपनयन सारिलें ॥ ३९ ॥

ततश्चलब्धसंस्कारौद्विजत्वंप्राप्यसुव्रतौ ॥ गर्गाद्यदुकुलाचार्याद्गायत्रंव्रतमास्थितौ ॥ २९ ॥

॥ टीका ॥ त्या नंतरें लब्धसंस्कार ॥ रामकृष्ण उभय कुमार ॥ मंत्रोपदेशीं अतिसादर॥ गर्गमुनिवर पुरोहित ॥४०॥चतुर्विंशति शेंटकमान[1] ॥ रत्नखचित हेमभाजन ॥ मुक्ताफळीं करूनि पूर्ण ॥ दिधलें आणून गर्गापें॥४१॥ स्वर्णशलाका घेऊनि हातीं ॥ क्षात्रगायत्री सव्याहृति[2] ॥ लिहिता झाला गर्गमूर्ति ॥यथानिगुती तत्पात्रीं ॥४२॥ विध्युक्त करूनि पूजन ॥ वर्णसंख्या निष्कार्पण ॥ गर्ग वसुदेव राम कृष्ण ॥ एक वसन पांघुरले ॥ ४३ ॥ मंगळतुरांचा एक गजर ॥ वैष्णवांचा जयजयकार ॥ ब्राह्मणांचा मंत्रस्वर ॥ सुमनीं निर्जर वर्षती ॥ ४४ ॥ प्रणव[3]पूर्वक प्रथम स्तवन ॥ पदशःकरवी मंत्रबोधन ॥ मध्यमसवनें अर्ध जाण॥मंत्र संपूर्ण सवनोत्तमें॥४५॥एवं आचार्यापासून ॥ द्विजत्व पावले रामकृष्ण ॥ गायत्रव्रतस्थ जाले जाण ॥ विधिविधान यथोचित ॥४६॥ ब्राह्मणांसि वांटिलें धन ॥ वस्त्राभरणीं गौरवून॥ विद्योपजीवी सर्वजन ॥ त्यागें संपूर्ण तोषविले ॥४७॥ सुहृदां अहेर परस्परीं ॥ मानें पूजिल्या पुरंध्री ॥ कृष्णव्रतबंधें धरित्री ॥ सुखसागरीं निमग्न ॥ ४८ ॥ ऐसा संपला व्रतबन्धु ॥ व्रतस्थ जाले दोघे बन्धु॥त्यांचा स्वयंभ अगाध बोधु ॥ शुककोविद नृपा कथी॥ ४९ ॥

प्रभवौसर्वविद्यानांसर्वज्ञौजगदीश्वरौ ॥ नान्यसिद्धामलज्ञानंगूहमानौनरेहितैः ॥ ३० ॥

॥ टीका ॥ सर्वविद्यांचा समुद्भव ॥ प्रकर्षें करूनि ज्यांपासाव ॥ ते बळरामवासुदेव ॥ मनुष्यभाव पांघुरले॥

---

[1] हा शब्द 'शाकट' याचा अपभ्रंश असावा. शाकटह्म०गाड्याचा, शकटसंबंधीं. [2] वेदमंत्रारंभीं ॐकारपूर्वक भूः भुवः स्वःमहःजनःतपःसत्यं अशा सात ह्मणतात.त्यां पैकीं प्रत्येक. [3] ॐकारपूर्वक.

यालागीं सर्वज्ञ जगदीश्वर ॥ स्वयंभ विद्यांचें आगर ॥ नहोतांचि अभ्यासपर ॥ विद्या स्वतंत्र प्रकाशिती ॥ ५१ ॥
अभ्याससाधनीं साधिल्या विद्या ॥ त्या बोलिजेती अन्यसिद्धा ॥ यांपासूनियां स्वतःसिद्धा ॥ ज्या अखिलाद्या प्रकाशती ५२
ऐसें जयांचें अमळ ज्ञान ॥ मनुष्यवेशें आच्छादून ॥ मनुष्यचेष्टाआचरण ॥ करिती वर्तन गूढत्वें ॥ ५३ ॥
कृपण लपवी आपुलें धन ॥ तैसें लपवूनि अमळ ज्ञान ॥ मनुष्यासमान क्रियाचरण ॥ करिती वर्तन शिशुवेषें ॥ ५४ ॥
सकळ विद्यांचें जन्मस्थान ॥ तेंही घेऊनि मनुष्यपण ॥ कैसें केलें गुरुसेवन ॥ तें व्याख्यान अवधारीं ॥ ५५ ॥

अथोगुरुकुलेवासमिच्छंतावुपजग्मतुः ॥ काश्यंसांदीपनिंनामह्यवंतिपुरवासिनम् ॥ ३१ ॥

॥टीका॥ एवं व्रतबंधानंतर ॥ असतां सर्वविद्याआगर ॥ तथापि मनुष्यदेहीं सार ॥ दास्य साचार सद्गुरूचें ॥ ५६ ॥
यालागीं गुरुकुळीं करूनि वास ॥ कायावाचा आणि मानस ॥ नवंचिता कीजे दास्य ॥ इच्छा विशेष हे धरिली ॥ ५७ ॥
श्रोत्रिय[1] आणि ब्रह्मनिष्ठ ॥ सकळां विद्यांचें मूळपीठ ॥ दयादाक्षिण्यें गारिष्ठ ॥ परम श्रेष्ठ कुटुंबी ॥ ५८ ॥
ऐशियांचें शुश्रूषण ॥ करितां होय इच्छा पूर्ण ॥ यामाजी जीं लक्षणें न्यून ॥ तितुकी अपूर्ण फळसिद्धि ॥ ५९ ॥
ऐसा लक्षूनियां महंत ॥ बंधु बळराम श्रीभगवंत ॥ जाते झाले स्वानंदभरित ॥ कोठपर्यंत तें ऐका ॥ ६० ॥
मथुरेहूनि अवंतिपुरी ॥ पंचाशत[2] योजनें दुरी ॥ दक्षिणप्रांतीं तीमाझारीं ॥ मुनिवर श्रोत्री सांदीपनि ॥ ६१ ॥
काश्यपगोत्रोत्पन्न महंत ॥ पूर्वोक्तलक्षणीं आचारवंत ॥ त्याप्रति येऊनि बळभगवंत ॥ शरण विनीत जाहले ॥ ६२ ॥
सुस्नात होवोनियां शुभदिनीं ॥ सफळोपचार[3] समित्पाणि[4] ॥ दृष्टि एकाग्र ठेवूनि चरणीं ॥ विनीतवाणी नियमस्थ ॥ ६३ ॥

---

[1] वेदवेत्ता. [2] पन्नास. [3] गुरूस उपयुक्त अशीं फळें. [4] हातांत समिध घेतली ज्यांनीं ते.

जाणोनि परम शुद्धांतर ॥ केवळ करुणाब्धि मुनिवर ॥ केला शिष्यत्वें अंगीकार ॥ दिधला अधिकार सेवेचा ॥६४॥
दास्याचरणाचा अधिकार ॥ झाला जाणोनि हर्षनिर्भर ॥ झाले दास्यासि तत्पर ॥ तो प्रकार अवधारा ॥ ६५ ॥

यथोपसाद्यतौदांतौगुरौवृत्तिमनिंदिताम् ॥ ग्राहयंतावुपेतौस्मभक्त्यादेवमिवाऽऽदृतौ ॥ ३२ ॥

॥टीका॥भक्तिकरूनि सर्वेश्वर ॥ जेंवि आराधिती उपासक नर ॥ ऐसे प्रेमपुरस्सर॥ आदरें गुरुवर आराधिती॥६६॥
दान्त ह्मणिजे दमनशील ॥ शमदमादिसाधनीं कुशळ ॥ सद्गुरूचें चरणकमल ॥ भजती केवळ सद्भावें ॥ ६७॥
उषःकाळीं[1] प्रातःस्नान ॥ सद्गुरूपूर्वीं करिती आपण॥ तेथूनि सर्व आह्निकाचरण॥ करिती लक्षूनि गुरुदास्य ॥६८॥
स्वामीचिया शौचाचारीं ॥ जळमृत्तिका अर्पिती करीं ॥ दंतशोधनाच्या अवसरीं ॥ दंतकाष्ठ अर्पिती ॥ ६९ ॥
आसन पादप्रक्षाळना ॥ विध्युक्त काष्ठ दंतशोधना ॥ गंडूषार्थ[2] शुद्ध जीवना ॥ देती आचमना पृथक् जळ ॥७०॥
सद्गुरु करितां प्रातःस्नान ॥ तदुचित द्रव्यें समर्पून ॥ आसन वसन तिलक जीवन ॥ करिती अर्पण यथोचित॥७१॥
होमशाळासंमार्जन ॥ होमार्थ करितां प्रादुषीकरण[3] ॥ अर्पिती विशुद्ध शुष्केंधन ॥ आज्ञालंघन नकरिती ॥ ७२ ॥
कुशपलाशें समिधा पुष्पें ॥ आणूनि भरिती शुद्ध आपें ॥ गंधाक्षताधूपदीपें ॥ परम साक्षेपें ओळंगती[4] ॥ ७३ ॥
नैवेद्य फळ तांबूल दक्षिणा ॥ यथाकाळीं अर्पिती जाणा॥ गुरुगृहींच्या परिवारगणा ॥ गुरुतोषणा आराधिती॥७४॥
समस्तांचीं क्षाळिती वसनें ॥ स्वर्चित वास्तुं[5] रंगाभरणें ॥ पानपचनादिभाजनें ॥ सर्वोपकरणें क्षाळिती ॥ ७५ ॥
तृणधान्यांचा परामर्ष ॥ पशुरक्षणीं परम हर्ष ॥ तंव तंव गुरुकृपा विशेष ॥ दिवसें दिवस वाढतसे ॥ ७६ ॥

---

१ प्रातःकाळीं. २ तोंड धुण्या करितां. ३ अग्निप्रबोधन. ४ सेविती. ५ घरांतील जागा.

काष्ठभारे वाहूनि शिरीं ॥ इंधनसंग्रह गुरूचे घरीं ॥ गोमयपिन्ड करिती करीं ॥ तंद्रा शरीरीं अस्पृष्ट ॥ ७७ ॥
संमार्जिती सदनभित्ति ॥ जळनिर्गम शोधिती हातीं ॥ गुरुतोषणीं परमप्रीति ॥ उह्लासती बहुदास्यें ॥ ७८॥
जाणोनि गुरूचें मनोगत ॥ तैसे वर्तती अतंद्रित ॥ सांडूनि व्रतें नेम समस्त ॥ गुर्वाज्ञेंत वर्तती ॥ ७९ ॥
आगम अनुल्लंघ्य उपासकां ॥ कीं विधि नुलंघवे याज्ञिकां॥ कीं काम्यव्रतें जेंवि कामुकां॥ तेंवि त्यां देखा गुर्वाज्ञा॥८०॥
सद्गुरु बोलतां आणिकांसी ॥ श्रवणीं सावध वृत्ति कैसी ॥ चातक मेघोदकातें लक्षी ॥ तेंवि मानसीं सादरता ॥८१॥
सर्व ऐश्वर्यभोग वैकुंठीं ॥ परि गुरुदास्याची दुर्लभ गोठी ॥ यालागीं नटोनि मनुष्यनटीं ॥ सप्रेम पोटीं गुरुभजनीं ८२॥
येर अवतारचरित्र ॥ तेथ साधनें सुरकार्य मात्र ॥ लक्षूनि गुरुदास्यलाभ स्वतंत्र ॥ जाले पात्र प्रेमाचें ॥ ८३ ॥
वेतन भक्षूनि सेवक ॥ सेवेसि वर्ततां प्रवासोन्मुख ॥ तेथ पंथीं जोडल्या गंगोदक ॥ तो लाभ सम्यक स्वतंत्र कीं ॥८४॥
कीं सहोदर जोडिती धन ॥ विभागें करिती दायादन ॥ त्यांमाजी गुरुदास्य विद्यापठन ॥ स्वतंत्र जाण तो लाभ ॥८५ ॥
तेंवि देवकार्याकारणें ॥ मर्त्यलोकीं म्यां अवतार घेणें॥ तेथ सद्गुरूच्या दास्याचरणें ॥ सनाथ होणें स्वतंत्र ॥ ८६ ॥
ऐशिया भावें कमलापति ॥ रामकृष्णत्वें धरूनि [2]व्यक्ति ॥ सप्रेम गुरुदास्याची रीति ॥ संपादिती कुरुवर्या ॥ ८७ ॥
चाहूरिया[3] चित्रासनें ॥ गाद्या मृदोलिया ओटंगणें ॥ झाडूनि बैसकार[4] करणें ॥ अध्यपना बैसतां ॥ ८८ ॥
आपण होवोनि चामरधर ॥ तिष्ठती सेवेसि सादर ॥ मानस जाणोनि तदनुसार ॥ सर्वोपचार अर्पिती ॥ ८९ ॥
सद्गुरु करिती निरूपण ॥ तेथ सादर करिती श्रवण ॥ ते प्रसंगीं कार्य आन ॥ पडतां उठोन सारिती ॥ ९० ॥
सद्गुरूचें माध्याह्निक ॥ दास्य वोळगती सम्यक ॥ पूजन करूनि तीर्थादिक ॥ आवश्यक स्वीकरिती ॥ ९१ ॥

---

१ योग्य. २ अवतार. ३ चवऱ्या. ४ बैठका.

गंधाक्षता कुसुममाळा ॥ घवघवित घालिती गळां॥परिमळद्रव्याचा वरी उधळा ॥ त्यावरी अमळा श्रीतुळसी॥९२॥
धूपदीप एकारती ॥ नैवेद्य षड्रसनिष्पत्ति ॥ फळतांबूल अनन्यभक्ति ॥ दक्षिणा देती तनुमनवाक् ॥ ९३ ॥
जेव्हां केलें आत्मार्पण ॥ तेव्हांचि त्यांचें अभेद भजन ॥ त्यांसीच ह्मणावें अनन्य ॥ दक्षिणाधन त्यानलगे ॥ ९४ ॥
गुरुगृहींची जे संपत्ति ॥ आत्मार्पकांची तेचि आइती ॥ कायावाचामनोवृत्ति ॥ अवंचकरीती तें भजन ॥ ९५ ॥
मनें नकल्पी दोषदर्शन ॥ दास्यविषयीं हांव पूर्ण ॥ पुढील कार्याचें चिंतन ॥ मानसभजन अवंचक हें ॥ ९६ ॥
वाचा नवदे दोषगुण ॥ कोण्हापासी नुमसे[1] न्यून ॥ गुरुयशाचें संकीर्तन ॥ वाचिक भजन या नांव ॥ ९७ ॥
बहुळकार्यांच्या अवसरीं ॥ प्रेमोत्साहें धैर्य शरीरीं ॥ नीचकार्यासि तनु नचोरी ॥ दास्य निर्धारीं कायिक हें ॥९८
एवं कायावाचामन ॥ तेंचि अर्पूनि दक्षिणाधन ॥ करूनि सर्वस्व नीराजन[2] ॥ निष्काम पूर्ण पुष्पांजळि ॥ ९९ ॥
प्रदक्षिणा नमस्कार ॥ घालूनियां वारंवार ॥ विनीतभावें निरहंकार ॥ न्यूनोपचार सांगता ॥ ३०० ॥
भोजनपात्र विसर्जून ॥ शेषप्रसादसेवन ॥ गुरु मंचकीं पौढवून ॥ पादसेवन आचरती ॥ १ सद्गुरूचा परिवार सर्व ॥ जाणोनि गुरूचे अवयव ॥ त्यांचे भजनीं प्रेमभाव ॥ दंभभाव नातळतां ॥ २ ॥ जाणोनि गुरूचें
प्रयाण ॥ गज रथ शिबिका अश्वयान ॥ सन्नद्ध करिती आज्ञेवरून ॥ होती आपण अनुयायी ॥ ३ ॥ यानारूढ असतां गुरु ॥ चरणीं खोलती[3] समोरु ॥ पायीं चालतां अनुचरु ॥ सर्वोपचार घेवूनी ॥ ४ ॥ सभास्थानीं
बैसतां गुरु ॥ सम्मुख तिष्ठती आज्ञाधरु ॥ किंवा होती चामरधरु ॥ पार्श्वभागीं स्वामीच्या ॥ ५ ॥ ज्यांवरी
कृपा सद्गुरूची ॥ सप्रेम प्रीति धरिती त्यांची ॥ उपेक्षा करिती उपेक्षितांची ॥ वमनअन्ना सारिखी ॥ ६ ॥

---

[1] न काढी. [2] आरती ओंवाळणें. [3] चालती.

दुग्धपाचित क्रमुक[1] फोडी ॥ खदिरवटिका[2]कृतकेवडी ॥ मुक्तत्रिभाग[3]चर्चितविडी ॥ भुजंग[4]वल्लीपत्रांची ॥ ७ ॥
तांबूल ऐसा त्रयोदशगुणी ॥ अर्पिती संकेत जाणोनि ॥ गंडूषपात्र[5] धरूनि पाणी॥ ष्ठीवनग्रहणीं[6] वोळगती[7]॥८॥
सद्गुरूचे आज्ञेवरून ॥ इतरां तांबूलसमर्पण ॥ करिती यथोचित सम्मान ॥ मनोगत जाणोनि स्वामीचें॥९॥
असो ऐसी सायंसंध्या ॥ जाणोनि ओळगती सर्वदा ॥ गोदोहनादि सर्व धंदा ॥ करूनि मोदा पावती ॥ १० ॥
गुरुवत् गुरुभार्येंची सेवा॥करिती समान मानूनि देवां॥सदार गुरु पहुडती जेव्हां ॥ तैं श्रम अवघा परिहरिती॥ ११
ऐसी अनिंदित गुरुदास्यवृत्ति ॥ अनन्यभावें चढली हातीं ॥ गुरुबंधूंतें ते शिक्षिती ॥ पुत्राप्रति जेंवि पिता ॥ १२ ॥
ऐसे स्वाध्यायी[8] समस्त ॥ केले अनन्य सद्गुरुभक्त ॥ अनन्यभावें सेवास्वार्थ ॥ सर्वां यथोक्त उपजविला ॥१३॥
अव्यभिचार[9] गुरुवृत्तीतें ॥ लाहोनि बोधिली गुरुभक्तांतें ॥ हें देखोनि सद्गुरुनाथें ॥ सदयचित्तें तुष्टला ॥ १४ ॥

तयोर्द्विजवरस्तुष्टः शुद्धभावानुवृत्तिभिः ॥ प्रोवाचवेदान्निखिलान्सांगोपनिषदोगुरुः ॥ ३३ ॥

॥टीका॥ भजनीं सादर निर्विकार ॥ देखोनि तोषला ऋषीश्वर ॥ पाचारूनि उभय छात्र॥ केला अधिकार अध्ययनीं
विवरूनियां सुमुहूर्तवेळा ॥ विद्यादैवं भ[10]चंद्रबळा ॥ गुरुगणपतिदैवतकुळा ॥ अर्चूनि सकळां द्विजादिकां ॥ १६ ॥
आरंभिला निगमपाठ॥ऋक्सामादि आम्नाय श्रेष्ठ ॥ शिक्षा[11] व्याकरण ज्योतिष स्पष्ट॥छंद निरुक्त कल्पादि॥ १७ ॥

---

१ सुपारी. २ खैराचा कात, केवडा घालून तयार केलेला. ३ मौक्तिकाच्या चुन्यानें तयार केलेली. ४ पानवेल. ५ तस्त. ६ पिकदाणी धरणें. ७ सेवा करिती. ८ सहाध्यायी आपल्याबराबर शिकणारे. ९ अनन्य. १० नक्षत्र. ११ शिक्षादि सहाग्रन्थ, अनुक्रमें घ्राणादि सहा अवयव होत.

घ्राण वदन नयन श्रवण ॥ हस्तहृदयादि षडंगें जाण ॥ उपनिषद्भाग मस्तक पूर्ण ॥ वेदोनारायण सांग हा ॥१८॥
ऐसेचि सांग अवघे वेद ॥ गुरुवर पढविता झाला विशद ॥ गुरु शिष्यांसि परमाह्लाद॥प्रज्ञाप्रबोध पाठत्वें॥१९॥
प्रज्ञा देखोनि संतुष्ट गुरु॥ ह्मणोनि अध्ययनीं तत्परु ॥ प्रबोधशक्तिचमत्कारु॥ तेणें शिष्य सादर अध्ययनीं॥२०॥
परस्परें आनंदभरित ॥ अध्यापनीं गुरूसि आर्त ॥ तंव तंव अध्ययनाचा स्वार्थ ॥ शिष्य समर्थ आंगविती ॥२१॥
नपुसतांचि सद्गुरु सांगे ॥ प्रज्ञाबळें ते पढती वेगें॥पुडती अनुवृत्ति करणें नलगे ॥ हें सामर्थ्य अवघें गुरुभजनीं॥

सरहस्यंधनुर्वेदंधर्मान्न्यायपथांस्तथा ॥ तथाचान्वीक्षिकींविद्यांराजनीतिंचषड्विधाम् ॥ ३४ ॥
सर्वंनरवरश्रेष्ठौसर्वविद्याप्रवर्त्तकौ ॥ सकृन्निगदमात्रेणतौसंजगृहतुर्नृप ॥ ३५ ॥

॥ टीका ॥अथर्वणआंगीरसरहस्यें ॥मंत्रविद्यादेवतावश्यें ॥ गूढ गोप्यें समरलास्यें ॥ तियेंही अशेषें कथियेलीं२३
अस्त्रविद्या धनुर्वेद॥ शस्त्रसाधनांचे भेद॥ मंत्ररहस्यें सहित विशद ॥बोधी प्रबुद्ध गुरुवर्य॥२४॥पौरंदरास्त्र[1] पावकास्त्र॥
संयमनास्त्र[2] कौणपास्त्र[3]॥वरुणपाशादि वारुणास्त्र॥अकूपारास्त्र[4] प्रबोधी॥२५॥नक्र[5] मकर[6] शिशुमारास्त्र[7]॥तिमिंगिळास्त्र
राघवास्त्र॥ शाफर मौद्गर कंबुकास्त्र ॥ पन्नकास्त्र ताक्षकी ॥२६॥ प्रभंजनास्त्र कर्षणास्त्र ॥ मरुद्गणास्त्र निरोधनास्त्र॥
प्राणपास्त्र मोहनास्त्र ॥अकोचनास्त्र बोधिलें॥२७॥यक्षराक्षसगुह्यकास्त्र॥कौबेरास्त्र पिंगलास्त्र॥शरभरुद्रभवगारुडास्त्र॥
प्लवंगास्त्र सरहस्य॥२८॥सिद्धसाध्यगंधर्वास्त्र॥वीरभद्रास्त्र भैरवास्त्र॥ कृत्याकौष्मांडवेताळास्त्र ॥वैनायकास्त्र भास्मिक

---

[1] इंद्रास्त्र. [2] यमास्त्र. [3] राक्षसास्त्र. [4] समुद्रास्त्र. [5] नक्राचें. [6] मकराचें. [7] शिशुमारादि पांच मत्स्य विशेष होत.

माहेश्वरास्त्र शांभवास्त्र ॥ कालिकास्त्र दुर्गमास्त्र॥ चंडिकास्त्र चामुंडास्त्र॥ पाशुपतास्त्र विश्वभुक्॥ ३० ॥ महाघोर अघोरास्त्र॥
तत्पुरुषास्त्र ईशानास्त्र ॥ वामदेवास्त्र सरौद्रास्त्र ॥ सद्योजातास्त्र कर्कश ॥ ३१ ॥ भास्करास्त्र भगणपास्त्र ॥ भौमभानुजभार्गवास्त्र
॥ जीवविधुजविधुंतुदास्त्र ॥ कैतवास्त्र कैतवी ॥ ३२ ॥ पर्जन्यास्त्र पावनास्त्र ॥ पर्वतास्त्र
सवज्रास्त्र ॥ आप्ययास्त्र कृतांतास्त्र ॥ मृत्युंजयास्त्र निवेदी ॥ ३३ ॥ कफवातादिमहामायास्त्र ॥ सुदर्शनास्त्र
वैष्णवास्त्र ॥ अनंतास्त्र आदित्यास्त्र ॥ महाब्रह्मास्त्र वसवादि ॥ ३४ ॥ अस्त्रविद्या रहस्येंसीं ॥ प्रबोधिली
विधानेंशीं ॥ आणि शस्त्रविद्याही तैसी ॥ कौशल्येंसीं साधविली ॥ ३५ ॥ खड्ग खेटक शूळ परशु ॥ तोमर वज्र
शक्ति पट्टिश ॥ परिघ मुद्गर कुंत पाश ॥ यमदंष्ट्रादि छूरिका ॥ ३६ ॥ टंक कृपाण त्रिशूळ लहुडी॥ लांगल चक्र
मुसल भृशुंडी ॥ कुरंगशृंगज अंकुशदंडी ॥ व्याघ्रनखादि वृश्चिक ॥ ३७ ॥ गदा कुठार परश्वध ॥ कंबुकंकणान्वित
मणिबंध ॥ कटिप्रदेशीं चक्रायुध ॥ खट्वांगवंशकूर्परिका॥ ३८॥ भिंदिपाळादि[1] छत्तिस ॥ दंडायुधीं विद्याभ्यास॥
करविता झाला सावकाश ॥ तुष्टमानस गुरुवर्य ॥ ३९ ॥ मल्लविद्या द्वंद्वयुद्ध ॥ प्रबोधूनि यथाविध ॥ आयुर्वेद
गांधर्ववेद ॥ ज्योतिर्वेद निरोपी ॥ ४० ॥ एवं उपवेदाध्यापन ॥ सांगोपांग करूनि जाण ॥ पुढें मांडिलें शास्त्राध्ययन॥
कृपाळु पूर्ण गुरुवर्य ॥ ४१ ॥ मन्वादिकांचिया स्मृति ॥ अनुकूळ पुराणसंमति ॥ धर्मशास्त्र यथानिगुती ॥ मन्वादि
धर्म प्रबोधिले ॥ ४२ ॥ न्यायशास्त्र गौतमकृत ॥ पूर्वमीमांसा श्रुतिसंमत ॥ आन्वीक्षिकी[2] इत्थंभूत ॥ कथिली समस्त
तर्कविद्या ॥ ४३ ॥ राजनीति षड्विध ह्मणिजे ॥ तेही साङ्ग कथिली द्विजें ॥ तेच साही प्रकार जे जे ॥ चतुरीं
वोजें परिसावे ॥ ४४ ॥ शत्रु जाणोनि बळिष्ठ ॥ स्नेहवादें तो कीजे इष्ट॥ यातें संधि ह्मणती श्रेष्ठ॥ उपाय वरिष्ठ

---

[1] गलोल. [2] गौतमप्रणीततर्कशास्त्र.

हा मुख्य ॥ ४५ ॥ बळिष्ठ शत्रूंशीं करूनि सख्य ॥ तुल्य शत्रूचा कीजे द्वेष ॥ याच्या बळें तो जाणिजे देख॥
विग्रह सम्यक या नांव ॥ ४६ ॥ आपणाहूनि सामान्य भूप ॥ मनीं धरिती दुष्ट संकल्प ॥ इतरांवरी दावूनि कोप
स्वारी साटोप करावी ॥ ४७ ॥ येणें मिषें अकस्मात् ॥ जातां देखती ते भयभीत ॥ द्रव्यें घेऊनि पादाक्रान्त ॥
करूनि यथोक्त रक्षावे ॥ ४८ ॥ तिसरा उपाय या नांव यान ॥ चतुर्थ उपाय तें आसन ॥ ऐका तयाचें लक्षण ॥
सावधान होउनी ॥ ४९ ॥ बळिष्ठांसिं करूनि सख्य ॥ तुल्य शत्रु जिंकिले देख ॥ ते ते पोटीं धरूनि दुःख ॥
साह्य आणिक मेळविती ॥ ५० ॥ यालागीं तेथ दुर्गम दुर्गीं ॥ ठाणें घालूनि प्रसंगीं ॥ पुन्हा शत्रु नुधवे जगीं॥
ऐशिया योगीं रक्षावा ॥ ५१ ॥ वश्य करूनि मांडलिक ॥ बलिष्ठ शत्रु होय एक ॥ तेथ द्वैधीभावविवेक ॥ उपाय
सम्यक पंचम हा ॥ ५२ ॥ तयाचा गोत्रज अथवा बन्धु ॥ फोडोनि कीजे स्नेहसंबंधु ॥ त्यांमाजी परस्परें
विरोधु ॥ युक्तिप्रबोधें उपजविजे ॥ ५३ ॥ मग ते मांडलिक सोयरे ॥ उभयतांच्या स्नेहादरें ॥ द्विधा होती
परस्परें ॥ द्वैध खरें त्या नांव ॥५४ ॥ शत्रु भंगले पराच्या भयें ॥ त्यांसि आपण देऊनि अभय ॥ प्रतिपाळावें
निजाश्रयें ॥ षष्ठ उपाय हा श्रेष्ठ ॥५५॥ शत्रूंसी करावा उपकार ॥ शस्त्रांहूनि हें मारणें सार॥राजनीतीचे प्रकार॥
साही साचार हे कथिले॥५६॥मंत्रदेवता सुप्रसन्न ॥ अस्त्रप्रेरण उपसंहरणं ॥सरहस्यधनुर्वेद ग्रहण ॥ सांग संपूर्ण
उपवेद॥५७॥धर्मन्यायप्रमुख शास्त्रें॥राजनीतीशीं कथिली वक्त्रें॥तें तें सकळ्निगदमात्रें॥घेतलीं श्रोत्रें परिसतां॥५८॥
मनुष्यदेहधारी ते नर ॥ कुशळ वर्णश्रेष्ठ ते नरवर ॥ त्यांमाजी हे श्रेष्ठतर ॥ केवळ ईश्वर बलकृष्ण ॥५९ ॥
सकळविद्याप्रवर्तक ॥ तिहीं धरूनि मनुष्यवेख ॥ दास्य करूनियां सम्यक ॥ केला संतोष स्वामीतें ॥ ६० ॥

---

१ द्वन्द्वयुद्ध. २ आटोपणें.

स्वामीचिया कृपावरदें ॥ सर्व विद्या सकृन्निगदें ॥ अभ्यासितां परमानंदें ॥ गुरु आह्लादे हृत्कमळीं ॥ ६१ ॥
वेदोपवेदशा रु ध्ययन ॥ कपेनें सद्गुरु करितां कथन ॥ श्रवणमात्रें करिती ग्रहण ॥ प्रज्ञागहन अनुपम ॥ ६२॥
चौसष्टी अहोरात्रांतरीं ॥ चौसष्टी कळांची कुसरी ॥ अभ्यासिली निगदमात्रीं ॥ तें अवधारीं कुरुवर्या ॥ ६३ ॥

अहोरात्रैश्चतुःषष्ट्यासंयत्तौतावतीःकलाः ॥ गुरुदक्षिणयाऽऽचार्यंछंदयामासतुर्नृप ॥ ३६ ॥

॥टीका॥ शैवतंत्रीं ज्या कळा कथिल्या॥त्या येथ जाती निरूपिल्या॥श्रोतीं पाहिजे श्रवण केल्या॥अभ्यासिल्या अवगमती॥६४॥सप्तस्वरीं गायन[१]कळा ॥ सप्तताल वाद्य[२]कळा ॥ भावसाहित्य नृत्य[३]कळा ॥ नाट्य[४]कळा तौर्यत्रिक ॥६५॥
विशेषक[५]च्छेद्य कंतनकळा ॥ आलेख्य[६] निरंजनी लेखनकळा ॥ तंडुलकुसुमा[७]विकारकळा॥ सपर्याविधिप्रकरणीं ॥६६॥
करकौशल्यें पुष्पास्तरण ॥ दशनवसना[९]ंगरंजन ॥मणिभूमि[१०]काकर्म गहन ॥ शयन[११]रचन अकरावें ॥ ६७ ॥
उदकवाद्य[१२] उदकघात ॥ चित्रयोग[१३] अत्यद्भुत ॥ माल्यग्रथन[१४]विकल्प येथ ॥ शेखरापीड[१५]योजना ॥ ६८ ॥
षोडशी कळा नेपथ्य[१६]योग ॥ सत्रावी ते कर्णपत्र[१७]भंग ॥ सुगंधयुक्ती[१८]चा प्रसंग ॥ कळा सांग अठरावी॥ ६९ ॥
भूषणयोजना[१९] ऐंद्रजाळ[२०] ॥ कौचुमार[२१]योगकौशल्य ॥ हस्तलाघव[२२] सुचापल्य ॥ बाविसावी हे कळा ॥ ७० ॥
चित्रशाका[२३]व्यंजनादिया ॥ अपूपभक्ष्यविकाराक्रिया ॥ तेविसावी कळा राया ॥ तुज लागोनि हे कथिली॥७१॥
पानक[२४]रसरागासव- ॥ योजना कळा हे अपूर्व ॥ सूचिवाय[२५]कर्म सर्व ॥ कळा स्वमेव पंचविसावी ॥ ७२ ॥
सव्विसावी सूत्रक्रीडा[२६] ॥ डमरु[२७]वीणादिवाद्य सुघडा ॥ प्रहेलिका[२८] कळा प्रौढा ॥ अठ्ठाविसावी जाणिजे ॥ ७३ ॥
एकोणतिसावी ते प्रतिमाळा[२९]॥दुर्वचक[३०]योग तिसावी कळा ॥पुस्तक[३१]वाचन कुरुभूपाळा ॥ जाणिजे कळा एकतिसावी

---

१ एकदां सांगण्यानें.

[३२]नाटकाख्यायिकादर्शन ॥ [३३]काव्यसमस्यापूरण ॥ [३४]पाट्टिकाविकल्पवेत्रबाण ॥ [३५]तर्ककर्मादि पंचतिस ॥ ७५ ॥
[३६]तक्षण आणि [३७]वास्तुविद्या ॥ [३८]रूप्यरत्नपरीक्षा शुद्धा ॥ [३९]आकरज्ञान [४०]धातुवादा ॥ [४१]मणिरागादिज्ञानकळा ॥ ७६ ॥
[४२]वृक्षआयुर्वेद सिद्ध ॥ [४३]मेषकुक्कुटलावकयुद्ध ॥ [४४]शुकसारिका पढवणें शुद्ध ॥ चव्वेताळिसावी ही कळा ॥ ७७ ॥
[४५]उत्सादन [४६]केशमार्जन ॥ आणि [४७]अक्षरमुष्टिकाकथन ॥ [४८]म्लेच्छितकुतर्कविकल्प जाण ॥ [४९]भाषाज्ञान देशभव ॥ ७८ ॥
पन्नासावी [५०]पुष्पशकटिका- ॥ निर्मितिज्ञान कुरुनायका ॥ यंत्रमातृका[५१]धारणमातृका ॥ [५२]संवाच्यकळा बावन्न ॥ ७९ ॥
[५३]मानसीकाव्यक्रिया जाण ॥ [५४]अभिधानकोश समयीं स्मरण ॥ [५५]पिंगळादिछंदोज्ञान ॥ [५६]क्रियाविकल्प कळा हे ॥ ८० ॥
[५७]वस्त्रगोपनें [५८]छलितक योग ॥ [५९]द्यूतादिविशेषप्रसंग ॥ आणि [६०]आकर्षक्रीडा सांग ॥ [६१]बालक्रीडनें बहुधा पैं ॥ ८१ ॥
[६२]वैतालिकी [६३]वैजयिकीं ॥ तृतीय विद्या [६४]वैनायिकी ॥ या विद्यांचीं ज्ञानें ठाउकीं ॥ एवमादिकी चौसष्टी ॥ ८२ ॥
चौषष्टी अहोरात्री नृपाळा ॥ अभ्यासिल्या चौषष्टी कळा ॥ मग गुरूच्या चरणकमळा ॥ अभिवंदिती मस्तकें ॥ ८३ ॥
सर्वसेवेसी सादर ॥ चुकों नेदिती अवसर ॥ अगाध प्रज्ञेचा विचार ॥ अभ्यासपर देखिला ॥ ८४ ॥
नुलंघवे मर्यादरेखा ॥ येरवीं गुरूहूनि आगळिका ॥ सर्व विद्यांच्या भूमिका ॥ ज्याच्या विवेका अवगमती[१] ॥ ८५ ॥
सदार गुरूच्या परिवारगणा ॥ गुरुप्रेमेंचि भजती जाणा ॥ स्नेहें सर्वांच्या अंतःकरणा ॥ वशिवर्तना अनुसरती
समयीं देती मागितलें ॥ करिती समयीं सांगीतलें ॥ मर्यादरेखेचीं पाउलें ॥ कोण्याकाळें नुलंघिती ॥ ८७ ॥
ऐसी देखोनि अद्भुत शक्ति ॥ मुनि ह्मणे या ईश्वरमूर्ति ॥ धरूनि मनुष्यांच्या व्यक्ति ॥ सादर तिष्ठती सेवेसी ॥
कोण्या कार्यार्थ हें तो नकळे ॥ परंतु माझें दैव आगळें ॥ आतां यांचीं चरणकमळें ॥ स्वयें निजमौळें वंदावीं ८९ ॥

---

[१] जाणती.

ऐसा विवरी अंतःकरणें ॥ यां पासूनि जें सेवा घेणें ॥ तें अनुचित बहुतां गुणें ॥ मजकारणें घडलें कीं ॥ ९० ॥
ऐसें गुरूचें मनोचेष्टित ॥ जाणोनि रामकृष्ण समर्थ ॥ ह्मणती गुरुसेवा समाप्त ॥ करूनि त्वरित निघावें॥ ९१ ॥
गुरु आदरिती आमुची सेवा ॥ तेव्हां विचार नोहे बरवा ॥ यालागीं आज्ञा घेऊनि गांवा ॥ जावें लाघवा रक्षूनी ॥ ९२ ॥
ऐसें विवरोनि बन्धु दोघे ॥ सद्गुरुचरण वंदूनि वेगें ॥ गुरुदक्षिणाप्रसंगें ॥ विनीत आंगें विनविती ॥ ९३ ॥
गुरुदक्षिणेचें करूनि मिष ॥ उपलोभिती गुरुमानस ॥ ह्मणती आह्मी लघुतर दास ॥ विनति उदास नकरावी ९४ ॥
पक्षिणीपक्षी रक्षी आंडीं ॥ चांचुवें चारा घाली तोंडीं ॥ स्वामीनें त्याचि परवडी ॥ आह्मां आवडी पाळिलें ९५ ॥
जनकाहूनि कोटि गुणें ॥ विद्या बोधिल्या कृपाळुपणें ॥ आतां घेऊनि गुरुदक्षिणे ॥ सफळ करणें निजवरें ॥ ९६ ॥
अल्प स्वल्प गुरुदक्षिणा ॥ समर्पावी सद्गुरुचरणा ॥ द्यावी स्वामींहीं आनुज्ञा ॥ ऐसी करुणा भाकिती ॥ ९७ ॥
राया कुरुकुळकुवलयतरणि ॥ रामकृष्णांची ऐकोनि वाणी ॥ मुनीनें विवरूनि अंतःकरणीं ॥ वदला वचनीं तें ऐका ९८

द्विजस्तयोस्तंमहिमानमद्भुतंसंलक्ष्यराजन्नतिमानुषींमतिम् ॥
संमंत्र्यपत्न्यासमहार्णवेमृतंबालंप्रभासेवरयाबभूवह ॥ ३७ ॥

॥टीका॥ पत्नी पाचारूनि एकांतीं ॥ गुह्य सांगे तियेप्रति ॥ रामकृष्ण हे मनुष्याकृति ॥ ईश्वरमूर्ति प्रत्यक्ष ॥ ९९ ॥
गुरुदक्षिणा देऊं ह्मणती ॥ तरी काय मागावें ऐशियांप्रति ॥ बरवें विचारूनियां चित्तीं ॥ सांगें युक्ति वरांगने ४००
एवं स्त्रीपुरुषीं दोघीं जणीं ॥ विवरूनियां अंतःकरणीं ॥ पुत्र निमाला समुद्रस्नानीं ॥ प्रभासपाटणीं दुर्मरणें ॥ १ ॥
तो याचिला गुरुदक्षिणे ॥ आज्ञा वंदूनि रामकृष्णें ॥ तथास्तु ह्मणोनि केलीं नमनें ॥ गवेषणे चालिले ॥ २ ॥

---

१ रीतीनें. २ शोधाला.

तथेत्यथाऽऽरुह्यमहारथौरथंप्रभासमासाद्यदुरंतविक्रमौ ॥
वेलामुपव्रज्यनिषीदतुःक्षणंसिंधुर्विदित्वाऽर्हणमाहरत्तयोः ॥ ३८ ॥

॥ टीका ॥ यानंतरें दोघे बन्धु ॥ महारथी प्रतापसिंधु ॥ हृदयीं देदीप्य धनुर्वेदु ॥ विद्याप्रबोध मुनीचा ॥ ३ ॥
सज्ज होवोनि बैसले रथीं ॥ घेवूनि शस्त्रास्त्रसंपत्ति ॥ चालिले प्रभासपाटणाप्रति ॥ मार्गीं होती शुभशकुन॥ ४ ॥
मेघगंभीरघोषें रथ ॥ गर्जना करी घडघडीत ॥ दोघे बन्धु प्रतापवंत ॥ गुरुकार्यार्थ चालिले ॥ ५ ॥
अश्व जवीन जिंकिती अनिळा ॥ गरुडचिह्नित केतु निळा ॥ मार्गीं देखत्यांचिया डोळां ॥ अमृतपान फावतसे ॥६॥
सवेग ठाकिली सोरटी ॥ पातले सोमेश्वरा निकटीं ॥ रत्नाकराचे वाळुवंटीं ॥ रथातळवटीं उतरले ॥ ७ ॥
रामकृष्णांचें आगमन ॥ जाणोनि सिंधु आला शरण ॥ रत्नाभरणें समर्पून ॥ करी पूजन सद्भावें ॥ ८ ॥
दिव्य वसनें गंधाक्षता ॥ दिव्यसुमनें वाहिलीं माथां ॥ धूपदीपादि अमृता ॥ नैवेद्यार्थ अर्पिलें ॥ ९ ॥
फलताम्बूल दक्षिणा ॥ पुष्पांजलि प्रदक्षिणा ॥ सहस्रशः करूनि नमना ॥ विज्ञापना करीतसे ॥ १० ॥
कोणीकडे येणें झालें ॥ मज दासातें सनाथ केलें ॥ कोण कार्य मनीं धरिलें ॥ तेंही कथिलें पाहिजे ॥ ११ ॥
ऐकोनि सिंधूची विनीत वाणी॥बलराम आणि चक्रपाणि॥बोलते झाले आज्ञावचनीं॥परिसें श्रवणीं तें राया ॥१२॥

तमाहभगवानाशुगुरुपुत्रःप्रदीयताम् ॥ योऽसाविहत्वयाग्रस्तोबालकोमहतोर्मिणा ॥ ३९ ॥

॥टीका ॥अचिंत्यैश्वर्यसंपन्न ॥ जो कां अनंतगुणपरिपूर्ण ॥ सिंधूप्रति प्रतापगहन ॥ आज्ञावचन निरूपी ॥१३॥
सांदीपनि अवंतिवासी ॥ अमुचा स्वामी तपोराशि ॥ येथें करितां स्नानविधीसी ॥ तां तत्पुत्रासी ग्रासिलें ॥ १४ ॥

---

२ वेगवान.

तुझिया ऊर्मी महा प्रबळ॥ तिहीं कवळूनि गुरूचा बाळ ॥तुवां ग्रासिला होवोनि काळ॥तो तत्काळ दे आतां॥ १५॥
कांहीं विलंब करितां येथें ॥ दण्ड पावसी आमुच्या हातें ॥ जाणोनि निष्ठुर आज्ञेतें ॥ गुरुपुत्रातें दे वेगीं ॥१६॥
निष्ठुर ऐकोनि भगवद्वाणी ॥ सिंधु भयभीत अंतःकरणीं॥ माथा ठेवूनियां चरणीं ॥ करुणावचनीं प्रार्थितसे ॥१७॥

समुद्रउवाच ॥ नैवाहार्षमहंदेवदैत्यःपंचजनोमहान् ॥ अंतर्जलचरःकृष्णशंखरूपधरोऽसुरः ॥ ४० ॥
आस्तेतेनाहृतोनूनंतच्छ्रुत्वासत्वरंप्रभुः ॥

॥ टीका ॥सिंधु ह्मणे मधुसूदना॥ग्रासिलें नाहीं म्यां गुरुनंदना॥यदर्थीं करितों विज्ञापना॥ते सर्वज्ञा अवधारीं॥
देव ह्मणोनि संबोधन ॥ तुझें अमळ दिव्य ज्ञान ॥ भूतभविष्यवर्तमान ॥ तुज लागून अवगत हें ॥ १९ ॥
पंचजन या नामें दैत्य ॥ शंखरूपी जलचर सत्य ॥ माझे जठरीं राहे नित्य ॥त्याचें कृत्य हें गमतें ॥ २० ॥
शंखरूप तो धरूनि असुर ॥ माझे जठरींचे जे जळचर ॥ त्यांतें पीडी अहोरात्र ॥ दुष्ट निशाचर निर्दय २१॥
बहुतेक हें त्याचें कृत्य ॥ हें ऐकानि त्वरान्वित ॥ कृष्ण परमात्मा समर्थ ॥ झाला उद्युक्त तद्वधा ॥ २२ ॥

जलमाविश्यतंहत्वानापश्यदुदुरेऽर्भकम् ॥ तदंगप्रभवंशंखमादायरथमागमत् ॥ ४१ ॥

॥ टीका॥ आज्ञा देऊनि सागराप्रति॥जळीं प्रवेशला श्रीपति॥मारूनि पंचजन दुर्मति॥पाहे निगुती तज्जठरीं॥
गुरुसुत तेथें न देखतां ॥ ज्ञानीं पाहोनि मन्मथजनिता ॥ पंचजनांग[1] वागविता ॥ जाला तत्वता आयुधार्थ॥२४॥
तो पांचजन्य शंख करीं ॥ घेऊनि बाहेर आला हरि ॥ वेगीं बैसोनि रहंवरीं ॥ त्वरें यमपुरीं ठाकिली ॥ २५ ॥

---

[1] पंचजन राक्षसाचें अंग जो शंख तो.

ततःसंयमनींनामयमस्यदयितांपुरीम् ॥ गत्वाजनार्दनःशंखंप्रदध्मौसहलायुधः ॥ ४२ ॥

॥ टीका ॥ त्यानंतरें ते संयमनी॥यमाची प्रियतम राजधानी॥तेथ जाऊनि चक्रपाणि स्फुरिला वदनीं पांचजन्य
हलायुधेंसीं जनार्दन ॥ संयमनी अधिष्ठून ॥ मुखें स्फुरिला पांचजन्य ॥ यम ऐकोनि साशंक ॥ २७ ॥

शंखनिह्रादमाकर्ण्यप्रजासंयमनोयमः ॥ तयोःसपर्यांमहतींचक्रेभक्त्युपबृंहिताम् ॥ ४३ ॥

॥ टीका ॥ भूतमात्रांते संयमिता॥तेणें पांचजन्य ऐकतां॥हृदयीं झाला दचक धरिता॥आला तत्वता भेटीसी ॥
रामेंसहित चक्रपाणि ॥ वंदिता झाला लोटांगणीं ॥ बैसवूनियां दिव्यासनीं ॥ प्रेमें अर्चनीं प्रवर्तला ॥ २९ ॥
बळपूर्वक जनार्दन ॥ उभयतांचे क्षाळूनि चरण ॥ तीर्थ मस्तकीं अभिवंदून ॥ केलें प्राशन सद्भावें ॥ ३० ॥
नीलकौशेयपीतांम्बरें ॥ नेसवूनियां अत्यादरें ॥ क्षीराब्धि अरुणरंगाकारें ॥ उत्तरीयार्थ अर्पिलीं ॥ ३१ ॥
मुकुट कुण्डलें मेखळा ॥ केयूरांगदें बाहुयुगला ॥ जडित मुद्रिका दशांगुळां ॥ कटकें तेजाळ अर्पिलीं ॥ ३२ ॥
वैजयंती कौस्तुभमणि ॥ प्रभे लोपवी दिनमणि ॥ वांक्या नूपुरें अंदु चरणीं ॥ त्वाष्ट्रघडणी सुघटित ॥ ३३ ॥
अर्पूनियां गंधाक्षता ॥ माला सुमनें वाहिलीं माथां॥ सधूप एकारती होतां ॥ पात्रीं अमृता ओगेरिलें ॥ ३४ ॥
अर्पूनि नैवेद्य फलतांबूल॥हेमरत्नें दक्षिणा बहळ॥पुष्पांजळि अर्पूनि अमळ ॥जोडोनि करतळ अभिवंदी ॥३५॥
भक्तियुक्त महापूजा ॥ यमें करूनि ऐशिया वोजा ॥ प्रार्थिता झाला गरुडध्वजा ॥ तें कुरुराजा अवधारीं॥ ३६ ॥

उवाचावनतःकृष्णंसर्वभूताशयालयम् ॥ लीलामनुष्यहेविष्णोयुवयोःकरवामकिम् ॥ ४४ ॥

---

१ बलरामाशीं. २ वाहिलें.

॥टीका॥नम्रकंधरें बद्धांजळि॥ह्मणे श्रीकृष्ण वनमाळी॥ आजि आपुल्या चरणकमळीं॥सनाथ केली संयमनी ३७॥
ब्रह्मादि अमरांचिये मुकुटीं ॥ व्यापक विष्णु तूंचि जगजेठी ॥ लीलेकरूनि मनुष्यनटीं ॥ सुरसंकटीं नटलासी ॥ ३८॥
जे कां सर्वभूताशय ॥ तूं तयांचा वसता ठाय ॥ विश्वप्रभव तूं अव्यय ॥ जगन्मय जगदात्मा ॥ ३९ ॥
तुमचें काय मी करूं दास्य ॥ आज्ञापिजे किंकरास ॥ सेवाहीन तरी पोष्य ॥ लागे अवश्य पोसावें ॥ ४० ॥
तुमच्या सेवेच्या अधिकारा ॥ आज्ञापिजे मज किंकरा ॥ सेवेविषीं जरीं अपुरा ॥ तरी दातारा अनुपेक्ष ॥ ४१ ॥
ऐसी विनीत यमाची वाणी ॥ परिसोनियां पंकजपाणि ॥ काय बोलिला तें कुरुमणि ॥ सावध श्रवणीं परिसावें॥४२॥

श्रीकृष्णउवाच ॥ गुरुपुत्रमिहानीतंनिजकर्मनिबंधनम् ॥ आनयस्वमहाराजमच्छासनपुरस्कृतः ॥ ४६ ॥

॥टीका॥यमासि ह्मणे गरुडध्वज॥भूतशास्ता तूं महाराज॥आमुचें इतुकें सांगणें तुज॥तें त्वां काज करावें ॥४३ ॥
गुरुपुत्र येथें त्वां आणिला ॥ जो कां निजकर्में बांधला ॥ यदर्थीं अपराध नाहीं तुजला ॥ विदित मजला हें सर्व ॥ ४४ ॥
आतां ममाज्ञा वंदूनि शिरीं ॥ गुरुसुत आणूनि दे झडकरी ॥ कर्मनिर्मुक्त करिता हरि ॥ हें अंतरीं जाणोनी ॥ ४५ ॥
ऐसें बोलतां कृष्णनाथा ॥ यमें आज्ञा वंदिली माथा ॥ गुरुपुत्रातें आणूनि देता ॥ झाला तत्वता उल्हासें ॥ ४६॥

तथेतितेनोपानीतंगुरुपुत्रंयदूत्तमौ ॥ दत्वास्वगुरुवेभूयोवृणीष्वेतितमूचतुः ॥ ४७ ॥

॥टीका॥गुरुपुत्र घेऊनियां करीं॥हात ठेवूनि यमाचे शिरीं ॥ यदूत्तम जे राममुरारी ॥ त्वरें रहंवरीं बैसले ॥४७॥
आस्फुरिलें पाचजन्या ॥ रहंवर चाले जिणोनि पवना ॥ निमेषमात्रें गुरूच्या सदना ॥ अवंतिपाटणा पातले ॥४८॥

---

१ नम्र केली कन्धरा ह्म० मान ज्यानें तो.

तंव ते गुरूची अंतुरी ॥ वल्लभासीं विचार करी ॥ रामकृष्णांची अवसरी ॥कुमरापरीस मज वाटे ॥ ४९ ॥
रामकृष्ण कोमळ बाळ ॥ परम अक्षोभ समुद्रजल ॥ प्रभासे जाऊनि उताविळ ॥ काय करितील हें नकळे॥५०॥
कीं ते सागरीं प्रवेशती ॥ किंवा तपश्चर्ये बैसती ॥ पुत्र निमाला कर्मगती ॥ केवीं आणिती हें नकळे ॥ ५१ ॥
मुनि ह्मणे तूं चिंता नकरीं॥ लीलामानुष्यविग्रहधारी ॥ ब्रह्मांड रचिती क्षणाभीतरी॥नकरीं अवसरी तूं त्यांची५२॥
तंव रथाचा घडघडाट ॥ पांचजन्याचा बोभाट ॥ ऐकतां छात्रीं ठेविला पाठ ॥ धांवले वाट पहावया ॥ ५३ ॥
तंव ते रामकृष्ण दोन्ही ॥ आले गुरुपुत्र घेऊनी ॥ माथे ठेविले गुरुचरणीं ॥ गुरुकामिनी वंदिली ॥ ५४ ॥
ह्मणती स्वामी घ्यावा कुमर ॥ पुढें अभीष्ट मागा वर ॥ आह्मी स्वामीचे किंकर ॥ आज्ञा सत्वर करावी ॥ ५५ ॥
यमें आणितां गुरुपुत्रातें॥ तो आणूनि अर्पिला आचार्यातें॥आणखीं आवडी वाटेल चित्तें॥त्या वरातें मागा हो॥५६॥
पुत्र देखोनियां जननी ॥ हृदयीं आलिंगी धांवोनी ॥ अश्रुधारा स्रवती नयनीं ॥ पान्हा स्तनीं उथलला ॥ ५७ ॥
मुनि अवघ्राण करी माथा ॥ नसंवरेची सत्वावस्था ॥ पुढती सावध करूनि चित्ता ॥ बोले तत्वता शिष्यांतें ॥५८॥

गुरुरुवाच ॥ सम्यक्संपादितोवत्सभवद्भ्यांगुरुनिष्क्रयः॥ कोऽनुयुष्मद्विधगुरोःकामानामावशिष्यते ॥ ४८ ॥

॥टीका॥एकवाक्यें दोघे जन ॥ वत्स ह्मणोनि संबोधून ॥ ह्मणे तुह्मीं मनोरथ पूर्ण ॥ केले संपूर्ण पैं माझे ॥ ५९ ॥
सम्यक् ह्मणिजे बरव्या प्रकारें॥ गुरुदक्षिणा दिधली बारे ॥ अध्ययनाच्या प्रत्युपकारें ॥ कोणी नाचरे हे क्रिया॥६०॥
गुरुनिष्क्रिय हा संपादिला ॥ तुह्मां योग्याचि प्रताप भला ॥ मनीं नकल्पवे अमरांला ॥ मनुष्यांला केंवि घडे ॥ ६१ ॥

---

१ चिन्ता.

तुह्मां ऐसा इतर कोण ॥ गुरुदक्षिणा समर्पून ॥ कृताध्ययना होय उत्तीर्ण ॥ अद्यापि श्रवणं नायकती ॥ ६२ ॥
आतां माझिया मनोरथा ॥ माजी मागावया पुरता ॥ कोण काम असे पाहातां ॥ जे पुढती समर्था मी मागूं ॥ ६३ ॥
एवं झालों पूर्णकाम ॥ हरला यच्छ्रेचा संभ्रम ॥ तुह्मां ऐसे शिष्योत्तम ॥ नदेखों श्रम परिहर्तें ॥ ६४ ॥
ऐसें ह्मणोनि आलिंगिलें ॥ कृपेनें मौळ कुरवाळिलें ॥ येरीं गुरुपद नमस्कारिलें ॥ प्रोत्साहिलें गुरुवर्यें ॥ ६५ ॥
गुरुमातेनें मधुरोत्तरीं ॥ तोषवूनि राममुरारी ॥ पुत्रासमान सर्वोपचारीं ॥ कित्येक रात्री गौरविले ॥ ६६ ॥
वियोग नसाहवे सर्वथा ॥ तथापि जावया प्रार्थिली माता॥ चरणांवरी ठेवूनि माथा॥ सद्गुरुनाथा विनविलें ॥ ६७ ॥
ह्मणती आज्ञा दीजे स्वामी॥ स्वगृहा जावया उदित आह्मी॥ जनकजननींच्या हृदयपद्मीं॥ वियोगऊर्मी जाकळी ॥ ६८ ॥
ऐसें ऐकोनि सभार्य मुनि॥ पुत्रवियोग स्मरोनि मनीं॥ ह्मणती वियोगें जनकजननी॥ झुरती मनीं आह्मां ऐसीं ॥ ६९ ॥
यालागीं राहवणें उचित नोहे॥ वियोग सर्वथा नसाहे ॥ मग जाकळूनियां महामोहें ॥ परम स्नेहें आज्ञापी ॥ ७० ॥

गच्छतंस्वगृहंवीरौकीर्त्तिर्वामस्तुपावनी ॥ छंदांस्ययातयामानिभवंत्विहपरत्रच ॥ ४९ ॥

॥टीका॥ भूभारहणार्थ अवतार ॥ क्षात्रधर्मीं धुरंधर ॥ ह्मणोनि संबोधी हे वीर ॥ प्रेमा मत्पर असो तुह्मां ॥ ७१ ॥
क्षेम जावें स्वगृहाप्रति ॥ आशीर्वाद घ्या वरोक्ति ॥ तुमची पावन असो कीर्त्ति ॥ जे उद्धरिती त्रिजगातें ॥ ७२ ॥
मत्सेवनें कृताध्ययन ॥ तें प्रकाशो नित्य नूतन ॥ जैसा उदेला व्यापी गगन ॥ सहस्रकिरण स्वतेजें ॥ ७३ ॥
नातरी स्वतेजें ताप निरसी ॥ पूर्ण कळामंडित शशी॥ पावन कीर्ति तुमची तैसी॥ जगदघ नासी स्मृतिपठनें॥ ७४ ॥
जलचर भूचर खेचर अमर ॥ शक्रविधातृप्रमुख हर ॥ गाती ऐकती निरंतर ॥ कीर्ति अपार हे तुमची ॥ ७५ ॥

---

१ कान.

कीर्तिश्रवणपठन जे करिती ॥ त्यांची होय अघनिवृत्ति ॥ जैसी पावन भागीरथी ॥ तेंवि ते होती सत्पुरुष ॥७६॥
श्रवणीं पठनीं स्त्रियांसि रति ॥ गाती ऐकती पावन कीर्ति॥त्या त्या वनिता साध्वी सती॥रमापार्वतीसमसाम्य७७
नित्य नूतन तुमचीं छंदें॥त्रिजगीं होती जगद्वंद्यें॥ मत्सेवेनें साधिलीं आद्यें ॥ गद्यें पद्यें स्मृतिशास्त्रें ॥ ७८ ॥
ऐसे आशीर्वाद देऊनी ॥ दोघां हृदयीं आलिंगोनी ॥ वारंवार पाहे नयनीं ॥ पडती धरणीं स्नेहाश्रु ॥ ७९ ॥
हनुवटिया धरूनि करीं ॥ हस्त कुरवाळी वदनशिरीं ॥ दुरी बोळवितां नेणती कुमरी ॥ ते अवसरीं होतसे ॥ ८० ॥
मग ते जिरवूनि स्नेहावस्था॥कृपेनें हस्त ठेविला माथां॥येरी वंदूनि बळघले रथा॥मथुरापथा अनुसरले॥ ८१॥

गुरुणैवमनुज्ञातौरथेनानिलरंहसा ॥ आयातौस्वपुरंतातपर्जन्यनिनदेनवै ॥ ५० ॥

॥टिका॥ऐसे गुरुनें आज्ञापिले ॥ मुहूर्तें रथारूढ झाले ॥ छात्रवर्गी बोळविले ॥ त्रिगव्यूतीपर्यंत[1] ॥ ८२ ॥
तेथ राहवूनि सहाध्यायिगण[2]॥पुढें चालिला दिव्यस्यंदन॥कल्याणदायक होती शकुन ॥पितृदर्शनसूचक जे॥८३॥
पवनाहूनि जवीन रथ ॥ गुरुचिंतनें क्रमूनि पंथ ॥ पावले मथुरापुरीं त्वरित ॥ केला अद्भुत कंबुरव ॥ ८४ ॥
प्रावृटीं मेघांचा बोभाट ॥ तेंवि रथाचा घडघडाट ॥ गगनगर्भीं लखलखाट ॥ विद्युत्प्राय खगकेतु[3] ॥ ८५ ॥

समनंदन्प्रजाःसर्वादृष्ट्वारामजनार्दनौ ॥ अपश्यंत्योबह्वहानिनष्टलब्धधनाइव ॥ ५१ ॥

॥टीका॥इत्यादि चिह्नीं ओळखून॥धांवूनि आला प्रजाजन॥देखोनि रामजनार्दन॥जाले निमग्न स्वानंदीं॥८६॥
जेंवि कृपणाचें हारपे धन॥पुन्हा चिरकाळीं सांपडे जाण॥तो जीवाचें उतरी लोण॥तेवीं पुरजन हरि पाहती॥८७॥

---

[1] सहा कोसपर्यंत. [2] गुरुबंधुसमूह. [3] गरुडध्वज.

किंवा शरीरा आलिया प्राण॥उत्फुल्लित इंद्रियगण॥तेंवि देखोनि रामकृष्ण ॥ झाला स्वजन सुखभरित ॥ ८८ ॥
इतुकें कुरुकंजाकरतरणि ॥ सार्वभौमचूडामणि ॥ बृहच्छ्रवा[2] प्रायोपशयनी[3] ॥ सादर श्रवणीं परीक्षिति ॥ ८९ ॥
तयाप्रति योगाब्जिनीमित्र[4] ॥ जो विधीचा प्रपौत्रपौत्र[5] ॥ निरोपूनियां हरिचरित्र ॥ सुधापात्र सम भरिला ॥ ९० ॥
सावध ह्मणे पुढिलिये कथे ॥ उद्धव प्रेरूनि व्रजपुरव्यथे ॥ निरसिजेल श्रीकृष्णनाथें ॥ तें श्रुतिपथें अवधारीं ॥ ९१ ॥
श्रीमद्भागवत पवित्र॥दशमस्कंध हरिचरित्र॥गुरुदक्षिणे अर्पिला पुत्र॥तो अध्याय विचित्र हा कथिला ॥ ९२ ॥
प्रतिष्ठानशेषशयनीं ॥ एकनाथ चक्रपाणि ॥ चिदानंद रमा चरणीं ॥ नाभिकंजज स्वानंद ॥ ९३ ॥ गोविंद
त्रिजग गोपनवंत ॥ दयार्णव क्षीराब्धि निश्चित ॥ श्रोते वक्ते निर्जर तेथ ॥ उपासिती प्रभूतें ॥ ९४ ॥ तत्प्रसादवरद
टीका ॥ कैवल्यदायक सद्भाविकां ॥ श्रवणें क्षाळी कलिमलपंका ॥ निववी शशांका पडिपाडें ॥ ९५ ॥

इतिश्रीमद्भागवतेमहापुराणे ऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायांश्रीरामकृष्णव्रतबंधविद्याभ्यसनगुरुपुत्रानयनन्नामपंचचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ४५ ॥

वैशाखज्येष्ठयोर्मध्येअमायांबुधवासरे ॥ देवालयपुरेह्येतद्व्रतबंधोहरेःकृतः ॥ ४९ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ६९ ॥ ॥ ओव्या ॥ ४९५ ॥ ॥ श्लोक ॥ ५१ ॥ ॥ एवंसंख्या ॥ ५४६ ॥

---

१ कुरु हींच कंजें ह्म० कमळें. त्यांचा आकर ह्म० उत्पत्तिस्थान, त्याचा सूर्य. २ महाश्रोता. ३ संन्यासग्रहणपूर्वक अन्नत्याग करून बसलेला. ४ योगरूपी कमलिनीचा सूर्य. ५ ब्रह्मदेवाचा पणतु पराशर. त्याचा नातु शुकाचार्य.

अध्याय ४६

ये अध्यायीं उद्धवाप्रति ॥ ब्रजा धाडील लक्ष्मीपति ॥
नंद यशोदा सह ब्रजयुवति ॥ शोकनिवृत्ति करावया ॥ १८ ॥



श्रीमत्सद्गुरुगोविंदाय नमः ॥ जय जय प्रणतचकोरचंद्रा ॥ जय जय सच्चित्सुखसमुद्रा जय जय त्रितापनिदाघहरा ॥ भवभ्रमतिमिरा ग्रासूनी ॥ १ ॥ आम्रेडितीं बोलिजे जय तुझा सर्वत्र ऊर्जितोदय ॥ ब्रह्मांडमंडित व्यतिरेकान्वय-॥ बोधें अव्यय अव्याहत ॥२॥ ईश्वरपर्यंत मायामय ॥ यास्तव सहजचि त्यातें व्यय॥काळकलनाजनित भय ॥ पावती लय वैयाहत ॥ ३ ॥ ह्मणोनि काळकलनातीत ॥ अवशिष्ट शेष श्रुतिसंकेत ॥ जाणोनि सुरवर मुनिवर मर्त्य ॥ होती प्रणत तव चरणा ॥ ४ ॥ जन्मसहस्रांचिया कोडी ॥ तपोध्यानयोगपरवडी ॥ मोडतां प्रणतजनांची मोडी ॥ तैं सुकृतजोडी निष्काम ॥ ५ ॥ निष्कामसुकृता जैं ये शीग ॥ गुरुपदप्रेमा तैं अभंग ॥ अनन्यभावें भजनमार्ग ॥ मिथ्यावियोग विरहद ॥ ६ ॥ ऐसे जे कां प्रणतचकोर ॥ तत्तर्पक तूं सुधाकर ॥ ऊर्जितसच्चित्सुखसमुद्र ॥ भवमृगनीरनिरासिता ॥ ७ ॥ भवमृगनीरानिमित्त भ्रमतां ॥ देखोनि तापत्रयसंतप्तां ॥ स्वप्रकाशें रोहिणीहर्ता ॥ श्रांतां निवविता सहज पैं ॥ ८ ॥ एवं चंदनीं सहज सुगंध ॥ सहज पीयूषीं सुस्वाद ॥ तैंवि गुरुपदभजनीं बोध॥ सहजसिद्ध सर्वदा ॥ ९ ॥ तस्मात अतीत जितुकीं जन्में ॥ तत्कृत सुकृत तो नावगमे ॥ परंतु वर्तमानप्रेमसंभ्रमें ॥ विषयभ्रमें नबाधिजे ॥ १० ॥ याचिवरूनि भूतावगम ॥ वर्तमान श्रीपदप्रेम ॥ सहजभावीं द्वैतोपरम ॥ अपरोक्ष सुगम अमृतत्व ॥ ११ ॥ जैसी समुद्रावरी वृष्टि ॥ तें जल पूर्वीं स-

---

१ सर्वव्यापकत्व असून सर्वांहून निराळेपणा. २ पूर्वजन्मीं केलेल्या कर्मांचें ज्ञान.

मुद्रापोटीं ॥ पतनें समुद्रा ये भेटी ॥ तैंवि हे गोठी त्रिकालीन ॥ १२ ऐशिया स्तवनें प्रणतपाळा ॥ स्तावितां
कृपेचिया निहाळा ॥ करूनि विकाशी हृत्पद्ममुकुळा ॥ योजी स्वलीलागुणकथनीं ॥ १३ ॥ आरब्ध श्रीमद्भागवत
॥ दशमस्कंध भगवच्चरित ॥ विद्याभ्यसनीं गुरुतोषार्थ ॥ दक्षिणे गुरुसुत अर्पिला ॥ १४ ॥ पंचेचाळिसावे
अध्यायीं ॥ इतुकी कथा संपली पाहीं ॥ तें परिसोनि प्रायोपशायी[1] ॥ मननें हृदयीं नृप ठेवी १५ ॥
मुखींचा कवळ गिळिला बाळें ॥ जाणोनि माउली निजकरतळें ॥ मुख संतर्पी द्वितीय कवळें ॥ तैंवि स्नेहाळें मुनिवर्यें
गत कथेचें जाणोनि मनन ॥ पुढें आदरी निरूपण ॥ तो हा शेचाळिसावा पूर्ण ॥ अध्याय पावन परिसावा ॥ १७
ये अध्यायीं उद्धवाप्रति ॥ व्रजा धाडील लक्ष्मीपति ॥ नंद यशोदा सहव्रजयुवति ॥ शोकनिवृत्ति करावया ॥ १८ ॥
क्षात्रकुळीं अवतरोनि ॥ वैश्यकुळीं शिशुक्रीडन ॥ संस्काररहित शूद्रपण ॥ स्वैराचरण गोपींसीं ॥ १९ ॥
कंसहननांतीं श्रीपति ॥ ज्ञातिसंस्कारविद्यावाप्ति ॥ गोपीविरहशोकापनुति ॥ उद्धवाप्रति निरूपी ॥ २० ॥

श्रीशुकउवाच ॥ वृष्णीनांप्रवरोमंत्रीकृष्णस्यदयितःसखा ॥ शिष्योबृहस्पतेःसाक्षादुद्धवोबुद्धिसत्तमः ॥१॥

॥ टीका ॥ गोपीस्नेहाचें अवतरण ॥ विविध विलास स्वैराचरण ॥ कोणापासीं नकरवे कथन ॥ जाकळे मन तत्स्मरणें
मम वियोगें मातापितरें ॥ स्वभुक्तगोपीअभ्यंतरें ॥ करपती वियोगविरहांगारें ॥ हृदयीं श्रीधरें जाणोनी ॥ २२ ॥
आपण गेलिया नसुटे मिठी ॥ नवचतांचि वियोगहव्यवाटीं[2] ॥ व्रजनिवासी लहानें मोठीं ॥ शोकसंकटीं बुडतील ॥
ऐसें विवरूनियां श्रीपति ॥ त्यांचिया शोकाचे निवृत्ति ॥ हृदयामाजी योजिली युक्ति ॥ कुरुभूपति तें ऐकें ॥ २४ ॥
जरी श्रीपति जगन्मित्र ॥ तथापि नवदे रहस्यमंत्र ॥ सद्‌गुणसंपन्न प्रिय सत्पात्र ॥ उद्धव स्वतंत्र एकात्मा ॥

---

[1] संन्यासग्रहणपूर्वक अन्नत्याग करून बसलेला· परीक्षिति. [2] वियोगाग्नीमध्यें.

वृष्णिकुळींचा मंत्रिवरिष्ठ ॥ कृष्णप्रियतम एकनिष्ठ ॥ अमृतापरीस वक्ता मिष्ठ ॥ जीवोपदिष्ट[1] सच्छिष्य ॥ २६ ॥
अनन्य अनिंदक सद्बुद्धि ॥ दोषदर्शन नकरी कधीं ॥ साक्षात् बृहस्पति ज्यासि बोधी ॥ तो हा त्रिशुद्धि उद्धव ॥ २७ ॥
ऐसा लक्षूनि जगदीश्वरें ॥ नेला एकांतीं धरूनि करें ॥ कथिता झाला गुह्योत्तरें ॥ तीं उत्तराकुमरें परिसावीं ॥ २८ ॥

तमाहभगवान्प्रेष्ठंभक्तमेकांतिनंक्वचित् ॥ गृहीत्वापाणिनापाणिंप्रपन्नार्तिहरोहरिः ॥ २ ॥

॥ टीका ॥ व्यभिचाररहितभक्तिमंत ॥ अनन्य प्रियतम आत्मनिरत ॥ त्याप्रति षड्गुणैश्वर्यवंत ॥ बोले भगवंत निजगुह्य
हस्त धरूनियां हस्तीं ॥ कांहीं क्वचित् गुह्य उक्ति ॥ कथिता झाला करुणामूर्ति ॥ प्रपन्नार्तिपरिहर्ता ॥ ३० ॥
शरणागताचें आर्तिहरण ॥ करावयाचें ज्यातें व्यसन ॥ तो व्रजविरहें कळवळून ॥ सांगे वचन तें ऐका ॥ ३१ ॥

गच्छोद्धवव्रजंसौम्यपित्रोनौंप्रीतिमावह ॥ गोपीनांमद्वियोगाधिंमत्संदेशैर्विमोचय ॥ ३ ॥

॥ टीका ॥ सौम्य ऐसें संबोधन ॥ कीं श्रमहर्ता तूं सोमासमान ॥ तनुताप निरसी अमृतकिरण ॥ निरसे तुझेन मनोग्लानि ॥
उद्धवा जाऊनि व्रजाप्रति ॥ स्वमुखें नंद यशोदासती ॥ माझी निवेदूनियां विनति ॥ बोधूनि आर्ति निरसावी ॥ ३३ ॥
गोपी माझिया वियोगदुःखें ॥ सदा संतप्त विरहशोकें ॥ माझे निरोप सांगोनि मुखें ॥ त्वां त्या स्वसुखें निववाव्या ॥ ३४ ॥
माझ्या परिसोनि वेणुगीता ॥ गोपी झाल्या भवसुखविरता ॥ सांडूनि धनसदनादिकांतापत्यां ॥ मम एकांता अनुसरल्या ॥
मत्प्रेमवेधें रंगलीं मनें ॥ इहामुत्रार्थफळभोग वमनें ॥ मानूनि भजल्या मजकारणें ॥ भववेदने विसरोनी ॥ ३६ ॥
ईषणात्रय[2] घालूनि मागें ॥ वोटंगल्या वाङ्मनआंगें ॥ नित्य रंगल्या मत्प्रेमरंगें ॥ मग म्यां श्रीरंगें रमविल्या ॥ ३७ ॥
धर्मशास्त्रार्थ बहुधा नीति ॥ म्यां बोधितां तयांप्रति ॥ त्यांची मन्निष्ठ चित्तवृत्ति ॥ नवचे कल्पांतीं पालटिली ॥ ३८ ॥

---

[1] बृहस्पतीनें पढविलेला. [2] धन, गृह आणि पतिपुत्र ह्यांच्या इच्छा.

तामन्मनस्कामत्प्राणामदर्थेत्यक्तदेहिकाः ॥ मामेवदयितंप्रेष्ठमात्मानंमनसागताः ॥
येत्यक्तलोकधर्माश्चमदर्थेतान्बिभर्म्यहम् ॥ ४ ॥

॥टीका॥ त्या मन्मनस्का मत्प्राणा॥ मदर्थशरीरसंबंधिजना॥ त्यागूनि झालिया मदेकशरणा ॥ प्रियतम आना नमनिती
मातेंचि मानिती प्रियतम इष्ट ॥ माझ्याचि ठायीं आत्मनिष्ठ ॥ कायावाचामनें स्पष्ट ॥ ममाभीष्ट तें करिती ॥ ४० ॥
मन्मना त्या ह्मणाल कैशा ॥ मत्परसंकल्पमानसा ॥ मत्संगती क्रमिल्या निशा ॥ त्या विलासा संस्मरती ॥ ४१ ॥
माझी क्रीडा हृदयीं स्मरती ॥ मद्गवेषणा आठविती ॥ वाळवंटीं विरहावर्ती ॥ गाइल्या उक्ति ममवेधें ॥ ४२ ॥
त्यांचें करितां अनुस्मरण ॥ तेणें मन्निष्ठ होय मन ॥ भवव्यवहारीं वृत्तिशून्य ॥ करिती शासन श्वशुरादि ॥ ४३ ॥
मातें देखोनि वाळवंटीं ॥ हस्त घालूनि माझ्या कंठीं ॥ सप्रेमभावें पडली मिठी ॥ त्या ते गोठी मनीं स्मरती ॥ ४४ ॥
मन्निष्ठ जाणोनि ऐसिया ललना ॥ म्यां तयांच्या भ्रमापहरणा ॥ हल्लीं सक्रीडारचना ॥ राससंज्ञा निर्मिली ॥ ४५ ॥
जितुक्या गोपींचिया व्यक्ति ॥ म्यांही तितुक्या धरूनि मूर्ति ॥ दिधली रासमिषें विश्रांति ॥ अमरांप्रति दुर्लभ जे ॥ ४६
मन्निष्ठचि त्यांचें मन ॥ तें नविसरती अर्ध क्षण ॥ अस्ताव्यस्त प्रवृत्तिभान ॥ करणज्ञान पारुषलें ॥ ४७ ॥
ऐसिया गोपी मन्मनस्का॥ मन्निष्ठ आबाल्यवयस्का ॥ मदर्थ बहुजन्मीं तपस्का ॥ वेधती अयस्कांतापरी ॥ ४८ ॥
अक्रूरें मज आणितां मथुरे ॥ ऐकोनि त्यांचीं चित्तें आतुरें ॥ न ह्मणती माहेर कीं सासुरें ॥ घरें लेंकुरें विसरल्या ॥ ४९ ॥
ठायीं ठायीं मदर्थ रडती ॥ मद्वियोगें विकळ पडती ॥ विरहानळें हृदयें कढती ॥ सप्रेम जडती मच्चरणीं ॥ ५० ॥

---

१ माझा शोध.

म्यां नवचावें सहसा दुरी ॥ ऐसा मनोरथ अभ्यंतरीं ॥ तो सूचिती बहुतां परी ॥ संकेतकुसरी दावूनी ॥ ५१ ॥
अक्रूरासी करिती विनति ॥ मथुरे ननेई श्रीपति ॥ आश्वासिलें म्यां तयांप्रति ॥ येईन पुढतीं ह्मणोनियां ॥ ५२ ॥
रथ हांकितांचि अक्रूरें ॥ मज मीनल्या अभ्यंतरें ॥ मागें टाकिलीं कलेवरें ॥ लोकव्यापारें सांडविलीं ॥ ५३ ॥
मग म्यां पूर्वपरामर्ष ॥ करूनि ओपिला स्मृतीचा लेश ॥ तेणें सांडूनियां श्वास ॥ व्रजा सक्लेश परतल्या ॥ ५४ ॥
निषादें वधिली जैंवि हरिणी ॥ तेवीं सक्षता वियोगबाणीं ॥ माझें चिंतन अंतःकरणीं ॥ गृहाचरणीं वैकल्य॥५५॥
अक्रूरावरी करिती कोप ॥ ह्मणती केवढा हा निष्कृप ॥ वृथा अक्रूरसंज्ञाजल्प ॥ कृतांतकल्प[1] निष्ठुर हा ॥ ५६ ॥
कृतांताहूनि अधिक क्रूर ॥ कां पां ह्मणती या अक्रूर ॥ गृहामाजि जो अंगार ॥ मंगलवासर तो जैसा ॥ ५७ ॥
राक्षसा ह्मणती पुण्यजन ॥ शस्त्रधारे जळाभिधान ॥ वत्सनाभीतें[2] अमृतपण ॥ अक्राभिधान या तैसें ॥ ५८ ॥
ऐशा शापिती गांदिनीसुता[3] ॥ मन्निष्ठ करूनि एकात्मता ॥ मत्संकल्प ग्रथिती चित्ता ॥तो तूं आतां अवधारीं॥५९॥
रामकृष्ण रथारूढ ॥ वारू चालती झडझड ॥ सवेग रथाची घडघड ॥ मानिती कोड रथयानीं ॥ ६० ॥
मार्गीं अनेक कौतुकें ॥ शकुंतें शुकसारिकाप्रमुखें ॥ हंस मयूर मृग जंबुकें ॥ देखती मुखें पथिकांचीं ॥ ६१ ॥
तेणें हर्षें पथाक्रमण ॥ आमुचें किमर्थ त्यातें स्मरण ॥ इत्यादि संकल्प बल्लवीगण ॥ चित्तें करूनि कल्पिती॥६२॥
आतां जाती मथुरापुरीं ॥ बंधु बैसोनि रहंवरीं ॥ पुढें येती नगरनारी ॥ चतुरा सुंदरी नागरा ॥ ६३ ॥
रत्नजडित त्यांचीं लेणीं ॥ वाङ्माधुर्य शब्दकडसणी[4] ॥ बळरामेंसीं चक्रपाणि ॥ अर्धक्षणीं भुलविती ॥ ६४ ॥
पुन्हा आमुची तेथ वार्ता॥काशिया स्मरेल त्याचिया चित्ता॥आह्मी घुरटा बल्लववनिता॥प्रियतम केउत्या त्यां पुढें६५

---

[1] यमासारखा. [2] बचनाग. [3] गांदिनी ही अक्रूरमाता होय. [4] परीक्षा, चौकशी.

आजि धन्य त्यांचे नयन ॥ होती देखोनि रामकृष्ण ॥ आजि सफळ त्यांचें पुण्य ॥ दैवहीन पैं आह्मी ॥ ६६ ॥
मार्गीं चालतां रामकृष्णा ॥ झणें वरपडे होती उष्णा ॥ अन्नपानाची होतां तृष्णा ॥ करिती प्रश्ना अक्रूरा॥६७॥
उष्णें कोमेजती वदनें ॥ तेव्हां स्मरती निकुंजसदनें ॥ विरहें संतप्त होती मदनें ॥ मन्मथकदनें तैं स्मरती॥६८॥
अक्रूर नेईल कंसाभेटी॥कंस दुरात्मा निर्दय कपटी॥घालील कवण विघ्नसंकटीं॥ह्मणोनि पोटीं कळवळिती॥६९॥
ऐसे संकल्प मत्पर ॥ मनें कल्पिती निरंतर ॥ त्यांचा प्राण मी श्रीधर ॥ मदर्थ पतिपुत्र त्यागिले ॥ ७० ॥
सासू श्वशुर देवर भावे ॥ तिहीं मदर्थ त्यागिले आघवे ॥ मजसीं ओटंगल्यां[२] जीवें ॥ आन नाठवे मजविणें त्यां ॥७१॥
मजकारणें इहामुष्मिक ॥ जिहीं त्यागिले उभय लोक ॥ तदुचित धर्म जे सम्यक् ॥ ते निष्टंक त्यागिले ॥ ७२ ॥
ऐसे मन्निष्ठ जे जे झाले॥त्यांचें सर्वस्व मज लागलें ॥ ते म्यां पाहिजे संगोपिले ॥ ओसंडिले नवचती ॥ ७३ ॥
योगक्षेमाचें मज ओझें॥भरण पोषण करितां नलजें॥त्यांचें दास्य बरवे वोजे॥ करणें माझें बिरुद हें ॥ ७४ ॥
वैकुंठक्षीराब्धिप्रमुखें ॥ ऐश्वर्यपदें जें अनेकें ॥ तिहीं सहित ब्रह्मांड फिकें ॥ तुकितां नतुके तत्संगा ॥ ७५ ॥
प्रेमळ संगें जो होय हरिख॥नतुके तेणेंसीं ब्रह्मसुख॥ब्रह्मसमरसीं होवोनि विमुख॥अवतरें देख त्यांसाठीं॥७६॥
ज्यांचीं माझ्या ठायीं मनें ॥ मज मीनले जीवें प्राणें ॥ मन्निष्ठाचि त्यांचीं करणें ॥ विषयाचरणें मदर्थ ॥ ७७ ॥
मद्गुणश्रवणीं शब्दग्रहण ॥ मम मूर्तीचें आलिंगन ॥ देव ब्राह्मण गुरु सज्जन ॥ निवती पूर्ण त्या स्पर्शें ॥ ७८ ॥
मन्मय पाहती अखिल जग॥नेणती गुणदोषांचें लिंग॥कीर्तनसुधारसाचा भोग॥जिह्वेसि चांग चाखविती॥७९॥
अथवा नामामृतरसपानें॥जिह्वा सुरंग रंगली स्मरणें॥कीं मत्प्रसादतीर्थग्रहणें ॥ फावली रसने रसगोडी ॥ ८० ॥

---

१ स्पर्शिलेले. २ आश्रय पावल्या.

मदर्चनींच वेधले कर ॥ मत्पर ज्यांचा पदव्यापार ॥ मदर्थ करिती शौचाचार ॥ अव्यभिचार मन्निष्ठ ॥८१॥
ऐसे जे कां सर्वोपरी ॥ मज कवळिती अभ्यंतरीं ॥ त्यांची तैसीच मज अवसरी ॥ मी संसारीं त्यां साठीं ॥ ८२ ॥
त्यांचा योगक्षेम मी वाहें ॥ मागें पुढें उभा राहें ॥ त्यांचें विषम मज नसाहे ॥ मी लवलाहें तें निरसीं ॥ ८३ ॥
त्यांची वाट झाडीं हातें ॥ कृपापीयूषें पोषीं त्यांतें ॥ आपुले शिरीं त्यांचीं दुरितें ॥ घेवोनि सरतें त्यां करीं८४॥
परस्परें प्रेमजिव्हाळा॥वदों नशकें मी तेथींची कळा॥यालागीं गोपींचा कळवळा॥स्मरतां डोळां जळ झिरपे८५॥

मयिताःप्रेयसांप्रेष्ठेदूरस्थेगोकुलस्त्रियः ॥ स्मरंत्योंऽगविमुह्यंतिविरहोत्कंठयविह्वलाः ॥ ५ ॥

॥टीका॥गोपीस्नेहाचें अवतरण॥अमनस्का मज होय स्मरण॥अवस्था जाकळी मजला पूर्ण॥मां त्यांचे प्राण केंवि
राहती॥८६॥माझ्या ठायीं त्या प्रियतमा॥मी तयांचा केवळ आत्मा॥दूर अंतरतां मग त्या वामा॥गोकुळग्रामामाजिलिया
॥८७॥स्मरणें झुरझुरूं पंजर होती॥विमुह्यंति ह्मणिजे भुलती॥विरहोत्कंठा वाहतां चित्तीं॥विह्वळवृत्ति परवशता॥८८॥
अंग ह्मणोनि संबोधन॥उद्धवा संबोधी भगवान॥कीं तो अनिंदक अनन्य सुमन॥कोमळामंत्रण या हेतु ॥ ८९ ॥
गोपी स्मरोनि कृष्ण जैसा ॥ उद्धव अवस्थाभूत तैसा ॥ देखोनि देवाचिया मानसा॥गहिंवर सहसा नसंवरे ॥ ९० ॥
मग ह्मणे गा उद्धवा ऐक ॥ माझे अंतरीं इतुकाचि धाक ॥ गोपींसी नसाहवे वियोगदुःख ॥ तथापि ऐक रहस्य॥९१॥

धारयंत्यतिकृच्छ्रेणप्रायःप्राणान्कथंचन ॥ प्रत्यागमनसंदेशैर्बल्लव्योमेमदात्मिकाः ॥६ ॥

॥टीका॥गोपी माझिया विरहानळें॥भस्म झाल्याचि असती नकळे॥येवढ्या वियोगदुःखें बहळें॥जीवनकळे नुरणूक९२

---

१ मनोधर्मरहिताला.

परन्तु एक भरवंसा मना॥महता क्लेशें धरिती प्राणा॥विश्वासोनि माझिया वचना॥प्रत्यागमना लक्षिती त्या॥ ९३ ॥
बहुतेक माझिया त्या बल्लवी॥मदात्मिका सर्वभावीं॥मी सर्वस्वें त्यांच्या जीवीं॥यास्तव जीववीं जगज्जीवन॥ ९४ ॥
शीघ्र येईन ऐसी वाणी ॥ स्वमुखें बोलिलों चक्रपाणि ॥ त्याविश्वासें पंचप्राणीं ॥ शरीरभुवनीं वसिजेल ॥ ९५ ॥
ऐशा सक्लेश प्राण धरिती॥बहुतेक वाटतें माझ्या चित्तीं॥तरी त्वां जावोनि तयांप्रति॥मम वचनोक्ति बोधाव्या॥९६ ॥
त्या वचनोक्ति ह्मणसी कैशा॥तुह्मी प्रियतमा मम मानसा॥मजसीं वियोग नाहीं सहसा॥हृदयीं ठसा ठसावतां ॥ ९७
मी तुमचिया अभ्यंतरीं ॥ तुह्मी मत्प्रेमें मजमाझारी ॥ असतां नबाधी विरहलहरी ॥ मम वैखरी हे बोधीं ॥९८॥
चतुरा उपदेशवचन एका॥शताब्द बोधितां नबणे मूर्खा॥सुरेंज्यशिष्य[1] उद्धव निका॥वृत्तांत असिंका[2] त्या कळला ॥
शुक ह्मणे गा परीक्षिति ॥ उद्धवें परिसोनि कृष्णोक्ति ॥ कैसा चालिला गोकुळाप्रति॥ तें तूं सुमति अवधारीं॥१००

श्रीशुकउवाच ॥ इत्युक्तउद्धवोराजन्संदेशंभर्तुराहृतः ॥ आदायरथमारुह्यप्रययौनंदगोकुलम् ॥ ७ ॥

॥ टीका ॥ गुह्यगोष्टी परम रहस्य ॥ वदतां साशंक मानस ॥ त्याही निःशंक उद्धवास बोलिला परेश निष्कपट
भर्ता ह्मणिजे आपुला स्वामी ॥ तेणें योजिलें रहस्यकामीं ॥ त्याचे निरोप हृदयपद्मीं ॥ धरूनि सद्मींहूनि ऊठला ॥
आज्ञा घेऊनि निज नाथाची ॥ रथ सज्जिला समयीं तेची ॥ रथीं बैसोनि गोकुळींची ॥ मति विवंची चालतां ॥
धन्य नंदाचें गोकुळ ॥ धन्य धन्य तो बल्लवपाळ ॥ धन्य यशोदा सुकृतशीळ ॥ मानिती बाळ जगज्जनका ॥४॥

---

[1] बृहस्पतीचा शिष्य. [2] सर्व.

धन्य धन्य तो बल्लवीगण ॥ नकळे त्याचें सुकृत कोण ॥ ज्याच्या प्रेमें श्रीभगवान ॥ कळवळून मज बोधी ॥५
ऐशिया नंदगोकुळाप्रति ॥ रथीं बैसोनि उद्धव सुमति ॥ अस्तगिरीं पावे गभस्ति॥जाता झाला ते समयीं ॥६॥

प्राप्तोनंदव्रजंश्रीमान्निम्लोचतिविभावसौ ॥ छन्नयानःप्रविशतांपशूनांखुररेणुभिः ॥ ८ ॥

॥टीका॥विभावसू[1]चिया मंडळा॥चुंबीत असतां अस्ताचळा॥ऐशिये समयीं नंदगोकुळा ॥ उद्धव पावला सप्रेमें ॥
पशूंचे कळप सायंकाळीं ॥ प्रवेशतां घोषमंडळी[2] ॥ त्यांच्या खुरें उधळल्या धुळी ॥ जीमूतां[3]वळीसम गमती ॥८॥
तया खुररेणूंहीं रथ ॥ झांकोळला गोकुळेंसहीत ॥ नंदसदनद्वारीं स्वस्थ ॥ नेऊनि केला सारथियें ॥ ९ ॥
गोपी रथातें लक्षून॥नेणतां कोणाचा हा कोण ॥ ह्मणती अक्रूरें आणिला कृष्ण ॥ कीं आमुचे प्राण नेईल हा ॥
असो गोपींचे वितर्क ॥ व्रजवर्णना करी शुक ॥ ते संक्षेपें पांच श्लोक ॥ श्रोतीं सम्यक परिसावे ॥ ११ ॥

वासिताऽर्थेऽभियुद्धयद्भिर्नादितंशुष्मिभिर्वृषैः॥धावंतीभिश्चवास्राभिरूधोभारैःस्ववत्सकान्॥९॥

॥टीका॥प्रवेशकाळींची गोकुळशोभा ॥ ऐकें कुरुभूतळवल्लभा ॥ धेनु ऋतुमति निमित्त वृषभा ॥ युद्धें क्षोभा पाव-
विती ॥ १२ ॥ युद्धें करिती वृषभ ऐसे ॥ सकाम उन्मत्त तनुआवेशें ॥ डरक्या फोडिती गंभीरघोषें ॥ मेघ जैसे प्रावृटीं
तयां उक्षां[4]च्या फुंपाटध्वनि ॥ युद्धार्थ इतस्ततःधावनीं ॥ ऐशी गोकुळशोभा नयनीं ॥ उद्धव पाहोनि संतुष्ट ॥ १४ ॥
वत्सासाठीं नवप्रसूता ॥ वोरसें[5] दाटोनि वत्समाता ॥ धेनु धांवती त्वरान्विता ॥ तिहीं तत्वता व्रज शोभे ॥ १५ ॥
वोहे[6] दाटले दुग्धभारें ॥ सस्निग्धवत्सांच्या हुंकारें ॥ स्तनीं लागले दुग्धझरे ॥ तें पाझरे भूतळीं ॥ १६ ॥

---

[1] सूर्याच्या. [2] गवळवाड्यांतील लोक. [3] मेघपंक्तीसारख्या. [4] बैलांच्या. [5] स्नेहभरित पान्ह्यानें. [6] कांसा.

अचलाग्रींहूनि जैसें जल ॥ तळवटीं धांवे उताविळ ॥ तेवीं वत्सार्थ धेनुमेळ ॥ जवनशील शोभती ॥ १७ ॥
गाई धांवती वत्सांसाठीं ॥ तेवीं औत्सुक्य वत्सां पोटीं ॥ ऐकें तयांची राहटी ॥ स्नेहाळें पोटीं परस्परें ॥ १८ ॥

इतस्ततोविलंघद्भिर्गोवत्सैर्मंडितंसितैः ॥ गोदोहशब्दाभिरवंवेणूनांनिःस्वनेनच ॥ १० ॥

॥टीका॥ऐकोनि धेनूंचे हुंकार॥धांवों इच्छिती वत्सें समोर॥कंठीं निरुद्ध पाशदोर॥तेणें आतुर उफाळती ॥ १९ ॥
इतस्ततःउडिया घेती ॥ गाई समोर उकावंती ॥ क्षुधातुरें हुंकारती ॥ स्थिर नहोती आंवरितां ॥ २० ॥
काळी निळी धवळी पवळी ॥ धेनुवत्सांची मंडळी ॥ तेणें व्रजशोभा आगळी ॥ दृष्टि निहाळी उद्धव ॥ २१ ॥
गोदोहनें बल्लव करिती ॥ पात्रीं पयधारा वाजती ॥ तेणें वत्सें हुंकारती ॥ सशब्द भ्रमती मार्जारें ॥ २२ ॥
सोडा सोडा रे वांसुरें ॥ प्यालीं अखंडा ह्मणती त्वरें ॥ घ्या घ्या ह्मणती दोहिलीं पात्रें ॥ पुन्हा सत्वरें द्या ह्मणती॥२३ ॥
तर्णकांचे हुंकारगजर ॥ वेणुध्वनि त्यांमाजी मिश्र ॥ तेणें नादें व्रज समग्र ॥नादाकार ब्रह्म गमे॥२४॥ऐशी व्रजशो-
भा उद्धवें ॥ श्रवणें नयनें पाहतां निवे ॥ गोपी गाती सप्रेमभावें ॥ तें परिसें आघवें हरिचरित ॥ २५ ॥

गायंतीभिश्चकर्माणिशुभानिबलकृष्णयोः ॥ स्वलंकृताभिर्गोपीभिर्गोपैश्चसुविराजितम्॥११॥

॥टीका॥जन्मापासूनि रामकृष्णीं॥जे जे क्रीडा व्रजभुवनीं॥केली ते ती गाती वदनीं॥मनीं स्मरोनि तद्वेधें ॥ २६ ॥
रामकृष्णांचीं कल्याणकर्में ॥ हृदयीं स्मरोनियां सप्रेमें ॥ विवशवृत्ति मनोधर्में ॥ गाती नामें गुणगरिमा ॥ २७ ॥ ॥ ५ ॥
राकारमणवदना गोपी ॥ प्रथमवयसा नवकांदर्पी ॥ दिव्याभरणीं रविभा लोपी ॥ ज्यांचे रूपीं हरि वेधे ॥ २८ ॥

---

१ उत्कंठेनें पाहती. २ वत्सांचे. ३ चंद्रमुखी.

आणि सांडूनि त्रिविष्टपं[1] ॥ त्रिदश जेथें जाले पशुप ॥ तो हा नंदव्रज अमूप ॥ शोभापडंप[2] मिरवीतसे ॥ २९ ॥
गोप गोपी लावण्यराशि ॥ सांलकृता शुभवाससी ॥ स्वसौंदर्यें व्रजभुवनाशी ॥ शोभाविशेषीं शोभविती ॥ ३० ॥
आणखी गोपाळांची वसती ॥ सकळ स्वधर्में गुणसंपत्ति ॥ तेणें गोकुळ शोभविती ॥ तें तूं भूपति अवधारीं ॥ ३१ ॥

अग्न्यर्कातिथिगोविप्रपितृदेवार्चनान्वितैः ॥ धूपदीपैश्चमाल्यैश्चगोपावासैर्मनोरमम् ॥ १२ ॥

॥टीका॥अग्न्यवदान सायंहोमीं॥प्रभाते होमिती सूर्यनामीं॥अतिथिपूजेचिया नियमीं॥ पुरुषोत्तमीं समरसती ३२ ॥
गोगोपांचें कुळदैवत ॥ अनन्यभावें विप्रभक्त ॥ सर्वदा पितृभजनीं निरत ॥ अतंद्रित सुरार्चनीं ॥ ३३ ॥
मलापकर्षण शुद्धस्नानें ॥ दिव्यवसनें दिव्याभरणें ॥ धूपदीपदिव्यसुमनें ॥ सुगंधचूर्णें चर्चिती ॥ ३४ ॥
अमृततुल्य षड्रस अन्नें ॥ सुगंध शीतळ पवित्र जीवनें ॥ फलतांबूलहेमरत्नें ॥ जें दक्षिणे समर्पिती ॥ ३५ ॥
नीराजनें मंत्रकुसुमें ॥ प्रदक्षिणा करिती नियमें ॥ निगमप्रणीत सूक्तोत्तमें ॥ स्तविती प्रेमें पूजान्तीं ॥ ३६ ॥
प्रार्थनापूर्वक क्षमापन ॥ अच्युतस्मरणें न्यून तें पूर्ण ॥ करिती ऐसे बल्लवगण॥ तिहीं करून व्रज शोभे ॥ ३७॥
ऐसे आभीर[3] सन्मार्गनिरत ॥ अग्निसूर्यअतिथिभक्त ॥ गोसुरभूसुरभजनीं निरत ॥ अतंद्रित पैतृकीं ॥ ३८ ॥
आर्यमुखें अध्यात्मश्रवण ॥ स्वमुखें करिती हरियशः कथन ॥ नित्य नियमें हरिकीर्तन ॥ पादसेवन पूज्यांचें॥ ३९ ॥
ऐशियांचिये वसतीकरून ॥ नंदगोकुळ विराजमान ॥ देखोनि उद्धवाचे नयन ॥ सुप्रसन्न निवाले ॥ ४० ॥
असो ऐसे व्रजनिवासी ॥ स्ववासें शोभविती व्रजासी ॥ भंवती वनें विपिनें कैसीं ॥वृंदावनासी शोभविती॥ ४१॥

---

[1] स्वर्ग. [2] शृंगार. [3] गौळी.

सर्वतःपुष्पितवनंद्विजालिकुलनादितम् ॥ हंसकारंडवाकीर्णैःपद्मखंडैश्चमंडितम् ॥ १३ ॥

॥टीका॥वनें वाटिका उद्यानें ॥ सुपुष्पितें श्रृंगारवनें ॥ कदळीखंडें च्यूतविपिनें ॥विविधकाननें विराजती॥४२ ॥
भंवते अनेक विटपारामं ॥ रामकृष्णीं धरूनि प्रेम ॥ मुनिवर झाले कल्पद्रूम ॥ सुकृतधाम व्रजविपिनीं ॥ ४३ ॥
फळप्रसूनीं नवपल्लवीं ॥ शीतळ छाया श्रमितां निववी ॥ ऐशिया तरुवरीं शोभा नवी॥व्रजा शोभवी स्वतेजें॥४४ ॥
वनोपवनीं द्विजांच्या पंक्ति ॥ फळें भक्षूनि विराव करिती ॥ हंसकारंडवादिजाति ॥ पिका कूजती शुकादिक॥ ४५ ॥
तडागसरोवरें उदंडें ॥ त्यांमाजी विचित्रें पद्मखंडें ॥ गुंजारवती भ्रमर कोडें ॥ तुच्छ त्यापुडें अमरपुरी॥४६ ॥
इत्यादिगुणीं वृंदावन ॥ उद्धवें देखिलें शोभायमान ॥ परमाह्लादें निवालें मन ॥ नंदसदन पावला ॥४७॥

तमागतंसमागम्यकृष्णस्यानुचरंप्रियम् ॥ नंदःप्रीतःपरिष्वज्यवासुदेवधिऽऽयार्चयत् ॥ १४ ॥

॥टीका॥श्रीकृष्णाचा अनुचर प्रिय॥येतां देखोनि नंदराय ॥ मेळवूनियां हृदया हृदय॥ परम सदय भेटला॥४८ ॥
यान विश्रामविलें वाटीं ॥ उद्धव धरूनियां मनगटीं ॥ गृहामाजी रत्नपीठीं ॥ सुखसंतुष्टी बैसविला ॥ ४९ ॥
प्रत्यक्ष मानूनियां रामकृष्ण ॥ किंवा वैकुंठ श्रीभगवान् ॥ ऐशिया बुद्धी उद्धवार्चन ॥ करी आपण व्रजपति ॥ ५० ॥
चरण क्षाळूनि शुद्धोदकें ॥ सदन प्रोक्षी पादोदकें ॥ भाळ शोभवी केशरतिलकें ॥ मलयजपंकें तनु चर्ची ॥ ५१ ॥
अक्षता माणिक्यरंगाकार ॥ कंठीं घातले सुमनहार ॥ परिमळद्रव्याचा धूसर ॥ पवन श्रमहर जाणविती ॥ ५२ ॥
दशांग धूप एकारती ॥ उजळूनियां कर्पूरज्योति ॥ महानैवेद्य यशोदासती ॥ कनकताटीं विस्तारी ॥ ५३ ॥

---

१ वृक्षांचे बाग.

भोजितंपरमान्नेनसंविष्टंकशिपौसुखम् ॥ गतश्रमंपर्यपृच्छत्पादसंवाहनादिभिः ॥ १५ ॥

॥टीका॥परमान्न पर्पट[1] पयाज्य सितां[2]॥नंदें नैवेद्य समर्पितां॥हरिस्मरणें उद्धव भोक्ता॥झाला तत्वता ते काळीं॥५४॥
भाव देखोनि निवाला मनीं ॥ तृप्त झाला प्रियभोजनीं ॥ गंडूषपात्रीं उष्ण पाणी ॥ आंचवनार्थ अर्पिलें ॥ ५५ ॥
प्रक्षाळूनियां करपदवदन ॥ पुसिलें विशुद्धवसनें करून ॥ मंचकीं कशिपु[3] उपबर्हण[4] ॥ मृदुलासनीं बैसविला ॥ ५६ ॥
मार्गश्रम विसर्जूनी ॥ सुखें बैसतां मंचकासनीं ॥ नंदें चरणसंवाहनीं ॥ सन्निधानीं निववीला ॥ ५७ ॥
स्वागत स्वर्चित सुभोजित ॥ मंचकीं बैसला श्रमातीत ॥ ऐशियातें यशोदाकांत ॥ पुसे वृत्तांत तो ऐका ॥५८॥

कच्चिदंगमहाभागसखानःशूरनंदनः ॥ आस्तेकुशल्यपत्याद्यैर्युक्तोमुक्तःसुहृद्वृतः ॥ १६ ॥

॥टीका॥कोमळशब्दें ह्मणे अंग॥उद्धवा भेटलासि तूं जिवलग॥तरी मथुरेचा वृत्तांत चांग॥स्वमुखें सांग निवेदीं ५९॥
शूरसेनाचा संभव ॥ वृष्णिप्रवर जो वसुदेव ॥ माझा सखा जिवाचा जीव ॥ कुशळगौरव असे कीं ॥ ६० ॥
महासभाग्य मारिषाकुमर ॥ ज्याचे उदरीं बळश्रीधर ॥ पुत्र होवोनि परमेश्वर ॥ स्वयें साचार अवतरला ॥ ६१ ॥
ते बळरामश्रीवनमाळी ॥ गुप्त होते मम गोकुळीं ॥ तंववरी कंस दुष्कृतशाली ॥ यादव छळी निर्बंधें[5] ॥ ६२ ॥
वसुदेव देवकी उग्रसेन ॥ यांसि करितां दृढ बंधन ॥ यादवीं केलें पलायन ॥ मथुरा सांडूनि दिगंतीं ॥ ६३ ॥
सांप्रत निमाला तो कंस ॥ तेणें निःशल्य यदूचा वंश ॥ कांहींएक वृष्णि नरेश ॥ कुशळ आतां असे कीं ॥ ६४॥
कंसनिग्रहापासूनि मुक्त ॥ रामकृष्णादि अपत्ययुक्त ॥ सुहृदस्वगोत्रगणमंडित ॥ क्वचित् स्वस्थ असे कीं ॥ ६५ ॥

---

१ पापड. २ साखर. ३ शय्या. ४ उशी. ५ हट्टानें.

दिष्टयाकंसोहतःपापःसानुगःस्वेनपाप्मना ॥ साधूनांधर्मशीलानांयदूनांद्वेष्टियःसदा ॥ १७ ॥

॥टीका॥विचित्र दैवाचा उभारा॥समल्लसानुज सहानुचरा॥स्वपापें पंचत्वं कंसासुरा॥निर्भय मथुरापुर आतां॥६६
यादव साधु स्वधर्मशीळ ॥ त्यांचा द्वेष्टा कंस खळ ॥ तो निमोनियां वसुधातळ ॥ झालें निर्मळ मधुपुरही ॥ ६७॥
आतां आपुलाली पदवी ॥ सुखमय भोगिजे कीं यादवीं ॥ असो हें राजा काय जेंवी ॥ उठवाठेवी किमर्थ हे ॥ ६८ ॥
आमुच्या जिवाचें जीवन ॥ तो तेथ आहे कीं श्रीकृष्ण ॥ कांहीं आमुचें करी स्मरण ॥ ह्मणोनि प्रश्न करीतसे॥ ६९ ॥

अपिस्मरतिनःकृष्णोमातरंसुहृदःसखीन् ॥ गोपान्व्रजंचाऽऽत्मनाथंगावोवृंदावनंगिरिम् ॥ १८ ॥

॥टीका॥आह्मी स्मरतों मेघश्यामा॥कांहींतरी तो स्मरतो आह्मां॥कीं मातेच्या सुस्निग्धकर्मा॥स्मरोनि नामा कैं घेतो
ज्यांसिं नर्मोक्ति विनोद ॥ ते कृष्णाचे सखे सुहृद ॥ केव्हां तरी तो बल्लववृंद ॥ स्वमुखें मुकुंद स्मरतसे ॥ ७१ ॥
गोप गोरक्षक संवगडे ॥ अनुयायी जे मागें पुढें ॥ कृष्णवियोगें झाले वेडे ॥ कैं त्यां तोंडें स्मरतसे ॥ ७२ ॥
केव्हांतरी वृंदावन ॥ स्मरत असेल व्रजभुवन ॥ स्वयें पाळिला जो गोगण ॥ कीं त्यांचें स्मरण होतसे ॥ ७३ ॥
व्रजभुवनाचा अपण नाथ॥ स्वयेंचि ह्मणवी कृष्णनाथ ॥ आपणामागें व्रज अनाथ ॥ ऐसी मात कैं स्मरतो ॥७४॥
इंद्रक्षोभाच्या अवसरीं ॥ गोवर्धन जो धरिला करीं ॥ जेथ सदैव धेनु चारी ॥ तो त्या गिरि आठवतो कीं॥ ७५॥
आह्मां आठवे कृष्णगान ॥ आह्मां आठवे कृष्णध्यान ॥ आह्मां आठवे कृष्णवदन ॥ कृष्णभाषण स्मरतसों ॥ ७६ ॥

अप्यायास्यतिगोविंदःस्वजनान्सकृदीक्षितुम् ॥ तर्हिंद्रक्ष्यामतद्वक्त्रंसुनसंसुस्मितेक्षणम् ॥ १९ ॥

---

१ मरण.

॥टीका॥ पहावया सुहृद सुजन॥ एकदां तरी येईल कृष्ण॥ तरी आमुचे निवती नयन॥ पाहोनि वदन स्मितयुक्त ७७॥
सरळनासिका सुस्मित अपांग ॥ श्रीकृष्णवदन पाहतां सांग ॥ आमुचें निवेल तें अष्टांग ॥ कृष्णानुराग सकळांसी ७८॥
श्रीकृष्णाचें उपकारश्रवण॥ होतां नंदाचें अंतःकरण॥ सर्वप्रकारें अभिभूयमान[1] ॥ विवश कथन करी मुखें ॥ ७९ ॥

दावाग्नेर्वातवर्षाच्चवृषसर्पाच्चरक्षिताः ॥ दुरत्ययेभ्योमृत्युभ्यःकृष्णेनसुमहात्मना ॥ २० ॥

॥टीका॥ यमुनापुलिनीं दावानळ॥ क्षोभोनि जाळितां व्रजजन सकळ॥ कृष्णें प्राशूनियां तत्काळ ॥ निर्भय केवळ वांचविला
॥ ८० ॥ तृणावर्तें पीडिला व्रज ॥ गगना नेला अधोक्षज ॥ तो मारूनि पापपुंज ॥ अक्षत व्रज रक्षिला ॥ ८१ ॥
स्वमानभंगें क्षोभला इंद्र॥ तैं बाळक उचली जेंवि शिलींध्र[2]॥ तेंवि गोवर्धनगिरींद्र ॥ यादवेंद्र उचलिला ॥ ८२ ॥
तळीं करूनि निर्भय स्थळ ॥ सप्तरात्र सर्व गोकुळ ॥ रक्षितां देखोनि आखंडळ[3] ॥ ठेवी मौळ हरिचरणीं ॥ ८३ ॥
अरिष्टनामा वृषभासुर ॥ क्षोभें भंगितां व्रजपुर ॥ कृष्णें मर्दूनि तो दुष्कर ॥ घोष समग्र सुखी केला ॥ ८४ ॥
अघासुरनामा महासर्प॥ त्रिदशां नसाहवे ज्याचा दर्प॥ तेणें ग्रासितां वत्सें वत्सप॥ पूतनागरप हरि लक्षी ॥ ८५॥
वत्सप मरतां मरती पशुप ॥ वत्सांसाठीं धेनुकळप॥ ऐशिया काकुळती सकप॥ कंदर्पबाप कळवळिला ॥ ८६ ॥
मग रिघोनि सर्पावदनीं ॥ प्राण रोधूनि फोडिला मूर्ध्नीं ॥ अमृतापांगें वांचवूनी ॥ वत्सें वत्सप काढिले ॥ ८७ ॥
दुःखें करूनि अशक्य तरतां॥ तो दुरत्यय महामृत्यु तत्वता॥ तयापासूनि झाला रक्षिता॥ विश्वगोप्ता श्रीकृष्ण॥ ८८॥
प्रत्यक्ष श्रीकृष्ण महात्मा॥ विश्वगोप्ता विश्वांतरात्मा॥ तेणें बहुधा हरूनि विषमा ॥ श्रमापासोनि रक्षिलें ॥ ८९ ॥

---

[1] ज्याचा पराभव झाला तें. [2] कुत्र्याचें मूत. ह्या नांवाची वतस्पति. [3] इंद्र.

ऐसे कृष्णाचे उपकार ॥ नंद स्मरे वारंवार ॥ ध्यानस्मरणीं चमत्कार ॥ कथी साचार तो ऐका ॥ ९० ॥
स्मरतांकृष्णवीर्याणिलीलाऽपांगनिरीक्षितम् ॥ हसितंभाषितंचांगसर्वानःशिथिलाःक्रियाः ॥ २१ ॥
॥टीका॥श्रीकृष्णाचीं स्मरतां यशें॥जन्मादारभ्य कृताशेषें॥मानस विरे तत्संतोषें॥सप्रेमरसें समाधिस्थ ॥ ९१ ॥
लीलेकरूनि पाहतां कृष्ण ॥ सस्मित अपांगविमोक्षण ॥ स्मरतां मूर्च्छित होय मन॥प्रवृत्तिभान मग कैंचें॥९२ ॥
उद्धवासि अंग ह्मणोन॥नंदें कोमळ संबोधून॥ह्मणे प्रियतम तुजही श्रीकृष्ण॥यास्तव अभिज्ञ मम हृदया ॥ ९३॥
आठवे कृष्णाचें पाहणें ॥ व्यंकटकटाक्षविमोक्षणें ॥ आपांगपातें ज्यां स्पर्शनें ॥ अमृतपानें त्यां होती ॥ ९४ ॥
शुद्धसत्वाचा हर्षोत्कर्ष॥तैसें श्रीकृष्णाचें हास्य ॥ जिहीं भोगिला तो सुखलेश ॥ ब्रह्मानंदास ते विटती ॥ ९५ ॥
तें आह्मांसि डोळे भरी ॥ येथें फावलें अद्यापिवरी ॥ आतां झुरतसों अंतरीं ॥ क्रिया व्यवहारीं नस्फुरती ॥ ९६॥
श्रीकृष्णाचें बोलणें मधुर॥सत्य हित मित मनोहर॥सबाह्य निर्मळ जाह्नवीनीर॥तेंवि सुखकर स्वानंदें ॥ ९७ ॥
संवगड्यांसीं बोले हरि ॥ कीं गोपींसीं मर्मोत्तरीं ॥ कलभाषणें[1] मानस हरी ॥ आह्मी पितरीं आळवितां ॥ ९८ ॥
सुस्वर मुरलीचिया गायनीं ॥ कृष्ण आळवितां नमानी ॥ तो रस स्मरतां अंतःकरणीं ॥ लागे उन्मनी अनायासें॥
तेणें शरीरीं बाणे काष्ठा ॥ विकळ होती इंद्रियचेष्टा ॥ पारुषे प्रपंचप्रवृत्तिनिष्ठा ॥ इष्टानिष्टा अनोळखी॥२००॥
ठेला व्यवसायसंभ्रम ॥ शिथिल आह्निक नित्यनेम ॥ हव्यकव्यादि नैमित्त कर्म ॥ पावलें विराम सर्वत्र ॥ १ ॥
राहिला कुळींचा कुळाचार ॥ ठेला लौकिक वृद्धाचार ॥ शान्तिकपौष्टिककर्माचार ॥ देशाचार स्मरेना ॥ २ ॥
कृष्णाकार झालें मन ॥ कृष्णक्रीडाअनुस्मरण ॥ दृष्टीपुढोनि नवचे ध्यान ॥ हास्यभाषणमंडित ॥ ३ ॥

---

१ मधुर भाषणामें. २ उत्कर्ष.

शिखंडमंडितमूर्धजमुरडी ॥ विरचित किरीट पुष्पपरवडी ॥ कर्णीं कर्णिकारें देव्हडीं॥ गुंजावतंस मिरवती॥४॥
कुटिल कुंतल आकर्ण नयन ॥ विशाळ भाळ सरळ घ्राण ॥ कुंडलमंडित गंड सघन ॥ कान्ति निर्घननभसाम्य
स्फुटविद्रुमासमान अधर ॥ दशन वज्रप्रभाभासुर ॥ कोटिकंदर्पशशिभास्कर ॥ वदनपरमा मांदुळेवी ॥ ६ ॥
चिबुक हनुवटी सकुमार ॥ कम्बुकण्ठ स्कंध सधर ॥ आजानुबाहु विस्तीर्ण उर ॥ उदर पीवर त्रिवळीसीं ७॥
नाभि गभीर मध्य सूक्ष्म ॥ पृथुळ नितंब जघन सम ॥ पीतवसन पुरुषोत्तम ॥ पादपद्मीं पंकजभा ॥ ८ ॥
वांक्या नूपुर अंदु चरणीं ॥ कृष्ण विचरतां गर्जे धरणि ॥ तेणें नादें अनुहत ध्वनि ॥ फावे श्रवणीं लयसिद्धि॥
कटिमेखळे क्षुद्रघंटी ॥ अंगदें शोभती बाहुवटीं ॥ त्रिधार कंकणें मनगटीं ॥ पुरट[3]रत्नीं सुघटितें ॥ १० ॥
नवरत्नांचे कंठीं हार ॥ वनमाळादि वन्य शृंगार ॥ विचित्र धातु तिलकाकार ॥ सर्व शरीर मिरविती॥ ११ ॥
काच गुंजा पल्लव पिच्छ ॥ नवकिंजल्ककुसुमगुच्छ ॥ कृष्णतेजें शोभती स्वच्छ ॥ त्यांपुढें तुच्छ स्मरकांति १२
आठवे कृष्णाचें आळी करणें ॥ आठवे कृष्णाचें थायाँ घेणें ॥ आठवे कृष्णाचें रांगणें ॥ काहाणी सांगणें आठवे
येणें सकळ शिथिल क्रिया ॥ इहपरकामना लोपलिया ॥ मानसें कृष्णमय झालिया ॥ गेला वायां संसार॥१४॥
आह्मी विसरों दाटूनि जरी ॥ कृष्ण सहसा नवचे दुरी ॥ दिसे जंगमीं स्थावरीं ॥ सबाह्यांतरीं तें ऐक॥ १५॥

सरिच्छैलवनोद्देशान्मुकुन्दपदभूषितान् ॥ आक्रीडानीक्षमाणानांमनोयातितदात्मताम् ॥ २२ ॥

॥टीका॥ कृष्णविसर पाडितां मनीं॥ तंव सरितातटावलोकनीं॥ कृष्णपादाब्जभूषिता अवनि ॥ देती स्मरोनि हरिक्रीडा

---

१ मुखाची उत्कृष्ट शोभा. २ एकत्र करी. ३ स्वर्ण व रत्नें. ४ छंद.

तेणें वियोगभडका उठे ॥ क्रीडा स्मरतां हृदय फुटे ॥ पुन्हा कृष्ण भेटेल कोठें ॥ ऐसें वाटे हृत्कमळीं ॥ १७ ॥
पाहतां गोवर्धनाचळ ॥ श्रीकृष्णाचें क्रीडास्थळ ॥ वाटे प्रत्यक्ष घननीळ ॥ सहगोपाळ क्रीडतसे ॥ १८ ॥लागतां
तद्रूपीं अनुसंधान ॥ कृष्णाकार होय मन ॥ तेव्हां नाठवे प्रपंचभान ॥ मन उन्मन हरिवेधें ॥ १९ ॥ यमुनातटीं
कदंबातळीं ॥ कृष्ण खेळला चेंडूफळी ॥ कोठें हमामा हुंबली घाली ॥ कोठें कुरवाळी धेनूतें ॥ २० ॥
निंबुटिंबु चुंबाचुंबी ॥ विटीदांडू सुरपारंबी ॥ स्तोककृष्णेंसीं घेत झोंबी ॥ बळसुबळेंसीं सरिपाडें ॥ २१ ॥
हुतुतु खेळती वाळवंटीं ॥ लपंडाई टिपिती पाठी ॥ त्या त्या क्रीडाकौतुकगोष्टी ॥ स्मरतां पोटीं तन्मयता॥ २२
कृष्णक्रीडा वनोद्देशीं ॥ तें तें वनें स्वानंदराशि ॥ लाजविताति सुरविपिनासी ॥ सुकृतें आणि सौंदर्यें ॥ २३ ॥
मधुवन तालवन कुमुदवन ॥ बेलवन भांडीरवन बहुळवन ॥ कामवन क्षुद्रवन मुंजावन ॥ क्रीडास्थानें कृष्णाचीं
नीपवन बृहद्वन वृंदावन ॥ ऐसीं द्वादश वनें जाण ॥ श्रीकृष्णाचें क्रीडास्थान ॥ देखोनि स्मरण होतसे ॥ २५॥
परम दरा गोवर्धन ॥ शंतनुकुंड पिहिताक्षस्थान ॥ मार्सी गंगासेतुदर्शन ॥ कदंबद्रोणीनिकुंज ॥ २६ ॥
धीर समीर अढळ विहार ॥ यज्ञपत्नींचा अन्नोपचार ॥ घेतला ह्मणोनि नामोच्चार ॥ भातरोंठ हे देशभाषा ॥
राधाविनोदविहारस्थानें ॥ श्यामतमाल कुंजसदनें ॥ वैकुंठदर्शन कालियमथनें ॥ इयें उपवनें क्रीडेचीं ॥२८॥
मम गवेषण ब्रह्मांडह्रद ॥ अघासुराचें चर्म विशद ॥ वत्सबकांचा केला वध ॥ सर्वत्र गोविन्द क्रीडला ॥ २९
आतां कोणीकडे जावें ॥ कैसें कृष्णातें विसरावें ॥ मानसें हिरोनि नेलीं सर्वें ॥ पिसें माधवें लाविलें ॥ ३० ॥

---

१ नंदनवनाला.

श्वापदां पक्ष्यांचे अनुकार ॥ मृगमयूरभ्रमराकार ॥ दृष्टी पडतां प्राणिमात्र ॥ कृष्ण सत्वर आठवतो ॥ ३१ ॥
कालियमथनाचिये समयीं ॥ कीं मम मोक्षणीं वरुणालयीं ॥ वैकुंठदर्शनीं यमुनाडोहीं ॥क्रीडानवाई कृष्णाची॥
कृष्ण दावी खगानुकार ॥ ते आठवती पाहतां खेचर ॥ भूचरानुकारें भूचर ॥ पाहतां श्रीधर आठवतो ॥ ३३
जळीं स्थळीं नभपोकळीं ॥ स्थावरजंगमीं वनमाळी ॥ विसर नपडे कोणे काळीं ॥ करणीं सकळीं हरि भरला ॥
काष्ठवृषभ गाडे घोडे ॥ गोट्या भिंगुरिया चंपे कवडे ॥ क्रीडोपकरणें दृष्टीपुढें ॥ दिसतां वेडें मन होय॥ ३५॥
कृष्णा आवडे दुग्धसाय ॥ कृष्ण हैयंगवीन[१] खाय ॥ भोजनीं रुचिकर पदार्थ होय ॥ कृष्णा प्रिय तो वाटे ॥
स्मरे कृष्णाचा शौचाचार ॥ स्मरे कृष्णाचा पदसंचार ॥ स्मरे कृष्णाचा करव्यापार ॥ शब्द नागर[२] आठविती
जी ग्राहकता परिमळाची ॥ कृष्ण चोजवी विविधारुचि ॥ रूपग्रहणीं श्रीकृष्णाची ॥ नेत्रचतुरता आठवे॥३८
कृष्ण डोळियांचा डोळा ॥ कृष्ण त्वचेची चैतन्यकळा॥श्रवणीं श्रोतव्यजिह्वाळा ॥ ज्ञातृत्वलीला कृष्णाची॥ ३९
श्वासोच्छ्वासीं कृष्णस्मरण ॥ कृष्ण प्राणांचा निजप्राण ॥ कृष्णसंकल्प वाहे मन ॥ होय लीन श्रीकृष्णीं ॥
कृष्णाकार बुद्धीसी बोध ॥ कृष्णानुसंधानें चित्तासि वेध ॥ कृष्णाभिमानें प्रसिद्ध ॥ संसार विरुद्ध नवाटे॥४१ ॥
ऐसी कृष्णीं तन्मयता ॥ क्रीडास्मरणें होय चित्ता ॥ऐसाचि अनुराग समस्तां॥पुरुषां वनितां व्रजपुरींच्या४२॥
लेंकुरें असती घरोघरीं॥परी रामकृष्णांची वेधकपरी॥अद्भुत देखिली संसारीं ॥ उपमा दुसरी यां नाहीं ॥ ४३ ॥
कृष्ण विसरों बहुतां परी ॥ परि तो सबाह्य अभ्यंतरीं ॥ स्मार्य स्मारक अवघा हरि ॥ न उरे उरी संसारा ॥
तस्मात रामकृष्ण नव्हती नर ॥ वयें नह्मणावे किशोर ॥नव्हती बल्लव ना वृष्णिकुमर॥ऐक निर्धार तयांचा॥४५॥

---

१ ताजें लोणीं. २ चतुर.

मन्येकृष्णंचरामंचप्राप्ताविहसुरोत्तमौ ॥ सुराणांमहदर्थायगर्गस्यवचनंयथा ॥ २३ ॥

॥टीका॥ निर्धार केला म्यां निजमनें॥ रामकृष्ण हे अमरराणे॥ येथें सुरकार्याकारणें॥ मनुष्यपणें अवतरले ॥ ४६ ॥
यासि प्रमाण काय ह्मणसी॥ तरी गर्गें एकांतें मजपासीं॥ करितां यांचियां नामकरणासी॥ गूढत्वेंसीं गुज कथिलें॥ ४७ ॥
दिवसेंदिवस नंदा तुज ॥ यांचें ऊर्जित प्रतापतेज ॥ कळों येईल सहजें सहज ॥ वदला मुनिराज संकेतें ॥ ४८ ॥
केवळ गर्गोक्तिमात्र प्रमाण ॥ ऐसें उद्भावा सहसा नह्मण ॥ प्रत्यक्ष देखिलें ऐश्वर्य पूर्ण ॥ तुझे नयन तुज साक्ष ॥ ४९ ॥

कंसंनागायुतप्राणंमल्लौगजपतिंतथा ॥ अवधिष्टांलीलयैवपशूनिवमृगाधिपः ॥ २४ ॥

॥टीका॥ दहा सहस्र गज प्रचंड॥ तत्तुल्य एकला कुवलयापीड॥ वज्रासमान अंबष्ठ दृढ॥ कृष्णें झोडून पाडिले॥ ५० ॥
तैसेचि नागायुतबळिष्ठ ॥ चाणूर मुष्टिक मल्लवरिष्ठ ॥ रामकृष्णेंसीं समरनिष्ठ ॥ झाले पिष्ट स्वप्रहारीं ॥ ५१ ॥
जैसें सिंहाचें उत्प्लवन ॥ भंगी मत्तगजांचें सैन्य ॥ तेथ कंस पशुसमान ॥ लीलेकरून निवटिला ॥ ५२ ॥
खड्ग खेटक पडताळून ॥ कंसें करितां निर्वाणकदन॥ कृष्णें आंसडिला केश धरून ॥ पावला मरण नवधितां ॥ ५३ ॥
शलतोशलप्रमुख मल्ल ॥ समरीं मारिले शलभतुल्य ॥ फेडितां कंसनिष्कृतिशल्य ॥ कंकन्यग्रोध निमाले ॥ ५४ ॥

तालत्रयंमहासारंधनुर्यष्टिमिवेभराट् ॥ बभंजैकेनहस्तेनसप्ताहमदधाद्गिरिम् ॥ २५ ॥

॥टीका॥ वज्रकठोर धनुष्पृष्ठी॥ तालत्रय सलंब काठी॥ गजेंद्र भंगी इक्षुयष्टि ॥ तेंवि जगजेठी हरि भंगी ॥ ५५ ॥
एकाचि हस्तें लीळेकरून ॥ भंगिलें कठोर शरासन ॥ कृष्णप्रताप ऐसा गहन ॥ कीं तुमचे नयन देखती ॥ ५६ ॥

---

१ दशसहस्र हत्तींचे बळाचा.

आणि प्रत्यक्ष व्रजपुरीं ॥ सप्त दिवस धरिला गिरि ॥ इंद्र वर्षतां मुसळधारीं ॥ आणिला हारीं प्रतापें ॥ ५७ ॥
एकाचि हस्तकें करून ॥ पाषाणमूर्तिहस्तीं सुमन ॥ तैसा पर्वत सप्त दिन ॥ धरूनि व्रजजन वांचविला ॥ ५८ ॥
गोकुळवासी जाणती सर्व ॥ रामकृष्णांचें गौरव ॥ जन्मादारभ्य अभिनव ॥ लीलालाघव तें ऐक ॥ ५९ ॥

प्रलंबोधेनुकोऽरिष्टस्तृणावर्तोबकादयः ॥ दैत्याःसुरासुरजितोहतायेनेहलीलया ॥ २६ ॥

॥टीका॥सुरासुर अजिंक ह्मणती ज्यांतें॥ऐसे दैत्य कृष्णनाथें॥शस्त्रेंवीण मारिले हातें॥ ऐक संकेतें उद्धवा ॥६०॥
पूतनाराक्षसी महाथोर ॥ दीड योजन क्रूर शरीर ॥ उल्बण विषाचा स्तनपाझर॥ प्राशूनि समग्र मारिली॥ ६१ ॥
शकट भंगिला कोमल चरणें ॥ तृणावर्त घेतला प्राणें ॥ रिठासुर फोडिला दशनें ॥ यमलार्जुन उन्मळिले ॥ ६२ ॥
वत्सासुर त्राहाटिला ॥ बकासुर चाभाडीं चिरियला ॥ वत्सें वत्सप कृष्ण गिळिला ॥ तो अघ वधिला प्राणरोधें ॥ ६३ ॥
धेनुक झुगारिला तालाग्रीं॥असंख्य रासभमांदी आसुरी॥निमाली रामकृष्णांच्या करीं॥निमेषामाझारीं तालवनीं॥ ६४
कालियविषाचा कडकडाट ॥ गगनीं खेचरां न फुटे वाट ॥ उभय तटीं घडघडाट ॥ स्थिरचरसंघाट भस्मंती[1] ॥ ६५ ॥
तें विषाचें पिऊनि पाणी ॥ गोप गोधनें पडलीं धरणीं ॥ कृष्णें कृपेनें अवलोकुनी ॥ अमृत वर्षोनि वांचविलीं ॥ ६६ ॥
तया कालियविषाचिया ह्रदीं ॥ रिघोनि दंडिला खगेंद्रदंदी[2] ॥ तयासि बसाति ओपूनि अब्धि ॥ केली नदी सुखसेव्य ६७
तेथ रात्रीं जाळितां वणवा॥कृष्णें गिळिला व्रजजनकणवा[3]॥ प्रलंब कपटी पशुपमावा[4] ॥ क्रीडतां रामें मारिला ॥६८॥
अश्वरूपी तो केशी दुष्ट ॥ कपटी व्योमासुर वरिष्ठ ॥ वृषभरूपी तो अरिष्ट ॥ अरिष्टकर्ता सुरासुरां ॥ ६९ ॥

---

१ भस्म होती. २ गरुडाचा प्रतिस्पर्धी. ३ व्रजजनांच्या कळवळ्यानें. ४ गोपवेषानें.

ऐसे मारिले सांगों किती॥रामकृष्णांची अद्भुत शक्ति॥ईश्वरावतार मानवाकृति॥ दोन्ही मूर्ति प्रत्यक्ष ॥ ७० ॥
अगाध बेधक शक्ति यांची ॥ चित्तें वेधलीं व्रजजनांचीं ॥ गोपगोधनगोपिकांची ॥ स्मृति सर्वांची कृष्णमय॥७१॥
ऐसा रामकृष्णांचे क्रीडे ॥ स्मरतां नंद विसंज्ञ पडे ॥ तें शुक सांगे रायापुढें ॥ मानस वेडें हरिवेधें ॥ ७२ ॥

श्रीशुकउवाच ॥ इतिसंस्मृत्यसंस्मृत्यनंदःकृष्णानुरक्तधीः॥अत्युत्कंठोऽभवत्तूष्णींप्रेमप्रसरविह्वलः॥२७॥

॥टीका॥ऐकें कुरुकुळनरशार्दूला॥ऐसी क्षणक्षणा कृष्णलीला॥स्मरोनि मूर्च्छित वेळोवेळां॥नंद पडिला धरणिये ७३॥
कृष्णीं प्रियतम नंदबुद्धि॥यालागीं ह्मणिजे अनुरक्तधी॥उत्कंठेचा मोहउदधि॥भरे प्रबळयाब्धीसारिखा ॥ ७४ ॥
तेणें वदनीं शब्द नफुटे ॥ उत्कंठित कंठ दाटे ॥ नेत्रीं बाष्पपूर लोटे ॥ हृदय फुटे संस्मरणें ॥ ७५ ॥
प्रेमसंरंभें विकळवृत्ति ॥ नंद मूर्च्छित पडे क्षिती ॥ उद्धवें देखोनि अनन्य भक्ति ॥ आपुले चित्तीं कळवळिला॥७६॥
ह्मणे धन्य धन्य याचा प्रेमा॥याचिया तपाची नेणवे सीमा॥प्रेमें बिंधिला परमात्मा॥येवढी गरिमा पुण्याची॥७७॥
देवासि ज्याची अवसरी लागे॥नविचारितां वृत्तांत सांगे॥तो आजी प्रेमा देखिला आंगें॥धन्य अनुरागें व्रजपति७८॥
नंदमुखें हे कृष्णगुण ॥ वर्णितां यशोदा करी श्रवण ॥ मोहें व्यापिलें अंतःकरण ॥ तिचें लक्षण अवधारा ॥ ७९ ॥

यशोदावर्ण्यमानानिपुत्रस्यचरितानिच ॥ शृण्वंत्यश्रूण्यवास्राक्षीत्स्नेहस्नुतपयोधरा ॥ २८ ॥

॥टीका॥वर्ण्यमानें चरितें ऐके॥स्नेह दुणबटोनि तंव तंव तवकें॥आपणही वर्णी मुखें॥वियोगदुःखें तळमळी॥८०॥
इये नाहाणीं नाहाणिला कृष्ण॥येथें कृष्णा उद्वर्त्तन॥जावळ माखीं स्नेहें करून॥पाणी उष्ण प्रिय कृष्णा ॥ ८१ ॥

---

१ मूर्च्छित. २ चिंता.

पालवें परिमार्जीं कृष्णांग॥कृष्णासि तिलक रेखीं चांग॥कृष्णा आभरणें लेववीं सांग॥कृष्णापांग आठवती॥ ८२ ॥
हें कृष्णाचें बैसतें पीठ॥हें कृष्णाचें जेवितें ताट॥रत्नखचित वाटिया नीट॥कृष्णासि अवीट आवडती ॥ ८३ ॥
हे कृष्णाची कनकझारी ॥ रत्नजडित उपपात्र वरी ॥ कृष्ण जेव्हां भोजन करी॥ तैं स्वीकरी जळ येणें ॥ ८४ ॥
कृष्णा आवडे घारी पुरी॥कृष्णा आवडे रोटी उखरी॥कृष्णा प्रियतम कुशिंबिरी॥आळणें सांबारीं आवडती॥८५ ॥
बोटवे दैंटवे मालतिया ॥ गहुंले नखुले चौकडिया ॥ पुष्पें सरवळी सेवया ॥ क्षीरी ऐशिया आवडती ॥ ८६ ॥
कृष्णासि आवडे शाल्योदन ॥ सोलींव डाळीचें वरान्न ॥ दुग्धपाचित पायसान्न ॥ घृतपक्वान्न गर्भादि ॥ ८७ ॥
तैलवरिया सांजवरिया ॥ फेण्या अनारसे गुळवरिया ॥ लाडू खाजें करंजिया॥ विडोरिया प्रिय कृष्णा ॥ ८८ ॥
पेढे बतासे मिठाई ॥ सितापाचित अच्युत पाहीं ॥ कृष्ण मागे जे जे समयीं ॥ तें लवलाहीं देतसें ॥ ८९ ॥
वाघारणीपूर्वक क्वथिका॥ कृष्ण भोक्ता विविधां वटकां॥पर्पट सांडया लवण[1]शाका॥यदुनायका आवडती ॥ ९० ॥
मेथी चाकवत चिमकुरा॥पोकळा बसोळा राजगिरा॥ ऐशिया पत्रशाका अपारा ॥ श्रीयदुवीरा आवडती ॥९१ ॥
पुष्पां फळां मुळांचिया॥ शाका आवडती यदुवर्या॥रायतीं मेतकुटें चटणिया ॥ आंवळकाठिया नेलचटें॥ ९२ ॥
व्यंजनपाचित चित्रौदन ॥ कृष्णासि प्रिय दध्योदन ॥ सुंठी मिरें राम[2]ठ लवण॥ दहें कालवन ठोंबरा ॥ ९३ ॥
कृष्णासि भाकरी आवडती॥दिवे ढोंकळे धिरडीं रुचती॥बहुविध सिदोरियांची प्रीति॥संवगडे आणिती त्या जेवी ९४
लोणकडें सद्यस्तप्त ॥ कृष्णासि आवडे गोघृत ॥ हैयंगवीन नवनीत ॥ दुग्ध सुतप्त आणि साय ॥ ९५ ॥

---

[1] लोणचीं. [2] हिंग.

सघन सव्यंजन साजुक तक्र ॥ ज्यालागीं स्वर्गीं सकाम शक्र ॥ अत्यंत कृष्णासि तें प्रियकर ॥ परम सादर तत्पानीं
ऐसे पदार्थ सांगों किती ॥ श्रीकृष्णाची ज्यांवरी प्रीति ॥ जे जे कृष्णासि नावडती ॥ ते त्रिजगतीं अपवित्र ॥ ९७
आंग्या टोप्या पिंपळवानें ॥ इयें कृष्णाचीं पायतनें ॥ हें कृष्णाचें बाळलेणें ॥ कोणाकारणें लेववूं ॥ ९८ ॥
हे कृष्णाची कांबळी काठी ॥ श्रृंग मोहरी वेणु वेताटी ॥ सदन्नजाळी हे घाली पाठी ॥ गाई तापटी जे समयीं
हें कृष्णाचें पीतांबर ॥ बलरामाचें नीलांबर ॥ कांच धातु गुंजाहार ॥ पिच्छसंभार मोरांचे ॥ ३०० ॥ ऐसें
जें जें दृष्टी पडे ॥ आठवे कृष्ण ठाके पुढें ॥ एवं कृष्णें लाविलें वेडें ॥ मागें पुढें स्मरेना ॥ १ ॥ हे कृष्णाची
मंचकशय्या ॥ गोपी गडिणी कृष्णसखिया ॥ श्रीकृष्णाची विनोदचर्या ॥ जाकळी हृदया आठवतां ॥ २ ॥
कृष्ण नाचे सदनांगणीं ॥ कृष्ण सुस्वर गाय गाणीं ॥ कृष्ण रुचिकर सांगे काहणी ॥ कृष्णबोलणीं आठवती
कृष्णविहारमंडित धरणि ॥ कृष्णक्रीडा यमुनाजीवनीं ॥ कृष्णें प्राशन केला वह्नि ॥ सुगंध पवनीं कृष्णाचा ॥
कृष्णप्रभा भासुर गगनीं ॥ कृष्णमूर्ति कोंदली नयनीं ॥ कृष्णक्रीडा भरली मनीं ॥ कृष्णावांचोनि स्मरों नेदी ॥
जिकडे पाहों तिकडे कृष्ण ॥ सबाह्य अवघा भरला पूर्ण ॥ श्रीकृष्णाचें क्रियाचरण ॥ कदा विस्मरण हों नेदी
खातां पितां आठवे कृष्ण ॥ आसनीं शयनीं भोजनीं कृष्ण ॥ जागृतीं सुषुप्तीं स्वप्नीं कृष्ण ॥ कृष्णें तनुमन
वेधलें ॥ ७ ॥ ऐसी यशोदा उद्धवापुढें ॥ कृष्णचर्या वर्णितां तोंडें॥कृष्णानुरागें विकळ पडे ॥ कृष्णीं जडे तादात्म्यें
नेत्र पाझरती बाष्पांभें ॥ हृदय व्यापिलें कृष्णबिंबें ॥ स्तनीं पान्हा सुटला लोभें ॥ कृष्णवालभें तो नधरे ॥ ९
कौरवकुळांबरभास्वता[1] ॥ श्रवणासक्ता अभिमन्युसुता ॥ नंदयशोदा हरिगुण कथितां॥उद्धव चित्तामाजी द्रवे॥ १०

---

[1] कौरवकुळरूपी आकाशास प्रकाशित करणाऱ्या सूर्या हे परीक्षितिराजा.

तयोरित्थंभगवतिकृष्णेनंदयशोदयोः ॥ वीक्ष्यानुरागंपरमंनंदमाहोद्धवोमुदा ॥ २९ ॥

॥टीका॥ षड्गुणैश्वर्याचा निधि ॥ त्याश्रीकृष्णीं अनन्यसिद्धि॥परमानुरागें जडली बुद्धि॥भवोपाधि विसरोनी ११
ऐसी नंदयशोदेचां ॥ कृष्णीं प्रीति देखोनि साची ॥ कुंठित प्रज्ञा उद्धवाची ॥ सीमा भाग्याची कल्पितां ॥ १२
शिव विरंचि पद्मालया ॥ कधीं न लाहती प्रेमा यया ॥ तो येथ नंदयशोदा उभयां ॥ फावला अनायासें करूनी
ध्यानीं नाकळे ध्याननिष्ठां ॥ योगी नफवे ऐसी काष्ठां॥ अनेक तपांच्या सोसितां कष्टां ॥प्रज्ञा प्रतिष्ठा दुर्लभ हे
योगयागतपीं नलभे ॥ तो हा प्रेमा हरिवालभें ॥ नंदयशोदा यांसि शोभे ॥ पुत्रलोभें वेधिलिया ॥ १५ ॥
पुत्रलोभें तो अविद्याभ्रम ॥ परंतु वस्तुमहिमा अगाध परम ॥ कृष्ण केवळ परब्रह्म ॥ पुरुषोत्तम परमात्मा ॥
यास्तव कृष्णीं जैं अनुराग ॥ तेंव्हांचि भवभ्राचा भंग ॥ जोडे कैवल्यपद अभंग ॥ नंद सभाग्य या लोभें ॥१७॥
उद्धवें ऐसें मानूनि चित्ता ॥ ह्मणे कृष्णें मज ज्या अर्था ॥ येथें पाठविलें तत्वता ॥ तो विवेक आतां यां बोधूं॥
ऐसें निर्धारूनियां मनीं ॥ नंदाप्रति चातुर्यखाणी ॥ उद्धव बोले प्रबोधवाणी ॥ ते श्रोतीं श्रवणीं परिसावी॥१९

उद्धवउवाच ॥ युवांश्लाघ्यतमौनूनंदेहिनामिहमानद ॥ नारायणेऽखिलगुरौयत्कृताभतिरीदृशी ॥ ३० ॥

॥ टीका ॥ पात्रापात्र विचारून ॥ करी यथोचित सम्मान ॥ मानद ऐसें संबोधन ॥ यालागून नंदासी ॥२०
उद्धव ह्मणे मानदा नंदा ॥ देहवंतांचिया वृंदा ॥ माजी तुह्मी नंद यशोदा ॥ श्लाघ्यें सर्वदा हरिभजनें ॥ २१॥
ह्या मनुष्यलोकाच्या ठायीं॥देहधारी जे असती पाहीं॥त्यांमाजी श्लाघ्यता तुमचीच कांहीं॥लोकीं तिहीं वाखाणे॥

---

१ स्थाति.

तुमचेंचि श्लाघ्य जन्मकर्म ॥ तुमचाचि सफळ सर्व धर्म ॥ बहुतेक तुह्मीच पुरुषोत्तम ॥ निष्काम भजनें तोषविला॥ २३
ज्ञानसंपन्न त्रिजगीं श्लाघ्य॥एक ऐश्वर्यें परम सभाग्य ॥ श्लाघ्यतम तुह्मी त्यांहूनि सुभग॥जे पूर्णानुराग भोगीतसां २४
तुमच्या पुण्याची नेणिजे सीमा ॥ श्लाघ्यतम ह्मा तुमचाचि महिमा ॥ ज्या कारणास्तव पुरुषोत्तमा ॥ लाविला प्रेमा
सुतमोहें ॥ २५ ॥ जीवसमूहा जो आयतन ॥ यालागीं ह्मणती नारायण ॥ जगत्पिता जगत्कारण ॥ तो कृष्ण
भगवान् अखिलगुरु ॥ २६ ॥ तया श्रीकृष्णाच्या ठायीं॥ अनुरक्त मति तुमची पाहीं ॥ तुह्मां ऐसीं भुवनत्रयीं॥
देखिलीं नाहीं विधिशक्रें ॥ २७ ॥ तुमची अभंग कृष्णीं निष्ठा ॥ यालागीं श्लाघ्य त्रिजगीं श्रेष्ठां ॥ ऐसाचि भजेल
जो वैकुंठा ॥ तो हे प्रतिष्ठा पावेल ॥ २८ ॥आपुलें विसरोनि जातिकुळ ॥ विद्या वयसा लावण्य शीळ ॥
निष्काम भजे जो गोपाळ ॥ तन्मय केवळ तो होय ॥ २९॥एवं भगवान् अखिलगुरु॥कर्मसाक्षी नियंतारु ॥ ते हे
दोघे सहोदरु ॥ रामकृष्ण प्रत्यक्ष ॥ ३० ॥ तेंचि अखिलगुरुत्व कैसें ॥ जगत्पितृनियंतृदशे ॥ आणूनि वर्णील
तें मानसें ॥ श्रोतीं विशेषें परिसावें ॥ ३१ ॥

एतौहिविश्वस्यचबीजयोनीरामोमुकुन्दःपुरुषःप्रधानम्॥अन्वीयभूतेषुविलक्षणस्यज्ञानस्यचेशातइमौपुराणौ

॥टीका॥राममुकुन्द हे सहोदर॥निखिल विश्वाचे मातापितर॥बीजशब्दें जनकोच्चार॥मातृजठर ते योनि॥ ३२ ॥
नंदा ह्मणसी प्रकृतिपुरुषें॥ इयें विश्वाचीं जननीजनकें ॥ तेचि हे राममुकुन्दवेखें ॥ प्रधानपुष जाणावे ॥ ३३ ॥
हेंचि कानडें वाटेल जरी ॥ तरी निमित्तोपादानभेदकुसरी ॥ वाखाणिजे वेदांतशास्त्रीं॥ ते हे निर्धारीं बळकृष्ण ॥ ३४॥

---

१. नार ह्म० जीवसमूह. त्याचें अयन ह्म० स्थान.

निमित्तकारण[1] संकर्षण ॥ कृष्ण केवळ उपादान[2] ॥ सांख्यसिद्धांतीं व्याख्यान ॥ ऐसेंचि जाण केलेंसे ॥ ३५ ॥
रासभचक्रादि उपसंपत्ति ॥ निमित्तकारण यातें ह्मणती ॥ उपादान तें केवळ माती ॥ घटदृष्टांतीं समजावें ॥ ३६ ॥
निमित्तकारणें मातीच घट ॥ तैंवि विश्व हें ब्रह्मचि स्पष्ट ॥ भ्रमनिमित्तें दृष्टादृष्ट ॥ कर्म प्रकट रूढवी ॥ ३७ ॥
कुलाल कर्ता जेवीं मृद्धटा ॥ संकल्पकर्ता ब्रह्मांडमठा ॥ एवं घटमठदृष्टांतवाटा ॥ वास्तव निष्ठा टाकाववा ॥ ३८ ॥
संकल्पशुद्ध सत्व ईश्वर ॥ तो हा बळराम रोहिणीकुमर ॥ उपादान जें निर्विकार ॥ कृष्ण साचार परब्रह्म ॥ ३९ ॥
एवं अभेद वस्तु एक ॥ परंतु विधि कृतसंस्थापक ॥ काळकळनानुरूप विवेक ॥ लेऊनि सम्यक अवतरती ॥ ४० ॥
तोचि अवतरता प्रकार ॥ ऐकें नंदा सविस्तर ॥ करावया जगदुद्धार ॥ करुणाकर काय करी ॥ ४१ ॥
आपुली अभिन्न चिदात्मशक्ति ॥ सत्तामात्र निर्गुण ज्ञप्ति ॥ जीतें ह्मणती अभेदभक्ति ॥ तीतें विभक्ति उपजवी ॥ ४२ ॥
निर्विषयिक चिदात्मरति ॥ निरुपाधिक सुखविश्रांति ॥ चिद्विलासीं अभेदस्फूर्ति ॥ द्विधा व्यक्ति पावोनी ॥ ४३ ॥
एकमेकांसाठीं झुरती ॥ एकमेकांची आवडी धरिती ॥ परस्परें उपजे प्रीति ॥ स्वविस्मृतीमाजिवडी ॥ ४४ ॥
नारी नरातें मानी प्रिय ॥ नर नारीची अपेक्षा वाहे ॥ चराचर येणेंचि न्यायें ॥ मिथ्या होय साक्षेप ॥ ४५ ॥
ऐसी क्रीडा परस्परीं ॥ रमतां प्रेमा सर्वांतरीं ॥ कीर्ति नोहे जगदुद्धारीं ॥ तैं द्विधा करी निजभक्ति ॥ ४६ ॥
एकी नामें आराधिनी ॥ दुजी बोलिजे विरोधिनी ॥ सवेग पक्षद्वय धरूनी ॥ समस्त जनीं विरूढल्या ॥ ४७ ॥
विरोधभक्ताचा विभाग ॥ आसुरी संपत्ति असुरा चांग ॥ दैवी संपत्ति यथासांग ॥ आराधनांग दैवपक्षीं ॥ ४८ ॥
भक्ति विरोधी एक मुख्य ॥ तेथ मिळे तो असुरपक्ष ॥ ते अवघेचि विरोधिभजक ॥ करिती सम्यक एकवळा ॥ ४९ ॥

---

[1] घटादिकांचे उत्पत्तीस परंपरया कारण. [2] साक्षात्कारण.

आराधकांसि विधि विरोध ॥ करिती धर्माचा उच्छेद ॥ ते ते पावोनियां खेद ॥ स्मरती गोविन्द संकटीं ॥ ५० ॥
तेंव्हां आराधकाच्या कैवारें ॥ विरोधियांच्या आविष्कारें ॥ युगीं युगीं स्वयें अवतरे ॥ तद्विकारें उपयुक्त ॥ ५१ ॥
सुखदुःखादि भयाभय ॥ यश अयश आपणाचि विये ॥ वांटूनि दोघां देता होय ॥ तेही सोय आवधारीं ॥ ५२ ॥
आराधकासि विधीचें भय ॥ विरोधी धृष्ट आणि निर्भय ॥ विरोधियां सुख तें विषय ॥ भक्त निर्विषय वैराग्यें ॥५३॥
आराधकांसि यश निर्मळ ॥ विरोधकांसि अपयश समळ ॥ दोहीं रूपें एक गोपाळ॥ मोडल्या खेळ स्वयें निवडे॥ ५४
भक्त मोक्षाचे अधिकारी ॥ विरोधी कैसेनि पां संसारी॥ ज्यांसि अवतरोनि देव मारी॥ ते नरकीं घोरीं कें पचती॥५५॥
एवं दैवासुरपक्षग ॥ यथाधिकारें अवघेंचि जग ॥ प्रसवले रामकृष्ण होचि दोघ ॥ प्रधान[2] पुरुष जगज्जनक ॥ ५६ ॥
ऐसें जनकत्व प्रतिपादिलें॥आतां ईशत्व कवण्या बोलें॥तेंही पाहिजे श्रवण केलें॥जैसें कथिलें मुनिवर्यें ॥ ५७ ॥
विरोधियां आणि भक्तां ॥ दोघां द्विविध ज्ञानदाता ॥ नंदा ह्मणसी कोण तत्वता ॥ निर्धारितां ईश्वर हे ॥ ५८ ॥
जे हे मुकुन्द संकर्षण ॥ कथिले पुरुष आणि प्रधान ॥ तेचि नियंते ईश्वर जाण ॥ द्विविधज्ञानप्रेरक ॥ ५९ ॥

श्लोकार्धं पूर्वश्लोकस्य ॥

अन्वीयभूतेषुविलक्षणस्य ॥ ज्ञानस्यचैशातइमौपुराणौ ॥ ६९ ॥

॥ टीका ॥ पंचधाप्रकृतिजनित भूतें॥अनुप्रवेश करूनि तेथें॥गौण ज्ञान इंद्रियांतें॥विषयस्वार्थें प्रेरक हे ६० ॥
गुणानुसार दैवासुर ॥ भक्त आणि विरोधकर ॥ प्रवृत्तिसारिखे ज्ञानांकुर ॥ उद्बोधकर बळकृष्ण ॥ ६१ ॥
भूतें होवोनि भूतीं प्रविष्ट ॥ तत्प्रवृत्तिज्ञान श्रेष्ठ ॥ गुणानुरूप जें उ भीट ॥ इष्टानिष्टद्योतक हे ॥ ६२ ॥

---

१ दांडगा. २ ज्याचे ठायीं हें दृश्य प्रवृत्त होतें तें. अर्थात् माया.

अणि प्रवृत्तीहूनि विलक्षण ॥ निवृत्तिरूप जें अपरोक्षज्ञांन[1] ॥ तदुद्बोधक हेचि पूर्ण ॥ रामकृष्ण जाणावे॥६३ ॥
एवं प्रवृत्ति निवृत्ति ॥ बहुविध ज्ञानें जीवांप्रति ॥ त्यांचे नियंतार[2] त्रिजगती ॥ राम श्रीपति ईश्वर पैं ॥ ६४ ॥
नंदा ह्मणसी हे बालक ॥ हे विश्वाचे होती जनक ॥ आज्ञादाते नियामक ॥ ईश्वर निष्टंक केवीं हे ॥ ६५ ॥
तरी हे पुराणपुरुष आद्य ॥ वेदवेदांतीं प्रतिपाद्य ॥ इयें अवतारनाट्यें विशद ॥ करिती विबुधकैवारें ॥ ६६ ॥
हे अनादि विश्वकारण॥तरी सहजचि यांतें जनकपण॥आणि उभय[3]ज्ञानप्रेरक जाण॥नियंते ह्मणोन ईश्वर हे॥ ६७ ॥
जरी तूं ह्मणसी जीवांप्रति॥प्रजाजननें जनकत्वप्राप्ति॥तरी सृष्ट्यादिकर्मावेशगति॥जगदुत्पत्तिकारक हे ॥ ६८ ॥
कर्मवासनाबीजें जीव ॥ जन्ममरणें भोगिती भव ॥ तेंवि यांतेंही गर्भी प्रभव ॥ तें विशेष गौरव यां कैसें ६९ ॥
तरी तूं नंदा ऐसें नह्मण ॥ यांचें अवधारीं महिमान ॥ श्लोकद्वयें तें निरूपण ॥ श्रोतीं श्रवण करावें ॥ ७० ॥

यस्मिञ्जनःप्राणवियोगकालेक्षणंसमाविश्यमनोविशुद्धम् ॥
निर्हृत्यकर्माशयमाशुयातिपरांगतिंब्रह्ममयोऽर्कवर्णः ॥ ३२ ॥

॥टीका॥जनासमान कैसे नव्हती॥तें तूं ऐकें बल्लवपति॥जनामाजि जो विशुद्धमति॥ तो प्राणांतीं स्मरे ज्या ॥ ७१ ॥
ज्याचें रूपीं विशुद्ध मन ॥ क्षणैक प्रवेशुनि सज्जन ॥ अंतकाळीं सोडी प्राण ॥ पद निर्वाण तो पावे ॥ ७२ ॥
आंगीं असतां जीवदशा ॥ निर्वाणपदवी पावे कैसा ॥ ऐसी शंका तव मानसा॥तरी तूं व्रजेशा अवधारीं ॥ ७३॥
कर्मवासना बीजरूप ॥ हेंचि जीवांचें स्वरूप ॥ तो त्यागोनि कर्मलेप ॥ ब्रह्मरूप मग होय ॥ ७४ ॥

---

[1] आत्मज्ञान. [2] नियामक. [3] प्रवृत्तिनिवृत्तिरूपज्ञान.

रूपनामब्रह्मीं नाहीं ॥ तरी ब्रह्मस्वरूप कैसा काई ॥ अपरोक्षज्ञानवंत पाहीं ॥ शुद्ध लक्ष्यांशें निवडला॥ ७५ ॥
विश्व केवळ अर्कवर्ण ॥ शुद्धसत्वात्मक होऊन ॥ परांगति जें पद निर्वाण ॥ शीघ्र सन्मय तेथ मिळे ॥ ७६ ॥
ज्याचें रूपीं मन निमग्न ॥ करूनि जो जन सोडी प्राण ॥ तो वासनाक्षय करून ॥ब्रह्म निर्वाण पद पावे॥ ७७॥
त्यासि जीवासमान गणणें ॥ तेव्हां मूर्खत्वा काय उणें ॥ तुह्मी कृतकृत्य दोघें जणें॥ कवण्या गुणें तें ऐका॥७८ ॥

तस्मिन्भवंतावखिलात्महेतौनारायणेकारणमर्त्यमूर्तौ ॥
भावंविधत्तांनितरांमहात्मन्किंवाऽवशिष्टंयुवयोःसुकृत्यम् ॥ ३३ ॥

॥टीका॥ अखिलचराचरात्मक बीज॥ नारायण तो मायामनुज ॥ तो भावूनि आत्मतनुज॥ भजलां सहज अनुरागें
आजवरी तुमचाचि बाळक॥आतां तैसाचि वसुदेवतोक ॥ न तो कवणाचा निष्टंक ॥ आदिपुरुष परमात्मा ॥८०॥
तो अवतारी मानवमूर्ति ॥ त्याचे ठायीं तुमची रति ॥ जडली तेणें भवविरक्ति ॥ आणि उपरति साधली ॥८१॥
इहामुत्रार्थफळसाधन ॥ प्रवृत्ति प्रकटी वेदविधान ॥ ते प्रवृत्तीचेंचि अस्तमान ॥ मन निमग्न जें कृष्णीं ॥ ८२ ॥
तो तुह्मांसि कृष्णानुराग ॥ त्यालागीं इहामुत्रार्थभोगविराग ॥ नित्यानित्यवस्तु चांग ॥ तुह्मींच सांग विवरिली ॥
नित्यवस्तु ब्रह्म निर्गुण ॥ तो हा जगदात्मा श्रीकृष्ण ॥ ईश्वरपर्यंत प्रपंचभान ॥ अनित्य ह्मणोनि विसरलां ८४॥
ईश्वर अनित्य ह्मणाल कैसा ॥ तरी कर्ता ज्ञाता हे ईशत्वदशा॥लेवविली ते माये सरिसा ॥ अनित्य ऐसा जाणावा
॥८५॥मायोपाधीचें निरसन ॥ जालिया कैंचें ईश्वरपण ॥ प्रतिबिम्बेंसीं बिम्बा जाण॥अस्तमान एकची ॥८६॥

---

१ इष्टसिद्धयर्थ वास्तविक अर्थ गुप्त ठेवून अर्थांतर सांगणें. २ सूर्यवर्ण.

वट मानूनि अनित्य ॥ वटबीजातें ह्मणती नित्य ॥ भव अनित्य ईश्वर नित्य ॥ हा सिद्धान्त तयांचा ॥ ८७ ॥
यावरी शंका न संभवे ॥ तथापि कोणी बालिशभावें॥ह्मणती कृष्णीं नित्यत्व फावे॥तरी अनित्य मानावें कां ईशा
॥८८॥कृष्ण मायामय मानव ॥ पूर्वींच निरूपिलें हें सर्व ॥ मायातीत वासुदेव ॥ ब्रह्म वास्तव अविरोध ॥८९॥
हा नित्यानित्यवस्तुविचार ॥ तुह्मी न करितां घडला सार ॥ साधन[1]षट्काचा प्रकार ॥ तो सविस्तर अवधारा ॥
कृष्णीं लागत्तां अनुराग ॥ भवविषयात्मकवासनात्याग ॥ नलगे दमावा इन्द्रियवर्ग ॥ शमदम सांग सहजेंची ॥
तुमचें मानस कल्पनाशून्य ॥ कृष्णाकार झालें पूर्ण ॥ प्रपंचापासूनि प्रत्यक्प्रवण ॥ कोण ते जाण याहूनी॥९२॥
कृष्णीं विरोनि गेलिया चित्ता ॥ द्वन्द्वतापसहिष्णुता ॥ घडली साक्षी चिन्तनसत्ता ॥ कोण जाणता द्वन्द्वातें९३॥
आतां श्रद्धा ह्मणिजे प्रीति ॥ तिणें कृष्णीं केली रति ॥ तेणें पारुषली प्रवृत्ति ॥ एकान्तभक्ति फावली ॥ ९४ ॥
विश्वास गुरुवेदान्तवचनीं ॥ ते परोक्षश्रद्धा षट्कसाधनीं ॥ अपरोक्षप्रेमा तुमचा कृष्णीं॥मोक्षामूर्ध्नीं जो मिरवे ॥
कृष्णवियोगें पावतां शीण ॥ या लागीं कथिलें कृष्णमहिमान ॥ तें विवरून माझें वचन ॥ एकाग्र मन करावें९६
श्रीकृष्णरूपीं एकाग्रमन ॥ यापरता समाधि कोण ॥ एवं नकरितां षट्कसाधन ॥ तुह्मीं सम्पूर्ण साधिलें॥९७॥
कृष्णवियोगें असहिष्णुता ॥ हेचि मुख्य मुमुक्षुता ॥ ज्ञानें मोक्ष सिद्ध तत्वता ॥ तेंचि आतां विवरा हो॥९८॥
अन्वयव्यतिरेकेंकरून ॥ कृष्णरूपीं विरतां मन ॥साधिलें सिद्धान्त अपरोक्षज्ञान॥झालां ह्मणोनि कृतकृत्य९९॥
कृष्ण परब्रह्म सुनिश्चित ॥ तेथ क्षणमात्रही थारतां चित्त ॥ प्राणि होय कृतकृत्य॥हा सिद्धान्त श्रुतिमाथां ४००
ज्याचें क्षणैक कृष्णीं मन ॥ स्थिर होय समरसोन ॥ तेणें सांग सर्व यज्ञ ॥ केले संपूर्ण व्रजपाळा ॥ १॥ ब्रह्मां-

---

[1] नित्यानित्यवस्तुविवेक; वैराग्य; शमादिषट्कसंपत्ति ह्म० शम, दम, तप, तितिक्षा, समाधान, श्रद्धा;मुमुक्षुत्व.

डींचिया तीर्थीं सकळीं ॥तदुचित माहात्म्य पर्वकाळीं ॥यथाविधानें स्नानें घडलीं॥जैं कृष्णीं जडली मति राहे २
देश काळ पात्र शोधूनी ॥ वेदविहितविधिविधानीं ॥ कनकरत्नीं भरूनि अवनि ॥ दिधली दानीं पैं तेणें ॥ ३ ॥
तेणें समस्त पितृगण ॥ तारिले संसारापासून ॥ पावविले ब्रह्मसदन ॥ कृष्णीं मन स्थिर होतां ॥ ४ ॥ सर्वत्रतें
अनुष्ठिलीं ॥ सर्व तीर्थीं स्नानें केलीं ॥ जेव्हां कृष्णीं स्थिर झाली ॥ चित्तवृत्ति क्षण एक ॥५॥ रत्नीं भरूनि
पृथ्वी दीधली ॥ पितृमण्डळी मोक्षा नेली ॥ जेव्हां कृष्णीं स्थिर झाली ॥ चित्तवृत्ति क्षण एक ॥ ६ ॥ सर्ववेदाध्ययनें
केलीं ॥ तपश्चर्या सिद्धी नेली ॥ जेव्हां कृष्णीं स्थिर झाली ॥ चित्तवृत्ति नावेक ॥ ७ ॥ यालागीं तुमची
चित्तवृत्ति ॥ कृष्णीं रंगोनि ठेली पुरती ॥ तेणें झाली भवनिवृत्ति ॥ विषयभ्रांति पारुषली ॥८ ॥ क्षणैक
कृष्णीं राहतां मन ॥ तेणें कृतकृत्य होती जन ॥ तुह्मांसि अवशिष्ट कृत्य कोण ॥ कृष्णीं संपूर्ण रंगलिया॥९॥
जाग्रतिस्वप्नसुषुप्तीआंत ॥ कृष्णाकार तुमचें चित्त ॥ सबाह्य साधला एकान्त ॥ कृतकृत्यार्थ सर्वत्र ॥ १० ॥
आतां असो हा परमार्थ ॥कृष्णें ज्यालागीं धाडिलें येथ॥तो कृष्णाचा निज गुह्यार्थ॥तुह्मीं यथार्थ मानावा॥ ११

आगमिष्यत्यदीर्घेणकालेनव्रजमच्युतः ॥ प्रियंविधास्यतेपित्रोर्भगवान्सात्वतांपतिः ॥ ३४ ॥

॥टीका॥अदीर्घ ह्मणिजे स्वल्पकाळान्तीं ॥ अच्युत येईल व्रजाप्रति ॥ ऐश्वर्यसंपन्न सात्वतपति ॥ देईल विश्रांति
तुह्मां पितरां ॥ १२ ॥

हत्वाकंसंरंगमध्येप्रतीपंसर्वसात्वताम् ॥ यदाहवःसमागत्यकृष्णःसत्यंकरोतितत् ॥३५॥

---

१ केलीं.

॥टीका॥कंस यदुकळाचा द्वेष्टा ॥ रंगीं मारूनि तया दुष्टा ॥ कृष्णें येऊनि तुह्मां श्रेष्ठां ॥ स्वमुखें निष्ठा हे कथिली॥
जें ताता जावें व्रजाप्रति ॥ मी ही येईन शीघ्रगति ॥ स्निंग्ध[1] यादव दुःखावर्ती ॥ त्यांसि विश्रान्ति देऊनी॥१४॥
तें यथार्थ करील शौरि ॥ सत्य मानीं हे मम वैखरी ॥ प्रतीक्षा करिता शिणलों भारी ॥ ह्मणाल तरी अवधारा१५
कृष्ण कधीं येईल नकळे॥वियोगें विलंब असहनशीळें॥वाट पाहतां शिणले डोळे॥तरी तुह्मांचि जवळी हरि नांदे१६
माखिद्यतंमहाभागौद्रक्ष्यथःकृष्णमंतिके ॥ अंतर्हृदिसभूतानामास्तेज्योतिरिवैधसि ॥ ३६ ॥
॥टीका॥ महाभाग हे संबोधनें॥यशोदानन्दांसि उद्धव ह्मणे॥तुह्मी भाग्याचीं याचि गुणें॥जें कृष्णीं तनुमनें वेधलां॥
खेद न करावा मानसीं ॥ कृष्ण पहा आपणांपासीं ॥ सर्वभूतांच्या हृदयावकाशीं ॥ ज्योति एधांसि[2] तेंवि नांदे१८॥
ह्मणाल सर्वभूतांतरीं ॥ समान नांदे जरी श्रीहरि ॥ तरी कां भूतें दैवानुसारी ॥ श्रम संसारीं भोगिती ॥ १९ ॥
ऐसी शंका मानाल ह्मणें ॥ काष्ठीं नांदतां हुताशनें ॥ काष्ठ तयासि सहसा नेणे ॥ काष्ठाभिमानें श्रम भोगी॥२०॥
गुरुशुश्रूषासंवादमथनीं ॥ प्रकटे ज्योतिरूप ज्ञानाग्नि ॥ तैं काष्ठत्वदेहाभिमानी ॥ करी जाळूनि शून्यता॥२१॥
सप्रेम भजन परस्परें ॥ वस्तुसामर्थ्य सहज संस्कारें ॥ मथन घडे तैं हृदयीं स्फुरे ॥ निजनिर्धारें श्रीकृष्ण ॥२२॥
कृष्णज्योति झळकल्या भजनीं ॥ कृष्णप्रभाचि दिवसरजनी ॥ शून्य पडे प्रपंचभानीं ॥ तुह्मांलागोनि ते दशा२३
अखंड समाधि तें या नांव ॥ तुह्मां फावली स्वयमेव ॥ आतां किमर्थ साधनीं हांव ॥ देहात्मभाव कां धरितां२४॥
येईन ह्मणोनि बोलिला कृष्ण॥यदर्थीं शंका धरील मन॥जें मातापितरें प्रियतम स्वजन॥कां पां त्यागून येईल २५॥
तरी हें ऐसें मानूंच नका ॥ हृदयांतील सांडूनि शंका ॥ यदर्थीं मद्वचनें आइका॥स्थिति व्यापकता कृष्णाची२६

---

१ स्नेही. २ काष्ठामध्यें.

नह्यस्यास्तिप्रियःकश्चिन्नाप्रियोवाऽस्त्यमानिनः ॥ नोत्तमोनाधमोवाऽपिसमानस्यासमोऽपिवा ॥३७॥

॥टीका॥मान ह्मणिजे देहाभिमान॥जो भेदाचें जन्मस्थान॥ज्याचेनि आप्त इतर स्वजन॥तो निपटूनि ज्या नाहीं
अमानासि अत्यंत प्रिय ॥ किंवा अत्यंत अप्रिय ॥ दोहींचाही अप्रत्यय ॥ जें तो अद्वय परमात्मा ॥ २८ ॥
अद्वयासि अधमोत्तम॥ न्यून पूर्ण असम सम ॥ ह्मणणें हाचि केवळ भ्रम ॥ तो निस्सीम निखिलाद्य ॥ २९ ॥
माती आप्त कवणा घटा॥कीं तंतु अनाप्त कवणा पटा॥नभ अनुत्तम कवण्या मठा॥कोण्या चोहटा उत्तम तें॥३०॥
पाणी कवण्या तरंगा सम ॥ कोण्या बुद्बुदामाजी विषम ॥ कवणे अळंकारीं हेम ॥ स्वपरनाम प्रियाप्रिय ॥ ३१
आपण झालेनि स्वप्नींचीं रूपें॥प्रियाप्रिय कोणतें घे पें ॥ तेवीं अखिलाद्य चिन्मात्र आपें॥ ब्रह्मांड जोपे भ्रमगर्भी ॥
यालागीं कृष्ण सर्वांचा आदि ॥ तेंचि श्लोकार्थें प्रतिपादी ॥ सावध होवोनि विद्वद्वृंदीं ॥ पदीं विशदीं परिसावें॥ ३३

नमातानपितातस्यनभार्यानसुतादयः ॥ नात्मीयोनपरश्चापिनदेहोजन्मएवच ॥ ३८ ॥

॥टीका॥जयापासूनि जिये ठायीं ॥ जन्म पावे जो कां देही ॥ आदिकारण तया दोंहीं ॥ लागीं पाहीं ह्मणिजेत॥
तरी कृष्णासि देहचि नाहीं ॥ मा तो जन्मला कोठोनि कांहीं ॥ माता पिता त्यासि काई ॥ कोणे समयीं कल्पावी
केंची भार्या देहातीता ॥ केंची तयासि पुत्रदुहिता ॥ केंचा भ्राता आप्त चुलता ॥ द्वैतरहिता कें शत्रु ॥ ३६ ॥
ह्मणसी प्रत्यक्ष देहधारी ॥ यावत्काळ आमुचे घरीं ॥ आतां वर्तें मथुरापुरीं ॥ मातापितरीं कुळयुक्त ॥ ३७ ॥
तरी हें नंदा सावधान ॥ होऊनि ऐकें निरूपण ॥ देहधारी ह्मणिजे कोण ॥ तें लक्षण तुज कथितों ॥ ३८ ॥

---

१ चवाठा.

संचित प्रारब्ध क्रियमाण॥या तिहींसि कर्माभिधान॥येणें निबद्ध प्राणिगण ॥ देह होवून विचंबती[1] ॥ ३९ ॥ सुखदुःखांचें अधिष्ठान॥कर्मनिर्दिष्ट देह जाण ॥ षड्विकारी[2] त्रिधाभिन्न ॥ देवतिर्यग्मनुजादि ॥ ४० ॥ काम्य सुकृतें देवयोनि ॥ दुष्कृततमें तिर्यग्योनि॥पापपुण्यसमतेकरूनी ॥ मनुजयोनि मिश्रकर्में ॥ ४१ ॥ देवां तिर्यगां क्रियमाण नाहीं ॥ पुण्यपापांचा क्षय दो ठायीं ॥ दोन्ही समान तें नरदेहीं ॥ भोगी सर्वही सुखदुःखें॥४२ ॥ सुकृतफळें सुखाभिव्यक्ति ॥ दुष्कृतें घडे दुःखावाप्ति ॥ एवं नचुके पुनरावृत्ति ॥ कर्में भ्रमती बहु योनि ॥ ४३ ॥

नचास्यकर्मवालोकेसदसन्मिश्रयोनिषु ॥ क्रीडार्थःसोऽपिसाधूनांपरित्राणायकल्पते॥ ३९ ॥

॥ टीका ॥ तें कर्मचि नाहीं कृष्णीं॥जें क्रीडार्थ बीजसाधनीं ॥ह्मणसी तरी कां देह धरूनी॥जीवनीं भुवनीं अवतरे॥ स्वभक्त तारावया कारणें ॥ जगदुद्धरणार्थ क्रीडा करणें ॥ आणि साधूंच्या परित्राणें ॥ आविर्भवणें निष्कर्मा ॥ ४५ मत्स्य कच्छ वराह सिंह ॥ इत्यादि तिर्यग्योनिप्रभव ॥ दुष्कर्मासि नसतां ठाव ॥ आविर्भव स्वजनेच्छा ॥ ४६ वामन भार्गव भूदेववंशीं ॥ जन्मले महर्षीचिये कुशी ॥ सुकृतफळाची नसतां राशि ॥ सुरकार्यासी अवतरे॥४७ रामकृष्ण मनुजां घरीं ॥ जन्मले मनुष्यदेहधारी ॥ मिश्रकर्मफळाधिकारी ॥ केवीं चतुरीं मानावे ॥ ४८ ॥ जो अविद्याकामकर्मातीत ॥ तोही साधुपरित्राणार्थ ॥ जन्मे नानायोनींआत ॥ जन्मरहित अयोनि ॥४९॥ अगाधलीलाचरितें करी ॥ श्रवणें पठनें जगदुद्धारी ॥ भक्तां रक्षी दैत्यां मारी ॥ परी निर्विकारी उभयात्मा ॥ ५० ॥ जन्म धरूनि जन्मातीत ॥ कैसा ह्मणोनि कल्पील चित्त ॥ तरी आपुलीच पाहें प्रतीत॥कृष्ण तव सुत कीं नोहे

---

[1] कष्ट पावती. [2] अस्ति, जायते, वर्धते, परिमणमते, अपक्षीयते, म्रियते.

जैसा जन्मला तुमचे उदरीं ॥ चोरसें क्रीडला तुमचेच घरीं ॥ तैसाचि वसुदेवदेवकीजठरीं ॥ परी नोहे श्रीहरि
कवणाचा ॥ ५२ ॥ ह्मणाल जन्मकर्माविरहित ॥ तरी त्या कैसें क्रीडाचरित ॥ तुह्मी ते सावध ऐका मात ॥
जे माया स्वीकृत गुणमयी ॥ ५३ ॥

सत्वंरजस्तमइतिभजतेनिर्गुणोगुणान् ॥ क्रीडन्नतीतोऽत्रगुणैःसृजत्यवतिहंत्यजः ॥४० ॥

॥टीका॥गुणातीत कैसा क्रीडे ॥तरी हें मायांगीकारें घडे ॥मायेमाजी गुण देव्हडे॥चिन्मात्र उजेडें प्रकाशी॥ ५४ ॥
अनेकगुणविकार जड ॥ मायेमाजी भरले निबिड ॥ चित्प्रकाशें होती रूढ ॥ कर्ता दृढ तें ह्मणती ॥ ५५ ॥
जड रामठ अचेतन ॥ शुद्ध साधु करी सेवन ॥ मग तो करू कां गंगास्नान ॥ परी हिंगटपण नवजाय ॥५६ ॥
कीं कनक[2]बीज विकारवंत॥जडत्वें विकाररूपा नयेत॥सचेतन नर जईं भक्षण करीत॥तैं विकार तेथ प्रकाशती५७॥
कीं लटिकाचि स्वप्नभ्रम ॥ परी निद्रावशें मनोधर्म ॥ अधिष्ठूनि करवी कर्म ॥ सम विषम भोगवी ॥ ५८ ॥
तैसा निर्गुणही मायावशें ॥ गुणविकारां भजला दिसे ॥ मग गुणकार्य गुणावेशें ॥ करी आपैसें गुणनिधि॥ ५९
रजोगुणें करी सृजन ॥ सत्वगुणें करी अवन ॥ तमोगुणें सर्व निधन ॥ करी आपण अजन्मा ॥ ६० ॥
ह्मणसी मायागुणें निबद्ध झाला॥तैं जीवाहूनि कें वेगळा॥तरी जो श्रेष्ठीं विचार केला॥तया बोला अवधारीं॥ ६१

यथाभ्रमरिकादृष्ट्याभ्राम्यतीवमहीयते ॥ चित्तेकर्त्तरितत्राऽऽत्माकर्तेवाहंधियास्मृतः ॥ ४१ ॥

॥टीका॥ जीवा आणि परमात्मया॥भेद इतुकाचि बल्लवराया ॥ ज्ञानस्वरूप जे कां माया ॥ अधिष्ठूनियां ईशत्वें
सृजनावना[3]प्ययादि करी॥परी परमात्मा निर्विकारी ॥ वास्तव स्वरूपाच्या अवसरीं॥लीलावतारी होत्साता॥ ६३

---

[1] स्नेहेंकरून. [2] धोतऱ्याचें बीं. [3] सृजन-अवन-अप्यय ह्म० सृष्टि, स्थिति, लय.

वास्तवस्वरूपाचें अज्ञान ॥ तें अविद्यात्मक गुणबंधन ॥ तेणें जिवासि विपरीत ज्ञान ॥ विषयभान प्रकाशी ॥ ६४ ॥
मिथ्या विषय सत्य गमती ॥ तदर्थ कामाची प्रवृत्ति ॥ कामलोभें कर्में करिती ॥ योनि भ्रमती फळभोगें ॥ ६५ ॥
प्रपंचा जें अधिष्ठान ॥ जेथें उमटे विपरीत ज्ञान ॥ तें कल्पनारूप बोलिजे मन ॥ जें वर्ते होऊन चतुर्धा ॥ ६६ ॥
बुद्धि निश्चय धूर धरी ॥ चित्तें अनुसंधान करी ॥ तदभिमानें अहंकारी ॥ देहधारी दृढ होय ॥ ६७ ॥
इंद्रियद्वारा विषयभान ॥ भावी सत्य सुखनिधान ॥ तत्साधनीं कर्तेपण ॥ चित्तीं जाण आविष्कारे ॥ ६८ ॥
देहधारी जीव भिन्न ॥ हेही विसरे आठवण ॥ देहचि मी आत्मा ह्मणून ॥ धरी अभिमान विषयार्थ ॥ ६९ ॥
देहाभिमानावलिप्तबुद्धि ॥ तये नांव ह्मणिजे अहंधी ॥ तिणें आवरिला कर्तृशब्दीं ॥ आत्मा निरुपाधि तो ह्मणवी ॥ ७० ॥
साच नसोनि साचासरिसें ॥ मनादिइंद्रियव्यापारवशें ॥ जीवचैतन्यालागिं भासे ॥ अविद्यापिसें या नांव ॥ ७१ ॥
ऐसें बोधितां तुजला नकळे ॥ तरी हें दृष्टांतें मोकळें ॥ प्रतीतीमाजी जैसें उजळे ॥ तैशिया बोलें अवधारीं ॥ ७२ ॥
भंवतां[1] भंवंडी[2] भरली देहीं ॥ तो सपर्वत भ्रमतां मही ॥ देखे साचाचि सारखी पाहीं ॥ तेंवि देही अहंभ्रमें ॥ ७३ ॥
तरी हा भ्रमचि सांडीं नंदा ॥ आत्मावबोधें भज गोविंदा ॥ तो कवणाचा नोहे कदा ॥ त्या अनुवादा अवधारीं ॥ ७४ ॥

युवयोरेवनैवायमात्मजोभगवान्हरिः ॥ सर्वेषामात्मजोह्यात्मापितामातासईश्वरः ॥ ४२ ॥

॥टीका॥षड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ हर्ता जीवाचें अज्ञान ॥ यालागिं हरि हें अभिधान ॥ त्रिजगीं जाण बुध गाती ॥ ७५ ॥
हा तुमचाचि नोहे पुत्र ॥ सर्वांचाही प्रीतिपात्र ॥ पुत्र आत्मा मातापितर ॥ जगदीश्वर जगन्मय पैं ॥ ७६ ॥

---

[1] मंडलाकार फिरतां. [2] भोंवळ.

जगन्मयत्वें प्रतिपादिला ॥ तेव्हां अवघाचि जाणें उगला ॥ शत्रुमित्रादिभेदाथिला ॥ परि तो संचला अभेद ॥ ७७ ॥
तरी तें अभेदत्व कैसें ॥ नंदा ऐक निरूपीतसें ॥ प्रतीती येतां भेद निरसे ॥ चांदिणां जैसें मृगतोय ॥ ७८ ॥

दृष्टंश्रुतंभूतभवद्भविष्यत्स्थास्नुश्चरिष्णुर्महदल्पकंच॥विनाऽच्युताद्वस्तुतरांनवाच्यंसएवसर्वंपरमार्थभूतः ४३

॥टीका॥दृष्टीपुढें जें दृश्य दिसे॥तें कृष्णाच्या चित्प्रकाशें॥येऱ्हवीं वास्तव कांहींच नसे॥विषयापिसें करणज्ञा॥ ७९
दृष्ट ह्मणिजे दृग्गोचर ॥ श्रुत ह्मणिजे इहामुत्र ॥ एवं पंचधा[1] विषयमात्र ॥ प्रकटी सर्वत्र चित्प्रभा ॥ ८० ॥
तस्मात चित्प्रभा नसतां देहीं ॥ विषयप्रतीति कवणे ठायीं ॥ करणालागीं भासे पाहीं ॥ यालागीं सर्वही कृष्णमय॥८१
दृष्ट श्रुत उमजल्या कांहीं ॥ कृष्णावेगळें उरलेंचि नाहीं ॥ भूत भावी वर्त्तमानही ॥ तैसेंचि पाहीं कृष्णमय ॥ ८२ ॥
स्थावरजंगम चेताचेत ॥ स्वयंभ संचला श्रीकृष्णनाथ ॥ गुरु लघु किंवा अणुत्व बृहत्त्व ॥ प्रकटी समस्त हरिप्रभा८३
अच्युताविण इतर कांहीं ॥ बोलावया वस्तु पाहीं ॥ तत्वनिर्धारें पाहतां नाहीं ॥ एवं सर्वही कृष्णमय ॥ ८४ ॥
सूर्यचि सूर्यभा[2]मृगजळ ॥ तैसाचि गोगोप्ता गोपाळ ॥ ब्रह्ममयचि ब्रह्मांडगोळ ॥ वस्तु केवळ अनिर्दिष्ट ॥ ८५ ॥
वस्तुतः निर्वचनीय ऐसा ॥ कृष्णप्रकाश बल्लवेशा ॥ बोधूनि उद्धव पाहे निशा ॥ तंव अरुणें दिशा उजळिलिया॥८६ ॥

एवंनिशासाब्रुवतोर्व्यतीतानंदस्यकृष्णानुचरस्यराजन् ॥
गोप्यःसमुत्थायनिरूप्यदीपान्वास्तून्समभ्यर्च्यदधीन्यमंथन् ॥ ४४ ॥

---

१ शब्दस्पर्शादि. २ सूर्यप्रकाश व मृगजळ.

॥टीका॥अरुणें सुरंग झाली प्राची॥चेइली मंडळी व्रजौकसांची॥जेथें वसती इंदिरेची॥चर्या त्यांची शुभ सर्व॥८७॥
एऱ्हवीं प्रसूतिसमयावधि ॥ मन्मथमंदिर जे न शोधी ॥ ऐसी जिची तांद्रिक बुद्धि ॥ अरुण बोधी कैंवि तये ॥ ८८॥
दिवस आलियाही प्रहरैक ॥ घोरत निजे जे निःशंक ॥ ते वळघली जयाचा अंक ॥ तो नर शंख कां न करी ॥ ८९ ॥
असो अवदशेचीं चिह्नें ॥ निद्रालस्यप्रमाद रुसणें ॥ दुर्भगांचीं दुर्लक्षणें ॥ तमोगुणें प्रियतम त्यां ॥ ९० ॥
व्रजीं अवतरला परेश ॥ तैंहूनि तेथें कमलावास ॥ रजतमादिदोषां नाश ॥ शोभे विशेष सद्गुणश्री ॥ ९१ ॥
शुक ह्मणे गा परीक्षिति ॥ उद्धवनंदसंवादप्रीति ॥ सरोनि गेली अवघी राती ॥ व्रजजनयुवति चेइलिया ॥ ९२ ॥
सवेग उठिल्या द्विजांगना ॥ शौचविधिदंतशोधना ॥ संमार्जिती यज्ञायतना ॥ प्रातःस्नाना सारूनी ॥ ९३ ॥
सुस्नात विप्र प्रादुषीकरणें॥ करूनि संध्यापात्रसादनें॥ अध्यापकीं अध्ययनें ॥ छात्रांलागूनि आदरिलीं ॥ ९४ ॥
एक प्रातःस्मरणें स्मरती॥एक आत्मचिंतनें करिती॥ योगाभ्यासीं निश्चळवृत्ति॥ लक्ष्य साधिती पैं एक ॥९५ ॥
समस्त व्रजींच्या गोपललना ॥ दीप लावूनि गृहार्चना ॥ सेकोपलेपसंमार्जना॥ गोदोहना सारिती ॥ ९६ ॥
एकी आस्तरणें काढिती ॥ एकी प्रांगणें झाडिती ॥ एकी गोपाळां वाढिती ॥ वना धाडिती गोगोष्ठें ॥ ९७ ॥
कंडनें पेषणें[1] करिती एकी ॥ बाळकें हालविती पर्यंकीं ॥ कृष्णचरितें गाती मुखीं ॥ होती सुखी तद्बोधें ॥ ९८ ॥
गाई वत्सां हुंबरती ॥ वत्सें प्रतिशब्दें बोभाती ॥ दोहनकाळीं बिडाल[2]पंक्ति ॥ पायीं घोळती दुग्धार्थ ॥ ९९ ॥
एकी क्षाळूनि तनुभाजनें॥शुद्ध करिती दधिशोधनें॥एकी करिती दधिनिर्मथनें॥गाती आननें हरिचर्या ॥ ५०० ॥
तिया गोपींची लावण्यगरिमा॥कैशा मिरवती हेमललामा॥एका श्लोकें कुरुसत्तमा॥शुकमहात्मा निरूपी ॥ १ ॥

---

[1] दळणें, [2] मांजर अथवा फार उपयोगी जनावर.

द्वितीयश्लोकीं त्यांचीं गानें॥आणि हरिचर्यावर्णनें॥छंदें करिती दधिनिर्मथनें ॥ तीं व्याख्यानें परिसावीं ॥ २ ॥

तादीपदीप्तैर्मणिभिर्विरेजूरज्जूर्विकर्षद्भुजकंकणस्रजः ॥
चलन्नितंबस्तनहारकुंडलत्विषत्कपोलारुणकुंकुमाननाः ॥ ४५ ॥

॥टीका॥क्षीरोद्भवा ज्या ललामललना॥अमरवरपुरविभूषणा॥मुनिजनगंजन मन्मथसेन ॥या व्रजभुवनामाजि वधू ३
कनकलतिका लावण्यमूर्ति ॥ कनकाभरणीं रत्नपंक्ति ॥ दीपप्रभेच्या बिंबतां दिप्ति ॥ शोभा मिरविती परस्परें ॥ ४ ॥
दीपप्रभेचीं प्रदीप्तकिरणें ॥ तेणें भासुर ललनारत्नें ॥ कांचनमंडित मणिभूषणें॥तरुणी तारुण्यें मिरविती ॥ ५ ॥
हेमरत्नाभरणाभरण[1] ॥ व्रजवनितांचें तनुलावण्य ॥ हें दृष्टांतें विचक्षण ॥ न्यून पूर्ण परिस तूं ॥ ६ ॥
नकटीनाकीं मुक्ताफळ ॥ कनकरत्नीं माणि सुढाळ ॥ तद्वत घ्राणें त्यांची किळ ॥ होय समळ शोभवितां ॥ ७ ॥
नासा श्वित्री[2] सर्वाभरणीं ॥ कुंकुममंडित सुभगा तरुणी ॥ नशोभे जैसा नर दुर्गुणी ॥ उत्तमवर्णी होत्साता ॥ ८ ॥
दरिद्र्याआंगींच्या चातुर्यकळा ॥ झांकी याच्ञेची अवकळा ॥ कीं मद्यमृद्धट गंगाजळा ॥ करी मंगळा अमंगळ ॥ ९ ॥
तैशा व्यंगांगा अंगना॥नशोभविती वस्त्राभरणा॥कीं धर्मजिज्ञासा कौळिकां[3] मलिना॥पढतां रसना लाजतसे॥ १० ॥
तैशा नव्हती व्रजसुंदरी॥ज्या दिव्यभूषणा भूषणकारी॥शोभा मिरविती परस्परीं॥निवती नेत्रीं पाहणारे ॥ ११ ॥
रज्जु कर्षितां दधिनिर्मथनीं॥कंकणीं झळकती रत्नमणि॥उठती मंजुळ वलयध्वनि॥भूषा श्रवणीं तळपती ॥ १२ ॥
बाहु चंचळ भूषायुक्त ॥ मौळ नितंब कुच कंपित ॥ कंठमाळा माणिमंडित ॥ त्या डोलती तच्छंदें ॥ १३ ॥

---

[1] सुवर्ण आणि रत्नें ह्यांच्या अलंकारांस अलंकार. [2] कुष्ठरोगमुक्त. [3] पाखंड्याला.

कांचनमंडित रत्नकांचि॥रुणझुण क्षुद्रघंटिकांची॥कटिप्रदेशीं शोभा त्यांची॥दाविती साची तन्वंगी ॥ १४ ॥
गंड मंडित कुण्डलकांति॥कुकुमें भालकपोलप्रांतीं॥ तेणें सुरंग आननपंक्ति॥विशेष शोभती व्रजललना ॥ १५ ॥
वांक्या नूपुर अंदु वाळे ॥ चरणीं रुणझुणती सुताळें ॥ कृष्णशैशवचरितें बहळें ॥ सुस्वरमेळें आळविती ॥ १६ ॥

उद्गायतीनामरविंदलोचनंव्रजांगनानांदिवमस्पृशद्ध्वनिः ॥
दध्नश्चनिर्मंथनशब्दमिश्रितोनिरस्यतेयेनदिशाममंगलम् ॥ ४६ ॥

॥टीका॥ऐशिया व्रजांगना निर्दोष॥गाती उच्चस्वरीं हरियश॥मिश्रितदधिनिर्मथनीं घोष॥ तो ध्वनिविशेष नभ व्यापी
॥ १७॥कमललोचनाप्रति गौळणी॥सप्रेम गाती उच्चस्वनीं॥माजी मिश्रित मथनध्वनि॥फांके गगनीं दशदिशा॥ १८॥
हरियशोध्वनि श्रवणीं पडतां ॥ दशदिशांची अमंगलता ॥ हरूनि प्रकटी सुमंगलता ॥ तें नृपनाथा अवधारीं ॥ १९ ॥
मधुरस्वरीं वल्लकी[1] वाजे ॥ तेणें तोषती सुर नर राजे ॥ रासभ[2]हेषित गगनीं गाजे ॥ तें धिक्करिजे सर्वत्रीं ॥ २० ॥
तैसें विषयार्थ जें गायन ॥ तें तें रासभहेषित जाण ॥ अचेतवल्लकीसमान मान ॥ एकाग्र मन हरिरंगीं ॥ २१ ॥
गायनविद्या सप्तस्वरीं ॥ अभ्यासिली कळाकुसरी ॥ मन कल्पना विषयीं करी ॥ तें रासभस्वरी विताळ[3] तें ॥ २२ ॥
अभ्यासरहित सप्रेमभरें ॥ हरियश गातां उच्चस्वरें ॥ चित्तैकाग्र्यें विवर्त विसरे ॥ मंगळ पसरे तद्गानीं ॥ २३ ॥
काष्ठवल्लकी समान तारा ॥ अभ्यस्त गायन सप्तस्वरा ॥ माजी प्रेमाचा उभारा ॥ एकाग्रचित्तें शोभविला ॥ २४ ॥
हरि सर्वात्मा निर्विकार ॥ होतां सप्रेम कीर्तनगजर ॥ कीर्तनीं प्रकटे सत्य साचार ॥ हरिजागर या नांव ॥ २५ ॥

---

[1] वीणा. [2] गर्दभाचा शब्द. [3] बेताल.

अभ्यास सप्रेम वरिष्ठ ॥ अनभ्यासी कीर्तननिष्ठ ॥ गाती सप्रेमें वैकुंठ ॥ वेधें प्रकट हरि होय ॥ २६ ॥
एवं सप्रेम हरिजागर ॥ प्रेमरहित जे सप्तस्वर ॥ ते उलूक[1]जंबुकसूकरखर ॥ वृथा करकर पोटार्थ ॥ २७ ॥
सप्रेमगानें वेधे वृत्ति ॥ तेणें अमंगळ भेदनिवृत्ति ॥ अभेद मंगळ सर्वां भूतीं ॥ हरिगुणकीर्ति विस्तारी ॥ २८ ॥
एवं दधिमथनाचा ध्वनि ॥ मिश्रित गोपी उद्गायनीं ॥ गाती सप्रेम चक्रपाणि ॥ तैं दिङ्मळ छेदूनि मंगळ दे ॥ २९ ॥
इत्यादिध्वनींचिया गजरीं ॥ चेइली संपूर्ण व्रजपुरी ॥ शौचवीथींत तंद्रिता नारी ॥ परस्परें गुजबुजिती ॥ ३० ॥
उद्धवनंदसंवादगती ॥ सरोनि गेली सर्व राती ॥ उषःकाळाची अभिव्यक्ति ॥ केली ग्रंथीं ते कथिली ॥ ३१ ॥
प्राची अरुणें सुरंग झाली ॥ कीं त्या कुंकुम रेखिलें भाळीं ॥ उद्धवें स्नान तेचि काळीं ॥ यमुनाजळीं सारिलें ॥ ३२ ॥
स्नानसंध्या जपादिनियम ॥ स्तोत्रपाठ रविप्रणाम ॥ प्रातराह्निक करितां यामें[2] ॥ यमुनातीरीं लागला ॥ ३३ ॥
तंव येरीकडे वर्तली कथा ॥ ते तूं ऐकें धरित्रीनाथा ॥ भास्करमंडळ उदया येतां ॥ व्रजजनवनिता विलोकिती ॥ ३४ ॥

भगवत्युदितेसूर्येनंदद्वारिव्रजौकसः ॥ दृष्ट्वारथंशातकौम्भंकस्यायमितिचाब्रुवन् ॥ ४७ ॥

॥टीका॥ फांकतांचि सूर्यकरीं ॥ व्रजौकसांच्या नंदद्वारीं ॥ दृष्टी जडलिया रहंवरीं ॥ भवंतीं भंवरी मिळाली ॥ ३५ ॥
जडितरत्नीं कनकरथ ॥ देखोनि व्रजवासी समस्त ॥ ह्मणती कोणाचा हो येथ ॥ अकस्मात उदेला ॥ ३६ ॥
ऐसा व्रजजन चर्चा करी ॥ तंव त्या गोपी विरहातुरी ॥ वितर्क तार्किती परस्परीं ॥ तें अवधारीं कुरुवर्या ॥ ३७ ॥

अक्रूरआगतःकिंवायःकंसस्यार्थसाधकः ॥ येननीतोमधुपुरींकृष्णःकमललोचनः ॥ ४८ ॥

---

[1] घुबड. [2] महर.

॥ टीका ॥ सक्रोध ह्मणती अगे पहिला ॥ हा काय अक्रूरचि येथ आला ॥ जो कंसार्थसाधक भला ॥ मथुरे
नेला हरि येणें ॥ ३८ ॥ कोमलारविंदलोचन ॥ तो मथुरे येणें नेऊनि कृष्ण ॥ केलें कंससकार्यसाधन ॥ पुढती
आन करूं आला ॥ ३९ ॥

किंसाधयिष्यत्यस्माभिर्भर्तुःप्रीतस्यनिष्कृतिम् ॥ इतिस्त्रीणांवदंतीनामुद्धवोऽगात्कृताह्निकः॥४९ ॥

॥टीका॥ एकी ह्मणती कृष्ण नेला ॥ तेणें कंस निर्दाळिला ॥ बरवा स्वामिकार्यार्थ केला ॥आतां आला किमर्थ हा
तंव येरी ह्मणे हा प्रियतम कंसा ॥ याचा कंसासि भरंवसा ॥ तदुत्तीर्णालागीं आपैसा[1] ॥ पहिल्या ऐसा येथ आला
येथ येऊनि करील काय ॥ तरी मृतप्राय आमुचे देह ॥ इहीं करूनि साधिता होय ॥ कंसकार्य येकाळीं ॥ ४२॥
आह्मां मारूनि आमुच्या पिशितीं[2] ॥ पिंड देईल कंसाप्रति ॥ तेणें पावेल तो सद्गति ॥ आला उपकृतिनिस्तरणा
आमुच्या मांसपिंडदानें ॥ कंसालागीं सद्गति देणें ॥ बहुतेक इतुक्याचि कारणें ॥ याचें येणें गमतसे ॥ ४४ ॥
ऐशा परस्परें वनिता ॥ विरहें सक्रोध वितर्क करितां ॥ उद्धव त्यासमया आंतौता[3] ॥ आह्निक करूनि पातला ॥४५
तिहीं उद्धव देखतां नयनीं ॥ अक्रूर नव्हे हें कळलें मनीं ॥ उद्धवावयव श्रीशुक वर्णी ॥ वक्ष्यमाणीं[4] तें ऐका ॥ ४६
सत्तेचाळिसावे अध्यायीं ॥ भ्रमरगीतव्याख्यान पाहीं ॥ तया श्रवणाची नवाई ॥पवित्रीं ह्रदयीं सांठविजे॥ ४७॥
आदिनारायण निर्गुण ॥ प्रणवांकुरें झाला सगुण ॥ नाभिकमळीं कमलासन ॥ निजनंदन बोधिला ॥ ४८ ॥
विधीनें देवर्षि नारद ॥ चतुःश्लोकीं बोधिला विशद ॥ तेणें बोधिला अत्रिवरद ॥ दत्तात्रेय परमात्मा॥ ४९॥

---

[1] आपोप. [2] मांसांनीं. [3] मध्यें. [4] पुढील श्लोकीं.

ह्मणाल अत्रि परम श्रेष्ठ ॥ महर्षि आणि ब्रह्मनिष्ठ ॥ तेणें अध्यात्मविद्या स्पष्ट॥स्वपुत्रा कां नबोधिली ॥ ५० ॥
तरी महर्षि ते सृष्टिवर्धना ॥ केली विरंचीनें आज्ञा ॥ कर्माचरणें सृजनाभिमाना ॥ पात्र झाले ते सर्व॥ ५१ ॥
तें नरुचेचि दत्तात्रेया ॥ बालोन्मत्तपिशाचचर्या ॥ वर्ततां देखोनि अनसूया ॥ कांतासहित सचिन्त ॥ ५२ ॥तेथ
पातला तो देवर्षि[1] ॥ देखोनि आनंद उभयतांसी ॥ गुह्य कथिलें तयांपासीं ॥ मग तो दत्तासी प्रबोधी ॥५३॥
दत्त नोहेचि सृजनीं रत ॥ नारदें केला ब्रह्मनिरत ॥ तेणें ब्रह्मविद्या कळिकाळांत ॥ जनार्दनपंता बोधिली॥५४
एकोपंतीं[2] छात्रदशा ॥ साधूनि केली अभेद शुश्रूषा ॥ जनार्दनकृपेनें ब्रह्मरसा ॥ दत्तप्रसादा साधिलें ॥५५ ॥
एकनाथकृपामृत ॥ चिदानंदासि झालें प्राप्त ॥ तेणें स्वानंद केला तृप्त ॥ कृपापीयूष वर्षोनी॥ ५६ ॥
स्वानंदाचिये कृपादृष्टी ॥ गोविंद लाधला ब्रह्मपुष्टि ॥ तेणें कैवल्यरसाची वृष्टि ॥ दयार्णवगर्तेंवरी[3] केली ॥ ५७ ॥
एवं परंपराक्रमें प्राप्त ॥ तें हें श्रीमद्भागवत ॥ अध्याय षट्चत्वारिंशत ॥ झाला समाप्त ये ठायीं ॥५८ ॥
इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायांदशमस्कंधेश्रीशुपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायांकृष्णाज्ञयोद्धवव्रजाभिगमनयशोदानंदप्रबोधनंनामषट्चत्वारिंशत्तमोऽध्यायः॥४६॥ ॥

प्रमाद्यब्देऽधिकेकृष्णेपंम्यागुरुवासरे ॥ पिपीलिकापुरेट्चत्वारिंशःसुसमापितः

॥ श्लोक ॥ ४९ ॥ ओंव्या ॥ ५५८ ॥ एवंसंख्या ॥ ६०७ ॥ संपूर्णमस्तु ॥ ॥ श्रीष्णार्पणमस्तु ॥

---

[1] नारद. [2] एकनाथस्वामींनीं. [3] कृष्णदयार्णवरूप गर्ता ह्म० खांच.

अध्याय ४७

नंदद्वारीं देखोनि रथ ॥ गोपी वितर्किती समस्त ॥ तंव पातला उद्धव तेथ ॥ प्रातःस्नान कृताह्निक ॥२६॥
श्री कृष्णाच्या गुह्य गोष्टी ॥ विशेष अध्यात्म परिपाटी ॥ सम्यक बोधूनि व्रजगोरटी ॥ येईल भेटी कृष्णाचे ॥२७॥



श्रीकृष्णपरब्रह्मणे नमः॥ ॥षड्गुणांचें अधिष्ठान ॥ गोविंदसद्गुरु श्रीभगवान ॥भवीं बुडतां मादृशदीन ॥ तदुद्धरणा अवतरसी ॥ १ ॥ तव यश गाती निगमागम ॥ शेषाविरंचिमुनिसत्तम ॥ हरिहरसुरवर पादपद्म ॥ नमिती सप्रेम स्वसुखार्थ ॥ २ ॥ मायाभ्रमभर भवाची वाडी ॥ वेली वाढतां चढोवढी ॥ सृष्टिस्थितिलय स्वकार्य ओढी ॥ भरली भवंडी अभिमानें ॥ ३ ॥ विसरोनि आंगींची एकात्मता ॥ प्रकृतिगुणीं निबद्ध होतां ॥ भेदें पसरे अनेकता ॥ हे क्षोभकता गुणांची ॥ ४ ॥ तया गुणक्षोभापासून ॥ मुक्त करिसी प्रबोधून ॥ यालागीं हरिहरकमलासन ॥ सुरमुनिगण यश गाती ॥ ५ ॥ मोक्षश्रीचा कल्पद्रुम ॥ ईश्वरा करिसी पूर्णकाम ॥ यालागीं शक्तीसि श्रीपदप्रेम ॥ बोधी निःसीम परिचर्या ॥ ६ ॥ तुझें उदारत्व कोणा ॥ नतुळे कैवल्यकृपाघना ॥ नकंडसितां[1] थोरा लहाना ॥ साम वदान्या[2] वर्षसी ॥ ७ ॥ जीवत्वावदशा दवडूनी ॥ संपन्न करिसी ईश्वरपणीं ॥ कीं जीवेश्वराची आटणी ॥ ब्रह्मनिर्वाणीं समरसतां ॥ ८ ॥ इंद्रियद्वारा विश्व अशेष ॥ उमाणी[3] धरूनि विषयसोस ॥ तों विपरीतज्ञानें चिदाभास ॥ मानी विशेष श्लाघ्यता ॥ ९ ॥ तुझें ज्ञान नोहे तैसें ॥ येणें त्रिपुटी निःशेष पुसे ॥ ज्ञेय ज्ञान ज्ञाता ऐसें ॥ कोण उमसे[4] ते ठायीं ॥ १०॥ वास्तवबोधें ब्रह्मानंद ॥त्रिपुटीवर्जित जो अभेद ॥ अमृतत्वीं अमृतस्वाद ॥ हें ज्ञान विशद तव कृपा ॥ ११ ॥ जया ज्ञानाचिया उजिवडें ॥ ईश्वरही स्वकार्य मानी उबडें ॥ मुरडोनि स्वा-

---

१ चौकशी न करितां. २ उदार. ३ तुलना करी. ४ बोले.

नंदडोहीं बुडे ॥ मग अनिवडे साक्षित्वें ॥ १२ ॥ जें या ज्ञानाचें भाजन ॥ तें वैराग्य तुझें गहन ॥ मिथ्या कळल्या
विवर्तभान ॥ रंगे कोण ते ठायीं॥ १३ ॥ स्वप्रियेचा सुरतानंद ॥ सुषुप्तिभ्रमामाजि विशद ॥ जागृति
येतां चिळसीप्रदं[1] ॥ विषयस्वाद तैंवि भवीं ॥ १४ ॥ मिथ्याविवर्तपतीति ॥ ज्ञानी निश्चय करी वसती ॥ तैं ब्रह्मांडगर्भितविषयविरक्ति
॥ भेदोपहतीमाजि मिरवे ॥ १५ ॥ एवं यश श्री औदार्य ॥ ज्ञान वैराग्य मिरवी
धैर्य ॥ तें तव सत्तेचें ऐश्वर्य ॥ त्रैलोक्यधुर्य धुरंधरा ॥॥ १६ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ गोमयवेत्ता आब्रह्मभुवन ॥
असद्बोधातें निरसून ॥ सद्बोधपूर्ण सद्गुरु तूं ॥ १७ ॥ अचिंत्यैश्वर्य अपार ॥ तें वर्णिलें षड्गुणाकार ॥
षण्णाम जो भग उच्चार ॥ तो भगवान्साचार गुरुवर तूं ॥ १८ ॥ मादृशें[2]दीनाचिये करुणे ॥ जाकळोनियां अवतार
धरणें ॥ तें षड्गुणांचीं अळंकरणें ॥ विश्वीं प्रकटणें तनुविभवीं ॥ १९ ॥ अनेक जन्म निष्कामभजनीं ॥
जिहीं केलासि सेवाऋणी ॥ तयां सभाग्यांच्या ऋणोत्तीर्णीं ॥ सद्गुण लेवूनि अवतरसी ॥ २० ॥ तेव्हां जगदघभ्रमांधकार
॥ निरसूनि चिद्बोधदिवाकर ॥ प्रकट होतां जगदुद्धार ॥ हा बडिवार बिरुदाचा ॥ २१ ॥
माझा कारुण्यकळवळा पोटीं ॥ ह्मणोनि अद्वैतबोधहातवटी ॥ सप्रेमभजन अभेदगोठी ॥ टीका मऱ्हाठी हरिवरदा
॥ २२ ॥ वाखाणवितां दशमस्कंधा ॥ त्यामाजि उद्धवें नंदयशोदा ॥ प्रबोधिलीं तो अध्याय समुदा॥
शेचाळिसावा संपला ॥ २३ ॥ यावरी सत्तेचाळिसावा ॥ अध्याय आरंभिला बरवा ॥ प्रज्ञाप्रकाशें सिद्धी न्यावा
॥ हें गुरुदेवा प्रार्थितसें ॥ २४ ॥ अतिदुर्बोध भ्रमरगीत ॥ परमरहस्यचातुर्यभरित ॥ परमहंसीं रमिजे जेथ ॥
श्रुतिसिद्धांत सद्भक्ति ॥ २५ ॥ नंदद्वारीं देखोनि रथ ॥ गोपी वितर्किती समस्त ॥ तंव पातला उद्धव तेथ ॥

---

[1] चिळस आणणारा. [2] माझ्यासारखे.

प्रातःस्नान कृताह्निक ॥ २६ ॥ श्रीकृष्णाच्या गुह्यगोठी ॥ विशेष अध्यात्म[1]परिपाटीं ॥ सम्यक बोधूनि व्रजगोरटी ॥ येईल भेटी कृष्णाचे ॥ २७ ॥ तेथ उद्धवातें देखून ॥ निवाले व्रजवधूंचे नयन ॥ तयाचें रूपलावण्य पूर्ण ॥ नृपा कथन करी शुक ॥ २८ ॥

॥ श्रीशुकउवाच॥ ॥तंवीक्ष्यकृष्णानुचरंव्रजस्त्रियःप्रलंबबाहुंनवकंजलोचनम् ॥
पीतांबरंपुष्करमालिनंलसन्मुखारविंदंमणिमृष्टकुंडलम् ॥ १ ॥

॥ टीका ॥ अनुचर कृष्णाचा उद्धव ॥ त्यातें व्रजस्त्रिया सर्व ॥ देखोनि मानिती अपूर्व ॥ तूं ते अवयव अवधारीं ॥ २९ ॥ सरळ सलंब बाहुयुगळ ॥ नयन नवकंज[2]दलविशाळ ॥ मणिमंडितें कुंडलें तरळ ॥ फांके झळाळ गंडयुगीं ॥ ३० ॥ तेणें फुल्लारपंकजवदन ॥ दिसे अत्यंत सुप्रसन्न ॥ हेमपीतांबरपरिधान ॥ श्वेतप्रावरण पांघुरला ॥ ३१ ॥ कण्ठीं विचित्र पंकजमाळा ॥ आंगीं सौंदर्यश्रियेची कळा ॥ त्यातें देखोनि बल्लवबाळा ॥ वदती नृपाळा तें ऐका ॥ ३२ ॥

शुचिस्मिताःकोऽयमपीच्यदर्शनःकुतश्चकस्याच्युतवेषभूषणः ॥
इतिस्मसर्वाःपरिवव्रुरुत्सुकास्तमुत्तमश्लोकपदांबुजाश्रयम् ॥ २ ॥

॥ टीका ॥ अपीच्य म्हणिजे सुन्दरतर ॥ ज्याचें दर्शन मनोहर ॥ तिलक भूषणें अलंकार ॥ वेषें अपर हरिसाम्य ॥ ३३ ॥ अगे हा कोण कोठोनि आला ॥ येथ कोणाचा प्रेरिला ॥ हरिवेषासम भूषाथिला ॥ नव्हे हा पहिला अक्रूर

---

[1] अध्यात्मविद्येच्या अनुक्रमेंकरून. [2] नवीन कमलपत्राप्रमाणें विशाळ.

॥३४॥ कृष्णपदांबुजाश्रय[1] ॥ उद्धव परमपार्षदवर्य[2] ॥ त्यातें वेष्टूनि वधूसमुदाय ॥ कृतविस्मय मिळाला ॥३५॥
सर्वदा कृष्णविरह पोटीं ॥ तेचि सर्वत्र अवगमे गोठी ॥ श्रवणीं पडतां शब्दसृष्टि ॥ तद्रूपें उठी अर्थबोधू३६ ॥
दृष्टी पडे तें तावक ॥ ऐसें तव वेधाचें लावक ॥ तावी विरहाचा पावक ॥ तेणें नावेक गतशंका॥३७॥नाममात्र
त्या अक्रूर ॥ क्रिया पाहतां परम क्रूर ॥ याचें कोमळ सदयांतर ॥ वाटे अनुचर कृष्णाचा ॥ ३८ ॥ ऐसा करूनि
दृढ निश्चय ॥ सादर गोपींचा समुदाय ॥ सांडूनि लौकिकशंकाभय ॥ करिती काय तें ऐका ॥ ३९ ॥

तंप्रश्रयेणावनताःसुसत्कृतंसव्रीडहासेक्षणसूनृतादिभिः ॥
रहस्यपृच्छन्नुपविष्टमासनेविज्ञायसंदेशहरंरमापतेः ॥ ३ ॥

॥टीका॥हा कृष्णाचा संदेशहर[3] ॥ तेणें धाडिला समाचार ॥ ऐसें जाणोनि वनितानिकर ॥जाला तत्पर सप्रेमें॥
उद्धवाप्रति नम्रपणें ॥ सत्कारपूर्वक केलीं नमनें ॥ सत्कारिला कवण्या गुणें ॥ तियें लक्षणें अवधारा ॥ ४१ ॥
सलज्ज मन्दहासित वदनें ॥ व्यंकटकटाक्षनिरीक्षणें ॥ सूनृत ह्मणिजे सुललित वचनें॥ सम्मुखीकरणें पैं केलीं४२
इत्यादि संस्कारीं सुसंस्कृत ॥ नम्रभावें नमस्कृत ॥ आसनीं बैसला आनन्दभरित ॥ गुह्यवृत्तांत त्या पुसती४३
प्रेमोत्सुका आपुले पोटीं ॥ अन्योक्तीच्या वदती गोष्टी ॥ त्या तूं ऐकें श्रवणपुटीं ॥ कुरुवरकोटीरललामा॥४४॥

जानीमस्त्वांयदुपतेःपार्षदंसमुपागतम् ॥ भर्त्रेहप्रेषितःपित्रोर्भवान्प्रियचिकीर्षया ॥ ४ ॥

टीका॥श्रीकृष्णाचा पार्षद ऐसा ॥ निश्चय करूनि दृढमानसा॥आह्मी तूतें उत्तम पुरुषा॥आलासि ऐसा जाणतसों॥

---

[1] कृष्णपदकमलाचा आश्रय ज्याला तो. [2] सेवकश्रेष्ठ. [3] दूत.

बरव्या प्रकारें आलासि येथें ॥ किमर्थ ऐसें कल्पितां चित्तें ॥ तुझिया स्वामीनें धाडिलें तूंतें ॥ ज्या कार्यातें तें ऐक॥४६
नंदयशोदा पितरें जाण ॥ त्यांच्या चित्ताचें समाधान ॥ करावयाचे इच्छेकरून ॥ तुजलागून पाठविलें ॥ ४७ ॥
निजपितरांचें प्रियतम करणें ॥ हेतुगर्भित हें बोलणें ॥ उद्धवें जाणावया निजमनें ॥ वदती वचनें तें ऐका॥ ४८ ॥

अन्यथागोव्रजेतस्यस्मरणीयंनचक्ष्महे ॥ स्नेहानुबंधोबंधूनांमुनेरपिसुदुस्त्यजः ॥ ५ ॥

॥टीका॥मातापितरें बंधु स्वजन॥यांचा स्नेह दुस्त्यज जाण॥केलियाही संन्यासग्रहण॥स्नेहबंधन तुटेना ॥४९॥
माता ठेवूनि बंधूपासीं ॥ आपण जाहला जरी संन्यासी ॥ बंधु पावल्या पंचत्वांसी ॥ तैं लागे मातेसि पोसावें ॥ ५० ॥
तस्मात दुस्त्यज मातापितरें ॥ त्यांप्रति धाडिलें तुज यदुवीरें ॥ येऱ्हवीं त्याचे सखे सोयरे ॥ व्रजीं दुसरे कोण पां॥५१
इये गाईच्या गोठणी ॥ कैंचे जिवलग त्यालागुनी ॥ ज्या तो स्मरेल अंतःकरणीं ॥ ऐसें कोण्ही नदेखों ॥ ५२ ॥
जरी तूं ह्मणसी व्रज समस्त ॥ गोविंदासि जिवलग आप्त ॥ तरी ते कार्यापुरती मात ॥ सद्दष्टांत अवधारीं ॥ ५३ ॥

अन्येष्वर्थकृतामैत्रीयावदर्थविडंबनम् ॥ पुंभिःस्त्रीषुकृतायद्वत्सुमनःस्विवषट्पदैः ॥ ६ ॥

॥टीका॥अन्यत्र कार्या पुरती जनीं॥मित्री सोंगसंपादनी॥अर्थ संपालिया परतोनी॥पुन्हा ढुंकोनि नपाहती ॥ ५४॥
तैसीच कां जारपुरुषांहीं ॥ मित्री कीजे स्त्रियांच्या ठाईं ॥ जैसा भ्रमर सुमनसोई ॥ गंधलोभें लुडबुडी ॥ ५५ ॥
चटुलचाटुवचनें कपटी ॥ कामप्रलोभ उपजवूनि पोटीं ॥ कार्यापुरत्या मधुर गोठी ॥ त्यजिती शेवटीं हळहळित ॥५६॥
सुमन सुके सुगंध उपखे ॥ तेव्हां पूर्वील प्रेम फिकें ॥ परतोनि शब्द नवदे मुखें ॥ स्नेह लटिकें कार्यार्थ ॥ ५७ ॥

---

१ मरणाळा. २ संपे.

नवप्रसूनीं आमोद[1]भरें ॥ पूर्विलाहूनि प्रेमादरें ॥ लंपट होतां पहिलें विसरे ॥ स्नेह नस्मरे रतिभुक्त ॥ ५८ ॥
एवं अर्थसंपादना ॥ पर्यंत मैत्रीलाघव नाना ॥ कार्याअंतीं समान तृणा ॥ मानी ललना जार नर ॥ ५९ ॥
सुकल्या सुमनीं नफिरे भ्रमर ॥ तैसाचि भोगूनि जाय जार ॥ रतिपूर्वील स्नेहादर ॥ विसरे सत्वर कृतघ्नवत ॥ ६० ॥
एवं मातापितरां आप्तांविणें ॥ कार्यापुरती मैत्री करणें ॥ कार्य संपल्या ओसंडणें ॥ कोणा कोणें ज्या परी ॥ ६१ ॥

निःस्वंत्यजंतिगणिकाअकल्पंनृपतिंप्रजाः ॥ अधीतविद्याआचार्यमृत्विजोदत्तदक्षिणम् ॥ ७ ॥

॥टीका॥ स्व ह्मणिजे धनाचें नाम ॥ सधन देखोनि नर सकाम ॥ गणिका[2] वाढवी स्नेहसंभ्रम ॥ सुरतप्रेम बहु लावी ६२
धन देवोनि निःस्व[3] होये ॥ तैं त्या गणिका लोटी पायें ॥ पूर्वस्नेहाची नरखे सोय ॥ रमती होय आणिकेंसीं ॥ ६३ ॥
कीं अष्टांगप्रकृतिहीन राजा ॥ अक्षमशासन रक्षणकाजा ॥ देखोनि त्यागिती समस्त प्रजा ॥ प्रतापपुंजा आश्रयिती ॥ ६४
कीं विद्या घेतलिया गुरूतें ॥ छात्र त्यजोनि जाती परौते ॥ कीं पालाश[4] पत्र हातें ॥ भोजनांतीं त्यागिती ॥ ६५ ॥
कीं यज्ञसिद्धि सुकृतग्रहणा ॥ ऋत्विजां दिधलिया दक्षिणा ॥ ते मग त्यजिती यजमाना ॥ अन्य याजना क्षण[5] घेती ॥ ६६ ॥

खगावीतफलंवृक्षंभुक्त्वाचातिथयोगृहम् ॥ दग्धंमृगास्तथाऽरण्यंजारोभुक्त्वारतांस्त्रियम् ॥ ८ ॥

॥टीका॥ कीं जाली देखोनि फळांची झाडी ॥ पक्षिवर्ग द्रुमातें सांडी ॥ कीं जेविल्यानंतरें नधरीगोडी ॥ अतिथि सोडी भुक्तगृहा ६७
कीं दावानळें जळालें वन ॥ त्यागूनि जाती मृगांचे गण ॥ तैसेचि जारपुरुष निर्घृण ॥ जाती सांडून कुलटांतें ॥ ६८ ॥
इत्यादि निरूपणाचा हाचि अर्थ ॥ आपुला जार श्रीकृष्णनाथ ॥ तेणें भोगोनि रतिकार्यार्थ ॥ निष्ठुर चित्त केलें कीं ॥ ६९ ॥

---

[1] अतिसुगंध. [2] वेश्या. [3] निर्धन. [4] पळसाचें. [5] आमंत्रण.

शुक ह्मणे गा कुरुवैडूर्या ॥ ऐसी गोपींची सप्रेम चर्या ॥ दुर्लभ योगियां जपियां तपियां ॥ मुख्यज्ञानियां आदिकरूनी ॥

इतिगोप्योहिगोविंदेगतवाक्कायमानसाः ॥ कृष्णदूतेव्रजंयातेउद्धवेत्यक्तलौकिकाः ॥ ९ ॥

॥टीका॥उद्धव श्रीकृष्णाचा दूत॥व्रजा पातला असतां तेथ॥गोपी मिळोनियां समस्त ॥वदल्या संकेत तो कथिला ॥
उद्धव व्रजा आला आसतां ॥ गोपी जाल्या लौकिकरहिता ॥ कायवाङ्मानसें अनंता ॥जाल्या निरता तन्निष्ठा॥ ७२॥
कृष्णीं वेधल्या वाङ्मन ॥ लौकिक व्यवहार स्मरे कोण॥ निःशंक गाती कृष्णाचरण ॥ तें निरूपण अवधारीं ॥७३॥

गायंत्यःप्रियकर्माणिरुदत्यश्चगतह्रियः ॥ तस्यसंस्मृत्यसंस्मृत्ययानिकैशोरबाल्ययोः ॥ १० ॥

॥टीका॥धन सुत वनिता वृत्ति क्षेत्र॥प्रियतम मानिती हें सर्वत्र॥ज्या कारणास्तव तें स्वगात्र॥प्रेमपात्र सर्वांसी॥ ७४॥
तया शरीराचाही उबग॥रोग वियोग कां विपत्तियोग॥कीं वार्धक्यें करणवर्ग ॥ विकळ व्यंग जालिया ॥ ७५ ॥
शरीराचाही उबग धरी ॥ परी क्षुधेतृषेच्या अवसरीं ॥ प्राणवर्गाचें रक्षण करी ॥ प्रीति भारी प्राणांची ॥ ७६ ॥
त्या प्राणांचें आकर्षण॥करूनि करिती आत्मसाधन॥तो आत्माही द्विविध भिन्न॥जीव आणि परमात्मा ॥ ७७॥
जिवाचिये प्रीतीस्तव ॥ इहलोकींचे विषय सर्व ॥ त्यागूनि इच्छिती दिविवैभव[१] ॥ इंद्रादिदेव हुआवया ॥ ७८ ॥
पुण्यक्षयीं अधःपतन ॥ होतां वृथाचि दिविसाधन ॥ तेव्हां विरक्त होऊनि पूर्ण ॥ आत्मनिर्वाण संपादी ॥ ७९ ॥
परमात्मयाचें अपरोक्ष ज्ञान॥आत्मनिष्ठ ते सभाग्य पूर्ण॥निष्काम स्वधर्म विहिताचरण॥शमदमसंपन्न विरक्त॥८०॥
ऐसे निष्काम स्वधर्मशील॥सांख्यीं योगीं अभ्यासबळ॥लाहोनि सच्चिदानंद केवळ॥लाहती निर्मळ आत्मत्व॥८१॥

---

[१] स्वर्गातील ऐश्वर्य.

तो हा जगत्प्रियतम कृष्ण॥सगुण गोपीप्रियकर प्राण॥त्या प्रियाचें कर्माचरण॥गाती विसरोन जनलज्जा ॥ ८२ ॥
कोमलबाल्यलीलाचरणें ॥ रिंगण निवेश अन्वेषणें ॥ संस्तोभनें[1] आलिंगनें ॥ निरीक्षणें आठविती ॥ ८३ ॥
श्रीकृष्णाची राजस गोडी॥कृष्ण सविलास डोळे मोडी॥कृष्णचुंबनसुखाची घडी ॥करी बापुडी भवस्वर्गा ॥ ८४ ॥
पूतना शकट तृणावर्त ॥ जृंभणमृद्भक्षणवृत्तांत ॥ विश्व दाविलें वदनाआंत ॥ इत्यादि समस्त आठविती ॥ ८५ ॥
यमलार्जुनांचें उन्मूलन॥कृष्णानिमित्त वृंदावन॥सेविलें तेथील लीलाचरण॥निःशंक होऊन त्या गाती ॥ ८६ ॥
वत्सासुराचें निबर्हण[2] ॥ तैसेंचि बकासुरमर्दन ॥ अघासुरा सायुज्यदान ॥ तें आख्यान आठविती ॥ ८७ ॥
धेनुक मर्दिला तालविपिनीं॥कालिय नाथिला यमुनाजीवनीं॥मुखें प्राशिला दावाग्नि॥जळतां वनीं व्रजवासी॥ ८८
भांडीरवनीं प्रलंब वधिला॥मुंजारण्यीं वणवा गिळिला॥प्रावृट्शरत्काळलीला॥विविध क्रीडला तें स्मरती ॥ ८९ ॥
मधुवन तालवन कुमुदवन ॥ बेलभांडीरबहुळवन ॥ ईर्षीकां[3]विपिन कामवन ॥ क्षुद्रवन नीपादि ॥ ९० ॥
बृहद्वन वृंदावन ॥ एवं द्वादशवनक्रीडन ॥ द्वादशोपवनविहार पूर्ण ॥ गोवर्धनादि आठविती ॥ ९१ ॥
धातुगुंजाप्रवाळमिश्र ॥ बर्हप्रसूनें अळंकार ॥ रामकृष्णादि गोपभार ॥ विहारपर त्या स्मरती ॥ ९२ ॥
वेणुवादनें सप्तस्वरीं ॥ अमृतोपम ते रसमाधुरी ॥ प्राणिमात्रां वेध करी ॥ स्मरोनि अंतरीं झुरताती ॥ ९३ ॥
त्रिभंगीं देहुडें ठाण ठकार[4]॥नीलोत्पलदलकोमल गात्र॥सविलास अपांग व्यंकट नेत्र॥ध्यान विचित्र आठविती॥९३ ॥
वेणुवादनें वेधिलीं मनें ॥ तैं जियें मिथां[5] केलीं कथनें ॥ मानस मोहिलें मनमोहनें ॥ अंतःकरणें तें स्मरती ॥ ९५ ॥
कुरवंडूनियां मन्मथकोटी॥कृष्णलावण्य स्मरती पोटीं॥त्याची प्राप्ति व्हावयासाठीं॥भजती गोरटी कात्यायनी॥ ९६ ॥

---

[1] टाळ्या वाजवून उत्तेजन देणें. [2] नाश· [3] कसई या नांवाचें गवताचें अरण्य, [4] मोहक. [5] परस्पर.

तदर्थ व्रतस्था हेमंतीं ॥ प्रातःस्नाना यमुने जाती ॥ कात्यायनी तुष्टली भक्ती ॥ हरि व्रतांतीं भेटला ॥ ९७ ॥
वस्त्रें घेऊनि कदंबावरी ॥ गेला कौतुकें मुरारि ॥ सव्रीड[1] बैसोनि जळांतरीं ॥ विनविला हरि तें स्मरती ॥ ९८ ॥
कृष्णआज्ञा मानूनि साच ॥ नग्न सलज्ज तनुसंकोच ॥ नमस्कारिला चंडवर्चे[2] ॥ निष्प्रपंच निगमात्मा ॥ ९९ ॥
ते काळींचीं मधुरोत्तरें ॥ आश्वासिलें वरदकरें ॥ तें तें स्मरतां अभ्यंरें ॥ नयनीं पाझरे बाष्पांबु ॥ १०० ॥
नंदें करितां वासवमख ॥ कृष्णें निषेधिला तो सदोष ॥ गोवर्धनार्चा[3] क्रतु सम्यक ॥ करितां दुःख अमरेंद्रा ॥
विद्युत्पात वृष्टि वारें ॥ जलोपलादि[4] वर्षतां इंद्रें ॥ तैं गोवर्धन धरिला करें ॥ ऐसीं चरित्रें आठविती ॥ २ ॥
इंद्रें कृष्णा अभिषेक केला ॥ स्नान करितां नंद नेला ॥ कृष्ण वरुणलोका गेला ॥ नंद आणिला तें स्मरती॥ ३
वैकुंठदर्शन गोपांप्रति॥यमुनेमाजि नेऊनि निगुती॥दाविता जाला कमलापति ॥ तें त्या गाती व्रजललना ॥ ४ ॥
गोपीकंदर्पोद्रेक[5] ॥ हृदयीं जाणूनि यदुकुलतिलक ॥ वेणुवादन रासरसिक ॥ वनीं सम्यक आदरितां ॥ ५ ॥
विह्वळ जाल्या बल्लवललना॥विस्मृतप्रपंचकर्माचरणा॥अस्ताव्यस्तवस्त्राभरणा॥गेल्या विजना त्या स्मरती ॥६ ॥
कृष्णें धर्मप्रवृत्तिबोधें॥बोधितां अभीष्टप्राप्तिरोधें॥ह्मणोनि श्रीकृष्णचरणारविंदें॥धरितां मुकुंदें रमविल्या ॥ ७ ॥
ते या सुरतरसिका गोठी॥आठवतां त्या विह्वळ पोटीं॥निर्लज्ज रुदती गाती वोठीं ॥ होती कष्टी हरिविरहें॥ ८ ॥
स्वलावण्या भुलला हरि ॥ ऐसा गर्व अभ्यंतरीं ॥ उठतां अंतरला मुरारि ॥ मग कांतारीं हुडकिती ॥ ९ ॥
तें तें स्मरती अन्वेषण॥पुन्हा पुलिनीं हरियशोगान॥करितां प्रकटला भगवान॥चिद्रसघन तो स्मरती ॥ १० ॥
तया सुखासि नाहीं पार ॥ त्याहूनि रासरससागर ॥ स्वयें जाला नर्तनपर ॥ मंडलाकार मुग्धांसीं ॥ ११ ॥

---

[1] सलज्ज. [2] उग्रतेज ज्याचें तो. [3] गोवर्धनपर्वताची पूजा. [4] गारा. इ० [5] कामातिशय.

स्थळजळक्रीडा व्यवाय[1] विविधा॥तें तें विविच्य स्मरती मुग्धा॥निर्लज्ज रुदती वदती शब्दा॥जनविरुद्धा न स्मरती १२
शंखचूडाचा मौळच्छेद॥स्मरती अरिष्टासुराचा वध॥अक्रूरागमनीं पावल्या खेद॥तदनुवाद त्या गाती ॥ १३ ॥
ऐशीं कैशोरबाल्यकर्में ॥ स्मरता गोपीमानस विरमे ॥ गाती रुदती वदती मर्में ॥ मानुषधर्में सांडवल्या ॥ १४ ॥
विरहावस्थेमाजिवडिया ॥ तत्संकल्पें देती बुडिया ॥ वदती अन्योक्ति सवडिया ॥ सप्रेम वेडिया तद्वेधें ॥ १५ ॥
त्यांचिया व्यंग्योक्तींची[2] परी॥कुरुवरवरिष्ठा अवधारीं॥भ्रमरगीतव्याख्यानकुसरी॥श्रोतीं चतुरीं परिसिजे ॥१६ ॥

काचिन्मधुकरंदृष्ट्वाध्यायन्तीकृष्णसंगमम् ॥ प्रियप्रस्थापितंदूतंकल्पयित्वेदमब्रवीत्॥ ११ ॥

॥टीका॥उद्धवीं देऊनि दौत्यदृष्टि॥भ्रमरमिसें व्यंग्यगोष्टी॥कृष्णसंगम चिंतूनि पोटीं॥बोले गोरटी व्रजललना॥१७
कृष्णसंगम ध्यात असतां॥कोणीएक भ्रमर अवचिता॥देखोनि ह्मणे हा दूत तत्वता॥प्राणप्रियें पाठविला॥१८॥
ममांतरींचा विषयशीण ॥ निरसूनि करावया प्रसन्न ॥ मधुकररूपी दूत कल्पून ॥ बोले वचन तें ऐका ॥ १९ ॥

गोप्युवाच ॥ मधुपकितवबंधोमास्पृशांघ्रिंसपत्न्याःकुचविलुलितमालाकुंकुमश्मश्रुभिर्नः ॥
वहतुमधुपतिस्तन्मानिनीनांप्रसादंयदुसदसिविडंब्यंयस्यदूतस्त्वमीदृक् ॥ १२ ॥

॥टीका॥अरे मधुपा ह्मणे ते वधू॥केवळ कपटियाचा तूं बंधु॥तुझा स्पर्शही निषिद्धु॥आमुचें पद न नमीं तूं ॥२० ॥
माझिये प्रसन्नतेलागूनी॥माथां ठेवूं पाहसी चरणीं॥तरी हे अनर्ह तुमची करणी॥आह्मांलागूनि अश्लाघ्य ॥२१ ॥
किमर्थ अश्लाघ्य ऐसें ह्मणसी॥तरी तूं कृष्णाचा सहवासी॥वनमालेच्या आमोदरसीं॥सदा लुंठसी[3] त्यासरिसा २२

---

[1] मैथुन. [2] वाच्यार्थाहून इतर अर्थांतरांश ज्यांत, त्या. [3] लोळतोस.

कृष्णातुल्य तुझी कांति ॥ हा निश्चय आमुच्या चित्तीं ॥ आजि विपरीत चिह्नावाप्ति ॥ तें मजप्रति जाणविलें ॥
कृष्ण गेला मथुरापुरीं ॥ तेथील नागरा नव सुंदरी ॥ तेहीं भोगिला मुरारि ॥ चातुर्यकुसरीं स्मरलास्यें ॥ २४
कोणें कथिलें तुह्मांपासीं ॥ हें जरी कांहीं आह्मां पुससी ॥ तरी तें तुझिये प्रतीतीसी ॥साक्षी देसी तूं येथें ॥
कैसी साक्ष ह्मणसी जरी ॥ तरी आमुचे सवंतीचिये उरीं॥गाढालिंगन देतां हरि॥माळा माझारी कुचुंबली २६
कुंकुम माखलें संवतीकुचां॥सुमनां लेपलें वनमाळेच्या॥तुवां स्वादितां आमोदा तिच्या॥लोहींवरुंचा[1] स्मश्रूतें २७
तयावरून कळलें आह्मां ॥ कीं तूं कृष्णदूत दौत्यकामा ॥विनवावया आलासि आह्मां॥पादपद्मा नमूं पाहसी॥ २८
तरी तूं आतां तेथेंच जाय ॥ त्या संवतीचे वंदीं पाय ॥ त्याचीच प्रसन्नता होय ॥ त्या उपायें विनवीं कां ॥ २९॥
आमुचे प्रसन्नतेवीण ॥ काय तयासि कारण ॥ जाऊनि त्यांचेचि[2] धरीं चरण ॥ करीं प्रसन्न कृष्णा त्या ॥ ३०॥
कृष्ण त्यांचाचि प्रसाद लाहो॥आणि त्यांचाचि हो कां नाहो॥ यादवसभेचा समुदाय पाहो॥हें लाघव सोंगाचें ३१
सोंग कैसें ह्मणसी जरी ॥ दूत ओळखों आह्मी नारी ॥ मा तो यादवसभाचतुरीं ॥ कैंवि मुरारि नलक्षिजे॥ ३२
माळा रुळती कुचकुंकुमीं ॥ अंजनांक[3] वदनपद्मीं ॥ दशनक्षतीं अधरलक्ष्मी ॥ कीं सभा ललामीं[4] नलक्षिजे ॥३३॥
ऐसें उपहासासि कारण ॥ यादवसभेसि ज्याचें चिह्न ॥ मागें पुढें थोर लहान ॥ वितर्क जन करी ज्याचे॥ ३४
जरी तूं ह्मणसी कृष्णें काय ॥ तुमचा अपकार केला आहे॥तरी कथितों उकलूनि हृदय॥परिसता होयसारंगा

सकृदधरसुधांस्वांमोहिनींपाययित्वासुमनसइवसद्यस्त्यज्यतेऽस्मान्भवादृक् ॥
परिचरतिकथंतत्पादपद्मंतुपद्माह्यपिबतहृतचेताउत्तमश्लोकजल्पैः ॥१३॥

---

१ रक्तिमायुक्तकान्ति. २ कृष्णाचे. ३ काजळाचें चिन्ह. ४ चिन्हांनीं. ५ हे भ्रमरा.

टीका॥जैसियां तैसाचि आवडे॥समानशीळां मैत्र घडे॥तुल्यव्यसना समान कोडें॥आनन जोडे सौहार्द ॥ ३६ ॥
तुजचि सारिखा मुकंद ॥ ह्मणोनि दोघांचा मित्रवाद ॥ कैसा ह्मणसी तरी तूं विशद ॥ ऐक सावध चंचरीकां[1] ॥३७॥
तुवां दुर्मनें सुमनीं रति ॥ धरूनि कार्यापुरती प्रीति ॥ त्यजीसी आमोदसेवनांतीं ॥ पुन्हा परती नकरिसी ॥ ३८ ॥
अन्य सुमनीं जाऊनि रमसी ॥ गुंजारवें तेथेंचि भ्रमसी ॥ पूर्वस्नेहाचिये विषीं ॥ नव्हे मानसीं आठवण ॥ ३९ ॥
मधुपा मधुप तैसाचि हरि ॥ सबाह्य कृष्ण तुझिया परी ॥ आह्मां अधरामृतमाधुरी ॥एके अवसरीं प्राशविली ॥
सप्तस्वरीं वेणुमयी ॥ श्रवणीं पडतां विश्व मोही ॥ तिणें मोहितां देहीं गेहीं ॥ सर्व विषयीं विस्मरण ॥ ४१ ॥
मग त्या अधरसुधेच्या पाना॥भाळोनि आह्मी भरलों राना॥भुलोनि कृष्णाच्या लावण्या॥नाना छळणा साहिलें॥ ४२
वनीं फिरलों पिशाचवत् ॥ विरहें पुलिनीं गाइलें गीत ॥ त्याच्या छंदें केलें नृत्य ॥ अमोघसुरत[2] तें केला ॥ १४३॥
अगाध प्रीति आह्मांचिवरी ॥ प्रेमा वाढला परस्परीं ॥ आतां सांडूनि सुमनापरी ॥ गेला मुरारि तुज ऐसा॥ ४४ ॥
मथुरेचिया नवनागरा ॥ भुलला त्यांच्या स्मरसंगरा ॥ मार[3] आमुच्या करी मारा ॥ हें श्रीधरा कळेचिना ॥४५ ॥
एवढें निष्ठुर ज्याचें चित्त ॥ तो कृतघ्न कृतकार्यार्थ[4] ॥मैंद जैसा होऊनि आप्त ॥ करी घात नैर्घृण्यें ॥ ४६ ॥
अरे द्विरेफा हें आश्चर्य ॥ खेदें आमुचें फुटतें हृदय ॥ ऐसियाचेही सेविते पाय ॥ पद्मा काय ह्मणोनियां ॥४७॥
तोही कळला आह्मांसि भाव ॥ उतमश्लोक हें ऐकोनि नांव ॥ बहुतेक तिचा भुलला जीव ॥ महानुभावयशःकथनें ४८
उत्तमश्लोक पुण्यश्लोक ॥ अभेद अव्यय विश्वव्यापक ॥ आनंदकंद जगत्पालक ॥ हा स्तवनचोक श्री भुलवी ॥४९

---

[1] हे भ्रमरा. [2] सफल सुरत ज्याचें तो. [3] मदन. [4] ज्याचें कार्य झालें तो.

रमा भुलली लटिक्या कथा ॥ हा जरी सर्वांतरात्मा असता ॥ तरी आमुची विरहव्यथा॥स्वयें नेणता निज हृदयीं॥ ५०
रमा अविचक्षण बापुडी ॥ कीर्ति ऐकोनि जाली वेडी ॥ नेणे याच्या कापट्यखोडी ॥ दिधली बुडी दृढ चरणीं ॥ ५१ ॥
तैशा नहों आह्मी ललना ॥ तत्कापट्यचर्याभिज्ञा ॥ पुन्हा नभुलों त्या कृतघ्ना ॥ वृथा वल्गना कां करिसी ॥ ५२ ॥

किमिहबहुषडंघ्रेगायसित्वंयदूनामधिपतिमगृहणामग्रतोनःपुराणम् ॥
विजयसखसखीनांगीयतांतत्प्रसंगःक्षपितकुचरुजस्तेकल्पयंतीष्टमिष्टाः ॥ १४ ॥

॥टीका॥शुक ह्मणे गा कुरुपाळका॥स्वभावें गुंजतां चंचरीका॥तें ऐकोनि कृतवितर्का॥व्रजनायिका बोलती॥५३॥
आमुचें मोहरावया मन ॥ भ्रमर गातसे कृष्णगुण ॥ ऐसा वित्तर्क मनीं कल्पून ॥ बोलती वचन मधुपेंसीं ॥ ५४ ॥
अरे भ्रमर किमर्थ येथ ॥ बहुधा गासी यदुवरनाथ ॥ आह्मांसि त्याचे गुण समस्त ॥ पूर्वींच विदित कविवदनें ॥५५ ॥
आह्मांपुढें त्याची कथा ॥ तूं गासील तितुकी वृथा ॥ आह्मी जाणतों त्याचिया चरिता ॥ पूर्ववृत्तांता मुळींहुनी ॥५६ ॥
अगृहाण जे अपरिग्रही[1] ॥ परमहंसादि वेषें पाहीं ॥ ज्यातें बहुधा कवळिती हृदयीं ॥ निर्लज्जदेहीं सर्वदा ॥ ५७ ॥
पूर्वीं बहुतीं अनुभविला ॥ पुराणपुरुष हा दादुला ॥ वृथा त्या गुणगणमाळा ॥ नरुचे आह्मांला तव वदनें॥ ५८ ॥
श्रीकृष्ण जो विजयसखा ॥ मथुरेचिया ललना सुमुखा ॥ सांप्रत त्याचिया जाल्या सख्या ॥ तूं या कौतुका गा तेथें॥५९
प्रस्तुत त्या प्रियतम त्यासी ॥ तयांपुढें तूं तद्यश गासी ॥ हरिइष्टा त्या अभीष्टासी ॥ श्रवणतोषीं तुज देती ॥ ६० ॥
ह्मणसी कैशा त्या हरिइष्टा ॥ हृदयीं कवळूनियां वैकुंठा ॥ क्षपिती कुचामया[2] दुष्टा ॥ रतिसंतुष्टा हरिसंगें ॥ ६१ ॥

---

१ विरक्त. २ स्तानांची पीडा.

तोही रंगला त्यांचेनि रंगीं ॥ भजलीं परस्परें अंगांगीं ॥ तव गायनें तत्प्रसंगीं ॥ वोपिती शुभांगी अभीष्टा॥ ६२॥
जरी तूं ह्मणसी अवो माय ॥ ऐसें बोलणें उदास काय॥ तुह्मांसि स्मरोनि कृष्णहृदय॥ व्याकुळ होय स्मरतापें॥६३॥
तेणें स्वमुखें आज्ञावचनीं ॥ तुह्मांसि विनवावयालागुनी ॥ मज धाडिलें वृंदावनीं ॥ ऐसें वदनीं जरी वदसी ॥६४॥
तरी ऐकें रे अळिउळतिळका[1]॥ कृष्ण आह्मांसि आहे ठाउका॥त्या दुर्लभ तिहीं लोकां॥माजि नायिका कवण असे॥६५

दिविभुविचरसायांकाःस्त्रियस्तद्दुरापाःकपटरुचिरहासभ्रूविजृंभस्ययाःस्युः॥
चरणरजउपास्तेयस्यभूतिर्वयंकाअपिचकृपणपक्षेह्युत्तमश्लोकशब्दः ॥१९॥

॥टीका॥स्वर्गमृत्युपाताळभुवनीं ॥ दुष्प्राप वनिता त्यालागुनी ॥ ऐसी नलक्षे आमुच्या नयनीं ॥काय ह्मणोनि तें ऐका
॥ ६६ ॥पद्मफुल्लार वदनकमळ ॥ वाचा चंदनाहूनि शीतळ॥हृदयीं कर्तरी कातर कुटिळ॥हें चिह्नें केवळ धूर्ताचीं६७
जळीं गळातें गिळी मासा ॥ लोभें भाळूनि बडिशामिषा[2] ॥ मग मत्स्यघ्न वोपी क्लेशा ॥ पंचत्वदपशापर्यंत ॥ ६८॥
कीं अंडजां[3] टाकुनि कण ॥ निषादें विश्वासें करी हनन ॥ तैसाचि कितव कामिनीगण॥भुलवी वेधून स्मितवक्रें॥६९ ॥
कपटरूप रुचिरहास ॥ व्यंकट कटाक्ष पैं सविलास ॥ लावण्यरसिका इंगितास ॥ दावूनि वनितांस वश करी॥ १७९ ॥
हे तों प्रतीत आमुच्या देहीं ॥ आणिकांसि पुसणें काई ॥ रमा मोहिली या उपायीं ॥ तेथ पाड काई इतरांचा॥ ७१ ॥
बापुडी नेणे याचिया कपटा ॥ विश्वमोहीनी भुलली नटा ॥ चरण उपासी धरूनि निष्ठा ॥ तेथ आह्मी रानटा केउतिया
अरे कपट्या चंचरीका ॥ पूर्ण कपटियाच्या सेवका ॥ जाऊनि बोधीं निजनायका ॥ नामविवेका विवरोनी ॥ ७३ ॥

---

१ भ्रमरश्रेष्ठा. २ गळाच्या मांसाला. ३ पक्ष्यांना. ४ पारधी.

यद्यपि ऐसा जऱ्ही कितव ॥ तथापि उत्तमश्लोक नांव ॥ वागवी त्याचा अभिप्राव ॥ कां पां स्वयें विवरीना ॥ ७४ ॥
कृपणा दीनावरी अनुकंपा ॥ जैसी माउली कळवळी स्तनपा ॥ तैसा सदय पुरुष तोचि मधुपा ॥ उत्तमश्लोक बोलावा ७५
मधुपा जाऊनि कृष्णापासीं ॥ प्रकट गोष्टी बोलें ऐसी ॥ जे उत्तम अभिधानासी ॥ कळंक नलवीं कापट्यें ॥ ७६ ॥
इंदिरादि[1] आह्मी ललना ॥ भुललों उत्तमश्लोकाभिधाना ॥ आतां याचिया कितवपणा ॥ जालों अभिज्ञा[2] विरमोनी ७७
उत्तमश्लोकनामत्रपा ॥ धरूनि कांहीं पूर्व कृपा ॥ अभिवर्द्धवीं ऐसें मधुपा ॥ कंदर्पबापाप्रति बोलें ॥ ७८ ॥ ऐशा
वितर्कें विरहिणी ॥ भ्रमराप्रति बोलतां वचनीं ॥ तंव तो पादांगुष्ठाहुनी ॥ पुढें सरकोनि पातला ॥ ७९ ॥
इतुक्यावरूनि विशेष तर्का ॥ करिती जाली व्रजनायिका ॥ तें तूं ऐकें कुरुवरतिलका ॥ हरिगुणरसिका श्रवणज्ञा ॥ ८०

विसृजशिरसिपादंवेद्म्यहंचाटुकारैरनुनयविदुषस्तेऽभ्येत्यदौत्यैर्मुकुंदात् ॥
स्वकृतइहविसृष्टापत्यपत्यन्यलोकाव्यसृजदकृतचेताःकिन्नुसंधेयमस्मिन् ॥ १६ ॥

॥टीका॥ क्षमापनार्थ पुढें पुढें ॥ रिघोनि चरण धरिसी चाडे ॥ येणें आमुचें प्रसादन नघडे ॥ वाक्य रोकडें हें मानीं ॥
पद विसर्जूनि परता सर ॥ कासया चरणीं ठेविसी शिर ॥ आह्मी जाणतों तवांतर ॥ तूं तत्पर स्वकार्या ॥ ८२ ॥
निर्भर्त्सितां नवचसी मागें ॥ हें लाघव तुजचि जोगें ॥ प्रसादनाचीं जितुकीं आंगें ॥ तें तें श्रीरंगें तुज कथिलीं ॥ ८३ ॥
यालागीं तूं प्रार्थनाचतुर ॥ निर्भर्त्सितांही स्वकार्यपर ॥ विनयभावें होसी नम्र ॥ हेंही समग्र जाणतसों ॥ ८४ ॥
मुकुंदापासूनि आलासि येथें ॥ तेणें दौत्य[3] शिक्षिलें तूतें ॥ तदनुसार तूं आह्मांतें ॥ निज इंगितें प्रकटिसी ॥ ८५ ॥
चाटु चटुला रसिका वाणी ॥ सलगी करूनि धरिजे पाणि ॥ निर्भर्त्सितां लागिजे चरणीं ॥ हे शिकवणी पैं त्याची

---

[1] लक्ष्मी इ०. [2] जाणणाऱ्या. [3] दूतकर्म.

अनुनयविदुषा[1] तच्छिक्षिता ॥ यालागीं तुझा विश्वास चित्ता ॥ नुपजे तद्वत करिसी घाता॥यावृत्तांता शंकतसों ८७
ह्मणसी तुमचा अपराध काय ॥ करूनि गेला यादवराय ॥ तरी हा ऐकें अभिप्राय ॥ उकलूं हृदय तुजपुढें ॥८८
अधरमाधुरी वेणुमयी ॥ श्रवणें प्रासिली जिये समयीं ॥तेव्हांचि वेध लावूनि हृदयीं॥प्रपंचविषयीं स्मृति हिरिली
मग हा एकचि आवडला ॥ जीवभाव यासीच जडला ॥ इंद्रियग्राम उद्वस पडला ॥ तेणें विघडला संसार ॥९०
येणेंवेधूनि निजात्मवेधें ॥ प्रपंच भंगिला प्रवृत्तिरोधें ॥ आह्मी भाळलों सुरतानंदें ॥शेखीं मुकुंदें विसर्जिलें ॥
पति अपत्यें जननी जनक ॥ स्वजन सोयरे आप्तलोक ॥ इष्ट मित्र गोत्र अशेख ॥ त्यजिलीं सम्यक मदर्थ॥९२
मजकारणें इहामुत्र ॥ त्यागूनि जालिया एकाग्र ॥ ऐसें जाणोनियां यदुवीर ॥ जाला निष्ठुर कृतघ्नवत् ॥ ९३ ॥
यालागीं तो अनियतचित्त ॥ ह्मणतां संदेह असे येथ ॥ ऐसींचि कर्में असंख्यात ॥ स्मरती हृदयांत तें ऐक ॥९४

मृगयुरिवकपींद्रंविव्यधेलुब्धधर्मास्त्रियमकृतविरूपांस्त्रीजितःकामयानाम् ॥
बलिमपिबलिमत्त्वाऽवेष्टयद्ध्वांक्षवद्यस्तदलमसितसख्यैर्दुस्त्यजस्तत्कथार्थः ॥ १७ ॥

॥टीका॥अरे भ्रमरा निश्चयें जाण ॥ पूर्वींच कृष्णाचें कर्माचरण ॥ हृदयामाजी अनुस्मरण ॥ होतां दारुण भय वाटे
पूर्वीं येणें राघवरूपें ॥ केलीं क्रूरकर्में अमूपें ॥ मधुपा ऐक सांगों तुजपें ॥ नमनीं सोपें स्नेह याचें॥९६॥ लुब्धें[2]-
कापरी लपोनि येणें ॥ वाळी कपींद्र घेतला प्राणें ॥ वृथा क्रूर हा कार्याविणें ॥ अंतःकरणें द्रवेना ॥ ९७ ॥
पारधी मांसभक्षणासाठीं ॥ लपोनि मृगातें वधी कपटी ॥ वाळी मारोनि कोण ते गोष्टी ॥ येणें शेवटीं साधिली
ऐसा वृथाचि निर्दय क्रूर ॥ कपटी कृतघ्न हा निष्ठुर ॥ कळों नेदी निजांतर ॥ परम कातर कितवेंद्र ॥९९ ॥

---

१ प्रसन्न करण्याची कला जाणणारा. २ पारधी.

स्त्रिया लेंकुरें याचीं रडती॥ऐसा कळवळा नधरी चित्ती॥लपोनि मारिला बानरपति॥कोण संपत्ति जडियली२००
कोण सुकृत कीं यश कीर्ति ॥ याची कीजे केंवि संगति ॥ स्मरतां ऐसी पूर्वस्थिति ॥ रोमांच येती सर्वांगा ॥
आणिक याची ऐकें गोठी ॥ सीता हरविली पंचवटी ॥ तिच्या विरहें फिरतां सृष्टी ॥ नमनी पोटीं शुभाशुभ॥
सीता परतंत्र केवळ ॥ स्त्रीजितपणाचें दावी शील ॥ आत्माराम हा शब्द विकळ॥ हृदय कुटिळ नैर्घृण्यें ॥ ३
कामसंप्राप्तिसाधनपरा ॥ येणें प्रेरूनि सहोदरा ॥ विटंबिली सकाम दारा ॥ सघ्राणश्रोत्रा छेदूनी ॥ ४ ॥
शूर्पणखा ते राक्षसवनिता ॥ विटंबिली स्मर याचितां ॥ ऐसीं याचीं कर्मे स्मरतां॥उपजे चित्ता घोर भय॥५ ॥
याहूनि पूर्वीं वामनरूपें ॥ साक्षर देखोनियां साक्षेपें ॥ शुक्रें वर्जितांही बळिनृपें ॥ विविधा कल्पें समार्चिला६॥
त्याचा सेवूनि दत्त बळी ॥ त्रिपादभूदानाच्या छळीं[1] ॥ बलात्कारें बांधोनि बळी॥ मग पाताळीं घातला ॥ ७ ॥
विष्टपापासोनि[2] अधोगति ॥ केली सुतळलोकावाप्ति ॥ अगाध त्याची प्रतापशक्ति॥तेणें द्वास्थीं प्रतिष्ठिला॥ ८॥
इत्यादि कर्में पुरातनें ॥ याचीं होतां अनुस्मरणें॥ आंत बाहिर काळा मनें ॥ त्यातें सौजन्यें नभजों रे॥ ९ ॥
तथापि मधुपा ऐसें ह्मणसी॥विरहें गातां कां दिननिशी॥आह्मी नाठवूं जर्‍ही त्यासी॥तद्गुण आह्मांसि बळें स्मरती
पिसें उमजोनि पिसेपणा ॥ सांडूनि धरूं पाहे स्मरणा ॥ परी ते दुस्त्यज भ्रांति करणा॥ भुलवूनि मना बरळवी॥
तेंवि तत्कथारूप अर्थ ॥ दुस्त्यज मानसा तद्गत स्वार्थ ॥ येणें बुडविला उभय स्वार्थ ॥ वृथा किमर्थ प्रार्थिसी॥ १२
जर्‍ही आमुच्या कळलें चिता॥त्रिवर्गाची सफळित लता॥उपडोनि सांडीं याची कथा॥तथापि समर्था नहों त्यागीं
ऐसियासि कीजे काय ॥ भ्रमरा सांगें कांहीं उपाय ॥ विरहिणीचा पाड काय॥विदुषसमुदाय भ्रमग्रस्त ॥ १४ ॥

---

[1] कपटानें. [2] पृथ्वीपासून.

यदनुचरितलीलाकर्णपीयूषविप्रुट्सकृददनविधूतद्वंद्वधर्माविनष्टाः ॥
सपदिगृहकुटुंबंदीनमुत्सृज्यदीनाबहवइहविहंगाभिक्षुचर्यांचरंति ॥ १८ ॥

॥टीका॥ ज्या हरीचीं अवतारचरितें ॥ अनुस्मरतां त्या लीला चितें ॥ श्रवणामृतें सेवितयांतें॥ अगाध सुकृतें तो लाभ ॥ १५ ॥ लीलाश्रवणसुधेची कणिका ॥एकवारही सेवितां रसिका ॥ द्वंद्वधर्मादि कळिमळपंका ॥ धुनी होय तत्काळ ॥ १६ ॥ सूर्योदयीं निरसे तम॥ कीं स्पर्शमणीच्या संगें हेम॥सांडी लोहकाळिमा नाम॥द्वंद्वधर्म तेंवि हरती॥ लीलाश्रवणामृतकणिकापान ॥ करितां निर्द्वंद्व होती सुज्ञ ॥ अतएव विनष्ट त्या अभिधान॥ नष्टांसमान नैष्ठुर्यें ॥ नष्टांसमान ह्मणाल कैसे ॥ कुटुंब पावतां दीनदशे ॥ कृपेनें न द्रवती मानसें ॥ तद्दुःखलेशें झळंबोनी ॥ १९ ॥ निर्दय ह्मणोनि असत्तुल्य ॥ येऱ्हवीं केवळ वैराग्यशीळ ॥ स्वप्नाभास प्रपंच टवाळ॥कुटुंब सकळ त्यासि गमे॥ स्वयें कुटुंबाचिया विघडें ॥ अन्नवसनांचें सांकडें ॥ भोगविहीन जैसें मडें ॥ तैसें कोरडें तनुचर्म ॥ २१ ॥ त्यांसि धरावया डाहाळी ॥ ना बैसावयासि साउली ॥ दीनें बापुडीं भणगें केलीं ॥ लीलाश्रवणें याचेनी॥ २२ विहंग भ्रमती नभोमंडळीं ॥ नभ त्याभवतें वरतें तळीं ॥तैसी जयासि सर्वकाळीं ॥हरिवेगळी अकिंचनता ॥ प्राणप्रवृत्तीलागिं द्रुमा ॥ टाकूनि जाणें विहंगमा ॥ तेंवि क्षुत्तृड्भयोपशमा ॥ भिक्षुधर्मा[2] अनुसरणें ॥ २४ ॥ ज्याचेनि लिलाश्रवणमात्रें ॥ भ्रमती ऐसीं विज्ञानपात्रें ॥ ऐसें कळतां आह्मी श्रोत्रें॥ऐकोनि वक्त्रें गातसों॥ २५ निर्दय[1] कृतघ्न तापकर ॥ प्रत्यक्ष कळतांही अंगार ॥ होऊं न शकती जन निष्ठुर ॥होती सादर तत्संगा॥ २६ ॥

---

१ दुष्ट. २ परमहंसगुणाला.

तैसें लीलालावक याचें ॥ प्रत्यक्ष भ्रमकर कळतां साचें ॥ त्यागूं नशकों हें तयाचें ॥ योगसत्तासामर्थ्य ॥ २७ ॥
दुस्त्यज याचें लीलाश्रवण ॥ ह्मणोनि भ्रमती होऊनि दीन ॥त्यागूं शकते जरी सज्जन॥तरी संपन्न ते असते२८
लीलादुस्त्यजत्व निंदून ॥ ऐसें वदलें बल्लवीवदन ॥ तें हें केलें निरूपण ॥ परमार्थकथन तें ऐका ॥ २९ ॥
हरिचरितामृतलीलाकणिका ॥ श्रवणदुर्लभ ब्रह्मादिकां ॥ सुकृती लाहती नफवे आणिकां॥जेंवि वणिकां नृपपदवी
लीलाकणिकामृतरसपानें ॥ एकवारही मातले मनें॥तत्काळ द्वंद्वधर्मादि वृजिनें ॥ जालीं भग्नें निःशेष॥ ३१ ॥
निर्ममनिर्द्वंद्व निरंतर ॥ तत्काळ कुटुंबगृहपरिवार ॥ त्यजिती मानूनि स्वप्नाकार॥तुच्छ निःसार फळकट जें॥३२
धीर ह्मणिजे व्यवसितमति[1] ॥दीन ह्मणिजे अकिंचन वृत्ति ॥ अपरिग्रहीं[2] अनिकेतस्थिति ॥ बहुधा भ्रमती परमहंस
विहंगमांमाजि हंसवर ॥ कां जे निवडिती क्षीरनीर ॥ तैसे सारासारविचारचतुर ॥ हंसांसमान परमहंस॥३४॥
सारासारविवेकज्ञानें ॥ असारप्रपंचा सांडणें ॥ सारामृततत्व अपरोक्षपणें ॥ लीलाश्रवणें पावले ॥ ३५ ॥ यांसि
दुस्त्यज तत्कथार्थ ॥ त्यांचा हाचि परम पुरुषार्थ ॥ हा त्यागूनि कोण तो स्वार्थ ॥ भवअनर्थ जोडावा॥३६ ॥
भ्रमरा तूं जरी बोलसी ऐसें ॥ पूर्वीं एकांतीं हृषीकेशें ॥ काय हेंचि कथिलें नसे ॥निश्चय वसे तुजपासीं॥३७॥
तरी येविषीं ऐकें मात ॥ आह्मी मानूनि वचन सत्य ॥ नेणों कपटाचा वृत्तांत॥विश्वासघातकारक जो॥ ३८ ॥

वयमृतमिवजिह्मव्याहृतंश्रद्दधानाकुलिकरुतमिवाज्ञाःकृष्णवध्वोहरिण्यः ॥
ददृशुरसकृदेतत्तन्नखस्पर्शतीव्रस्मररुजउपमंत्रिन्भण्यतामन्यवार्त्ता ॥१९ ॥

---

१ निश्चयात्मकबुद्धि ज्यांची ते. २ गृहादिपरिवाररहित.

॥टीका॥अरे उपमंत्री[१] दौत्यचतुरा॥नवदें तद्वार्ताउत्तरा॥ज्या कारणास्तव त्या विचारा॥ऐकें विचारा सांगतसों॥
कुलिकें[२] ह्मणिजे मृगयानिरत॥कपटें गाऊनि गोरीगीतें[३]॥कृष्ण[४]मृगांगना कापट्यरहित॥मानिती सत्य श्रवणसुधा॥४०
नेणती निषादत्द्दयींच्या कपटा॥सत्य मानूनि धरिती निष्ठा॥तंव अकस्मात देखती कष्टा॥बाणीं वोखटा विंधी तें४१
मग त्या सक्षतहृदया वनीं॥दुःखें भोगिती कुरंगिणी ॥याचिप्रकारें आह्मी विरहिणी॥विश्वासोनि दुखावलों॥ ४२
जिह्म ह्मणिजे जो कुटिल कृष्ण॥सत्य मानूनि तद्भाषण ॥ आह्मी विश्वासलों पूर्ण ॥ स्पृहा धरून तद्रसा॥ ४३ ॥
पारधियाच्या गायनापरि ॥ सत्य मानूनि अभ्यंतरीं ॥ विश्वासलों कुरंगनेत्री ॥ कपटकातरी नेणोनी॥ ४४ ॥
तंव निषादें कपटमारें ॥ हरिणी विंधिल्या क्रूरशरें ॥ तैसेंचि आह्मांसि केलें येरें ॥ मधुरोत्तरें भुलवूनी ॥ ४५ ॥
विश्वासतांचि सुखसंगमा ॥ नखखरक्षतें उरोजपद्मा ॥ करूनि प्रदीप्त केलें कामा ॥पावलों भ्रमा स्मररुग्णा[५]४६
कंदर्पबाणांच्या वेदना ॥ निषादबाणापरिस कठिना ॥ यास्तव नकरीं तद्गुणकथना ॥ अन्यवार्ता वद बदनें॥४७॥
ऐसें ह्मणोनि निष्ठुर चित्तें ॥ भ्रमरा झाडूनि टाकिलें हातें ॥उडोनि गेला मथुरापंथें॥ पुढती तेथेंचि पातला४८॥
त्यातें देखोनि वदती काय ॥ तो गोपींचा अभिप्राय ॥ परिसावया सावध होय॥ह्मणे मुनिवर्य कुरुनाथा ॥ ४९ ॥

प्रियसखपुनरागाःप्रेयसाप्रेषितःकिंवरयकिमनुरुंधेमाननीयोऽसिमेंऽग ॥
नयसिकथमिहास्मान्दुस्त्यजद्वंद्वपार्श्वंसततमुरसिसौम्यश्रीर्वधूःसाकमास्ते ॥ २० ॥

॥टीका॥मधुपें जाऊनि मधुपापासीं॥आमुची अवस्था सांगूनि त्यासी॥पुढती आमुतें न्यावयासी॥तत्प्रेषित पातला

---

१ हे दूता. २ पारधी. ३ फांसेपारध्याचें गायन. ४ काळवीट. ५ कामरोगपीडित.

यया भावना त्या भ्रमरातें ॥बोलती विरहाकुलितचित्तें ॥ प्राणप्रियाच्या सखया येथें ॥ कीं तेणें तूतें पाठविलें ॥५१॥
आमुचा प्रियतम जो मुरारि ॥ तेणें द्रवोनि अभ्यंतरीं ॥ तुज पाठविलें झडकरी ॥ कोणा विचारीं आलासी ॥ ५२ ॥
कोमळ संबोधनें अंग ॥ ह्मणती भ्रमरा वृत्तांत सांग ॥ आह्मांसि मान्य तूं परम योग्य ॥ काय श्रीरंग तुज वदला५३
कोणे प्राप्तीची इच्छा पोटीं ॥ ते तूं निःशंक सांगें गोठी ॥ ऐशा सम्मानें पावल्या तुष्टि ॥पुन्हा वाक्पुटीं त्या वदती५४
त्या[1]पैं आह्मांसि नेसी काय ॥ तरी तूं ऐकें अभिप्राय॥ आह्मी नसांडितां आपुले ठाय।परी दुस्त्यज होय तन्मिथुन५५
त्याचा द्वंद्वीभाव हृदयीं ॥ आह्मां दुस्त्यज बैसले ठायीं ॥ ऐसियाचे पार्श्व[2]सोयी ॥ कोण्या उपायीं तूं नेसी॥ ५६॥
दुरी असतां द्वंद्वचिंतन ॥ दुस्त्यज त्यागूं नशके मन ॥ मा समीप नेलिया पुढती जाण॥ गेलिया प्राण नटाकवे॥५७॥
ह्मणसी लौकिकीं स्त्रियांचा संग ॥ करूं नशके मेघरंग ॥ तरी श्रीनामका वधू चांग ॥ वसवी सांग निज हृदयीं॥५८ ॥
श्रीसहवास निरंतरी ॥ न लजे धरितां हृदयावरी ॥ त्याचे पार्श्वीं आह्मी नारी ॥ कवणे प्रकारीं नशोभों ॥ ५९ ॥
ऐसिया बोलोनि व्यंग्योक्ति॥ तेणें प्रसन्न केली मति ॥ ऐसें भावूनि आपुल्या चित्तीं ॥ सप्रेम पुसती हरिवृत्त॥६० ॥
सौम्य ह्मणिजे विषादरहित ॥ आमुच्या प्राणप्रियाचा दूत ॥ साधु[3] जाणसी दौत्यकृत्य॥मान्य संमत तूं आह्मां॥६१॥
बत या अव्ययाचा अर्थ ॥ गोपीमानस संतोषभरित ॥ अपि ह्मणिजे कांहीं हेत ॥धरूनि स्मरत हरि आह्मां॥ ६२ ॥
तोचि वृत्तांत सविस्तर ॥ सौम्यनामें बोधूनि भ्रमर ॥ गोपी पुसती तो विचार ॥ श्लोकाधारें परियेसा ॥ ६३ ॥

अपिबतमधुपुर्यामार्यपुत्रोऽधुनाऽऽस्तेस्मरतिसपितृगेहान्सौम्यबंधूंश्चगोपान् ॥

---

[1] त्यापाशीं. [2] समीपमार्गीं. [3] चागलें.

क्वचिदपिसकथानःकिंकरीणांगृणीतेभुजमगुरुसुगंधंमूध्न्यर्धास्यत्कदानु ॥२१॥

॥टीका॥अरे सौम्या भ्रमरवर्या॥सारूनि गुरुकुळींची परिचर्या॥आतां वसति वृष्णिधुर्या॥मथुरापुरीं असे कीं ६४
मथुरापुरीं वर्तमान ॥ आर्यपुत्रें[1] वसुदेवनंदन ॥ कांहीं तरी नंदसदन ॥ व्रजजनभुवन स्मरतसे॥६५ ॥
नंदयशोदेचें स्मरण ॥ कीं स्वबंधु गोपगण ॥ यमुनापुलिनीं गोवर्द्धन ॥ करी आठवण कधीं तऱ्ही ॥ ६६ ॥
कोण्हे एके तऱ्ही समयीं ॥ आह्मां किंकरींची कांहीं ॥ कथावार्ता आपुले ठायीं ॥ वदतो कांहीं कोणापें ॥६७ ॥
कधीं तऱ्ही परावृत्ति ॥ करूनि येईल व्रजाप्रति ॥ पूर्वस्नेहाची अनुस्मृति ॥आह्मां विश्रांति करील ॥ ६८ ॥
अगुरुपरीस सुगंधतर ॥ आपुला भुज सुमनोहर ॥ आमुचे मूर्ध्नीवरी सादर ॥ कधीं श्रीधर ठेवील कीं ॥ ६९ ॥
आपुले तांबूल आमुचे वदनीं॥ केव्हां तऱ्ही तो चक्रपाणि ॥घालील ऐसी अमृतवाणी॥ आमुचे कानीं घालीं कां ७०

॥ श्रीशुकउवाच॥ ॥अथोद्धवोनिशम्यैवंकृष्णदर्शनलालसाः॥सांत्वयन्प्रियसंदेशैर्गोपीरिदमभाषत॥२२

॥टीका॥कायवाचामनोभावें ॥कृष्णदर्शन प्राप्त हुआवें॥याहूनि अवघे संसारमावे॥ माजूनि मानिनी निर्मुक्ता॥७१
ऐसा गोपींचा भ्रमरगीत ॥ उद्धवें परिसोनि इत्थंभूत ॥ त्यांचा सप्रेम वृत्तांत ॥ कृष्णीं निरत जाणवला ॥ ७२ ॥
कृष्णवेधें वेधल्या वृत्ति॥तेणें विसरल्या संसारभ्रांति ॥ सबाह्य बाणली कृष्णप्रतीति॥उद्धवा चित्तीं दृढ कळलें॥७३॥
मग तयांच्या सांत्वनासी॥ उद्धवें विवरूनि निजमानसीं ॥ बोलिला तें नृपापासीं॥ अह्लादेंसीं शुक सांगे ॥७४ ॥
कठोवरज्रमणीचें आंग ॥ वेधक वज्रशलाकाचि चांग ॥ तैसा कृष्णवेधें प्रसंग ॥ सांत्वना योग्य कृष्णोक्ति ॥७५ ॥

---

[1] स्त्रिया पतीस आर्यपुत्र ह्मणत असत.

कृष्ण गोपींचा प्रियतम प्राण ॥ त्याचे संदेश परम प्रमाण॥ ऐसें उद्धवें विवरूनि पूर्ण ॥ हें भाषण आदरिलें ॥ ७६ ॥
सहा श्लोकीं तें निरूपण ॥ शुकें नृपासि कथिलें पूर्ण ॥ तेंचि हरिवरदभाषाकथन ॥ कीजे श्रवण सज्जनीं ॥ ७७ ॥

॥ उद्धवउवाच ॥ ॥ अहोयूयंस्मपूर्णार्थाभवत्योलोकपूजिताः॥ वासुदेवेभगवतियासामित्यर्पितंमनः २३

॥टीका॥ अहो ऐसें आश्चर्य परम॥ तुमचें मानस मेघश्याम॥ होऊनि विसरलें संसारश्रम॥ प्रेमसंभ्रम सौभाग्यें॥ ७८॥
तुमच्या वृत्ति कृष्णाकारा॥ यास्तव कृतार्था प्रेमनिर्भरा ॥ लोकपूज्या सनकादिवरां॥ तुह्मी विधिहरां पूज्यतमा॥ ७९॥
विश्वनिवास वासुदेव ॥ तोचि लीलावसुदेवप्रभव ॥ षड्गुणैश्वर्य अच्युतविभव ॥ तुमचा सद्भावतच्चरणीं॥ ८०॥
यालागीं तुह्मी परम पूता॥ ब्रह्मादिदेवां आस्पदभूता[1] ॥ पूज्या पूज्यतमा पूर्णार्था ॥ सत्संमता हरिप्रेमें ॥ ८१ ॥
ते हे आत्यंतिकी[2] भक्ति ॥ परम दुर्लभ जिची प्राप्ति ॥ आकल्प साधनचीं संपत्ति॥ तें लाहती तुह्मां ऐसे ॥ ८२ ॥
म्हणाल कैसीं तियें साधनें ॥ ऐका तयांचीं स्वरूपज्ञानें ॥ भाग्यें फळती अविघ्न पुण्यें॥ निर्वाणभजनें ऐसीं तें॥ ८३ ॥

दानव्रततपोहोमजपस्वाध्यायसंयमैः ॥ श्रेयोभिर्विविधैश्चान्यैःकृष्णेभक्तिर्हिसाध्यते ॥ २४॥

॥टीका॥ दानें व्रतें तपें तीव्र ॥ नित्य नैमित्त होमाध्वर ॥ स्वाध्याय[3]जपादि संयमपर ॥ शौचाचारपूर्वक॥ ८४ ॥
नवविधभजन निष्ठा नेम ॥ तीर्थयात्रा अनुक्रम ॥ माता पिता द्विजसत्तम ॥ गुरुपदप्रेम उपासना ॥ ८५ ॥
इत्यादिसाधनें श्रेयस्करें ॥ निष्काम भगवत्प्राप्तिकरें ॥ भूतदयादि विविधें अपरें ॥ पुण्यप्रचुरें बहु जन्मीं॥ ८६॥
इहामुत्रप्रदें साधनें ॥ तें फळ साक्षेपें काम्यें गौणें ॥ निषिद्धें आसुरें अशौचाचरणें॥ नरकयातने भोगविती॥ ८७ ॥

---

[1] पूज्यस्थानीं झालेल्या. [2] दृढ. [3] ईश्वरप्रीत्यर्थ वेदाध्ययन.

भगवत्प्राप्तिकरें पुण्यें ॥ फळती निष्कामें साधनें ॥ ऐका तयांचीं लक्षणें ॥ पद्व्याख्यानें कथिजती॥ ८८ ॥
जें जें दातव्य त्या नांव दान ॥ तेथील शुद्ध विधि विधान ॥ निगमपरायण तपस्वी पूर्ण ॥ दानभाजन शुद्धात्मा ॥
प्रत्युपकरणाचिया शब्दा ॥ नकरी प्रस्ताव अनुमोदा ॥ कायावाचामानसें कदा ॥ खेदानंदा स्पर्शेना॥ ९० ॥
दानपात्र लाहोनि ऐसें ॥ चित्तशुद्धि देशविशेषें ॥ पुण्यकाळीं ईश्वरोद्देशें ॥ दानें अशेषें निष्कामें ॥ ९१ ॥संपत्तिसंपन्न असतां पूर्ण ॥ यथोक्तपात्रीं नित्यदान ॥ नैमित्तिकीं विशेषें करून ॥ कीं याच्यमान सत्पात्रें ॥ ९२॥
लाहूनि निर्दोष द्रव्यसंपत्ति ॥ भगवद्भावें सप्रेम भक्ति ॥ पात्रगौरव यथास्थिती ॥सत्कार उचितीं समर्पण॥९३
दानशब्दाचा विवेक ॥ दान ह्मणिजे मदोदक ॥ तें अष्टधा पृथक पृथक॥ संकल्पपूर्वक सोडणें॥९४॥स्वसत्तेतें
निवर्तवणें[2] ॥ पात्रसत्ता उत्पादनें ॥ इदं ते नमम इत्यादि वचनें ॥ प्रतिगृह्यतां गृह्णामि ॥ ९५ ॥ वेदवेत्ता
तपोहीन ॥ तये ठायीं पात्रता गौण ॥ अनध्यायी तपस्वी पूर्ण ॥ तोही गौण पात्रत्वीं ॥ ९६ ॥ वेदाध्यायी
आणि तपस्वी ॥ वेदोक्तकर्माचरणपदवी ॥ संतुष्टमानस सर्वभावीं ॥ तैं त्या शोभवी पात्रता ॥ ९७ ॥ नाम
गोत्र शाखाध्ययन ॥ परस्परें उच्चारून ॥ प्रतिगृह्यतां प्रतिग्रहणं ॥ त्यागादान उभयत्र ॥ ९८॥ ऐसिया रीती गोभूतिळ ॥ कांचनवसनें धान्यें सकळ ॥ अश्वगजरथफलदलजळ ॥ सूक्ष्मस्थूळअन्नादि ॥ ९९ ॥
यथायोग्य पात्रानुरूप ॥ संपन्न द्रव्य अल्पस्वल्प ॥ यथाधिकारें कृतसंकल्प ॥ निष्कामकल्प सर्वत्र ॥ ३०० ॥
अधीताहूनि तदनुष्ठाता ॥ त्याहूनि श्रेष्ठ आत्मवेत्ता ॥ वेदवेदांतपारंगता ॥ शांता विरक्ता पात्रत्व ॥ १ ॥
कायावाचामनें करून ॥ संकल्पिलें नेदी दान ॥ त्याचें आकल्प नाशे पुण्य ॥ पापसंपन्न तो होय॥ २ ॥

---

१ प्रसंग. २ दूरकरणें.

जेथ पात्र आशाबद्ध ॥ दात्यासि बोले परुषवाद[1] ॥ अथवा दाता द्रव्यलुब्ध ॥ देऊनि खेद मग मानी ॥ ३ ॥
तयां उभयां नरकावाप्ति ॥ ऐसी धर्मवादव्युत्पत्ति ॥ एवं प्रतिश्रुत[2] जे नेदिती ॥ ते अधःपाती सर्वत्र ॥ ४ ॥
तैसेचि जाणा दत्तापहारी ॥ नरकवासी आकल्पवरी ॥ दानीं ऐसी दोषसामग्री ॥ निरयाधिकारी करीतसे॥५ ॥
ईश्वरकृपावरदबळें ॥ देश काळ पात्र मिळे ॥ द्रव्य शुद्ध चित्तें अमळें ॥ विनियोग कळे यथोचित ॥ ६ ॥
येरवीं कोण्हीएक अंग ॥ न्यून असतां होय व्यंग ॥ तें तत्सदादिमंत्रें सांग ॥ कीजे अभ्यंग हरिस्मरणें ॥ ७ ॥
परंतु अवंचक सप्रेमळता ॥ निष्कामप्रेमें श्रीभगवंता ॥ भजतां कर्मासि साद्गुण्यता॥ येरां विगुणता ठेविली ॥८॥
भगवत्प्राप्तीचीं साधनें ॥ ऐसीं सुसंपन्नें दानें ॥ हरिहरव्रतें निष्कामपुण्यें ॥ येरें गौणें सकामें ॥ ९ ॥ पतिव्रता
वरिल्या पति ॥ तन्निष्ठव्रताचरणीं मति ॥ तैसी निष्ठा अंगीकृतीं ॥ व्रतसंपत्तिपूर्वक ॥ १० ॥ येऱ्हवीं व्रत्तें तीनसैंसाठी ॥
कळिकाळाच्या सुभगां[3]पाठीं ॥ लागली तयांची राहटी ॥कोणे कोटी माजि गणिजे॥११ ॥ एक्या घायें पाविजे
मरण॥तरी कां धुंडिजे अवघें रण ॥ तारक एक व्रताचरण ॥ वृथा विचरण सैराट॥ १२ ॥ रुक्मांगदें
एकादशी ॥ एकचि साधिली निश्चयेंसीं ॥ कीं अंबरीषें द्वादशी ॥ कृतनियमेंसीं वरियेली ॥१३ ॥ कीं कौंडिन्यें
अनंतव्रत ॥ एकचि करूनि जाला पूत ॥ अनेकव्रताचरणपंथ ॥ विप्रपोटार्थ कळिकाळीं ॥१४॥ दीक्षाग्रहण औपासन
॥ गुर्वाराधन पितृभजन ॥ अतिथिपूजन पतिसेवन ॥ नियमें वरून व्रत कीजे ॥ १५॥ एवं जें जें अंगीकृत
॥ कायवाचामनेंसहित ॥ नियमपूर्वक दृढव्रत ॥ हरिप्रीत्यर्थ निष्काम ॥ १६॥ ऐसीं व्रतें जिवें साठी ॥
करूनि आचरतां भगवत्तुष्टी ॥ वांचूनि कामनेची गोष्टी ॥ सहसा पोटीं नधरिती ॥ १७ ॥ तें इयें निष्कामव्रता-

---

[1] कठोर भाषण. [2] कबूल केलेलें. [3] कलियुगांतील स्त्रियांकारितां.

चरणें ॥ आतां तपाचीं लक्षणें ॥ तेंही ऐका निरूपणें ॥ यथाव्याख्यानें कथिजती ॥ १८ ॥ दृढ नेमें जें वारिलें
व्रत ॥ तें आचरिजे अतंद्रित ॥ हाचि तपशब्दाचा अर्थ ॥ पृथक किमर्थ वाखाणूं ॥ १९ ॥ कायावाचामनें
करून ॥ त्रिविध तपाचें लक्षण ॥ ईश्वरानिष्ठा तनुशोषण ॥ निष्कामपुण्य लक्षूनी ॥ ३२०॥ तेचि तनुशोषणाची
परी ॥ कृच्छ्रचांद्रायणाची परी ॥ निरूपिजेल ग्रंथाधारीं ॥ चमत्कारीं अतिस्वल्प ॥ २१॥ एके दिवशीं
एकभुक्त ॥ दुसरे दिवशीं कीजे नक्त ॥ तृतीयदिवशीं अयाचित ॥ केवळ चतुर्थ उपोषण ॥ २२ ॥ या नामबोलिजे
पादकृच्छ्र ॥ पर्णकृच्छ्राचा प्रकार ॥ श्रोतीं होऊनि सादर ॥ साविस्तर परिसावा ॥ २३ ॥ वट उंबर
राजीव बिल्व ॥ क्रमेंकरूनि यांचे पल्लव ॥ कुशोदकपानें पांचवा देव ॥ कीजे निर्वाह पर्णकृच्छ्रीं ॥ २४ ॥
पेंडीभक्षण एके दिवसीं ॥ [1]एकांतरें शुद्धोपवासीं ॥क्रमें उदकतक्रसक्तूशीं ॥ दिनाष्टकेंसीं सौम्यकृच्छ्र ॥ २५ ॥
प्रातस्त्रिदिन [2]हविषान्न ॥ त्रिदिन सायं हविर्भोजन ॥ त्रिंदिन अयाचित हविषान्न ॥ त्रि उपोषण मध्यकृच्छ्र ॥२६
ग्रासमात्र प्रभाते प्रथम ॥ द्वितीय सायाह्नीं तितुकाचि नेम ॥ ग्रास एक अयाचित धर्म ॥ तृतीय दिवशीं भक्षणें
चतुर्थदिवशीं उपोषण ॥ अतिकृच्छ्राचा एक चरण ॥ अपर अतिकृच्छ्रलक्षण ॥ श्रोते विचक्षण परिसतु ॥ २८ ॥
एकैक ग्रास प्रातस्त्रिदिन ॥ तैसेंचि एकैक सायं त्रिदिन ॥ अयाचित एकैक ग्रास त्रिदिन॥ त्रि उपोषण अतिकृच्छ्र
प्रातस्त्रिदिन हविर्भोजन ॥ तैसेंचि सायाह्नीं त्रिदिन ॥ त्रिदिन अयाचित हविषाशन ॥त्रि उपोषण प्राजापत्य॥ ३०
एकदिवसीं गोमूत्रपान ॥ द्वितीय दिवशीं गोमयाशन ॥ तृतीयदिवशीं गोक्षीरग्रहण ॥ दधिसेवन चतुर्थीं ॥ ३१॥
गोघृताशन पंचमेहनि ॥ षष्ठीं कुशोदक प्राशूनी ॥ एक रात्र उपोषणीं ॥ कृच्छ्रसांतपन या नांव ॥ ३२ ॥

---

[1] एक दिवस आड करून. [2] नुसता घृतयुक्त भात.

शुक्लपक्षीं एकैक ग्रास ॥ पूर्णमेपर्यंत कीजे ह्रास ॥ तेथून वर्धविजे ग्रासांस ॥ अमावास्येस परिपूर्ति ॥ ३३ ॥
हा एक चांद्रायणाचा पक्ष ॥ अपर पूर्णमेपासूनिं लक्ष ॥ ग्रासा ह्रास करिती दक्ष॥पुनः सापेक्ष पूर्णिमा॥ ३४ ॥
असो कृच्छ्रीं[1] चांद्रायणीं ॥ पश्चात्तापें तनुशोषणीं ॥ तपश्चर्या करिती मुनि ॥ चित्तशोधनीं प्रवर्तती ॥३५ ॥
जळें होय मलक्षालन ॥ अन्न शुद्ध सत्यें करून ॥ विद्या तपें तनुशोषण ॥ चित्तशोधन सत्कर्में ॥ ३६ ॥
ज्ञानें होय बुद्धि शुद्ध ॥ इत्यादि स्थूलतपोनुवाद ॥ अधिकार उजळलिया दुःखद॥ सहसा विरुद्ध मग नरुचे ॥
एकनिष्ठ भगवद्भक्ति ॥ ते काळींची तपःसंपत्ति॥ कायिक वाचिक मानसगति ॥ तपोभिव्यक्ति गुणभेदें॥३८ ॥
शैवी वैष्णवी उपासना ॥ तदर्थ करितां कर्माचरणा॥ नियमपूर्वक तनुशोषणा ॥ कायिक संज्ञा त्या होय॥ ३९ ॥
कीं गुरुगृहींचा परिचारक[2]॥ होऊनि परिचर्या सम्यक ॥ एकनिष्ठा निष्कामुक ॥ हेंही कायिक बोलिजे॥ ४० ॥
आणि गुरुसमान जे जे प्राज्ञ ॥ त्यांचें कीजे दास्याचरण ॥ सर्वभावें विप्रार्चन ॥ परोपकरण सर्वत्र ॥४१ ॥
नित्य नैमित्त शौचाचारें ॥ ब्रह्मचर्यादि व्रतनिर्धारें ॥ भूतदया सरलांतरें ॥ निर्विकारें तपोनिष्ठा ॥ ४२ ॥
ऐसें शुद्ध कायिक तप ॥ ईश्वरप्राप्तीचा संकल्प ॥ अन्य कामना नुपजे अल्प ॥ वाङ्मयजल्प तो ऐका॥ ४३ ॥
प्राणिमात्रांचें ज्यामाजि हित ॥ शंकाभयोद्वेगरहित॥जगत्प्रियकर आणि सत्य ॥परमार्थ सुनिश्चित मितवाक्य॥
द्विजालागीं श्रुतीचें पठन ॥ सामान्यवर्णा स्तोत्रपुराण ॥ कीं एकनिष्ठ नामस्मरण॥ कामनाशून्य अविकारें ॥
या नांव बोलिजे वाङ्मय तप॥शरीरक्लेशीं न करितां अल्प॥ईश्वरप्राप्तीचा उजळी दीप॥जैंवि सुरपादप कृषिरहित
मानसतपाचें लक्षण ॥ निर्विकार सुप्रसन्न ॥ आपणा लक्षूनि आपण ॥ निश्चळ उन्मन पूर्णत्वें ॥ ४७

---

[1] प्रायश्चित्तामध्यें.
[2] सेवक.

इक्षूपासूनि निवडला रस ॥ खंडपर्यंत[1] विकारविशेष ॥ मग जे मिष्ठताचि निःशेष॥ तेंवि मानससौम्यता॥४८॥
इंद्रियव्यापार मांदुळती[2] ॥ मुनिमर्यादामौनवृत्ति ॥ सबाह्य प्रकटे आत्मस्थिति ॥ बाह्यप्रवृत्ति नुमसतां[3] ॥४९॥
आत्माकाराकारित मन ॥ आत्मारामचि सुखसंपन्न ॥ भावाभावसंकल्पशून्य ॥ मानससाधनतप ऐसें ॥५०॥
मखजपसंयमस्वाध्याय ॥ अन्य विविध श्रेयोपाय ॥ अनंत जन्में साधितां होय ॥ साध्यभक्ति श्रीकृष्णीं॥५१॥
उद्धव ह्मणे गोपींप्रति ॥ ऐसी आत्यंतिकी भक्ति ॥ अनंतजन्मकृतसुकृतीं ॥ तुह्मीं श्रीपति अनुभविला ॥५२॥
श्रोते शंका करिती येथ ॥ होमस्वाध्यायदानादि व्रत ॥ वर्णविशेषें पुरुषांसि उक्त ॥ स्त्रिया येथ अनर्हा॥५३॥
तरी जायापरिग्रह असे ज्यांसी ॥ तेचि अधिकारी गृहमेधासी ॥ तेर्थीच्या अच्छिद्र सुकृतासी॥ दंपतीसि अधिकार ॥
ह्मणोनि गोपींचीं सुकृतें ॥ उद्धवें अनुमानिलीं तियें सत्यें॥ निष्काम कर्में जन्में बहुतें ॥ तें सप्रेमभरितें हरिभक्ति५५
व्रजवनितांतें उद्धव ह्मणे ॥ ऐसीं अगाध तुमचीं पुण्यें ॥ भूतभविष्यवर्तमानें ॥ कोण्ही तुलने नतुलती॥ ५६॥

भगवत्युत्तमश्लोकेभवतीभिरनुत्तमा ॥ भक्तिःप्रवर्तितादिष्ट्यामुनीनामपिदुर्लभा ॥ २५ ॥

॥टीका॥ उत्तमश्लोक श्रीभगवान्॥ अतितर श्रेष्ठ तत्प्रेम गहन॥ तुमच्या अदृष्टपुण्यें करून॥ असाध्यसाधन हें घडलें
येह्रवीं ऐसी दुर्लभ भक्ति ॥ निसर्गजनित भगवद्रति ॥ अनन्तजन्मार्जितसुकृतीं ॥ त्या मुनींहीप्रति दुर्लभ पैं॥५८
अदृष्टपुण्य ह्मणाल कैसें ॥ तें कथिजेल दैवविशेषें ॥ जेणें तोडिले भवसुखफांसे ॥ स्वस्थमानसें तें परिसा ॥५९॥

दिष्ट्यापुत्रान्पतीन्देहान्स्वजनान्भवनानिच ॥ हित्वाऽवृणीतयूयंयत्कृष्णाख्यंपुरुषंपरम् ॥ २६ ॥

खडीसाखरेपर्यंत. २ एकत्र होती. ३ न प्रकटहोतां.

॥टीका॥पुत्रासाठीं घेती गळ॥पायीं तुडविती इंगळ॥व्रतें उपवास स्थळोस्थळ॥करिती चिरकाळ बहुनेमें॥ ६० ॥
देवद्वारीं घेती धरणें ॥ नागबळी घालिती राहाणे ॥ ऐसे यत्न पुत्राकारणें ॥ स्नेहबंधनें प्रसवलिया॥ ६१ ॥
ऐसा पुत्रस्नेह कठिन ॥ दैवबळें तो खंडून ॥ तुह्मी पावलां श्रीकृष्ण ॥ पूर्वसाधनयोगबळें ॥ ६२ ॥
पतीपासूनि विषयसुख ॥ इहलोक आणि परत्र देख ॥ संतति संपत्ति सांसारिक ॥ बंध निष्टंक सस्निग्ध ॥ ६३ ॥
त्या पतिस्नेहपाशाचा भंग ॥ करूनि पावलां श्रीरंग ॥ पूर्वसुकृतसाधन सांग ॥ दैव चांग यास्तव हें ॥ ६४ ॥
आपला देह असतां बरवा ॥ अधिकारसंसारगौरवा ॥ रूपलावण्यभूषणभावा ॥ सर्व वैभवा मंडन जो ॥ ६५ ॥
त्या देहाचें प्रेम गहन ॥ मुनीरश्वरांहीं नसुटे जाण ॥ तुमच्या पूर्वसुकृतेंकरून ॥ तनुविस्मरण दैवबळें ॥ ६६ ॥
माता पिता सासू श्वशुर ॥ भाऊ बहिणी भावे देवरें[1] ॥ व्याही जामात सुह्रद अपर॥मोह दुस्तर पैं यांचा॥ ६७ ॥
लज्जेसाठीं देती प्राण ॥ तया सुहृद्वर्गा लंघून ॥ तुह्मीं ठाकिला श्रीभगवान ॥ दैव गहन हें तुमचें ॥ ६८ ॥
प्राणा पंढियंतीं[2] मंदिरें ॥ स्नेहें कवळिलीं अत्यादरें ॥ बांधतां तत्स्नेहाच्या दोरें ॥ तुह्मी सत्वर निष्टलां ॥ ६९ ॥
याचिमाजि धनगोधनें ॥ ऐशीं सप्तविध[3] बंधनें ॥ तुह्मी छेदूनि निष्ठुरमनें ॥ भगवद्ध्यानें वेधलां ॥ ७० ॥
जो कां परमपुरुष भगवान ॥ तो हा नंदाचा नंदन ॥ नामें ह्मणती ज्या श्रीकृष्ण॥ तुह्मीं संपूर्ण तो वरिला ॥७१ ॥
ज्या कारणास्तव कृष्णीं रति ॥ ते पूर्वार्जित दैवसंपत्ति ॥ भाग्यें वरिला जगत्पति ॥मज विश्रांति तद्योगें ॥ ७२ ॥

सर्वात्मभावोऽधिकृतोभवतीनामधोक्षजे ॥ विरहेणमहाभागामहान्मेऽनुग्रहःकृतः ॥ २७ ॥

---

[1] दीर. [2] भिय. [3] पुत्र, पति, देह, स्वजन, मंदिरें, धन आणि गोधन,

भा० द. ॥टीका॥पतिपुत्रादि स्वजन धन॥यांतें आत्मत्वें कवळी मन॥सर्वात्मभाव एकवटून॥ तुह्मीं भगवान् वरियेला॥७३ टी. अ०
अक्षजज्ञान ज्याहूनि अध ॥ तो अधोक्षज अगाधबोध ॥ त्याच्या ठायीं साधनें[1]सिद्ध ॥ एकांतभक्ति लाधलां ॥ ७४ ॥
॥ ३५॥ विरहव्यंगोक्त सुखाची वाजी[2] ॥ प्रसंगें महदनुग्रह आजी ॥ मजवरी तुह्मीं केला सहजीं ॥शतम[3]खयाजी जो नलभे॥७५ ॥४७॥
अनंतजन्मार्जित सुकृतें ॥ मजवरी संतुष्टोनि श्रीभगवंतें ॥ संदेशनिरूपणाच्या अर्थें ॥ मजलागिं येथें पाठविलें ॥७६॥
तुह्मी प्रसंगें विरहवार्ता ॥ मजवरी अनुग्रह केला पुरता ॥ आतां एकांतगोष्टी भर्ता ॥ वदला तत्वता त्या ऐका॥७७॥

श्रूयतांप्रियसंदेशोभवतीनांसुखावहः ॥ यमादायागतोभद्राअहंभर्तूरहस्करः ॥ २८ ॥

॥टीका॥भद्रा ह्मणिजे कल्याणमूर्ति॥भगवत्संगमलब्धा सती॥तुमचा प्रियतम जो श्रीपति ॥तेणें मजप्रति प्रेरिलें
त्याचा एकांत गुह्य वृत्तांत ॥ तुह्मांसि सुखावह परमामृत ॥ जो मी घेऊनि आलों येथ ॥ देऊनि चित्त तो ऐका॥ ७९॥
येथ शंकोंनका कांहीं ॥ रहस्य वदतां ऐकतां पाहीं ॥ मजहूनि रहस्यवक्ता नाहीं ॥ ह्मणोनि येठायीं धाडिलें ॥ ८०॥
मी स्वामीचा रहस्यकर ॥ यास्तव मम मुखींचें उत्तर ॥ ते कृष्णोक्तीचि साचार ॥ जाणोनि सादर परिसा हो॥८१ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ भवतीनांवियोगोभेनहिसर्वात्मनाक्वचित् ॥ यथाभूतानिभूतेषुखंवाय्वग्निर्जलंमही॥ २९
तथाऽहंचमनःप्राणभूतेंद्रियगुणाश्रयः ॥ ६ ॥

॥टीका॥व्रजललनांतें शेषशायी॥ह्मणे तुमचा मजसीं कांहीं॥विवेकें पाहतां वियोग नाहीं ॥ ऐका तेही विवंचना ॥
काय ह्मणोनि वियोग नघडे ॥ ऐसी शंका करणें घडे ॥ मी सर्वात्मा कोण्या पाडें ॥ हें निवाडें उमजा हो ॥ ८३ ॥
जें जें उपादान[3]कारण ॥ याचा तत्कार्येंशीं जाण ॥ वियोग ह्मणतां पडे मौन ॥ अभेद ह्मणोनि वनिता हो ॥ ८४ ॥ ॥१५॥

---

[1] तप आदिकरून, साधनानें प्राप्त होणारी. [2] प्रकटीकरण. [3] शंभर यज्ञ करणारा. [3] साक्षात्कारण.

हेम आत्मा सर्व नगां ॥ तोय आत्मा सर्व तरंगां ॥ माती आत्मा घटमठलिंगा ॥ तेंवि मी जगा जगदात्मा ॥ ८५ ॥
आत्माशब्दें बोलिजे देह ॥ तो सर्वात्मा मीच होय ॥ कीं मनोबुद्धिजीवसमूह ॥ चैतन्यविग्रह तद्गत मी ॥ ८६ ॥
यदर्थीं दृष्टांत शुकप्रणीत ॥ भौतिकें जैसीं भूताआंत ॥ कार्यकारणबोधें स्थित ॥ अनुस्यूत[१] अभिन्नत्वें ॥ ८९ ॥
स्थावरजंगमें जें जें भूतें ॥ महद्भूतें उपादान त्यांतें ॥ कार्यकारणविवेकज्ञाते ॥ ते हे जाणते तत्वज्ञ ॥ ८८ ॥
चेंपूनि पाहतां एक शीत ॥ पक्वापक्व जाणिजे भात ॥ तेंवि हा भूतभौतिकवृत्तान्त ॥ थोडेनि बहुत विवरावा ॥ ८९ ॥
वटबीज पाहतां अणुसमान ॥ भूम्याधारें वर्धक जीवन ॥ तेज प्रकाशक परिपाककरण ॥ वायु विस्तीर्ण पाहूलाळ ॥
आकाश सच्छिद्र व्यापक ॥ मूळादि अग्रपर्यंत देख ॥ जीवन तद्द्वारा सम्यक ॥ पोषे रुख तद्योगें ॥ ९१ ॥
सच्छिद्र व्याकपत्व गगनाचें ॥ तिर्यकपाहूलाळत्व वायूचें ॥ ऊर्ध्व वाढणें तेजाचें ॥ जळें मूळाचें अधोगमन ॥ ९२ ॥
तेथ जडता ते पार्थिव[२] ॥ आणि गंधगुण स्वभाव ॥ रसाळ स्वादुत्व टवटव ॥ इत्यादि सर्व तोयगुण ॥ ९३ ॥
रूपलावण्यझगमग ॥ तेजें परिणाम परिपाक सांग ॥ शीतोष्णमृदुकठिनभाग ॥ स्पर्शादिलिंग वायूचें ॥ ९४ ॥
पोकळ सच्छिद्र ह्मणोनि ध्वनि ॥ हा शब्दगुण गगनींहूनी ॥ स्थावरादिभौतिकस्थानीं ॥ अभिन्नपणीं प्रकाशे ॥ ९५ ॥
एवं वटाचा विस्तार ॥ पारंबियांस्तव अपार ॥ त्याचा होतां उपसंहार ॥ निवडे साचार भूतत्वें ॥ ९६ ॥
खणूनि समूळ छेदितां वट ॥ असंभाव्य भरती शकट ॥ शोषूनि दाहितां हव्यवाट[३] ॥ मृदंश[४] अवशिष्ट तद्भस्म ॥ ९७ ॥
तेणें मूळगर्ताचि[५] भरे ॥ सहसा विशेष होऊनि नथरे ॥ जळांश परिणमे स्नेहाकारें ॥ वैश्वानरें तो शोषे ॥ ९८ ॥
वायु क्षोभवी वैश्वानरा ॥ तो निजांशा निवडी धूम्रा ॥ गगन सच्छिद्र अंबरा ॥ मिळतां पदरा नराखे ॥ ९९ ॥

---

[१] ओविलेली. [२] पृथ्वीसंबंधी. [३] अग्नि. [४] मातीचा अंश. [५] वृक्षमूळाची खांच.

याचिप्रकारें चराचरीं॥भूतें अभिन्न भौतिकाकारीं ॥ शेखीं उरती उपसंहारीं ॥ निज निर्धारीं निजरूपें॥ ४०० ॥
तेंवि मी सर्वात्मा उपादान॥मनोबुद्धिप्राणेंद्रियादि गुण॥एतदाश्रय अभिन्न पूर्ण॥ वियोग ह्मणोन नमनावा॥ १ ॥
अभेदें ऐक्य बोलिलें ऐसें ॥ तथापि कार्यकारणवशें ॥ भेदावाप्ति संचली असे ॥ तरी कायसें एकत्व ॥२ ॥
कीं सर्वांमाजि अनुगत आत्मा॥परि सर्वत्वाची पृथग् गरिमा॥ऐसिया द्वैतापत्तिधर्मा॥भेदनामा नह्मणावें॥ ३ ॥
ऐसा भेद मानाल जरी ॥ यदर्थी परिहार बोले हरि ॥ तो ऐकोनि अभ्यंतरीं ॥ व्रजसुंदरी विवरा हो ॥ ४ ॥

आत्मन्येवाऽऽत्मनाऽऽत्मानंसृजेहन्म्यनुपालये ॥ आत्ममायानुभावेनभूतेंद्रियगुणात्मना ॥ ३० ॥

॥टीका॥ तरी सर्व आणि सर्वानुगत॥कार्यकारण अभेद नित्य॥हाचि उमजेसा वृत्तांत॥नावेक स्वस्थ परिसा हो॥५॥
आपुले ठायीं आपणा करून॥आपणापेंचि सृजी जाण॥आपण आपुलें करी पालन॥आत्मोपसंहरण आत्मत्वीं॥६ ॥
जैसा एकचि सुप्त पुरुष॥अन्यथाबोधें स्वप्नाभास॥सृजूनि व्यवहार पालनें तोष ॥ ग्रासी अशेष चेइरा ॥ ७ ॥
आत्मा ह्मणाल स्वतःसेद्ध नित्य॥तेथ कें सृष्टि स्थिति अंत॥तरी मनोबुद्धिगुणेंद्रियसंघात॥मायाबिंबित प्रकाशी ८ ॥
जेंवि मनेंचि स्वप्न दिसे नासे॥तेंवि अविकार आत्मा मायावशें॥सृजनावनांत अभेददशे॥भेदाचि ऐसें प्रतिपादी॥९॥
ह्मणाल आत्मा निर्विकार॥तो जरी मायागुणीं सविकार॥तें त्या गुणदोषसंचार॥दिसे साचार झळंबला॥ १० ॥
येही शंकेचा परिहार ॥ ऐका साध्वी हो साचार ॥ आत्मा शुद्ध निर्विकार ॥ गुणादिविकार त्या नशिवे ॥ ११ ॥

आत्माज्ञानमयःशुद्धोव्यतिरिक्तोऽगुणान्वयः ॥ सुषुप्तिस्वप्नजाग्रद्भिर्मायावृत्तिभिरीयते ॥ ३१ ॥

---

१ आपणापासून. २ उत्पत्तिस्थितिलय.

॥टीका॥शुद्ध बुद्ध नित्य मुक्त॥निष्प्रपंच विकाररहित॥त्यासि भूतगुणादि रूपत्व प्राप्त॥हें अघटित सर्वत्र॥ १२॥
गुणी असोनि गुणातीत॥कैसा ह्मणाल शुद्ध शाश्वत॥तरी अगुणान्वयपदें[1] ख्यात॥गुणीं नमिळत गुणसाक्षी॥ १३ ॥
ज्ञातृत्व अमळत्व संतोष ॥ इत्यादि सत्वगुणोत्कर्ष ॥ प्रकाशूनि स्वकाश ॥ निःसंग उदास अस्पृष्ट ॥ १४ ॥
रागतृष्णाप्रवृत्तिप्रचुर ॥ इत्यादि राजस गुणविकार ॥ आत्मसत्तायोगें सधर ॥ आत्मा अविकार अनुस्यूत ॥ १५ ॥
प्रमाद अबोध जडता तम ॥ इत्यादि तामस गुणसंभ्रम ॥ वातशीतोष्णामाजि व्योम ॥ दावी संगम असंगत्वें ॥ १६ ॥
एवं गुणान्वयव्यतिरिक्त ॥ ज्ञानस्वरूप आत्मा नित्य ॥ ह्मणाल अवस्थाप्रत्यय बहुत ॥ तरी तो वृत्तांत आवधारा ॥ १७
ज्ञानस्वरूप स्वसंवेत्ता ॥ तरी प्राज्ञ[2]तैजस[3]विश्वात्मता[4] ॥ इत्यादि प्रत्ययें पृथगवस्था ॥ तें स्वसंवेत्तृता केंवि घडे ॥ १८॥
इये शंकेच्या परिहारा ॥ ऐका साध्वी हो विचारा ॥ मायाकार्यमनोविकारां ॥ माजि उभारा पृथक्त्वा ॥ १९॥
मंचकशिबिकाअश्वयानीं ॥ एकचि भूप पृथगासनीं ॥ सेवितां तद्गत सेवकजनीं ॥ पृथगभिमानी प्रत्यय ये॥ २० ॥
कीं बाल्य प्रागल्भ्य वार्धक्य ॥ त्रिधा अनुभविता पुरुष एक॥ पृथक् प्रत्यय ते वार्ष्मिक ॥ नहोनि नावेक प्रकाशी ॥ २१
एवं आत्मा अवस्थाभेद ॥ मायागुणकार्ययोगें विशद ॥ प्रकाशी तो प्रत्ययानुवाद ॥ येऱ्हवीं स्वतःसिद्ध शुद्धात्मा॥ २२
मुख्य बिंब जैं गगनीं लोपे ॥ नलोपितां तैं प्रतिबिंब हारपे॥ तद्गतविकारचांचल्यकंपें ॥ केंवि साटोपें वसिजेल तैं॥ २३ ॥
तैसें निरोधिलिया मन ॥ विकार राहती तैं कोठून ॥ तें व्यतिरेकें प्रतिपादन ॥ दृष्टांत भिडवून दार्ष्टांती ॥ २४ ॥

येनेंद्रियार्थान्ध्यायेतमृषास्वप्नवदुत्थितः ॥ तन्निरुंध्यादिंद्रियाणिविनिद्रःप्रत्यपद्यत ॥ ३२ ॥

---

[1] गुणांशीं संबंध न ठेवणारा. [2] कारणशरिराभिमानी. [3] सूक्ष्मशरीराभिमानी. [4] स्थूलशरीराभिमानी.

॥टीका॥स्वप्नामाजि लटिका विषय॥मनोविकारजनित होय ॥तैजस आत्मा सत्प्रत्यय॥तद्विपर्यय जागलिया २५
जागृतिबोधें स्वप्न रोधे ॥ बाधितवृत्तांतप्रत्यय नांदे ॥ तद्वद्देशिकोपनिषद्बोधें ॥ विवर्त रोधे मिथ्यात्वें॥ २६ ॥
॥१७॥ परंतु निद्रोत्थिता जैसें॥ लटिकें गतस्वप्न स्मरणीं गवसे॥ बाधितविषया मनोध्यासें॥साचांसरिसें अनुभविती॥ २७ ॥४७॥
अनिद्र अजड निरालस्य ॥ तथापि उरे विषयाध्यास॥ आवरूं नशके तो ज्ञानास ॥ भर्जि[2]तसस्य जेंवि नुगवे॥२८ ॥
बाधितविषयाची अनुभूति ॥ शरीरयात्रामात्रवृत्ति ॥ परंतु निजात्मवंतांप्रति ॥ आत्मप्रतीति अविरुद्ध॥ २९ ॥
तो तेव्हांचि कृतार्थ जाला ॥ जैं स्वात्मप्रत्यय बोधा आला ॥तो हा निःसंशय दादुला॥शुक बोलिला कीं हरि हो॥ ३० ॥

एतदंतःसमाम्नायोयोगःसांख्यंमनीषिणाम् ॥ त्यागस्तपोदमःसत्यंसमुद्रांताइवापगाः ॥ ३३ ॥

॥टीका॥तोचि मनोनिरोध कैसा॥जेणें अपवाद दृश्याभासा॥अंतःशब्दार्थें हा परिसा॥पूर्णाभ्यासापर्यंत॥ ३१ ॥
मनोनिरोधाचें फळ ॥ अभ्याससमाप्तिपर्यंत अढळ॥सम्यक आम्नाय वेदवित्कुशळ॥जिज्ञास्यं[3] केवळ अवगमी तो ३२
ब्रह्मजिज्ञास्य ब्रह्मनिष्ठा ॥ ब्रह्मप्राप्तीसि अनेक वाटा॥ ह्मणसी तरी त्या एकवटा ॥ होती चोहटा प्राप्तीच्या ॥ ३३ ॥
मनोनिरोध शेवटवरी ॥ सम्यक ह्मणिजे बरव्या परी ॥ कोण्या एक्या मार्गें तऱ्ही ॥ दृढ निर्द्धारें सुखदानी ॥ ३४ ॥
तेचि ऐका मार्गभेद ॥ अष्टांगादि योग विशद ॥ आत्मानात्म सांख्यबोध॥ त्याग तो प्रसिद्ध संन्यास ॥ ४३५ ॥
भवविरागें स्वधर्माचरण ॥ सप्रेम विश्वास भक्ति प्रधान॥ एतन्निष्ठ तनुशोधन॥ तपोभिधान त्या ह्मणिजे॥ ३६ ॥ ॥१७॥
वासनानाश इंद्रियदमन॥ दमशब्दाचें हें व्याख्यान ॥ सत्य ह्मणिजे समदर्शन ॥ सबाह्य शोधन तें शौच ॥ ३७ ॥

---

१ खऱ्यासारखें. २ भाजलेलें धान्य. ३ जाणयास इच्छिलेलें.

इत्यादि मार्ग पैं अनेक ॥ परंतु फळप्राप्ति सकळां एक ॥ बहुविध नद्यांचें जेंवि उदक ॥ पावे ऐक्य समुद्रीं ॥ ३८ ॥
तेंवि आत्मप्राप्तिवे[5]ऱ्ही ॥ मनोनिरोध कोण्हेपरी ॥ जालिया संसृति उदयो नकरी ॥ हा निर्धारीं सिद्धांत ॥ ३९ ॥
ऐसें बोलोनि बल्लवींसीं ॥ पुन्हा उद्धव ह्मणे त्यांसी ॥ तुमचें अभिप्रेत मानसीं ॥ त्या गुह्यासि अवधारा ॥ ४० ॥
ह्मणाल ब्रह्मविद्येच्या बोधें ॥ आह्मां झकविलें कां मुकुंदें ॥ आमुचीं करपलीं हृदयारावेंदें ॥ विरहवेधें कृष्णाच्या ॥ ४१ ॥
विश्वश्रियेसि भुलवणें ॥ केलें जयाचिया लावण्यें ॥ सनकादि मुक्तां गुणगणपूर्णें ॥ केलीं बंधनें ध्यानमिसें ॥ ४२ ॥
ज्याच्या कारुण्यें संसृति ॥ भक्ति प्रियतम पुढत पुढती ॥ माजूनि अवतारांची पंक्ति ॥ केली विश्रांति त्रिजगातें ॥ ४३ ॥
ज्याच्या आस्तिक्यें लटिका भव ॥ साच मानूनि भ्रमले जीव ॥ त्या भवसागरामाजि नाव ॥ तारक नांव पैं ज्याचें ॥
त्या तुज विश्वसुंदरा हरि ॥ आह्मी रतलों रानटा नारी ॥ आतां विरहाच्या जोहे[1]रीं ॥ कैंवि मुरारि लोटिसी ॥ ४५ ॥
आह्मी साहों नशकों विरह ॥ ऐसा तुमचा अभिप्राव ॥ यदर्थीं काय वासुदेव ॥ वदला गौरव तें ऐका ॥ ४६ ॥

यत्वहंभवतीनांवैदूरेवर्तेंप्रियोदृशाम् ॥ मनसःसन्निकर्षार्थंमदनुध्यानकाम्यया ॥ ३४ ॥

॥टीका॥ ज्या कारणास्तव वियोग तुमसीं ॥ करणें रुचला मम मानसीं ॥ तुह्मी नेणां त्या गुह्यासी ॥ वृथा खेदासि पावतसां
अहं ह्मणिजे मी जो हरि ॥ तुह्मांसि प्रियतम सर्वांपरी ॥ तुमच्या नेत्रांपासूनि दुरी ॥ मथुरापुरी माजि वर्तें ॥ ४८ ॥
याचें रहस्य ऐसें जाणा ॥ सन्निध असतां घडे अवज्ञा ॥ दूरी प्रेष्ठ[2] तैं सप्रेम ध्याना ॥ कारण माना मानिनी हो ॥ ४९
कन्या जाय सासुरवासा ॥ माता भा[3]जन होय ध्यासा ॥ खातां पितां घेतां ग्रासा ॥ क्रिया अशेषां[4] तन्निष्ठा ॥ ५० ॥

---

१ आर्गीमध्यें. २ प्रियतम. ३ पात्र. ४ सर्व. ५ पर्यंत.

आणिकां आळवी तिचेचि नांवें ॥ दुचिंतीं उठे उदित खेंवे[2] ॥ तिचें स्वरूप ध्यानीं फावे॥ कृत्य आठवे तच्चरित ॥ त्याहूनि प्रेष्ठतमाच्या ठायीं ॥ ध्यानें वृत्ति वेधती पाहीं ॥ त्या ध्यानाचें कारण काई ॥ ऐका तेंही हरि सांगे ॥ ५२ ध्यानें मनाचें आकर्षण ॥ होतां होय मन उन्मन ॥ वास्तव मत्प्राप्तिकारण ॥ गुह्य संपूर्ण हें उमजा ॥ ५३ ॥ तिहीं श्लोकीं स्पष्टतर ॥ हें निरूपी मुरलीधर ॥ तुह्मी होऊनि सादर ॥ परिसा समग्र चतुरी हो ॥ ५४ ॥

यथादूरचरेप्रेष्ठेमनआविश्यवर्तते ॥ स्त्रीणांचनतथाचेतःसन्निकृष्टेऽक्षगोचरे ॥३५॥

॥टीका॥ पितापुत्र परस्परीं ॥ वियोगें वर्तत असतां दुरी ॥ इतुकी नबाधी त्यां अवसरी[3] ॥ नारी अंतरीं जेंवि झुरती अक्षगोचर सन्निकृष्ट ॥ वर्तत असतां प्रियतम प्रेष्ठ ॥ तैसा नवटे स्नेहाभीष्ट ॥ हा स्वभाव दुष्ट स्त्रियांचा॥ ५६ जैसा दुरी प्रियतम असतां ॥ तेथूनि उगड[4] नोहे चित्ता ॥ ध्यानीं मानसीं तन्निष्ठता॥ अनुभव पुरता नमना कां ॥ सामन्य स्त्रियांची हे रीति ॥ ऐका मत्प्रेमाची उक्ति ॥ जेणें निरसे पुनरावृत्ति ॥ कैवल्यप्राप्ति मम विरहें॥ ५८ ॥

मय्यावेश्यमनःकृत्स्नंविमुक्ताशेषवृत्तियत् ॥ अनुस्मरंत्योमांनित्यमचिरान्मामुपैष्यथ ॥३६ ॥

॥टीका॥पूर्वी मत्संगसेवनें ॥ मन्निष्ठ जालीं तुमचीं मनें ॥ आईतीं स्तिमित विरहध्यानें ॥ अन्यसाधनें नलगती॥ कृत्स्न ह्मणिजे समग्र मन ॥ माझ्या ठायीं प्रवेशवून ॥ अनुवेदनें[5] माझें स्मरण ॥ करितां संपूर्ण मत्प्राप्ति॥६० ॥ समग्र मन तें ह्मणाल कैसें ॥ अशेषकरणवृत्तिसरिसें ॥ एकवटोनि अवस्थानाशें ॥ विषयाध्यासें सुटलें जें ॥६१ ॥ जैसा सूर्य किरणगोळा ॥ करूनि टाकी अस्ताचळा ॥ तेंवि करणवृत्तिमेळा ॥ मानसें सकळा आवरुनी ॥ ६२ ॥

---

१ खिन्नपणानें. २ आलिंगनाला. ३ चिंता. ४ आनायासानें.५ वारंवार चिंतनानें. ६ उद्धार.

करणवृत्तिसहित मन ॥ मजमाजि प्रवेशतां पूर्ण ॥ तुटले विषयासक्तिगुण ॥ निर्मुक्तपण सहजेंची ॥ ६३ ॥
जेव्हां विमुक्त अशेष वृत्ति ॥ तेव्हांचि जाली भवनिवृत्ति॥तस्मात बाणल्या ऐसी स्थिति ॥ तैं मत्प्राप्ति अतिशीघ्र
अवज्ञा हेलन सन्निधानें ॥ मानस वेधे विरहध्यानें ॥ ज्या कारणास्तव तीं लक्षणें ॥ तुह्मीं संपूर्ण अनुभविलीं ॥
आतां माझें अनुस्मरण ॥ मनिष्ठता अनुवेदन ॥ तेणें मदैक्य पावलां पूर्ण ॥ चिरकाळ साधन नकरितां॥६६ ॥
ह्मणाल समाधानास्तव ॥ ऐसिया उक्तीचें गौरव ॥ दावूनि माधुर्यरसाची ठेव ॥ स्नेहलाघव पोखणें[१] ॥ ६७ ॥
यदर्थीं ऐका वो कल्याणी ॥ प्रतीति बाणे तुमच्या मनीं ॥ ऐसें बोलिला चक्रपाणि ॥ ते हे हरिवाणी अवधारा

यामयाक्रीडतारात्र्यांवनेऽस्मिन्व्रजआस्थिताः ॥ अलब्धरासाःकल्याण्योमाऽऽपुर्मद्वीर्यचिंतया ॥ ३७॥

॥टीका॥मजसीं वनितां क्रीडता रातीं॥जाणूनि प्रेमनिर्भरा चित्तीं ॥ धांवोनि येतां मजप्रति॥गृहीं स्वकांतीं रोधिल्या
अप्राप्त माझी रासक्रीडा ॥ भर्तृनिरोधें पावल्या पीडा ॥ क्रीडाध्यानीं त्यांस चाडा[२] ॥ देहसांकडाहूनि[३] सुटल्या॥
त्या माझेनि वीर्यचिंतनें॥मजसीं मिनल्या माझेनि ध्यानें ॥ हें जाणिजे तुमचेनि मनें ॥तरी संशय करणें कां येथ
ऐसीं कृष्णाचीं शब्दरत्नें ॥ उद्धव पारखूनि देतां यत्नें ॥ व्रजवनिताही घेऊनि श्रवणें ॥ अंतःकरणें निवालिया
कुरुकुलमलयाचलचंदन[४] ॥ श्रोता परीक्षिति विचक्षण ॥ सादर देखोनि पुढां कथन ॥ करी संपूर्ण शुकयोगी ॥ ७३

श्रीशुकउवाच॥एवंप्रियतमादिष्टमाकर्ण्यव्रजयोषितः ॥ ताऊचुरुद्धवंप्रीतास्तत्संदेशागतस्मृतीः ॥ ३८

॥टीका॥गोपीमानसप्रियतम कृष्ण॥तदुक्त संदेश करूनि श्रवण॥पूर्वस्मृतीचें लाहूनि स्मरण॥करिती भाषण उद्धवेंसीं

---

१ बाळगणें. २ आवड. ३ संकटापासून ४ कौरवांचें कुळ हा मलयपर्वत, तेथील चंदनवृक्ष परीक्षिति.

गोप्यऊचुः ॥ दिष्ट्याऽहितोहतःकंसोयदूनांसानुगोऽघकृत् ॥ दिष्ट्याऽऽप्तैर्लब्धसर्वार्थैःकुशल्यास्तेऽच्युतोऽधुना

॥टीका॥उद्धवातें ह्मणती गोपी॥यादवांचा वैरी पापी॥दुःखदायक खटाटोपी॥वधिला प्रतापी रामकृष्णीं ॥७५॥
ऊर्जितदैवें परमानंदें ॥ सानुगशत्रूचे[1] खाणोनि कांदे ॥ स्वजनसुहृदेंसीं मुकुंदें ॥ ऐश्वर्य समुदें[2] सेविजतें ॥ ७६॥
यादव लागले देशोदेशीं॥कृष्णें संपदा वोपूनि त्यांसी॥सर्वही करूनि मथुरावासी॥आतां तिहींसीं कुशळ असे॥७७॥
कुशळ रामकृष्ण बंधु ॥ कुशल स्वपक्ष सात्वतसिंधु[3] ॥ आतां किमर्थ स्नेहसंबंधु ॥ कीं तो व्रजवधू स्मरेल ॥ ७८॥
ऐशा बल्लवी वदल्या एकी॥तंव विरहोत्सुका ज्या आणिकी॥अभीष्ट गोष्टी पुसती मुखीं॥तें श्रोतीं कौतुकीं परिसावें७९॥

कथंरतिविशेषज्ञःप्रियःसपुरयोषिताम् ॥ नानुबध्येततद्वाक्यैर्विभ्रमैश्चानुभाजितः ॥ ४० ॥

॥टीका॥देव मानव आब्रह्मभुवन ॥ रमवूं जाणे रतिअभिज्ञ॥परम प्रियतम तो जोडला कृष्ण॥भाग्यसंपन्न पुरवनिता
॥८०॥रतिविशेष जेथ जे जैसे॥कृष्ण तेथ ते जाणे तैसे॥पुरवनितां तो जोडला असे॥त्या स्वविलासें भजविती॥८१
चाटुचटुला मधुरा वचनीं॥सलज्ज मंद स्मित ईक्षणीं॥वक्र व्यंकट कटाक्षबाणीं॥नागरा स्वगुणीं अर्चिती॥८२॥
इत्यादि ललनालालस[4]ललितीं॥लाघवललाम[5] लावण्यदीप्ति॥स्ववश करितां हरिद्दक्पातीं॥स्नेहावर्तीं कां नपडे॥ ८३
पुरस्त्रीस्नेहें बांधला हरि॥कोठूनि आमुचें स्मरण करी॥आह्मी वृथा वराका नारी॥झुरों अंतरीं तद्विरहें ॥ ८४॥
ऐशा एकी बोलों सरल्या॥तंव आणिकी उदिता जाल्या॥कृष्णप्रेमें विरहाथिल्या॥काय बोलिल्या तें ऐका॥८५॥ ॥१९॥

कच्चिद्गदाग्रजःसौम्यकरोतिपुरयोषिताम् ॥ प्रीतिंनःस्निग्धसव्रीडहासोदारेक्षणार्चितः ॥ ४१ ॥

---

१ सेवकांसहित शत्रूचे. २ सर्व. ३ यादवसमुद्र. ४ स्त्रीविलासांत रमणीय. ५ चातुर्यचिह्नें.

॥टीका॥सुशांतवृत्ति सत्वसंपन्न॥सौम्य हें त्या संबोधन॥यास्तव उद्धवा बल्लवीगण॥सौम्य ह्मणोनि संबोधी॥८६ ॥
जो गदाचा बंधु ज्येष्ठ॥जैसा आह्मांसि प्रियतम प्रेष्ठ॥तैसेच पुरवधूंचे अभीष्ट ॥काम यथेष्ट पुरवी कीं ॥ ८७ ॥
स्निग्ध ह्मणिजे सप्रेमभरें॥मंदस्मितादि सलज्ज वक्रें॥ललितापांगें मन्मथशरें॥आह्मी हरिगात्रें पूजिलीं जें॥४८८॥
किंवा नागरी मथुरा वामा॥त्याही ऐशाचि मेघश्यामा॥अर्चिती ह्मणोनि त्यांचिया कामा॥कांहीं तैसाचि पुरवी कीं८९
नागरी वामा कामासक्त ॥ स्मरसंभ्रमें तदनुरक्त ॥ आमुचे ठायीं त्याचें चित्त॥ कांहीं वृत्तांत स्मरे कीं ॥ ९० ॥
आह्मांवरी कांहींएक ॥ कृष्णस्नेहाचा कटाक्ष ॥ आतां कैंचा निजमनसाक्ष ॥ हरिलें लक्ष पुरवनितीं ॥ ९१ ॥
तंव आणिकी रानटा रमणी ॥ साबड्या गांवढळा गौळणी॥उद्धवेंसीं वदती वाणी॥सादर श्रवणीं ते ऐका॥ ९२ ॥

अपिस्मरतिनःसाधोगोविंदःप्रस्तुतेक्वचित् ॥ गोष्ठीमध्येपुरस्त्रीणांग्राम्याःस्वैरकथांतरे ॥४२॥

॥टीका॥साधु ह्मणोनि उद्धवासी॥पुसती उघड वृत्तांतासी॥गोविंद जो हृषीकेशी॥केव्हां आह्मांसि स्मरतसे ९३ ॥
मथुरापुरींच्या नागरा नारी ॥ कृष्णीं क्रिडतां स्वैराचारीं॥स्मरसंभ्रमें तत्सभांतरीं॥ आह्मां मुरारि स्मरतसे ॥ ९४ ॥
ग्राम्याग्राम्यभोगासक्ता ॥ प्रस्तुत ह्मणती कथीं हे वार्ता ॥ काय करावी चातुर्यता ॥ स्मरे स्वसुरता हरि कीं ना॥ ९५
तंव आणिकी विलासरसिका ॥ उद्धवेंसीं व्रजनायिका ॥ पूर्वानुभूतमन्मथसुखा ॥ अभिवर्धका प्रश्नमिषें ॥ ९६ ॥

ताःकिंनिशाःस्मरतियासुतदाप्रियाभिर्वृंदावनेकुमुदकुंदशशांकरम्ये ॥
रेमेक्वणच्चरणनूपुररासगोष्ठ्यामस्माभिरीडितमनोज्ञकथःकदाचित् ॥ ४३॥

---

१ स्वच्छंदानें, अमर्यादपणानें.

॥टीका॥ह्मणती उद्धवा अवधारीं॥केव्हां तऱ्ही त्या शर्वरी[1]॥ स्मरतो कीं ना श्रीमुरारि ॥ वद निर्द्धारीं शफथेंसीं॥९७
तया शर्वरी कैशा ह्मणसी ॥ ज्यांच्या ठायीं पूर्ण शशी ॥ कुमुदां कुदांतें प्रकाशी ॥ वृंदावनासि ते शोभा ॥ ९८॥
बहळसुगंध वृंदावनीं ॥ सुधाढ्य धवलिमा शशांककिरणीं॥वनश्रीच्या लावण्यगुणीं॥व्रजकामिनी हरि रमवी ॥९९॥
सुभगा सुगौरा लावण्यखाणी॥मंडित अनर्घ्यवसनाभरणीं॥कृष्णें नर्तितां रासरंगणीं॥मन्मथकदनीं रसभरिता ५००
रत्नजडित कार्तस्वर[2] ॥ विलोल श्रवणींचे अलंकार ॥ कंकणें मुद्रिका अनर्घ्य हार॥ शोभा रुचिर साभरणीं ॥ १ ॥
मौळवेणिका नासामुक्तें[3] ॥ रुक्म[4]विरचितें माणिक्ययुक्तें ॥ कंठाभरणें कंठासक्तें ॥ पदें सालक्तें[5] रंगितें ॥ २ ॥
कटिमेखळे क्षुद्रघंटी ॥ बाहुभूषणें बाह्यवटीं ॥ चरणीं क्वणित नूपुरदाटी ॥ निजबोभाटीं ध्वनि भरिती ॥३ ॥
ऐसिया वनिता सालंकारा॥कृत नर्मोक्ति[6] विविधा मधुरा॥रास समाजीं विलासचतुरा॥आह्मी श्रीधरा स्तवितसों॥ ४
जया उक्ति पडतां कानीं ॥ सहस्रगुणित आनंद मनीं ॥ कोंधाटे त्या कथाकथनीं ॥ चक्रपाणि प्रोत्साहूं ॥ ५ ॥
तेणें उत्साहभरितकामें ॥ आमुसीं रमिजे मेघश्यामें ॥ ज्यांमाजि त्या त्रियामा नर्में[3] ॥ आननपद्में कैं स्मरतो॥६॥
किंवा विसरोनि गेला अवघें ॥ भुलला नवनागराभोगें ॥ असो जें होऊनि गेलें मागें ॥ पुढें सवेगें प्रश्न कथीं॥७ ॥

अप्येष्यतीहदाशार्हस्तप्ताःस्वकृतयाशुचा ॥ संजीवयन्नुनोगात्रैर्यथैंद्रोवनमंबुदैः ॥ ४४ ॥

॥टीका॥ऐशा अपरा पुसती रमणी॥ह्मणती कृष्ण चातुर्यखाणी॥आपणानिमित्त बल्लवतरुणी॥ मन्मथकिरणीं संतप्ता
कृष्णवियोगशोकदुःखें ॥ गोपीवदनाब्जकानन सुके ॥ हें काय नाहीं त्या ठावुकें ॥ जाणे असिकें सर्वज्ञ ॥ ९ ॥ ॥२०॥

---

१ रात्री. २ स्वर्ण. ३ नथी. ४ सोन्याचीं. ५ अळित्यानें युक्त. ६ थट्टेचीं भाषणें.

तया संतापनिवारणा ॥ सदयहस्तें संस्पर्शना ॥ तत्पीयूषें गात्रजीवना ॥ करील कीं ना येऊनी ॥ १० ॥
जैशींच मेघवियोगें वनें ॥ ग्रीष्में संतप्त तीव्रकिरणें ॥ हें जाणोनि संक्रंदनें[1] ॥ सजीव करणें नवमेघीं ॥ ११ ॥
तैसाचि कृष्ण येईल काय॥आह्मां संतप्तां जीवनोपाय॥ करसंस्पर्शें अमृतप्राय ॥ करील निश्चयें वद ऐसें॥ १२ ॥
हें ऐकोनि गोपी येरी ॥ ह्मणती कासया मूर्खापरी ॥ वृथा बोलतां विरहातुरी ॥ गोष्टी अंतरीं विवरा गे ॥ १३॥

कस्मात्कृष्णइहायातिप्राप्तराज्योहताहितः ॥ नरेंद्रकन्याउद्वाह्यप्रीतःसर्वसुहृद्वृतः ॥ ४५ ॥

॥टीका॥कोणा कारणास्तव येथें ॥ परतोनि यावें कृष्णनाथें ॥ पावला राज्यैश्वर्यातें ॥ स्वशत्रूतें मर्दुनी॥ १४ ॥
आतां त्यासि काय उणें ॥ सालंकृत स्वगोत्रस्वजनें ॥ नरेंद्रांचीं कन्यारत्नें ॥ पाणिग्रहणें पर्णील ॥ १५ ॥
भूपोपभोग नृपासनीं ॥ हयगजसिबिका[2] नानायानीं॥ विलासकुशळ नृपनंदिनी॥ मन्मथकदनीं साभरणा[3] ॥ १६ ॥
अनुचर किंकर समर्याद॥ अमात्यसचिवांचे संवाद ॥ भाट बंदी सूत मागध ॥ नाना विनोद रुचविती ॥ १७ ॥
सामंतमांडलिकांचे गण ॥ विनीत करिती विज्ञापन ॥ तेथ आमुची आठवण ॥ त्यासि कोठून किमर्थ॥ १८ ॥
बाळपणीं व्रजीं होता ॥ आह्मां वांचूनि अन्य वार्ता ॥ नेणे ह्मणोनि अनन्यता ॥ क्रीडा करितां सस्निग्ध॥ १९ ॥
आतां महद्भाग्याच्या भरीं॥आमुचें स्मरण करील हरि ॥पुन्हा येऊनियां व्रजपुरीं ॥ आह्मां स्वकरीं स्पर्शेल॥ २० ॥
ऐसी किमर्थ धरणें आशा ॥ आमुचा विचंबु त्या कायसा ॥ आह्मी रानटा वनौकसा ॥मा येरी राजसा तरी पुसे २१

किमस्माभिर्वनौकोभिरन्याभिर्वामहात्मनः ॥ श्रीपतेराप्तकामस्याक्रियेतार्थःकृतात्मनः ॥४६॥

---

[1] इंद्रानें. [2] पालकी. [3] अलंकारयुक्त.

॥टीका॥हें ऐकोनि येरी वनिता॥वास्तवबोधें परमार्थता॥कृष्णपरामात्मा तत्वता॥त्या हे वृथा उपभोग ॥ २२ ॥
महानआत्मा ह्मणिजे धीर ॥ षड्गुणैश्वर्यवंत सधर ॥ त्यासि केतुला राज्यभार ॥ कायसा दारपरिग्रह ॥ २३ ॥
जो कां प्रत्यक्ष लक्ष्मीपति॥त्या हे केतुली नृपसंपत्ति॥आवाप्तकाम आत्मस्थिति॥नधरी आसक्ति लक्ष्मीची॥ २४
कृतात्मा जो पूर्ण स्वयें ॥ कोण अर्थ त्या सापेक्ष होये॥वृथा त्यातें आत्मविषयें ॥ कवळितां विरहें संतप्ता॥ २५॥
तो सर्वत्र अनासक्त ॥ सर्वसाक्षी सर्वातीत ॥ त्याची आशा धरूनि व्यर्थ ॥ विरहें संतप्त होतसां ॥ २६ ॥

परंसौख्यंहिनैराश्यंस्वैरिण्यप्याहपिंगला ॥ तज्जानतीनांनःकृष्णेतथाऽप्याशादुरत्यया ॥ ४७ ॥

॥टीका॥ज्या कारणास्तव कृष्णरति॥दुर्लभ सनकादिकांप्रति॥तद्दुराशा धरूनि चित्तीं॥व्याकुळा निश्चिती होतसों२७
यास्तव ऐका वो निरुतें ॥ परमसुख नैराश्यापरौतें ॥ नाहीं ऐसें जाणतसां तें॥नैराश्य सर्वांतें दुष्कर ॥ २८ ॥
दुष्कर ह्मणाल कोणेपरी॥तेंही ऐका हो सुंदरी॥सर्प लटिका कळल्या दोरी॥उचलूनि करीं मग घेती॥ २९ ॥
दोरी घेतलिया हातीं॥सर्पभयाची होय निवृत्ति॥तैसी आशा बाधक कळल्या चित्तीं॥नैराश्यस्थिति नबाणे॥ ३० ॥
करकंकणा दर्पण काई ॥ आह्मां हें कळलें असतां बाई ॥ दृढ नैराश्य नधरे देहीं ॥ इतरां काई ह्मणावें ॥ ३१ ॥
आह्मी जाणतसों पिंगळा॥वेश्या स्वैरिणी अमंगळा॥नैराश्यसुखाचा सोहळा॥भोगूनि सकळांतें वदली ॥ ३२ ॥
पिंगळा ह्मणाल कोठील कोण॥ऐका तयेचें संक्षेप कथन॥उद्धवासि बल्लवीगण॥अनुवादोन जाणविती ॥ ३३ ॥
मिथिला विदेहांची[2] नगरी॥पिंगला वेश्या तिये पुरीं॥वर्तत असतां स्वैराचारी॥तिसी अवसरी हे घडली॥ ३४ ॥
नित्य नूतन पुरुष तरुण॥त्यासि दावी तनुलावण्य॥कुलटाकौशल्यें भुलवून॥स्वभोगदानें धन इच्छी ॥ ३५ ॥

---

१ कसला. २ जनकराजाची.

कोण्हे एके सुदैवदिवशीं॥भोगार्थ पुरुष नजोडे तिसी॥आशा धरूनि निजमानसीं॥पर्ण्यवीथीसी निरखितसे ३६ ॥
ऐसी क्रमिली अर्धरात्री॥पुरुषमात्रा खुणावी नेत्रीं॥कोण्ही नजोडे सकामगात्री॥नपडे श्रोत्रीं तच्चर्चा ॥ ३७ ॥
ह्मणे वृथा हा शृंगार ॥ वृथा सुकले सुमनहार ॥ वृथा उदविलें शयनागार ॥ वृथा उपचार रतियोग्य ॥ ३८ ॥
वृथा चालिली आजिची रजनी॥पुरुष सधन तरुण शयनी॥आलिंगनीं मजलागुनी॥स्मररंगणीं नजोडे ॥ ३९ ॥
आतां नराशा निराश जाली॥दुराशा दुःखद मनीं उरली॥अर्ध रजनी क्रमोनि गेली॥गळीं मासोळीसम करपे ४०
पूर्व भाग्यें तिच्या मनीं ॥ विरक्ति उपजली तेक्षणीं ॥ ह्मणे आशा ही पापिणी ॥ दुःखश्रेणी मज वोपी ॥ ४१ ॥
ऐसें विवरूनि मानसीं॥विटली ग्राम्यजनविषयांसी॥दृढनैराश्यें त्दृदयस्थासी॥भजतां स्वसुखासि पावली॥ ४२ ॥
तेणें निष्कष्टनराशा त्यजिली॥दृढनैराश्यें सुख पावली॥आह्मांसि ते हे प्रतीति आली॥परी नवचे त्यजिली हरिआशा ४३
यालागीं नैराश्य दुर्लभतर॥साधावया मुनीश्वर॥शिणती परंतु दुराशा घोर॥नकढी बिढार अंतरींचें ॥ ४४ ॥
हें ऐकोनि येरी ललना॥ह्मणती मृगांभीं अमृतपाना॥साम्य करितां अंतःकरणा॥कां शंकाना साध्वी हो॥९४५॥

कउत्सहेतसंत्यक्तुमुत्तमश्लोकसंविदम् ॥ अनिच्छतोऽपियस्यश्रीरंगान्नच्यवतेक्कचित्॥४८॥

॥टीका॥जैसी दुराशा सांसारिक॥मुनिसुरमर्त्यां भवदायक॥तैसा नोहे उत्तमश्लोक॥हा परमपुरुष परमात्मा ४६॥
कृष्णसंगाची दुराशा वाढे॥तेणें भवभ्रम समूळ मोडे॥कृष्णध्यान जैं त्दृदयीं जडे॥तैं अभीष्ट चढे फळ हाता ४७॥
कृष्णसुखाची एकांतवार्ता॥त्यागावयार्थ उत्साह चित्ता॥कोण मानी अभाग्य पुरता॥निजात्महंता निर्दैव॥ ४८ ॥
कृष्ण नइच्छी कमलासंग॥परी ते नटकी त्याचें अंग॥कोणे काळींही वियोग॥नकरी अव्यंग सुखवासी॥ ४९ ॥

---

१ बाजाराला. २ मृगजळाला. ३ जन्ममरणप्रद.

नारदशुकसनकादिक ॥ कंजजहृत्कंजीं पदांक ॥ ध्याती विसरोनि सांसारिक ॥ ललनावेधक तो एथें ॥ ५० ॥
हृदयीं विसर पाडूं त्याचा ॥ सहसा स्मरण न करूं वाचा॥ अभिलाष नधरूं तत्संगाचा ॥स्मारक साचा परि तो कीं
स्मारक होय कवण्या गुणें ॥ उद्धवा कथिती तियें लक्षणें ॥ पूर्वीं रक्षिलीं गोधनें ॥ क्रीडाचरणें तें ऐक ॥ ५२ ॥

सरिच्छैलवनोद्देशागावोवेणुरवाइमे ॥ संकर्षणसहायेनकृष्णेनाचरिताःप्रभो ॥ ४९ ॥

॥टीका॥ कृष्ण स्ववेधें वेधी प्रबळ ॥ वेधें वेधिलें व्रजमंडळ ॥कोण्हा आंम्हीं ऐसें बळ ॥ जे तद्वेध शिथिल करावया
कृष्णविस्मृति आह्मां पडती ॥ दुःखनिवृत्ति तेणें घडती ॥ परी तें नघडे स्मृति वाढती॥ कोणे रीती तें ऐका॥ ५४
तिहीं श्लोकीं स्मृतिवर्धन ॥ श्रीकृष्णाचें लीलाचरण ॥ शुक भूपातें करवी श्रवण ॥ तें व्याख्यान अवधारा ॥ ५५
यमुनाप्रमुख अनेक सरिता ॥ रोधस्वंती[2] कां पुलिनवंता ॥ कृष्णक्रीडेसि यथोचिता ॥ आठव चित्ता त्या देती ॥
गोवर्धनप्रमुख अचळ ॥ उपात्तभूमि[3] गंडशैल[4] ॥ रोध सानु शिखरें उपळें[5] ॥ तें क्रीडास्थळ हरि स्मरवी ॥ ५७ ॥
दरे दरकुट्या गुहा विवरें ॥ प्रस्रवप्रपातजळें निर्झरें ॥ शैलकक्षा द्रुमकोटरें ॥ पाहतां स्मरे हरि हृदयीं॥ ५८॥
मधुवन तालवन कुमुदवन ॥ बेलभांडीरमुंजाविपिन ॥ क्षुद्रकानन कामोद्यान ॥ बहुळारण्य हरि स्मरवी ॥५९॥
कदंबद्रोणी बृहद्वन ॥ कृष्णाप्रियतम वृंदाविपिन ॥ व्रजीं केलें जें बाल्याचरण॥ तें तद्ध्यान उद्बोधी॥ ६० ॥
तृणावर्त्तप्रपातन ॥ वत्सासुराचें निबर्हण ॥ लीला केलें बकदारण ॥ कृष्णाचरण तें स्मरवी ॥ ६१ ॥ पाद-
स्पर्शें भंगिला शकट ॥ पूतनेचा भरिला घोंट ॥ अघासुराचा रोधिला कंठ ॥ स्मरे वैकुंठ तद्योगें ॥ ६२ ॥
यमुनाह्रदीं कालियमथन ॥ केशिअरिष्टप्रलंबहनन ॥ व्योमासुराचें केलें दमन ॥ तें तें कारण हरिस्मरणा॥ ६३

---

१ ब्रह्मदेव. २ ज्यांस कांठ आहेत त्या. ३ पर्वताचा पायथा. ४ पर्वतावरून कोसळून पडलेले मोठे दगड. ५ दगड.

इत्यादि वनोपवनींच्या क्रीडा ॥ गाईगोपाळांमाजिवडां ॥ वेणुवादकां परम सुघडा ॥ माजि पवाडा कृष्णाचा ॥
सप्तस्वरीं तानमानें ॥ आरोहावरोहरागज्ञानें ॥ षाडवऔडव[1]परिज्ञानें ॥ वेणुवादनें मन मोही॥६५ ॥ सवें संकर्षण
संवगडा ॥ सुबळ स्तोककृष्ण बोबडा ॥ पेंधा श्रीदामा वडजा वेडा ॥ धामा वांकुडा कृष्णसखे ॥ ६६ ॥
इत्यादिवयस्यांसमवेत ॥ शृंग मोहरी वेत्र धृत ॥ वन्यस्रजा[2]बर्हभूषित ॥ चीर सुपीत कौशेय ॥ ६७ ॥ ऐसी
क्रीडा वनोपवनीं ॥ अवनीं जीवनीं नंदभुवनीं ॥ घोषवीथी कां वृंदावनीं ॥ सशिशु नवनीतादि हरी ॥ ६८ ॥
प्रभो ह्मणोनि उद्धवासी ॥ सर्वज्ञ समर्थ जाणोनि त्यासी ॥ गोपी संबोधिती संतोषीं॥ह्मणती क्रीडा ऐसी हरि स्मरवी
देतां घेतां भूषणें लेतां ॥ खातां जेवितां प्राशन करितां ॥ कृष्णक्रीडा आठवे चित्ता ॥ तद्‌गुणकथा ते स्मरवी ॥

पुनःपुनःस्मारयंतिनंदगोपसुतंबत ॥ श्रीनिकेतैस्तत्पदकैर्विस्मर्तुंनैवशक्नुमः ॥५० ॥

॥टीका॥बत आश्चर्यें पुनःपुन्हा॥खेदें ह्मणती व्रजांगना॥नित्य नूतन देती स्मरणा॥क्रीडा नाना कृष्णाच्या॥७१ ॥
नंदगोपाचा नंदन ॥ दधिदुग्धांचें करी हरण ॥ यशोदे सन्निध बल्लवीगण ॥ करिती येऊन बोभाट॥ ७२ ॥
श्रीवत्सचिह्न वक्षस्थळीं ॥ सुरेख कस्तूरी केशर भाळीं ॥ माथां मयूरपिच्छावळी ॥ श्रवणयुगळीं कर्णिकारें७३ ॥
सालंकृत सविभ्रम ॥ क्रीडामंडित मिरवी धाम ॥ सबाह्य प्रकटे मेघश्याम ॥ विस्मृतिधर्म कैंवि घडे ॥ ७४ ॥
विसरों नशकों ऐशा कृष्णा ॥ विरहतापें क्षोभे तृष्णा ॥ साहों नशकों वियोगउष्णा ॥ पुसों तत्प्रश्ना गतत्रपा ७५
ऐकोनि हरीचा वेणुगीत ॥ परिष्वंगा इच्छी चित्त ॥ ऐकें उद्धवा तो वृत्तांत ॥ लीलाइंगित क्रीडेसी॥ ७६ ॥

---

[1] गायनभेद आहेत. [2] वनमाला व मयूरपिच्छें यांनीं सुशोभित.

गत्याललितयोदारहासलीलाऽवलोकनैः ॥ माध्व्यागिराहृतधियःकथंतंविस्मरामहे ॥ ५१॥

॥टीका॥कृष्णपरिष्वंगाकारणें[1]॥कात्यायनीव्रताचरणें॥प्रथम हेमंतीं यमुनास्नानें॥केलीं अरुणें नुदैजतां ॥ ७७ ॥
तया व्रताच्या शेवटीं ॥ कृष्णें येऊनि यमुनातटीं ॥ चीरें हरिलीं चुकवूनि दृष्टि ॥ कदंबापृष्ठीं वळघला ॥७८ ॥
शीतार्दिता यमुनाजळीं ॥ बैसोनि प्रार्थितां वनमाळी ॥ तेणें अभीष्ट केली रळी[2] ॥ ते तुजजवळी सांगतसों॥७९ ॥
तुह्मी व्रतस्था नग्न स्नानें॥करितां घडलीं सुरहेळणें॥तस्मात् प्रायश्चित्त करणें॥मदनुशासनें वनिता हो ॥ ८० ॥
नीपां[3]निकटीं अवघ्या जणी॥येऊनि वंदावा दिनमणि॥हें ऐकोनि अंतःकरणीं॥करी झडपणी जनलज्जा ॥ ८१ ॥
तथापि अभीष्ट सुखाची प्राप्ति॥यास्तव लज्जा ठेविली परती॥निःशंक येऊनि कृष्णाप्रति ॥ जोडिल्या हस्तीं रवि नमिला
तेव्हां प्रसन्न होऊनि हरि॥वरद वदला अभीष्टोत्तरीं॥पुण्योदयाच्या येतील रात्री॥कामना पुरी तैं करिन॥८३ ॥
तेथूनि आशा लागली मना॥वाढली दिवसेंदिवस कामना॥कृष्णें करितां वेणुगायना॥भरलों वना हृतचित्ता॥८४॥
कृष्णीं जाऊनि मिनलों कैशा॥नधरत सागरीं सरिता जैशा॥कृष्णसंगें क्रमिल्या निशा॥त्या मानसा आठवती॥ ८५ ॥
वनीं जीवनीं पुलिनीं भुवनीं॥श्रीकृष्णाच्या आलिंगनीं॥सुख भोगिलें तें अनुदिनीं॥विस्मृति मनीं पडों नेदी ॥ ८६॥
रासक्रीडेचीं इंगितें ॥ श्रीकृष्णाचीं विचेष्टितें ॥ त्यांचा विसर पाडितां चित्तें ॥ नपडे कल्पांतीं पैं आह्मां॥ ८७ ॥
श्रीकृष्णाची ललितगति॥सस्मित उदार अपांगपातीं॥सुधा नसरे तन्मधुरोक्ति॥इहीं इंगितीं मन मोही ॥ ८८॥
चित्तें हिरोनि नेलीं ऐसीं॥नुसतीं प्रेतें फिरतों पिसीं॥आतां विस्मृति पडेल कैसी॥निजमानसीं॥तूं विवरीं॥८९॥
ऐसें बोलोनि उद्धवाप्रति॥तंव जाकळी कृष्णस्मृति॥तेणें विवश कृष्ण स्मरती ॥ तें तूं नृपति अवधारीं ॥९० ॥

---

[1] श्रीकृष्णाच्या आलिंगनाकरितां. [2] थट्टा. विनोद. [3] कदंबापाशीं.

हेनाथहेरमानाथव्रजनाथार्तिनाशन ॥ मग्नमुद्धरगोविंदगोकुलंवृजिनार्णवात् ॥ ५२ ॥

॥टीका॥ श्वसित[1] ह्मणती भो भो नाथा॥तुज विण दिसतसों अनाथा॥आह्मां जाकळी विरहव्यथा॥कीं ते समर्था नेणसी त्वं
॥९०॥रमानाथ तूं त्रिजगद्धर्ता॥कृपापांगें निवविसी आर्ता॥प्रपन्नार्तिहर सुखकर्ता ॥आमुची वार्ता कां त्यजिली॥९२॥
इंद्र वरुण यम कुबेर ॥ अग्नि नैर्ऋति वायु ईश्वर ॥ ऐसे तुझे पादुकाधर ॥ आह्मां सहचर तो कीं तूं ॥ ९३ ॥
अनंत ब्रह्माण्डपालनपटु॥व्रजीं अवतरूनिआह्मांनिकटु॥ क्रीडाकौतुकें एकवटु ॥ केलीं निपट स्निग्धत्वें ॥ ९४ ॥
सकळव्रजाचा तूं नाथ॥तुवां त्यजितां व्रज अनाथ॥अर्थ स्वार्थ आणि परमार्थ॥आह्मां सत्पथदर्शक तूं ॥९५ ॥
इंद्र वर्षतां सक्रोध घणवां[2]॥व्रजार्थ गिरिवर धरिला कणवां[3]॥व्रज वांचविला गिळूनि वणवा॥तैं भेरी पणवां[4] सुर वाती
९६ऐशा अनेक व्रजार्ति हरिल्या॥सुरसंपदा व्रजीं भरिल्या॥प्रेमपोषका व्यक्ति धरिल्या ॥ बहु उद्धरिल्या व्रजरामा
॥९७आतां निष्ठुर जालासि कैसा॥अक्रूरें नेतां दूरदेशा॥हरिलें आमुचिया मानसा॥तें कां परेशा नाठविसी॥९८॥
कें मथुरेचा राज्यलोभ ॥ रमानाथ तूं पद्मनाभ ॥ आमुचें पुरवूनि वालभ ॥ कें दुर्लभ हों पाहसी ॥९९॥ गोविंद
तूं गोगणवेत्ता॥तरी कां नेणसी गोकुलव्यथा ॥ आमुची जाणूनि विरहावस्था ॥भो व्रजनाथा ते निरसीं६००॥
तूं गेलासि मथुरापुरीं ॥ गोकुळ बुडतें भवदुस्तरीं ॥ दुःखार्णवापासूनि तारीं ॥ धांव मुरारि कृपाळुवा ॥ १ ॥
हा हा करूनि चुरिती हात॥कंठ दाटोनि स्फुंदती रुदत॥ह्मणती आमुचा प्राणनाथ॥ कां पां समर्थ अंतरला॥२ ॥
अहा अहा रे अदृष्टा[5] ॥ नाहीं पुरता सुकृतसांठा ॥ कृष्ण भोगूनि असंतुष्टा ॥ शेखीं[6] संकटा वरपडलों[7]॥ ३ ॥

---

१ धावऱ्या. २ वृष्टि. ३ कृपेनें.४ वाद्यविशेषाला. ५ दैवा. ६ शेवटीं. ७ प्राप्त झालों.

करुणवत्सला मुरारि ॥ गोकुळ पडलें दुःखसागरीं ॥ निष्ठुर नहोईं अंतरीं ॥ तारीं झडकरी कृपाळुवा ॥ ४ ॥
शुक ह्मणे गा परीक्षिति॥ऐशा विरहिणी विलपती॥उद्धवें देखोनि आपुल्या चित्तीं॥ह्मणे यां श्रीपति तुष्टला॥५॥

॥२४॥ ॥श्रीशुकउवाच ॥ततस्ताःकृष्णसंदेशैर्व्यपेतविरहज्वराः ॥ उद्धवंपूजयांचक्रुर्ज्ञात्वाऽऽत्मानमधोक्षजम्॥५३॥ ॥४७॥

॥टीका॥त्यानंतरें कौरवपाळा॥कृष्णसंदेश ऐकोनि अबळा॥वरपडिलिया विरहानळा॥उद्धवें सकळा निवविल्या६॥
कृष्णप्रणीत अध्यात्मयुक्ति॥उद्धवें बोधितां बोधकशक्ती॥प्रतीति येतां वनिताचित्तीं॥ सुखविश्रांति पावल्या ॥ ७ ॥
प्रतीति ह्मणाल कैसी कोण॥तरी नंदनंदन नोहे कृष्ण॥ज्याहूनि अर्वाक्[1] अक्षजज्ञानें[2]॥तो हा भगवान् अधोक्षज॥८॥
आत्मा व्यापक अधोक्षज ॥ सर्वात्मकत्वें तेजःपुंज ॥ आपण तोचि अभिन्न सहज ॥ हें निजगुज उमजल्या ॥ ९ ॥
जाणोनि अधोक्षज आपण ॥ सर्वात्मकत्वें पाहती कृष्ण ॥ ऐशा अनुभवें संपन्न ॥ पूजिती पूर्ण उद्धवा त्या ॥ १० ॥
उद्धवें त्यांचिया प्रेमभावें ॥ विशेषप्रार्थनागौरवें ॥ कृष्णकौतुकाविष्टजीवें ॥ केला स्वभावें व्रजवास ॥ ११ ॥

उवासकतिचिन्मासान्गोपीनांविनुदञ्शुचः ॥ कृष्णलीलाकथांगायन्रमयामासगोकुलम् ॥ ५४ ॥

॥टीका॥गोपिकांचें श्रमापहरण॥करावयार्थ प्रेरी कृष्ण॥हरिआज्ञा हे मुकुटीं धरून॥ उद्धव आपण स्थिर झाला ॥
सकळां व्रजौकसांची भक्ति॥नंदयशोदेची ही आर्ति ॥ जाणोनि निववी मधुरा उक्ती ॥ हरिगुणकीर्ति वर्णूनी ॥ १३ ॥
कृष्णगुणांचें करिती कथन॥ तेथें सादर करी श्रवण ॥ प्रेमें परिसती त्यांपें[3] पूर्ण ॥ हरिगुणवर्णन स्वयें करी॥१४॥ ॥२४॥
ऐसा व्रजजन निजसंगती ॥ गातां ऐकतां कृष्णकीर्ति ॥ उद्धवें पावविली विश्रांति ॥अहोराती नित्य नवी ॥ १५ ॥

---

१ अलीकडे. २ इंद्रियज्ञान. ३ त्यापाशीं-उद्धवापाशीं.

एवं कित्तेक मासवरी ॥ उद्धवें राहूनियां व्रजपुरीं ॥ गोपिकांचा संताप दुरी ॥ केला यापरी कुरुवर्या ॥ १६ ॥

यावंत्यहानिनंदस्यव्रजेऽवात्सीत्सउद्धवः ॥ व्रजौकसांक्षणप्रायाण्यासन्कृष्णस्यवार्तया ॥ ५५ ॥

॥टीका॥नंदगोकुळीं जितके दिवस॥केला होता उद्धवें वास॥क्षणप्राय तो व्रजौकसांस॥वाटे क्लेशपरिहारें ॥ १७॥
हरिगुणकीर्तनसुधापानें ॥ नितांत[१] निवली श्रवणें मनें ॥ उद्धवसहवास येणेंगुणें ॥ अल्प मानणें व्रजौकसीं ॥ १८॥
व्रजौकसांचें आर्तिहरण ॥ ना तें उद्धवा प्रेम गहन ॥ कृष्णक्रीडावनोपवन ॥ निवे पाहोनि तें ऐका ॥ १९ ॥

सरिद्वनगिरिद्रोणीर्वीक्षन्कुसुमितान्द्रुमान् ॥ कृष्णंसंस्मारयन्रेमेहरिदासोव्रजौकसाम् ॥ ५६ ॥

॥टीका॥यमुनाप्रमुख नानासरिता॥कुंजकाननें पिहित[२]लता॥गोवर्धनाद्रि अधोर्ध्व भवंता॥पाहे पुरता हरिचर्या॥२०॥
गुहागह्वरें[३] वप्रें[४] शिखरें ॥ प्रफुल्ल वल्ली द्रुम कांतारें ॥ कृष्णक्रीडितें पाहोनि नेत्रें ॥ सप्रेमभरें हरि हृदयीं ॥ २१॥
हरिक्रीडेचीं पाहतां भुवनें ॥ उद्धव निवे स्वांतःकरणें ॥ गोपी गोपाळ व्रजस्थें जनें ॥ तत्तत्स्मरणें निववितसे॥२२ ॥
हरिदासां जो अग्रगणी॥तो उद्धव निवोनि स्वांतःकरणीं॥हरिक्रीडेच्या अनुस्मरणीं॥व्रजा लागूनि अभिरमवी ॥ २३
ऐसा उद्धव कित्तेक मास॥करितां व्रजजनीं सहवास ॥ गोपिकांचा प्रेमोत्कर्ष ॥ देखोनि संतोष पावला ॥ २४ ॥
नंद यशोदा सुहृदां स्वजनां॥अजा अविकां पशु गोधना॥कृष्णें वेधलें व्रजस्थां जनां॥ परी नपवती तुळणा गोपींची॥
जीवन जिवलग सर्वां जीवां॥तेंवि व्रजजन प्रिय केशवा ॥ मत्स्या वियोग नसाहवे केव्हां॥ गोपीभावा ते तुळणा॥२६॥
कुलटा स्वैरिणी जारनिपुणा॥कुंकुमकज्जलवसनाभरणा॥सालंकृता लावण्यगुणा॥कामुकां तरुणां भुलविती ॥ २७॥

---

१ अत्यन्त. २ लतांनीं आच्छादित. ३ दऱ्या. ४ पर्वतांचे कडे.

मधुरनर्मोक्तिभाषणें ॥ ठाणठकारें[1] कटाक्षबाणें ॥ चाटुचटुलकुलटाचिह्नें ॥ विंधिती मनें भुजंगांचीं[2] ॥ २८ ॥
तैशा स्वैरिणी नव्हती गोपी॥निष्काम साधक जपी तपी॥योगी विरक्त निर्विकल्पी॥तेंवि हरिरूपीं रंगल्या ॥ २९ ॥
ज्ञानी विवेकविरागवंत॥व्यतिरेकबोधें निजात्मरत ॥ साधनसंपन्न उपरमयुक्त ॥ कृष्णीं निरत या तैशा ॥ ३०॥
नाहं देहो नेंद्रियगण[3] ॥ नाहंकार नाहं प्राण ॥ इत्यादि व्यतिरेकें निरसन ॥ करिती सज्ञान गुरुवचनें ॥ ३१ ॥
गोपीलागिं ते स्वयंभ दशा॥बाणली नकरितां शास्त्राभ्यासा॥होऊनि भवभानीं उदासा॥कृष्णपरेशा अनुसरल्या॥ ३२
तनुलावण्या वस्त्राभरणा ॥ गात्रा नेणती नग्नानग्ना ॥ पतिपुत्रादि स्वजना सदना॥सर्व ईषणा नस्मरती ॥ ३३ ॥
दृश्याभासा घालूनि पाणी॥विमुख जालिया तन्मात्रज्ञानीं॥केवळ निद्रिता भवभानीं॥रतल्या कृष्णीं आत्मत्वें॥३४॥
सांख्यवेदांतपरिशीलनें॥नित्यानित्यविवेकज्ञानें ॥ साधनसंपत्तिव्याख्यानें ॥ तें स्वयंभ लक्षणें गोपींचीं ॥ ३५ ॥
शास्त्राधारें शब्द वदती॥आंगीं दुर्लभ अपरोक्षस्थिति॥दशासिद्धि त्यां केउती॥मा कृष्णप्राप्ति कैंवि घडे ॥ ३६ ॥
गोपिकांचा अगाध महिमा॥वेधें विसरल्या भवसंभ्रमा॥प्रेमें रतल्याआत्मयारामा॥ पूर्णकामा श्रीकृष्णा ॥ ३७ ॥
ऐसा विवेक बहुधापरी॥उद्धव आपुले हृदयीं विवरी ॥ तो तूं कुरुवर्या अवधारीं ॥ शुकवैखरी वदतसे ॥ ३८ ॥

दृष्ट्वैवमादिगोपीनांकृष्णावेशात्मविक्लवम् ॥ उद्धवःपरमप्रीतस्तानमस्यन्निदंजगौ ॥ ५७ ॥

॥टीका॥ऐसी पूर्वोक्त बहुतां परी॥ऐकोनि गोपींची वैखरी॥व्रजीं राहोनि चिरकाळवरी॥ अवस्था नेत्रीं पाहोनी ३९ ॥ ॥२५॥
कृष्णाकार जालीं मनें॥ कृष्णीं उपरम पावलीं करणें ॥ कृष्णावेशें आविष्करणें ॥ जिणें मरणें तन्निष्ठ॥ ४० ॥

---

[1] टाकमटिकल्यानें, [2] विलासिजनांचीं. [3] मी देहेंद्रियप्राणादि नव्हें, तर केवळ शिव आहे.

शरीरभावीं परम ग्लानि ॥ क्षुधे तृषेची नेणती हानि ॥ कृष्णविरहाचा दावाग्नि ॥ तावी ह्मणोनि बरळती॥ ४१॥
क्षुधा तृषा नेणती कांहीं ॥ तेणें प्राणांसि विकळता देहीं ॥ परी ते मनासि ठाउकी नाहीं ॥ध्यानप्रवाहीं उन्मन तें
सर्वदा कृष्णक्रीडाध्यान ॥ तेणें सदैव मन उन्मन ॥ प्रवृत्तीसी पडिलें शून्य ॥ प्रपंचभान मावळलें ॥ ४३ ॥
ऐसी गोपींची देखोनि स्थिति ॥ उद्धवें चमत्कारूनि चित्तीं ॥ धन्य मानूनि परम प्रीति ॥करी प्रणति गोपींतें॥
पुरस्कारोनि[1] वारंवार ॥ सप्रेम घाली नमस्कार ॥ ह्मणे धन्य हा व्यभिचार ॥ कैवल्यपर अवघाची॥ ४५ ॥
नमीत होत्साता गोपींतें ॥ उद्धव विवरी आपुल्या चित्तें ॥ शास्त्रज्ञ दोष देखती येथें ॥ धर्मशास्त्रातें लक्षूनी॥ ४६
प्रत्यक्ष जे कां आपुली जननी ॥ अथवा सर्वत्र गुरूची पत्नी ॥ सामान्य सर्वत्र वर्णा ब्राह्मणी॥नमितां श्रेणी पुण्याच्या
वैश्यवर्णी गोपवनिता॥म्यां क्षत्रियें यालागिं नमितां॥ वर्णविभागें अयोग्यता ॥ धर्मशास्त्रता[2] प्रतिभासे ॥ ४८ ॥
शास्त्रदृष्टीच्या परिहारा ॥ वर्णी गोपींच्या अधिकारा ॥ ह्मणे प्रेमळा कैवल्यपरा ॥ महत्त्वें थोरा व्रजललना॥ ४९
श्लोकपंचकें उद्धवगीत ॥ क्षणैक परिसा सावधचित्त ॥ ज्याच्या श्रवणें सभाग्य भक्त॥ अधिकारवंत जाणवती॥५०॥

एताःपरंतनुभृतोभुविगोपवध्वोगोविंदएवनिखिलात्मनिरूढभावाः ॥
वांछंतियद्भवभियोमुनयोवयंचकिंब्रह्मजन्मभिरनंतकथारसस्य ॥ ५८ ॥

॥टीका॥उद्धव ह्मणे इये धरणी ॥ देहधारी जितुके प्राणी ॥ त्यांमाजि या व्रजमानिनी॥ धन्य जन्मोनि भूलोकीं ॥५१
धन्य सफळ जन्म यांचें ॥ ऐका रहस्य या वाक्याचें ॥ नैसर्गिक प्रेम साचें ॥ परमेश्वरीं यां घडलें ॥ ५२ ॥

---

[1] सत्कार करून. [2] धर्मशास्त्रप्रमाणें.

गोष्ठा गोमय गोगोविंद ॥ अखिलात्मा जो परमानंद ॥ त्याच्या ठायीं कृतसौहार्द ॥ प्रेमा विशद पैं यांचा ॥५३
सदनीं धनीं तनुसंतानीं ॥ पृथक्प्रेमा वाढे मनीं ॥ प्रवृत्तिविसरें एकवटुनी ॥ अवघा कृष्णीं तो यांचा ॥ ५४ ॥
नितरां ह्मणिजे अतिशयेंसीं ॥ रूढभाव ह्मणिजे ज्यासी ॥ नैसर्गिक तो प्रेमा यांसी ॥ पूर्वपुण्येंसीं जोडला ॥ ५५
जन्ममरणांचा ज्यांसि धाक ॥ तापत्रयाची धुकधुक ॥ कर्मबंधें त्रासले लोक ॥ मोक्ष निष्टंक इच्छिती ॥ ५६ ॥
ऐसिया मुमुक्षुवर्गाप्रति ॥ नैसर्गिक भगवद्रति ॥ श्रमतां नजोडे कल्पांतीं ॥ जे व्रजयुवति लाधलिया ॥ ५७ ॥
अथवा मनातें धरूनि मुठी ॥ मननशीळही मुनिजन हठी ॥ येहीं कष्टतां बहुसंकटीं ॥ प्रेमा पोटीं हा नुपजे ॥ ५८
संकल्पाचा करूनि न्यास[1] ॥ कर्मत्यागें कृतसंन्यास ॥ गोपींऐसा प्रेमा विशेष ॥ तेही निःशेष नलाहती ॥ ५९ ॥
योगाभ्यासी जितप्राण[2] ॥ त्यांसही हा प्रेमा गहन ॥ नलभे करितां अनेक शीण ॥ बल्लवीगणसमसाम्य ॥ ६० ॥
अथवा आह्मी सात्वत भक्त ॥ भगवत्प्रेमें भवविरक्त ॥ ऐसिया आह्मांही अप्राप्त ॥ प्रेमा निश्चित गोपींचा ॥ ६१ ॥
तीर्थवासी मरती शिणें ॥ याज्ञिकें श्रमती मखसाधनें ॥ तापसें करिती व्रताचरणें ॥ तनुशोषणें कृच्छ्रादि ॥ ६२ ॥
वेदशास्त्रादि स्तोत्रपाठ ॥ नानादेवताराधननिष्ठ ॥ पुरश्चरणाचे साहती कष्ट ॥ परि हा उद्भट भाव न त्यां ॥ ६३
निसर्गप्रेमा दुर्लभ दानीं ॥ नलभे आपूर्तादि[3]साधनीं ॥ नजोडे जपजाप्यविधानीं ॥ गोपींलागूनि फळला जो ॥
यालागीं पावन भगवत्प्रेमा ॥ किमर्थ योनि उत्तम अधमा ॥ वृथाचि आभिजात्यादि[4]गरिमा ॥ पुरुषोत्तमा भाव प्रिय
जनकशुक्लें जननीजठरीं ॥ गात्र परिणमे नवमासवरी ॥ जन्म पावे योनिद्वारीं ॥ तें निर्धारीं शौक्ल जन्म ॥ ६६ ॥
शौक्ल जन्म सर्वां जाती ॥ विशेष वर्णाग्र्यमहंती ॥ तेथिंची ऐकावी व्युत्पत्ति ॥ सावध श्रोतीं होऊनी ॥ ६७ ॥

---

१ त्याग. २ शरीरस्थवायु ज्यांनीं स्वाधीन केले, ते. ३ तळीं, विहिरी इ० ४ कुलीनता इ०

करावया वेदपठन ॥ अधिकारसिद्ध व्रतबंधन ॥ सावित्रं[1] जन्म त्या अभिधान ॥ वैश्यान्तत्रिवर्णपर्यंत ॥ ६८ ॥
यज्ञाधिकारसिद्धीसाठीं ॥ ब्राह्मण सर्वां वर्णां मुकुटीं ॥ श्रौतदीक्षा मखपरिपाटीं ॥ तृतीय जन्म दैक्षाख्य[2] ॥ ६९
वृथाचि ऐसीं त्रिविध जन्में ॥ वृथाचि श्रौतस्मार्तादि कर्में ॥ वृथा वाहिजे वर्णाग्र्यगरिमे ॥ हरिपदप्रेमें नरंगतां ॥
अग्रवर्णाच्या या गोठी ॥ तेथ कायशा सामान्यकोटी॥ असो जो सर्वलोकांही मुकुटीं॥ तो ब्रह्मा शेवटीं नतुळेची ७१
येथ ब्रह्माचि नसरता ॥ कायसी ब्रह्मलोकाची कथा ॥ ब्रह्मलोकावाप्ति वृथा ॥ कर्मठें इच्छितां नलजती ॥ ७२ ॥
विद्या वयसा रूप बळ ॥ सत्ता संपदा कुळ शीळ ॥ भगवत्प्रेमेंवीण वोफळ ॥ जैसें मृगजळ श्रम न हरी ॥ ७३ ॥
श्रेष्ठजन्माचा अतिशय वृथा ॥ सत्यलोकादि कायसी कथा ॥ भगवत्प्रेमा प्राप्त नसतां ॥ शीणाचि नुसता सर्वत्र ॥७४॥
होका कोण्ही जातिविशेष ॥ कोण्हे योनिमाजि वास ॥ परि गोपींऐसा प्रेमोत्कर्ष ॥ लाहतां सारांश हरिप्राप्ति ॥ ७५ ॥
तेंचि जन्म उत्तमोत्तम ॥ कुळ शीळ रूप नाम ॥ धन्य तेंचि धर्म कर्म ॥ भगवत्प्रेम जे ठायीं ॥ ७६ ॥ शुक
ह्मणे गा कुरुकुळनरपा ॥ हरिरति दुर्लभ कंजजगरपां[3] ॥ ते हे सुलभ अबळां गोपां ॥ प्रौढां स्तनपां गोवत्सां ॥
ऐसीच आणखी एक परी ॥ भगवत्प्राप्ति निजनिर्धारीं ॥ तेही राया तूं अवधारीं ॥ उद्धव वैखरी जें वदला ॥७८ ॥
अनंताचिया अनंत कथा ॥ त्रिजगीं विस्तृता गुणगणभरिता ॥ तद्रसपानीं सादर श्रोता ॥ गोपीसमता तो पावे ॥
जातिवर्ण त्या नलगे श्रेष्ठ ॥ सप्रेमभावें श्रवणनिष्ठ ॥ विधिहरशक्रांहूनि वरिष्ठ ॥ मानी वैकुंठ प्रियतम त्या ॥ ८० ॥
तस्मात महत्त्वा कारण ॥ तो हा भगवत्प्रसाद पूर्ण ॥ भगवत्प्रेमोपलब्धीविण ॥ जन्म वर्ण सर्व वृथा॥ ८१ ॥
भगवत्प्रेमाचिये प्राप्ति ॥ कुळ शीळ वर्ण जाति ॥ अथवा ज्ञानाची संपत्ति ॥ नलगे व्युत्पत्ति बहुशास्त्रीं ॥ ८२ ॥

---

[1] सावित्रीमंत्रोपदेशानें प्राप्त झालेलें. [2] यज्ञदीक्षासंबंधी. [3] कंजज-गरप ह्म० ब्रह्मा-शंकर.

तरी ते कैंवि चढे हाता ॥ ऐसा संदेह बाधी चित्ता ॥ केवळ भजनें हरिएकांता ॥ प्रेमोत्कटता वश होय ॥ ८३ ॥
तें या श्लोकीं निरूपण ॥ उद्धव विवरी अनुतापोन ॥ श्रोतीं करूनि मनाचे कान ॥ हें व्याख्यान परिसावें ॥ ८४ ॥

क्वेमाःस्त्रियोवनचरीर्व्यभिचारदुष्टाःकृष्णेक्वचैषपरमात्मनिरूढभावः ॥
नन्वीश्वरोऽनुभजतोऽविदुषोऽपिसाक्षाच्छ्रेयस्तनोत्यगदराजइवोपयुक्तः ॥ ५९ ॥

॥टीका॥उद्धव ह्मणे कोण या स्त्रिया॥वनौकसा वनचरप्रिया॥नेणती विधानविधिचातुर्या॥श्रुतिपथचर्या अश्रुत यां ॥
केवळ मूढा श्वापदवत॥परम तुच्छ यांचें जीवित॥अधिकार पाहतां अपाडं[1] बहुत॥कीं हरिएकांत यां योग्य॥८६॥
तथापि व्यभिचारप्रेमेंकरून ॥ ज्यांचें वर्तन सदूषण ॥ व्यभिचारदुष्टा हें अभिधान ॥ श्रुतिधर्मज्ञ ठेविती ॥ ८७ ॥
ऐसियां आणि हरिएकांत ॥ उन्मत्तपुष्पीं[2] उमाकांत॥ तैंवि व्यभिचारें त्रैलोक्यनाथ ॥ रानटां प्राप्त अघटित हें॥ ८८
अह्मो श्रुतिपथधर्माभिमानी ॥ युगीं युगीं चक्रपाणि ॥ नानारूपें अवतरोनी ॥ धर्मस्थापनीं प्रवर्त्ते ॥ ८९ ॥
तो हा अधर्मव्यभिचारपथें ॥ इहीं स्ववश केला येथें ॥ अधर्ममार्गें स्वधर्मकृत्यें ॥ इहीं समस्तें लाजविलीं ॥९०॥
श्रुताध्ययनीं विमुखा नारी ॥ तथापि केवळ या वनचरी॥ अधर्मस्वधर्ममार्गकुसरी॥कोणे संसारीं नेणती ॥ ९१ ॥
तिहीं व्याभिचारप्रेमभावें ॥ भगवन्निष्ठा वरिली जीवें ॥ विधिविधान नाहींच ठावें ॥मा जेणें घडावें दूषण॥ ९२॥
तस्मात वेदशास्त्रपुराणयोग्यता॥ तुळितां नतुळे सप्रेमपथा॥प्रेमें पाविजे हरिएकांता॥विधान वृथा तद्रहिता॥ ९३
बाळक शब्दचातुर्य नेणे ॥ कोंडोळ्यासि कोमडें ह्मणे ॥ परि तें माता अंतर जाणे ॥तैंवि सर्वज्ञें जगदीशें ॥ ९४ ॥

---

१ तुलनारहित. २ धोतऱ्याचे फुलाचे ठायीं.

गोवाची पुदी बोबडावाणीं॥बाळक मागे अज्ञानपणीं॥त्या गुळाची पुरी वोपी जननी ॥अनर्थचि आणी सरळार्था॥९५
कीं तें अनन्यभावें जननी॥वांचूनि त्रिजगीं श्रेष्ठ नमनी ॥तेंवि निरूढ प्रेमा कृष्णीं ॥ व्रजकामिनीबहुपुण्यें॥ ९६ ॥
भजनोपलब्धप्रेमभरें ॥ कृष्णीं रंगलिया व्यभिचारें॥अंतर जाणोनि कमलावरें॥आत्माकारें रमविलिया ॥ ९७ ॥
बहुतेक ईश्वर जो सर्वज्ञ॥त्यासि अविदुष[1] ज्ञानहीन ॥भजतां त्याचें न्यून पूर्ण ॥ करी कल्याण प्रसादें ॥ ९८ ॥
परिस जैसें कां लोहाचें॥दैन्य फेडूनि कांचन साचें॥करी तैसेंचि व्यभिचाराचें॥दूषण पालटी हरितुष्टि ॥ ९९ ॥
कीं तमाढ्य कुहूचे[2] रातीं॥दैवें उगवलिया गभस्ति॥तैं तो तमत्वा करी निवृत्ति॥धवळी जगती निज तेजें॥७००
कीं उपयुक्त सुधारस ॥ सर्व रोगांचा करी नाश ॥ नपाहे आयुर्विधानास ॥ चिकित्सा[3] त्रिदोष नविचारी॥ १ ॥
तेंवि भजनोपलब्धप्रेमें ॥अविदुष भजतां अविधिक्रमें॥परि अनन्य जाणोनि पुरुषोत्तमें॥कैवल्यधामें गौरविजे॥ २ ॥
साक्षाच्छ्रेय तो अपवर्ग ॥ वोपी नमगतां अव्यंग ॥ बळिष्ठ सप्रेमभजनमार्ग॥त्याविण व्यंग विधिपदवी॥ ३ ॥
जाति चंपक शेंवती बकुळा॥पासूनि कनकौळें जासनीळा॥प्रियतम नगणोनि परिमळा॥तेंवि गोपाळा व्रजललना॥४ ॥
तें या श्लोकीं निरूपण ॥ उद्धव बोले चमत्कारून ॥ शुकें नृपासि केलें कथन ॥ तें व्याख्यान अवधारा ॥ ५ ॥

नायंश्रियोंऽगउनितांतरतेःप्रसादःस्वर्योंषितानलिनगंधरुचांकुतोऽन्याः ॥
रासोत्सवेऽस्यभुजदंडगृहीतकंठलब्धाशिषांयउदगाद्व्रजबल्लवीनाम् ॥ ६० ॥

॥टीका॥ अपूर्व गोपींवरी प्रसाद॥करिता झाला जो मुकुंद॥पूर्वीं श्रियादि प्रेमळ वृंद॥कोणी विशद नलाहती ॥६ ॥

---

[1] अपण्डित. [2] जींत चन्द्रकलादर्शन मुळींच नाहीं ती अमावास्या. [3] रोगाचा प्रतीकार.

ललनारत्न लक्ष्मी श्रेष्ठ ॥ सागरसंभवा वरिष्ठ ॥ ऐश्वर्यसौभाग्यें एकनिष्ठ ॥ तेही फलकट गोपींसीं ॥ ७ ॥
लक्ष्मी निजांगीं वक्षस्थळीं ॥ पादसेवनीं चरणकमळीं ॥ तीसि हे प्रसादनव्हाळी ॥ कोण्हे काळीं अप्राप्त ॥ ८ ॥
जयेसि सर्वदा एकांतरति ॥ अनन्यनिरता सुभगा सती ॥ गोपीप्रसादाची प्राप्ति ॥ तेही कल्पांतीं नलाहे ॥ ९ ॥
उकारार्थें आश्चर्य मोठें ॥ हेंचि राया आह्मांसि वाटे ॥ जें नलाहती नितांत निकटें ॥ तें लाहती रानटें गोवळियें ॥ १० ॥
आणि लक्ष्मीच्या सहोदरी[1] ॥ ज्या जन्मल्या क्षीराब्धिजठरीं ॥ पद्मगंध ज्यांच्या शरीरीं ॥ पद्मकांति पद्माक्षी ॥ ११ ॥
पद्माकृति करपदतळें ॥ पद्मवदना लावण्यमेळें ॥ मनसिज ज्यांच्या प्रतापबळें ॥ जिंके सगळें ब्रह्मांड ॥ १२ ॥
ज्यांचा तापसांसि दरारा ॥ ऐसिया स्वर्गांगना अप्सरा ॥ गोपींसमान त्याही चतुरा ॥ प्रसादपरा नहोती ॥ १३ ॥
तेथ इतरा प्राकृतनारी ॥ केंवि या प्रसादा अधिकारी ॥ ह्मणसी कोण ते प्रसादथोरी ॥ ते अवधारीं कुरुनरपा ॥ १४ ॥
लक्ष्मी चिरकाळ इच्छी रति ॥ तीसि दुर्लभ श्रीपदप्राप्ति ॥ तो बलात्कारें कमलापति ॥ गोपींप्रति आळंगी ॥ १५ ॥
रासक्रीडेच्या आनंदें ॥ भुजदंड पसरूनि श्रीमुकुंदें ॥ आलिंगूनि आनंदकंदें ॥ बल्लवीवृंदें तोषविलीं ॥ १६ ॥
कंठीं संलग्न होतां हरि ॥ लाधल्या प्रसादसिंधुलहरि ॥ तेचि दुर्लभ सर्वांपरी ॥ समता नकरी कमलाही ॥ १७ ॥
तया आनंदाचा लेश ॥ दुर्लभ सहसा विधिहरांस ॥ कदा नलाहती खगेंद्रशेष ॥ सनकादिकांस अप्राप्य ॥ १८ ॥
ऐसा गोपींचा भाग्यमहिमा ॥ वर्णूं नशके फणींद्र ब्रह्मा ॥ तो तुज कथिला श्रवणकामा ॥ नृपसत्तमा संक्षेपें ॥ १९ ॥

आसामहोचरणरेणुजुषामहंस्यांवृंदावनेकिमपिगुल्मलतौषधीनाम् ॥
यादुस्त्यजंस्वजनमार्यपथंचहित्वाभेजुर्मुकुंदपदवींश्रुतिभिर्विमृग्याम् ॥ ६१ ॥

---

[1] भगिनी-अप्सरा.

॥टीका॥यावरी उद्धव वांछी मनीं॥मजवरी तुष्टेल चक्रपाणि॥तरी मी होईन वृंदावनीं॥व्रजपदघसणी तृणवल्ली॥२०
या गोपींचे पदरजरेणु॥सेविती जे जे उद्भिज्ज[१]गण॥त्यांमाजि कोण्हीएक सामान्य॥होईन आपण तल्लाभा॥ २१॥
पतिपुत्रादि सदन धन ॥ इष्टमित्र सुहृद स्वजन ॥ कर्म लौकिक परम गहन ॥ दुस्त्यज पूर्ण सर्वांसी ॥ २२ ॥
वेदविहित श्रेष्ठमार्ग ॥ अनादिसिद्ध आचारओघ ॥ इहीं त्यागूनि तो सवेग ॥ भजल्या श्रीरंग सुखपदवी ॥ २३ ॥
निगमशिरोभागींच्या श्रुति[२]॥अद्यापि जे पदवी शोधिती॥भवसुखत्यागें गोपींप्रति॥ते हरिरति फावली ॥ २४ ॥
यास्तव यांचे पदरजरेणु ॥ ज्यांवरी पडती ते तरु तृण ॥ होईन ऐसें वांछी मन ॥ श्रीभगवानप्रसादें ॥ २५ ॥
उद्धव ऐसें वांछी मनीं॥पुन्हा स्तवी त्या व्रजकामिनी॥तें तूं सादर ऐकें श्रवणीं॥कौरवअवनीअवनेंद्रा ॥ २६ ॥

यावैश्रियाऽर्चितमजादिभिराप्तकामैर्योगेश्वरैरपियदात्मनिरासगोष्ठ्याम् ॥
कृष्णस्यतद्भगवतश्चरणारविंदंन्यस्तंस्तनेषुविजहुःपरिरभ्यतापम् ॥ ६२ ॥

॥टीका॥उद्धव विवरी अभ्यंतरीं॥केवढ्या सभाग्य व्रजसुंदरी॥लक्ष्मी अर्ची जें पद स्वकरीं॥अत्यादरीं दृढनिष्ठा २७
ब्रह्मादिक जे आप्तकाम ॥ आणि योगेश्वर नित्य निष्काम ॥ तेही हृदयीं श्रीपादपद्म ॥ ध्याती सनेम सप्रेमें॥ २८ ॥
परंतु नोहे अपरोक्ष[३]भेटी ॥ ते या पशुपांगना रानटी ॥ रासस्थानीं यमुनातटीं ॥ धरिती कुचतटीं प्रत्यक्ष॥७२९ ॥
श्रीकृष्णचरण कुचांच्या ठायीं॥रासस्थानीं गोपिकांहीं॥दृढालिंगनें कवळूनि पाहीं॥त्रितापखाई निवविली ॥ ३० ॥
विरहरूपी त्रितापदहन॥जिहीं कुचतटीं पद कवळून॥निःशेष निरसूनि समाधान॥पावल्या पूर्ण हरिप्रेमें ॥ ३१ ॥

---

[१] भूमीला भेदून वर येणारे वृक्षादि. [२] उपनिषदें. [३] ब्रह्मप्राप्ति.

लक्ष्मीब्रह्मादि योगेश्वर ॥ हरिपद ध्याती निरंतर ॥ गोपी प्रत्यक्ष तें कुचाग्र ॥ स्पर्शें संसारश्रम हरिती ॥ ३२ ॥
यालागीं यांहूनि वरिष्ठ कोण्ही ॥ नदिसे अखिलब्रह्मांडभुवनीं ॥ धन्य धन्य या व्रजभामिनी ॥ पंकजपाणि ज्या भजल्या ३३
शुक ह्मणे गा कुरुकुळभूपा ॥ सप्रेमभजनें श्रुतिपथलोपा ॥ जालिया प्रियतम कंदर्पबापा ॥ तरि मग कां पां नभजावें ॥ ३४
ह्मणसी किमर्थ वर्णाश्रम ॥ किमर्थ वेदाध्ययनीं श्रम ॥ कैसेनि ब्राह्मण वर्णोत्तम ॥ ऐकें निर्भ्रम यदर्थीं ॥ ३५ ॥
श्रुतिपथप्रणीत व्रताचरणें ॥ ज्यांचे पदरीं अच्छिद्र पुण्यें ॥ भगवत्प्राप्ति तेणें गुणें ॥ तुजकारणें कथिली कीं ॥ ३६ ॥
भूधननिक्षेप जो पूर्वींचा ॥ अवचट लाभ जालिया त्याचा ॥ इतरीं प्रयत्न जोडावयाचा ॥ काया वाचा नत्यजिजे ॥ ३७ ॥
भगवच्चरणीं प्रेम ज्यांचें ॥ आभिजात्यादि उत्तम त्यांचें ॥ वर्णिलें रहस्य या वाक्याचें ॥ ऐकें साचें श्रवणज्ञा ॥ ३८ ॥
मलयागराच्या सान्निध्यें ॥ मलयाचळीं काष्ठें विविधें ॥ पालटलिया सौरभ्यवेधें ॥ चंदनबोधें बोधिजती ॥ ३९ ॥
ज्यांसि जालें सान्निधान ॥ तितुकींच ह्मणविती चंदन ॥ तद्बीज देशांतरीं आणून ॥ पेरितां द्रुमपण पाहिलेंची ॥ ४० ॥
चलदल[1]तुलसी चंदनतरु ॥ इतर पादप ते लघुतरु ॥ मलयागरवेधें अधिकारु ॥ सुरभूसुर[2]तिलकत्वा ॥ ४१ ॥
एवं अन्यज्ञातीमाजी ॥ जे अनुसरती गरुडध्वजीं ॥ पावन तितुकेचि पुढें वंशजीं ॥ वर्तिजे सहजीं जातिपथें ॥ ४२ ॥
एवं अनन्य प्रेमा प्रिय ॥ आभिजात्या[3]चें नाहीं कार्य ॥ येर संतति यथान्वय ॥ न्याय अन्याय विधिप्रणीत ॥ ४३ ॥
ऐसा महिमा वरिष्ठ त्यांचा ॥ उद्धवें वर्णूनियां स्ववाचा ॥ दोष निरसूनि तारतम्याचा ॥ केला नमनाचा अधिकार ॥ ४४

वंदेनंदव्रजस्त्रीणांपादरेणुमभीक्ष्णशः ॥ यासांहरिकथोद्गीतंपुनातिभुवनत्रयम् ॥ ६३ ॥

॥ टीका ॥ व्रजस्त्रियांचे पादरेणु ॥ सर्वदा वंदी प्रेमें करून ॥ ज्यांचें हरिसंगींचें आचरण ॥ गातां त्रिभुवन पूत करी ४५ ॥

---

[1] पिम्पळ. [2] देवब्राह्मणांचा तिलक होण्यास. [3] कुलीनतेचें.

॥श्रीशुकउवाच॥ अथगोपीरनुज्ञाप्ययशोदांनंदमेवच ॥ गोपानामंत्र्यदाशार्होयास्यन्नारुरुहेरथम्॥६४॥

॥टीका॥शुक ह्मणे गा कुरुकंजार्का॥ऐसी उद्धवें नमनशंका॥निरसूनि नमिल्या व्रजबायका॥हृदयीं विवेका विवरूनी४६
त्यानंतरें गोपिकांप्रति ॥ आज्ञा मागोनि सप्रेमवृत्ति ॥ पुसोनि नंद यशोदा सती ॥ बैसला रथीं संतोषें॥ ४७ ॥
समस्त गोपाळां पुसोन ॥ उद्धवें आदरिलें प्रयाण ॥ नंदप्रमुख बल्लवगण ॥ आले घेऊन उपायनें ॥ ४८ ॥

तंनिर्गतंसमासाद्यनानोपायनपाणयः ॥ नंदादयोऽनुरागेणप्रावोचन्नश्रुलोचनाः ॥६५ ॥

॥टीका॥मथुरे निघतां उद्धवातें॥नंदादि बल्लव मिनले भवंते॥स्नेहानुरागें प्रेमभरितें॥उपायनांतें[1] समर्पिती॥४९॥
कोण्ही उष्णीष[2] बांधिती शिरीं॥एक अवतंस खोंविती वरी॥एक कंचुक[3] अत्यादरीं॥उद्धवाशरीरीं लेवविती॥७५०॥
एक बांधिती कटिबंधनें ॥ एक पीतांबरपरिधानें ॥ एक अर्पिती कंठाभरणें ॥ अमूल्यवसनें प्रावारणा ॥ ५१ ॥
एक कुंडलें घालिती श्रवणीं ॥ एक कंकणें घालिती पाणी ॥ दशांगुळियें जडितरत्नीं ॥ गोधा[4]त्राणें रत्नांची॥५२ ॥
एकीं अर्पिली मेखळा ॥ रुक्मांगदें बाहुयुगळा ॥ आपाद रत्नमणींच्या माळा ॥ वैजयंतीसमसाम्य ॥ ५३ ॥
कौस्तुभातुल्य पदकमाणि॥वांकी तोडर अंदु चरणीं॥कनकाभरणीं रत्नीं वसनीं॥अर्पिलीं व्रजजनीं उपायनें॥ ५४ ॥
नंदप्रमुख बल्लवगण ॥ उद्धवप्रयाणीं करिती रुदन ॥ ह्मणती वियोग अर्धक्षण ॥ कृष्णासमान तव विरह ॥ ५५॥
श्रमतां कृष्णविरहखेदें॥क्षण एक विसरलों तव सांनिध्यें॥आतां वियोगें विरहभेदें॥दुःख समुदें दुणवटलें ॥ ५६ ॥
तेणें श्वास घालूनि वदनीं ॥ बाष्पोदकें परिमार्जूनी ॥ उद्धवाप्रति दीनवाणी ॥ करिती विनवणी ते ऐका॥ ५७ ॥

---

१ भेटी-नजराणे. २पागोटें. ३ अंगरखा. ४ धनुष्य काखेला लाविलें असतां दोरी न लागावी ह्मणून केलेला बाहुबंध.

मनसोवृत्तयोनःस्युःकृष्णपादांबुजाश्रयाः ॥ वाचोऽभिधायिनीर्नाम्नांकायस्तत्प्रह्वणादिषु॥६६ ॥

॥टीका॥बल्लव ह्मणती उद्धवराया॥आमुच्या मनोवृत्ति अवधिया॥कृष्णपादांबुजाश्रया॥करीं कां सदया हरिवरें॥
कृष्णनामें आमुच्या वाणी ॥ नित्य रंगोत हरिकीर्तनीं ॥ कृष्णभावें भगवद्भजनीं ॥तनु अर्चनीं विलसतु या॥५९॥
याहूनि उद्धवा आमुच्या चित्तीं॥अभीष्टप्रार्थना जे तुजप्रति॥तेही सेवेसि करितों विनति॥सुस्निग्धवृत्ती अवधारीं॥६०

कर्मभिर्भ्राम्यमाणानांयत्रक्वापीश्वरेच्छया ॥ मंगलाचरितैर्दानैरतिर्नःकृष्णईश्वरे ॥ ६७॥

॥टीका॥विविधा कर्मी भ्रमतां आह्मां॥ईश्वरेच्छेनें सात्वतोत्तमा॥कोठेंतरी आमुचा प्रेमा॥कृष्णपरमात्मा आलिंगो॥
विविधा कल्याणरूपाचरणीं॥तीर्थीं व्रतीं तपीं दानीं॥आमुचा अनुराग कृष्णचरणीं॥वसो निर्वाणीं मेळविता ॥६२ ॥
कृष्णावेगळा परमेश्वर ॥ आह्मी नमनूं हा निर्धार ॥ कृष्णीं निरत अभ्यंतर ॥ असो हा वर मागतसों ॥ ६३ ॥
ऐसा उद्धव परोपरी ॥ प्रार्थूनियां नम्रोत्तरीं ॥ बोळविला तो मथुरापुरीं ॥ कोणेपरी प्रवेशला ॥ ६४ ॥

एवंसभाजितोगोपैःकृष्णभक्त्यानराधिप ॥ उद्धवःपुनरागच्छन्मथुरांकृष्णपालिताम् ॥ ६८ ॥

॥टीका॥शुक ह्मणे गा कुरुनरपति॥नंदादिबल्लवीं समस्तीं॥उद्धव पूजूनि श्रीकृष्णभक्ती॥मथुरेप्रति बोळविला॥ ६५
रथ चालिला घडघडाट ॥ केतु[1] झळके लखलखाट ॥ मागें बल्लव पाहती वाट ॥ करिती बोभाट हरिस्मरणें॥ ६६ ॥
उद्धव परतूनि पालवी[2] वसनें॥देखूनि बल्लवीं केलीं नमनें ॥ परस्परीं विपरीत[3] गमनें ॥ पूर्वपश्चिमें आदरिलीं॥ ६७ ॥
उद्धव आठवी कृष्णकथा ॥ यशोदानंदाची अवस्था ॥ गोपगोपींची विरहव्यथा ॥ क्रमिलें पथा तत्स्मरणें॥ ६८॥

---

१ ध्वज. २ खुणावी. ३ विरुद्ध दिशांकडे.

परतूनि आला मथुरापुरीं ॥ येतां देखोनि नागरीं ॥ सर्व गर्जती जयजयकारीं ॥ स्मरती वैखरी बळकृष्णा ॥ ६९ ॥
मथुरापालक कृष्णनाथ ॥ तेणें प्रजाजन सनाथ ॥ अर्थ स्वार्थ आणि परमार्थ ॥ चाऱ्ही पुरुषार्थ वोळगती ॥ ७० ॥
ऋद्धि सिद्धि राबती घरीं ॥ वीथी झाडिती मुक्ति चाऱ्ही ॥ स्वयें विश्वश्री[1] कामारी[2] ॥ सौभाग्यथोरी कोण वदे ॥ ७१ ॥
सुरवर सर्वत्र किंकर ॥ काळ कृतांत घरटीकार[3] ॥ सूर्य सूचवी घटिकायंत्र ॥ कर्म स्वतंत्र हरिआज्ञा ॥ ७२ ॥
रामकृष्णादिनामगजरीं ॥ सर्वविघ्नांची बोहरी[4] ॥ जार चोर दुराचारी ॥ मथुराराष्ट्रीं नाढळती ॥ ७३ ॥
दंड छत्रीं आतपत्रीं ॥ सुमना बंधनें सुमनहारीं ॥ त्रास दुंदुभिताडनप्रहारी ॥ जैत्यहारीं बुद्धिबळीं ॥ ७४ ॥
घरोघरीं हरिकीर्तनें ॥ सर्वांवदनीं नामस्मरणें ॥ अतिथिगोविप्रपूजनें ॥ परोपकरणें प्रिय सर्वां ॥ ७५ ॥
ऐसी कृष्णें पाळिलीं मथुरा ॥ उद्धव प्रवेशला सत्वरा ॥ यान निरोपूनि मंदुरा[5] ॥ राजमंदिरा पातला ॥ ७६ ॥

कृष्णायप्रणिपत्याऽहभक्त्युद्रेकंव्रजौकसाम् ॥ वसुदेवायरामायराज्ञेचोपायनान्यदात् ॥ ६९ ॥

॥ टीका ॥ उग्रसेनातें जुहारून ॥ नमिले वसुदेवरामकृष्ण ॥ सर्वसदस्यां[6] अभिवंदन ॥ नम्रमौळें पैं केलें ॥ ७७ ॥
उपायनमिसें आणिला कर ॥ नृपा अर्पिला तो समग्र ॥ नानापदार्थ अळंकार ॥ पृथगाकार अर्पिले ॥ ७८ ॥
वसनाभरणें वसुदेवासी ॥ नंदें दिधलीं मित्रत्वेंसीं ॥ पुत्रभावें बळरामासी ॥ नानावस्तु अर्पिलिया ॥ ७९ ॥
यशोदेनें देवकीप्रति ॥ सौभाग्यद्रव्यें दीधलीं प्रीति ॥ अनेक वस्तु नृपसंपत्ति ॥ त्या त्या निगुती पावविल्या ॥ ८०
स्वमुखें व्रजींची कथूनि वार्ता ॥ आज्ञा घेऊनि ऊठिला त्वरिता ॥ खुणाऊनियां कृष्णनाथा ॥ मग एकांता पातले ॥ ८१ ॥

---

१ त्रैलोक्यलक्ष्मी. २ दासी. ३ गस्तवाले. ४ नाश. ५ अश्वशाळेंत. ६ सभासदांस.

नमूनि कृष्णपादारविंद ॥ सम्मुख बैसवूनि मुकुंद ॥ विरहोत्कंठितबल्लवीवृंद- ॥ कृतसंवाद निरूपिला॥ ८२ ॥
व्रजौकसांचा भक्त्युद्रेक ॥ नंदयशोदेचा शोक ॥ संवगडियांचें वियोगदुःख ॥ ऐकोनि नावेक हरि विरमे॥ ८३ ॥
मग परिमार्जूनियां नयन ॥ उद्धवातें विसर्जून ॥ भक्तवत्सल श्रीभगवान ॥ द्रवे कारुण्यें हृत्कमळीं ॥ ८४ ॥
भक्तभावार्थें बांधला हरि ॥ भक्तानिमित्त अवतार धरी ॥ भक्तपरतंत्र मुरारि ॥ झुरे अंतरीं तत्प्रेमें ॥ ८५ ॥
कुरुनरचकोरसुधाकरा ॥ ऐकें परीक्षिति भूवरा ॥ जो कां दुर्लभ मुनिसुरअसुरां ॥ तो सोपारा भक्तांसी ॥८६॥
श्रुतींसी ज्याचा नलगे शोध॥तयासि भक्तीं लाविला वेध॥प्रेमळ विरहें करी खेद॥ऐसा अगाध भक्तिमहिमा ॥
योगयागीं नलभे तपीं ॥ भक्तिप्रेमें ते वस्तु सोपी ॥ साध्य नकरी तो नर पापी ॥ अनेक कल्पीं भवदुःखी ॥ ८८ ॥
ऐसें रायासि सांगोनि शुक ॥ पुढील कथेचा विवेक ॥ हृदयीं विवरी तो नावेक ॥ श्रोतीं सम्यक परिसावा ॥ ८९ ॥
सैरंध्रीचे मनोरथ ॥ आधीं साधूनि मुख्य कार्यार्थ ॥ पुरवीन ऐसें श्रीकृष्णनाथ ॥ वदला यथार्थ तें करील ॥ ९० ॥
त्यानंतरें अक्रूरसदना ॥ जाऊनियां यादवराणा ॥ अक्रूरा देऊनि समाधाना ॥ धाडील हस्तिनापुरासी ॥ ९१ ॥
इतुकी कथा वक्ष्यमाण[2] ॥ श्रोतीं सादर कीजे श्रवण ॥ कलिकल्मषनिर्दलन ॥ स्वयें श्रीकृष्ण कैंपक्षी[3] ॥ ९२ ॥
एकाजनार्दनश्रीमंत- ॥ सदनीं सेवक श्रीकृष्णनाथ ॥ भक्तिप्रेमाचा वृत्तांत ॥ दावी समर्थ कळिकाळीं ॥ ९३ ॥
एकनाथाचें कृपापात्र ॥ चिदानंद अनन्य च्छात्र ॥ तेणें स्वानंद स्वतंत्र ॥ आत्मतंत्र प्रबोधिला ॥ ९४ ॥
स्वानंदकृपेचें गौरव ॥ तो सद्गुरु गोविंदराव ॥ तेणें भरिला दयार्णव ॥ पादप्रभवसुधाजळें ॥ ९५ ॥ तें हें

---

१ कुब्जेचें. २ पुढें. सागांवयाची. ३ कैवारी.

श्रीमद्भागवत ॥ अठरा सहस्त्र संख्यामित ॥ परमहंसांचा एकांत ॥ शुकप्रणीत श्रुतिसार ॥ ९६ ॥ दशमस्कंध परमरहस्यं[1] ॥ भगल्लीलासुधारस[2] ॥ अध्याय सप्तचत्वारिंश ॥ उद्धव मथुरेस पातला ॥ ९७ ॥ इतिश्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायांभ्रमरगीतगोपीप्रबोधनोद्धवमथुराभिगमनंनामसप्तचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ४७ ॥

आनंदाब्देमधौशुक्लेद्वितीयाशशिवासरे ॥ पिपीलिकाभिधेक्षेत्रेगोपीबोधःसमापितः ॥ १६ ॥

श्लोक ॥ ६९ ॥ टीकावोव्या ॥ ७९७ ॥ एवंसंख्या ॥ ८६६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ६९ ॥

---

[1] अतिगुह्य. [2] भगवंताचीं चरित्रें, हाच सुधारस.

अध्याय ४८

कुब्जा सद्भाव ऋणोत्तीर्णा ॥ पूर्ण करूनि तत्कामना ॥
अक्रूराचिया जाऊनि सदना ॥ प्रेरी हस्तिनाह्वय नगरा ॥ १९ ॥



श्रीमद्गोविंदात्मने नमः ॥ ॥ सच्चित्सुखासि उपादान[1] ॥ गोविंदसद्गुरु सनातन ॥
नामरूपात्मक निमित्त पूर्ण ॥ मायावरणगुणगरिमा ॥ १ संततसत्पदसत्तामात्र ॥
असन्निरसन त्याचें गात्र ॥ तत्प्रकाशक सद्गुरुवक्त्र ॥ चित्पद स्वतंत्र तैं तेंची ॥ २ ॥
असन्निरसन जिये काळीं ॥ तैं तें आत्मोपलब्धानंदउजळी ॥ सच्चिदानंद त्रिपदावळी ॥
ते संचली गुरुमूर्ति ॥ ३ ॥ तेथ अनन्यभक्तिप्रेम ॥ द्विधा नहोनि जालें ब्रह्म ॥ तये चिच्छक्ती माया नाम ॥
जे गुणसाम्य प्रधान[2] ॥ ४ ॥ वास्तव नसोनि कार्य होणें ॥ कालत्रयींही अविनाशपणें ॥ वर्त्तिजे उपादानकारणें ॥
उदाहरणें अवगमिजे ॥ ५ हेम ननसोनि होय नग ॥ स्थितिलयप्रभवीं नग हेमांग ॥ कार्यरूपें वर्त्तता चांग ॥ नग
अव्यंग हेमची ॥ ६ ॥ कार्य कारणीं अविकारपण ॥ कार्य कारणेंसीं अभिन्न ॥ यया नांव उपादान ॥
निमित्तलक्षण तें परिसा ॥ ७ ॥ भक्तनिमित्त अवतरे देव ॥ देवानिमित्त भक्तसद्भाव ॥ परस्परें प्रेमगौरव ॥
मायालाघव तें ऐसें ॥ ८ ॥ शिष्य आत्मत्व गुरुत्वीं पाहे ॥ गुरु आत्मवें छात्रीं लाहे ॥ एवं सच्चिदानंद सबाह्य ॥
प्रेमप्रवाहें लुंठतसे ॥ ९ ॥ अविद्याभ्रमें विषयनिष्ठ ॥ दारपुत्रादिकीं प्रविष्ट ॥ तेणें करी स्थानभ्रष्ट ॥ अमृताविष्ट
गुरुभजनें ॥ १० ॥ जेणें अन्वयसंवेदन ॥ त्या नांव बोलिजे गोगण ॥ एवं गोगण विंदमान ॥ गोविंद अभिधानधारक तूं ॥
तन्मयत्वचि जेथ नाहीं ॥ ते असन्मय माया पाहीं ॥ सत्पदाविण गुरुत्व केंहीं ॥ कैं कोण्हाही नावगमे ॥ १२ ॥

---

१ कार्यकारणांची अभिन्नता. २ प्रपंचोत्पत्तीस मुख्य कारणभूत मायास्वरूप.

यालागीं सन्मार्गे तूं सद्गुरु ॥ येर असन्मात्र लघुतरु ॥ गोविंद ऐसा नामोच्चारु ॥ सच्चित्सुखकरविग्रही॥ १३ ॥
ऐसें नित्यत्वें गुरुत्व तुझें॥विशेष भ्रमितां जडाचें वोझें॥भवाब्धीमाजि तारिसी पैं जे॥हें लाघव सहजें पदभजनीं॥
इत्यादि गुरुत्वलघुत्व कोटी ॥ विरंच्यादिकां अकथ्य गोठी॥ अणोरणीय[1] या पारिपाटीं॥महत्त्वमुकुटीं वेदोक्त॥१५॥
ऐसिया अनंतगुणपरिपूर्णा ॥ अभेदबोधें नमितां चरणां ॥ दायं[2] पसाव[3] ते हे अज्ञा ॥पूर्वोक्त सूचना ग्रंथाची॥ १६॥
दशमस्कंध कृतव्याख्यान॥सत्तेचाळिसावा अध्याय पूर्ण॥वाखाणिला तो करूनि श्रवण॥श्रोते सुरगण संतुष्ट॥ १७
यावरी अठ्ठेचाळिसावा ॥ क्रमें अध्याय वाखाणावा ॥ तेथ सैरंध्रीसद्भावा ॥ माजि केशवा अनुकरण ॥ १८ ॥
कुब्जासद्भावऋणोत्तीर्णा ॥ पूर्ण करूनि तत्कामना ॥ अक्रूराचिया जाऊनि सदना ॥ प्रेरी हस्तिनाह्वयनगरा ॥१९॥
ये अध्यायीं इतुकी कथा ॥ शुक निरूपी कौरवनाथा ॥ श्रोतीं आणितां श्रवणपथा ॥ हे भवव्यथा खंडील ॥२० ॥
पूर्वाध्यायीं व्रजार्तिहरण ॥ केलें उद्धव पाठवून ॥ त्यानंतरें श्रीभगवान ॥ कुब्जादैन्य मनीं स्मरे ॥ २१॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ यास्तव सर्वात्मा सर्वदर्शन ॥ द्रष्टा साक्षी सर्वज्ञ पूर्ण ॥ भक्तकारुण्यें कळवळिला॥ २२ ॥

श्रीशुकउवाच ॥ अथविज्ञायभगवान्सर्वात्मासर्वदर्शनः ॥ सैरंध्र्याःकामतप्तायाःप्रियमिच्छन्गृहंययौ ॥ १ ॥

॥टीका॥गंधार्पणें भगवत्प्रीति ॥ जें जोडली कुब्जेप्रति ॥ तें कामिली सप्रेम रति ॥ ते वरदोक्ति आठविली॥ २३ ॥
सैरंध्री जे सकाम तप्ता॥जाणोनि हृदयीं तिची आस्था॥स्वयें इच्छूनि तिच्या स्वहिता॥जाता झाला तत्सदना॥ २४
रहस्यवेत्ता अंतरंग ॥ असंगप्राय ज्याचा संग ॥ एकात्मभावें अवंचक चांग ॥ तो उद्धव जिवलग समवेत ॥ २५ ॥ ॥ १ ॥
दिढा श्लोकें सदनशोभा ॥ ऐकें वैराटीवल्लभा ॥ जिये मंदिरीं पद्मनाभा ॥ झालें दुर्लभा सुलभत्व॥ २६ ॥

---

१ अणूहून सूक्ष्मतर. २ वडिलोपार्जित विभागार्ह धन. ३ प्रसाद.

महार्होपस्कराढ्यंवैकामोपायोपबृंहितम् ॥ मुक्तादामपताकाभिर्वितानशयनासनैः
धूपैःसुरभिभिर्दीपैःस्रग्गंधैरपिमंडितम् ॥ ॥ २ ॥

॥टीका॥जेणें स्ववश होय हरि॥ते ते वशीकरणसामग्री॥जिये मंदिरीं भरिली पुरी॥सबाह्यांतरीं स्वच्छत्व॥२७॥
महार्ह ह्मणिजे मोलागळी॥विविध गृहोपकरणावळी॥उपचारसंपत्तिसमृद्धि सकळी॥यथोक्तकाळीं अनुकूळ॥ २८ ॥
कनकरत्नीं खचित भुवनें ॥ मणिमंचक विचित्रासनें ॥ मृदोळिया वोटंगणें ॥ दिव्यवितानें रविभाक्तें ॥ २९ ॥
जिहीं परमपुरु वश होय ॥ त्यांतें ह्मजिजे कामोपाय ॥ तिहीं मंडित कुब्जानिलय ॥ कैसें काय तें ऐका॥ ३० ॥
भूतदयेची शीतळ च्छाया ॥ यालागीं गेलियातया ठाया॥ भूतमात्रांची निवे काया ॥ ते पहावया आला हरि॥ ३१॥
अपरोक्षज्ञानें तेजःपुंज॥अवंचक औदार्य कीर्तिध्वज॥देखोनि भुलला गरुडध्वज॥नधरी लाज अभिरमतां ॥ ३२ ॥
अमूल्य सलंब मुक्तामाळा॥रत्नतोरणीं फांकती किळा॥गगनगर्भीं पताका सरळा॥अतिचंचळा पवमानें[1] ॥ ३३ ॥
सत्वसंपत्ति सुरभि धूप ॥अहंता जळतां उठे अमूप ॥एकनिष्ठेचे अचळ दीप ॥सर्वां करणीं लखलखिती ॥ ३४ ॥
सुमना गुंफूनि भगवद्गुणीं॥आपादमाळा विविधा सुमनीं॥गुच्छअवतंस निर्मूनी॥उदित अर्पणीं परपुरुषा॥ ३५ ॥
केशर कर्पूर जवादि रोळा ॥कस्तूरीमलयजचंदनगोळा ॥गंधें भरिलीं रत्नकचोळां ॥श्रीघननीळा अर्पावया ॥ ३६ ॥
नलदं[2]निर्मित सजळ व्यजनें ॥ त्रयोदश तांबूलद्रव्यें पूर्णें॥चरणक्षालना उदकें उष्णें॥स्वादु जीवनें पानार्थ॥ ३७॥
शांतिक्षमेची विस्तीर्णता॥कामोद्दीपक संग्रह पुरता॥विविध द्रव्यें चर्वण करितां॥आंगा मन्मथा अवतरणें ॥ ३८॥

---

[1] वायूनें. [2] वाळ्याचे.

परस्परें मन्मथकदनीं ॥ सन्नद्ध कामुकेंसीं कामिनी ॥ लेख्य[1]लेप्यांचिया श्रेणी ॥ पृथगासनीं चौऱ्यांसीं ॥ ३९ ॥ दंतक्षतें नखरक्षतें ॥ गात्रचुंबनें अधरामृतें ॥ कामुकचित्तें सुशिक्षितें ॥ होती चित्रें निरखिलिया॥ ४० ॥ मन्मथकदनीं द्वंद्वयुद्धें ॥ कामशास्त्रप्रपठित बंधें ॥ देखोनि अभ्यास करिती मुग्धें॥ द्वंद्ववृंदें लेप्यांचीं ॥ ४१॥ सुगंध तैलें सुगंधचूर्णें ॥ माळा मखरें ध्वज तोरणें ॥ भित्तिप्रदेशीं दर्पणें ॥ हेमरत्नीं खेवणिलीं[2] ॥ ४२ ॥ कामोपायो[3]पबृंहित ॥ ऐसें मंदिर समृद्धिमंत ॥ तेथ परिवारगण समस्त ॥ सुशिक्षित परिचर्ये ॥ ४३ ॥ सत्य हित मित मृदु भाषणें ॥ तनुवाङ्मनें श्रमापहरणें ॥ अवंचकत्वें परोपकरणें ॥ इयें लक्षणें सर्वांचीं ॥ ४४ ॥ ह्मणोनि वैकुंठकंठीरवें ॥ सर्वज्ञ जाणोनि तत्सद्भाव ॥ कुब्जासदना देवाधिदेव ॥ गेला स्वमेव सुखदानी ॥ ४५ ॥

गृहंतमायातमवेक्ष्यसासनात्सद्यःसमुत्थायहिजातसंभ्रमा ॥
यथोपसंगम्यसखीभिरच्युतंसभाजयामाससदासनादिभिः ॥ ३ ॥

॥ टीका ॥ स्वसदनातें कैवल्यदानी ॥ आला देखोनि तेचि क्षणीं ॥ उठिली आसनापासूनी॥धांवोनि चरणीं लागली ॥ ४६ ॥ मुष्टीभरा अन्नासाठीं ॥ रंक रावे धरूनि काठी ॥ जेंवि तो बैसे सांम्राज्यपीठीं ॥ त्याहूनि पोटीं सोत्साह ॥ ४७ ॥ जातसंभ्रम हर्षोत्कर्ष ॥ तेणें प्रफुल्लित मानस ॥ सखियांसहित उत्तमपुरुष ॥ चित्प्रकाश कवळिला ॥ ४८ ॥ कर्मेंद्रियांच्या क्रियावृत्ति ॥ ज्ञानेंद्रियांच्या ज्ञानवृत्ति ॥ प्राणेंद्रियांच्या चेष्टावृत्ति ॥ या सखिया श्रीपती मिनलिया ॥ ४९ ॥ जे जे क्रियेसी जेजे उचित ॥ ते ते तैसी येथोचित ॥ क्रिया संपादू-

---

१ चित्रें व पुतळे ह्यांच्या पंक्ति. २ खचिलीं. ३ समृद्ध. ४ सिंह.

नि समस्त ॥ कमलाकांत तोषविला ॥ ५० ॥ वत्स देखोनि वोरसें[1] माता ॥ कीं कामिनीकटाक्षें अनिरुद्ध[2]जनिता तैंवि नमनाश्लेषस्वागत पुसतां ॥ स्नेह इंगिता माजि दिसे ॥ ५१ ॥ ऐसी कुब्जा सखियांसहित॥धांवोनि भजली रमाकांत ॥ जातसंभ्रम तो स्नेहाभिव्यक्त ॥ वक्ता समर्थ लक्षेना ॥ ५२ ॥ भक्ताधीन जालिया देवा ॥ तैं तो भजवी निजवैभवा ॥ शुद्धबुद्धा निरवयवा ॥ देहभावा आतुडवी ॥ ५३ ॥ देव पारसा सुस्नात ॥ देव क्षुधित नैवेद्यरहित ॥ वसनातीत जाग्रत सुप्त ॥ हे लावी समस्त तनुभाव ॥ ५४ ॥ देव सक्रोध क्षोभला ॥ देव प्रसन्न संतोषला ॥ देव प्रार्थिला विनविला ॥ तैं तो वोळला कारुण्यें ॥ ५५ ॥ ऐसे तनुभाव समस्त ॥ देवाआंगीं लावी भक्त ॥ तैसतैसा तोही होत ॥ छंदें नाचत भक्तांच्या ॥ ५६ ॥ तयाचिपरी सैरंध्रिया ॥ स्वसदनींच्या संपदा जिया ॥ प्रेमें कृष्ण भजविला तिया ॥ स्निग्ध चातुर्या दावूनी ॥ ५७ ॥भद्रपीठीं मृद्वासनीं ॥ नेऊनि बैसवी चक्रपाणि ॥ सखिया वीजिती विविध व्यजनीं ॥ सभास्थानीं स्वगणेंशीं ॥ ५८ ॥ इंद्रगोप[3]वर्णासनें॥चित्रविचित्रविस्तीर्णें ॥ मृदोळिया वोटंगणें ॥ सर्वोपकरणें अर्पिलीं ॥ ५९ ॥

तथोद्धवःसाधुतयाऽभिपूजितोन्यषीददुर्व्यामभिमृश्यचासनम् ॥
कृष्णोऽपितूर्णशयनंमहाधनंविवेशलोकाचरितान्यनुव्रतः ॥ ४ ॥

॥ टीका ॥भगवत्प्रेमें उद्धवासी ॥ जैसजैसिया उपचारांसी ॥ पूजिले साधुसद्भावेंसीं ॥ तेणें तयांसी स्वीकेलें ॥ ६० ॥ उद्धव बृहस्पतीचा शिष्य ॥भजनीं समर्यादही विशेष ॥ कुब्जा जाणे भक्तिरस तरी कां व्यत्या-

---

[1] प्रेमयुक्त पान्ह्यानें परिपूर्ण होणें. [2] मदन. [3] एक तांबडा सूक्ष्म किडा.

स हा घडला ॥ ६१ ॥ कुब्जेसि कां हे विषमबुद्धि ॥ जे उद्धवा पूजी कृष्णाआधीं ॥ ह्मणाल तो कां तियेतें
ननिषेधी ॥ तरी हें त्रिशुद्धी अवधारा ॥ ६२॥तरी जारदौत्य स्वैराचारा ॥ आधीं पूजिजे पार्षदनिकरा[1] ॥
उद्धवें जाणोनि या विचारा ॥ पूजोपचारा स्वीकेलें ॥ ६३ ॥ ब्राह्मणांमाजि सुविद्य श्रेष्ठ ॥ क्षत्रिय शौर्यवान
वरिष्ठ ॥ धनाढ्य वैश्यवर्णी गारिष्ठ ॥ पूज्य जरठ दासवर्णीं[2] ॥ ६४ ॥ कुब्जा राजदासी प्रसिद्ध ॥ भगवत्पितृव्य
वयोवृद्ध ॥ उद्धव जाणोनि भजतां विरुद्ध ॥ सहसा प्रबुद्ध नमनिती ॥ ६५ ॥ कुब्जा स्वाधिकाराविधानचतुरी
॥ उद्धवा पूजी तदनुसारीं ॥ उद्धवही नीतिशास्त्रीं ॥ अंगीकारी यथोचित ॥ ६६ ॥ मुख्यासनापासौनि
अवर ॥ भूमिभागीं आसन अपर ॥ घेऊनि बैसला उद्धव नम्र ॥ जाणोनि आदर तयेचा ॥ ६७ ॥ कृष्णही
तैसाचि तत्प्रेमभरित ॥ दावी मानवलोकाचरित॥ उपचार घेऊनि कुब्जादत्त ॥ शयनीं क्रीडार्थ प्रवेशला ६८ ॥
परमसुंदर शय्यासदन ॥ रुक्मललामनिर्मित पूर्ण ॥ दिव्यमंचक ऊर्ध्ववितान सूची ग्रथनकौशल्यें॥६९ ॥
कनकतंतुमुक्ताफळें ॥ गोमेदमाणिक्यपाचप्रवाळें ॥ पुष्कराजवज्रलसनियानिळें ॥ गुच्छ ग्रथिले वितानीं॥ ७० ॥
हंसतूळिका[3] उपबर्हणें[4]॥ कशिपु[5] सुखदें मृद्वासनें ॥ अमूल्य सुरंग विचत्र वसनें ॥ पासोडिला पर्यंक ॥ ७१ ॥
जाई जुई चंपकयाति ॥ बकुळें मोगरी मालती ॥ मृदुतर कह्लारपंकजपंक्ति ॥ शय्या निगुती निर्मिली७२ ॥
शयनीं अनर्ह केतकपत्रें॥संलग्न होतां भेदिती गात्रें॥ह्मणोनि अंतरें प्रादेशमात्रें[6]॥घ्राणतर्पणा स्थापियलीं ॥ ७३ ॥
चरणक्षालन करावया ॥ सुघटित रजतपात्र राया ॥ तांबूलष्ठीवन[7] धरावया ॥ कनकभाजन जडिताचें ॥ ७४ ॥

---

[1] सेवकसमूहाला. [2] शूद्रयोनीमध्यें. [3] हंसाप्रमाणें शुभ्रवर्ण गादी. [4] उशा. [5] लोड. [6] टीचभर. [7] विडा थुंकणें.

भित्तिप्रदेशीं स्थळोस्थळीं॥सौरभ्यंद्रव्यशलाका अनळीं॥योजूनि स्थापिल्या त्या परिमळीं॥सुगंध धूम प्रसरिती ॥
पद्माकृति रत्नखचितें ॥ विस्तीर्ण कनकपात्रें उचितें ॥ तांबूलद्रव्यें माजि समस्तें ॥ जाजीफळादि परिपूर्ण॥ ७६ ॥
खंडखाद्य साक्रोटबीजें ॥ रसाळ कदळें द्राक्षें सहजें ॥ पक्व खर्जूरें कंकोळद्रुमजें ॥ पक्वकपित्थें मघमघिती ॥७७॥
पक्व पनस जंबुफळें ॥ बीजपुरें नारीकेळें ॥ इक्षुदंड श्वेतकाळे ॥ त्वचे वेगळे कृतशकलें ॥ ७८ ॥ क्षौद्रं[3] मैरेयें
पौष्पज मधु ॥ सुदोहदुग्धद्रव्यें विविध ॥ रत्नकूपिका भरूनि सिद्ध ॥ सपानपात्रीं स्थापिलिया ॥ ७९ ॥
अमूल्यवैडूर्यरत्नमणि ॥ देदीप्यमान जैसे तरणि ॥ कुड्यस्तंभादि वितानीं ॥ जेंवि रविभुवनीं तम नभसे ॥ ८० ॥
इत्यादि अनेक समृद्धिमंत॥महाधन शयन सुशोभित॥तेथ निविष्ट कमलाकांत॥प्रतीक्षा करीत कुब्जेची ॥ ८१ ॥
तंव ते वार्ष्मिक क्रीडोपचार ॥ भगवदर्पणा योग्यशरीर ॥ सज्जिती जाली सालंकार ॥तो प्रकार अवधारा॥८२॥

सामज्जनालेपदुकूलभूषणस्रग्गंधतांबूलसुधासवादिभिः ॥
प्रसाधितात्मोपससारमाधवंसव्रीडलीलोत्स्मितविभ्रमेक्षितैः ॥ ५ ॥

॥टीका॥सदना पातला मुरारि॥जाणोनि शिक्षिता गृहकिंकरी॥सिद्ध सन्नद्ध सर्वोपचारीं॥यथाधिकारीं पृथक्त्वें ॥
अंगकांतिउद्दीपकें ॥ मृदुळें सौरभ्यप्रकाशकें ॥ ऐसीं उद्वर्तनें अनेकें ॥ गात्रीं पृथकें उटणिया ॥ ८४ ॥ कुब्जा
वेष्टूनि उपदुकूल ॥ सुगंधतैलें चर्चित मौळ ॥ उटणें लावूनि सुतप्तजळ ॥ घालिती केवळ यथेच्छा ॥ ८५ ॥
ऐसा अभ्यंग संपल्या वरी ॥ अंग परिमार्जिती किंकरी ॥ तैलविकार गात्रीं शिरीं ॥ दुर्गंधकारी नथरे तो ॥८६ ॥

---

१ उदबत्त्या. २ महाळुंग. ३ मध. ४ उसाच्या रसापासून झालेलें मद्य.

करूनि धूतवस्त्रपरिधान ॥ लेइली कंचुकी साधारण ॥ तयावरी अनुलेपन ॥ मलयचंदनद्रव्याढ्यें ॥ ८७ ॥
शिवसूचक नैशं[1] चूर्ण ॥ करीं मर्दूनि उटिलें वदन ॥ कुंकुमरेखा देदीप्यमान ॥ मन्मथमार्गण ज्याबद्ध ॥ ८८ ॥
पाचरंग गोंदिले तळीं॥तदुपरि केशराटिकली पिवळी॥त्यामाजि कस्तूरीपुलिका काळी॥नेत्रकमळीं अंजनभा॥८९॥
गंडस्थळें कुंकुमरंगीं ॥ वेणिका रचिली उत्तमांगीं ॥ सिंदूररेखा सरळ भांगीं ॥ पौष्पजपरागीं कर्णपुटें ॥ ९० ॥
हनुवक्षांतर मलयजसार॥कर्पूर कळाविया मणिबंध कर॥परिधान कंचुकी मध्यउदर॥कृष्णागरविचर्चित ॥९१ ॥
पदतळ कोमळ सालक्त रंगीं ॥ काश्मरिजाउडें उपरभागीं ॥ दिव्यधूसरविलेपनांगी॥ एवं शुभागी शोभतसे॥९२॥
विलेपनाक्त फेडूनि चीर॥परिधान केलें दिव्यांबर॥अमूल्य कंचुकी लेइली रुचिर॥हंस मयूर भुजभागीं ॥ ९३ ॥
माथां मुक्ताफाळांची जाळी॥अम्लान सुगंध सुमनें ग्रंथिलीं॥मूद राखडी काकंडोळी॥बेल आंवळा बदरादि ॥९४॥
मत्स्य कूर्म हिरडे गुच्छ॥रत्नजडित वेणिका स्वच्छ॥कांचीबद्ध खोवूनि कच्छ॥इच्छी अनिच्छ[2] भोगार्थ ॥९५ ॥
मौळप्रसून अर्धचंद्र ॥ मध्यें बिजवरा अतिसुंदर ॥ निडळपट्टिका रत्नीं रुचिर ॥ भ्रमरभासुर कुंतळभा ॥ ९६ ॥
इंद्रनीळादि भासुरमणि॥चंचळअमूल्यमुक्ताश्रेणी॥भ्रमरबाळिका बुगड्या श्रवणीं॥सुजडित रत्नीं ताटंकें ॥ ९७ ॥
तद्भामंडितगंडयुगळें॥नवयौवनप्रभेच्या मेळें ॥झळकती त्यांसि तुळितां नतुळे॥अमळकमळा रति रंभा ॥ ९८ ॥
नासापुटीं सुमुक्तानथनी ॥ मध्यें मंगळप्रभेचा मणि ॥ अनुराधाचा प्रथम चरणीं ॥ स्वामी सदनीं शोभतसे॥ ९९ ॥
माधवी राकावदनशशी ॥ भ्रूकज्जल मृगांकेंसीं ॥ मिश्रितमंगळभाविशेषीं ॥ प्रकाशी लावण्यचांदणें ॥ १०० ॥
मरकतबिंदु अधरातळीं ॥ अंजनांक सव्य कपोळीं ॥ कंठीं सूक्ष्म गळसरी काळी ॥ मुक्तावळी तदुत्तर ॥ १ ॥

---

[1] रात्रीसंबंधी. [2] ईश्वर.

जडित चिताक ग्रैवेयकें ॥ सरिया शृंखळा अमूल्य पदक ॥ समुक्तमणिमाळा अनेक ॥ कुचकलशांतें शोभविती ॥ २ ॥
बाहुभूषणें दोहींकडे ॥ रत्नकंकणें जडित चुडे ॥ मुद्रिकांवरी जडिले खडे ॥ ते चहूंकडे भा[2] पसरे ॥ ३ ॥
खचित कांचीचा मध्यमणि ॥ पदकप्रभा तेजें नगणी ॥ त्या दोहींतें आपुल्या किरणीं ॥ नथनीललाम लाजवी ॥ ४ ॥
त्यावरी शींसफूल अर्धचंद्र ॥ मध्यें बिजवरा भासुर ॥ एवं पंक्ति उत्तरोत्तर ॥ विलसे रुचिर रत्नांची ॥ ५ ॥
चरणीं अंदु नूपुर वाळे ॥ वांक्या गर्जती विन्यासताळें ॥ विरोद्या जोडवीं दशांगुळें ॥ अनवट पोल्हारे झिणियांसीं ॥ ६ ॥
कंठीं आपाद सुमनहार ॥ करूनि एवमादि शृंगार ॥ कांहीं घेऊनि अमृतआहार ॥ उद्बोधकर[3] आसवेंही ॥ ७ ॥
सुरंग तांबूल घेतां वदनीं ॥ रुचिर राजती द्वय सृक्किणी ॥ अधर जैसा विद्रूममणि ॥ झळके किरणीं दशनांच्या ॥ ८ ॥
मौन माधुर्य नम्रता ॥ सौष्ठव सप्रेम सुस्निग्धता ॥ सर्वश्रृंगारांचिये माथां ॥ चातुर्यभरिता पूर्ण कळा ॥ ९ ॥
षोडश शृंगार सोळा कळीं ॥ शशांकवदना मन्मथपुतळी ॥ कुब्जाराका माधवमेळीं ॥ दैवागळी माधविका ॥ १० ॥
इत्यादिशृंगारमंडिततर ॥ कृष्णक्रीडे योग्य शरीर ॥ सज्जूनि चालिली सत्वर ॥ सुरंग वस्त्र पांघुरली ॥ ११ ॥
मधुकुळसंभव श्रीमाधव ॥ परी तो केवळ रमाधव ॥ त्यातें कुब्जा हावभाव ॥ ललनालाघवरस दावी ॥ १२ ॥
व्यंकटकटाक्षनेत्रबाणीं ॥ विंधे आपांगविमोक्षणीं ॥ सलज्जमंदस्मिताननीं ॥ अह्लादश्रेणि प्रकटितसे ॥ १३ ॥
ऐसी कांता लावण्यभरिता ॥ मन्मथसमरा सन्नद्ध उदिता ॥ देखोनि प्रार्थी मन्मथताता ॥ तें नृपनाथा अवधारीं ॥ १४ ॥

आहूयकातांनवसंगमह्रियाविशंकितांकंकणभूषितेक्करे ॥
प्रगृह्यशय्यामधिवेश्यरामयारेमेऽनुलेपार्पणपुण्यलेशया ॥ ६ ॥

---

१ कंठभूषण. २ कान्ति. ३ उत्तेजक. ४ मर्यादे. ५ ओष्ठप्रांताचे शेवट.

॥टीका॥कृष्णसंगम नव अपूर्व॥सशंक सलज्ज धुकधुकी जीव॥मुग्धेङ्गितीं नव अवयव॥लपवी सर्व संकोचें॥ १५
धरूनि कंकणमंडित करीं ॥ वोढूनि घेतली शय्येवरी ॥ गंधानुलेपनपुण्यावारीं ॥ भोगी मुरारि सुखशयनीं ॥ १६ ॥
गंधार्पणाचा पुण्यलेश ॥ तेणेंकरूनि जगदधीश ॥ यथास्वइच्छा परमपुरुष ॥ भोगिला रमेश रमणीनें ॥ १७ ॥
तया भोगाची कैसी रीति ॥ वदली शुकाची सद्भारती ॥ तें परिसावें चतुरीं श्रोतीं ॥ पदपदार्थी व्याख्यान ॥ १८॥

साऽनंगतप्तकुचयोरुरसस्तथाऽक्ष्णोर्जिघ्रंत्यनंतचरणेनरुजोमृजंती ॥
दोर्भ्यांस्तनांतरगतंपरिरभ्यकांतमानंदमूर्तिमजहादतिदीर्घतापम् ॥ ७ ॥

॥टीका॥मग ते कवळूनि कमळाकांत॥बहुतां जन्मीं श्रमतां प्राप्त॥नेत्रहृत्कुच अनंगतप्त॥निववी सुरतप्रसंगें॥ १९
प्रेमें पसरूनि उभयभुज ॥ गाढ आळंगी अधोक्षज ॥ कंदर्पदर्प तेणें नीरुज ॥ शीतळ सहज सर्वांग ॥ २० ॥
सच्चिदानंदपदत्रयी ॥ अभेद त्रिपदें एके ठायीं ॥ ते श्रीमूर्ति आनंदमयी ॥ सुंदर हृदयीं आळंगी ॥ २१ ॥
जैंहूनि जीवदशा प्राप्त ॥ तैंहूनि वियोगविरहें तप्त ॥ आकल्प दीर्घ ताप तो समस्त॥त्यागूनि स्वस्थ निवाली॥ २२॥
पादांबुजें अवघ्राण ॥ करितां निवाले दशधा प्राण ॥ कृष्णमूर्तीचें लावण्यपान ॥ करूनि नयन निवाले ॥ २३ ॥
जोंवरी साक्षित्वदशेचा वास॥ तंववरी संगसुख अशेष ॥ अनुभवी तो सुखसंतोष॥ लाहूनि गगनास कवळीतसे ॥२४
ग्राम्यविषयभोगाअंतीं ॥ यूनां आलिंगूनि यूवति ॥ भुक्तसुखाची उपरमवृत्ति ॥ अष्टधा रमती उत्तरांगीं ॥ २५ ॥
तैसी नोहे भगवद्रति ॥ उभय चैतन्या ऐक्यताप्राप्ति ॥ संभोगसाक्षित्वा निवृत्ति ॥ अमृतावाप्ति कीं ना ते ॥२६ ॥

---

१ गुप्तअभिप्रायसहित. २ पीडारहित. ३ तरुणाला.

तये ठायीं दीर्घ ताप ॥ टाकिती झाली ऐसा जल्प ॥ करणेंचि नलगे अल्पस्वल्प ॥ साक्षित्वलोप पावलिया॥ २७॥
सुरतामाजि कैवल्यसुख ॥ ऐसा ग्रंथीं नाहीं लेख ॥ ऐशी शंका करिती मूर्ख ॥ तरी हा उत्तर श्लोक अवधारा॥ २८

सैवंकैवल्यनाथंतंप्राप्यदुष्प्रापमीश्वरम् ॥ अंगरागार्पणेनाहोदुर्भगेदमयाचत ॥ ८॥

॥टीका॥प्राकृत पति तो प्राणनाथ ॥ प्राणरक्षणपोषणार्थ ॥ कृष्ण केवळ कैवल्यनाथ॥कुब्जा सनाथ तद्भोगीं॥ २९
ऐसी कैवल्यसुखाची गोडी॥विषयसंभोगाचिये मोडी ॥कुब्जेसि दावूनि क्रीडावडी॥पुढती निवडी साक्षित्वें॥ ३० ॥
ऐशिया प्रकारें ते रमणी ॥साक्षात ईश्वर चक्रपाणि॥ त्यातें भोगूनि स्वानंदशयनीं॥सनाथ होऊनि संस्पदें॥ ३२॥
ईश्वरांचा जो ईश्वर ॥ कैवल्यनाथ परमेश्वर ॥ त्याची प्राप्ति दुर्लभतर ॥ सुरवर मुनिवर नलाहती ॥ ३२ ॥
अंगरागार्पणसुकृतलेशें॥भोगीं लाहूनि मन्मथावेशें॥बुद्धि अशिक्षित साधनाभ्यासें॥ह्मणोनि ऐसें याचितसे ॥३३॥
दुर्भगा ह्मणोनि कुब्जेप्रति॥वदली मुनींद्रवरभारती॥येथिंचा अर्थ व्यवसितमति[1] ॥सावध श्रोतीं विवरावा॥ ३४ ॥
ऊर्जित ऐश्वर्य या नाम भग ॥ दुर्गम कुब्जेचें महाभाग्य ॥अंगरागार्पणें श्रीरंग॥जे भोगी सांग सुखशयनीं॥ ३५
अनुलेपार्पणपुण्यलेश ॥ तेणें भोगिला श्रीपरेश ॥ याचि मार्गें आणिकांस ॥ पावावयास दुर्गमता ॥ ३६ ॥
मृगयामिसें जागतां रजनीं ॥ व्याधा जोडला शूलपाणि॥तैंवि न करितां साधनश्रेणी॥गंधार्पणें हरिप्राप्ति ॥ ३७ ॥
ह्मणोनि दुर्गम कुब्जाभाग्य ॥ कोण्ही पावावया अयोग्य ॥श्रीधरस्वामीचा व्याख्यानमार्ग॥तोही चांग अवधारा ३८
गोपी अनन्यभावें निरता ॥ प्राकृतभावें न मागती सुरता॥ कुब्जा भोगूनि कैवल्यनाथा ॥ याची प्राकृतसम रमणा ३९

---

[1] निश्चयात्मक बुद्धि ज्यांची ते,

अमृत प्राशूनि धणीवरी ॥ पुन्हा ह्मणे मज अमर करीं ॥ तैसी कुब्जेची वैखरी ॥ प्राकृतापरी आतुरत्व ॥ ४० ॥
लेंकुरें रंगती जेंवि बहिरंगा ॥ तेंवि ते लाहूनि अंतरंगा॥यांची प्राकृतमन्मथसंगा ॥ ह्मणोनि दुर्भगा ह्मणिजे ते॥४१ ॥
अमोघैश्वर्यसंपन्नहरि ॥ त्यातें याची कवणेपरी ॥ ते हे शुकाची वैखरी ॥ श्रोतीं चतुरीं परिसावी ॥ ४२ ॥

आहोष्यतामिहप्रेष्ठदिनानिकतिचिन्मया ॥ रमस्वनोत्सहेत्यक्तुंसंगंतेऽम्बुरुहेक्षण ॥ ९ ॥

॥टीका ॥ रसाळ साधुत्वींउत्कर्ष ॥ जैसें बोलिजे पीयूष॥तैसा प्रियतम हृषीकेश ॥ पूर्णपरेश परमात्मा ॥ ४३ ॥
त्यातें ह्मणे भो प्रेष्ठतमा ॥ इतुकें प्रार्थितसें मी तुह्मां ॥ कांहीं दिवस निजसंगमा ॥ देऊनि कामा पुरवावें ॥ ४४ ॥
येथें रहावें कांहीं दिवस ॥ मजसीं रमवावें सावकाश ॥ त्यागूं नशकें तव संगास ॥ मम मानस जलजाक्षा ॥ ४५ ॥
एवं याची विषयसंग ॥ नमगे कैवल्य अभंग ॥ परि तो प्रणतकल्याण सांग ॥ करी श्रीरंग नेच्छितां ॥ ४६ ॥
रक्षा भाविला पावक ॥ परि तो स्वभावेंचि दाहक ॥ तेंवि कुब्जेसि विषयसुख ॥ याचितां अचुक कैवल्य॥४७॥
कुब्जा भोगूनि चक्रपाणि ॥ पुढती याची विषयग्लानि ॥ नरमे कैवल्यनिर्वाणीं ॥ दुर्भगा ह्मणोनि बोलिली ॥४८ ॥
तथापि अक्षयप्राप्तीसि उणें ॥ झणीं मानाल तीकारणें ॥ कैवल्यनाथपदव्याख्यानें ॥ व्यासनंदनें सुचविलें॥४९ ॥
स्पर्शसान्निध्यें कांचन ॥ कीं काष्ठ पालटी चंदन ॥ कैवल्यनाथ भोगूनि कृष्ण ॥ केंवि निर्वाण नपवे ते ॥ ५० ॥
असो हा अगाध वस्तुमहिमा॥पूर्ण करोनि कुब्जाकामा॥तदुचित वस्तु ज्या प्रियतमा॥हेमललामा वसनादि॥ ५१

तस्यैकामवरंदत्वामानयित्वाचमानदः ॥ सहोद्धवेनसर्वेशःस्वधामागमदर्चितम् ॥ १० ॥

---

१ मागे. २ हे कमलनेत्रा.

॥टीका॥एवं तये कुब्जेकारणें॥अभीष्टवरातें देऊनि कृष्णें॥सम्मानूनि वरसम्मानें॥मानदें तेणें गौरविली॥५२ ॥
उद्धवासहित सर्वेश्वर ॥ पावता जाला स्वमंदिर ॥ महासिद्धि अर्चनपर ॥ स्वर्चित सुंदर तें धाम ॥ ५३ ॥
इतुकें कथूनि कुब्जाख्यान ॥ साधकहितार्थ विस्मयापन्न ॥ होऊनि वदला मुनि सर्वज्ञ ॥ कुरुभूषणक्षितिपेंसीं॥५४ ॥

दुराराध्यंसमाराध्यविष्णुंसर्वेश्वरेश्वरम् ॥ योंवृणीतेमनोग्राह्यमसत्वात्कुमनीष्यसौ॥ ११ ॥

॥टीका॥कांहीं दिवस राहें हरि॥मजसीं रमें सुखशेजारीं॥दुर्भगा इये याच्ञेवरी॥शुकवैखरी वाखाणी ॥ ५५ ॥
येह्वीं कुब्जेचिया अधिकारा॥ हेवा नकरवे मुनिसुरपितरां॥विषययाच्ञेची अल्पक गिरा॥दुर्भगाकारा तुच्छत्वें॥ ५६
ह्मणाल कुब्जेचें चातुर्य ॥ वदला शृंगारीं मुनिवर्य ॥ विषययाच्ञेचें अधैर्य ॥ तें हें अनार्य नस्मरलें॥ ५७ ॥
ऐसें नह्मणावें सज्जनीं ॥ भूतभविष्यवर्तमानीं ॥ सर्वद्रष्टा योगाग्रणी ॥ तद्व्याख्यानीं हा भाव ॥ ५८ ॥
कुब्जा तों साची राजदासी ॥ गंधार्पणें हृषीकेशी ॥ तोषवूनि रतिकामासी ॥ प्रार्थी सद्मासि न्यावया ॥ ५९ ॥
तये काळींच्या वरोत्तीर्णा ॥ पुरवूं गेला कैवल्यराणा ॥दासीसमान याच्ञावचना॥दुर्भगपणा मुनि वदला॥ १६० ॥
जैसीं दासींचीं लक्षणें॥ तत्साहित्या रूपकरणें ॥ येह्वीं कानन वेल्हाळपणें॥ अनळीं तुळितां अघटित ॥ ६१ ॥
दासी याचिती जेंवि जारा॥ तेंवि याचिलें जगदाधारा॥आतां शिकवण साधक नरां॥ कथी नृपवरा मुनिवर्य॥६२ ॥
जन्मसहस्त्रांचिया कोटी ॥ तपोध्यानें समाधि हठी ॥ साधितां भजनाची हातवटी॥ लाहे कष्टीं क्वचिन्नर॥ ६३ ॥
ऐसिया सप्रेम भजनभाग्यें॥दुराराध्यही आराधना योग्य॥जालिया याची विषयसौभाग्य॥तोचि दुर्भाग्य कुबुद्धि ६४
त्रिजगीं श्रेष्ठ जे सुरवर ॥ त्यांहूनि वरिष्ठ बोलिजे शक्र ॥ शक्रविरंचि शंकर ॥ त्यांहूनि श्रीवर वर सर्वां॥ ६५ ॥

---

१ गृहाला. २ अग्नीचे ठायीं.

सर्व वरेश्वर तो विष्णु ॥ दुर्घट ज्याचें आराधन ॥ तोही करून सुप्रसन्न ॥ इंद्रियजन्य सुख मागे ॥ ६६ ॥
मनोग्राह्य काल्पनिक ॥ मृषा तुच्छ विषयात्मक ॥ स्वप्नाकार भासे क्षणिक ॥ याची मूर्ख कुबुद्धि ॥ ६६ ॥
लाहूनि सर्ववरेश्वर ॥ विषय मागे तो पामर ॥ ऐसी शिकवण व्यासकुमर ॥ वदतां भूवर भ्रम निरसी ॥ ६८ ॥
इतुकें कुब्जेचें आख्यान ॥ भागवतोद्धव अतिपावन ॥ दयार्णवाचें भाषाकथन ॥ बालभाषण हरिवरद ॥ ६९ ॥
आराधक विरोधक ॥ द्विधा भक्तां तारक एक ॥ अवतरे धर्मसंस्थापक ॥ जो यदुनायक जगदात्मा ॥ ७० ॥
पूतनेपासूनि कंसवरी ॥ विरोधी केले मोक्षाधिकारी ॥ आराधकांची ही भजनपरी ॥ प्रकट करी तदंगत्वें ॥ ७१ ॥
त्यावरी आराधकांची करुणा ॥ आंगीं लेवूनि त्रैलोक्यराणा ॥ क्रमें करितां तदार्तिहरणा ॥ अक्रूरस्मरणा करी हृदयीं ७२
उद्धवद्वारा व्रजसांत्वन ॥ सैरंध्रीचें वरोत्तीर्ण ॥ अक्रूराचें केलें स्मरण ॥ पांडवगोपन लक्षूनी ॥ ७३ ॥ कुब्जा-
ख्यान अळंकारीं ॥ संपूर्ण केलें ज्ञानेश्वरीं ॥ अक्रूरभवना गेला हरि ॥ कवणे परी तें ऐका ॥ ७४ ॥

अक्रूरभवनंकृष्णःसहरामोद्धवःप्रभुः ॥ किंचिच्चिकीर्षयन्प्रागादक्रूरप्रियकाम्यया ॥ १२ ॥

॥ टीका ॥ श्रीकृष्ण जो जगत्पति ॥ ज्याची अगाध प्रभुत्वशक्ति ॥ चालिला अक्रूरभवनाप्रति ॥ जिवलग हातीं धरूनियां ॥
तेचि जिवलग ह्मणाल कोण ॥ उद्धव अणि संकर्षण ॥ सहित अनुचर पार्षदगण[1] ॥ मनीं चिंतोनि गुज कांहीं ॥ ७६ ॥
अक्रूराचें करावें हित ॥ ऐसी कामना हृदया आंत ॥ कृपेनें द्रवोनि जगन्नाथ ॥ जाता झाला तत्सदना ॥ ७७ ॥
ह्मणाल चिंतिलें गुज तें कवण ॥ होऊनि अक्रूरावरी प्रसन्न ॥ गजसाह्वया[2] त्या धाडून ॥ कुरुवर्तन[3] शोधावें ॥ ७८ ॥

---

[1] सभासद. [2] हस्तिनापुराला. [3] कौरवांचें आचरण.

इतुकीं कार्यें धरूनि चित्तीं ॥ अक्रूरसदना कमलापति ॥ राम उद्धव धरूनि हातीं ॥ कृपामूर्ति पातला ॥ ७९ ॥

सतान्नरवरश्रेष्ठानाराद्वीक्ष्यस्वबांधवान् ॥ प्रत्युत्थायप्रमुदितःपरिष्वज्याभिनंद्यच॥ १३ ॥

॥टीका॥नरांमाजि वरवरिष्ठ ॥ आपुले बंधु आत्मनिष्ठ ॥ दूर देखोनि त्यांतें स्पष्ट ॥ अक्रूर यथेष्ट हरिखेला॥८०
उठोनि सामोरा गेला वेगीं ॥ सप्रेमभावें त्या आळंगी ॥ उह्लासवाक्यांच्या प्रसंगीं ॥ आनंदवूनि सकळांतें ॥८१ ॥
कृष्णरामांतें लोटांगण ॥ उद्धवाचे नमिले चरण ॥ तिहीं अक्रूरा अभिवंदून ॥ करिती भाषण प्रियवार्ता॥ ८२ ॥

ननामकृष्णंरामंचसतैरप्यभिवादितः ॥ पूजयामासविधिवत्कृतासनपरिग्रहान् ॥ १४ ॥

॥ टीका ॥ सभास्थानीं चित्रासनें ॥ मृदोळिया वोटंगणें ॥ भित्तिप्रदेशीं विचित्र वसनें ॥ ऊर्ध्व वितानें विराजती ॥
तेथें नेऊनि बैसविले ॥ सर्वोपचार सिद्ध केले ॥ सुस्नात होऊनि पूजिले ॥ विधिविधानपूर्वक ॥ ८४ ॥ हरिहर
जैसे अमरावती ॥ माजि अर्ची अमरपति ॥ रामकृष्ण तयाचि रीति ॥ अक्रूरें भक्ती पूजिले ॥ ८५ ॥ अर्घ्य
पाद्य आचमन ॥ विध्युक्त चरणक्षालन ॥ दिधलें दिव्य मंगलस्नान ॥ उद्धवासमान बलकृष्णां ॥ ८६ ॥
मृदुल सूक्ष्म धौत वस्त्रें ॥ स्वकरीं परिमार्जूनि[1] गात्रें ॥ रक्त नीळ पीतांबरें ॥ अत्यादरें नेसविलीं ॥ ८७ ॥
उत्तरीयेंवरी प्रावरणा ॥ सूक्ष्म सुरंग ऊर्णावसना[2] ॥ तिलक रेखूनि अर्पी सुमना ॥ धूप दीप यथोचित॥ ८८ ॥
नैवेद्य पंचामृत षड्रस ॥ संधितें व्यंजनें रुचिर सुरस ॥ क्षीरादि घृतान्त गोरस ॥ तक्र विशेष संस्कारीं॥८९॥
जेंवि चित्रान्त पर्जन्य ॥ तेंवि तक्रान्त भोजन ॥ उष्णोदकें आंचवण ॥ करपद क्षाळूनि पूसिले ॥ ९० ॥

---

१ पुसून. २ लोकरीचें वस्त्र.

भा०द मलयजमिश्रित कस्तूरी ॥ करोद्वर्तना मर्दिली करीं ॥ दुग्धपाचित भग्न सुपारी ॥ सनागरीं मुखवास ॥ ९१ ॥ टी. अ०
पुढती आणूनि भद्रपीठा ॥ करवूनि आसनप्रतिष्ठा ॥ उद्धवबळरामवैकुंठा ॥ सप्रेमनिष्ठा बैसविले ॥ ९२ ॥

॥ ८ ॥ पादावनेजनीरापोधारयञ्शिरसान्टप ॥ अर्हणेनांबरैर्दिव्यैर्गंधस्रग्भूषणोत्तमैः ॥ १५ ॥ ॥४८॥

॥टीका॥कुरुनरपाळका परीक्षिति॥मग अक्रूर सप्रेमभक्ती॥पादावनेजन उभय हस्तीं ॥ धरिलें निगुती निजमौळीं
सदनीं प्रोक्षूनि सर्वत्र ॥ सर्वां अर्पूनि विभागमात्र ॥ शेष प्राशूनि मार्जी नेत्र ॥ धन्य स्वगात्र मानिलें ॥ ९४ ॥
मुकुट कुंडलें मेखळा ॥ ग्रैवेयकादि मुक्तामाळा ॥ वलयांगदें दशांगुळा ॥ दिव्य मुद्रिका अर्पिल्या ॥ ९५ ॥
कटिप्रदेशीं दिव्य रशना ॥ प्रकटी क्षुद्रघंटिकास्वना ॥ चरणीं अर्पूनि पदभूषणा ॥ लोटांगणा घातलें ॥ ९३ ॥
मग अर्पूनि दिव्य वसनें ॥ चर्चिलीं सौरभ्य सुचंदनें ॥ माळा घालूनि वाहिलीं सुमनें ॥ सुगंध चूर्णें उधळिलीं ॥ ९७ ॥
इत्यादि दिव्यराजोपचारीं ॥ उद्धव बलराम श्रीहरि ॥ अक्रूरें पूजूनि सभागारीं ॥ काय करी तें ऐका ॥ ९८ ॥

अर्चित्वाशिरसाऽऽनम्यपादावंकगतोमृजन् ॥ प्रश्रयावनतोऽक्रूरःकृष्णरामावभाषत ॥ १६ ॥

॥टीका॥सन्निध बैसोनि आपण॥अंकीं धरूनि उभय चरण॥करी पदतळसंवाहनें[2]॥लक्ष्मीसमान सद्भावें॥ ९९ ॥
विनयभावें नम्रतर ॥ रामकृष्णेंसीं परम मधुर ॥ बोलता झाला तें उत्तर ॥ उत्तराकुमरा मुनि सांगे ॥ २०० ॥

दिष्ट्यापापोहतःकंसःसानुगोवामिदंकुलम् ॥ भवद्भ्यामुद्धृतंकृच्छ्राद्दुरंताच्चसमेधितम् ॥७॥ ॥ ८ ॥

॥टीका॥उर्जित दैवकल्याणप्रचुर॥तेणें कंस किल्बिषकर[3]॥सानुग निमाला दुष्कर॥हें भाग्य थोर त्रिगजाचें॥ १ ॥

---

१ पाय धुतलेलें पाणी. २ मर्दन. ३ पापकर्मा.

अनुग ह्मणिजे यूथपति ॥ बंधु अमात्य खळ दुर्मति ॥ पार्षदसैनिक जे दुष्कृति ॥ जाली उपहति[1] त्यां सर्वां ॥ २ ॥
पूतनेपासूनि सबंधुकंस ॥ सानुग शब्दें बोलिजे यास ॥ दैवयोगें या अघिष्ठा[2] नाश ॥ हा भाग्यविशेष त्रिजगाचा ॥ ३ ॥
कंस मरोनि अनुग इतर ॥ एकही उरता कनीयतर ॥ तो या त्रिजगासि दुष्कर ॥ दुःख दुर्धर भोगविता ॥ ४ ॥
यालागीं सानुगकंसा मरण ॥ दैवें त्रिजगाचें कल्याण ॥ तुमचें कुळ हें दुःखनिमग्न ॥ तुह्मीं संपूर्ण उद्धरिलें ॥ ५ ॥
तुमच्या कुळाची अभिवृद्धि ॥ सानुग कंसाची अवधि ॥ पुरली ह्मणोनि कार्यसिद्धि ॥ हे त्रिशुद्धि साधली ॥ ६ ॥
परम दुरंत दुःखार्णव ॥ तेथें तुमचें यदुकुळ सर्व ॥ बुडतां तारिलें तुह्मीं सर्व ॥ पुसूनि ठाव कंसाचा ॥ ७ ॥
इत्यादि प्रस्तावप्रासंगिकें ॥ मानुषधर्मानुसारलौकिकें ॥ प्रथम अक्रूरें बोलोनि वाक्यें ॥ अलौकिकें आदरिलीं ॥ ८ ॥
तेंचि परमार्थरूपस्तवन ॥ श्रोतीं परिसिजे सावधान ॥ देशभाषा कृतव्याख्यान ॥ बालभाषण हरिवरें ॥ ९ ॥

युवांप्रधानपुरुषौजगद्धेतूजगन्मयौ ॥ भवद्भ्यांनविनाकिंचित्परमस्तिनचापरम् ॥ १८ ॥

॥ टीका ॥ तुह्मी अखिल त्रिजगन्मय ॥ कोठूनि कैसे ह्मणाल काय ॥ जगद्बीज कारणकार्य ॥ मृद्घटप्राय अभिन्नत्वें ॥ १० ॥
कार्यकारण तें कोठून ॥ तरी हे तुह्मीच दोघेजण ॥ धर्मस्थापक रामकृष्ण ॥ पुरुष प्रधान अवतरलां ॥ ११ ॥
संवित्प्रज्ञान प्रधाननामें ॥ मूळप्रकृति जे गुणसाम्यें ॥ सर्वज्ञ सर्वेश्वर पुरुषनियमें ॥ अभिन्नप्रेमें ते तुह्मी ॥ ११ ॥
माया ईश्वर दोन्हीपणा ॥ नभजोनि द्वैताच्या भूषणा ॥ मिरवी जे ते वस्तु जाणा ॥ अगुणा सगुणा माजिवडी ॥ १३
यास्तव तुह्मांवांचूनि कांहीं ॥ अपर अथवा परही नाहीं ॥ ह्मणाल अपर पर तें काहीं ॥ तरी कारणीं कार्यीं व्यवहित जें १४

---

[1] मृत्यु. [2] अतिपापिष्ठाला.

कार्यशब्दें बोलिजे अपर ॥ कारणशब्दें बोलिजे पर ॥ व्याप्यव्यापक हा प्रकार ॥ ग्रंथकार ज्या ह्मणती ॥ १५ ॥
प्रत्यक्षादिप्रमाणसिद्ध ॥ ह्मणाल कैसा नाहीं भेद ॥ तरी यदर्थीं ऐका विशद ॥ ममानुवाद यथामति ॥ १६ ॥

आत्मसृष्टमिदंविश्वमन्वाविश्यस्वशक्तिभिः ॥ ईयतेबहुधाब्रह्मञ्श्रुतप्रत्यक्षगोचरम् ॥ १९ ॥

॥टीका॥विश्व ह्मणिजे अकार मात्रा॥आपण आत्मत्वीं या गात्रा॥क्रियाज्ञानादि स्वशक्तितंत्रा॥पृथगाकारा समसृष्टि
ब्रह्मन् ऐसें संबोधन ॥ साक्षात्परब्रह्म तूं ह्मणोन ॥ अथवा परमेश्वर भगवान् ॥ गुणपरिपूर्ण संबोधी ॥ १८ ॥
रजादि गुणशक्ति करून॥तुह्मीं हें सृजिलें आब्रह्मभुवन॥तेथ आत्मत्वें उपादान॥वास्तव अभिन्न भिन्न गमे॥ १९ ॥
प्रविष्ट नसोनि प्रविष्ट गमसी॥एक असोन बहुधा होसी॥तेंचि या विश्वदृष्टांतेंसी ॥कळे सर्वांसी प्रत्यक्ष ॥ २० ॥
रजसत्वादि आत्मशक्ति॥तिहीं करूनि विश्वाकृति॥तुह्मीच होऊनि आणिली व्यक्ती॥ऐसी प्रतीति गोगम्य॥ २१ ॥
तुह्मी ह्मणिजे परब्रह्म ॥ अक्षय अक्षर अविकारधाम ॥ मायावलंबें गुणसंभ्रम ॥ विश्वोद्गम तज्जनित ॥ २२ ॥
वास्तव नसोनि विवर्त लटिका॥किरणीं संभव मृगोदकां[1]॥तारभ्रांति जैंवि शुक्तिका॥तैंवि मायिका माजी तुह्मीं॥ २३
तुह्मी नहोनि बहुधा विश्व॥ श्रुतप्रत्यक्षगोचर सर्व ॥ अनेकव्यक्तिरूपनांव ॥ अवघें वास्तव गमतसां॥ २४ ॥
एकचि वस्तु बहुधाकार ॥ कैसी होय प्रतीतिकर॥दृष्टांतद्वारा तो विचार ॥ ऐका साचार मम वदनें ॥ २५ ॥

यथाहिभूतेषुचराचरेषुमह्यादयोयोनिषुभांतिनाना ॥
एवंभवान्केवलआत्मयोनिष्वात्माऽऽत्मतंत्रोबहुधाविभाति ॥ २० ॥

---

[1] मृगजळाला.

॥ टीका ॥ योनि ह्मणिजे पृथक कारणें ॥ एका आपणची अनेकपणें ॥ रूपांतराभिव्यक्तिस्थानें ॥ भौतिकें भूतें चराचरें ॥ २६ ॥ पृथ्वी पृथ्वीपणें ननसे ॥ हयगजसेना चित्रीं दिसे ॥ कुंडस्थंडिलव्यक्तिवशें ॥ बहुविध भासे एकची ॥ २७ ॥ कीं जळ एकचि ह्रदोदरीं ॥ बुद्बुदतरंगकल्लोललहरी ॥ गोचर होय अनेकाकारीं ॥ तेंवि संसारीं चिदात्मा ॥ २८ ॥ मृगतृष्णिका रज्जुसर्प ॥ नभीं नीळिमा शुक्तिरौप्य ॥ एक तेजाचें बहुधारूप ॥ वास्तव अल्प ननसोनी ॥ २९ ॥ जैसे कथिले भूतदृष्टांत ॥ तैसे भौतिकाकार अनंत ॥ नानागंधीं पृथ्वी व्यक्त ॥ तोय समस्त रस होय ॥ ३० ॥ अनेकरूपी भासे तेज ॥ शीतोष्णमृदुळ वायु सहज ॥ स्पर्शीं गमनीं चलनीं वोज ॥ प्रकटी काज अनेकता ॥ ३१ ॥ तैसेंचि नभ बहुधा ध्वनि ॥ घटमठभेदें अनेकपणीं ॥ गोचर होय भिन्न नहोनी ॥ तेंवि तूं जनीं जनरूप ॥ ३२ ॥ एक परमात्मा तूं सत्य ॥ जीव प्रतिबिंबें अनंत ॥ योनिभेदें विकारवंत ॥ प्रत्ययभूत जाणिजसी ॥ ३३ ॥ मृगपन्नगशशकमशक- ॥ बालतरुणवृद्धादिक ॥ अविद्य सुविद्य चतुर मूर्ख ॥ हे प्रत्यय अनेक प्रकाशिशी ॥ ३४ ॥ आत्मा केवळ तूं स्वतंत्र ॥ तो भाससी कर्मतंत्र ॥ एवं अभेद अगोचर ॥ विश्वाकारें गोचर तूं ॥ ३५ ॥ हें ऐकोनि ह्मणसी ऐसें ॥ सृष्ट्यादि कर्म मजही असे ॥ तरी मी बद्ध तेमाजि गवसें ॥ जीवा ऐसा गुणत्वें ॥ ३६ ॥ तरी हें नह्मणें पुरुषोत्तमा ॥ तुझा अगाध अचिंत्य महिमा ॥ वश नहोनि मायाभ्रमा ॥ गुणसंभ्रमा वाढविसी ॥ ३७ ॥ तो तूं ह्मणसी कवणेपरी ॥ अक्रूर ह्मणे ऐकें हरि ॥ रवि नबुडे मृगजळपूरीं ॥ गुणविकारीं तूं तैसा ॥ ३८

सृजस्यथोलुंपसिपासिविश्वंरजस्तमःसत्वगुणैःस्वशक्तिभिः ॥

---

१ मृगजळ.

॥ नबध्यसेतद्गुणकर्मभिर्वाज्ञानात्मनस्तेक्कचबंधहेतुः ॥ २१॥

॥ टीका ॥ क्रियाद्रव्यज्ञानशक्ति ॥ या स्वशक्तीकरूनि त्रिगुणांप्रति ॥क्षोभवूनि कार्यप्रवृत्ति॥आणिसी व्यक्ती पृथक्त्वें ॥ ३९ ॥ क्रियाशक्ति क्षोभवून ॥ रूपा आणिसी रजें द्रुहिण ॥ तेव्हां करिसी विश्वसृजन ॥ तें विस्तीर्ण गुणकार्य ॥ ४० ॥ ज्ञानशक्तीचा करूनि क्षोभ ॥ सत्वादि रूढ पद्मनाभ[1] ॥ पालनकार्याचा अवलंब ॥ करी स्वयंभ गुणकार्य ॥ ४१ ॥ द्रव्यशक्तीची क्षोभक दशा ॥ करी समग्र सृष्टिनाशा॥ तमोगुणात्मक महेशा ॥ प्रवर्त्तवूनि स्वकार्यी ॥ ४२ ॥ गुणाभिमानी तीन्ही देव ॥ ते तुझेचि अंशप्रभव ॥ न संडिती तव अनुभाव ॥ यालागिं माव नबधी त्यां ॥ ४३ ॥ पूर्वसृष्टीची हे गोठी ॥ पुढें कर्मानुसार सृष्टि ॥ धाता यथापूर्व[2]परिपाटीं ॥ मुख्य चावटी श्रुतींची ॥ ४४ ॥ कल्पांतीं जैं होय प्रळय ॥ तेव्हां सृष्टि पावे लय॥सकर्मजीवांचा समुदाय ॥ लीन होय अव्यक्तीं ॥ ४५ ॥ सृजनकाळीं पुढती तेची ॥ कर्मानुरूप सृष्टि रची ॥ यास्तव मुक्तता जीवांची॥ कर्मापासूनि असेना ॥ ४६ ॥ तव चिंतनें हरिहरधाता ॥ नित्य निर्मुक्त गुणीं वर्ततां ॥ त्या तुज गुणकर्मीं बद्धता ॥ कोण तो वक्ता कल्पील ॥ ४७ ॥ गुणसाक्षी तूं गुणीं बद्ध ॥ ऐसें बोलणेंचि अबद्ध ॥ मा जें गौणकर्म प्रवृद्ध॥ तें कें निबद्ध करूं शके ॥ ४८ ॥ बंधत्रयासि कारण ॥ एक अविद्याचि मुख्य जाण ॥ ते कोठेंही तुजलागून ॥ प्रतीयमान[3] असेना ॥ ४९ ॥ स्थूळसूक्ष्मकारण तनु ॥ त्रिविध अविद्याबंधन ॥ सत्वरजतमवृत्यावरण॥गौणबंधन त्रिधा हें॥ ५० ॥ संचित प्रारब्ध क्रियमाण ॥ ऐसें त्रिविध कर्मबंधन ॥ तिहीं बंधाचें अधिष्ठान ॥ मुख्य कारण अविद्या॥५१ ॥ अविद्या ह्मणिजे अज्ञान जड ॥ तूं ज्ञानात्मा चैतन्य अजड ॥ तमा

---

१ विष्णु. २ ब्रह्मदेव पूर्ववत् सर्व करिता झाला. ३ अनुभूयमान.

नगिळवे मार्तंड ॥ तो पडिपाड तव बंधा ॥ ५२ ॥ज्ञानशक्ति जे का माया ॥ समर्थ नोहे आवरावया ॥ अनावरा जी मायाश्रया ॥ निरामया अमायिका ॥ ५३ ॥असो तुझी हे बंधशंका ॥ ज्यास्तव जीवासही बंध लटिका ॥ अविद्योपाधिक भासे लोकां ॥ वस्तुता देखा असेना॥ ५४ ॥

देहाद्युपाधेरनिरूपितत्वाद्भवोनसाक्षान्नभिदाऽऽत्मनःस्यात्॥
अतोनबंधस्तवनैवमोक्षःस्यातानिकामस्त्वयिनोऽविवेकः ॥ २२॥

॥ टीका ॥ आत्मप्रत्यया आवरण ॥ बहुधा प्रपंचविक्षेपस्फुरण ॥ ऐसी अविद्योपाधि जाण ॥ करी बंधन देहरूपें ॥ ५५ ॥ जागृति स्वप्न विक्षेप द्विधा ॥ मूर्च्छा निद्रा लयांची अभिधा ॥ उभयप्रत्यय तुरीय शब्दा ॥ महाकारण या अभिधानें ॥ ५६ ॥ ऐसा चतुर्धा देहभेद ॥ अविद्योपाधि जो हा विशद ॥ यास्तव जीवासि बोलिजे बंध ॥ येऱ्हवीं शुद्ध चिन्मय तो ॥ ५७ [3]साडेपंधरें किडाळीं पडे ॥ तैं तें किडाळ ऐसेंचि आवडे ॥ [2]पुटीं शोधन जेव्हां घडे ॥ तेव्हां निवडे निजरूपें ॥ ५८ ॥असतां किडाळाचिये संगती ॥ पंधरेपणा हानि नव्हती ॥ तेंवि जीवा अविद्याभ्रांति ॥ बंधनावाप्ति साच करी ॥ ५९ ॥ गुरुवेदांतवाक्यपुटें॥ झडतां अविद्याभ्रमाचीं किटें ॥ वास्तव आत्मत्व जीवा प्रकटे ॥ कीं नूतन भेटे हें विवरा ॥ ६० ॥ एवं देहादि उपाधिमुळें ॥ जीव जन्मला ऐसें कळे ॥ देह चेष्टतां विषयमेळें ॥ कर्म पुंजाळे शुभाशुभ ॥६१ ॥ देहयोगें षड्विकार ॥ प्रायश्चित्तादि सदाचार ॥ अधमोत्तम कर्म मिश्र ॥ हा भेद विचित्र देहयोगें॥ ६२ ॥ देहयोगें शत्रु मित्र ॥ आप्त

---

[1] डांकलग. [2] अग्निशुद्धीनें. उत्तम सोनें.

स्वजन स्वकुळ गोत्र ॥ सुखदुःखादि इहामुत्र ॥ हा भेद सर्वत्र सोपाधि ॥ ६३ ॥ उपाधिनाशें जीवासि कांहीं ॥ साक्षाद्वस्तुता भेदचि नाहीं ॥ मा तो भेद तुझ्या ठायीं ॥ कोणें कहीं कल्पावा ॥ ६४ ॥ भेदाभावीं आत्मा एक ॥ होतां अपरोक्षसद्विवेक ॥ जीवत्वाचा तैं कें अंक ॥ आत्मा सम्यक वास्तव तूं ॥ ६५ जरी मज बंध नाहीं ह्मणसी ॥ तेव्हां मोक्ष प्रतिपादिसी ॥ बंधाभावें मी मोक्षासी ॥ पात्र झालों कीं ना रे ॥ ६६ ॥ मोक्ष अंगीकारिसी जरी ॥ तरी तूं अक्रूरा अवधारीं ॥ बंधावेगळी मोक्षा उरी ॥ कोणे परी मज सांग ॥ ६७ ॥ वंध्यापुत्र जन्मला नाहीं ॥ तो मेला हें साच काई ॥ मरण साच होतां पाहीं॥तैं जन्मही साचची॥ ६८ ॥ तैसा मोक्ष ह्मणसी मज ॥ तेव्हां बंधही लागला सहज ॥ तरी हें शंकापरिहारगुज ॥ स्वामी बुझ श्लोकार्द्धें ॥ ६९ ॥ मायानियंता मायातीत ॥ मायागुणीं अनंतवृत ॥ मायाकार्य अविद्या तेथ ॥ नोहे समर्थ किमुत पैं ॥ ७० ॥ जेथ अविद्यासंभव नाहीं ॥ तत्कृत बंध तो मग काई ॥ बंध नसतां मोक्ष पाहीं ॥ मूर्ख तोही मानीना ॥ ७१ ॥ तस्मात अविद्यागुणकर्म ॥ हेचि त्रिविध बंध परम ॥ स्वसंवेद्य तूं पुरुषोत्तम ॥ पूर्णकाम परमात्मा॥ ७२ ॥ तस्मात बंधमोक्षातीत ॥ अक्षय अव्यय तूं अनंत॥ जरी तूं शंका करिसी येथ॥ कैंवि मी व्रजांत बांधलों॥७३॥ यशोदेनें गोकंठपाशें ॥ उखळीं बांधिलें शिक्षामिषें ॥ गोरसचौर्यकर्मवशें ॥ निर्मुक्त कैसें तूं वदसी ॥ ७४ ॥ तैंहूनि दामोदर हें नांव ॥ लहान थोर ऐकती सर्व ॥ आणि यमुनाहृदीं जें वास्तव ॥ मुक्तगौरव देखिलें॥ ७५ ॥ एवं बधमोक्ष माझ्या ठायीं ॥ देखोनि कैसा ह्मणसी नाहीं ॥ तरी हा अमुचा अविव्रेक पाहीं ॥ तुझ्या ठायीं प्रतिपादी ॥ ७६ ॥ अभ्रपटळें आवृत नयन ॥ सूर्य झांकला ह्मणती जन ॥तेंवि आह्मी विवेकशून्य ॥ मोक्षबंधन

---

१ समज. २ दाव्यानें.

तुज कल्पूं ॥ ७७ ऐसें ह्मणोनि श्वफल्कतनय ॥ पुन्हा शंकेचा लक्षूनि ठाय ॥ विज्ञापना करिता होय ॥ कैसी काय ते ऐका ॥ ७८ ॥ बंध मोक्ष माझ्या ठायीं ॥ अविवेकदृष्टि वास्तव नाहीं ॥ तरी अवतारचरित्र जें जें कांहीं ॥ तें तें सर्व हो तद्वत कीं ॥ ७९ ॥ शुक्तीवरी रजतारोप ॥ भास्करकिरणीं कल्पित आंप ॥ तैसे अवतार आणि प्रताप ॥ हा कल्पित जल्प अविद्यक कीं ॥ ८० ॥ तरी हें नह्मणावें श्रीहारि ॥ तव लीला हे जगदुद्धारी ॥ ईतें ह्मणतां मृगांबुलहरी ॥ मम वैखरी शून्य नव्हे ॥ ८१ ॥ बाळ मातेचे अवयव आन ॥ चोखी स्तनही तयांचि समान ॥ ह्मणतां वक्त्याचें करपलें ज्ञान ॥ बालपोषण स्तनपानें ॥ ८२ ॥ तेंवि हा जगत्कल्याणार्थ ॥ तव प्रणीत जो निगमपथ ॥ तो भंगिती जें उत्पथ ॥ तें तूं तेथ अवतरसी ॥ ८३ ॥ दों श्लोकीं हें निरूपण ॥ करी अक्रूर अनन्यशरण ॥ तें परीस तूं विचक्षण ॥ भाषाव्याख्यान हरिवरद ॥ ८४ ॥

त्वयोदितोऽयंजगतोहिताययदायदावेदपथःपुराणः॥बाध्येतपाखंडपथैरसद्भिस्तदाभवान्सत्वगुणंबिभर्ति.२३

॥टीका॥ अखिल जगाच्या कल्याणार्थ॥तव कृत जो हा आम्नायपंथ[2] ॥पुराणमहर्षिप्रतिपादित॥सर्व पुरुषार्थ ज्यामाजी ॥ ८५ ॥ पाखंडपथ जे असद्रूप ॥ तिहीं करितां श्रुतिपथलोप ॥ तैं अवतरसी सप्रताप ॥ कीर्ति अमूप विस्तरिसी॥८६॥जे जे काळीं श्रुतिपथग्लानि॥होतां त्रासिजे तन्निष्ठ जनीं॥तेव्हां तेव्हां कळवळोनी॥तद्रक्षणीं अवतरसी॥८७॥सत्वगुणाच्या घेऊनि बुंथी॥प्रकटूनियां अवतारपंक्ति॥विस्तारिसी अमोघकीर्ति जे अघहर्त्री त्रिगाची ॥८८॥जैसी तुझी अवतारमाला॥तत्कृत अमोघ गुणगणलीला ॥गातां ऐकतां तव जनमेळा ॥ भवजळ हेळा[3]

---

१ मृगजळ. २ वेदमार्ग. ३ लीलेनें.

उल्लंघी ॥ ८९ ॥ तो तूं आतां कमलारंग ॥ दुष्पथीं करितां श्रुतिपथभंग ॥ देखोनि स्वजनग्लानिप्रसंग ॥घेतला अवग तो ऐका ॥ ९० ॥

सत्वंप्रभोऽद्यवसुदेवगृहेऽवतीर्णःस्वांशेनभारमपनेतुमिहासिभूमेः ॥
अक्षौहिणीशतवधेनसुरेतरांशराज्ञाममुष्यचकुलस्ययशोवितन्वन् ॥ २४ ॥

॥ टीका ॥ द्वापारांतीं कलीच्या उदयीं ॥ प्रभो समर्था ऐसिये समयीं ॥ अवतरलासि वसुदेवगेहीं ॥ निजांशअहिसमवेत ॥ ९१ ॥ अवतरोनियां करणें काय ॥ तरी असुरांश जे मनुष्यप्राय ॥ अनेक अक्षौहिणीसमुदाय ॥ पावे भू भय तद्द्वारें ॥ घेऊनि निजांश बळ निजगडा ॥ भूभाराचा करावया झाडा॥स्वजन पावावया सुरवाडा॥ आणि पवाडा स्वकुळाचा ॥ ९३ ॥ इतुकीं कार्यें साधनार्थ ॥ दुष्टा अक्षौहिणी अनेकशत॥समरीं करूनि त्यांचा घात ॥ भूभार समस्त उतरिसी ॥ ९४ ॥ स्वकुळ करिसी यशोमंडित ॥ लीलाचरणें त्रिजगत्पूत ॥गुणकीर्तनीं तरती भक्त ॥ तो तव समर्थ अवतार ॥ ९५ ॥ धन्य देखती वर्तमान ॥ गाती ऐकती भविष्यमाण ॥ ते पावती सुखनिर्वाण ॥ हें महिमान श्रुति गाती ॥ ९६ ॥ असो तयाचा भाग्यमहिमा ॥ ज्यास्तव वर्णितां तोषे ब्रह्मा ॥ तो आलासि आमुचिया सद्मा ॥ आश्रमधर्मा साफल्य ॥ ९७ ॥ तवागमनें कृतार्थ झालों ॥ तीं श्लोकीं हें आदरीं बोलों ॥ तेंविचि ह्मणे मी हरिखेलों ॥ लागला डोलों तच्छंदें ॥९८॥ ममागमनीं अभीष्ट काय ॥ ह्मणसी तरी तो अभिप्राय ॥ ऐकें ह्मणोनि कथिता होय ॥ तें नृपा मुनिवर्य निरूपी ॥ ९९ ॥

---

१ मुखाला.

अद्यैशनोवसतयःखलुभूरिभागायःसर्वदेवपितृभूतनृवेदमूर्तिः ॥
यत्पादशौचसलिलंत्रिजगत्पुनातिसत्वंजगद्गुरुरधोक्षजयाःप्रविष्टः ॥ २५ ॥

॥ टीका ॥ ईश ह्मणोनि संबोधन ॥ ईश्वरेश्वर तूं ऐश्वर्यपूर्ण ॥ आजि माझ्या वसती धन्य ॥ केल्या येऊन निजचरणें ॥ ३०० ॥ ममागमनें समाग्यवसती ॥ कैशा ह्मणसी जरी श्रीपति॥तरी निश्चयें मम भारती ॥ करी विज्ञप्ति ते ऐक ॥ १ ॥ सर्व देवांचा तूं देव ॥ त्रिजग अवघें तव अवयव ॥ भूतें पितर आणि मानव ॥ सवेदप्रणव तवमूर्ति ॥ २ ॥ एवं पंचमहा जे क्रतु ॥ त्यांमाजी चराचर समस्त ॥ तो तूं ईश्वर मूर्तिमंत ॥ ज्या वसतींत प्रविष्ट ॥ ३ ॥ ह्मणोनि जितुकीं तपोवनें ॥ निगमप्रणीतें पुण्यस्थानें ॥ नयेती मम वसतीचे तुळणें ॥ अंतःकरणें जाणतसें ॥ ४ ॥ प्रयागराज तीर्थराव ॥ जेथें त्रिवेणीमाधव ॥ तो तूं प्रविष्ट देवाधिदेव ॥ हें भाग्य अपूर्व वसतीचें ॥ ५ ॥ ज्या तव पादशौचसलिलें ॥ जगत्त्रयाचीं हरती [1]शमलें ॥ जाणोनि शंकरें मुकुटीं धरिलें ॥ पुष्पमाले समसाम्य ॥ ६ ॥ कालांतरें सगराप्रति ॥ कपिलशापें आधोगति ॥ करावया तन्निष्कृति ॥ स्तविला पशुपति भगीरथें ॥ ७ ॥ त्रिपूर्वजांच्या अनुष्ठानें ॥ संतोषोनि गौरीरमणें ॥ तव पदप्राक्षालनजीवनें ॥ [2]शतांशमानें बोळविला ॥ ८ ॥ शतांश ह्मणिजे अनंतवाची ॥ त्रिजगीं प्रसिद्धि सुरगंगेची ॥ भूतळीं भगीरथयत्नें तेची ॥ भागीरथी अघहंत्री ॥ ९ ॥ तिचे वोघ झाले सप्त ॥ सीतानामक प्रयागीं प्राप्त ॥ यास्तव प्रयाग तीर्थनाथ ॥ त्रिजगीं ख्यात यश मिरवी ॥ १० ॥ ते तव चरणीं संपूर्ण गंगा ॥ चरणस्पर्शें वसती चांगा ॥

---

[1] पापें. [2] शंभराव्या हिश्शानें,

यास्तव ह्मणिजती भूयिष्ठभागा ॥ तुल्य प्रयागा कैंवि करूं ॥ ११ ॥ त्रिजगज्जनक जो कां ब्रह्मा ॥ नाभिकमळीं
तो पावला जन्मा ॥ यास्तव जगद्गुरु या नामा ॥ पुरुषोत्तमा तूं पात्र ॥ १२ ॥ येऱ्हवीं नामरूपातीत ॥
मायानियंता श्रीअनंत ॥ जाणोनि अधोक्षजसंकेत ॥ स्तवी निश्चित श्वाफल्कि ॥ १३ ॥ विष्णु ह्मणिजे अंतः
करण ॥ चंद्रमा तो केवळ मन ॥ बुद्धि ह्मणिजे कमलासन ॥ नारायण चित्ताख्य ॥१४ ॥ अहंकार तो गिरि-
जारंग॥इत्यादि समष्टि अक्षवर्ग॥तज्जनित जो ज्ञानमार्ग॥तुजहूनि प्रसंग अध त्याचा॥१५॥तुजहूनि अध अक्ष-
ज ज्ञान ॥ यास्तव अधोक्षज संबोधन ॥ अक्रूर ह्मणे तूं ब्रह्म पूर्ण ॥ वसति धन्य तव योगें ॥ १६ ॥ येथ श्रोते
शंका करिती ॥ ब्रह्म सनातन सर्वां भूतीं ॥ प्रविष्ट ऐसी अक्रूरोक्ति ॥ सभाग्य वसति कैंवि ह्मणे॥१७॥ तरी ये
शंकेचा परिहार ॥ साक्षात पदाचा निर्धार ॥ करूनि बोलिला अक्रूर ॥ तोही विचार परिसा हो॥ १८ ॥ जैसी
सजळ सर्वत्र धरणि ॥ परी जळअलाभें मरती प्राणी ॥ अपरोक्ष होतां सुखाची श्रेणि॥ भोगिजे जनीं जळ योगें १९
तेंवि तूं साक्षात अधोक्षज॥ यमुनाहृदीं जगद्बीज॥देखिलासि तो आजि सहज ॥ वसती पदरज कृतपूत ॥२०॥तो तूं
साक्षतकैवल्यदानी ॥ कृपामृतें वोरसोनी ॥ मनोरथ पूर्ण तवागमनीं ॥ बोले तोषोनि तें ऐका ॥ २१ ॥

कः पंडितस्त्वदपरं शरणं समीयाद्भक्तप्रियादृतगिरः सुहृदः कृतज्ञात् ॥
सर्वान्ददाति सुहृदो भजतोऽभिकामानात्मानमप्युपचयापचयौ न यस्य ॥ २६ ॥

॥टीका॥कोण पंडित पैं शहाणा॥तुजहूनि शरण जाईल आना॥येथ न्यूनता कोण्यागुणा॥मा प्राकृतां हीना भजेल२२

---

१ अतिशय. २ श्वफल्क राजपुत्र अक्रूर. ३ शंकर. ४ इंद्रिय समूह. ५ शाश्वत.

सत्यसंकल्प तूं ईश्वर ॥ तुझी गिरा सत्य साचार ॥ येर ब्रह्मादि प्रपंचपर ॥ प्रपंच समग्र लटिका कीं॥ २३ ॥
तूं सर्वस्वें भक्ताधीन ॥ भक्तप्रियतम तव अभिधान ॥ येरां प्राकृतां पदाभिधान ॥ तनुसम्मानालागिं मरती॥२४॥
सुहृद ह्मणिजे सुष्ठुहृदय ॥ तो तुजहूनि कोण सदय ॥ अभेद आत्मा आत्मप्रिय ॥ येर निर्दय गुणक्षुब्ध ॥२५॥
ब्रह्मा सृजन मात्र करी ॥ कैंवि वांचती हें नविचारी ॥ सदयहृदया तव अंतरीं ॥ कारुण्यलहरी त्रिजगाची ॥२६॥
इष्टानिष्ट नमनूनि कांहीं ॥ जीवनदानें सर्वदेहीं ॥ कृपेनें पाळिसी सर्वदाही ॥ नकरूनि कांहीं समविषम ॥ २७ ॥
रुद्र तवांश परि निष्ठुर ॥ करितां जीवांचा संहार ॥ हृदयीं नद्रवेचि अणुमात्र ॥ आपपर नविचारी ॥ २८॥
येर सुरवर सामान्य कोटी ॥ किमर्थ त्यांची करणें गोठी ॥ भक्तवत्सल तूं जगजेठी ॥ सदय पोटीं सुहृदत्वें ॥२९॥
कृतज्ञ ह्मणिजे जाणसी केलें॥भविष्य वर्तमान होऊनि गेलें॥त्रिकाळींचेंही ज्ञान पहिलें ॥तुज संचलें सर्वगता ३०॥
ध्रुव जाणोनि निर्विकार॥अढळपदीं त्वां केला स्थिर॥रुद्रें नेणोनि दिधला वर॥तैं भस्मासुर त्वां वधिला ॥ ३१ ॥
ब्रह्मा जन्मला तुझे जठरीं॥अज्ञ ह्मणोनि ओळखी न धरी॥वत्साहरणीं त्वां श्रीहरि॥येही अवतारीं बोधिला॥ ३२॥
विषयविरागें सद्भाविक ॥ वसती निरंजनीं निष्टंक ॥ कायिक वाचिक मानसिक ॥ तव तोषक परिचर्या ॥ ३३ ॥
विषयत्यागें तनुकाचरी[1] ॥ गुप्त वसती गिरिकंदरीं॥प्रकट कोणी नेणती जरी॥ तूं त्यां अंतरीं कृतज्ञ॥ ३४ ॥ त्याचे
मनारथ ते किती ॥ ते पुरवूनि मनोरथार्ति ॥ करिसी अखिलकामनापूर्ति ॥ देसी अंतीं आपणातें॥ ३५ ॥सुहृद
जे कां स्वपादभजक ॥ विषयविरागें अंतर्मुखें[2] ॥ त्यांतें अभीष्ट काम सम्यक ॥देऊनि सेवक तूं होसी ॥ ३६ ॥
ह्मणसी सुरवरांची ही सेवा ॥ करितां अर्पिती निजगौरवा ॥ परी तें नश्वर नथरे देवा ॥ स्वप्नवैभवा सम हरपे ३७

---

[1] उसरी. [2] ब्रह्मनिष्ठ.

तुवां अढळ केला ध्रुव ॥ तो काळाचा न धरी भेव ॥ प्रह्राद दैत्यान्वयसंभव ॥ लाधला गौरव तव भजनें ॥ ३८ ॥
स्थळजळदहनीं पवनीं॥भूतीं भौतिकीं सगुणीं अगुणीं॥प्रह्राद पाहे तुजला नयनीं॥तूंत्यालागूनि नविसंबसी॥ ३९ ॥
बत्तीस युगें सार्वभौम ॥ राज्य करितां विरक्त परम ॥ त्याचें अभीष्ट सर्वकाम ॥ तूं निःसीम पुरविता ॥ ४० ॥
प्रह्रादाचा पौत्र बळि ॥ सुरकार्यार्थ याच्ञाछळीं[1] ॥ बांधोनि घातला पाताळीं ॥ तूं त्याजवळी द्वास्थत्वें[2] ॥ ४१ ॥
शक्रपदाचें अवंतणें ॥ अक्षय दिधलें त्या कारणें ॥ ह्मणाल शक्रत्व कवण्या गुणें ॥ अक्षय तें ह्मणणें ऐका ॥ ४२ ॥
ध्रुव प्रह्राद बळि प्रमुख ॥ इत्यादि भक्तां अक्षय सुख ॥ ऐसें ह्मणाल तरी सम्यक ॥ ऐका नावेक अवधानें ॥ ४३ ॥
स्वभावें ब्रह्मांड पावे लय ॥ प्रलयीं स्वभक्तगणानिर्भय ॥ ते पावती कैवल्यनिलय ॥ आत्मप्रत्ययसुखलाभें ॥ ४४ ॥
आत्मानमपि या वाक्यार्थबोधें ॥आपणा ह्मणिजे कैवल्य नुसधें॥अंतीं तें ही देसी मोदें॥ऐशीं बिरुदें श्रुति गाती ४५
यालागीं तुझिया कृपावरदा॥ उपचयापचय[3] नाहीं कदा॥ह्रासवृद्धि इत्यादिशब्दा ॥पर्यायार्थी जाणिजे ॥ ४६ ॥
ऐसा समर्थ सुखसंपन्न ॥ तुजहूनि प्राकृत आश्रयी गौण ॥ तैं पंडितपणा धिक्कार पूर्ण ॥ पंडितलेखा न चतुरत्वा ॥
अमृतसांडूनि मृगजळपाना॥धांवे त्याचिया शहाणपणा॥तुजहूनि प्राकृता भजे गौणा ॥ त्याचिया तुलना कल्पावी ॥
असो मूर्खाच्या किमर्थ गोठी ॥ मजवरी करूनि कृपांबुवृष्टि ॥ स्वामी आलासी माजिये भेटी ॥ ते संतुष्टि अवधारीं॥

दिष्ट्याजनार्दनभवानिहनःप्रतीतोयोगेश्वरैरपिदुरापगतिःसुरेशैः ॥
छिंद्ध्याशुनःसुतकलत्रधनाप्तगेहदेहादिमोहरशनांभवदीयमायाम् ॥ २७ ॥

---

[1] भिक्षेच्या मिषानें. [2] द्वारपाळपणानें. [3] क्षयवृद्धि.

आह्मी अविवेकी संसारग्रस्त॥आमुचा कळवळा हृदया आंत॥स्वयें होऊनि कृपावंत॥आलासि येथ सदनासी॥ ५०॥
ज्या तव नामामृतरसपाना ॥ लेशमात्रही लाहो रसना ॥ ह्मणोनि तापस भरले राना॥करिती साधना त्वन्निष्ठ॥५१
शिवादि विरक्त स्मशानमठीं॥एकनिष्ठ योगी हठी॥तयांसि ध्यानीं दुर्लभ भेटी॥मां अपरोक्ष दृष्टिकैं लाहती ५२ ॥
कोण्ही तव यशःश्रवणें तुष्ट ॥ एक झाले कीर्तननिष्ठ ॥ एक करिती नामपाठ ॥ घडघडाट अहर्निशीं॥ ५३ ॥
नगरा मानूंनियां सगरां[1] ॥ वनीं पडती समअजगरा ॥ अष्टौ प्रहर ज्या उजिगरा[2] ॥ ऐसे निजगिरा तुज भजती॥५४ ॥
कित्तेक झाले अर्चनपर ॥ कित्तेक फिरती दिगंबर ॥ ऐसे श्रमती निरंतर ॥ भजनाधिकार लहावया ॥ ५५ ॥
सनकादिक ऊर्ध्वरेते ॥ शक्रादिसुकृती शतमखकर्ते ॥ कपिलादि इंद्रियगणसंहर्ते ॥ कैं तद्वार्ते नकरिसी तूं॥ ५६॥
तो तूं आह्मां अविवेकपरां ॥ हृदयीं स्मरसी करुणाकरा॥विशेष येथेंचि आलासि घरा॥ममाधिकारा न पाहतां॥५७॥
महद्भाग्य हें जनार्दना ॥ पात्र झालों अखिल कल्याणा ॥ आतां इतुकी मम प्रार्थना ॥ करुणाघना परिसावी ॥ ५८ ॥
कोण्या सुकृतलेशें तुझी ॥ वरद कृपा हे लाधलों आजी ॥ भ्रांतिरूपा बेडी माझी ॥ छेदी सहजीं तव माया॥ ५९ ॥
आशु ह्मणिजे शीघ्रतर ॥ मोहरज्जु जे कठोर ॥ ते तव माया दुस्तर ॥ हे जे संसारसुखभ्रांति ॥ ६० ॥ देहात्मभावें
देहममता ॥ तत्सुखार्थ प्रियतम वनिता ॥ तद्भोग घडावया पुरता ॥ सदनआस्था दृढ जाली ॥ ६१ ॥
सदनसंग्रह उपसामग्री ॥ धनधान्यांची ममता भारी ॥ पात्रें वस्त्रें शस्त्रें घरीं ॥ परोपरी अभिलाष॥ ६२॥हय
रथ कुंजर गाई महिषी ॥ अजा अविकें श्वापदें पक्षी ॥ वृत्ति क्षेत्रें विविधा कृषि ॥ गुप्त भूकुक्षीं धननिचय ६॥
वापी कूप तडाग वळनें ॥ सरितानिरुद्ध ह्रदजीवनें ॥ विविध वाटिका वनोद्यानें ॥ तद्रक्षणें जन विविध॥ ६४ ॥

---

[1] विषयुक्त. [2] मोकळीक.

पुत्र कन्या जामात स्नुषा ॥ बहिणी मेहुणे माउशा ॥ बंधु चुलते गोत्र अशेषा ॥ कवळूनि क्लेशा वरपडणें ॥ ६५ ॥ इष्टमित्र सुहृदवर्ग ॥ प्रीति लावूनि करिती संग ॥ विषयार्थ करिती युद्धप्रसंग ॥ शत्रु अभंग ते होती ॥ ६६॥ पदार्थरक्षक मनोनुकूळ ॥ ते जन आप्त होती सकळ ॥ एवं अवघें मोहजाळ ॥ दुस्तर केवळ तव माया॥ ६७ ॥ इयेतें छेदीं तूं झडकरी ॥ त्वरा कां करितोसि ह्मणसी जरी॥ दुर्लभ तव प्राप्ति श्रीहरि ॥ ये संसारीं ये समयीं६८ सुलभ झालासि तूं श्रीपति ॥ ह्मणूनि मानूं जरी निश्चिती ॥ तरी तव माया घालूनि बुंथी[1] ॥ हातोहातीं नाडील ॥ ६९ ॥ नरसुरपितरां योगिवृंदां ॥ दुर्लभ तव प्राप्ति गोविंदा ॥ मज तुष्टलासि आनंदकंदा ॥ तरी करीं छेदा मायेच्या ॥ ७० ॥ पुत्रमोहें वशिष्ठ ठकला ॥ देहाभिमानें कौशिक[2] झकला ॥ अहल्यालोभें भूमंडळा ॥ मुनिसुरमेळा स्मर फिरवी ॥ ७१ ॥ मोहयोगें देहात्मता ॥ देहयोगें विषयीं आस्था ॥ विषयभोगार्थ गृह धन वनिता ॥ प्रपंचममता तद्योगें ॥ ७२ ॥ अप्राप्त जो जो पदार्थमात्र ॥ तदपेक्षेचें संकल्पसूत्र ॥ वासनेचें खवळी गात्र ॥ काम विचित्र मग वाढे ॥ ७३ ॥ जे जे वस्तूचा वियोग ॥ तत्प्राप्तिसाधना नांव योग ॥ प्राप्तवस्तूचा नव्हावा भंग ॥ क्षेम सांग त्या नांव ॥ ७४ ॥ ऐसा योगक्षेम वाहतां॥ जे अनुकूळ होती हिता ॥ त्यांच्या ठायीं प्रेम चित्ता ॥ राग तत्वतां तो ह्मणिजे ॥ ७५ ॥ प्रतिकूळत्वें विषयरोध ॥ करिती त्यांवरी उपजे क्रोध ॥ द्वेष ह्मणिजे जो विरुद्ध ॥ वोपी खेद परोपरी ॥ ७६ ॥ प्रिय वस्तूचा वाढे लोभ ॥ बाह्यलौकिकीं खवळे दंभ ॥ विषयअप्राप्तीचा क्षोभ ॥ करी स्वयंभ द्वेषातें ॥ ७७ ॥ भोग्यवस्तूचा लोभ धरी ॥ तव ते नाशे काळांतरीं ॥ तेणें उपजे शोकलहरी ॥ ते भवपूरीं बुडवितसे ॥ ७८ ॥ जिवलगांचीं कवळूनि मढीं ॥ रडे बोंबली

---

१ आवरण. २ विश्वामित्र.

कपाळ फोडी ॥ ऐशा शोकार्णवीं दे बुडी ॥ परी कोण ते जोडी नविचारी ॥ ७९ ॥ न्यून पाहती पिशुनवर्ग ॥
त्यांसि मत्सर चाळी सांग ॥ अष्टधा मदाचा प्रसंग ॥ करी अभंग अभिमान ॥ ८० ॥ ऐसी दुस्तर हे तव माया ॥
सत्वर छेदीं करुणानिलया ॥ अनन्यभावें प्रणत पायां ॥ वाङ्मनकाया अर्पूनी ॥ ८१ ॥ दैवें जोडल्या कैवल्यपति
॥ तरी हे मागावी संपत्ति ॥ मनोग्राह्य सुख याचिती ॥ ते दुर्मति तुज कथिले ॥ ८२ ॥ असो
अक्रूरें ऐसिया परी ॥ कृष्ण पूजूनि यथोपचारीं ॥ पद मर्दितां मधुरोत्तरीं ॥ भावें श्रीहरि तोषविला ॥ ८३ ॥

इत्यर्चितःसंस्तुतश्चभक्तेनभगवान्हरिः ॥ अक्रूरंसस्मितंप्राहगीर्भिःसम्मोहयन्निव ॥ २८ ॥

॥ टीका ॥ अनन्यभावें अक्रूर शरण॥नमगे वनिता सुत धन धान्य ॥वृत्तिक्षेत्र सुहृद स्वजन॥देहादिकल्याण नापेक्षी
॥ ८४ ॥ इत्यादिवैभवें प्राकृतह्मणती ॥ अक्रूर बंधनें मानी चित्तीं ॥ आमुष्मिक जे भोगप्रतीति ॥तेही भ्रांति हरिमाया
॥ ८५ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्नहरि ॥ विस्मित होऊनि मनीं विवरी ॥ अक्रूरसंपन्नतेची थोरी ॥ मजही वैखरी वदवेना ८६
वैभव ह्मणती ज्या सुरवर ॥ तें हा मानी बंधनागार ॥ परमात्मा मी षड्गुणधर ॥ तेंही सादर हा नमगे ॥ ८७॥ इहामुष्मिकममताबेडी
॥ प्रार्थूनि ह्मणे हे कृपेनें तोडीं ॥ उभयभोगीं अनावडी ॥ आगीं धडधडी वैराग्य ॥ ८८ ॥
मोहरशना जे मम माया ॥ प्रार्थी तीतें छेदावया ॥ नमगत साधिलें कैवल्यनिलया ॥ सीमा चातुर्या नकरवे ॥ ८९ ॥
इहामुत्रार्थ कळला मृषा ॥ सहज बाणली विरक्तिदशा ॥ छेदितां मायामोहपाशा ॥ हरली निशाभंव[1]भ्रांति ॥ ९० ॥
मोहमायेचा करितां छेद ॥ तेव्हांचि तुटोनि गेला भेद ॥ अक्षयकैवल्यपरमानंद ॥ लाहे अमंद नमगोनी ॥ ९१ ॥
धन्य अक्रूर विपश्चितं[2] ॥ धन्य अक्रूर भवविरक्त ॥ धन्य अक्रूर पूर्णभक्त ॥ निष्काम श्रीमंत यशस्वी ॥ ९२ ॥स-

---

[1] अमली पदार्थापासून उत्पन्न झालेली भ्रांति. [2] ज्ञाता.

दयहृदय परमोदार ॥ याचें ऐश्वर्य मजहूनि थोर ॥ ऐसें विवरूनि जगदीश्वर ॥ बोले मधुर तयासीं ॥ ९३ ॥ सम्यक ह्मणिजे बरव्या परी ॥ नेमस्त समर्याद उत्तरीं ॥ अक्रूरातें प्रार्थी हरि ॥ परां[1]दिवैखरीकरूनियां ॥ ९४ ॥ तें बोलणें ह्मणों काय ॥ कीं तनुमनमोहकचि होय ॥ दृष्टीसूनि अवतारकार्य ॥ हरिचातुर्य तें ऐका ॥९५॥

श्रीभगवानुवाच ॥ त्वन्नोगुरुःपितृव्यश्चश्लाघ्योबंधुश्चनित्यदा॥वयंतुरक्ष्याःपोष्याश्चअनुकंप्याःप्रजाहिवः२९

॥ टीका ॥ अचिंत्यानंतगुणपरिपूर्ण ॥ तो अक्रूराचें करी स्तवन ॥ ह्मणे तूं आमुचा गुरु सघृणं[2]॥ पितृव्यपणसंबंधें ॥ ९६ ॥ वसुदेवदेवकी जनकजननी ॥ तिहीं टाकिले बृहद्वनीं ॥ जातमात्रांच्या जीवनीं ॥ नाहीं ग्लानि त्यां चित्तीं ९७ केशिअरिष्टप्रमुख दुष्ट ॥ बाहुबळें म्यां केले पिष्ट ॥ हें कळोनिही कृपाविष्ट ॥ ममाभीष्ट वांछिसी तूं ॥ ९८ ॥ ह्मणे कंस या लेंकुरा मारी ॥ ऐसा कळवळा तव अंतरीं ॥ विनीत होऊनियां ईश्वरीं ॥ अभय निर्धारीं वांछिसी ९९ ऐसा गुरु तूं आमुचा ॥ गोत्रसंबधें चुलता साचा ॥ लोकीं ह्मणतां महत्त्वाचा ॥ श्लाघ्यत्वाचा हा महिमा ॥ ४०० ॥ गोत्रविभाग दायादपणीं ॥ बंधुत्वही तुज लागूनी ॥ परी तूं नित्यसुखाचा दानी ॥ देहाभिमानी नहोसी ॥ १ ॥ आह्मी कृपेचीं भाजनें ॥ पोष्यें लेकुरें अज्ञानें ॥ तुह्मी सर्वस्वें रक्षण करणें ॥ प्रजा जाणोनि आपुलिया ॥ २ ॥ आह्मी लेकुरेंचि साचार ॥ परी येरही संसारग्रस्त जे नर ॥ त्यांही तुमचाच आधार ॥ तो प्रकार अवधारा ॥ ३ ॥

भवद्विधामहाभागानिषेव्याअर्हसत्तमाः ॥ श्रेयस्कामैर्नृभिर्नित्यंदेवाःस्वार्थानसाधवः॥ ३० ॥

॥टीका॥ आपुलें कल्याण इच्छिती पोटीं॥ ऐसे श्रेयस्काम जे सृष्टी॥ मौळें स्पर्शोनि पादपीठीं॥ नमिजे मुकुटीं तिहीं तुह्मां

---

१ परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी अशी चार प्रकारची वाणी. २ सदय.

सज्जनांमाजि सज्जनतम ॥ अर्ह ह्मणिजे पूज्यपरम ॥ नसेवितयांचे पुरविती काम ॥ कल्पद्रुम तुह्मां ऐसे ॥ ५ ॥
तुह्मां ऐशांच्या निषेवणें[१]॥मनुजीं अभीष्ट फळ पावणें॥नित्य सेवितां सुनिष्ठ मनें॥सकळ कल्याणें नर लाहती॥६ ॥
ह्मणाल देवता सेव्य मनुजां॥प्रसिद्ध जाणती जनपद प्रजा॥येथ साधूंची किमर्थ पूजा॥तरी हे वोजा अवधारीं॥७॥
देव इच्छिती आपुला स्वार्थ ॥ नेणती भजकाचा परमार्थ ॥ दीन दयाळ साधु समर्थ ॥ द्रवती परा हृत्कमळीं ॥ ८ ॥
देव रडोनि मागती नवस॥यात्रा नकरितां देती क्लेश ॥कुळधर्मलोपें ठेवूनि दोष ॥करिती विघ्नांस बहुसाल ॥ ९ ॥
एक क्षोभें डोळे धरिती॥एक वांकुडीं तोडें करिती॥एक विस्फोटादि नायटे लुती॥भक्ता अर्पिती महारोग ॥ १० ॥
नवसयात्राकुलधर्मांसी॥रोधतां विघ्नें करितो ऐसीं॥भक्तीं भजतां उपचारेंसीं॥विघ्नें प्रयासीं अनावर त्यां ॥ ११ ॥
अवचित कांटा मोडतां वाटे॥देव क्षोभला तेथेंचि प्रकटे॥लोकीं बोलती उफराटे॥हे लज्जा नवाटे देवासी ॥४१२ ॥
ह्मणती देव लागला पायां॥पायां लागूनि मागतो खाया॥तेव्हां देवत्व गेलें वांयां॥आदरी क्षया भक्ताच्या ॥ १३ ॥
अडक्याचिया गुळासाठीं ॥ तिडका उठवी भक्तापोटीं ॥ भक्तिणीची धरी घांटी ॥ पोरें संकटीं हुंबरवी ॥१४ ॥
महाद्वारींचा जेंवि महार ॥ टुकडा नपवतां होय क्रूर ॥ येतां जातां वारंवार ॥ करी करकर निरोधें ॥ १५ ॥
राजनियोगीं जियेठायीं ॥ ह्मणे तेणेंचि मार्गें जाई ॥ न्यून पूर्ण सांगोनि कांहीं ॥ घाली अपायीं तत्काळ॥ १६ ॥
एवं तुकड्यासाठीं रडती ॥ प्रसन्न होऊनि काय देती ॥ असो क्षुद्र देवांची गति ॥ ह्मणाल सुरपति सेवावा ॥१७
तोही करितां यज्ञ दान ॥ ब्रह्मचर्यादि तपःसाधन ॥ क्षुद्र लक्षूनि करी विघ्न ॥ परी तोषोन द्रवेना ॥ १८ ॥
पंचमहायज्ञ नित्य ॥ निष्ठापूर्वक श्रौतस्मार्त आचरतां कामनारहित ॥ सुरवर समस्त भय वाहती ॥ १९ ॥

---

[१] सेवेनें.

निष्काम सत्कर्मानुष्ठानें ॥ होती चित्तमलक्षालनें ॥ उदया येतां वास्तव ज्ञानें ॥ विरक्त होणें यजमानीं॥ २० ॥
यजमान सुरवराचे पशु ॥ ते जैं लाहती ज्ञानप्रकाशु ॥ इहामुत्रार्थ जाणोनि फोस ॥ होती उदास भवस्वर्गीं॥२१॥
तैं ते नेदिती आह्मां बळी ॥ ह्मणोनि निष्काम भजनकाळीं ॥ विघ्नें कीजे अमरपाळीं ॥ बिरुदावळी बांधोनी॥२२॥
सकाम यजमान घेती पदें ॥ ह्मणोनि त्यांसि चाळिती द्वंद्वें ॥ बळि भक्षूनि देती अपदें ॥कर्मठा खेदें जाचिती ॥
शुकच्छलनार्थ धाडिली रंभा॥क्रोधें जमदग्नि आणिला क्षोभा॥श्वान करूनि केला उभा॥कौशिक कामें कविसदनीं॥
नहुषा केलें अधःपतन ॥ कपिलक्षोभें सगरदहन ॥ शिबिरुक्मांगदांचें कथन ॥जाणे त्रिभुवन सुरमहिमा ॥ २५ ॥
एवं स्वार्थी रडती देव ॥ त्यांसि भजकांची कैंची कींव ॥ यालागिं दयाळु साधव ॥ परार्थ स्वमेव कळवळिती॥२६
आर्तभूत दीन प्राणी॥त्यांतें देखतां द्रवती मनीं॥करिती अनार्त्त अनुग्रहूनी॥ईश्वरभजनीं नियोजिती ॥ २७ ॥
साधु विसरोनि अपकार॥करिती कृपेनें उपकार॥नविचारितां लहान थोर ॥देती अधिकार स्वपदाचा ॥ २८ ॥
ध्रुवासि देखोनि अनाथ दीन॥कृपेनें सनाथ केला पूर्ण॥मग त्या तुष्टोनि श्रीभगवान॥अढळ करोनि स्थापिला२९
कयाधू बंदी धरिली सुरीं॥प्रह्लाद असतां तिचे उदरीं॥जाकळितां शोकलहरी॥साधु अंतरीं कळवळिला ॥३० ॥
सर्वात्मकत्वें निर्वैरता॥बोधूनि अनुग्रह केला पुरता॥प्रह्लाद तेणेंचि झाला सरता॥मिरवे माथां अमरांचे ॥ ३१॥
वाल्मीकि तस्कर जो परिपंथी[1]॥ज्यासि देखोनि लपती श्रुति॥त्यासि सज्जनीं धरूनि हातीं॥छेदूनि संसृति[2] मुनि केला
तत्कृत शतकोटि रामायण ॥ श्रवणें पठनें त्रिजगदुद्धरण ॥ ऐसे कृपाळु सज्जन॥कैंवि सुरगण त्यां तुळती ॥३३ ॥

---

१ शत्रु. २ संसार.

गणिका केवळ अघसंवर्दणी[1] ॥ तारूं नशके सधन कोणी ॥ तेही कृपेनें सज्जनीं ॥ युक्ति योजूनि उद्धरिली ॥३४॥
ह्मणाल श्रेष्ठ तपोधन ॥ आह्मी यदुकुळीं सामान्य ॥ तरी अबाधित ज्यांचें ज्ञान ॥ तेचि सज्जन सुरपूज्य ॥ ३५॥
साक्षात तुष्टल्या लक्ष्मीपति ॥ जे मागती नितांतभक्ति ॥ इहामुत्रार्थी विरक्ति ॥ मोहनिवृत्तिपूर्वक ॥ ३६ ॥
ते नर सनकादिकांचे तुळणे ॥ गौण नमनिजे आधुनिकपणें ॥ ऐसें बोलोनि नारायणें ॥ पुन्हा लक्षणें कथीतसे ॥

नह्यम्मयानितीर्थानिनदेवामृच्छिलामयाः ॥ तेपुनंत्युरुकालेनदर्शनादेवसाधवः ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ गंगाप्रयागादि जें तोयें ॥ कीं पुष्करादि जे जलाशय ॥ सर्वतीर्थें इयें जळमयें ॥ नहोती काय अघहंतीं[2] ॥ ३८ ॥ गंडकी गोमती हरिद्वारीं ॥ मांधातृपुरी नर्मदोदरी ॥ विष्णु श्रीशिव सिंदुरारि ॥ सूर्यकांत तो रविरूपी ॥ ३९ ॥ इत्यादि दैवतें शिळामय ॥ भजतां प्रसन्न होती काय ॥ होती परंतु साधुप्राय ॥ सद्याचि सदय नहोती ॥ ४४० ॥ बदरिनारायण केदार ॥ बिंदुमाधव विश्वेश्वर ॥ प्रयागक्षेत्रीं गदाधर ॥ पितामहेश्वर पितृरूपी ॥ ४१ ॥ जगन्नाथीं पुरुषोत्तम ॥ श्रीशैल्यशिखरीं कैलासधाम॥अहोबळी जो सर्वोत्तम॥वीरविक्रम नरसिंह ॥ ४२ ॥ काळहस्तीमाजी शूळी ॥ श्रीनिवास व्यंकटाचळीं ॥ शिवकंचित चंद्रमौळी ॥ शैलबाळी कामाक्षी ॥ ४३ ॥ विष्णुकंची वरदराज ॥ पक्षतीर्थीं पूषाद्विज ॥ अरुणाचळीं तेजःपुंज ॥ तेजोलिंग गिरिरूपी त्रिविक्रम त्रिकोलूरीं ॥ आदिवाराह श्रीमुष्टिनगरीं ॥ वृद्धाचळीं मन्मथारि ॥ चिदंबरीं गगनात्मा ॥ ४५ ॥ आणि सिंहाळीं वैजनाथ ॥ मध्यार्जुन जगद्विख्यात ॥ गौरी मयूरी एकदंत ॥ गौरीकांत अघहंता ॥ ४६ ॥

---

[1] पापकर्मकथन. [2] पापानाशक.

कुंभकोणीं कुंभेश्वर ॥ शार्ङ्गपाणि कोदंडधर ॥ कावेरीचें अभ्यंतर ॥ वसवी सुंदर श्रीरंग ॥ ४७ ॥ जंबिकेश्वर
आपोमय ॥ रुद्रपादकमलालय ॥ रामचंद्रें स्थापिलें होय ॥ रामेश्वर सेतुबंध ॥४८ ॥ दर्भशायी दर्भशयनीं ॥
मथुरा मीनाक्षी भवानी ॥ सुंदरेश्वराची ते रमणी ॥ शोभती दोन्ही वधूवरें ॥ ४९ ॥ आदिकेशव जनार्दन ॥
त्रिवादित्रिविक्रम वामन ॥ गजेंद्रमोक्ष इंद्रद्युम्न ॥ त्रिकूटाचळ तोताद्रि॥५०॥कन्याकुमारी सिंधुतीरीं ॥ तैसाचि
व्यंकटेश अळगिरि ॥ सुब्रह्मण्य कुमारक्षेत्रीं ॥ कुमार धारातटाकीं ॥ ५१ ॥ सुरासुरांतें मोहनकारी ॥
ते मोहनी उडपक्षेत्रीं ॥ शंकर नारायण हर हरि ॥ कोटेश्वरीं कोटिलिंग ॥ ५२ ॥ मूकांबिका सदय पूर्ण ॥ श्रीमहाबळेश्वर
गोकर्ण ॥ हंपी विरूपाक्ष पावन ॥ पंपासरोवर ज्या नांव ॥५३॥ कृत्तिकायोगीं कार्तिकमासीं ॥
स्वामिदर्शन घडे ज्यासी ॥ सप्त जन्म दे द्विजत्वासी ॥ तपोराशि षण्मुख तो ॥ ५४ ॥ श्रीकरहाटक कृष्णातीरीं
कोपारूढीं श्रीनरहरि ॥ महालक्ष्मी कोल्हापुरीं ॥ भीमातीरीं पांडुरंग ॥ ५५ ॥ तुकाई तुरीया तुळजापुरीं ॥
वैजनाथ पर्यली क्षेत्रीं ॥ अवढानागनाथत्रिपुरारि ॥ ज्योतिर्लिंग अमर्दकीं ॥ ५६ ॥ अत्रि अनसूया रेणुका
दत्त ॥ सिंहाद्रिपर्वतीं जगद्विख्यात ॥ लवणासुराचा केला घात ॥ तेही अद्भुत विष्णुगया ॥ ५७ ॥ शार्ङ्गपाणि
मेहकरीं ॥ सिद्ध अमरेश्वर ॐकारीं ॥ महाकाळेश्वर अवंतिपुरीं ॥ आणि येळूरीं घृष्णेश ॥ ५८ ॥ त्रिसंध्याक्षेत्रीं
त्र्यंबकेश्वर ॥ भीमाउगमीं भीमशंकर ॥ रेवातीरीं[1] भृगुक्षेत्र ॥ सप्तशृंगीं चंडिका ॥ ५९ ॥ प्रभास
सोरठीसोमनाथ ॥ त्रिविक्रम नांदे द्वारके आंत ॥ अर्बुदाचळीं उमाकांत ॥ अर्बुदाचळेश्वर अभिधानें ॥ ६० ॥
यमुनातीरीं मथुरापुरी ॥ भवाब्धिलंघना नौका दुसरी ॥ जेथें सन्निहित श्रीहरि॥अमरीं भूसुरीं सुपूजित ॥६१॥

---

[1] नर्मदातीरीं.

इत्यादि देवता शिळामय ॥ सेवनें प्रसन्न नव्हती काय ॥ होती परंतु पाहिजे धैर्य ॥ बहुकाळवरी भजकांसी ॥ ६२ ॥
मृद्गोकुळें मृन्मय गौरी ॥ पार्थिवलिंगें कीं विघ्नारि[1] ॥ वेदिकास्थंडिलीं शर्वरारि ॥ अर्चिजे नरीं श्रुतिआज्ञा ॥ ६३ ॥
इयें मृच्छिळामय दैवतें ॥ ब्रह्माद्यमरीं संस्थापितें ॥ प्रसन्न होऊनि पूजकातें ॥ पावन करिती चिरकाळें ॥ ६४ ॥
तैसे नव्हती सज्जन साधु ॥ जे दर्शनमात्रें निरसिती खेदु ॥ पाप ताप दैन्य त्रिविध ॥ छेदूनि आनंदमय करिती ६५ ॥
तपीं तीर्थीं पुरश्चरणीं ॥ नानाक्षेत्रीं अनुष्ठानीं ॥ बहुकाळ श्रमतां प्राणिगणीं ॥ विरळा कोण्ही फळ लाहे ॥ ६६ ॥
एकरूप निश्चळवृत्ति ॥ बहुकाळ नराहे सन्मति ॥ मध्यें षड्रिपु विघ्नें करिती ॥ मग अंतरती फळलाभा ॥ ६७ ॥
कित्तेक कामेंचि नाडिले ॥ कित्तेक क्रोधें लिथांडिले[2] ॥ कित्तेक मत्सरें झोडिले ॥ दंभें पाडिले उलथोनी ॥ ६८ ॥
कित्तेक लोभें घातले बंदीं ॥ एकां मदाष्टकाची मांदी ॥ बळेंचि वळघोनियां खांदीं ॥ केले दंदी त्रिजगाचे ॥ ६९ ॥
एक ममतेअधीन झाले ॥ शोकावर्तीं ते बुजाले ॥ तीर्थीं क्षेत्रीं देवतां भजले ॥ कोण्ही लाभले फळ काळें ॥ ७० ॥
तैसे नव्हती सज्जनोत्तम ॥ सहसा नघेती बहुकाळ श्रम ॥ अभीष्टदानीं कल्पद्रुम ॥ निरसिती श्रम दर्शनें ॥ ७१ ॥
पापतापदैन्यहर ॥ साधुसमान नह्वती अपर ॥ काळें फळती तीर्थें अमर ॥ साधु सत्वर फळदाते ॥ ७२ ॥
त्रिपुरुषीं सगरासाठीं ॥ तपश्चर्येच्या संकटीं ॥ श्रमतां तुष्टला धूर्जटि[3] ॥ तैं गंगा मुकुटींहूनि दिधली ॥ ७३ ॥
तैसे सज्जन नफळती कष्टें ॥ दर्शनमात्रेंचि त्या कुक्कटें[4] ॥ पुंडरीकाचें कर्म खोटें ॥ सत्कर्मवाटे परतविलें ॥ ७४ ॥
भागीरथीसन्निध आला ॥ कुक्कटदर्शनें विरमला ॥ पितृभजनीं सज्ज झाला ॥ तेणें विठ्ठला उभें केलें ॥ ७५ ॥
राया ऐसा अक्रूरासी ॥ मृदुभाषणें हृषी केशी ॥ मनीं धरूनि ज्या कार्यासी ॥ आला त्यासी तें सांगे ॥ ७६ ॥

---

१ श्रीगजानन, २ लातेनें उडविले ३ श्रीशंकर, ४ काशीगच्यें दक्षिणभागीं हा एक ब्राह्मण आहे.

कांहीं एक कार्य मनीं ॥ धरूनि आला अक्रूरासदनीं ॥ त्यासि दर्शनें तोषवूनी ॥ सांगे श्रवणीं तें ऐका ॥ ७७ ॥

सभवान्सुहृदांवैनःश्रेयाञ्श्रेयश्चिकीर्षया ॥ जिज्ञासार्थंपांडवानांगच्छस्वत्वंगजाह्वयम्॥ ३२॥

॥टीका॥ श्रीकृष्ण ह्मणे अक्रूरासी॥बोलिलों साधुलक्षणांसी॥प्रस्तुत तितुकींही तुजपासीं॥तो तूं आह्मांसि क्षेमकर७८
निश्चयें आमुच्या सुहृदांमाजी ॥ श्रेष्ठ स्नेहाळ बुद्धि तुझी ॥ अवचंकभावें सुहृत्काजीं ॥ प्रवर्त्तसी हें मी जाणें ॥ ७९ ॥
पांडवांचिया कल्याणकार्या ॥ तुवां जावें गजसाह्वया ॥ कौरवांची विषमचर्या ॥ जाणावया साकल्यें॥८०॥ स्व ह्मणोनि संबोधन॥ सुहृद आप्त तूं आत्मीय पूर्ण ॥ ह्मणोनि तुज हें गुह्यकथन ॥ केलें जाणोन विश्वासें ॥ ८१ ॥
प्रकटूंनये जें इतरांसी ॥ आत्मीयभावें बदतों तुजसीं ॥ त्या ऐकोनि ॥ वृत्तांतासी ॥ साधीं कार्यासि सर्वज्ञा॥ ८२ ॥

पितर्युपरतेबालाःसहमात्रासुदुःखिताः ॥ आनीताःस्वपुरंराज्ञावसंतइतिशुश्रुम ॥ ३३ ॥

॥टीका॥ सावध ऐकें दानपति॥चित्र[1] विचित्र[2] मेलिया अंतीं॥खंडली देखोनि कुरुसंतति ॥ तेणें सत्यवती सचिंत८३
तिनें प्रार्थूनि बादरायणा[3] ॥ भुजिष्ये[4] सहित दोघी सुना ॥ धाडूनि तपोधनाच्या शयना ॥ वंशवर्धना आदरिलें ॥८४॥
चित्रक्षेत्रीं पाण्डुराजा ॥ विचित्रक्षेत्रीं धृतराष्ट्र दुजा ॥ भुजिष्ये जठरीं जन्मला वोजा॥तृतीय प्रजा तो विदुर॥८५॥
पांडु विरूप पांडुरवर्ण ॥ धृतराष्ट्र तो चक्षुर्हीन ॥ विदुर क्षत्ता[5] त्रिकाळज्ञ ॥ परि राज्यासन आयोग्य त्या॥८६ ॥पांडु स्थापूनि भद्रासनीं ॥ राजा केला प्रजाजनीं ॥ त्यासि मृगया करितां वनीं ॥ पडिला व्यसनीं द्विजशापें ॥ ८७ ॥
कर्दमऋषि पत्नीसहित ॥ मृगमैथुना देखोनि तप्त ॥ दंपती मृगत्वें रमतां तेथ ॥ विंधी अवचित पांडु त्या ॥ ८८॥
हृदयीं भेदतां मार्गण[6] ॥ कर्दम बोलिला शापवचन ॥ तूंही रमतां पावसी मरण ॥ पांडु ऐकोन दुखवला ॥ ८९ ॥ते-

---

[1] चित्राङ्गद. [2] विचित्रवीर्य. [3] व्यासाला. [4] दासीसहित. [5] सूतजातीय. [6] बाण.

णें विरक्त झाला मनीं ॥ राज्य सांडूनि तीर्थाटनीं ॥ जातां कांता दोघी जणी ॥ गेल्या विरहिणी दुःखार्ता ॥९०॥ करूनि
समस्त तीर्थावळी ॥ सिद्धाश्रमीं प्रावृट्काळीं ॥ तापसवेशें सिद्धांजवळी॥वसती केली पांडूनें ॥९१ ॥ पुत्ररहिता
अनूर्ध्वगति[1]॥ ऐकोनि पांडु पोळला चित्तीं ॥ तेव्हां ज्येष्ठभार्या जे कुंती ॥ कथी त्याप्रति निजगुह्य॥९२॥ राया
पूर्वीं जनकाघरीं[2] ॥ दुर्वासऋषीनें वरदोत्तरीं ॥ हात ठेवूनि माझिये शिरीं ॥ असतां कुमारी मनु[3] कथिले ॥ ९३ ॥
मंत्रपंचक सांगोनि कानीं॥मग बोधिली विनियोगकरणी॥देव प्रार्थिसी मंत्र जपोनी ॥ तो सुतदानी होईल ॥ ९४ ॥
प्रतीति यावी अंतःकरणा॥ह्मणोनि प्रार्थिलें चंडकिरणा॥तेणें करितां सन्निधाना ॥ मग मी कर्णा प्रसवलें ॥ ९५ ॥
त्यानंतरें उद्वाह[4]काळा ॥ राया तुज म्यां घातली माळा॥ अनन्यभावें तव पदकमळा ॥वांचून डोळां नर नघलीं ९६
सचिंत देखोनि तुज संकटीं ॥ आजि सेवेसि कथिली गोठी॥चारी मंत्र असती गांठी॥ऐकोनि पोटीं नृप हर्षे ॥९७॥
राजा ह्मणे वो धर्मांगने[5] ॥प्राणवल्लभे मृगलोचने ॥ मंत्रसामर्थ्यें मुनिवरदानें ॥ पुत्र ममाज्ञे उत्पादीं ॥ ९८ ॥ ऐसी
आज्ञा लाहूनि सती॥ मंत्रें प्रार्थिला धर्ममूर्ति ॥ त्यापासूनि तत्संतति ॥ लाधली कुंती युधिष्ठिर ॥ ९९ ॥ पुत्र गुणाढ्य
दोखोनि पांडु ॥ प्रतापतेजस्वी मार्तंड ॥ कुंती कवळूनि चुंबी तोंड॥ ह्मणे त्वां गोड भव केला ॥५००॥
पुन्हा अज्ञापी पांडुराजा ॥ शेषमंत्रांच्या प्रसवें प्रजा ॥ मग ते जपोनि मंत्रबीजा ॥ प्रार्थी वोजा समीरणा ॥ १ ॥
तो मारुत[6]संतति वृकोदर ॥ कुंती प्रसवली दुसरा कुमर ॥ तृतीयमंत्रें प्रार्थूनि इंद्र ॥ अर्जुनवीर प्रसवली ॥२॥
मग पांडूनें बोधूनि कुंती ॥ चतुर्थमंत्र माद्रीप्रति ॥ देऊनि तद्द्वारा संतति ॥ केली विश्रांति तयेसी॥३॥ मनीं
माद्रीचे कातर ॥ ह्मणे कुंतीसि तिघे कुमर ॥ एकया मंत्रें दोघे सुर ॥ अश्विनीकुमार ते प्रार्थी ॥ ४ ॥

---

१ अधःपात. २ कुन्तिभोजाच्या घरीं. ३ मन्त्र. ४ विवाहकाळीं. ५ यम. ६ बायु. ७ चिन्ता.

यमल[1] नकुळसहदेव ॥ ऐसे जन्मले पांडव ॥ पुढें कर्माचें तांडव ॥ ऐकें अपूर्व दानपति ॥ ५ ॥ कोणे एके
विचित्र दिवसीं ॥ कुंती गेलिया स्नानासी ॥ कामें जाकळिलें पांडूसी ॥ तो माद्रीसी रति मागे ॥ ६ ॥ निषे-
धितां ते बहुतांपरी ॥ पांडु रमतां बलात्कारीं ॥ जाली प्राणांची बोहरी[2] ॥ मन्मथसमरीं तनु त्यजिली ॥ ७ ॥
कुंती देखोनि ते अवस्था ॥ माद्रीवरी कोपों जातां ॥ तिणें कथिलें त्या वृत्तांता॥समान आर्त्ता वरमरणें[3]॥ ८ ॥
कुंतीसि निरवूनि बाळें दोन्ही ॥ माद्री पांडुसहगामिनी ॥ बाळांसहित कुंती वनीं ॥ शोक करूनि आक्रंदे॥९ ॥
पिता पंचत्वं[4] पावला असतां ॥ मातेसहित बाळां आर्त्ता ॥वरपडलिया दुःखावर्त्ता॥सिद्धसंकेता जाणोनी ॥ १० ॥
मग धृतराष्ट्रें खिन्नमनें ॥ स्वपुरा आणिलें कारुण्यें ॥ तेथें वसताति ऐसी श्रवणें ॥ वार्ता आह्मी ऐकतों ११॥
कुंती आमुची पितृभगिनी[5] ॥ बाळकेंसहित करी ग्लानि ॥ जरी तूं पुससी काय ह्मणोनी ॥ तरी तें श्रवणीं अवधारा

तेषुराजांऽबिकापुत्रोभ्रातृपुत्रेषुदीनधीः ॥ समोनवर्ततेनूनंदुष्पुत्रवशगोंऽधदृक्॥ ३४॥

॥टीका॥धृतराष्ट्र जो अंबिकापुत्र ॥ दुष्टपुत्रांचा ऐकोनि मंत्र ॥ स्वयें झाला पुत्रतंत्र ॥ अंध निर्नेत्र सबाह्य ॥
तया भ्रातृपुत्रांच्या ठायीं ॥ दीन दुर्बुद्धि धरिली पाहीं॥समानभावें वर्तत नाहीं ॥ हें निश्चयीं जाणवया ॥ १४ ॥
सूक्ष्म अभिप्राय जो म्यां कथिला ॥ तो तूं ऐकोनि उठीं वहिला ॥ इतुकें कथूनि अक्रूराला॥ काय बोलिला पुन्हा हरि

गच्छजानीहितद्वृत्तमधुनासाध्वसाधुवा ॥ विज्ञायतद्विधास्यामोयथाशंसुहृदांभवेत् ॥ ३५ ॥

॥टीका॥आतां अक्रूरा स्वार होईं॥सवेग हस्तिनापुरा जाईं॥धृतराष्ट्राचें वर्तन पाहीं॥ दिवस कांहीं राहोनी॥ १६ ॥

---

१ जुळे. २ नाश. ३ पतिमरणानें. ४ मरण. ५ पित्याची बहीण-आते.

तीव्रदंडें शासन करितां ॥ सहसा निवाड नोहे वृत्ता ॥ तेंचि सहवासें वर्ततां ॥ सुष्ठु दुष्टता प्रकाशे ॥ १७ ॥
यालागिं राहोनि कांहीं दिवस ॥ पाहें तयाच्या वर्तनास ॥ साधुअसाधुत्वाचा दोष ॥ लागे कवणास हें विवरीं ॥ १८ ॥
पांडुमरणें दुःख पृथे ॥ बाळें जनकेंविण अनाथें ॥ अंध आपंगी कीं दे व्यथे ॥ हें तां चित्तें अवगमिजे ॥ १९ ॥
न्यायनैष्ठुर्य अंबिकासुता ॥ गौ[2]तमा गांगेया देखतां ॥ विषमाचरण प्रकाशितां ॥ शंका चित्ता नधरावी ॥ २० ॥
इतुका साधूनि कार्यार्थ ॥ सत्वर परतोनि येईं येथ ॥ ऐकोनि तव मुखें वृत्तांत ॥ सुहृदां सनाथ करूं आह्मी ॥ २१ ॥
जेणें सुहृदां वाढे सुख ॥ तेंचि आह्मां करणें देख ॥ ऐसा वृत्तांत आदिपुरुष ॥ वदला सम्यक ते काळीं ॥ २२ ॥

इत्यक्रूरंसमादिश्यभगवान्हरिरीश्वरः ॥ संकर्षणोद्धवाभ्यांवैततःस्वभवनंययौ ॥ ३६ ॥

॥ टीका ॥ इतुका आदेश निरोपूनी ॥ अचिंत्यैश्वर्याची खाणी ॥ तो अक्रूरा चक्रपाणे ॥ आज्ञा देऊनि ऊठिला ॥ २३ ॥
प्रणतक्लेशांतें संहरी ॥ यालागिं नामें बोलिजे हरि ॥ स्वगतमाया अंगीकारीं ॥ ईश्वरोच्चारीं श्रुति गाती ॥ २४ ॥
सहित उद्धव संकर्षण ॥ अभिवेष्टित पार्षद[3]गण ॥ निघाले अक्रूरसदनींहून ॥ निजात्मसदन प्रवेशले ॥ २५ ॥
इतुकी कथा व्यासतनय ॥ सांगोनि संपविला अध्याय ॥ पुढिले कथेचा अभिप्राय ॥ बीजप्राय प्रदर्शी ॥ २६ ॥
पुढिले अध्यायीं अक्रूर ॥ प्रवेशोनि हस्तिनापुर ॥ धृतराष्ट्राचें विषमांतर ॥ लक्षूनि सत्वर येईल ॥ २७ ॥
तें सविस्तर परिसिजे श्रोतीं ॥ ज्यामाजि पूर्वार्धा सामाप्ति ॥ वर्णील श्रीशुक[4]भारती ॥ भाषाव्युत्पत्ति हरिवरद ॥ २८ ॥
आधारभूत प्रतिष्ठानीं ॥ आधेय[5] अनंतब्रह्माण्डश्रेणी ॥ एकनाथ ऐश्वर्यदानी ॥ सिंहासनीं सर्वात्मा ॥ २९ ॥

---

[1] ममतेनें रक्षण करितो. [2] कृपाचार्य. [3] सभासद-सेवक. [4] श्रीशुकाची वाणी. [5] आधारानें राहणारा पदार्थ.

प्रतिब्रह्माण्डीं ईश्वर पृथक ॥ स्थापिले स्वपादप्रणत रंक ॥ शासन चिदानंदात्मक ॥ स्वानंद सम्यक सन्मयता ॥ ३०
गोविंद प्रबोधामृतघन ॥ वर्षतां ब्रह्माद्वयजीवन ॥ तेणें दयार्णव केला पूर्ण ॥ तें हें व्याख्यान हरिवरद ॥ ३१ ॥
श्रीमद्भागवत या नाम ॥ स्कंध त्यांतील हा दशम ॥ श्रीकृष्णाचें जन्मकर्म ॥ अध्याय परम अठ्ठेचाळिसावा ॥ ३२ ॥

इतिश्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायांसैरंध्रीसनाथीकरणाक्रूरसदनाभिगमनहस्तिनापुरप्रवेशेनंनामाष्टचत्वारिंशत्तमोऽध्यायः ४८ ॥

अहंकारमदानांचगरंयत्रनविद्यते ॥ अहंमदाख्येनगरेअध्यायोऽयंसमापितः ॥ १ ॥
आनंदाब्देमाधवेचकृष्णाष्टम्यांबुधेदिवा ॥ अष्टचत्वारिंशतिकोह्यध्यायःपूर्णतांगतः ॥

॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ शुभंभवतु ॥ श्लोक ॥ ३६ ॥ वोव्याटीका ॥ ५३२ ॥ एवंसंख्या ॥ ५६८ ॥

अध्याय ४९ वा

अक्रूरें जाऊनि हस्तिनापुरा ॥ लक्षितां धृतराष्ट्र अंतरा ॥ भजे वैषम्यें भ्रातृपुत्रां ॥ या निर्धारा प्रकटिलें ॥ ४९ ॥ गौतम गांगेय भारद्वाज ॥ बाह्लीकादि सहात्मज ॥ सर्व सभ्यां कलहबीज ॥ प्रकट गुज प्रकाशिलें ॥ ५० ॥



श्रीमद्गोविंदात्मने नमः ॥ ॥ गौरव धरितां लघुत्व भेटे ॥ लघुत्वें भजतां गुरुत्वें वेंठ ॥राहटीं
माजि ऐसें घटे ॥ भजनवाटे नमो तुझिये ॥ १ ॥ ब्रह्मत्त्वें वेंठतां स्मरणीं ॥तैं सांठवे
ईश्वरपणीं ॥ शुद्धसत्वाची गवसणी ॥ मायावरणीं आवृत ॥ २॥ समष्टि सर्वज्ञत्वा धरी
तंव ये व्यष्टित्वामाझारी ॥ अल्पज्ञत्वें मानी थोरी ॥ तिर्यकस्थावरीं मग पैंठे[1] ॥ ३ ॥
गौरवें लघुता ऐसी पावे ॥ लक्षचौऱ्यांसीं योनि भंवे ॥ सत्यानृत न होतां ठावें ॥ केवळ मावे वरपडवी ॥ ४ ॥
गौरवावगमें ऐसी दशा ॥ उभारूनि विश्वाभासा ॥ माजि विचंबवी[2] प्रकाशा ॥ पात्र क्लेशा करूनियां॥ ५ ॥
येथें कर्म कोठें होतें ॥ गौरवाभिमानें लघुत्व आंते[3] ॥ एवं राहाटीचेनि पंथें ॥ अवस्तुत्वातें वस्तु ये॥६॥ आपदा
भोगी नानापरी ॥ तथापि गौरवाची आस्था धरी ॥ तंव तंव सार्टें[4] वाजती शिरीं ॥ लघु लघुतरीं अवतर ॥ ७॥
श्वान सूकर खर वानर ॥ इत्यादि योनि नीचतर ॥ तेथही आपणा मनी थोर ॥ धरी अहंकार गौरवीं ॥ ८ ॥
तों तों विशेष क्लेश पावे ॥ परंतु वर्म नोहे ठावें ॥ भाग्यें कृपा केलिया देवें ॥ तैं सत्सेवे अधिकार ॥ ९ ॥
चित्त रंगतां सत्संगती ॥ पश्चात्ताप होय चित्तीं॥गुरुत्व पाहे सर्वां भूतीं ॥ लघुत्वीं वसती स्वयें करी ॥ १० ॥
विश्वीं पाहे विश्वंभर ॥ जगद्रूप जगदीश्वर ॥ आपण लघुतर दीन पामर ॥ पापसागर दुर्वृत्त ॥ ११ ॥
प्राणिमात्राचें करी स्तवन ॥ नदुखवी कोणाचेंही मन ॥ जनीं लक्षूनि जनार्दन ॥ लघुत्वें शरण सर्वांसी॥ १२ ॥

---

[1] प्रविष्ट होई. [2] श्रमवी. [3] प्राप्त होई [4] सोसाटे.

ऐसी निष्ठा दृढ बाणतां ॥ प्रकटे सर्वत्र एकात्मता ॥ निंदा द्वेष नुधवी[1] माथा ॥ अभेद समता प्रकाशे ॥ १३ ॥
सत्संगती रमतां मन ॥ सद्गुरुमहिमा होय श्रवण ॥ तेव्हां सांडूनि देहाभिमान ॥ अनन्यशरण स्वयें होय ॥ १४ ॥
नित्या[2]नित्यवस्तुविचार ॥ सद्गुरुबोधें वारंवार ॥ प्रत्यय बाणतां संसार ॥ मृषा असार जाणों ये ॥ १५ ॥
इहामुत्रार्थीं विरक्त ॥ होऊनि विवरी आत्महित ॥ गुरुसेवनीं अतंद्रित ॥ शोधी चित्त सन्मार्गें ॥ १६ ॥
उपास्यदैवत सद्गुरुमूर्ति ॥ आत्मनिवेदनान्त भक्ति ॥ करितां अपरोक्षज्ञानावाप्ति ॥ भ्रमनिवृत्तिपूर्वक ॥ १७ ॥
ऐसा होतां निजात्मरत ॥ नरसुरविधिहर वांछिती तीर्थ ॥ लघुत्वें गौरव ऐसें प्राप्त ॥ ब्रह्मपर्यंत समरसतां ॥ १८ ॥
यालागिं लघुत्वें भजनपथा ॥ सप्रेमभावें वंदूनि माथां ॥ हेंचि प्रार्थितों सद्गुरुनाथा ॥ जे प्रणतां लघुता रुचवावी ॥
येथें श्रोते शंका करिती ॥ शिष्य लघुत्वें गुरुत्वीं भजती ॥ तैं शिष्यांसि गौरवप्राप्ति ॥ लघुत्वावाप्ति मग कोणा ॥ २० ॥
लघुत्वें भजतां गौरव पावे ॥ हें शिष्यत्वीं दिसे आघवें ॥ तेथ गुरूनें कें लघुत्वा यावें ॥ प्रतिपादावें हें कैसें ॥ २१ ॥
ऐसें जरी नप्रतिपादिजे ॥ तरी व्याख्यान करूं वक्ता लाजे ॥ इये शंकेच्या निरसनकाजें ॥ श्रवण कीजे विचक्षणीं २२ ॥
आदिनाथ तो ईश्वरु ॥ त्यासही भज्य अवश्य गुरु ॥ शक्तीसि[3] बोधूनि प्रबोधसारु ॥ ध्यानीं तत्पर स्वयें होतां २३
तैं देवीनें केला प्रश्न ॥ पूर्णब्रह्म तूं सनातन ॥ तुजही ध्येय असे कोण ॥ तें मज निरूपण करावें ॥ २४ ॥
मग तो ह्मणे ऐकें शक्ति ॥ मज नकरितां सद्गुरुभक्ति ॥ ऐश्वर्याची होईल च्युति ॥ लघुत्वावाप्ति अनयासें ॥ २५ ॥
यालागीं सद्गुरुपदाचें ध्यान ॥ मी न विसंबें अर्धक्षण ॥ यास्तव करितां स्थितिलयसृजन ॥ अलिप्त पूर्ण नित्यमुक्त २६
दक्षिण।मूर्ति सर्वां शिरीं ॥ देदीप्यमान सहस्रारीं ॥ भजनविमुखा भवसागरीं ॥ लघुलघुतरीं अवतरतां ॥ २७ ॥

---

[1] वर उचलीत नाहीं. [2] नित्यवस्तु एक ईश्वर. इतर दृश्य तितकें अनित्य. [3] श्रीपार्वती.

गुरुत्वें करूनि शिष्यबोधा॥स्वयें भजिजे सद्गुरुपदा॥लघुत्व विसंबूंनये कदा॥या अनुवादा शिव वदला ॥२८ ॥
यालागिं गुरुपरमगुरु- ॥ प्रमुख परमेष्ठी[1] परात्परु ॥ ईश्वरपर्यंत उत्तरोतरु ॥ मार्ग सधर भजनाचा॥२९ ॥
लघुत्वें आपुल्या गुरूसि भजिजे॥तेणें लाघव जतन कीजे॥परंपरेच्या रक्षणकाजें॥शिष्य बोधिजे तदाज्ञा ॥ ३० ॥
शिष्य बोधूनि गौरवगरिमा॥घेऊनि सांडील गुरुपदप्रेमा॥तो तैं पावेल योनि अधमा॥ऐसिया नेमा समजा हो ॥
जंववरी संप्रज्ञात[2]वृत्ति॥तंववरी नटकिजे सद्गुरुभक्ति॥असंप्रज्ञात बाणल्या स्थिति॥तैं अभेदभक्ति सायुज्य॥ ३ ॥
दक्षिणामूर्ति[3] सर्वां शिरीं॥तैं सर्वीं भजावें सहस्रारीं ॥ ह्मणाल परंपराव्यवहारीं ॥ वृद्धाचारीं कां पडिजे ॥ ३३॥
इये शंकेचा परिहार ॥ ऐका होऊनि एकाग्र ॥ शुद्धसत्वात्मक ईश्वर ॥ अमळ विशुद्ध परब्रह्म ॥ ३४ ॥
प्रवृत्तिप्रकाश प्रथम स्फुरण ॥ नरमे एकाकी ह्मणोन ॥ बहुत्वाचें अभिलाषण ॥ ईश्वरपण या नांव॥ ३५ ॥
ऐसी वाढलिया प्रवृति ॥ तेणें अनुल्लंघ्य संसृति ॥ यास्तव कारुण्यें निवृत्ति ॥ दक्षिणामूर्ति प्रबोधी ॥ ३६ ॥
शुद्धसत्वात्मक प्रथम स्फुरण॥तेथ वामांगीं ईश्वरपण ॥ दक्षिणांगीं करुणापूर्ण ॥ दक्षिणामूर्ति गुरुवर्य ॥ ३ ॥
प्रवृत्ति प्रकाशूनि ईश्वर ॥ करितां गुरुपदभजनादर ॥ स्वसंवेद्य निर्विकार ॥ नित्यमुक्त निर्लेप ॥ ३८ ॥
पुढें अष्टधाप्रकृतियोगें ॥ जीवकोटि योनिविभागें ॥ चिज्जडग्रंथी स्थिरचर जगें ॥रजतमप्रसंगें मलिनता॥ ३९ ॥
यास्तव स्वसंवेद्यता नाहीं॥तरी दक्षिणामूर्ति भजती कहीं॥ह्मणोनि परंपराप्रवाहीं॥गुरुपद तेहीं भजावें॥४० ॥
वेदांतवाक्यार्थबोधेंकरून ॥ होतां तत्वंपदशोधन ॥ परोक्षमात्र शब्दज्ञान ॥ गुरुपदभजन अपरोक्ष॥ ४१ ॥
नलगे तत्वंपद शोधावें ॥ गुरुपद भजता अनन्यभावें॥परोक्ष स्वसंवेद्यता फावे॥हें वर्म जाणावें प्रणतजनीं४२ ॥

---

१ ब्रह्मदेव. २ भेदभाव. ३ शिवमूर्ति.

ऐसिया गुरुपदभजनपथा ॥ बद्धांजळि नमितां माथा॥कृपा अनावर सद्गुरुनाथा ॥आरब्धकथा ते वदवी॥४३॥
गुरुकृपेचा वर्षतां घन ॥ उदुंबरमूळीं गौतमीवन ॥ येर ब्रह्मादि जीवन ॥ ते सज्जन बहुवोघ ॥ ४४ ॥
सर्व मिळोनि गोदावरी ॥ ते गुरुकृपा परमेश्वरी ॥ दयार्णवाचे अभ्यंतरीं ॥ प्रकाश करी प्रज्ञेचा ४५ ॥
तेथ प्रश्नमिसें सज्जन ॥ श्रवणीं बैसोनि सावधान ॥ वक्तृत्वाचें पुष्टीकरण ॥ अंतःकरण प्रशस्तीं ॥ ४६ ॥
ह्मणती श्रीकृष्णें अक्रूरा ॥ पाठवूनि हस्तिनापुरा ॥ रामउद्धवेंसिं आला घरा ॥ ऐसें कुरुवरा मुनि वदला ॥
॥ ४७ ॥ पुढें अक्रूराकडील मात ॥ पुसावया राजा उदित ॥ हें जाणोनि व्याससुत ॥ सांगे वृत्तांत
न पुसतां ॥ ४८ ॥ अक्रूरें जाऊनि हस्तिनापुरा ॥ लक्षितां धृतराष्ट्र अन्तरा॥भजे वैषम्यें भ्रातृपुत्रां॥
या निर्धारा प्रकटिलें ॥ ४९ ॥ गौतम[1] गांगेय भारद्वाज[2] ॥ बाल्हीकादि सहात्मज ॥ सर्व सभ्यां कलहबीज ॥
प्रकट गुज प्रकाशिलें ॥ ५० ॥ मग पातला मधुपुरासी ॥ वृत्तांत कथिला कृष्णापासीं ॥ इतुकेनि समाप्ति
पूर्वार्धासी ॥ एकोणवन्नासीं अध्यायीं ॥ ५१ ॥ तो ये कथेचा विस्तार सरला ॥ शुक निरूपी कुरुशार्दूला[3]
एकाग्र करूनियां हृत्कमळा ॥ श्रोतीं परिसिला पाहिजे ॥ ५२ ॥

॥ श्रीशुकउवाच॥ ॥ सगत्वाहास्तिनपुरंपौरवेंद्रयशोंऽकितम् ॥ददर्शतत्रांबिकेयंसभीष्मविदुरंपृथाम्॥ १॥
सहपुत्रंचबाह्लीकंभारद्वाजंसगौतमम्॥कर्णंदुर्योधनंद्रौणिंपाण्डवान्सुहृदोपरान्॥२॥

---

१ कृपाचार्य. २ द्रोणाचार्य. २ कौरवश्रेष्ठाला.

॥ टीका ॥ शुक ह्मणे गा श्रोतृरत्ना ॥ कुरुकुळमलयाचलचंदना ॥ यशःसौरभ्यें निववविसी जना ॥ सुरसज्जनां
गुणतिलकीं ॥५३॥कृष्णानुज्ञा वंदूनि शिरीं॥अक्रूर सानुराग सहरहंवरीं ॥हस्तिनापुरा प्रयाण करी॥हृदयीं श्रीहरि
चिंतूनी ॥ ५४ ॥ हरिस्मरणें दोषनिवृत्ति॥तैशा वसती क्रमूनि पंथीं॥तीर्थभ्रम कीं द्वारावती॥तेंवि कुंती पहावया ॥
पुढें जाऊनि हस्तिनापुरा॥आत्मागमन चारद्वारा[1]॥विदित केलें अंबिकाकुमरा॥प्रेरी सामोरा प्रधान तो॥ ५६ ॥
ययातीचा तनयोत्तम ॥ पूरु ऐसें जयासि नाम ॥ तदन्वयीं ज्याचें जन्म ॥ प्रतापधाम पौरव ते ॥ ५७ ॥
महाभिष दुष्यन्त भरत ॥ शंतनु भीष्म विचित्ररथ ॥ पांडुधृतराष्ट्रपर्यंत ॥ यशोमंडित पुरशोभा ॥ ५८ ॥
पौरवीं निर्मिलीं देवागारें ॥ ब्राह्मणायतनें अग्रहारें[2] ॥ हयमेधप्रमुख यज्ञागारें ॥ विश्रांतिकरें सर्वत्र ॥ ५९ ॥
अन्नाच्छादनकृतनैश्चित्य ॥ ब्राह्मण स्ववर्णाश्रमनिरत ॥ व्रतीं गृहस्थ वानप्रस्थ ॥ स्वधर्ममंडित पुरगर्भीं ॥ ६० ॥
वेदाध्यायी ब्रह्मचारी ॥ श्रौतस्मार्तें घरोघरीं ॥ पुराणश्रवणें गंगातीरीं ॥ प्रजा व्यापारीं भयरहिता ॥ ६१ ॥
वनें उपवनें वाटिका ॥ तपोधनांच्या गुहा मठिका ॥ स्वधर्मनिर्णयधर्मपीठिका ॥ हाट वटिका चौबारें ॥ ६२॥
रत्नखचितकलशश्रेणी ॥ ध्वजा पताका झळकती गगनीं ॥ मखरीं तोरणीं वितानीं ॥ वैडूर्यमणि लखलखिती॥ ६३॥
पौरवेंद्र यशोऽकित ॥ अक्रूर नगर पाहत पाहत ॥ पातला राजभुवना आंत ॥ अंबिकासुत जे ठायीं ॥ ६४ ॥
यान विसर्जूनि लवलाहीं ॥ प्रवेशोनि सभालयीं ॥ मौळ ठेवूनियां पायीं ॥ भीष्मद्रोण वंदिले ॥ ६५ ॥
तिहीं देतां आलिंगन ॥ नमिले गौतमद्रोणनंदन ॥ बाहूलीक भूरिश्रवा कर्ण ॥ क्रमेंकरून भेटले॥ ६६ ॥
प्रज्ञाचक्षु तो धृतराष्ट्र ॥ त्रिकालज्ञ क्षत्ता विदुर ॥ पृथेसहित पांडुकुमर ॥ आणि गांधार अवघेची ॥ ६७ ॥

---

[1] दूताकडून. [2] ईश्वरप्रीत्यर्थ कुटुंब वत्सल ब्राह्मणास इनाम दिलेला गांव.

शकुनिप्रमुख सुहृद आप्त ॥ गांधारदुर्योधनांसहित ॥ देखता झाला गांदिनीसुत ॥ त्यातें यथोचित आळंगी ॥ ६८ ॥

यथावदुपसंगम्यबंधुभिर्गांदिनीसुतः ॥ संस्पृष्टस्तैःसुहृद्वार्तांस्वयंचास्पृच्छदव्ययम् ॥ ३ ॥

॥टीका॥निजानुयायी यूथपति॥तिहींसीं अक्रूर कौरवांप्रति॥भेटला आणि साधुवृत्ति॥तिहीं समस्तीं मानिला६९॥
समस्तीं पुसिलें सुस्वागत॥कुशल यादवकुल समस्त॥त्यां तें कथूनि यथावृत्त॥स्वयेंही पुसत त्यां कुशळ ॥ ७० ॥
कृष्णें कथिल्या वृत्तांतास ॥ विवराया निजमानस ॥ तेथें राहिला कित्तेक मास ॥ तें रायास मुनि सांगे ॥ ७१ ॥

उवासकतिचिन्मासान्राज्ञोवृत्तविवित्सया ॥ दुष्प्रजस्याल्पसारस्यखलच्छंदानुवर्तिनः ॥ ४ ॥

॥टीका॥राजा धृतराष्ट्र अंबिकासुत॥दुष्टपुत्रेंसिं पुत्रवंत॥दुर्मति आणि धैर्यरहित॥छंदें वर्तत खळांचिया॥७२॥
दुर्योधन दुःशासन ॥ परमान्यायी निजसंतान ॥ मोहें ह्मणवी पुत्रवान् ॥ नकरी शासन कृतांगसां ॥ ७१ ॥
पुत्रमोहें व्याकुळित ॥ विशेष खळच्छंदें वर्तत ॥ कर्ण शकुनि जयद्रथ ॥ स्वयें संमत या दुष्टां ॥ ७४ ॥
स्वयें आपण रहित नेत्र ॥ दुष्टचतुष्टयकथितमंत्र ॥ ऐकोनि वर्ते तदनुसूत्र ॥ खंडूनि पवित्र धर्मपथा ॥ ७५ ॥
त्याचें पाहावया चेष्टित ॥ सरळ कुटिल मनोरथ ॥ अक्रूर राहिला मास बहुत ॥ कीं उमजे वृत्त सहवासें ॥ ७६॥
दुष्ट मंत्र ह्मणसी कैसा ॥ तो तूं ऐकें कुरुनरेशा ॥ सद्गुणीं आरोप करूनि दोषा॥कपटें नाशा प्रवर्तती ॥ ७७ ॥

तेजओजोबलंवीर्यंप्रश्रयादींश्चसद्गुणान् ॥ प्रजानुरागंपार्थेषुनसहद्भिश्चिकीर्षितम् ॥ ५ ॥

॥टीका॥पृथाशब्दें बोलिजे कुंती॥तिच्या पुत्रां पार्थ ह्मणती ॥कुंतीसुतांची संपत्ति ॥ऐकें नृपति गुणवंता ॥ ७८ ॥

---

१ शकुनि. २ अपराध्यांना.

तेज ओज वीर्य बळ ॥ प्रश्रयादि सद्गुण बहळ ॥ पांडवीं देखोनि प्रजा सकळ ॥ भजती स्नेहाळ मानूनी ७९॥ तेज ह्मणिजे प्रभावशक्ति ॥ स्वयंभ आंगींची ऐश्वर्यवृत्ति ॥ ओज ह्मणिजे शस्त्रास्त्रमति ॥ अभ्यासयुक्ति पटुतरता ॥ ८० ॥ वीर्यशब्दें बोलिजे शौर्य ॥ शत्रुसमरीं नभंगे धैर्य ॥ नपाहतां आश्रयसाह्य ॥ बुद्धि निर्भय नैसर्ग्य ॥ ८१ ॥ स्वयंभ शरीरशक्ति तें बळ ॥ तनुठकार अभ्यासशीळ ॥ बाहु सदट[1] मंदराचळ ॥ कवळूं पाहती उन्मळना ॥ ८२ ॥ प्रश्रय ह्मणिजे विनयभाव ॥ नीतिनैपुण्य स्नेहलाघव ॥ सेना सेवक प्रजा सर्व ॥ निजगौरवें वर्त्तवणें ॥ ८३ ॥ दया दाक्षिण्य वदान्यता ॥ प्रताप प्रागल्भ्य दुर्धर्षतां[2] ॥ दीनानुकंपा मितवक्तृता ॥ मिष्ट अमृतासम वदती ॥ ८४ ॥ ऐसे सद्गुणमंडित पार्थ ॥ देखोनि कौरव दुष्पथनिरत ॥ नसाहोनि पांडवाचरित ॥ ह्मणती अनर्थ हे आह्मां ॥ ८५ ॥ स्वगुणीं प्रजा करूनि वश्य ॥ आह्मां नेमिती आपुलें दास्य ॥ कैंचें राज्य कैंचें यश ॥ करूनि पोष्य वर्त्तविती ॥ ८६ ॥ आपुलिया कल्याणाकारणें ॥ तिहीं दुष्टीं जो विचार करणें ॥ चिकीर्षित[3] ऐसें त्यातें ह्मणणें ॥ तें ऐकणें श्लोकार्थें ॥ ८७ ॥

कृतंचधार्तराष्ट्रैर्यद्वरदानाद्यपेशलम् ॥ आचख्यौसर्वमेवास्मैपृथाविदुरएवच ॥ ६ ॥

॥टीका॥ दुर्योधनादि धृतराष्ट्र ॥ कर्ण शकुनि द्रोणकुमर ॥ इहीं करूनि दुर्विचार ॥ केले अपकार पांडवां ॥ ८८ ॥ भीमार्जुना मारिल्याविण ॥ आह्मां कैंचें सिंहासन ऐसें॥ चिकीर्षित[3] विवरून ॥ करिती यत्न तद्धननीं ॥ ८९ ॥ जळक्रीडामिसें सकळीं ॥ प्रवेशोनि गंगाजळीं ॥ धर्मादि गोवूनि पृथग्मेळीं ॥ अर्जुन तळीं बुडविला

---

१ दृढ, २ अजिंक्यपणा. ३ करावयास इच्छिलेलें.

॥ ९० ॥ मृगयाव्याजें सन्नद्ध बद्ध ॥ शस्त्रें करूं पाहती वध ॥ ऐसिया विचित्र क्रीडा विविध ॥ करितां सावध हननार्थी ॥ ९१ ॥ भीमासि विषप्रलय केला ॥ रात्रीं गंगेंत तो टाकिला ॥ धृतराष्ट्रासि हा अन्याय कळला ॥ परि कुमरांला नकोपे ॥ ९२ ॥ इत्यादि अन्याय कौरवकृत ॥ कुंतीविदुरवदनें श्रुत॥ पांडुमरणापासूनि वृत्त॥ केलें विदित अक्रूरा ॥ ९३ ॥ केव्हां विदित केलें ह्मणसी ॥ ऐकें राया इयेविषीं ॥ जें अक्रूर गेला कुंतीपासीं ॥ एकांतासी सांतवना ॥ ९४ ॥ सभे भेटोनि सर्वांप्रति ॥ कुंतीसि भेटला मग एकांतीं ॥ तिणें सुखदुःखांच्या युक्ति ॥ कथिल्या नृपति त्या ऐकें ॥ ९५ ॥

पृथातुभ्रातरंप्राप्तमक्रूरमुपसृत्यतम् ॥ उवाचजन्मनिलयंस्मरंत्यश्रुकलेक्षणा ॥ ७ ॥

॥टीका॥अक्रूर स्नेहें सदना आला ॥ देखोनि पृथेसि आह्लाद झाला ॥ बंधु चिरकाळें भेटला॥ पुरस्करिलां[1] अभिगमनें ॥ ९६ ॥ त्वरें जाऊनि अक्रूराप्रति ॥ आणूनि बैसविला आसनीं निगुती ॥ जन्मभूमि स्मरोनि चित्तीं ॥ अश्रुपातीं भू भिजवी ॥ ९७ ॥ पिता शूरसेन भरला मनीं ॥ आणि आठवी मारिषा जननी ॥ बंधु वसुदेवाची ग्लानि ॥ स्मरतां नयनीं जळ वाहे ॥ ९८ ॥ कैसी दैवरेखा विचित्र ॥ तदनुसार कर्मसूत्र॥देवकी पर्णूनि क्लेशपात्र ॥ झाला पवित्र वसुदेव ॥ ९९ ॥ मागें ऐकिली नाहीं कोण्हीं ॥ ते उदेली गगनवाणी ॥ कंसें शंकोनि रक्षणीं ॥ केली जाचणी यदुवंशा ॥१०० ॥ इत्यादि कंसमरणवरी ॥ स्मरोनि यदुकुळींची अवसरी ॥ कुंती सखेद अश्रुधारी ॥ अक्रूर करीं परिमार्जी[2] ॥ १ ॥ कुंतिभोजें पालन केलें ॥ पांडु वरिला दैवबळें ॥ तैंहूनि माहेर अंत

---

[1] सत्कारिला. [2] पुशी.

रलें ॥ आजि देखिलें तव वदन ॥ २ ॥ धणीभरीं[1] असोनियां गणगोत॥ झालें परदेशी अनाथ ॥ भाग्यें देखिलासि अवचित ॥ परी सांगें वृत्तांत यदुकुळींचा ॥ ३ ॥

अपिस्मरंतिनःसौम्यपितरोभ्रातरश्चमे ॥ भगिन्योभ्रातृपुत्राश्चजामयःसख्यएवच ॥ ८ ॥

॥टीका॥ सौम्य ऐसें संबोधन ॥ अक्रूर चंद्रावतार ह्मणोन॥आणि निववितां चंद्राहून ॥ अमृतवचनीं मनुजातें ॥ ४ ॥ सौम्यबंधु भो अक्रूरा ॥ माझें स्मरण कधींही पितरां ॥ बंधुवर्गा सहोदरां ॥ होते अंतरा आठवण ॥ ५ ॥ माझ्या भगिनी सहोदरी ॥ पितृव्यभगिनी यदुकुळकुमरी ॥ स्वभावें पातलिया माहेरीं॥केव्हां तरी मज स्मरती ॥ ६ ॥ माझ्या बंधूचे जे पुत्र ॥ रामकृष्णादि पुण्यपवित्र ॥ वृष्णि यादव सर्व गोत्र ॥ प्रीतिपात्र मज स्मरती ॥ ७ ॥ जामया ह्मणिजे कुळस्त्रिया ॥ लहान थोरा भाउजया ॥ चुलत्या आता बंधुतनया ॥ सख्या वयसिया शिशुपणींच्या ॥ ८ ॥ कधीं कोण्ही स्मरती मातें ॥ माझी अवसरी करिती चित्तें ॥ ऐसें पुसतां अक्रूरातें ॥ दाटे भरतें शोकाचें ॥ ९ ॥ पांडु कुरुवंशींचा राजा ॥ दैवें वरूनि झालें भाजा ॥ तोही त्याग करूनि माजा ॥ निर्वाणकाजा अनुसरला ॥ १० ॥ मद्ररायाची नंदिनी ॥ मद्री माझी धाकुटी बहिणी ॥ झाली पांडुसहगामिनी ॥ मजला वनीं टाकिलें ॥ ११ ॥ जातमात्र[2] पांचही बाळें ॥ वनीं एकली दुःखें आहळें ॥ सिद्धवृंदें करुणाशीळें ॥ वचनें कोमळें शांतविती ॥ १२ ॥ पुढें आणितां कौरवपुरा ॥ कौरवीं गौरव केला पुरा॥ तेणें शोकनदीच्या पूरा ॥ माजि कापुरासम हारपें १३ ॥ माझ्या दुःखाचें निरसन ॥ करूनि माझा हारिती शीण ॥भ्रातृपुत्र दोघे जण॥ मजलागून कैं स्मरती ॥ १४ ॥

---

१ यथेच्छ, २ अल्पवयस्क. ३ स्वकीयां पासून वियुक्त होऊन राहिलें.

भ्रात्रेयोभगवान्कृष्णःशरण्योभक्तवत्सलः ॥ पैतृष्वस्रेयान्स्मरतिरामश्चांबुरुहेक्षणः॥ ९ ॥

॥टीका॥ भ्रातृपुत्र तो श्रीकृष्ण ॥ यशस्वी श्रीमंत वदान्य ॥ सर्वज्ञ विरक्त ऐश्वर्यपूर्ण॥षड्गुणसंपन्न ईश्वर तो
॥ १५ ॥ शरणागतासि शरण्य ॥ भक्तवत्सल करुणापूर्ण ॥ असुरउत्पथप्रभंजन ॥ दुष्टदमन दुरितारि ॥ १६॥
तैसाचि संकर्षण दुसरा ॥ प्रतापें वश्य ज्यातें धरा ॥ कमललोचन नरनिर्जरा॥ वरशृंगारा मुकुटमणि ॥ १७॥
पुराणपुरुष हे माझे भाचे ॥ कळले वदतांच गगनवाचे ॥ विशेष रहस्य नारदाचें ॥ आणि गर्गाचें प्रभाषित१८
मी तयांची पितृष्वसा ॥ मज तयांचाचि भरंवसा ॥ कधीं तऱ्ही आपुल्या दासां ॥ माझ्या पाडसां स्मरती ते ॥ १९॥
मी अनाथ बहुतां गुणें ॥ माझें तयांसि नसाहे उणें ॥ मम संकट त्यां कारणें ॥ विदित कोणें करावें ॥ २० ॥

सपत्नमध्येशोचंतींवृकाणांहरिणीमिव ॥ सांत्वयिष्यतिमांवाक्यैःपितृहीनांश्चबालकान् ॥ १० ॥

॥टीका॥ बहुतां लांडगियांचे मेळीं ॥ हरिणी जैसी सांकडली ॥ किंवा व्याघ्रांचे मंडळीं ॥ धेनु पडली आक्रंदे २१
कौरवांमाजि मज ते दशा ॥ असहनशीळा तत्कृतक्लेशां ॥ रामा आणि जगदधीशा ॥ माझें स्मरण कें होतें ॥ २२ ॥
पितृष्वसा हे आपुली ॥ दैवें दुष्टीं दुःखी केली ॥ स्मरतां हृदयातें जाकळी ॥ माझी करुणा कें त्यांसी ॥ २३ ॥
अमृतापरिस मधुरोत्तरीं ॥ माझें सात्वन करील हरि ॥ जनकरहित बाळांवरी ॥ करील मुरारि अनुकंपा ॥ २४ ॥
आपुले शिरीं आमुचें दुःख ॥ घेऊनि निरसील अवघा शोक ॥आमुचा उजळला मस्तक॥ह्मणती लोक तें धन्य॥ २५॥
ऐसी वदत वदतां पृथा ॥ दीर्घस्वरें कृष्णनाथा ॥ धांवें पावें निरसीं व्यथा ॥ ह्मणे ते कथा अवधारा ॥ २६ ॥

---

१ पित्याची बहीण. २ संकटीं पडली.

कृष्णकृष्णमहायोगिन्विश्वात्मन्विश्वभावन ॥ प्रपन्नांपाहिगोविंदशिशुभिश्चावसीदतीम् ॥ ११ ॥

॥टीका॥ अगा ये कृष्णा कलुषांतका[1] ॥ तव चिंतनें क्षय पातका ॥ शरणागतजनकैपक्षका[2] ॥ जगद्रक्षका जगदीशा ॥ २७ ॥ भो भो कृष्णा कलिमलमथना ॥ भक्तवत्सला करुणाघना ॥ हरिसी तापत्रयवेदना॥ शरण शरण्या सर्वेशा ॥ १२८ ॥ कृष्णनामाच्या संबोधनें ॥ सूचिलें अवतारकार्यसूचने ॥ कौरवांचें अनार्य करणें ॥ हें तुज कारणें विदित असो ॥ २९ ॥ ह्मणसी विदित होऊनि काय ॥ तरि तत्परिहरणीं उपाय ॥ संबोधनीं सूचिती होय ॥ योगिवर्य ह्मणोनियां ॥ ३० ॥ जीवेश्वर योगाभ्यासी ॥ सिद्धि तिष्ठती तयांपासीं ॥ महायोगी तूं हृषीकेशी ॥ तुझेनि सर्वांसि साफल्य ॥ ३१ ॥ तुझिया सत्तायोगबळें ॥माया अचेत जडही चळे ॥अनंतब्रह्मांड ढिसाळें[3] ॥ केवळ स्वलीळे चेष्टविसी ॥ ३२ ॥ सृजनस्थितिलय मायाकार्य ॥ तुझेनि वर्ते हें गुणमय ॥ तेथ केतुलें कौरवभय ॥ तत्कृतानार्यपरिहरणीं ॥ ३३ ॥ तत्कृतानार्य कथिलें कोणें ॥ ऐसी शंका करिसी मनें ॥ तरी विश्वात्मन् या संबोधनें ॥ करी सूचने तें ऐका ॥ ३४ ॥ विश्वात्मा तूं विश्वंभर ॥ सहज जाणसी विश्वांतर ॥ कौरवांचें कुडें अंतर ॥ सर्व सविस्तर तुज विदित ॥ ३५ ॥ चराचरांचें न्यूनपूर्ण ॥ पहावया काय कारण ॥ यदर्थी सूचवी संबोधन ॥ विश्वभावन ह्मणोनियां ॥ ३६ ॥ तूं विश्वाचा पालनपटु ॥ निरपराधें छळिती दुष्ट ॥ त्यांचा समूळ भरूनि घोट ॥ स्वधर्मनिष्ठ स्थापिसी ॥ ३७ ॥ याचिसाठीं युगीं युगीं॥साधुच्छलनाचे प्रसंगीं ॥अवतरोनियां लागवेगीं ॥ दुष्टांलागीं संहरिसी॥ ३८ ॥ नक्रें गजेंद्रा दिधली ग्लानि ॥ तो प्रर्वतला तुझ्या स्तवनीं॥ तुवां

---

[1] पापनाशका. [2] शरणागतांचा कैवारी. [3] मोठें.

धांवोनि चक्रपाणि ॥ वैर छेदूनि उद्धरिलें ॥ ३९ ॥ ब्रह्मा छलिला शंखासुरें ॥ वेद हिरोनि नेले असुरें ॥ तैं तां नटोनि मत्स्यावतारें ॥ असुर निकरें संहरिला ॥ १४० ॥ रसातळा जातां क्षोणि ॥ तुवां देखोनि तिची ग्लानि ॥ प्रकटलासि गोगोपनीं ॥ कूर्म होऊनि गोविंदा ॥ ४१ ॥ हिरण्याक्षें दैत्यें दृढें ॥ तैसीच धरणि नेतां पुढें ॥ वराहवेषें मोडिलीं हाडें ॥ धरिली दाढे वसुंधरा ॥ ४२ ॥ हिरण्यकशिपु त्याचाचि बंधु ॥ तेणें गांजितां प्रह्लादु ॥ तुवां करूनि स्तंभभेदु ॥ केला वध दुष्टाचा ॥ ४३ ॥ बळीनें घेऊनि अमरपुरी ॥ अमर घातले गिरिकंदरीं ॥ तेव्हां होऊनि ब्रह्मचारी ॥ यज्ञागारीं बळि छळिला ॥ ४४ ॥ हैहयें[1] अन्याय आचरला ॥ यज्ञधेनूचा अभिलाष धरिला ॥ तपस्वी महर्षि मारिला ॥ त्रिजगीं झाला हाहाकार ॥ ४५ ॥ तैं तां क्षोभोनि परशुधरें ॥ हैहयसहस्रबाहु निकरें ॥ छेदूनि निक्षत्री केलें धरे ॥ तर्पिलीं पितरें तद्रुधिरीं ॥ ४६ ॥ रावणें अमर घातले बंदी ॥ स्वधर्मकर्मे पडलीं सांदीं ॥ तैं तां घेऊनि कपींची मांदी ॥ निर्जरदंदी तो वधिला ॥ ४७ ॥ आतां कळीची प्रवृत्ति ॥ उत्पथगामी दृप्त नृपति ॥ वधावया कृष्णव्यक्ति ॥ धरूनि क्षिती आलासी ॥ ४८ ॥ निरपराध मज कौरवीं ॥ गांजितां दुःखें दाटलें जीवीं ॥ शरण आलें मज गौरवीं ॥ घालीं रौरवीं या दुष्टां ॥ ४९ ॥ बाळकें सहित मी दुःखिता ॥ दुष्टीं दुष्कर्मीं त्रासितां ॥ शरण आलें मातें आतां ॥ होईं त्राता कृपाळुवा ॥ ५० ॥ तुजविण शरण जावया ठाव ॥ अन्यत्र नाहीं हा निर्वाह ॥ ह्मणोनि तवांघ्रिराजीव[2] ॥ त्रिजगीं जीव आश्रयिती ॥ ५१ ॥

नान्यत्तवपदांभोजात्पश्यामिशरणंनृणाम् ॥ बिभ्यतांमृत्युसंसारादीश्वरस्यापवर्गिकात् ॥ १२ ॥

---

१. सहस्रार्जुन. २ तुझें पदकमल.

॥टीका॥त्रिजगीं त्रिधा जीवयोनि॥देवतिर्यकमनुष्यपणीं॥सुकृत दुष्कृत क्षपिती दोन्ही॥मनुजाचरणीं शुभाशुभें॥
नृणां ह्मणिजे त्यां मनुजांसी ॥ मृत्युसंसारभयत्रस्तांसी ॥ पदाब्जावीण आणिके देशीं॥ विश्रांतीसी स्थळ नाहीं॥ ५३॥
मृत्युसंसारभय तें काय ॥ षड्विकार तापत्रय ॥ आणि षड्वैरिसमुदाय ॥ छळिती विषयप्रलोभें ॥ ५४ ॥
यांचा कथावा विस्तार ॥ किमर्थ पुढती वारंवार ॥ एवं दुःखाचा सागर ॥ मृत्युसंसारभयजनक ॥ ५५ ॥
ऐसिया भवाब्धीपासून ॥ भयें त्रासला मनुजगण ॥ त्यासि तव पदाब्जावीण ॥ नाहीं शरण्य स्थळ दुसरें ॥५६ ॥
तूं ईश्वरांचा ईश्वर ॥ शरणां शरण्य परमेश्वर ॥ तव पादाब्जावीण थार ॥ नदेखें अपर त्रिजगीं मी ॥ ५७ ॥
ह्मणसी कैसें तें तव पद ॥ भवत्रस्तांसि मोक्षप्रद॥ यालागिं त्याहूनि स्थान सुखद॥ त्रिजगीं विशद मी नेणें॥५८॥
ऐसा निश्चय वदोनि मनें॥ सप्रेम कृष्णाच्या चिंतनें ॥ उत्सुक सबाह्य कृष्णध्यानें ॥ करी नमनें तें ऐका ॥ ५९ ॥

नमःकृष्णायशुद्धायब्रह्मणेपरमात्मने ॥ योगेश्वराययोगायत्वामहंशरणंगता ॥ १३ ॥

॥टीका॥सबाह्य अधोर्ध्व दशदिग्भागीं॥कृष्ण लक्षूनि उत्सुकांगी॥संबोधूनि ते प्रसंगीं॥नमी वेगीं प्रणतत्वें ॥६०॥
कृष्णाकारणें माझें नमन॥जो कां कलिभयोत्पथशमन॥ह्मणाल त्या जरी कलिसंक्रमण॥तरी शुद्ध ह्मणोन पुन्हा नमी६१
धर्मसंस्थापनासाठीं॥कळिभव उत्पथ कोट्यानकोटीं॥अवतरोनियां समरीं निवटी॥शुद्ध जगजेठी धर्मात्मा ॥ ६२ ॥
दुष्ट वधिल्या कैसा शुद्ध ॥ ऐसा मानाल जरि विरोध ॥तरी तृतीयनामें हा प्रसिद्ध॥अर्थ अविरुद्ध प्रतिपादी॥६३ ॥
ब्रह्माकारणें नमन माझें ॥ जेथ नसरे द्वैत दुजें ॥ अपरिच्छिन्नें[1] सहजीं सहजें ॥ विश्वीं स्वतेजें विलासिजे ॥ ६४ ॥
मनःकल्पित विश्वाभास॥ नसतां देखे प्रसुप्त पुरुष ॥ तेंवि मायिक जग अशेष॥ब्रह्मप्रकाशप्रकाशीं ॥ ६५ ॥

---

[1] अभिन्नतेनें.

मायातीत अपरिच्छिन्न ॥ सर्वत्र परिच्छेदविहीन ॥ निर्विकार सनातन ॥ त्या तुज नमन ब्रह्मरूपा ॥ ६६ ॥
ब्रह्म कूटस्थ सर्वगत॥असोनि अप्राप्य उपयोगरहित॥ह्मणसी तरी तूं त्रिजगआप्त॥त्या तुज नमित परमात्मया॥६७॥
जीवसखा जो सुहृदपणें॥ त्या तुज परमात्मयाकारणें ॥ नमन माझें तनुवाङ्मनें ॥ शरणा शरण्यें रक्षावें ॥ ६८ ॥
योगेश्वराकारणें नमो ॥ तवांघ्रिपद्माविण नरमो ॥ सिद्धिसौभाग्य मृषा गमो ॥ तुजविण विरमो भवभान ॥ ६९ ॥
अणिमादि ज्या विभूति श्रेष्ठ॥तद्युक्त योगेश्वर वरिष्ठ॥आणि जीवब्रह्मैक्यज्ञान स्पष्ट॥तो तूं उत्कृष्ट ज्ञानात्मा॥७० ॥
जीवब्रह्मैक्य ह्मणिजे योग॥तो तूं ज्ञानात्मा श्रीरंग ॥ तूतें शरण मी आल्यें चांग ॥ माझा उबगं[1] नमनावा ॥ ७१ ॥
तूं विश्वाचाआर्तिहरण ॥ दुर्मदउत्पथनृपदारुण ॥ कलिमलवारणविदारण ॥ तुज मी शरण दुःखार्ता ॥ ७२ ॥
विशेष माझा तूं भ्रातृपुत्र॥पितृष्वस्रेय[2] माझे कुमर॥आह्मी अनागस तव किंकर॥छळिती दुष्कर अन्यायें ॥ ७३॥
यांसि दंडूनि कमलापति॥प्रणतां देईं स्वपादरति ॥ दीर्घस्वरें हें स्मरोनि कुंती॥करूनि विनति रुदतसे ॥ ७४ ॥

॥ श्रीशुकउवाच॥इत्यनुस्मृत्यवचनंकृष्णंचजगदीश्वरम्॥सारुदद्दुःखिताराजन्भवतांप्रपितामही ॥ १४ ॥

॥ टीका ॥ कुरुकुलमानसमरालतिलका ॥ राया श्रवणसुधारसरासिका ॥ शुक ह्मणे गा नृपधार्मिका ॥
कुंती शोकाकुल ऐसी ॥ ७५ ॥ स्मरोनि आपुलें माहेर ॥ इष्टमित्र मातापितर ॥ चुलत्या चुलते सहोदर ॥
बंधुकुमर बळकृष्ण ॥ ७६ ॥ भाच्या भाउजया आणि बहिणी ॥ आता माउशा सनंदिनी ॥ धाकुटपणींच्या
आपुल्या गंडिणी ॥ कुंती स्मरोनि रुदतसे ॥ ७७ ॥ आपुली अवस्था स्मरोनि रडे॥ सहित पाहिले बालक्रीडे ॥

---

१ कण्टाळा. २ आतेचे पुलगे.

त्यांमाजि कृष्णाचे पवाडे ॥ वर्णी निवाडें ऐश्वर्य ॥ ७८ ॥ जगदीश्वरा श्रीकृष्णातें ॥ आणि आपुलिया स्वज-
नातें ॥ स्मरूनि कुंती करी रुदनातें ॥ दुःखें बहुतें आठवूनी ॥ ७९ ॥ तुझिया पित्याची पितामही ॥
राया कुंती तिये समयीं ॥ रुदन करितां अक्रूरा हृदयीं ॥ द्रवली नई कारुण्यें ॥ ८० ॥ मग ते अक्रूरविदुर
दोघे ॥ कुंतीसमान द्रवले वोघें ॥ तिचिया सुखदुःखविभागें ॥ जाहले आंगीं द्रवीभूत ॥ ८१ ॥

समदुःखसुखोऽक्रूरोविदुरश्चमहायशाः ॥ सांत्वयामासतुःकुंतींतत्पुत्रोत्पत्तिहेतुभिः ॥१८॥

॥टीका॥परमार्थरूपचि ज्याचें यश॥अवंचकभावें हृषीकेश॥प्रियतम केला तो कुंतीस॥विदुर विशेष संबोखी[1] ८२ ॥
विदुर अक्रूर दोघेजण ॥ करिती कुंतीचें क्लेशहरण ॥ पुत्रोत्पत्तीकारणें भिन्न ॥ प्रबोधून श्रेष्ठतरें ॥ ८३ ॥
कुंतीसि कांहीं झालिया सुख॥ज्यांचे मानसीं दाटे हरिख॥कुंतीदुःखें दुखवती देख॥कथूनि विवेक सांतविती ॥ ८४ ॥
अहो एथे मायबहिणी ॥ सहसा दुःख नधरीं मनीं ॥ तुझिये जठरीं रत्नखाणी ॥ तनय तरणीसम गमती ॥ ८५ ॥
तरणितनयप्रवर यम ॥ तो तव ज्येष्ठ कुमर धर्म ॥ दुसरा बलिष्ठ जो कां भीम ॥ हनु[2]मद्विक्रम मारु[3]ति हा ॥ ८६ ॥
अमरां माजि जंभ[4]भेदी ॥ तो हा अर्जुन विशाळबुद्धि ॥ नासत्य[5] जे अमरसंसदीं ॥ ते हे माद्रीसुत दोन्ही ॥ ८७ ॥
पंचतत्वांचीं सत्वें जाण ॥ कीं रुद्राचे पंच प्राण ॥ कंदर्पाचे पंच बाण ॥ तेंवि लावण्यें मिरविती ॥ ८८ ॥
क्षात्रविद्येचें पंचायतन ॥ पंच प्रलयहुताशन ॥ पंचत्व कौरवांलागून ॥ द्यावयापूर्ण अवतरले ॥ ८९ ॥
ऐसीं रत्नें असतां पोटीं ॥ सपत्नविषमें[6] नवदें वोठीं ॥ सिंहशावकां कौरवकरटी[7] ॥ कैंवि संकटीं आकळिती ॥ ९० ॥

---

१ हांक मारी. २ मारुती प्रमाणें पराक्रम ज्याचा तो. ३ वायुपुत्र भीम. ४ इन्द्र. ५ अश्विनीकुमार. ६ शत्रूंचीं छिद्रें. ७ कौरव हेच हत्ती.

येथूनि स्वस्थचित्तें राहें ॥ भगवल्लीलालाघव पाहें ॥ एवं बोधूनि कुंती माये ॥ अक्रूर काय करी पुढें ॥ ९१ ॥

यास्यन्राजानमभ्येत्यविषमंपुत्रलालनम् ॥ अवदत्सुहृदांमध्येबंधुभिःसौहृदोदितम् ॥ १६ ॥

॥टीका॥राजा धृतराष्ट्र सभास्थानीं॥भीष्मप्रमुख कौरवश्रेणी॥त्यांप्रति अक्रूरें जाऊनी॥निष्ठुरवचनीं अनुवादें ॥
कित्तेक मासवरी अक्रूर ॥ हस्तिनापुरीं होता स्थिर ॥ कौरवांचें अभ्यंतर ॥ शोधनपर समविषम ॥ ९३ ॥
आसनीं शयनीं भोजनीं पानीं ॥ सभास्थानीं मृगयायानीं ॥ वनीं उपवनीं जलक्रीडनीं ॥ सभास्थानीं परस्परें॥ ९४ ॥
पक्षपातें आविष्करती ॥ पण प्रतिज्ञा द्यूत दीव्यंती[1] ॥ कुंतीसुतांच्या घातपातीं ॥ यत्न करिती गांधार ॥९५ ॥
प्रजा अनुकूळ पांडवां चतुरां॥हृदयशल्य तें धार्तराष्ट्रां॥धृतराष्ट्र निषेध न करी कुमरां॥अन्यायकरां कुटिळांतें९६॥
एसें विवरोनि अंतःकरणीं ॥ अक्रूर उद्युक्त मथुरायानीं ॥ सन्नरहयगजपरिवारगणीं॥आज्ञाग्रहणीं पातला ॥ ९७ ॥
सभास्थानीं कुरुवरिष्ठ ॥ सपुत्र द्रोण गौतमश्रेष्ठ ॥ भीष्म बाह्लीकं[2] भगवन्निष्ठ ॥ सोमदत्त भूरिश्रवा ॥९८ ॥
शल्य जयद्रथ शकुनि कर्ण ॥ दुर्योधनादि नृपनंदन ॥ स्वस्तिश्रियेचे ब्राह्मण॥ राष्ट्रिकजन नृपवर्ग्य ॥ ९९ ॥
ऐसी घनवट कौरवसभा॥तेथ प्रयाणोन्मुख अक्रूर उभा॥कौरवीं दर्शवूनि स्नेहलोभा॥अतिवालभें बैसविला॥२००॥
ऐसिये भीष्मादिसभासदीं ॥ न्यायनिष्ठुर विशाळ बुद्धि ॥ धृतराष्ट्रातें अक्रूर बोधी ॥ सुहृदां आप्तां देखतां॥ १ ॥
रामकृष्णादि वृष्णिप्रवर ॥ उग्रसेनप्रमुख अपर ॥ तिहीं सुहृद्भावें मंत्र ॥ कथिला हितकर सर्वांसी ॥ २ ॥
पांडव मानूनियां सपत्न ॥ विषम स्वपुत्रस्नेहलालन ॥ वदता झाला परिच्छिन्न ॥ संबोधून धृतराष्ट्रा ॥ ३ ॥

---

[1] क्रीडती. [2] भीष्माचा चुलता.

अक्रूरउवाच ॥ भोभोवैचित्रवीर्यत्वंकुरूणांकीर्तिवर्द्धन ॥ भ्रातर्युपरतेपांडावधुनाऽऽसनमास्थितः ॥ १७ ॥

॥ टीका ॥ विचित्रवीर्याचा नंदन ॥ भो शब्दें त्या पुरस्करून[1] ॥ अक्रूर ह्मणे तूं कीर्तिवर्धन ॥ कुरुसंतानमुकुटमणि ॥ ४ ॥ विचित्रवीर्याचा आत्मज ॥ कुरुवंशीं तूं कीर्तिध्वज ॥ अन्याय वर्ततां नवटे लाज ॥ हांसती पूर्वज तव कर्मा ॥ ५ ॥ शंतनुसहोदर बाह्लीक बळि ॥ धनुर्विद्येचा चंद्रमौळी॥पुत्रपौत्रेंसीं तुह्मांजवळी ॥ कुरुमहीतळी नापेक्षी ॥ ६ ॥ नेच्छी छत्र सिंहासन ॥ मुद्रापत्रादि अनुशासन ॥ तुमचें देखोनियां न्यून ॥ धांवे प्राण घ्यावया ॥ ७ ॥ कौरववंशाच्या कैवारें ॥ समरीं कृतांता दंडीन करें ॥ परंतु राज्यासनाचें वारें ॥ अभ्यंतरें स्पर्शेना ॥ ८ ॥ तैसाचि पाहें शंतनुतनुज[2] ॥ पूर्णप्रतापी तेजःपुंज॥ब्रह्मचर्याची घालूनि पैज ॥ नेच्छी राज्य वमनवत् ॥ ९ ॥ क्षात्रधर्मीं परम निपुण ॥ राज्याभिलाषीं विरक्त पूर्ण ॥ इहीं पांडूसी नृपासन ॥ देऊनि शासन चालविलें ॥ १० ॥ पांडु पंचत्व पावलियापाठीं ॥ धर्म स्थापिजे भद्रपीठीं ॥ त्वां ते मोडूनि वृद्धराहटी॥ धरिला पोटीं राज्यलोभ ॥ ११ ॥ वृद्ध असतां बाह्लीक भीष्म ॥ पांडवांमाजि गुणाढ्य धर्म ॥तुह्मांसि राज्यलोभ हा अधम ॥ गर्हित कर्म हें तुमचें ॥ १२ ॥ पांडव लेंकुरें नेणतीं ॥ पांडुवियोगें सखेद कुंती ॥ ह्मणऊनि झालासि जरी तूं नृपति ॥ तरी न्यायें क्षिति प्रतिपाळीं ॥ १३ ॥

धर्मेणपालयन्नुर्वींप्रजाःशीलेनरंजयन् ॥ वर्तमानःसमःस्वेषुश्रेयःकीर्तिमवाप्स्यसि ॥ १८ ॥

॥टीका॥ घेऊनि करभार षष्ठांश ॥ प्रजा रक्षाव्या विगतक्लेश॥आप्त स्वजन सुहृदां तोष॥दीजे विशेष विनयत्वें १४॥

---

[1] सत्कारून. [2] भीष्म.

सामंत[1] मांडलिक नृपवर ॥ त्यांचा रक्षिजे शिष्टाचार ॥ प्रजापीडक दस्यु चोर ॥ अन्यायकर दंडावे ॥ १५ ॥
पांडव आणि निजनंदन ॥ समत्वें शिक्षीं यां सद्गुण ॥ किंबहुना हे पांडुनंदन ॥ स्वसुतांहून सम्मानीं ॥ १६ ॥
सद्गुणांचा वाढवीं मान ॥ दुर्गणवंता करीं न्यून ॥ ऐसें देखोनि अनुशासन ॥ प्रजा संपूर्ण तुज भजती ॥ २१७ ॥
स्वधर्मशासनें पाळीं उर्वी ॥ शीळसद्गुणीं प्रजा निववीं ॥ वर्ततां इत्यादि समत्वभावीं ॥ लाहसी आघवी कीर्ति श्री १८ ॥
कुरुवंशींच्या यशोधना ॥ माजी मंडन तूं त्रिभुवना ॥ युगानुयुगीं निववीं जना ॥ कीर्तिअंगना पर्णूनी ॥ १९ ॥
म्यां जो कथिला हा सत्पथ ॥ लंघूनि वर्ते तो उत्पथें[1] ॥ धिग्धिग् त्याचा जन्म व्यर्थ ॥ भोगी अनर्थ पदोपदीं ॥ २० ॥

अन्यथात्वाचरंल्लोकेगर्हितोयास्यसेतमः ॥ तस्मात्समत्वेवर्तस्वपांडवेष्वात्मजेषुच ॥ १९ ॥

॥ टीका ॥ म्यां जो कथिला धर्मन्याय ॥ लंघूनि वर्ते जो अन्याय ॥ त्यासि पुढें नरकभय ॥ पावे अपाय पदोपदीं ॥ २१ ॥ यास्तव समत्वें वर्ते राया ॥ पांडवां आणि आत्मतनयां ॥ विषमभाव नधरूनियां ॥ भोगीं ऐश्वर्या न्यायपथें ॥ २२ ॥ दोघां समान संपदा वोपीं ॥ दोघां स्वपुत्रभावें जोपीं ॥ विषमभावाची काळिमा लोपीं ॥ रहस्य गोपीं हृत्कमळीं ॥ २३ ॥ प्रज्ञाचक्षु राजेश्वरा ॥ ह्मणसी ममता स्वलेंकुरा ॥ कवळी तैसी अपरां इतरां ॥ सुरनरपितिरांसम नदिसे ॥ २४ ॥ श्वापद पक्षी पशवादि योनि ॥ सुस्निग्ध निज औरससंतानीं ॥ तैसी ममता इतर स्थानीं ॥ समताचरणीं केंवि घडे ॥ २५ ॥ यदर्थीं ऐकें वैचित्रवीर्या ॥ रामकृष्णें मज याचि कार्या ॥ धाडिलें येथ ज्या अभिप्राया ॥ तो निजहृदयामाजि धरीं ॥ २६ ॥

नेहचात्यंतसंवासःकर्हिचित्केनचित्सह ॥ राजन्स्वेनापिदेहेनकिमुजायात्मजादिभिः ॥ २० ॥

---

[1] शेजारचे [1] अमार्गवर्ती.

॥टीका॥ मी जें वदतों सभास्थानीं ॥ रामकृष्णांहीं कथिल्या वाणी ॥ यथार्थ विवरूनि अंतःकरणीं ॥ समवर्तनीं दृढ होईं २७
सम्यक ह्मणिजे बरव्या परी ॥ इह ह्मणिजे ये संसारीं ॥ एकत्र वास निरंतरीं ॥ नघडे निर्धारीं कैं कोण्हा ॥ २८ ॥
स्नेहभावें कथितां मित्री ॥ बिघडूनि जाय काळसूत्रीं ॥ प्राणी निबद्ध स्वकर्मतंत्रीं ॥ मायायंत्रीं परिभ्रमती ॥ २९ ॥
आपुलें शरीर बळ प्रचुर ॥ धृष्टपुष्ट तरुणतर ॥ अभ्यासशीळ चपळ चतुर ॥ गौर सुंदर गुणवंत ॥ ३० ॥
राया नाहीं तनुभरंवसा ॥ इतरां आप्तांचा कायसा ॥ त्यांच्या लोभें पात्र क्लेशा ॥ होऊनि अपयशा कां वरिजे ॥ ३१ ॥
ह्मणोनि धरितां शरीरलोभ ॥ विषयभोगांचा समारंभ ॥ करितां अनावर काळक्षोभ ॥ क्षोभे स्वयंभ मदभंगा ॥ ३२ ॥
काळक्षोभें पडती दांत ॥ खुळे होती पाय हात ॥ गात्र विपत्तिपात्रभूत ॥ मा इतर आप्त ते कोण ॥ ३३ ॥ स्वदेहींच
वास ऐसा ॥ एकरूप वयसेसारिसा ॥ नघडे कळतां हें मानसा ॥ मूर्ख भरंवसा मानिती ॥ ३४ ॥ तेथ
जाया आणि पुत्र ॥ वसती चिरकाळ एकत्र ॥ ह्मणोनि धरितां स्नेहसूत्र ॥ पापा पात्र होइजे ॥ ३५ ॥ तरुणी
तारुण्यें लावण्य ॥ देखतां कामीं क्षोभे मन ॥ वाटे तनु मन कुरवंडून ॥ वनितेवरून टाकावें ॥ ३६ ॥ कुलीन
गुणाढ्य रूपाथिली ॥ दैवें अवचट मज लाधली ॥ तिचेनि अवघी अन्वयवल्ली ॥ त्रिजगीं शोभली विधिहूनही ॥ ३७ ॥
प्रपितामही प्रमातामही ॥ पर्यंत पाहतां ईसम नाहीं ॥ माझें दैव विचित्र कांहीं ॥ जें मद्गेहीं हें रत्न ॥ ३८ ॥ धनगरा
हातीं माणिक्यमणि ॥ तैसी मज हे कुटुंबिनी ॥ सलज्ज ईच्या लावण्यगुणीं ॥ अंतःकरणीं जाणतसें ॥ ३९ ॥ रूप
लावण्य गुण अपाडें ॥ अळंकरण माझेन नघडे ॥ भर्ता ह्मणविजे कोण्या तोंडें ॥ ह्मणवूनि कुढें हृदयीं मी ॥ ४० ॥
रत्नजडित अळंकार ॥ परिधानार्थ तगटी चीर ॥ कंचुकीवरी हंसमयूर ॥ शिल्पविकार हेमसूत्रीं ॥ ४१ ॥

---

१ रूपसंपन्न.

अशनें वसनें भूषणें विविधा॥गुणलावण्यसमान कदा॥नकरविती मज भाग्यमंदा॥लाजें प्रमदा ह्मणावया ॥ ४२ ॥
ऐसें जयाचें मानस ॥ चित्तीं ललनेचें लालस ॥ कामें भुलोनि लावण्यास ॥ धरी हव्यास तद्धरणीं ॥ ४३ ॥
तिचिया भरणपोषणासाठीं॥आचरे अनेक अन्यायकोटी॥सुकृताची नायके गोठी ॥नधरी पोटीं नरकभय ॥ ४४ ॥
रत्नजडित अळंकार ॥ देशोदेशींचे विविधाकार ॥ प्रतिवासरीं नव शृंगार ॥ करवी सादर सप्रेमें ॥ ४५ ॥
भ्रमर वेधे अरविंदीं ॥ कीं वृष्टिभरें तुंबळे नदी ॥ तेंवि मानस प्रमदावेधीं ॥ आठव नेदी स्वहिताची ॥ ४६ ॥
ऐसिये ठायीं प्रजाजनन ॥ होतां मोहें झळंबे मन ॥ जेंवि जीमूतें[१] जोपितां लवण ॥ पूर्वकाठिन्य नाठवी ॥ ४७ ॥
मातापित्याची हेलना ॥ आदर नकरी स्वधर्माचरणा ॥ नमनी देवा पितृगणा ॥ अतिथिब्राह्मणा वरी कोपे ॥४८ ॥
जनकासि जो नह्मणे पिता॥तो कें पितृव्य ह्मणे उपस्थिता ॥तेंवि जायापुत्रीं जडल्या ममता ॥स्वधर्मआस्था मग कैंची॥
नकरी नित्यनैमित्तिक ॥ पंचमहाक्रतु सम्यक ॥ याचकालागीं नघली भीक ॥ स्त्रीबाळक रंजावितां॥५०॥
अपत्याचें करी कोड ॥ मनीं संकल्प धरी वाड[२] ॥ करें कुरवाळी ह्मणे रोड ॥ पुरवी लाड परोपरी ॥ ५१ ॥
क्षणक्षणा उतरवी लोणें ॥ दृष्टि काढूनि बळि सांडणें ॥ भूर्जपत्रें यंत्रें करणें ॥ मंत्ररक्षणें मणिवल्ली ॥ ५२ ॥
देवदेव्हारे नागबळी ॥ निंब नेसने नाचे गोंदळीं ॥ भिक्षा मागे अंत्यजआळी ॥ गदावारी जोगवा ॥ ५३ ॥
अपत्यलोभें होय वेडा ॥ रानोमाळीं पूजी दगडा ॥ नशिणे आचार करितां कुडा ॥ घुमत्या झाडा भांबावे॥५४॥
मुंजे वेताळ यक्षिणी ॥ अर्ची बाळांच्या रक्षणीं ॥ अर्पी पशूंच्या दावणी ॥ रुधिरार्पणीं चिळसेना ॥ ५५॥
मैळी मुकी रानषष्ठी ॥ ह्मणें बाळासि करिती कष्टी ॥ प्रजाकल्याणीं देऊनि दृष्टि॥करी त्यां तुष्टि पशुघातें ॥ ५६ ॥

---

[१] मेघानें. [२] अधिक.

मारको मेसंको[१] महिषासुर ॥ तदर्थ यजी मांग महार ॥ नकरी वर्णाश्रमविचार ॥ दुराचार प्रिय मानी ॥ ५७ ॥
केरा पुंजा सटवा राणा ॥ ऐसीं निंद्य नांवें नाना ॥ ठेवूनि संबोधी संताना ॥ ह्मणवी शाहणा संसारीं ॥ ५८ ॥
स्वाभाविक ऐसे दोष ॥ भरणपोषणीं विशेष ॥ अलंकाराचा हव्यास ॥ सोयरिकांस आरंभी ॥ ५९ ॥
ज्यांचे गांठी बहुत धन ॥ उत्पथ दुष्ट अन्यायनिपुण ॥ ते ते सभाग्य सोयरे महान ॥ करी प्रयत्नपूर्वक ॥ ६० ॥
उपाधिवर्धक ज्या अविद्या ॥ त्या त्या पढवी मानूनि विद्या ॥ पोटार्थ करी कर्मा निंद्या ॥ नमनी कदा नरकभय ॥६१॥
चिंती स्वपुत्रा कल्याण ॥ बंधुवर्गाचें अकल्याण ॥ बंधुसंतति होतां क्षीण ॥ ह्मणे नांदेन सुतपौत्रीं ॥ ६२ ॥
ऐसी मोहममताभरीं ॥ विषम बुद्धि धरी अंतरीं ॥ तंव काळाची नवलपरी ॥ करी बोहरी सर्वांची ॥ ६३ ॥
पारकीयांचें चिंती कुडें ॥ तेंचि परते आपणाकडे ॥ काळसत्तेचें बळ हें गाढें ॥ मोहें मूढें नागवती ॥ ६४ ॥
पुत्र पित्यासान्निध राहे ॥ ऐसा निश्चय तऱ्ही आहे ॥ कोठें जन्मोनि कोठें जाये ॥ नदिसे काय प्रत्यक्ष ॥ ६५ ॥
इच्छिल्या ऐशा मनोरथा ॥ घडों नेदी काळसत्ता ॥ दोषसंग्रह होय माथां ॥ मग ते कर्ता अघ भोगीं ॥ ६६॥
शकुनि जन्मला सुबळाजठरीं॥आमात्य चालवी कौरवांघरीं॥कर्ण राधेय झाला क्षेत्रीं॥त्या मातापितरीं कैं योग ६७॥
सम्यक ह्मणिजे बरव्यापरी ॥ अत्यंत एकरूपता शरीरीं ॥ नवसे तेथें जायाकुमरी ॥ नैरंतरी कें वसती॥ ६८ ॥
मायामोहभ्रमाचे भरीं ॥ कुटुंबलोभें पातकें करी ॥ पुढें भोगाचे अवसरीं ॥ पचे अघोरीं एकाकीं ॥ ६९ ॥

एकःप्रसूयतेजंतुरेकएवप्रलीयते ॥ एकोऽनुभुंक्तेसुकृतमेकएवचदुष्कृतम् ॥ २१ ॥

---

[१] मारक जलदेवता.

॥टीका॥कुटुंबकर्तृत्वाभिमानी पुरुष ॥ संग्रहूनि अवघे दोष ॥ भोगी अनेक गर्भवास ॥ तद्भोगास नये दुजा ॥
जननीजनक कामासक्त ॥ रमतां मिळे शुक्लशोणित ॥ तेथ संभवे अकस्मात ॥ अवधीपर्यंत जातचतसे॥ ७१ ॥
विष्ठाद थरं[1] मूत्र आधण ॥ गर्भखोळे उल्बावरणें[2] ॥ वांती पित्त चिळसी स्थान ॥ वदन घ्राण निरोधित॥ ७२ ॥
ऐसिये गर्भखोळे स्तब्ध ॥ अधोमुख प्राणरोध ॥ दुःखयातना होतीं विविध ॥ त्या सोसी सखेद एकाकी ॥ ७३ ॥
पुढें प्रसूति होते काळीं ॥ प्रसुतिवाताची वाहुटुळी ॥ अधोर्ध्व गर्भातें घोंटाळी ॥ तेणें तळमळी गर्भस्थ ॥ ७४ ॥
वेणे वरी येती वेणा ॥ गर्भिणी सोडूं पाहे प्राणा ॥ होय गर्भाचा घोळाणा[3] ॥ तें दुःख कोण्हा सांगेल ॥ ७५ ॥
त्यामाजि प्राणि जे सुकृती ॥ ते लाहती सुप्रसूति ॥ येरां पापिष्ठां विपत्ति ॥ उपप्रसूति करघातें ॥ ७६ ॥
सुइणी आणिती प्रसवचाडे[4] ॥ मग त्या जाणोनि सांकडें ॥ उपाय करिती कठिन कुडे ॥ गर्भाकडे नपाहती॥७७
असो नबोलूं विचकट ॥ पूर्वोक्त मोहांध पापिष्ठ ॥ एकट भोगी प्रसवकष्ट ॥ नपवे इष्ट तेथ दुजा ॥ ७८ ॥
मातृकोदरा बाहीर पडे ॥ जातमात्र गात्रें उघडें ॥ नवनीतापिंडाचेनि पाडें ॥ तोडिती किडे चहूंकडुनी ॥ ७९ ॥
माता निजवी शय्येवरी ॥ तेथ मत्कुण झोंबती गात्रीं ॥ कोमळ रुधिर प्राशिती वक्री ॥ भरती नेत्रीं घुंगरडीं ॥ ८० ॥
मक्षिका झोंबती चहूंकडे ॥ चिलटें पिसा मुंग्या मार्कोडें[5] ॥ तेणें दुःखें तळमळी आरडे ॥ तैं माता कोडें गरळाँ दे ॥
यवानी[6] चावूनि देतां गरळाँ॥तेणें मुखाचा होय हुरपळा॥परि तें दुःख नेणे बरळा॥वाणी सरळा कथूं नशके॥८२॥
एकलाचि त्या दुःखें मिर्डके[8]॥साहों नशके विषम तिडके॥पडिले ठायीं कुडे लिंडके[9]॥परि नफडंके[10] तेथूनी ॥ ८३ ॥
पुन्हा तारुण्यीं ममताभरें ॥ क्षोभे कामाचें कांविरें[11] ॥ षड्रिपूंच्या महामारें ॥ दुःखें अघोरें वोसंती[12] ॥ ८४ ॥

---

१ थर. २ गर्भाच्छादन. ३ घोंटाळ. ४ प्रसूती करितां. ५ मुंगळे. ६ ओंवा. ७ मुलांचें औषध. ८ व्याकुळ होई. ९ तळमळे. १० न दूर जाई. ११ वेड. १२ आचरे.

अपेश पावे रडे पडे ॥ पुन्हा आंगीं हव्यास चडे ॥ अष्टमदांच्या उफाडें ॥ कर्म कुडें प्रिय मानी ॥ ८५ ॥
एका कर्मीं पोळे आपटे ॥ सर्वेंचि आणिके कर्मीं वेंठे ॥ परंतु नटकी कर्म खोटें ॥ भोगी दुर्घटें दुष्कर्में ॥ ८६ ॥
तेथही एकाकी आपण ॥ वाढवूनियां देहाभिमान ॥ भोगी दुर्घट दुःख कठिन ॥ पावे मरण एकाकी ॥ ८७ ॥
संगें नयेती जायापुत्र ॥ वृत्तिक्षेत्र स्वकुलगोत्र ॥ अर्थ स्वार्थ जिवलगमित्र ॥ दुहिता दौहित्र न येती ॥ ८८ ॥
पाप अथवा पुण्य जोडी॥जिता मेलियाही नसोडी॥भोग विफळ भोगपरवडी॥जे ज्यां आवडी शुभाशुभीं॥८९ ॥
करितां कर्म वाटे नीट॥भोगितां होय हृदयस्फोट॥यालागीं विवेकविचारनिष्ठ॥सहसा अनिष्ट नाचरती ॥ ९ ॥
कुरुवरिष्ठा अंबिकातनया॥नीति विवरूनि प्रवर्त्तें न्याया॥पुत्रममता राज्यमाया॥धरितां अपाया आतुडसी९० ॥
अन्यायोपार्जित जें धन ॥ मानिती मोहांध तें जीवन ॥ तेणें गुणें पावती व्यसन ॥ तें आख्यान अवधारीं ॥ ९२१

अधर्मोपचितंवित्तंहरंत्यन्येऽल्पमेधसः ॥ संभोजनीयापदेशैर्जलानीवजलौकसः ॥ २२ ॥

॥टीका॥प्राणप्रियतम जायाकुमर ॥ ऋणानुबंधें वियोगपर ॥ तदर्थ धनधान्य मंदिर॥जोडिती पामर अन्यायें ॥
लोभ धरिला जेणें भावें ॥ तैसा तयाचा उपयोग नव्हे ॥ प्रतिपदीं दुःखद जे ते आघवे॥शत्रु मानावे तैं ना ते॥९४
ह्मणाल वियोगें दुःखद होती ॥ प्रियसंवासें सुखावाप्ति ॥ हेंही नघडे येथ युक्ति॥ ऐक व्युत्पत्ति श्लोकोक्त॥९५ ॥
अल्प[३]मंधेस जो मंदमती॥परमपुरुषार्थ ज्या विषयावाप्ति॥पांचभौतिक आत्मप्रतीति॥जायासंतत्ति समवेत॥९६ ॥
अधर्मक्लेशोपार्जितधन ॥ पुत्रकलत्रमिषेंकरून ॥ पोष्यवर्गें करिती हरण ॥ तैं त्या मरण धनहरणीं ॥ ९७ ॥

---

१ जोरामुळें. २ मिळसी. ३ कमी बुद्धीचा.

लोभिया मंदमतीचें धन ॥ जेंवि मत्स्याचें जीवन ॥ पोष्य होऊनि करिती हरण ॥ तें त्या मरण धनहरणीं ॥९८ ॥
एकला मत्स्य क्रीडतां जळीं ॥जीवनसंग्रहें जैसा बळि ॥ त्यासि कामेच्छा जैं कवळी ॥ तें आदरी केली शफरीशीं[1] ॥
कामलोभें क्रीडती सुखें ॥ स्वादुजीवन प्राशिती मुखें ॥ तोषती संततिबाहुल्यहरिखें ॥ एकमेकें हृत्कमळीं ॥ ३०० ॥
तेथ सहवासी जळचर ॥ कर्ककच्छपादि[2] दर्दुर ॥ पोष्यमिसें जलापहार ॥ करिती साचार यथेष्ट ॥१ ॥
कर्क उकरितां पडती छिद्रें ॥ तद्द्वारा तें जळ पाझरे ॥ कूर्म मंडूक रोधितां झरे॥ पुन्हा नभरे जळ तेणें॥२॥
संतति आणि जलौकसें ॥ आप्त मानिलीं निजसंवासें ॥ वृद्धि होतां येणें मिसें॥अवचट माणुसें देखती त्यां॥३॥
मग ढीवर घालिती जाळ॥ जळ तें डहुळिती तत्काळ॥ शोधूनि काढिती मत्स्य स्थूळ॥ क्लेश बहळ मग भोगी॥४॥
एवं सहवासें प्रियतम ॥ तद्व्याजें ते शत्रुचि सम ॥ ऐसें नेणे नर जो अधम ॥ दुःखपरम तो भोगी ॥ ५ ॥
ऐकें राया प्रज्ञाचक्षु ॥ नउन्माळिजे स्वधर्मवृक्षु ॥ हृदयीं करूनि ईश्वर साक्ष ॥ अन्यायपक्ष सोडावा ॥ ६ ॥
आप्त मानूनि जायातनय ॥ पोषी करूनि परमान्याय ॥ त्या मूर्खातें तेंचि स्वकीय ॥ घेऊनि राय[3] उपेक्षिती॥७॥
तें या श्लोकीं अक्रूर कथी ॥ परिसा योगींद्रवर[4]भारती ॥क्षणैक अवधान देऊनि श्रोतीं ॥ हृदयीं निगुती विवरावी ॥

पुष्णातियानधर्मेंणस्वबुद्ध्यातमपंडितम् ॥ तेऽकृतार्थंप्रहिण्वंतिप्राणारायःसुतादयः ॥ २३ ॥

॥टीया॥ज्यातें पोषी जयासाठीं॥त्यासी नघडतां तैसी राहटी॥ तेणें दुःखाग्नि प्रज्वळे पोटीं ॥विरुद्ध गोठी परस्परें
अधर्मोपार्जित धनें करून॥ ज्यातें पोषिलें आप्त मानून ॥ तेंचि हिरूनि घेती धन॥ उपेक्षून त्या अपंडिता ॥ १० ॥

---

[1] मत्स्यीशीं. [2] कासव इ०. [3] धन. [4] योगिश्रेष्ठांमध्यें मुख्य शुकाचार्य, याची वाणी.

परम मूर्ख तो अपंडित ॥ जैसे इच्छी मनोरथ ॥ ते सुखभोग नहोतां प्राप्त ॥ करिती आप्त धनहरण ॥ ११ ॥
आप्त मानूनि जे पोषिले॥ते धन हिरोनि पारिखे झाले॥त्यां निमित्त जे अधर्म केले॥ते ते भोगिले पाहिजती॥ १२ ॥
राज्य करावें आपुल्या पुत्रीं ॥ निष्कंटक एकच्छत्री ॥ समुद्रवलयांकित धरित्री ॥ आज्ञापत्रीं शासनत्वें॥ १३ ॥
ते सुत आपणा देखतां मरती ॥ तैं निष्फळता मनोरथीं ॥ आमरणान्त दुःखावाप्ति ॥मेल्या दुर्गति अधर्में ॥ १४ ॥
जित असतां प्रतीप[1] झाले ॥ तऱ्ही मनोरथ वायां गेले ॥ जिता मेल्या क्लेश दिधले॥भोग इच्छिले नलभोनी ॥ १५॥
धनसद्नादिराष्ट्रधरणि ॥ सुखा कारणें अधर्माचरणीं ॥ जोडिली ते बलिष्ठ जनीं॥घेतां हिरोनि दे दुःख ॥ १६ ॥
अधर्माचरणें विषय जोडी ॥ पिंडपोषणें प्राणावडी ॥ते प्राण जैं त्यजिती कुडी ॥तैं देइजे बुडी दुःखडोहीं॥ १७ ॥
जिता मेल्या वियोगयोगें॥पोष्यें[2] देती दुःखें अनेगें ॥त्यांच्या पोषणीं करितां अघें॥ भोगणें लागे तें ऐकें॥ १८॥

स्वयंकिल्बिषमादायतैस्त्यक्तोनार्थकोविदः ॥ असिद्धार्थोविशत्यंधंस्वधर्मविमुखस्तमः ॥ २४ ॥

॥टीका॥पुत्रादि पोष्यें जियें परम॥राय ऐसें धनाचे नाम॥क्षुधा तृषा प्राणधर्म॥कीजे अधर्म यांसाठीं॥ १९॥तंव
ते विपरीत पुत्रादिक ॥ करिती धनाचा अभिलाख ॥ तेणें अत्यंत पावे दुःख ॥ करी शोक आठवितां ॥ २० ॥
शोकें जर्जर पंजर होय ॥ तैं प्राणवर्गही त्यजूनि जाय ॥ तदर्थ केला पापनिचय[3] ॥ तो नवजाय त्या सरिसा ॥ २१ ॥
जेंवि शत्रु हाणी घाय ॥ क्षत ठेवूनि शस्त्र जाय ॥ तैसा आप्तांचा समुदाय ॥ विमुख होय अघदानें ॥ २२ ॥
जेथ जेथ स्नेहबंधन निकें ॥ हृदयीं शोकशंकुचि तितुके ॥ मोहें रोंविले अविवेकें ॥ देती दुःखें अहरह[4] ते॥ २३ ॥

---

१ उलट. २ पोसावयाचीं माणसें इ० ३ पापसमूह. ४ प्रतिदिवशीं,

पुढें होईल ऐसी दशा ॥ अनर्थज्ञ तो नेणे ऐसा ॥ पात्र होऊनि अधर्मदोषा ॥ मग भोगी क्लेशा अंधतमीं ॥ २४ ॥
समस्तांचिया पोषणभिडा ॥ स्वयें पापाचा उकरडा ॥ आप्तीं त्यागिला जो निचाडा ॥ इच्छिल्या चाडा नपुरतां २५ ॥
मग तो अपूर्णमनोरथ ॥ ज्यातें ह्मणिजे असिद्धार्थ ॥ स्वधर्मविमुख पैं दुर्वृत्त ॥ भोगी अनंत यातना ॥ २६ ॥
नरकमार्गींची सिदोरी ॥ स्वयें तो किल्बिष बांधोनि पदरीं ॥ अंधतमीं प्रवेश करी ॥ नरकाधिकारी आकल्प ॥
इहलोकीं शोकाभिभूत ॥ धनपिशाचमृतप्रेत ॥ पुढें यमयातना अनंत ॥ भोगूनि प्रवेशत अंधतमीं ॥ २७ ॥
असिपत्रीं[1] निक्षेपण ॥ तप्तताम्रभूमिके शयन ॥ कुंभपाकीं करिती क्थनं[2] ॥ विषमाचरण स्मरविती ॥ २९ ॥
वज्रचचूंचे वायसनिकर ॥ वृश्चिकवृकव्याघ्रादिहिंस्र ॥ ऐसे निदर्य यमकिंकर ॥ अधर्मी पामर ते पीडिती ॥ ३० ॥
पूयपंकीं[3] छेदन[4] करिती ॥ रजोरुधिरीं निमज्जिती ॥ विष्ठाभांडामाजि पचिती ॥ कीं जाचिती दंडवरी ॥ ३१ ॥
सहस्रें सहस्र वृश्चिकजाति ॥ विषोल्बण जे क्रूरनिघाती ॥ एकएका रोमगर्तीं ॥ क्रोधें स्पर्शती यमाज्ञा ॥ ३२ ॥
किंबहुना तियें दुर्दशपेवें ॥ तेथ जाचिती दुष्कृतिजीवें ॥ एवं भोगूनि निरय अघवे ॥ अंतीं पावे अंधतमीं ॥ ३३ ॥
ह्मणाल नरक पृथगाकारें ॥ मूळीं नकथिले व्यासकुमरें ॥ तरी विवाह ह्मणतां संभ्रमगजरें ॥ संस्कारचतुरें
जाणावें ॥ ३४ ॥ कीं तट लंघूनि भरला पूर ॥ मग सोपानपंक्ति समग्र ॥ क्रमें अतिक्रमूनि चढलें नीर ॥
हें तों चतुर जाणती ॥ ३५ ॥ येह्र्वीं सामान्य जरी राजा ॥ दंड करी जैं पापपुंजा ॥ तैं ताडन बंधन शासन वोजा ॥
शूळाग्रध्वजा करी अंतीं ॥ ३६ ॥ तेथ शूळारोपण सर्व वदती ॥ चतुर शासनक्रम जाणती ॥ तिहीं कथितां

---

१ खड्गधारेवर. २ कढविणें. ३ पुवाच्या चिखलांत. ४ भिजविणें. ५ सुळाच्या अग्रावर ध्वजरूप.

अबळांप्रति ॥ वृथा वदंती नमनावी ॥ ३७ ॥ ऐसी अक्रूरें कुरुभूपाप्रति ॥ अधर्मकर निरयपंक्ति ॥ कथूनि उपसंहरी अंतीं ॥ ते शुकोक्ति अवधारा ॥ ॥ ३८ ॥

तस्माल्लोकमिमंराजन्स्वप्नमायामनोरथम् ॥ वीक्ष्यायम्याऽऽत्मनाऽऽत्मानंसमःशांतोभवप्रभो ॥ २५ ॥

॥ टीका ॥ तस्मात कोण्हाचें नोहे कोण्ही ॥ इहलोकींची विचित्र काहणी ॥ कौरवभूपा ऐकें श्रवणीं ॥ सावध होऊनि क्षणएक ॥ ३९ ॥ जैसा बुद्धिबळाचा डाव ॥ क्रीडामिसें अहंभाव ॥ क्षोभोनि जैसी चढे हांव ॥ तेंवि हे माव संसारीं ॥ ४० ॥ खेळ खेळतां वाव झाला॥ परी आयुष्यक्षय वृथा केला ॥ हें तों नकळे पामराला जेंवि तस्करीं लुटिला निद्रिस्थ ॥ ४१ ॥ निद्रेमाजि स्वप्नीं राजा ॥ विगुंतला त्या संभ्रमकाजा॥ बाहिरी चोरीं लुटिला पैजा ॥ तें निर्लज्जा स्मरेना ॥ ४२ ॥ माया ह्मणिजे दैवकृत॥तन्निष्ठप्राणी मोहग्रस्त॥विषयीं होऊनि आसक्त ॥ निजपरमार्थ विसरती ॥ ४३ ॥ विषय स्वप्नाभ[2] क्षणभंगुर ॥ तेथ होऊनि स्वार्थपर ॥ अधर्माचरणें निरय घोर ॥ अनेक दुस्तर भोगिती ॥ ४४ ॥ विषयाभास ते कल्पना॥संस्कारजनित मनोरथरचना॥चित्प्रकाशें स्फुरती मना॥ गुणानुसार शुभाशुभ ॥ ४५ ॥ तदनुसार पामर प्राणी ॥ भांबावोनि विषयाचरणीं ॥ प्रवर्तती त्या पातकश्रेणी॥यमजाचणी तद्योगें॥ ४५॥आंगीं तारुण्याचा भर॥ प्रबल कामाचा संचार॥कन्याभगिनीमातृशरीर देखतां विकार उमटती ॥ ४७ ॥ विकारांसरिसा तनुसंगम ॥ झालिया कायिकपापोद्गम॥दर्शनमात्रें चित्तोद्यम ॥ करी त्या नाम मानसिक ॥ ४८ ॥ सूक्ष्मकामोर्मि[3] अंतरीं ॥जऱ्ही तो वर्ते सदाचारीं॥तऱ्ही स्वप्नीं बलात्कारीं ॥काम-

---

[1] वार्ता. [2] स्वप्नासारखे. [3] कामाची लहरी.

विकारीं व्यभिचारे ॥ ४९॥ माता दुहिता भगिनी सम ॥ स्वप्नीं परांगनासंगम ॥ तरी तें मानसिक दुष्कर्म॥ घडलें
निःसीम जाणावें ॥ ३५० ॥ कामक्रोधांच्या आवेशें ॥ सकामजल्पें साभिलाषें॥ घडे कीं नघडे पाहे ऐसें॥ वाचिकदोषें
तो लिंपे ॥ ५१ याचिसाठीं तारुण्यभरीं॥ संन्यास नकीजे प्रेषोच्चारीं॥ मनोनिग्रहविरक्तीं नरीं॥ अभ्यास कुसरीं साधा-
वा ॥ ५२ ॥ सच्छास्त्रश्रवणें सद्विचारें ॥ सत्संगमें सदाचारें ॥ श्रद्धाधानें[1] अभ्यंतरें॥ अभ्यास मोहरे मन लागे ॥५३॥
कृतदोषांचा पश्चात्ताप ॥ तेणें जळे त्रिविध पाप ॥ प्रायश्चित्त विधानकल्प॥ शास्त्रविकल्प निर्णीत[2] जे ॥ ५३ ॥
शौचकूपीं दुर्दैवें पडिला ॥ पश्चात्तापें कांटाळला ॥ प्रायश्चित्तें नक्षाळला ॥ तंव सोवळा नव्हे कीं॥ ५४ ॥ पश्चात्ताप
प्रायश्चित्त ॥ उभययोगें[3] अघनिर्धूत ॥ मनोनिग्रहीं अतंद्रित ॥ तैं तो अभ्यस्त सुख भोगी ॥ ५६ ॥ वामाचारें इंद्रिय
बरळ॥ यथेष्टाचरणीं अनर्गळ ॥ जऱ्ही तो दावी अभ्यासशीळ॥ तऱ्ही तो बाष्कळ निर्धारें॥ ५७ ॥ पश्चात्ताप प्रायश्चित्त
वानप्रस्थाश्रमपर्यंत ॥ चतुर्थाश्रमीं आरूढ पतित ॥ प्रायश्चित्त त्या नाहीं ॥ ५८ ॥ यालागिं मनाची कल्पना ॥ स्फुरवी
विषयात्मक वासना ॥ तो जागृतीउत्कर्ष माजि स्वप्ना ॥ भासे कीं ना विवरा हो ॥ ५९ ॥ पूर्वसंस्कारदैवबळें॥
शुभाशुभविषयीं वृत्ति खवळे ॥ धर्माधर्म तेणें मेळें ॥ करी आंधळे अज्ञान ॥ ६० ॥ तस्मात् स्वप्न क्षणभंगुर ॥
माया मिथ्या भ्रममंदिर ॥ मनोरथ केवळ कल्पनामात्र ॥ या तिहीं तुल्य असार हा लोक ॥ ६१ ॥ यदर्थीं काय
ह्मणसी यत्न ॥ दैव माया प्रेरी मन ॥ तैसें कल्पी विषयभरण ॥ तैं क्षोभे करणसमुच्चय ॥ ६२ ॥ जो जागृतीं
तीव्र अध्यास ॥ तैसाचि दिसे स्वप्नाभास ॥ कोण समर्थ आवरावयास ॥ अधर्मदोष केंवि चुके ॥ ६३ ॥
तरी ऐकें गा अंबिकातनया ॥ माया स्वप्नमनोरथमया ॥ तिन्ही उपमा लोका यथा ॥ जाणोनियां सम होईं ॥ ६४ ॥

---

१ विश्वास ठेविणारें. २ ठरविलेले. ३ पापविमक्त.

आत्मना ह्मणिजे मनेंकरून ॥ देहात्मा जो इंद्रियगण ॥ यत्नें आवरीं नियमून ॥ अधर्माचरण सांडवी ॥ ६५॥
मनीं उठतां अधर्मांकुर ॥ इंद्रियें हों पाहती तत्पर ॥ तेथ कीजे विवेक सधर ॥ शास्त्रनिर्धार अनुतापें ॥ ६६ ॥
राया अनुताप ह्मणसी कैसा ॥ तरी अधर्में पाविजे नरकवासा ॥ तेथील अनुलक्षूनि क्लेशा ॥ दृढ मानसा आवरिजे ॥ ६७ ॥ याचिसाठीं शास्त्रसंपन्न ॥ स्वस्तिश्रियेचे विद्वज्जन ॥ धर्मवेत्ते सुब्राह्मण ॥ त्यांसि पुसोन
वर्तावें ॥ ६८ ॥ जऱ्ही अधर्में आवडे लाभ ॥ तो जाणिजे नरककोंभ ॥ तदर्थ होतां वृत्तिक्षोभ ॥ विवेकें
लोभ खंडावा ॥ ६९ ॥ याचिसाठीं भगवद्गुणीं ॥ मानस बुभुक्षु[1] कीजे श्रवणीं ॥ नामस्मरणाविणें वाणी ॥
अर्धक्षणीं नवसावी ॥ ७० ॥ नीतिशास्त्रें राज्यभार ॥ चालवूनि निर्विकार ॥ नित्य नियमीं निजांतर ॥
शांत सुधीर सम होईं ॥ ७१ ॥ स्वपुत्रांवरी स्नेहगौरव ॥ पांडवांचा विषमभाव ॥ त्यजी ऐसें शब्दलाघव ॥
बोधूनि सर्व सूचविलें ॥ ७२ ॥ प्रभो ऐसें संबोधन ॥ कीं तूं स्वभावें चक्षुर्हीन ॥ मनोनिग्रहीं एकाग्रपण ॥
सहज संपूर्ण सामर्थ्ये ॥ ७३ ॥ सांडूनि दुष्टाची संगति ॥ श्रवणें नेघावी दुरुक्ति ॥ मन नघालावें अधर्मपंथीं ॥
यदुवर्योक्ति हे कथिली ॥७४॥ हें ऐकोनि कौरवनृपति ॥ बोले अक्रूरेंसीं मधुरोक्ति ॥ चौं श्लोकीं ते शुकभारती ॥
सावध श्रोतीं परिसावी ॥ ७५ ॥

धृतराष्ट्रउवाच ॥ यथावदतिकल्याणींवाचंदानपतेभवान्॥तथाऽनयानतृप्यामिमर्त्यःप्राप्ययथाऽमृतम् २६

॥टीका॥भो भो दानपते[2] अक्रूरा॥जैसी वदे हे तव गिरा॥यथार्थ कल्याणवती चतुरा॥नाहीं परिहारा स्थळ येथें७६

---

[1] क्षुधित. [2] हे अक्रूरा.

ईतें ऐकतां नह्मणवे पुरे ॥ तुझीं ऐसीं अमृतोत्तरें ॥ इये वाणीनें बोधितां निकरें ॥ तृप्ति श्रोत्रें मी नमनीं ॥ ७७ ॥
मर्त्यलोकींचा वर्ष्मधारी[1] ॥ भाग्यें अमृतपान जैं करी ॥ तैसी तयाची वैखरी ॥ अलं[2] उत्तरीं असमर्थ ॥ ७८ ॥

तथाऽपिसूनृतासौम्यहृदिनस्थीयतेचले ॥ पुत्रानुरागविषमेविद्युत्सौदामनीयथा ॥ २७ ॥

॥टीका॥शास्त्रसंमत विवेकयुक्त॥सत्यसुललित उद्वेगरहित॥तीतें बोलिजे सूनृत॥येर ते अनृत भवचर्चा ॥ ७९ ॥
ऐसी वाणी प्रियतम तुझी ॥ परिसतां धणी नपुरे माझी ॥ तथापि नथरे हृदयकंजीं ॥ माहाझंझीं दीपवत् ॥ ८० ॥
सौम्य ऐसें संबोधन ॥ तुझें सौमनस्य[3] अक्षोभ[4] पूर्ण ॥ यास्तव हृदयींचे दोषगुण ॥करितों कथन स्वमुखें मी॥८१॥
इहपर सर्वत्र कल्याणरूपा॥हितावह सुखकर सद्गुरुकृपा॥तैसी भारती तुझी बापा॥हृदया कां पां नरुचावी ॥८२ ॥
परम चंचळ माझें हृदय ॥ व्यवसायरहित अनिश्चय ॥ पुत्रमोहें विषम स्नेह ॥ पालट होय क्षणक्षणा ॥ ८३ ॥
पांडवांचे लक्षूनि गुण ॥ क्षणैक होय तुष्टमान[5] ॥ पुत्रस्नेहें जाकळून ॥ क्षणें क्षोभोन पालटे ॥ ८४ ॥
स्वपुत्र केवळ दुर्गुणखाणी॥तथापि प्रियतम वाटती मनीं॥यास्तव सूनृत तुझी बाणी ॥ नथरे नलिनीदलजल[6]लवत्८५
कीं सुष्ठु ह्मणिजे शुभलक्षणीं ॥मेघमाळा जे कादंबिनी॥सुदामशब्दें तीलागूनी ॥ श्रेष्ठीं कविजनीं बोलिजे ॥८६॥
विद्युत्प्रकाश तीच्या ठायीं ॥ लखलखूनि लपे पाहीं ॥ तैसी तव वाणी मम हृदयीं ॥ नथरे कांहीं तमःपटलीं ॥८७॥
श्रीधरस्वामींची व्युत्पत्ति ॥ सुदामस्फटिकाचे पर्वतीं ॥ लवोनि हारपे विद्ज्योति ॥ तेंवि तवोक्ति मम हृदयीं॥ ८८ ॥
कीं मुक्तादि सोज्वळ माळा॥माजि फांकोनि लपे चपळा॥विद्युत्प्रभेचिया उजाळा॥सरिसी किळा जेंवि स्फुरे ॥ ८९ ॥

---

[1] देहधारी. [2] 'पुरे, अशा उत्तरानें. [3] मनाची निर्मलता. [4] क्षोभरहित. [5] संतोष पावणारा. [6] कमलपत्रावरील उदकासारखी.

जंव ते विद्युद्धाझगमगी ॥तंव रोदसी[1] विविधारंगीं ॥ भा भंगतां तमाढ्यलिंगीं ॥ दशदिग्भागीं प्राचुर्य[2] ॥ ९० ॥
ऐसियासी करणें काय ॥ यदर्थीं अक्रूरा अनुपाय ॥ अदृष्टप्रेरक ईश्वर होय ॥ ते तूं सोय अवधारीं ॥ ९१ ॥

ईश्वरस्यविधिंकोऽन्नुविधुनोत्यन्यथापुमान् ॥ भूमेर्भारावताराययोऽवतीर्णोयदोःकुले ॥ २८ ॥

॥ टीका ॥ ह्मणसी जाणोनि विचार सर्व ॥ तुझ्या ठायीं हा कैंवि मोह ॥तरी ईश्वरेच्छेचा प्रवाह ॥ मतिनिर्वाह तद्रूप ॥ ९२ ॥ जो कां ईश्वराचा विधि ॥ ते हे माया ईश्वरोपाधि ॥ तदनुरूप चेष्टे बुद्धि ॥ प्राणिवृंदीं सर्वत्र ॥ ९३ ॥ ईश्वराचें विधिविधान ॥ क्षाळी अन्यथा करून ॥ ऐसा पुरुष असे कोण ॥ जो विधिलंघन करूं शके ॥ ९४ ॥ ह्मणसी ईश्वर सर्वीं सम ॥ तो कां प्रेरी हें वैषम्य ॥ यदर्थीं दानपा[3] ऐकें वर्म ॥प्रेरणानियम तो ऐसा ॥ ९५ ॥ सृजन पालन संहरण ॥ त्रिविध ईश्वरविधिक्रीडन ॥ तदनुसार तत्प्रेरण ॥ भासे भिन्न वैषम्यें ९६ स्वधर्माचें संस्थापन ॥ अधर्माचें उच्छेदन ॥ उभय कार्यार्थ उपकरण ॥ करी सृजन विधितंत्र ९७ ॥ ईश्वरेच्छे नाम विधि ॥ तो अनुकूळीं सृजी समृद्धि ॥ तदनुसार प्रेरी बुद्धि ॥ भासे तत्संधी सम विषम ॥ ९८ ॥ तो तूं ईश्वर ह्मणसी कोण ॥ जो यदुकुळीं रामकृष्ण ॥ अवतीर्ण रूपद्वय धरून ॥ भूभारशमन करावया ॥ ९९ ॥ त्याची उपकरणसामग्री ॥ पांडवप्रमुख आह्मी क्षत्री ॥ द्विधा होऊनि द्यूताकारीं ॥ करील धरित्री निर्भार ॥ ४०० ॥ तत्प्रेरणेसारिख्या बुद्धि ॥ स्फुरती अस्मदादिसर्वांहृदीं ॥ यालागिं अक्रूरा मी त्या वंदीं ॥ अन्यायवृद्धिक्षमापना ॥ १ ॥ कैसें तयाचें स्वरूप ॥ स्वयंभतेचा प्रताप ॥ स्वमुखें ह्मणे कौरवभूप ॥ एकें संक्षेप श्लोकार्थ ॥ २ ॥

---

१ आकाश व भूमि. २ बाहुल्य. ३ हे अक्रूरा.

योदुर्विमर्शपथयानिजमाययेदंसृष्ट्वागुणान्विभजतेतदनुप्रविष्टः ॥
तस्मैनमोदुरवबोधविहारतंत्रसंसारचक्रगतयेपरमेश्वराय ॥ २९ ॥

॥ टीका ॥ जो निजमायेकरून ॥ हें विश्व करी निर्माण ॥ प्रविष्टवत् अनुप्रवेशोन॥फळ कर्मैं गुण विभागीं ३ ॥
कैसी ह्मणसी ते निज माया ॥ जिचा अवितर्क्य पथ तर्काया ॥समर्थ नाहीं या गुणमया॥माजि ईश्वरपर्यंत ४॥
शुद्धसत्वात्मक ईश्वर ॥ जियेवांचूनि चराचर ॥ सृजूं नशकोचि अणुमात्र ॥ ना स्वयेंही ज्ञाता रहों नशके ॥५ ॥
यालागिं अघटितघटनापटी ॥ जीतें ह्मणती श्रुति वाक्पुटीं ॥ जे निराकारीं ब्रह्मांडकोटी ॥ सृजूनि एकटी नावगमे६॥
तियेमाजि जेव्हां स्वप्रकाश ॥ अनुप्रविष्ट चिदाभास ॥ भासे तेव्हां योनि अशेष ॥ चराचरास उत्पादी ॥ ७ ॥
तेथ तमःप्रचुर योनि हिंस्र ॥ तदनुसार कर्मैं क्रूर ॥ तत्फळभोग नरक दुस्तर ॥ तिर्यक तामिस्र अंधतम॥ ८ ॥
सत्वगुणें स्वर्गावधि ॥ सकामसत्कर्मसुकृतसिद्धि ॥ आभिजात्यादि अष्टमदीं ॥ ज्ञानसमृद्धि दिविभोग ॥ ९ ॥
सत्वतमाची मिश्रदशा ॥ तो रजोगुण संमिश्र ऐसा ॥ मिश्रकर्मीं फळाभिलाषा ॥ वळघोनि क्लेशा सुख मानी ॥
॥ १० ॥ सुकृत मानूनि आचरे दोष ॥ तत्फळ सुखबुद्धि भोगी क्लेश ॥ तो हा मर्त्यलोक अशेष ॥ विश्वाभास
त्रिधा ऐसा॥ ११ ॥गुणानुरूप हे कर्मरचना॥ न्यूनपूर्णविवंचना॥तत्फळ भोगी योनि नाना ॥ कैशा भोगवी नतर्कवे ॥ १२ ॥ऐसी दुर्बोध ज्याची क्रीडा॥ स्मरण नेदी स्वरूपाकडां ॥ मायाचक्रीं संसारगाडा ॥ चाळी घडघडां गतिरूप ॥ १३ ॥ एवं संसारचक्रगति ॥ जो मायावी विहारस्थिति ॥ क्रीडोनि नकळे कोणाप्रति ॥तो

---

१ घडण्यास अशक्य अशी रचना करण्यांत निपुण अशी माया.

परमेश्वर मी नमितों ॥ १४ ॥ माझें अंतर तयासि विदित ॥ तत्सत्तेनें मम चेष्टित ॥ ऐसें बोलिला अंबिकासुत ॥ अक्रूरें समस्त अवगमिलें ॥ १५ ॥ इतुकें हस्तिनापुरींचें वृत्त ॥ अक्रूरें राहोनि मास बहुत ॥ निर्द्धारिलें हृदयाआंत ॥ मग झाला उदित प्रयाणीं ॥ १६ ॥

॥ श्रीशुकउवाच ॥ इत्यभिप्रेत्यनृपतेरभिप्रायंसयादवः ॥ सुहृद्भिःसमनुज्ञातःपुनर्यदुपुरीमगात् ॥ ३० ॥

॥ टीका॥योगीश्वरकृतकपर्दकेळा ॥ कीं ब्रह्मविद्येचा पुतळा ॥ जो पर्णूनि विरक्तिबाळा ॥ भोगी स्वलीला सर्वांगीं ॥ १७ ॥ तो शुक स्वमुखें स्वानंदभरित ॥ मत्स्यजाशुक्तिगर्भींचें मुक्त ॥ श्रवणरंध्रीं हरिगुण प्रोत ॥ करूनि कर्षित स्वभूषणा ॥ १८ ॥ कुरुकुळक्षीराब्धिसंभवसोमा ॥ ऐकें राया सार्वभौमा ॥ ऐसी धृतराष्ट्रवक्तृत्वसीमा ॥ धर्मा अधर्मा संमत जे ॥ १९ ॥ परिच्छिन्न टाकली सोंटी ॥ ते हे वदला प्रकट गोठी ॥ येरें घेवूनि श्रवणपुटीं ॥ पुन्हा वाक्पुटीं त्या नवदे ॥ २० ॥ झडझडूनि सभास्थानीं ॥ उभा ठाकला स्वयूथगणीं ॥ आज्ञा मागे जुहारूनी ॥ बाह्लीकभीष्मप्रमुखांतें ॥ २१ ॥ टाकली साटी कैसी कोण ॥राजा करूं पाहे प्रश्न ॥ शुकें नृपांतर जाणोन ॥ करी ते कथन प्रकटार्थें ॥ २२ ॥ सहस्र शूळ कृतागस एक ॥ कीं सहस्रशस्त्रां एक मस्तक ॥ तेंवि यादव कां यदुनायक ॥ बिभीषाजनक कोठवरी ॥ २३ ॥ अलोट ईश्वराची करणी ॥ मानूनि शिकवण नेघे कर्णीं ॥ वदले हलधरचक्रपाणि ॥ तऱ्ही दुर्गुणी सुत नह्मणे ॥ २४ ॥ ऐसें धृतराष्ट्राभिप्रेत ॥ साद्यंत अभिप्राय तो समस्त ॥ जाणोनि यादव श्वफल्कसुत ॥ कांहीं नवदत ऊठिला॥२५ ॥ नमूनि बाहूली-

---

१ जटाजूटरचना. २ विरक्तिरूप स्त्री. ३ विराटकन्यारूपी शिंपींतील. ४ संगति. ५ भयदायक.

क सपुत्रपौत्र ॥ गौतमद्रौणिद्रोणादिविप्र ॥ भीष्मप्रमुख प्रज्ञानेत्र ॥ येर सर्वत्र जुहारिले ॥ २६ ॥ आज्ञा घेऊनि मथुरे जातां ॥ सदना जाऊनि नमिली पृथा ॥ युधिष्ठिरप्रमुख पांडुसुतां ॥ पुसोनि निघता जाहला ॥ २७ ॥ विदुरपादुका स्पर्शोनि करीं ॥ अंतःपुरींच्या वृद्धा नारी ॥ चेटिकाद्वारा[2] अनुज्ञोत्तरीं[3] ॥ सहगांधारी वंदिल्या ॥ २८ ॥ वारुणी[4]दिग्वप्रगोपुर ॥ पर्यंत अनुयायी गांधार[5] ॥ कर्ण शकुनि द्रोणकुमर ॥ पांडववीर पुरजनही ॥ मग ते राहवूनि समस्त ॥ रथीं बैसला गांदिनीसुत ॥ कृष्णस्मरणें मथुरापंथ ॥ सेनावेष्टित चालिला ॥ ३० ॥ विदुर पांडव त्रिगव्यूति ॥ रथीं बैसोनि सवें जाती ॥ कृष्णभेटीची सप्रेम आर्ती ॥ विदित करिती पुनःपुन्हा ॥ ३१ ॥ आणि कौरवकृत हृच्छल्यें ॥ अक्रूर कथूनि कौशल्यें ॥ वस्त्राभरणें परमामौल्यें ॥ जें सम तुल्यें हरिभूषा ॥ ३२ ॥ रामकृष्णार्थ अक्रूराहातीं ॥ अर्पूनियां सप्रेमभक्ति ॥ अक्रूर नमिला उतरूनि क्षिती ॥ वियोगार्तिवैकल्यें ॥ ३३ ॥ परस्परें पुसती नेत्रें ॥ अक्रूर पाहूनि पांडववक्त्रें ॥ सात्विकाष्टकें विह्वळगात्रें ॥ हृदयीं सुभरें आलिंगी ॥ ३४ ॥ एवं सुहृदीं अनुज्ञात ॥ अक्रूर पुन्हा वळघला रथ ॥ विदुरेंसहित पांडुसुत ॥ आज्ञागृहीत थांबविले ॥ ३५ ॥ श्वाफल्किरथ दृग्गोर ॥ तंव वरी पांडव होते स्थिर॥मग परतोनि सहित विदुर ॥ निजमंदिर प्रवेशले ॥ ३६ ॥ अक्रूर पंथीं क्रमूनि वसती ॥ सवेग आला मथुरेप्रति ॥ सभे भेटूनि सर्वांप्रति ॥ रामकृष्ण वंदिले ॥ ३७ ॥

शशंसरामकृष्णाभ्यांधृतराष्ट्रविचेष्टितम् ॥ पांडवान्प्रतिकौरव्ययदर्थंप्रेषितःस्वयम्॥ ३१ ॥

---

१ धृतराष्ट्र. २ दासी कडून. ३ परवानगीचे उत्तरानें. ४ पश्चिमेकडील तटावरचें गोपुर. ५ गांधारीचे पुत्र दुर्योधनादि.

॥टीका॥ कौरव्य ऐसें संबोधन ॥ परीक्षितीस व्यासनंदन ॥ देऊनि ह्मणे सावधान ॥ अक्रूरकथन अवधारीं ॥ ३८ ॥ रामकृष्णांहीं ज्या कार्यार्थ ॥ हस्तिनापुरा श्वफल्कसुत ॥ प्रेरिला होता तो वृत्तांत ॥ करी विदित साकल्यें ॥ ३९ ॥ पांडवांतें प्रतीपरूपें[1] ॥ वर्तत असतां कौरवभूपें ॥ तुमचे आज्ञेच्या संक्षेपें ॥ बोधितां विकल्पें नमनी तो ॥ ४० ॥ हस्तिनापुरप्रवेशन ॥ कौरवांचें अभ्युत्थान ॥ विदुरपृथेचें गुह्यकथन ॥ आणि सद्गुण पार्थाचे ॥ ४१ ॥ धृतराष्ट्राचें विषमांतर ॥ कौरवांचा कपटाचार ॥ शकुनिकर्णकृतविचार ॥ सविस्तर निवेदिला ॥ ४२ ॥ धृतराष्ट्रानें टाकिली साटी[2] ॥ दिधली तेही कथूनि गोठी ॥ रामकृष्णांतें नमूनि मुकुटीं ॥ मौन वाक्पुटीं स्वीकेलें ॥ ४३ ॥ हें ऐकोनि प्रधानपुरुष ॥ रामकृष्ण जे नरवरवेष ॥ परस्परें करूनि हास्य ॥ हस्त हस्तास मिळविले ॥ ४४॥ येथूनि अवतारकार्यारंभ ॥ तो हा उदेला कलहक्कोंभ ॥ आंगीं प्रकटूनि वीरश्रीक्षोभ ॥ स्मश्रु स्वयंभ स्पर्शिलें ॥ ४५ ॥ यावरी बलराममुरारि ॥ तुळिती आयोधन[3]सामग्री ॥ समरीं होती शस्त्रधारी ॥ ते कथा पुढारीं उत्तरार्धीं ॥ ४६ ॥ अस्ति प्राप्ति कंसांगना ॥ जाऊनि स्वतातमागधसदना ॥ विदित करूनि कंसनिधना ॥ वैरभावना वर्द्धविती ॥ ४७ ॥ ते सविस्तर कथा पुढें ॥श्रोतीं परिसिजे निवाडें[4] ॥ श्रीकृष्णाचे बालक्रीडे ॥ कथूनि पूर्वार्ध संपविलें ॥ ४८ ॥ सद्गुर्वाज्ञा अतिसमर्थ ॥ परम कृपाळु एकनाथ ॥ संतीं कथिला परमार्थ स्वार्थ॥सफळ येथ तो झाला ॥ ४९॥ शरीराची शमली व्यथा॥ ग्रंथव्याख्यानीं वक्तृत्वप्रथा ॥ शमलशमनीं हरिगुणत्रिपथा[6] ॥ धारिलीं माथां शिवश्रोतीं ॥ ४५० ॥ श्रीधरस्वामींच्या पदप्रकाशें ॥ सद्गुरुसंताज्ञासौरसें ॥ प्रवर्तलों जें महाराष्ट्रभाषे ॥ ते टीका विशेष हरिवरदा ॥ ५१ ॥ अंतेवासी[7]

---

१ विरुद्ध. २ संगाति. ३ युद्धसामग्री. ४ वेगळें. ५ ख्याति. ६ गंगा. ७ शिष्य.

उत्तमश्लोक ॥ झाला पूर्वार्द्धीं लेखक ॥ वदलें दयार्णवाचें मुख ॥ बुद्धिप्रेरक हरिगुरु तो ५२ ॥ पुढें उत्तरार्धाची टीका ॥ जरी करवणें श्रीनायका ॥ स्वसामर्थ्यें करील देखा ॥ किमर्थ शंका मज येथें ॥ ५३ ॥ परंतु जरेनें शरीर क्षीण ॥ देशकालादि विपरीत चिह्न ॥ संतीं करविलें व्याख्यान ॥ तेही निर्वाण पावले ॥ ५४ ॥ प्राचीन सज्जन जिवलग सखे ॥ ब्रह्मसायुज्यीं भजले तितुके ॥ त्यांच्या वियोगें वाटे फिकें ॥ जिणें वर्तणें भूभार ॥ ५५ ॥ त्यांच्या स्मरतां गोठी राहटी ॥ विरहावस्था उथळे[1] पोटीं ॥ सगुणसुखाची पडली तुटी ॥ भासे सृष्टि अविरामें[2] ॥ ५६ ॥ असो यावरी सज्जनमूर्ति ॥ ॥ अवतरोनि जे तारिती क्षिती ॥ त्यांचे पदींची वंदूनि माती ॥ सुखविश्रांति भावितसें ॥ ५७ ॥ कळिकाळाचा चढतां भर ॥ कांताकनकीं यति सादर ॥ गुरुद्रोही शिष्य विप्र ॥ रंडा जारपरायणा ॥ ५८ ॥ वामी कामी कौळाचरणी ॥ जारणमारणप्रयोगकरणी ॥ साबरचेटकादि निर्घृणी ॥ संतसज्जनीं मिरवती ॥ ५९ ॥ देखोनि क्षुद्र चमत्कार ॥ कळिकाळींचे दुर्मति नर ॥ त्यांचे ठायीं भक्तितत्पर ॥ शिष्य सादर होत्साते ॥ ६० ॥ ऐसियांपासोनि तरणोपाय ॥ मोक्षमार्गींची केउती सोय ॥ स्वमति नमिळे त्यां अपाय ॥ करितां अन्याय न मनिती ॥ ६१ ॥ असो ऐसिया कळिकाळांत ॥ दहा सहस्र अब्दपर्यंत ॥ कुढावीन[3] निज सात्वत ॥ हें श्रीकांत बिरुद असे ॥ ६२ ॥ हाचि भरवसा सद्भाविकां ॥ सत्वसंपन्नां मुमुक्षुलोकां ॥ भक्तनिमित्त श्रीनायका ॥ कलिमलपंका निस्तरणें ॥ ६३ ॥ तया हरिगुरूचे अवतार ॥ संत होती जगदाधार ॥ शमदमादि साधनपर ॥ सदाचार निष्काम ॥ ६४ ॥ त्रितापरहित सुशीतळ ॥ शरणशरण्य दीनदयाळ ॥ क्लेश साहूनि क्षमाशीळ ॥ प्रबोधकुशळ सत्पुरुष ॥ ६५ ॥ त्यांच्या पदरजांची आशा ॥ करूनि लक्षीं दाही दिशा ॥ कोठें सज्जनसगुणवेषा ॥ धरूनि क्लेशा निरसील ॥ ६६ ॥

---

[1] उत्पन्न होते. [2] विश्रांतिरहित. [3] रक्षीन.

सद्गुरूनें मज सज्जनां ॥ निरविलें ते कवल्यसदना॥ गेले यास्तव पदव्याख्याना ॥ हांव नबणे परार्द्धीं[1] ॥६७ ॥ यास्तव
येथ अळंकार ॥ करावयाचा हा परिहार ॥ उत्तरार्धही कमलावर ॥ करविता सादर ना नह्मणो॥ ६८॥श्रीएकनाथसाम्राज्यपीठीं
॥ प्रतिष्ठानीं गोदातटीं ॥ चिदानंदाचिये संतुष्टी ॥ स्वानंदपुष्टि त्रिजगा दे ॥ ६९ ॥ गोविंदकृपागंगावोघ
॥ हरिगुरुपादोदक अमोघ ॥ निरसी त्रिगुणत्रितापदाघ ॥ क्षाळूनि अघ त्रिजगाचें ॥ ७० ॥
तो कृपेचा प्रवाह सर्व ॥ लोटूनि भरला दयार्णव ॥ श्रवणें मननें सुस्नात विश्व ॥ पर्व अपूर्व मोक्षद हें
॥ ७१ ॥ इये पर्वी सुस्नात मननें ॥ जिह्वे स्पर्शिती पठनाचमनें ॥ प्राशन करिती सदुक्तश्रवणें ॥ ते निर्वाणें
आंथिले[2] ॥ ७२ ॥ विद्यातपादि सत्ययोनि ॥ व्यापक विष्णु जो अयोनि ॥ तो हा यजिला गिरायज्ञीं ॥ झाला
तुष्टोनि श्रीवरद ॥ ७३ ॥ हरिगुरुवरदप्रसादसिद्धि ॥ ही प्रार्थना सकामबुद्धी ॥ ग्रंथश्रवणीं दुष्टोपाधि ॥ कोण्हा
कधीं नस्फुरतु ॥ ७४ ॥ बद्ध[3] मुमुक्षु आणि मुक्त ॥ त्रिविध जनाचा संघात ॥ श्रवणीं बैसतां शुद्धचित्त ॥ अधिकारवंत
ते व्हावे ॥ ७५ ॥ हेतुवाद सांडूनियां ॥ सद्भाव उपजो पाखंडियां॥श्रवणाधिकार कुतर्कियां॥ प्रत्यक्ष
बाणोनि हो लाभ ॥ ७६ ॥ कर्मठांची सकाम बुद्धि ॥ तुटोनि बाणे चित्तशुद्धि ॥ अपरोक्षबोधाच्या संवादीं ॥
अधिकारसिद्धि लाहो कां ॥ ७७ ॥ अनन्यप्रेमा सद्गुरुचरणीं ॥ सर्वां उपजो अंतःकरणीं ॥ निंदा द्वेष कोण्हा
मनीं ॥ श्रवणमात्रीं नरुचावा ॥ ७८ मोडो खळाची वक्रता ॥निष्काम सत्कर्मीं हो आस्था॥सर्वभूतीं एकात्मता
प्रेम वाढो परस्परें ॥ ७९ ॥ कडसणींची[4] अहाच मात ॥ सन्मात्रैक शुद्ध शाश्वत ॥ विश्वाभास तद्विवर्त
॥ मुख्यपरमार्थ हा विवळो[5]॥ ८० ॥ सच्छब्दें जे सन्मात्र वस्त ॥ तन्मय होऊनि वर्तती स्वस्थ ॥

---

१ उत्तरार्धाविषयीं. २ संपन्न झाले. ३ संसारी. ४ विचाराची. ५ स्पष्टहोवो.

तयां सज्जनांसि सांघात ॥ होऊनि स्वहित सर्वीं हो ॥ ८१ ॥ दीनानुकंपी समर्थ संत ॥ शुकासारिखे
अकस्मात ॥ वरदें करोत अधिकारवंत॥पढतां ग्रंथ सद्भावें ॥ ८२ ऐसें ऐकोनि प्रार्थन ॥ सद्गुरु मूर्तिमय
सज्जन ॥ ह्मणती दत्तात्रेयदर्शन ॥ लाहती श्रवणाधिकारी ॥ ८३ ॥ अभीष्टकाम सर्व पुरती ॥
ग्रंथश्रवणीं होतां रति ॥ करूनि कलिमलाची शांति ॥ गोप्ता श्रीपति सर्वदा ॥ ८४ ॥ ऐसें लाहतां
वरदोत्तर ॥ संतीं केला जयजयकार ॥ तथास्तुशब्दाचा निज गजर ॥ श्रोते सुरवर गर्जती ॥ ८५ ॥
गोदावरीदक्षिणतीरीं ॥ पिपीलिकानामकक्षेत्रीं[1] ॥ प्रतिष्ठानापासूनि दुरी ॥ ऐंद्राग्निमध्यग त्रिक्रोशीं ॥ ८६ ॥
त्रितीय शक शालिवाहन ॥ गताब्द षोडशशत छप्पन्न ॥ आनंदवत्सर वद्यश्रावण॥जन्माष्टमी रविवार ॥ ८७ ॥
रोहिणीनक्षत्र कौलव करण ॥ व्याघातयोग चतुर्थ चरण ॥ प्रथमप्रहरीं ग्रंथलेखन ॥ झालें संपूर्ण पूर्वार्ध ॥८८॥
नाहीं क्षणाचा भरंवसा ॥ ग्रंथ समाप्ति पावेल कैसा ॥ ह्मणोनि पूर्वार्धींच ऐसा ॥ अळंकार निरूपिला ॥ ८९ ॥
ग्रंथ नव्हे हा कल्पतरु ॥ चिंतारत्नांचा[2] सागरु ॥ भावें इच्छी जे जो नरु ॥ त्यातें श्रीधर पुरवील ॥ ९० ॥
पूर्णकाम परब्रह्म ॥ पूर्णगुर्वाज्ञेचा नियम ॥ पूर्णभूतीं भगवत्प्रेम ॥ पुरषोत्तम संतुष्ट ॥ ९१ ॥

हरिः ॐ श्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यांपारमहंस्यांसंहितायांदशमस्कंधेश्रीशुकपरीक्षित्संवादेहरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायांकुंतीसांत्वनधृतराष्ट्रबोधनाक्रूरमथुराभिगमनंनामैकोनपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ४९ ॥

पृथ्वीग्लानिब्रह्मादिदेवैर्हरिप्रार्थनादारभ्याक्रूरधृतराष्ट्रसंवादपुनर्मथुराप्रवेशनंनामपूर्वार्द्धसमाप्तिमगमत् ॥

---

[1] मुंगीपैठणनांवाच्या क्षेत्रांत. [2] चिन्तामणींचा.

[illegible] व सख्या ॥ [illegible] ॥ [illegible] स्तु॥ ॥

[illegible]२ विक्रातनामसंवत्सरेचैत्रशुद्धप्रतिपदातद्दिनीं धारुरीं पूर्वार्द्धलेखन समाप्त ॥ ३ ॥

अदृष्टभावान्मतिविभ्रमाद्वान्यूनाधिकंवालिखितंमयात्र ॥
तत्सर्वमार्यैःपरिशोधनीयंकोपंनकुर्यात्खलुलेखकस्य ॥

॥ इति पूर्वार्द्धः समाप्तः ॥

```
[OrderDescription]
,CREATED=19.06.20 11:05
,TRANSFERRED=2020/06/19 at 13:31:30
,PAGES=790
,TYPE=STD
,NAME=S0003184
,Book Name=M-3014-BHAGWAD TIKA
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
```

```
FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
```

```
FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF
,FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF
,FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,FILE56=00000056.TIF
,FILE57=00000057.TIF
,FILE58=00000058.TIF
,FILE59=00000059.TIF
,FILE60=00000060.TIF
```

```
FILE61=00000061.TIF
,FILE62=00000062.TIF
,FILE63=00000063.TIF
,FILE64=00000064.TIF
,FILE65=00000065.TIF
,FILE66=00000066.TIF
,FILE67=00000067.TIF
,FILE68=00000068.TIF
,FILE69=00000069.TIF
,FILE70=00000070.TIF
,FILE71=00000071.TIF
,FILE72=00000072.TIF
,FILE73=00000073.TIF
,FILE74=00000074.TIF
,FILE75=00000075.TIF
,FILE76=00000076.TIF
,FILE77=00000077.TIF
,FILE78=00000078.TIF
,FILE79=00000079.TIF
,FILE80=00000080.TIF
,FILE81=00000081.TIF
,FILE82=00000082.TIF
,FILE83=00000083.TIF
```

```
FILE84=00000084.TIF
,FILE85=00000085.TIF
,FILE86=00000086.TIF
,FILE87=00000087.TIF
,FILE88=00000088.TIF
,FILE89=00000089.TIF
,FILE90=00000090.TIF
,FILE91=00000091.TIF
,FILE92=00000092.TIF
,FILE93=00000093.TIF
,FILE94=00000094.TIF
,FILE95=00000095.TIF
,FILE96=00000096.TIF
,FILE97=00000097.TIF
,FILE98=00000098.TIF
,FILE99=00000099.TIF
,FILE100=00000100.TIF
,FILE101=00000101.TIF
,FILE102=00000102.TIF
,FILE103=00000103.TIF
,FILE104=00000104.TIF
,FILE105=00000105.TIF
,FILE106=00000106.TIF
```

```
FILE107=00000107.TIF
,FILE108=00000108.TIF
,FILE109=00000109.TIF
,FILE110=00000110.TIF
,FILE111=00000111.TIF
,FILE112=00000112.TIF
,FILE113=00000113.TIF
,FILE114=00000114.TIF
,FILE115=00000115.TIF
,FILE116=00000116.TIF
,FILE117=00000117.TIF
,FILE118=00000118.TIF
,FILE119=00000119.TIF
,FILE120=00000120.TIF
,FILE121=00000121.TIF
,FILE122=00000122.TIF
,FILE123=00000123.TIF
,FILE124=00000124.TIF
,FILE125=00000125.TIF
,FILE126=00000126.TIF
,FILE127=00000127.TIF
,FILE128=00000128.TIF
,FILE129=00000129.TIF
```

```
FILE130=00000130.TIF
,FILE131=00000131.TIF
,FILE132=00000132.TIF
,FILE133=00000133.TIF
,FILE134=00000134.TIF
,FILE135=00000135.TIF
,FILE136=00000136.TIF
,FILE137=00000137.TIF
,FILE138=00000138.TIF
,FILE139=00000139.TIF
,FILE140=00000140.TIF
,FILE141=00000141.TIF
,FILE142=00000142.TIF
,FILE143=00000143.TIF
,FILE144=00000144.TIF
,FILE145=00000145.TIF
,FILE146=00000146.TIF
,FILE147=00000147.TIF
,FILE148=00000148.TIF
,FILE149=00000149.TIF
,FILE150=00000150.TIF
,FILE151=00000151.TIF
,FILE152=00000152.TIF
```

```
FILE153=00000153.TIF
,FILE154=00000154.TIF
,FILE155=00000155.TIF
,FILE156=00000156.TIF
,FILE157=00000157.TIF
,FILE158=00000158.TIF
,FILE159=00000159.TIF
,FILE160=00000160.TIF
,FILE161=00000161.TIF
,FILE162=00000162.TIF
,FILE163=00000163.TIF
,FILE164=00000164.TIF
,FILE165=00000165.TIF
,FILE166=00000166.TIF
,FILE167=00000167.TIF
,FILE168=00000168.TIF
,FILE169=00000169.TIF
,FILE170=00000170.TIF
,FILE171=00000171.TIF
,FILE172=00000172.TIF
,FILE173=00000173.TIF
,FILE174=00000174.TIF
,FILE175=00000175.TIF
```

```
FILE176=00000176.TIF
,FILE177=00000177.TIF
,FILE178=00000178.TIF
,FILE179=00000179.TIF
,FILE180=00000180.TIF
,FILE181=00000181.TIF
,FILE182=00000182.TIF
,FILE183=00000183.TIF
,FILE184=00000184.TIF
,FILE185=00000185.TIF
,FILE186=00000186.TIF
,FILE187=00000187.TIF
,FILE188=00000188.TIF
,FILE189=00000189.TIF
,FILE190=00000190.TIF
,FILE191=00000191.TIF
,FILE192=00000192.TIF
,FILE193=00000193.TIF
,FILE194=00000194.TIF
,FILE195=00000195.TIF
,FILE196=00000196.TIF
,FILE197=00000197.TIF
,FILE198=00000198.TIF
```

```
FILE199=00000199.TIF
,FILE200=00000200.TIF
,FILE201=00000201.TIF
,FILE202=00000202.TIF
,FILE203=00000203.TIF
,FILE204=00000204.TIF
,FILE205=00000205.TIF
,FILE206=00000206.TIF
,FILE207=00000207.TIF
,FILE208=00000208.TIF
,FILE209=00000209.TIF
,FILE210=00000210.TIF
,FILE211=00000211.TIF
,FILE212=00000212.TIF
,FILE213=00000213.TIF
,FILE214=00000214.TIF
,FILE215=00000215.TIF
,FILE216=00000216.TIF
,FILE217=00000217.TIF
,FILE218=00000218.TIF
,FILE219=00000219.TIF
,FILE220=00000220.TIF
,FILE221=00000221.TIF
```

```
FILE222=00000222.TIF
,FILE223=00000223.TIF
,FILE224=00000224.TIF
,FILE225=00000225.TIF
,FILE226=00000226.TIF
,FILE227=00000227.TIF
,FILE228=00000228.TIF
,FILE229=00000229.TIF
,FILE230=00000230.TIF
,FILE231=00000231.TIF
,FILE232=00000232.TIF
,FILE233=00000233.TIF
,FILE234=00000234.TIF
,FILE235=00000235.TIF
,FILE236=00000236.TIF
,FILE237=00000237.TIF
,FILE238=00000238.TIF
,FILE239=00000239.TIF
,FILE240=00000240.TIF
,FILE241=00000241.TIF
,FILE242=00000242.TIF
,FILE243=00000243.TIF
,FILE244=00000244.TIF
```

```
FILE245=00000245.TIF
,FILE246=00000246.TIF
,FILE247=00000247.TIF
,FILE248=00000248.TIF
,FILE249=00000249.TIF
,FILE250=00000250.TIF
,FILE251=00000251.TIF
,FILE252=00000252.TIF
,FILE253=00000253.TIF
,FILE254=00000254.TIF
,FILE255=00000255.TIF
,FILE256=00000256.TIF
,FILE257=00000257.TIF
,FILE258=00000258.TIF
,FILE259=00000259.TIF
,FILE260=00000260.TIF
,FILE261=00000261.TIF
,FILE262=00000262.TIF
,FILE263=00000263.TIF
,FILE264=00000264.TIF
,FILE265=00000265.TIF
,FILE266=00000266.TIF
,FILE267=00000267.TIF
```

```
FILE268=00000268.TIF
,FILE269=00000269.TIF
,FILE270=00000270.TIF
,FILE271=00000271.TIF
,FILE272=00000272.TIF
,FILE273=00000273.TIF
,FILE274=00000274.TIF
,FILE275=00000275.TIF
,FILE276=00000276.TIF
,FILE277=00000277.TIF
,FILE278=00000278.TIF
,FILE279=00000279.TIF
,FILE280=00000280.TIF
,FILE281=00000281.TIF
,FILE282=00000282.TIF
,FILE283=00000283.TIF
,FILE284=00000284.TIF
,FILE285=00000285.TIF
,FILE286=00000286.TIF
,FILE287=00000287.TIF
,FILE288=00000288.TIF
,FILE289=00000289.TIF
,FILE290=00000290.TIF
```

```
FILE291=00000291.TIF
,FILE292=00000292.TIF
,FILE293=00000293.TIF
,FILE294=00000294.TIF
,FILE295=00000295.TIF
,FILE296=00000296.TIF
,FILE297=00000297.TIF
,FILE298=00000298.TIF
,FILE299=00000299.TIF
,FILE300=00000300.TIF
,FILE301=00000301.TIF
,FILE302=00000302.TIF
,FILE303=00000303.TIF
,FILE304=00000304.TIF
,FILE305=00000305.TIF
,FILE306=00000306.TIF
,FILE307=00000307.TIF
,FILE308=00000308.TIF
,FILE309=00000309.TIF
,FILE310=00000310.TIF
,FILE311=00000311.TIF
,FILE312=00000312.TIF
,FILE313=00000313.TIF
```

```
FILE314=00000314.TIF
,FILE315=00000315.TIF
,FILE316=00000316.TIF
,FILE317=00000317.TIF
,FILE318=00000318.TIF
,FILE319=00000319.TIF
,FILE320=00000320.TIF
,FILE321=00000321.TIF
,FILE322=00000322.TIF
,FILE323=00000323.TIF
,FILE324=00000324.TIF
,FILE325=00000325.TIF
,FILE326=00000326.TIF
,FILE327=00000327.TIF
,FILE328=00000328.TIF
,FILE329=00000329.TIF
,FILE330=00000330.TIF
,FILE331=00000331.TIF
,FILE332=00000332.TIF
,FILE333=00000333.TIF
,FILE334=00000334.TIF
,FILE335=00000335.TIF
,FILE336=00000336.TIF
```

```
FILE337=00000337.TIF
,FILE338=00000338.TIF
,FILE339=00000339.TIF
,FILE340=00000340.TIF
,FILE341=00000341.TIF
,FILE342=00000342.TIF
,FILE343=00000343.TIF
,FILE344=00000344.TIF
,FILE345=00000345.TIF
,FILE346=00000346.TIF
,FILE347=00000347.TIF
,FILE348=00000348.TIF
,FILE349=00000349.TIF
,FILE350=00000350.TIF
,FILE351=00000351.TIF
,FILE352=00000352.TIF
,FILE353=00000353.TIF
,FILE354=00000354.TIF
,FILE355=00000355.TIF
,FILE356=00000356.TIF
,FILE357=00000357.TIF
,FILE358=00000358.TIF
,FILE359=00000359.TIF
```

```
FILE360=00000360.TIF
,FILE361=00000361.TIF
,FILE362=00000362.TIF
,FILE363=00000363.TIF
,FILE364=00000364.TIF
,FILE365=00000365.TIF
,FILE366=00000366.TIF
,FILE367=00000367.TIF
,FILE368=00000368.TIF
,FILE369=00000369.TIF
,FILE370=00000370.TIF
,FILE371=00000371.TIF
,FILE372=00000372.TIF
,FILE373=00000373.TIF
,FILE374=00000374.TIF
,FILE375=00000375.TIF
,FILE376=00000376.TIF
,FILE377=00000377.TIF
,FILE378=00000378.TIF
,FILE379=00000379.TIF
,FILE380=00000380.TIF
,FILE381=00000381.TIF
,FILE382=00000382.TIF
```

```
FILE383=00000383.TIF
,FILE384=00000384.TIF
,FILE385=00000385.TIF
,FILE386=00000386.TIF
,FILE387=00000387.TIF
,FILE388=00000388.TIF
,FILE389=00000389.TIF
,FILE390=00000390.TIF
,FILE391=00000391.TIF
,FILE392=00000392.TIF
,FILE393=00000393.TIF
,FILE394=00000394.TIF
,FILE395=00000395.TIF
,FILE396=00000396.TIF
,FILE397=00000397.TIF
,FILE398=00000398.TIF
,FILE399=00000399.TIF
,FILE400=00000400.TIF
,FILE401=00000401.TIF
,FILE402=00000402.TIF
,FILE403=00000403.TIF
,FILE404=00000404.TIF
,FILE405=00000405.TIF
```

```
FILE406=00000406.TIF
,FILE407=00000407.TIF
,FILE408=00000408.TIF
,FILE409=00000409.TIF
,FILE410=00000410.TIF
,FILE411=00000411.TIF
,FILE412=00000412.TIF
,FILE413=00000413.TIF
,FILE414=00000414.TIF
,FILE415=00000415.TIF
,FILE416=00000416.TIF
,FILE417=00000417.TIF
,FILE418=00000418.TIF
,FILE419=00000419.TIF
,FILE420=00000420.TIF
,FILE421=00000421.TIF
,FILE422=00000422.TIF
,FILE423=00000423.TIF
,FILE424=00000424.TIF
,FILE425=00000425.TIF
,FILE426=00000426.TIF
,FILE427=00000427.TIF
,FILE428=00000428.TIF
```

```
FILE429=00000429.TIF
,FILE430=00000430.TIF
,FILE431=00000431.TIF
,FILE432=00000432.TIF
,FILE433=00000433.TIF
,FILE434=00000434.TIF
,FILE435=00000435.TIF
,FILE436=00000436.TIF
,FILE437=00000437.TIF
,FILE438=00000438.TIF
,FILE439=00000439.TIF
,FILE440=00000440.TIF
,FILE441=00000441.TIF
,FILE442=00000442.TIF
,FILE443=00000443.TIF
,FILE444=00000444.TIF
,FILE445=00000445.TIF
,FILE446=00000446.TIF
,FILE447=00000447.TIF
,FILE448=00000448.TIF
,FILE449=00000449.TIF
,FILE450=00000450.TIF
,FILE451=00000451.TIF
```

```
FILE452=00000452.TIF
,FILE453=00000453.TIF
,FILE454=00000454.TIF
,FILE455=00000455.TIF
,FILE456=00000456.TIF
,FILE457=00000457.TIF
,FILE458=00000458.TIF
,FILE459=00000459.TIF
,FILE460=00000460.TIF
,FILE461=00000461.TIF
,FILE462=00000462.TIF
,FILE463=00000463.TIF
,FILE464=00000464.TIF
,FILE465=00000465.TIF
,FILE466=00000466.TIF
,FILE467=00000467.TIF
,FILE468=00000468.TIF
,FILE469=00000469.TIF
,FILE470=00000470.TIF
,FILE471=00000471.TIF
,FILE472=00000472.TIF
,FILE473=00000473.TIF
,FILE474=00000474.TIF
```

```
FILE475=00000475.TIF
,FILE476=00000476.TIF
,FILE477=00000477.TIF
,FILE478=00000478.TIF
,FILE479=00000479.TIF
,FILE480=00000480.TIF
,FILE481=00000481.TIF
,FILE482=00000482.TIF
,FILE483=00000483.TIF
,FILE484=00000484.TIF
,FILE485=00000485.TIF
,FILE486=00000486.TIF
,FILE487=00000487.TIF
,FILE488=00000488.TIF
,FILE489=00000489.TIF
,FILE490=00000490.TIF
,FILE491=00000491.TIF
,FILE492=00000492.TIF
,FILE493=00000493.TIF
,FILE494=00000494.TIF
,FILE495=00000495.TIF
,FILE496=00000496.TIF
,FILE497=00000497.TIF
```

```
FILE498=00000498.TIF
,FILE499=00000499.TIF
,FILE500=00000500.TIF
,FILE501=00000501.TIF
,FILE502=00000502.TIF
,FILE503=00000503.TIF
,FILE504=00000504.TIF
,FILE505=00000505.TIF
,FILE506=00000506.TIF
,FILE507=00000507.TIF
,FILE508=00000508.TIF
,FILE509=00000509.TIF
,FILE510=00000510.TIF
,FILE511=00000511.TIF
,FILE512=00000512.TIF
,FILE513=00000513.TIF
,FILE514=00000514.TIF
,FILE515=00000515.TIF
,FILE516=00000516.TIF
,FILE517=00000517.TIF
,FILE518=00000518.TIF
,FILE519=00000519.TIF
,FILE520=00000520.TIF
```

```
FILE521=00000521.TIF
,FILE522=00000522.TIF
,FILE523=00000523.TIF
,FILE524=00000524.TIF
,FILE525=00000525.TIF
,FILE526=00000526.TIF
,FILE527=00000527.TIF
,FILE528=00000528.TIF
,FILE529=00000529.TIF
,FILE530=00000530.TIF
,FILE531=00000531.TIF
,FILE532=00000532.TIF
,FILE533=00000533.TIF
,FILE534=00000534.TIF
,FILE535=00000535.TIF
,FILE536=00000536.TIF
,FILE537=00000537.TIF
,FILE538=00000538.TIF
,FILE539=00000539.TIF
,FILE540=00000540.TIF
,FILE541=00000541.TIF
,FILE542=00000542.TIF
,FILE543=00000543.TIF
```

```
FILE544=00000544.TIF
,FILE545=00000545.TIF
,FILE546=00000546.TIF
,FILE547=00000547.TIF
,FILE548=00000548.TIF
,FILE549=00000549.TIF
,FILE550=00000550.TIF
,FILE551=00000551.TIF
,FILE552=00000552.TIF
,FILE553=00000553.TIF
,FILE554=00000554.TIF
,FILE555=00000555.TIF
,FILE556=00000556.TIF
,FILE557=00000557.TIF
,FILE558=00000558.TIF
,FILE559=00000559.TIF
,FILE560=00000560.TIF
,FILE561=00000561.TIF
,FILE562=00000562.TIF
,FILE563=00000563.TIF
,FILE564=00000564.TIF
,FILE565=00000565.TIF
,FILE566=00000566.TIF
```

```
FILE567=00000567.TIF
,FILE568=00000568.TIF
,FILE569=00000569.TIF
,FILE570=00000570.TIF
,FILE571=00000571.TIF
,FILE572=00000572.TIF
,FILE573=00000573.TIF
,FILE574=00000574.TIF
,FILE575=00000575.TIF
,FILE576=00000576.TIF
,FILE577=00000577.TIF
,FILE578=00000578.TIF
,FILE579=00000579.TIF
,FILE580=00000580.TIF
,FILE581=00000581.TIF
,FILE582=00000582.TIF
,FILE583=00000583.TIF
,FILE584=00000584.TIF
,FILE585=00000585.TIF
,FILE586=00000586.TIF
,FILE587=00000587.TIF
,FILE588=00000588.TIF
,FILE589=00000589.TIF
```

```
FILE590=00000590.TIF
,FILE591=00000591.TIF
,FILE592=00000592.TIF
,FILE593=00000593.TIF
,FILE594=00000594.TIF
,FILE595=00000595.TIF
,FILE596=00000596.TIF
,FILE597=00000597.TIF
,FILE598=00000598.TIF
,FILE599=00000599.TIF
,FILE600=00000600.TIF
,FILE601=00000601.TIF
,FILE602=00000602.TIF
,FILE603=00000603.TIF
,FILE604=00000604.TIF
,FILE605=00000605.TIF
,FILE606=00000606.TIF
,FILE607=00000607.TIF
,FILE608=00000608.TIF
,FILE609=00000609.TIF
,FILE610=00000610.TIF
,FILE611=00000611.TIF
,FILE612=00000612.TIF
```

```
FILE613=00000613.TIF
,FILE614=00000614.TIF
,FILE615=00000615.TIF
,FILE616=00000616.TIF
,FILE617=00000617.TIF
,FILE618=00000618.TIF
,FILE619=00000619.TIF
,FILE620=00000620.TIF
,FILE621=00000621.TIF
,FILE622=00000622.TIF
,FILE623=00000623.TIF
,FILE624=00000624.TIF
,FILE625=00000625.TIF
,FILE626=00000626.TIF
,FILE627=00000627.TIF
,FILE628=00000628.TIF
,FILE629=00000629.TIF
,FILE630=00000630.TIF
,FILE631=00000631.TIF
,FILE632=00000632.TIF
,FILE633=00000633.TIF
,FILE634=00000634.TIF
,FILE635=00000635.TIF
```

```
FILE636=00000636.TIF
,FILE637=00000637.TIF
,FILE638=00000638.TIF
,FILE639=00000639.TIF
,FILE640=00000640.TIF
,FILE641=00000641.TIF
,FILE642=00000642.TIF
,FILE643=00000643.TIF
,FILE644=00000644.TIF
,FILE645=00000645.TIF
,FILE646=00000646.TIF
,FILE647=00000647.TIF
,FILE648=00000648.TIF
,FILE649=00000649.TIF
,FILE650=00000650.TIF
,FILE651=00000651.TIF
,FILE652=00000652.TIF
,FILE653=00000653.TIF
,FILE654=00000654.TIF
,FILE655=00000655.TIF
,FILE656=00000656.TIF
,FILE657=00000657.TIF
,FILE658=00000658.TIF
```

```
FILE659=00000659.TIF
,FILE660=00000660.TIF
,FILE661=00000661.TIF
,FILE662=00000662.TIF
,FILE663=00000663.TIF
,FILE664=00000664.TIF
,FILE665=00000665.TIF
,FILE666=00000666.TIF
,FILE667=00000667.TIF
,FILE668=00000668.TIF
,FILE669=00000669.TIF
,FILE670=00000670.TIF
,FILE671=00000671.TIF
,FILE672=00000672.TIF
,FILE673=00000673.TIF
,FILE674=00000674.TIF
,FILE675=00000675.TIF
,FILE676=00000676.TIF
,FILE677=00000677.TIF
,FILE678=00000678.TIF
,FILE679=00000679.TIF
,FILE680=00000680.TIF
,FILE681=00000681.TIF
```

```
FILE682=00000682.TIF
,FILE683=00000683.TIF
,FILE684=00000684.TIF
,FILE685=00000685.TIF
,FILE686=00000686.TIF
,FILE687=00000687.TIF
,FILE688=00000688.TIF
,FILE689=00000689.TIF
,FILE690=00000690.TIF
,FILE691=00000691.TIF
,FILE692=00000692.TIF
,FILE693=00000693.TIF
,FILE694=00000694.TIF
,FILE695=00000695.TIF
,FILE696=00000696.TIF
,FILE697=00000697.TIF
,FILE698=00000698.TIF
,FILE699=00000699.TIF
,FILE700=00000700.TIF
,FILE701=00000701.TIF
,FILE702=00000702.TIF
,FILE703=00000703.TIF
,FILE704=00000704.TIF
```

```
FILE705=00000705.TIF
,FILE706=00000706.TIF
,FILE707=00000707.TIF
,FILE708=00000708.TIF
,FILE709=00000709.TIF
,FILE710=00000710.TIF
,FILE711=00000711.TIF
,FILE712=00000712.TIF
,FILE713=00000713.TIF
,FILE714=00000714.TIF
,FILE715=00000715.TIF
,FILE716=00000716.TIF
,FILE717=00000717.TIF
,FILE718=00000718.TIF
,FILE719=00000719.TIF
,FILE720=00000720.TIF
,FILE721=00000721.TIF
,FILE722=00000722.TIF
,FILE723=00000723.TIF
,FILE724=00000724.TIF
,FILE725=00000725.TIF
,FILE726=00000726.TIF
,FILE727=00000727.TIF
```

```
FILE728=00000728.TIF
,FILE729=00000729.TIF
,FILE730=00000730.TIF
,FILE731=00000731.TIF
,FILE732=00000732.TIF
,FILE733=00000733.TIF
,FILE734=00000734.TIF
,FILE735=00000735.TIF
,FILE736=00000736.TIF
,FILE737=00000737.TIF
,FILE738=00000738.TIF
,FILE739=00000739.TIF
,FILE740=00000740.TIF
,FILE741=00000741.TIF
,FILE742=00000742.TIF
,FILE743=00000743.TIF
,FILE744=00000744.TIF
,FILE745=00000745.TIF
,FILE746=00000746.TIF
,FILE747=00000747.TIF
,FILE748=00000748.TIF
,FILE749=00000749.TIF
,FILE750=00000750.TIF
```

```
FILE751=00000751.TIF
,FILE752=00000752.TIF
,FILE753=00000753.TIF
,FILE754=00000754.TIF
,FILE755=00000755.TIF
,FILE756=00000756.TIF
,FILE757=00000757.TIF
,FILE758=00000758.TIF
,FILE759=00000759.TIF
,FILE760=00000760.TIF
,FILE761=00000761.TIF
,FILE762=00000762.TIF
,FILE763=00000763.TIF
,FILE764=00000764.TIF
,FILE765=00000765.TIF
,FILE766=00000766.TIF
,FILE767=00000767.TIF
,FILE768=00000768.TIF
,FILE769=00000769.TIF
,FILE770=00000770.TIF
,FILE771=00000771.TIF
,FILE772=00000772.TIF
,FILE773=00000773.TIF
```

```
FILE774=00000774.TIF
,FILE775=00000775.TIF
,FILE776=00000776.TIF
,FILE777=00000777.TIF
,FILE778=00000778.TIF
,FILE779=00000779.TIF
,FILE780=00000780.TIF
,FILE781=00000781.TIF
,FILE782=00000782.TIF
,FILE783=00000783.TIF
,FILE784=00000784.TIF
,FILE785=00000785.TIF
,FILE786=00000786.TIF
,FILE787=00000787.TIF
,FILE788=00000788.TIF
,FILE789=00000789.TIF
,FILE790=00000790.TIF
,
```